# परमहंस योगानंद



Complete Edition with over 80 archival photos.

# योगी कथामृत


Yogoda Satsanga Society of India

FOUNDED 1917


Paramahansa Yogananda

YOGODA SATSANGA SOCIETY OF INDIA

eBook


परमहंस योगानंद
Complete Edition with over 80 archival photos.
योगी कथामृत
YOGODA SATSANGA SOCIETY OF INDIA
eBook
Yogoda Satsanga Society of India
FOUNDED 1917
Paramahansa Yogananda

# परमहंस योगानंद



# योगी कथामृत

Yogoda Satsanga Society of India
FOUNDED 1917
Paramahansa Yogananda



**श्री श्री परमहंस योगानंद**

जानेवारी 5, 1893—मार्च 7, 1952

एक प्रेमावतार

# योगी कथामृत

(*Autobiography of a Yogi*)

**श्री श्री परमहंस योगानंद**

प्रस्तावना

**डब्ल्यू. वाय. इव्हॅन्स वेंट्झ**

एम. ए., डी. लिट., डी. एससी.

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन॥
—श्रीमद्भगवद्गीता ६:४६

Yogoda Satsanga Society of India
FOUNDED 1917
Paramahansa Yogananda

# कॉपीराईट

Copyright © 2005 Self-Realization Fellowship

सर्वाधिकार सुरक्षित. पुस्तकाच्या समालोचनासाठी संक्षिप्त उताऱ्यां व्यतिरिक्त योगी कथामृत *(Autobiography of a Yogi)* च्या कोणत्याही भागाची प्रतिकृती, संग्रह, संचारण व प्रदर्शन करणे-कोणत्याही प्रकारात किंवा कोणत्याही माध्यमातून (इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल वा इतर कोणाही) सद्या अस्तित्वात किंवा यानंतर बनविलेल्या—फोटोकॉपी, रेकॉर्डिंग वा कोणाही माहिती-संग्रह व पुन:प्राप्ती प्रणाली सहित—यास Self-Realization Fellowship, 3880 San Rafael Avenue, Los Angeles, California 90065-3219, U.S.A. च्या लिखित अनुमति शिवाय मनाई आहे.

*Autobiography of a Yogi* has been published in English, Hindi, Bengali, Gujarati, Kannada, Malayalam, Marathi, Nepali, Odia, Sanskrit, Tamil, Telugu, Urdu, Arabic, Danish, Dutch, Finnish, French, German, Greek, Icelandic, Italian, Japanese, Polish, Portuguese, Russian, Spanish, and Swedish.

The trade dress of this book is a trademark of
Self-Realization Fellowship

Published in India by
Yogoda Satsanga Society of India
Yogoda Satsanga Math
21, U.N. Mukherjee Road
Dakshineswar, Kolkata 700 076

ISBN 978-81-902562-5-4 (quality paperback)

ISBN 978-93-83203-55-0 (Kindle edition)

योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/
सेल्फ-रियलायझेशन फेलोशिपचे अधिकृत प्रकाशन

# वाचकासाठी टीप

श्री श्री परमहंस योगानंदांच्या आत्मचरित्राची संपूर्ण असंदिग्ध आवृत्ति इलेक्ट्रॉनिक स्वरूपात, भारत आणि शेजारच्या देशांच्या वाचकांना, त्यांच्या वैयक्तिक वाचनासाठी येथे प्रस्तुत करण्यात योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया आपले अहोभाग्य समजते.

योगी कथामृतच्या ह्या डिजिटल आवृत्तिच्या निर्मितीच्या हरएक तपशीलाकडे आमच्या कर्मचाऱ्यांनी विशेष लक्ष दिले आहे आणि आम्ही अपेक्षा करतो की ते प्रयास आमच्या वाचकांच्या फायदेकारक वाचन-अनुभवास परिणामी ठरतील. तुम्ही हे पुस्तक ज्या वितरण कंपनीकडून मिळविले आहे, केवळ तिने ठरविलेल्या अटीं गृहीत धरून, तुम्ही ह्या आवृत्तिच्या प्रती तुमच्या कितीही डिजिटल साधनांवर तुमच्या व्यक्तिगत, बिन-व्यावसायिक वापरासाठी डाऊनलोड करू शकता (आणि तुमच्या वैयक्तिक आवश्यकतेनुसार ह्यातील कोणतेही उद्धरण तुमच्या संदर्भासाठी प्रिंट करू शकता).

कृपया हे लक्षात घ्या, किंबहुना, ही आवृत्ति प्राप्त केल्यावर लागू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय, ग्रंथावरील मालकी हक्क (कॉपीराईट) कायद्याच्या पालनास वाचक संमती दर्शवितो, आणि ह्या पुस्तकातील सामग्रीचे, प्रथम प्रकाशकाची लिखित परवानगी घेतल्याशिवाय, कोणत्याही माध्यमाद्वारे (इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल, किंवा इतर) दुसऱ्या व्यक्तींसाठी अथवा गोष्टींसाठी पुनर्निर्माण आणि/किंवा प्रक्षेपण करण्यापासून वाचक स्वत:स दूर ठेवील. लेखकाच्या कार्याची अखंडता राखण्यासाठी ह्या नियमांचे पालन करून मदत करण्यातील आपल्या विचारशीलतेची आम्ही कदर करतो.

आमचे संस्थापक श्री श्री परमहंस योगानंदांच्या आध्यात्मिक वारश्याशी संबंधित आमच्या प्रकाशनाच्या प्रयत्नांना समर्थन दिल्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

तुमच्या अत्युत्तम वाचन-अनुभवासाठी आमच्या शुभेच्छा,
योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया

# श्री श्री परमहंस योगानंदांचा आध्यात्मिक वारसा

*त्यांचे संपूर्ण लिखाण, प्रवचने आणि अनौपचारिक व्याख्याने*

परमहंस योगानंदांनी, त्यांच्या शिकवणुकींचा जगभर प्रसार करण्यासाठी आणि त्यांची शुद्धता व अखंडत्व पुढच्या पिढींसाठी राखून ठेवण्यासाठी १९१७ मध्ये योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया (वाय.एस.एस.)ची आणि १९२० मध्ये सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप (एस.आर.एफ.)ची स्थापना केली. अमेरिकेतील त्यांच्या अगदी सुरुवातीच्या वर्षांपासूनच फलप्रद लेखक आणि व्याख्याता असलेल्या योगानंदांनी ध्यानाच्या योग शास्त्रावर, संतुलित जीवनाच्या कलेवर, आणि सर्व महान धर्मांतील मूलभत ऐक्यावर प्रख्यात आणि विशाल साहित्य कार्य निर्माण केले. जगभरच्या लाखो सत्यशोधकांना प्रेरित करीत हा अद्वितिय आणि दूरपर्यंत पसरलेला आध्यात्मिक वारसा आजही पुढे चालूच आहे.

ह्या महान गुरुच्या व्यक्त इच्छांशी सुसंवाद राखत योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप ने परमहंस योगानंदांचे संपूर्ण कार्य प्रकाशित करण्याचे आणि कायम मुद्रणात ठेवण्याचे अविरत कार्य पुढे चालूच ठेवले आहे. त्यात योगानंदांनी आपल्या कालावधीत प्रकाशित केलेल्या सर्व पुस्तकांच्या शेवटच्या आवृत्तीच नव्हे, तर अनेक नवीन शीर्षकांचा—कार्यांचा समावेश आहे जे १९५२ मध्ये त्यांच्या निर्वाणाच्या वेळेत अप्रकाशित राहिले, किंवा जे योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप च्या नियतकलिकांमध्ये कित्येक वर्षे मालिकेच्या रूपात अपूर्ण स्वरूपात प्रकाशित केले गेले, तसेच शेकडो नितांत प्रेरणादायक प्रवचने आणि अनौपचारिक व्याख्याने ज्यांची नोंद करून ठेवली गेली पण त्यांच्या निर्वाणाच्या वेळेपर्यंत प्रकाशित झाले नाहीत.

परमहंस योगानंदांनी स्वतः आपल्या त्या जवळच्या शिष्यानां निवडले आणि त्यांना प्रशिक्षण दिले जे त्यांच्या निर्वाणानंतर योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रियलायझेशन च्या प्रकाशन मंडळाच्या अध्यक्षपदी राहिले आहेत. त्यांना त्यांनी आपल्या शिकवणुकींच्या तयारी आणि प्रकाशनासाठी विशेष मार्गदर्शक सूचना दिल्या. वाय.एस.एस./एस.आर.एफ. च्या प्रकाशन मंडळाचे सदस्य (संन्यासी आणि संन्यासिनी, ज्यांनी जीवनभरासाठी संन्यास आणि निस्वार्थ सेवेच्या शपथा घेतल्या आहेत) ह्या मार्गदर्शक

सूचनांचा पवित्र जबाबदारी जाणून आदर करतात, जेणेकरून ह्या प्रिय जगत-गुरुचा जागतिक संदेश त्याच्या मूळ सामर्थ्यात आणि अस्सलपणात जिवित राहिल.

योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रियलायझेशन फेलोशिपचे चिन्ह (आधीच्या पृष्ठावर दर्शविले आहे) परमहंस योगानंदांनी आपल्या शिकवणुकींचे अधिकृत स्त्रोत म्हणून स्थापित विना-नफा संस्थेच्या ओळखीसाठी नियुक्त केले. वाय.एस.एस./एस.आर.एफ. नाव आणि चिन्ह वाय.एस.एस./एस.आर.एफ. ची सर्व प्रकाशने आणि रेकॉर्डिंग्स वर आढळतात, वाचकाला हा विश्वास देत की ते कार्य परमहंस योगानंद स्थापित संस्थेकडून अस्तित्वात आले आहे, आणि त्यांच्या शिकवणुकी त्यांच्या सुचनेनुसारच व्यक्त केल्या गेल्या आहेत.

—योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप

*माझे परम आराध्य, ईशकृपाप्राप्त, परमपूज्य गुरू*
*श्री श्री स्वामी श्रीयुक्तेश्वर गिरिजी महाराजांचे*
*करकमली समर्पित*

# लेखकाचे आभार

ह्या पुस्तकाच्या पांडुलिपि वर दीर्घ संपादकीय श्रमासाठी मी सुश्री एल. वी. प्रॅट (तारा माता) यांचा मनापासून ऋणी आहे. मी श्री सी. रिचर्ड राईट ला पण धन्यवाद देतो की त्यांनी मला त्यांच्या भारत यात्रा रोजनिशी मधून उतारे वापरण्याची परवानगी दिली. मी डॉ. डब्ल्यू. वाय. इव्हॅन्स वेंट्झ चा, केवळ त्यांच्या प्रस्तावने साठीच नाही तर त्यांनी दिलेल्या सल्ल्यांसाठी आणि प्रोत्साहनां साठी सुद्धा, आभारी आहे.

परमहंस योगानंद

ऑक्टोबर 28, 1945

# अनुक्रमणिका


कॉपीराईट
लेखकाचे आभार
चित्रसूची
प्रस्तावना
योगी कथामृत चे जगव्यापी अभिनंदन
परिचय
1. माझे मातापिता आणि पूर्वायुष्य
2. माझा मातृवियोग आणि मांत्रिक ताईत
3. द्विदेहि संत
4. माझ्या हिमालयाच्या पलायनात विघ्न
5. ‘गंधबाबांचे’ चमत्कार-प्रदर्शन
6. व्याघ्रस्वामी
7. लघिमासिद्ध संत
8. भारताचे महान शास्त्रज्ञ, जगदीशचंद्र बोस
9. आनंदमूर्ति भक्त व त्याच्या विश्वलीला
10. माझे गुरू श्रीयुक्तेश्वर यांची व माझी भेट
11. वृंदावनात दोन निर्धन बालक
12. गुरुजींच्या आश्रमातील माझी काही वर्षे
13. नित्य जागृत संत
14. समाधीची अनुभूती
15. फुलकोबीची चोरी
16. ग्रहांवरती मात
17.शशी आणि तीन नीलम रत्ने
18. एक मुसलमान जादूगार
19. माझे गुरू कलकत्त्यात असूनही सेरामपूरमध्ये प्रकट होतात
20. काश्मीर यात्रेला व्यत्यय
21. आम्ही काश्मीरला जातो
22. पाषाणहृदय मूर्ती
23. मला विश्वविद्यालयाची पदवी मिळते

24. स्वामी परंपरे मध्ये माझे संन्यास ग्रहण
25. अनंतदादा व बहीण नलिनी
26. क्रियायोगाचे शास्त्र
27. रांची येथे योगविद्यालयाची स्थापना
28. काशीचा पुनर्जन्म व शोध
29. रवींद्रनाथ आणि मी आपापल्या शाळांची तुलना करतो
30. चमत्कारांचे नियम
31. पूज्य माताजींशी झालेली मुलाखत
32. राम पुनः जिवंत होतो
33. बाबाजी — आधुनिक भारताचे महावतार
34. हिमालयामध्ये प्रासाद निर्माण
35. लाहिरी महाशयांचे अवतार सदृश जीवन
36. बाबाजींना वाटणारी पाश्चिमात्य जगाबद्दलची आस्था
37. मी अमेरिकेस जातो
38. ल्यूथर बरबँक—गुलाबबागेतील संत
39. कॅथॉलिक महिला थेरेसा नॉयमन
40. मी हिंदुस्थानात परत येतो
41. दक्षिण हिंदुस्थानातील प्रवास
42. गुरुजींच्या सहवासातील शेवटले दिवस
43. श्रीयुक्तेश्वर महाराजांचे पुनरुत्थान
44. वर्ध्यात महात्मा गांधींबरोबर
महात्मा गांधींच्या पवित्र स्मृतीस
45. बंगाली आनंदमयी मा
46. निराहारी योगिनी
47. माझे पश्चिमेस प्रत्यागमन
48. कॅलिफोर्निआमधील एन्सिनिटासमध्ये
49. १९४०-१९५१चा काल
महान योगी — आजीव व मरणोत्तरही
गुरु परंपरा
उद्देश्य आणि आदर्शयोगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया
परमहंस योगानंदाच्या क्रिया योग वरील शिकवणींची अतिरिक्त संसाधने
Yogoda Satsanga Lessons

# चित्रसूची

*लेखक (मुखचित्र)*
श्री योगानंदांच्या मातोश्री, श्रीमती ज्ञान प्रभा घोष
श्री योगानंदांचे वडील, श्री भगवती चरण घोष
योगानंद—वय वर्षे सहा
अनंत, योगानंदांचे वडील बंधू
श्री योगानंदांची मोठी बहीण उमा आपल्या लहानपणांत, गोरखपूर
श्री योगानंदांच्या बहीणीः उमा, रोमा आणि नलिनी
स्वामी प्रणवानंद वाराणसीचे “द्विदेही संत”
स्वामी केवलानंद श्री योगानंदांचे प्रिय संस्कृतचे शिक्षक
नागेंद्र नाथ भादुरी “लघिमासिद्ध संत”
जगदीश चंद्र बोस, महान भारतीय शास्त्रज्ञ
मास्टर महाशय (महेंद्र नाथ गुप्त)
स्वामी ज्ञानानंद आणि श्री योगानंद
श्रीयुक्तेश्वर, योगानंदांचे गुरु
योगानंदजी, त्यांच्या वडिलांनी दिलेल्या मोटरसायकलच्या मागील सीटवर, 1915
जितेन्द्र मजुमदार, वृंदावनचा सोबती
श्रीयुक्तेश्वरांचे ध्यान मंदिर, सेरामपूर
राम गोपाल मजुमदार “नित्य जागृत संत”
श्रीयुक्तेश्वर पद्मासनामध्ये
पुरी येथील समुद्राकाठी असलेला स्वामी श्रीयुक्तेश्वरजींचा आश्रम
श्री योगानंद वयाच्या सोळाव्या वर्षी
आंतरराष्ट्रीय मुख्यालय, सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिप/योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया
श्री श्री राजर्षि जनकानंद, भूतपूर्व अध्यक्ष (1952-55) योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिप
श्री श्री दया माता, भूतपूर्व अध्यक्षा (1955-2010) योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिप
श्री श्री मृणालिनी माता, सध्याच्या अध्यक्षा आणि आध्यात्मिक प्रमुख योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिप
श्री योगानंद आणि त्यांचे चुलत भाऊ, प्रभास चंद्र घोष

श्री परमहंस योगानंदांचे पारिवारीक घर, गरपार रोड, कोलकाता
श्री जगद्गुरु शंकराचार्य, यो. स. सो./एस. आर. एफ. मुख्यालयामध्ये, 1958
श्री श्री दया माता ईश्वरी तादात्म्यमध्ये
एक पाश्चिमात्य, श्री राजर्षि जनकानंद (जेम्स जे. लिन्न) समाधि मध्ये
योगदा शाखा मठ आणि आश्रम, राँची
काशी, रांची विद्यालयाचा विद्यार्थी
रवीन्द्रनाथ टागोर
शंकरी माई जिउ, त्रैलंग स्वामींची शिष्या, 1938
हिमालयाच्या पायथ्याशी, द्वाराहाट जवळ यो.स.सो.चा आश्रम व एकांताश्रम
लाहिरी महाशय
महावतार बाबाजी, लाहिरी महाशयांचे गुरु
महावतार बाबाजींचे काही काळ वास्तव्य असलेली गुहा
लाहिरी महाशय, श्रीयुक्तेश्वरांचे गुरु
पंचानन भट्टाचार्य, लाहिरी महाशयांचे शिष्य
परमहंस योगानंद स्मृति मंदिर
श्री योगानंदांचा पासपोर्ट फोटो, 1920
काँग्रेस ऑफ रेलिजंसचे प्रतिनिधी, बोस्टन, 1920
श्री योगानंद अलास्काच्या दिशेने, ग्रीष्मकाल, 1924
डेनवर, कोलोरॅडो येथे योग वर्ग
योग विद्यार्थ्यांचा वर्ग, लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया, 1925
ईस्टरच्या दिवशी सुर्योदयाच्या वेळची प्रार्थनासभा, यो. स. सो./एस. आर. एफ. आंतरराष्ट्रीय मुख्यालय, 1925
श्री योगानंद जॉर्ज वॉशिंग्टनच्या शवकक्षा जवळ, 1927
श्री योगानंद व्हाईट हाऊस मध्ये
मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष एमिलिओ पॉर्तेस गील योगानंदांबरोबर, 1929
श्री योगानंद सोचिमिल्को सरोवरापाशी, मेक्सिको, 1929
ल्यूथर बरबँक आणि योगानंदजी, सांता रोझा, 1924
थेरेसा नॉयमन, सी. आर. राइट आणि श्री योगानंद, 1935
श्रीयुक्तेश्वर आणि श्री योगानंद, कोलकाता, 1935
सेरामपूर आश्रमाच्या भोजनाच्या बाल्कनीमध्ये भक्त मंडळी, 1935
श्री योगानंद आणि सोबती मुथरेतील यमुना नदीवर, 1935
श्री योगानंद दामोदर येथे, हिन्दुस्तान, 1935

श्री योगानंद आदिवासी मुलींच्या शाळेपाशी, रांची, 1936
श्री योगानंद मुलांच्या शाळेपाशी, रांची, 1936
योगदा सत्संग मठ, दक्षिणेश्वर
रमण महर्षी आणि श्री योगानंद
श्री युक्तेश्वर आणि श्री योगानंद धार्मिक मिरवणुकीत, 1935
कृष्णानन्द माणसाळवलेल्या सिंहीणीसह कुंभ मेळ्यामध्ये, 1936
श्री योगानंद आणि त्यांचे सेक्रेटरी सी. रिचर्ड राइट स्वामी केशवानंदांच्यासह, वृंदावन, 1936
सेरामपूर आश्रमाच्या आवारामध्ये भक्त मंडळी, 1935
योगाचा वर्ग, कोलकता येथे, 1935
श्री युक्तेश्वर यांचे समाधी मंदिर, पुरी
महात्मा गांधीं आणि श्री योगानंद, वर्धा आश्रम, 1935
आनंदमयी मा आणि परमहंस योगानंद
श्री योगानंद ताजमहल जवळ, आग्रा, 1936
गिरिबाला, बंगालच्या निराहारी संत
श्री श्री परमहंस योगानंद, बॉस्टन, 1922
परमहंस योगानंद आणि श्री राजर्षि जनकानंद, 1933
परमहंस योगानंद आणि श्री दया माता, 1939
सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप आश्रम, एन्सिनिटास, कॅलिफोर्निआ
श्री योगानंद एन्सिनिटास येथील एस. आर. एफ. आश्रमाच्या भमीवर, 1940
श्री योगानंद, सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप, लेक श्राइन येथे, 20 ऑगस्ट, 1950
सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप, लेक श्राईन व गांधी विश्वशांती स्मारक
कॅलिफोर्नियाचे लेफ्ट. गव्हर्नर, माननिय गुडविन जे. नाईट, योगानंदांच्या समवेत, इंडिया सेंटरच्या उद्घाटनाच्यावेळी, 1951
श्री योगानंद, एन्सिनिटास, कॅलिफोर्निया, 1950
भारताचे राजदूत, श्री बी. आर. सेन, एस. आर. एफ. आंतरराष्ट्रीय मुख्यालयामध्ये, 1952
श्री योगानंद, त्यांच्या महासमाधीपूर्वी एक तास अगोदर, 7 मार्च, 1952
परमहंस योगानंदांच्या सन्मनार्थ भारत सरकारने काढलेले स्मृति-तिकिट

# प्रस्तावना

डब्ल्यू वाय. इव्हॅन्स वेंट्झ, एम. ए., डी. लिट., डी. एससी.,
जीजस कॉलेज, ऑक्सफर्ड
व 'तिबेटन योग ॲण्ड सीक्रेट डॉक्ट्रिन्स,' 'तिबेटस् ग्रेट योगी मिलरेपा,'
'दि तिबेटन बुक ऑफ दि डेड्,' वगैरे पुस्तकांचे लेखक-ग्रंथकार.

योगानंदांच्या ह्या आत्मचरित्राचे मूल्य एका दृष्टीने अधिकच वाढलेले आहे. ती अशीः इंग्लिश भाषेत अशी पुस्तके थोडी आहेत. हे पुस्तक भारतातील सिद्धपुरुषांच्या हकीकतीवरील असून ते कोणी वृत्तपत्र-व्यावसायिकाने किंवा परकीय लेखकाने लिहिलेले नसून त्याचा लेखक हा त्या सिद्धपुरुषांच्या मालिकेतील असून त्याची योगसाधनाही तशीच आहे. ह्या पुस्तकात अर्वाचीन कालातील हिंदू संत-पुरुषांच्या प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या हकीकती त्यांच्या लोकविलक्षण जीवनक्रमांचे व त्यांच्या सिद्धिसामर्थ्याचे वर्णन आहे. त्यामुळे या पुस्तकाचे महत्त्व केवळ आजच नाही तर अनंतकाळ टिकणारे असे आहे. ह्या पुस्तकाच्या सुविख्यात लेखकाशी भारतात व अमेरिकेमध्ये माझा परिचय झालेला होता हे मी माझे मोठे भाग्य समजतो. लेखकाच्या ह्या असामान्य कृतीचे वाचकाने कौतुक करावे व त्याच्याबद्दल आपली कृतज्ञता दर्शवावी. लेखकाच्या ह्या लोकविलक्षण जीवनआलेखाची खरोखरीच अशा ग्रंथांमध्ये गणना होते की, जे हिंदुमात्राच्या मनाचे व हृदयाच्या अंतरंगाचे मोठ्या प्रमाणावर यथातथ्य दिग्दर्शन करून देतात, आणि जे ग्रंथ भारताची आध्यात्मिक संपत्ती किती उच्च कोटीची आहे हे व्यक्त करतात. पाश्चिमात्य जगात असे ग्रंथ क्वचितच प्रसिद्ध होतात.

ह्या जीवनचरित्रात ज्या संत-महात्म्यांचे वर्णन आले आहे त्यांपैकी युक्तेश्वर गिरी यांच्या दर्शनाचे सद्भाग्य मला लाभलेले होते. माझ्या 'तिबेटन योग ॲण्ड सीक्रेट डॉक्ट्रिन्स' [1] या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर जे चित्र दिले आहे त्या चित्रात या पूजनीय संतमहात्म्याचे मुखचित्र आले आहे. श्रीयुक्तेश्वरांशी माझी भेट, बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावर ओरिसामध्ये पुरीला झाली. समुद्रकिनाऱ्यावरील एका प्रशांत आश्रमाचे ते त्या वेळी प्रमुख होते. तेथील काही तरुण शिष्यांना आध्यात्मिक साधनेचे शिक्षण देण्याचा त्यांचा मुख्य उद्योग होता. परमहंस योगानंद हे त्यांचे प्रमुख शिष्य. त्यांच्यावर त्यांचे नितांत प्रेम. त्यांनी त्यांना १९२० मध्ये दूत प्रचारक म्हणून पश्चिमेकडे पाठविले. कॅलिफोर्नियासारख्या अगदी दूर भागात त्यांनी जे कार्य चालविलेले होते, त्याबद्दल त्यांनी मला बरेच प्रश्न विचारले.

श्रीयुक्तेश्वरांची मुद्रा व आवाज सौम्य होता. त्यांच्या सहवासात, सान्निध्यात आनंद वाटायचा. त्यांचे अनुयायी त्यांच्याबद्दल सहजरीत्या उत्स्फूर्त असा जो आदर दाखवीत त्यास ते सर्वथैव योग्य होते. त्यांची ज्याला ओळख झालेली आहे, असा प्रत्येक मनुष्य, मग तो त्यांच्या.

स्वतःच्या समाजापैकी असो की नसो, त्यांच्याबद्दल अत्यंत आदर दाखवीत असे. मला त्यांची ती उंच, सडपातळ, सर्वसंगपरित्याग करून, इहलोकीच्या सर्व वासनांचा त्याग करून भगवी वस्त्रे परिधान केलेली, आश्रमाच्या दरवाजात माझे स्वागत करण्यासाठी म्हणून उभी

राहिलेली मूर्ती स्पष्ट, अगदी डोळ्यांसमोर आलेली, अशी आठवते. त्यांचे केस लांब व किंचित कुरळे होते. चेहऱ्यावर दाढी होती. त्यांचे शरीर पीळदार पण शरीरयष्टी सडपातळशी होती. अवयव सुबद्ध व रेखीव; आणि त्यांची चाल डौलदार असे. पुरीसारख्या पवित्र शहरी त्यांनी भूलोकातील आपल्या वास्तव्याचे निवासस्थान निवडलेले होते. पुरीला दररोज असंख्य हिंदू यात्रेकरू, हिंदुस्थानाच्या कानाकोपऱ्यातून, प्रत्येक प्रांतातून जगन्नाथाच्या दर्शनाकरिता मंदिरात येतात. १९३६ मध्ये पुरीलाच श्रीयुक्तेश्वरांनी आपल्या क्षणभंगुर शरीराच्या देखाव्या पासून आपले मानवी डोळे कायमचे मिटले आणि देह त्याग केला. ही जाणीव घेऊन कि त्यांचे हे अवतरण यशस्वीपणे पुरे झाले आहे.

श्रीयुक्तेश्वरांच्या उदात्त व्यक्तित्त्वाबद्दल व पावित्र्याबद्दल माझी जी खात्री झाली होती ती नमूद करण्यास मला फार आनंद वाटतो. जनसंमर्दापासून दूर राहून त्यांनी निःसंकोचपणे व एकांतात शांततापूर्ण, असे एक आदर्श जीवन व्यतीत केले. जसे त्यांचे शिष्य परमहंस योगानंद यांनी भावी युगांकरिता म्हणून आता वर्णिले आहे.

1 ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९५८

# योगी कथामृत चे
# जगव्यापी अभिनंदन

"दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या हजारो पुस्तकांमध्ये, मनोरंजनात्मक, अनुदेशात्मक, आणि आत्मिक नैतिक दृष्ट्या बोधकारक पुस्तक असतात. हे तिन्ही हेतु पुरे करणारे एक पुस्तक मिळाल्यावर वाचक स्वतःला भाग्यवान समजू शकतो. ह्या अर्थी 'योगी कथामृत' आज ही दुर्मिळ आहे....एक पुस्तक जे मन आणि आत्म्याच्या ज्ञानाचा मार्ग उघडून देते."

***—इण्डिया जर्नल***

"एक दुर्लभ वृत्तान्त."

***—न्यूयॉर्क टाईम्स***

"हा ग्रंथ कधी न ऐकलेल्या अशा महान व्यक्तित्वांचे आकर्षक जीवन, अशा अप्रतिम सामर्थ्य व स्पष्टतेने व्यक्त करतो कि सुरूवाती पासून शेवट पर्यंत वाचक श्वास धरुन बसतो....हा ग्रंथ असे निर्विवाद पणे सिद्ध करुन देतो कि मनुष्याचे केवळ मानसिक व आध्यात्मिक प्रयत्नच चिरस्थायी असतात, आणि मनुष्यास आपल्या अंतस्थ शक्तीने बाह्य भौतिक अडचणींवर विजय मिळविता येतो....ह्या ग्रंथात आध्यात्मिक क्रांति घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे, हे श्रेय ह्या ग्रंथास आपण दिले पाहिजे."

***—शेल्सविग-होस्टनिशे टागेजपोस्ट,*** *जर्मनी*

"....एक संस्मरणीय कृती."

***—शेफील्ड टेलीग्राफ,*** *इंग्लँड*

"सखोल मानवी वृत्तान्ताचे शुद्ध प्रदर्शन....मानव जाति ला स्वतःला

अधिक चांगल्या प्रकारे समजण्यात मदतगार होईल....योगी कथामृत आपल्या सर्वोच्च स्वरुपात....स्तब्ध करणारे आहे....एखाद्या कादंबरीप्रमाणे

चित्ताकर्षक....आह्लादकारी विनोद आणि लक्षवेधक प्रामाणिकपणे वर्णिलेले....हे पुस्तक अगदी अनुकूल वेळी आले आहे."

***—न्यूज-सेन्टिनेल, इंडियाना,*** *यू.एस.ए.*

"या पुस्तकाची विषय-सामग्री असामान्य आहे....तत्त्वज्ञानविषयक अंश अतिशय रुचिकर आहेत. योगानंद धार्मिक मतान्तरांहून वर आध्यात्मिक पातळीवर आहेत."

***—चायना वीकली रिव्ह्यू,*** *शंघाई*

"एक अत्यंत वाचनीय शैली मध्ये....योगानंदांनी योगा विषयीचा एक खात्री करुन देणारा दावा मांडला आहे, आणि जे ह्याच्या 'उपहासासाठी' आले ते 'प्रार्थनाच करत' बसू शकतात."

*—सॅन फ्रांसिस्को क्रॉनिकल*

“एक चित्ताकर्षक आणि स्पष्टपणे व्याख्यीयलेले अध्ययन.”

***—न्यूजवीक***

“या शतकातील सर्वात गहन आणि महत्त्वाच्या उपदेशांपैकी एक.”

***—नेव टेल्टा झेतुंग,*** *ऑस्ट्रिया*

“सर्वात आकर्षकपणे सरळ आणि स्वतःला उजागर करणाऱ्या जीवन-वृत्तांतां पैकी एक....प्रगाढ ज्ञानाची प्रचीती करुन देणारा एक खजिना....ह्या पुस्तका मध्ये वाचक ज्या महान व्यक्तित्त्वांना भेटतो....ते अशा मित्रांप्रमाणे स्मृति मध्ये पुनः पुनः परत येतात, ज्यांनी समृद्ध आध्यात्मिक ज्ञान कायमचे कमावून घेतले आहे, आणि या महानतम व्यक्तित्त्वां मधलाच एक ईश्वरोन्मत्त लेखक स्वतः आहे....अद्वितीय....एक महान आत्म्याचे एक उत्कृष्ट दर्शन.”

***—डॉ. अना वॉन हेलम्होल्टज-फेलन,*** *युनिवर्सिटी ऑफ मिनेसोटा, यू.एस.ए.*

“योगानंद अमर संतांविषयी आणि आश्चर्यकारक रोगनिदानां विषयी बोलत असो कि मग ते भारतीय ज्ञान आणि योग विज्ञानाचे प्रेषण करत असो, वाचक मंत्रमुग्ध होऊन जातो.”

***—दिए वेल्टवॉश, झ्यूरिच,*** *स्विटझरलँड*

“हे असे पुस्तक आहे ज्याच्या द्वारे वाचक....त्याच्या विचार क्षितिजाला अनंतत्वात विस्तारित झालेले पाहील, आणि अनुभवेल कि त्याचे हृदय वर्ण व जातिचा विचार न करता संपूर्ण मानव मात्रा साठी स्पंदित होऊ शकते. हे एक असे पुस्तक आहे ज्याला आम्ही ईश्वरीय प्रेरणा प्राप्त असे म्हणू शकतो.”

***—एलेफ्थेरिआ,*** *ग्रीस*

“सुप्रसिद्ध योगी कथामृत (योगानंदांच्या) या पुस्तकात, त्यांनी योगाभ्यासाच्या उंच पातळींवर पोहोचून ‘ब्रह्म चैतन्याचे’ अप्रतिम वृत्तान्त आणि योग व वेदान्ता च्या दृष्टीने मानवी स्वभावावर पुष्कळसे महत्त्वाचे यथार्थ चित्र दर्शविले आहेत.”

***—रॉबर्ट एस. ऐलवुड, पि.एच.डी., स्कूल ऑफ रिलिजन,*** *युनिवर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्निया*

“योगी जगाबरोबर हा नूतन झालेला संबंध, भौतिक वास्तविकतेवर ह्याची मानसिक उच्चता, आणि ह्याचे आध्यात्मिक अनुशासन, माझ्यासाठी फार उदबोधक राहिले आहे, आणि ह्या मोहक जगाला समजण्याची काहीशी दृष्टि दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.”

***—थॉमस मॅन,*** *नोबल पुरस्कार विजेता*

“परमहंस योगानंद....एक असं व्यक्तिमत्व ज्यांची प्रेरणा जगाच्या प्रत्येक भागात आदरपूर्वक स्वीकारल्या गेली आहे.”

***—राईडर्स रिव्यू,*** *लंडन*

# परिचय

*“परमहंस योगानंदांच्या भेटीचा अनुभव माझ्या स्मृतीमध्ये, माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय घटना म्हणून कोरला गेला आहे.... मी जेव्हा त्यांच्या चेहेऱ्याकडे पाहिले, तेव्हा माझे डोळे तेजाने जवळजवळ दिपूनच गेले, आध्यात्मिक तेज जे त्यांच्याकडून अक्षरशः प्रकाशित होत होते. त्यांची असीम सभ्यता, त्यांचा आनंदपूर्ण दयाळूपणा ह्यांनी मी जणू उबदार प्रकाशात न्हाऊन निघालो..... मी पाहत होतो की ते दिव्य पुरुष असूनही त्यांची समज आणि सूक्ष्मदृष्टि अतिशय सांसारिक प्रश्नांपर्यंत सुद्धा विस्तारित होती. मला त्यांच्यामध्ये भारताच्या प्राचीन ज्ञानाचे मूलतत्व घेऊन, त्याचा प्रसार करणारा भारतभूमीचा खरा राजदूत आढळून आला.”*

—डॉ. बिनय रं. सेन,
अमेरिकेतील भूतपूर्व भारतीय राजदूत

परमहंस योगानंदांशी ज्यांची व्यक्तीगत ओळख झाली होती, त्यांच्यासमोर त्यांचे जीवन व अस्तित्व, हे त्यांनी जगापुढे सादर केलेल्या प्राचीन ज्ञानाचे सामर्थ्य आणि सत्यता यांचे एक जिवंत उदाहरणच होते. त्यांचे आत्मचरित्र ज्यांनी वाचले आहे असे असंख्य वाचक सांगतात की आध्यात्मिक सामर्थ्याचे जे तेज त्यांच्याकडून प्रसारित होते, तेच त्यांच्या आत्मचरित्रातील पानांमध्ये अनुभवास येते. साठ वर्षांपूर्वी, जेव्हा हे पुस्तक मुद्रण होऊन आले तेव्हा निसंशय श्रेष्ठ कलाकृती म्हणून ते गौरवले गेले. हे पुस्तक केवळ एका निर्विवाद श्रेष्ठ जीवनाची कहाणी म्हणूनच नव्हे, तर पूर्वेकडील आध्यात्मिक विचार, विशेषतः परमेश्वराशी व्यक्तीचे साधणारे थेट सख्य, ह्याच्या एकमेवाद्वितीय विज्ञानाची ती एक आकर्षक प्रस्तावना ठरली आहे. फारच थोड्या लोकांना उपलब्ध झालेले ज्ञानाचे क्षेत्र त्यांनी पाश्चिमात्य जगासाठी उघडे केले आहे.

आज *ऑटोबायॉग्राफी ऑफ अ योगी (योगी कथामृत)* संपूर्ण जगात एक उत्कृष्ठ आध्यात्मिक साहित्यकृती म्हणून ओळखली जाते. ह्या परिचयात ह्या पुस्तकाच्या अलौकिक इतिहासाचा काही भाग आम्ही तुमच्यासमोर सादर करू ईच्छितो.

असे पुस्तक लिहिले जाईल अशी भविष्यवाणी फार पूर्वीच झाली होती. आधुनिक काळात योग विज्ञानाचे पुनरुज्जीवन करणारी एक ऋषितुल्य व्यक्ती, १९ व्या शतकातील एक अत्यंत श्रद्धेय असे गुरुमहाराज लाहिरी महाशय यांनी असे भाकित केले होते: “माझ्या निर्वाणानंतर साधारणतः पन्नास वर्षांनी माझ्या जीवनाबद्दल लिहिले जाईल, त्यामागे कारण असेल पश्चिमेत योग साधनेबद्दल जागृत होणारी खोलवर आस्था. योगाचा संदेश संपूर्ण जग व्यापून टाकेल. मानवामध्ये बंधुभाव स्थापन होण्यास: परमपिता एकच आहे याचे थेट आकलन होऊन मानवजातीमध्ये ऐक्य निर्माण होण्यास ते सहाय्यक होईल.”

त्यानंतर काही वर्षांनी लाहिरी महाशयांचे एक उच्च कोटीचे शिष्य स्वामी श्रीयुक्तेश्वर यांनी ही भविष्यवाणी श्री योगानंदाना सांगितली. ते म्हणाले, “ह्या संदेशाचा प्रसार करण्याची आणि त्या पवित्र जीवनाबद्दल लिहिण्याची तू तुझी भूमिका पार पाडावीस.”

१९४५ साली, म्हणजे लाहिरी महाशयांच्या निर्वाणानंतर बरोबर ५० वर्षांनी परमहंस योगानंदांनी त्यांच्या *ऑटोबायॉग्रफी ऑफ अ योगी* चे लेखन पूर्ण केले. त्या द्वारे त्यांच्या गुरुंच्या दोन्ही आदेशांची प्रशस्तपणे पूर्ती झाली: लाहिरी महाशयांच्या विलक्षण जीवनाचे तपशिलवार प्रस्तुतिकरण प्रथमच इंग्लिशमध्ये सादर झाले, आणि जगभरातील श्रोत्यांना आत्म्याच्या भारतीय प्राचीन विज्ञानाची ओळख झाली.

*ऑटोबायॉग्रफि ऑफ अ योगी* ची निर्मिती, ह्या त्यांच्या प्रकल्पावर परमहंस योगानंद अनेक वर्षे कार्य करीत होते. त्यांच्या सुरूवातीच्या आणि नजिकच्या शिष्यांपैकी एक श्री दया माता [1] आठवण सांगतात:

“१९३१ मध्ये जेव्हा मी माऊंट वॉशिंग्टन येथे आले, त्या आधीच परमहंसजींनी *ऑटोबायॉग्रफि* वर कार्य सुरू केले होते. एकदा, सचिव म्हणून त्यासंबंधी त्यांच्या अभ्यासिकेत काही काम करीत असतांना, त्यांनी लिहिलेल्या सुरूवातीच्या प्रकरणांपैकी एक प्रकरण पाहण्याचे सौभाग्य मला लाभले—‘व्याघ्रस्वामी’ वरील ते प्रकरण होते. त्यांनी मला ते लेखन जपून ठेवायला सांगितले, आणि ते लिहित असलेल्या पुस्तकात ते वापरले जाईल हेही स्पष्ट केले. पुस्तकाची बहुतांश रचना त्यानंतर, १९३७ ते १९४५ च्या काळात केली गेली.”

जून १९३५ ते ऑक्टोबर १९३६ च्या दरम्यान, श्री योगानंदांनी आपले गुरु स्वामी श्री युक्तेश्वर यांच्याशी शेवटच्या भेटीसाठी (युरोप आणि पॅलेस्टाइन मार्गे) भारताला परतीची यात्रा केली. तिथे असतांना त्यांनी *ऑटोबायॉग्रफि* साठी पुष्कळ वास्तविक माहिती गोळा केली होती; तसेच ते ज्यांना ओळखत होते, व ज्यांचे जीवन ते इतक्या अविस्मरणीय रीतीने लिहिणार होते, त्या काही संत आणि ज्ञानी स्त्री-पुरूषांच्या गोष्टी ते जमा करीत होते.

“लाहिरी महाशयांचे जीवन चरित्र लिहावे ही माझे गुरु स्वामी युक्तेश्वरांनी केलेली विनंती मी कधीही विसरलो नाही,” त्यांनी नंतर लिहिले, “भारतातील वास्तव्यात त्या योगावतारांचे प्रत्यक्ष शिष्य व नातेवाईक ह्यांच्याशी संपर्क साधण्याची प्रत्येक संधी मी घेत होतो. त्यांच्याशी झालेल्या संवादांची भरपूर टिपणे घेत, मी घटनांची सत्यता व तारखा वगैरेंची तपासणी केली. तसेच छायाचित्रे, जुनी पत्रे आणि कागदपत्रेही गोळा केली.”

१९३६ च्या अखेरीस जेव्हा ते अमेरिकेला परतले, तेव्हा त्यांच्या गैरहजेरीत दक्षिण कॅलिफोर्नियाच्या समुद्रकिनाऱ्यावर एन्सिनिटास येथे त्यांच्यासाठी जो आश्रम बांधण्यात आला, तिथेच ते आपला बराचसा वेळ व्यतीत करायला लागले. अनेक वर्षांपूर्वी सुरु केलेल्या पुस्तकाचे लिखाण पूर्ण करण्यासाठी ती जागा आदर्श ठरली.

परमहंस योगानंदांनी स्थापित केलेल्या मठामध्ये १९३१ साली दया मातांनी प्रवेश घेतला. त्या १९५५ पासून २०१० मधील त्यांच्या निर्वाणाच्या काळापर्यंत योगदा सत्संग

सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप संस्थेच्या अध्यक्षा म्हणून सेवारत होत्या.

"सागर किनाऱ्यावरील त्या शांतीमय आश्रमात व्यतीत केलेले दिवस माझ्या स्मृतीत आजही ताजे आहेत," श्री दया माता आठवणी सांगतात. "त्यांच्या मागे इतर इतक्या जबाबदाऱ्या आणि करावयाची कामे होती की *ऑटोबायॉग्रफि* वर दररोज काम करणे त्यांना शक्य होत नसे. परंतु सामान्यतः संध्याकाळी आणि जेव्हा वेळ शक्य होईल तेव्हा ते त्यावर काम करीत असत. १९३९ किंवा १९४० च्या सुरूवातीच्या काळापासून ते पूर्णवेळ आपले लक्ष्य पुस्तकाच्या लेखनावर केंद्रित करू शकले. आणि किती पूर्ण वेळ? सकाळी अगदी पहाटेपासून ते दुसऱ्या सकाळी पहाटेपर्यंत! त्यांच्या शिष्यवर्गापैकी आमचा एक लहानसा गट —तारा माता, माझी बहिण आनंद माता, श्रद्धा माता आणि मी स्वतः—आम्ही त्यांना सहाय्य करण्यासाठी हजर होतो. प्रत्येक भागाचे टंकलेखन झाले की ते लेख ते तारा मातांना देत असत, ज्या संपादक म्हणून त्यांच्यासाठी काम करीत होत्या.

"किती मौल्यवान आहेत त्या आठवणी! योगानंद लिहित असतांना, ते लिहित असलेले पवित्र अनुभव अंतरित पुन्हा जगत असत. संत आणि महान गुरुंच्या सहवासात मिळालेल्या आणि स्वतःला झालेल्या ईश्वर प्राप्तीच्या, अनुभूतींचा आनंद आणि झालेले साक्षात्कार ह्यांचा अनुभव दुसऱ्यांबरोबर वाटणे हा त्या प्रकल्पामागचा त्यांचा दैवी हेतु होता. लिहितांना बऱ्याचदा ते थोडा वेळ थांबत. त्यावेळी त्यांची दृष्टी ऊर्ध्व, शरीर स्तब्ध असे, ईश्वराशी सायुज्यतेच्या *समाधि* अवस्थेत ते तल्लिन असत. त्यावेळी संपूर्ण खोली ईश्वरी प्रेमाच्या विलक्षण शक्तीशाली तेजोमंडलाने प्रकाशित झालेली असे. आम्ही शिष्य त्यावेळी तिथल्या केवळ उपस्थितीतच जाणिवेच्या उच्च पातळीवर उचलले जात असू.

"शेवटी १९४५ मध्ये पुस्तक पूर्ण झाल्याचा हर्षपूर्ण दिवस उजडला. परमहंसजींनी शेवटले शब्द लिहिले, 'ईश्वरा, तू ह्या संन्याशाला किती विशाल कुटुंब दिले आहेस;' मग पेन खाली ठेऊन ते आनंदाने उद्गारले, 'उरकलं सगळं;' ते पूर्ण झालंय. हे पुस्तक लाखोंचे जीवन बदलून टाकेल. मी गेल्यानंतर हे पुस्तक माझा दूत ठरेल."

त्यानंतर पुस्तकासाठी प्रकाशक शोधण्याची जबाबदारी तारा मातांवर आली. १९२४ मध्ये परमहंस योगानंद सॅन फ्रॅन्सिस्को येथे व्याख्यानमाला व प्रक्षिशण वर्ग घेत असतांना त्यांची तारा मातांशी पहिल्यांदा भेट झाली होती. असाधारण आध्यात्मिक अंर्तदृष्टी असलेल्या तारा माता, योगानंदांच्या अतिशय प्रगत अशा एका छोट्या शिष्यवर्गातील एक बनल्या, त्यांच्या संपादकीय क्षमतेबद्दल परमहंसजींना अतिशय आदर होता. आणि ते म्हणत, त्यांना आजवर भेटलेल्या सर्वांत तल्लख बुद्धिमत्तेच्या लोकांपैकी त्या एक होत्या. भारतीय धर्मग्रंथांच्या ज्ञानासंबंधी त्यांना असलेली अफाट महिती आणि समज यांची ते प्रशंसा करीत; एका प्रसंगी त्यांनी म्हटले होते, "माझे महान गुरु स्वामी श्री युक्तेश्वरजी सोडल्यास, भारतीय तत्वज्ञानावर तिच्याबरोबर बोलण्यात मला जितका आनंद होत असे, तितका आणि कोणाही बरोबरी नाही."

तारा माता पुस्तकाचे टंकलेखन घेऊन न्यूयॉर्क सिटी येथे गेल्या. परंतु प्रकाशक शोधणे हे काही सोपे काम नव्हते. जसे अनेकदा पाहिले जाते, श्रेष्ठ कलाकृतीची खरी महानता बहुतेक रूढिबद्ध मानसिकता असलेल्या व्यक्तींना सुरूवातीस कधीकधी समजून येत नाही. नव्यानेच जन्म झालेल्या अणु युगाच्या प्रभावाखाली, मानवजातीच्या एकत्रित जाणिवेच्या विस्ताराने—भौतिक पदार्थ, उर्जा, आणि विचार यांतील सूक्ष्म ऐक्याची समज वाढीस लागून सुद्धा, "हिमालयामध्ये प्रासाद निर्माण" आणि "द्विदेही संत" ह्या सारख्या प्रकरणांना स्विकार करण्यास त्या काळातले प्रकाशक तयार नव्हते!

प्रकाशकांकडे चकरा मारीत, जेमतेम फर्निचर असलेल्या, केवळ थंड पाण्याची सोय असलेल्या व रूम गरम करण्याची सोयही नसलेल्या एका फ्लॅटमध्ये तारा माता एक वर्ष राहिल्या. सरतेशेवटी, कामात यश मिळाल्याची तार त्या पाठवू शकल्या. फिलॉसॉफिकल लायब्ररी ह्या सन्मान प्राप्त प्रकाशन संस्थेने ऑटोबायॉग्रफि प्रकाशन करण्यास घेतली. "ह्या पुस्तकासाठी (तिने) जे काही केले आहे त्याचे वर्णन करणे सुद्धा मला शक्य नाही....," श्री योगानंदानी म्हटले होते. "तिच्याशिवाय हे पुस्तक पूर्णत्वास कदापि पोहचले नसते."

दीर्घ काळ वाट पाहिल्या गेलेल्या त्या पुस्तकाच्या प्रति १९४६ च्या ख्रिसमसच्या थोडया आधी माऊंट वॉशिंग्टनला पोहचल्या.

ह्या पुस्तकाचे वाचकांनी आणि जगभरच्या वर्तमानपत्रांनी भरपूर प्रशंसेसकट स्वागत केले. "ह्या आधी, योगाच्या ह्या प्रस्तुतीप्रमाणे आणखी दुसरे काहीच, इंग्रजीत किंवा इतर कोणत्याही भाषेमध्ये लिहिले गेले नाही," असे कोलंबिया युनिव्हरसिटी प्रेस ने आपल्या *रिव्ह्यू ऑफ रिलिजन्स* मध्ये लिहिले. *न्यूयॉर्क टाइम्स* ने त्यास "दुर्लभ वृतांत" म्हणून घोषित केले. न्यूजवीक ने सूचित केले, "योगानंदांचे पुस्तक शरीराहून अधिक आत्म्याची आत्मकथा आहे....ते जीवनाच्या धार्मिक मार्गाचे चित्ताकर्षक आणि स्पष्ट टीपणीसह प्रस्तूत अध्ययन, पूर्वेकडच्या रसाळ शैलीत निपुणतेने केलेले वर्णन आहे."

ह्या पुस्तकाचे इतर भाषांमध्ये अनुवाद झाल्यानंतर, आणखी अधिक समिक्षा जगभरच्या वर्तमानपत्रांतून आणि नियतकलिकांमधून यायला सुरूवात झाली.

दुसरी आवृत्ती लगेच तयार केली गेली, आणि १९५१ मध्ये तिसरी आवृत्ती. पुस्तकाच्या लेखांची पुन्हा उजळणी करत आणि त्यात अद्ययावता आणित, काही मजकूर जो संस्थेच्या कार्यासंबंधी आणि योजनांसंबंधी ज्या आता वर्तमान राहिल्या नव्हत्या, त्यांना वगळत परमहंस योगानंदांनी त्यात शेवटचे प्रकरण जोडले—पुस्तकातील सर्वाधिक दिर्घ प्रकरणांपैकी एक —१९४० ते १९५१ ह्या वर्षांचा मागोवा. नव्या प्रकरणाच्या तळटिपेमध्ये त्यांनी लिहिले, "ह्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीत (१९५१) बरीच नवीन माहिती प्रकरण ४९ मध्ये समाविष्ट केली आहे. पहिल्या दोन आवृत्तींच्या अनेक वाचकांनी केलेल्या विनंतींना उत्तर म्हणून, मी ह्या प्रकरणामध्ये भारत, योग आणि वैदिक तत्वज्ञानाबद्दलच्या विविध प्रश्नांना उत्तर दिले आहे." [2]

"हजारो वाचकांकडून आलेली पत्रे पाहून मी अतिशय हेलावून गेलो आहे." श्री योगानंदांनी १९५१ च्या आवृत्तीच्या लेखकाच्या टीपेमध्ये लिहिले, "त्यांची मते वाचून आणि हे तथ्य लक्षात घेऊन की ह्या पुस्तकाचे कित्येक भाषांमध्ये अनुवाद झाले आहे, मी ह्या गोष्टीवर विश्वास करण्यास प्रोत्साहित होत आहे की, ह्या पुस्तकाच्या पृष्ठांमध्ये पाश्चात्य जगास 'योग च्या प्राचीन शास्त्रास आधुनिक मनुष्याच्या जीवनात काही लाभप्रद स्थान आहे का?' ह्या प्रश्नास सकारात्मक उत्तर गवसले आहे."

उत्तरोत्तर, काही वर्षांत वाचक हजारोंचे लाखो झाले, आणि *ऑटोबायॉग्रफि ऑफ योगी* ची चिरकालिन व सार्वत्रिक पसंती अधिकाधिक दृष्टिस येऊ लागली. ह्या पुस्तकाच्या प्रथम प्रकाशनाच्या साठ वर्षांनंतर सुद्धा, ते तत्वज्ञान आणि प्रेरणादायी पुस्तकांच्या श्रेष्ठ विक्रीच्या यादीत उपस्थिती राखून आहे. केवळ दुर्मिळ घटना! त्याची कित्येक भाषांतरे उपलब्ध असून, जगभरच्या महाविद्यालये आणि विश्वविद्यापिठांमध्ये पौर्वात्य तत्वज्ञान व धर्म ते इंग्लिश साहित्य, मानसशास्त्र, समाजशास्त्र, मानवंशशास्त्र, इतिहास, आणि व्यवसाय व्यवस्थापन च्या अभ्यासक्रमांमध्ये त्याचा वापर केला जात आहे. एक शतकापूर्व, लाहिरी महाशयांनी केलेल्या भविष्यवाणी प्रमाणेच, योग चा संदेश आणि त्याच्या ध्यानाच्या प्राचीन परंपरेने जगाला निस्संदेह गवसणी घातली आहे.

तत्वज्ञानविषयक नियतकालिक *न्यू फ्रंटियर* (ऑक्टोबर १९८६) लिहिते, "ज्या पुस्तकाने अगणित कोटी लोकांना प्रेरित केले, त्या त्यांच्या *ऑटोबायॉग्रफि ऑफ अ योगी* साठी संभवतः अतिशय ज्ञात परमहंस योगानंदांनी गांधीं प्रमाणे, आध्यात्मास समाजाच्या मुख्यप्रवाहात आणले. योगानंदांनी इतर कोणाही पेक्षा, 'योग' हा शब्द आमच्या शब्द संग्रहात बसविण्याचे भरीव कार्य केले आहे, असे म्हणणे रास्तच आहे."

प्रतिष्ठित विद्वान आणि अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ वेदिक स्टडिज चे संचालक डॉ. डेव्हीड फ्रॉले, द्विमासिक नियतकलिक योगा इंटरनॅशल (ऑक्टोबर-नोव्हेंबर १९९६) मध्ये लिहितात, "योगानंदांना पाश्चात्य जगातील योग चे जनक म्हणता येईल—केवळ शारिरिक योग नव्हे जे लोकप्रिय झाले आहे, तर आध्यात्मिक योग, आत्मानुभूति चे विज्ञान, जो योग शब्दाचा खरा अभिप्राय आहे."

कलकत्ता युनिवर्सिटिचे प्राध्यापक आशुतोष दास, Ph.D., D.Litt. स्पष्ट करतात, "*ऑटोबायॉग्रफि ऑफ अ योगी* ला आधुनिक युगाचे उपनिषद मानले जाते....जगभरच्या सत्य-शोधकांची आध्यात्मिक तृष्णा त्याने शमविली आहे. भारताचे संत आणि तत्वज्ञान यांवरील ह्या पुस्तकाच्या प्रसिद्धीचा अभूतपूर्व प्रसार, आम्ही भारतामध्ये अचंबेने, मुग्धतेने पाहिला आहे. भारताच्या सनातन धर्माचे चिरंतर अमृत *ऑटोबायॉग्रफि ऑफ अ योगी* च्या सुवर्ण प्याल्यात संग्रह करून ठेवले आहे ह्याचा आम्हाला प्रचंड संतोष आणि अभिमान जाणवला आहे."

भूतपूर्व सोव्हियट युनियन मध्ये सुद्धा ह्या पुस्तकाने तुलनेत थोड्या लोकांवर परंतू स्पष्टपणे सखोल ठसा पाडला, जे लोक त्या कम्युनिस्ट राजवटीखाली सुद्धा त्या पुस्तकाला प्राप्त करू शकले. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे भूतपूर्व न्यायाधीश, न्यायमूर्ती व्हि. आर.

कृष्ण अय्यर, सेंट पिट्सबर्ग (त्यावेळच्या लेनिनग्राड) च्या समीप असलेल्या एका नगराच्या आपल्या भेटीबद्दल सांगतात; तेथील प्राध्यापकांच्या एका समूहास त्यांनी विचारले "मनुष्याच्या मृत्युनंतर त्याचे काय होते...., ह्यावर त्यांनी विचार केला आहे का? त्यांच्यापैकी एक प्राध्यापक गुपचुप आत गेले आणि एका पुस्तकासह—*ऑटोबायॉग्रफि ऑफ अ योगी* सकट बाहेर आले. मी स्तिमित झालो. मार्क्स आणि लेनिन यांच्या भौतिकतावादी तत्वज्ञानाचा अंमल असलेल्या देशात, शासकीय संस्थेचा एक अधिकारी मला परमहंस योगानंदांचे पुस्तक दाखवित आहे! 'कृपया लक्षात घ्या की भारताचा आत्मा आम्हाला अनोळखी नाही,' त्यांनी म्हटले. 'ह्या पुस्तकात लिहिलेल्या प्रत्येक गोष्टीच्या खरेपणास आम्ही मान्य करतो.'"

अलिकडच्या काळात पुस्तक-विक्रेते, समालोचक आणि वाचकांनी ह्या पुस्तकाचे, आधुनिक काळातील अतिशय प्रभावी आध्यात्मिक पुस्तकांपैकी एक असे एकसूरात गुणगान केले आहे. १९९९ मध्ये, हार्परकॉलिन्स च्या लेखक आणि विद्वानांच्या पंच समितिमध्ये, *ऑटोबायॉग्रफि ऑफ अ योगी* ची "ह्या शतकातील सर्वश्रेष्ठ १०० आध्यात्मिक पुस्तकांपैकी एक" म्हणून निवड केली गेली; आणि २००५ मध्ये प्रकाशित आपल्या ५० आध्यात्मिक श्रेष्ठ पुस्तके मध्ये टॉम बटलर-बोडन यांनी लिहिले आहे की हे पुस्तक "आजपर्यंतच्या लिहिल्या गेलेल्या सर्वाधिक मनोरंजक आणि ज्ञानवर्धक आध्यात्मिक पुस्तकांपैकी एक, अशी त्याची ख्याती समर्थनीयच आहे."

युगानुयुगे समस्त जगातील धर्मांच्या संत आणि ऋषींनी उच्चारलेल्या गाढ आश्वासनाबद्दल परमहंस योगानंद पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात लिहितात:

> *"ईश्वर प्रेम आहे; त्याच्या सृष्टीच्या योजनेचे मूळ केवळ प्रेमातच असू शकते. विद्वत्तापूर्ण तर्कापेक्षाही जास्त, हा सालस विचारच मानवी ह्दयास सांत्वना देत नाही का? प्रत्येक संत, ज्याने ईश्वरी सत्याच्या गाभ्यास भेदले आहे, त्याने साक्ष दिली आहे की संपूर्ण विश्वासाठीची ईश्वराची योजना खरोखरच अस्तित्वात आहे; व ती सुंदर आणि पूर्ण आनंदमय आहे."*

*ऑटोबायॉग्रफि ऑफ अ योगी* ची शतकाच्या दुसऱ्या अर्ध्या भागात वाटचाल चालू असताना, आमची आशा आहे की ह्या प्रेरणादायक पुस्तकाचे सर्व वाचक—ते, ज्यांचा ह्या पुस्तकाशी पहिल्यांदाच संपर्क येत आहे आणि ते, ज्यांच्या जीवनमार्गावर हे पुस्तक दिर्घकाळ ह्दयस्थ सोबती ठरले आहे—ते दोघेही अनुभवतील की त्यांचा स्वतःचा आत्मा सर्वश्रेष्ठ सत्यावरील गाढ श्रद्धेस मार्ग उघडत आहे, सत्य जे जीवनाच्या बाहेरून भासणाऱ्या रहस्यांच्या अंतःकरणामध्ये स्थित आहे.

योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/
सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप

लॉस एँजेलिस, कॅलिफोर्निया

जुलै २००७

1 लॉस एँजेलिस शहराचे उंचावरून जिथून दर्शन होते त्या माऊंट वॉशिंग्टनच्या शिखरावर परमहंस योगानंदांनी स्थापित केलेल्या मठामध्ये १९३१ साली दया मातांनी प्रवेश घेतला. त्या १९५५ पासून २०१० मधील त्यांच्या काळापर्यंत योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप संस्थेच्या अध्यक्षा म्हणून सेवारत होत्या.

2 परमहंस योगानंदांनी केलेल्या आणखी पुनर्लेखनाचा सातव्या आवृत्तीमध्ये (१९५६) समावेष केला गेला, ह्या आवृत्तीच्या प्रकाशकाच्या टिपेमध्ये त्याचे पुढिल प्रमाणे वर्णन केले आहे:

"१९५६ च्या ह्या अमेरिकन आवृत्तीमध्ये परमहंस योगानंदांनी १९४९ मध्ये लंडन, इंग्लंड च्या आवृत्तीमध्ये केलेले पुनर्लेखन आहे; त्याचबरोबर लेखकाने १९५१ मध्ये केलेले अतिरिक्त पुनर्लेखनसुद्धा आहे. २५ ऑक्टोबर, १९४९ च्या 'लंडन आवृत्तीसाठीची टीपणी' मध्ये परमहंस योगानंद लिहितातः 'ह्या पुस्तकाच्या लंडन आवृत्तीसाठीची तयारी करताना मला पुनर्लेखन, आणि लिखाण थोडे अधिक वाढविण्याची संधी मिळाली. शेवटच्या प्रकरणातील नव्या मजकूरा व्यतिरिक्त मी बऱ्याच तळटिपा जोडल्या आहेत, ज्यांमध्ये अमेरिकन आवृत्तीच्या वाचकांनी मला पाठविलेल्या प्रश्नांची मी उत्तरे दिली आहेत.'

"नंतरचे, १९५१ मध्ये लेखकाने केलेले पुनर्लेखन, चौथ्या अमेरिकन आवृत्ती (१९५२) मध्ये प्रकाशित होणे अभिप्रेत होते. त्यावेळी *ऑटोबायॉग्रफि ऑफ अ योगी* चे अधिकार न्यूयॉर्क पब्लिशिंग हाऊस कडे स्थिर केले गेले. १९४६ मध्ये, न्यूयॉर्क मध्ये पुस्तकाच्या प्रत्येक पानाची 'इलेक्ट्रोटाइप प्लेट' बनविली गेली. परिणामस्वरूप केवळ स्वल्पविराम सुद्धा जोडण्यासाठी त्या संपूर्ण पानाची प्लेटच कापून वेगळी करावी लागे, व स्वल्पविराम जोडलेली नवीन ओळीची प्लेट टांके देऊन जोडावी लागे. कित्येक अशा प्लेट्स जोडण्यात येणारा खर्च लक्षात घेऊन, न्यूयॉर्क पब्लिशर ने लेखकाचे १९५१ चे पुनर्लेखन चौथ्या आवृत्तीमध्ये समाविष्ट केले नाही."

"१९५३ च्या नंतरच्या काळात सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप (एस.आर.एफ.) ने न्यूयॉर्क पब्लिशर कडून *ऑटोबायॉग्राफि ऑफ अ योगी* चे अधिकार विकत घेतले. एस.आर.एफ. ने १९५४ आणि १९५५ मध्ये पुस्तक पुन्हा (पाचवी आणि सहावी आवृत्ती) प्रकाशित केले; पण त्या दोन वर्षांमध्ये, इतर कामांच्या व्यापामुळे एस.आर.एफ. च्या संपादकीय विभागास, लेखकाच्या पुनर्लेखनास इलेक्ट्रोटाइप प्लेट्स वर घेण्याचे विकट काम करण्याचे जमले नाही. ते काम मात्र, सातव्या आवृत्तीसाठी वेळेवर पूर्ण झाले."

"१९५६ नंतर, परमहंस योगानंदांच्या निर्वाणाच्या आत, तारा मातांना त्यांच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शनानुसार, आणखी काही संपादकीय उजळणी केली गेली.

*ऑटोबायॉग्रफि ऑफ अ योगी* च्या पूर्वीच्या आवृत्तींमधून लेखकाचे शीर्षक "Paramhansa" दिले गेले, ज्यात सर्वसामान्य बंगाली रीतीप्रमाणे अउच्चारणीय किंवा अल्प-उच्चारणीय 'a' स्पेलिंगमधून गाळण्यात आले होते. वेदांवर आधारित ह्या शीर्षकाचे पावन महत्व खात्रीपूर्वक व्यक्त व्हावे म्हणून नंतरच्या आवृत्तींतून, प्रमाणित संस्कृतचे इंग्लिशमधील अंतर: "Paramhansa" वापरले गेले. ज्यातील *paramhansa (परम)* म्हणजे "उच्च किंवा श्रेष्ठ" आणि *hansa (हंस)* म्हणजे "हंस पक्षी" — हे सूचित करते, ती व्यक्ती ज्याने स्वतःच्या दैवी स्वत्वाःची; आणि त्या आत्मा व परमात्मा यांच्या एकरूपतेच्या सर्वोच परिपूर्तीची प्राप्ती केली आहे.



# सदाचरणाचा शाश्वत सिद्धांत

१९४७ साली नव्यानेच स्वातंत्र्य मिळालेल्या भारताच्या ध्वजावर गडद भगवा, पांढरा आणि गडद हिरवा ह्या तीन रंगांचे पट्टे आहेत. त्यावर तिसऱ्या शतकात सम्राट अशोकाने सारनाथ येथे उभारलेल्या, दगडी स्तंभावर कोरलेल्या धर्मचक्राचे प्रतिरुप नौसेनेच्या निळ्या रंगांत आहे.

सदाचरणाच्या शाश्वत सिद्धांताचे चिन्ह म्हणून ह्या चक्राची निवड केली गेली; आनुषंगानेच, त्यात जगातील सर्वात किर्तिमान सम्राटाच्या स्मृतीचा आदर व्यक्त केला गेला आहे. "त्याच्या चाळीस वर्षांच्या राजसत्तेस इतिहासात तोड नाही." असे एच.जी. रॉलिन्सन हा इतिहासकार लिहितो. "त्याची तुलना निरनिराळ्या वेळी मार्कस ऑरेलियस, सेंट पॉल आणि कॉन्स्टंटाइन यांच्याशी केली गेली आहे.... ख्रिस्तपूर्व २५० वर्षांआधी, आपल्या यशस्वी मोहिमेच्या परिणामाच्या भयानकतेची शिसारी आणि झालेला पश्चाताप व्यक्त करण्याचे धाडस अशोकाने दाखविले; आणि पूर्ण विचारांती युद्ध त्यागाचे धोरण त्याने अंमलात आणले."

अशोकाला वारसा हक्काने मिळालेल्या साम्राज्यामध्ये भारत, नेपाळ, अफगणिस्तान आणि बलुचिस्तान यांचा समावेश होता. जगातील पहिल्या आंतरराष्ट्रीयतावादी अशोकाने ब्रह्मदेश, सिलोन, ईजिप्त, सिरिया आणि मॅसेडोनिया येथे आपली धार्मिक आणि सांस्कृतिक प्रसारक मंडळे शुभसंदेश आणि नजराण्यांसह पाठविली होती.


"मौर्य वंशातील तिसरा राजा अशोक हा इतिहासातील श्रेष्ठ तत्वज्ञानी राजांपैकी....एक होता," असे एक विद्वान पी. मॅसन-ऑर्सेल म्हणतात.

"दुसऱ्या कोणीही सामर्थ्य व जनकल्याण, न्याय व दानशीलता यांना त्याच्याइतके एकत्र आणले नाही. त्याच्या काळात तो एक जिवंत आदर्श होता. आणि आपल्यासमोर त्याचे अत्यंत आधुनिक असे व्यक्तिमत्व दिसून येते. त्याच्या दिर्घकालीन राजसत्तेच्या काळात त्याने जे साध्य केले, ते आम्हाला दूरदृष्टी प्राप्त असलेल्याची केवळ महत्वाकांक्षाच वाटेल: सर्व्वोच्च शक्य भौतिक सामर्थ्य उपभोगत, त्याने शांती प्रस्थापित केली. आपल्या अतिविस्तिर्ण सत्तेच्याही खूप पलिकडे त्याने जागतिक सुव्यवस्था—मानवजातीला आलिंगण देणारी सुव्यवस्था प्रत्यक्षात उतरविली, जे अनेक धर्मांचे स्वप्न होते."

"सर्व प्राणिमात्रांचे सुख हेच सर्व धर्मांचे (वैश्विक सिद्धांताचे) उद्दिष्ट आहे." आजतागायत टिकून राहिलेल्या त्याच्या शीलालेख व स्तंभांतून, सम्राट अशोक दूरपर्यंत

पसरलेल्या आपल्या साम्राज्याच्या प्रजेस प्रेमळपणे उपदेश देतो की, नैतिकता आणि पावित्र्यतेमध्ये सुखाचे मूळ दडले आहे.

आधुनिक भारत, हजारो वर्षे त्याच्या भूमीला व्यापून असलेला लौकिक आणि समृद्धी पुन्हा प्रस्थापित करण्याची महत्वाकांक्षा बाळगत आपल्या ध्वजाद्वारे 'ईश्वरास प्रिय' सम्राट अशोकाच्या स्मृतीस वंदन करीत आहे.




*(१९४७ च्या अगोदर. वायव्येकडील भाग मिळून सध्याचा पाकिस्तान आणि ईशान्येकडील भाग मिळून बांग्लादेश बनला आहे.)*

# योगी कथामृत

## प्रकरण - १

# 1. माझे मातापिता आणि पूर्वायुष्य

परम तत्त्वाचा शोध व तदनुषंगिक गुरुशिष्यसंबंध [1] ही फार पुरातनकालापासून भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये समजली जातात.

माझे मार्ग पण मला भगवत्स्वरूप अशा ऋषिंकडे घेऊन गेले की ज्यांचे अनुपम जीवन आगामी सर्व युगांकरिता घडविलेले उत्कृष्ट आदर्शरूप असेच होते. असे संत-महापुरुष जे भारताची खरीखुरी संपदा होय त्यांपैकी ते एक होते. या महापुरुषांनी प्राचीन इजिप्त व बाबिलोनिया या देशांची जशी दुर्गती झाली अशा दुर्गतीपासून आपल्या देशाचे रक्षण करण्याकरिता पिढ्यापिढ्यांतून अवतरित होऊन आध्यात्मिक शक्तिशाली कोट उभे केले.

माझ्या अगदी लहानपणच्या आठवणी म्हणजे माझ्या पूर्वजन्मीच्या, सध्याच्या कालमानास न जुळणाऱ्या अशा गूढ स्मृती. एका पूर्वजन्मी हिमालयाच्या हिमप्रदेशात योगी [2] म्हणून मी जीवन व्यतीत करीत होतो, हे मला अगदी स्पष्ट आठवते. भूतकाळाच्या ह्या अवशिष्ट स्मृतींनी जणू एखाद्या अक्षहीन — अदृश्य सूत्राने करावे तशी मला भविष्यकाळाचीही कल्पना करून दिली.

शैशवकालीन असाहाय्य, दीन अवस्थेचे प्रसंग मला अजून आठवतात. त्या वेळी मला धडपणे चालताही येत नसे आणि बरोबर स्पष्टपणे बोलताही येत नसे, याचा मला त्या वेळी फार खेद वाटे. माझ्या शारीरिक असमर्थतेबद्दल खंत वाटून मनामध्ये प्रार्थनारूपी भाव उचंबळून येत असत. माझ्या तीव्र भावनेंची मानसिक अभिव्यक्ति नाना भाषेंच्या शब्दांत होत असे. भिन्न भाषांच्या आंतरिक गोंधळातून माझ्या सभोवारच्या लोकांच्या तोंडून बंगाली शब्द ऐकण्याची मला हळूहळू सवय होऊ लागली. बालमनाचा ठाव मोठ्या माणसांना घेता येत नाही. मुलांचे मन खेळणी व आंगठा चोखण्यातच आनंद मानून राहते असे ते समजतात.

मानसिक उद्वेग व शारीरिक असमर्थता यांमुळे मी वरचेवर दुराग्रहाने रडत असे. माझ्या ह्या त्रासामुळे घरातील माणसे गोंधळून जात असल्याचे मला आठवते. माझ्या मातेचे प्रेमस्पर्श, माझे बोबडे बोल व धडपडत चालण्याचा प्रथम प्रयत्न, वगैरे सुखद आठवणीही मला आठवतात. साधारणतः लवकर विसरले जाणारे हे बालपणातील साफल्याचे प्रसंग म्हणजे माणसातील आत्मविश्वासाचा पहिला पाया होय.

अगदी दूरवर पोचणाऱ्या माझ्या बालपणच्या आठवणी तशा काही विलक्षण नाहीत. पुष्कळ योग्यांनी आपले आत्मचैतन्य ‘जन्म’ आणि ‘मरण’ ह्या नाट्यपूर्ण अवस्थांतराने खंडित न होऊ देता कायम ठेवल्या आहेत, असे विदित आहे. मनुष्य हा केवळ शरीरमयच असता तर शरीराचा नाश झाल्यावर त्याचाही लोप व्हावयास पाहिजे. सहस्रावधि वर्षाच्या दीर्घकालात जे द्रष्टे होऊन गेले ते जर सत्य सांगत असतील तर मनुष्य हा प्रामुख्याने अशरीरी व सर्वव्यापी असा आत्मस्वरूपी आहे.

असाधारण असले तरी अगदी अर्भकावस्थेतल्या सुद्धा स्मृती टिकण्याचे प्रसंग एकदम दुर्मिळ नाही. माझ्या अनेक देशांच्या प्रवासात सत्यनिष्ठ पुरुष व स्त्रिया यांच्या तोंडून त्यांच्या अर्भकावस्थेतल्या आठवणी मी ऐकलेल्या आहेत.

माझा जन्म ५ जानेवारी १८९३ रोजी हिमालय पर्वतश्रेणीजवळ पूर्वोत्तर भारतात गोरखपूर येथे झाला. तिथे माझी पहिली आठ वर्षे गेली. आम्ही आठ भावंडेः चार भाऊ व चार बहिणी. मी मुकुंदलाल घोष, [3] माझ्या वडिलांचा दुसरा मुलगा व चौथे अपत्य.

माझे मातापिता बंगालमधील क्षत्रिय जातीचे. दोघेही अगदी सात्त्विक वृत्तीचे; त्यांचे एकमेकांवरील प्रेम शांत व उदात्त प्रकारचे असून उच्छृंखलतारहित असे होते. मातापित्यांमधील पूर्ण समजूतदारपणा हा त्यांच्या भोवताली आम्हां आठ बालकांच्या गोंगाटाचा शांतिमय केंद्रबिंदू होता.

माझे वडील भगवतीचरण घोष यांचा स्वभाव दयाळू, गंभीर, क्वचितप्रसंगी करारी असा असे. आम्हां मुलांना वडिलांच्याविषयी खूप ममता असे, पण आम्ही त्यांच्यापासून जरा दूर पण अदबीने राहत असू. एक असाधारण गणितज्ञ व तर्कशास्त्री असल्यामुळे त्यांच्या मनाची ठेवण बुद्धिवादी असे. पण आईचा स्वभाव अत्यंत स्नेहपूर्ण असून ती मोठ्या वात्सल्याने आम्हांस शिकवी. तिच्या पश्चात वडिलांचा आंतरिक प्रेमळपणा अधिक व्यक्त होऊ लागला. त्यांच्या डोळ्यांतील चमक सुद्धा बदलून तिचे आईच्या नजरेत परिवर्तन होऊन गेल्याचे मला आढळून आले.

आईने आम्हां मुलांना लवकरच धर्मग्रंथांतील चांगल्या-वाईट गोष्टींशी ओळख करून दिली. महाभारत आणि रामायण यांमधून प्रसंगोचित कथा सांगून ती मोठ्या चातुर्याने आम्हांला शिस्तीचे वळण लावीत असे. अशा वेळी शिक्षण व शासन बरोबरच होई.

वडिलांच्याबद्दल आदर दाखविण्यासाठी ते संध्याकाळी घरी कामावरून परत येण्याच्या अगोदर आई आम्हांला व्यवस्थित नीटनेटके कपडे घालून जणू त्यांच्या स्वागताला तयार करून ठेवी. देशातील एका मोठ्या कंपनीत, बंगाल-नागपूर रेल्वेमध्ये ते उपाध्यक्षासारख्या एका अधिकाराच्या जागी होते. त्यांना कामासाठी फिरतीवर जावे लागे. माझ्या लहानपणी कितीएक मोठ्या शहरी राहण्याचा आमच्या कुटुंबाला योग आला होता.

गोरगरिबांना मदत करण्यासाठी आई सदैव तत्पर असे. वडिलांचाही स्वभाव कनवाळू खरा; पण त्यांचा हा आदर घरखर्चापर्यंतच होता. एकदा पंधरवड्याच्या अवधीतच आईने बाबांच्या महिन्याच्या पगारापेक्षा जास्त रक्कम गोरगरिबांना अन्नदान करण्यात खर्च केली.

न रागावता ते आईला इतकेच म्हणाले, “माझी एवढीच विनंती आहे की, दानधर्माला काही मर्यादा, सीमा असावी.” आईला आपल्या पतीचा एवढा सौम्य फटकारा सुद्धा असह्य होता. या मतभेदाबद्दल आम्हां मुलांना काही कळू न देता तिने गाडी मागविली.

“बरेय, मी आता माहेरी जाते.” भारतीय स्त्रियांचा पूर्वापारपासूनचा चालत आलेला निर्वाणीचा खलिता!

आम्ही गोंधळून एकदम रडायलाच लागलो. इतक्यात आमचे मामा तेथे अगदी वेळेवर येऊन पोहोचले. त्यांनी बाबांच्या कानात काही कुजबुजून सांगितले, निःसंशय पुरातन

काळापासूनचा तो एक चातुर्यपूर्ण उपदेश होता. वडिलांनी काही समजुतीचे बोलणे काढले आणि आईने खुशीने गाडी परत करविली. आणि अशा तऱ्हेने माझ्या आई-वडिलांचा मी पाहिलेला एकच कलहप्रसंग संपला. असेच एकदा दोघामध्ये उल्लेखनीय असे बोलणे झाले ते मला आठवते.

"एक अभागी गरीब बाई दाराशी आली आहे. मला जरा दहा रुपये द्या." आईचे मंदस्मित तिचे अनुरोधपूर्ण प्रतिपादन दर्शवीत होते.

"दहा रुपये कशासाठी? एक रुपया पुष्कळ झाला." आपल्या म्हणण्याच्या समर्थनाकरिता वडील पुढे सांगू लागले, "जेव्हा माझे वडील, आजोबा, आजी अचानकपणे गेले तेव्हा मला गरिबीचा सर्वप्रथम अनुभव आला. कित्येक मैल दूर अंतरावर असलेल्या अशा शाळेस जायला निघताना माझा अल्पोपहार फक्त एक लहान केळे होते. पुढे विश्वविद्यालयात गेलो तेव्हा तीव्र गरजेच्यावेळी एका श्रीमंत न्यायाधीशाकडे मी दरमहा एक रुपयाच्या मदतीची याचना केली. एक रुपया देखील महत्त्वाचा आहे असे सांगून त्यांनी मला नकार दिला."

आईला ताबडतोब खुबीदार तर्कशुद्ध बोलण्याचे सुचले. ती म्हणाली, "एक रुपयाला देखील नकार मिळाल्याची ही आठवण तुम्हांला किती कटुतापूर्ण वाटते? ह्या स्त्रीस दहा रुपयांची नड असताना तुमच्याकडून नकार मिळाल्याची दुःखद आठवण तितक्याच कटुतापूर्णपणे तिने जतन करून ठेवावी असे तुम्हांला वाटते का?"

"तू जिंकलेस बरे." असे म्हणून पराभूत पतीच्या अगदी पूर्वापार चालीने त्यांनी आपले पाकीट उघडले. "ही घे दहा रुपयांची नोट, माझ्या सदिच्छे सोबत तिला दे."

बाबांचा कुठल्याही नवीन सूचनेला प्रथम नकार देण्याचा कल असायचा. ज्या तिऱ्हाईत बाईने आईची इतक्या त्वरितपणे सहानुभूती मिळविली तिच्या विनंतीकडे चिकित्साबुद्धीने पाहण्यात बाबांचा नेहमीचा सावधगिरीचा स्वभाव दिसून येत होता. कोणतीही गोष्ट ताबडतोब मान्य न करणे म्हणजे फक्त कोणतीही गोष्ट योग्य विचारांती करणे ह्या तत्त्वाचे पालन. बाबांचे वागणे मला नेहमी बरोबर वाटे. मला वडिलांचे निर्णय नेहमीच युक्तिपूर्ण व संतुलित वाटले. जर मी माझ्या निरनिराळ्या मागण्यांच्या बाबतीत त्यांना एकदोन पटणारे मुद्दे सांगितले की बस; माझी मागणी ताबडतोब मंजूर होई; मग ती मागणी म्हणजे सुट्टीतील सहल असो की मोटर-सायकल असो.

आमच्या लहानपणी वडिलांची शिस्त मोठी कडक असे; पण त्यांचे स्वतःचे आचरण तितकेच कडक, अपरिग्रहवृत्तीचे असे. उदाहरणार्थ, ते कधीही नाटक-सिनेमाला गेले नाहीत. ते आपले मनोरंजन आध्यात्मिक मार्गाने व भगवद्गीता वगैरे धार्मिक ग्रंथांचे वाचन करण्यात करीत. चैनीच्या पदार्थांपासून ते इतके दूर राहत की बुटांचा एकच जोड ते तो अगदी निरुपयोगी होईपर्यंत वापरीत. पुढे काही वर्षांनी मोटारगाड्या सर्रास झाल्यावर त्यांच्या मुलांनी खरीदल्या; पण आमच्या वडिलांनी दररोज कचेरीत जाण्यासाठी आपली ट्रॅमगाडी कधी सोडली नाही.



*ज्ञान प्रभा घोष (1868-1904)*
*श्री श्री परमहंस योगानंदांच्या मातोश्री;*
*श्री श्री लाहिरी महाशयांच्या शिष्या*



*भगवती चरण घोष (1853-1942)*
*श्री श्री परमहंस योगानंदांचे वडील;*
*श्री श्री लाहिरी महाशयांचे शिष्य*

सत्तेकरिता, अधिकाराकरिता पैसा साठविण्याकडे वडिलांचे कधीही लक्ष नसे. कलकत्ता अर्बन बँकेचे त्यांनी संघटन केल्यानंतर स्वतःचा फायदा करून घेण्या करिता बँकेचा एक

सुद्धा शेअर ठेवायला त्यांनी नकार दिला. आपल्या फावल्या वेळात काही सामाजिक कार्य करावे एवढीच त्यांची इच्छा.

वडील सेवानिवृत्त होऊन पेन्शन घेतल्याला बरीच वर्षे लोटल्यानंतर बंगाल-नागपूर रेल्वेचे जुने हिशेब तपासण्यास ईग्लंडहून एक हिशेबनीस आला. हिशेब तपासल्यावर त्याला आढळून आले की, आमच्या वडिलांनी कित्येक वर्षे आपल्या हक्काच्या बोनससाठी कधी अर्ज केलाच नाही, म्हणून त्याला आश्चर्य वाटले.

त्या तपासनिसाने कंपनीला सांगितले, “सदर गृहस्थांनी तीन माणसांचे काम केलेले आहे. त्यांच्या खाती पाठीमागल्या वर्षांचे ‘कॉम्पेन्सेशन’ म्हणून १,२५,००० रुपये (४१,२५० डॉलर) जमा आहेत.” खजीनदाराने तेवढ्या रकमेचा वडिलांकडे चेक पाठविला. आमच्या वडिलांना ही गोष्ट इतकी क्षुल्लक वाटली की ती घरात सांगावयाचे सुद्धा ते विसरून गेले. पुष्कळ वर्षांनी माझा सगळ्यांत धाकटा भाऊ विष्णू याला बँकेच्या खातेऊताऱ्यात सहज एवढी मोठी रक्कम जमा असल्याचे पाहण्यात आले तेव्हा कुठे त्याने वडिलांना त्याबद्दल विचारले.

वडील म्हणाले, “भौतिक फायद्याने एवढे काय फुशारून जायचेय? ज्याचे ध्येय समदृष्टी ठेवण्याचे आहे तो फायदा झाल्याने आनंदून जात नाही की तोटा झाल्याने दुर्मुख होत नाही. त्याला माहीत असते की, मनुष्य या जगात जन्मास येतो तेव्हा त्याच्याजवळ एक दमडीही नसते आणि जातेवेळी एक रुपयासुद्धा तो बरोबर घेऊन जात नाही.”

लग्न झाल्यावर थोड्याच वर्षांनी माझे आई-वडील वाराणसीचे महान गुरू लाहिरी महाशयांचे शिष्य झाले. गुरूसान्निध्यामुळे माझ्या वडिलांच्या मूळच्याच विरक्त वृत्तीत आणखी भर पडली. माझी थोरली बहीण रोमा हिच्यापाशी एकदा आईने लक्षणीय स्वीकारोक्ति केली, “तुझे वडील आणि मी वर्षातून एकदाच दांपत्यधर्माने वागतो आणि ते फक्त संतानोत्पत्तीकरिता.”

वडिलांची लाहिरी महाशयांची पहिली भेट रेल्वेत नोकरीस असलेल्या अविनाशबाबूंच्या मार्फत झाली. हे अविनाशबाबू गोरखपूरला असताना माझ्या बालमनाला चित्तवेधक अशा अनेक भारतीय साधुसंतांच्या गोष्टी सांगत. त्या गोष्टींचा समारोप साधारणपणे आपल्या स्वतःच्या गुरूचा मोठेपणा सांगण्यात होत असे.

“ज्या विलक्षण परिस्थितीमुळे तुझे वडील लाहिरी महाशयांचे शिष्य झाले ती तुला माहीत आहे काय?” उन्हाळ्याच्या दिवसांतल्या दुपारच्या सुवेळी अविनाश आणि मी असे दोघेजण आमच्या घराच्या अंगणामध्ये बसलो होतो, आणि अविनाशने मला गोंधळात टाकणारा वरील प्रश्न विचारला. मी सस्मित डोके हालवून नाही असे सांगितले आणि आता तो काय सांगणार याची उत्कंठेने वाट पाहत बसलो.

“पुष्कळ वर्षांपूर्वी, तुझ्या जन्माच्या अगोदर मी तुझ्या बाबांना—ते माझे वरिष्ठ होते—ऑफिसच्या कामातून सात दिवसांची रजा, वाराणशीला माझे गुरू होते त्यांना भेटायला जायला, मागितली. तुझ्या वडिलांनी माझी टर उडविली.”

“तुला काय धर्मांध व्हायचेय काय? जर तुला आपला उत्कर्ष घडवून आणायचा असेल तर ऑफिसच्या कामात जास्त लक्ष दे.” त्यांनी उपदेश केला.

"त्या दिवशी उदास मनाने मी जंगलातील वाट तुडवीत घरी परतत होतो. वाटेत मला तुझे वडील भेटले. ते पालखीतून घरी जात होते. मला पाहिल्यावर त्यांनी पालखी परत पाठविली व नोकरांना परत जायला सांगितले आणि ते माझ्याबरोबर चालू लागले. माझे सांत्वन करावे म्हणून ते मला सांगू लागले, की आयुष्यात यशस्वी होण्याने काय फायदे होतात? मी त्यांचे बोलणे निरुत्साहीपणे ऐकून घेत होतो. पण माझे अंतःकरण वारंवार म्हणत होते, 'लाहिरी महाशय, तुमचे दर्शन झाल्याविना मी जिवंत राहू शकणार नाही.'

"पुढे रस्त्र्याने जात असता आम्ही एका शांत मैदानाच्या किनाऱ्यावर आलो. तेथे रानटी गवताच्या उंचावलेल्या तुऱ्यांवरून संध्याकाळचे रवीचे किरण आपले सोनेरी हस्त फिरवीत होते. ते निसर्गसौंदर्य न्याहाळण्याकरिता आम्ही जरा थांबलो. तेथे त्या मैदानात, आमच्यापासून अगदी थोड्या यार्डांच्या अंतरावर माझ्या महान गुरूंची आकृती एकदम प्रकट झाली. [4]

"भगवती, तू आपल्या नोकरावर फारच कडक शिस्त धरलीस." त्यांचा आवाज आमच्या चकित कर्णरंध्रांत दुमदुमून निघाला आणि एकदम जसे ते रहस्यमयपणे आले तसेच निघून गेले. मी गुडघे टेकून उद्गारलो, "लाहिरी महाशय! लाहिरी महाशय!" तुझे वडील अगदी विस्मयचकित होऊन थोडा वेळ निःस्तब्ध झाले."

"अविनाश, मी तुला रजा देतो. एवढेच नव्हे तर मी स्वतः उद्या तुझ्याबरोबर बनारसला जावयास निघतो. हे तुझे गुरू लाहिरी महाशय इच्छेनुरूप दृश्य देह धारण करून तुझ्याकरिता मध्यस्थी करतात, त्यांना मला भेटायलाच पाहिजे. मी सपत्नीक येतो आणि आम्हांसही त्यांच्या अध्यात्ममार्गावर दीक्षित करुन घेण्याची त्यांना विनंती करतो. काय, तू आम्हांला त्यांचेकडे घेऊन जाशील?"

'जरूर'! माझ्या प्रार्थनेला चमत्कारपूर्ण उत्तर मिळाल्याने आणि प्रसंगाला त्वरितच अगदी माझ्या बाजूने कलाटणी मिळाल्याने माझे मन आनंदातिरेकाने भरून गेले."

"दुसऱ्या दिवशी संध्याकाळी तुझे आई-वडील आणि मी वाराणशीला जाण्यासाठी गाडीत बसलो. दुसरे दिवशी तिथे पोहोचल्यावर आम्ही थोड्या दूर पर्यंत एक घोडा गाडी केली व तेथून पुढे अरुंद अशा गल्लीगल्लीतून चालत जात गुरुजींच्या अगदी एकान्त स्थळी असलेल्या घरी पोहोचलो. पडवीतून आत शिरल्यावर आम्ही गुरुजींना नमस्कार केला. ते नेहमीप्रमाणे पद्मासन घालून बसलेले होते. त्यांनी आपली भेदक दृष्टी किंचित संकुचित करून माझ्या वडिलांकडे दृष्टिक्षेप केला. "भगवती, तू आपल्या नोकरावर फार कडक शिस्त धरलीस." अगदी दोन दिवसांपूर्वी त्यांनी त्या मैदानामध्ये दृश्यरूप होऊन उच्चारले तेच शब्द ते होते. पुढे ते म्हणाले, "मला आनंद झाला की तू अविनाशला माझ्याकडे येण्यास परवानगी दिलीस आणि तू आणि तुझी पत्नी दोघेही त्याच्याबरोबर आलात."

"त्यांनी तुझ्या आई-वडिलांना क्रियायोगाची [5] —आध्यात्मिक योगमार्गाची दीक्षा दिली. तुझ्या आई-वडिलांना मोठी धन्यता वाटली. तुझे वडील आणि मी त्या संस्मरणीय दिवसापासून गुरुबंधूंसारखे मैत्रीने वागत आलो आहोत. तुझ्या स्वतःच्या जन्माच्या बाबतीत

लाहिरी महाशयांनी फार उत्सुकता दाखविली होती. तुझे जीवन त्यांच्या जीवनाशी नक्की निगडित होणार आहे. गुरुजींचे आशीर्वाद फुकट जायचे नाहीत.”

मी ह्या जगात पदार्पण केल्यानंतर थोड्याच अवधीत लाहिरी महाशयांनी या जगातून प्रस्थान केले. ज्या ज्या गावी, शहरी आमच्या वडिलांची बदली व्हावयाची तेथे तेथे त्यांची अगदी शोभिवंत फ्रेममध्ये बसविलेली तसबीर आमच्या देव्हाऱ्यात नेहमी ठेवलेली असावयाची. पुष्कळ वेळा सकाळी व संध्याकाळी आई आणि मी त्या कामचलाऊ वेदीसमोर ध्यान लावून बसत असू व सुवासिक चंदनाच्या गंधात फुले बुडवून ती त्या तसबिरीला वाहत असू. धूप, अगरबत्ती आणि आमच्या संयुक्त भक्तीने आम्ही लाहिरी महाशयांच्या ठिकाणी मूर्त झालेल्या त्या परमात्मस्वरूपाची पूजा करीत असू.

त्यांच्या तसबिरीने माझ्या साऱ्या जीवनावर फार प्रभावी परिणाम केलेला होता. मी जसजसा मोठा होत गेलो तसतसे गुरुजींबद्दलचे विचार माझ्या मनात जास्त जास्त येऊ लागले. ध्यानामध्ये त्यांची तसविरीतील प्रतिमा फ्रेममधून बाहेर येऊन जिवंत साकार रूप धारण करून माझ्यासमोर बसलेली आहे असे मला अनेकदा दिसत असे. आणि ते तेजस्वी शरीर पाहून त्याचा चरणस्पर्श घेण्याचा प्रयत्न करताच ते शरीर पुनः चित्ररूप होत असे. शैशवावस्थेतून मी जेव्हा कौमार्यावस्थेत आलो तेव्हा माझ्या मनः श्चक्षूंपुढे लाहिरी महाशयांची तसबिरीतील लहानशी मूर्ती जणू जिवंत व तेजस्वी स्वरूपात परिवर्तित झालेली दिसू लागली. ज्या वेळी माझे मन गोंधळून जाई, माझी कसोटीची, परीक्षेची वेळ येई तेव्हा मी त्यांची अनेकदा प्रार्थना करी आणि मला त्यांचे समाधानकारक मार्गदर्शन मिळे.

ते शारीरिकदृष्ट्या जिवंत राहिले नसल्याने मला दुःख होई. पण त्यांचे सुप्त सर्वव्यापित्व जसजसे मला दिसून येऊ लागले तसतसा माझा शोक नाहीसा झाला. पूर्वी त्यांना भेटायला येऊ इच्छिणाऱ्या भक्तांना बहुधा ते लिहून कळवीत, “माझी हाडे आणि मांस पाहायला कशाला येता? तुमच्या कूटस्थ (आध्यात्मिक नेत्र) ठिकाणी मी तर नेहमी असतोच.”

मला वयाच्या आठव्या वर्षी लाहिरी महाशयांच्या केवळ तसबिरीच्या योगे मोठ्या आश्चर्यकारक रीतीने स्वास्थ्यलाभाचे आशीर्वाद मिळाले. ह्या अनुभवामुळे त्यांच्याबद्दलची माझी भक्ती अधिकच दृढ झाली. बंगालमध्ये इच्छापूरला आमच्या वडिलार्जित वतनवाडीवर असताना मला एशियाटिक कॉलरा झाला. माझ्या जीविताची आशा संपली. डॉक्टरांनी सुद्धा हात टेकले. माझ्या बिछान्याजवळ असलेल्या आईने आर्ततेने मला माझ्या उशावर टांगलेल्या लाहिरी महाशयांच्या तसबिरीकडे पाहण्यास सांगितले.

“बाळ, मनाने त्यांना नमस्कार कर.” आईला कळत होते की मी इतका अशक्त झालेलो होतो, की नमस्कार करावयाला मला हात सुद्धा उचलवत नव्हते. “तू जर खरीखुरी दृढ भक्ती दाखविलीस आणि मनाने त्यांच्यापुढे गुडघे टेकलेस तर तुला जीवनदान मिळेल.”

मी त्या तसबिरीकडे एकटक पाहिले आणि त्या जागी डोळे दिपवून टाकणारा एक प्रकाश दिसला. त्याने माझे शरीर व सारी खोली व्यापून टाकिली. माझे मळमळणे व रोगाची अनियंत्रणीय इतर लक्षणे एकदम नाहीशी झाली. मी बरा झालो. एकदम माझ्या अंगात ताकद आली आणि पुढे वाकून आईच्या आपल्या गुरूवरील असीम विश्वासाला आदर दर्शविण्यासाठी

म्हणून मला तिच्या चरणांस स्पर्श करावासा वाटला. आईने तर किती तरी वेळा आपले मस्तक त्या लहान तसबिरीपुढे टेकून गुरुजींना वंदन केले.

"हे सर्वव्यापी गुरुदेव, तुमचे किती उपकार मानू? तुमच्या तेजाच्या प्रभावामूळे माझा मुलगा आज वाचला."

सामान्यतः प्राणघातक अशा ह्या रोगापासून मी ज्या तेजस्वी प्रकाशामुळे नुकताच वाचलो तो प्रकाश तिने सुद्धा पाहिला होता हे मी ओळखले.

माझ्या सर्वात अनमोल वस्तुं मध्ये एक ती तसबीर पण आहे. खुद्द लाहिरी महाशयांनी ती तसबीर वडिलांना दिलेली होती, आणि तिच्यात पवित्र स्पंदन असे. त्या तसबिरीची पूर्वपीठिका चमत्कृतिजनक होती. ती गोष्ट मी बाबांचे गुरुबंधू जे कालीकुमार रॉय त्यांच्यापासून ऐकलेली आहे.

गुरुजींना कोणी त्यांचा फोटो काढून घेणे आवडत नव्हते असे दिसते. ते नको नको म्हणत असता त्यांचा व इतर भक्तजनांचा एकदा ग्रुपफोटो काढण्यात आला, कालीकुमार रॉयही त्यात होते. पण त्या वेळी फोटोग्राफरच्या आश्चर्यास सीमा राहिली नाही जेव्हा त्याने पाहिले की फोटोप्लेटवर सर्व शिष्यांचे फोटो तर एकदम स्पष्ट आले, परंतु मध्यभागी जेथे लाहिरी महाशयांचा फोटो येण्याची कल्पना होती ती जागा रिकामी होती आणि तेथे कसलीही आकृती नव्हती. ह्या चमत्काराची जागोजाग चर्चा झाली.

गंगाधरबाबूने (एक विद्यार्थी), जो अगदी निष्णात फोटोग्राफर म्हणून प्रसिद्ध होता, फुशारकी मारली की ही अस्थिर आकृती त्याचे हातून सुटणार नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी गंगाधरबाबू आपला सारा सरंजाम घेऊन आले. मागे पडदा टांगला आहे अशा एका लाकडाच्या बाकावर गुरुजी पद्मासन घालून बसलेले होते. फोटो बरोबर निघावा म्हणून प्रत्येक गोष्ट त्यांनी काळजीपूर्वक तपासून घेऊन एखाद्या अधाशासारख्या फोटोच्या १२ प्लेटस् घेतल्या आणि त्यांना लवकरच कळले की प्रत्येक प्लेटीमध्ये लाकडी बाक व पडदा बरोबर आला पण पुन्हा एकदा गुरुजींची आकृती मात्र गायब होती.

गलितगात्र व डोळ्यांत पाणी आलेले गंगाधरबाबू आपल्या गुरुजींकडे नम्रपणे आले. कित्येक तासांच्या मौनधारणेनंतर लाहिरी महाशयांचे सारगर्भित शब्द निघाले:

"मी आत्मस्वरूपी आहे. जे सर्वव्यापी, अदृश्य आहे त्याचा फोटो तुझा कॅमेरा कधी घेऊ शकेल काय?"

"मी पाहतो आहे की ते अशक्य आहे. परंतु हे पूज्य प्रभो, आपल्या देहमंदिराची तसबीर घ्यावी अशी माझी भाविक इच्छा आहे. माझी दृष्टी संकुचित होती, अगदी आतापर्यंत मला कधी उमजले नाही की आपल्या देहात परमेश्वर पूर्णतः निवास करीत आहे."

"तर मग उद्या सकाळी ये. मी आनंदाने फोटोला बसेन."

पुनः फोटोग्राफरने कॅमेऱ्याचा फोकस लावला. ह्या वेळी ती पवित्र आकृती गूढपणे अदृश्य न होता प्लेटवर अगदी स्पष्ट आली होती. त्यानंतर गुरुजींनी पुनः आपला फोटो कधी काढू दिला नाही; निदान माझ्यातरी पाहण्यात नाही.

तो फोटो या पुस्तकात दिलेला आहे. [6] लाहिरी महाशयांचे सर्ववर्गीय असे गौर वर्ण अवयव पाहून त्यांच्या कुळ वंशाचे अनुमान लावणे सहज नव्हते. ईश्वरस्वरूपी तादात्म्य पावलेल्या आनंदाची थोडीशी छटा त्यांच्या, गूढ स्मितात दृग्गोचर होत होती. त्यांचे अर्धोन्मीलित, बाह्य जगाकडे नाममात्र अवधान व अर्धे मिटलेले डोळे निजानंदात तल्लीन असल्याचे दर्शवितात. ऐहिक क्षुद्र प्रलोभनापासून अलिप्त, पण त्यांच्याकडे जे अनुग्रहासाठी येत त्यांचे पारमार्थिक मार्गातील प्रश्न सोडविण्याच्या कामी मात्र ते सदैव तत्पर असत.

गुरुजींच्या फोटोच्या प्रभावामुळे, दुखण्यातून वाचल्यानंतर लवकरच मला एक प्रभावी दृष्टान्त घडला. एके दिवशी सकाळी मी बिछान्यावर बसलो असता मला गहन तल्लीनता आली.

‘बंद डोळ्यांच्या अंधारा मागे आहे तरी काय?’ हा परीक्षणात्मक विचार माझ्या मनात तीव्रतेने आला. एक तेजस्वी प्रकाशाची लहर एकदम माझ्या अंतश्चक्षूंपुढून चमकून गेली. माझ्या ललाटातल्या चकचकीत विस्तृत पडद्यावर सिनेमातल्या लहानशा चित्राप्रमाणे साधुसंतांच्या दिव्य आकृती गिरिगुहांमध्ये ध्यानस्थ बसलेल्या अशा दिसून आल्या.



*श्री योगानंद - वय वर्षे सहा*

"कोण तुम्ही?" मी मोठ्याने विचारले.

"आम्ही हिमालयातील योगी." त्या दैवी प्रत्युत्तराचे वर्णन करणे अवघड आहे. माझे हृदय आनंदपुलकित होऊन गेले.

"मला सुद्धा हिमालयात जावेसे वाटते आणि आपल्यासारखे व्हावेसे वाटते." ते दृश्य नाहीसे झाले, पण त्यातून बाहेर पडलेली रुपेरी किरणशलाका वर्तुळाकार पसरत पसरत अनंतात मिळून गेली.

“हा विस्मयकारी झगझगाट कशाचा?”

“मी ईश्वर [7] आहे, मी प्रकाशमय आहे.” मेघांच्या गुंजनासारखा तो आवाज होता.

“मला तुझ्यात एकरूप व्हायचे आहे!”

माझी ती दिव्य भावसमाधी हळूहळू उतरू लागली आणि त्यासरशी परमेश्वराचा शोध घेण्याकरिता स्फूर्तीची कायमची ठेव माझ्या हस्तगत झाली. “तो शाश्वत आहे, सच्चिदानंद!” त्या आनंददायी दिवसानंतर कित्येक दिवस ही स्मृती राहिली.

बालपणची आणखी एक घटना उल्लेखनीय आहे; आणि अक्षरशः त्या घटनेचे स्मारक म्हणून माझ्या शरीरावर अजून त्या जखमेची खूण आहे. एकदा माझी वडील बहीण उमा आणि मी आमच्या गोरखपुरामधील घराच्या अंगणात कडूलिंबाच्या झाडाखाली अगदी सकाळीच बसलो होतो. ती मला पहिले बंगाली पुस्तक वाचायला मदत करीत होती. या लिंबाच्या झाडावरच्या पिकलेल्या लिंबोण्या खायला आजूबाजूच्या झाडांवरून आलेल्या पोपटांकडे मी नुसता पाहत होतो.

पायाला गळू झाल्याचे उमा सांगत होती व म्हणून तिने मलमाची डबी आणली. मी पण माझ्या हाताच्या पुढच्या भागावर ते थोडेसे मलम लावले.

“तुझ्या धडधाकट हाताला तू मलम कशाला लावतोस?”

“त्याचे असे आहे ताई, मला वाटते उद्या तिथे गळू होणार आहे. जेथे गळू होणार आहे तेथे मलम लावून त्याच्या गुणाची परीक्षा पाहतोय.”

“खोटारडा कुठला!”

“ताई, उद्या सकाळी काय होतेय ते पाहीपर्यंत मला तू खोटारडा म्हणू नकोस.” मला तिचा राग आला. उमावर माझ्या रागावण्याचा काहीएक परिणाम झाला नाही व तीनदा तिने मला टोमणा दिला. त्यामुळे उलट माझ्या आवाजात दृढनिश्चयाची छटा आली. मी सावकाशपणे उत्तर दिले, “माझ्यातील इच्छाशक्तीच्या जोरावर मी नक्की सांगतो की, उद्या माझ्या हातावर ह्या नेमक्या जागी मला एक चांगले भलेमोठे गळू येईल आणि तुझे गळू फुगून सध्या आहे त्याच्या दुप्पट होईल!”

दुसऱ्या दिवशी सकाळी नेमक्या त्याच जागी चांगले मोठे गळू आले व उमाचे गळू दुप्पट झाले. किंचाळत माझी बहीण आईकडे धावत गेली आणि म्हणाली, “मुकुंदा जादूगार झाला आहे.” आईने मला गंभीर शब्दांत कोणास दुःख द्यायला शब्द शक्तिचा उपयोग कधीच करू नये म्हणून बजावले. तिचा उपदेश कायमचा माझ्या ध्यानात राहिला आणि त्याप्रमाणे मी माझे इतिउत्तरचे आचरण ठेवले.

माझे गळू कापून काढावे लागले. डॉक्टरांनी जी शस्त्रक्रिया केली तिची दिसण्याजोगी खूण अजून आहे. मानवाच्या नुसत्या शब्दांत काय सामर्थ्य असू शकते याचे माझ्या उजव्या हातावर निरंतरचे स्मृतिचिन्ह आहे. तीव्र एकाग्रतेने उमाला बोललेल्या त्या स्पष्टपणे वरवर दिसणाऱ्या शब्दांमध्ये इतके सामर्थ्य होते की, जणू बाँबचा स्फोट व्हावा आणि त्यामुळे जरी हानिकारक असला तरी निश्चित परिणाम घडून आला. पुढे कित्येक वर्षांनी मला समजून आले की, मनुष्याच्या वाणीमध्ये असलेल्या स्पंदनात्मक स्फोटक सामर्थ्याचा शहाणपणाने

उपयोग करून माणसावरील आपत्तींचे निवारण करता येते. अशा तऱ्हेने जखम न होऊ देता किंवा दोषरहित शस्त्रक्रिया करता येते. [8]

पुढे आमच्या कुटुंबाची बदली लाहोर (पंजाब)ला झाली. तिथे असताना जगन्मातेचे भगवती कालीच्या [9] स्वरूपातील एक चित्र मला मिळाले. आमच्या घराच्या पडवीमध्ये एका साध्यासुध्या देव्हाऱ्यामध्ये त्याची प्रतिष्ठापना केली होती. त्या पवित्र जागी जर कोणतीही प्रार्थना केली तर ती फलद्रूप होते अशी माझ्या मनाची दृढ धारणा झाली. एके दिवशी तिथे उमा बरोबर उभा असताना मी दोन मुलांना दोन घरांच्या छपरांवर पतंग उडवताना पाहिले ती दोन्ही घरे व आमचे घर यांमध्ये एक लहान गल्ली होती.

"तू गप्प कां?" उमाने मला सहज गमतीने धक्का दिला.

"मी विचार करतोय की काय आश्चर्य आहे, जगन्माता मला मी मागतो ते देतेय."

"मला वाटते, ती तुला ते दोन्ही पतंग देणार आहे!" तिने हसून माझी चेष्टा केली.

"कां नाही देणार?" असे बोलून ते पतंग मला मिळावे म्हणून मी मनातल्या मनात प्रार्थना करावयास सुरुवात केली.

भारतात दोऱ्या वर मांजा (गोंद व काचेचे चूर्ण) लाऊन पतंगींच्या प्रतिस्पर्धा होतात. प्रत्येक पतंग उडविणारा प्रतिस्पर्ध्याच्या पतंगाचा दोरा तोडण्याचा प्रयत्न करीत असतो. दोरा तुटला म्हणजे पतंग लोकांच्या घरांच्या छपरांवरून जातो आणि तो पकडण्यात मोठी मौज वाटते. उमा आणि मी घरावरच्या छप्पर असलेल्या गच्चीवर होतो आणि तुटून पडलेला पतंग आमच्या हाती येणे दुरापास्त होते, कारण त्या पतंगाचा दोरा स्वाभाविकपणे त्या छपरांवरतीच लटकत राहिला असता.

आमच्या गल्लीच्या समोर शर्यतीस प्रारंभ झाला. एक दोरा कापला गेला त्याबरोबर पतंग माझ्या दिशेने येऊ लागला. इतक्यात अचानक वाऱ्याचा वेग कमी झाला आणि काही वेळ पतंग तसाच हवेत लोंबकळत राहिला. तेवढ्यात त्याचा दोरा समोरच्या घराच्या छपरावरील एका निवडुंगाच्या फडात अडकला. दोऱ्यास एक लांब माझ्या पोहोच मध्ये येईल असा फासा तयार झाला, आणि हा उपहार मी उमाला देऊन टाकला.

"पतंग तुझ्या हाती देवाची प्रार्थना केलीस म्हणून नाही आला, हा तर एक असाधारण योग होता. जर दुसरा पतंग तुझ्या हाती आला तरच मी विश्वास मानीन." ताईच्या शब्दांपेक्षा तिचे काळे डोळेच अधिक आश्चर्य वाटल्याचे सांगत होते. मी माझी तीव्र प्रार्थना चालूच ठेवली. दुसऱ्या प्रतिस्पर्ध्याने पतंग मागे जोराने खेचला आणि त्याबरोबर तो तुटून पडला. तो हवेत नाचत नाचत माझ्या दिशेने आला. गच्चीवरचा निवडुंग माझा दोस्तच जणू. त्याने पुनः त्याचा दोरा अडकवून टाकला; दोरीचा फास तयार झाला त्यामुळे पुनः मी त्याला पकडू शकलो. हा माझा दूसरा उपहार पण मी उमाला देऊन टाकला.

"खरेच की! देवी जगदंबा तुझे ऐकते. मला तर हे सगळे विलक्षण गूढ वाटते." असे म्हणून ताई एखाद्या भयभीत झालेल्या मृगशावका प्रमाणे तिथून पसार झाली.

1 आध्यात्मिक गुरु—'गुरुगीता' (Verse 17) गुरु म्हणजे "अंधकार घालविणारा" (गु-"अंधकार" व रु-म्हणजे "घालविणारा")

2 योगाभ्यासी. योग म्हणजे 'मिलन.' परमेश्वराच्या ठिकाणी ध्यान लावण्याचे प्राचीन भारतीय शास्त्र. (प्रकरण २६ —'क्रियायोगाचे शास्त्र' पाहावे.)

3 १९१५ साली मी जेव्हा संन्यासधर्माची दीक्षा घेतली तेव्हापासून माझे योगानंद असे नाव पडले. १९३५ साली माझ्या गुरूंनी मला परमहंस ही संन्यासाश्रमातली त्याच्याही वरची पदवी दिली. (प्रकरणे २४ व ४२ पाहावीत)

4 सिद्धयोग्यांच्या ठिकाणी अतींद्रिय शक्ती असतात. त्याविषयी प्रकरण ३०—"चमत्कारांचे नियम" यामध्ये स्पष्टीकरण दिलेले आहे.

5 लाहिरी महाशयांनी शिकविलेली एक योगिक क्रिया. जिच्या साधनेने, इंद्रियभावना स्तब्ध, नष्ट केली जाते व साधक परमात्मस्वरूपाच्या भावनेशी अधिकाधिक संलग्न, युत होऊन जातो. (प्रकरण २६ पाहावे)

6 पहा फोटो सेक्शन पृ. ९; आणि फोटो सेक्शन पृ. १० वर श्री श्री लाहिरी महाशयांचे चित्र. १९३५-३६ मध्ये भारतात असताना परमहंस योगानंदांनी एका बंगाली चित्रकाराला मूळ फोटो चे हे प्रतिरूप तयार करण्यास म्हटले आणि नंतर ह्याला यो. स. सो./एस. आर. एफ.च्या प्रकाशनांमध्ये उपयोगासाठी लाहिरी महाशयांचे सामान्य चित्र म्हणून नेमले. (हे चित्र माऊंट वाशिंगटनला परमहंसजींच्या बैठक खोलीत लागले आहे.) (प्रकाशकीय टीप)

7 जगन्नियंत्याचे संस्कृत नाव. मूळ धातू 'राज्य करणे' यापासून तद्धित. हिंदू धर्मग्रंथात परमेश्वराची सहस्रनामावली आहे. त्यांपैकी प्रत्येक नामाचा तत्त्वज्ञानदृष्ट्या एकेक वेगवेगळा अर्थ आहे. जगन्नियंत्याच्या ईश्वर या नावाचा अर्थ असा आहे की, जो आपल्या इच्छाशक्तीने सर्व ब्रह्मांड सुव्यवस्थितपणे, सुसंबद्धपणे निर्माण करतो व त्याचप्रमाणे त्याचा संहार करतो.

8 ध्वनीचे हे अपार सामर्थ्य ॐ ह्या सृजनात्मक शब्दापासून उत्पन्न झालेले आहे. ॐ ही विश्वव्यापी स्पंदनात्मक शक्ती सर्व अणु-परमाणूंच्या व्यवहारांची कारक शक्ती होय. कोणताही शब्द निभ्रान्त अनुभूतीने व मनाच्या तीव्र धारणेने जर उच्चारला तर तो खरा ठरतो. स्फूर्ती निर्माण करणाऱ्या अशा शब्दांचा (मंत्रांचा) मोठ्याने उच्चार किंवा मनातल्यामनात जप, सहज निर्देशांद्वारे उपचारात तसेच मानसोपचारात प्रभावी ठरला आहे. याचे रहस्य मनाच्या स्पंदनाचा वेग वाढविण्यात आहे.

9 काली: हे परमेश्वराचे, शाश्वत अशा निसर्गाचे मातृस्वरूपी प्रतीक आहे.

प्रकरण - २

# 2. माझा मातृवियोग आणि मांत्रिक ताईत

माझ्या वडील भावाचे लग्न व्हावे ही माझ्या आईच्या आयुष्यातली मोठी इच्छा. “माझ्या अनंताच्या बायकोचे मुख पाहीन तोच ह्या जगातला माझा स्वर्ग!” असे उद्गार माझी आई किती तरी वेळा काढायची! आपले वंशसातत्य अबाधित टिकून राहावे ही भारतीय भावना त्या उदगारांतून उमटत असे.

अनंताचे लग्न ठरले तेव्हा मी सुमारे अकरा वर्षाचा असेन. आई त्या वेळी कलकत्त्याला लग्नसमारंभाच्या तयारीत गर्क होती. फक्त मी आणि वडील बरेलीला होतो. दोन वर्षें लाहोरला काढल्यानंतर वडिलांची बदली येथे झाली होती.

मला दोन वडील बहिणी—रोमा आणि उमा. यांची लग्ने कशी थाटामाटात झाली होती हे मी पाहिलेले होते. पण अनंताच्या लग्नाच्या समारंभाचा थाट काही वेगळाच होता. कारण अनंत हा बाबांचा वडील मुलगा. घरी आईला भेटावयाला दूरदूरचे पाहुणे दररोज येत. त्यांची उतरण्याची, राहण्याची सोय आईने वेगळी केली होती. आम्ही ५०, ॲम्हर्स्ट हाऊस, या ठिकाणी एक नवीन घर खरेदी केले होते. तेथे पाहुण्यांची सगळी सोय केली होती. सर्व गोष्टीची अगदी जय्यत तयारी करून ठेविली होती. फराळाचे पदार्थ, लाडू वगैरे गोड पदार्थ, नवऱ्या मुलीकडे जाण्याकरिता नवऱ्यामुलाचा साजशृंगार घालून सजविलेला वरघोडा, मुंडावळी, रोषणाई, शृंगार केलेले हत्ती, उंट, इंग्रजी, स्कॉटिश बँड, देशी वाजंत्री, करमणुकीची सोंगे, भटजी वगैरे सर्व काही जुन्या रीतिरिवाजाप्रमाणे आवश्यक त्या सर्व गोष्टींचा बंदोबस्त करून ठेवला होता.

आम्ही दोघे, बाबा आणि मी अगदी खुशीत होतो. लग्नाच्या अगदी आयत्या वेळी हजर राहण्याचा आम्ही विचार ठरविला होता. परंतु ज्या दिवशी मुहूर्त निश्चित केला होता त्याच्या अगोदर काही दिवस मला एक अशुभ दृष्टान्त झाला.

आम्ही बरेलीला होतो. मध्यरात्रीची वेळ. बंगल्याच्या बाहेर अंगणात मी बाबांच्या जवळ झोपलो होतो. माझ्या गादीवरच्या मच्छरदाणीत वरती एका डासाने गुणगुणत फडफड करून मला उठविले. मच्छरदाणीचा पडदा उघडला व माझ्या आईची प्रेमळ मूर्ती माझ्यापुढे उभी राहिली.

“जा, वडिलांना उठव.” तिचा आवाज अगदी बारीक होता. “हे पाहा, तुम्हांला जर मला भेटायची इच्छा असेल तर उद्या सकाळी अगदी पहाटेच्या चारच्या गाडीने, जी अगदी पहिली गाडी मिळेल त्या गाडीने कलकत्त्याला या.” असे म्हणून ती पिशाच्चासारखी दिसणारी आकृती अदृश्य झाली.

“बाबा, बाबा, आई आपल्याला सोडून जातीय!” माझ्या भेदरलेल्या आवाजाने बाबांना ताबडतोब उठविले. अशुभ दृष्टान्त हा मी त्यांना रडतरडतच सांगितला.

"स्वप्नात घाबरला आहेस तू, दुसरं काही नाही, भिऊ नकोस." असे म्हणून बाबांनी माझी समजूत घातली. कुठलाही नवीन प्रसंग उपस्थित होवो, त्याची वासलात लावायची त्यांची ही ठराविक पद्धत होती. "तुझ्या आईची तब्येत चांगली आहे. बिघडली आहे असे जर आपल्याला कळले तर उद्या आपण तिकडे जायला निघू."

माझ्या मनाला ज्या यातना होत होत्या त्यांनी मला कठोरपणे बोलायला लावले. "आताच जर निघाला नाहीत तर त्याबद्दल तुम्ही स्वतः ला पुढे कधीही क्षमा करू शकणार नाही; आणि मीही तुम्हांला कधी क्षमा करणार नाही."

रात्र संपून सकाळ उजाडली आणि ती अशुभ वार्ता स्पष्ट शब्दांत आमच्या कानी पडली. "आई अत्यवस्थ आहे; लग्नाचे पुढे ढकलले आहे. ताबडतोब या."

बाबा आणि मी ताबडतोब घाईने निघालो. वाटेत एका जंक्शनच्या स्टेशनवर माझे एक काका आम्हांला भेटले. त्यांची गाडी जणू आमच्याच दिशेने मोठ्या वेगाने मोठी मोठी होत अशी येत होती. माझ्या मनातील दुःखावेग अगदी उचंबळून आला. मला वाटले, की अशीच्या अशीच गाडीच्या रुळांवर उडी घ्यावी. आई सोडून गेली असेच मला वाटले. तिच्या वियोगाचे दुःख मला असह्य होते. या जगात आता जगण्यासारखे काही उरले नाही असे मला वाटले. या जगात आईच माझे सर्वस्व होते. माझा सारा आधार तीच होती. लहानपणी किरकोळ दुःखाच्या प्रसंगी तिने माझे प्रेमळ मुद्रेने सांत्वन करावे. तिचे ते आश्वासन देणारे काळे डोळे मला अगदी स्पष्ट आठवले.

"अजून आहे ना ती?" अगदी निघता निघता मी काकांना काकुळतीने अखेरचा प्रश्न विचारला.

माझ्या मनाची व्याकुळता माझ्या चेहऱ्यावर ताबडतोब दिसून येत होती. ती त्यांच्या ध्यानात आली. ते म्हणाले, "आहे, अजून जिवंत आहे." पण मला त्यांचे बोलणे खरे वाटेना.

कलकत्त्याला आम्ही घरी पोचलो, आणि आई गेल्याची बातमी ऐकून आम्ही स्तंभितच झालो. मी खाली जमिनीवर निश्चेष्टपणे अगदी कोसळून पडलो. आक्रोशाने मी माझ्या दिव्य मातृदेवतेला स्वर्गाच्या द्वारातून बाहेर येण्याचे जणू पाचारण केले. माझ्या पिकत चाललेल्या जखमांवर तिच्या शब्दांनी जणू फुंकर घातली. "जन्मोजन्मी मीच तुझी आई होत्ये. मीच तुझे वात्सल्याने पालनपोषण केले. माझ्या या रूपात ते माझे दोन काळे सुंदर डोळे जे आता तुला पुनः कधीही दिसणार नाहीत ते पाहून घे."

माझ्या प्रिय मातेचे अंत्यसंस्कार झाल्यावर मी व बाबा दोघे परत बरेलीला आलो. आमच्या बंगल्याच्या समोर पिवळसर हिरवळीवर सौम्य शीतल छाया देणारे एक मोठे शेवळीचे झाड होते; ते आता माझे यात्रास्थान झाले. दररोज सकाळी मी त्या झाडाखाली जाऊन बसत असे.

मला कधीकधी काव्यस्फूर्ती येई आणि मला वाटे, शेवळीच्या झाडाची फुले मोठ्या भक्तिभावाने त्या हिरवळीच्या व्यासपीठावर स्वतःला अर्पण करीत आहेत. पहाटे दवबिंदूंबरोबर अश्रू गाळीत असताना मला त्या वेळी पुष्कळदा कसला तरी अनोखा, अन्य लोकातून येणारा असा प्रकाश भासमान होत असे. परमेश्वरदर्शनाची तीव्र तळमळ मला लागली. हिमालय पर्वताकडे माझे मन फार तीव्रतेने आकर्षित होऊ लागले.

माझा एक आतेभाऊ होता. त्याने त्या पवित्र पर्वतप्रदेशामध्ये बरीच वर्षे भ्रमण केलेले होते. तो एकदा आम्हांला भेटावयास बरेलीला आला. तो आम्हांला त्या उच्च गिरिकंदरात राहणाऱ्या योग्यांच्या आणि स्वामींच्या गोष्टी सांगे. [1]

"चला, आपण हिमालयात जाऊ." बरेलीमधील आमच्या घरमालकाच्या मुलाला—द्वारकाप्रसादला—मी एक दिवस सुचविले. पण त्याला त्यात काही गम्य वाटेना. त्याने उलट माझा हा बेत माझ्या वडील भावाच्या कानांवर घातला. तो नुकताच वडिलांना भेटावयाला बरेलीला आला होता. लहान मुलाची एक आपली हौस; न पुरविली जाणारी का होईना, असा विचार करून ती हसण्यावारी नेण्याच्या ऐवजी अनंताने माझी कुचेष्टा केली.

"कुठे आहे. तुझी ती भगवी छाटी? छाटीखेरीज तू स्वामी कसा होणार?" पण त्याच्या शब्दांनी माझ्या मनात रोमांचकारी विचार आणले. स्वामीचे खरेखुरे चित्र त्या शब्दांनी माझ्यापुढे उभे केले. मी साधू बनून साऱ्या हिंदुस्थानभर संचार करीत आहे असे मला वाटले. कदाचित एखाद्या पूर्व जन्मातील स्मृती जागृत झाली असेल. काही असो, हा पुरातनकालापासून चालत आलेला संन्याशाचा वेष वापरताना किती सोयीचा वाटेल हे मला समजून आले.

एकदा सकाळी मी द्वारकाबरोबर गप्पा मारीत होतो. आणि पर्वतावरून बर्फाचा खडक जसा खाली घरंगळत यावा तसे परमेश्वराने वरून खाली येऊन आम्हांला दर्शन द्यावे असे वाटले. माझ्या बोलण्याकडे माझ्या सोबत्याचे अर्धवट लक्ष होते. पण मी मात्र मनापासून बोलत होतो व स्वतःच स्वतःचे ऐकत होतो.

त्या दिवशी दुपारी मी हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या नैनितालच्या दिशेने घराबाहेर पडलो. अनंताने बरोबर पाठलाग केला व मला पकडून बरेलीला परत आणले. माझी फार निराशा झाली आणि यापुढे आमच्या यात्रा-बित्रा बंद झाल्या. आता यात्रा फक्त आमच्या शेवळीच्या झाडापर्यंतची दररोज पहाटेला जाण्याची. हिला फक्त परवानगी. माझ्या दोन माता—एक मानवी व एक स्वर्गीय. ह्या दोन्ही मातांच्या वियोगाच्या दुःखाने माझे हृदय पिळवटून निघाले.

आईच्या निधनाने आमच्या कुटुंबाची घडी विस्कटली ती विस्कटलीच. ती पुन्हा पूर्ववत होण्यासारखी नव्हती. बाबांनी पुढे दुसरे लग्न केले नाही. तसेच ते पुढे चाळीस वर्षे विधुर स्थितीत राहिले. आम्हा मुलांना ते आता बाप व आई अशा दोघांच्या मायेची पाखर घालू लागले. त्यांचा स्वभावही थोडाथोडा ममताळू होऊ लागला आणि त्यांच्याबद्दलची आमची भीतीही हळूहळू कमी होऊ लागली. कुटुंबातील निरनिराळे प्रश्न आता ते थंडपणे व समजुतीने सोडवू लागले. ऑफिसमधून घरी परत आल्यावर ते एखाद्या वैराग्याप्रमाणे आपल्या खोलीत जात व अगदी गंभीरपणे क्रियायोगाची साधना करीत. आई गेल्यावर बऱ्याच वर्षांनी घरकाम पाहण्याकरिता मी एक इंग्लिश नर्स ठेवण्याची खटपट केली; हेतू हा की वडिलांचे कष्ट कमी व्हावेत; पण त्यांनी नकार दर्शविला.

"माझी सेवा करणारी तुझी आईच शेवटची." आयुष्यभरच्या भक्तीकडे त्यांनी फार दूरवर नजर पोचविली. "दुसऱ्या कोणत्याही स्त्रीपासून प्रापंचिक कामात मला मदत घ्यावयाची

नाही."

आई गेल्यानंतर चौदा महिन्यांनी मला कळले की तिने माझ्याकरिता एक महत्त्वाचा निरोप ठेवून दिलेला होता. शेवटच्या घटकेला तिच्या बिछान्याजवळ अनंता बसून होता आणि त्याने तिचे शब्द टिपून ठेवले होते. तिने त्याला सांगून ठेवलेले होते की, एक वर्षानंतर त्याने तो संदेश मला द्यावा. पण अनंताने तो मला सांगायला जरा उशीर लावला. आईने त्याच्याकरिता नवरी शोधून ठेवलेली होती. त्या मुलीशी लग्न करण्यासाठी त्याला लवकरच बरेलीहून कलकत्त्याला जायचे होते. एके दिवशी संध्याकाळी त्याने मला जवळ बोलाविले.

"हे बघ मुकुंदा, एक काही विलक्षण बातमी सांगायची आहे तुला. मला सांगावयाला धीर होत नाही." अनंता जणू आपली अगतिकता दर्शवीत होता. "मला सारखी भीती वाटे की, ती हकीकत सांगितल्यावर तू घरातून निघून तर जाणार नाहीस ना! पण ते काही जरी असले तरी तुझ्यामध्ये ईश्वरी साक्षात्काराची चमक आहे. तुला मी हिमालयाच्या वाटेवरून पकडून आणले तेव्हा तुझ्याबाबत मी एक निश्चय केला होता. आता मी आपल्या आईला दिलेल्या वचनाच्या पूर्तीस अधिक विलंब लावीत नाही." माझ्या भावाने माझ्या हातात एक लहानशी पेटी दिली आणि आईचा निरोप सांगावयास सुरुवात केली:

आई म्हणाली होती, "मुकुंदा, माझ्या लाडक्या बाळा, हे माझे अखेरच्या आशीर्वादाचे शब्द तुला सांगते. तुझ्या जन्मानंतर ज्या काही घटना झाल्या त्या सांगायची आता वेळ आली आहे. तू अगदी लहान, माझ्या अंगावर होतास, तेव्हाच तुझे आयुष्य पुढे कसे जाणार आहे हे मला कळून चुकले होते. तेव्हा तुला घेऊन मी वाराणशीमधील आपल्या गुरुमहाराजांकडे गेले होते. भक्तगणांची केवढी गर्दी होती. त्यांमध्ये लाहिरी महाशय गुरुमहाराज अगदी ध्यानमग्न बसले होते. मला ते धड नीटपणे दिसतही नव्हते.

मी तुला थोपटत होते आणि मनात प्रार्थना करीत होते की, गुरुमहाराजांचे तुझ्याकडे लक्ष जावे आणि तुला त्यांनी आशीर्वाद द्यावा. माझी ही मनातली प्रार्थना इतकी तीव्र होत चालली की, शेवटी गुरुमहाराजांनी आपले डोळे उघडले आणि मला जवळ येण्याकरिता खूण केली. इतरांनी मला वाट मोकळी करून दिली. त्यांच्या पवित्र पायांवर मी डोके ठेवले व नमस्कार केला. लाहिरी महाशयांनी तुला आपल्या मांडीवर घेतले आणि तुझ्या कपाळावरून आपल्या अनुग्रहाचा हात फिरविला आणि ते उद्गारले की, 'मुली, तुझा मुलगा एक योगी होईल. परमार्थमार्गावर इंजिनासारखा तो इतरांना मोठा मदतनीस होईल. कित्येक आत्म्यांना तो परमेश्वराच्या द्वाराशी आणून पोचवील.'

माझ्या मनातली गुप्त प्रार्थना सर्वज्ञ अशा गुरुमहाराजांनी ऐकली व वरदान दिले. त्यामुळे माझे हृदय आनंदाने भरून आले. तुझ्या जन्माच्या थोडे दिवस आधी त्यांनी, तू त्यांच्याच मार्गाने जाशील असे मला सांगितलेले होते. पुढे बाळा, तुला तो दिव्य प्रकाश दिसला ती हकीकत मला माहीत होती. तुझी वडील बहीण रोमा हिलाही माहीत होती. आम्ही त्या वेळी अगदी शेजारच्याच खोलीमध्ये बसलेलो होतो. बिछान्यावर तू निश्चेष्ट पडलेला होतास हे आम्ही पाहिले होते. तुझ्या लहानशा मुखमंडलावर एक तेज आले होते आणि तू तेव्हा म्हणालास की, परमात्म्याच्या शोधार्थ मी हिमालयात जाण्याचा निश्चय केला आहे, तेव्हा तुझा आवाज दृढनिश्चयाच्या बळाने जणू घुमत होता!

बाळा, अशा किती तरी गोष्टी घडून आल्या आणि माझी ठाम समजूत झाली की, तुझा मार्ग वेगळा आहे. संसारी माणसाहून तू वेगळा आहेस. आणि पुढे माझ्या आयुष्यात अशी एक विलक्षण घटना घडून आली आणि त्या प्रसंगाने माझी अगदी खात्री पटली. तो प्रसंगच मला आता पुढला संदेश द्यावयास लावीत आहे.

पंजाबमधून कोणी एक साधुपुरुष आपल्याकडे आले होते. आम्ही त्या वेळी लाहोरला होतो. सकाळचीच वेळ होती. नोकर माजघरात आला व म्हणाला, ‘बाईसाहेब, एक विचित्रसा साधू [2] बाहेर आला आहे. तो म्हणतोय की मला मुकुंदाच्या आईला भेटायचे आहे.’

हे साधे शब्द, पण माझ्या मनातील संवेदनाच्या तारा त्या शब्दांनी छेडल्या. कोण आले आहे हे पाहण्याकरिता मी बाहेर आले तो साधुमहाराज दृष्टीस पडले. मी त्यांच्या पाया पडले. आपल्यासमोर परमेश्वरच मनुष्यरूपाने उभा आहे हे मी अंतर्ज्ञानाने जाणले.

‘माई!’ तो म्हणाला, ‘तुझे या भूतलावरचे आयुष्य आता संपत आले आहे; हे तुला समजावे अशी संतमहात्म्यांची इच्छा आहे. आता जे दुखणे तुला येईल ते तू अखेरचेच दुखणे समज.’ [3] एवढे बोलून तो थांबला. काही वेळ कोणीच बोलले नाही. मला भीती अशी वाटली नाही. पण एका महान मनःशांतीच्या स्पंदनाचा मला अनुभव आला. पुनः तो मला सांगू लागला.

‘तुझ्याजवळ मी एक चांदीचा मंतरलेला ताईत ठेवायला देणार आहे. आजच नाही देत. माझ्या बोलण्याचा खरेपणा तुला पटवून द्यायचा म्हणून सांगतो की, उद्या तू जेव्हा ध्यानाला बसशील तेव्हा तुझ्या हातात तो ताईत आपोआप येईल. आयुष्याच्या अखेरीची वेळ येईल तेव्हा तू आपला सगळ्यांत वडील मुलगा जो अनंत त्याच्याजवळ हा ताईत द्यावास व त्यास एक वर्ष जवळ ठेवून देण्यास आणि नंतर दुसऱ्या मुलाच्या स्वाधीन करण्यास सांगावेस. या ताईताचे महत्त्व मुकुंदाला सिद्ध-महात्म्यांकडून कळेल. तो जेव्हा ऐहिक वासनांचा त्याग करून परमेश्वरप्राप्तीच्या मार्गाला लागेल तेव्हा त्याने हा ताईत जवळ ठेवावा. अशा तऱ्हेने त्याने हा ताईत बरीच वर्षे ठेवावा. त्याचे कार्य-प्रयोजन झाले म्हणजे तो आपोआप अदृश्य होईल. अगदी गुप्त ठिकाणी जरी ठेवून दिला तरी ज्या ठिकाणाहून तो आला त्या ठिकाणाप्रत तो जाईल.’

त्या साधूला मी भरपूर भिक्षा [4] वाढली आणि आदरपूर्वक त्यांना नमस्कार केला. साधू भिक्षा न घेताच आशीर्वाद देऊन निघून गेला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळीं मी जेव्हा हात जोडून ध्यानास बसले तेव्हा माझ्या ओंजळीत एक चांदीचा ताईत अगदी त्या साधूने सांगितल्याप्रमाणे प्रकटला. माझ्या हाताला त्याचा गार, मऊ स्पर्श झाला तेव्हा माझ्या ओंजळीत तो आल्याचे समजून आले. आज दोन वर्षे होऊन गेली. मी काळजीपूर्वक तो ताईत सांभाळून ठेवलेला आहे. आणि आता तो अनंताच्या स्वाधीन करीत आहे. माझ्याकरिता शोक करू नका. माझे गुरूच मला परमेश्वराच्या स्वाधीन करणार आहेत. बरं बाळ, मी आता जाते. आई जगदंबा तुझे रक्षण करील.”

तो ताईत हातात घेतल्यावर माझ्या अंगावर एक दिव्य तेज चढले. किती एक सुप्त स्मृती जागृत झाल्या. ताईत वाटोळा, जुन्या घडणीचा असून त्याच्यावर संस्कृत अक्षरे लिहिलेली होती. भूतकाळात होऊन गेलेल्या उपदेशकांपासून तो माझ्या हातात आलेला आहे व तेच

अदृश्यपणे मला मार्गदर्शन करीत आहेत हे मी समजलो. त्या ताइताचे आणखी एक रहस्य होते, पण असे त्याचे अंतरंग विशद करणे बरे नव्हे. [5]

तो ताईत माझ्या हातातून अत्यंत शोचनीय अशा माझ्या आयुष्यातील दुःस्थितीतून कसा नाहीसा झाला व तो नाहीसा झाल्याने पुढे मला गुरूचा कसा लाभ झाला हे सर्व काही या प्रकरणात सांगता येणार नाही.

पण हिमालयात जाण्याला प्रथमच आडकाठी आल्याने तो लहान मुलगा नाउमेद झाला नाही. तो दररोज त्या ताईताच्या पंखांवरून दूरवर संचार करून परत येई.



*हायस्कूलमधील तरुण विद्यार्थी श्री योगानंद (उभे) व त्यांचे वडील बंधू अनंत*



*श्री योगानंदांची मोठी बहीण उमा आपल्या लहानपणात, गोरखपूर येथे*



*वडील बहीण रोमा (डावीकडे) व धाकटी बहीण नलिनी यांच्या समवेत श्री योगानंद, कोलकाता 1935*

1 ‘स्वामी’ ह्या संस्कृत शब्दाचा धात्वर्थ, जो आपल्या ‘स्व’शी, स्वतःशी युक्त आहे ‘तो’ असा आहे.

2 तपस्वी; साधनेचे किंवा आध्यात्मिक यम-नियमांचे पालन करणारा.

3 आपल्याला अल्पायुष्य आहे हे आईला माहीत होते आणि हे जेव्हा मला कळले तेव्हा अगदी प्रथमच माझ्या ध्यानात आले की, अनंताच्या लग्नाच्या तयारीची तिला घाई का झाली होती जरी प्रत्यक्ष त्याचे चार हात झाल्याचे तिच्या दृष्टीस पडले नाही, तरी पण तिच्या मातृहृदयाची स्वाभाविक इच्छा जी समारंभाची तयारी आपल्या डोळ्यांनी पाहावी ती पुरी झाली.

4 साधूंबद्दल आदरभाव दर्शविण्याची ही पद्धत आहे.

5 हा ताईत परलोकात, सूक्ष्म लोकात तयार झालेला असा होता. अशा वस्तूंची रचनाच क्षणिक स्वरूपाची असते. शेवटी त्या वस्तू ह्या पृथ्वीतलावरून नाहीशा होतात. (४३ वे प्रकरण पाहावे)

ह्या ताइतावर मंत्र किंवा जपाचे पवित्र शब्द कोरलेले होते. ध्वनी आणि वाक किंवा मनुष्यवाणी ह्यांच्या सामर्थ्याचा इतका सखोल अभ्यास भारताइतका अन्यत्र कोठेही झालेला आढळत नाही. ह्या अखिल विश्वात सामावून राहिलेला जो ॐ शब्द (बायबलमधील 'शब्द' किंवा अनेक जलप्रवाहांचा संमिश्र नाद) ह्याची तीन व्यक्त स्वरूपे किंवा गुणधर्म आहेत. निर्माण करणे, सांभाळ करणे व नाश करणे (तैत्तिरीय उपनिषद् १:८). प्रत्येक वेळी मनुष्य जेव्हा ॐ ह्या शब्दाचा उच्चार करतो तेव्हा ॐच्या ह्या तीनपैकी एका गुणास तो कार्यप्रवृत्त करतो. सर्व धर्मांच्या शास्त्रग्रंथांमध्ये मनुष्याने सत्यभाषण करावे म्हणून जे सांगितलेले आहे, सत्यभाषणाबद्दल जो आग्रह आहे त्याचे हेच सयुक्तिक कारण आहे.

ताइतावर जे संस्कृत मंत्र खोदलेले होते व त्या मंत्रांचा बरोबर उच्चार करून जप केल्याने त्या मंत्राच्या ठिकाणी आध्यात्मिक, शुभ, स्पंदनात्मक सामर्थ्य असल्याचे प्रतीत होत होते. संस्कृतमधील मुळाक्षरांची रचना अगदी आदर्श आहे. त्यांत पन्नास अक्षरांचा समावेश होतो. प्रत्येक अक्षर म्हणजे एक विशिष्ट, निश्चित असा उच्चार आहे. जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी लॅटिन लिपीवर आधारलेल्या इंग्रजी मुळाक्षरांविषयी एक उद्बोधक पण थोडासा विनोदगर्भ असा प्रबंध लिहिला आहे. त्यात त्यांनी असे म्हटलेले आहे की, ही इंग्रजी अक्षरे ध्वनींचा यथायोग्य उच्चार करावयास अपुरी व दुबळी पडतात. या वर्णमालेतील एकूण सव्वीस मुळाक्षरांवर ध्वनीच्या निरनिराळ्या उच्चारांचा फाजील ताण बसतो व हे उच्चार त्या अक्षरांकरवी बिनचूक असे व्यक्त केले जात नाहीत. प्रतिपादन करण्याच्या आपल्या नेहमीच्या कठोर पद्धतीनुसार शॉ म्हणतात, "इंग्रजी भाषेकरिता एक नवी इंग्रजी वर्णमाला सुरू करण्याबाबत जरी यादवीचा प्रसंग ओढवला तरी हरकत नाही. पण बेचाळीस अक्षरांच्या एका नवीन वर्णमालेचा स्वीकार करावा. (या संबंधात विल्सन ह्यांच्या *'दि मिरॅक्युलस बर्थ ऑफ लँग्वेज'* या पुस्तकाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना पाहावी.) अशा तऱ्हेची नवीन वर्णमाला संस्कृतमधील मुळाक्षरांच्या, उच्चारांच्या दृष्टीने, ध्वनिवाहक पूर्णतेच्या जवळ जवळ येईल. संस्कृत भाषेमध्ये पन्नास मुळाक्षरे आहेत व त्यांचे उच्चार अगदी बिनचूक व समर्पक असे होतात.

सिंधू नदीच्या खोऱ्यामधील उत्खननामध्ये निरनिराळ्या मुद्रा आढळून आल्या आहेत. त्यांवरून भारतीय संस्कृतीने आपली संस्कृत वर्णमाला ही सेमेटिक संस्कृतीपासून घेतली हा समज आता पुष्कळ प्राच्यसंशोधन शास्त्रातील विद्वानांनी टाकून दिला आहे. मोहेंजोदारो व हडाप्पा येथील उत्खननामध्ये काही मोठी शहरे पूर्वी भरभराटीच्या स्थितीत असलेली अशी नुकतीच आढळून आलेली आहेत. त्या शहरांच्या अवशेषांवरून त्या परिसरात भारताच्या भूमीवर प्राचीन काळी एक उच्च प्रतीची संस्कृती बराच दीर्घ काळ नांदत असावी असे सिद्ध होते; व इतिहास-संशोधनाचा पल्ला इतका दूरवर जाऊन पोचतो की, त्या काळाचे फक्त अंधुकच असे अनुमान करता येते. (सर जॉन मार्शल, 'मोहेंजोदारो व सिंधु-संस्कृती;' १९३१).

ह्या भूगोलावर मानवप्राणी हा अतिप्राचीन कालापासून सुसंस्कृत अवस्थेमध्ये वावरत असावा, ही भारतीय हिंदू व्युत्पत्ती जर मान्य केली तर या जगातील अतिप्राचीन अशी संस्कृत भाषा सुद्धा तितकीच परिपूर्ण असावी हे सिद्ध करणे सुलभ होते. एशियाटिक सोसायटी ज्यांनी स्थापन केली ते सर विलियम जोन्स म्हणतात, "संस्कृत भाषा, ती कितीही पुरातन असो, तिची वर्णरचना अगदी आश्चर्यकारक आहे. ती ग्रीक वर्णाहून अधिक पूर्ण, लॅटिन वर्णरचनेहून अधिक व्यापक आणि दोन्ही वर्णरचनांहून अधिक शास्त्रशुद्ध व सर्वोत्कृष्ट आहे."

'एन्सायक्लोपेडिआ अमेरिकाना' मध्ये दिलेले आहे: "पुरातन विद्येच्या अभ्यासाबाबत पुनरुत्थान झाल्यावर संस्कृतींच्या इतिहासामध्ये १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात संस्कृत भाषेचा जो शोध (पाश्चिमात्य विद्वानांच्या दृष्टीने) लागला त्याच्याइतकी महत्त्वाची दुसरी कोणतीही घटना झाली नाही. भाषाशास्त्र, तुलनात्मक व्याकरण, तुलनात्मक पुराणशास्त्र, धर्मशास्त्र ही सर्व शास्त्रे आपल्या मूळ अस्तित्वासाठीच संस्कृत भाषेच्या शोधाची ऋणी आहेत; किंवा त्या भाषेच्या अभ्यासाने त्यांच्यावर फारच मोठा परिणाम घडून आलेला आहे.

## प्रकरण - ३

# 3. द्विदेहि संत

"बाबा, मी जर निमूटपणे घरी परत यायचे कबूल केले तर मला काशीला जायला परवानगी द्याल का?"

प्रवासाची मला फार आवड होती. प्रवासाचा कधी काही बेत ठरवला तर वडील क्वचितच त्याला विरोध करीत. मी लहान असताना सुद्धा त्यांनी मला निरनिराळी शहरे व तीर्थांच्या ठिकाणी जायला परवानगी दिलेली होती. बहुधा माझ्याबरोबर एक-दोन मित्रही येत. आम्ही नेहमी पहिल्या वर्गातून जायचे. पास आम्हांला वडील काढून देत. रेल्वेमध्ये ते मोठे हुद्देदार अधिकारी होते आणि त्यामुळे कुटुंबातील आम्हा भटक्या मंडळींना त्यांचा फार उपयोग होई.

माझ्या विनंतीबाबत विचार करण्याचे वडिलांनी कबूल केले. दुसऱ्या दिवशी त्यांनी मला आपल्या जवळ बोलावले व एक बरेली ते वाराणशीच्या गोल सफरीचा पास, काही रुपयांच्या नोटा व दोन पत्रे माझ्या स्वाधीन केली.

"काशीला माझे एक स्नेही आहेत—केदारनाथबाबू. त्यांच्याकडे माझे जरा धंद्याबाबत काम आहे. अडचण अशी की, त्यांचा पत्ता माझ्याजवळ नाही. पण तिथे आम्हा उभयतांचे एक मित्र आहेत—स्वामी प्रणवानंद. त्यांच्यामार्फत तू हे पत्र केदारबाबूंकडे पोहोचते कर. स्वामी माझे गुरुबंधू आहेत. त्यांची आध्यात्मिक प्रगती मोठी आहे. त्यांच्याकडे जाऊन आल्याने तुझा फायदा होईल. आणि ही दुसरी चिठ्ठी तुझा त्यांच्याशी परिचय करून देईल.

"आणि हे पाहा, आता पुनः घरातून पळून जायचे नाही बरे का." हे सांगताना वडिलांचे डोळे किंचित् चमकले.

त्या वेळी माझे वय बारा वर्षांचे होते. वयाला अनुरूप अशा उत्साहाने मी बाहेर पडलो. (आता इतकी वर्षे झाली पण निरनिराळी ठिकाणे व निरनिराळी माणसे पाहण्याचा माझा आनंद अजून काही कमी झालेला नाही.) वाराणशीला पोहोचल्यावर मी तडक स्वामींच्या घरी गेलो. बाहेरचे दार उघडेच होते. मी दुसऱ्या मजल्यावर एका लांबलचक हॉलवजा दालनात गेलो. तेथे एका उंचशा व्यासपीठावर पद्मासन घालून बसलेली, कमरेभोवती फक्त एक पंचा गुंडाळलेली अशी एक स्थूलदेही व्यक्ती दिसली. त्यांच्या चेहऱ्यावर एकही सुरकुती नव्हती. डोक्याचे मुंडन केलेले होते, दाढी केलेली होती. त्यांच्या ओठांवर एक सुंदर हास्य विराजमान झालेले होते. मी त्यांच्या एकान्तात व्यत्यय आणला अशी माझ्या मनात आलेली कल्पना जाणून तिचे निराकरण करावे म्हणूनच की काय, त्यांनी मला जुन्या ओळखीच्या माणसास जशी हाक मारावी तशी हाक मारून जवळ बोलाविले.

"आनंद बाबा!" (माझ्या लाडक्याला आनंदाचा लाभ होवो) हे त्यांचे पाचारण अगदी मनापासून बालसदृश आवाजातले होते. मी खाली वाकलो आणि त्यांच्या पायांना स्पर्श केला.

"स्वामी प्रणवानंद आपणच का?"

त्यांनी होकारार्थी मान हलविली. “भगवतीचा मुलगाच ना तू?” माझ्या खिशातून बाबांचे पत्र काढण्याअगोदरच त्यांच्या तोंडून वरील शब्द बाहेर पडले. मी आश्चर्यचकित झालो. माझ्याजवळचे परिचयपत्र त्यांना दिले. त्या पत्राची आता आवश्यकताच राहिली नव्हती.

“केदारनाथबाबूंचा पत्ता मी तुला देतोच.” स्वामींच्या दूरदर्शनशक्तीच्या ह्या दुसऱ्या प्रयोगाने मी चाटच पडलो. त्यांनी पत्र नजरेखाली घातले; आणि माझ्या वडिलांच्याबाबत काही प्रेमळ उद्गार काढले.

“हे पाहा बाळ, मला दोन पेन्शनं आहेत. रेल्वे-ऑफिसमध्ये तुझ्या वडिलांच्या हाताखाली मी काम करीत होतो. त्यांनी मिळवून दिलेले एक पेन्शन; आणि दुसरे पेन्शन म्हणजे माझा स्वर्गीय पिता, जगन्नियंता त्याने शिफारस करून मिळवून दिलेले. त्या पित्याकरिता मी जाणूनबुजून ह्या संसाराचा त्याग केला.”

ह्या उद्गारांचा मला अर्थ कळेना. “महाराज, स्वर्गीय पित्याने हे जे पेन्शन दिले आहे असे आपण म्हणता त्याचा प्रकार काय आहे? तो काय आपल्या ओंजळीत पैसे टाकतो की काय?”

त्यांना हसू आले. “ते पेन्शन म्हणजे अगाध शांतीचा लाभ—कितीएक वर्षे ध्यानसाधना केली त्याचे बक्षीस. आता मला पैशाची जरुरी नाही. माझ्या ज्या काही थोड्या प्रापंचिक व्यवहाराच्या गरजा आहेत त्यांची भरपूर सोय करून ठेवलेली आहे. हे दुसरे पेन्शन म्हणजे काय आहे हे तुला काही दिवसांनी पुढे समजेल.”

अशा तऱ्हेने संभाषण एकदम थांबवून स्वामीमहाराज गंभीर व निश्चेष्ट झाले. त्यांच्या मुद्रेवर एका दगडी पुतळ्याची छटा आली. त्यांचे डोळे प्रथम चमकत होते. जणू काही एखादी पाहण्यासारखी गोष्ट न्याहाळून ते पाहत होते. पण नंतर त्यांची नजर थिजल्यासारखी झाली. त्यांच्या ह्या अचानक मौनधारणेने मला जरा गोंधळल्यासारखे झाले. वडिलांच्या मित्रांना भेटायला कसे जायचे ते त्यांनी अद्याप सांगितलेले नव्हते. त्या खोलीत आमच्या दोघांखेरीज दुसरे कोणी नव्हते. मी आपल्या सभोवार जरा पाहिले. मला जरा चमत्कारिक वाटू लागले. त्यांच्या बसायच्या जागेखाली त्यांच्या पादुका होत्या तिकडे माझी ओझरती नजर गेली.

“छोटेबाबू, [1] काही काळजी करू नका. तुम्हांला ज्यांना भेटायला जायचे आहे ते गृहस्थ अर्ध्या तासात उपस्थित होतील.” योगीमहाराज माझे मन समजावून घेत होते. हे असाध्य कार्य त्या क्षणाला कठीण नव्हते.

पुनः त्यांनी मौन धारण केले. माझ्या घड्याळाकडे मी पाहिले. बरोबर तीस मिनिटे झाली होती. स्वामीजींनी मौन आटोपते घेतले आणि ते म्हणाले “मला वाटते केदारनाथ दारापर्यंत येऊन पोचला असेल.” आणि मी जिन्यावरून वर येणाऱ्या कोणाच्या तरी पावलांचा आवाज ऐकला. वातावरण एकदम गंभीर झाले. माझ्या डोक्यात विचारांचे चक्र झंझावातासारखे फिरू लागले. ‘निरोप पाठविल्याशिवाय बाबांच्या मित्रांना येथे बोलावून घेणे कसे काय शक्य झाले? मी आल्यापासून माझ्याखेरीज दुसऱ्या कोणाशी ते शब्दही बोलले नाहीत.’

मी निमुटपणे त्या खोलीतून बाहेर पडलो व जिन्यावरून उतरू लागलो. अर्धा अधिक जिना उतरतोय तोच मला एक सद्‌गृहस्थ वाटेत भेटले. गोरे, मध्यम उंचीचे व पातळसे. ते गडबडीत असल्यासारखे दिसले.

"केदारनाथबाबू आपणच काय? माझा आवाज घाबरल्यासारखा होता.

"होय, मीच तो. भगवतीचा मुलगाच ना तू? मला भेटण्याकरिता येथे येऊन थांबला आहेस ना?" आणि त्यांनी किंचित गोड सुहृद्भावपूर्वक स्मित केले. ते एकदम येथे कसे येऊन ठेपले हे मला काही उमजेना. मी गांगरून जरा त्रासल्यासारखा झालो आणि मी आश्चर्याने विचारले, "महाराज, आपण येथे कसे काय आलात?"

"आज सगळे काही चमत्कारच होताहेत! एक तास सुद्धा झाला नसेल. गंगेवर मी स्नान उरकले आणि स्वामी प्रणवानंदांची अन माझी तेथे भेट झाली. मला काही समजत नाही, त्यांना मी तेथे त्या वेळी आहे हे कसे कळले?

"भगवतीचा मुलगा माझ्या खोलीत येऊन तुझी वाट पाहत आहे," ते म्हणाले. "माझ्याबरोबर चलतोस काय?" आणि मी आनंदाने कबूल झालो. हातात हात घालून आम्ही निघालो. माझ्या पायांत हे चालतानाचे जाड जोडे होते. स्वामींच्या पायांत लाकडी खडावा होत्या, पण माझ्याबरोबर ते चालत होते.

प्रणवानंद एकदम थांबले आणि त्यांनी मला विचारले,

"माझ्या जागेपर्यंत पोचण्यास तुला किती वेळ लागेल?"

"साधारण अर्धा-एक तास."

"मला आता थोडेसे दुसरे काम आहे." त्यांनी माझ्याकडे जरा मार्मिक नजरेने पाहिले. "मी आता तुला येथे सोडतो. मला माझ्या मुक्कामाच्या ठिकाणी येऊन भेट. भगवतीचा मुलगा आणि मी तुझी तेथे वाट पाहत आहोत!"

मी जरा काही हो ना करतोय तोच ते माझ्या बाजूने पुढे सटकले आणि गर्दीत नाहीसे झाले. आणि मी येथे जणू धावतच येऊन पोचतोय.

ह्या साऱ्या खुलाशाने माझ्या मनातला गोंधळ अधिकच वाढला. मी त्यांना विचारले, "स्वामींचा व आपला किती दिवसांचा परिचय आहे?"

"गतवर्षी काही प्रसंगी त्यांची-माझी भेट झाली. पण यंदा काही नाही. आज पुनः घाटावर त्यांची भेट झाली. फार आनंद झाला."

"माझ्या कानांवर माझा विश्वास बसत नाही! मला काय भ्रम झाला आहे की काय? तुम्हांला काय ते स्वप्नात भेटले की प्रत्यक्ष भेटले? अगदी हाताला हात लावलात आणि त्यांच्या पावलांचा आवाज तुम्हांला स्पष्ट ऐकू आला?"


"तू काय म्हणतोस ते मला काही समजत नाही," ते रागाने उसळून म्हणाले, "मी काही खोटे बोलत नाही; तू ह्या ठिकाणी माझी वाट पाहत थांबलेला आहेस हे फक्त स्वामीजींकडूनच मला समजणे शक्य आहे हे तुला समजत नाही काय?"

"पण मग सुमारे एक तास झाला; ते स्वामी प्रणवानंद तर माझ्या दृष्टीसमोरून एक क्षणभर सुद्धा दूर झालेले नाहीत." आणि मग त्यांना मी सारी हकीकत सांगितली; व स्वामीजींशी जे माझे संभाषण झाले ते पुन्हा त्यांना सांगितले.

त्यांचे डोळे मोठे झाले, “काय, आपण ह्या जड सृष्टीत आहो का स्वप्नसृष्टीत आहो? असा चमत्कार पाहावयास मिळेल असे मला कधीही वाटले नाही! मला प्रथम वाटले होते की हे स्वामी काय सामान्य मनुष्यच आहेत. पण आता पाहतो तर काय, ते दुसरा देह धारण करतात व त्या देहाने कार्यही करू शकतात.”

दोघांनी मिळून आम्ही स्वामींच्या दालनात प्रवेश केला. केदारनाथबाबूंनी माझे लक्ष व्यासपीठाच्या खाली ठेवलेल्या पादुकांकडे वेधले.

“पाहा, त्याच त्या पादुका. घाटावर त्यांच्या पायांत असलेल्या.” ते बारीक आवाजात सांगू लागले. “त्यांच्या अंगावर फक्त एक पंचा होता; आताही तो तसाच आहे.”



त्यांनी स्वामींना वाकून प्रणाम केला. त्यांनी माझ्याकडे पाहून विनोदगर्भ स्मित केले व म्हणाले, “ह्या साऱ्या प्रकाराचा तुला अचंभा का वाटतो? खऱ्या योग्यांपासून ह्या जडसृष्टीची सूक्ष्म एकता लपून राहत नाही. एका क्षणात कलकत्त्यामधील माझ्या शिष्यांना मी पाहू शकतो, त्यांच्याशी बोलू शकतो. ते सुद्धा ह्या स्थूल जड सृष्टीचे बंधन स्वेच्छेने तोडून टाकून पलीकडे जाऊ शकतात.”

स्वामीजींनी मला परलोकातील संदेशवहन व दूरान्वेषण [2] या बाबतीतील आपल्या सामर्थ्याची जी चुणूक दाखविली, त्यात त्यांचा हेतू होता. माझ्या बालमनावर दैवी सामर्थ्याची पकड बसावी हा तो हेतू असावा. पण मला त्याबाबत उत्साह वाटण्याऐवजी एक तऱ्हेची आश्चर्यमिश्रित भीतीच वाटू लागली. एका विशिष्ट गुरूकडून—श्रीयुक्तेश्वरांकडून मला अनुग्रह दिला जाण्याची ईश्वरी योजना असल्याकारणाने प्रणवानंदांचे शिष्यत्व पत्करण्याचे माझ्या मनात आले नाही. मी त्यांच्याकडे पाहत होतो. मनात संशय आला की, खरोखर मी पाहतो ते तेच आहेत की त्यांची दुसरी प्रतिमा आहे!

गुरुजींनी माझ्या मनाची अस्वस्थता घालविण्यासाठी आत्मजागृती करवून देणारा दृष्टिक्षेप केला व स्फूर्तिदायक अशा शब्दांत आपल्या स्वतःच्या गुरूसंबंधी ते सांगू लागले.

“मला माहीत असलेल्यांत लाहिरी महाशय सर्वांत मोठे योगी. मानवी देहात वावरणारे प्रत्यक्ष परमेश्वरच ते.”

मी विचार केला, की शिष्य जर आपल्या इच्छेनुसार अन्य हाडामांसाचे शरीर निर्माण करू शकतो, तर त्याच्या गुरूला कोणता असा चमत्कार करता येणार नाही?

“गुरुकृपेचे मोल नाही, ह्याची तुला मी एक गोष्ट सांगतो. दररोज रात्री आठ तास दुसऱ्या एका साधकाबरोबर मी ध्यानाला बसत असे. दिवसा आम्ही ऑफिसमध्ये काम करीत असू. कारकुनी काम करावयास मला कठीण वाटे म्हणून सारा वेळ ईश्वरचिंतनाकडे घालवावा अशी माझी मनापासून इच्छा होती. आठ वर्षे चिकाटीने मी दररोज अर्धी रात्र ध्यानात घालविली. ध्यानामुळे मला आश्चर्यकारक लाभ झाला. आध्यात्मिक उन्नती पराकोटीस जाऊन माझे चित्त उजळून निघाले. परंतु मला असे वाटे की, परमेश्वरापर्यंत पोचायला मला अजून एक अडसर दूर ठेवीत आहे. अगदी मनुष्याच्या सामर्थ्यापलीकडील उत्कंठा, आस्था मी दाखविली तरी जिचा लाभ शाश्वत स्वरूपाचा असतो अशा अंतिम सायुज्यतेपासून मी वंचितच झालो. एकदा संध्याकाळी मी लाहिरी महाशयांकडे गेलो आणि त्यांनी माझ्याकरिता दैवी स्वरूपाची मध्यस्थी करावी म्हणून त्यांस विनविले. सबंध रात्रभर माझी विनवणी चालू होती:

‘गुरुमहाराज, आपण साक्षात् देवदूत आहात. माझी आध्यात्मिक तळमळ आता इतकी तीव्र झाली आहे की परमात्म्याचे प्रत्यक्ष समोर दर्शन झाल्याशिवाय मी आता जगू शकणार नाही!’

‘त्याला मी काय करू? ध्यान अधिक तीव्र कर.’

‘गुरुमहाराज, आपण प्रत्यक्ष परमेश्वर आहात. मी आपली प्रार्थना करतो. परमेश्वरच जणू जड देह धारण करून माझ्यापुढे उभा आहे. मला आता आपल्या दिव्य स्वरूपाचे दर्शन घडवून द्या; कृपा करा!’

लाहिरी महाशयांनी अनुग्रह केला. आपला हात माझ्याकडे करून ते म्हणाले, ‘तू आता जा आणि ध्यानाला बैस. मी तुझ्यासाठी ब्रह्मदेवाकडे [3] मध्यस्थी केली आहे.’

“मी एकदम अगदी उंच उंच उचलला जात आहे असे मला वाटले. मी घरी परत आलो. त्या रात्री ध्यानामध्ये माझे ज्वलंत ध्येय मला प्राप्त झाले. असे लाभलेले ते आध्यात्मिक पेन्शन मी आता अविरतपणे उपभोगीत आहे. त्या दिवसापासून तो आनंदमय सृष्टिनिर्माता माझ्या डोळ्यांपासून एखाद्या भ्रमाच्या पडद्यामागे दडून राहावा तसा कधी राहिलेलाच नाही.”

प्रणवानंदांचा चेहरा दिव्य तेजाने भरून राहिलेला होता. पारलौकिक शांतता माझ्या हृदयात संचरली. भीती अशी वाटेनाशी झाली. गुरुमहाराजांनी आणखी एक गोष्ट सांगितली. त्यानंतर काही महिन्यांनी मी लाहिरी महाशयांना भेटलो आणि दिव्य प्रसाद दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्याचा मी प्रयत्न केला. नंतर मी आणखी एका बाबतीत त्यांच्याशी बोलणे केले.

“गुरुमहाराज, आपण देवस्वरूप आहांत. आता मला कचेरीत पुढे काम करायची बिलकुल इच्छा नाही. कृपा करून मला त्यातून मोकळे करा. हे जे ब्रह्मसुख आहे त्यात मी सतत जणू धुंद असाच असतो.”

“मग कंपनीकडून पेन्शन मागून घे.”

“इतक्या लवकर मला पेन्शन कसे मिळेल? काय कारण देऊ?”

“तुला वाटेल ते कारण दे.”

दुसऱ्याच दिवशी मी अर्ज केला. नौकरीची मुदत संपण्यापूर्वीच मी पेन्शन का मागतोय याची कारणे डॉक्टरांनी विचारली.

“काम करीत असताना माझ्या पाठीत मेरुदंडातून [4] एक जबरदस्त चमक वरपर्यंत चढत जाते. ती चमक माझ्या शरीरभर भरून जाते आणि त्यामुळे कचेरीचे काम मला करता येत नाही.” हे माझे म्हणणे ऐकून आणखी जास्त काही न विचारता डॉक्टरांनी मला पेन्शन मिळावे म्हणून जोराची शिफारस केली आणि मला पेन्शन मिळाले. मला माहीत होते की, लाहिरी महाशयांच्या दैवी इच्छेने डॉक्टर, रेल्वेतील अधिकारी आणि त्यांत तुझे वडील सुद्धा या सर्वांची मने वळविली गेली. गुरुमहाराजांनी जसा आदेश द्यावा त्याप्रमाणे त्या सगळ्यांनी कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानली आणि माझे जे परम ईप्सित त्याच्याशी अखंडितपणे संलग्न होण्यासाठी त्यांनी मला मोकळे केले.

आणि असे हे विलक्षण वक्तव्य केल्यावर स्वामी प्रणवानंदांनी एका प्रदीर्घ मौनाचा अवलंब केला व ते एकान्तात गेले. त्यांच्या पायांना आदरपूर्वक नम्रभावाने मी वंदन केले व त्यांचा निरोप घेतला. निरोप घेतेवेळी त्यांनी मला आशीर्वाद दिला:

“तुझे जीवन सन्यासधर्म व योगमार्ग यांस वाहिलेले आहे. पुनः एकदा तू माझ्या भेटीला येशील त्या वेळी तुझे वडील तुझ्याबरोबर असतील.” पुष्कळ वर्षांनी ही दोन्ही भाकिते खरी ठरली.

संध्याकाळ झाली होती. अंधार पसरत होता. केदारनाथबाबू माझ्याबरोबरच चालत होते. मी त्यांना बाबांचे पत्र दिले. ते त्यांनी रस्त्र्यावरच्या दिव्याच्या उजेडात वाचले.

"तुझ्या वडिलांचे असे म्हणणे आहे की, मी त्यांच्या रेल्वे कंपनीच्या कलकत्त्याच्या ऑफिसमध्ये नोकरी पत्करावी. स्वामी प्रणवानंद ज्या पेन्शनचा उपभोग घेतात असे पेन्शन मिळविण्यात काय मौज आहे! पण ते शक्य नाही. मला बनारस सोडून जाता येणार नाही. अरेरे! दोन देह धारण करणे मला या जन्मी तरी शक्य नाही!"

1 छोटेबाबू या नावाने बरेचसे साधुसंत मला हाक मारीत. त्याचा अर्थ 'छोटे मालक.'

2 योगीजनांनी मनोविज्ञानाने जे निसर्गनियम शोधून काढलेले आहेत त्या नियमांचेच अबाधित अस्तित्व भौतिक शास्त्रे आपापल्या पद्धतींनी शाबीत करीत असतात. उदाहरणार्थ, रोमच्या रॉयल युनिव्हर्सिटीमध्ये २६ नोव्हेंबर १९३५ रोजी माणसाला दूरान्वेषणाचे सामर्थ्य असू शकते ह्याचे प्रात्यक्षिक दाखविले गेले. डॉ. गेसेप्प कॅलिगॅरिस, ज्ञानतंत्र मनोविज्ञानाचे प्राध्यापक, यांनी प्रयोग करून दाखविला. एका मनुष्याच्या शरीरातील काही भागांवर दाब ठेवल्यावर तो मनुष्य भिंती पलीकडील व्यक्ती व वस्तुंचे अगदी स्पष्टपणें सूक्ष्म वर्णने देऊ लागला.

डॉ. कॅलिगॅरिस यांनी इतर प्राध्यापकांस सांगितले की, त्वचेच्या काही भागांना जर उत्तेजित केले तर त्या व्यक्तीस इंद्रियातीत ज्ञान होते व ती व्यक्ती अन्यथा साधारणपणे ज्या वस्तू पाहू शकणार नाही त्या पाहू शकते. त्या व्यक्तीला भिंतीच्या दुसऱ्या बाजूकडील वस्तु पाहता यावेत म्हणून प्रोफेसर कॅलिगॅरिस यांनी त्या व्यक्तीच्या वक्षस्थलाच्या उजव्या बाजूकडील भाग सुमारे पंधरा मिनिटे दाबला. डॉ. कॅलिगॅरिस यांच्या म्हणण्याप्रमाणे शरीराचे काही विशिष्ट भाग उत्तेजित केले असता त्या व्यक्ती अतिदूर अंतरावरील वस्तू पाहू शकतात. मग त्या वस्तू त्यांनी पूर्वी पाहिलेल्या असोत किंवा नसोत.

3 ईश्वर जेव्हा सृष्टी निर्माण करतो तेव्हा त्यास ब्रह्मदेव म्हणतात. मूळ संस्कृत धातू 'बृह्' म्हणजे विस्तार करणे.

4 ध्यान तीव्र झाले म्हणजे चैतन्य-जागृती सर्वांत प्रथम मेरुदंडामध्ये उत्पन्न होते. त्यानंतर ती वर वर जात मेंदूपर्यंत जाऊन पोचते. त्या वेळी मग जो परमानंद प्राप्त होतो त्याने साधक भारावून जातो. पण योगीजन त्या परमानंदाची बाह्य व्यक्त लक्षणे ताब्यात ठेवण्यास हळूहळू शिकतात.

माझी ज्या वेळी प्रणवानंदांशी भेट झाली त्या वेळी त्यांना साक्षात्कार झालेला होता. पण त्यांच्या व्यावसायिक आयुष्याची इतिश्री यापूर्वीच कित्येक वर्षे झालेली होती. निर्विकल्प समाधी त्यांना त्या वेळी अगदी पूर्णतया साध्य झाली नव्हती. जाणीवेच्या त्या पूर्ण व अचल अवस्थेमध्ये योग्याला आपले कोणतेही ऐहिक कर्म आचरताना अडचण भासत नाही.

प्रणवानंदांनी सेवानिवृत्त झाल्यावर भगवद्गीतेवर हिंदी आणि बंगाली भाषांमध्ये 'प्रणब गीता' नावाची एक विद्वत्ताप्रचुर टीका लिहिली.

अनेक देहांत प्रकट होणे ही सिद्धी पातंजलीने आपल्या योगसूत्रात नमूद केलेली आहे. अनेक स्थळी प्रकट होऊन दाखविल्याचे चमत्कार अनेक साधुसंतांच्या जीवनात पूर्वापार दृष्टोत्पत्तीस आलेले आहेत.

प्रकरण - ४

# 4. माझ्या हिमालयाच्या पलायनात विघ्न

"काही तरी सबब सांगून शाळेतून बाहेर पड आणि एक टांगा करून आमच्या गल्लीत येऊन अशा ठिकाणी थांब की आमच्या घरातील कोणाच्याही दृष्टीस तू पडू नयेस."

असे अंतिम निर्देश मी अमर मित्र या माझ्या शाळेतील मित्राला देऊन ठेवल्या. हिमालयात जाण्याच्या माझ्या बेतात तो सामील होता. तो माझ्याबरोबर येणार होता. पुढला दिवस आम्ही आमच्या पलायनासाठी निश्चित केला. काळजी घेणे अगदी आवश्यक होते. आमचे दादा अनंतबाबू ह्यांचे फार बारीक लक्ष. आमचा हा गुप्त बेत जर त्यांच्या ध्यानात आला तर ते नक्कीच आमचा बेत हाणून पाडणार ही भीती सारखी माझ्या मनात होती. मी माझ्या मनातल्या मनात ताइताची प्रार्थना करी. हिमालयातील बर्फाच्छादित गिरिकंदरात माझ्या गुरूचे मला दर्शन घडून येईल अशी मला आशा होती. कितीकदा त्यांनी मला स्वप्नांमध्ये दर्शन दिलेले होते.

आम्ही ह्या वेळी कलकत्त्याला राहत असू. बाबांची कलकत्त्याला कायमची बदली झाली होती. भारतीय पितृसत्ताक कुटुंबपद्धतीप्रमाणे अनंतदादाची बायको—माझी वहिनी—घरात आली होती. तेथे माळ्यावर एक लहानशी खोली मी दररोजच्या ध्यानासाठी तयार केली होती. आणि तेथे बसून मी माझ्या मनाला ईश्वर-प्राप्ति साठी तयार करीत असे.

तो संस्मरणीय दिवस उजाडला पण अमंगलकारक अशा पावसा सोबत. अमरच्या टांग्याच्या चाकांचा आवाज रस्त्रया वर ऐकू आल्याबरोबर मी ताबडतोब ब्लँकेट, पादत्राणे, दोन लुंग्या, एक जपाची माळ, लाहिरी महाशयांची तसबीर आणि भगवद्गीतेची एक पोथी असे सामान एकत्र बांधून एक गाठोडे तयार केले आणि ते तिसऱ्या मजल्यावरून खिडकीतून खाली फेकून दिले व जिन्यावरून खाली धावतच गेलो. दाराशी काका मासळी विकत घेत होते.

"काय गडबड आहे?" त्यांनी जरा संशयी नजरेने मला आपादमस्तक न्याहाळले.

मी न बोलताच किंचित् स्मित करून पुढे सटकलो आणि गल्लीत गेलो. गाठोडे नीट सावरून घेतले आणि गुपचुप अमरला गाठले. नंतर आम्ही चांदणी चौकाकडे टांगा वळविला. तेथे म्हणजे बाजारपेठ. आज कित्येक महिने आम्ही खाऊचे पैसे जवळ साठवून ठेवीत होतो. आम्हांला साहेबी कपडे घ्यायचे होते ना. आमचा दादा फार चाणाक्ष. गुप्त हेराचे काम करून आम्हांला हुडकून काढायचा. त्याला आम्हांला हुडकून काढता येऊ नये म्हणून आम्ही साहेबी युरोपियन कपडे घालून हिंडण्याचे ठरविले.

माझा चुलत भाऊ ज्योतींद्र घोष हाही आमच्याबरोबर येणार होता. त्यास आम्ही जतींदा नावाने हाक मारीत असू. स्टेशनकडे जाताना त्यास बरोबर घेण्याकरिता वाटेत आम्ही थांबलो. हिमालयात गुरूच्या शोधार्थ बाहेर पडण्याच्या आमच्या ह्या बेतात तो नुकताच सामील झाला होता. आम्ही तयार ठेवून दिलेला साहेबी पोशाख त्याने ताबडतोब अंगावर

चढविला. अशा बंदोबस्ताने आम्ही बाहेर पडलो. बेत ठरल्याप्रमाणे जमून येण्यास सुरुवात झाल्याने आमची छाती जरा फुगली.

आता फक्त रबरी-कॅनव्हसचे बूट घ्यावयाचे राहिले! आणि मग आमच्या मित्रमंडळीना मी रबरी बुटांच्या दुकानाकडे घेऊन गेलो. कातड्याच्या वस्तू जनावरांना मारून त्यांच्या कातड्यापासून तयार करतात. अशा वस्तू यात्रेच्या वेळी आपण घेऊ नयेत असे म्हणून माझ्या भगवद्गीतेवरचे कातडी वेष्टण व माझ्या इंग्रजी सोला टोपीवरचा कातडी पट्टा काढून टाकण्याकरिता आम्ही वाटेत थोडा वेळ थांबलो.

स्टेशनवर आल्यावर आम्ही बराद्वानची तिकिटे काढली. तेथे आम्ही हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या हरद्वारची तिकिटे घेणार होतो. गाडी धावतच आली; जणू आमच्यासारखी. आणि मग आता पुढे आपल्या कशा तऱ्हेच्या अपेक्षा सफल होणार त्याचे मी भाकीत करू लागलो.

“हे पाहा, कल्पना करा,” मी सांगू लागलो, “आता आपल्याला गुरुजी दीक्षा देणार आणि मग आपल्याला समाधी लावता येणार. आपल्या हाडामांसात जणू चुंबकीय शक्ती जागृत होणार आणि मग हिमालयातील हिंस्र वन्य पशू आपल्याजवळ अगदी शेळीसारखे येणार. एवढा वाघ, तो पण गरीब मांजरीसारखा आपल्याजवळ येऊन आपण त्याच्या अंगावरून प्रेमाने हात फिरवावा म्हणून वाट पाहत बसणार!”

आमचा भावी जीवनक्रम शब्दशः व अलंकारिक पद्धतीने चित्रित करणारे, रंगविणारे माझे हे भाषण ऐकून अमरच्या अंगी जणू नवचैतन्य संचारले. त्याच्या मुद्रेवर स्मित खेळू लागले. पण जतींदाने आपली नजर वळवून तो खिडकीतून बाहेर दिसणारा व सर्रकन दृष्टीसमोरून जाणारा भूप्रदेश निरखून पाहू लागला.

“आता आपल्याजवळच्या पैशाचे आपण तीन सारखे भाग करू.” बराच वेळ स्तब्ध राहिलेल्या जतींदाने आपली सूचना पुढे मांडली. “हे पाहा, बरद्वानला तिकिटे आपण वेगवेगळी काढू, म्हणजे स्टेशनवर आपण एकत्र मिळून पळून जात आहोत असे कुणाला वाटणार नाही.”

मनात काही एक संशय न घेता आम्ही कबूल झालो. बरद्वानला आमची गाडी आली तेव्हा संध्याकाळ झाली होती. जतींदा तिकीट-ऑफिसकडे गेला. अमर व मी प्लॅटफॉर्मवरच बसून राहिलो. आम्ही जतींदाची पंधरा मिनिटे वाट पाहिली. तो जेव्हा येईना तेव्हा जरा इकडे तिकडे चौकशी केली पण त्याचा पत्ता लागेना. सगळीकडे शोध केला. भीती वाटून आम्ही त्याला मोठ्या आवाजाने हाक मारू लागलो, पण त्याचा पत्ता नाही. त्या लहान स्टेशनच्या आजूबाजूच्या अंधारात तो नाहीसा झाला.

मी अगदी घाबरून गेलो. मला धक्काच बसला. माझे अवयव गारठलेच. परमेश्वराला अशी दुर्घटना पसंत पडावी ना! त्याच्या दर्शनाकरिता मी एवढा आटापिटा करून सगळी योजना काळजीपूर्वक आखली, आणि अशा ह्या अद्भुत प्रसंगी परमेश्वराने आम्हांला दगा द्यावा!

“अमर, चला आपण घरी परतू या.” मी एखाद्या लहान मुलासारखा रडू लागलो. “जतींदाचे असे हे एकाकी नाहीसे होणे हा अपशकुन होय. आपली ही सफर अयशस्वीच होणार.”

“हीच का तुझी परमेश्वरावरची निष्ठा? एका सोबत्याने दगा दिला. ह्या कसोटीला उतरण्याची तुझी तयारी नाही का?”

ही जणू परमेश्वराची कसोटी आहे असे जेव्हा अमरने सूचित केले तेव्हा जरा थोडासा माझ्या जिवात जीव आला. दुकानात जाऊन थोडी बरद्वानची प्रसिद्ध मिठाई—सीताभोग आणि मोतीचूर—घेतली व ताजेतवाने झालो. थोड्याच तासांत आम्ही हरद्वारच्या गाडीत—बरेलीमार्गे—बसलो. दुसऱ्या दिवशी मोगलसराईला आम्ही गाडी बदलली. प्लॅटफॉर्मवर गाडीची वाट पाहत असता आम्ही एका महत्त्वाच्या गोष्टीची चर्चा केली.

“अमर, मला वाटते, आता रेल्वेचे अधिकारी आपली कसून तपासणी करणार. आमच्या दादांची तुला कल्पना नाही. फार बारीक कसून शोध केल्याखेरीज ते राहाणार नाहीत. काहीही होवो मी बनावट हकीकत सांगणार नाही.”

“मुकुंदा, गप्प बसायला काय घेशील? मी बोलत असताना हसू नकोस की दात विचकू नकोस.”

आणि ह्याच क्षणी एका युरोपियन स्टेशन-अधिकाऱ्याने मला गाठले. त्याने माझ्याकडे पाहून तारेचा कागद हातात धरला. त्यात काय मजकूर असावा हे मी ताबडतोब ताडले.

“काय, घरातून रागावून बाहेर पळून जातो आहेस की काय तू?”

“नाही!” त्याने प्रश्न विचारताना असे काही शब्द वापरले की मला त्याच्या प्रश्नाचे ठाम उत्तर देता आले. मी पळून गेलो ते काही रागावून वगैरे गेलो नाही, पण ईश्वरदर्शन न झाल्याने मनाला जी उद्विग्नता आली ते खरे कारण होते हे मी जाणून होतो. नंतर तो अधिकारी अमरकडे वळला आणि मग त्या दोघांत जे वाग्द्वंद्व झाले त्यामुळे मी मनाशी ठरविलेली गंभीर, रागलोभांचा त्याग करून आचरावयाची उदासीनता मला सोडावी लागली.

त्या अधिकाऱ्याने मग पूर्ण हुकमी आवाजाने दरडावून विचारले, “तिसरा मुलगा कोठे आहे? खरे बोल, कुठे आहे तो?”

“साहेब, तुम्ही चष्मा घातलेला आहांत हे मला दिसत आहे. आम्ही फक्त दोघेच आहोत हे तुम्हांला दिसतेय ना?” आणि मग अमरने उद्धटपणे किंचित हास्य केले. “मी काही जादूगार नाही. तिसरा मुलगा मला काही किमया करून निर्माण करता येणार नाही.”

ह्या त्याच्या उद्धटपणामुळे अधिकाऱ्याला राग आल्यासारखा दिसला. त्याने हल्ल्याची दिशा बदलली. “तुझे नाव काय?”

“मला थॉमस नावाने लोक हाक मारतात. माझी आई इंग्लिश असून बाप क्रिस्ती झालेला हिंदी आहे.”

“तुझ्या ह्या सोबत्याचे नाव काय?”

“मी त्याला थॉम्पसन नावाने हाक मारतो.” आता मला हसू आवरेना. मनातल्या मनात मला जी गंमत वाटत होती तिला आता पारावार उरला नाही. मी सरळ निमुटपणे गाडीची वाट धरली; गाडी नेमकी निघायलाच लागली होती. शिटी वाजली होती. अमरही अधिकाऱ्याच्या पाठोपाठ निघाला. अधिकाऱ्याला आमचे बोलणे खरे वाटले असावे; कारण त्याने आम्हांला युरोपियनांच्या खास डब्यात नेऊन बसविले. दोन निम-इंग्लिश मुलांनी गाडीत नेटिवांच्या बरोबर बसून प्रवास करावा हा विचार त्या युरोपियन अधिकाऱ्याला दुःखद वाटत असावा

असे दिसले. नंतर तो विनयपूर्वक तेथून दुसरीकडे निघाला; मी माझ्या जागेवर बसलो आणि मनापासून गदगदा हसलो. एका अनुभवी कसलेल्या युरोपियन अधिकाऱ्यावर बेमालूम मात केल्याने माझ्या मित्राच्या मुद्रेवर संतोष झाल्याचे अगदी स्पष्ट दिसून येत होते.

प्लॅटफॉर्मवर आम्ही उभे होतो तेवढ्यात त्या अधिकाऱ्याच्या हातातली तार मी युक्ती-युक्तीने वाचून घेतली होती. ती तार माझा भाऊ अनंता याची होती. मजकूर असा होता: “तीन बंगाली मुले साहेबी पोशाख घालून घराबाहेर पळून गेली आहेत. मोगलसराईवरून हरद्वारच्या मार्गे जात असावीत. कृपा करून मी येईपर्यंत त्यांना रोखून धरा. भरपूर बक्षीस मिळेल.”

“अमर, तुला मी सांगितले होते ना, की खोलीत रेल्वेची टाइमटेबले खुणा करून ठेवू नकोस म्हणून?” आणि मी त्याच्याकडे रागाने पाहिले. “दादाला असले टाइमटेबल सापडले असले पाहिजे.”

माझ्या मित्राने शरमेने झालेली चूक कबूल केली. आम्ही थोडा वेळ बरेलीला थांबलो. तेथे द्वारकाप्रसाद [1] आमच्याकरिता थांबलेलेच होते. त्यांच्या हातात अनंतदादाची तार होती. द्वारकाप्रसादांनी आम्हांस थोपवून धरण्याचा बराच प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. आमची ही मुशाफरी काही किरकोळ स्वरूपाची नाही हे मी त्यांना बरोबर समजावून सांगितले. द्वारकाप्रसादांना आमच्याबरोबर हिमालयात चला म्हणून मी म्हणालोही. पण मागल्या वेळेप्रमाणे त्यांनी येण्यास नकार दर्शविला.

त्या रात्री आमची गाडी स्टेशनवरच होती. मला अर्धवट झोप लागली. अमरला पुन्हा एकदा रेल्वे-अधिकाऱ्याने झोपेतून उठविले व विचारपूस केली. त्यालाही आम्ही पूर्वीप्रमाणेच आमची नावे ‘थॉमस’ व ‘थॉम्पसन’ आहेत असे सांगितले. त्यालाही ह्या बाटग्या नावांनी भुरळ पडली. आणि मग आमची गाडी पहाटे हरद्वारला मोठ्या थाटात आम्हा विजयी वीरांना घेऊन पोचली. दूर अंतरावर उत्तुंग पर्वतश्रेणी आम्हांस जणू आपल्याकडे बोलावीत होती. आम्ही स्टेशनातून बाहेर पडलो व बाहेरील जनसंमर्दामध्ये मिसळून गेलो. आमचा पहिला कार्यक्रम म्हणजे साहेबी पोशाख बदलून पूर्वीचा देशी पोशाख घालणे. अनंतदादाला ही आमची साहेबी पोशाखाची ट्रिक समजली असल्यामुळे त्या पोशाखामुळे पुन्हा आम्ही पकडले जाऊ ही भीती मला सारखी भेडसावीत होती.

हरिद्वारहून ताबडतोब प्रयाण करणे आमच्या दृष्टीने जरूर होते म्हणून आम्ही उत्तरेकडील हृषिकेशची तिकिटे काढली. अनेक साधुसंतांनी तेथील भूमी आपल्या पदरजांनी पुनीत केलेली आहे. मी गाडीत चढलो होतो आणि अमर प्लॅटफॉर्मवर रेंगाळत उभा होता. एकदम पोलीस शिपायाच्या मोठ्या आवाजाने त्याला थांबविले. कायद्याचा पालनकर्ता तो. आम्हांला दुष्मन वाटला. त्याने मला आणि अमरला पोलीस ठाण्याच्या बंगल्यावर नेले आणि आमच्याजवळचे पैसे काढून घेतले. त्याने आम्हांला विनयपूर्वक सांगितले की, “तुमचे वडील भाऊ येत आहेत तोपर्यंत तुम्हांला अटकावून ठेवायला आम्हांला सांगितले आहे.”

त्याला जेव्हा कळले की आमचा पलायनाचा हेतू हिमालयात जाण्याचा आहे. तेव्हा त्याला जरा मौज वाटली आणि त्याने आम्हांला एक गमतीची गोष्ट सांगितली.

मला वाटते की, तुम्हांला ह्या साधुसंतांना भेटण्याचे वेड लागले आहे. पण तुम्हांला गंमत सांगतो, कालच मला एक महात्मा भेटला. त्याच्यापेक्षा मोठा असा महात्मा तुम्हांला कधी भेटणार नाही. आमचे दुसरे एक ऑफिसर आहेत. त्यांना आणि मला पाच दिवसांपूर्वी त्यांचे दर्शन झाले. एका खुनी इसमाचा बारकाईने शोध करीत आम्ही गंगेच्या काठाकाठाने फिरत होतो. त्याला जिवंत किंवा मेलेला कसाही पकडण्याचा आम्हांला हुकूम होता. तो साधूच्या वेषात फिरत होता व यात्रेकरूंना लुबाडण्याचा त्याचा उद्योग होता. शोधता शोधता आमच्यासमोर अगदी थोड्याच अंतरावर आम्हांला एक इसम दिसला. आम्हांला जो गुन्हेगार पाहिजे होता, अगदी हुबेहुब त्याच्यासारखा तो इसम दिसत होता. 'थांब,' म्हणून आम्ही त्यास सांगितले. आमच्याकडे दुर्लक्ष करून तो पुढे चालू लागला. आम्ही धावत जाऊन त्याला गाठले. त्याच्या पाठीमागे आम्ही होतो. मी जोराने त्याच्यावर कुऱ्हाडीचा प्रहार केला. त्या प्रहाराने त्या इसमाचा उजवा हात खांद्यापासून सगळाच्या सगळा तुटून पडला.

काही आरडाओरड न करता की त्या भयंकर जखमेकडे अगदी ढुंकून सुद्धा न पाहता तो इसम वेगाने पुढे चालूच लागला. आम्ही आश्चर्याने अगदी थक्क झालो. आम्ही जेव्हा त्याच्या अगदी समोरच जाऊन उभे राहिलो तेव्हा तो शांतपणाने आम्हांला म्हणाला.

"तुम्हांला जो खुनी इसम पाहिजे आहे तो मी नव्हे." एका दिव्य पुरुषाचा, महात्म्याचा देह मी विच्छिन्न केल्याबद्दल मला अत्यंत दुःख झाले. मी त्याच्या पायांवर लोटांगण घातले आणि क्षमेची याचना केली; आणि खांद्यापासून येणाऱ्या रक्ताचा लोट थांबविण्याकरिता माझ्या पगडीचे कापड त्या जखमेवर धरले.

"बेटा, तू केलेली चूक समजू शकणारी आहे." त्या महात्म्याने माझ्याकडे दयार्द्र दृष्टीने पाहिले. "जा, स्वतःला दोष देऊ नकोस. आई जगदंबा माझी काळजी घेण्यास समर्थ आहे." त्याने आपला लोंबकळत असणारा हात खांद्याच्या बाहुट्यावर दाबून बसवला; आणि काय आश्चर्य! तो पूर्ववत तेथे चिकटून बसला आणि रक्त वाहावयाचे एकदम थांबले. काय चमत्कार!

"तीन दिवसांनी त्या झाडाखाली मला भेट आणि पाहा हात पूर्ण बरां झाला आहे की नाही ते. मग काही तुला वाईट वाटण्याचे कारण नाही."

आणि काल आमचे बरोबरचे अधिकारी व मी असे दोघे मोठ्या उत्सुकतेने त्या सांगितलेल्या ठिकाणी गेलो. साधूमहाराज तेथे होते व त्यांनी आपला हात आम्हांस पाहावयास दिला. हातावर जखमेची काही एक खूण नव्हती!

"हृषिकेशहून पुढे मी हिमालयात एकान्तवासात जाणार आहे." आणि साधुमहाराज तेथून ताबडतोब निघाले. जाण्यापूर्वी त्यांनी आम्हांला आशीर्वाद दिला. साधुमहाराजांच्या पावित्र्याने माझे जीवन उन्नत झाल्यासारखे मला वाटत आहे.

हे बोलणे संपविल्यावर त्या पोलीस अंमलदाराने मोठ्या भाविकतेने उद्‌गार काढले. एकंदर प्रकारामुळे व जे अनुभवावयास आले त्याने त्या अंमलदारास अगदी हलवून टाकले. नंतर त्या अंमलदाराने नजरेत भरणारी अशी हाताची हालचाल करून एक छापील मजकुराचे कात्रण माझ्या हातात दिले. त्यात त्या चमत्काराची हकीकत होती. वर्तमानपत्रात क्षोभजनक बातमी नेहमीच्या संक्षिप्त स्वरूपात देण्याच्या पद्धतीनुसार (हाय! भारतातही ह्या

प्रकाराची उणीव नाही!) बातमीदाराचे वर्णन जरा अतिशयोक्तीचे होते. त्याने चक्क असे छापून दिले होते, की साधूचे मस्तकच जवळजवळ तोडून टाकले होते!

येशू ख्रिस्ताप्रमाणे आपल्याला छळणाऱ्यावर सुद्धा क्षमेचे पांघरूण घालणाऱ्या त्या महान योग्याचे दर्शन होण्याचा आमचा योग थोडक्यात चुकला याबद्दल अमरला व मला फार वाईट वाटले. गेली दोन शतके भारत देश दारिद्रयात खितपत पडलेला असेना का, पण दिव्य संपत्तीची देशात वाण नाही; अधूनमधून अगदी वाटेवरच अध्यात्मरूपी 'गगनचुंबी' इमारती पोलीस शिपायासारख्या संसारी प्रापंचिक माणसाला आढळून येतात.

अशा तऱ्हेने ही विस्मयकारी हकीकत सागून आम्हांला आलेला कंटाळा काढून टाकल्याबद्दल आम्ही त्या अंमलदाराचे आभार मानले. आमच्यापेक्षा आपणच भाग्यवान ठरलो असे कदाचित त्याला सुचवायचे असेल! कारण काही सायास न करता एका दिव्य महात्म्याची भेट त्याला घडून आली. असो. याप्रमाणे आम्ही आतुरतेने शोध घेण्याकरिता बाहेर पडलो; पण एखाद्या गुरूच्या पायाशी लागण्याच्या ऐवजी पोलीस कोठडीत मात्र आम्ही जाऊन पोहोचलो!

आता हिमालयाच्या इतके जवळ येऊन ठेपलेलो आम्ही, पण कोठडीत डांबून ठेवल्याकारणाने तितकेच दूर. मी अमरला सांगितले की, मुक्ततेची मला तर आता दुप्पट ओढ लागली आहे.

“संधी सापडताच आपण येथून निसटू. पवित्र अशा हृषिकेशला आपण पायी जाऊ शकू.” मी उत्साहाच्या भरात त्याला सांगितले.

पण आमच्याजवळ जे काही थोडे पैसे होते ते जप्त झालेले असल्याकारणाने माझ्या सोबत्याला मात्र काही उत्साह वाटेना. त्याने हातपाय गाळले.

“आपण जर येथून या भयानक जंगलात पोबारा केला तर आपली गाठ कोणा साधूमहाराजांशी न होता वाघोबाच्या पोटात मात्रा व्हावयाची!”

अनंतदादा व अमरचा दादा दोघांना तेथे यावयास तीन दिवस लागले. भाऊ भेटल्याबरोबर अमरला ह्या आपत्तीतून सुटलो म्हणून समाधान वाटले. माझा निग्रह मात्र अजून टिकून राहिला होता. आणि माझा पिच्छा पुरविल्याबद्दल अनंतदादाला मी टाकून बोललो.

पण दादाला राग आला नाही. तो उलट माझी समजूत घालू लागला, “मला कल्पना आहे तुला कसे वाटत असेल; मी तुला एवढेच सांगतो की तू माझ्याबरोबर काशीस चल. तेथे मी तुझी एका महात्म्याची भेट करवून देतो. आणि मग पुढे आपण कलकत्त्याला जाऊ; तेथे तुझे वडील तुझी मोठ्या काकुळतीने वाट पाहत आहेत. तेथे काही दिवस राहू आणि मग तू गुरुच्या शोधार्थ येथे फिरून ये.”

आमचे बोलणे येथपर्यंत आल्यावर अमरने पुन्हा माझ्याबरोबर हरिद्वारला आपण येणार नाही असे चक्क सांगून टाकले. माणसांत आल्याबरोबर त्याला हायसे वाटले; जरा.. उबारा आला. पण मी काही गुरूचा शोध करण्याचा माझा बेत कदापीही टाकून देणार नाही हे मला माहीत होते.

नंतर आम्ही सगळे काशीच्या गाडीत बसलो. तेथे माझ्या प्रार्थनेला ताबडतोब आणि अपूर्व असा जबाब मिळाला.

अनंतदादाने हुशारीने एक बेत योजून आणला होता. हरद्वारला येऊन मला भेटण्यापूर्वी तो काशीस उतरला होता. आणि तेथे एका पंडिताला भेटून त्याने नंतर माझ्याशी बोलणे करावे असे योजून ठेवले होते. ते पंडित आणि त्यांचा मुलगा, या दोघांनी दादाला असे वचन दिले होते की ते संन्यासमार्ग घेण्याच्या इच्छेपासून मला परावृत्त करतील.

अनंतदादाने मला त्यांच्या घरी नेले. पंडितांचा मुलगा तरुण असून त्याचे वागणे भारदस्त होते. त्याने माझे अंगणातच स्वागत केले. त्याने माझ्याशी तत्त्वज्ञान विषयाची चर्चा आरंभिली. चर्चा बराच वेळ टिकली. आपल्याला भविष्य कळते असा आविर्भाव आणून तुझ्या नशिबी संन्यासी होणे नाही असे त्याने सांगून टाकले.

“तुझ्यावर सारख्या आपत्ती येत राहतील आणि तू जोपर्यंत तुझी ऐहिक कर्तव्ये सोडून देण्याचा आग्रह धरीत राहशील तोपर्यंत तुला ईश्वर भेटणार नाही. जगाचा अनुभव घेतल्याखेरीज तुला तुझे पूर्वसंचित [2] नष्ट करता येणार नाही.”

उत्तर द्यावे म्हणून भगवद्गीतेतील [3] ते अमर विवेचनात्मक श्लोक माझ्या अगदी ओठावर आले: “जो अगदी दुराचारी असला तरीही तो जर माझे अनन्यभावाने ध्यान करीत असेल तर त्याची पूर्वीची सर्व पापकर्मे नष्ट होऊन जातील. तो धर्मात्मा होऊन त्यास शाश्वत शांतीचा लाभ होईल हे तू नक्की ध्यानात ठेव. जो माझ्यावर पूर्ण निष्ठा ठेवतो त्याचा कधीही नाश होत नाही!”

पण त्या तरुण पंडिताने माझ्या भविष्याचे जे जोरदारपणे भाकीत केले त्यामुळे माझा आत्मविश्वास थोडासा डळमळला. माझ्या अंतःकरणातील सारी तळमळ एकवटून मी ईश्वराची मूक प्रार्थना केली:

‘माझ्या ह्या संशयाचे, संभ्रमाचे निराकरण करून मला मार्ग दाखव; अगदी येथेच आणि ह्याच क्षणी. बोल, मी कसे जीवन कंठावे? संन्याशासारखे की संसारी माणसासारखे? तुझी काय इच्छा आहे?’

आणि तेवढ्यात त्या पंडितांच्या घराच्या आवाराच्या बाहेर उभा असलेला गंभीर मुद्रेचा व उदात्त चेहऱ्याचा एक साधू माझ्या दृष्टीस पडला. तो आमचे हे दोघांमधील संभाषण—ते स्वयंसंबोधित भविष्यज्ञानी व मी —ऐकत होता असे दिसून आले. कारण तो तिऱ्हाईत असूनही त्याने मला हाक मारली व जवळ येण्याविषयी सुचविले. त्याच्या शांत डोळ्यांतून होत असलेल्या एका प्रचंड शक्तीच्या प्रवाहाचा मला भास झाला.

“बेटा, त्या दांभिक माणसाचे तू काही ऐकू नकोस. तू परमेश्वराची प्रार्थना केलीस. त्याला उत्तर म्हणून परमेश्वराने मला तुझ्याकडे पाठवले आहे. मी तुला आश्वासन देतो, की या जीवनात तुझा एकच मार्ग आहे व तो म्हणजे संन्यासाचा.”

मला आश्चर्य वाटले आणि कृतज्ञताही वाटली. असा निश्चित स्वरूपाचा संदेश मिळाल्याने मला फार आनन्द वाटला. मी स्मित केले.

“त्या माणसापासून दूर हो!” तो ‘दांभिक’ पंडित मला अंगणातून बोलावीत होता. संदेश देणाऱ्या साधूने हात वर करून मला आशीर्वाद दिला आणि तो हळूहळू दूर निघून गेला.

"तू जसा वेडा आहेस तसाच तो साधूही वेडा आहे." त्या धवलकेशधारी वृद्ध पंडिताने असे मनोहर भाष्य केले. तो व त्याचा तरुण मुलगा माझ्याकडे खेदपूर्वक नजरेने पाहत होते. "त्यानेही परमेश्वराच्या कल्पित शोधासाठी घर सोडून दिले आहे."

मी लक्ष दिले नाही. अनंतदादाला सांगितले की, ह्या यजमानांशी मला आता काही जास्त चर्चा करावयाची नाही. दादाची जरा निराशा झाली. त्याने तेथून ताबडतोब निघण्याचे कबूल केले. आणि आम्ही थोड्याच अवधीत कलकत्त्याला जाणाऱ्या गाडीत बसलो.

"अहो डिटेक्टिवसाहेब, आपण कसे ओळखले, की मी दोन सोबत्यांबरोबर पळून गेलो होतो?" घरी परत जाताना माझी जागृत झालेली उत्सुकता मी अनंतदादाला व्यक्त केली. तो खोडसाळपणे हसला.

"हे पाहा, शाळेत मी तपास केला. अमर वर्गातून बाहेर पडला होता व परत वर्गात आला नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्याच्या घरी गेलो व तेथे मला एक खुणा केलेले रेल्वे-टाइमटेबल सापडले. अमरचे वडील टांग्यात बसून बाहेर चालले होते व टांगेवाल्याशी बोलत होते.

"माझा मुलगा आज माझ्याबरोबर शाळेत काही येणार नाही. तो घरातून पळून गेला आहे." त्यांना दुःख झाले होते. टांगेवाला म्हणाला, "पण साहेब, आमच्या दुसऱ्या गाडीवाल्याकडून मला असे कळले की, तुमचा मुलगा व आणखी दोघे साहेबी पोशाख घालून हावडा स्टेशनवर गाडीत चढले; आणि त्यांनी आपले कातडी बूट त्या गाडीवाल्याला देऊन टाकले."

"आता मला तीन धागे मिळाले; एक टाइमटेबल, दुसरा धागा म्हणजे तुम्ही तिघे बाहेर पडलेले. आणि तिसरा धागा म्हणजे हा तुमचा साहेबी पोशाख."

अनंतदादाचे हे सांगणे मी ऐकत होतो. थोडी गंमत वाटली व थोडे चिडल्यासारखे झाले. गाडीवाल्याला जे आम्ही औदार्य दाखविले त्याचा मोबदला त्याने असा दिला!

दादा पुढे सांगू लागला, "मग मी टाइमटेबलमध्ये खुणा केलेल्या सर्व स्टेशनांच्या रेल्वे-अधिकाऱ्यांना ताबडतोब तारा केल्या. तशीच तार तुझा मित्र जो द्वारका त्यालाही केली. कलकत्त्याला आपल्या शेजारीपाजारी चौकशी केली तेव्हा कळले की, जतींदा एक दिवस घरी नव्हता व दुसऱ्या दिवशी सकाळी साहेबी पोशाखात परत आला. मी त्याला गाठले व घरी जेवायला बोलावले. त्याने जेवणाचे आमंत्रण स्वीकारले. मी प्रेमाने बोलावले; त्याला काही संशय वगैरे आला नाही. रस्त्र्याने जाता जाता त्याला मी अचानक पोलिसठाण्यावर नेले. तेथे त्याच्याभोवती लागलीच पोलिस अधिकारी जमले. ठाण्यावरचे जे अधिकारी तपासणीमध्ये अगदी कर्दनकाळ असे गाजलेले होते त्यांचीच मी या कामाकरिता निवड केली होती. त्यांच्या त्या क्रुद्ध दृष्टीपुढे जतींदाने आपली सर्व विचित्रशी हकीकत निवेदन करण्याचे कबूल केले.

तो सांगू लागला, "मी जेव्हा हिमालयात जाण्यास निघालो तेव्हा माझ्या मनात उच्च प्रतीचे विरक्तीचे विचार होते. मला अंतःस्फूर्ती असे सांगे की, तुला साधुसंतांचे, गुरुमहाराजांचे दर्शन घडणार. पण जेव्हा मुकुंदा सांगू लागला की, 'हिमालयामधील गुहांमध्ये वाघ वगैरे आपल्या आध्यात्मिक सामर्थ्यापुढे आपला नैसर्गिक स्वभाव विसरून आपल्या शेजारी मांजरासारखे बनतील' तेव्हा माझी घाबरगुंडी उडाली. भीतीने रोमांच उभे राहिले. मी

घामाघूम झालो. मी विचार केला, ‘मग काय! समजा, जर आमच्या योगसमाधीच्या सामर्थ्याने त्या वाघांचा हिंस्र स्वभाव बदलला गेला नाही तर ते काय घरातल्या मांजरांसारखे आमच्याशी प्रेमाने वागतील काय?’ माझ्या मनःश्चक्षूंपुढे ते चित्र उभे राहिले; वाघोबाच्या पोटात आम्हांला जबरदस्तीने ओढून घातलेले आहे व तेथे सुद्धा आमचा प्रवेश एकाच वेळी सबंध शरीराचा झालेला नसून शरीरातील निरनिराळ्या भागांचा टप्प्याटप्प्याने झालेला आहे!”

जतींदाने जो हा असा मध्येच पोबारा केला होता त्याचा मला फार राग आला होता. तो राग आता कुठेच पळाला; उलट त्याच्या बोलण्याने मला अगदी हसू आले. माझ्या भावाने दिलेले हे मजेदार वर्णन ऐकून मी असह्य झालेल्या माझ्या यातना पूर्णपणे विसरलो. पण मी कबूल करतो, की जतींदाला सुद्धा पोलिसांशी गाठ टाळता न आल्याचे ऐकून मला थोडेसे समाधान वाटले.


“अनंतदा, [4] तू अगदी मूळचाच जन्मापासूनचा गुप्तचर आहेस.” माझ्या मुद्रेवर जरा मौज वाटल्याची छटा होती; पण तितकाच त्याचा मला राग आला होता. आणि आता मी जतींदाला सांगेन की, “तू जो मध्येच गुंगारा मारलास त्यात तुला आमची फसगत करावयाची नसून तुझे स्वतःचेच रक्षण करण्याची फक्त सुज्ञ बुद्धी होती!”

आम्ही कलकत्त्याला घरी परत आलो. वडिलांना मला पाहिल्यावर अगदी भडभडून आले. अगदी आर्जवी स्वरात ते मला म्हणाले, “निदान तुझा हायस्कूलचा अभ्यास संपेतोपर्यंत तरी तू एका ठिकाणी राहा.” माझ्या गैरहजेरीत त्यांनी एक योजना आखली होती. स्वामी केवलानंद [5] या संतपंडितांना त्यांनी रोज घरी येऊन जाण्यास सांगून ठेवले होते.

“हे बाबा तुला संस्कृत शिकवितील.” आमच्या वडिलांनी अधिकारवाणीने आम्हांस सुनावले.

“माझी धार्मिक तळमळ एका विद्वान तत्त्वज्ञानी पंडिताच्या उपदेशाने निवेल अशी वडिलांची आपली एक अपेक्षा होती. पण परिणाम उलटाच झाला. कारण ह्या शिक्षकांनी मला बौद्धिक खाद्य पुरविण्याच्या ऐवजी माझी परमेश्वरभेटीची उत्कंठाच अधिक प्रज्वलित केली. स्वामी केवलानंद हे लाहिरी महाशयांचे एक उच्च कोटीचे शिष्य होते. हे वडिलांना माहीत नव्हते. ह्या अद्वितीय गुरुमहाराजांचे हजारो शिष्य होते. गुरुजींच्या दिव्य लोहचुंबकाच्या दुर्दमनीय अशा आकर्षणाने ते त्यांच्याकडे हळूच आकर्षित केले जात असत. लाहिरी महाशय हे केवलानंदांना ‘ऋषी’ म्हणून संबोधीत हे मला नंतर कळले.

गुरुजींच्या सुंदर चेहऱ्यावर भरगच्च केसांची वेलबुट्टी असायची. त्यांचे काळेभोर डोळे अगदी निष्पाप दिसत. अगदी लहान मुलासारखे पारदर्शक. त्यांची देहयष्टी लहान होती पण शरीराची हालचाल रेखीव व दृढनिश्चय दर्शविणारी अशी होती. त्यांची मुद्रा सौम्य व प्रेमळ व नेहमी असीम व गूढ अशा समाधिअवस्थेमध्ये दृढबद्ध अशी असावयाची. आम्ही किती एक वेळा एकत्र क्रियायोगध्यानात मग्न असे बसत असू.



*स्वामी केवलानंद*
*श्री योगानंदांचे प्रिय संस्कृत शिक्षक*

प्राचीन धर्मशास्त्रावर केवलानंद हे एक अधिकारी पुरुष म्हणून विख्यात होते. त्यांच्या अगाध विद्वत्तेमुळे त्यांना 'शास्त्रीमहाशय' ही पदवी प्राप्त झाली होती; व त्याच नावाने त्यांना लोक ओळखत. पण संस्कृतमधील माझी प्रगती मात्र अगदीच जेमतेम होती. मी गद्य व्याकरणाकडे दुर्लक्ष करी आणि संधी मिळेल तेव्हा योग आणि लाहिरी महाशय यांच्यावरच बोलत असे. एकदा गुरुजींनी आपल्या स्वतःच्या गुरूच्या संबंधातील एक गोष्ट सांगून माझ्यावर मोठी कृपा केली.

"माझे नशीब चांगले. लाहिरी महाशयांजवळ दहा वर्षे राहण्याचा मला योग आला. काशीला त्यांच्या घरी दररोज रात्री जाऊन मी यात्रेचे पुण्य पदरी पाडून घेई. पहिल्या मजल्यावर

एका लहानशा पडवीत गुरुजी नेहमी बसलेले असावयाचे. पाठीशी टेकावयास नसलेल्या अशा एका लाकडी आसनावर ते पद्मासन घालून बसलेले असावयाचे. त्यांची शिष्यमंडळी त्यांना हार घालून त्यांच्यासमोर अर्धवर्तुळाकार आकृतीत बसावयाची. त्यांचे नेत्र चमकत व दिव्य आनंद झाल्याने नाचू लागत. ते नेहमी अर्धोन्मीलित असे असावयाचे; जणू ते अंतःस्थ अशा एका दुर्बिणीच्या भिंगातून आतील चिरंतन आनंदाच्या गोलाकडे दृष्टी लावीत असावे असे दिसे. ते फार असे क्वचितच बोलत. एखाद्या वेळी एखादा भक्त त्यांच्याकडे सहाय्याची याचना करी तेव्हा त्याच्याकडे मात्र ते दृष्टी केंद्रित करीत; आणि नंतर मग त्यांच्या तोंडून आश्वासनाचे शब्द एखाद्या प्रकाशाच्या झोतासारखे बाहेर पडत.

"गुरुमहाराजांनी माझ्याकडे दृष्टिक्षेप केल्यावर एक अवर्णनीय शांतता व प्रसन्नता माझ्यामध्ये उदित झाली. एका चिरंतन कमलापासूनच्या सुवासाने मी कोंदून गेलो. त्यांच्या सान्निध्यात असणे—मग ते कित्येक दिवस एक शब्दही का न बोलोत—म्हणजे अप्रतिम अनुभव. त्या अनुभवाने माणसाचे वेगळे असे व्यक्तित्व बदलून जाई. माझ्या चित्ताग्रतेमध्ये व्यत्यय आल्यासारखे जेव्हा मला वाटे तेव्हा मी त्यांच्या चरणांशी ध्यान लावण्यास बसे. तसे बसल्यावर मनाच्या सूक्ष्मतम अवस्थांचा अनुभव घेणे शक्य होई. अशा तऱ्हेचा अनुभव साधारण प्रतीच्या गुरुजनांच्या सान्निध्यात होत नव्हता. गुरुमहाराज म्हणजे चालतेबोलते परमेश्वराचे मंदिरच. त्याची गुप्त दारे भक्ती केल्यावर सर्व भक्तांना खुली व्हावयाची.

"लाहिरी महाशय धर्मग्रंथांचे नुसते पुस्तकी तात्त्विक टीकाकार नव्हते. 'दिव्य ग्रंथालयाच्या' दालनात ते सुखेनैव प्रवेश करीत. त्यांच्या सर्वज्ञतेच्या कारंजातून फेनरूपी शब्द व विचारांचे फवारे जोराने बाहेर पडत. वेदामध्ये [6] पुरातन काळापासून जे प्रगल्भ तत्त्वज्ञान गुप्त असे ठेवलेले आहे ते बाहेर काढण्याची अद्भुत अशी किल्लीच त्यांच्याजवळ होती. ह्या प्राचीन धर्मग्रंथामध्ये चैतन्याच्या निरनिराळ्या स्तरांविषयी, लोकांविषयी कोणी काही स्पष्टीकरण विचारले तर ते ते स्मितपूर्वक द्यावयाचे.

"'मी आताच त्या स्तरांमधून लोकांमधून जाऊन येतो आणि तुला तेथील अनुभव सांगतो' अशा तऱ्हेने इतर सामान्य गुरूपेक्षा एका नाट्यपूर्ण अशा विरुद्ध मार्गाने स्पष्टीकरण देत. इतर गुरू धर्मग्रंथ मुखोद्गत करतात व त्यांतील तत्त्वे अनुभूतीखेरीज नुसत्या शब्दावडंबरानेच स्पष्ट करतात.

"'हे पाहा, या पवित्र श्लोकांचा तुला येईल तसा अर्थ सांग पाहू.' अशा पद्धतीने मितभाषी गुरुजी पुष्कळदा जवळच बसलेल्या शिष्याला उपदेशपर सांगत. 'मी तुझ्या विचारांना मार्गदर्शन देतो म्हणजे तुझ्या तोंडून त्याचा बरोबर अर्थ बाहेर पडेल.' अशा तऱ्हेने लाहिरी महाशयांच्या अनेक दिग्दर्शनांची नोंद झालेली आहे व अनेक विद्यार्थ्यांनी—अभ्यासकांनी त्या टिपणांवर विस्तृत भाष्ये केली आहेत.

"गुरुजींना अंधश्रद्धा मान्य नव्हती. 'शब्द म्हणजे बाह्यकवच आहे,' ते म्हणत, 'परमेश्वराच्या अस्तित्वाची खात्री ध्यानमार्गाने आपला स्वतःचाच संपर्क साधून करून घ्यावी.'

“भक्ताची समस्या कोणत्याही प्रकारची असो, ती उकलण्यासाठी गुरुजी क्रियायोगाचा उपाय सांगत.

“‘ही योगमार्गाची गुरुकिल्ली अशी आहे की, मी जरी तुम्हांला मार्गदर्शन करण्यास ह्या देहात विद्यमान नसलो तरी हिची क्षमता कमी होणारी नाही. केवळ तात्त्विक सिद्धान्तांपासून जी प्रेरणा मिळते त्या प्रेरणेसारखी ही प्रक्रिया मर्यादित सामर्थ्याची व नुसती ध्यानात ठेवून नंतर विसरण्यासारखी नाही. क्रियायोगाच्या सहाय्याने मोक्षाच्या मार्गाची अविरत वाटचाल करा. क्रियायोगाचे सामर्थ्य क्रियेच्या आचरणात आहे.’

“मी स्वतः असे समजतो की, परमेश्वराच्या शोधार्थ उद्युक्त झालेल्या मनुष्याला आपल्या स्वतःच्या प्रयत्नाने मुक्ती मिळविण्याचा जो काही हमखास फलदायी मार्ग असेल तर तो क्रियायोग हा होय. क्रियायोग आचरल्याने सर्व मनुष्यमात्रामध्ये सुप्त असलेला असा सर्वशक्तिमान परमेश्वर लाहिरी महाशयांच्या हाडामांसाच्या शरीरात व तसेच त्यांच्या अनेक शिष्यांच्या शरीरांत प्रकट झालेला आहे.” केवलानंदांनी असे प्रत्यक्ष जिवंत उदाहरण देऊन आपल्या भाषणाचा समारोप केला.

केवलानंदांच्या देखतच लाहिरी महाशयांनी येशू ख्रिस्तासारखा एक चमत्कार करून दाखविला होता. आमच्या संतसदृश गुरुवर्यांनी एके दिवशी एक गोष्ट सांगितली. त्या वेळी त्यांचे डोळे आमच्यासमोर टेबलावर ठेवलेल्या संस्कृत पुस्तकापासून दूर कोठे तरी गेले होते.

“रामू नावाचा एक शिष्य आंधळा होता. त्याची मला नेहमी दया यायची. तो गुरुदेवांची अतिशय एकनिष्ठपणे आणि भक्तिभावाने सेवा करी. गुरुमहाराज तर प्रत्यक्ष परमेश्वर. दिव्य तेज त्यांच्या ठायी झळकत असायचे. तर मग रामूच्या डोळ्यांना का दिसू नये? एक दिवस सकाळी रामूला याबाबत विचारायचे मी ठरविले; पण तो आपला सारखा हाताने बनविलेल्या ताडपत्राच्या पंख्याने गुरुजींना वारा घालीत होता. शेवटी तो जेव्हा खोलीच्या बाहेर आला तेव्हा त्याला मी गाठले.

“रामू, किती दिवस असा तू आंधळा आहेस?”

“जन्मापासून, महाराज! माझ्या डोळ्यांनी कधी सूर्याचे दर्शन घेतलेले नाही.”

“आपले गुरुजी एवढे सर्वशक्तिमान; त्यांना खचित तुझ्यावर कृपा करता येईल. एकदा त्यांना विनंती करून पाहा की.”

“दुसऱ्या दिवशी रामू भीत भीत लाहिरी महाशयांच्या जवळ आला. आपल्या अतुल अशा आध्यात्मिक संपत्तीमध्ये शारीरिक शक्तीची आणखी वाढ व्हावी म्हणून विनंती करताना शिष्याला जरा लाज वाटली.

“गुरुजी, साऱ्या ब्रह्मांडाचे तेज आपल्यामध्ये सामावलेले आहे. ते तेज माझ्या डोळयांत आपण आणावे. सूर्याचा प्रकाश त्या तेजाहून कमी आहे खरा, पण तो माझ्या दृष्टीला दिसावा अशी माझी आपल्या पायांशी प्रार्थना आहे.”

“रामू, मला अडचणीत टाकण्याकरिता कुणी तरी तुला तयार केलेले आहे. माझ्या ठिकाणी रोगव्याधी बरी करण्याची अशी काही शक्ती नाही.”

“महाराज, आपल्या ठिकाणी वास करीत असलेला परमेश्वर नक्कीच ती बरी करू शकेल.”

“ते वेगळे, रामू. परमेश्वराच्या शक्तीला मर्यादा नाही. जो निरनिराळ्या तारकांना द्युतिमान करतो आणि जीवपेशींना चैतन्ययुक्त करतो, तो नक्कीच तुझ्या डोळ्यांना दृष्टी देईल.” गुरुजींनी रामूच्या कपाळाला दोन भुवयांच्या [7] मध्ये स्पर्श केला.

“तुझे मन त्या ठिकाणी केंद्रित कर आणि सात दिवस रामनामाचा जप कर. भगवान सूर्य आपल्या प्रकाशाची तुझ्याकरिता जरूर प्रभात करतील.”

“आणि पाहा, काय चमत्कार! एका आठवड्यात त्याला दृष्टी आली. अगदी पहिल्याप्रथम रामूने जगाचे दृश्य स्वरूप, उजळ स्वरूप पाहिले. सर्वज्ञ अशा गुरुजींनी आपल्या शिष्याला अगदी अचूकपणे असा रामनामाचा जप करण्यास सांगितला होता; कारण राम त्याचे इष्ट दैवत होते. रामूची श्रद्धा म्हणजे भक्तीने नांगरलेली जमीन. तेथे गुरुजींचे व्याधिनाशक अशा शक्तीचे बीज पेरलेले; त्याला अंकुर चांगला फुटला.” केवलानंद नंतर काही वेळ स्तब्ध राहिले. नंतर त्यांनी गुरुजींबद्दल आणखी प्रशंसोद्गार काढले.

“लाहिरी महाशयांनी हे जे सारे चमत्कार करून दाखविले त्यांत त्यांनी अहंकार-तत्त्वाचा [8] कधीही प्रयोजन-शक्ती म्हणून उपयोग केला नाही. मूळ अशा आधि-व्याधिनाशक महाशक्तीला ते अनन्यभावाने शरण जात आणि त्यायोगे ती शक्ती त्यांच्यामधूनही वाहू लागे.

“लाहिरी महाशयांनी अनेक माणसांना चमत्कार करून दाखवून व्याधिमुक्त केलेले होते; पण ती सारी माणसे शेवटी चितेमध्ये भस्मरूप झाली. पण प्रशान्त अशी आध्यात्मिक चिच्छक्ती जी त्यांनी जागृत केली व ख्रिस्तासारखे शिष्य तयार केले हेच त्यांचे शाश्वत स्वरूपाचे चमत्कार होत.”

मला संस्कृत कधीही आले नाही. केवलानंदांनी मला त्याहूनही दिव्य अशी वाक्यरचना मात्र शिकविली.

1 मागे पान २२ वर यांच्या नावाचा उल्लेख आलेला आहे.

2 ह्या किंवा पूर्वजन्मांचे कर्मफल.

3 अ. ९, श्लोक ३०-३१.

4 मी वडील भावाला नेहमी ‘अनंतदा’ नावाने हाक मारीत असे. दा किंवा दादा ही अक्षरे लहान भावंडे आपल्या वडील भावाच्या नावाशी शेवटी आदरार्थाने जोडतात.

5 ज्या वेळी आमची भेट झाली त्या वेळी केवलानंदांनी संन्यास घेतला नव्हता. ते स्वामी झाले नव्हते. त्यांना “शास्त्रीमहाशय” या नावानेच सर्व लोक हाक मारीत. लाहिरी महाशय आणि गुरुमहाशय (प्रकरण ९) यांच्या नावांचा घोटाळा होऊ नये म्हणून मी ह्या माझ्या संस्कृत शिक्षकांचा त्यांच्या नंतरच्या संन्यासधर्मातील नावाने म्हणजे स्वामी केवलानंद या नावाने उल्लेख करीत आहे. त्यांचे चरित्र नुकतेच बंगाली भाषेमध्ये प्रसिद्ध झालेले आहे. १८६३ साली बंगालच्या खुलना जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला, आपल्या वयाच्या ६८व्या वर्षी केवलानंदांनी देहत्याग केला. त्यांचे मूळचे गृहस्थधर्मातील नाव आशुतोष चटर्जी असे होते.

6 ह्या पुरातन चार वेदांचे सुमारे १००च्या वर सूत्रग्रंथ आज उपलब्ध आहेत. आपल्या ‘जर्नल’ या पुस्तकामध्ये इमर्सन याने वैदिक विचारप्रणालीविषयी गौरवाचे उद्गार काढले आहेत. तो म्हणतो, “ही विचारप्रणाली उष्णता, रात्र व तरंगरहित सागर यांप्रमाणे अथांग व गंभीर आहे. हिच्यामध्ये प्रत्येक धर्मविषयक भावनेचा अंतर्भाव होतो. प्रत्येक उच्च अशा कविमनाला ज्याने स्फूर्ती येते अशा महान नीतिशास्त्राचा ह्यात अंतर्भाव होतो … हे ग्रंथ वाचून बाजूस ठेवता येण्यासारखे नाहीत. जर मी अरण्यातून निर्भयपणे जाऊ शकलो किंवा एखाद्या तलावात नावेतून बिनधोकपणे हिंडू शकलो तर निसर्गाने मला द्विजत्व बहाल केले असे समजावे. शाश्वत आवश्यकता, शाश्वत मोबदला, अगाध शक्ती, अखंडित शांती … ह्या सर्वांचे विचारधारांमध्ये साम्राज्य आहे. ही विचारधारा मला असे आश्वासन देते की, शांतता, शुचिता व सर्वसंगपरित्याग ही साधने सर्व पापांचे निरसन करतात व तुम्हांस अष्टदेवतांच्या आनंदमय लोकात आणून सोडतात.”

7 एकमेव अशा दिव्यचक्षुचे स्थान. मृत्यूच्या वेळी माणसाची जाणीव ह्या पवित्र स्थानी आकर्षित होते; आणि म्हणून मृत्यूनंतर शरीरामध्ये डोळे ऊर्ध्वगामी झालेले दिसून येतात.

8 अहंकार (शब्दार्थाने 'मी करतो') हे सर्व द्वैतभावाचे मूळ कारण आहे. जीवात्मा व परमात्मा यांमधील मिथ्या भेदभावाचे ते कारण आहे. अहंकार हा मनुष्यप्राण्यांना मायेच्या मगरमिठीत आणतो; त्यामुळे कर्त्याला (अहंकार) आपण कर्मच आहो असे वाटू लागते, आणि सृष्ट जीव स्वतःलाच सृष्टा समजून घेतो. (पहा पृ. ६०-६१, ३७६-३७७, ३९१-३९२)

ह्या संबंधात भगवद्गीतेमधील खालील श्लोक पाहावेत;
नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित्।
पश्यञ्श्रृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन्।।
प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि।
इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन।। अध्याय ५:८-९

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः।
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति।। अध्याय १३:२९

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया।। अध्याय ४:६

दैवी ह्येषा गुणमयी मम *माया* दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरन्ति ते।। अध्याय ७:१४

मी स्वतः असे काहीच करीत नाही, असे तो मानतो. त्याला खरे तत्त्व कळलेले असते. इंद्रिये इंद्रियांकरिताच आहेत अशी त्याची खात्री झालेली असते. (अध्याय ५:८, ९)

सर्व कर्मे प्रकृतीकडूनच केली जातात व जो आत्म्याला 'अकर्ता' म्हणजे काही न करणारा असे पाहतो तोच वास्तविक पाहतो. अध्याय १३:२९.

मी जन्मरहित, अमर व अविनाशी आहे. मी सर्व प्राणिमात्रांचा ईश्वर आहे. मी मायेवर माझी जादूची छाप मारून मूळ प्रकृतीच्या अधिष्ठानावर येतो, जातो व पुनः येतो. अध्याय ४:६.

ह्या मायेचा हा दैवी गुणमयी पडदा उल्लंघून त्यापलीकडे मला शोधून काढणे फार कठीण आहे. तथापि केवळ मलाच जे शरण येतात ते तो पडदा उल्लंघून त्यापलीकडे जाऊ शकतात. अध्याय ७:१४

—*भगवद्गीता (आर्नोल्डच्या इंग्रजी अनुवादावरून).*

प्रकरण - ५

# 5. 'गंधबाबांचे' चमत्कार-प्रदर्शन

"ह्या विश्वात प्रत्येक गोष्ट परिपक्व व्हावयास एका विशिष्ट ऋतूची जरुरी असते; व प्रत्येक हेतू साध्य व्हावयास एक विशिष्ट वेळ यावी लागते." [1]

सॉलोमनचे [2] हे शहाणपणाचे शब्द माझे समाधान करू शकले नाहीत. घरातून जेव्हा मी बाहेर पडे तेव्हा मला माझा नियुक्त गुरू भेटतोय की काय हे मी आसपास धुंडाळीत बसे. पण माझे शालेय शिक्षण संपेपर्यंत माझा मार्ग व माझ्या गुरूचा मार्ग हे एकमेकांस भेटले नाहीत.

अमरचे व माझे हिमालयातील पलायन आणि माझ्या आयुष्यात श्रीयुक्तेश्वरांचे झालेले आगमन तो दिवस; यांमध्ये दोन वर्षांचा काळ लोटला. ह्या दरम्यानच्या काळात मला अनेक साधुपुरुष भेटले— "गंधबाबा," "शेरबाबा," नगेंद्रनाथ भादुरी, मास्टरमहाशय आणि सुप्रसिद्ध बंगाली शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस.

"गंधबाबां"शी माझा जो संबंध आला तो दोन प्रसंगांनी; एक सुसंगत व दुसरा विनोदी.

"ईश्वराचे स्वरूप साधे आहे. बाकी सर्व गुंतागुंतीचे आहे. निसर्गाच्या ह्या सापेक्ष विश्वात शुद्ध मूल्याची अपेक्षा करू नकोस."

कालीमातेच्या [3] मूर्तीपुढे देवळात मी जेव्हा शांतपणाने उभा राहिलो तेव्हा माझ्या कानांत हे वरील तत्त्वज्ञान सांगणारे शब्द हळुवारपणे गुणगुणलेले ऐकू येऊ लागले. मी पाठीमागे वळून पाहिले तर एक उंच अशी व्यक्ती माझ्या समोर उभी होती. त्या व्यक्तीच्या अंगावरचे वस्त्र किंवा त्याचा अभाव हे ती एक भटकणारी साधु व्यक्ती असावी हे दर्शवीत होते.

"माझ्या मनात विचारांचा गोंधळ उडालेला आहे हे तुम्ही बरोबर ताडले." मी कृतज्ञता दर्शविणारे स्मित केले. "निसर्गाची ही दोन रूपे, भद्र व रौद्र; त्यांमध्ये जो गोंधळ माजून राहिलेला आहे त्याचे प्रतीक म्हणजे ही कालीमाता; हिच्या ह्या स्वरूपाने माझ्यापेक्षा अधिक सुज्ञ माणसांना सुद्धा विस्मयात टाकलेले आहे!"

"तिच्या ह्या गूढ स्वरूपाचे फार थोड्यांना आकलन झाले आहे. शुभ व अशुभ ह्यांच्या रहस्याचे हे न सुटणारे कोडे प्रत्येक बुद्धिमंतापुढे स्फिंक्स [4] राक्षसीसारखे समोर उभे ठाकलेले आहे. हे कोडे सोडविता न आल्यामुळे पुष्कळांना अगदी थेबसच्या काळातल्यासारखा देहदंड सोसावा लागला आहे. एखाद दुसरी उच्चश्रेणीची व्यक्ती हा पराभव मान्य करीत नाही. द्वैतस्वरूपी मायेमधून [5] ती अद्वैताचे निर्मळ सत्य शोधून काढीत असते."

"तुम्ही अगदी खात्री झाल्यासारखे बोलत आहा, महाराज."

"ज्ञान मिळविण्याचा अत्यंत दुःखदायक मार्ग म्हणजे जो प्रामाणिक आत्मनिरीक्षण करण्याचा आहे त्याचा मी दीर्घकाळपर्यंत प्रयोग केलेला आहे. आत्मनिरीक्षण म्हणजे स्वतःच्या विचारांचे निष्ठुर अवलोकन, समालोचन. हे मोठे कडक असून स्वतःची अस्मिता अगदी गदगदून हलवून टाकणारे आहे. अहंतेचा अगदी चक्काचूर होऊन जातो. पण असे हे

आत्म-पृथक्करण, प्रामाणिकपणे केलेले, गणितातील प्रमेयाप्रमाणे द्रष्टे निर्माण करते. आमचे म्हणणे हे असे आहे. आम्हांला हे मान्य आहे किंवा हे मान्य नाही अशा वृत्तीतून अहंमन्यतेचा प्रादुर्भाव होतो व हे अहंमन्य ईश्वर व हे सारे विश्व यांबद्दल आपल्या स्वतःच्याच अशा काही वेगळ्या कल्पना बांधीत असतात व त्याच ते खऱ्या मानतात."

"आणि अशा उद्धट अपूर्वाईपुढे खरोखरी सत्य सुद्धा आपण होऊन नम्रपणे पड घेते." मी चर्चेचा आनंद घेत होतो.

"मनुष्य जोपर्यंत अशा दंभापासून आपली मुक्तता करून घेत नाही तोपर्यंत त्याला हे सनातन सत्य समजणार नाही. जन्मजन्मांतरीच्या चिखलाने भरलेले हे मन संसाराच्या असंख्य मायाजालांच्या प्रत्याघातांनी पुरेपूर भरून गेलेले आहे. मनुष्य ज्या वेळी प्रथमच अंतःस्थ शत्रूंशी झुंज घेतो त्या वेळी प्रत्यक्ष समरांगणावरील युद्धे फिकी वाटतात. हे शत्रू मर्त्य नसतात की ज्यांचा पाडाव अगदी खरडून टाकणाऱ्या सैन्याच्या व्यूहरचनेने करू शकता येईल. मायावी वासनांचे हे शिपाई सर्वत्र वावरत असतात; त्यांना विश्रांती अशी कधी माहीत नसते. माणसाला झोपेत सुद्धा हे सतावत असतात. त्यांची हत्यारेही तितकीच तीक्ष्ण असतात. असे हे शिपाई आपणां सर्वांचा नायनाट करावयास टपलेलेच असतात. जो मनुष्य सर्वसामान्य अशा नशिबाला शरण जाऊन आपल्या ध्येयांचा त्याग करतो तो मूर्ख होय. मग तो पौरुषहीन, जड व तिरस्करणीय वाटणार नाही तर काय?"

"पूज्य महाराज, ह्या भांबावून गेलेल्या सामान्य लोकांबद्दल तुम्हांला सहानुभूती वाटत नाही काय?"

तो साधू क्षणभर शांत राहिला व मग व्यंजतापूर्वक उत्तर दिले:

"सर्वगुणसंपन्न असा अदृश्य परमेश्वर व एकही गुण ज्याच्या अंगी नाही असा डोळ्यांना दिसणारा मनुष्य ह्या दोघांवर सारखेच प्रेम करणे हे महाकर्मकठीण आहे. पण ते जितके कठीण आहे तितके त्याला पुरून उरणारे माणसाचे चातुर्य आहे. स्वार्थी विचाराच्या माणसांचा असा हा भ्रातृभाव. एका अर्थाने तरी ह्या भ्रातृभावाचे पोकळपण, निरर्थकत्व उघड दिसून येते. वर सांगितलेल्या समताभावाचा एकदा पुरस्कार केल्यावर मग आणखी नम्रतेची, आत्मघृणेची जरूरी प्रस्थापित करावयाची. त्या नम्रतेचे रूप पुढे पालटत जाऊन तिची जागा अन्य बांधवांवरील दया किंवा अनुकंपा ही घेते. ह्या सर्व आत्मवंचनेत रुतल्याकारणाने स्वतःची फसवणूक करून घेत असल्यामुळे संपूर्ण निरामयत्व करून देणाऱ्या आत्म्याचा कोणी शोध घेत नाही.

"प्रत्येक युगातील साधुसंतांनी जगातील हे जे दुःख आहे त्याबद्दल अगदी आपल्यासारखाच अनुभव व्यक्त केलेला आहे."

"ज्याच्यामध्ये माणूसकी अगदी कमी आहे असा मनुष्य दुसऱ्या जीवांवर आलेल्या आपत्तींबाबत विशेष कदर दाखवीत नाही; कारण स्वतःच्या दुःखापलीकडे जाऊन दुसऱ्यांच्या दुःखांचा विचार करावयास त्याला मुळी सवडच नसते." साधुमहाराजांचा चेहरा जो उग्र होता तो किंचित् सौम्य दिसला. "जो स्वतःचे अगदी तीक्ष्ण चाकूने आत्मच्छेदन करू शकतो त्यालाच फक्त विश्वव्यापी दया म्हणजे काय हे कळू शकते. अहंकार त्याला अगदी मोठमोठ्याने हाका मारून ओढून नेत असला तरी अशा अहंकाराच्या पंजातून त्याची मुक्तता

होते. परमेश्वराची प्रीती साऱ्या जमिनीवर सारखीच फुलत असते. प्राणी शेवटी आपल्या निर्माणकर्त्याकडे दुसऱ्या कोणत्या कारणाकरिता नाही, तरी पण 'परमेश्वरा, का, का हे?' अशी मनोवेदना त्याच्या कानी घालण्याकरिता तरी वळतो. आणि मग दुःखाचे चटके बसले की मनुष्य शेवटी परमेश्वराकडे धाव घेतो. खरे पाहता त्याची सुंदरता एवढी आकर्षक आहे, की त्या कारणानेच मनुष्याने त्याच्याकडे धाव घ्यावयास हवी."

साधुमहाराज व मी यांच्यातला असा हा संवाद कलकत्त्याच्या कालीघाट मंदिरात चालला होता. त्या मंदिराचे सुप्रसिद्ध सौंदर्य व भव्यता पाहण्याकरिता मी तेथे गेलो होतो. एका वाक्यात झट्दिशी त्या मंदिराच्या भव्यतेबद्दल व सौंदर्याबद्दल आकस्मिकपणे भेट झालेल्या त्या सोबत्याने आपले वक्तव्य बोलून टाकले.

"चुना आणि विटा यांतून संगीत तर काही निर्माण होत नाही ना? अंतःकरण उघडते कुठे, तर मानवप्राण्याचे जिवंत सूर ऐकून."

आम्ही मोहक सूर्यप्रकाशात सावकाश चालत चालत दरवाज्यापर्यंत गेलो. तेथे भक्तांचे थवेच्या थवे जात-येत होते.

साधुमहाराजांनी माझ्याकडे आपादमस्तक अवलोकन केले. "तू तर अगदी तरुण आहेस. भारत देश सुद्धा तरुण आहे. प्राचीन ऋषींनी [6] आध्यात्मिक जीवन कसे जगावे ह्याबद्दल काही साचे आखून ठेवलेले आहेत. ते कधीही नष्ट होणारे नाहीत. इतक्या पुरातन कालातील त्यांची सुक्ति-वचने आजच्याही काळाला व देशाला पूर्णपणे लागू पडतात. भोगवादाच्या कपटनाटकाच्या प्रभावाने त्यांचा साचा निरुपयोगी झालेला नाही की त्यात कोणत्याही तऱ्हेची कृत्रिमताही आलेली नाही. त्यातील शिस्तीचे नियम आजही या भारत देशाला शिस्तबद्ध करू शकतील. सहस्रावधी वर्षांची गणती गोंधळून गेलेले विद्वान पंडित करतात; पण वैदिक ज्ञानाचे मूल्य ह्या दीर्घ कालावधीत टिकून राहिलेले आहे. हा तुझा वारसा आहे."

साधुमहाराज चांगलेच वक्ते होते. आदरभावाने नमस्कार करून त्यांचा मी निरोप घेत होतो. तेवढ्यात त्यांनी दूरदर्शनाचा एक चमत्कार करून दाखविला.

"तू जेव्हा आज येथून जाशील त्यानंतर तुला एका विलक्षण घटनेचा अनुभव येईल."

देवळाच्या प्राकारातून मी बाहेर पडलो व विमनस्कपणे इकडे तिकडे हिंडत होतो. रस्त्रयावरचे वळण घेऊन पुढे चालू लागलो तो अगदी जुन्या ओळखीचा एक मनुष्य अचानकपणे भेटला. तो म्हणजे असा होता की, त्याने एकदा गप्पा मारावयास सुरुवात केली की त्याला काळ वेळ यांचे भान राहत नसावयाचे.

"मी तुझा फार वेळ घेत नाही," त्याने मला वचन दिले. "आज इतकी वर्षे आपल्याला भेटल्याला झाली. त्या अवधीत काय काय झाले ते सगळे सांगशील की नाही?"

"काय गंमत आहे, फार वेळ घेत नाहीं म्हणून म्हणतोय, मला आता गेले पाहिजे."

पण त्याने आपल्या हाताने मला दाबून धरले व माझ्याकडून तो हकीकती वदवू लागला. गंमत अशी, माझ्या मनात विचार आला, हा जणू खादाड लांडगा आहे; मी जितके जास्त सांगे तितके अगदी आशाळभूतपणे व आधाशासारखे त्याला जास्त जास्त ऐकावयास हवे असे.

मनातल्या मनात मी कालीमातेची प्रार्थना केली की, याच्यापासून मला एकदाचा व्यवस्थितपणे सोडीव.

नंतर एकदम माझा सोबती तेथून निसटला. मला हायसे वाटले, की सुटलो बाबा याच्या तावडीतून. नंतर दुप्पट वेगाने मी पुढे चालू लागलो; मनात भीती ही की, हा आमचा गप्पिष्ट मित्र मला पुनः गप्पांत अडकवायचा, इतक्यात पुनः पाठीमागे जोरजोराने पावलांचा आवाज ऐकू आला. मी आणखी वेग वाढविला; पाठीमागे वळून पाहण्याचे मला धाडस होईना. पण इतक्यात त्या आमच्या दोस्ताने मला गाठलेच. माझ्या खांद्यावर हात ठेवून तो म्हणाला, “मी तुला गंधबाबांचे सांगायला विसरलो! ते येथे जवळच शेजारी असतात.” त्याने काही यार्डांच्या अंतरावरचे एक घर दाखविले. “त्यांना जरूर जाऊन भेट. मोठी विलक्षण व्यक्ती आहे. तुला काही एखादा विचित्र अनुभव येईल. बरंय मी जातो. नमस्कार.” आणि नंतर स्वारी पसार झाली.

कालीघाट मंदिरात जो साधू मला भेटला त्याचेही वर्णन असेच होते हे माझ्या चटकन ध्यानात आले. माझ्या मनात कुतूहल निर्माण झाले. मी त्या घरात शिरलो व एका मोठ्या दिवाणखान्यात जाऊन पोचलो. बरेच लोक तेथे बसलेले होते. पौर्वात्य रिवाजाप्रमाणे नारिंगी रंगाचे एक जाजम जमिनीवर अंथरलेले होते. एकदम एक गंभीर संदेश माझ्या कानांवर आला:

“आता व्याघ्रांबरावर आसनस्थ असे गंधबाबा तुम्हांला दर्शन देतील. कोणत्याही वासहीन फुलाला ते कोणत्याही फुलाचा नैसर्गिक सुगंध देऊ शकतील किंवा कोमेजलेल्या कळीला ते टवटवीत करू शकतील किंवा कोणाच्याही शरीरापासून आल्हाददायक असा सुगंध उत्पन्न करू शकतील.”

मी त्या बाबांकडे सरळ रोखून पाहिले. त्यांचीही नजर चटकन माझ्याकडे वळली. ते अंगाने स्थूल होते व त्यांना दाढी होती. वर्ण काळा असून त्यांचे डोळे मोठे व चमकदार होते.

“बेटा, आनंद झाला मला तुला पाहून. काय पाहिजे तुला बोल. तुला काही सुगंध पाहिजे काय?”

“कशाकरता?” मला त्यांचे हे बोलणे जरा पोरकट वाटले.

“सुगंधांचा वास घेण्याचा चमत्कार अनुभविण्याकरिता.”

“चमत्कारपूर्ण मार्गाने सुगंधाचा आनंद अनुभविण्याकरिता.”

“सुगंध निर्माण करण्याकरिता ईश्वराला बोलवायचं?”

“त्यात काय झाले? ईश्वरच सर्व सुवासिक पदार्थ निर्माण करतो.”

“होय; पण तो पाकळ्यांच्या नाजुक शीशी मध्ये सुगंध तयार करतो, उपयोगा नंतर त्यांना फेकून देण्यासाठी. तुम्हांला फुलं निर्माण करता येतील काय?”

“होय, येतील; पण माझ्या छोट्या मित्रा, मी बहुशः सुवासच निर्माण करतो.”

“मग सुगंधी कारखान्यांना काही काम राहणार नाही.”

“मी काही त्यांच्या धंद्यात व्यत्यय आणीत नाही. माझा हेतू फक्त परमेश्वराचे सामर्थ्य दाखविणे एवढाच आहे.”

“पण महाराज, परमेश्वर आहे हे सिद्ध करावयास पाहिजे का? तो प्रत्येक गोष्टीत, सर्वत्र चमत्कार करून दाखवीत नाही काय?”

“होय, पण आपण सुद्धा त्याची अमर्याद, विविध प्रकारची निर्माणशक्ती थोड्याफार प्रमाणात व्यक्त करून दाखवू नये काय?”

“ही विद्या साध्य करावयास आपल्याला किती दिवस लागले?”

“बारा वर्षे.”

“पारलौकिक पद्धतीने सुगंध निर्माण करावयास बारा वर्षे? याचा अर्थ असा आहे महाराज, की या विद्येत तुम्ही बारा वर्षे निरर्थक खर्च केली. अहो, हे सुगंध फुलवाल्याच्या दुकानात जाऊन काही पैसे खर्च करून मिळविता येतात.”

“फुले कोमेजावयास लागली की त्यांचा सुगंध ही जातो.”

“सुगंध तर मृत्यु बरोबरही जातो. ज्यामुळे फक्त शरीरास आनंद वाटतो त्याची मी वासना का धरावी?”

“अहो तत्त्वज्ञानी, तुमचे बोलणे मला आवडते. आता तुमचा उजवा हात पुढे करा.” साधुमहाराजांनी आशीर्वाद देण्याचा अभिनय केला.

“आता कशाचा सुवास तुम्हाला पाहिजे?”

“गुलाबाचा.”

“बरे, तसा मिळेल.”

आणि त्याबरोबर माझ्या हाताच्या मध्यबिंदूमधून एकदम गुलाबाच्या वासाचा आल्हाददायक सुगंध हवेत भरून गेला. मला आश्‍चर्य वाटले. मी स्मित केले व जवळच्या फुलदाणीतून एक अगदी वास नसलेले मोठे फूल हातात घेतले.

“या वासहीन फुलाला चमेलीचा वास येईल काय?”

“बरे, तसा मिळेल!”

आणि एकदम त्या फुलाच्या पाकळ्यांतून चमेलीचा वास येऊ लागला. किमया करून दाखविल्याबद्दल मी त्या साधुबाबांचे आभार मानले आणि त्यांच्या एका शिष्या जवळ जाऊन बसलो. त्या शिष्याने मला सांगितले की, या गंधबाबांचे खरे नाव स्वामी विशुद्धानंद असे आहे. आणि त्यांना एका तिबेटी योग्याने पुष्कळशा चमत्कृतिपूर्ण अशा योगसिद्धी दिल्या आहेत. त्याने मला अगदी खात्रीपूर्वक सांगितले की, त्या तिबेटी योग्याचे वय एक सहस्र वर्षांहूनही अधिक आहे.

“आणि त्याचे हे शिष्य गंधबाबा तुम्ही आता जसे पाहिलेत तसे साध्या पद्धतीने नेहमीच काही हे वासांचे चमत्कार करून दाखवीत नाहीत.” त्या शिष्याच्या बोलण्यात आपल्या गुरूबद्दलचा अभिमान अगदी उघड दिसून येत होता. “त्यांची चमत्कार करून दाखववयाची पद्धत ज्या तऱ्हेचे लोक त्यांना भेटावयास येतात त्यांच्या आवडीनिवडीनुसार वेगळी वेगळी असते. त्यांचे चमत्कार म्हणजे अजब आहेत. त्यांच्या भक्तांमध्ये कलकत्त्याचे पुष्कळसे अगदी बुद्धिवादी असे सुशिक्षित लोक आहेत.”

मी मनात म्हटले की, अशा सुशिक्षित भक्तांच्या संख्येत माझी आणखी भर पडू नये. जो गुरू अगदी शब्दशः किमया करून दाखवितो असा गुरू मला आवडत नसे. गंधबाबांना नम्रपणे नमस्कार करून मी निघालो. रेंगाळत रेंगाळत घरी आलो व आज दिवसभरात घडून आलेल्या तीन विविध प्रकारच्या घटनांबद्दल विचार करू लागलो.

आमच्या घरातील दारात जो मी प्रवेश करतोय तो माझी बहीण उमा मला भेटली.

“तू आता काय अगदी फॅशनेबल होत चालला आहेस, अत्तर वगैरे लावून!”

मी काही बोललो नाही. फक्त माझ्या हाताचा वास घे म्हणून खूण केली.

“काय गुलाबाचा अगदी मस्त वास आहे! इतका तीव्र कधी वास नसतो पण!”

वास अगदी “असाधारणपणे तीव्र” आहे हे जाणूनच मी ते पारलौकिक सुवासाने भारलेले फूल तिच्या नाकापुढे सावकाशपणे धरले.

“अहा, चमेली मला आवडते!” तिने ते फूल आपल्या हातात ओढून घेतले. तिचा चेहरा जरा गोंधळल्यासारखा दिसला; कारण ज्या फुलाला काही वासच नसतो हे तिला माहीत होते, अशा फूलातून ती वारंवार चमेलीचा सुगंध घेत होती. त्यावरून माझा संशय दूर झाला की गंधबाबांनी माझ्यावर मोहिनी टाकून मला एकट्यालाच त्या फुलाचा वास घेता यावा अशी किमया केली की काय!

त्यानंतर माझा एक मित्र अलकानंद याच्याकडून मला असे कळले की, गंधबाबांना अशी सिद्धी अनुकूल आहे मला वाटते तशी सिद्धी विश्वातल्या असंख्य क्षुधातुर लोकांना प्राप्त झाली तर किती चांगले होईल!

अलकानंदाने मला पुढे सांगितले की, “बरद्वानला गंधबाबांच्या घरी मी गेलो होतो त्या वेळी शंभर एक पाहुणे तेथे आले होते. मोठाच उत्सवसमारंभ होता. कारण योगीमहाराजांची अशी ख्याती होती की, नुसत्या हवेतून ते जड वस्तू काढीत. मी हसत हसत बाबांना विनंती केली की, काही मोसंबी काढून दाखवा. त्या वेळी मोसंब्यांचा मोसम नव्हता. त्याबरोबर त्यांच्या समोरील केळीच्या पानावरील लुची (पुऱ्या) हळूहळू फुगून प्रत्येक पुरीची एक सोललेली मोसंबी तयार झाली. त्यांपैकी एका मोसंबीची मी भीतभीतच चव घेतली. पण ती स्वादिष्ट होती.

पुष्कळ वर्षानी नंतर गंधबाबा अदृश्यातून दृश्य कसे निर्माण करीत हे मला अंतर्ज्ञानाने समजून आले. परंतु खेदाची गोष्ट अशी की, ही पद्धत या जगातील असंख्य क्षुधातुर लोकांच्या आवाक्यापलीकडील आहे.

स्पर्श, रूप, चव, श्रवण व गंध याविषयींच्या ज्ञानेंद्रियांनी निर्माण केलेल्या सगळ्या प्रेरणा इलेक्ट्रॉन व प्रोटॉन यांच्या स्पंदनांतील कमीजास्त फरकामुळे उत्पन्न झालेल्या असतात. हे स्पंदन पुनः ‘प्राणा’ (लाइफ-ट्रॉन) करवी नियंत्रित केले जाते. लाइफ-ट्रॉन म्हणजे सूक्ष्म जीवशक्ती किंवा अणुशक्तीहूनही सूक्ष्म अशी पाच विवक्षित संवेदनाशील कल्पना-वस्तूकरवी बुद्धिपूर्वक प्रेरित झालेली अशी ऊर्जा.

गंधबाबा काही योगसाधनांच्या सामर्थ्याने ह्या प्राणशक्तीशी एकसूर, एकताल होऊन ह्या लाइफ-ट्रॉनच्या स्पंदनांच्या स्थितीत फरक घडवून आणीत व त्यांच्याकरवी आपल्याला पाहिजे ती वस्तू निर्माण करीत. त्यांनी जे सुवास निर्माण केले, मोसंबी काढून दाखविली किंवा इतर जे दुसरे चमत्कार करून दाखविले ते म्हणजे ह्या ऐहिक लहरींचे जड वस्तूमध्ये झालेले रूपांतर किंवा परिवर्तन. त्या काही मोहिनी विद्येने निर्माण केलेल्या आंतरिक संवेदना नव्हेत.

डॉक्टरलोक मोहिनी विद्येचा उपयोग लहान लहान शस्त्रक्रिया करण्याच्या वेळी करतात. भूल आणणाऱ्या औषधाने रोग्याच्या जीविताला जेव्हा धोका असतो तेव्हा या विद्येचा उपयोग मानसिक क्लोरोफॉर्मसारखा होतो. पण ज्यांच्यावर ह्या मोहिनी विद्येचा वारंवार उपयोग केला जातो त्यांच्या जीविताला ह्या प्रयोगांनी धोका निर्माण होतो. ह्या प्रयोगांनी एक प्रकारचा निषेधात्मक (Negative) असा काही मानसिक परिणाम घडून येतो, की जेणेकरून काही काळाने मेंदूतील पेशींची नैसर्गिक क्रिया बिघडून जाते. मोहिनी विद्या म्हणजे दुसऱ्याच्या—चैतन्याच्या [7] क्षेत्रामध्ये अतिक्रमण करणे होय. हे प्रयोग असे जे काही क्षणिक देखाव्याकरिता करतात त्याचा, ज्यांना ईश्वरी साक्षात्कार झाला आहे अशा सिद्धांच्या चमत्कारांशी काही संबंध नाही. परमेश्वराच्या ठिकाणी जागृत असल्याने हे खरे सिद्ध विश्वरूपी स्वप्न अनुभविणाऱ्या सृष्टिकर्त्याशी एकरस झालेल्या आपल्या इच्छाशक्तीने स्वप्नसृष्टीत बदल घडवून आणतात. [8]

गंधबाबांनी जे आश्चर्य निर्माण करणारे प्रयोग दाखविले ते डोळ्यांना विस्मयकारी वाटतात, हे खरे. पण आध्यात्मिक दृष्ट्या त्यांचा काही उपयोग नाही. करमणुकीच्या पलीकडे त्यांचा काही उपयोग नाही. परमात्म्याच्या स्वरूपशोधनाच्या मार्गात ते साधकाला अडथळे आणतात.

असामान्य सिद्धीचे हे अवडंबरपूर्वक प्रदर्शन सिद्ध पुरुषांनी त्याज्य मानलेले आहे. पर्शियन गूढवादी अबू सय्यद हा एके समयी पाणी, हवा व आकाश यांच्यावर मिळविलेल्या सिद्धिसामर्थ्याचा गर्व बाळगणाऱ्या काही फकिरांकडे पाहून उपहासाने हसला.

अबू सय्यद तिरस्काराने म्हणत असे, “बेडकाला सुद्धा नाही का वाटत की, पाण्यातच आपले घर आहे म्हणून? कावळा आणि गिधाड ही हवेत अगदी स्वच्छंदपणे विहार करतात. सैतान हा सुद्धा एकाच वेळी पूर्वेकडे व पश्चिमेकडे वावरत असतो. सच्चा मनुष्य तो, की जो आपल्या इतर बांधवांमध्ये सचोटीने वागून राहातो. आपला जो काही धंदा आहे तो तो प्रामाणिकपणे करतो, पण ज्याला ईश्वराचा [9] एक क्षणभरही विसर पडत नाही.” दुसऱ्या एका प्रसंगी त्या पर्शियन उपदेशकाने धार्मिक आचरणाविषयी आपले जे विचार व्यक्त केले ते असे: “(स्वार्थमूलक वासना व हव्यास) यांसारखा गोष्टी ज्या तुमच्या डोक्यात भरून राहिल्या आहेत त्या बाजूस ठेवणे; तुमच्याजवळ जे काही आहे त्याचे उदारहस्ताने दान करणे आणि आपत्तीच्या प्रसंगात माघार न घेणे.”

पण कालीघाटावरील मंदिरात भेटणारा तो निःपक्षपाती साधुबाबा किंवा तिबेटमध्ये सिद्धी शिकून आलेले गंधबाबा यांपैकी कोणीही मला गुरूसारखे वाटले नाहीत, माझ्या हृदयात जे विचार येत ते बरोबर आहेत की नाहीत हे तपासून घेण्याकरिता मला गुरूची अशी जरुरीच नव्हती. कारण हे जे विचार मला सुचत ते माझ्या हृदयातील आतल्या गूढ संवेदनांनीच कधीकधी प्रेरित होत असत. जेव्हा शेवटी मला माझ्या गुरूचे दर्शन झाले तेव्हा त्या गुरूनेच मला आपल्या स्वतःच्याच उदात्त उदाहरणाने सच्चा, सत्प्रवृत्त पुरुष कसा असतो हे दाखवून दिले.

1 एक्लेसिॲस्टिस ३:१ (बायबल, किंग जेम्सचे संस्करण).

2 सॉलोमन ख्रिस्तपूर्व दहाव्या शतकातला इस्रायलचा पराक्रमी राजा. त्याने इतक्या शहाणपणाने व न्यायीपणाने राज्य चालविले की आज देखील एखाद्या शहाण्या माणसाला 'सॉलोमन' म्हणून संबोधले जाते.

3 काली हे निसर्गातील शाश्वत तत्त्वाचे प्रतीक आहे. परंपरेनुसार तिचे जे चित्र काढतात ते चतुर्भुज असून ईश्वरस्वरूप अशा शिवाच्या देहावर किंवा अनंत स्वरूपावर ती उभी केलेली असते. कारण की, निसर्गाचा किंवा ह्या दृश्यमान अशा जगताचा सारा प्रपंच ह्या सुप्त अव्यक्त मुळातून उभारला गेलेला आहे. हे चार हात म्हणजे चार मूलभूत गुण; दोन विधायक व दोन विघातक. सृष्टीची रचना द्वैतावर उभारलेली आहे हे ते हात दर्शवितात.

4 स्फिंक्स हे ग्रीक पुराणातील भयंकर प्राणी होत. स्फिंक्सचे डोके स्त्रीचे असून शरीर सिंहाचे व कुत्र्याचे असते व तिला पंखही असतात. हिची आख्यायिका अशी होती की, ग्रीसच्या थेबस नावाच्या प्राचीन शहराजवळ ही राही आणि तिच्याजवळून जाणाऱ्या लोकांना ती प्रश्न विचारी व त्या प्रश्नाचे उत्तर चुकीचे आल्यास ती त्यांना खाऊन टाकी.

5 माया—शब्दशः अर्थ "मापन करणारा." *माया* म्हणजे जादूची शक्ती, जी सृष्टीमधील असीमत्व व अभिन्नत्व यांमध्ये सीमित्वाचा व भिन्नत्वाचा भास निर्माण करते.

इमर्सनने एक कविता लिहिली व तिचे शीर्षक 'माया' असे ठेविले:

माया करी कार्य कसे अभेद्य,
असंख्य जाळी विणिते सदैव;
चित्रे जियेची बहुरंग कांती,
पटापटांतर्गत वेष्टनाची;
मोहास ज्या मानव लुब्ध होई
मायाविना वंचितसे तयासी.

6 ऋषि—शब्दशः अर्थाने 'द्रष्टे,' ज्यांनी अती पुरातन काळात वेदांची रचना केली.

7 पाश्चिमात्य मानसशास्त्रज्ञ मनुष्याच्या चैतन्याबाबत जे संशोधन करतात ते पुष्कळ अंशी सुप्त मनाच्या आणि मानसोपचार व मनोविश्लेषणाच्या पद्धतींनी बरे केले जाणाऱ्या मानसिक रोगांच्या संशोधनापर्यंतच मर्यादित असते. सर्वसाधारण मनाच्या अवस्था कोणत्या कारणामुळे उगम पावतात व त्यांचे मूलतः स्वरूप काय असते याविषयी त्यांचे संशोधन ही फारच अल्प असते. ह्या खऱ्याखुऱ्या मूलगामी विषयाकडे भारतीय तत्त्वज्ञानाने दुर्लक्ष केलेले नाही. सांख्य व योगदर्शनामध्ये सामान्य मानसिक अवस्थान्तर, बुद्धीची लाक्षणिक कार्ये (विवेकबुद्धी), अहंकार आणि मन (इंद्रियगत चैतन्य) यांमधील जे वेगवेगळे परस्परविषयक संबंध आहेत त्यांचे नेमके अचूक वर्गीकरण केलेले आहे.

8 "ब्रह्मांडाचे आपल्या कणा-कणांत प्रतिनिधित्व होत आहे. प्रत्येक वस्तु एका गुप्त पदार्थाने निर्माण पावली आहे. हे विश्व एका दवबिंदु मध्ये गोलाकार झाले आहे....सर्वव्यापकत्वाच्या मताचा खरा अर्थ हा आहे की ईश्वर शेवाळाच्या प्रत्येक रेश्यात आणि कोळ्याच्या जाळात आपल्या पूर्ण रुपात नांदत आहेस." —इमर्सन, "कॉम्पेन्सेशन."

9 "नेहमीचा कामधंदा करीत असताना, खरेदी-विक्रीचे व्यवहार चालू असताना सुद्धा परमेश्वराचा विसर पडता कामा नये." हेतू हा की, कर्म व धर्म; हात, पाय व हृदय ह्यांचा योग्य समन्वय घडून आला पाहिजे. काही पाश्चिमात्य लेखक असे म्हणतात की, हिंदू दर्शनांचे ध्येय हे संन्यासमार्गी आहे; निष्क्रियतेचे आहे व समाजामध्ये न राहता सामाजिक कर्तव्यातून बाहेर पडण्याचे आहे. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. वैदिक आश्रमधर्माच्या चतुर्विध व्यवस्थेत सर्वसाधारण जनतेच्या दृष्टीने कर्म व धर्म यांची फार सुंदर सांगड घातली आहे. निम्मे आयुष्य हे अध्ययन व गृहस्थाश्रमाचे परिपालन करण्याकरिता काढून ठेवलेले आहे; व बाकीचे निम्मे ध्यानधारणा व ईश्वरचिंतनाकडे घालविण्याकरिता योजिलेले आहे.

आत्मस्वरूपी स्थिर होण्याकरिता एकांतवासाची फार आवश्यकता आहे. पण यानंतर हे गुरू परलोकातून ह्या पृथ्वीतलावर लोककल्याणाचे कार्य करण्याकरिता परत येत असतात. साधुसंत सुद्धा बाह्य ऐहिक कर्मांपासून जरी अलिप्त राहत असले तरी ते आपल्या विचारांनी व आपल्या पवित्र विचारलहरींद्वारा जगावर फार मोठे उपकार करून ठेवीत असतात. ह्या त्यांच्या उपकारांचे मूल्य असंस्कृत माणसांच्या अतिकष्ट घेऊन केलेल्या समाजकल्याणाच्या कार्याहून अधिक असते. हे जे महात्मे असतात ते आपल्या परीने पुष्कळदा तीव्र विरोध सहन करून सुद्धा लोकांना स्फूर्ती देण्याचे व आपल्या सामान्य बांधवांचा उद्धार करण्याचे काम अविरतपणे करीत असतात. हिंदू तत्त्वज्ञानाचे धार्मिक किंवा सामाजिक असे कोणतेही ध्येय हे मनुष्याला निष्क्रिय करण्याचे नाही. अहिंसेला 'सकल धर्म' म्हणूनच महाभागवतात संबोधिलेले आहे. आणि त्याचे कारण हेच की, जो दुसऱ्यांना मदत करीत नाही तो कोणत्या ना कोणत्या तरी मार्गाने त्यांना दुखापत करीत असतो. अहिंसापालन हे वस्तुतः सक्रिय निषेधात्मकच आहे.

भगवद्गीतेमध्ये (अध्याय ३: श्लोक ४-८) असे दर्शविलेले आहे की, प्रवृत्ती ही, क्रियाशीलता ही माणसाच्या स्वभावाचा नैसर्गिक गुण आहे. आलस्य म्हणजेच थोडक्यांत 'असत प्रवृत्ती.'

“न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति । । ४ । ।
न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः । । ५ । ।
कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारःस उच्चते । । ६ । ।
यस्त्रिवन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।
कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते । । ७ । ।
नियतं कुरु कर्म त्यं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।
शरीरयत्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः । । ८ । ।

कर्म कोणाही माणसाला सुटत नाही. कर्माचा त्याग करून, संन्यासधर्माचा अवलंब करून कोणालाही सिद्धीचा लाभ घडत नाही. खरोखर पाहता कोणीही एक क्षणभर सुद्धा कर्मविरहित अशा अवस्थेत राहू शकत नाही. प्रकृती आपल्या गुणधर्मानुसार त्याच्या इच्छेविरुद्ध सुद्धा त्याला कार्यप्रवृत्त करीत असते. (कारण विचार म्हणजे कल्पनासृष्टीतील कर्मच होय.) … जो आपल्या सुदृढ इंद्रियांचे दृढनिश्चयाने दमन करून आपल्या दैहिक शक्तींचा योग्य हेतूकरिता उपयोग करतो, जो लाभाची अपेक्षा करीत नाही, अर्जुना, असा तो वैशिष्ट्यपूर्ण होय. तू आपले नियत— नेमलेले कर्म करीत जा.

*(आर्नोल्डच्या इंग्रजी अनुवादावरून)*

## प्रकरण - ६

# 6. व्याघ्रस्वामी

"व्याघ्रस्वामींचा पत्ता मी शोधून काढला आहे. चल, आपण उद्या त्यांच्याकडे जाऊ."

चंडीच्या ह्या सूचनेचे मी स्वागत केले. चंडी हा माझा इंग्रजी शाळेतील मित्र. ह्या साधूला भेटावयास मी उत्सुक होतो. कारण हे स्वामी आपल्या पूर्वाश्रमीच्या आयुष्यात मोठे शिकारी होते. त्यांनी पुष्कळ वाघ आपल्या हातांनी पकडलेले होते व कित्येक वाघांशी ते केवळ हातांनी कुस्ती खेळलेले होते. अशा तऱ्हेच्या प्रेक्षणीय शक्तीच्या प्रयोगामध्ये माझ्या बालमनाला औत्सुक्य, जबरदस्त उत्कंठा वाटणे अगदी साहजिक होते.

ते हिवाळ्याचे दिवस होते. थंडी पडली होती. दुसऱ्या दिवशी पहाटे उठून चंडी आणि मी दोघे रमतगमत बाहेर पडलो. कलकत्ता शहराच्या बाहेर भवानीपूरमध्ये बराच वेळ निष्फळ शोध घेत घेत शेवटी त्यांच्या नेमक्या घरी आम्ही जाऊन पोचलो. दरवाज्याला दोन लोखंडी कड्या होत्या, त्या मी मोठ्याने वाजविल्या. त्या आवाजाकडे काही लक्ष न देता एक नोकर हळूहळू पावले टाकीत आला. त्याच्या चेहऱ्यावर किंचित उपरोधिक स्मिताची छटा होती. जणू त्याला असे दर्शवायचे होते की, भेटायला येणाऱ्या लोकांनी कितीही गडबड केली तरी साधुबाबांच्या घरातील शांतता भंग पावत नाही.

अभिप्रेत असा हा अर्थ जाणून आम्ही त्या सेवकाचे आभार मानले. त्याने आम्हांला आत दिवाणखान्यात नेले. आम्हांला तेथे बराच वेळ तिष्ठत उभे राहावे लागले. आम्हांला काय काय अनुभव येतो याबद्दल आमचे मन जरा साशंक झाले. ज्याला सत्य शोधून काढावयाचे आहे त्याच्यासाठी भारत देशात एक अलिखित कायदा आहे; तो म्हणजे त्याने सबुरीने घेतले पाहिजे. एखाद्या वेळी गुरू हेतुपूर्वक परीक्षा घेत असतो, की साधकाला गुरूला भेटण्याची किती उत्कंठा आहे! पाश्चात्य देशांत डॉक्टर लोक व दंतवैद्य ह्या मानसशास्त्रदृष्ट्या उपयुक्त अशा युक्तीचा पुष्कळदा अवलंब करतात.

शेवटी आम्हांला सेवकाने नेल्याप्रमाणे चंडी आणि मी दोघे एका शयनगृहात गेलो. सुप्रसिद्ध असे सोहंग [1] स्वामी गादीवर बसलेले होते. त्यांचे शरीर अवाढव्य होते. ते पाहून आम्हांला जरा डोळे विस्फारून त्यांच्याकडे पाहावे लागले. आम्ही अगदी गप्प उभे राहिलो. अशी भरदार विशाल छाती व गोल फुटबॉलसारखे दंडांतील स्नायू आम्ही कधीही पाहिलेले नव्हते. त्यांची गर्दन भरदार असून तिच्यावर स्वामींचा उग्र पण शांत चेहरा, खालवर आलेली केशवलये, दाढी आणि मिशा यांनी शोभून दिसत होता. त्यांच्या काळ्याभोर डोळ्यांत बगळ्याचा व वाघाचा स्वभावधर्म चमकून दिसत होता. त्यांच्या मांसल कमरेभोवती एक व्याघ्रचर्म गुंडाळलेले होते. याविरहित त्यांच्या शरीरावर दुसरे वस्त्र नव्हते.

आमच्या तोंडातून जेव्हा शब्द फुटावयाला लागले तेव्हा माझा मित्र व मी, आम्ही दोघांनी स्वामींना नमस्कार केला. ह्या अशा असाधारण हिंस्र व कपटी पशूंच्या परिसरात त्यांनी जे सामर्थ्य प्रकट करून दाखविले त्याबद्दल आम्ही त्यांची प्रशंसा केली.

"ह्या अशा बंगाली वाघासारख्या क्रूर वन्य पशूंशी आपण केवळ नुसत्या हाताच्या मुठीने कसा सामना करता व त्यांना कसे वठणीवर आणता हे आम्हांला जरा सांगता का महाराज?"

"मुलांनो, वाघांशी लढणे म्हणजे मला पोरखेळ आहे. पाहिजे तर आता सुद्धा मी लढून दाखवितो." असे म्हणून त्यांनी बालिश हास्य केले. "तुम्हांला ते वाघ वाटतात. मला ती मांजरे वाटतात."

"पण स्वामीजी, मी जरी माझ्या सुप्त जाणीवेला खूप समजाविले, की वाघ म्हणजे अगदी पाळीव मांजर आहे, तरी पण वाघाला तसे समजेल काय?"

"अर्थात् ताकद सुद्धा आवश्यक आहे. एखाद्या मुलाने जरी मनात म्हटले की वाघ म्हणजे मांजर आहे, तरी त्याला वाघ काबूत आणता येईल असे कोणी समजू नये. हे माझे दांडगे हात हे हत्यारच आहेत."

नंतर त्यांनी आम्हांला पडवीत नेले. तेथे एका भिंतीवर त्यांनी धडक मारून दाखविली. भिंतीतली एक वीट ढासळून खाली पडली. भिंतीस पडलेल्या भोकातून पलीकडील आकाश चक्क दिसत होते. ती वीट म्हणजे जणू भिंतीच्या कवळीतून तुटून पडलेला एक दात. मी मनातल्या मनात आश्चर्य करीत राहिलो. एका धडकेने जर हे स्वामी चुना लावून पक्की बसविलेली वीट जाड भिंतीतून उखडून काढू शकतात, तर मग मला वाटले की, त्यांना वाघाचे दातही तसेच नक्की उपटून काढता येतील.

"माझ्यासारखी ताकद पुष्कळजणांना असते, पण त्यांना माझ्यासारखा दृढ़ आत्मविश्वास नसतो. जे इसम शरीराने भरभक्कम पण मनाने दुबळे असतात त्यांना जंगलात स्वैरपणे संचार करणाऱ्या वाघापुढे उभे केले तर तो वाघ पाहताक्षणीच ते बेशुद्ध होऊन जातील. ज्याचा मूळचा क्रूर स्वभाव टिकून राहिलेला आहे व जो आपल्या मूळच्या नैसर्गिक वस्तीत वावरत आहे असा वाघ हा अफू घालून गुंगी आणलेल्या सर्कसमधील वाघापेक्षा वेगळा असतो!

"ज्यांच्या ठिकाणी भीमाची शक्ती आहे अशी अनेक जबरदस्त माणसे वनराज बंगाली वाघाच्या पंजाच्या पहिल्या फटक्याबरोबरच गर्भगळित होऊन जातात; म्हणजे त्या वाघाने त्या माणसाची मानसिक अवस्था एखाद्या पाळीव मांजरासारखी भित्री करून टाकलेली असते. त्याच पद्धतीने ज्याचे शरीर चांगले ताकदवान आहे व ज्याची मानसिक निश्चयशक्ती अचाट आहे अशा मनुष्यालाही वाघाच्या मनावर परिणाम घडवून आणता येतो व त्याला पाळीव मांजरासारखे दुर्बल व असाहाय्य करून टाकता येते. असे प्रयोग मी किती तरी वेळा करून दाखविलेले आहेत!"

माझ्यासमोरचे हे भीमकाय पुरुष अशा तऱ्हेचे वाघाचे मांजरामध्ये रूपांतर करण्याचे प्रयोग करून दाखवीत असतील यावर माझा विश्वास बसण्यासारखा होता. ते उपदेशकाच्या मनःस्थितित दिसत होते. चंडी व मी दोघे त्यांचे बोलणे आदरपूर्वक ऐकत राहिलो.

"मन स्नायूंवर हुकुमत चालविते. हातोड्याच्या घणामधील जोर हा हातोडा मारणाऱ्याने घण टाकण्याच्या वेळी जेवढी शक्ती वापरली असेल त्यावर अवलंबून असतो. माणसाची शारीरिक शक्ती ही त्याने मनाने योजिलेल्या इच्छाशक्तीवर व त्याच्या धृतीवर अवलंबून असते. स्पष्टच सांगावयाचे म्हणजे शरीर हे मनाने बनविलेले व वर्तविलेले असते. पूर्वजन्मीच्या संस्कारांच्या परिणामामुळे माणसाच्या मनामध्ये, जाणीवेमध्ये सामर्थ्य किंवा

दौर्बल्य हे हळूहळू उतरत असते. त्यांना सवयी अशी संज्ञा देता येईल. आणि ह्याच सवयी पुढे शरीरसंबंधी इष्टानिष्टता निर्माण करीत असतात. बाहेरून दिसून येणाऱ्या दुबळेपणाचे खरे कारण मनाच्या दौर्बल्यात आहे. शरीराच्या सवयी मनाला आपल्या जरुरीप्रमाणे वागावयाला लावतात. शरीर व मन यांचे असे हे दुष्ट वर्तुळ आहे. जर एखाद्या मालकाने आपल्या नोकराला सैल सोडले तर तो जसा मालकाच्या डोक्यावर बसतो, त्याचप्रमाणे शरीररूपी नोकराच्या अधीन गेल्याने मनरूपी मालक त्या नोकराचा नोकर बनतो."

आपल्या पूर्वायुष्याबद्दल काही सांगावे म्हणून आम्ही त्या रुबाबदार स्वामींना विनंती केली, त्यावरून त्यांनी सांगावयास सुरुवात केली:

"माझी अगदी सुरुवातीची तीव्र इच्छा वाघाशी कुस्ती करावी अशी होती. माझी इच्छाशक्ती दांडगी होती पण शरीर अगदीच नाजूक होते."

माझ्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडले. हा दांडगा, वृषस्कंध मनुष्य कधी अशक्त असेल हे मला खरेच वाटेना.

"मग मी आरोग्य व ताकद यांच्यावर विचार सतत व इतके केंद्रित केले की शेवटी ती उणीव मी भरून काढली. ह्या बंगाली वनराजांना नरम करण्याच्या कामी ही माझी दुर्दमनीय मानसशक्तीच उपयोगी पडली व तिलाच धन्यवाद द्यावयास हवेत."

"स्वामीमहाराज, मला कधी वाघाशी कुस्ती खेळता येईल काय? काय वाटते आपल्याला?" अशा तऱ्हेची विक्षिप्त इच्छा माझ्या मनात अगदी प्रथमच आली व ती शेवटचीच ठरली. पुनः कधीही माझ्या मनात अशी इच्छा उत्पन्न झाली नाही!

ते हसत हसत म्हणाले, "येईल. पण वाघ अनेक जातीचे, प्रकारांचे असतात. माणसाच्या वासनारूपी जंगलात काही वाघ हिंडत असतात. जनावरांना ठोसे मारून त्यांना बेशुद्ध करण्यात काही आध्यात्मिक लाभ घडून येत नाही. पण अंतरंगात वावरणारे असे जे हे भक्ष्य शोधणारे आहेत त्यांच्यावर मात करणे अधिक श्रेष्ठ होय."

"महाराज, आम्हांला सांगा, तुम्ही हिंस्र वाघांचे दमन करता करता हिंस्र वासनांचे दमन करावयास कशी सुरुवात केली?"

व्याघ्रस्वामी काही वेळ स्तब्ध राहिले. त्यांचे डोळे कोठे तरी लांबवरचे पाहत असावेसे दिसले. पूर्वायुष्याच्या आठवणी आठवत असावेसे दिसले. आमच्या विनंतीला मान देऊन आम्हांस काही सांगावे की नाही याचा त्यांच्या मनात थोडा संदेह पडलासा दिसला. शेवटी सांगावे असे त्यांनी ठरविले आणि मग किंचित् सस्मित नजरेने आमच्याकडे पाहिले.

"जेव्हा माझी कीर्ती अगदी कळसाला पोचली तेव्हा मला अती गर्व झाला, कैफ आला. माझ्या मनाने असे ठरविले की, आता वाघांशी नुसती कुस्तीच न करता त्यांच्याकडून कसरत करवून घेऊन ती लोकांना दाखवावी. हिंस्र पशूंना माणसाळवावं ही महत्त्वाकांक्षा मी धरली. आणि मग मी हे कसरतीचे सार्वजनिक प्रयोग करावयास सुरुवात केली आणि त्यात मला यशही चांगले आले.

"एक दिवस संध्याकाळी मी माझ्या खोलीत बसलो असता माझे वडील अगदी चिंतातुर होऊन माझ्याकडे आले.

"मुला, मला तुला एक धोक्याची सूचना द्यावयाची आहे. कार्यकारणरूपी दळून काढणाऱ्या चक्रांपासून जी पातके निर्माण होतात त्या पातकांपासून मला तुला वाचवायचे आहे."

"बाबा, तुम्ही दैववादी आहात की काय? भोळ्या समजुतींना भिऊन मी माझ्या कर्तृत्वाला पायबंद घालू की काय?"

"मुला, मी दैववादी नाही. पण पवित्र अशा धर्मशास्त्रात बदला घेण्याविषयी जो न्यायास धरून कायदा आहे त्याच्यावर माझा विश्वास आहे. जंगलामध्ये वावरणाऱ्या ह्या वन्य पशूंमध्ये तुझ्याविषयी संताप निर्माण झालेला आहे. एखाद्या वेळी तुझ्या जिवाला धोका होण्याचा संभव आहे."

"मला तुमच्या बोलण्याचे आश्चर्य वाटते, बाबा! तुम्हांला माहीत आहे, की हे वाघ देखणे असतात खरे, पण क्रूर! एखाद्या असहाय्य प्राण्याला मारून टाकून त्याच्या मांसाने भरपूर जेवण झाले तरी पुनः ताबडतोब एखादे नवीन भक्ष्य दिसले की वाघ त्याच्यावर झेप टाकतोच. एखादे वेळी जंगलात मजेने इकडे तिकडे फिरत एखादे हरीण चरत असावे आणि त्या वाघोबाने त्याच्यावर झडप टाकावी; त्याच्या मऊशा मानेला आपल्या कराल दाढेने विच्छिन्न करावे आणि मग त्या वन्य पशूने त्या दुबळ्या मूकपणे विव्हळणाऱ्या हरणाच्या मानेतील गरम रक्ताचा एक घुटका घ्यावा आणि मग ते भक्ष्य टाकून देऊन पुनः दुसरीकडे निघून जावे.

"वाघ म्हणजे जंगलात वावरत असणाऱ्या साऱ्या पशूंमध्ये अती दुष्ट पशू! काय सांगावे? माझ्या ठोशांनी त्यांच्या मथ्थड डोक्यांत एखादे वेळी विवेकाचा, भूतदयेचा किंचितसा प्रकाश पडावा. ह्या जंगलातील लवकरच बंद होणाऱ्या शाळेचा मी जणू हेडमास्तरच आहे. आणि या रानवट मुलांना सदाचाराचे धडे देत आहे!

"म्हणून बाबा, मी म्हणतो की, कृपा करून तुम्ही मला वाघाची शिकार करणारा असे न समजता वाघास माणसाळवणारा असे समजत चला. मग माझे हे सत्कृत्य माझ्यावर आपत्ती कसे आणील? कृपा करून मी ज्या पद्धतीने हा व्यवसाय करीत आहे ती पद्धत बदलावी असे मला सांगू नका."

ही जुनी कहाणी चंडी आणि मी दोघे लक्षपूर्वक ऐकत होतो. भारत देशामध्ये मूल सहसा आपल्या आई-बापांची अवज्ञा करीत नाही. व्याघ्रस्वामी पुढे सांगू लागले:

"माझे हे सगळे बोलणे वडील अगदी निर्विकारपणे व शांतपणे ऐकत होते. माझे बोलणे संपल्यावर त्यांनी गंभीर मुद्रेने एक निवेदन केले.

"बेटा, एका साधूच्या तोंडून ऐकलेल्या एका अशुभ भवितव्याबद्दल तू मला बोलायला लावीत आहेस. कालच मला तो साधू भेटला. मी असा सज्ज्यामध्ये रोजच्याप्रमाणे ध्यानाला बसलो होतो. तो म्हणाला—

"प्रिय मित्रा, तुझ्या भांडखोर मुलाच्या बाबतीत काही सूचना द्यायला मी आलो आहे. त्याने हा आपला रानटी व्यवसाय बंद करावा. नाही तर आता पुढे जी त्याची वाघाशी कुस्ती होणार आहे त्यात त्याला जबर जखमा होतील. सहा महिने त्याला दुखणाईत अवस्थेत काढावे लागतील. आणि मग त्यानंतर तो हे आपले उद्योग सोडून देईल व साधुसंन्यासी बनेल."

“ह्या सांगण्याचा माझ्या मनावर काही परिणाम झाला नाही. कोण्या तरी भ्रमिष्ट व धर्मवेड्या माणसाने माझ्या भोळ्या वडिलांना घाबरवून टाकले असेच मला वाटले.”

व्याघ्रस्वामींच्या ह्या कबुलीत एक असा अधीर भाव होता जसा मुर्खतापूर्ण कार्यात आढळून येतो. बराच वेळ ते अगदी गप्प बसले. नंतर आम्ही तेथे बसलेले आहोत हे त्यांच्या ध्यानात आले. नंतर त्यांनी जेव्हा आपली कहाणी पुढे सांगावयास सुरुवात केली तेव्हा त्यांचा आवाज एकदम बारीक झाला.

“वडिलांनी ही धोक्याची सूचना दिल्यावर थोड्याच दिवसाने माझा मुक्काम कुचबिहारच्या राजधानीत झाला. तो रमणीय प्रदेश मी प्रथमच पाहत होतो; आणि आता मला काही विश्रांती मिळेल अशी माझी अटकळ होती. मी रस्त्र्याने जात होतो. साधारणपणे प्रत्येक ठिकाणी माझ्या पाठीमागे लोकांचा घोळका जमायचा; त्यांचे माझ्याबद्दलचे उद्‌गार मला ऐकू येत:

“रानटी वाघांशी कुस्ती खेळणारा हाच तो.”

“त्याचे पाय आहेत की झाडाचे बुंधे?”

“त्याच्या तोंडाकडे बघा! तो पुर्वजन्मी वाघांचा राजाच असला पाहिजे.”

आणि तुम्हांला माहीतच आहे की, गावातली मुले म्हणजे वर्तमानपत्राची अगदी ताजी आवृत्ती! ताजी बातमी तीच पुरवितात. आणि मग त्यानंतर बायका ती बातमी ह्या घरातून त्या घरात वाऱ्यासारखी पसरवून टाकतात. अगदी थोड्याच तासांत सबंध शहरभर माझ्या येण्यामुळे प्रचंड खळबळ उडून गेली.

संध्याकाळच्या वेळी मी आराम घेत शांतपणे पडलो होतो. इतक्यात घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला. ते माझ्या मुक्कामाच्या ठिकाणासमोरच थांबले. त्यावर आरूढ झालेले उंच पगडीवाले पोलीस खाली उतरले.

मी जरा दचकलोच. मानवी कायद्याची जपणूक करणारे हे पोलीस वाटेल ते करू शकतात, मी मनाशी म्हटले.

माझ्या मनात कल्पना आली की ज्या गोष्टीबद्दल मला काही एक माहीत नाही त्याबद्दल विचारणार आहेत की काय ते मला! पण त्या अंमलदारांनी आदबीने पण जरा चमत्कारिक पद्धतीने मला नमस्कार केला.

“महाराज, कुचबिहारच्या युवराजसाहेबांकडून आम्ही आलो आहोत. आपले स्वागत असो. युवराजसाहेबांनी आपल्याला उद्या संध्याकाळी राजवाड्यावर येऊन जाण्याचे आमंत्रण दिले आहे. आपल्या भेटीने त्यांना फार आनंद होईल.”

मी जरा थोडा वेळ साशंकपणे विचार केला. कारण काही असो, पण मला जरा थोडेसे बरे वाटेना की, ह्या शांतपणे आरंभिलेल्या माझ्या प्रवासामध्ये असा व्यत्यय यावा. पण पोलीस अंमलदारांच्या नम्रतेने मी खूष झालो. मी आमंत्रण स्वीकारले.

दुसरे दिवशी चार घोड्यांची ऐटदार गाडी मला थाटात नेण्याकरिता आलेली माझ्या दाराशी उभी पाहुन मला थोडे गोंधळल्यासारखे झाले. रखरखीत उन्हापासून बचाव करण्याकरिता एका नोकराने माझ्यावर एक भपकेदार छत्री धरली होती. शहराच्या वस्तीतून आणि शहराबाहेरील झाडीमधून असा हा फेरफटका झाला. मी या स्वारीचा आनंद

घेतला. खुद्द युवराजसाहेब माझे स्वागत करावयास राजवाड्याच्या दरवाज्याशी हजर होते. त्यांनी आपली सुवर्णजडित किनखाबाची गादी खाली करून त्याच्यावर मला बसविले व आपण स्वतः एका साध्या खुर्चीवर बसले.

'हा जो माझा सगळा सत्कार होत आहे तो मला भारी पडणार आहे!' माझ्या मनात विचार आला व कुतूहल वाढू लागले. थोडे औपचारिक बोलणे झाल्यावर युवराजांनी आपला हेतू प्रकट केला.

"आमच्या ह्या साऱ्या शहरात अशी बातमी उठली आहे की, आपण जंगली वाघांशी केवळ मोकळ्या हातांनी लढू शकता? खरे आहे का हे?"

"ते सगळे खरे आहे."

"माझा काही विश्वास बसत नाही! आपण कलकत्त्याचे बंगाली बाबू. शहरातील पांढऱ्या शाल्योदनावर आपण वाढलेले. खरे सांगा, आतापर्यंत आपण फक्त हाडकुळ्या, अफू खाऊ घालून गुंगी आणलेल्या वाघांशी झुंज घेतली असेच ना?" त्यांचा आवाज मोठा व छद्मी होता, व त्यांच्या बोलण्यात प्रांतिक बोलीची, उच्चाराची ढब होती.

त्यांच्या ह्या अपमानकारक प्रश्नाचे मी काहीच उत्तर दिले नाही.

"आम्ही एका नव्या वाघाला इतक्यातच धरले आहे. राजा बेगम [2] नाव आहे त्याचे. त्याच्याशी झुंज घेऊन दाखवा. माझे आपल्याला आव्हान आहे. तुम्ही त्याच्याशी यशस्वीपणे सामना केलात, त्याला साखळदंडाने बांधलेत आणि त्याच्या पिंजऱ्यातून शीरसलामत बाहेर पडू शकलात तर हा पट्टेदार बंगाली वाघ तुमच्या मालकीचा होईल. हजारो रुपये तुम्हांस दिले जातील व इतर आणखी बक्षिसे तुम्हांला दिली जातील. जर त्याच्याशी झुंज घेण्याचे आव्हान तुम्ही नाकारलेत तर ढोंगी म्हणून तुमचे नाव मी आमच्या साऱ्या राज्यात जाहीर करीन!"

त्यांच्या ह्या अपमानकारक शब्दांनी माझ्यावर बंदुकीच्या गोळ्यांसारखा प्रहार केला. मी रागातच ते आव्हान स्वीकारले. युवराजसाहेब जे अस्थिरतेने खुर्चीवरून अर्धे उठलेले होते ते परत खुर्चीवर बसले. त्यांच्या चेहऱ्यावर एक तऱ्हेचे हिंसक स्मित दिसून आले. पूर्वी रोमन बादशाहा मोठ्या प्रशस्त अंगणामध्ये ख्रिस्ती लोकांवर वाघ, सिंह सोडीत व त्यांची क्रूर हत्या करवीत व अशी दृश्ये पाहून आपली करमणूक करून घेत त्याची मला आठवण झाली. ते म्हणाले,

"आजपासून सात दिवसांनी ही झुंज होईल. तुम्हांला हा वाघ अगोदर पाहावयास मिळणार नाही. त्याबद्दल मी दिलगीर आहे."

मी त्या वाघाला मोहमुग्ध करीन की त्याला चोरून अफूची गोळी चारीन अशी भीती युवराजांना वाटली की काय नकळे!

मी राजवाड्यातून बाहेर पडलो. निघते वेळी ती शानदार गाडी मला नव्हती की ती भपकेदार छत्रीही माझ्या डोक्यावर कोणी धरली नव्हती.

पुढल्या सात दिवसांत मी माझे मन व शरीर ह्या आगामी दिव्याला तोंड देण्याकरिता तयार केले. नोकरांच्या तोंडून काय वाटेल त्या काल्पनिक हकीकती मला समजल्या. साधूबाबाने

जे काही पूर्वी माझे भविष्य माझ्या वडिलांजवळ वर्तविले होते ते हळूहळू लोकांत प्रसृत झाले. अधिकाधिक लोकांना माहीत झाले. काही भोळसर खेडवळ लोकांना तर असे वाटले की, परमेश्वराचा कोप झाल्याने एक भूत वाघाच्या रूपाने जन्माला आले आहे. ते रात्रीच्या वेळी निरनिराळी अक्राळविक्राळ रूपे धारण करते पण दिवसा एक पट्टेदार वाघ बनून झोपून राहते. आणि हा जो व्याघ्ररूप राक्षस आहे तो माझी मस्ती जिरविण्याकरिता परमेश्वराने पाठवून दिला आहे.

दुसरा असाच लोकांच्या सुपीक मेंदूतून बाहेर निघालेला तर्क की, जंगलातील प्राण्यांनी व्याघ्रदेवतेची प्रार्थना केली व तिने प्रसन्न होऊन 'राजा बेगम' रूपाने अवतार घेतलेला आहे. आणि त्या रूपाने माझा काटा काढून टाकावयाचा आहे. सर्व व्याघ्रजमात माझ्यावर उसळलेली. कोण हा असा उद्धट व्याघ्रजातीच्या मुळावर आलेला द्विपाद प्राणी! याच्या अंगावर लोकरीसारखे केस नाहीत. ज्याला सुळे दात नाहीत असा मनुष्य. ज्याला पंजाचे हत्यार आहे, ज्याचे शरीर दणदाकट आहे अशा वाघाला हा उद्धट आव्हान देतो म्हणजे काय? खेडवळ लोकांनी तर अशी बातमी उठविली की आतापर्यंत वठणीवर आणलेल्या सर्व वाघांचा रोष अगदी एकत्रित होऊन त्याने जोर धरला आहे व काही अज्ञात अशा निसर्गनियमांनुसार वाघांवर मात करणाऱ्या ह्या गर्विष्ठ माणसाचा गर्व उतरण्याची आता वेळ येऊन ठेपली आहे.

त्यात माझ्या नोकराने मला अशी खबर दिली की, ह्या मनुष्य व हिंस्र पशू यांच्या झुंजीच्या कार्यक्रमाची सारी व्यवस्था युवराजसाहेब जातीने करणार आहेत. त्यांच्या खास देखरेखीखाली एक मोठे सर्कशीचे रिंगण तयार केले गेले. त्यावर छप्पर वगैरे टाकून हवेतील धुरळा वगैरे आत घुसू नये अशी व्यवस्था झाली. आवारामध्ये हजारो प्रेक्षकांची पाहण्याची सोय केली गेली. रिंगणाच्या मध्यभागी एक भव्य लोखंडी पिंजरा ठेवला होता. त्या पिंजऱ्यामध्ये बंदोबस्ताने राजा बेगमला ठेवून दिले होते. आणि त्या पिंजऱ्याभोवती सुरक्षिततेच्या दृष्टीने आणखी एक खोली तयार करून ठेविली होती. बंदिस्त राजा बेगम सारख्या रक्त गोठवणाऱ्या आरोळ्याठोकीत, गर्जना करीत होता. त्याचा आहार मुद्दाम कमी केलेला होता; हेतू हा की, त्याला जबर भूक लागावी. कदाचित राजकुमारांनी असा बेत योजला असावा की वाघोबाला बक्षीस म्हणून आमच्या देहाची मेजवानी द्यावी!

ह्या अभूतपूर्व झुंजीची डांगोरा पिटून जाहिरात दिली गेली. शहरातल्या व आसपासच्या गावांतल्या असंख्य लोकांनी तिकिटे खरेदी केली. ज्या दिवशी झुंज होणार होती त्या दिवशी तर तिकिटे न मिळाल्याकारणाने शेकडो लोकांना परत जावे लागले. अनेकांनी तंबूच्या फटीतून आत प्रवेश करून घेतला; गॅलरीखाली, जेथे जागा मिळेल तेथे लोकांनी बसून घेतले.

आता व्याघ्रस्वामींची गोष्ट रंगात आली. आमची उत्कंठा अगदी शिगेला पोचली. चंडी तर नुसता गप्प बसला होता. व्याघ्रस्वामी पुढे सांगू लागले:

"झाले, राजा बेगमच्या गर्जनेचे आवाज सर्व आवार दणाणून सोडीत होते. लोकांची गडबड चालूच होती. काय होईल अन काय नाही म्हणून कित्येक भीतीने गांगरून गेले होते; आणि अशा गडबडीत मी रिंगणात प्रवेश केला. माझ्या कमरेभोवती वस्त्र जेमतेमच होते; माझ्या बाकीच्या शरीरावर कपडा असा नव्हता. वाघाच्या हल्ल्यापासून बचाव करावयास साधन

असे माझ्याजवळ काहीच नव्हते. पिंजऱ्याभोवती तयार करून ठेवलेल्या सुरक्षा खोलीचे दार मी उघडले आणि नंतर शांतपणे आत गेल्यावर त्याला कुलूप लावून बंद केले. वाघाला रक्ताचा वास आला. पिंजऱ्याच्या लोखंडी गजांवर, वाघोबांनी मेघगर्जनेसारख्या डरकाळ्या फोडीत, उड्या मारावयास सुरुवात केली. अशा तऱ्हेने त्याने माझे भयानक स्वागत केले. प्रेक्षकांमध्ये भीती व माझ्याबद्दल करुणा वाटू लागली. ह्या डरकाळ्या फोडणाऱ्या वन्य पशूपुढे मी म्हणजे एक कोवळे बापडे कोकरू दिसत होतो.

"एका क्षणातच मी पिंजऱ्यात आलो. पाठीमागे दार बंद करतोय तोच राजा बेगमने माझ्यावर एकदम हल्ला केला. माझा उजवा हात त्याने फाडून टाकला. माझे रक्त—मानवी रक्त—जखमांतून जोरजोराने वाहू लागले. माणसाच्या रक्ताची वाघाला मोठी चटक. मागे साधूबाबाने वर्तविलेले भविष्य खरे होण्याची वेळ येऊन ठेपली.

"असा भयंकर हल्ला अद्याप कधीही माझ्यावर झाला नव्हता. पण मी ताबडतोब सावध झालो. माझी रक्तबंबाळ झालेली बोटे लंगोटाच्या आत घालून दृष्टीआड केल्यावर मी डाव्या हाताने हाड फोडून टाकणारा एक जबरदस्त ठोसा वाघाच्या डोक्यावर ठणकावला. जनावर मागे सरले. पिंजऱ्याच्या पाठीमागच्या बाजूकडे गिरक्या घालू लागले व नंतर आचके देत देत पुढे उसळून आले. माझ्या सुप्रसिद्ध अशा जबरदस्त ठोशाने त्याच्या डोक्यावर भारी प्रहार करून ठेवला होता.

"पण राजा बेगमला एकदा माणसाच्या रक्ताची चटक जी लागली तिने त्याला अगदी वेडे करून टाकले. एखाद्या पट्टीच्या दारूबाजाला बऱ्याच दिवसांनी दारूचा घोट प्यावयास मिळावा तसे त्याला झाले. त्या पशूचे माझ्यावर जोरजोराचे हल्ले होऊ लागले. मधून मधून तो कानठळ्या बसविणाऱ्या डरकाळ्या फोडीत होता. वाघाचे पंजे व सुळे दात यांच्या हल्लापुढे टिकाव धरणे अवघड होते. माझ्या फक्त एका हाताने केलेला बचाव पुरेसा नव्हता. पण मी त्याचा बदला मात्र जबरदस्त घेतला. आम्ही दोघेही रक्तबंबाळ झालो होतो. दोघेही मरणाशीच झुंज घेत होतो. पिंजऱ्यात एकच गोंधळ उडून गेला होता. रक्ताचे फवारे सर्व दिशांनी वाहू लागले. आणि त्या पशूच्या घशातून वेदनेचे उसासे व खुनी रक्तपिपासेचे चीत्कार बाहेर पडू लागले.

"'वाघाला गोळी घाला! त्याला ठार करा!' अशा प्रेक्षकांमधून किंचाळ्या निघू लागल्या. मनुष्य व पशू इतके जलद धावत होते की रिंगणात रखवालदाराने मारलेल्या गोळीचा नेम चुकला. मी माझी सारी इच्छाशक्ती एकवटली. एक भीषण आरोळी मारली व वाघाला एक शेवटचा निकाली ठोसा ठणकावून दिला. त्याबरोबर वाघ कोसळून खाली निपचित पडला."

"अगदी पाळीव मांजराप्रमाणे!" माझ्या तोंडून उद्‌गार आले. स्वामीजी कौतुकाने मनःपूर्वक हसले आणि पुनः हकीकत सांगावयास सुरुवात केली.

"अशा तऱ्हेने राजा बेगमचा निकाल लागला. त्याचा राजन्य गर्व पुढे अजून जिरला: माझ्या रक्तबंबाळ झालेल्या हातांनी मी बेडरपणे त्याचा जबडा जबरदस्तीने उघडला. एका नाट्यपूर्ण क्षणात त्याच्या वासून उघडलेल्या जबड्यात—प्रत्यक्ष मृत्यूच्या दारात मी माझे मस्तक घातले. जवळपास एखादा साखळदंड आहे का पाहिले. खाली जमिनीवर पडलेल्या राशीमधून

एक साखळदंड काढला व वाघाला पिंजऱ्याच्या गजाशी त्याच्या मानेला साखळदंडाने बांधून टाकले आणि नंतर मोठ्या विजयश्रीने दरवाज्याकडे वळलो.

“पण राजा बेगम म्हणजे जणू भुताचाच अवतार! लोक त्याला राक्षसाचा अवतार असेच मानीत. त्याच्या ठिकाणी राक्षसाची मस्ती व कपट ह्याचे जन्मजात संस्कार होते. त्याने एकदम विलक्षण अशी झडप मारून साखळदंड पकडला व माझ्या पाठीवर उडी मारली. माझ्या खांद्याला त्याचे पंजे रुतून बसले व मी एकदम खाली कोसळून पडलो. पण एका क्षणात जोर करून त्याला माझ्या खाली घातले. आणखी जबरदस्त ठोसे लावल्यावर ते कपटी जनावर बेशुद्ध स्थितीत पुनः खाली कोसळले. ह्या वेळी त्याला मी अगदी पक्के बांधून टाकले. आणि नंतर हळूहळू पिंजऱ्यातून बाहेर आलो.

“आणि त्यानंतर लोकांमध्ये जो काही कल्लोळ उठला तो काही विचारू नका. पण या वेळी तो हर्षकल्लोळ होता. जमावातून जो काही हर्षनिनाद उसळून निघाला तो जणू एकाच अजस्र कंठातून बाहेर येत होता असे वाटले. मला भयंकर जखमा झाल्या खऱ्या, पण झुंजीच्या तीन अटी मी पुऱ्या केल्या. एक म्हणजे वाघाला बेशुद्ध केले; दुसरी अशी की, त्याला साखळदंडाने बांधून टाकले व तिसरी म्हणजे कोणाचीही मदत न घेता त्याला बांधल्यावर बाहेर पडलो. ह्याशिवाय मी त्या हिंस्र पशूला इतके जबरदस्त जखमी केले होते व घाबरवून टाकले होते की, त्याच्या जबड्यात मी माझे मस्तक घातल्यामुळे त्याला जी अनायासे शिकार मिळाली असती ती गमावल्याचे त्याला भानही राहिले नव्हते!

“माझ्या जखमांवर औषधोपचार झाल्यावर माझा मोठा सन्मान झाला. मला हारतूरे घातले गेले. माझ्या पायांवर लोकांनी सोन्याच्या मोहरा उधळल्या. साऱ्या शहरभर जणू सुट्टीचे वातावरण निर्माण झाले. इतका अवाढव्य व हिंस्र वाघ लोकांच्या पाहण्यात नव्हता. अशा वाघावर मी मात केली म्हणून जिकडे तिकडे माझ्या ह्या झुंजीचा मोठा चर्चेचा विषय होऊन गेला. ठरल्याप्रमाणे राजा बेगम मला बक्षीस दिला गेला. पण मी शेफारून गेलो नाही. माझ्या ह्रदयात एका आध्यात्मिकतेचा उदय झाला. पिंजऱ्यातून जो मी अखेरीस बाहेर पडलो तो म्हणजे मी माझ्या ऐहिक महत्त्वाकांक्षेच्या दरवाज्याची दारे जणू कायमची बंद केली असे मला वाटले.

“आणि नंतर माझ्या करूण कहाणीला सुरुवात झाली. जवळ जवळ सहा महिने रक्तविषाक्तते मुळे मी आजारी होतो. त्यातच दगावलो असतो. कुचबिहार सोडण्यापुरता जेव्हा मी बरा झालो तेव्हा तेथून निघून मी माझ्या गावी आलो.

“ज्या गुरुजीने मला धोक्याची सूचना दिली होती तो खरोखरच साधुपुरुष होता हे मला आता समजून आले. हे मी वडिलांपाशी नम्रपणे कबूल केले. अरेरे! आता पुनः मला कधी ते भेटतील काय? त्यांना भेटण्याची तळमळ मला इतकी तीव्र होती की एके दिवशी ते खरोखरीच आमच्या घरी येऊन ठेपले, अगदी अचानकपणे.

“‘आता पुरे ही वाघाशी झुंज आणि त्यांना माणसाळवायचा धंदा, त्यांनी शांतपणे माझी खात्री केली. “चल, आता माझ्याबरोबर चल. माणसाच्या मनाच्या जंगलात भटकत राहणारे अज्ञानरूपी हिंस्र पशू कसे वठणीवर आणावे हे मी तुला शिकवितो. तुला जमावाला तोंड

द्यायची सवय आहे. ते प्रेक्षक म्हणजे आता देवदूतांचा समुदाय समज आणि योगमार्गाने सिद्धी मिळवून तू त्यांना थक्क करून टाक!”

“माझ्या संतप्रकृती गुरुमहाराजांनी मला अध्यात्ममार्गाची दीक्षा दिली. माझ्या आत्म्याची दारे गंजली होती आणि बरीच वर्षे वापरण्यात न आल्यामुळे उघडत नव्हती. ती गुरुमहाराजांनी उघडून दिली. नंतर लवकरच आम्ही बरोबरच योगसाधनेच्या माझ्या शिक्षणासाठी हिमालयात गेलो.”

चंडी आणि मी स्वामीजींच्या पाया पडलो. त्यांनी आपल्या झंझावाती आयुष्याचा आम्हांला जो थोडक्यात सारांश सांगितला त्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त केली. त्या प्रशस्त दिवाणखान्यात थंडीत बराच वेळ उमेदवारी करून बसून राहिल्याचे आम्हां दोघांना भरपूर श्रेय व पारितोषिक मिळाले.

1 सोहंग हे त्यांचे संन्यासधर्मातील नाव होते. पण लोक त्यांना “व्याघ्रस्वामी” या नावानेच अधिक ओळखत.
2 “राजा बेगम” ह्या नावाचा अर्थ असा की, ह्या जनावरामध्ये वाघ व वाघीण या दोघांचे क्रौर्य एकत्रित होते.

प्रकरण - ७

# 7. लघिमासिद्ध संत

“काल रात्री एका सभेमध्ये जमिनीपासून बऱ्याच फुटांच्या अंतरावर उंच हवेत अधांतरी राहणारा असा एक योगी मी पाहिला.” माझा मित्र उपेंद्रमोहन चौधरी मला मोठ्या जोराने सांगत होता.

मला एकदम उत्साह वाटला व त्याच्याकडे पाहुन मी स्मित केले. “मला बाटतं, मला त्याचं नांव माहीत आहे. अप्पर सर्क्युलर रोडवरील भादुरी महाशय तर नव्हे ना?”

उपेंद्राने संमतिपूर्वक मान हलविली. ही बातमी ह्याला अगोदरच माहीत आहे हे कळल्याबरोबर त्याचे मन जरा खट्टू झाले. साधुसंतांबद्दल माहिती गोळा करण्याचा हा माझा उद्योग माझ्या मित्रमंडळींना नित्य परिचयाचा होता. नवीन कोठे काही माहितीचा सुगावा लागला की त्यापाठीमागे मला लावून देण्यात त्यांना मोठी मौज वाटे.

“हे योगीमहाराज आमच्या घराजवळच राहत असत आणि मी त्यांना नेहमी भेटत असे.” हे मी सांगितल्यावर उपेंद्राच्या चेहेऱ्यावर कुतूहल जागृत झाले. मी त्याला आणखी एक खास बातमी सांगितली.

“त्यांचे नाव घेण्यासारखे बरेच चमत्कार मी पाहिले आहेत. पतंजलिविहीत [1] प्राचीन अष्टांगयोगसाधनेमधील प्राणायामाचे [2] विविध प्रकार त्यांनी आत्मसात् केले आहेत. एकदा भादुरी महाशयांनी भस्रिका प्राणायामाचे प्रात्यक्षिक माझ्यासमोर इतक्या आश्चर्यकारक जोराने केले की, खरोखरीच खोलीमध्ये तुफान उत्पन्न झाल्याचा भास झाला. नंतर त्यांनी मेघगर्जनेसारखा होत असलेला श्वासोच्छ्वास थांबविला व समाधीच्या [3] परमावस्थेमध्ये ते अगदी पूर्ण निःस्तब्ध स्थितीत बसून राहिले. तुफानानंतर जी शांतता प्रस्थापित झाली तिचे तेजोवलय अगदी स्पष्ट दिसत होते. त्याची विस्मृती होणे शक्य नाही.”

“मी असे ऐकले आहे की, हे महाराज घर सोडून कधी बाहेर जात नाहीत.” उपेंद्राच्या बोलण्यात थोडा अविश्वास होता.

“हे अगदी खरे आहे! गेली वीस वर्षे ते अगदी घरातच बसून आहेत. आपल्या सणासुदीच्या प्रसंगी ते आपणच अंगीकारलेल्या शिस्तीत थोडा फरक करतात व आपल्याच घराच्या पुढील रस्त्र्यापर्यंत जातात! आणि मग तेथे भिकाऱ्यांची गर्दी जमते. भादुरीस्वामीचे औदार्य सर्वविश्रुत आहे.”

“गुरुत्वाकर्षणाच्या नियमाच्या विरुद्ध ते हवेत असे कसे अधांतरी राहतात?”

“काही विशिष्ट प्राणायामांचा अभ्यास केल्यावर योग्याच्या शरीराचे जडत्व, स्थूलत्व नाहीसे होते; व नंतर ते हवेत तरंगावयाला लागते किंवा बेडकासारखे इकडे तिकडे उड्या मारू लागते. ज्यांचा पद्धतशीर योगसाधनेचा अभ्यास झालेला असतो असे संत सुद्धा परमेश्वराच्या आत्यंतिक भक्तीच्या उमाळ्यामध्ये असेच हवेत अधांतरीजाऊ शकतात.”

“ह्या साधुमहाराजांबद्दल मला जास्त माहिती हवी आहे. त्यांच्या संध्याकाळच्या सत्संगाला तू जातोस काय?” उपेंद्राचे डोळे उत्सुकतेने चमकत होते.

“होय, मी अनेकदा जात असतो. त्यांच्या सुज्ञतेमधील विनोदाने माझी मोठी करमणूक होते. कधी कधी माझ्या बराच वेळ हसण्यामुळे सभेच्या गांभीर्यात अडथळा येतो. महाराजांना त्याचा राग येत नाही, पण त्यांचे शिष्यगण मात्र माझ्यावर डोळे वटारतात!”

त्या दिवशी दुपारी शाळेतून घरी परत येत असताना भादुरीमहाशयांच्या मठावरून गेलो व त्यांचे दर्शन घ्यावयाचे मी ठरविले. साधारण माणसाला योगीमहाराजांचे दर्शन मिळणे केवळ दुरापास्त होते. तळमजल्यावर त्यांचा एक शिष्य बसून असे, आणि तो आपल्या गुरुजींकडे जाऊ देत नसे, त्यांच्या एकांतामध्ये व्यत्यय आणू देत नसे. ह्या शिष्याची शिस्त मोठी कडक होती. आम्ही तेथे गेल्यावर त्याने आम्हांला विचारले की, “तुम्हांला त्यांनी भेटायची काही वेळ दिली आहे काय?” आणि इतक्यात त्याच्या गुरूने सहज नेमके डोकावून पाहिले आणि आमची हकालपट्टी वाचली.

“मुकुंदाला वाटेल तेव्हा येऊ द्या.” आणि साधुमहाराजांचे डोळे चमकले. “माझे एकांताचे नियम मी माझ्याकरिता केलेले नसून इतरांकरिता केलेले आहेत. संसारी माणसांना त्यांचा भ्रमनिरास करणारा स्पष्टपणा आवडत नाही. असे साधू नुसते दुर्मिळच नव्हेत तर ते लोकांना बेचैन करतात. धर्मशास्त्रात सुद्धा त्यांचे वर्णन गोंधळात टाकणारे असते!”

भादुरीमहाशयांच्या पाठोपाठ मी वरच्या मजल्यावर असलेल्या त्यांच्या खोलीत गेलो. तेथून ते क्वचितच बाहेर पडत. काही महात्मे जगाच्या अवडंबराकडे दुर्लक्ष करतात. हे अवडंबर युगायुगातून साचत साचत येऊन केंद्रित झालेले असते. महात्म्यांचे वर्तन ह्याच्या विरुद्ध असते. ह्या महात्म्यांच्या बाबतीत त्यांचे समकालीन लोक म्हणजे केवळ अगदी त्याच काळात वावरणारे लोक नव्हेत.

“महर्षी, माझ्या जाणीवेत सदैव घरातच राहणारे आपण पहिलेच योगी आहात.”

“परमेश्वर कधी कधी अनपेक्षित अशा भूमीमध्ये साधुजनांना जन्मास घालतो. नाहीतर त्याच्या पाठीमागे एका विशिष्ट नियमाची उपाधी लावून दिली असती!”

महर्षींनी आपले कंपायमान शरीर पद्मासनामध्ये स्थिर केले. त्यांचे वय सत्तरीपर्यंत येऊन पोचले होते; तरीपण त्यांच्या शरीरावर वार्धक्याची छटा नव्हती की ते बैठे आयुष्य व्यतीत करीत असावेत असेही चिन्ह दिसत नव्हते. शरीराने धडधाकट व देहयष्टी सरळ असे त्यांचे आदर्श व्यक्तित्व होते. प्राचीन ग्रंथांमध्ये वर्णिलेल्या ऋषींसारखी त्यांची मुद्रा होती. चेहरा भव्य व भरपूर दाढी असलेला, बैठक ताठ आणि शांत असे नेत्र सर्वव्यापी परमेश्वराच्या ठिकाणी केंद्रित केलेले दिसत.

साधुमहाराज व मी दोघे ध्यानाला बसलो. साधारण तासाभराने त्यांनी मृदू आवाजाने मला हाक मारली.

“तू पुष्कळदा ध्यान लावून बसतोस पण तुला अनुभव [4] म्हणून काही आहे काय?” ध्यान लावण्यापेक्षा ईश्वराला अधिक प्रेम कर असे त्यांना मला सांगावयाचे होते. “साधनेला साध्य समजण्याची चूक करू नकोस.”

त्यांनी मला खायला काही आंबे दिले. त्यांचा स्वभाव जरा गंभीर होता तरी त्यांच्या विनोदी बोलण्याच्या पद्धतीमुळे त्यांचा सहवास मला सुखावह झाला. ते म्हणाले, “साधारणपणे लोकांना ध्यानयोगापेक्षा (ईश्वराशी सारूप्य) जल-योगच (खाद्य पदार्थांशी सारुप्य) अधिक पसंत पडतो.”

त्यांची ही योगिक कोटी ऐकून मला हसू आवरेनासे झाले.

“काय हास्य आहे तुझे!” त्यांच्या दृष्टीमध्ये एकदम प्रेमळपणाची झाक आली. त्यांची स्वतःची मुद्रा नेहमी गंभीर असायची पण त्यात समाधीचे स्मित मंदरूपाने असायचे. त्यांच्या कमळासारख्या विशाल डोळ्यांमध्ये एक तऱ्हेचे सुप्त दिव्य हास्य दिसून येत असे.

“दूर अमेरिकेतून ती पत्रे येतात.” असे म्हणून साधुमहाराजांनी टेबलावर पडलेल्या जाड जाड पाकिटांकडे बोट दाखविले. “योगशास्त्राची ज्यांना आवड आहे अशा लोकांच्या काही थोड्या संस्था आहेत त्यांच्याशी माझा पत्रव्यवहार चालतो. त्यांना भारत देशाचा नवीनच शोध लागत आहे. कोलंबसाने जो शोध लावला त्याच्यापेक्षा अधिक योग्य दिशेने! त्यांना मदत करण्यात मला आनंद वाटतो. योगविषयक ज्ञान हे सूर्यप्रकाशाप्रमाणे ज्याला पाहिजे असेल त्याला मुक्त आहे.

“मानवाच्या मुक्तीकरिता ज्या गोष्टी ऋषींना आवश्यक वाटल्या त्या पाश्चिमात्यांकरिता सोयीच्या करणे योग्य होणार नाही. योगाभ्यासाची एक प्रकारची शिस्त जर पाळली गेली नाही तर पूर्व काय किंवा पश्चिम काय, कोणीही त्यात प्रगती करू शकणार नाही. आत्मा हा तसे पाहिले तर त्यावरील बाह्य अशी विविध आवरणे सोडून दिल्यास एकच आहे.”

साधुमहाराजांनी माझ्याकडे प्रशान्त नजरेने पाहिले. त्यांचे हे बोलणे म्हणजे गर्भितार्थाने भविष्यकथनच होते. त्यात मार्गदर्शनही होते. आता मी हे लिहीत आहे त्या वेळी या त्यांच्या सहजगत्या पण वारंवार काढलेल्या सूचक उद्गारांचा पुरा अर्थ मला समजत आहे की केव्हा तरी मी भारताचे तत्त्वज्ञान अमेरिकेपर्यंत नेऊन पोचविणार आहे.

“महर्षी, जगाच्या कल्याणाकरिता योगावर आपण एखादे पुस्तक लिहावे असे मला वाटते.”

“मी शिष्यांना तयार करीत आहे. ते शिष्य आणि त्यांची परंपरा म्हणजे चालते-बोलते ग्रंथच होत. त्यांच्याकरवी जे योगाचे ज्ञान प्रसृत होईल त्यास कालाची नैसर्गिक बाधा लागणार नाही की टीकाकारांची अनैसर्गिक टीका त्या ज्ञानाचे स्वरूप विकृत करणार नाही.”

संध्याकाळी त्यांचे शिष्य येईपर्यंत मी योगीमहाराजांच्या जवळ एकटाच होतो. भादुरीमहाशयांनी अद्वितीय असेच प्रवचन दिले. ज्याप्रमाणे शांतपणे वाहणारा प्रवाह आजूबाजूची घाण आपल्याबरोबर वाहून नेतो, त्याप्रमाणे त्यांच्या भाषणाच्या ओघाने श्रोत्यांच्या मनातील किल्मिषे, शंकाकुशंका वाहून नेऊन श्रोत्यांना परमेश्वराच्या मार्गास लाविले. ह्या चित्तवेधक उपदेशपर गोष्टी त्यांनी बंगाली भाषेमध्ये अगदी बिनचूक सांगितल्या.

त्या दिवशी संध्याकाळी भादुरींनी मीराबाईच्या जीवनातील काही तत्त्वज्ञानविषयक मुद्दयांचे विवरण केले. मीराबाई ही एक राजपूत राजकुमारी होती. तिने सत्संग जोडण्याकरिता राजवैभवाचा त्याग केलेला होता. एकदा असे झाले की, एक मोठे संन्यासी, सनातन गोस्वामी तिला दर्शन देण्यास कबूल होईनात. का, तर ती स्त्री होती म्हणून, तिने असे प्रत्युत्तर दिले

की, संन्यासीमहाराज तिच्या पायाशी नम्र होऊन आले. ती म्हणाली, “महाराजांना जाऊन सांगा की या साऱ्या विश्वात परमेश्वराखेरीज दुसरा कोणी पुरुष आहे हे मला माहीत नाही. आपण सर्व त्याच्यापुढे स्त्रियाच नव्हेत काय?” (श्रुतीनुसार परमेश्वर म्हणजे एकमेव निश्चित सर्जक तत्त्व होय; आणि त्याने निर्मिलेली सृष्टी म्हणजे निष्क्रिय माया).

मीराबाईने भावनापूर्ण अशी अनेक गीते, भजने केली आहेत. ती अद्याप भारतात लोकांच्या तोंडी आहेत. त्यांपैकी एक गीत खालीलप्रमाणे:

“प्रेम लगाना चाहिये, मनुवा, प्रीत लगाना चाहिये।
नित नहानेसे हरि मिले तो मैं जलजंतू होई।
फल मूल खाके हरि मिले तो बहुत मृगी अजा।
माला जपनेसे हरि मिले तो मैं जपूँ बहुत माला।
पत्थर पूजे हरि मिले तो मैं पूजूँ पहाड़।
दूध पीनेसे हरि मिले तो बहुत वत्स बाला।
नारी छोडके हरि मिले तो बहुत रहे हैं ख़ोजा।
मीरा कहे बिना प्रेमसे ना मिले नंदलाला।”

भादुरीमहाशय समाधी लावून बसत त्या वेळी काही विद्यार्थी बाजूला पडलेल्या त्यांच्या पादत्राणांत पैसे ठेवून जात. भारतात अशा तऱ्हेने दक्षिणा देण्याची पद्धत आहे. याचा अर्थ असा की, भक्त आपली भौतिक मालमत्ता गुरुच्या चरणाशी अर्पण करीत आहे. कृतज्ञ मित्र म्हणजे अन्य रूप धारण केलेला परमेश्वरच आणि तो स्वतःच आपला योगक्षेम चालवितो.

“गुरुजी, मोठे आश्चर्य आहे!” एक शिष्य निरोप घेण्यापूर्वी पितृवत्सल अशा त्या महर्षींकडे औत्सुक्यपूर्ण दृष्टीने पाहत होता. “आपण आपल्या संपत्तीचा व सुखी संसाराचा परमेश्वराच्या शोधार्थ व आम्हांसारख्यांस बोध करण्याकरिता त्याग केलेला आहे!” भादुरीमहाशयांनी अगदी लहानपणीच, योगमार्गावर अगदी एकचित्तपणे पदार्पण करण्यापूर्वी आपल्या वडिलार्जित धनदौलतीचा त्याग केला होता हे सर्वविश्रुत होते.

“मला हे तुझे बोलणे उलटेच वाटते.” गुरुमहाराजांच्या मुद्रेवर उपहासाची किंचित छटा होती. “अनंत अशा परमानंदाच्या प्राप्तीकरिता थोड्याशा पैशावर व थोड्याशा सुखावर मी पाणी सोडले ह्यात मी काय मोठा त्याग केलेला आहे? ह्या दौलतीच्या उपभोगाच्या आनंदात मी सहभागी होत आहे. ह्याला त्याग म्हणायचे का? संकुचित दृष्टीचे संसारी लोकच खरे त्यागी होत! ते मूठभर अशा ऐहिक खेळण्याकरिता अप्रतिम अशा दैवी दौलतीचा त्याग करतात!”

त्यागाच्या ह्या विरोधात्मक दृष्टिकोणाचे विवेचन ऐकून मी गालातल्या गालात हसलो— म्हणजे क्रोससची टोपी एखाद्या वैराग्याच्या डोक्यावर ठेवण्याचा आणि गर्वांध अशा कोट्यधीशांना त्यांना कल्पना नाही अशा तऱ्हेने हुतात्म्यांच्या पदवीला नेऊन बसविण्याचा प्रकारच की!


“दैवी शक्ती ही आपले भविष्य कोणत्याही विमा कंपनीपेक्षा अधिक सुज्ञपणे घडवीत असते.” गुरुमहाराजांचे हे समारोपात्मक शब्द त्यांच्या मार्गाच्या अनुभूतीचा अभिप्राय दर्शवीत होते. जग हे बाह्यात्कारी सुरक्षित दिसणाऱ्या गोष्टीवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांनी भरलेले

आहे. त्यांचे कटू विचार म्हणजे त्यांच्या कपाळावरील जखमांच्या व्रणाप्रमाणे होत. जो आपल्या पहिल्या श्वासापासून हवा व दूध पुरवीत असतो, तोच आपल्या भक्ताची दररोजची सोय कशी करावी हे जाणतो."

शाळा सुटल्यानंतर ह्या महर्षींच्या दारी जाण्याची वारी मी पुढे चालू ठेविली. एका शांत उत्साहाने त्यांनी मला अनुभव घडवून आणण्यात मदत केली. एके दिवशी ते आमच्या गडपार रोडवरील घरापासून दूर राममोहन रॉय रोडवर राहावयाला गेले. त्यांच्या लाडक्या भक्तांनी त्यांना 'नागेंद्र मठ' [5] नावाचा एक आश्रम बांधून दिला.

आता कथानुसंधानाच्या दृष्टीने मी बरीच वर्षे पुढे जात आहे. अमेरिकेस जाण्यापूर्वी थोडे दिवस अगोदर मी भादुरी महाशयांना भेटलो होतो व त्यांच्यापुढे दंडवत घालून प्रयाणापूर्वी त्यांचा आशीर्वाद मागितला त्या वेळी ते जे मला म्हणाले ते त्यांचे अखेरचे शब्द मी पुढे देत आहे:

"बेटा, जा, अमेरिकेला जा. ह्या अतिप्राचीन अशा भारत देशाची प्रतिष्ठा बरोबर घेऊन जा. तुला ती ढालीसारखी उपयोगी पडेल. तुझ्या ललाटावर विजयाचे चिन्ह आहे. दूरवरचे तेथील उदारहृदयी लोक तुझे योग्य ते स्वागत करतील."



*नागेंद्रनाथ भादुरी*
*"लघिमासिद्ध संत"*

1 योगशास्त्रावरील अग्रेसर असा पुरातनकालामधील भाष्यकार.

2 श्वास-प्रच्छ्वासाचे नियमन करून प्राण निरोध करण्याच्या पद्धती. भस्रिका प्राणायामाच्या (भात्यासारख्या) अभ्यासाने मनास स्थैर्य प्राप्त होते.

3 १९२८ साली सोबेनीचे प्रोफेसर ज्यूल्स-बोईस यांनी असे निवेदन केले होते की, फ्रेंच मानसशास्त्रज्ञांनी अतींद्रिय ज्ञानाच्या संबंधात संशोधन केलेले आहे व समाधीच्या अवस्थेला मान्यता दिली आहे. ही जी समाधिअवस्था भव्यतेच्या व उत्कटतेच्या दृष्टीने "फ्रॉईडच्या अर्ध-जागृत मनाच्या अवस्थेच्या अगदी विरुद्ध टोकावरील आहे; अणि त्यामुळेच मनुष्य हा खऱ्या अर्थाने मनुष्य आहे. नुसताच केवळ उच्च कोटीचा प्राणी नाही." ह्या फ्रेंच शास्त्राज्ञाने पुढे असे स्पष्ट करून सांगितले आहे की, ही अतींद्रिय मनाची जागृती म्हणजे काही गाढ निद्रावस्था किंवा संमोहनावस्था नव्हे. तत्त्वज्ञानशास्त्राने अतींद्रिय मनाचे अस्तित्व फारच पुरातन कालापासून मान्य केलेले आहे. ह्या मनाला यथार्थपणे इमर्सनने अधि-आत्मा या संज्ञेने संबोधिलेले आहे. परंतु शास्त्रज्ञांनी अगदी अलीकडेच ह्या मनाच्या अवस्थेला तत्त्वतः मान्यता दिलेली आहे.

"द ओवर सोल" मध्ये इमर्सन लिहितो, "हा अधि-आत्मा म्हणजे जणू एखाद्या मंदिराचे प्रवेशद्वार आहे. त्या मंदिरामध्ये सर्व सुज्ञता व सर्वरूप कल्याणप्रदता वास करीत असते. मनुष्य खातो; पितो, रोपण करतो, मोजतो व अशा तऱ्हेने वर्तणाऱ्या मनुष्याला साधारणपणे आपण मनुष्य म्हणतो. पण अशी कार्ये करणारा खरा मनुष्य नव्हे. ही कार्ये करताना तो आपले खरे स्वरूप दर्शवीत नाही; अशा मनुष्याला आपण मान देत नाही. आपण ज्याला मान देतो तो त्या मनुष्यामध्ये वास करणाऱ्या आत्म्याला देतो. मनुष्य आपल्या कर्मेंद्रियांच्या करवी आपल्या आत्म्याचे अस्तित्व प्रकट करतो, आणि त्याला आपण मानतो. अधि-आत्म्यामध्ये वास करणारे आत्मिक गांभीर्य व ईश्वरी गुणधर्म यांच्या आविष्कारापुढेच आपण नतमस्तक होत असतो."

4 प्रत्यक्ष ईश्वर-दर्शन.

5 त्यांचे संपूर्ण नाव नागेन्द्रनाथ भादुरी.

काही ख्रिस्ती संत-महात्मे सुद्धा अधांतरी राहू शकत असत. त्यांमध्ये १७ व्या शतकातील कूपर्टिनोच्या सेंट जोसेफचे नाव प्रख्यात आहे. त्याने करून दाखविलेले चमत्कार पुष्कळांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेले आहेत. सेंट जोसेफ याला ऐहिक गोष्टीचे विलक्षण विस्मरण असे. पण खरोखरी पाहता ते विस्मरण म्हणजे पारलौकिक गोष्टींची पुनः आठवण होण्याच्या प्रकारचे होते. मठामधील त्याचे बंधू त्याला जेवण्याखाण्याच्या टेबलापाशी येऊ देत नसत. कारण की, एखादे वेळी कपबशा घेऊन भिंतीवरून वर चढत जायचा. हा महात्मा ऐहिक कर्तव्ये पार पाडण्यास अशाच विलक्षण पद्धतीने अपात्र होता. कारण तो जमिनीवर फार वेळ ठरतच नसे. समोर एखादा साधुसंताचा पुतळा दिसला न दिसला की हा महात्मा एकदम वर अधांतरी चढूच लागायचा आणि मग हवेत हे दोन संत. एक दगडाचा आणि दुसरा हाडामांसाचा जिवंत. दोघे एकमेकांच्या गळ्यात गळा घालून बसावयाचे.

आव्हिला या ठिकाणची सेंट थेरेसा हिची आध्यात्मिक उन्नती तर फारच प्रगत झालेली होती. तिला अधांतरी वरवर चढत जाणे जरा त्रासदायक होई. तिच्या पाठीमागे मठाच्या कारभाराची मोठी जबाबदारीची कामे असायची; आणि तिला हे 'ऊर्ध्वगमनाचे' प्रसंग मोठ्या कष्टाने टाळता येत. तिने लिहून ठेवलेले आहे की, "थोडीफार काळजी घेऊन काही उपयोग होत नसे. कारण प्रभूची इच्छा कधी कधी वेगळीच असायची." सेंट थेरेसाचे शव स्पेनमध्ये आल्बा या गावी एका चर्चमध्ये ठेवलेले आहे. आज चारशे वर्षे झाली, ते अजून जसेच्यातसेच आहे अजून तेथे चमत्कार होतात. फुलांचा मनस्वी सुगंध सभोवार भरून राहतो. ज्या ठिकाणी हे शव ठेवलेले आहे त्या ठिकाणी सुद्धा अनेक चमत्कार घडून आलेले आहेत.

प्रकरण - ८

# 8. भारताचे महान शास्त्रज्ञ, जगदीशचंद्र बोस

"जगदीशचंद्र बोस यांनी बिनतारी शोध मार्कोनीच्याही अगोदर लावले होते."

काही प्राध्यापक मंडळी शास्त्रीय चर्चा करीत रस्त्र्याच्या कडेने जात होती. त्यांच्या तोंडून वरील धाडसाचे उद्गार ऐकल्यावर मी जरा त्यांच्याचजवळून चालू लागलो. त्यांच्या चर्चेत भाग घेण्यात जर माझा जात्यभिमान असेल तर त्याबद्दल मी दिलगीर आहे. भारताला केवळ अध्यात्मातच नव्हे तर पदार्थविज्ञानशास्त्रात सुद्धा अग्रेसर राहता येते, हे सप्रमाण सिद्ध करण्याच्या बाबतीत मला फार कुतूहल होते, हे मी कबूल करतो.

"म्हणजे आपले म्हणणे तरी काय, साहेब?"

प्राध्यापकांनी मेहेरबानी करून आपले म्हणणे स्पष्ट केले. ते म्हणाले, "बिनतारी संयोजक व विद्युल्लहरींचे वक्रीभवन दर्शविणारे यंत्र बोस यांनीच प्रथम शोधून काढले. पण ह्या भारतीय शास्त्रज्ञाने आपल्या शोधाचे बाजारी मूल्यमापन केले नाही. त्यांनी अल्पावधीतच आपल्या संशोधनाची दिशा निर्जीव जगताकडून सजीव जगताकडे वळविली. वनस्पतिशास्त्रातील त्यांचे क्रांतिकारक शोध पदार्थविज्ञानशास्त्रातील त्यांच्या मूलगामी शोधाहूनही वरचढ आहेत."

या खुलाशाबद्दल मी त्यांचे सौजन्यपूर्वक आभार मानले. ते आणखी असे म्हणाले. "ते विख्यात शास्त्रज्ञ प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये माझे सहाध्यापक आहेत."

दुसऱ्याच दिवशी मी ह्या महर्षींच्या घरी गेलो. त्यांचे घर आमच्या घराजवळच होते. दुरूनच का होईना पण माझ्या मनात त्यांच्याबद्दल बरेच दिवस आदर होता. गंभीर मुद्रेच्या सेवानिवृत्त झालेल्या त्या वनस्पतिशास्त्रज्ञांनी माझे सौजन्यपूर्वक स्वागत केले. त्यांचे वय पन्नाशीच्या आसपास असावे. त्यांचे व्यक्तिमत्त्व रुबाबदार असून शरीराने ते सुदृढ होते. त्यांचा केशभार विपुल असून भालप्रदेश विशाल होता; आणि डोळ्यांमध्ये स्वप्नाळू झाक होती. त्यांच्या आवाजातील अचूकपणा त्यांच्या आजीव शास्त्रीय सवयींचा निर्देशक होता.

"पश्चिमेकडील शास्त्रीय संस्थांच्या परीक्षणाच्या मोहिमेवरून मी नुकताच परत आलो आहे. जीवमात्रामधील [1] अभेद्य अशी एकता दर्शविणारे जे यंत्र मी शोधून काढले आहे त्या यंत्राच्या बाबतीत त्या संस्थांच्या सभासदांनी फार कुतूहल दर्शविले. बोस क्रेस्कोग्राफ एका कोटीच्या पटीचे विशालत्व दाखवू शकते; पण या यंत्राने जीवशास्त्रातील संशोधनाला एक चैतन्य आणून दिले आहे. क्रेस्कोग्राफच्या शोधाने निरीक्षणाला अमर्याद क्षेत्र खुले करून दिले आहे."

"व्यक्तिनिरपेक्ष अशा शास्त्रीय ज्ञानाच्या बाहूंनी पूर्व व पश्चिम यांचे मिलन सत्वर घडवून आणण्याच्या बाबतीत आपण पुष्कळच कार्य केले आहे, साहेब!"

"माझे अध्ययन केंब्रिजला झाले. सगळे सिद्धान्त काटेकोर प्रयोगपद्धतीने तपासून घेऊन मगच ते मानणे ही पाश्चिमात्यांची पद्धत किती प्रशंसनीय आहे! ही प्रायोगिक पद्धत व

आम्हां पौर्वात्यांचा जणू जन्मजात वारसा असलेले अंतर्निरीक्षणाचे वरदान ह्या दोन्ही गोष्टी एकत्र आलेल्या आहेत. ह्या दोन्ही साधनांचा उपयोग करून आतापर्यंत काहीही संदेश जेथून मिळू शकला नाही अशा निसर्गाच्या राज्यातील रहस्ये मी उघडी करून दाखविली आहेत. माझ्या क्रेस्कोग्राफच्या [2] मदतीने तयार केलेले बोलके तक्ते हे वनस्पतींमध्ये सुद्धा भावनाशील मज्जासंस्था असून त्यांना सुद्धा विविध प्रकारच्या भावना आहेत हे अगदी शंकेखोर माणसांना सुद्धा सप्रमाण सिद्ध करून दाखवितात. प्राण्यांच्याप्रमाणे वनस्पती सुद्धा प्रेम, द्वेष, आनंद, भीती, सुख, दुःख, क्रोध, मोह आणि अशाच दुसऱ्या असंख्य भावनांच्या बाबतीत तितक्याच व्यापक प्रमाणात संवेदनाशील आहेत."

"प्रोफेसरसाहेब, आपण संशोधन करण्यापूर्वी सर्व सृष्टितील जीवमात्रामध्ये एक विलक्षण प्रकारचे वाहणारे कंपनात्मक जीवन म्हणजे केवळ कविकल्पनाच होती. माझ्या माहितीतला एक साधुपुरुष कधीच फुले तोडीत नसे. तो म्हणे, 'गुलाबाचे फूल—त्या झाडाच्या सौंदर्याच्या गर्वाचे प्रतीक जणू—मी त्या झाडापासून हिरावून घेऊ काय? मी अशा उद्दामपणाने त्याचा ठेवा हिरावून घेऊन त्याच्या मोठेपणाच्या अभिमानाला डिवचू काय?' त्या साधूचे हे सहानुभूती व्यक्त करणारे शब्द आपण आपल्या संशोधनाने शब्दशः खरे करून दाखविले आहेत."

"कवीला सत्य कळलेले असते. पण शास्त्रीय संशोधक तेच ओबडधोबड पद्धतीने शोधून काढतो. तू एखादे दिवशी माझ्या प्रयोगशाळेत ये आणि क्रेस्कोग्राफची असंदिग्ध प्रमाणसिद्धता पाहून घे."

कृतज्ञतापूर्वक मी आमंत्रण स्वीकारले आणि तेथून निघालो. त्यानंतर काही दिवसांनी मला कळले की, ते वनस्पतिशास्त्रज्ञ प्रेसिडेन्सी कॉलेज सोडून गेले व ते कलकत्त्याला एक संशोधन केंद्र स्थापन करण्याच्या विचारात आहेत.

ज्या वेळी बोस इन्स्टिट्यूटचे उद्घाटन झाले, त्या वेळी प्रतिष्ठापनेच्या समारंभाला मी गेलो होते. आवारामध्ये शेकडो उत्साही लोक इकडेतिकडे हिंडत होते. शास्त्रीय ज्ञानाच्या त्या अभिनव केंद्रामध्ये जे कलाकौशल्य व जी आध्यात्मिक प्रतीकता मला आढळून आली त्यामुळे मी मुग्ध झालो. त्या केंद्रगृहाचे महाद्वार हे एका दूर ठिकाणच्या शतकापूर्वीच्या मंदिराच्या अवशेषांपासून तयार केलेले होते. कमळाकार [3] कारंजाच्या पाठीमागे हातात दीपज्योत धरलेली अशी एक स्त्रीची प्रतिमा होती. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला एक अमर ज्योतिशिखाधारी म्हणून जे आदरणीय स्थान आहे त्याची ही प्रतिमा द्योतक होती. बागेमध्ये एक लहानसे मंदिर होते व ते ह्या दृश्य जगतापलीकडील नितान्तशुद्ध अशा बुद्धिनिष्ठ अंतर्ज्ञानाला अर्पण केलेले होते. व्यासपीठावर कोणत्याही प्रकारची मूर्ती नव्हती. त्यामुळे मनामध्ये दिव्यात्मक अशा निराकार स्वरूपाचाच विचार येई.

ह्या संस्मरणीय प्रसंगी बोस यांचे जे भाषण झाले ते प्राचीन कालातील एखाद्या आत्मज्ञानी ऋषि-मुनीच्या मुखातून निःसृत झालेले वाटले.

ते म्हणाले, "मी ही संस्था केवळ एक प्रयोगशाळा म्हणून नव्हे तर एक मंदिर म्हणून आज अर्पण करीत आहे." त्यांचे आदरणीय व्यक्तिमत्व व मुद्रेवरील गांभीर्य हे त्या सभागृहातील

जमलेल्या श्रोतृवृंदावर जणू एक अदृश्य शालीप्रमाणे नकळत पसरल्यासारखे भासमान होत होते.

ते पुढे म्हणाले, "संशोधन चालू ठेवल्यावर मी अकल्पितपणे पदार्थविज्ञान व इंद्रियविज्ञान या दोन शास्त्रांच्या सीमेपर्यंत येऊन पोचलो आणि मला आश्चर्य असे वाटले की, ही सीमारेषा हळूहळू पुसट होत जात आहे. सजीव व निर्जीव सृष्टीच्या सीमारेषेवर अनेक स्पर्शबिंदू असलेले माझ्या दृष्टोत्पत्तीस आले. "निर्जीव सृष्टी ही आत्तापर्यंत पूर्णतया जड मानली जात असे. पण आता तिच्यावर विविध प्रेरणांचे कार्य सुरू झाल्यावर तिच्यातही संवेदनशीलता जागृत होऊ लागल्याचे दिसून आले.

"खनिज धातू, वनस्पती व प्राणी यांना एका समान गुणधर्मांच्या कक्षेखाली आणावेत अशी एक प्रतिक्रियात्मक विचारसरणी सर्वत्र पसरू लागली. ह्या सर्व सृष्ट पदार्थांच्या बाबतीत थकावट व मांद्य येत असल्याचे आढळून आले व त्याचप्रमाणे मृतावस्थेतील कायमची संवेदनाशून्यता— ह्याही गोष्टी आढळून येण्याची शक्यता वाटू लागली. अशा तऱ्हेचे हे अजब सरसकट विधान मला आश्चर्याचे व धाडसाचे वाटून व तितकीच एक मोठी आशा मनात बाळगून मी माझ्या प्रयोगांनी दाखवून दिलेले विविध परिणाम रॉयल सोसायटीपुढे निवेदन केले. परंतु तेथे हजर असलेल्या इंद्रियविज्ञानशास्त्रज्ञांनी मला असे सुनावले की, मी फक्त विज्ञानशास्त्राबद्दलच बोलावे, कारण त्याच प्रांतात माझे म्हणणे खरे ठरणारे होते व संशोधनाची त्यांची अशी जी खास दालने त्यांमध्ये मी अतिक्रमण करू नये. नकळत मी एका अपरिचित ज्ञातिसंस्थेच्या मिरासदारीमध्ये घुसत होतो. आणि त्यामुळे माझ्या हातून त्यांच्या शिष्टाचाराचा उपमर्द घडला.

"त्यांच्या मनामध्ये अजाणतेपणे अज्ञानालाच श्रद्धा मानणारी अशी एक धार्मिक बैठक होती. ज्या परमेश्वराने आपल्यासभोवती सतत उत्क्रान्त होत असलेल्या सृष्टीचे गूढ निर्माण केले आहे त्यानेच आपणामध्ये चिकित्सा करण्याची व शंकांचे समाधान करून घेण्याची इच्छाही निर्माण केलेली आहे. आपले म्हणणे दुसऱ्यांना ताबडतोब पटवून देता येत नाही, इतर संशोधकांना ते पटवून देण्यास अनेक वर्षे लागतात. तोपर्यंत शास्त्रीय ज्ञानाच्या साधकास दीर्घकाल अनिवार्यपणे सारखे झगडावे लागते. लाभ, हानी, जय, पराजय यांचा विचार न करता आपले आयुष्य त्याला ह्या सिद्धीसाठी खुशीने अर्पण करावे लागते.

"काही कालाने प्रमुख अशा जगातील शास्त्रीय संस्थांनी माझे सिद्धान्त व माझ्या प्रयोगांचे निष्कर्ष मान्य केले व शास्त्रीय ज्ञानाच्या अभ्यासाच्या बाबतीत भारताने जो हातभार लावला त्याचे महत्त्व ओळखले. कोणती लहान किंवा मर्यादित स्वरूपाची गोष्ट भारताचे समाधान करू शकेल? एका अखंडित व जिवंत, अशा परंपरेला अनुसरून आणि पुनरुज्जीवनाच्या एका अतुल शक्तिसामर्थ्याने ह्या देशाने अनेक स्थित्यंतरांमधून जाऊन पुनरपी आपल्या स्वतःस कालानुरूप व स्थितीनुरूप जुळवून घेतलेले आहे. सत्वर मिळणाऱ्या व लोभनीय अशा बक्षिसांचा लोभ बाजूला सारून, जीवनाची अत्युच्च मूल्ये साध्य करण्यासाठी भारतीय नेहमी प्रयत्नशील राहिलेले आहेत. आणि हे प्रयत्न निष्क्रिय संन्यासमार्गी नसून सक्रिय संघर्षाचे होते. ज्या संशोधकांनी हा संघर्ष टाळला त्यांना काहीच मिळाले नाही. त्याग करण्यासारखे आणखी त्यांच्याजवळ काही नव्हतेच. ज्याने प्रयत्नांची

कास सोडली नाही व जो शेवटी विजयी ठरला त्यानेच आपल्या यशस्वी अनुभवांची फळे प्रदान करून जगास समृद्ध केले आहे.

“बोस प्रयोगशाळेत आजवर वस्तुमात्राची प्रक्रिया व वनस्पतींच्या जीवनामधील अनपेक्षितपणे प्रकट झालेले ज्ञान यांवर जे संशोधन झाले त्यायोगे पदार्थविज्ञानशास्त्र, इंद्रियविज्ञान, वैद्यक, कृषिशास्त्र व मानसशास्त्र अशा विविध शास्त्रांमधील अनेक विस्तृत दालने सखोल अभ्यासासाठी खुली करून ठेविली आहेत. ज्या समस्यांचे उकलन आजवर दुरापास्त ठरलेले होते त्या आता प्रायोगिक संशोधनाच्या कक्षेत आणून ठेवल्या आहेत.

“पण उच्च प्रतीचे यश हे सहजासहजी साध्य होत नाही. त्याला कडक शिस्त पाळावी लागते. आणि याकरिताच ह्या प्रवेशद्वाराशी असलेल्या दालनात तुमच्यापुढे आज अतिसंवेदनशील अशा उपकरणांची ही लांबलचक फौज आणि माझ्या साच्यानुसार तयार केलेली प्रयोगसामग्री ह्या पेट्यांमध्ये मांडून ठेवलेली आहे. ही प्रयोगसामग्री व साधने तुम्हांला आमच्या दीर्घ प्रयत्नांची, अविरत श्रमांची, चिकाटीची आणि मानवी मर्यादांपलीकडे जाण्यात दाखविलेल्या चातुर्याची कहाणी सांगतील. दीर्घ प्रयत्न अशाकरिता की, ही जी फसवी भासमान दृश्ये आहेत त्यांपलीकडे जाऊन सत्य काय आहे, ज्याचा आजवर पत्ता लागला नाही ते शोधून काढावे म्हणून. सर्व संशोधक शास्त्रज्ञांना माहीत असते की खरी प्रयोगशाळा म्हणजे माणसाचे मन; जेथे मायेच्या पलीकडे जाऊन सत्याचे अबाधित नियम ते शोधून काढतात.

“या ठिकाणी केले जाणारे व्याख्यान हे केवळ अगोदर मिळविलेल्या ज्ञानाची पुनरुक्ती नाही करणार. ते नवीन संशोधन पुढे मांडतील. ते ह्या सभागृहामध्ये प्रथमच प्रयोगांद्वारा दाखविले जाईल. ही संस्था जे कार्य करील त्याची निवेदनपर प्रकाशने नियमितपणे काढण्यात येतील. आणि हे भारतीय संशोधकांचे शोध साऱ्या जगभर माहीत होतील. हे शोध म्हणजे सार्वजनिक धन होय. त्यांची पेटंट्स (खास परवाने) घेतली जाणार नाहीत. आपल्या राष्ट्रीय संस्कृतीचा गाभा असा आहे की, जे ज्ञान प्राप्त करून घेतले आहे त्याचा वैयक्तिक स्वार्थाकरिता उपयोग करण्याच्या भ्रष्टाचारापासून आपण मुक्त, अलिप्त असावे.

“आणखी माझी अशी इच्छा आहे की, शक्यतोकरून सगळ्या देशांतील संशोधकांना ह्या संस्थेत काम करावयास संधी मिळावी. ह्या बाबतीत मी आपल्या देशाची परंपराच पुढे चालवीत आहे. सुमारे पंचवीस शतकांपूर्वी भारत देशातील नालंदा आणि तक्षशिला येथील विद्यापीठांनी जगाच्या सर्व भागांतील विद्वानांचे स्वागत केले होते.

“आता शास्त्रीय ज्ञान हे पौर्वात्य किंवा पाश्चिमात्य यांपैकी कोणाचीही मिरासदारी नव्हे. व्यापकतेच्या दृष्टीने ते आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आहे. पण असे असले तरी त्यात विशेष हातभार [4] लावण्यास भारताची एक विशिष्ट पात्रता आहे. “बाह्यतः परस्परविरोधी गोष्टींच्या ढिगाऱ्यामधून एका तऱ्हेची नवीनच अशी सुसंबद्धता आयासपूर्वक शोधून काढण्याला आवश्यक अशी जी भारतीयांची ज्वलंत कल्पनाशक्ती आहे तिला पायबंद फक्त एकाग्रतेच्या

सवयीनेच घालता येतो. आणि ह्या कामी जो संयम दाखवावा लागतो त्यायोगे मनास अतुल चिकाटीने सत्यशोधनाच्या मार्गास लावता येते.”




*जगदीश चंद्र बोस*
*महान भारतीय भौतिकशास्त्रज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ, क्रेस्कोग्राफचे जनक*

शास्त्रज्ञाचे शेवटचे शब्द ऐकून माझ्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. काळ आणि इतिहासकार यांना संभ्रमात टाकणारे ‘सोशिकपणा’ हे भारताचे पर्यायी नाव खरोखरी नाही काय?

उद्घाटनाच्या दिवसानंतर थोड्याच दिवसांनी मी त्या संशोधनकेंद्रात पुनः गेलो. त्या महान वनस्पतिशास्त्रज्ञांना आपल्या बोलण्याचे स्मरण होते. त्यांनी मला आपल्या शांत वातावरणातील प्रयोगशाळेत नेले.

"आता ह्या नेचावर मी क्रेस्कोग्राफ ठेवतो. पाहा ही वनस्पती किती अजस्र प्रमाणात मोठी दिसत आहे. जर गोगलगाईचे सरपटणे ह्याच अजस्र प्रमाणात मोठे करून दाखविले तर हा छोटासा प्राणी एखाद्या खास भरधाव आगगाडीच्या वेगाने धावत जात आहे असे दिसून येईल!"

पडद्यावर अतिभव्य प्रमाणात दाखविलेल्या त्या नेच्याच्या छायेकडे पाहण्यात माझी नजर अगदी उत्सुकतेने केंद्रित झाली होती. अतिसूक्ष्म अशा जीवनाच्या हालचाली अगदी स्पष्टपणे दिसून येत होत्या. ती वनस्पती खरोखरीच माझ्या मुग्ध डोळ्यांसमोर हळूहळू वाढत जात असलेली दिसत होती. शास्त्रज्ञांनी त्या नेच्याच्या टोकाला धातूची कांडी लावली आणि त्याबरोबर ती निमुटपणे होत असणारी नाट्यपूर्ण वाढ एकदम थांबली आणि तो धातूची कांडी बाजूला घेतल्यावर ती वाढ पूर्ववत सुसंबद्धपणे सुरू झाली.

"तू पाहिलेस ना की अगदी थोडासा सुद्धा बाह्य अवरोध, क्षेप हा ह्या संवेदनाशील ग्रंथींना किती हानिकारक असतो?" बोस म्हणाले, "पाहा, आता मी क्लोरोफॉर्म देतो व मग त्याचा उतारा देतो."

क्लोरोफॉर्मचा परिणाम असा झाला की, वाढ होण्याची एकदम थांबली आणि उताऱ्याचे औषध दिल्यावर पुनः पूर्ववत सुरू झाली. पडद्यावर उत्क्रांतिमय हालचाली दिसून येत होत्या. मी अगदी स्तब्धपणे पाहात होतो. सिनेमातला देखावा सुद्धा इतका आकर्षक नसेल. माझ्या सोबत्याने (प्रस्तुत सिनेमातल्या खलनायकाने) त्या वनस्पतीच्या एका भागात तीक्ष्ण चाकू खुपसला. त्याबरोबर त्या ठिकाणी आंकडी आल्यासारखी फडफड सुरू झाली व दुःख झाल्याचे दिसून आले. माझ्या सोबत्याने त्या वनस्पतीच्या खोडातून जेव्हा चाकू फिरवला तेव्हा पडछाया खूप आवेशाने क्षुब्ध झाली आणि मग स्तब्ध होऊन शेवटी मृत्युमध्ये विश्राम पावली.

"एका मोठ्या झाडाला क्लोरोफॉर्म देऊन मी त्याचे यशस्वीपणे स्थलांतर केले, साधारणपणे जंगलातील हे राजे स्थलांतर केल्यावर पुढे थोड्याच काळात मरून पडतात." वनस्पतीच्या बाबतीत पुनरुज्जीवन साध्य करून देण्याचे सांगतांना जगदीशबाबूंना अगदी मनापासून हसू आले. "माझ्या नाजूक उपकरणांच्या साहाय्याने मी जे आलेख काढले आहेत ते असे सिद्ध करू शकतात की, झाडांमध्ये सुद्धा रुधिराभिसरणाची प्रक्रिया चालू असते. त्यांच्या जीवनरसाची हालचाल प्राण्यांच्या शरिरातील रक्तदाबाने होणाऱ्या हालचालीसारखी असते. वनस्पतींची जीवनरस शोषून घेण्याची क्रिया केशाकर्षणासारखी यांत्रिक स्वरूपाची नसते, जसे साधारणपणे समजले जाते. ही जी घटना होते ती जिवंत अशा पेशींच्या प्रवृत्तीचे निदर्शक होय, असे स्पष्टीकरण क्रेस्कोग्राफ करून देतो. रूळाच्या आकाराची एक लांब नलिका झाडाच्या बुंध्यापासून फांद्यांपर्यंत गेलेली असते व तिच्यातून चोहीकडे सभोवार तंतू पसरत जातात; आणि त्यांकरवी झाडाच्या हृदयाचे कार्य होते. जितक्या बारकाईने आपण ह्या

गोष्टी पाहाव्या तितके आपल्याला उघड दिसून येते की, निसर्गामध्ये सर्व पदार्थांमधून एक समानधर्मी योजना नित्य कार्य करीत असते.

शास्त्रज्ञमहाशयांनी आणखी एका बोसयंत्राकडे मला नेले.

"आता मी तुला कथिलाच्या तुकड्यावर प्रयोग करून दाखवितो. धातूंमधील जीवनशक्तीवर आघाताचा अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम घडून येतो. अशा विविध प्रत्याघातांची नोंद शाईच्या खुणांनी केली आहे."

अणुरचनेच्या वैशिष्ट्यपूर्ण लहरी दर्शविणारा आलेखाचा तक्ता पाहात असताना मी अगदी तल्लीन झालो. प्रोफेसरसाहेबांनी जेव्हा कथिलाच्या तुकड्यावर क्लोरोफॉर्म टाकला तेव्हा आंदोलनांचे नोंदलिखाण थांबले. ज्या वेळी धातूने आपली पूर्वीची स्थिती प्राप्त करून घेतली त्या वेळी ते नोंदलिखाण पुनः सुरू झाले. माझ्या सोबत्याने मग एका विषारी रसायनाचा उपयोग केला. पत्र्याचे टोक कंप पावू लागले आणि अगदी त्याचबरोबर आलेखातील सुईने अगदी नाट्यपूर्ण पद्धतीने त्या धातूच्या तुकड्याची मृत्युची घटका दर्शविली. नंतर शास्त्रज्ञमहाशय म्हणाले:

"बोस उपकरणांनी आलेखांच्या साहाय्याने असे दाखविले आहे की, कात्रीमधील व इतर यंत्रांमधील पोलादासारखे धातू यांनाही थकवा येतो आणि मधून मधून विश्रांती घेतल्यावर ते ताजेतवाने व कार्यक्षम होतात. धातूंमधील जीवशक्तीची नाडी ही विद्युत्-प्रवाह त्यांमधून वाढविल्याने किंवा त्यांच्यावर जास्त दाब ठेवल्यानेही जबरदस्त दुखावली जाते किंवा एखादे वेळी अजिबात थांबते."

खोलीमध्ये ठेवलेल्या अनेक शोधयंत्रांचे मी निरीक्षण करीत होतो. ती यंत्रे म्हणजे अविश्रांत कौशल्याची बोलती स्मारके होती.

"साहेब, आपल्या आश्चर्यकारक यंत्रांचा भरपूर उपयोग करून मोठ्या प्रमाणावर आपल्या देशातील कृषिविकासाला वेग दिला जात नाही ही मोठी खेदाची गोष्ट आहे. ह्यांपैकी काही यंत्रांचे प्रयोगशाळेमध्ये निकडीचे प्रयोग करून वनस्पतींच्या वाढीवर निरनिराळ्या प्रकारच्या खतांचा कसाकसा परिणाम घडून येतो हे सुलभपणे दाखविता येणार नाही काय?"

"तुझे म्हणणे बरोबर आहे. पुढील पिढ्यांकडून बोस-उपकरणांचे असंख्य उपयोग केले जातील. शास्त्रज्ञाला आपल्या हयातीत इतरांकडून मान्यता मिळत नाही. आपण काही नवीन शोध शोधून काढले ह्यातच त्याला आनंद मानून घ्यावा लागतो."

अविरत सेवा करणाऱ्या त्या विज्ञानमहर्षीचा मी कृतज्ञतेच्या निःसंकोच उद्गारांनी निरोप घेतला. मी मनात म्हणालो, "त्यांच्या बुद्धिमत्तेची ही विस्मयकारी उत्पादनक्षमता कधी आटू शकते काय?"

पुष्कळ वर्षे झाली. त्यांच्या बुद्धिमत्तेची क्षमता कमी झाली नाही. "रेझोनन्ट कार्डिओग्राफ" सारख्या गुंतागुंतीच्या उपकरणाचा शोध लावून बोसांनी पुढे हिंदुस्थानातील असंख्य वनस्पतींवर प्रदीर्घ संशोधन चालू ठेविले. उपयुक्त अशा औषधांच्या कृतींचा म्हणता म्हणता एक अवाढव्य ग्रंथ तयार झाला. हा कार्डिओग्राफ इतक्या बारकाईने लक्ष देऊन काही एक चूक राहू न देता तयार केलेला आहे. त्या यंत्रात एका क्षणाचा एक शतांश भागसुद्धा

आलेखित केला जातो. वनस्पती, प्राणी आणि मानवी देह यांच्यामधील स्पंदनाचे हळूवार असे ठोके त्याच सुरात नोंदले जातात. त्या महान वनस्पतिशास्त्रज्ञाने असे भविष्य केले की, ह्या कार्डिओग्राफचा उपयोग प्राण्यांच्या ऐवजी वनस्पतींवर केला जाईल व त्यांचे शास्त्रीय अवच्छेदन करता येणे शक्य होईल.

वनस्पती आणि प्राणी यांना एकाच वेळी औषध देऊन त्याचे दोघांच्या शरीरांवरील परिणाम नोंदले तेव्हा त्या नोंदीमध्ये एक विलक्षण एकसूत्रीपणा व साम्य आढळून आले, असे त्यांनी दाखवून दिले. मानवी शरीरामधील प्रत्येक घडण ही वनस्पतीच्या शरीरामध्ये अगोदरच केलेली आढळून येते. वनस्पतींवर असे प्रयोग केल्याने प्राणी आणि मानव यांच्या शरीरयातना थोड्याफार प्रमाणात कमी होऊ शकतील.

काही वर्षांनी बोसांच्या वनस्पतींवरील ह्या अग्रगामी शोधांचा इतर शास्त्रज्ञांनी पाठपुरावा केला. १९३८ मध्ये कोलंबिया विश्वविद्यालयामध्ये जे संशोधन झाले ते 'दि न्यूयॉर्क टाइम्स' पत्राने प्रसिद्ध केले ते असे:

गेल्या काही वर्षांमध्ये संशोधनान्ती असे सिद्ध झाले आहे की, ज्या वेळी मज्जातंतू, मेंदू व शरीराचे इतर भाग यांमध्ये संदेश एकमेकांकडे पोचविले जातात त्या वेळी सूक्ष्म असे विद्युत्प्रवाह-तरंग निर्माण होतात. ह्या प्रवाहतरंगांचे अगदी सूक्ष्ममापनाच्या गॅल्व्हनोमीटरकरवी मापन झाले आहे; आणि आधुनिक बृहद्दर्शक उपकरणांकरवी त्या प्रवाहतरंगांचें लाखपट बृहतीकरण करण्यात आले आहे. जिवंत प्राण्यांच्या किंवा मनुष्याच्या देहातील ज्ञानतंतूंमधून ह्या प्रवाहतरंगांचे जे वहन होत असते त्याचा अभ्यास करण्याची आतापर्यंत एकही समाधानकारक अशी पद्धती उपलब्ध नव्हती. कारण ह्या प्रवाहतरंगांचे जे वहन होते ते अत्यंत द्रुतगतीने होत असते.

डॉ. के. एस. कोल व एच्. जे. कर्टिस यांनी आपल्या एका शोधाचा अहवाल प्रसिद्ध केलेला आहे. तो शोध म्हणजे असा: सोनेरी रंगाचे मासे ठेवण्याच्या काचेच्या पात्रात जी आपण निटेला नावाच्या ताज्या पाण्यातील वनस्पतीची पाने ठेवतो त्या वनस्पतीच्या लांबशा एकेरी पेशी ह्या गुणधर्मांच्या दृष्टीने वस्तुतः एकेरी ज्ञानतंतूच होत. यापुढे जाऊन त्यांनी असेही शोधून काढले की, निटेला वनस्पतीच्या तंतूंना उत्तेजन दिल्यावर त्यांतून अगदी एकाच पद्धतीचे विद्युत्प्रवाहाचे तरंग प्रसृत होतात. फक्त ह्या तरंगांचा गतिवेग हा मनुष्य व इतर प्राणी यांच्या शरीरांतील ज्ञानतंतूंपासून प्रसूत होणाऱ्या अशाच तरंगांच्या गतिवेगापेक्षा भिन्न असतो. ह्या विद्युत्प्रवाहतरंगांचा गतिवेग प्राण्यांच्यापेक्षा वनस्पतींमध्ये फारच कमी असलेला आढळून आलेला आहे. म्हणून ह्या शोधाचा उपयोग कोलंबिया विश्वविद्यालयातील वैज्ञानिकांनी, ज्ञानतंतूंमधून प्रवाहित होणाऱ्या विद्युततरंगांच्या वहनाचे मंदगतीचे चलच्चित्र काढण्याच्या कामी करून घेतला.

अशा तऱ्हेने निटेला वनस्पती ही एका प्रकारे रोझेटा दगड़ासारखी झाली आहे की जिचा उपयोग जड व जीव (वस्तुजात व मन) यांच्या अगदी परस्पर सीमेवरील अत्यंत गुप्त अवस्थेत ठेवलेली गूढ रहस्ये उकलण्याच्या कामी झालेला आहे.

भारताच्या ह्या ध्येयवादी शास्त्रज्ञाचे कविसम्राट रवींद्रनाथ टागोर हे एक मोठे चहाते व गाढ मित्र होते. त्यांना उद्देशून त्या गोड बंगाली कवीने खालील काव्यपंक्ती [5] लिहिल्या आहेत:

साधो, सांग पुनः जगास तुझिया शास्त्रीय वाणीमधे।
पूर्वापारयुगीन साम कवनी, 'उत्तिष्ठ! हो जाग्रत'।।
पाचारी घनपंडितांस जवळी बोधामृतप्राशना।
पाचारी मदमोहपीडित जनां सत्यार्थ ऐकावया।। १।।
पांडित्ये अतिगर्व, वाद करिती, तो वादही निष्फळ।
धीरोदात्त निसर्ग तत्पर असे पार्श्वी तुझ्या मंगल।।
पाचारी वरदे धरे बुधजनां सर्वा इथे यावया।
येऊ दे तव अध्वराग्निभवती संमेलनी ते जन।। २।।
येवो भारत आमुचा पुनरपी त्या वैभवाच्या शिरी।
कर्तव्योन्मुख, कार्यतत्पर असे होवोत सारे जन।।
ध्यानी तन्मय होउनी सहजही लागो समाधी तयां।
चित्ती निर्भयता असून कसला तो लोभ नाही मना।। ३।।
नाही विग्रह कोणताहि कसला, शुद्धात्मता ही तशी।
ऐसे गौरवस्थान त्यास मिळुनी, उच्चासनी बैसुनी।।
साऱ्या मानवजातिला पुनरपी सन्मार्ग दावोनिया।
देवोनी उपदेश; भारत बनो आदर्श साऱ्या जगा।। ४।।

---

1 "सर्व विज्ञानशास्त्रे ही इंद्रियातीत ज्ञानाची असतात; नाही तर ती टिकू शकत नाहीत. वनस्पतिशास्त्र सुद्धा आता बरोबर व्युत्पत्ती लावू लागले आहे. लवकरच ब्रह्मदेवाच्या अवतारांचा अभ्यास म्हणजेच निसर्गाच्या इतिहासाची पाठ्यपुस्तके होतील." —इमर्सन.

2 मूळ लॅटिन धातू, 'क्रिसकिअर' म्हणजे वाढविणे. क्रेस्कोग्राफ तयार करण्याबद्दल व इतर संशोधनाबद्दल बोस यांना १९१७ साली 'नाईट' ही उपाधि मिळाली होती.

3 कमळपुष्प हे भारतात प्राचीन कालापासून दिव्यत्वाचे प्रतीक समजले जाते. कमळाच्या उमलणाऱ्या पाकळ्या म्हणजे विकसित होत जाणारा आत्मा. कमळाचा उद्‌गम चिखलात होतो, पण येथूनच कमळपुष्पाची शुद्ध अशी सुंदरता विकसित होत जाते. ह्याच तुलनेने मानवाची आध्यात्मिक उन्नती होत जावी हा अर्थ कमळपुष्प दर्शविते.

4 प्राचीन भारतीयांना पदार्थ हा अणूंनी बनलेला आहे हे माहीत होते. भारतीय तत्त्वज्ञानाच्या सहा दर्शनांमध्ये वैशेषिक हे एक दर्शन आहे. ह्या शब्दाचा मूळ संस्कृत धातू 'विशेषस्' हा आहे. याचा अर्थ आहे "अणुगत व्यक्तित्व." वैशेषिक दर्शनकारांपैकी प्रमुख दर्शनकार औलुक्य ऊर्फ कणाद. हा २८०० वर्षांपूर्वी होऊन गेला. कणाद म्हणजे शब्दशः 'अणु-भक्षक.'

'ईस्ट-वेस्ट' या मासिकाच्या एप्रिल १९३४ च्या अंकातील तारा मातांच्या एका लेखात वैशेषिक ह्या दर्शनाची शास्त्रीय माहिती सारांशरूपाने दिलेली आहे ती अशी: "भौतिक शास्त्रांच्या ज्ञानामध्ये आधुनिक अणु-सिद्धान्तप्रणालीने एक नवीन प्रगती केली आहे असे सामान्यतः मानले जाते, तरी ती सिद्धान्तप्रणाली 'अणुभक्षक' कणादाने पूर्वीच फार समर्पकपणे मांडलेली आहे. 'अणु' ह्या मूळ संस्कृत शब्दाचे बरोबर भाषांतर 'ॲटम' ह्या त्या शब्दाच्या 'अविच्छिन्न' किंवा 'न कापलेले' या शब्दशः अशा ग्रीक अर्थाने होते. त्याच ख्रिस्तपूर्व काळातील वैशेषिक दर्शनामधील इतर शास्त्रीय सिद्धान्तांमध्ये खालील तत्त्वांचा मुख्यतः समावेश होतो: १ चुंबकाच्या दिशेने सुईचे चलन. २. पाण्याचे वनस्पतींमधील अभिसरण. ३. आकाश किंवा 'ईथर' हे जड व रचनाविरहित असे असून ते प्रामुख्याने सूक्ष्म प्रेरणांचे वहन करते. ४. सूर्याची दाहकता ही उष्णतेच्या इतर साऱ्या प्रकारांचे आदिकारण होय. ५. अणुरचनेमध्ये फरक हा उष्णतेमुळे होतो. ६. पृथ्वीच्या अणूंमध्ये जी आकर्षण-शक्ती असते किंवा त्यांच्या ठिकाणी खालच्या दिशेने जी ओढ असते ह्या त्यांच्या गुणधर्मामुळेच गुरुत्वाकर्षणाचा नियम सिद्ध झाला आहे. ७. साऱ्या शक्तीचे

रूप गतिमान असते. शक्तीच्या विनियोगामुळे किंवा गतीच्या अन्य प्रकारे केलेल्या वाटणीमुळेच चालू क्रिया ही नेहमी प्रेरित केली जाते. ८. अणूंच्या स्फोटाने विश्वाचे विसर्जन होते अंत होतो. उष्णता व प्रकाशकिरण हे अतिसूक्ष्म कणांचे बनलेले असून सर्व दिशांनी कल्पना करता येणार नाही अशा प्रचंड वेगाने बाहेर पडत असतात. १०. काळ व स्थळ यांमधील सापेक्षता.

"वैशेषिक सिद्धान्तानुसार हे विश्व अणूंचे बनलेले आहे. हे अणू चिरंतन स्वरूपाचे असून त्यांचे हे नित्यत्व हेच त्यांचे अंतिम वैशिष्ट्य आहे. ह्या अणूंच्या ठिकाणी अविरत स्पंदनशील गतिमानता गृहीत धरली जाते … अणू म्हणजे सूर्यमालेचे एक अतिसंक्षिप्त स्वरूप आहे हा जो नवीन शोध लागला आहे तो वैशेषिक दर्शनकारांना नवीन नाही. कारण त्यांनीही 'काल' ह्याचे अगदी गणितशास्त्रदृष्ट्या पराकोटीचे असे वर्णन केले आहे की, 'काल' म्हणजे अणूला आपल्या स्वतःच्या अवकाशगोलामध्ये भ्रमण पुरे करावयास लागलेल्या अवधीचा सूक्ष्मतम काल."

5 "विश्वभारती," शांतिनिकेतन, भारत, या त्रैमासिकातील मूळ बंगालीमधील कविवर्य रवींन्द्रनाथ टागोर यांच्या गीताचा मराठीमधील अनुवाद.

चार वेदांपैकी सामवेद हा एक वेद आहे. बाकीचे वेद म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद. या वेदग्रंथांमध्ये विधाता, परमेश्वर ब्रह्म याच्या स्वरूपाचे—जो परमात्मा मानवी जीवनामध्ये जीवात्म्याचे स्वरूप व्यक्त करतो त्याचे—विवेचन आहे. 'ब्रह्म' ह्या शब्दाचा मूळ क्रियावाचक धातू 'बृह'—प्रसरणे असा आहे. ह्या शब्दातून दिव्यशक्तीचा सहज विकास होणे आणि तिचा सृजनामध्ये स्फोट होणे ही वैदिक कल्पना व्यक्त होते. मूळ परमात्म्याच्या स्वरूपातून हे ब्रह्मांड, हे विश्व कोळ्याच्या जाळ्यासारखे उत्क्रांत होते (विकुरूते). जीवात्म्याचे सबुद्धिक परमात्मस्वरूपामध्ये, ब्रह्मतत्त्वामध्ये विलीन होणे हा वेदातील सर्व तत्त्वांचा सारांश आहे.

वेदान्त म्हणजे वेदांचा सारांश. पुष्कळ पाश्चिमात्य विचारवंतांना वेदान्ताने नवीन स्फूर्ती दिलेली आहे. फ्रेंच इतिहासकार व्हिक्टर कझिन म्हणतो, "पौर्वात्यांची, विशेषेकरून भारतीय तत्त्वज्ञान विषयांची स्मारके जेव्हा आपण बारकाईने वाचतो, तेव्हा आपल्याला किती एक सत्ये, गूढ, गंभीर व उदात्त अशी आढळतात. या पौर्वात्य तत्त्वज्ञानापुढे आपल्याला लोटांगण घालावे लागते. ह्या मानवजातीच्या अर्भकावस्थेत अत्युच्च तत्त्वज्ञानाची मूळची बैठक आढळून येते." श्लेगेल म्हणतो, "युरोपीयांचे अगदी सर्वांत उच्च, प्रगल्भ असे जरी तत्त्वज्ञान घेतले—ग्रीक तत्त्वज्ञान्यांनी मोठ्या आग्रहाने प्रतिपादिलेला बुद्धिप्रधान ध्येयवाद जरी घेतला तरी त्याची पौर्वात्य बुद्धिवादाच्या जिवंतपणाशी व दमदारपणाशी तुलना करता येणे शक्य नाही; जशी धगधगीत सूर्यप्रकाशाशी मिणमिणीत प्रॉमीथियन ठिणगीची तुलना करता येत नाही." [ग्रीक पुराणातील प्रॉमीथिअसचा संदर्भ. ह्या व्यक्तीने सूर्यापासून अग्नीची चोरी केली व मानवाला मदत करण्यासाठी अग्नी पृथ्वीवर आणला.]

भारतात अवाढव्य वाङ्मयात 'वेद' (धातू 'विद्'—जाणणे) हे असे वाङ्मय आहे की ते कोणी रचिले याचा पत्ता नाही. वेद हे अपौरुषेय आहेत. ऋग्वेदानुसार (X:90, 9) ही स्तोत्रे खुद्द परमात्म्याने गायिलेली आहेत; आणि ती (III:39, 2) अशीच परंपरेने पूर्वापारपासून नवीन नवीन शब्दांत चालत आलेली आहेत. युगायुगांतून प्राचीन ऋषींना, (द्रष्ट्यांना) ही दिव्यवाणी प्रकट झालेली आहे; आणि त्यामुळे वेदांना नित्यत्व प्राप्त झाले आहे असे म्हणतात.

वेदांना 'श्रुती' असेही म्हणतात. ऋषींना जो ध्वनी श्रुत झाला, ऋषींनी जी दिव्य वाणी अंतरिक्षातून ऐकिली त्या श्रुती. वैदिक वाङ्मयात प्रामुख्याने स्तोत्रांचा व पठणांचा अंतर्भाव आहे. वेदांच्या ह्या १००,००० ऋचा कोणी अशा लिहिल्याच नाहीत, तर ब्राह्मण पुरोहितांनी आपल्या मुखांनी पठणाच्या साहाय्याने शिष्यांस परंपरेने देत देत आणलेल्या आहेत. काळाच्या सर्वभक्षक शक्तीपुढे कागद आणि शिला टिकाव धरू शकत नाहीत. आज इतकी युगे झाली पण वेद टिकून राहिले. याचे कारण असे की, प्राचीन ऋषींना जड वस्तूंपेक्षा मन हे उच्च वाटत होते आणि त्याकरवी संदेश प्रसृत करविणे हेच त्यांना बरोबर वाटत होते. मनाच्या लेखशिलेपुढे कशाची मातब्बरी आहे?

वैदिक शब्द ज्या विशिष्ट क्रमाने (अनुपूर्वी) येतात हे ध्यानात घेऊंन आणि ध्वनिशास्त्रातील नियमांचा उपयोग करून, संध्वनींचे (संधी) व अक्षांचे परस्परसंबंध (सनतन) हे सिद्ध करून आणि काही विशिष्ट गणिती पद्धतींनी ह्या मुखोद्गत पाठांची बिनचूकता सिद्ध करून ब्राह्मणांनी ह्या वेदांची मूळची शुद्धता अगदी अंधुकशा पुरातन काळापासून एका विलक्षण पद्धतीने अबाधित ठेविली आहे. वैदिक शब्दाच्या प्रत्येक अक्षरामध्ये काही विशिष्ट अर्थ व सामर्थ्य असते.

प्रकरण - ९

# 9. आनंदमूर्ति भक्त व त्याच्या विश्वलीला

"छोटे बाबू, जरा बसता का? मी जगन्मातेबरोबर थोडे बोलतो आहे."

बिचकतच पण आदरपूर्वक निमूटपणे मी त्या खोलीत प्रवेश केलेला होता. मास्टर महाशय अगदी देवदूताप्रमाणे दिसत होते. त्यांना पाहून मी दिपून गेलो. त्यांची दाढी रेशमासारखी पांढरी होती, डोळे तजेलदार होते. जणू शुचितेची मूर्तिमंत प्रतिमा. त्यांनी आपला चेहरा जरा वर केला व हात जोडले. त्यामुळे मला वाटले की, मी त्यांच्या एकान्ताचा भंग केला व साधनेत व्यत्यय आणला. आतापर्यंत अनेक साधुसंतांचे मी दर्शन घेतले पण मास्टर महाशयांच्या ह्या साध्या शब्दांनी माझ्या मनावर एकदम जबरदस्त प्रभाव पडला. आईचा वियोग ही माझ्या आतापर्यंतच्या आयुष्यातील दुःखाची परिसीमा. पण आता जगन्मातेपासूनचा होत असलेला वियोग माझ्या मनाला अत्यंत क्लेश देत होता. दुःखाने मी धाडकन जमिनीवर पडलो.

"छोटे बाबू, धीर धरा." साधुमहाराजांना माझ्या दुःखाबद्दल वाईट व सहानुभूतीही वाटली.

एका महासागरात टाकून दिलेला मी, जीव वाचविण्याकरिता तराफा म्हणून त्यांच्या पायाचा आधार घेत होतो.

"महाराज, आपण मध्यस्थी करावी. माझ्यावर काही कृपादृष्टी होणार काय हे जगन्मातेला विचारावे, महाराज!"

मध्यस्थी करण्याचा अनुग्रह हा सहजासहजी होत नाही. गुरुमहाराज स्तब्धच बसलेले होते.

मास्टर महाशय जगन्मातेबरोबर अगदी सलगीने बोलत असतात याबद्दल मला बिलकुल संशय नव्हता. साधुमहाराजांच्या अचूक दृष्टीला अगदी याच वेळी जगन्माता दिसत होती, पण माझ्या आंधळ्या डोळ्यांना ती दिसत नव्हती ही मोठी लाजिरवाणी गोष्ट होती. निर्लज्जपणे त्यांचे पुन्हा पाय धरीत, ते सौम्यपणे नाखुशी दर्शवीत असताना सुद्धा मी त्यांची पुनः पुन्हा विश्वंभरीकडे मध्यस्थी करण्याची सारखी विनवणी करीत होतो.

"प्रेमळ मातेपुढे मी तुझे म्हणणे ठेवतो." मास्टर महाशयांनी शेवटी शरणागती दिली. त्यांच्या मुद्रेवर मंद सहृदय हास्य हळूहळू विलसू लागले.

काय त्यांच्या शब्दांत एवढी जादू होती की वावटळी अज्ञातवासातून सुटका झालीशी मला वाटावी?

"महाराज, आपल्या शब्दांची आपल्याला आठवण असू द्या! जगन्मातेकडून काही कळल्याबरोबर मी ताबडतोब येतोच!" माझ्या आवाजात आनंदपूर्ण अपेक्षेचा निनाद उठला. अगदी थोड्याच क्षणांपूर्वी मी दुःखाने मुसमुसून रडत होतो!

लांबलचक जिना उतरत असताना पूर्वीच्या आठवणींनी मी व्याकूळ झालो. या वेळी ते कलकत्त्यात अम्हर्स्ट रोडवर घर क्र. ५० मध्ये राहात होते. अगदी ह्याच घरात एके काळी

आम्ही राहात होतो. आईचा मृत्यूही येथेच झाला होता. येथेच माझ्या जन्मादात्या आईच्या मृत्यूमुळे माझे हृदय पिळवटून निघाले होते आणि येथेच आज जगन्माता दिसत नसल्यामुळे माझ्या आत्म्याला क्रूसावर दिल्याप्रमाणे वेदना होत होत्या. ह्या पवित्र भिंती —माझ्या जबर जखमा—त्या होत असताना व बऱ्या झालेल्याही त्यांनी पाहिल्या होत्या.

घराकडे परत जात असताना माझी पावले जरा जलदच औत्सुक्याने पडत होती. तेथे पोटमाळ्यावर एका लहानशा खोलीत मी एकटा बसलो व तेथे दहा वाजेपर्यंत ध्यानमग्न राहिलो. भारत देश उष्ण कटिबंधातला. रात्र काळोखी होती. मनस्वी उकडत होते. आणि एकदम तेथे आश्चर्यकारक असे दृश्य दिसले.

माझ्यासमोर जगन्माता उभी ठाकलेली होती. तिच्याभोवती तेजोवलय विराजमान झाले होते. तिची मुद्रा हसरी, जणू सौंदर्याची मूर्तीच!

“तुझ्यावर माझ्या कृपेची पाखर नेहमीचीच आहे. यापुढेही तशीच राहील!”

त्या दिव्य वाणीचे निनाद हवेत सारखे उठत होते. एकदम ती अंतर्धान पावली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच सूर्य क्षितिजावर येता न येता मी मास्टर महाशयांच्या घरी गेलो. त्यांना भेटायला जाण्याची ही दुसरी वेळ. दुःखद आठवणींनी पूर्ण असलेल्या त्या घराचा जिना चढून मी चवथ्या मजल्यावर गेलो. दार बंद होते. दारावरील मूठ फडक्याने झाकलेली होती. साधुमहाराजांना एकान्तवासाची जरुरी आहे, हे त्यावरून दिसून येत होते. जिना चढून गेल्यावर आता काय करावे असा मनाशी विचार करीत मी उभा राहिलो असताना मास्टरांनी आपल्या स्वतःच्या हातांनीच दार उघडून माझे स्वागत केले. मी त्यांच्या पवित्र चरणांना नमन करण्याकरिता वाकलो. दैवी साक्षात्काराच्या दिव्य आनंदाला गंमत म्हणून गंभीरतेच्या मुखवट्याने मी झाकले होते.

“महाराज, मी आलोय, अगदी लवकरच, आपणांकडून निरोप ऐकायला. जगन्माता माझ्याबद्दल काही बोलली काय?”

“छोटे बाबू, तुम्ही लबाड आहात!”

त्यांना दुसरे काही बोलण्याची जरुरीच नव्हती. उसने आणलेले माझे गांभीर्य हास्यास्पदच ठरले.

“एवढे रहस्यमय का? एवढी उडवाउडवीची उत्तरे का? महात्म्यांना कधी सरळ बोलताच येत नाही काय?” मला जरा रागच आला होता.

“तुला माझी परीक्षाच घ्यायची आहे ना?” त्यांचे शांत डोळेच बोलके होते. “काल रात्री दहा वाजता देदीप्यमान जगन्मातेने तुला जे आश्वासन दिले त्यावर एक शब्द तरी जास्त सांगायची जरूर आहे का?”

मास्टर महाशयांनी माझ्या आत्म्याच्या उद्रेक-दरवाज्याचा पूर्ण कबजा घेतलेला होता. परत मी त्यांना साष्टांग दंडवत घातले. ह्या वेळी माझ्या नेत्ररूपी वापीतून अश्रूंचा प्रवाह वाहू लागला. पण ते अश्रू दुःखाचे नसून आनंदाश्रू होते.

“दयेचा अथांग सागर अशी जी जगन्माता ती तुझ्या भक्तीमुळे द्रवली नाही, असे का तुला वाटते? परमेश्वराची तू मातृस्वरूपात जन्मदात्री व जगन्माता अशा दोन्ही स्वरूपांत पूजा केलेली आहेस. तुझ्या आक्रंदनाचे उत्तर ती तुला नक्की देईल.”

अगदी साधे दिसणारे हे कोण साधू? की ज्यांनी नुसते गमतीने परमात्मशक्तीला पाचारण करावे आणि तिने त्या विनंतीस अशी गोड अनुमती द्यावी? मला परिचित अशा अत्युच्च महात्म्याला साजेशी अशी नम्रता यांच्या ठिकाणी होती. जगामधील त्यांचे कार्य तसेच विनम्र स्वरूपाचे होते. ह्या ॲम्हर्स्ट रोडवरील घरात मास्टर महाशय [1] मुलांची एक शाळा चालवीत असत. त्यांच्या मुखातून शिक्षेचा एक सुद्धा शब्द बाहेर पडत नसे. आणि शिस्तीकरिता म्हणून काही नियम किंवा बेताची छडी यांचे तेथे काही काम नव्हते. ह्या साध्यासुध्या वर्गांतून वरच्या दर्जाचे गणित शिकविले जात असे; आणि प्रेमाचे रसायनशास्त्र शिकविण्यास यांच्याकडे पुस्तक नव्हते.

ज्याचा खोलवर परिणाम होत नसे असा कोरडा उपदेश न करता आध्यात्मिक संपर्क साधून ते मुलांमध्ये ज्ञानाचा प्रसार करीत. दिव्य अशा जगन्मातेच्या ठिकाणी शुद्ध निरागस प्रेम असल्याकारणाने ह्या महात्म्याने लहान मुलाप्रमाणे मानापमानाची भावना दूर ठेविली होती.

“मी काही तुझा गुरू नव्हे. तुला तुझा गुरू काही कालावधीने भेटेल.” ते मला म्हणाले, “त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्रेम व भक्ती या रूपातच तुझे साक्षात्कारी अनुभव यांचे त्यांच्या अगाध ज्ञानामध्ये परिवर्तन होईल.”

नंतर रोज दुपारी मी ॲम्हर्स्ट स्ट्रीटवरील त्यांच्या घरी जात असे. मास्टर महाशयांच्या दिव्य सुरईतून मी बोधामृताचे आकंठ पान करीत असे. ती सुरई इतकी भरलेली होती की, त्यातून बोधामृताचे थेंब वाहत जाऊन माझ्यापर्यंत ओघळून येत असत. मी कधी कोणाला अत्यंत पूज्य भावाने नमस्कार केला नव्हता. आता मला असे वाटले की, मास्टर महाशयांच्या पावलावर पाऊल ठेवून जाण्याचे मला भाग्य मिळाले, त्या भाग्याला मोल नाही.

“महाराज, आपल्याकरिता मी चाफ्याच्या फुलांचा हार आणला आहे, त्याचा आपण स्वीकार करावा.” एक दिवस संध्याकाळी फुलांचा हार घेऊन मी तेथे गेलो. पण लाजेने ते बाजूला सरले. आपला तो अधिकार नाही असे त्यांनी मला वारंवार बजावले. पण माझ्या भावना दुखावल्या गेल्या आहेत हे ओळखून शेवटी त्यांनी त्या हाराचा हसून स्वीकार केला.

“आपण दोघेही एकाच जगन्मातेचे भक्त आहोत. जगन्माता माझ्या देहरूपी मंदिरात वास करीत आहे. तिला तू हार घाल.” त्यांच्या विशाल हृदयात अहंकाराला पाय ठेवण्यास सुद्धा जागा नव्हती.

“उद्या आपण दक्षिणेश्वरला कालीच्या मंदिरात जाऊ या. जे मंदिर माझ्या गुरूंच्या पादस्पर्शाने पुनीत झालेले आहे.” मास्टर महाशय येशू ख्रिस्तासमान असलेल्या रामकृष्ण परमहंसांचे शिष्य होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही निघालो. अंतर फक्त चार मैलांचे होते. आम्ही गंगेतून नावेने गेलो. नऊ घुमट असलेल्या कालीच्या मंदिरात आम्ही शिरलो. तेथे जगन्माता व शिव यांच्या मूर्ती चकचकणाऱ्या चांदीच्या कमळावर बसविलेल्या आहेत. त्या कमळाच्या सहस्र पाकळ्या कलाकुसरीने कोरलेल्या आहेत. मास्टर महाशय हे त्या मंदिरात जणू भारावून गेले. ते आपल्या प्रेमळ मातेशी हितगुज करण्यात अगदी पुरेपूर रंगून गेले होते. त्यांनी नामजप

सुरू केल्यावर अत्यानंदाने भारावलेले माझे कमलसदृश ह्रदय सहस्र पाकळ्यांत विदीर्ण झाले.

नंतर आम्ही मंदिराच्या त्या पवित्र परिसरात हिंडलो. उपवनात एका चिंचेच्या झाडाखाली थांबलो. त्या झाडामधून जो रस येत होता तो प्रसाद समजून गुरुमहाशय सगळ्यांना वाटीत. त्यांचा जप चालूच असावयाचा. मी तेथे हिरवळीवर अगदी ताठ पुतळ्यासारखा स्तब्ध बसलो होतो. सभोवार चिंचेची लहान लहान पिसांसारखी फुले विखरून पडलेली होती. थोडा वेळ का होईना, पण मी देहभान विसरलो आणि स्वर्गाच्या उच्च वातावरणात भरारी मारू लागलो.

त्या महात्म्याच्या सान्निध्यात दक्षिणेश्वरला जाण्याची ही माझी पहिलीच वेळ. परमेश्वराचा प्रेमळपणा, आईच्या स्वरूपातला किंवा दिव्य दयेच्या स्वरूपातला मी त्यांच्यापासून शिकलो. त्या बालसदृश निरागस महात्म्याच्या ठिकाणी पितृत्वाची किंवा परमेश्वराची न्यायबुद्धीची भूमिका नव्हती. त्यांच्या मृदू स्वभावाला कडक, हुकमी, अगदी काटेकोर अशी न्यायबुद्धीची भावना विसंगत होती.

एके दिवशी ते प्रार्थना करीत असताना मी त्यांच्याकडे पाहत होतो. माझ्या प्रेमळ मनात विचार आला, “स्वर्गातील देवदूतांची प्रतिकृतीच ह्या भूलोकावर निर्माण केली आहे असे समजावयास हरकत नाही.” तोंडातून टीकेचा किंवा निंदेचा एकही शब्द बाहेर न काढता ते आपल्या डोळ्यांनी जगाचे निरीक्षण करीत होते. त्यांच्या डोळ्यांना सनातन पावित्र्य चांगलेच परिचयाचे होते. त्यांचे शरीर, मन, बोलणे आणि कृती ही साहजिकपणेच त्यांच्या आत्म्याच्या साधेपणाशी सुसंगत होती.

ते स्वतःचे असे कधी ठामपणे प्रतिपादन करीत नसत. “माझे गुरू मला असे सांगत असत.” ह्या पद्धतीने साधुमहाराज ज्या ज्या वेळी चांगला सल्ला देत असत त्या त्या वेळी ते नेहमीच आपल्या गुरूबद्दल प्रशंसेचे उद्गार काढीत असत. त्यांचे गुरू श्रीरामकृष्ण परमहंस. त्यांच्या विचारसरणीशी ते इतके तादात्म्य पावले होते की, गुरूंचे विचार हे आपले स्वतःचेच विचार असे ते समजत असत.

एके दिवशी संध्याकाळी मी आणि साधुमहाराज हातात हात घालून शाळेच्या आवारात हिंडत होतो. त्याच वेळी त्यांच्या ओळखीचा एक अहंमन्य इसम आला. तो आमच्याशी बराच वेळ बोलत बसला. त्यामुळे माझ्या आनंदावर विरजण पडले.

“मला वाटते, तुला ह्या माणसाचे बोलणे आवडले नाही.” साधूमहाराज माझ्या कानात हळूच कुजबुजले. तो अहंमन्य मनुष्य आपल्याच बोलण्यात गर्क झाला होता. त्याला ते त्यांचे कुजबुजणे ऐकू गेले नाही. ते पुढे म्हणाले, “जगन्मातेला मी त्याबद्दल बोललेलो आहे. तिला आपली विकल अवस्था कळली आहे. आपण आता जेव्हा त्या पलीकडच्या तांबड्या घराजवळ जाऊ तेव्हा आपल्याला काही जरुरीचे काम आहे ह्याची ती त्याला आठवण करून देईल.”

त्या जागेपाशी त्या माणसाच्या तावडीतून सुटका होणार त्या ठिकाणी माझे डोळे जणू चिकटले. त्या लाल फाटकापाशी आम्ही जेव्हा जाऊन पोचलो तेव्हा मनुष्य एकदम उगाचच वळला आणि निघून गेला. त्याने आपले वाक्यही पुरे केले नाही की आमचा रीतसर निरोपही


घेतला नाही. तेथल्या वातावरणावर त्याने जो आघात केला होता ते वातावरण आता तो गेल्यावर पुनरपि शांत झाले.

असेच एकदा हावडा रेल्वे स्टेशनजवळ मी एकटाच हिंडत होतो. मी क्षणभर एका देवळाजवळ उभा राहिलो. तेथे काही माणसे मृदंग वाजवीत जोरजोराने भजन करीत होती. त्या मंडळींवर मी मनातल्या मनात टीका करीत होतो.

मी मनात म्हणालो, 'हे लोक भगवंताचे नाव मनामध्ये काही भक्तिभाव न बाळगता नुसतेच यांत्रिक पद्धतीने पुनः पुनः घेत आहेत.' आणि इतक्यातच मास्टर महाशय जलद माझ्याकडेच येत आहेतसे मी पाहिले. मला आश्चर्यच वाटले.

"महाराज, आपण येथे कसे?"

साधुमहाराजांनी माझ्या प्रश्नाकडे दुर्लक्षच केले; पण माझ्या मनातले विचार ओळखले आणि म्हणाले, "छोटे बाबू, प्रेमळ मातेचे नाव सगळ्यांच्या तोंडून, जाणते किंवा अडाणी, आलेले गोड नाही का वाटत?" त्यांनी माझ्या अंगावर वात्सल्याने हात फिरविला. मला जणू असे वाटले की, परमदयाघन परमेश्वराकडे जाण्यासाठी मला त्यांनी एका जादूच्या गालिचावर बसविले आहे.



*मास्टर महाशय*
*"आनंदमुर्ती भक्त"*

“तुला सिनेमा पाहायचा आहे का?” एके दिवशी दुपारी संन्याशासारख्या मास्टर महाशयांच्या तोंडून हे ऐकल्यावर मला अचंबा वाटला. भारतात त्या वेळी चलच्चित्रांना

'बायोस्कोप' असे संबोधीत असत. मी होकार दिला. कोणत्याही परिस्थितीत त्यांच्या सहवासात मला आनंद वाटत असे. आम्ही थोडा वेळ जलद चाललो व कलकत्ता विश्वविद्यालयाच्या समोरच असलेल्या बागेपर्यंत पोचलो. त्यांनी गोल दिघी (कृत्रिम तलाव) जवळच असलेल्या बाकाकडे बोट दाखविले.

"इथेच आपण थोडा वेळ बसू या. जेव्हा म्हणून पाण्याचा विपुल साठा दृष्टीत्पत्तीस येईल तेव्हा तेव्हा तिथे मी ध्यान करावे अशी माझ्या गुरूजींची मला आज्ञा आहे. पाण्याच्या पृष्ठभागावरील शांतता ही परमेश्वराच्या अपार शांत स्वभावाची आठवण करून देत असते. ज्याप्रमाणे सर्व पदार्थांचे प्रतिबिंब पाण्यात दिसते, तद्वत् सारे ब्रह्मांड विश्वरूप मनाच्या सरोवरामध्ये प्रतिबिंबित होते, असे माझे गुरुदेव वारंवार सांगत असत."

लवकरच आम्ही विश्वविद्यालयाच्या एका सभागृहात आलो. तेथे एक व्याख्यान चालू होते. व्याख्यानाचा विषय अतिशय कंटाळवाणा होता, मधून मधून विभिन्न लँटर्न स्लाइडस् दाखविण्यात येत होत्या, पण त्या स्लाईडवरील चित्रेही तितकीच रूक्ष होती.

'म्हणजे मास्टर महाशय मला हा सिनेमा दाखवू इच्छित होते तर?' असा विचार करण्यात माझा उतावीळपणा झाला. परंतु माझ्या चेहऱ्यावरील आलेला कंटाळा दर्शवून मला मास्टर महाशयांना दुखवायचे नव्हते. पण ते काही खास सांगण्याकरिता माझ्याचकडे वळून म्हणाले.

"छोटे बाबू, मी पाहतो आहे तुम्हांला हा सिनेमा आवडला नाही. जगन्मातेजवळ मी त्याबद्दल बोलून ठेविले आहे. तिला आपल्या दोघांबद्दल पूर्ण सहानुभूती आहे. तिने मला असे सांगितले आहे की, सभागृहामधील विजेचे दिवे लवकरच जातील आणि आपण सभागृह सोडीपर्यंत परत येणार नाहीत."

त्यांचे हे बोलणे पुरे होते न होते तोच सभागृहामधील दिवे गेले व तेथे अंधार पसरला. प्रोफेसरमजकुरांना आश्चर्य वाटले व थोडा वेळ त्यांचा कर्कश आवाज बंद पडला. "इथली विजेच्या दिव्यांची व्यवस्था काही बरोबर दिसत नाही. कुठे तरी बिघडलेले आहे." प्रोफेसरसाहेब म्हणू लागले. तितक्यात मास्टर महाशय व मी सभागृहाच्या दरवाज्यापर्यंत जाऊन पोचलो सुद्धा होतो. गॅलरीतून वळून पाठीमागे नजर टाकली तो सभागृहामध्ये दिवे लागलेले दिसले.

"छोटे बाबू, तुम्हाला हा सिनेमा पाहण्याचा कंटाळा आला होय? मग आता दुसरा दाखवतो. तो तुम्हाला आवडेल." साधुमहाराज व मी विश्वविद्यालयाच्या इमारतीच्या समोरील फरशीवर उभे होतो. त्यांनी हळूच हृदयाजवळ माझ्या छातीवर चापटी मारली.

आणि एकदम जिकडे तिकडे शांत झाले. हल्लीचे बोलपट जसे अचानकपणे यंत्रा बंद पडल्यावर नुसता सिनेमाच चालू राहतो व आवाजबिलकुल ऐकू येत नाही, अगदी तसेच झाले. जगन्मातेने काही विलक्षण चमत्कार करून दुनियेतली सारी गडबड, धडपड थांबविली. पादचारी, त्याचप्रमाणे ट्रामगाड्या, मोटारी, बैलगाड्या, टांगे हे सगळे अगदी गुपचूपपणे आवाज न करता चालू लागले. मला जणू सगळीकडे पाहण्याची दिव्य दृष्टी आली मी माझ्या पाठीमागचे पाहू शकलो. दोन्ही बाजूंची दृश्ये मला दिसू लागली. अगदी समोरची दृश्ये जशी दिसावी त्याप्रमाणे मला सगळीकडचे दिसू लागले. काही एक आवाज ऐकू न येता. कलकत्ता शहराच्या त्या लहान भागातील हालचालीची सर्व दृश्ये मी पाहिली. राखेच्या

पातळ थराखाली जशी विस्तवाची ठिणगी मंदपणे चमकत असलेली दिसून यावी, त्याप्रमाणे सर्व बाजूंच्या ह्या समय देखाव्यामध्ये एक तऱ्हेचा मंद प्रकाश भरून राहिलेला दिसत होता.

माझे स्वतःचे शरीरसुद्धा मला इतर दृश्याप्रमाणे एक छायाच दिसली. फक्त ते निश्चल होते व बाकीची दृश्ये इकडून तिकडे मंदपणे हलत होती. पुष्कळ मुले, त्यांत माझी काही मित्रमंडळी होती, ती माझ्या दिशेने यायची व पुढे निघून जायची. ती माझ्याकडे जरी अगदी सरळ पाहत होती तरी त्यांना मी ओळखू यायचा नाही.

हे विलक्षण मूकनाट्य पाहून मला जो आनंदोद्रेक आला त्याचे वर्णन करता येत नाही. एका दिव्यानंदरूपी झऱ्याचे पाणी मी अगदी आकंठ प्यायलो. आणि एकदम माझ्या छातीवर हळूच आणखी एक चापटी मास्टर महाशयांनी मारली. जगाचे ते गोंधळ माझ्या कानांवर एकदम आदळले. ते ऐकू यावे अशी माझी बिलकुल इच्छा नव्हती. एका अंधुक स्वप्नातून मी धक्का मारून उठविल्यासारखा जागा झालो. मी धडपडलो. एका अन्य लोकी मी जो वावरत होतो तेथील अमृत आता मला प्राशन करता येण्यासारखे नव्हते. त्या अमृताचा घडा आता माझ्या हातांच्या पलीकडे गेलेला होता.

“छोटे बाबू, मी पाहतो आहे हा दुसरा सिनेमा [2] तुमच्या आवडी प्रमाणेच होता.” साधुमहाराज मंदस्मित करीत होते कृतज्ञतेच्या भावनेने जमिनीपर्यंत वाकून मी त्यांना नमस्कार करू लागलो. ते म्हणाले, “तुला आता असे करता येणार नाही. तुला आता कळले की तुझ्यामध्येही परमेश्वर वास करीत आहे. तुझ्या हातांकरवी जगन्मातेला मी माझ्या पायांना स्पर्श करू देणार नाही.”

जर एखाद्याने विनयशील गुरूंना व मला त्या गजबजलेल्या पायरस्त्र्यावरून हळूहळू दूर जाताना पाहिले असते तर आम्ही दोघे झिंगलेले आहोत असे त्याला नक्कीच वाटले असते. मला असे वाटले की, संध्याकाळच्या त्या पडत्या छाया ईश्वरभक्तीने जणू झिंगलेल्याच होत्या.

पुढे कितीएक वर्षांनी एका पाश्चिमात्य देशात मी त्यांच्या जीवनक्रमाबद्दल लिहून, त्यांच्या कृपाळूपणाबद्दल माझ्या दुबळ्या शब्दांत वर्णन करीत असे. त्यांचे साक्षात्कारी साधक म्हणून मी वर्णन करीन, अशी माझ्या आयुष्यात जे मला भेटले अशा मास्टर महाशयांना व इतर अनेक सत्पुरुषांना फार थोडीच कल्पना असेल. ते भविष्यज्ञानी होते तेव्हा त्यांना हे समजले असेल याचे मला व येथपर्यंत माझ्याबरोबर आलेल्या वाचकांना बिलकुल आश्चर्य वाटणार नाही.

सर्व धर्मातील संतमहात्म्यांनी विश्वप्रेमी जगदंबेमध्ये ईश्वराचे साधेसुधे स्वरूप प्रतीत झालेले मानून व त्या रूपाची भक्ती करून ईश्वरसाक्षात्कार प्राप्त करून घेतलेला आहे. कारण तत्त्व हे निर्गुण व अचिंत्य आहे; त्याला काही गुणधर्म नाहीत व त्याचे स्वरूप आकलन करता येत नाही. मानवी कल्पनेने व तळमळीने जगन्मातेच्या स्वरूपात त्याचे सगुण स्वरूप कल्पिलेले आहे. कैवल्याचे तत्त्वज्ञान व सगुण भक्ती ह्याचा हिंदू तत्त्वज्ञानामध्ये प्राचीन काळापासून फार सुंदर मिलाफ घडवून आणलेला आहे. ही खरोखरी बहुमोल कामगिरी आहे. वेदांमध्ये व भगवद्गीतेमध्ये हे तत्त्वज्ञान जागोजाग विखुरलेले आहे. परस्परविरुद्ध विचारांचा

घडवून आणलेला हा गोड मिलाफ हृदय व बुद्धी या दोन्हींचे समाधान करतो. भक्ती व ज्ञान ही मूलतः एकच होत. प्राप्ती (आश्रय घेणे) व शरणागती (ईश्वरास शरण जाणे) हे दोन्हीही अत्युच्च ज्ञान प्राप्त करून घेण्याचे मार्ग होत.

मास्टर महाशय व इतर दूसरे संत यांच्यामध्ये जी ही विनम्रता आढळून येते त्यांची मीमांसा अशी आहे. परमेश्वर हा एकमेव जीविताधार व न्यायदाता असे मानून त्याच्यावर आपला सारा भार (शेषत्व) आहे ही जाणीव ह्या संतमहात्म्यांना झालेली असते. त्या जाणीवेमधून ही नम्रता निर्माण होते. परमेश्वराचे खरे स्वरूप आनंदमय आहे आणि त्यामुळे परमेश्वराशी तादात्म्य पावलेला मनुष्य तशाच असीम दिव्यानंदाचा अनुभव घेतो. “आत्मा व इच्छाशक्ती यांच्या आविष्कारांचा पहिला आविष्कार, उद्रेक आनंद हा आहे.” [3]

सर्व युगातील साधकभक्त जगन्मातेकडे अर्भकाच्या नात्याने धाव घेतात व अनुभवावरून अशी ग्वाही देतात की, जगन्माता आपल्या अर्भकांशी नित्य खेळत असते. मास्टर महाशयांच्या आयुष्यामध्ये ह्या दिव्य खेळाचे प्रसंग कधी महत्त्वाचे घडून आले तर कधी अशा प्रसंगांना काहीच महत्त्व नव्हते. परमेश्वराच्या दृष्टीपुढे कोणतीही गोष्ट मोठी नाही की लहान नाही. जर अणू निर्माण करण्यात त्याचे इतके कौशल्य व इतका पूर्ण बारकावेपणा नसता तर आकाशामधील अभिजित व स्वातीसारखी भव्य नक्षत्रे अभिमानाने मिरविली असती काय? महत्त्वपूर्ण व महत्त्वशून्य यांमधील फरक परमेश्वरास नक्कीच मान्य नाही. नाहीपेक्षा एका क्षुद्र टाचणीकरिता सारे विश्व कोलमडून पडले असते!

1 त्यांना सर्व लोक या नावाचेच हाक मारीत. त्यांचे खरे नाव महेंद्रनाथ गुप्त असे होते. ते फक्त ‘एम्’ नावानेच आपले लिखाण लिहीत.

2 ‘बायोस्कोप’ची व्याख्या थोडीशी दुष्कर आहे. वेब्स्टर्स न्यू इंटरनेशनल डिक्शनरीने (१९३४). दिलेली आहे ती अशी: “जीवनातील एक दृश्य, जे असे दृश्य दाखविते ते.” म्हणजे मास्टर महाशयांनी ज्या शब्दाचा प्रयोग केला तो बरोबर होता. हाही एक चमत्कारच!

3 सेन्ट जॉन ऑफ द क्रॉस हा प्रेमळ खिरस्ती संत १५९१ मध्ये वारला. १८५९ साली त्याचे पुरलेले शव उकरून काढले, त्यात काहीही विघटन झाले नसल्याचे आढळून आले.

सर फ्रान्सिस यंगहसबंड (डिसें. १९३६चा ‘अटलांटिक मंथली’चा अंक) दिव्यानंदाच्या अनुभूतीचा स्वतःचा प्रकार असा वर्णन करितात: माझ्या ठिकाणी अशी एक अवस्था आली की ती सगर्व आनंद किंवा उत्साहपूर्ण आनंद याच्याही अवस्थेपलीकडील होती. आनंदातिरेकाने मी जणू बेभान झालो. ह्या पराकोटीच्या आनंदाचे वर्णन करता येत नाही की तो सहनही करता येण्यासारखा नाही. आणि ह्या आनंदाबरोबर हे सारे विश्व शिवस्वरूप आहे, कल्याणस्वरूप आहे हे रहस्यही समजून आले; आणि माझ्या मनाची पुरेपूर खात्री झाली की, मनुष्यप्राणी हा हृदयाने सत्प्रवृत्त आहे; त्याच्यामध्ये आढळून येणारी दुष्ट प्रवृत्ती ही केवळ क्षुल्लक व क्षणिक आहे.

## प्रकरण - १०

# 10. माझे गुरू श्रीयुक्तेश्वर यांची व माझी भेट

"पूर्वतयारी न करता परीक्षा पास होणे या गोष्टीशिवाय इतर कोणताही चमत्कार परमेश्वरावरील श्रद्धा करून दाखविते." रिकाम्या वेळी मी एक 'प्रेरणात्मक' पुस्तक हातात घेतले. पण ते न आवडून मी बंद केले.

"लेखकाने दाखविलेला अपवाद त्याची परमेश्वरावरील पूर्ण अश्रद्धा दाखवतो." मी मनात म्हणालो, "गरीब बिचारा लेखक, रात्रीचे तेल जाळण्यावर त्याची फार श्रद्धा आहे!"

हायस्कूलचा अभ्यास पुरा करीन असे वचन मी बाबांना दिले होते. मला अभ्यासाचे ढोंग करता येत नसे. मी शाळेतल्या वर्गात क्वचितच दिसायचा. माझा बहुतेक सारा वेळ कलकत्त्यामधील गंगेच्या घाटावर एकान्त स्थळी जास्त जायचा. जवळची स्मशानभूमी म्हणजे योगीजनांची फारच आवडती जागा. रात्री ती जागा फारच भयंकर. शाश्वत तत्त्वाचा शोध घ्यायला जो बाहेर पडलेला आहे त्याला काही थोड्याशा कवट्यांनी भय वाटण्याचे कारण नाही. नाना तऱ्हेच्या हाडांनी बनलेला हा अस्थिपंजर पाहून मानवी दौर्बल्य अधिक जाणवते. माझे हे मध्यरात्रीचे जागरण अर्थात विद्यार्थ्यांच्या जागरणापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे होते.

हिंदू हायस्कूलमधल्या शेवटल्या परीक्षेचा आठवडा जवळ येत चालला होता. मध्यंतरीचा हा काळ म्हणजे फार भीतिदायक; स्मशानातील भुतांसारखा. इतके असून सुद्धा माझे मन शांत होते. या भुतावळीशी सामना करता करता वर्गात जे ज्ञान मिळत नसे ते मिळे. पण माझ्याजवळ स्वामी प्रणवानंदांसारखी एकाच वेळी सहज रीतीने दोन ठिकाणी वावरण्याची किमया नव्हती. पुष्कळांना पटणार नाही, पण माझी विचारसरणी अशी होती की, हा माझा शिक्षणाचा प्रश्न परमेश्वराच्याच हातात होता आणि तोच मला या अडचणीतून सोडविणार होता. भक्ताच्या अयुक्तिकपणाचे कारण असे असते की, त्याला हजारो आपत्प्रसंगी परमेश्वराने आपले निकटवर्तित्व गूढ रीतीने पटवून दिलेले असते.

"काय मुकुंदा, हल्ली तुझे दर्शन सुद्धा दुर्मिळ झाले आहे!" वर्गातील एका सोबत्याने गुरपार रोडवरून एके दिवशी दुपारी जात असताना मला हटकले.

"अरे, नंटू? वर्गात मी गैरहजर असतो ना, त्यामुळे माझी आता मोठी पंचाईत झाली आहे." मित्र भेटल्यावर माझी सारी हकीकत त्याला सांगून टाकली.

नंटू फार हुशार मुलगा होता; त्याला माझ्या बोलण्याचे मनापासून हसू आले. माझी अडचण ऐकून घेतल्यावर त्याला गंमतच वाटली.

"परीक्षेची तर तुझी काहीच तयारी नाही," तो म्हणाला, "आता मलाच तुला मदत केली पाहिजे!"

हे त्याचे साधे शब्द पण मला ते दैवी आश्वासनासारखे वाटले. मी तडकच माझ्या मित्राच्या घरी गेलो. परीक्षक साधारणपणे जे प्रश्न घालणार त्यांची त्याने तयार केलेली उत्तरे मला मोठ्या प्रेमळपणे सांगितली.

"हे प्रश्न असे आहेत की भोळ्या विद्यार्थ्यांची ते अगदी फसवणूक करतील. मी सांगितलेली उत्तरे नीट ध्यानात ठेव, म्हणजे तू अगदी सहीसलामत सुटशील."

मी त्याच्या घरून निघालो तेव्हा बरीच रात्र झाली होती. मी एकदम अगदी पंडित झालो. हे माझे पांडित्य थोड्याच दिवसांनी येणाऱ्या आणीबाणीच्या वेळपर्यंत टिकावे म्हणून मी मनोमन भक्तिपूर्वक प्रार्थना केली. नंटूने मला अनेक विषयांत तयार केले. पण संस्कृतची तयारी करून घेण्याचे वेळेच्या अभावी तसेच राहून गेले. ह्या आमच्या दुर्लक्षाबद्दल मी परमेश्वराला अगदी कळवळून आळविले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी हिंडावयाला निघालो चालता चालता पावलांच्या ठेक्यावर नवीन ग्रहण केलेल्या ज्ञानाचे चर्वण चालविले. कोपऱ्यावरच्या झुडुपातून एक जवळचा मार्ग काढीत मी चालत असताना माझी दृष्टी खाली पडलेल्या काही छापलेल्या सुट्या कागदांवर पडली. मी एकदम त्याच्यावर विजयानंदाने झडप घातली. माझ्या हातात काही संस्कृत सुभाषिते आली! मला त्यांचा धडपणे अर्थ लावता येईना. मी एका शास्त्रयांकडे गेलो. त्यांनी त्या सुभाषितांचा आपल्या भरीव आवाजाने अर्थ सांगावयास सुरुवात केली. त्या पुरातन भाषेच्या [1] नितळ मधुर सौंदर्याने वातावरण भरून गेले.

"हे श्लोक अपवादात्मक आहेत. हे बहुधा तुझ्या संस्कृतच्या परीक्षेला येणारे नाहीत." त्या पंडितांनी त्या श्लोकांचा असा साशंकपणे निकाल लावला.

पण त्या विशिष्ट कवितेशी परिचय झाल्याने दुसऱ्या दिवशी मला संस्कृतचा पेपर सोडवता आला. नंटूची मदत अगदी नेमकी उपयोगी पडली. बाकी साऱ्या विषयांत मला उत्तीर्ण होण्यापुरते गुण मिळाले.

मी माझा शब्द पाळला व माध्यमिक शिक्षणाचा अभ्यास पुरा केला, या गोष्टीचा वडिलांना आनंद झाला. मी कृतज्ञतेने परमेश्वराचे ताबडतोब आभार मानले. केवळ त्याच्याच संकेतामुळे मला नंटू भेटला व आडवाटेला केरकचऱ्याच्या जागी हिंडावयाची बुद्धी झाली हे माझ्या ध्यानात आले. माझी जी ह्या दिव्यातून सुटका झाली त्याचे कारण परमेश्वराने मला मदत केली हे होय. त्याने केवळ लीलेने आपल्या योजनेच्या पूर्तीकरिता दोन प्रसंगी अगदी नेमक्या वेळी मला मदत केली.

परीक्षेच्या जागी दैवी संकेताला अग्रेसरत्व नाकारणाऱ्या लेखकाची व त्याचे पुस्तक जे मी निरुपयोगी ठरविले त्याची मला आता आठवण झाली. मी मनातल्या मनात टीका करीत होतो, त्याचे मला हसू आवरेना.

शाळेतील शिक्षण पूर्ण करण्याकरिता परमेश्वराचे ध्यान व चिंतन आणि ते सुद्धा स्मशानात लावून बसणे हा एक जवळचा मार्ग आहे हे जर मी त्या लेखकाला सांगितले असते तर त्या सद्गृहस्थाचा अधिकच गोंधळ झाला असता.

आता मला जरा प्रतिष्ठा प्राप्त झाली होती त्यामुळे मी आता उघडपणे घर सोडून जाण्याचे ठरवीत होतो. माझा एक मित्र होता, जितेंद्र मजुमदार. [2] त्याच्याबरोबर वाराणशीला श्री भारत धर्म महामण्डल आश्रमात जाऊन तेथील आध्यात्मिक शिस्त पाळून राहण्याचे मी ठरविले.

कुटुंबातून बाहेर जाण्याच्या विचाराने एक दिवशी माझ्या मनाला फार विषण्णता आली. आईच्या मृत्युनंतर माझी माया, विशेषेकरून माझी लहान भावंडे, सनंदा, विष्णू व अगदी धाकटी बहीण थामू यांच्यावर विशेषच प्रगाढ झाली होती. मी माझ्या एकान्त स्थळी—ती लहानशी पोटमाळ्यावरची खोली—तेथे धावतच गेलो. त्या ठिकाणी मी संत्रस्त अवस्थेत अनेकदा साधना [3] केलेली होती. तेथे ध्यानाला बसलो. सतत दोन तास माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. एखाद्या रासायनिक औषधाने जसे शरीर शुद्ध व्हावे तसे माझ्यामध्ये एक विलक्षण परिवर्तन घडून आले. मायापाश [4] सगळे तुटले. सुहृदांचा सुहृद् जो परमेश्वर त्याचा शोध घेण्याचा माझा निश्चय अगदी वज्रलेप झाला.

वडिलांच्या पुढे मी आशीर्वाद मागण्याकरिता उभा राहिलो. वियोग दुःखाने त्यांचे हृदय अगदी विकल झाले होते. ते म्हणाले, “माझी एक शेवटची विनंती आहे. मला आणि ह्या तुझ्या शोकविव्हल भावंडांना अंतर देऊ नकोस.”

“पूज्य पिताजी, तुमच्याबद्दल मला जे प्रेम वाटते ते मी कसे व्यक्त करू? पण ज्याने मला ह्या भूलोकी आपल्यासारखा सर्व दृष्टींनी परिपूर्ण असा पिता दिला त्या माझ्या आकाशस्थ पित्यावर माझे अधिक प्रेम आहे. मला जाऊ द्या. काही एक विशेष दिव्य स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून घेऊन मी आपल्याला भेटायला परत केव्हा तरी येईन.”

वडिलांनी मोठ्या नाखुशीने संमती दिली व मी वाराणशीला आश्रमात जाण्यास निघालो. जितेंद्र तेथे अगोदर गेलेला होताच. मी तेथे गेल्यावर तेथील तरुण मुख्य स्वामी दयानंद यांनी माझे अंतःकरणपूर्वक स्वागत केले. त्यांची उंच व शेलाटी शरीरयष्टी; मुद्रा विचारी. मला ते रुबाबदार वाटले. त्यांचा चेहरा गोरा असून त्यांचे बुद्धाच्या चेहऱ्याच्या शांततेशी साम्य होते.

माझ्या नवीन राहत्या जागेत पोटमाळ्यावर एक खोली होती. ती पाहून मला फार बरे वाटले. तेथेच मी पहाटे आणि सकाळी बसत असे. आश्रमातील मंडळींना ध्यान, धारणा वगैरे विषयांबद्दल अगदीच थोडी माहिती होती. तेव्हा मी आश्रमाच्या संघटनेच्या कामात जास्त लक्ष घालावे असे त्यांना वाटे. मी दुपारी ऑफिसमध्ये काम करी; त्याची ते प्रशंसा करीत.

“परमेश्वर शोधण्याचा इतक्या लवकर प्रयत्न करू नकोस.” पोटमाळ्यावरच्या खोलीत अगदी लवकरच उठून जात असताना एक आश्रमवासी विद्यार्थी माझ्याबरोबर येत होता त्याने छद्मी आवाजात वक्तव्य केले. मी दयानंदांकडे गेलो. गंगेच्या किनाऱ्यावर तिचे चांगले दर्शन होईल अशी एक लहानशी खोली होती तेथे ते काम करीत बसले होते.

“स्वामीजी, येथे मी काय करायचे हे काही मला समजत नाही. मला परमेश्वराच्या प्रत्यक्ष अनुभूतीचा सरळ शोध घ्यावयाचा आहे. त्याच्या भेटीखेरीज केवळ एखाद्या संस्थेचा सदस्य होऊन, किंवा एका पंथात जाऊन किंवा काही सत्कर्मे करून माझे समाधान होणार नाही.”

भगवी वस्त्रे धारण करणाऱ्या स्वामींनी माझ्या पाठीवर प्रेमाने थाप मारली. रागावण्याचे लटके नाटक करून जवळपास असलेल्या काही शिष्यांना त्यांनी ताकीद दिली, “मुकुंदाला त्रास देऊ नका; आमची शिस्त तो स्वतः शिकेल.”

माझ्या मनात शंका आली पण मी ती बोलून दाखविली नाही. ते शिष्य तेथून गेले. त्यांच्यावर वरील ताकिदीचा काही विशेष परिणाम झालेला दिसला नाही. दयानंदजी पुढे

म्हणाले.

"मुकुंदा, तुझे वडील तुझ्याकरिता येथे वेळच्या वेळी पैसे पाठवीत असतात. ते तू परत करीत जा पाहू. तुला येथे त्याची जरूर नाही. शिस्तीच्या बाबतीत तुला सांगावयाची दुसरी गोष्ट म्हणजे जेवणाखाण्यासंबंधी. तुला जरी भूक लागली तरी तू त्याचे नाव काढू नकोस."

माझ्या डोळ्यांमध्ये माझी उपासमार होत असल्याचे दिसून येत होते की काय न कळे; पण मला भूक लागली आहे हे मला नक्की माहिती होते. आश्रमातील जेवणाची अगदी बिनचूक वेळ म्हणजे मध्यान्हाची. घरी असताना सकाळी नऊ वाजताच भरपूर न्याहारीची मला सवय होती.

ही तीन तासांची कळ मला दिवसेंदिवस सोसेनाशी झाली. कलकत्त्याला असताना दहा मिनिटे जरी उशीर झाला तरी आचाऱ्याला मी तंबी देत असे. जाऊ द्या, गेले ते दिवस! आता भूक आवरायचा मी प्रयत्न करू लागलो. मी एकदा सर्व दिवसभर उपास करून पाहिला. दुसऱ्या दिवशी दुपारी जेवणाच्या वेळी मला दुप्पट भूक लागली.

"दयानंदजीच्या गाडीला आज उशीर झाला आहे. ते आल्याखेरीज आपल्याला जेवायला बसता येणार नाही." जितेंद्राने ही भयानक बातमी आणली. स्वामीजी दोन आठवडे बाहेर होते. तेव्हा ते आज येणार म्हणून त्यांचे स्वागत करावयाचे म्हणून की काय, आज जरा काही विशेष मिष्ठान्न केले होते. हवेत अन्नाचा भूक वाढविणारा सुवास दरवळत होता. पोटात काही टाकण्याची सोय नव्हती. काल सारा दिवसभर मी उपास केला होता. त्याचा मला जरा अभिमान झाला होता तेवढाच फक्त गिळंकृत करायला मिळण्यासारखा होता.

"परमेश्वरा, गाडी लवकर येऊ दे." परमेश्वराची मी प्रार्थना करू लागलो. दयानंदजींनी मला शिस्त लावली. मी गप्प बसलो. तशी शिस्त काही त्या परमेश्वराला लावता येण्यासारखी नव्हती. त्याचे लक्ष दुसरीकडेच होते. इकडे घड्याळाचे ठोके वाजण्याचे चालूच होते. स्वामीजींनी दरवाज्यात पाऊल टाकले तेव्हा चांगला अंधार झाला होता. त्यांचे मी मोठ्या आनंदाने स्वागत केले.

जितेंद्राने पुनः पदार्पण केले व दुसरी वाईट बातमी जाहीर केली: "दयानंदजी स्नान वगैरे करतील आणि मग ध्यानाला बसतील. ध्यान झाल्यानंतर मग त्यांना आपल्याला वाढता येईल."

मी जवळ जवळ कोसळलोच. माझे वय लहान. माझ्या पोटाला उपासाची सवय नव्हती. माझ्या पोटात आगीचा डोंब उसळला, मी कुरकुरायला सुरुवात केली. भूकबळींची काही चित्रे मी पाहिली होती ती पिशाचासारखी माझ्या डोळ्यांसमोरून सरकू लागली.

"पुढला भूकबळी वाराणशीला होणार आणि तो या आश्रमात आणि आताच अगदी," मी मनात म्हणालो. बरोबर नऊ वाजता ही होणारी दुर्घटना टळली. भोजनाचे निमंत्रण आले. अगदी अमृतासमान! ह्या संध्याकाळची ही आठवण माझ्या पुढील आयुष्यात एक कायमचा ठसा ठेवून गेली.



*श्री योगानंद आणि स्वामी ज्ञानानंद, स्वामी दयानंदांचे गुरु, महामंडल आश्रम, वाराणसी येथे, 7 फेब्रुवारी, 1936. श्री योगानंद सन्मानाच्या परंपरागत संकेताप्रमाणे या आश्रमाचे प्रमुख ज्ञानानंदांच्या पायाशी बसले आहेत. 1910 मध्ये त्यांचे गुरु, स्वामी श्रीयुक्तेश्वरांच्या प्रथम भेटीपूर्वी योगानंदांनी कुमार वयात इथे आध्यात्मिक शिस्त जोपासली होती.*

मी जेवणात जरी अगदी मग्न होऊन गेलो होतो तरी दयानंदजींचे जेवणात लक्ष नव्हते हे माझ्या ध्यानात आल्याखेरीज राहिले नाही. या जड देहाच्या भोगापलीकडे ते होते हे उघड दिसत होते.

“स्वामीजी, आपल्याला भूक नव्हती लागली काय?” माझे भरपूर जेवण झाले होते आणि स्वामीजींबरोबर एकटाच मी त्यांच्या अभ्यासिकेत होतो.

“होय लागली होती!” ते म्हणाले, “मी गेले चार दिवस अन्नग्रहण केलेले नाही. अगदी पाणीसुद्धा प्यालो नाही. प्रवासात गाडीमध्ये मी कधी खात नाही. गाडीमध्ये नाना तऱ्हेची माणसे असतात. त्यांचे नाना विचार असतात. त्यांची विचार-आंदोलने नाना प्रकारची असतात. आमच्या आश्रमाला—संन्याशाला विहीत असे जे काही आचारधर्म शास्त्रात [5] सांगितले आहेत त्यांचे काटेकोरपणे मी पालन करीत असतो.

"आमच्या ह्या आश्रमाचे काही प्रश्न माझ्या मनात सारखे विचाराधीन असतात. आज रात्री घरी आल्यावर माझे जेवणात लक्ष लागले नाही. काय घाई आहे? उद्या व्यवस्थित जेवण घेऊ म्हणजे झाले!" आणि असे सांगून ते गमतीने हसले.

मी लाजेने अगदी गुदमरून गेलो. माझा तीव्र यातनेत गेलेला कालचा दिवस काही सहजासहजी विसरण्यासारखा नव्हता. पुनः बोलायचे मी धाडस केले.

"स्वामीजी, आपण मला जे सांगितले त्याने माझ्या मनात जरा गोंधळ उडून गेला आहे. समजा, मी खायला काही मागितले नाही आणि जर मला कोणी काही दिलेही नाही तर माझी उपासमार होऊन मी मरून जाईन."

"मग मरून जा." ह्या भयंकर सल्ल्याने जणू हवा दणाणून निघाली. माझा भीतीने थरकाप उडाला. "मुकुंदा, जरूर पडली तर तू मरायला तयार झाले पाहिजे. अन्नावरच तू जगत आहेस आणि ईश्वराच्या सामर्थ्यावर नाही हा समज मनातून काढून टाक. ज्याने शरीरपोषणाचा प्रत्येक प्रकार निर्माण करून ठेवला आहे, ज्याने भूक निर्माण केली आहे तो भक्ताचे पोषण कसे होईल हे नक्कीच पाहिल्याखेरीज राहणार नाही. भात वगैरे खाऊन तुझी शरीरधारणा होत आहे किंवा पैशामुळे तुझा निर्वाह होत आहे किंवा इतर माणसे तुला मदतीला आहेत म्हणून तुझे चालले आहे असे समजू नकोस. परमेश्वराने जर तुझा प्राणवायू काढून घेतला तर हे सर्व तुझ्या उपयोगी पडतील काय? हे सर्व पदार्थ म्हणजे केवळ त्याची साधने होत. तुझ्या पोटात जे अन्नाचे पचन होते ते काय तू करीत असतोस? तुझे काय चातुर्य आहे त्यात? मुकुंदा! विवेकाच्या तीक्ष्ण तलवारीचा उपयोग कर. आणि इतर मध्यस्थ लोक काय सांगतात ते सोडून दे व या मार्गाचे एकमेव कारण समजून घे!"

हे त्यांचे भेदक शब्द माझ्या मर्माला झोंबले. शारीरिक आवश्यक गरजा आत्म्यावर मात करतात ह्या पूर्वापारच्या भ्रमाचे पूर्ण निरसन झाले. तेथल्या तेथेच एकदम आत्मिक जीवनाची परिपूर्णता पटली. वाराणशीमधील ह्या आश्रमात मी जो हा धडा शिकलो त्याचा उपयोग अजमावण्याचे माझ्या पुढील आयुष्यात, सारखा प्रवास करीत असताना, नाना तऱ्हेच्या परक्या शहरांतून हिंडत असताना अनेक प्रसंग आले!

कलकत्त्याहून घरातून जेव्हा मी बाहेर पडलो तेव्हा माझ्याबरोबर एकच किमती चीज होती; ती म्हणजे साधूमहाराजांनी दिलेला चांदीचा ताईत; जो मला आईने तहाहयात म्हणून दिला होता. वर्षानुवर्षे मी त्याचे जतन करून ठेवले होते. आश्रमामध्ये माझ्या खोलीत तो मी अगदी काळजीपूर्वक एके ठिकाणी लपवून ठेवला होता. त्या ताइताचा पुनः एकदा चमत्कार पाहून पुनः आनंदाचा अनुभव घेण्याकरिता एके दिवशी सकाळी मी ती कुलुप लावलेली पेटी उघडली. त्याच्यावर सील केलेले वेष्टण तसेच होते, पण हाय! ताईत नाहीसा झालेला! रडत रडत मी त्यावरचे पाकीट फाडून माझ्या मनाची खात्री करून घेतली. पण काय, ताईत नाहीसा झालेला. साधुमहाराजांनी भाकीत केल्याप्रमाणे ज्या ईथरमधून त्यांनी तो काढून आणला होता त्या ईथरमध्ये तो परत नाहीसा झाला.

पुढे दयानंदांच्या सेवकमंडळींशी माझे पटेना. त्यांच्याशी माझे संबंध अधिकाधिक बिघडत चालले. आश्रमात आता मला परक्यासारखे वाटू लागले. मी अलिप्त राहायचे ठरविले तेव्हा सगळ्यांना दुखावल्यासारखे झाले. ध्यान करण्याच्या निश्चयाने मी घर व प्रापंचिक

महत्त्वाकांक्षा सोडलेल्या होत्या आणि त्या निश्चयाला मी चिकटून राहिलो. त्यामुळे लोक माझ्यावर उथळ टीका करू लागले.

अध्यात्ममार्गामध्ये अपेक्षित यश न मिळाल्यामुळे माझ्या मनाला फार तीव्र वेदना झाल्या होत्या. एकदा भल्या पहाटे मी माझ्या पोटमाळ्यावरील खोलीत बैठक मारून बसलो व अगदी निश्चित उत्तर मिळेपर्यंत उठायचे नाही असे ठरविले.

“हे दयावत्सल जगन्माते, तू स्वतः दृष्टान्त देऊन किंवा गुरू पाठवून मला बोध कर!”

कितीएक तास मी ढसढसा रडत होतो. माझ्या विनवणीला उत्तर मिळेना. आणि एकदम मला स्वतःला कोणीतरी वरती अमर्याद अशा एका गोलाकडे शरीराने उचलून धरीत आहे असे वाटू लागले.

“तुझे गुरुजी आज तुला भेटतील!” असा मला एक दिव्य स्त्रीसुलभ स्वर ऐकू आला. तो सर्व बाजूंनी ऐकू आला की कोणत्याच बाजूने ऐकू आला नाही.

एका विशिष्ट जागेतून हाक ऐकू आल्यामुळे हा इंद्रियातीत अनुभव येण्याचे बंद झाले. हबू ह्या टोपण नावाचा एक तरुण पुजारी मला जिन्याच्या खाली असलेल्या स्वयंपाकघरातून हाक मारीत होता.

“मुकुंदा, पुरे झाले हे तुझे ध्यान करणे! तुझ्याकरिता कोणाचा तातडीचा निरोप आला आहे.”

एरव्ही मी अधीरपणे उत्तर दिले असते; पण आता मी रडून रडून सुजलेले डोळे व चेहरा पुसला व अगदी आज्ञाधारकपणे निरोप घेतला. हबू आणि मी वाराणशीमधील दूरवर असलेल्या बंगाली मोहल्ल्यामधील बाजारामध्ये जाण्यास निघालो. आम्ही बाजारात काही जिनसा खरेदी केल्या. त्या वेळपर्यंत सूर्य डोक्यावर आला नव्हता. भारतात दुपारची वेळ म्हणजे कडक उन्हाची. तो मोहल्ला म्हणजे चित्रविचित्र रंगांचे कपडे घातलेल्या बायका, यात्रेकरूंना मार्गदर्शन करणारे वाटाड्ये, पंड्ये, साध्यासुध्या कपड्यांतील विधवा, विद्वान् ब्राह्मण, सर्वत्र आढळणारे वळू यांनी तो बाजार गजबजून गेलेला होता. ह्या गर्दीतून वाट काढीत काढीत आम्ही दोघे पुढे चाललो. आणि एका अरुंद, नजरेत न भरणाऱ्या अशा एका गल्लीच्या तोंडापर्यंत येऊन पोचलो.

तेथे गल्लीच्या टोकाशी एक येशू ख्रिस्तासारखे दिसणारे, भगवी वस्त्रे परिधान केलेले साधु अगदी निश्चल असे उभे होते. एकदम ते मला जुन्या परिचयाचे वाटले. एक क्षणभर मी त्यांच्याकडे अधाशी नजरेने पाहिले आणि एकदम माझ्या मनात शंका आली.

मी मनात म्हणालो, “तुला तुझ्या माहितीच्या अशा कोणाशी तरी तू ह्या भटक्या साधूचा घोटाळा करीत आहेस. वेड्या, स्वप्नात आहेस की काय तू? हो पुढे.”

दहा-एक मिनिटांनी पाहतो तो काय, माझे पाय जड झाल्यासारखे वाटले. जणू काय दगड झाल्यासारखे होऊन पुढे चालेचनात. मोठ्या कष्टाने मी मागे वळलो. माझे पाय नेहमीसारखे चालायला लागले. माझे तोंड विरुद्ध दिशेला केले, पुनः पायांत त्याच तऱ्हेचा जडपणा वाटू लागला.

“तो साधू मला लोहचुंबकासारखा आपल्याकडे ओढून घेत आहे” अशा विचाराने मी माझे सामान हबूच्या स्वाधीन केले. माझ्या पायांचा हा तऱ्हेवाईक खेळ तो आश्चर्याने पाहत होता.

आणि त्याला आता मनस्वी हसू लोटले.

"काय दुखतेय तुझ? तुला काय वेड लागलेय काय?"

भावनावेगाने मला उत्तर काही देता येईना. मी हळूहळू तेथून पुढे निघालो.

परत फिरून वाऱ्याच्या वेगाने मी चालू लागलो. त्या अरूंद गल्लीपर्यंत येऊन पोचलो. माझ्या चपळ दृष्टीला ती शांत मुद्रेची आकृती चटकन दिसली. ती माझ्याच दिशेने एकाग्र दृष्टीने संथपणे पाहत होती. उत्सुकतेने आणखी काही पावले पुढे चाललो आणि त्यांच्या पायांशी येऊन मी पोचलो.

"गुरुदेव!" ती दिव्य मुद्रा. त्या मूर्तीचे माझ्या मनोमय दृष्टीला हजार वेळा दर्शन झाले असेल. ते शांत, स्थिर डोळे, निमुळती दाढी व रुळलेल्या केसांचे झुबके असलेला सिंहासारखा चेहरा माझ्या चांगला ध्यानात आला. ह्याच मुद्रेने रात्रीच्या माझ्या अनेक भेसूर तंद्रींमध्ये अनेकवार दर्शन दिलेले होते. त्या दर्शनाबरोबर मला हायसे वाटायचे. पण त्याचा अर्थ त्या वेळी मला पुरेसा कळलेला नव्हता.

"माझ्या राजसा, माझ्याकडे आलास?" असे शब्द माझ्या गुरूंनी बंगाली भाषेत अनेकवार उच्चारले. त्यांचा आवाज आनंदाने कापरा झाला होता. "किती वर्षे मी तुझी वाट पाहत आहे!"

आम्ही दोघेही निःस्तब्ध झालो. निःस्तब्धता एकात्मतेची होती. शब्दांनी, जुजबी शब्दांनी बोलण्याची जरूरच राहिली नव्हती. गुरुच्या हृदयापासून शिष्याकडे निःस्तब्ध अशा गीतांत वक्तृत्वाचा प्रवाह वाहू लागला. वादातीत संवेदनात्मक इंद्रियांच्या ग्रहणक्षमतेने अजमावल्यावर मला असे वाटू लागले की, परमेश्वर यांच्या चांगलाच परिचयाचा आहे व हे मला त्याच्यापर्यंत नेऊन पोहोचवितील. पूर्वजन्मीच्या स्मृती जागृत झाल्या. त्यांच्या अंधुक आणि धूसर अरुणोदयापुढे या जीवनाचे मायावी आवरण विरल होऊ लागले. काय नाट्यपूर्ण काळ! भूत, वर्तमान व भविष्य हे ह्या कालचक्राचे देखावे होत. त्या पवित्र चरणांशी नेणारा हा काही पहिलाच दिवस नव्हता.

हातात हात घालून माझ्या गुरूंनी शहराच्या राणामहाल मोहल्ल्यातील आपल्या तात्पूरत्या मुक्कामी मला नेले. त्यांची आकृती एखाद्या कसलेल्या खेळाडूप्रमाणे होती; व त्यांची पावले जमिनीवर दृढपणे पडत होती. त्यांची शरीरयष्टी उंच व सरळ होती. वय साधारणपणे या वेळी पंचावनच्या आसपास असावे. पण एखाद्या तरुणाप्रमाणे त्यांची हालचाल चपळ व जोमदार होती. त्यांचे डोळे काळेभोर व विशाल होते. अगाध ज्ञानामुळे ते सुंदर दिसत होते. केस किंचित कुरळे, पण त्यामुळे त्यांच्या चेहऱ्याची उग्रता मृदू झाली होती. त्यांच्यामध्ये सामर्थ्य व मृदुता यांचा सूक्ष्म मिलाफ घडून आला होता.

त्यांच्या घराच्या फरसबंद बाल्कनीतून गंगेचा प्रवाह दिसत होता. त्या बाल्कनीत जाताच ते प्रेमळपणाने मला म्हणाले:

"मी तुला आपला आश्रम व जे काही माझ्याजवळ आहे ते देऊन टाकीन."

"महाराज, मी आपल्याकडे ज्ञानाचा लाभ व ईश्वरी साक्षात्कार व्हावा म्हणून आलो आहे. आपले हे खजिने मला पाहिजे आहेत."

भारतातील संध्याकाळचा सत्वर पडणारा संधिप्रकाश आपला पडदा अर्धवट टाकू लागला होता. ते माझ्याशी पुनः बोलू लागले. त्यांच्या नेत्रांमध्ये अथांग प्रेमळपणा भरून राहिलेला होता.

“मी तुला माझे निःशर्त प्रेम देतो.”

काय बहुमोल शब्द! त्यांच्या ह्या गूढ प्रेमाचा मला आणखी पंचवीस वर्षांनी पुनः अनुभव आला. उत्साहाचा आवेश त्यांच्या ओठांना अपरिचित होता. सागरसदृश अशा त्यांच्या अंतःकरणाला मौन शोभत होते.

“तू सुद्धा मला तसेच निःशर्त प्रेम देशील काय?” बालसदृश विश्वासाने त्यांनी माझ्याकडे पाहिले.

“गुरुदेव, मी आपल्यावर शाश्वत प्रेमच करीत राहीन!”

“सामान्यतः प्रेम हे स्वार्थी असते, वासना व त्यांची तृप्ती यांमध्ये त्याची मुळे फार खोलवर गेलेली असतात. दिव्य प्रेम हे अनिर्बंध असते; त्याला मर्यादा नसते; त्यात अंतर पडत नाही. शुद्ध प्रेमाचा खिळवून टाकणारा स्पर्श होताच मानवी अंतःकरणाचा प्रवाह कायमचा बंद होतो.” ते नम्रपणे आणखी सांगू लागले, “साक्षात्कारी अवस्थेतून मी खाली पडत आहे असे जर आढळले तर माझे डोके तुझ्या मांडीवर घे आणि ज्या विश्वजननीची आपण दोघेही पूजा करतो तिच्याकडे मला पुनः आणण्याच्या कामी मदत करण्याचे वचन दे.”

अंधकार जास्त होऊ लागला. ते उठले आणि मला एका आतल्या खोलीत घेऊन गेले. आणि तेथे आम्ही आंबे व बदामाची बर्फी खात असता त्यांनी आपल्या सहज संभाषणातून माझा स्वभाव दाट परिचयाचा असल्याचे दर्शित केले. त्यांच्या ज्ञानाची विशालता पाहून मी आश्चर्याने थक्क होऊन गेलो. त्यांच्या ज्ञानाला नैसर्गिक विनयाची जोड होती.

“तुझा ताईत हरवला म्हणून वाईट वाटून घेऊ नकोस. त्याचे कार्य आता संपले आहे.” एका दिव्य आरशाप्रमाणे माझ्या गुरूंनी माझ्या साऱ्या आयुष्याचे प्रतिबिंब उमटवून दिल्यासारखे दिसले.

“गुरुदेव, आपली प्रत्यक्ष उपस्थिती हीच मोठ्या अप्रतिम आनंदाची गोष्ट आहे.”

“आता स्थित्यंतर होण्याची वेळ आली आहे; कारण तुला आश्रमात राहण्याचा कंटाळा आला आहे. तेथे तुला बरे वाटत नाही.”


माझ्या आयुष्याबाबत अजूनपर्यंत मी त्यांना कोणतीही गोष्ट सांगितली नव्हती आणि ती सांगण्याचीही आता काही जरुरी उरली नव्हती. त्यांना दूरदृष्टी होती. अंतर्ज्ञानशक्ती होती, त्यामुळे लोकांना ते ज्ञान प्रत्यक्ष शब्दांनी सांगून त्यांच्याकडून आश्चर्योद्गार काढून घेण्याची त्यांची इच्छा नव्हती, हे मला त्यांच्या नैसर्गिक व नम्र वागणुकीवरून समजले.

“तू कलकत्त्याला परत जावेस. मानवजातीवर तुला प्रेम करावयाचे आहे ना? मग त्यातून नातेवाइकांना तू का वगळतोस?”

त्यांची ही सूचना ऐकून माझा धीरच खचला. माझ्या घरातल्या मंडळींची विनवणीची पत्रे मला खूप येत. पण कोणत्याही पत्राला मी उत्तर असे पाठविले नव्हते. पण त्यांना आपले असे वाटावयाचे की मी परत घरी येईन. अनंता म्हणे, “या लहान पक्ष्याला अध्यात्मविद्येच्या आकाशात खुशाल उडू द्या. पण तिथल्या जड वातावरणात त्याचे पंख थकून जातील तेव्हा

तो परत घरी झेप टाकून येईल हे आपण पाहूच. पंख मिटवून तो आपल्या घरकुलात विश्रांती घ्यायला येईल हे निश्चित.” ही नाउमेद करणारी उपमा माझ्या मनात अजून ताजी होती. पण काही केल्या कलकत्त्याच्या दिशेने परत झेप टाकायची नाही हे मी नक्की ठरविले होते.

“गुरुदेव, मी घरी जाणार नाही. मी तुमच्याबरोबर तुम्ही जाल तेथे येणार. मला आपले नाव व पत्ता सांगाल काय?”



*श्री श्री स्वामी श्रीयुक्तेश्वर गिरी (1855-1936)*
*"ज्ञानावतार"*
*श्री श्री लाहिरी महाशयांचे शिष्य;*
*श्री परमहंस योगानंदांचे गुरु,*
*यो.स.सो./एस.आर.एफ. च्या सर्व क्रियायोगींचे परमगुरु*

“स्वामी श्रीयुक्तेश्वर गिरी. माझा मुख्य आश्रम सेरामपूरला आहे, रायघाट लेनमध्ये. मी येथे थोडे दिवस आलो आहे. माझ्या आईला भेटायला.”

परमेश्वर आपल्या भक्तांबरोबर काय गुंतागुतीचे नाटक खेळतों ह्याचे मला आश्चर्य वाटले. सेरामपुर कलकत्त्यापासून फक्त बारा मैल, पण त्या भागात मला कधी गुरूंचे ओझरते सुद्धा दर्शन झाले नाही. लाहिरी महाशयांच्या स्मृतींनी पुनीत झालेल्या पुरातन काशीपुरीमध्ये (वाराणशी) आम्हांला एकमेकांना भेटण्याकरिता यावे लागले. ह्या भूमीला भगवान् बुद्ध, श्रीमत् शंकराचार्य [6] आणि अनेक योग्यांच्या पायांनी पुनीत केले आहे.

“तू चार आठवड्यांनी माझ्याकडे येशील.” प्रथमच मी श्रीयुक्तेश्वरांचा कठोर आवाज ऐकला. “आता तुला माझे कायमचे प्रेम मिळेल म्हणून तुला सांगितले आणि तू माझ्याकडे आलास म्हणून मी आनंद दर्शविला, तेव्हा माझी विनंती अमान्य करण्यास तू मोकळा आहेस. पुनः जेव्हा तू मला भेटशील तेव्हा तुला माझे प्रेम परत संपादन करावयास लागेल. आणि तुझा मी मग शिष्य म्हणून सहजासहजी स्वीकार करणार नाही. माझ्या कडक शिस्तीचे पालन करण्याकरिता संपूर्ण शरणागती पत्करावी लागेल.”

मी तसाच हट्ट चालवून गप्प उभा राहिलो. माझ्या गुरूंनी माझ्या अडचणीचा ताबडतोब थांग लावला.

“तुझे नातेवाईक तुला हसतील असे तुला वाटते काय?”

“मी परत जाणार नाही.”

“तू तीस दिवसांत परत जाशील.”

“कधीही जाणार नाही.”

ही मतभेदाची तेढ तशीच राहिली. मी त्यांच्या पायांवर आदराने नमस्कार केला आणि तेथून निघालो. मी मध्यरात्रीच्या अंधारात रस्ता कापीत होतो आणि माझ्या मनात असे विचार आले की, आम्हा दोघांची ही जी चमत्कारिक रीतीने भेट झाली ती अशी विफल का व्हावी? मायेच्या तराजूच्या पारड्यांत सुखाच्या बरोबरीने दुःखाचे मोजमाप होते. माझे कोवळे हृदय अजून गुरूंच्या हातांकरवी ठाकून ठोकून आकार देण्यासारखे लवचिक झाले नव्हते.

दुसऱ्या दिवशी मी जो पाहतो आहे तो आश्रमातील लोकांमध्ये माझ्याबद्दलचा एक विरोधी भाव वाढत असल्याचे दिसून आले. तीक्ष्ण भाल्याने टोचल्यावर जशा वेदना होतात तशा त्यांच्या सारख्या टोचून बोलण्याने माझ्या मनाला वेदना झाल्या. तीन आठवडे उलटले. दयानंदजी मुंबईला भरणाऱ्या एका परिषदेला हजर राहण्याकरिता तिकडे गेले.

“मुकुंदा म्हणजे ऐतखाऊ आहे. आश्रमातील आदरातिथ्याचा तो फुकट स्वीकार करीत आहे. त्याचा कोणत्याही स्वरूपात तो मोबदला म्हणून काही देत नाही.” असे उद्गार मी आडून ऐकले, तेव्हा अगदी प्रथमच मला खेद वाटला की, बाबांनी पाठविलेले पैसे मी दयानंदजींच्या आज्ञेवरून परत केले. अगदी जड अंतःकरणाने माझा जो एकमेव मित्र जितेंद्र त्याची मी गाठ घेतली.

“मी जात आहे. दयानंदजी जेव्हा परत येतील तेव्हा त्यांना तू माझ्यातर्फे माझे प्रणाम व दिलगिरी सादर कर.”

"मी सुद्धा निघालो. येथे ध्यान लावून बसण्याच्या प्रयत्नांत तुझ्यासारखीच माझ्या बाबतीतही प्रगती झाली नाही." जितेंद्र निश्चयाने बोलला.

"येशू ख्रिस्तासारख्या एका संतमहात्म्याची माझी भेट झाली आहे. ते सेरामपूरला राहतात. तेथे आपण त्यांना भेटू या."

आणि अशा तऱ्हेने त्या 'पक्ष्याने' कलकत्त्याच्या परिसरात धोका पत्करून झडप घालण्याची तयारी केली!




*योगानंदजी, त्यांच्या वडिलांनी दिलेल्या मोटरसायकलच्या मागील सीटवर, 1915 मध्ये."मी ती घेऊन सर्वत्र हिंडलो," ते म्हणाले, "विशेषकरुन माझ्या गुरुंना, श्रीयुक्तेश्वरांना त्यांच्या श्रीरामपूर आश्रमात भेटण्यासाठी."*

1 संस्कृत—"सुसंस्कृत, पूर्ण." सर्व इंडो-युरोपियन भाषांची संस्कृत ही ज्येष्ठ भगिनी आहे. तिच्या लिपीला 'देवनागरी' असे नाव आहे. 'देवनागरी' चा शब्दशः अर्थ देवांचे नगर—वसतिस्थान. पाणिनी हा प्राचीन भारतातील मोठा व्याकरणकार. त्याने संस्कृत भाषेमध्ये गणितशास्त्र व मानसशास्त्र यांच्या दृष्टीने जी पूर्णता आढळते त्याचा गौरव केला आहे. तो म्हणतो, "ज्याला माझे व्याकरण समजेल, त्याला परमात्म्याची ओळख झाली असे समजावे." जो मनुष्य भाषेचा मुळापासून अभ्यास करतो तो अंती सर्वज्ञच होतो.

2 वाघांबद्दल ज्याने मनात धास्ती घेऊन पलायन केले तो जतींदा (जोतिन घोष) हा नव्हे.

3 मार्ग; ईश्वरप्राप्ती साध्य करून घेण्याचा पूर्वतयारीचा मार्ग.

4 हिंदू धर्मशास्त्रांची शिकवण अशी आहे की, कौटुंबिक आसक्ती ही *माया* आहे; ही फसवी आहे. ती साधकाला परमेश्वराच्या शोधापासून वंचित करते. प्रेमळ आप्तजन, फार काय, पण प्रत्यक्ष मानवी जीवनही परमेश्वराचेच वरदान होय. जीसस्ची

शिकवण अशीच आहे. “जो माझ्यापेक्षा आपल्या पित्यावर किंवा आईवर जास्त प्रेम करतो तो माझ्याबरोबर राहण्यास योग्य नाही.” मॅथ्यू १०:३७ (बायबल).

5 शास्त्र संबंधित, शब्दार्थाने, “पवित्र ग्रन्थ,” ज्यात चार प्रकारच्या ग्रंथांचा समावेश आहे: श्रृति, स्मृति, पुराण, तंत्र. या सर्वसमावेषक ग्रंथामध्ये धार्मिक व सामाजिक जीवनाच्या आणि विधि, वैद्यकशास्त्र, वास्तुशास्त्र, कला, विज्ञान व इतर विषयांच्या प्रत्येक स्वरूपाचे समावेश आहे. श्रृति म्हणजे “प्रत्यक्ष ऐकलेले” किंवा “प्रकट केलेले” ग्रंथ, ते वेद. स्मृति म्हणजे स्मरण आधारित पूर्वापार चालत आलेले विशेष ज्ञान जे प्राचीन काळात कधी तरी महाभारत आणि रामायण या विश्वातल्या सर्वात लांब महाकाव्यांच्या रुपात लिहून घेण्यात आले. पुराण, शब्दार्थाने “प्राचीन” रुपक; हे संख्येने अठरा आहेत; तंत्र, शब्दार्थाने “विधी” किंवा “धार्मिक रूढ संस्कार.” हे ग्रन्थ विस्तृत प्रतीकांच्या पडद्याखाली गहन सत्य व्यक्त करतात.

6 शंकराचार्य (शंकर) भारताचे दोन हजार वर्षापूर्वीचे सगळ्यांत मोठे तत्त्वज्ञ. हे गोविंद यतींचे शिष्य होते व गोंविद यती हे गौडपादांचे शिष्य होते. गौडपादाचार्यांनी ‘मांडुक्यकारिका’ नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे; त्यावरील शंकराचार्यांची टीका प्रसिद्ध आहे. त्यांनी आपल्या अनिर्वाच्य अशा तर्कशुद्ध विचारप्रणालीने व सुंदर शैलीने वेदांचा केवळ अद्वैत सिद्धान्तानेच अर्थ लावला आहे. ह्या महान एकेश्वरवाद्याने इतर अनेक भक्तिवर स्तोत्रे रचलेली आहेत. त्यांच्या ‘श्रीदेव्यपराधक्षमापन’ स्तोत्रामधील श्लोकांचे शेवटचे ध्रुवचरण असे आहे.

“कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति।”

शंकराचार्यांचा एक शिष्य सानंदन याने ब्रह्मसूत्रांवर (वेदान्त तत्त्वज्ञान) एक भाष्य लिहिलेले आहे. याचे हस्तलिखित जळून नष्ट झाले होते; पण शंकराचार्यांनी (त्यांनी फक्त त्यावरून एकदा नजर फिरविली होती) ते पुनः शब्दन् शब्द बिनचूक आपल्या शिष्याला म्हणून दाखविले. ह्या भाष्याचे नाव ‘पंचपादिका’ असे आहे. आजही त्या भाष्याचा विद्वान लोक अभ्यास करतात.

हा जो शिष्य सानंदन त्याला एका अद्भुत प्रसंगानंतर नवीन नाव मिळाले. नदीच्या तीरावर एकदा ते बसले असताना समोरच्या तीरावरून शंकराचार्यांनी मारलेली हाक त्यांना ऐकू आली. सानंदनाने त्याबरोबर एकदम पाण्यात उडी घातली. तेव्हा शंकराचार्यांनी त्या भिरभिरणाऱ्या नदीच्या प्रवाहात कमळांच्या फुलांचा गालिचा निर्माण केला व त्या गालिचाने सानंदनास पाय ठेवण्यास आधार मिळाला. सहजगत्या त्याच्या श्रद्धेसही तितकाच भक्कम आधार मिळाला. सानंदनास त्यामुळे ‘पद्मपाद’ असे पुढे नाव मिळाले. ‘पंचपादिके’ मध्ये पद्मपादांनी आपल्या गुरूबद्दल जागोजाग प्रशंसापर व भक्तिपर उद्गार काढलेले आहेत. शंकराचार्यांनी स्वतः काही सुंदर ओळी लिहिल्या: “या तिन्ही लोकांत खऱ्या गुरूची दुसऱ्या कशाशीही तुलना करता येण्यासारखी नाही. पारसमणी जर खरा मानला तर असे सांगता येईल की, त्याच्या स्पर्शाने फक्त लोखंडाचे सोने होते पण तो स्पर्श लोखंडास पारसमणी करीत नाही. याच्या उलट पूज्य असा गुरू आपल्या पायांशी शरण आलेल्या शिष्यास आत्ममयच करून टाकतो. अशा तऱ्हेने गुरू हा अद्वितीय आहे; खुद्द परमात्मस्वरूप आहे. (शतश्लोकी—१)

भगवान शंकरांच्या ठिकाणी संतत्व, पांडित्य आणि कर्तृत्वाचा दुर्लभ मिलाफ झाला होता. ते केवळ बत्तीस वर्षेच जगले, पण त्यातली बहुतेक वर्षे त्यांनी आपल्या अद्वैत मताच्या प्रसारासाठी संपूर्ण भारताच्या काना-कोपऱ्यात दुःसाध्य यात्रेंमध्ये लावली. ह्या अनवाणी तरुण संन्याशाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या समाधानकारक ज्ञानाच्या प्रवाहाला ऐकण्यासाठी हजारो लोक गोळा होत.

सुधारणेसाठी केलेल्या त्यांच्या विभिन्न कार्यांमध्ये प्राचीन स्वामी परंपरेच्या पुनर्रचने चे पण समावेश आहे. (पहा पृ. ३१७-३१८) त्यांनी भारताच्या चार कोपऱ्यांवर चार मठ स्थापित केले—दक्षिणमध्ये शृंगेरी, पुर्वेमध्ये पुरी, पश्चिमेमध्ये द्वारका आणि उत्तरेच्या हिमालयक्षेत्रामध्ये बद्रीनाथ.

सामान्य लोकांकडून तसेच राजा-महाराजांकडून उदारपणे समर्थन प्राप्त ह्या महान अद्वैतवादी चे हे चार मठ, संस्कृत व्याकरण, तर्कशास्त्र आणि वेदान्त दर्शनाचे शिक्षण विनामूल्य देतात. भारताच्या चार कोपऱ्यांवर हे मठ स्थापित करण्यात शंकराचार्यांचा हेतु ह्या संपूर्ण विशाल भू भागा वर धार्मिक व राष्ट्रीय ऐक्य वाढविण्याचा होता.

प्रकरण - ११

# 11. वृंदावनात दोन निर्धन बालक

"वडिलांनी तुला काहीएक द्यावयाचे नाही असे ठरविले म्हणजे तुझे डोळे उघडतील, मुकुंदा! काय मूर्खासारखे आयुष्य वाया घालवीत आहेस!" घरी गेल्यावर आमच्या वडील बंधूंचे प्रवचन, उपदेशामृत आमच्या कानांवर जोरजोराने आदळू लागले.

जितेंद्र आणि मी नुकतेच गाडीतून उतरून, ताजेतवाने होऊन (म्हणण्याचा प्रघात आहे; कारण आमचे चेहरे अगदी धुळीने भरून गेले होते) अनंतदादाच्या घरी नुकतेच येऊन पोहोचलो होतो. त्याची नुकतीच कलकत्त्याहून आग्रा ह्या प्राचीन शहरी बदली झालेली होती. माझा भाऊ सध्या सरकारच्या पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटमध्ये सुपरवायझिंग अकाउंटंटचे काम करीत होता.

"अनंतदादा, तुला चांगलं माहीत आहे ना, की मला जे काही मागायचे आहे ते आकाशस्थ पित्याकडून, परमेश्वराकडूनच मागायचे आहे."

"प्रथम पैसा, नंतर परमेश्वर! कोणाला माहीत, आयुष्य पुष्कळ वर्षे जगायला लागले म्हणजे?"

"परमेश्वर प्रथम. संपत्ती ही त्याची दासी आहे! कोणाला माहीत, आयुष्य अगदी थोडेच नसेल कशावरून?"

माझा हा टोमणा बोलण्याच्या ओघात प्रसंगोपात्त दिला गेला. काही अशुभसूचक भविष्य मला वर्तवावयाचे नव्हते. (दुर्दैवाची गोष्ट अशी की, अनंतदादाचे आयुष्य लवकरच पुढे संपुष्टात आले.) [1]

"आश्रमात राहून हेच शहाणपण शिकलास वाटते? पण मला वाटते, तू आता वाराणशीला रामराम ठोकलास." अनंताच्या डोळ्यांत समाधानाची चमक दिसू लागली माझे पंख दाबून धरून मला कुटुंबाच्या घरट्यात डांबून ठेवता येईल अशी त्याला अजून आशा होती.

"वाराणशीमधील माझे अल्प वास्तव्य अगदीच फुकट गेले नाही! माझे हृदय ज्याचा वेध घेत होते ते सगळे मला तेथे सापडले! ते विद्वान पंडित व त्यांचे चिरंजीव ह्यांना काही ते देता आले नाही हे नीट ध्यानात ठेवावे!"

ती जुनी आठवण काढल्यावर अनंताही माझ्याबरोबर हसू लागला. त्याला कबूल करणे भाग पडले की, वाराणशीचा जो 'दूरदर्शी' मनुष्य माझ्यासाठी निवडला होता तो ऱ्हस्वदृष्टीचा निघाला.

"अहो भटकेबुवा, काय करायचे ठरवलेय तुम्ही आता पुढे?"

"जितेंद्राने मला आग्र्याला ओढून आणले. येथे आता आधी ताजमहाल पाहून घेऊ." मी खुलासा करू लागलो. "नंतर आम्ही आमच्या नवीन शोधलेल्या गुरूंच्या भेटीला जाऊ. त्यांचा सेरामपूरला आश्रम आहे."

अनंताने आमची व्यवस्था चांगली ठेविली होती. संध्याकाळच्या वेळी कितीकदा तो माझ्याकडे सारखी नजर लावून बघत राहायचा.

"ती नजर माझ्या पूर्ण परिचयाची आहे," मी मनात म्हणालो, "काही तरी कट शिजतोय!"

दुसऱ्या दिवशी सकाळी चहाच्या वेळी त्या कटाची वाच्यता झाली.

"म्हणजे तुला वडिलांचे काही एक नको आहे." कालच्या संभाषणाचा धागा अनंताने परत हातात घेतला, त्या वेळी त्याचे डोळे अगदी निर्व्याज होते.

"माझा सारा आधार त्या परमेश्वरावर आहे, इतके मी जाणतो."

"बोलणे सोपे आहे! आतापर्यंत आयुष्यात तुला अडचण अशी आली नाही. अन्नपाण्याकरिता व निवाऱ्याकरिता तुला अदृश्य अशा त्या शक्तीपुढे हात पसरावा लागला असता तर तुझी काय स्थिती झाली असती? थोड्याच अवधीत तू रस्त्र्यावर भीक मागायला लागला असतास!"

"मुळीच नाही. कधीही नाही. ईश्वराच्या ऐवजी रस्त्र्याने जाणाऱ्यायेणाऱ्यांवर माझी मी भिस्त ठेविली नसती! भिकेची नरोटी आपल्या भक्ताच्या हातात देण्याऐवजी त्याने इतर हजार उपाय शोधून काढले असते."

"बोलण्यात तू मोठा चतुर आहेस रे! समज, तुझे हे बढाईखोर तत्त्वज्ञान ह्या दृश्य जगात कसोटीला लावले तर?"

"मला कबूल आहे! ईश्वर म्हणजे असा आहे की काय की तुम्ही त्याला काल्पनिक जगात कोंडून ठेवावे?"

"बघू आता आपण; आज तुला माझी मते बदलण्यास किंवा ती दृढ करण्यास संधी मिळणार आहे." असे बोलून अनंता क्षणभर थांबला आणि नंतर मग तो संथपणे पण गंभीरपणे बोलू लागला.

"आता मी असे ठरवितो की, तू व तुझा शिष्य-बंधू जितेंद्र असे दोघे आज सकाळी वृंदावन शहरात जा; जवळच आहे ते. पण जवळ मात्र एक दिडकी सुद्धा घ्यायची नाही; तसेच अन्नाकरिता किंवा पैशाकरिता कुठे याचना करायची नाही. तुमची विपत्ती कोणालाही सांगायची नाही. तसेच दुपारी कोठे तरी तुम्ही जेवण हे घेतलेच पाहिजे आणि वृंदावनामध्ये अडकून राहायचे नाही. आणि जर ह्या कसोटीची कोणतीही शर्त न मोडता आज रात्री बारापर्यंत माझ्या बंगल्यावर परत व्यवस्थित आलात तर या साऱ्या आग्रा शहरात माझ्याइतके कोणालाही आश्चर्य वाटणार नाही!"

मी ते आव्हान स्वीकारले. माझ्या शब्दांत किंवा हृदयात काहीएक दुविधा नव्हती. ज्या ज्या वेळी परमेश्वराची मदत मला ताबडतोब लाभली त्या सर्व कृतज्ञतापूर्ण स्मृती माझ्या मनःश्चक्षूंसमोरून सर्रकन पुढे सटकल्या. लाहिरी महाशयांच्या तसबिरीपुढे विनवणी करून बरे झालेले माझे कॉलऱ्याचे दुखणे; लाहोरला असताना गच्चीवर पतंगांची रस्सीखेच चालू असताना मिळालेले दोन पतंग; बरेलीला असताना माझी दारूण निराशा झाली होती तेव्हा अगदी आयत्या वेळी झालेला ताईताचा लाभ; वाराणशीला पंडितांच्या घराच्या अंगणात साधूकडून मिळालेला निर्णायक संदेश; जगन्मातेचे घडून आलेले दर्शन व तिचे प्रेमळ व अधिकारवाणीने उच्चारलेले शब्द; माझा क्षुल्लक गोंधळ झाला असताना मास्टर महाशयांच्या

करवी तिने ताबडतोब केलेली मदत; हायस्कूलमधील शेवटच्या परीक्षेच्या वेळी अगदी आयत्या वेळी झालेले मार्गदर्शन आणि त्यानंतर मिळालेला वर; आयुष्यभर होत असलेल्या स्वप्नांमधून आता होत असलेली जिवंत प्रत्यक्ष गुरूची भेट. जगाच्या कठीण अशा कसोटीभूमीवर कोणत्याही संघर्षाला दाद देणारे असे माझे तत्त्वज्ञान दुबळे आहे हे मी कधीही कबूल केले नसते!

"हे तुला कबूल आहे ही गोष्ट तुला भूषणावह आहे. आता मी ताबडतोब तुम्हांला गाडीत बसवून देतो," अनंता म्हणाला.

तोंड वासून बसलेल्या जितेंद्राकडे वळून तो पुढे म्हणाला, "तूही जा त्याच्याबरोबर; साक्षीदार म्हणून तुझा उपयोग होईल. आणि तूही त्याच्याबरोबर सगळे सहन कर!"

अर्ध्या तासाने आम्हा दोघांच्या हातांत प्रवासाची जाण्यापुरतीच तिकिटे आली. स्टेशनच्या एका कोपऱ्यात अनंताने आमची झडती घेऊन पाहिली. आमच्याजवळ काहीएक लपवून ठेवलेले नव्हते हे पाहून अनंताचे समाधान झाले. आमच्या साध्यासुध्या धोतरात जरूर त्याच्यापेक्षा काहीच लपवून ठेवलेले नव्हते.

पैशाची गंभीर गोष्ट निघाल्यावर श्रद्धा डळमळू लागली; माझा दोस्त कुरकुरत म्हणू लागला, "अनंता, माझ्याजवळ एकदोन रुपये अडीअडचणीकरिता ठेवून द्या; समजा, आमच्यावर काही आपत्ती कोसळली तर निदान तार तरी करता येईल."

मी त्याला ताडकन रागावून मागे खेचले व म्हणालो, "जितेंद्र, जर तू अडीअडचणीला म्हणून काही पैसे घेतलेस तर ह्या कसोटीला मी तयारच होणार नाही.

"नाण्याच्या आवाजात काहीतरी हायसे वाटण्यासारखे असते." जितेंद्र काही बोलला नाही. मी त्याच्याकडे रागाने पाहत होतो.

"मुकुंदा, मला काही थोडेतरी हृदय आहे." अनंताच्या आवाजात नम्रतेची छटा आली होती. त्याची सदसद्विवेकबुद्धी त्याला टोचत असावी. परक्या शहरात दोन पोरांना जवळ काही न देता पाठवून देणे म्हणजे त्रासदायकच नाही का? आणि ते सुद्धा त्याची स्वतःची धर्मावर साशंक दृष्टी होती म्हणून. "आणि जर नशिबाने किंवा ईश्वरी कृपेने तू ह्या वृंदावनच्या अग्निदिव्यातून यशस्वीपणे पार पडलास तर मी तुझा चेला होईन, मला दीक्षा द्यायला तुला सांगेन."

हे जे त्याचे वचन दिल्यासारखे बोलणे होते ते थोडेसे चुकीचे होते. प्रसंग जरा वेगळा खरा; पण भारतीय कुटुंबामध्ये थोरला भाऊ धाकट्या भावाच्या क्वचितच पाया पडतो. थोरला भाऊ म्हणजे पित्याच्या खालोखाल. त्याला इतर भावंडे मान देतात; त्याची आज्ञा पाळतात; पण मला काही बोलायला असा वेळच उरला नव्हता. आमची गाडी सुटण्याच्या बेतात आली होती.

आमची गाडी जसे जास्त जास्त अंतर कापू लागली, तसतसा जितेंद्र अधिकाधिक गप्प होऊ लागला. शेवटी त्याने स्वतःला हालवले. माझ्याकडे वाकून एका नाजूक जागी त्याने मला चिमटा घेतला.

"आता आपली पुढली जेवणाची काही व्यवस्था परमेश्वर करील असे काही चिन्ह दिसत नाही!"

“गप्प बैस, संशयी कुठला! परमेश्वर आपल्याबरोबरच आहे.”

“त्याला घाई करायला लावशील का तू? आपले आता जेवण्याखाण्याचे कसे काय जमणार या विचारानेच मी कासावीस झालो आहे. वाराणशी सोडली ती आज ताजमहाल बघायला; स्वतःच्या कबरीमध्ये शिरायला नव्हे.”

“जितेंद्र, धीर धर. वृंदावनामधील पवित्र अशा आश्चर्यकारक गोष्टी नाही का आपल्याला अगदी प्रथमच पाहायला मिळणार? भगवान श्रीकृष्णांच्या पदरजाने पुनीत झालेल्या ह्या भूमीवरून आपण चालत जाणार या विचारानेच मला अत्यंत आनंद झालेला आहे.”

आमच्या डब्याचे दार उघडून दोन माणसे आत येऊन बसली. आम्हांला पुढल्या स्टेशनवर उतरायचे होते.

“मुलांनो, वृंदावनमध्ये तुमच्या ओळखीचे कोणी आहे काय?” आमच्यासमोर बसलेला परका मनुष्य आमची चौकशी करू लागला.

“तुम्हांला काय करायचेय त्याच्याशी?” उद्धटपणे मी नजर दुसरीकडे वळविली.

“त्या हृदयचोर [2] भगवंताच्या जादुगिरीमुळे ओढले जाऊन तुम्ही बहुतेक घरातून पळून जात असाल. बरे, परमेश्वरच तो. मीसुद्धा भाविकच आहे. तुमच्या जेवण्याखाण्याची, उतरायची काही सोय आहे का? ऊन काय पण रणरणत आहे! तुमची तशी काही सोय नसेल तर मी करतो. कामच आहे माझे ते.”

“नाही महाराज, आम्ही आमचे पाहून घेऊ तुम्ही मोठे दयाळू दिसता; पण घरातून बाहेर पडून आम्ही नुसते उनाडपणे भटकत आहोत, हा तुमचा अंदाज चुकला.”

नंतर पुढे आमचे काही बोलणे झाले नाही. इतक्यात गाडी थांबली. जितेंद्र व मी, आम्ही जसे प्लॅटफॉर्मवर उतरलो तसे ह्या अचानकपणे आम्हांला भेटलेल्या त्रयस्थाने आमच्या हातात हात घालून आम्हांला स्टेशनबाहेर नेले व एक गाडी बोलाविली.

आम्ही एका भव्य आश्रमापुढे उतरलो. आश्रमातील जमिनीवर हरित तृणाचा गालिचा जणू आंथरलेला होता व परिसरामधे हिरवीगार वृक्षराजी होती. आमची ज्यांनी विचारपूस केली त्या दोघांची येथे चांगलीच ओळख असावी. एक हसतमुख चेहऱ्याचा मुलगा तेथे आला व काही न बोलता आम्हांला एका दिवाणखान्यात घेऊन गेला. तेथे आम्हांला एक पोक्तशी वयस्कर बाई सामोरी आली.

“गौरी मा, राजकुमार काही येऊ शकले नाहीत.” तेथल्या एका माणसाने आश्रमाच्या व्यवस्थापिकेस निवेदन केले. “अगदी निघायच्या वेळी त्यांचा बेत फिसकटला. त्यांनी बडी दिलगिरी दर्शविली आहे. त्यांच्याऐवजी आम्ही हे दुसरे दोन पाहूणे आणले आहेत. गाडीत यांना पाहिल्याबरोबर भगवंताच्या ह्या दोन बालभक्तांकडे मी ओढला गेलो.”

“बरेय मुलांनो, आम्ही आता जातो.” असे म्हणून आम्हांला गाडीत भेटलेले ते दोघे इसम दरवाज्याकडे गेले. “भेटू आपण पुनः, जशी परमेश्वराची इच्छा असेल त्याप्रमाणे.”

गौरी मांनी आमच्याकडे पाहून मातृवात्सल्यपूर्ण स्मित केले. “या बाळांनो या, काय गंमत आहे पाहा. या आश्रमाचे आश्रयदाते जे राजेसाहेब त्यांचे दोन कुमार आज यायचे होते.

त्यांची वाट पाहत होते मी. त्यांच्याऐवजी तुम्ही आलात; चांगलाच दिवस भेटला तुम्हांला. माझ्या स्वयंपाकाची वाखाणणी करण्याकरिता आज जर कोणी आले नसते तर माझा मोठा हिरमोड झाला असता!"

ह्या सुखद शब्दांचा जितेंद्रावर मोठा आश्चर्यकारक परिणाम घडून आला. त्याच्या डोळ्यांतून घळघळा अश्रुधारा वाहू लागल्या. वृंदावनामध्ये उपासमारीची जी त्याला भीती होती त्याऐवजी आज त्याला शाही खान्याची मेजवानी मिळणार होती. आता एकदम या प्रसंगाला तोंड द्यायला मनाला तयार करणे त्याला फार अवघड झाले. आमच्या यजमानीणबाईने त्याच्याकडे औत्सुक्याने पाहिले, पण ती काही बोलली नाही. कदाचित त्या तरुण प्रवृत्तींशी परिचित असाव्या.

जेवण तयार असल्याची वर्दी आली. गौरी मा आम्हांला भोजनघरात घेऊन गेल्या. स्वादिष्ट पदार्थांचा खमंग वास सुटला होता. त्यानंतर त्या शेजारी स्वयंपाकघरात निघून गेल्या.

अशा प्रसंगाची मला थोडीशी कल्पना होतीच. जितेंद्राच्या शरीरावर एक जागा निवडून काढून त्या ठिकाणी मी त्याला एक जोरदार चिमटा घेतला. गाडीत बसलो असताना त्याने मला चिमटा घेतला होता; तितका जोरदार.

"संशयखोर, परमेश्वर कार्य करीत असतो—घाईत सुद्धा!"

व्यवस्थापिका बाई पंखा हातात घेऊन पुनः परत आल्या. तिने पौर्वात्य पद्धतीने आम्हांस सावकाशपणे वारा घातला. आम्ही उंची लोकरीच्या आसनांवर जेवायला बसलो होतो. आश्रमातील शिष्य जवळ जवळ तीस पदार्थांचे वाढप करीत ये-जा करीत होते. त्याला 'जेवण' म्हणण्यापेक्षा 'शाही भोजन' म्हणणेच योग्य ठरेल. ह्या भूलोक नामक ग्रहावर आल्यापासून इतके स्वादिष्ट पदार्थ जितेंद्र आणि मी, दोघांनी आतापर्यंत कधीच खाल्ले नव्हते.

"पूज्य माताजी, खरोखरच हे पदार्थ राजकुमारांनीच सेविण्याजोगे झाले आहेत! काय एवढे मोठे त्यांना तातडीचे काम होते की त्यांना ह्या मेजवानीचा स्वाद घेण्यास वेळ झाला नाही! मला काही कल्पना करता येत नाही! ह्या मेजवानीची जन्मभर आम्हांस आठवण राहील!"

अनंताची अट म्हणून आम्ही गप्प बसलो. आम्ही त्यांना धन्यवाद दिले. पण आमच्या आभारांना दोन अर्थ होते ते त्या दयाळू मांना आम्हांस स्पष्ट करून सांगता येईनात. आमचे बोलणे अगदी उघडपणे व कळकळीचे होते. तेथून निघण्यापूर्वी त्यांनी आम्हांला आशीर्वाद दिले व पुनः परत आश्रमात येण्याबद्दल निमंत्रण दिले. निमंत्रण अर्थात आकर्षकच होते.

बाहेर कडाक्याचे ऊन तापलेले होते. आम्ही दोघांनी आश्रमाच्या दाराशीच असलेल्या एका विशाल कदंबवृक्षाखाली सावलीकरिता आश्रय घेतला. पुनः आमची बोलाचाली सुरू झाली. परत एकदा जितेंद्राच्या मनात शंकाकुशंकांचे काहूर माजले.

"तू मला चांगलेच अडचणीत टाकले आहेस! आपल्याला जेवण चांगले मिळाले ते केवळ नशीब म्हणून. आता खिशात दमडी नाही आणि मग या शहरातली प्रेक्षणीय स्थळे आपण कशी पाहणार? आणि अनंतदादाच्या घरी तरी तू मला परत कसे काय नेणार?"

"इतक्या लवकर तू ईश्वराला विसरलास? चांगले भरगच्च पोट भरलेय ना?" माझे शब्द कटू नव्हते, पण त्याच्यावर कृतघ्नतेचा आरोप करणारे होते. परमेश्वराने केलेली कृपा मनुष्य

किती लवकर विसरतो! केलेल्या प्रार्थनेचा—थोडाबहुत का होईना—पण जबाब ज्यास मिळाला नाही असा मनुष्य ह्या पृथ्वीतलावर असणेच शक्य नाही.”

“तुझ्यासारख्या पागल माणसाबरोबर बाहेर भटकण्याचे धाडस करण्यात मी मोठा मूर्खपणा केला आहे तो मी विसरणे शक्य नाही!”

“जितेंद्र, शांत हो! ज्या ईश्वराने आपल्याला भोजन दिले तोच आपल्याला वृंदावन दाखवील व परत आग्र्यास पोचवून देईल.”

एक साधारण तरुण मनुष्य, गोड चेहऱ्याचा, घाईघाईने पावले टाकीत आमच्याकडे आला. आमच्या झाडाखाली येऊन, वाकून त्याने आम्हांला नमस्कार केला.

“प्रिय मित्रा, तू आणि तुझा सोबती येथे नक्कीच परठिकाणाहून आलेले दिसताय! तुमचा यजमान व मार्गदर्शक होण्याची मला अनुज्ञा द्या.”

कोणा हिंदी माणसाचा चेहरा इतका लवकर पांढरा पडत नाही; पण जितेंद्राचा चेहरा एकदम आजाऱ्यासारखा दिसू लागला. मी नम्रपणे त्याची मदत नाकारली.

“पण तुम्ही मला घालवून तर नाही ना देत?” त्या त्रयस्थ माणसाला वाटलेली भीती अन्य परिस्थितीमध्ये हास्यास्पद वाटली असती.

“ते का म्हणून?”

“तुम्ही माझे गुरू आहात.” त्याचे डोळे माझ्याकडे विश्वासाने पाहत होते. “मी माध्यान्ह संध्या करीत होतो; आणि भगवान श्रीकृष्णाने मला दृष्टान्त दिला. त्याने मला ह्याच झाडाखाली दोन वाट चुकलेली माणसे दाखविली. त्यांपैकी एक चेहरा आपला होता. गुरुजी, ध्यानामध्ये पुष्कळदा मी तो पाहिलेला आहे! तुम्ही जर माझी सेवा स्वीकारलीत, तर मला किती आनंद होईल बरे!”

“तुम्ही मला शोधून काढलेत याबद्दल मला सुद्धा आनंद वाटतो. परमेश्वर आम्हांला विसरला नाही की कोणी मनुष्यही आम्हांला विसरला नाही.” मी जरी निःस्तब्ध उभा होतो आणि त्याच्या उत्सुक चेहऱ्याकडे स्मितपूर्वक पाहत होतो तरी मनातल्या मनात मी परमेश्वराच्या पायांवर नतमस्तक झालो होतो.

“प्रिय मित्रहो, माझ्या घरी येऊन माझे घर आपण पुनीत करणार नाही काय?”

“फार उपकार आहेत आपले. पण आपल्या घरी येणे आम्हांस जमणार नाही. आग्र्याला आम्ही भावाकडे उतरलो आहोत.”

“वृंदावनामध्ये तुमच्याबरोबर मी हिंडलो त्याच्या काही आठवणी तरी निदान मला द्या.”

मी आनंदाने रुकार दिला. नंतर त्या तरुण माणसाने—त्याने आपले नाव प्रताप चटर्जी असल्याचे सांगितले—एक घोडागाडी बोलाविली. आम्ही मदनमोहन मंदिरात आणि कृष्णाच्या इतर देवळांत गेलो. मंदिरांमधून आम्ही जाऊन येण्याच्या अगोदरच रात्र झाली.

“‘संदेश’ आणीतोपर्यंत जरा माफ करा हं!” रेल्वे स्टेशनच्या जवळच्या एका दुकानात प्रताप शिरला. जितेंद्र आणि मी दोघे त्या रुंद रस्त्र्यावर इकडे तिकडे फिरत राहिलो. त्या मानाने आता थंड झाल्याने रस्ते गजबजलेले होते. आमचा दोस्त काही वेळ गायब झाला होता. पण शेवटी आला तो हातात नाना तऱ्हेची मिठाई घेऊनच आला.

"कृपा करून मला हे पुण्य मिळवून द्या." प्रतापने अजीजीने स्मित केले व नुकतीच काढलेली आग्र्याची तिकिटे व काही रुपयांच्या नोटा देण्याकरिता हात पुढे केला.

ते घेताना त्याच्या पाठीमागे जो अदृश्य हात काम करीत होता, त्याच्याबद्दल मी पूज्य भावना दाखविली. ज्याचा अनंता उपहास करीत होता, त्या परमेश्वराच्या अदृश्य शक्तीने आम्हांला आमच्या जरुरीपेक्षा जास्त दिले नाही का?

स्टेशनजवळ आम्ही एक एकान्त-स्थळ शोधून काढले.

"प्रताप, मी तुला लाहिरी महाशयांचा क्रियायोग शिकवितो. लाहिरी महाशय म्हणजे अर्वाचीन कालात सर्वांत मोठे योगी होऊन गेले. त्यांचे क्रियातंत्र तुला गुरूच्या ठिकाणी होईल."

साधारण अर्ध्या तासात हा दीक्षाविधी संपला. "क्रिया हा तुझा चिंतामणी [3] होय" असे मी नवीन साधकाला सांगितले. "तू पाहिलेसच की हे तंत्र सोपे आहे. ह्याच्यामध्ये मनुष्याची आध्यात्मिक उत्क्रांती लवकर घडवून आणण्याची कला आहे. हिंदू धर्मग्रंथ असे सांगतात की, नेहमी जन्म घेत राहणाऱ्या अहंकाराला मायेच्या तावडीतून सुटका व्हायला दहा लक्ष वर्षे लागतात. हा एरव्ही लागणारा दीर्घ कालावधी क्रियायोगाच्या साधनेमुळे पुष्कळच कमी होतो. जगदीशचंद्र बोस यांनी प्रयोगांती असे सिद्ध केले आहे की, वनस्पतींची वाढ त्यांच्या वाढीच्या नैसर्गिक वेगापेक्षा अधिक वेगाने करता येते; त्याचप्रमाणे माणसाची मानसिक उन्नतीही शास्त्रीय पद्धतीने जलद करता येईल. हिची साधना तू निष्ठेने करावीस. त्यायोगे साऱ्या गुरूंच्या गुरूप्रत तू जाऊन पोहोचशील."

प्रताप विचारपूर्वक सांगू लागला, "फार दीर्घ काल मी ह्या योगाची गुरुकिल्ली शोधण्यात घालविला. आज नेमकी ती मला सापडली. इंद्रियांच्या बंधनातून मुक्त करणारी ही प्रक्रिया मला उच्च स्तरांवर आणून सोडील. भगवान कृष्णाचे जे मला आज स्वप्नदर्शन झाले त्याचा अर्थ इतकाच की, माझी आता अत्युच्च उन्नती होणार आहे."

तेथेच काही वेळ आम्ही शांतपणे परस्परांच्या बोलण्याचा विचार करीत बसलो. नंतर मग आम्ही सावकाशपणे स्टेशनवर गेलो. गाडीत बसल्यावर मी आनंदाने प्रफुल्लित झालो. पण जितेंद्राचा हा दिवस रडण्याचा होता. प्रतापचा प्रेमळपणे मी निरोप घेत होतो. त्या वेळी माझ्या ह्या दोन्ही सोबत्यांचे रडण्याचे हुंदके मधून मधून ऐकू येत होते. ह्या परत-प्रवासात जितेंद्राने शोक करून गोंधळ उडवून दिला; पण ह्या वेळी स्वतः करिता नसून स्वतःच्या विरुद्ध त्याची ही सारी बडबड होती.

"माझी श्रद्धा किती उथळ! माझे हृदय जणू दगडाचेच आहे! आता पुनः कधी मी आयुष्यात परमेश्वराच्या दयाळूपणाबद्दल शंका घेणार नाही!"

मध्यरात्र होऊ लागली. एक दिडकी जवळ नसलेले व वाऱ्यावर सोडलेले हे दोन भटके वीर अनंताच्या खोलीत प्रवेश करते झाले. आमच्याबद्दल भाकीत करताना त्याला एवढी कल्पना नसेल. पण आता त्याचा आश्चर्यचकित चेहरा पाहण्यालायक होता. सावकाशपणे मी टेबलावर रुपयांच्या नोटांची रास ओतली.

“जितेंद्र, खरे सांग पाहू काय झाले ते.” अनंताने मस्करीच्या आवाजात विचारले. “ह्या आमच्या धाकट्या बंधूंनी कुठे धाडबीड तर नाहीना घातली?”

पण जेव्हा आम्ही सारी हकीकत सांगितली तेव्हा आमच्या बंधूंचा चेहरा जरा सुधारला; मग गंभीर झाला.

“मला वाटले त्यापेक्षा फार बिनचूक रीतीने सूक्ष्मतर जगतामध्ये मागणी आणि पुरवठा या नैसर्गिक नियमाचा अवलंब होत असतो.” आतापर्यंत कधीही दिसून आला नाही अशा आध्यात्मिक उत्साहाने बोलावयास अनंताने सुरुवात केली. “जगात आढळून येणाऱ्या प्राकृत, ग्राम्य अशा ऐहिक वस्तूंचा संग्रह करण्याकडे तुझे का दुर्लक्ष आहे, याचे कारण आज माझ्या ध्यानात आले.”

बरीच रात्र झाली असताही दादाने आपल्याला क्रियायोगाची दीक्षा [4] देण्याबद्दल मला आग्रह केला. अशा तऱ्हेने मुकुंद ‘गुरुजींना’ एकाच दिवसात दोन अनपेक्षित ‘शिष्यांची’ जबाबदारी पत्करावी लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आमची चहाबरोबरची न्याहारी मोठी मजेत झाली. हे मजेचे व संतोषाचे वातावरण आदल्या दिवशीच्या सकाळी नव्हते.

मी जितेंद्राकडे पाहून स्मित केले. “ताजमहाल पाहण्याबाबत तुझी फसवणूक केली जाणार नाही; सेरामपूरला जाण्यापूर्वी, चल, आपण तेथे जाऊन येऊ.”

नंतर अनंतदादाचा निरोप घेऊन आम्ही बाहेर पडलो. माझा मित्र आणि मी आग्र्याचे वैभवस्थान जो ताजमहाल त्याच्यासमोर होतो. पांढरा संगमरवर सूर्याच्या प्रकाशात चकाकत होता. नितान्त प्रमाणबद्धतेचे ते एक दृश्य प्रतीक होते. त्याच्या पार्श्वभागी काळी सुरूची झाडे, तकाकी मारणारी हिरवळ व निश्चल अशा पाण्याने भरलेले लांबलचक हौद यांनी त्याची शोभा वृद्धिंगत झाली होती. आतील भागावर सुंदर जाळीदार काम असून त्याच्या मधून मधून मौल्यवान खडे बसविलेले होते. पिंगट व जांभळ्यां दगडांवर जागोजाग नाजूक पुष्पमाला व चित्रे एकमेकांत गुंफलेली अशी खोदलेली आहेत. घुमटातून शहेनशहा शहाजहान व त्याच्या साम्राज्याची व तशीच हृदयाची राणी मुमताजमहाल यांच्या थडग्यांवर नेमका प्रकाश पडत असतो.


प्रेक्षणीय स्थळे पाहणे आता पुरे झाले! गुरूच्या भेटीची मला आता ओढ लागली. थोड्याच अवधीत जितेंद्र आणि मी दक्षिणेकडे बंगालच्या दिशेने प्रवासाला निघणार होतो.

“मुकुंदा, बरेच दिवस झाले, घरातल्या माणसांची भेट नाही. माझा बेत मी बदलला आहे. कदाचित पुढे काही दिवसांनी सेरामपूरच्या तुझ्या गुरुजींच्या दर्शनाला मी येईन.”

माझ्या मित्राचे वर्णन करावयाचे म्हणजे तो धरसोड वृत्तीचा, चंचल मनाचा होता, असे करता येईल. त्याने माझा कलकत्याला निरोप घेतला. मी तेथून लवकरच लोकलगाडीने उत्तरेस बारा मैलांवरच्या सेरामपूरला गेलो.

माझ्या गुरूची वाराणशीला जी भेट झाली होती त्याला बरोबर अठ्ठावीस दिवस झाले होते; हे माझ्या लक्षात येताच एक आश्चर्याचा कंप माझ्या अंगावरून थरारून गेला. “तू माझ्याकडे चार आठवड्यांत येशील!” आणि मी त्याप्रमाणे प्रशान्त अशा रायघाट गल्लीमधील त्यांच्या

अंगणात प्रसन्न अंतःकरणाने हजर झालो. त्या आश्रमात मी प्रथमच प्रवेश करीत होतो आणि येथेच मी भारताचे 'ज्ञानावतार' यांच्या सान्निध्यात माझ्या आयुष्यातील पुढचा दहा वर्षांचा अत्युत्तम काळ व्यतीत करणार होतो.



*जितेन्द्र मजुमदार*
*श्री योगानंदांचा वृंदावनचा सोबती*

1 प्रकरण २५ पाहावे.
2 हरी. भगवान श्रीकृष्णाचे भक्त त्याला 'हृदय-चोर' या नावाने ओळखतात.

3 पुराणांत सांगितलेले एक रत्न, की ज्याच्या लाभाने सर्व इच्छा पुऱ्या होतात. तसेच परमेश्वराचे एक नाव.
4 ‘दीक्षा. मूळ संस्कृत धातू ‘दिक्ष्’ म्हणजे स्वतःस समर्पण करणे.

## प्रकरण - १२

# 12. गुरुजींच्या आश्रमातील माझी काही वर्षे

"आलास तू." श्रीयुक्तेश्वरांनी माझे स्वागत केले. ते वरच्या मजल्यावर असलेल्या आपल्या खोलीच्या सज्जात व्याघ्रांबरावर बसले होते. त्यांचा आवाज थंड होता व वागण्यामध्ये भावनांचा विकार नव्हता.

"होय गुरुजी, मी तुमचा शिष्य व्हायला आलो आहे." गुडघे टेकून मी त्यांच्या पायांना स्पर्श केला.

"असे कसे होईल? तू काही माझ्या इच्छेला मान देत नाहीस."

"गुरुजी, आता यापुढे तसे होणार नाही. आपली इच्छा मला सर्वथैव शिरसावंद्य होईल."

"हे ठीक आहे. आता मला तुझ्या आयुष्याची सगळी जबाबदारी पत्करता येईल."

"गुरुजी, हे ओझे मी स्वखुशीने आपल्याकडे सोपवितो."

"तर आता माझी पहिली आज्ञा अशी की तू आपल्या घरी परत जावेस. तू कलकत्त्याला जाऊन कॉलेजमध्ये नाव घालावेस असे मला वाटते. तुझे शिक्षण पुढे चालू राहिले पाहिजे."

"ठीक आहे गुरुजी!" माझी भीती मी दाबून ठेविली. ही पुस्तकांची ब्याद माझ्या पाठीमागे आज इतकी वर्षे लागली आहे. प्रथम वडील व आता श्रीयुक्तेश्वर!

"कधी काळी तुला युरोप-अमेरिकेत जावे लागेल. तिथले लोक भारताचे प्राचीन तत्त्वज्ञान अधिक सहृदयतेने ऐकतील आणि मग ते समजावून देणारा परका उपदेशक जर विश्वविद्यालयाचा पदवीधर असेल तर फारच चांगले."

"श्रेयस्कर काय आहे, हे आपण उत्तम जाणता गुरुजी." माझे औदासीन्य गेले. युरोप-अमेरिकेचा उल्लेख हा मला बुचकळ्यात टाकणारा होता व दूरगामी असा वाटत होता. पण गुरुजींची आज्ञा पाळून त्यांना प्रसन्न करण्याची संधी मला अगत्याची वाटत होती.

"पण तू येथे जवळच कलकत्त्याला असणार; तुला वेळ होईल तेव्हा येत जा."

"शक्य झाले तर रोज येत जाईन, गुरुजी! माझ्या आयुष्यातील प्रत्येक लहानसहान बाबतीत मी आपली हुकुमत कृतज्ञपणे मानत जाईन, पण एका अटीवर."

"कोणती ती?"

"आपण मला परमेश्वराचे दर्शन घडवून द्याल, असे वचन द्या!"

नंतर मग एक तासभर शब्दांची रस्सीखेच चालू होती. गुरुजींचा शब्द हा कधीही खोटा ठरणारा नसतो; पण तो विचार न करता दिलाही जात नाही. ह्या वचनाच्या पूर्तीने अफाट आध्यात्मिक विश्व खुले करून दिले जाणार होते. गुरूची परमेश्वराबरोबर एवढी घनिष्ठ सलगी पाहिजे तरच तो त्याला व्यक्त स्वरूपात प्रकट व्हावयाला सांगणार! मला श्रीयुक्तेश्वरांच्या तादात्म्याची कल्पना होती आणि म्हणून त्यांचा शिष्य या नात्याने मी त्यांचा फायदा घेण्याचे ठरविले.

"तुझा फार आग्रही स्वभाव आहे!" असे म्हणून गुरुजींनी दयावंत होऊन माझा हट्ट पुरवायचे कबूल केले.

"बरे, तुझी जी इच्छा तीच माझी इच्छा."

माझ्या हृदयावरची जिंदगीभरची छाया दूर केली गेली. इकडे, तिकडे, पलीकडे अज्ञाताचा शोध घेण्याचे काम संपले. मला आता एका खऱ्या गुरूमध्ये कायमचा आधार सापडला.

"चल, मी तुला आश्रम दाखवितो," असे म्हणून गुरुजी आपल्या व्याघ्राम्बराच्या आसनावरून उठले. समोरच एका भिंतीवर टांगलेल्या एका तसबिरीकडे माझी दृष्टी गेली. त्या तसबिरीला फुलांचा मधून मधून पाने असलेला हार घातलेला होता.

"लाहिरी महाशय!" तसबीर पाहिल्याबरोबर मी आश्चर्याने उद्गारलो.

"होय, तेच माझे दिव्य गुरू." श्रीयुक्तेश्वरांचा आवाज आदराने कंप पावत होता. "मी आयुष्यभर फार शोध केला. पुष्कळ गुरू पाहिले; पण मनुष्य व योगी अशा दोन्ही दृष्टींनी श्रेष्ठ गुरू असे हेच."

त्या ओळखीच्या तसबिरीपुढे मी मनातल्या मनात नमस्कार केला: ज्या अद्वितीय गुरूने मला लहानपणापासून आशीर्वाद देऊन पावलोपावली मार्गदर्शन केले आणि आजच्या स्थितीला आणून पोचविले त्यांना माझे आत्मवंदन पोचले.

गुरूंच्याबरोबर मी आश्रमात व सभोवारच्या पटांगणात हिंडलो. आश्रम जुना व मजबूत बांधणीचा होता. आणि त्याच्या मध्यभागी एक मोठे आवार असून आश्रमात जागोजागी मोठे खांब होते. बाहेरील भिंतीवर शेवाळ माजलेले होते. आश्रमाचे छत सपाट व करड्या रंगाचे असून त्यावर कबुतरे फडफडत होती व काहीएक संकोच न करता आश्रमातील जागेचा उपयोग करीत होती. पाठीमागे एक बाग होती. त्यामध्ये फणस, आंबा व केळी यांची झाडे असल्यामुळे बाग मोठी रमणीय झाली होती. आश्रमातील मुख्य इमारत दुमजली असून वरच्या दालनांच्या सज्जांना नक्षीदार कठडे होते व तेथून तीन बाजूंचे आवार दिसत होते. तळमजल्यावर एक मोठा प्रशस्त दिवाणखाना असून त्याच्या उंच छताला खांबांनी आधार दिला होता. गुरुजी म्हणाले की, तो दिवाणखाना बहुतेक दुर्गापूजेच्या वार्षिक उत्सवाला वापरला जातो. कडेच्या अरुंद जिन्याने श्रीयुक्तेश्वरांच्या बैठकीच्या खोलीला जाण्याचा रस्ता होता. त्या खोलीचा सज्जा रस्त्र्याला लागून होता. आश्रमातील सामान साधेसुधे होते. प्रत्येक गोष्ट साधी, स्वच्छ व उपयोगाची होती. तसेच तेथे काही पाश्चिमात्य पद्धतीच्या खुर्च्या, बाके व टेबले मांडून ठेवलेली होती.

गुरुजींनी मला रात्री तेथेच राहण्यास सांगितले. संध्याकाळचे जेवण म्हणजे साधा आमटीभात. ते वाढण्याचे काम त्यांचे दोन शिष्य करीत होते. ते शिष्य तेथे शिक्षणाकरिता राहिले होते.

"गुरुजी, आपल्या पूर्वायुष्याबद्दल मला काही सांगता का?" त्यांच्या व्याघ्रांबराच्या शेजारीच मी चटईवर बसलो होतो. सज्जाच्या पलीकडे चांदणे अगदी जवळच असल्यासारखे स्नेहपूर्ण असे वाटत होते.

“माझे मूळचे नाव प्रियनाथ करार. माझा जन्म [1] येथे सेरामपूरला झाला. माझे वडील श्रीमंत व्यापारी होते. हा माझा वडिलोपार्जित वाडा वडिलांनी माझ्यासाठी ठेवून दिला. त्याचाच आता आश्रम केला आहे. माझे शाळेतील शिक्षण यथातथाच. ते मला अगदी मंदगतीचे व वरवरचे वाटले. अगदी तरुणपणीच संसाराची जबाबदारी माझ्यावर येऊन पडली. मला एक मुलगी आहे. लग्न झालेले आहे तिचे. माझ्या आयुष्याच्या मध्यभागात मला लाहिरी महाशयांच्या मार्गदर्शनाचा लाभ घडून आला. कुटुंब निवर्तल्यावर मी संन्यास घेतला; आणि श्रीयुक्तेश्वरगिरी [2] हे संन्यासधर्माचे नाव धारण केले. असा हा माझा थोडक्यात साधा इतिहास आहे.”

माझ्या उत्सुक चेहऱ्याकडे पाहुन गुरुजींनी जरा स्मित केले. साधारण चरित्रवृत्तांतांच्या रुपरेषे प्रमाणेच त्यांच्या शब्दांनी सुद्धा, त्यांच्या अंतरंगाचा काही एक ठाव न देता वरवर दिसून आलेल्या घटनेंचे वर्णन केले.

“गुरुजी, आपल्या लहानपणाच्या काही गोष्टी सांगता का?”

“काही थोड्या सांगतो; प्रत्येकीच्या शेवटी एक उपदेशपर तात्पर्य आहे!”अशा तऱ्हेची ताकीद देताना श्रीयुक्तेश्वरांचे डोळे चमकले. “एकदा माझ्या आईने अंधारकोठडीतील एका भुताची भयंकर गोष्ट सांगून मला भिववून टाकण्याचा प्रयत्न केला. मी त्या भुताच्या कोठडीत ताबडतोब गेलो. पण तेथे मला भूत काही आढळले नाही. माझी निराशा झाल्याचे मी सांगितले. नंतर पुनः काही आईने अशी भुताची भयंकर गोष्ट सांगितली नाही. तात्पर्य, भीतीशी उघड सामना करा म्हणजे ती तुम्हांला कधी भिववून टाकणार नाही.

“दुसरी अशीच लहानपणची जुनी आठवण म्हणजे एका कुरुप कुत्रयाची. हा कुत्रा आमच्या शेजाऱ्याचा होता. आणि मला तो हवा होता. तो कुत्रा पाहिजे म्हणून मी कित्येक दिवस घरातल्या माणसांना सतावून सोडले. त्यांनी मला इतर चांगली, अधिक सुंदर दिसणारी कुत्री दाखविली. पण माझा हट्ट आपला त्याच कुत्रयाकरिता. मी कोणाचे काही ऐकले नाही. तात्पर्य, आसक्तीची ओढ फार जबर असते. ती इच्छित वस्तूच्या भोवती आकर्षकत्वाचे एक काल्पनिक तेजोवलय निर्माण करीत असते.

“तिसरी गोष्ट म्हणजे लहानपणी मुलाचे मन किती लवचिक असते याबद्दलची. माझी आई कधीकधी म्हणायची: जो मनुष्य कोणाच्या हाताखाली काम करतो तो त्याचा गुलाम बनतो. ह्या उपदेशाची पकड माझ्या मनावर इतकी भक्कम बसली होती की, लग्न झाल्यावर सुद्धा मी कितीएक सांगून आलेल्या नोकऱ्या नाकारल्या. आमच्या कुटुंबाची जी संपत्ती होती ती जमिनीत घालून त्या उत्पन्नावर मी घरखर्च चालवीत असे. तात्पर्य, चांगल्या आणि विधायक सूचना लहान मुलांना द्याव्यात. कारण त्यांची मने कोवळी व भावनाप्रधान असतात. त्यांच्या लहानपणच्या कल्पना दीर्घकालपर्यंत त्यांच्या मनावर कोरलेल्या राहतात.”

गुरुजी निश्चल शांततेत गेले. मध्यरात्रीच्या सुमारास त्यांनी मला एक अरुंद चौपाई दिली. मला गाढ मधुर झोप लागली. गुरुजींच्या आश्रयाखाली घालविलेली ही माझी पहिलीच रात्र होती.

श्रीयुक्तेश्वरांनी दुसऱ्या दिवशीची सकाळ मला क्रियायोगाची दीक्षा देण्याकरिता मुक्रर केली. हे तंत्र मला लाहिरी महाशयांच्या दोन शिष्यांकडून अगोदरच कळून चुकले होते. एक म्हणजे माझे वडील व दुसरे म्हणजे माझे शिक्षक, स्वामी केवलानंद. पण गुरुजींच्या ठिकाणी एकदम परिवर्तन घडवून आणणारी शक्ती होती. त्यांनी स्पर्श केल्याबरोबर माझ्या अंगावर, व्यक्तित्वावर एक मोठा प्रकाश पडला. तो प्रकाश म्हणजे असंख्य सूर्य एकत्र तळपावे इतका तो देदीप्यमान होता. एक अत्यंत आनंदाचा अवर्णनीय महापूर माझ्या हृदयाचे अंतरंग छेदून गेला.

दुसऱ्या दिवशी अगदी संध्याकाळच्या पुढे आश्रमातून मी अनिच्छेनेच बाहेर पडलो.

"तू तीस दिवसांत परत येशील!" कलकत्त्याला घरातल्या दारात प्रवेश करतो तो गुरुजींच्या भविष्यवाणीची आठवण झाली. माझे नातेवाईक "उडणारा पक्षी" परत येईल अशी माझ्यावर टीका करतील अशी मला भीती होती ती निराधार ठरली.

मी जिना चढून गेलो व जिवंत माणसाकडे पाहावे त्याप्रमाणे माझ्या पोटमाळ्यावरील लहानशा खोलीकडे पाहिले. "तू मला चिंतन करताना अनेक वेळा पाहिलेले आहेस, माझे अश्रु, साधनेमधील वादळे ही सर्व पाहिली आहेस. आता मी दैवी गुरुरूपी बंदराला जाऊन पोचलो आहे."

"बेटा, मला आनंद होतोय; आपणा दोघांकरताही." संध्याकाळच्या वेळी शांतपणे वडील आणि मी एकत्र बसलो होतो. "ज्या चमत्कारिक रीतीने मला माझे गुरु भेटले त्याच रीतीने तू पण तुझ्या गुरुंना शोधून काढले आहेस. लाहिरी महाशयांचा पवित्र हात आपले रक्षण करीत आहे. तुझे गुरु म्हणजे दुर्गम हिमालयातील महात्मे नसून ते जवळचेच आहेत. माझी प्रार्थना परमेश्वराने ऐकली. परमेश्वराचा शोध घेताना तू माझ्या दृष्टीसमोरून कायमचा गेला नाहीस."

माझा अभ्यास पुढे व्यवस्थितपणे सुरू होणार आहे हे समजल्यावर वडिलांना फार आनंद झाला. त्यांनी माझी शिक्षणाची योग्यशी व्यवस्था केली. दुसऱ्याच दिवशी कलकत्त्यामधील जवळच्या स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये मी नाव घातले.

पुढे काही महिने आनंदात गेले. कॉलेजच्या वर्गात मी क्वचितच दिसत असेन, असे वाचकांनी स्पष्ट अनुमान केले असेलच. सेरामपूरच्या आश्रमाचा मोह टाळण्यासारखा नव्हता. मी नेहमी आश्रमात जाई; पण गुरुजी कॉलेज सोडून का आलास म्हणून बोलत नसत. ते वर्गातील अभ्यासाची क्वचितच चौकशी करीत. ह्याचे मला समाधान वाटे. जरी सगळ्यांना माहीत होते की मी काही मोठा हुशार विद्यार्थी होण्यातला नाही, तरी परीक्षा पास व्हायच्या वेळी पास होण्यापुरते मार्क मिळवून वरच्या वर्गात जात असे.

आश्रमातील दैनंदिन कार्यक्रम संथपणे चालत असत. त्यांत क्वचितच बदल होई. गुरुजी पहाटेपूर्वी उठत. पडल्यापडल्याच किंवा अंथरुणावरच बसल्या बसल्या ते समाधी [3] लावीत. गुरुजी जागे केव्हा झाले आहेत हे समजणे फार सोपे होते. मोठमोठ्याने घोरणे एकदम थांबत असे. [4] एक किंवा दोन जांभया किंवा क्वचित आळोखेपिळोखे ते देत; नंतर मग

श्वासोच्छ्वासविरहित अशा निःस्तब्ध अवस्थेत ते जात. ते नंतर योगसाधनेच्या आनंदात बुडून जात.

उठल्याबरोबर न्याहारी नसे. दैनिक कार्यक्रमाची सुरुवात गंगेच्या किनाऱ्यावरून एक लांबलचक फेरफटका करण्याने होत असे. गुरुजींच्या बरोबर ते सकाळचे फिरायला जाणे; म्हणजे ते आता सुद्धा अगदी खरेखुरे व प्रत्यक्ष वाटत आहे. त्यांच्या आठवणी अगदी सहज निघतात. त्या आठवणी मनात आल्या म्हणजे किती बरे वाटते. त्यांचा तो सहवास. सूर्य नुकताच उगवलेला आहे. नदीवर त्याचे कोवळे किरण पसरत आहेत. त्या कोवळ्या उन्हाने पाण्याला थोडथोडी ऊब येत आहे. त्यात त्यांचा आवाज सिंहगर्जनेप्रमाणे बाहेर पडायचा. त्यांच्या आवाजात ज्ञानाच्या बिनचूकपणाचे, अधिकारवाणीचे वैभव असाचये.

नंतर स्नान व मग दुपारचे भोजन. ते आश्रमातील शिष्य त्यांच्या रोजच्या सूचनांप्रमाणे काळजीपूर्वक तयार करीत. आमचे गुरू शाकाहारी होते. संन्यास घेण्यापूर्वी कधीकाळी त्यांनी अंडी व मासे खाल्ले असतील. आपल्या शरीराला मानवेल असा साधा आहार ठेवावा, असा उपदेश ते आपल्या शिष्यांना करीत.

गुरुजी फारच थोडे खात. पुष्कळदा भातावरच त्यांचे जेवण होत असे. भातामध्ये हळद, बीटचा रस किंवा पालेभाजी व तूप असे मिसळून घेत. एखादे दिवशी भाताबरोबर ते डाळ किंवा पनीरची आमटी व भाजी घेत. मुखशुद्धीकरिता भाताचा सांजा, आंबे, नारिंग किंवा फणसाचे गरे किंवा रस घेत.

दुपारी लोक भेटायला येत. संसारी माणसांचा एक संथ ओघ त्या आश्रमाच्या शांत परिसरात प्रवेश करायचा. भेटायला येणाऱ्या सगळ्या लोकांशी गुरुजी विनयाने व दयाशील वृत्तीने वागत. साक्षात्कारी महात्म्याला, ज्याला आत्मैकत्वाची ओळख झाली आहे, त्याला शरीर व तदंगभूत अहंकाराची मातब्बरी नसते. त्याला सर्व प्राण्यांमध्ये साधर्म्य, साम्य असलेले चटकन आढळून येते.

संतांच्या ठिकाणी हा जो निःपक्षपातीपणा आढळून येतो, त्याचे मूळ कारण त्यांना जे ज्ञान झालेले असते त्यामध्ये असते. संतांवर मायेच्या आलटून पालटून बदलणाऱ्या रूपांचा काही परिणाम होत नाही. अप्रबुद्ध माणसांची विवेकबुद्धी जिथे बावरून जाते, अशा प्रिय किंवा अप्रिय गोष्टींमुळे संतांवर काही एक परिणाम होत नाही. श्रीयुक्तेश्वर अधिकारी, हुद्देदार, श्रीमंत किंवा विद्वान अशा माणसांना जास्त आदरही दाखवीत नसत, की जे दरिद्री किंवा अडाणी आहेत त्यांना तुच्छही समजत नसत त्यांच्या ठिकाणी भेदभाव असा नसे. सत्यवचन, मग ते एखाद्या मुलाने जरी उच्चारले तरी ते आदराने ऐकत; आणि प्रसंगी एखाद्या अहंमन्य पंडिताच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत.

रात्रीच्या जेवणाची वेळ आठ वाजता असायची. मधून मधून पाहुणेही जेवायला असत. माझे गुरू एकटे असे जेवायला बसत नसत. आश्रमात कोणी जेवावयाचा किंवा असंतुष्ट राहत नसे. काही अनपेक्षित पाहुणे आले तरी श्रीयुक्तेश्वर घाबरुन जात नसत की आश्चर्य पावत नसत. ते आपल्या शिष्यांना अशा युक्तीने सूचना देत की अन्न थोडे असले तरी पुरे पडावे. इतके असून ते काटकसरी असत. त्यामुळे त्यांच्याजवळ पैसा कमी असला तरी त्यायोगे पुष्कळ काम होई. ते नेहमी म्हणत, “मिळकतीमध्ये तुमची सारी सुखसोय भागवून

घ्या. उधळपट्टी करण्याने तुमचे समाधान नष्ट होते." आश्रमामध्ये कोठे काही समारंभाचा प्रसंग असो, कोठे काही नवीन बांधकाम किंवा दुरुस्तीचे काम असो किंवा इतर कोठे काही व्यवहाराचे काम असो, त्याच्या तपशिलात गुरुजी एका विधायक बुद्धीचे नावीन्य प्रकट करीत.

सायंकाळच्या शांत वेळी कधी कधी गुरुजींची प्रवचने होत असत. त्या वेळी वेळेची आठवण राहत नसे. त्यांचा प्रत्येक उद्गार ज्ञानाने तासलेला असे. त्यांच्या भाषणात नि भाषणशैलीत एक प्रकारचा उदात्त, गंभीर आत्मविश्वास प्रतीत होत असे. हा आत्मविश्वास अगदी विलक्षण असे. माझ्या पाहण्यात तरी त्यांच्यासारखा वक्ता झाला नाही. शब्दांचा पेहराव पांघरूनच प्रकट करण्यापूर्वी ते आपले विचार विवेकाच्या तराजूत तोलून-मापून घेत. नितान्त सत्य, सर्वंकष, आपल्या शरीरशास्त्राच्या गुणधर्मांसह सुद्धा त्यांच्या मुखातून जेव्हा बाहेर पडे त्या वेळी जणू त्यांच्या आत्म्यामधून सुवास बाहेर पसरत असे. मला नेहमी असे वाटे की, मी प्रत्यक्ष ईश्वराच्या जिवंत, व्यक्त स्वरूपाच्या सान्निध्यात वावरत आहे. त्यांच्या दिव्यत्वाच्या वजनाने माझे मस्तक आपोआप त्यांच्यापुढे नमले जात असे.

श्रीयुक्तेश्वरांना समाधी लागू लागली आहे, असे पाहुण्यांच्या नजरेला आल्याचे जर त्यांच्या ध्यानात आले तर ते त्यांना चटकन संभाषणात गुंतवून टाकीत. मुद्दाम असा आविर्भाव ते आणू शकत की अंतर्मूख झाल्याच्या अवस्थेचे आवर्जून प्रदर्शन करीत नसत. सदैव परमेश्वराच्या ठिकाणी तादात्म्य पावल्याने त्यांना त्याच्याशी सख्य जोडण्याकरिता वेगळा वेळ लागत नसे. ज्याला साक्षात्कार झालेला आहे त्याने ध्यानरूपी पाय ठेवण्याचा दगड अगोदरच मागे टाकून दिलेला असतो. "वनस्पतींना फळ यायला लागले की फूल गळून पडायला लागते." परंतु संतमहात्मे बहुधा आपल्या शिष्यांपुढे उदाहरण ठेवून देण्याकरिता आध्यात्मिक रूप, आकार वगैरेंस चिकटून राहतात.

मध्यरात्र झाली की गुरुजी एखाद्या लहान मुलाप्रमाणे बोलता बोलता डुलक्या घ्यायला लागत. त्यांना अंथरूण, गादी वगैरे लागत नसे. त्यांचे नेहमीचे व्याघ्रांबर—आसन जिथे असे त्याच्या पाठीमागे एक अरुंद बाक ठेवलेले असे, त्यावर ते बहुधा झोपत असत.

कधी कधी सर्व रात्रभर तत्त्वज्ञानविषयक चर्चा चालावयाची. असे प्रसंग अगदी क्वचित येत असे नाही. एखाद्या शिष्याला जर काही प्रश्नाबाबत अगत्याचे विवेचन करावे असे वाटले तर तो गुरुजींशी सर्व रात्रभर चर्चा करीत बसायचा. अशा वेळी मी रात्रभर जागत असे. मला थकवाही वाटायचा नाही की झोपही घ्यावीशी वाटायची नाही. गुरुजींचे जिवंत शब्द पुरेसे असत. "अरे, आता पहाट व्हायची वेळ आली. चला आता आपण गंगेच्या तीराने चालत जाऊ या." आणि अशा तऱ्हेने पुष्कळदा आमचे हे आध्यात्मिक मंत्रजागराचे रात्रीचे कार्यक्रम संपत.

मी श्रीयुक्तेश्वरगुरुजींच्या बरोबर राहण्यास सुरुवात केल्यापासून थोड्याच महिन्यांत मला त्यांनी एक बोधपाठ दिला, मोठी शिकवण दिली: "डासांवर मात कशी करावी?" आमच्या घरी रोज रात्री मच्छरदाणी लावण्याची पद्धत होती. पण मला आश्चर्य असे वाटे की, सेरामपूरच्या आश्रमात ही आवश्यक अशी पद्धत का नाही? आश्रम तर डासांचे अगदी

माहेरघर होते. मस्तकापासून पायांपर्यंत त्यांनी मला अगदी चाववून घेतले. शेवटी गुरुजींना माझी दया आली.

"जा, मच्छरदाणी घेऊन ये तुला; आणि एक मलाही आण." ते हसले आणि पुढे म्हणाले, "जर तू तुझ्यापुरती एकच आणलीस तर सर्व डास माझ्या एकट्यावरच हल्ला करतील!"

एकदा काय झाले, गुरुजी नेहमीप्रमाणे मच्छरदाण्या बांधण्यास सांगण्याचे विसरले. झाले, रात्र सुरू झाल्यावर डासांचा एक ताफाच्या ताफा आमच्याभोवती जमा झाला. त्या डासांचे गुंजनगीत अगदी असाहाय्यपणे मी ऐकत राहिलो. गादीवर पडलो व डासांच्या दिशेने त्यांनी शांत व्हावे म्हणून प्रार्थना करू लागलो. अर्ध्या एक तासाने गुरुजींना जाग यावी या उद्देशाने मी जरा मुद्दाम खोकलो. मला वाटले की डासांच्या या चावण्यामुळे मला वेड लागेल. विशेषेकरून त्यांचे जे संगीत-गान सुरू झाले तेव्हा मला वाटले की, ते जणू आपले रक्तपिपासू धर्मविधी उरकीत आहेत.

पण गुरुजींना जाग येण्याचे काही चिन्ह दिसेना. मी त्यांच्याजवळ भीत भीत गेलो. त्यांचा श्वासोच्छ्वास मुळी चालूच नव्हता. त्यांना योगनिद्रा लागल्याचे बारीक नजरेने पाहण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. मी भीतीने गांगरून गेलो.

त्यांची हृदयक्रिया बंद झाली असावी! मी त्यांच्या नाकाखाली आरसा ठेवला. त्यावर वाफ काही दिसेना. अगदी नक्की खात्री करून घेण्याकरिता काही मिनिटे मी त्यांचे तोंड व नाकपुड्या आपल्या बोटांनी बंद केल्या. त्यांचे शरीर थंडगार व निश्चल झाले होते. बावरून कोणाला तरी मदतीला बोलवावे म्हणून मी दरवाज्याकडे वळलो.

"अच्छा! होतकरु प्रयोगकर्त्ता! माझे बिचारे नाक!" गुरुजींचा आवाज ऐकू आला. हसण्यामुळे तो थरथरत होता. "तू झोप का घेत नाहीस? हे सारे जग तुझ्याकरिता बदलणार आहे काय? तू आपल्या स्वतःत बदल करून घे. डासांबद्दलची जाणीवच काढून टाक."

गुपचूपपणे मी आपल्या बिछान्याकडे परतलो. एकही डास मग माझ्याकडे यावयास धजला नाही. नंतर माझ्या ध्यानात आले की, मी केवळ नाखूश होऊ नये म्हणून त्यांनी अगोदर मच्छरदाण्या आणण्यास कबुली दिली होती. त्यांना डासांची मुळी भीतीच वाटत नसे. योगसामर्थ्याने ते डासांना मुळी आपल्याला चावूच देत नसत; किंवा मर्जीनुसार ते चावले तरी त्यांना काही होऊच नये असा बंदोबस्त करीत.

मी मनात असा विचार केला की, "मला ते प्रात्यक्षिक करून दाखवीत आहेत की अशी योगिक अवस्था साध्य करण्याचा मी प्रयत्न करावा." जो खरा योगी असतो त्यास अतींद्रिय अवस्थेमध्ये जाता येते व राहता येते; मग सभोवार असंख्य असे व्यत्यय आले तरी ती समाधी भंग पावत नाही. आणि जगतामध्ये, डासांच्या गुणगुणण्यासारखी ही अनेक व्यवधाने नेहमीच असावयाची. त्यापेक्षा जग वेगळे असे काय आहे? दिवसाच्या प्रकाशाचे सर्वव्यापी तेज. समाधीच्या पहिल्या अवस्थेमध्ये (सविकल्प) साधक बाह्य जगाची संवेदनाशील चिन्हे नाहीशी करून टाकतो. त्या अवस्थेत मग त्याला मानवी संसाराच्या प्रारंभीच्या ईडन [5] उद्यानापेक्षाही सुंदर अशा अंतः प्रदेशातील ध्वनी व दृश्ये ऐकण्याचे व पाहण्याचे भाग्य प्राप्त होते.

ह्या बोधप्रद डासांनी आश्रमात असताना सुरुवातीसच आणखी एक धडा शिकवला. संध्याकाळची सौम्य वेळ होती. गुरुजी प्राचीन ग्रंथांवर विवेचन करीत होते. विवेचन अगदी अप्रतिम होते. मी त्यांच्या पायांशीच अगदी शांतपणे बसलो होतो. एक उद्दाम डास त्या ठिकाणी आपले गान गुणगुणतच येऊन ठेपला व मला त्रास देऊ लागला. गुरुजींच्या सांगण्याकडे माझे लक्ष लागेना. त्याने जशी माझ्या मांडीमध्ये त्वचेखाली आपली विषारी सुई खुपसली तेव्हा प्रतिकारार्थ मी ताबडतोब हात उचलला. 'हिंसा करू नकोस!' आणि नेमक्या वेळी अहिंसेवरील [6] पातंजलीच्या सूत्राची मला आठवण झाली.

"तू आपले काम पुरे का नाही करून टाकलेस?"

"गुरुजी, हत्या करावी असे का आपले सांगणे आहे?"

"नाही, पण मनाने तू त्याच्यावर अगोदरच प्राणघातक प्रहार केलाच होतास की."

"मला समजत नाही आपण काय म्हणताय ते!"

"मारण्याची इच्छाच नाहीशी करणे हा पातंजलीच्या 'अहिंसा' या शब्दाचा मथितार्थ आहे." श्रीयुक्तेश्वरांना माझ्या मनाच्या प्रक्रिया अगदी उघडलेल्या पुस्तकासारख्या वाचता आल्या. "या जगात अहिंसेचे शब्दशः पालन करता येणे अवघड आहे. हिंस्र पशूंना, उपद्रवी प्राण्यांना नाहीसे करणे माणसाला जरूरी पडते. पण क्रोध किंवा द्वेष मनात ठेवण्याची त्याला इतकी जरुरी पडत नाही. मायेचा आस्वाद घ्यावयाला सर्व प्राण्यांना सारखाच हक्क आहे. जो महात्मा सृष्टीचे हे गुपित-कोडे उलगडतो त्याला निसर्गाच्या असंख्य अशा गोंधळून टाकणाऱ्या आविष्कारांशी समरस होता येते. सर्व माणसांना हे सत्य, हिंसा करण्याची प्रबल इच्छा दाबून टाकल्याने कळून चुकते."

"गुरुजी, एखादा हिंस्र पशू आपल्या अंगावर चालून आला तर त्याला ठार मारण्याऐवजी आपण स्वतःचे बलिदान करावे काय?"

"नाही. माणसाचे शरीर मौल्यवान आहे. माणसाच्या शरीरामध्ये वैशिष्ट्यपूर्ण, अजोड असा मेंदू व मज्जातंतुंची केंद्रे आहेत; आणि त्यामुळे माणसाचे शरीर उत्क्रांतीच्या उच्चतम अवस्थेला पोचलेले आहे. त्यामुळे प्रगत अशा साधकाला उच्चतम दैवी गुणांचे आकलन होते व ते गुण त्याला व्यक्त करता येतात. उत्क्रांतीच्या खालच्या अवस्थेतील प्राण्यांना ही साधने प्राप्त झालेली नसतात. आता ही गोष्ट खरी आहे की, ज्या वेळी तो एखादा प्राणी किंवा एखादा जीव अनिवार्यपणे मारतो तेव्हा तो थोड्या तरी पातकाचा धनी होतोच. पण आपल्या धर्मशास्त्रांची शिकवण अशी आहे की, मानवी शरीराची नाहक हत्या करणे म्हणजे कर्मनियमांच्या विरुद्ध एक भयंकर अतिक्रमण होय."

मी समाधानाचा एक सुस्कारा सोडला. माणसाच्या नैसर्गिक प्रेरणांस त्याला नेहमीच शास्त्रार्थांचा दुजोरा मिळतो असे नाही.

माझ्या माहितीप्रमाणे गुरुजींचा वाघ किंवा चित्ता यांच्याशी समोरासमोर असा कधी प्रसंग आला नाही. पण एकदा त्यांची एका विषारी नागाशी गाठ पडली. पण त्या नागाला गुरुजींनी प्रेमाने जिंकले. हा प्रसंग पुरीला असताना घडून आला. पुरीला समुद्रकिनाऱ्यावर

गुरुजींचा आणखी एक आश्रम होता. श्रीयुक्तेश्वरांच्या नंतरच्या आयुष्यातला एक तरुण शिष्य प्रफुल्ल नावाचा होता, तो गुरुजींच्या बरोबर या प्रसंगी होता.

प्रफुल्लने मला ती हकीकत सांगितली. “आश्रमाच्या जवळ—बाहेर आम्ही बसलेलो होतो आणि जवळच तो नाग निघाला. चांगला चार फूट लांबीचा, केवळ कर्दनकाळ. आमच्याकडे जणू तो धावून येत होता. त्याची फणा रागाने पसरलेली होती. गुरुजींनी त्याच्याकडे पाहून चुकचुक केले; एखाद्या लहान मुलाकडे पाहून करतात तसे. नंतर त्यांनी नादबद्ध पद्धतीने हाताच्या टाळ्या [7] वाजवायला सुरुवात केली. हे पाहून मला भीतीने धडकीच भरली. ते त्या भयंकर पाहुण्याची करमणूक करीत होते. मी अगदी गप्प बसून होतो व मनातल्या मनात परमेश्वराची प्रार्थना करीत होतो. नाग आता अगदी गुरुजींच्या जवळ आला होता; पण त्याची काहीएक हालचाल चालू नव्हती. त्याच्यावर ममता दाखविल्याबरोबर तो गुरुजींच्याकडे लोहचुंबकासारखा आकृष्ट केला गेला. उभारलेली भीतिदायक फणा हळूहळू त्याने आकसून घेतली. नाग श्रीयुक्तेश्वरजींच्या पायांमध्ये थोडा वेळ घुटमळला व मग काही वेळाने झुडपात नाहीसा झाला.

“गुरुजींनी आपले हात का हलवावे व नागाने त्यांना दंश का करू नये ह्या सर्व गोष्टींचे कारण मला त्या वेळी समजले नाही.” प्रफुल्लने आपली हकीकत पुरी केली. “त्यानंतर मला हळूहळू कळून येऊ लागले की, आपले साक्षात्कारी गुरु हे कोणत्याही प्राण्याकडून इजा होण्याच्या भीतीपलीकडील आहेत.”

आश्रमात येऊन मला थोडेच दिवस झाले होते. एकदा दुपारी श्रीयुक्तेश्वरजी माझ्याकडे रोखून पाहत असल्याचे माझ्या ध्यानात आले.

“तू फार बारीक आहेस, मुकुंदा.”

त्यांचे हे उद्‌गार मला लागले. खरोखरीच माझे डोळे खोल गेले होते व माझा चेहरा रोडावल्यासारखा दिसत होता. माझे हे ध्यान मला बिलकुल आवडत नसे. लहानपणापासून क्रॉनिक डिस्पेप्शियाचा (अपचनाचा) विकार जडलेला होता. घरात माझ्या खोलीत शेल्फवर शक्तिवर्धक औषधांच्या अनेक बाटल्या पडलेल्या असायच्या पण त्यांपैकी एकीचाही मला उपयोग झाला नाही. कधी कधी मी स्वतःच्या मनालाच विचारी की, अशा दुबळ्या शरीराने जगण्यात काही अर्थ आहे काय?

“औषधांच्या गुणाला काही मर्यादा असतात. दिव्य सर्जनशील अशा जीवनशक्तीला मात्र काही मर्यादा नसतात, ध्यानात ठेव, तुझी तब्येत चांगली सुधारेल व तू अगदी धष्टपुष्ट होशील.”

गुरुजींच्या शब्दांनी माझी ताबडतोब खात्री पटविली की, त्याची प्रचिती माझ्या स्वतःच्या आयुष्याच्या बाबतीत पडताळून पाहावी. कोणाही वैद्याने (आणि मी पुष्कळांची औषधे घेतली) आजपर्यंत माझ्या ठिकाणी इतका पूर्ण भरवसा व श्रद्धा जागृत केली नसेल.

दिवसेंदिवस माझी तब्येत सुधारत चालली आणि श्रीयुक्तेश्वरांच्या सुप्त आशीर्वादांनी दोनच आठवड्यांत माझे वजन वाढू लागले. वजन वाढावे म्हणून आजपर्यंत मी किती तरी

प्रयत्न केले होते; पण ते सारे निष्फळ ठरले होते. माझी पोटदुखी कायमचीच नाहीशी झाली.

त्यानंतर पुढे पुष्कळदा गुरुजींनी आपल्या दिव्य आशीर्वादांनी पुष्कळांचे मधुमेह, अपस्मार, क्षय, अर्धांगवायू ह्यांसारखे रोग बरे केलेले पाहण्याचे सद्भाग्य मला लाभले.

“पुष्कळ वर्षे झाली. मला सुद्धा अशीच काळजी वाटायची की माझे वजन कसे सुधारेल?” माझी तब्येत सुधारल्यावर थोड्याच दिवसांनी गुरुजी मला सांगू लागले, “एकदा एका मोठ्या दुखण्यातून बरा झाल्यावर अंगात ताकद भरून येत असताना मी वाराणशीला लाहिरी महाशयांना भेटावयास गेलो.

“‘महाराज,’ मी म्हणालो, ‘मी फार आजारी होतो व माझे वजन बरेच घटले आहे.’

“‘मी पाहतो आहे, युक्तेश्वर, [8] तू स्वतःलाच आजारी पाडलेस आणि आता तुला वाटते की तू बारीक झाला आहे.’

“अशा तऱ्हेचे उत्तर मिळेल अशी माझी बिलकुल अपेक्षा नव्हती. पण गुरुजी पुढे माझा उत्साह वाढवीत बोलू लागले:

“‘बघू काय ते! उद्या तुझी तब्येत तुला बरी वाटायला लागेल.’

“सूचनाग्राहक अशा माझ्या मनाने ह्या शब्दांचा अर्थ असा घेतला की, ते गुप्तपणे मला बरे करीत असावेत. दुसऱ्या दिवशी मी त्यांना गाठले आणि मोठ्या आनंदाने म्हणालो, ‘महाराज, आज मला फार बरे वाटते आहे.’

“खरे की काय? आज तूच स्वतः हुरूप धारण करीत आहेस!’

“‘नाही, गुरुजी!’ मी विरोध दर्शविला. ‘आपणच मला बरे केलेत. गेल्या कित्येक आठवड्यांत मला अशी ही ताकद व असा उत्साह प्रथमच वाटू लागला आहे.’

“‘होय. तुझी व्याधी तशीच गंभीर स्वरूपाची होती. पण अजून तुझे शरीर अशक्त आहे. उद्या कसे असेल हे कोणाला सांगता येईल?’

“एखाद्या वेळी माझे दुखणे उलटायचे ह्या विचारानेच माझे भीतीने अंग थरारले. दुसऱ्या दिवशी सकाळी जसातसाच मी लाहिरी महाशयांच्या घरी स्वतःला ढकलत नेऊ शकलो.

“‘गुरुजी, मी पुन्हा आजारी झालो.’

“माझ्या गुरूंनी माझ्याकडे विनोदगर्भ दृष्टिक्षेप केला. ‘असे होय? म्हणजे तू स्वतःला परत आजारी पाडलेस.’

“माझा धीर खचला होता. ‘गुरुदेव,’ मी म्हणालो, ‘मला आता असे वाटायला लागले आहे की, तुम्ही हे सर्व थट्टेवर नेत आहा. मी माझ्या तब्येतीबद्दल जे काही खरोखरी घडत आहे ते सांगत असतो; आणि त्याच्यावर आपला विश्वास का बसत नाही हे काही मला समजत नाही.’

“‘खरेच आहे. कधी आपण अशक्त आहोत तर कधी आपण सशक्त आहोत असे तू आलटून पालटून स्वतःला समजून घेत आहेस. दूसरे काय?’ माझे गुरू माझ्याकडे वास्तल्यपूर्ण दृष्टीने पाहत होते. “आता तुला समजून चुकले असेल की, तुझे जसे अर्धसुप्त, अर्धजागृत विचार किंवा अपेक्षा चालू असेल, त्याप्रमाणे तुझी प्रकृती सुधारत आहे किंवा

बिघडत आहे." विचार ही एक प्रेरणा आहे, शक्ती आहे. विद्युत् शक्तीसारखी किंवा गुरुत्वाकर्षणासारखी. परमेश्वराच्या सर्वशक्तिमान अशा चैतन्याचे मानवी मन हे एक स्फुल्लिंग आहे. मी तुला दाखवू शकेन की, ज्या गोष्टीवर तू अत्यंत विश्वास ठेवींत आहेस ती तशीच ताबडतोब घडून येईल.'

"लाहिरी महाशय हे कधी निरर्थक बोलत नाहीत हे मला माहीत असल्याने मी त्यांना मोठ्या आश्चर्ययुक्त आदरभावाने व कृतज्ञतेने म्हणालो, 'गुरुजी, समजा, मी असे मनात समजलो की मी बरा झालो व माझे वजनही पूर्वीप्रमाणे झाले; तर ते तसे खरोखरीच घडून येईल काय?'

"'होय, अगदी या घटकेला सुद्धा.' गुरुजी अगदी गंभीरपणे सांगू लागले. त्यांची नजर माझ्या डोळ्यांवर स्थिर झालेली होती.

"आणि त्या क्षणीच माझ्या ताकदीतच नव्हे तर वजनात सुद्धा वाढ झाल्याचे मला वाटू लागले. लाहिरी महाशयांनी नंतर मौन धारण केले. त्यांच्या पायांशी मी काही तास बसलो व नंतर आईच्या घरी गेलो. वाराणशीत असताना मी तेथेच राहत असे.

"'बेटा, काय झालेय तुला? जलोदर झालाय की काय तुला, एवढा फुगत चालला आहेस तो?' आईचा तिच्या स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. आजारपणापूर्वी जशी होती तशीच माझी प्रकृती सुदृढ व सशक्त झाली होती.

"मी वजन करून पाहिले, आणि मला असे आढळून आले की, माझे वजन एका दिवसात पन्नास पौंडांनी वाढलेले आहे. आणि ही वाढ कायमची टिकली. ज्यांनी माझे हडकुळे शरीर पाहिले होते अशा मित्रांना व ओळखीच्या लोकांना फार आश्चर्य वाटले. त्यांपैकी कित्येकांनी आपल्या आयुष्याचा मार्ग बदलला; व त्या चमत्काराच्या प्रभावाने ते लाहिरी महाशयांचे शिष्य बनले.

"माझे गुरू परमेश्वराच्या ठिकाणी सदैव जागृत असल्याने त्यांच्या दृष्टीने हे जग म्हणजे विधात्याच्या स्वप्नाचे स्थूलीकरण होय; त्यापलीकडे दुसरे काही नाही हे ते जाणून होते. दिव्यस्वरूप स्वप्नद्रष्ट्याशी आपण तादात्म्य पावलेलो आहोत, हे पूर्णपणे माहीत असल्याने लाहिरी महाशय ह्या अद्भुत जगाच्या [9] स्वप्नरूप अणू-परमाणूंचे स्थूलीकरण करू शकत असत; त्यांचा स्थूलभाव नष्ट करू शकत किंवा त्यांच्यामध्ये आपल्या इच्छेनुसार वाटेल तो बदल घडवून आणू शकत असत.

"ह्या सृष्टीचे सर्व व्यापार नियमानुसार चालतात." श्रीयुक्तेश्वरांनी आपले भाषण संपविले. "बाह्य विश्वामध्ये ज्या तत्त्वांनुसार अंमल चालतो व जी तत्त्वे शास्त्रज्ञांना शोधून काढता येतात अशा तत्त्वांना निसर्गनियम म्हणतात. पण ह्या निसर्गनियमांहूनही काही सूक्ष्मतर असे नियम असतात की, ज्यांचा अंमल अवगुंठित आध्यात्मिक स्तरांवर आणि जाणीवेच्या अंतःस्थ क्षेत्रांवर चालत असतो. हे नियम योगशास्त्राच्या अभ्यासाने समजू शकतात. म्हणजे जड सृष्टीच्या खऱ्या स्वरूपाचे आकलन हे वैज्ञानिकांना होत नसून साक्षात्कारी सिद्धपुरुषांना होऊ शकते. ज्ञानाचे असे आकलन झालेले असल्यामुळे येशू ख्रिस्त एका शिष्याने कापून टाकलेला एका सेवकाचा कान पुनः बरोबर बसवून टाकू शकला." [10]

गुरुजी धर्मग्रंथांवर अप्रतिम भाष्य करीत. माझ्या पुष्कळशा सुखद आठवणी अशा प्रवचनांविषयी आहेत. पण त्यांची विचाररत्ने ही दुर्लक्ष किंवा मूढता यांच्या राखेच्या ढिगाऱ्यात पडलेली नसत. माझ्या शरीराची एखादी अस्वस्थ हालचाल झाली किंवा माझे मन किंचित जरी दुर्लक्ष करू लागले तरी तितके सुद्धा गुरुजींचे प्रवचन बंद पडण्यास कारण पुरत असे.

"तुझे माझ्या बोलण्याकडे लक्ष नाही," असे म्हणून एके दिवशी दुपारी श्रीयुक्तेश्वरांनी आपले चालू असलेले प्रवचन थांबविले. नेहमीप्रमाणे माझे लक्ष बरोबर आहे की नाही याचा ते निर्दयपणे मागोवा घेत होते.

"गुरुजी," मी विरोध दर्शवू लागलो. "मी काही हललो नाही. माझ्या पापण्यांची सुद्धा हालचाल झाली नाही. आपण उच्चारलेला प्रत्येक शब्द मी पुनः उच्चारुन दाखवीन!"

"ते काही असले तरी तुझे माझ्याकडे सर्वस्वी लक्ष नव्हते. तू हे जे आता आग्रहाने नाकबूल करीत आहेस त्यामुळे मला सांगणे जरूर वाटते की, तुझ्या मनाच्या पार्श्वभूमीवर तू तीन इमले बांधीत आहेस. एक सपाट मैदानावर हिरव्यागार वनराजीमध्ये, दुसरा गिरिशिखरावर व तिसरा सागरतीरी."

हे संदिग्धपणे सूचित केलेले विचार खरोखरीच माझ्या मनात अभावितपणे आलेच होते; तेव्हा वरमून मी त्यांच्याकडे दृष्टिक्षेप केला.

"आता अशा गुरूंच्या पुढे मी काय करणार? यांना माझ्या मनात भरमसाट येत असलेले विचार सुद्धा समजतात!"

"तूच तो अधिकार मला बहाल केलेला आहेस. ज्या सूक्ष्म सत्यतत्त्वांचे मी विवेचन करीत आहे, ती तुझे पूर्ण लक्ष असल्याखेरीज तुला कळणार नाहीत. अगदी जरूर असल्याशिवाय मी दुसऱ्यांच्या मनाच्या एकांतात प्रवेश करीत नाही. आपल्या विचारांमध्ये गुप्तपणे वावरण्याचा नैसर्गिक विशेष हक्क हा प्रत्येक मनुष्याला असतोच. ज्याला सगळीकडे प्रवेश आहे असा परमेश्वर सुद्धा तेथे प्रवेश करीत नाही. मी सुद्धा ते धाडस करीत नाही."

"गुरुजी, आपले नेहमीच स्वागत आहे!"

"ही तुझी शिल्परूपी स्वप्ने पुढे खरी ठरणारी आहेत. सध्या तुला अभ्यास केला पाहिजे!"

अशा तऱ्हेने ओघाओघाने, साध्या पद्धतीने गुरुजींनी माझ्या आयुष्यातील तीन महत्त्वाच्या आगामी घटनांचे भविष्य वर्तविले. अगदी लहानपणापासून माझ्या डोळ्यांपुढे तीन इमारतींची —प्रत्येक इमारत वेगवेगळ्या पार्श्वभूमीवर बांधलेली—अशा इमारतींची तीन कोड्यांसारखी दृश्ये दिसत असत. श्रीयुक्तेश्वरांनी दर्शविलेल्या क्रमानुसार ही दृश्ये साकार झाली. पहिली म्हणजे रांचीमधील मैदानावर स्थापन केलेल्या मुलांच्या योग-विद्यालयाची इमारत, नंतर अमेरिकेत लॉस एंजेलिस येथे टेकडीवर बांधलेली संस्थेची अमेरिकेमधील मुख्य इमारत आणि त्यानंतर कॅलिफोर्नियामधील एन्सिनीटास येथे बांधलेला समुद्राचे विहंगम दृश्य न्याहाळणारा आश्रम. समोर प्रशान्त महासागर त्याच्यापुढे पसरलेला आहे असा.

गुरुजी कधी प्रौढीने असे म्हणत नसत, "मी असे भविष्य वर्तवितो की, अमुक अमुक घटना ही अशी होणार." ते साधारणपणे नुसते सुचवीतः "असे होईल असे तुला नाही का

वाटत?” पण त्यांच्या साध्या शब्दांत भविष्यवाणी दडलेली असे. त्यांच्या भाकितात कधी फरक होत नसे. आणि किंचित अवगुंठित अशी भविष्ये कधी खोटी ठरत नसत.

श्रीयुक्तेश्वर भिडस्त स्वभावाचे असत व त्यांचे आचरण एखाद्या व्यवहारी माणसासारखे असे. त्यांच्या बाबतीत संदिग्ध किंवा हवेत मनोरे बांधण्याचा प्रकार नसावयाचा. त्यांचे पाय भूतलावरच असायचे; पण डोके मात्र स्वर्गात जाऊन पोचलेले असावयाचे. व्यवहारी माणसे त्यांच्याकडून प्रशंसा मिळवीत. ते म्हणत, “साधुत्व म्हणजे मौन नव्हे! दिव्यदृष्टी काही माणसाला असमर्थ करीत नाही. सद्‌गुणाच्या व्यावहारिक प्रदर्शनातून तीव्र बुद्धिमत्ता निर्माण होते.”

अतींद्रिय सृष्टीबाबत चर्चा करणे गुरुजींना विशेष आवडत नसे. त्यांच्या भोवती असलेले ‘विस्मयकारी’ तेजोवलय हे नितान्त ऋजुतेचे, साधेपणाचे असे. संभाषणप्रसंगी चकित करून टाकणारे दाखले ते क्वचितच देत. कृतीत मात्र त्यांचे व्यक्तित्व मोकळेपणाने व्यक्त व्हावयाचे. पुष्कळसे गुरू चमत्कारांविषयी नुसते बोलतात, पण प्रत्यक्ष एकसुद्धा चमत्कार करून दाखवीत नाहीत. श्रीयुक्तेश्वर ह्या सूक्ष्म नियमांबाबत क्वचितच बोलत; पण त्यांचा उपयोग मात्र इच्छेनुसार वाटेल तेव्हा करून दाखवीत.

“अंतरंगातून परवानगी मिळाल्याखेरीज साक्षात्कारी पुरुष चमत्कार करून दाखवीत नाही.” गुरुजी खुलासा करीत. परमेश्वराला आपल्या सृष्टीची गुपिते अशी-तशी प्रकट झालेली आवडत नाहीत. [11] शिवाय प्रत्येक व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणे वागण्याचा हक्क आहे व तो हक्क दुसऱ्या कोणास हिरावून घेता येणार नाही. संत जरी झाला तरी तो व्यक्तिस्वातंत्र्यावर अतिक्रमण करू इच्छीत नाही.

श्रीयुक्तेश्वरांच्या ठिकाणी जी कमालीची शांतता आढळून यायची त्याचे कारण त्यांना परमात्मस्वरूपाचे सखोल दर्शन झालेले होते, हे होय. ज्यांना साक्षात्कार झालेला नाही अशा नुसत्या पोकळ गुरूंप्रमाणे, ज्यांचा थांग लागू शकत नाही अशी गुह्ये व्यवहारी लोकांना जुजबी रीतीने प्रकट करून दाखविण्यास श्रीयुक्तेश्वरांना वेळ नसे. हिंदू धर्मग्रंथात अशी म्हण आहे: “उथळ माणसांत अल्प विचारांचे मासे फार गडबड उडवून देतात. सागरा सारखे ज्यांचे मन विशाल आहे त्यांच्यामध्ये अंतःस्फूर्तीचे देवमासे किंचित सुद्धा हालचाल करीत नाहीत.”

गुरुजीचे स्वरूप, आचरण असे हे साधे, अवडंबररहित असल्याने ते कधी देखावा करीत नसल्याने, त्यांच्या समकालीनांपैकी फार थोड्यांनाच त्यांच्या अतिमानव स्वरूपाची कल्पना होती. एक म्हण आहे: “ज्याला आपले शहाणपण लपवून ठेवता येत नाही, तो मूर्ख होय.” ही म्हण माझ्या धीरप्रकृती व शांतस्वभावी गुरुजींच्या बाबतीत बिलकुल लागू पडत नसे.

त्यांचा जन्म जरी इतर मर्त्य प्राण्यांसारखा झालेला होता तरी श्रीयुक्तेश्वरांनी काल व अवकाश यांचा जो स्वामी त्या परमेश्वराच्या ठिकाणी तादात्म्य मिळविलेले होते. मानवता व दिव्यता यांचे ऐक्य साधण्याच्या मार्गात गुरुजींना दुर्लंघ्यनीय अशी कोणतीही अडचण आली नाही. अशा तऱ्हेचा अडसर असतच नाही; फक्त मानवास आध्यात्मिक साधनेमध्ये धाडस करावयास नको असते, हे मला कळून आले.

श्रीयुक्तेश्वरांच्या पवित्र पादस्पर्शाने मी नेहमीच थरारून जात असे. गुरुच्या पवित्र संपर्काने शिष्य आध्यात्मिक दृष्ट्या चुंबकाप्रमाणे आकर्षित केला जातो व गुरूचे गुणधर्म त्याच्या ठिकाणी दिसू लागतात. शिष्याच्या मेंदूतील अनिष्ट सवयींची यांत्रिक रचना खरडून साफ केली जाते; त्याच्यामधील पार्थिव संस्कारांचे खोलगट भाग त्याच्या हिताच्या दृष्टीने भरले जातात. थोडा वेळ तरी का होईना, त्याला आपल्यावरचे मायेचे आवरण उचलले गेल्यासारखे वाटते आणि खऱ्या दिव्य आनंदाचे ओझरते दर्शन होते. मी जेव्हा जेव्हा गुरुपुढे भारतीय रिवाजाप्रमाणे वंदन करीत असे, त्या त्या वेळी माझे शरीर मुक्तिप्रदायक चमकीने पुलकित होत असे.

गुरुजी मला सांगू लागले, “लाहिरी महाशय जरी गप्प असले किंवा अगदी धार्मिक विषयाव्यतिरिक्त विषयांवर संभाषण करू लागले तरीसुद्धा मला असे आढळून आले आहे की, त्यांनी मला अविस्मरणीय, कधीही न पुसले जाणारे ज्ञान प्रदान केले आहे.”

श्रीयुक्तेश्वरांचा माझ्यावर तसाच परिणाम झाला. आश्रमात प्रवेश करावयाच्या वेळी जर माझ्या मनाला त्रास झाला असला किंवा माझ्या मनाला बरे वाटत नसले तर आश्रमात शिरल्यानंतर माझ्या मनाच्या वृत्तीत हळूहळू बदल होऊ लागे. गुरुजींचे केवळ दर्शन झाल्यानेच माझ्या मनाला बरे व शांत वाटू लागे. त्यांच्या सहवासातील प्रत्येक दिवशी आनंद, शांतता व ज्ञान यांचा नवीन नवीन अनुभव घडून यायचा. लोभ, क्रोध किंवा काम, मानवी आसक्ती यांच्यायोगे मी त्यांना कधीही मूढ झालेले किंवा भावनोद्रेकाने बेभान झालेले पाहिले नाही.

“मायेचा अंधकार हळूहळू येत आहे. चला, आपण आता आपल्या हृदय-गुंफेत बसून राहू.” अशा तऱ्हेचे ताकीद देणारे शब्द वापरून गुरुजी शिष्यांना सतत क्रियायोगाच्या अभ्यासाच्या जरुरीची आठवण करून देत. एखादा नवीन विद्यार्थी प्रसंगी शंका प्रदर्शित करावयाचा की, आपण खरोखरच क्रियायोगाची साधना करावयास पात्र असू की नाही?

त्या वेळी श्रीयुक्तेश्वर त्याचे शंकानिरसन करावयाचे व त्याचे समाधान करावयाचे. “जुने सगळे विसरून जा. सर्व माणसांची आतापर्यंत खलास झालेली आयुष्ये ही अनेक लज्जास्पद गोष्टींमुळे अंधकारमय झालेली आहेत. मनुष्याला ईश्वराची ओळख जोपर्यंत झाली नाही तोपर्यंत त्याच्या वागणुकीवर विश्वास ठेवता येत नाही. आतापासूनच जर तू आध्यात्मिक दृष्ट्या उद्योगाला लागलास तर आयुष्यातल्या पुढील सर्व गोष्टी इतउत्तर सुधारतील.”

गुरुजींजवळ आश्रमात नेहमी बरेचसे तरुण शिष्य, चेले असत. त्यांच्या बौद्धिक व आध्यात्मिक शिक्षणामध्ये त्यांचे आयुष्यभर लक्ष असायचे. त्यांच्या समाधीच्या थोडे दिवस अगोदर त्यांनी सहा वर्षांची दोन मुले व सोळा वर्षांचा एक मुलगा यांना शिक्षणाकरिता आश्रमात ठेवून घेतले होते. त्यांनी ज्या विद्यार्थ्यांना आपल्याजवळ ठेवून घेतले होते त्यांना त्यांनी फार दक्षतेने तयार केले. “शिष्य” आणि “शिस्त” हे दोन्ही शब्द व्युत्पत्तिशास्त्राच्या दृष्टीने तसेच व्यवहाराच्या दृष्टीने एकमेकांशी संबंधित आहेत.

आश्रमवासी गुरूंवर प्रेम करीत असत व त्यांना मानीत असत. हातांनी बारीक टाळी वाजविल्यावर शिष्य त्यांच्याजवळ उत्सुकतेने येत. पण ते जेव्हा स्तब्ध व अंतर्मुख असत तेव्हा

त्यांच्याशी बोलावयाचे कोणास धाडस होत नसे. ते जेव्हा खुशीत येऊन हास्य करीत तेव्हा मुले त्यांना आपल्यांतलेच एक समजत असत.

श्रीयुक्तेश्वर क्वचितच दुसऱ्यांना आपली शारीरिक सेवा करावयास सांगत; किंवा चेल्याकडून ते कोणत्याही तऱ्हेची मदत, त्याने आपण होऊन दिल्याशिवाय घेत नसत. कपडे धुण्याचे खास काम जर शिष्य विसरले तर गुरुजी ते स्वतः करीत.

त्यांच्या अंगावरील नेहमीचे वस्त्र म्हणजे संन्याशाचे पूर्वापार चालत आलेले भगव्या रंगाचे वस्त्र होय. घरातल्या घरात ते बंद नसलेले पादत्राण वापरीत. हे पादत्राण योग्यांच्या पद्धतीप्रमाणे वाघाच्या किंवा हरणाच्या कातड्याचे केलेले असे.

श्रीयुक्तेश्वर इंग्लिश, फ्रेंच, बंगाली व हिंदी अस्खलितपणे बोलत. त्यांचे संस्कृतही बरे असे. इंग्लिश व संस्कृत शिकविण्याबाबत त्यांनी स्वतः विद्यार्थ्यांना त्या भाषा लवकर समजाव्यात म्हणून काही युक्त्या आपल्या कल्पकतेने शोधून काढल्या होत्या व त्यांचा ते संथपणे शिकविण्याच्या कामी अवलंब करीत.

गुरुजींना आपल्या शरीराबद्दल विशेष अशी आसक्ती नव्हती; पण प्रकृतीची ते योग्य ती काळजी घेत. शारीरिक व मानसिक आरोग्य राखण्याच्या कामी दैवी-ईश्वरप्रेरित दक्षताच यथायोग्य तऱ्हेने नित्य कार्य करीत असते, असे ते प्रतिपादन करीत. कोणत्याही तऱ्हेचा आत्यंतिकपणा ते वर्ज्य समजत. एका शिष्याला दीर्घकालपर्यंत उपास करण्याची इच्छा झाली; तर गुरुजी त्याला म्हणाले, “कुत्र्यापुढे एखादा हाडाचा तुकडा का नाही टाकत?” [12]

श्रीयुक्तेश्वरांची शरीरप्रकृती उत्तम असे. मी त्यांना आजारी पडल्याचे [13] कधीही पाहिले नाही. व्यवहारी पद्धतीचा थोडा आदर दाखविण्याच्या हेतूने ते आपल्या शिष्यांना त्यांची इच्छा असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेण्याची परवानगी देत. ते म्हणत, “डॉक्टरलोकांनी लोकांच्या तब्येती बऱ्या करण्याचे काम, अखिल वस्तुमात्राला लागू असणाऱ्या परमेश्वराच्या नियमांनुसार करीत राहावे.” परंतु डॉक्टरांच्या उपचारांपेक्षा मानसोपचार पद्धतीला ते श्रेष्ठ समजत. ते आपल्या शिष्यांना नेहमी म्हणायचे की. “ज्ञान हा सर्वात श्रेष्ठ असा प्रकृती शुद्ध करण्याचा मार्ग आहे.”

“शरीर म्हणजे एक धोकेबाज मित्र आहे. त्याला जेवढे जरूर आहे तेवढे देऊन टाका; पण जास्त काही देऊ नका. वेदना आणि आराम ह्या क्षणभंगुर आहेत. द्वैतधर्माच्या ह्या साऱ्या उपाधी शांत चित्ताने राबवा; सहन करा; आणि त्याचबरोबर त्यांच्या तावडीतून आपली सुटका करून घेण्याचा प्रयत्न करीत जा. रोग व तसेच त्याचे निवारण यांचे कार्य कल्पनेतून होत असते. शरीरात त्यांचा प्रवेश होण्याचा कल्पना हा दरवाजा आहे. तुम्ही जरी आजारी असला तरी आपल्याला खरोखरी काही दुखणे झाले आहे ही भावना मनातून काढून टाका. ह्या प्रमाणे, मान्यता न मिळाल्याने तो आगंतुक पाहुणा पळून जाईल!”

गुरुजींच्या शिष्यसमुदायात पुष्कळ डॉक्टरही असत. ते त्यांना म्हणत, “ज्यांनी शरीरविज्ञानशास्त्राचा अभ्यास केला आहे त्यांनी आणखी पुढे जाऊन आत्मज्ञानाचे जे शास्त्र आहे त्याचा अभ्यास करावा. शारीरिक रचनेच्या मागे एखादी सूक्ष्म आध्यात्मिक रचना दडलेली आहे.” [14]

श्रीयुक्तेश्वर आपल्या विद्यार्थ्यांना पाश्चिमात्य व पौर्वात्य या दोन संस्कृतींमधील दुवा सांधण्याचे कार्य प्रत्यक्ष आचरणात आणावे म्हणून उपदेश करीत. बाह्य आचारविचारांत ते स्वतः जरी पाश्चिमात्य राहणीचे असले तरी अंतरंगामध्ये ते आध्यात्मिक वृत्तीचे पौर्वात्यच होते. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रगतिशील, शोधक व आरोग्यशील प्रवृत्तीची ते प्रशंसा करीत. त्याचप्रमाणे पौर्वात्य संस्कृतीस धार्मिक नि आध्यात्मिक आदर्शांनी शतकानुशतके टिकलेले असे एक आगळे तेज दिले आहे, याचाही ते गौरवपूर्ण उल्लेख करीत.

शिस्तीचे वळण मला अपरिचित असे नव्हते. घरी वडील फार कडक. अनंतदादा सुद्धा कधी कधी फार कठोर वागायचा. पण श्रीयुक्तेश्वरांची शिस्त अशी होती की, जहाल म्हटल्याशिवाय तिचे दुसऱ्या शब्दाने वर्णन करता यायचे नाही. त्यांचे स्वतःचे आचरण अगदी परिपूर्ण असल्याने शिष्यांच्या ढिलाईबद्दल ते फार टीका करीत; मग ती ढिलाई साध्या कामात असो, की चारित्र्यस्खलनाच्या सूक्ष्म बाबतीत असो.

“खऱ्या कळकळीशिवाय नुसती चांगली रीतभात म्हणजे एखाद्या सुंदर मेलेल्या स्त्रीप्रमाणे आहे.” अशाच एका निमित्ताने ते म्हणाले, “नुसता रीतीभातीखेरीज सरळपणा म्हणजे एखाद्या शस्त्रवैद्याच्या चाकूप्रमाणे आहे; परिणामकारक पण त्रासदायक. सरळपणाच्या जोडीला वागण्याची पद्धत असली म्हणजे तो सरळपणा उपयोगी पडतो व त्याची सर्व लोक प्रशंसा करतात.

गुरुजी माझ्या आध्यात्मिक प्रगतीवर खूश आहेत असे दिसत होते; कारण तिचा ते क्वचितच उल्लेख करीत असत. इतर बाबतींमध्ये त्यांचे बोलणे ऐकून घेण्याची माझ्या कानांना सवय होती. माझे प्रमुख दोष म्हणजे लक्ष नसणे, मधून मधून येणारे औदासीन्य आणि शिष्टाचाराच्या काही नियमांचा भंग करणे, आणि मधून मधून दिसून येणारा गैरशिस्तपणा.

“तुझे वडील भगवती यांचे वागणे कसे व्यवस्थित असते आणि काटेकोरपणे असते ते पाहा.” माझे गुरू मला सांगत. सेरामपूर आश्रमात मी जेव्हा पहिल्या वेळी गेलो त्यानंतर लवकरच लाहिरी महाशयांचे हे दोन शिष्य एकमेकांस भेटले. वडील आणि गुरुजी परस्परांची वाखाणणी करीत. दोघांनी अध्यात्माच्या ग्रॅनाइट खडकावर एक सुंदरसे आंतरिक जीवन उभारले होते. सर्वग्रासी काळाला ते बधणारे नव्हते.

अगदी लहानपणी एका शिक्षकाने मला काही थोडे दिवस शिकविले होते. त्याच्याकडून मी काही चुकीचे धडे ग्रहण केले होते. त्याने मला असे ठासून सांगितले होते की, संसारातील कर्तव्यांमध्ये चेल्याने फारसे लक्ष घालू नये. मी ज्या ज्या वेळी कामाकडे दुर्लक्ष केले किंवा काम करण्याचे टाळले त्या त्या वेळी मला शिक्षकाने शिक्षा केली नाही. मनुष्याचा स्वभावच असा आहे की, अशा तऱ्हेची शिकवणूक तो लवकरच आत्मसात करतो. अशा तऱ्हेच्या गोड वाटणाऱ्या निष्काळजीपणाच्या भ्रमापासून गुरुजींच्या कडक शिस्तीच्या दंडूक्याने मला ताळ्यावर आणले.

“जी माणसे ह्या जगाच्या दृष्टीने फार चांगली असतात ती दुसऱ्यांना सुशोभित करतात.” श्रीयुक्तेश्वरांनी एकदा वरीलप्रमाणे शेरा मारला. जोपर्यंत तुम्ही पृथ्वीवरील खुली हवा घेता तोपर्यंत तुम्हांवर कृतज्ञ बुद्धीने जगाची सेवा करण्याचे बंधन असते. फक्त ज्याने श्वसनरहित

अवस्था [15] साध्य केली आहे तोच फक्त विश्वाच्या हुकुमाचा बंदा राहत नाही." ते पुढे रूक्षपणे म्हणाले, "तुझी जेव्हा अशी पूर्णावस्था येईल तेव्हा मी तुला सांगण्यास विसरणार नाही."

माझे गुरू कोणत्याही लालचीने वश होत नसत; प्रेमाने सुद्धा. ते कोणालाही दया दाखवीत नसत; अगदी आपण होऊन, खुशीने शिक्षणाकरिता आलेल्या माझ्यासारख्या शिष्याला सुद्धा. गुरुजी आणि मी विद्यार्थ्यांकडून किंवा तिऱ्हाइतांकडून वेढले गेलेले असो किंवा आम्ही दोघे एकटेच असू, ते नेहमी स्पष्ट बोलत व टीका करावयाची ती कडकपणे करीत. उथळपणा किंवा विसंगतपणा यास कारणीभूत होणारी कितीही जरी क्षुल्लक ढिलाई झाली तरी ती त्यांच्या निर्भर्त्सनेतून सुटत नसे. अहंकार जमीनदोस्त करून टाकण्याची ही कडक शिस्त पालन करण्यास फार कठीण होती. परंतु माझा दृढनिश्चयच असा झाला होता की, श्रीयुक्तेश्वरांना माझ्या मानसिक सुरकुत्या सरळ करून टाकण्यास पूर्ण मुभा द्यावी. माझ्यामध्ये हे प्रचंड परिवर्तन घडवून आणण्याचे ते सारखे कष्ट करीत असत आणि त्यांच्या शिस्तीच्या हातोड्याच्या वजनाखाली पुष्कळदा मी हादरून जात असे.

"तुला जर माझे बोलणे आवडत नसेल तर तुला जायला केव्हाही मोकळीक आहे." गुरुजी मला आश्वासन देत. "मला तुझ्यापासून काहीही नको आहे; फक्त तुझ्यामध्ये उन्नती व्हावी अशी माझी तीव्र इच्छा आहे. तुला जर येथे आश्रमात राहिल्याने फायदा होतो आहे असे वाटत असेल तरच तू येथे राहा."

माझ्या अहंकाराला ते असे नमविणारे प्रहार करीत त्याबद्दल त्यांचे माझ्यावर अपरिमित ऋण आहे. उदाहरण द्यावयाचे म्हणजे मला कधी कधी वाटे की, माझ्या जबड्यामधील सडलेला नि कुजलेला दात ते शोधून काढून, उपटून बाहेर फेकून देत आहेत. मनुष्याच्या मनावरील अहंतेचे कवच इतके घट्ट बसलेले असते की, ते काढून टाकण्याकरिता जोर लावल्याशिवाय काम होत नाही. ते कवच एकदा काढून टाकले की, मनुष्याच्या मनामध्ये दिव्यत्व प्रकट व्हावयाला शेवटी मार्ग मोकळा होतो. स्वार्थाने ओतप्रोत भरलेली कठीण अंतःकरणे भेदून आरपार होण्यास ते सारखा वृथा संघर्ष करीत असते.

श्रीयुक्तेश्वरांची अंतःस्फूर्ती ही दुसऱ्याच्या अंतःकरणाचा भेद घेत असे; मग तो मनुष्य कितीही कुरकुर करो. पुष्कळदा ते त्याच्या मनात चाललेल्या विचारांना जबाब देत असत. मनुष्य जे शब्द वापरतो व त्या शब्दांच्या उच्चाराच्या पाठीमागे त्याचे जे प्रत्यक्ष विचार असतात त्यांच्यामध्ये महदंतर असते. गुरुजी म्हणायचे, "शांतपणे विचार करून दुसऱ्याचे विचार त्याच्या शब्दावडंबराच्या गोंधळाच्या पलीकडे जाऊन जाणावेत."

दिव्य दृष्टीने जे ज्ञान प्रकट होते ते पुष्कळदा संसारी जनांच्या कानांना ऐकावयास क्लेशकारक असते. उथळ नि वरवरच्या शिष्यांना गुरुजी आवडत नसत. पण सुज्ञ विद्यार्थी जे असत—अर्थात त्यांची संख्या कमी होती—त्यांना मात्र त्यांच्याबद्दल नितान्त आदर असे.

मी असे सांगण्याचे धाडस करतो की, श्रीयुक्तेश्वरांचे बोलणे असे स्पष्ट, निर्भीड व टीकात्मक स्वरूपाचे नसते तर त्यांच्याभोवती अनुयायांची मनस्वी गर्दी झाली असती.

त्यांनी एकदा माझ्याजवळ कबूल केले की, “माझ्याकडे जे शिकावयास येतात त्यांना मी कडक शिस्तीत धरतो. माझा शिरस्ता असा आहे. पत्करा, नाही तर सोडून द्या. मला तडजोड करावयाची नाही. पण तू तुझ्या शिष्यांशी दयाशील वृत्तीने वागशील. तुझी ती पद्धत असेल. मी शुद्धीकरण फक्त कडक भट्टीतच करतो. माझी ही दिव्य परीक्षा साधारण प्रतीच्या शिष्यांना सहन व्हावयाची नाही. त्यांना ती भाजून काढील. प्रेमाचा सौम्य मार्ग सुद्धा असे परिवर्तन घडवून आणु शकतो. कडक व नरम हे दोन्ही मार्ग सारखेच परिणामकारक ठरतात; पण त्यांचा शहाणपणाने, चातुर्याने उपयोग केला पाहिजे.” ते पुढे म्हणाले, “तुला परदेशात जावे लागेल. तेथे अहंकारावर असे कडक ताशेरे मारलेले कुणाला रुचणार नाहीत. उपदेशकाला जर पाश्चिमात्य जगात भारताच्या संदेशाचा प्रचार करावयाचा असेल तर दुसऱ्याचा दृष्टिकोण समजून घेण्याचे धैर्य, चिकाटी व असीम सहनशक्तीची जरुरी आहे.” (पुढे अमेरिकेस गेल्यावर गुरुजींच्या ह्या शब्दांची मला कितीदा आठवण होत असे, ते मी येथे सांगत नाही!)

गुरुजींच्या ह्या स्पष्टवक्तेपणामुळे त्यांच्याभोवती त्यांच्या हयातीत जरी विशेष गर्दी झाली नाही, तरी त्यांच्या शिकवणुकीचा अभ्यास करणारे असे निष्ठावंत कळकळीचे विद्यार्थी त्यांच्या पश्चात उत्तरोत्तर अधिकाधिक संख्येने वाढत गेले. व तसे पाहिले तर त्यांचे चैतन्य अशा व्यापक अर्थाने या जगावर आजही वास करीत आहे. थोर शिकंदरासारख्या महान योद्ध्यांनी भूमीवर स्वामित्व मिळविण्याची आकांक्षा बाळगली. श्रीयुक्तेश्वरांसारखे गुरू याच्या पलीकडचे स्वामित्व, मानवांच्या आत्म्यांवरील स्वामित्व, साध्य करून घेतात.

आपल्या शिष्यांच्या साध्या, दुर्लक्ष करण्याजोग्या चुका दाखवून देण्याचा गुरूजींचा मार्ग, मोठे अवडंबर करून गांभीर्यपूर्वक वर्णन करून सांगण्याचा असे. एक दिवस माझे वडील सेरामपूरला गुरुजींच्या दर्शनाला आले. माझ्याबद्दल काही बरे शब्द बोलतील अशी त्यांची साहजिकपणे अपेक्षा होती. पण माझ्या चुकांचा गुरुजींनी जेव्हा लांबलचक पाढा वाचला तेव्हा त्यांना धक्काच बसला. ते ताबडतोब माझ्या कडे आले.

“तुझे गुरुजी जे काही सांगतात त्यावरून तू तर अगदी कामातून गेल्यासारखा दिसतोयस मला!” वडिलांच्या डोळ्यांत अश्रू आले व तसे त्यांना हसूही आले.

त्या वेळी श्रीयुक्तेश्वर जे माझ्यावर नाराज झाले होते त्याचे कारण अगदी क्षुल्लक होते. त्यांच्या नम्र सूचनेविरुद्ध मी एका इसमाला आध्यात्मिक मार्गावर आणण्याचा प्रयत्न करीत होतो.

रागाच्या भरात मी गुरुजींपाशी पोचलो. त्यांनी माझ्याकडे पाहिले. आपली काही तरी चूक झालेली आहे, या जाणीवेने त्यांचे डोळे खाली वळलेले होते. त्या दिव्य सिंहाला माझ्यापुढे नम्र झालेले मी अगदी त्या एका वेळीच पाहिले. त्या अद्वितीय क्षणाचा मी पुरता लाभ घेतला.

“गुरुजी, आश्चर्यचकित झालेल्या माझ्या वडिलांपुढे तुम्ही माझ्याबद्दल इतक्या निर्दयपणे का बोललात? ते न्यायाला धरून होते काय?”

“पुनः मी तसे करणार नाही.” श्रीयुक्तेश्वरांचा स्वर दिलगिरी प्रदर्शित करण्याचा होता.

एका क्षणात माझ्या हातचे शस्त्र गळून पडले. त्या महात्म्याने किती ताबडतोब आपली चूक कबूल केली! जरी त्यांनी पुनः कधीही माझ्या वडिलांची मनःशांती ढळू दिली नाही तरी

गुरुजींनी कठोरपणे संधी मिळेल तेव्हा, केव्हाही व कोठेही माझ्यावर शिस्त धरण्याचे सत्र चालूच ठेवले.

श्रीयुक्तेश्वर इतरांवर टीका करीत असताना नवीन झालेले शिष्य त्यात पूर्णपणे सामील होत. जणू काय गुरुजींप्रमाणे तेही शहाणे होते! जणू काय अचूक विवेकाचे ते पुतळेच होते! पण जो पहिल्यांदा कुरापत काढतो त्याने आपल्या बचावाची तयारी ठेवावी. पण हे दुसऱ्यांचे दोष काढणारे शिष्य गुरुजी जेव्हा उघडपणे आपल्या पृथःकरणरूपी भात्यातून थोडेसे बाण त्यांच्या दिशेने फेकत असत त्यांसरशी ते अविचारीपणाने ताबडतोब त्यांच्यापासून पळून जात.

"नाजूक असे अंतरंगातील दोष सौम्यशा टीकास्पर्शाने विरोध दर्शवितात. याला उदाहरण द्यायचे म्हणजे शरीरातील व्याधींनी पछाडलेले अवयव किंवा भाग. ते असेच नाजूक स्पर्श करण्यापूर्वीच मागे सरकतात." पळून जाणाऱ्यांवर श्रीयुक्तेश्वर गमतीने अशा प्रकारची टीका करीत.

पुष्कळ शिष्य गुरुजींचे प्रत्यक्ष दर्शन होण्यापूर्वी त्यांच्याबद्दल काही वेगळ्याच कल्पना बांधतात आणि त्या कल्पनांवरून त्यांच्या शल्यांचे, कृतींचे मोजमाप करतात. असे शिष्य आपल्याला श्रीयुक्तेश्वरांच्या स्वरूपाचे आकलन झाले नाही अशी तक्रार करीत.

मी एकदा टोमणा मारला, "त्याचप्रमाणे तुम्हांला ईश्वराच्या स्वरूपाचे आकलन झालेले नाही. जर एखाद्या संताचे स्वरूप कळले तर तुम्ही सुद्धा संतच व्हाल, ह्या विश्वामध्ये जी अब्जावधी गूढ रहस्ये आहेत त्यांपैकी एक हे आहे की, जिचे वास्तविक स्वरूप वर्णन करता येत नाही. अशा हवेचे क्षणोक्षणी श्वसन करणारा असा कोणता मनुष्य असे विचारण्याचे धाडस करील की, गुरुच्या अगाध स्वभावाचे ज्ञान ताबडतोब मिळविले आहे काय?"

विद्यार्थी येत आणि जात. ज्यांना अध्यात्माचा सोपा मार्ग पाहिजे होता, सहानुभूती ताबडतोब मिळावी व आपल्या गुणांस मान्यता मिळावी अशी ज्यांची अपेक्षा असे अशांची ह्या आश्रमात अपेक्षा पुरी होत नसे. गुरुजी आपल्या शिष्यांना आश्रय व निवारा देत व एखाद्या धनगरासारखी त्यांची वर्षानुवर्षे देखभाल करीत. पण पुष्कळसे विद्यार्थी तेथून लवकरच निघून जात. आयुष्यातील असंख्य मानहानीचे प्रसंग त्यांना परवडत, पण आश्रमात होणारी मानहानी त्यांना असह्य वाटे. त्यांची आध्यात्मिक प्रगती फारच अल्प व सदोष असल्याने श्रीयुक्तेश्वरांची दिपवून टाकणारी दृष्टी, त्यांच्या ज्ञानाचा मोकळा व भेदक सूर्यप्रकाश अशा विद्यार्थ्यांना फार प्रखर वाटे. त्यांच्याशी ते मुकाबला करू शकत नसत. असे विद्यार्थी पुढे कमी योग्यतेचा दुसरा गुरू शोधून काढीत की, जो गुरू त्यांची खुशामत करून त्यांचे अज्ञान तसेच कायम ठेवी; त्यांना त्यांच्या अज्ञानरूपी झोपेतून उठवीत नसे.

अगदी सुरुवाती-सुरुवातीला मी जेव्हा गुरुजींकडे आलो तेव्हा त्यांच्याकडून बोलणे खाण्याची मला नेहमी धास्ती वाटे. मला नंतर लवकरच आढळून आले की, त्यांची शाब्दिक टीकेची शस्त्रक्रिया ही फक्त अशांवरच—माझ्यासारख्यावरच चालायची, की जे आपण होऊन त्यांच्या शिस्तीच्या हुकमतीत आलेले आहेत. जर एखाद्या कुरकुरणाऱ्या विद्यार्थ्याने शिस्तीस विरोध दर्शविला, तर श्रीयुक्तेश्वर अगदी गप्प बसत. त्यांना ती आपली बेअदबी

झाली असे वाटत नसे. अशा वेळी त्यांच्या शब्दांत क्रोध दर्शविला जात नसे. कोणाला उद्देशून नसणारा असा त्यात सर्वसामान्य उपदेश असावयाचा.

आश्रम पाहावयास येणाऱ्या केवळ प्रासंगिक अशा पाहुण्यांशी वागताना गुरुजी असे निर्भर्त्सनापर शब्द वापरीत नसत. ते त्यांचे दोष क्वचितच काढीत; मग ते अगदी उघड स्वरूपाचे असले तरीही. पण जे विद्यार्थी त्यांच्याकडे उपदेशाकरिता येत त्यांच्या बाबतीत श्रीयुक्तेश्वरांना एक प्रकारची गंभीर जबाबदारी वाटावयाची. ज्याचे अंतरंग अहंकाराने भरून गेलेले आहे अशा मानवप्राण्याचे संपूर्ण परिवर्तन करण्याचे महाकठीण काम हातीं घेणारा गुरू खरोखरच धन्य होय! संतांच्या धैर्याचे मूळ हे असे मायेने भांबावून गेलेल्या लोकांबद्दल, या जगात आंधळ्यासारखे चाचपडत, अडखळत असणाऱ्या लोकांबद्दल वाटणाऱ्या दयार्द्र बुद्धीमध्ये असते.

मनातल्या मनात जाणवणारी चीड मी जसजसा टाकून देऊ लागलो, तसतशी माझी हजेरी सुद्धा कमीकमी होऊ लागली, हे माझ्या ध्यानात येऊ लागले. एका अगदी सूक्ष्म अशा पद्धतीनुसार गुरुजींच्या वागण्यात पूर्वी कधी नसे अशी क्षमाशीलता दिसू लागली. हळूहळू त्यांच्या आणि माझ्यामधील कृत्रिमतेची व अंतर्मनातील [16] वेगळ्या भावनेची भिंत, की जिच्यामुळे मनुष्य आपले व्यक्तिमत्त्व, विशिष्टत्व साधारणपणे जपून ठेवण्याची खटपट करीत असतो ती मी पाडून टाकिली. परिणामी मी विनासायास गुरुच्या ठिकाणी तन्मयता पावलो. त्यानंतर मला आढळून आले की, ते विश्वासाचे पूर्ण निधान, समंजस, सहृदय आणि उघड न दाखविता प्रेमाचा वर्षाव करणारे असे आहेत. ते फक्त प्रेमाचा, ममतेचा उघड असा शब्द तोंडातून बाहेर काढीत नसत.

माझी स्वतःची मनोवृत्ती ही प्रामुख्याने भक्तिमार्गी आहे. गुरुजी हे ज्ञानमार्गी होते. भक्तीचा [17] त्यांना एवढा जिव्हाळा नव्हता; आणि त्यामुळे त्यांच्या उपदेशात थंडगार, आध्यात्मिक गणिताची भाषा असायची. सुरुवाती-सुरुवातीला त्यांचे हे ज्ञानमार्गी व भक्तिशून्य स्वरूप मला बेचैन करायचे; पण जसजसा मी त्यांच्याशी एकरूप होऊ लागलो, तसतसा परमेश्वरप्राप्तीविषयीचा माझा भक्तिभाव कमी न होता वाढतच जाऊ लागला. साक्षात्कारी गुरू आपल्या विविध प्रकारच्या शिष्यांना त्यांच्या मूलभूत अशा नैसर्गिक विचारसरणीनुसार मार्गदर्शन देण्याच्या कामी पूर्ण वाकबगार होते.

श्रीयुक्तेश्वर आणि मी, आम्हा दोघांमधील संबंध फारसे बोलके नव्हते हे जरी खरे असले तरी निःशब्द मनोवेधकता असायची. पुष्कळदा माझ्या विचारांवर त्याची सुप्त छाप, शिक्कामोर्तब असल्याचे मला आढळून येई आणि त्यामुळे बोलण्याची जरूरीच उरत नसे. त्यांच्या शेजारी शांतपणे बसून त्यांचे औदार्य माझ्यावर शांतपणे अवतरत असल्याचे मला आढळून येई.

गुरुजींची निःपक्षपाती, न्यायी वागणूक आमच्या कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये स्पष्टपणे दिसून आली. सेरामपूरला गुरुजींच्या सान्निध्यात खंड न पडता काही महिने घालविण्याचे मी ठरविले होते.

“आश्रमाची व्यवस्था आता तुझ्याकडे.” मी उत्साहाने आलो हे पाहून श्रीयुक्तेश्वरांना फार आनंद वाटला. “तुझे काम म्हणजे पाहुण्यांच स्वागत करणे व इतर शिष्यांच्या कामावर देखरेख करणे असे राहील.”

सुमारे एक पंधरवड्याने पूर्व बंगालमधून कुमार नावाचा एक ग्रामीण तरूण आश्रमात शिक्षण घेण्याकरिता म्हणून दाखल झाला. अतिशय बुद्धिमान असल्यामुळे त्याने गुरुजींचे प्रेम लवकरच संपादन केले. या नवीन आश्रमवासियाच्या बाबतीत श्रीयुक्तेश्वरांनी अगदी नरमाईचे धोरण का स्वीकारले, याचे कारण कळणे कठीण होते.

“मुकुंदा, तुझी कामे कुमारला करू दे; तू झाडलोट व स्वयंपाक कर.” तो नवीन मुलगा आमच्याबरोबर राहिला असेल नसेल तोच गुरुजींनी अशा सूचना दिल्या.

एकदम मोठेपणा आल्यामुळे कुमारने एखाद्या लहान कुटुंबात जशी अरेरावी करतात, तशी अरेरावी करण्यास सुरुवात केली. इतर शिष्य गुपचूप बंड करण्यास प्रवृत्त होऊन दररोज माझा सल्ला घेऊ लागले. ही परिस्थिती जवळ जवळ तीन आठवडे चालली. नंतर माझ्या कानांवर कुमार आणि गुरुजी यांचे खाली दिल्याप्रमाणे भाषण ऐकू आले:

“मुकुंदाच्या पुढे हात टेकले!” तो मुलगा म्हणाला, “तुम्ही मला देखरेख करायला ठेवले पण सगळे त्याच्याचकडे जातात व त्याचे ऐकतात.”

“आणि म्हणूनच मी त्याला स्वयंपाकाचे काम सांगितले व तुला बैठकीच्या खोलीतील कामावर नेमले. म्हणजे तुला कळावे की, जो लायक पुढारी आहे तो काम करू इच्छितो आणि इतरांच्यावर हुकमत गाजवत नाही.” श्रीयुक्तेश्वरांचे वरील शुष्क शब्द कुमारला नवीन होते. “तुला मुकुंदाची जागा पाहिजे होती; पण ती टिकवायची तुझी लायकी नाही. जा, आता तू आपले पूर्वीचे स्वयंपाक्याच्या मदतनिसाचे काम करीत जा.”

ह्या मानहानीच्या प्रसंगानंतर गुरुजींनी कुमारचे पुर्वीप्रमाणे लाड करणे सुरू केले. ह्या आकर्षणाचे गूढ कोण बरे उकलणार? कुमारमध्ये आमच्या गुरुजींना एक सुंदर झरा सापडला होता; पण तो झरा इतर शिष्यांना पाण्याचे फवारे देत नव्हता. जरी तो नवीन मुलगा श्रीयुक्तेश्वरांचा लाडका होता तरी मला त्याचा हेवा वाटत नव्हता. गुरुजनांच्या ठिकाणी सुद्धा वैयक्तिक चमत्कारिक आवडीनिवडी असतात आणि त्यामुळे जीवनाला अनेक तऱ्हांची उच्च दर्जाची विचित्रता व विविधता प्राप्त होते. बारीक-सारीक गोष्टींची मी परवा करीत नसे. श्रीयुक्तेश्वरांकडून वरवरच्या स्तुति-प्रशंसेपेक्षा उच्चतर लाभाची मी अपेक्षा करीत होतो.

कुमार एकदा काही एक कारण नसता आपल्या मनातले विष कला, मला त्याचे बोलणे जिव्हारी लागले.

“तुझे डोके आता इतके फुगले आहे की ते आता फुटणार” अंतःस्फूर्तीने मला जे सत्य कळले त्यावरून मी त्याला धोक्याची सूचना देत होतो. “तू आपली वागणूक जर सुधारली नाहीस तर एक दिवस तुला आश्रम सोडून जावे लागेल.”

कुमार कुचेष्टेने हसू लागला आणि त्याच वेळी गुरुजी खोलीत आले. कुमारने त्यांना मी काय बोललो ते सांगितले. आता माझी चांगलीच खरडपट्टी निघणार म्हणून मी चोरासारखा कोपऱ्यात जाऊन उभा राहिलो.

"कदाचित मुकुंदाचे खरे असेल." गुरुजींचे हे उत्तर ऐकून कुमार अगदी गार पडला.

नंतर वर्षभराने कुमार आपल्या लहानपणच्या घरी जावयास निघाला. श्रीयुक्तेश्वरांच्या सौम्य नापसंतीची त्याने कदर केली नाही. गुरुजी कधीही आपल्या शिष्यांच्या हालचालीवर हुकमत गाजवीत नसत. तो मुलगा जेव्हा काही महिन्यांनी परत सेरामपूरला आला, तेव्हा त्याच्या वागणुकीत एक अप्रिय असा फरक दिसून आला. रूबाबदार, गंभीर तेजस्वी चेहऱ्याचा कुमार जाऊन त्याच्याऐवजी आमच्या डोळ्यांसमोर एक गावंढळ खेडूत उभा राहिला आणि येताना त्याने पुष्कळशी व्यसनेही लावून घेतली होती.

गुरुजींनी मला बोलावले आणि भग्न हृदयाने मला सांगितले की, "हा मुलगा आता आश्रमातील संन्यासी जीवनाला योग्य राहिला नाही."

"मुकुंद, कुमारला उद्या आश्रम सोडून जाण्याचे सांगण्याची कामगिरी मी तुझ्यावर सोपवीत आहे. मला हे काम करवत नाही!" श्रीयुक्तेश्वरांच्या डोळ्यांत अश्रु आले. पण त्यांनी ताबडतोब स्वतःला सावरले. "ह्या मुलाने जर माझे ऐकले असते आणि आश्रम सोडून तो कुसंगतीत राहिला नसता तर तो आज इतक्या थराला गेला नसता. त्याने माझ्या संरक्षणाचा त्याग केलेला आहे. ह्या निष्ठुर जगाने त्याला गुरू म्हणून शिकविणे अजून जरूर आहे."

कुमार गेल्याने मी काही शेफारून गेलो नाही. उलट मला वाईट वाटले की, गुरुजींचे प्रेम मिळविण्याचे सामर्थ्य ज्याच्या अंगी आहे त्याने इतक्या ताबडतोब जगातील मोहास बळी पडावे! मदिरा व मदिराक्षी यांबद्दलची भोगवासना ही माणसात मुळचीच आहे हे समजावयास काही नाजूक दृष्टीची जरूर नाही. इंद्रियांच्या ह्या चाळ्यांना ओलिअँडर झाडाची उपमा देता येण्यासारखी आहे. हे झाड कसे नेहमी हिरवेगार असते व गुलाबी रंगांच्या सुवासिक फुलांनी बहरलेले असते. पण ह्या फुलझाडाचा प्रत्येक भाग विषारी असतो. [18] इंद्रियांच्या भोगेच्छेवर उपाय हा स्वतःजवळच असतो. त्या उपायाचा अवलंब केल्याने जे उज्ज्वल सुख प्राप्त होते ते सुख मनुष्यमात्र आंधळेपणाने इतर अनेक सहस्र बाह्य दिशांमध्ये शोधत राहतो.

"तीव्र बुद्धिमत्तेला दोन धारी असतात." कुमारच्या बुद्धिमत्तेचा विषय निघाला तेव्हा गुरुजी म्हणाले, "बुद्धीचा उपयोग दोन्ही तऱ्हांनी होऊ शकतो; विधायक व विघातक. उदाहरण चाकूचे घ्या, त्याने अज्ञानरूपी गळूही कापता येते व तसाच स्वतःचा शिरच्छेदही करता येतो. बुद्धिमत्ता ही योग्य दिशेने काम करते, पण केव्हा? तर ज्या वेळी मनाने आध्यात्मिक नीतिनियमांची अनिवार्यता मान्य केली असेल तेव्हा."

माझे गुरू शिष्यांशी, मग ते पुरुष असोत की स्त्रिया असोत, अगदी मोकळेपणाने मिसळत. ते सगळ्यांना आपली मुलेच लेखीत. त्या सर्वांमधील आत्मैक्य जाणून ते त्यांमध्ये भेदभाव करीत नसत व त्या सर्वांशी निःपक्षपातीपणाने वागत.

ते म्हणत, "झोपेत तुम्हांस समजत नाही की तुम्ही पुरुष आहात की स्त्री आहात. ज्याप्रमाणे पुरुष स्त्रीची भूमिका करून स्त्री होत नाही, त्याचप्रमाणे आत्म्याने पुरुषाची

किंवा स्त्रीची भूमिका घेतली तरी त्याच्या स्वरूपात बदल होत नाही. आत्मा म्हणजे परमेश्वराचे निर्विकार व निर्गुण प्रतिबिंब आहे.”

श्रीयुक्तेश्वर स्त्रियांचा संपर्क वर्ज्य समजत नसत की त्यांच्यावर ‘पुरुषाच्या अधःपाताचे कारण’ म्हणून टीकाही करीत नसत. पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सुद्धा मोहाला तोंड द्यावे लागते, हे त्यांनी निदर्शनास आणले. मी एकदा गुरुजींना विचारले की, “एका मोठ्या महात्म्याने स्त्रीला नरकाचे द्वार म्हणून का संबोधिले आहे?”

“त्याच्या तारूण्यात एखाद्या मुलीने त्रास देऊन त्याची मनःशांती बिघडवून टाकिली असेल.” गुरुजींनी असे मर्मभेदक उत्तर दिले. “नाहीपेक्षा त्याने स्त्रीवर टीका न करता उघड उघड आपल्या आत्मसंयमनाच्या कमजोरीला दोषी धरले असते.”

एखाद्या पाहुण्याने, आश्रमात आले असताना, एखादी विषयवासना सूचक गोष्ट सांगितली तर गुरुजी त्याला उत्तर न देता गप्प बसत. ते शिष्यांना सांगत, “एखाद्या सुंदर चेहेरारूपी चाबकाने तुम्ही स्वतःला फटके मारून घेण्यास अवसर देऊ नका. विषयांचे गुलाम झालेले ह्या जगात सुख कसे मिळविणार? शेणात रमून जाणाऱ्यास ह्या जगातील सूक्ष्म स्वादांपासून वंचित व्हावे लागते. पंचमहाभूतांच्या विषयास बळी पडलेल्या मनुष्यास सूक्ष्म विवेकबुद्धीस मुकावे लागते.” मायेने निर्माण केलेल्या विषयसुखाच्या मोहापासून मुक्तता मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ते धीराचा व समजुतीचा सल्ला देत.

“ज्याप्रमाणे भूक, याला एक सयुक्तिक हेतू आहे, लोभाला नव्हे, त्याप्रमाणे संभोगवृत्ती ही निसर्गाने फक्त वंशसातत्याच्या उद्देशाने निर्माण केलेली आहे. त्याचा हेतू कधीही तृप्त न होणाऱ्या अशा वासनांना प्रज्वलित करण्याकरिता नव्हे” असे ते म्हणत. “दुष्ट वासनांचा आताच्या आताच नाश करा. नाही तर त्या तुमच्या पार्थिव शरीरातून लिंगदेह बाहेर पडल्यावर सुद्धा तुमच्याबरोबर टिकून राहतील. जरी शरीर दुबळे असले तरी मनाने सारखा विरोध करीत राहिले पाहिजे. जर प्रलोभन तुमच्यावर निर्दय हल्ला करीत असेल, तर त्यावर व्यक्तिनिरपेक्ष विश्लेषण करून व दुर्दमनीय अशा इच्छाशक्तीच्या जोरावर जय मिळवा. प्रत्येक नैसर्गिक कामक्रोधादी विकारांवर जय मिळविता येतो.

“तुमच्या शक्तीचे जतन करा. एखाद्या विशाल सागराप्रमाणे भोगवासनाचे वाहत येणारे नदीप्रवाह शांतपणे पोटात घ्या, सामावून घ्या. दररोज नवीन नवीन उत्पन्न होणाऱ्या भोगवासना तुमची आंतरिक शांती बिघडवून टाकतात. भोगवादाच्या वैराण वाळवंटात फुकट जाणारे चांगले पोषक पाणी सोडून देणाऱ्या एखाद्या हौदाच्या तोट्यांप्रमाणे ह्या वासना आहेत. जबरदस्त व सक्तीने काम करावयास लावणारा असा हा चुकीच्या वासनांचा जोर मनुष्याच्या सुखाचा सर्वांत मोठा शत्रू आहे. आत्मसंयमन धारण करून सिंहासारखे निर्भयपणे ह्या जगात संचार करीत राहा. इंद्रियदौर्बल्याच्या बेडकांना तुमच्या सभोवार लाथा मारू देऊ नका!”

निष्ठावंत साधक हा शेवटी सहजप्रवृत्तीच्या ताबेदारीतून मुक्त होतो. मानवी प्रेमाच्या जरुरीचे तो केवळ ईश्वरनिष्ठेमध्येच परिवर्तन करून टाकतो. हे ईश्वरप्रेम एकमेव आहे, कारण ते सर्वव्यापी असते.

श्रीयुक्तेश्वरांची आई वाराणशीमध्ये राणा महाल भागात राहत असे. त्याच भागात मी गुरुजींना प्रथम भेटलो होतो. उमद्या व दयाळू स्वभावाची ती मातोश्री अजूनही ठाम मताची होती. मी एक दिवस सज्जात उभा राहून मायलेकरांचे संभाषण ऐकत होतो. काही एका गोष्टीविषयी गुरुजी आपल्या शांत व समजूतदार पद्धतीने तिला समजावून देण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्यांना काही यश येत असल्याचे दिसत नव्हते; कारण ती डोके हलवून त्यांचे म्हणणे तिला पटत नसल्याचे जोरजोराने दर्शवीत होती.

“नाही, बेटा, नाही, तू जा आता! तुझ्या सुज्ञ शब्दांचा मला उपयोग नाही! मी काही तुझी शिष्य नव्हे!”

एखाद्या रागे भरलेल्या मुलाप्रमाणे श्रीयुक्तेश्वर जास्त काही विवाद न करता तेथून निघून गेले. आईचा असा हा दुराग्रही स्वभाव असताना सुद्धा त्यांनी जो तिचा मान राखला, त्याचे मला कौतुक वाटले. तिला ते आपले एक लहान मूलच वाटे. ते संतपदाला पोचले होते याची तिला कल्पना नव्हती. या किरकोळप्रसंगांची सुद्धा एक मौज होती. या प्रसंगाने मला गुरुजींच्या अपरिचित अशा नव्या स्वभावाची—आतून नम्र पण बाहेरून ताठ—ओळख करून दिली.

आश्रमधर्माच्या नियमांप्रमाणे संन्याशाने एकदा आप्तसंबंध रीतसर सोडल्यानंतर त्याचा पुनः त्यास अंगीकार करता येत नाही. गृहस्थाला आवश्यक अशा कौटुंबिक संस्कार-विधींमध्ये त्याला भाग घ्यावयाचा नसतो. तरी पण शंकराचार्यांनी, ज्यांनी खुद्द संन्यासधर्माचे पुनरुज्जीवन केले त्यांनी, स्वतः या निषेधांचे पालन केले नाही. आपल्या प्रिय मातेच्या निधनानंतर त्यांनी तिचे दहन केले व दहनाला अग्नी आपला हात हवेत उंचावून आकाशातून आणला.

श्रीयुक्तेश्वरांनी त्याचप्रमाणे ह्या निषेधांकडे दुर्लक्ष केले; पण जरा कमी चित्ताकर्षक पद्धतीने. त्यांची आई जेव्हा वारली तेव्हा त्यांनी तिचा दहनविधी काशीमध्ये गंगेच्या घाटावर पूर्ण विधियुक्त असा केला; आणि गृहस्थधर्मास अनुसरून ब्राह्मणभोजनही घातले.

शास्त्रात ज्या ह्या निषिद्ध गोष्टी सांगितल्या आहेत, त्याचा हेतू एवढाच की, संन्याशांनी कोणत्याही संसारी गोष्टीमध्ये आकुंचितपणे समरस होऊ नये. शंकराचार्य व श्रीयुक्तेश्वर यांनी आपले सारसर्वस्व निर्गुण परमतत्त्वाच्या ठिकाणी विलीन केले होते आणि त्यामुळे त्यांच्या बाबतीत निषेधनियमांची तादृश जरुरी नव्हती. कधी कधी संत एखाद्या निषेधात्मक नियमाचा मुद्दाम भंग करतात. हेतू हा की, लोकांना त्यातला मुळ हेतू कळावा व हा हेतू आचारनियमांपेक्षा अधिक महत्त्वाचा व स्वतंत्र आहे हे कळावे. तसेच येशूने विश्रमाच्या दिवशी (रविवारी) धान्याचे कणीस तोडले होते. दुराराध्यांना ते एवढेच सांगत, “रविवारचा विश्रांतीचा दिवस माणसाकरिता आहे. माणूस त्या दिवसाकरिता नाही.” [19]

धर्मग्रंथांपलीकडे श्रीयुक्तेश्वरांनी विशेष असे वाचन केले नव्हते. तरी सुद्धा त्यांना अद्ययावत् शास्त्रीय शोधांची बहुधा माहिती असावयाची व ज्ञानाची प्रगती कशी कशी होत चालली आहे, त्याचा परिचय असावयाचा. [20] संभाषण करण्यात ते फार चतुर होते. संभाषणप्रसंगाने ते अभ्यागतांशी नाना विषयांची चर्चा करून आपल्या दृष्टिकोणांचा विनिमय

करीत. अशा वादविवादांना गुरुजींच्या विनोदप्रचुर कोट्यांनी व हास्यांनी मजा यायची. गुरुजींची मुद्रा गंभीर असायची, पण त्या मुद्रेत औदासीन्य कधी नसायचे. ते म्हणत, “परमेश्वरप्राप्तीकरिता माणसाने दुर्मुखलेले असण्याचे कारण नाही.” अशा अर्थाचे बायबलमधील [21] वचन ते उद्धृत करीत. “लक्षात ठेवा, परमेश्वराचा शोध घ्यायचा म्हणजे साऱ्या दुःखांची होळी करायची.”

त्यांच्याकडे नाना तऱ्हेचे व्यावसायिक लोक येत. तत्त्वज्ञानी, प्रोफेसर, वकील, शास्त्रज्ञ. त्यांमधील पुष्कळसे अगदी प्रथमच येत. त्यांची येण्यापूर्वी कल्पना अशी असावयाची की, गुरुजी म्हणजे एक कर्मकांडी, सनातनमतवादी धार्मिक गुरु असावेत. नवीनच आलेल्या अभ्यागतांना असे वाटायचे की, काही धार्मिक सामान्य नीतिनियमांच्या उपदेशापलीकडे त्यांच्याकडून काही विशेष लाभ व्हावयाचा नाही. तसा त्यांचा पूर्वग्रह असे. पण त्यांच्याकडून मधून मधून आत्मविश्वासाचे स्मित किंवा दुसऱ्याचा दृष्टिकोण समजावून घेऊन स्वतःची थोडीपार करमणूकच झाल्याची मुद्रा दर्शवू लागले की, तो पूर्वग्रह पूर्ण विलयास जाई. श्रीयुक्तेश्वरांशी वादविवाद केल्यानंतर आणि त्यांच्या ठिकाणी असलेली ज्ञानाच्या खास क्षेत्रांमधील त्यांची दृष्टी अगदी बिनचूक असल्याचे त्यांना जेव्हा आढळून येई तेव्हा मग मात्र बैठकीतून उठणे त्यांच्या जिवावर येई.

गुरुजींची वागणूक सर्वसाधारणपणे नम्र व अभ्यागतांशी प्रेमळ अशी असायची. त्यांनी केलेले स्वागत व आदरातिथ्य मनोरम असावयाचे. परंतु दुराग्रही, अहंमन्य असे अभ्यागत जेव्हा त्यांना भेटावयास येत, त्यांना मात्र कधी कधी उत्तेजक व उद्बोधक असा धक्का बसायचा. त्यांना गुरुजींमधील थंडगार बेपर्वाई किंवा प्रखर विरोध यांच्याशी उघड सामना करावयास लागे. बर्फ किंवा लोखंड!

एकदा एका रसायनशास्त्रज्ञाचा श्रीयुक्तेश्वरांशी अगदी अटीतटीचा सामना झाला. पाहुण्यांना ईश्वराचे अस्तित्वच मुळी मान्य नव्हते; कारण काय की, त्यांच्या मते परमेश्वराला शोधून काढण्याचे काही साधन उपलब्ध नाही.

“म्हणजे त्या परम शक्तीला तुम्ही आपल्या परीक्षानळीमध्ये वेगळी करू शकत नाही; आणि त्याचे कारणही तुम्हांला सांगता येत नाही!” गुरुजींची दृष्टी उग्र झाली. “मी तुम्हांला एक नवीन प्रयोग सुचवितो. तुम्ही आपले विचार एकदा अविरतपणे चोवीस तास तपासून पाहा आणि मग परमेश्वर तुमच्यापुढे हजर होत नाही याचे आश्चर्य मानू नका.”

एकदा एक विख्यात पंडित तेथे आले. त्यांना असाच धक्का बसला. त्या वेळी ते आश्रमात पहिल्याप्रथमच आले होते. पंडितमहाशयांनी महाभारत, उपनिषदे, शांकरभाष्य यांमधील अनेक उतारे पाठ म्हणून दाखविले. दिवाणखान्यातील छताचे कडीपाट सुद्धा दणाणून निघाले.

“आता तुमचे काय म्हणणे आहे हे ऐकावयाची मी वाट पाहत आहे.” श्रीयुक्तेश्वरांचा आवाज चौकशीचा होता. जणूं काय आतापर्यंत कोणी काही बोलतच नव्हते. पंडितमहाशय बुचकळ्यात पडले.

"उतारे वाटेल तितके देता येतील." गुरुजींचे हे शब्द ऐकून माझी हसून हसून मुरकुंडी वळली. पाहुण्यांपासून काही अंतरावर एका कोपऱ्यात मी विनयपूर्वक बसलो होतो. "तुमच्या स्वतःच्या वैयक्तिक अशा जीवनामधून तुम्ही स्वतःचे असे कांही भाष्य करू शकाल काय? कोणते पवित्र धर्मग्रंथ तुम्ही वाचले आहेत व आत्मसात केले आहेत? कोणत्या तऱ्हेने त्यामधील त्रिकालबाधित अशा सत्यदर्शनाने तुमच्या स्वभावामध्ये परिवर्तन घडून आले आहे? का तुम्ही दुसऱ्या माणसांच्या शब्दांची यांत्रिक पोपटपंची करून स्वतः फक्त ध्वनिवाहक पोकळ यंत्र बनण्यात समाधान मानता?"

"मी पराजय कबूल करतो." पंडितांचा झालेला हिरमोड हास्यास्पद होता. 'मला कांही आंतरिक अनुभूती नाही.

कदाचित प्रथमच पंडित महाशयांना समजून आले असेल की पुस्तकी ज्ञान आध्यात्मिक अनुभवाच्या अभावास दूर करू शकत नाही.

त्या पंडिताची अशी हजेरी घेतली गेली. तो गेल्यानंतर गुरुजी म्हणाले, "हे रक्तहीन, पुस्तकी पंडित दिव्याच्या तेजाला काळोखी आणतात. त्यांना असे वाटते की, तत्त्वज्ञान म्हणजे एक हलकीशी बौद्धिक पूर्वतयारीची कसरत आहे. त्यांच्या अत्युच्च विचारांचा त्यांच्या ओबडधोबड बाह्य आचारांशी किंवा आंतरिक आत्मपरीक्षणाशी काहीएक संबंध नसतो."

नुसत्या पुस्तकी पांडित्याचा काही उपयोग नाही, हे गुरुजींनी आणखी काही प्रसंगी मोठ्या आग्रहाने प्रतिपादन केले होते. ते म्हणत, "नुसते अनेक शब्द वापरले म्हणजे त्यांपाठीमागील तत्त्व कळले असे होत नाही. पवित्र धर्मग्रंथ, त्यांतील एखाद्या श्लोकाचा अर्थ एका वेळी हळूहळू ग्रहण करीत गेले, तरी आंतरिक स्वानुभवाची आकांक्षा मनात निर्माण करण्याच्या कामी त्यांचा उपयोग होतो, हे खरे आहे. पण सतत बौद्धिक अभ्यास करीत राहिल्याने माणसाच्या ठिकाणी वृथाभिमान, खोटे समाधान आणि ज्ञानाचे अपचन निर्माण होते."

ग्रंथांच्या शिक्षणाच्या बाबतीत श्रीयुक्तेश्वरांनी आपला एक स्वानुभव सांगितला. पूर्व बंगालमध्ये अरण्यात एक आश्रम होता. तेथे एक प्रसिद्ध शिक्षक होते. त्यांचे नाव डब्रू बल्लव. त्यांची शिकविण्याची पद्धत गुरुजींनी फार बारकाईने पाहिली होती. त्यांची पद्धत म्हणावे तर सोपी व म्हणावे तर अवघड अशी प्राचीन भारतातील परंपरेनुसार होती.

त्या शांत वनश्रीच्या वातावरणात डब्रू बल्लव यांनी आपल्याभोवती शिष्य जमविले होते. त्यांच्या पुढ्यात भगवद्गीतेची उघडी पोथी ठेवलेली होती. एखादा उतारा घेऊन त्याच्याकडेच ते स्थिर नजरेने सुमारे अर्धा तास पाहात बसले; नंतर डोळे मिटले; आणखी अर्धा तास ह्या स्थितींत गेला. नंतर त्या गुरूंनी त्यावर थोडे भाष्य केले. नंतर आणखी एक तास निश्चल स्थितीत ते गुरू आणि विद्यार्थी ध्यानस्थ बसले. अखेरीस गुरुंनी विचारले:

"समजला का श्लोक तुम्हांला आता?"

"होय, गुरुजी." एकाने असे बोलण्याचे धाडस केले.

"नाही, पुरता नाही. त्यातील आध्यात्मिक सामर्थ्य नीट समजावून घ्या. ह्या सामर्थ्याने शब्दांच्या ठिकाणी शतकानुशतके भारताचे पुनरुज्जीवन करण्याने बळ निर्माण केलेले आहे."

आणखी एक तास स्तब्धतेत गेला. नंतर त्या गुरुजींनी विद्यार्थ्यांना सुट्टी दिली. श्रीयुक्तेश्वरांकडे वळून ते म्हणाले:

"तुम्हांला भगवद्गीता समजली आहे काय?"

"नाही महाराज, खरेच नाही; जरी माझे डोळे व मन पोथीमधील पानांमधून अनेकवार संचरलेले आहेत."

"शेकडो लोकांनी मला वेगवेगळी उत्तरे दिली आहेत!" त्या महात्म्याने गुरुजींकडे आशीर्वादपूर्वक पाहून स्मित केले. "जर अभ्यासकाने त्या श्लोकातील अर्थसंपत्तीच्या बाह्यस्वरूपाकडेच सारखे लक्ष लावले तर मग त्याला त्या श्लोकातील गर्भितार्थाची अमोल मौक्तिके प्राप्त करण्यासाठी—शांतपणे स्वतःच्या अंतरंगाचा ठाव घेण्यासाठी—बुडी मारण्यास वेळ कोठून उरणार?"

श्रीयुक्तेश्वरांनी आपल्या स्वतःच्या विद्यार्थ्यांच्या अध्यापनाच्या दृष्टीने एकाग्रतेच्या ह्याच सखोल पद्धतीचा अवलंब केला. ते म्हणत, "ज्ञान हे काही डोळ्यांनी आत्मसात् करता येत नाही; तर ते अणुरेणूपर्यंत जाऊन पोचले पाहिजे. जेव्हा सत्याची प्रतीती तुमच्या केवळ बुद्धीपर्यंत न पोचता तुमच्या खुद्द व्यक्तित्वात उतरेल तेव्हा तुम्ही त्याचा काही अर्थ सांगू शकाल." एखाद्या विद्यार्थ्यास जर असे वाटले की, ईश्वर-साक्षात्कारासाठी पुस्तकी ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यक आहे; तर अशा विद्यार्थ्यास त्यांनी कधीही उत्तेजन दिले नाही.

"ऋषींनी एका वाक्यात इतका अगाध अर्थ ओतलेला आहे की, त्याचा संपूर्ण अर्थ लावावयाला भाष्यकार पंडिताना पिढ्यान् पिढ्या खर्च कराव्या लागल्या आहेत." ते म्हणाले, "न संपणारा शाब्दिक वादविवाद हा मंदबुद्धीच्या आळशी लोकांकरिता आहे. केवळ "ईश्वर आहे" किंबहुना "ईश्वर" या शब्दाच्या उच्चारापरता सत्वर मुक्तिदायक असा दुसरा कोणता विचार आहे?"

पण मनुष्य सुगम मार्गाकडे सहजासहजी वळत नाही. बुद्धिवाद्याचे समाधान केवळ "ईश्वर" ह्या साध्या शब्दोच्चाराने होत नाही. त्याकरिता त्याला प्रगल्भ, विद्वत्ताप्रचुर अशा अनेक शब्दांचा प्रयोग करावासा वाटतो; अशा तऱ्हेचा विद्वत्ताप्रचुर अर्थ स्वीकारण्यात त्याची अहंता सुखावते, प्रसन्न होते.

जे लोक आपल्या सामाजिक दर्जाचा किंवा पैशाचा अभिमान बाळगून असत ते गुरुजींच्या समोर आपल्या इतर संपत्तीबद्दल काही शब्द काढीत नसत. एके प्रसंगी पुरीस असताना समुद्रकिनाऱ्यावरील आश्रमात तेथले मॅजिस्ट्रेट गुरुजींची मुलाखत घेण्यास आले. ते अगदी निष्ठुरपणाबद्दल प्रसिद्ध होते. आणि आम्हांला आश्रमामधून बाहेर काढण्याची ताकद त्यांच्या ठिकाणी होती. ही गोष्ट मी गुरुजींच्या नजरेस आणली. पण ते आपल्या बसलेल्याच जागी हटवादीपणाने बसून राहिले व मॅजिस्ट्रेटचे स्वागत करावयास उठले सुद्धा नाहीत.

मी दरवाज्यापाशीच मांडी घालून बसलो होतो. मनातून थोडा घाबरलेला होतो. मॅजिस्ट्रेटसाहेबांकरिता खुर्ची आणावयास सांगावयाचे श्रीयुक्तेश्वर विसरले व साहेबांना तेथेच एका लाकडी पेटीवर बसावे लागले. आपले स्वागत होऊन आपल्या दर्जाप्रमाणे तेथे आपणास महत्त्व मिळेल, अशी साहेबांची साहजिकच अपेक्षा होती; पण ती पुरी झाली नाही.

नंतर आध्यात्मिक विषयावर चर्चा सुरू झाली. पाहुण्यांनी धर्मग्रंथांमधील संदर्भांचा अर्थ लावण्यात चुका केल्या; जसजशा त्यांच्या चुका होत गेल्या तसतसा त्यांचा रागाचा पारा वाढत चालला.

“तुम्हांला माहीत आहे का की, मी एम. ए. च्या परीक्षेत पहिला आलेलो आहे?” वादविवादामध्ये त्यांचे मुद्देसूद बोलणे संपले, पण त्यांचे ओरडणे चालूच राहिले.

“मॅजिस्ट्रेटसाहेब, हे काही कोर्ट नाही, हे आपण विसरलात.” गुरुजी शांतपणाने म्हणाले. “तुमच्या या बालिश उद्‌गारांवरून एखादा असे अनुमान काढू शकेल की, कॉलेजमधील आपला अभ्यास यथातथाच होता. विश्वविद्यालयाच्या पदवीचा वैदिक साक्षात्काराच्या दृष्टीने काही अर्थाअर्थी संबंध नाही. हिशेबनिसासारखे दरवर्षी महात्मे गटागटांनी उत्तीर्ण होत नाहीत.”

काही वेळ आश्चर्यचकित होऊन स्तब्ध बसल्यानंतर पाहुणे मनापासून हसले.

“स्वर्गीय मॅजिस्ट्रेटशी हा माझा पहिलाच सामना आहे, “ते म्हणाले. नंतर त्यांनी एक औपचारिक विनंती कायद्याच्या शब्दांत बसवलेली—कारण कायद्याची भाषा त्यांचे जणू सारे जीवनच झाली होती—केली, “माझा ‘शिकाऊ’ शिष्य म्हणून स्वीकार व्हावा.”

कित्येक प्रसंगी, लाहिरी महाशयांप्रमाणे श्रीयुक्तेश्वर सुद्धा ‘अपक्व’ विद्यार्थ्यांना संन्यास घेण्याच्या इच्छेपासून परावृत्त करीत. या दोन्ही गुरूंचे म्हणणे असे “जेथे ईश्वरी साक्षात्कार झालेला नाही, तेथे नुसती भगवी वस्त्रे घालून वावरणे म्हणजे समाजाची दिशाभूल करणे होय. वैराग्याची बाह्य चिन्हे सोडून द्या; त्याने तुमच्यामध्ये खोटा अभिमान निर्माण होईल व तुमचे नुकसान होईल. दररोज थोडीथोडी आध्यात्मिक उन्नतीची संथपणे साधना करीत जावी. यापरता दुसरा मार्ग नाही. आणि त्याकरिता क्रियायोगाची साधना करीत जा.”

एखाद्या माणसाची योग्यता अजमावण्याच्या कामी तिचे मोजमाप करण्याकरिता संतपुरुष नेहमी एकच कसोटी लावतात; त्यांची ही फूटपट्टी जगाच्या नेहमी बदलत जाणाऱ्या फूटपट्टीपेक्षा वेगळी असते. मानवता—तसे पाहिले तर विविध स्वरूपांची—पण गुरुजींच्या दृष्टीने दोनच विभागांत तिचे वर्गीकरण होत असे. ईश्वराचा शोध न घेणारी अडाणी माणसे आणि तो शोध घेणारी सुज्ञ माणसे.

गुरुजी व्यक्तिशः आपल्या इस्टेटीची व्यवस्था पाहताना अगदी बारीक सारीक गोष्टींत सुद्धा लक्ष घालीत असत. बदमाश माणसे गुरुजींच्या वडिलोपार्जित जमिनीचा ताबा घेण्यासाठी अनेकवार प्रयत्न करीत. आपल्या दृढनिश्चयाने व कोर्ट-कचेरी करून ते प्रतिस्पर्ध्यांचे डाव हाणून पाडीत. अशा तऱ्हेचे हे दुःखदायक अनुभव घेत की, त्यात त्यांची इच्छा एवढीच असायची की आपले स्वतःचे ओझे भीक मागणारा गुरू म्हणून आपल्या शिष्यांवर पडू नये. ते आर्थिक दृष्ट्या पूर्ण स्वावलंबी असल्याने माझे गुरुजी एरवी भयानकपणे फटकळ बोलत असले तरी व्यवहाराच्या बाबतीत लबाडी वगैरे करण्याच्या कामी पूर्ण अनभिज्ञ होते. इतर गुरूंना आपल्या आश्रयदात्यांची हांजी हांजी करावी लागते. पण आमच्या गुरुजींच्या मनावर इतरांच्या संपत्तीचा उघड किंवा सूक्ष्म असा कोणताही परिणाम

होत नसे. कोणत्याही कारणाकरिता त्यांनी कधी पैसे मागितल्याचे किंवा पैशाची गोष्ट काढल्याचे मी कधी ऐकले नाही. त्यांच्या आश्रमातील शिक्षण सर्वांना मोफत असे.

एके दिवशी सेरामपूरच्या आश्रमात समन्स लावायला कोर्टाचा बेलीफ आला. मी आणि कनई नावाचा एक दुसरा शिष्य, दोघांनी मिळून त्याला गुरुजींच्या समोर नेले.

त्या बेलिफाची गुरुजींशी वागण्याची वर्तणूक अपमानास्पद होती. “तुझ्या मठाची छाया सोडून देऊन कोर्टाची खुली, प्रामाणिक हवा घे म्हणजे तुझा फायदा होईल.” तो अपमान करण्याच्या हेतूने असे काही बडबडू लागला.

मला ते सहन करवेना. “एक शब्द आणखी उर्मटपणे काढ, पाहा तुला जमीनदोस्त करतो की नाही” मी त्याला धमकावणी देत पुढे झालो.

कनई सुद्धा त्या बेलिफाच्या अंगावर ओरडत होता, “हलकट माणूस! ह्या पवित्र आश्रमात अशी भाषा वापरतोस? देवा-धर्माची काही कदर आहे का नाही तुला?”

पण आपल्याला शिव्या देणाऱ्या त्या माणसाचे जणू रक्षणच गुरुजी उभे राहून करीत होते. “विनाकारण भडकून का जाता? हा इसम आपले कर्तव्य बजावीत आहे.”

आपल्या वागण्याची अशी काही प्रतिक्रिया होईल अशी त्या बेलिफाची कल्पना नव्हती. त्याने आदरपूर्वक गुरुजींपाशी दिलगिरी प्रदर्शित केली व तो निघून गेला.

गुरुजींची इच्छाशक्ती एवढी तीव्र असून अंतरंगी ते इतके शांत कसे राहिले, हे समजणे मोठे गूढ होते. दैवी पुरुषांची, लोकोत्तर पुरुषांची जी व्याख्या वेदांत केली आहे, ती त्यांच्या बाबतीत बरोबर लागू पडत होती: ‘वज्रादपि कठोराणि, मृदूनि कुसुमादपि.’ जेथे तत्त्वाचा प्रश्न असेल तेथे मेघगर्जनेहून सामर्थ्यवान व जेथे दया दाखविण्याचा प्रश्न असेल तेव्हा फुलाहूनही मृदू.

ब्राऊनिंग म्हणतो त्याप्रमाणे, ‘स्वतःच निस्तेज राहिल्याने प्रकाश सहन न करणाऱ्या’ अशा अनेक व्यक्ती या जगात आढळून येतात. एखादे वेळी एखादा तिऱ्हाईत मनुष्य काही एका काल्पनिक त्रासाने संतप्त होऊन श्रीयुक्तेश्वरांचा उपमर्द करी. पण गुरुजी चिडल्यासारखे बिलकुल न दाखविता त्याचे बोलणे शांतपणे व नम्रपणे ऐकुन घेत व स्वतःशीच, त्याच्या आक्षेपामध्ये काही सत्याचा अंश आहे की नाही हे तपासून पाहत. अशा तऱ्हेचे प्रसंग पाहिल्यावर माझ्या ध्यानात गुरुजींच्या अनुपम सूक्तिवचनांपैकी ते सूक्तिवचन येई: “काही माणसे दुसऱ्यांची डोकी कापून स्वतः उंच होऊ पाहतात!”

साधुपुरुषाची कधीही न ढळणारी अशी चित्ताची स्थिरता ही कोणत्याही प्रवचनापेक्षा अधिक प्रभावी ठरते. “ज्यास सहसा राग येत नाही, तो बलिष्ठाहूनही श्रेष्ठ होय; आणि जो आपल्या स्वतःस ताब्यात ठेवतो तो शत्रूचे नगर [22] जिंकणाऱ्या वीराहूनही श्रेष्ठ होय.”

माझ्या मनात पुष्कळदा येई की, माझ्या भव्योदात्त गुरुजींनी जर आपले चित्त कीर्ती किंवा जागतिक विक्रम संपादन करण्यावर केंद्रित केले असते, तर ते सम्राट किंवा जगज्जेते झाले असते. त्याच्याऐवजी त्यांनी क्रोध व अहंकार यांचे कोट जमीनदोस्त करावयाचे पसंत केले, की ज्यांच्या विनाशाने मानवास उन्नतावस्था प्राप्त होते.



*श्रीरामपुर येथील ,1977 मध्ये समर्पित स्वामी श्रीयुक्तेश्वर ध्यान मंदिर, त्यांच्या आश्रमाच्या जागेवर बांधलेला आहे. मूळ आश्रमाच्या कित्येक विटा त्याच्या बांधकामात वापरण्यात आल्या. परमहंस योगानंदांनी चितारलेल्या रूपरेखेला अनुसरून या मंदिराचे स्थापत्य केले गेले आहे.*

1 श्रीयुक्तेश्वरांचा जन्म १० मे, १८५५ रोजी झाला.
2 'युक्तेश्वर' म्हणजे 'ईश्वराशी युक्त'. संन्यासधर्मातील 'स्वामी' या पदवीच्या ज्या दहा विशिष्ट अर्थसूचक शाखा पूर्वीपासून चालत आलेल्या आहेत त्यांपैकी गिरी ही एक. 'श्री' म्हणजे पवित्र. हे काही नाव नाही; आदरार्थी संबोधन आहे.
3 शब्दशः "एकत्र प्रेरित करणे." समाधी म्हणजे आनंदमय अशी इंद्रियातीत अवस्था; की ज्या अवस्थेमध्ये योगी जीवात्मा व परमात्मा यांच्या ऐक्याचा अनुभव मिळवितो.
4 शरीरशास्त्रज्ञांच्या दृष्टीने घोरणे म्हणजे इंद्रियांचे संपूर्ण शिथिलीकरण.
5 योग्याच्या सर्वव्यापक शक्तींविषयी, ज्यायोगे तो कर्मेंद्रियांचा उपयोग न करता पाहतो, चव घेतो, वास घेतो, स्पर्श करतो आणि ऐकतो ह्याचे वर्णन तैत्तिरीय आरण्यकामध्ये अशा तऱ्हेने केले आहे: "आंधळ्या माणसाने मोती छेदिले, ज्याला बोटे नाहीत अशाने त्यांतून दोरा ओवला; ज्याला मान नाही त्याने ते वापरले आणि ज्याला जीभ नाही त्याने त्याची वाखाणणी केली."
6 अहिंसाप्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः"
पातंजली योगसूत्र, २-३५
"अहिंसेच्या परिपालनाने परिपूर्ण झालेल्या माणसाच्या सान्निध्यात वैरभाव (कोणत्याही प्राण्याविषयीचा) उरत नाही."
7 नाग हा आपल्या तावडीत आलेल्या कोणत्याही चालत्या पदार्थावर हल्ला करतो. पुष्कळदा असे आढळून आलेले आहे की, त्याच्या हल्ल्यापासून बचाव करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे बिलकूल न हालणे.

8 लाहिरी महाशयांचे प्रत्यक्ष शब्द असे: “प्रिय” (गुरुजींचे पहिले नाव). ‘युक्तेश्वर’ नव्हे (हे संन्यासाश्रमातले नाव माझ्या गुरूंनी लाहिरी महाशय हयात असतोपर्यंत धारण केले नव्हते). वाचकांचा ह्या दोन्ही नावांमुळे घोटाळा होऊ नये म्हणून ह्या पुस्तकात येथे आणि अन्य काही ठिकाणी ‘युक्तेश्वर’ असेच नाव मूळ नावाच्या बदली घातले आहे.

9 “ज्या गोष्टींची तू इच्छा करतोस व त्या मिळाव्यात म्हणून प्रार्थना करतोस त्या तुला मिळतील व त्या तुझ्या होतील यावर पूर्ण विश्वास ठेव.” मार्क ११:२४ परमेश्वराशी तादात्म्य पावलेल्या सिद्ध-महात्म्यांना आपले साक्षात्कारी ज्ञान प्रगत शिष्यांना प्रदान करता येते. ह्याच पद्धतीने लाहिरी महाशयांनी श्रीयुक्तेश्वरांना ह्या प्रसंगी साक्षात्कारी ज्ञान दिले.

10 “आणि त्यांपैकी एकाने मुख्य उपाध्यायाच्या मुस्कटात मारली व त्याचा उजवा कान कापला. आणि येशूने उत्तर दिले व तो म्हणाला, ‘येथपर्यंतच तू यातना, देहदंड सहन कर.’ आणि त्याने त्या कानास हाताने स्पर्श केला व तो बरा केला.” —ल्यूक २२:५०-५१ (बायबल).

11 “जे पवित्र आहे ते कुत्र्यापुढे टाकू नकोस; डुकरांपुढे तू तुझे मोती सांडू नकोस. का की, ती डुकरे ती मोती पायदळी तुडवितील व परत फिरून उलटतील व तुला फाडून टाकतील.” —मॅथ्यू ७:६ (बायबल).

12 गुरुजींना उपोषण हा आदर्श नैसर्गिक असा शरीरशुद्धीचा मार्ग फार पसंत होता. परंतु तो विशिष्ट शिष्य आपल्या शरीरामध्ये फारच रममाण झालेला होता.

13 एकदा ते काश्मीरमध्ये असताना आजारी पडले होते. पण त्या वेळी मी त्यांच्याजवळ नव्हतो. (२१ व्या प्रकरणाचा शेवटचा भाग पाहावा.)

14 चार्लस रॉबर्ट रिचेट हा फार मोठा स्वतंत्र विचारसरणीचा डॉक्टर होऊन गेला. त्यास शरीरविज्ञानामध्ये नोबेल प्राईझ मिळालेले होते. तो असे लिहितो, “अध्यात्मविद्येची अजून शास्त्रीय विषयांत गणना झालेली नाही; पण ती लवकरच होईल … एडिनबर्गला शंभर शरीरविज्ञानशास्त्रांमध्ये पारंगत अशा डॉक्टरांपुढे मी ठासून सांगू शकलो की, आपली पाच ज्ञानेन्द्रिये हीच केवळ ज्ञान ग्रहण करण्याची आपली साधने नाहीत आणि कधी कधी सत्यत्वाचा अंश बुद्धीला अन्य मार्गाने पोचू शकतो … कारण एखादी गोष्ट क्वचित आढळून येते म्हणून ती अस्तित्वातच नाही असे म्हणता येणार नाही. म्हणजे एखाद्या विषयाचा अभ्यास करणे अवघड आहे, म्हणून त्याचा अभ्यास करूच नये की काय? रसायनशास्त्राची सुरुवातीला ते शास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान्याने पारसमणी शोधण्याच्या पाठीमागे लागणे होय म्हणून शास्त्रज्ञांनी टवाळी केली; पण पुढे ते शास्त्र आहे असे सिद्ध झाल्यावर त्यांनी लज्जेने मान खाली घातली. त्याचप्रमाणे अध्यात्मविद्या ही एक जादूटोण्याची गूढ विद्या आहे म्हणून जे टवाळी करतात, त्यांनाही पुढे शरमेने मान खाली घालावी लागेल … तत्त्वे म्हणून मान्य करावयाची झाली तर ती लॅव्हॉइझिअर, क्लॉड बर्नार्ड आणि पाश्चर यांची प्रयोगाने सिद्ध झालेली, जी सर्व ठिकाणी व सर्वदा लागू पडणारी तत्त्वे होत. तेव्हा हे जे नवीन शास्त्र पुढे येत आहे व जे मानवी विचाराच्या दिशेत पालट घडवून आणीत आहे, त्या शास्त्राचे स्वागत असो.

15 समाधी.

16 “आपणामधील चैतन्य व अर्धचैतन्य शक्तीवर आणखी एक अधिचैतन्य किंवा ऊर्ध्वचैतन्य शक्ती आपणामध्ये वास करीत असते.” न्यूयॉर्कमधील एका व्याख्यानात रब्बी इस्रायल एच. लेविंथाल याने हे निदर्शनास आणून दिले. “पुष्कळ वर्षांपूर्वी एफ. डब्ल्यू. एच.—मायर्स या इंग्लिश मानसशास्त्रज्ञाने असे सुचविले होते की, “आपल्या व्यक्तित्वाच्या खाली खोल कचऱ्याचा ढीग जसा असतो, तशी मौल्यवान रत्नांची रासही असते.” मनुष्यामधील ऊर्ध्वचैतन्य शक्तीवर—अतींद्रिय ज्ञानावर संशोधन करणारे मानसशास्त्र आपले लक्ष ह्या रत्नांच्या राशीवर केंद्रित करीत असते—की जे क्षेत्रच फक्त मानवाच्या महान, निःस्वार्थी व पराक्रमी कृत्यांची कारणमीमांसा करू शकते—मनुष्याच्या अर्धचैतन्य शक्तीवर आपले संशोधन केंद्रित करणाऱ्या सामान्य मानसशास्त्राला ह्या विलक्षण संशोधनाचा पत्ता असत नाही.

17 ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग. ईश्वरप्राप्तीचे दोन मार्ग.

18 “मनुष्य हा जागृतावस्थेमध्ये इंद्रियसुखांचा उपभोग घेण्यासाठी नाना प्रकारच्या खटपटी करीत असतो. पण कर्मेंद्रियांचा हा सारा संच जेव्हा थकून जातो तेव्हा त्याला अगदी निकटवर्ती असे सुख भोगण्याची इच्छा होत नाही. तो झोपी जातो आणि त्या झोपेत तो आत्म्याच्या ठिकाणी, आपल्या स्वतःच्या ठिकाणी शांतता अनुभवितो.” महान वेदान्ती शंकराचार्यांनी म्हटलेले आहे. “इंद्रियातीत सुखाचा, दिव्य आनंदाचा लाभ मिळविणे हे अशा तऱ्हेने सोपे आहे; आणि हे सुख, हा आनंद इंद्रियसुखापेक्षा फार उच्च प्रतीचा आहे. इंद्रियभोगांचे पर्यवसान शेवटी त्या भोगांचा उद्वेग येण्यामध्येच होते.”

19 मार्क २:२७ (बायबल)

20 आपल्या इच्छेनुसार गुरुजी एका क्षणात कोणाही व्यक्तीच्या मनाशी एकरूप होत (ह्या योगसिद्धीचा उल्लेख पातंजलीने आपल्या योगसूत्रांत केलेला आहे. योगसूत्रे: ३:१९) मानवी रेडिओसारख्या त्यांच्या ठिकाणी असलेल्या सिद्धींचे वर्णन आणि त्यांच्या विचारांचे स्वरूप प्रकरण १५ मध्ये सविस्तर दिलेले आहे. (पहा पृ. २१८-२१९)

21 मॅथ्यू ६:१६ (बायबल)

22 प्रॉवर्ब्स १६:३२ (बायबल).

## प्रकरण - १३

# 13. नित्य जागृत संत

"कृपा करून हिमालयात जाण्याची मला परवानगी द्या. ज्या एकान्ताचा कोणी भंग करणार नाही अशा ठिकाणी अविरतपणे ध्यान लावले तर परमेश्वराशी दिव्य संपर्क मी साधू शकेन अशी मला आशा आहे."

एकदा मी खरोखरच कृतघ्नपणाचे वरील शब्द गुरुजींना बोललो. साधकाला मधून मधून ज्याची प्रथम काही कल्पना येत नाही असा एकप्रकारचा भ्रम सतावीत असतो. अशा भ्रमामुळे ग्रस्त होऊन मला आश्रमातील कामांचा व कॉलेजमधील अभ्यासाचा कंटाळा येत चालला. वर सांगितल्याप्रमाणे विनंती करण्याच्या मागे एक लंगडी सबब मला सांगता आली असती; व ती म्हणजे ही की, श्रीयुक्तेश्वरांच्या सान्निध्यात येऊन मला फक्त सहाच महिने झाले होते. अजून मला त्यांच्या भव्य व उच्च व्यक्तित्वाचे पुरते दर्शन झाले नव्हते.

"हिमालयात कितीएक गिरिजन राहतात; पण त्यांना काही ईश्वरी साक्षात्कार झालेला नसतो." गुरुजींनी असे हे साधे उत्तर सावकाशपणे दिले. "एखाद्या अचल पर्वतापेक्षा साक्षात्कार झालेल्या माणसापासून ज्ञान अधिक खात्रीलायकपणे मिळू शकते."

तुझा मी गुरू आहे व गिरिकंदर तुझा काही गुरू नाही अशा तऱ्हेची गुरुजींनी दिलेली रोखठोक सूचना न मानता मी माझ्या विनंतीचा पुनरुच्चार केला. श्रीयुक्तेश्वरांनी खुशीने असे उत्तर दिले नाही. 'मौनं संमतिलक्षणम्।' त्यांच्या मौनाचा मी असा हा धाडसी पण सोयीचा अर्थ घेतला.

त्या दिवशी संध्याकाळी कलकत्त्याला घरी माझी प्रवासाची तयारी चालली होती. ब्लँकेटमध्ये काही थोड्या वस्तू बांधून घेत असताना काही थोड्या वर्षांपूर्वी मी असेच माझे सामान बांधून घेऊन ते बोचके चोरटेपणाने पोटमाळ्यावरील खोलीतून खाली टाकून दिले होते त्याची आठवण झाली. मनात अशी भीती वाटली की, त्याचप्रमाणे हिमालयातील ही यात्रा पण अशुभ मुहूर्तावर निघणार की काय? पहिल्या वेळी माझा आध्यात्मिक उत्साह जबर होता. आज रात्री माझी विवेकबुद्धी माझ्यावर सारखे प्रहार करीत होती की, 'तू गुरुजींना सोडून चालला आहेस.'

दुसऱ्या दिवशी सकाळी स्कॉटिश चर्च कॉलेजमधील आमचे संस्कृतचे प्रोफेसर बिहारी पंडित यांना गाठले.

"सर, लाहिरी महाशयांच्या एका मोठ्या शिष्याबरोबर तुमची मैत्री असल्याचे तुम्ही बोलला होता. कृपा करून मला त्यांचा पत्ता द्या."

"म्हणजे तू राम गोपाळ मुजुमदारबद्दल बोलातोयस. मी त्याला न झोपणारा महात्मा म्हणतो. तो नेहमी अनुपम अशा अत्यानंदात जागृत असतो. त्याचे घर तारकेश्वरजवळ रणबाजपूरला आहे."

मी पंडिताचे आभार मानले व ताबडतोब तारकेश्वरला जाण्याकरिता गाडीत बसलो. माझ्या मनातील कुतर्क नाहीसा करण्याकरिता मी त्या 'झोपी न जाणाऱ्या' महात्म्याची हिमालयात गेल्यावर एकान्तवासामध्ये ध्यान करीत राहण्यासाठी परवानगी घ्यावयाचे ठरविले. बिहारी पंडितांनी मला असे सांगितले होते की, राम गोपाल यांनी बंगालमधील कानाकोपऱ्यातील गुहांमध्ये बसून बरीच वर्षे क्रियायोगाची साधना केल्यामुळे दिव्यदर्शन प्राप्त झाले होते.

तारकेश्वरला मी एका प्रसिद्ध देवळात गेलो. फ्रान्समधील लोअर्डस चर्चला कॅथॉलिक जेवढे पवित्र स्थान मानतात तितकेच हिंदू लोक हे ठिकाण पवित्र मानतात. तारकेश्वरच्या ह्या देवळामध्ये रोग बरे झाल्याचे असंख्य चमत्कार घडून आलेले आहेत. त्याची प्रचीती आमच्या घरातील एका नातेवाइकास पण आलेली आहे.

माझी थोरली काकू मला सांगे, "मी ह्या देवळामध्ये एक आठवडाभर बसून राहिले होते. तेथे बसून तुझ्या शरदकाकांचा एक जुनाट रोग बरा व्हावा म्हणून कडक उपवास करून प्रार्थना करीत होते. सातव्या दिवशी माझ्या हातात एक वनस्पती आली! त्या वनस्पतीच्या पानांचा मी रस काढला व तो तुझ्या काकांना दिला. त्यांचा रोग ताबडतोब बरा झाला. एवढेच नव्हे, तर तो पुनः कधी उद्भवला नाही."

तारकेश्वरच्या त्या पवित्र मंदिरात मी प्रवेश केला. वेदीवर एका गोल दगडाखेरीज काही नव्हते. त्या दगडाच्या परिघाला सुरुवातही नव्हती व शेवटही नव्हता; आणि तशा त्या स्वरूपामुळे तो दगड अनंतत्वाचे निदर्शक होता. भारतामध्ये ब्रह्मांडाची गूढे अगदी खेडवळ शेतकऱ्याला सुद्धा समजतात. तसे पाहिले तर, पाश्चिमात्यांनी, 'गूढवादावरच तो जगत असतो,' असा आक्षेप त्याच्यावर काही प्रसंगी घेतलेला आहे.

माझी मनोवृत्ती त्या वेळी इतकी कठोर झाली होती की, त्या दगडाच्या प्रतीकासमोर मला नमन करावेसे वाटेना. परमेश्वराचा शोध आपल्या अंतरंगातच करावयास पाहिजे, अशी माझी विचारसरणी होती.

मी साष्टांग नमस्कार केल्याशिवाय देवळातून बाहेर पडलो व रणबाजपूर गावाच्या दिशेने भरभर चालू लागलो. मला रस्ता माहीत नव्हता. बाजूने जाणाऱ्या एकाला मी त्या गावाबद्दल व मला जेथे जायचे होते त्या ठिकाणाबद्दल विचारले. त्याला बराच वेळ विचार करावा लागला.

"आता तुम्हांला आडवा रस्ता दिसला की उजवीकडे वळा व पुढे थेट चालत जा." शेवटी भाष्य करण्यासारखे त्याने मार्गदर्शन केले.

त्याने सांगितल्याप्रमाणे कालव्याच्या बाजूबाजूने मी चालू लागलो. अंधार पडू लागला. रानातील त्या गावाच्या आजूबाजूला काजवे लुकलुकत होते व कोल्हेकुई ऐकू येत होती. चांदणे फार मंद होते. त्याचा काही उपयोग होण्यासारखा नव्हता. दोन-एक तास मी धडपडत चाललो होतो.

इतक्यात मला धीर आला. गाईच्या गळ्यातल्या घुंगुरांचा आवाज ऐकू आला. मी बराच वेळ जोरजोराने हाका मारल्या, तेव्हा एक ग्रामीण माझ्याजवळ आला.


"राम गोपाळ बाबूंना मला भेटावयाचे आहे."

“आमच्या गावात या नावाचा कोणी इसम राहत नाही.” त्या इसमाचा आवाज उद्धट होता. “तू कोणीतरी खोटे बोलणारा गुप्त हेर असावास.”

राजकीय विचारांनी त्रस्त झालेल्या त्याच्या मनातून हा संशय काढून टाकण्याच्या हेतूने मी त्याला माझी करुणास्पद स्थिती कळवळून सांगितली. त्याने त्याची खात्री झाली. त्याने मला आपल्या घरी नेले व माझे चांगले आदरातिथ्य केले.

त्याने माहिती दिली, “रणबाजपूर येथून फार दूर आहे. इकडे येताना जो आडवा रस्ता तुम्हांला लागला त्या ठिकाणी उजवीकडे न वळता तुम्ही डावीकडे वळावयास पाहिजे होते.”

मला ज्याने प्रथम वाट सांगितली असा इसम म्हणजे माझ्या मते मोठा धोका आहे. नंतर माझे जेवण झाले. जेवणाचा बेत त्याने चांगला केला होता. जाड्या तांदळाचा भात. मसूर डाळ. बटाटे व कच्ची केळी यांची भाजी. अंगणाच्या पलीकडे एका लहानशा झोपडीत मी झोपण्यासाठी गेलो. दूर कोठेतरी गावातील लोक टाळ-मृदंग, झांजा यांच्या सुरात भजन करीत होते. त्या रात्री झोप येणे शक्य नव्हते. त्या एकान्तवासी योग्याची—राम गोपाळ यांची—मला भेट मिळावी म्हणून मी मनातल्या मनात खूप प्रार्थना केली.



*राम गोपाल मजुमदार "नित्य जागृत संत"*

माझ्या अंधाऱ्या झोपडीच्या फटीतून जेव्हा पहाटेच्या प्रकाशाचे धूम्रधूसर किरण आत येऊ लागले तेव्हा मी रणबाजपूरला जायला निघालो. वाटेतली भातखाचरे तुडवीत, भाताच्या काटेरी रोपांचे कापून उरलेले बुंधे पायांखाली घालीत, आणि माती सुकवून तयार केलेल्या

बांधांच्या कडेकडेने मी पुढे चाललो. वाटेत एखादा ग्रामीण भेटायचा. त्याला विचारले असताना पोचण्याचे ठिकाण एक कोसभर (दोन मैल) आहे असे ठराविक उत्तर मिळे. सहा तासांत सूर्यनारायणाने क्षितिजावरून डोक्यावर येईपर्यंत विजयोत्साहाने प्रवास केला; पण मला सारखे असे वाटे की, रणबाजपूरपासून मी कायमचाच एक कोस अंतरावर आहे.

दुपार टळली तरी मी भातखाचरेच तुडवीत होतो. तेच माझे जग; आणि त्याला अंत नव्हता. ऊन अगदी मी म्हणत होते. आकाश जणू निखारा ओतीत होते. त्यापासून सुटका होण्यासारखी नव्हती मी जवळ जवळ कोसळण्याच्याच बेतात आलो होतो. एवढ्यात समोरून एक इसम अगदी संथपणे येताना दिसला. त्याला माझा तो ठराविक प्रश्न विचारावयाचे धाडस मला झाले नाही; कारण 'येथून एकच कोस' हे ठरीव उत्तर येणार अशी माझी खात्री होती.

तो मनुष्य माझ्याजवळ आल्यावर थांबला. ठेंगणा आणि बारीक; तसे पाहिले तर अगदी सुमार असा. फक्त त्याचे डोळे मात्र विलक्षण भेदक व काळेभोर असे होते.

"रणबाजपूर सोडून जाण्याच्या मी तयारीत होतो. पण तुझी भेटायची सदिच्छा होती; तेव्हा थांबलो तुझ्याकरिता." आणि त्याने आश्चर्यचकित झालेल्या माझ्या चेहऱ्याकडे बोट दाखविले. "अगोदर काही वर्दी न देता एकदम मला भेटायला येण्यात तुला काय हुशारी वाटली होय? त्या प्रोफेसर बिहारींना माझा पत्ता तुला देण्याचे काय कारण?"

आता या महाराजांपुढे माझी ओळख करून द्यायची म्हणजे फक्त निरर्थक बडबडण्यासारखेच होते. मी अवाक् झालो. अशा तऱ्हेच्या स्वागताने मी गार पडलो. त्यानंतर त्यांचे उद्गार एकदम बाहेर पडले.

"परमेश्वर कुठे आहे असे वाटते तुला? मला सांग पाहू."

"का, तो माझ्यामध्ये आहे तसा सगळीकडे आहे." निःसंशयपणे. मी जसा मनात गोंधळून गेलो तसाच गोंधळल्यासारखा दिसू लागलो.

"सगळीकडे अं?" महाराज गालांतल्या गालांत हसले. "तर मग, माझ्या तरूण मित्रा, तारकेश्वर देवळामध्ये काल तू दगडाच्या प्रतीकामध्ये वास करीत असलेल्या परमात्म्यापुढे नमस्कार का केला नाहीस? [1] तुझ्या दुरभिमानामुळे तुला शिक्षा मिळाली. त्या वाटसरूने तुला चुकीची वाट दाखविली. त्या बिचाऱ्याला डावे किंवा उजवे यांमधील फरक अजमावण्याचा त्रास घेण्याने कारण नव्हते. आणि आजही तुला शोधून काढण्याकरिता त्रास पडलाच की!"

मी एकदम कबूल केले. मला महदाश्चर्य वाटले की, माझ्या समोरील विशेष काही नसलेल्या शरीरामध्ये सर्वसाक्षी असा नेत्र दडून बसलेला आहे. त्या योगीमहाराजांच्या शरीरापासून रोगनिवारणशक्ती उद्भूत होऊ लागली. त्या पोळून काढणाऱ्या शेतामध्ये मी उभा असता मला एकदम ताजेतवाने झाल्यासारखे वाटले.

"भक्ताला असे वाटते की, ईश्वर शोधण्याचा त्याचा जो मार्ग तोच एकमेव मार्ग," ते म्हणाले, "निःसंशय योगमार्ग हाच खरा मार्ग, की ज्याच्यामुळे आपल्या स्वतःमध्येच दिव्यत्वाची जाणीव होते. लाहिरी महाशयांनी हेच आम्हांला सांगितले. परमात्म्याची अंतरंगी ओळख

पटल्यावर आपण लगेच त्याला बाहेर पाहू लागलो. तारकेश्वराचे देऊळ व इतर मंदिरे ही जी लोकांची आदरस्थाने, पूजास्थाने झाली आहेत ते बरोबर आहे. कारण ती ठिकाणे म्हणजे आध्यात्मिक शक्तीच्या अणुगाभ्याची केंद्रेच होत."

त्यानंतर त्या महात्म्याचे उपहास करणे थांबले. त्याचे नेत्र दयार्द्रबुद्धीने मृदू बनले. त्याने माझ्या पाठीवर थाप मारली.

"तरुण योगी, आपल्या गुरूपासून काय पळून चाललायस होय? तुला जे काय पाहिजे ते सगळे त्याच्याजवळ आहे. तू त्याच्याकडे परत जा." ते पुढे म्हणाले, "पर्वत काही तुझे गुरू होऊ शकत नाहीत—" अगदी हाच विचार श्रीयुक्तेश्वरांनीच दोन दिवसांपूर्वी बोलून दाखविला होता.

"महात्म्यांनी आपले वास्तव्य फक्त गिरिकंदरांमध्येच ठेवावे असा काही विश्वव्यापी दंडक नाही." महाराजांनी माझ्याकडे विनोदपूर्ण कटाक्ष टाकला. "भारत आणि तिबेट यांमधील हिमालयालाच संतांना आश्रय देण्याचा काही मक्ता दिलेला नाही. जो परमेश्वराला आपल्या अंतःकरणात शोधून काढण्याचा त्रास घेत नाही, त्याला आपले शरीर इकडे तिकडे नेऊन तो सापडणार नाही. ज्या वेळी आध्यात्मिक जागृतीकरिता साधक पृथ्वीच्या अगदी सीमेपर्यंत जायला स्वखुशीने तयार होतो त्या वेळी त्याला गुरू जवळपासच भेटतो."

मी मूक संमती दिली. वाराणशीच्या आश्रमात मी प्रार्थना करीत होतो. त्याची मला आठवण झाली. तशीच श्रीयुक्तेश्वरांशी जी माझी गजबजलेल्या रस्त्रयामध्ये भेट झाली त्याही प्रसंगाची आठवण झाली.

"तुला एखादी लहानशी खोली मिळू शकेल काय, की जेथे दार लावून एकांतात बसता येईल?"

"होय, मिळू शकेल," आता हे महाराज सामान्य गोष्टींवरून विशिष्ट वैयक्तिक गोष्टीपर्यंत मोठ्या धडाक्याने आले.

"तीच तुझी गुहा." त्या वेळी योगीराजांनी माझ्याकडे एक तेजःपुंज दृष्टिक्षेप टाकला; तो मी कधीही विसरलेलो नाही. "तीच तुझा पवित्र हिमालय. तेथेच तुला परमेश्वराचे राज्य आढळेल."

हे त्यांचे साधेच शब्द, पण त्या शब्दांनी माझा आयुष्यभरचा हिमालयात जाण्याचा हट्ट काढून टाकला. त्या भातखाचरामधील रखरखणाऱ्या उन्हामध्ये, आगीमध्ये मी पर्वतांच्या आणि चिरंतन हिमाच्छादित शिखरांच्या स्वप्नातून जागा झालो.

"छोटे महाशय, तुझी दिव्य तृष्णा प्रशंसनीय आहे. मला तुझ्याबद्दल आता मोठे प्रेम वाटू लागले आहे." रामगोपाळांनी नंतर मला हाताशी धरून जंगलामध्येच जरा स्वच्छ केलेल्या ठिकाणी तयार केलेल्या एका विचित्रशा झोपडीमध्ये नेले. जवळपासच्या झोपड्यांच्या छपरांवर माडाची झावळी टाकलेली होती आणि त्या झोपड्यांची दारे गावंढळ पद्धतीने उष्ण प्रदेशातील फुलांच्या माळांनी सुशोभित केलेली होती.

त्या योग्याने बाबूंनी तयार केलेल्या आपल्या लहानशा ओटेवजा शीतल छाया देणाऱ्या झोपडीमध्ये मला बसविले. नंतर त्यांनी मला लिंबाचे सरबत व खडीसाखरेचा एक खडा दिला. नंतर आम्ही त्याच्या कट्टयावर पद्मासन घालून बसलो. चार तास आम्ही ध्यानस्थ

बसलो. नंतर मी डोळे उघडले. चंद्रप्रकाशात ठळक दिसून येणारी त्या योग्याची मूर्ती तशीच निश्चल होती. मी माझ्या मनाला अगदी कठोरपणे समजावीत होतो की, माणूस केवळ भाकरीवरच जगत नसतो आणि तेवढ्यात रामगोपाळ आपल्या आसनावरून उठले.

"तुझी उपासमार झाली आहे; मला माहीत आहे," योगीराज म्हणाले, "आता थोड्या वेळातच फराळाचे तयार होईल."

नंतर त्यांनी आपल्या बैठकीच्या जागेवर ठेवलेल्या चुलीत विस्तव घातला. थोड्याच वेळात डाळ-भाताचे जेवण तयार झाले. केळीच्या पानावर आम्ही जेवण केले. स्वयंपाकाच्या कामात त्यांनी माझी काही एक मदत घेतली नाही. त्यात त्यांचा विनय दिसून आला. "अतिथिदेवो भव" असे शास्त्रात म्हटलेले आहे. तदनुसार अनादिकालापासून आजपर्यंत अतिथिधर्म पाळला जातो. पुढे मी जगभर प्रवास केला. अतिथींबद्दलचा तितकाच आदर इतर देशांत, विशेषेकरून ग्रामीण भागात दिसून आला. त्याचा मला आनंद होई. शहरवासी माणसाच्या बाबतीत ही आदरातिथ्याची भावना कमी दिसून येई. नाना तऱ्हेच्या परक्या माणसांचे वाजवीपेक्षा जास्त चेहरे दृष्टीस पडल्याने त्या भावनेची तीक्ष्ण कड बोथट झालेली असे.

त्या लहानशा जंगलामधील गावात राम गोपाळ यांच्याशेजारी मी मांडी घालून बसलो असताना माणसांची वर्दळ मला जणू दूर कोठे तरी असल्याचे भासू लागले. त्या झोपडीमध्ये एक मंद प्रकाशाचा दिवा तेवत होता. ते दृश्य मला गूढ वाटले. राम गोपाळांनी काही जुनी फाटकी पांघरुणे जमिनीवर टाकून मला झोपण्याकरिता अंथरूण तयार केले; आणि ते स्वतः एका गवताच्या चटईवर बसले. त्यांच्या आध्यात्मिक चुंबकाकर्षणामुळे मी भारावून गेलो. भीत भीत मी विनंती केली:

"महाराज, मला तुम्ही समाधी का लावून देत नाही?"

"लाडक्या, मला ती दिव्य अवस्था तुला प्रदान करण्यात फार आनंद होईल; पण तो अधिकार माझा नाही." त्या महात्म्याने माझ्याकडे अर्धवट उघड्या डोळ्यांनी पाहिले. "तुझा गुरू तुला तो अनुभव करून देईल लवकरच. तुझे शरीर अजून त्या अवस्थेला पात्र झालेले नाही. ज्याप्रमाणे एखादा लहानसा विजेच्या दिव्याचा बल्ब जास्त व्होल्टेजचा विजेचा प्रवाह सोडल्यावर फुटून जाईल, त्याप्रमाणे तुझे ज्ञानतंतू त्या विश्वप्रवाहाच्या वहनाला अजून क्षम झालेले नाहीत. मी जर तुला आताच ती अमर्याद उत्कटावस्था प्रदान केली तर तुझ्या शरीरातील प्रत्येक पेशी जणू भाजून गेल्याने तू जळून जाशील.

"तुला माझ्याकडून आत्मप्रकाशाचा अनुभव पाहिजे आहे." योगीराजांनी आपले बोलणे गूढगुंजनासारखे चालू ठेवले. "आश्चर्य वाटते मला! माझी पात्रता ती काय, आणि ध्यान ते किती अल्प?—जर परमेश्वराला प्रसन्न करण्यात मी काही यश मिळविलेले असेल—तर त्याच्या दृष्टीने अंतिम निर्णयाच्या वेळी (प्रलयाच्या दिवशी) मला काय किंमत असेल?"

"महाराज, आपण अगदी दीर्घकालापासून एकनिष्ठपणे परमेश्वराचा शोध घेत आला आहात नाही काय?"

"मी काही फारसा शोध केला नाही. बिहारीने तुला माझ्या पूर्वायुष्याबद्दल काही सांगितले असेल. वीस वर्षे मी एका गुहेत दररोज अठरा तास ध्यानात बसून गुप्तपणे काढली. त्यानंतर

तेथून निघून त्याहूनही दुर्गम अशा गुहेत पंचवीस वर्षे काढली. मला झोपेची जरूर नसे. अहोरात्र मी ईश्वराच्या स्वरूपात मग्न झालेला होतो. माझ्या शरीरास इंद्रियातीत अवस्थेच्या पूर्ण शांततेमुळे जितकी पूर्ण विश्रांती मिळाली, तितकी विश्रांती सामान्य अर्धजागृत अवस्थेपासून मिळणाऱ्या अपूर्ण शांततेमुळे मिळू शकली नसती.

"स्नायूंना झोपेत विश्रांती मिळते; परंतु हृदय, फुफ्फुसे आणि रुधिराभिसरणाची क्रिया सारखी चालूच असते. त्यांना विश्रांती अशी असतच नाही. इंद्रियातीत किंवा अतिजागृत अवस्थेमध्ये शरीरातील सर्व अवयव विश्वचिच्छक्तीच्या (Cosmic energy) प्रवाहाने उत्तेजित होऊन, त्यांच्यामधील चैतन्य किंचित काळ स्थगित होते. अशा साधनांनी मला झोपेची कित्येक वर्षे जरुरीच वाटेनाशी झाली आहे," ते पुढे म्हणाले, "एवढेच काय, पण अशी वेळ येईल की, तुला सुद्धा झोपेची जरुरी राहणार नाही."

"अरे बापरे! आपण इतके ध्यान केले, पण परमेश्वर प्रसन्न कशाने होईल हे जर अजून आपल्याला सांगता येत नाही, तर मग आमच्यासारख्या मर्त्य माणसांची काय कथा!" मी आश्चर्याने उद्‌गार काढले.

"हे पाहा, माझ्या मुला, परमेश्वर म्हणजे प्रत्यक्ष शाश्वत चिरंतनताच. पंचेचाळीस वर्षे ध्यान केल्याने त्याच्या स्वरूपाचे पूर्ण ज्ञान होईल असे समजणे जरा मूर्खपणाची अपेक्षा होय. परंतु बाबाजींनी आम्हाला असे आश्वासन दिलेले आहे की, थोडे जरी ध्यान केले तरी मृत्युच्या महद्भयापासून व मरणानंतरच्या अवस्थांतून मानव मुक्त होतो. लहानशा पर्वतावर तुझे आध्यात्मिक उद्दिष्ट केंद्रित करू नकोस, तर ते निर्गुण अशा परब्रह्माच्या प्राप्तीच्या ताऱ्याशी निगडित करून टाक. जर कष्ट करशील तर तू त्या ध्येयाप्रत पोहोचशील."

पुढील अपेक्षांबाबत धीर आल्यामुळे त्यांनी आणखी काही बोध करावा म्हणून मी विनंती केली. लाहिरी महाशयांचे गुरू बाबाजी [2] यांच्याशी त्यांची जी पहिली भेट झाली, त्या भेटीची विस्मयकारी हकीकत त्यांनी सांगितली. मध्यरात्रीच्या सुमारास राम गोपाळांनी मौन धारण केले; आणि मी आपल्या अंथरुणावर पहुडलो. डोळे मिटल्यावर मला विजेचे चमत्कार दिसू लागले; माझ्यामधील विशाल अवकाश वितळलेल्या प्रकाशाने भरून गेले. मी डोळे उघडले आणि त्या तेजस्वी प्रकाशाने माझे डोळे दिपून गेले. माझी खोली अमर्याद अशा भुयाराचा जणू एक भाग बनून गेली. ते भुयार मी अंतर्दृष्टीने पाहत होतो.

योगीराजांनी विचारले, "तू झोप का घेत नाहीस?"

"महाराज, मी डोळे उघडे ठेवले काय किंवा मिटले काय, त्यांच्यापुढे विद्युत्प्रकाशाचे झोतच्या झोत दिसत असताना मला कशी बरे झोप लागेल?"

"हा अनुभव तुला मिळत आहे. भाग्यवान आहेस तू. ह्या आध्यात्मिक तेज-लहरी पाहता येणे ही सुलभ गोष्ट नाही," योगीराजांनी त्यावर काही ममतेचे शब्द उच्चारले.

पहाटेच्या सुमारास राम गोपाळांनी मला थोडी खडीसाखर खावयास दिली व निरोप दिला. त्यांना सोडून जाण्यास मी फार नाखूष होतो. माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या.

“तुला रिक्त हस्ताने मी जाऊ देणार नाही,” योगीराज ममतेने म्हणाले, “तुझ्याकरिता मी काहीतरी करीन.”

त्यांनी स्मित केले व ते माझ्याकडे स्थिर नजरेने पाहू लागले. माझी हालचाल थांबली; जमिनीला मी जणू जखडल्यासारखा झालो. योगीराजांपासून प्रसृत झालेली शांतिस्पंदने मला भारावून टाकू लागली; माझ्या पाठीत एक वेदना कित्येक वर्षे मधून मधून मला त्रास देत असे. ती वेदना एकदम नाहीशी झाली.

माझे पुनरुज्जीवन झाले. प्रकाशमान आनंदाच्या समुद्रामध्ये मी पोहू लागलो. माझे रडणे थांबले. राम गोपाळांना नमस्कार करून मी परत जंगलात गेलो. उष्णप्रदेशातील आडव्या-तिडव्या झुडुपातून मार्ग काढीत व अनेक भातखाचरे तुडवीत मी शेवटी तारकेश्वराला जाऊन पोचलो.

तेथे गेल्यावर त्या प्रसिद्ध देवळामध्ये मी फिरून यात्रेकरू म्हणून गेलो व देव्हाऱ्यापुढे लोटांगण घातले. त्या गोलाकार शिळेच्या दर्शनाने माझी अंतर्दृष्टी विशाल झाली आणि तिचे शेवटी विश्वरूप गोलात परिवर्तन झाले. वर्तुळात वर्तुळ, पट्टयात पट्टा अशा त्या गोलाला दिव्यत्वाची देणगी मिळालेली होती.

तासाभराने मी प्रसन्न अंतःकरणाने कलकत्त्याच्या गाडीत बसलो. अशा तऱ्हेने माझा प्रवास उंच हिमालय पर्वतराजींमध्ये न होता त्याऐवजी ह्या योगीराजांच्या हिमालयसदृश सान्निध्यात पुरा झाला.

---

1 “जो मनुष्य कोणापुढे वाकत नाही तो स्वतःचा सुद्धा भार कधीहि वाहू शकणार नाही.”—डोस्टोयेस्की, ‘द पजेस्ड.’

2 प्रकरण ३३ मधील शेवटली काही पृष्ठे पाहावीत.

प्रकरण - १४

# 14. समाधीची अनुभूती

“गुरूजी, परत आलो मी.” माझा खजील झालेला चेहराच माझे मनोगत अधिक बोलत होता.

“जरा स्वयंपाकघरात चल पाहू! काही मिळतंय का तोंडात टाकायला बघू!” आमच्या वियोगास जणू काही कित्येक दिवस लोटले नसून थोड्याफार तासांचाच वियोग होता. श्रीयुक्तेश्वरांची नेहमीचीच ही वागण्याची नि बोलण्याची पद्धत.

“गुरुजी, इथली सारी कामे टाकून मी अचानक निघून गेलो. आपली निराशा झाली असेल. रागावला नाहीत ना माझ्यावर?”

“छे, मुळीच नाही. इच्छाभंग झाला म्हणजेच माणसाला राग येतो. मी दुसऱ्यापासून कसलीच अपेक्षा करीत नाही तेव्हा त्यांची वागणूक माझ्या मनासारखी असली काय किंवा नसली काय, मला सारखेच. माझी स्वतःची कामे मला तुझ्याकडून करवून घ्यायची नव्हती. तुझे सुख ते माझे सुख.”

“गुरुजी, दिव्य प्रेमाच्या गोष्टी आपण ऐकतो; पण त्या ओझरत्या. आपल्यासारख्या देवमाणसाच्या संपर्कात दिव्य प्रेम काय असते हे स्पष्ट कळून चुकले आहे. ह्या जगात बापाच्या धंद्यातून पोरगा काही सूचना वगैरे न देता बाहेर पडला तर बाप सुद्धा त्याला एकदम क्षमा करीत नाही. आणि मी कितीतरी कामे अर्धवट टाकून गेलो. तुमची बरीच गैरसोय झाली, तरी पण त्रासल्याचे काहीएक चिन्ह आपल्या मुद्रेवर नाही.”

आम्ही गुरुशिष्यांनी एकमेकांच्या नजरेला नजर लावली. दोघांच्याही डोळ्यांत अश्रू चमकू लागले. एका सुखसंवेदनेने मी भारावून गेलो. परमेश्वरच जणू गुरुरूपाने माझ्या ह्रदयातील उत्साह नि भक्तिभाव विश्वप्रेमाच्या अफाट दिगंतरी पसरवीत होता.

काही दिवसांनंतर मी एकदा गुरुजींच्या खोलीत गेलो. खोलीत त्या वेळी कोणी नव्हते. तेथे ध्यानाला बसावे असा विचार माझ्या मनात आला. परंतु हा माझा स्तुत्य उद्देश माझ्या स्वैर विचारांना मंजूर नव्हता. शिकाऱ्याच्या गोळीच्या आवाजाने जशी पाखरे सैरावैरा उडून जातात, त्याप्रमाणे माझ्या मनातील विचारांनी थैमान घातले होते.

“मुकुंदा!” दूरच्या एका सज्जातून श्रीयुक्तेश्वरांनी मारलेली हाक मला ऐकू आली.

माझ्या विचारांसारखेच मला बंड करावेसे वाटले. “गुरुजी आम्हांला नेहमी ध्यानाला बसवतात,” माझ्या मनाशीच मी पुटपुटलो, “त्यांच्या खोलीत मी कशाकरता आलोय हे त्यांना माहीत आहे. तेव्हा त्यांनी मला आता व्यत्यय आणू नये.”

पुनः त्यांची जोरदार हाक मला ऐकू आली. मी मुद्दामच गप्प राहिलो. तिसऱ्यांदा त्यांनी पुनः हाक मारली. त्या आवाजाची धार जरा रागावल्याची होती.

“गुरुजी, मी ध्यान करीत आहे,” मी विरोधी स्वरात जोराने उद्‌गारलो.

"तुझे ध्यान कसे चालले आहे हे मला माहीत आहे." गुरुजी बोलले, "वावटळीत ज्याप्रमाणे पाने इतस्ततः फडफडतात, त्याप्रमाणेच तुझे विचार स्वैरपणे संचार करीत आहेत. इकडे ये पाहू." माझा हिरमोड झाला. माझी अवस्था त्यांना कळून चुकली. मी उदास झालो. निमूटपणे त्यांच्यापुढे जाऊन उभा राहिलो.

"पोरा, तुला जे काय पाहिजे आहे ते पर्वत देऊ शकणार नाहीत." गुरुजींनी लडिवाळपणे माझी समजूत घातली. त्यांची नजर शांत व स्थिर होती. तिचा ठाव घेता येणे शक्य नव्हते. "तुझी इच्छा पूर्ण होईल."

श्रीयुक्तेश्वर क्वचितच कोड्यात बोलत. मी गोंधळून गेलो. हृदयाच्या जरा वरच्या बाजूला त्यांनी अलगदपणे धक्का दिला.

माझे शरीर जमिनीला जख्खपणे जडून राहिले. एखाद्या मोठ्या लोहचुंबकाने आकर्षित करून जणू माझ्या फुफ्फुसांतला श्वास काढून घेतला. जीव आणि मन ही क्षणार्धात शरीराच्या बाहेर पडली; आणि प्रत्येक रंध्रारंध्रातून द्रवरूपी प्रकाश बाष्प होऊन जोराने बाहेर पडू लागला. शरीर जणू निर्जीव झाले. परंतु माझ्या आताच्या तीव्र जागृतावस्थेत मला कळून चुकले की, मी आतापर्यंत कधीही इतका जिवंत नव्हतो. शरिराशी निगडित झालेली माझी जाणीव आता शरीरावयवापुरतीच राहिली नसून सभोवतालच्या अणुरेणूंना सुद्धा व्यापून राहिली. दूर रस्त्र्यावरचे लोक जणू माझ्या शरीराच्या परिघावर अलगदपणे चालत जात आहेत, असे मला वाटले. झाडे व वनस्पती यांची मुळे अंधुक पारदर्शक होऊन गेलेल्या जमिनीतून स्पष्ट दिसू लागली. त्यांच्या अंतरंगामध्ये वाहत असलेला जीवरस मला दिसू लागला.

आसमंतातील सारा भाग तसा मला दिसू लागला. माझ्या दृष्टीची फेक साधारणतः समोरची. पण आता मला गोलाकार विशाल दृष्टी आली. आणि सगळे सर्व बाजूंचे दिसू लागले. दूर अंतरावर रायघाट गल्लीतून फेरफटका करीत असलेली माणसे व एक पांढरी गाय संथपणे जवळ येत असलेली माझ्या डोळ्यांच्या मागच्या बाजूने मला दिसली. जेव्हा ती गाय आश्रमाच्या उघड्या असलेल्या फाटकाजवळ आली, तेव्हा मात्र मी तिला माझ्या खऱ्याखुऱ्या डोळ्यांनी पाहिली. अंगणाच्या कडेला विटांच्या भिंतीपलीकडे जेव्हा ती गाय गेली, तेव्हा सुद्धा मी तिला स्पष्ट पाहिले.

आसमंतातील व्यापक दृष्टिपथातील सर्व वस्तू हलू लागल्या व चलच्चित्राप्रमाणे स्पंदन पावू लागल्या. माझे शरीर, गुरुजींच्या आश्रमातील आंगण, त्यातील खांब, खुर्च्या, बाके वगैरे, जमीन, फरशी, झाडे, सूर्यप्रकाश हे सगळे मधुन मधुन इतक्या जोरजोराने हलू लागले की, या सर्व वस्तू एका अतितेजस्वी सागरात अगदी साखरेच्या खड्यासारख्या, खडीसाखरेचे खडे पाण्याच्या भांड्यात टाकल्यावर जोरजोराने हलवून जसे विरघळून जातात, त्याप्रमाणे विरघळून गेल्या. एकरूप करणारा तो प्रकाश सर्व वस्तूंना विविध आकारांची, रंगांची स्थूल रूपे देऊ लागला. वस्तूमात्रांच्या निर्मितीमध्ये कारण व परिणाम यांच्या प्रभावाने त्यांचे अवस्थांतर कसकसे होत जाते, हे अगदी स्पष्ट दिसून आले.

माझ्या अंतरंगाच्या अमर्याद शांत किनारपट्टीवर जणू आनंदाचा सागर लोटला. मला समजून आले की, ईश्वरस्वरूप चिदानंदरूपी आहे. परमेश्वराचा देह म्हणजे जणू प्रकाशाचे

असंख्यात तंतू, माझ्या अंतरंगातून उफाळून येणाऱ्या ऊर्मी सभोवतालच्या सृष्ट वस्तू, गावे, शहरे, भूखंडे, पृथ्वी, सूर्यमालेतील ग्रह, तारकापुंज; विरलसे धूम्रतारकांचे समूह, तरंगती विश्वे; सर्व काही व्यापू लागल्या. अखिल विश्व माझ्या विराट रूपामध्ये रात्री दूर दिसणाऱ्या सौम्य प्रकाशाने चमकणाऱ्या शहराप्रमाणे दिसू लागले. काटेकोर असलेल्या भूमंडळाच्या किनारीपलीकडील डोळ्यांस दिपवून टाकणारा प्रकाश, त्यापलीकडे पसरत गेलेल्या अंतरिक्षात हळूहळू कमी कमी होत जाऊन तेथून पुढे एक सौम्य प्रकाशवलय असलेले मला दिसून आले. त्या प्रकाशवलयाचे तेज सतत सारखेच राहत असून, ते वलय इतके सूक्ष्म होते की, त्याचे वर्णन करता येणे शक्य नाही. ग्रहमालिकांचा देखावा हा त्या प्रकाशातूनच पण किंचितशा धूसर अशा प्रकाशातून निर्माण झाला होता. [1]

हे दिव्य प्रकाशकिरण एका शाश्वत व निरंतर उगमस्थानापासून सर्व दिशांमध्ये सहस्र धारांनी बाहेर पडत जाऊन त्यांचे पर्यवसान शेवटी अवर्णनीय अशा ज्योतिर्मंडलामध्ये होत होते. पुनः पुनः सृजनात्मक असे प्रकाशझोत तारकापुंजांचा आकार घेऊन त्यांतून पुढे पारदर्शक अग्निशिखा निर्माण होत. तसेच, ह्याच पद्धतीने पण उलट तशाच नियम व तालबद्ध क्रमाने असंख्य अगणित सृष्ट गोल स्वच्छ, निर्मल ज्योतींमध्ये रूपांतर पावत व हे असे अग्निमंडळ विशाल असे अंतरिक्ष निर्माण करी.

ह्या सर्व ब्रह्मांडाचा केंद्रबिंदू हा माझ्या हृदयातील अंतर्ज्ञान-दृष्टीचा बिंदू आहे, हे मी ओळखले. माझ्या अंतर्यामातून जे तेजवैभव बाहेर पडे, तेच ह्या सर्व ब्रह्मांडाच्या कानाकोपऱ्यापर्यंत जात आहे. आनंदमय अमृत माझ्यामधून पाऱ्यासारखे द्रवधर्माने वाहत आहे. परमेश्वराचा सृजनात्मक निर्मितिमूल ध्वनी ॐ ह्या दुमदुमणाऱ्या ध्वनीतून बाहेर पडत आहे. [2] ॐ म्हणजे विश्वरूपी यंत्राचे स्पंदन, कंपन.

आणि एकदम श्वास-उच्छ्वास माझ्या फुफ्फुसांमध्ये परत सुरू झाले. माझी फार निराशा झाली. निराशा अशी की ती सहन करणे केवळ दुरापास्त. माझे अमर्त्यत्व नष्ट झाल्याचे मला कळून आले. फिरून मी घृणास्पद अशा शरीराच्या पिंजऱ्यामध्ये कोंडून गेलो. आत्म्याला त्यात सहजरीत्या उतरताही येत नाही. एखाद्या उनाड मुलाप्रमाणे मी ह्या विराट ब्रह्मांडरूपी माझ्या खऱ्याखुऱ्या घरातून बाहेर पडून एका मर्त्य देहरूपी खुराड्यात स्वतःला बंदी केले.

माझे गुरुजी माझ्यासमोर अगदी निश्चल असे उभे होते. मी ज्या विश्वरूप दर्शनाच्या अनुभवाची अतीव उत्कंठेने वाट पाहत होतो तो अनुभव माझ्या गुरूंनी मला आणून दिला. म्हणून कृतज्ञता दाखविण्यासाठी मी त्यांच्या पवित्र चरणांवर लोटांगणे घालण्याकरिता पुढे वाकलो आणि त्यांनी मला अलगद वरच्यावर झेलले व ते मला संथपणे म्हणाले.

“ह्या परमानंदामुळे तू बेहोष होऊन जाऊ नकोस. तुला ह्या जगात अजून पुष्कळ काम करावयाचे आहे. चल, आपण इथला बाल्कनीतला केर काढू आणि मग गंगेवर फिरावयास जाऊ.”

मी एक केरसुणी आणली. गुरुजी मला सर्व कामे सारखी समजून करण्याचे शिकवीत होते, हे मी समजलो. ज्या वेळी शरीर नित्य दैनंदिन कार्यक्रम करीत असते, त्या वेळी आत्म्याने

ह्या विश्वरचनेच्या गूढ रहस्याचा शोध घेणे जरूर आहे.

आणि श्रीयुक्तेश्वर व मी काही वेळाने बाहेर फिरावयास निघालो. त्या वेळी सुद्धा मी त्या दिव्य दर्शनाच्या अत्यानंदात पोहतच होतो. नदीच्या काठावरून रस्त्र्याने आम्ही दोघे जात होतो. आमच्या दोघांची शरीरे म्हणजे मला दोन सूक्ष्म लिंगदेह दिसले. आणि नदी सुद्धा निव्वळ प्रकाशातूनच निर्माण झाली असल्याचे दिसून आले.

"ह्या ब्रह्मांडातील प्रत्येक आकृती व शक्ती हे परमात्मतत्त्व व्यापून आहे. पण परमेश्वर स्वतःला असा त्यामध्ये गोवून घेत नाही. तो वेगळ्या स्तरात वावरतो. तो स्तर स्पंदनात्मक ब्रह्मांडापलीकडे असून पूर्ण आनंदमय असून केवळ शून्यरूप आहे." [3] गुरुजी पुढे म्हणाले, "ज्यांना आत्मसाक्षात्कार झालेला आहे असे महात्मे सुद्धा पृथ्वीवर दोन प्रकारच्या वास्तव्यात वावरतात. एका प्रकारे ते भूलोकावर आपले नियत कर्म चोख बजावीत असतात व दुसऱ्या प्रकारे त्याचबरोबर स्वानंदानुभव भोगीत असतात.

"परमेश्वराने खुद्द आपल्या स्वतःमधून एका असीम आनंदाने उत्स्फूर्त होऊन हे सर्व मानवजात निर्माण केले. संकुचित शरीराच्या पिंजऱ्यात जरी ते कोंडले गेले असले तरी तो त्याने आपल्या प्रतिमेबरहूकूम केलेला असल्यामुळे शेवटी मानव ह्या इंद्रियांच्या एकजीवतेतून, जोखडातून बाहेर पडून परत आपल्या स्वतःच्या स्वरूपात विलीन व्हावा अशी त्याची अपेक्षा आहे."

ह्या विश्वरूप दर्शनाने मला पुष्कळ गोष्टी शिकविल्या. दररोज माझ्या विचारांना शांत किंवा स्थिर करून मी एक हाडा-मांसाचा बनविलेला देही आहे ही जी मोहमयी भावना आहे, त्या फसव्या भावनेपासून मुक्तता मिळवू शकलो, जड वस्तूंच्या कठीण भूमीवरून चालू शकलो. श्वासोच्छ्वास व अस्थिर मन ही मला वादळासारखी वाटतात. ही वादळे प्रकाशरूपी महासागराला झोडपून काढतात व त्यांतूनच जड वस्तुरूपांच्या लाटा उत्पन्न होतात; मग ती लाट म्हणजे पृथ्वी असो, आकाश असो, मानव, पशू, पक्षी किंवा झाडे असोत. ही वादळे शांत झाल्याशिवाय परमतत्त्व हे जे एकमेव प्रकाशरूप आहे त्याचा बोध होऊ शकत नाही.

ज्या ज्या वेळी ह्या दोन नैसर्गिक उद्रेकांना मी शांत करू शकलो तेव्हा तेव्हा मला असे आढळून आले की, ज्याप्रमाणे वादळ शांत झाल्यावर समुद्रात उठलेल्या लाटा शांत होतात व पाण्याची पातळी गंभीरपणे सपाट एकरूप होऊन जाते, त्याप्रमाणे ह्या सृष्ट वस्तूंच्या उठलेल्या तिन्ही कक्षांत पसरलेल्या लहरी (ध्वनिलहरीसारख्या) एका तेजोमय सागरामध्ये जणू वितळून जातात.

जेव्हा शिष्य ध्यानाने आपले मन इतके बलवान करून दाखवितो की हे विशाल विराट दर्शन त्यास घाबरवून टाकीत नाही. तेव्हा गुरू त्यास ह्या समाधीचा—विश्वरूप दर्शनाच्या दिव्य अनुभूतीचा साक्षात्कार घडवून आणतो, त्यासाठी नुसती बौद्धिक पात्रता किंवा मनाची ऋजुता पुरेशी पडत नाही. योगाभ्यासाने आणि शुद्ध भक्तीने साधकाची मानसिक संवेदनक्षमता चांगली व्यापक होते व तशी ती व्यापक झाली म्हणजे तो सर्वव्यापकतेच्या विराट अनुभूतीचा प्रचंड धक्का सहन करू शकतो.

निष्ठावान साधकाला ही दिव्य अनुभूती अगदी ओघानेच येते. त्याची तीव्र तळमळ परमेश्वराला अगदी जोराने ओढून आणते. विराटस्वरूपी परमेश्वर साधकाच्या मानसिक संवेदनाच्या कक्षेत एका चुंबकीय प्रेरणेने आकृष्ट केला जातो.

समाधी साध्य झाली म्हणजे जे विश्वरूप दर्शन होते, त्याच्या महिमेचे किंचित दर्शन करविण्याच्या हेतूने मी पुढे काही वर्षांनी ‘समाधी’ या शीर्षकाखाली एक कविता केली ती अशी:

प्रकाश आणि छाया या दोन्हींची आवरणे दृष्टीआड झाली.
दुःखाचे धूम्रवलय उचलले गेले.
क्षणिक सुखाची पुनः पुनः येणारी प्रभात दूर निघून गेली.
इंद्रियांना खरे वाटणारे ते मृगजळ नाहीसे झाले.
प्रेम, द्वेष, स्वास्थ्य, रोगराई, जीवन, मृत्यू;
द्वैताच्या पडद्यावरच्या ह्या फसव्या छाया नाहीशा झाल्या.
मायेने उठविलेले वादळ शांत झाले.
अंतर्ज्ञानाच्या जादूच्या कांडीमुळे वर्तमान, भूत, भविष्य हा
भेद माझ्यापुरता नाहीसा झाला,
मीच निरंतर जागृत, सर्वरस मीच, सर्वत्र मीच.
ग्रहगोल, तारका, नक्षत्रे, उल्काची राख, ही पृथ्वी,
प्रलयकाळातील ज्वलत्पर्वतांतून उफाळलेले आगीचे प्रचंड लोट.
सृष्ट पदार्थांना आकारवैचित्रय देणारी विधात्याची ती प्रचंड भट्टी.
सौम्य किरणांचे हिमपर्वत; जळजळत्या अणूपरमाणूंच्या
प्रवाहाचे ओघ.
मनुष्यमात्राचे सर्व मनोव्यापार; भूत, वर्तमान आणि भविष्य
ह्या कल्पना,
गवताची एकेक काडी, मी स्वतः, सारी मानवजात,
विश्वाच्या या अजस्र धूलीमधील एकेक रज,
राग, लोभ, शुभ, अशुभ, मोक्ष, काम,
सर्वभक्षक मी; केले म्यां परिवर्तित सर्व
माझ्या एकमेव जितेपणीच्या रुधिराच्या महाडोहात.
धुसमुसणारा आनंद, ध्यानाच्या अहंकाराने वारंवार फुशारलेला
माझ्या साधू नयनांना अंध करणारा,
परमानंदाच्या अमर ज्योतिशिखांमध्ये भडकलेला,
त्याने माझे अश्रू, कुडी, माझे सर्व काही स्वाहा केले.
तू मी आहेस; मी तू आहे,
ज्ञान, ज्ञाता, ज्ञेय सगळे एकच.
शान्त, स्तब्ध, अखंडित कंपन; नित्य नव शांति चिरंतन.
अपेक्षेच्या कल्पनेपलीकडील उपभोग्य, समाधीचा दिव्य आनंद!

मूर्च्छा नव्हे,
की मानसिक गुंगी नव्हे पुनरपि शुद्ध न आणणारी,
समाधी; ज्या अवस्थेत मी पूर्ण शुद्धीवर, मी पूर्ण जागृत असा आहे.
ह्या मर्त्य कुडीच्या कंगोऱ्यापलीकडे
अनंतत्व जेथपर्यंत पोचेल तेथपर्यंत,
जिथे मी विराट उदधीसम,
क्षुद्र अहंकार मी, प्रवाहात माझिया पाहतो तरंगणाऱ्या मला,
गतिमान होत असलेल्या अणूची घरघर कानी ऐकू येत आहे,
हा श्याम धूसर भूगोल, हे पर्वत, ही गिरिकंदरे, ही दरीखोरी,
पाहा ते ज्वलद्रसाचे स्रोत!
खळखळणारे सागर बनती धूम्रतारका वाष्प,
अन, त्या वाफांतुन निघे नाद ॐ; प्रकट दावितो पडदे त्यांतिल.
पडति कोरडे सागर मोठे, दीप्तिमंत अणुरेणू,
विराट पडघम, त्यातिल अंतिम नाद निघे तो वरी, [4]
स्थूल किरण त्यावरी पावती, रूप चिरकालिक
सर्वकष परमानंदाचे.
आनंदातुन आलो मी हा, जगतो त्यास्तव, विलीन होउनि
जातो तैसा पवित्र हर्षामध्ये.
मन्मन माझे सागर जैसे, सृष्ट लहरिंना पिउनि टाकते.
घन, द्रव, वाष्प, द्युति, पट हे चारी,
पाहि उचलुनी.
विराट देही प्रवेशितो मी, भूतमात्रही मी.
नष्ट जाहली चंचल प्रतिमा, कायमची ती मर्त्य स्मृतींची;
मन नभ माझे पूर्ण निरंजन, खाली, पुढती, वरती वरती,
अनंतता अन् मी, हो दोघे, किरण युक्त एक.
हास्याचा मी बुदबुद इवला.
स्वयेचि झालो मोदसागर.

ही अनुभूती, इच्छा होईल तेव्हा कशी घ्यावी व ज्यांची अंतर्ज्ञान शक्ती पक्व झाली आहे अशा साधकांना कशी प्रदान करावी, हे श्रीयुक्तेश्वरांनी मला शिकविले. [5]

ह्या पहिल्या प्रसंगानंतर, कितीएक महिने मी त्या ब्रह्मानंदात पोहत राहिलो आणि मग मला उपनिषदात परमेश्वराला ‘रस,’ ‘सर्वांत चविष्ट’ असे का म्हणतात हे समजले. तथापि एके दिवशी सकाळीच मी गुरुजीपुढे प्रश्न मांडला:

“गुरुजी, मला सांगा, देवाचे दर्शन मला केव्हा होईल?”

“तो तर तुला दिसलेलाच आहे.”

“गुरुजी, मला नाही वाटत तसे.”

गुरुजींनी स्मित केले. “माझी खात्री आहे की, तुझी काही अशी समजूत नाही की, परमेश्वर म्हणजे कोणी मोठा पूजनीय महापुरुष आहे आणि तो ब्रह्मांडाच्या कोठे तरी निरापद, कोणतीही बाधा जिथे होणार नाही, अशा कोपऱ्यात, सिंहासनावर विराजमान आहे. चमत्कार करून दाखविण्याचे सामर्थ्य आपल्या ठिकाणी आले म्हणजे परमेश्वराचे दर्शन झाले असा तुझा समज झाला असेल. पण तसे नाही. हे पाहा. एखाद्याच्या ताब्यात सारे विश्व जरी आले तरी त्यातून परमेश्वर चुटकीसारखा निसटून जाईल. अध्यात्ममार्गावरील प्रगती ही बाहेरून दिसून येणाऱ्या शक्तीच्या देखाव्याने मोजावयाची नसते, तर ध्यानामध्ये जो अत्यानंद मिळतो तो कोठवर अंतर्यामी गेला आहे त्यावरून मोजावयाची असते.

“ईश्वर म्हणजे सच्चिदानंद. त्या आनंदाचा कधीही अंत व्हावयाचा नाही. पुढे जसजसे तू ध्यान चालू ठेवशील तसतसा ईश्वर तुला मोठ्या चलाखीने फसवीत जाईल. परमेश्वर-दर्शनाचा मार्ग ज्यांना सापडला आहे असे तुझ्यासारखे जे भक्त आहेत ते त्याच्या बदली दुसरी कोणतीही गोष्ट स्वीकारण्याचे स्वप्नात सुद्धा आणीत नाहीत. तो चित्तचोर असून त्याच्या लाभाची दुसऱ्या कशानेही तुलना करता येणारी नाही.

“ऐहिक सुखांचा आपल्याला किती लवकर कंटाळा येतो? सुखोपभोगांच्या वासनांना अंत नाही. मनुष्याचे कधीही समाधानच होत नाही. एका सुखापाठीमागून दुसऱ्या सुखाकडे तो सारखा धावत राहतो. तो जे वेगळे काही शोधीत बसतो ते म्हणजे परमेश्वर. तोच फक्त चिरंतन सुखाचा लाभ देतो.

“बाह्य सुखांच्या हव्यासाने आपण आपल्या अंतर्यामातील स्वर्गसुखापासून वंचित होतो. ह्या वासना जी सुखे देतात ती नकली असतात. आत्मसुख दिल्याचे फक्त भासवतात. हरपलेल्या स्वर्गाचा पुनश्च लाभ दिव्य ध्यानामुळे ताबडतोब होतो. ईश्वरस्वरूप अजमाविता येण्यासारखे नाही. ते नित्य नूतन आहे. ईश्वरलाभाचा आपल्याला कधीही कंटाळा येत नाही. अनंतकालपर्यंत त्याच्या प्राप्तीचे जे विविध प्रकारचे सुख आपल्याला मिळते त्याचा कधी आपल्याला वीट येईल काय?”


“गुरुजी, साधुसंत परमेश्वर हा अगम्य आहे असे का म्हणतात, हे मला आता कळले. हे आयुष्य असेच जरी कायमचे टिकले तरी त्याची किंमत, योग्यता अजमावता येणार नाही.”

“खरे आहे ते; पण तो समीपही आहे आणि प्रियही आहे. क्रिया योगाच्या अभ्यासाने इंद्रियसुखांचे अडथळे नाहीसे होऊन मन निर्दोष होऊन जाते. आणि मग ध्यानातून परमेश्वराच्या अस्तित्वाचे प्रमाण दोन प्रकारांनी मिळते, नित्य नूतन असा जो हा आनंद तोच मुळी त्याच्या अस्तित्वाचा आपली पुरेपूर खात्री करून देणारा पुरावा आहे. तसेच ध्यानामध्ये आपल्याला त्याचे मार्गदर्शन ताबडतोब होत असते; आपल्या कोणत्याही अडचणीच्या वेळी तो लगेच समोर उभा राहतो.”

“खरेच, गुरुजी, तुम्ही माझ्या शंकेचे निरसन केले.” मी त्यांना कृतज्ञतेने स्मितपूर्वक म्हणालो. “ईश्वरप्राप्तीचा लाभ मला घडून आलेला आहे. हे मला आता समजून चुकले, कारण जेव्हा जेव्हा कामाच्या गर्दीत, अर्धवट जागृतीच्या अवस्थेत ध्यानाचा आनंद मला परत परत मिळतो, तेव्हा तेव्हा परमेश्वर प्रत्येक गोष्टीत अगदी गौण तपशिलांसह बरोबर मार्ग दाखवीत असतो ह्याचा मला प्रत्यक्ष अनुभव आलेला आहे.”

गुरुजी म्हणाले, “जोपर्यंत आपण परमेश्वरी इच्छेस साथ दिली नाही, तोपर्यंत मानवी जीवन हे दुःखानेच घेरलेले राहते. ह्या परमेश्वरी इच्छेने जे योग्य मार्गदर्शन होते ते अहंकारयुक्त बुद्धिवाद्यांना गोंधळून टाकते.”

“जो परमेश्वर बिनचूक मार्ग दाखवितो; रास्त सल्ला देतो, अजून कोण पण तोच अखिल ब्रह्मांडाचा भार वाहतो?”



*स्वामी श्रीयुक्तेश्वर पद्मासनामध्ये*

1 सृजनाचे मूळ प्रकाशात आहे. हे प्रकरण ३० मध्ये समजावून दिले आहे.

2 “सुरुवातीला शब्द झाला आणि तो शब्द ईश्वराने उच्चारला, आणि तो शब्द म्हणजे खुद्द ईश्वर.” —जॉन १:१ (बायबल).

3 “पण हा परमपिता कोण्या माणसाचा स्वतः निवाडा करीत नाही. त्याने ही सर्व निवाड्याची कामे आपल्या पुत्रावर सोपविलेली आहेत.” —जॉन ५-२२. (बायबल) “कोण्या माणसाने कधीही ईश्वराला पाहिलेले नाही. फक्त त्याने उत्पन्न केलेल्या पुत्राने पाहिलेले आहे. तो आपल्या पित्याच्या अगदी हृदयात असतो. त्यानेच त्याला प्रकट केले आहे.” —जॉन १-१८. (बायबल) “परमेश्वराने ... ह्या सगळ्या वस्तू येशू ख्रिस्ताकरवी निर्माण केल्या”—एफेसिअन्स ३-९. (बायबल) “ज्याचा माझ्यावर विश्वास आहे तो, मी जी कामे करू शकतो, ती करू शकतो; एवढेच काय, माझ्याहूनही जास्त मोठी कामे करू शकती; कारण मला माझ्या पित्याकडे जायचे असते.” —जॉन १४-१२. (बायबल) “पवित्र आत्मा जो दिलासा देतो त्यास परमेश्वराने माझ्या नावे पाठविलेले आहे. तो तुम्हांला सर्व गोष्टी शिकवील. मी जे जे म्हणून तुम्हांला सांगितलेले आहे त्या सर्व गोष्टींची तुम्हांला तो आठवण करून देईल.” —जॉन १४-२६ (बायबल).

बायबलमधील हे शब्द परमेश्वराचे त्रिविध स्वरूप दर्शवितात. पिता, पुत्र व पवित्र आत्मा. (हिंदू धर्मशास्त्रातील सत्, तत् व ओम ही अखिल ब्रह्मांडाची मूलभूत तत्त्वे) पितारूप परमेश्वर हा परिपूर्ण, अव्यक्त, स्पंदणशील सृष्ट पदार्थांच्या पलीकडचा. पुत्ररूप परमेश्वर म्हणजे ख्रिस्त संवेदना (ब्रह्म किंवा कूटस्थ चैतन्य) जे स्पंदनशील सृष्ट पदार्थामध्ये विद्यमान असते; हे ख्रिस्त संवेदन फक्त एकच असे अपत्य; सृष्टिपूर्व अनंतत्वाचे एकमेव प्रतिबिंब; ह्या सर्वव्यापी ख्रिस्त संवेदनाचे बाह्य व्यक्त स्वरूप; त्याचे साक्षी म्हणजे, (रेव्हेलेशन ३-१४) ॐ शब्द; पवित्र आत्मा = अदृश्य दिव्य शक्ती हीच फक्त कारक, एकमेव प्रयोजक व प्रेरक, अशी प्रेरणा. ह्याच प्रेरणेने सर्व सृष्ट पदार्थ कंपायमान होतात. दिलासा देणारा आनंदमय शब्द जो ॐ तो ध्यानात ऐकू येती आणि तो साधकाला, भक्ताला परमसत्याचा बोध करून देतो; “त्याला सर्व गोष्टींची स्मृती करून देतो.”

4 ॐ म्हणजे बायबलमधील शब्द; सर्व वस्तूंना आकार, रूप देणारे सृजनात्मक स्पंदन.

5 विश्वरूपदर्शन मी अनेक पूर्वेकडील व पश्चिमेकडील, क्रियायोगींना घडवून आणलेले आहे. त्यांपैकी एक श्री जेम्स जे. लिन यांचे समाधी अवस्थेतील एक चित्र या पुस्तकात दिले आहे.

## प्रकरण - १५

# 15. फुलकोबीची चोरी

"गुरूजी, ही पाहा तुम्हांला भेट आणली आहे, सहा मोठ्या फुलकोब्या. ह्या मी स्वतः हाताने लावल्या होत्या. आई जशी आपल्या अर्भकाचे पालनपोषण करते, त्याला वाढवते, त्याचप्रमाणे मी ह्यांची निगा घेतली आहे." एखाद्या समारंभाच्या प्रसंगाला साजेशा अशा उत्साहाने मी ही भाजीने भरलेली करंडी नजर केली.

"आभार आहेत." श्रीयुक्तेश्वरांना बरे वाटले. त्यांनी प्रसन्न होऊन स्मित केले. "तुझ्याच खोलीत ठेवून दे ती करंडी. उद्या आपल्याकडे मेजवानी आहे तेव्हा ते आपल्याला उपयोगी पडतील."

मी नुकताच पुरीला आलो होतो. कॉलेजला उन्हाळ्याची सुट्टी झाली होती. तेव्हा आश्रमात गुरुजींच्या सहवासात सुट्टी घालवावी असा विचार मी केला. हा शोभिवंत लहानसा दोन मजल्यांचा आश्रम गुरुजींनी व त्यांच्या शिष्यांनी बंगालच्या उपसागरावरील खुल्या उत्साहपूर्ण वातावरणात बांधला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी लवकरच उठलो. समुद्रावरून किंचित क्षारयुक्त अशा वायुलहरी येत होत्या. त्यामुळे व आश्रमातील प्रशान्त सुंदर वातावरणाने मी ताजातवाना झालो होतो. गुरुजी मला मधुर आवाजात हाक मारीत होते. मी त्या माझ्या फुलकोबीच्या करंडीवर नजर टाकली व ती खाटेखाली व्यवस्थितपणे सारून ठेविली.

"चल, आपण समुद्रतीरावर जाऊ." गुरुजी पुढे झाले. त्यांच्या पाठोपाठ मी व इतर तरुण शिष्य असे आम्ही पांगून चाललो. गुरुजींनी आमच्याकडे पाहिले; थोडे बोलावेसे त्यांना वाटले.

"हे पाहा, जेव्हा आपले पाश्चिमात्य बंधू चालत जातात तेव्हा एकत्र चालतात. त्याचा त्यांना अभिमान वाटतो. तर मग तुम्ही सुद्धा दोन रांगा करून व्यवस्थितपणे एकमेकांच्या पावलांच्या सुसंबद्ध तालावर चाला पाहू." आम्ही त्याप्रमाणे चालू लागलो. गुरुजींनी पाहिले. ते गाणे गुणगुणू लागले. "मुले जाति येती; पहा सान पंक्ति." आपल्या तरुण शिष्यांच्या त्या द्रुत गतीच्या पावलावर पाऊल टाकून गुरुजी सुद्धा अगदी सहजगतीने चालू लागले. मला त्यांचे कौतुक केल्याविना राहवेना.

"थांबा!" गुरुजींच्या डोळ्यांशी माझे डोळे भिडले.

"आश्रमाचे पाठीमागचे द्वार लावून घेतल्याचे आठवतेय ना?"

"मला वाटते घेतलेय, गुरुजी."

श्रीयुक्तेश्वर थोडा वेळ स्तब्ध राहिले. त्यांच्या ओठांवर अर्धोन्मीलित हास्य विलसत होते. शेवटी ते म्हणाले, "नाही, तू विसरला आहेस. ऐहिक बाबतींतल्या निष्काळजीपणाकरिता दिव्य स्वरूपाच्या चिंतनाची सबब सांगू नये. आश्रमात बंदोबस्त ठेवण्याचे तुझे कर्तव्य तू बरोबर पाळले नाहीस. तुला शिक्षा केली पाहिजे."

"तुझ्या सहा फुलकोब्या लवकरच फक्त पाचच राहून जातील," असे जेव्हा त्यांनी सांगितले तेव्हा ते थोडी गंमत करीत असावेत असे मला वाटले.

गुरुजींच्या आज्ञेप्रमाणे आम्ही मागे वळलो आणि आश्रमाच्या जवळ परत येऊन पोचलो.

"थोडी विश्रांती घे, मुकुंदा तुझ्या डाव्या बाजूला कंपाऊंडच्या पलीकडे रस्त्र्यावर पाहा. एक मनुष्य तेथे आता येईल. तो तुला शिक्षा देण्यास कारणीभूत होईल."

ह्या उद्‌गारांचा अर्थ मला कळला नाही. मनाला जरा अवघड वाटले; पण ती भावना मनातल्या मनातच ठेविली. लवकरच रस्त्र्यावर एक शेतकरी येऊन पोचला. तो काही तरी वेडावाकडा नाचत होता. काही निरर्थक हातवारे करून तो आपले हात चोहीकडे फिरवीत होता. जिज्ञासेने मी अगदी मतिमूढ झालो आणि ह्या हर्षोद्रेकाचे दृश्य अनिमिष नेत्रांनी पाहू लागलो. रस्त्र्यावर चालत चालत तो अमुक एका ठिकाणी आला व तेथून आमच्या दृष्टीआड झाला. श्रीयुक्तेश्वर म्हणाले, "पाहा, आता तो परत फिरेल."

त्या शेतकऱ्याने आपली चालण्याची दिशा फिरविली आणि आश्रमाच्या पाठीमागल्या बाजूने तो चालू लागला. एक रेताड रस्ता ओलांडून त्याने इमारतीत मागच्या दाराने प्रवेश केला. त्या दाराला कडी घालायचे मी विसरलो होतो, जसे गुरुजी म्हणाले होते. तो मनुष्य थोड्या वेळाने बाहेर आला. त्याच्या हातात माझी ती किंमती फुलकोबी होती. आणि तो पुढे संभावितपणे चालू लागला. जणू त्याला आपल्याजवळ काही मौल्यवान चीज आहे याचा अभिमान वाटत होता.

ह्या साऱ्या हळूहळू प्रकट होत जाणाऱ्या घटनेमध्ये माझी भूमिका फक्त एका बावरलेल्या अपराध्यासारखी होती. तरी पण त्यामुळे माझे मन इतके गोंधळून जाण्यासारखे नव्हते की, त्या चोराचा रागाने पाठलाग करण्याचे मी विसरून जावे. रस्त्र्यावर मी अर्धाअधिक गेलो तो गुरुजींनी मला हाक मारली. ते आपादमस्तक गदगदा हसत होते.

"त्या गरीब वेडसर माणसाला ती फुलकोबी पाहिजे आहे." हे सांगताना त्यांची हसून हसून पुरेवाट झाली. "मला वाटले की तू आणलेल्यापैकी एक गड्डा त्याला मिळावा. नाहीतरी तू त्या कोब्या बंदोबस्ताने ठेवल्या नव्हत्याच!"

मी ताबडतोब खोलीकडे धावत गेलो; आणि जाऊन पाहिले तो काय, चोराला फक्त कोबीच पाहिजे होती असे दिसून आले. माझ्या सोन्याच्या अंगठ्या, घड्याळ आणि पैसे तसेच पांघरुणावर उघडे पडले होते; पण त्यांपैकी कशालाही त्याने हात लावला नव्हता. त्याऐवजी त्याने खाटेखाली धुंडाळले. तेथे कोणालाही अजिबात दिसू नये, अशी फुलकोबीची करंडी ठेवलेली होती. आपल्या एकमेव इच्छेची वस्तू अशी जी करंडी ती त्याला तेथे सापडली.

संध्याकाळी मी श्रीयुक्तेश्वरांना या अद्भुत घटनेचा अर्थ विचारला. (माझ्या दृष्टीने ही घटना अगम्य होती.)

गुरुजींनी हळूहळू डोके हालविले. "तुला एक दिवस याचा अर्थ समजेल. ह्या सुप्त अशा पुष्कळशा नैसर्गिक नियमांचा लवकरच भौतिक शास्त्रे शोध लावतील."

पुढे काही वर्षांनी ज्या वेळी रेडिओच्या आश्चर्यकारक शोधाने जगाला थक्क करून सोडले, त्या वेळी गुरुजींच्या ह्या भविष्यकथनाची मला आठवण झाली. काल व स्थल (अवकाश) यांबाबतच्या पूर्वापारच्या कल्पना अगदी जमीनदोस्त झाल्या. असे कोणतेही घर

आता इतके आकुंचित राहिले नाही की, जेथे लंडन किंवा कलकत्ता (तेथील रेडिओच्या लहरी) प्रवेश करू शकणार नाहीत. मनुष्याच्या सर्वव्यापकतेच्या एका स्वरूपाची निःशंक सिद्धता अगदी मतिमंद अशा माणसालाही पटली.

फुलकोबीच्या चोरीची 'पूर्वयोजना' रेडिओशी [1] तुलना केल्याने उत्तम ध्यानात येण्यासारखी आहे. माझे गुरुदेव हे पूर्ण मानवी रेडिओ. विचार म्हणजे ईथरमधून वाहणाऱ्या अतिसौम्य स्पंदनलहरीपेक्षा विशेष जास्त काही नाही. ज्याप्रमाणे एखादा बरोबर पॉइंटला लावलेला रेडिओ प्रत्येक दिशेने चालू राहत असणाऱ्या हजारो कार्यक्रमांतून एक विशिष्ट संख्याक गायनाचा कार्यक्रम निवडून काढतो, तद्वत श्रीयुक्तेश्वर मानवी इच्छाशक्तीमधून बाहेर पडणाऱ्या असंख्य विचारांतून एक विशिष्ट विचार ग्रहण करू शकत असत. (जसा फुलकोबी चोरून नेणाऱ्या वेडसर माणसाच्या विचारांसारखा). समुद्रकिनाऱ्याने जात असताना त्यांनी त्या शेतकऱ्याच्या मनातील उत्कट इच्छा जाणली व त्याबरोबर ती इच्छा पुरी करावी असे त्यांनी योजिले. श्रीयुक्तेश्वरांच्या दिव्य चक्षूने तो नाचणारा मनुष्य इतर शिष्यांनी पाहण्याच्या अगोदर पाहिला. माझ्या विसरभोळेपणामुळे आश्रमाच्या मागील दाराला कुलूप लावायचे मी विसरलो. त्यामुळे गुरुजींना एक सबब मिळाली. त्याचा त्यांनी फायदा घेऊन मला भाजीचा किमती गड्डा गमवायला लावला.

अशा तऱ्हेने संदेशसंग्राहकाचे काम केल्यावर श्रीयुक्तेश्वरांनी आपल्या स्वतःच्या प्रभावी इच्छाशक्तीच्या जोरावर संदेशप्रेरकाचे [2] सुद्धा काम केले. आणि त्या भूमिकेमध्ये त्यांनी यशस्वीपणे त्या शेतकऱ्याला परत फिरावयाला व एका फुलकोबीसाठी एका विशिष्ट खोलीपर्यंत जावयाला लावले.

अंतःप्रेरणा हे आत्म्याचे मार्गदर्शन होय. आणि हे मार्गदर्शन मनुष्याचे मन जेव्हा शांत असते, त्या वेळी स्वाभाविकपणेच होत असते. जवळ जवळ प्रत्येक माणसाला अगम्य अशा पद्धतीने मिळणाऱ्या कल्पनेचा किंवा आपले विचार दुसऱ्यामध्ये यशस्वीरीत्या उतरविण्याचा अनुभव आलेला असतो.

मनुष्याचे मन, मनस्ताप नसल्यावर किंवा ते अस्थिरतेच्या गलबल्यापासून मुक्त असले म्हणजे त्याला अंतःस्फूर्ती प्राप्त होते. आणि त्या अंतःस्फूर्तीच्या जोरावर मनाला गुंतागुंतीची, रेडिओच्या यंत्रक्रियेची सर्व कार्ये—विचार प्रेषण करणे व ग्रहण करणे दोन्हीही आणि अनिष्ट असे विचार काढून टाकणे—करता येतात. ज्याप्रमाणे आकाशध्वनिक्षेपण केंद्राची शक्ती त्यात वापरल्या जाणाऱ्या विजेच्या प्रवाहाच्या एकूण राशीकडून नियमित केली जाते, तद्वत मानवी रेडिओची कार्यक्षमता ही प्रत्येक व्यक्ती ज्या प्रमाणात इच्छाशक्ती आपल्या ताब्यात ठेवते, त्या प्रमाणावर अवलंबून असते.

सर्व विचार विश्वामध्ये सतत आंदोलन पावत असतात. सिद्ध-महात्मे मनाच्या सखोल एकाग्रतेने दुसऱ्या कोणत्याही माणसाचे विचार जाणू शकतात, मग तो माणूस जिवंत असो की मेलेला असो. विचारांचे स्वरूप व्यक्तिगत नसून विश्वगत आहे. सत्य हे निर्माण करता येत नाही; पण त्याचा अनुभव घेता येतो. माणसाचा कोणताही चुकीचा विचार हा त्याच्या विवेक-बुद्धीतील लहान किंवा मोठ्या अपूर्णतेमुळे संभवतो. योगशास्त्राचे ध्येय हे मनास

शांतता मिळवून देण्याचे आहे; परिस्थितीमुळे त्रास कितीही होवो; त्याने आपल्या आतल्या आवाजाचा, न चुकता, संदेश घेत जावा असे आहे.

आकाशवाणी आणि दूरवीक्षण यांनी अतिदूर अंतरावर असलेल्या माणसाचे धनी व रूप कोट्यवधी लोकांच्या अगदी स्वयंपाकघरात आणून सोडलेले आहेत. माणूस हा सर्वव्यापी आत्मा आहे याचे हे अस्पष्टसे शास्त्रीय निवेदनच आहे. जरी त्याच्यामधील अहंता ही त्याला अत्यंत रानटी प्रकारांनी गुलामगिरीत जखडून टाकते, तरी त्याला आकाशामध्ये कोणत्या अशा विशिष्ट बिंदूला चिकटून राहण्याचे कारण पडत नाही. तो मूलतः सर्वव्यापी आत्मा आहे.

शरीरशास्त्रातील नोबेल प्राईझचे विजेते चार्लस् रॉबर्ट रिचेट [3] यांनी असे म्हटलेले आहे की, “आज आपणांस भौतिक शास्त्रांनी गेल्या शतकातील अनेक शोधांमुळे थक्क करून सोडलेले आहे. पण त्याहूनही अधिक चमत्कारिक, अधिक आश्चर्यकारक व सामान्यतः असंभाव्य असे वाटणारे शोध लागावयाचे आहेत. त्या शोधांपाठीमागील तत्त्वे एकदा दृढमूल झाली म्हणजे ते शोध आपणांस तसेच आश्चर्याने थक्क करून टाकतील. एखादी घटना, जी आज आपण आश्चर्य न दाखविता मान्य करतो, ती आपल्या ठिकाणी आश्चर्य निर्माण करीत नाही, कारण त्या घटनेचा अर्थ आपल्याला समजतो अशी साधारण कल्पना आहे; पण वस्तुस्थिती तशी नाही. अशा घटना जर आपल्या ठिकाणी आश्चर्य निर्माण करीत नसतील तर त्याचे कारण असे नव्हे की, त्या आपल्याला समजतात. त्याचे कारण असे की, त्या आपल्याला परिचित असतात. कारण जर जे आपणांस समजत नाही ते आपल्याला आश्चर्यचकित करून सोडीत असेल तर प्रत्येक गोष्टीने आपल्याला आश्चर्यचकित करून सोडावयास पाहिजे. हवेत मोकळ्या सोडलेल्या दगडाचे पतन; एका लहानशा बीजातून होणारी विशाल वृक्षाची वाढ; पारा तापविला असता होणारे त्याचे प्रसरण; चुंबकाकडून होणारे लोखंडाचे आकर्षण; फॉस्फरसचा तुकडा घासल्यावर त्याने पेट घेणे, वगैरे.

“आजची भौतिक शास्त्रे ही खरी जुजबी आहेत ... अशी कित्येक विस्मयकारी सत्ये आपल्या सभोवार पसरून राहिली आहेत; पण ती आपण पाहू शकत नाही. ती आपल्या डोळ्यांकडे जणू रोखून पाहत आहेत. त्यांचा पत्ता पुढील पिढ्यांना लागेल. ती आपण पाहू शकत नाही हे म्हणणे बरोबर नाही; ती पाहण्याची आमची इच्छा नाही; कारण कोणतीही एखादी गोष्ट आपल्यापुढे अनपेक्षितपणे अपरिचित अशी आली तर तिला आपण आतापर्यंत मिळवून ठेवलेल्या जुजबी ज्ञानाच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न करतो. आणि एखादा त्याच्यापुढे जाऊन प्रयोग करू लागला तर आपल्याला त्याचा राग येतो.”

फुलकोबीची अगदी असंभाव्य पद्धतीने चोरी झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी एक विनोदपूर्ण घटना घडून आली. एक घासलेटचा दिवा नाहीसा झाला. आमच्या गुरुजींच्या सर्वज्ञ दृष्टीबाबत नुकतेच आम्हांस प्रमाण मिळाले होते. तेव्हा त्यांनाच विचारावे असे मी ठरविले. माझ्या मते दिवा शोधून काढणे म्हणजे त्यांना पोरखेळ होता.

मला काय पाहिजे होते हे गुरुजींनी जाणले. त्यांनी वाजवीपेक्षा जास्त गांभीर्याने आश्रमातील सगळ्यांना खडसून विचारले. एका तरुण शिष्याने कबूल केले की, त्याने परसातील विहिरीकडे जाताना बरोबर दिवा नेला होता.

श्रीयुक्तेश्वरांनी त्याला गंभीरपणे सुचविले, “पाहा, मग विहिरीशेजारीच तो राहिला असेल.”

मी विहिरीकडे धावलो. पण काय, दिवा नाही, हिरमोड होऊन मी गुरुजींकडे परत आलो. माझ्या फजितीबद्दल काहीएक विषाद न बाळगता ते मोठ्याने हसूच लागले.

“दिवा कुठे हरवला आहे तिकडे तुला जायला सांगितले नाही; वाईट गोष्ट मी केली नाही का? पण मी काही ज्योतिषी नाही!” त्यांच्या डोळ्यांत एक चमक आली. ते पुढे म्हणाले, “साधा एक जुजबी पण हमखास हुडकून काढणारा शेरलॉक होम्ससुद्धा मी नाही!”

मला आता कळून चुकले की, गुरुजी आपले सिद्धिसामर्थ्य आव्हान केल्यावर किंवा किरकोळ बाबतीत मुळीच दाखविणार नाहीत.

नंतर काही आठवडे अगदी मजेत गेले. एक धार्मिक मिरवणूक काढण्याच्या विचारात श्रीयुक्तेश्वर होते. शिष्यांना गावातून पुढे पुरीच्या किनाऱ्यापर्यंत घेऊन जाण्यास त्यांनी मला सांगितले. तो उत्सवाचा दिवस (उत्तरायणाचा) उजाडला. हवेत उष्मा फार होता.

“गुरुजी, त्या निखाऱ्यासारख्या वाळूतून मी विद्यार्थ्यांना अनवाणी कसे नेऊ?” मी अगदी निराशेने म्हणालो.

गुरुजींनी उत्तर केले, “मी तुला एक गुपित सांगतो. परमेश्वर ढगांची छत्री उभारील; तुम्ही अगदी आरामात वाळूतून चालू शकाल.”

मी आनंदाने मिरवणूक नेण्याचे पत्करले. आम्ही शिष्यमंडळी सत्संग [4] निशाण घेऊन आश्रमातून बाहेर पडलो. हे निशाण, ध्वज श्रीयुक्तेश्वरांनी तयार केलेला होता. त्यावर एकमेव नेत्राचे [5] चिन्ह होते. एकमेव नेत्र म्हणजे अंतःस्फूर्तीची दुर्बीण.

आम्ही आश्रम सोडतो न सोडतो तोच आकाश ढगांनी भरून गेले. काय जादू पाहा! पावसाची एक लहानशी सर आली. सगळ्यांच्या तोंडून आश्चर्याचे उद्‌गार निघाले. शहरातील रस्त्रयांना व उन्हाने तळपणाऱ्या समुद्रकिनाऱ्याला गारवा आला.

आमची ही मिरवणूक दोन तास चालली. ती चालू असेपर्यंत पावसाचे सुखकारक थेंब पडत होते. अगदी ज्या क्षणास आम्ही आश्रमात परत येऊन पोचलो अगदी त्या क्षणास आकाशातले ढग निवळले व पाऊस पडावयाचा थांबला.

गुरुजींना मी कृतज्ञता दर्शविली; त्याला त्यांनी उत्तर केले, “पाहा, ईश्वराला आपल्याबद्दल किती काळजी वाटते! परमेश्वर सगळ्यांना पावतो व सगळ्यांना मदत करतो. मी विनंती केली म्हणून जसा त्याने पाऊस पाडला, त्याचप्रमाणे कोणत्याही भक्ताची कळकळीची इच्छा तो पूर्ण करतो. आपल्या प्रार्थनेला परमेश्वर किती साद देतो याचा लोक क्वचितच विचार करतात. तो काही थोड्या अशा लोकांच्या बाबतीत पक्षपात करतो असे नाही; पण जो त्यास विश्वासाने, श्रद्धेने शरण येतो त्याची प्रार्थना तो जरूर ऐकतो. त्याच्या अर्भकांनी आपल्या सर्वव्यापक पित्याच्या [6] प्रेमळ दयालुत्वामध्ये सदैव पुरेपूर, मनापासून विश्वास बाळगला पाहिजे.”



*पुरी येथे समुद्राकाठी असलेला स्वामी श्रीयुक्तेश्वरांचा आश्रम*

श्रीयुक्तेश्वर वर्षातून चार उत्सव साजरे करीत. तुला विषुव व मेष विषुव आणि दोन संक्रांतीचे. त्या वेळी त्यांचे विद्यार्थी दूरदूरहून येत. मकरसंक्रांत ते सेरामपूरला साजरी करीत. मी जेव्हा पहिल्या वेळी त्या उत्सवाला हजर राहिलो तेव्हा मला एक कायमचे वरदान मिळाले.

उत्सवाला सुरुवात सकाळी व्हायची. रस्त्रयावरून पायी मिरवणूक निघायची. शेकडो विद्यार्थ्यांची गोड धार्मिक भजने चालू असायची. काही थोडे बासरी वाजवीत तर काही ढोल व झांजा वाजवीत. उत्साही नगरजन रस्त्रयावर फुले उधळीत. परमेश्वराच्या नामसंकीर्तनाच्या ध्वनीमुळे रोजच्या कंटाळवाण्या कामांमध्ये त्यांना थोडा विरंगुळा मिळे. लांबलचक अशा ह्या मिरवणुकीचा शेवट आश्रमाच्या अंगणात होई. तेथे गुरुजी मध्यभागी बसत. आम्ही त्यांच्याभोवती कोंडाळे घालून बसत असू. वरच्या माडीवरून काही विद्यार्थी आमच्यावर पुष्पवर्षाव करीत.

पुष्कळसे आमंत्रित वरती माडीवर प्रसाद घ्यावयास जात. प्रसाद म्हणजे हरबऱ्याच्या डाळीची खिरापत व संत्रे. आज स्वयंपाकघरात जिकडे माझे गुरुबंधू स्वयंपाकाच्या कामात गुंतले होते तिकडे मी गेलो. एवढ्या मोठ्या समाजाचे जेवण म्हणून खाली मोकळ्या जागेतच चुली मांडून मोठ्या कढयांतूनच पदार्थ शिजविले जात. विटा मांडून तात्पुरत्या चुली तयार केल्या होत्या. त्यांतून धूर निघायचा व आमच्या डोळ्यांना पाणी यायचे. पण आम्ही आनंदाने हसतखेळत काम करीत होतो. भारतात धार्मिक उत्सव साजरे करावयाचा कधी कोणाला

कंटाळा येत नाही. प्रत्येक भक्त आपापले काम आनंदाने करतो; द्रव्यसाहाय्य देतो; किंवा धान्य, भाजीपाला पुरवितो; काही नाही तर शारीरिक कष्ट करतो.

गुरुजी लवकरच आमच्यांत सामील झाले. भोजनाच्या बारीकसारीक बाबतींत सुद्धा त्यांची देखरेख असावयाची. प्रत्येक क्षण ते कामात घालवीत. एखाद्या उत्साही तरुण विद्यार्थ्याच्या बरोबरीने ते काम करीत.

दुसऱ्या मजल्यावर संकीर्तन चालू होते. त्याला पेटी, तबला, मृदंग यांची साथ होती. श्रीयुक्तेश्वर कौतुकाने कीर्तनाकडे लक्ष देत होते. त्यांचे स्वरज्ञान अप्रतिम होते.

"त्यांचा सूर चुकला आहे!" गुरुजी स्वयंपाकघरातून बाहेर वाजविणाऱ्यांच्या जवळ आले. संगीत पुनः सुरू झाले. या वेळी सूर बरोबर लागला होता.

सामवेदामध्ये संगीत-शास्त्रावरील जगाच्या प्राचीनतम लिखाणांचा समावेश होतो भारतामध्ये संगीत ही चित्रकला व नाट्य ह्यांच्याबरोबर एक स्वर्गीय कला समजली जाते. ब्रह्मा, विष्णु व शिव अशी ही त्रिमूर्ती हे आद्य संगीतज्ञ होत. धर्मग्रंथांमध्ये शंकराचे नटराजाच्या भूमिकेत विश्वव्यापीनृत्यकाराच्या भूमिकेत असंख्य विविध राग निर्माण करणारा व आपल्या तांडवनृत्यामध्ये जगाची उत्पत्ती, पालन व संहार यांचे दर्शन घडवून आणणारा, असे वर्णन केलेले आहे. शंकराचे हे तांडवनृत्य चालू असता ब्रह्मदेव व विष्णु हे ताल धरू लागतात. ब्रह्मदेव हा झांजा वाजवीत असतो व विष्णु हा मृदंगाचे स्वर काढीत असतो.

बुद्धीची देवता जी सरस्वती ती सर्व तंतुवाद्यांच्या जननीच्या ठिकाणी असलेल्या वीणा या वाद्यावर तारा छेडीत असल्याचे दाखवितात. विष्णूचा अवतार जो कृष्ण तो हिंदू चित्रकलेमध्ये मुरली वाजवीत असल्याचे दाखवितात. त्या मुरलीवर तो इतके मनोहर गीत वाजवीत असतो की, मायेच्या इंद्रजालामध्ये भटकत असणाऱ्या मानवी जीवांना तो त्यांच्या आदिस्थानाप्रत खेचून आणतो.

भारतीय संगीताच्या पायाचे दगड म्हणजे त्यातील निश्चित स्वरवर्णांची रचना. मुख्य सहा राग; त्यांतून विकास पावलेल्या अशा १२६ रागिणी (स्त्रिया) व पुत्र. प्रत्येक रागात कमीत कमी पाच स्वर असतात. प्रमुख स्वर (वादी किंवा राजा), दुय्यम स्वर (समवादी किंवा प्रधानमंत्री), त्याला साहाय्यभूत स्वर म्हणजे (अनुवादी किंवा सेवक) आणि विरुद्ध स्वर म्हणजे (विवादी किंवा शत्रू).

ह्या सहा मूलभूत रागांपैकी प्रत्येक रागाच्या गायनाचा दिवसामधील एक निश्चित समय, ऋतू व एक विशिष्ट देवता असे काही नैसर्गिक नियमानुसार आखलेले असतात ते ह्याप्रमाणे: (१) हिंडोल राग—हा वसंत ऋतूत पहाटेच्या वेळी गातात. ह्या रागाच्या गायनाने विश्वप्रेमाची भावना जागृत होते. (२) दीपक राग—हा ग्रीष्म ऋतूत संध्याकाळच्या वेळी गातात. ह्या रागाच्या गायनाने कारुण्यभाव जागृत होतो. (३) मेघ राग—हा राग वर्षा ऋतूमध्ये मध्यान्हाच्या वेळी गातात. याच्या गायनाने धैर्य, शौर्य प्रवृत्ती जागृत होते. (४) भैरव राग—हा राग ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर या महिन्यांत प्रातःकाळी गातात. याच्या गायनाने शांततेचे वातावरण निर्माण होते. (५) श्री राग—हा राग शरद ऋतूमध्ये संध्यासमयी गातात. याच्या गायनाने प्रीतिभाव जागृत होतो. (६) मालकंस राग—हा राग हिवाळ्यात मध्यरात्रीच्या वेळी गातात. याच्या गायनाने पराक्रमाचा प्रसंग व्यक्त होतो.

प्राचीन ऋषींनी निसर्ग आणि मनुष्य यांमधील दृढ समभावनेवर आधारलेले हे स्वरनियम शोधून काढले आहेत. निसर्ग हे ॐ ह्या आदी स्वराचे, स्पंदनशीलतेचे व्यक्त व मूर्त स्वरूप आहे. या कारणाने मनुष्य अमुक मंत्रोच्चारांच्या [7] स्वरांचा उच्चार करून सृष्टीवर विजय मिळवू शकतो. अकबर बादशहाच्या दरबारात सोळाव्या शतकात मियाँ तानसेन नावाचा एक प्रसिद्ध संगीतशास्त्रज्ञ गायक होऊन गेला. त्याच्या ठिकाणी गायनकलेतील अत्युत्कृष्ट गुण होते, असे ऐतिहासिक बखरींवरून दिसून येते. एकदा बादशहाने त्याला रात्रीचा राग, दुपारी माध्यान्ही गावयास सांगितला. तानसेनाने असे एक मंत्रगान केले की, त्या गायनाने त्या राजप्रासादामध्ये ताबडतोब रात्रीचा अंधकार निर्माण करून टाकला.

भारतीय संगीतामध्ये ऑक्टेव्हचे (सप्तस्वरांचे) बावीस श्रुतींमध्ये किंवा दुय्यम स्वरांमध्ये विभाग केलेले आहेत. हे सूक्ष्म स्वरांतरिक नाद संगीताच्या इतक्या बारीक छटा व्यक्त करतात की, तशा पाश्चिमात्य संगीतात निर्माण करणे साधत नाही. ह्या ऑक्टेव्हमधील सात मूलभूत स्वरांपैकी प्रत्येक स्वर हा हिंदू पुराणात कोणत्या तरी रंगाशी किंवा पशुपक्ष्याच्या आवाजाशी निगडित आहे. ‘दो’ या स्वराचा संबंध हिरवा रंग व मोर; ‘रे’चा संबंध तांबडा रंग व चंडोल पक्षी; ‘मि’चा संबंध सोने आणि बोकड; ‘फा’चा संबंध फिक्का व बगळा; ‘सोल’चा संबंध काळा रंग व बुलबुल पक्षी; ‘ला’चा संबंध पिवळा रंग व घोडा; आणि ‘सि’चा संबंध सर्व रंग आणि हत्ती असा ठरविलेला आहे.

भारतीय संगीतात एकूण ७२ थाट (स्केल्स) मानले जातात. रागाभोवती किंवा निश्चित परंपरागत स्वराभोवती गाण्यास गायकास वाटेल तितका रागाचा तात्पुरता विस्तार करावयास भरपूर अवकाश मिळतो. तो आपले लक्ष एका भावनेवर किंवा घटनात्मक विषयाच्या एका विशिष्ट प्रवृत्ती वर केंद्रित करतो व तीस आपल्या वैयक्तिक मर्यादेमध्ये सजवितो. हिंदू गायक कोणत्या एका निश्चित स्वराचे पठण करीत नाहीत. प्रत्येक आलाप काढण्याच्या वेळी तो रागाच्या अस्थिपंजरास नावीन्याचा वेष चढवितो आणि स्वराचा एक मधुर क्रम ठेवून, त्याचा पुनः पुनः उच्चार करून त्या स्वराच्या सर्व सूक्ष्म आवाजांचे व तालांचे निरनिराळे प्रकार, त्यांत श्रुती आणि लय यांचा समावेश करून श्रोत्यांना गाऊन दाखवितो. पाश्चिमात्य संगीतनियोजकांमध्ये ‘बाक’ यास शेकडो गुंतागुंतीच्या पद्धतींनी पृथकपणे काढलेल्या आवाजांच्या पुनरुक्तीने आवाजास किती माधुर्य येते, ताकद येते याचे चांगले ज्ञान होते.

संस्कृत वाङ्मयात १२० तालांचे वर्णन केलेले आहे. हिंदू संगीताचा परंपरामान्य आद्यसंस्थापक भरत याने चंडोल पक्ष्याच्या गाण्यामध्ये बत्तीस तालांचे भेद दर्शविले आहेत. तालाचा किंवा सुरातील सुसंबद्धतेचा उगम हा मनुष्याच्या हालचालीमध्ये धरलेला आहे. उदाहरणार्थ, चालताना होणारा दुप्पट ताल व झोपेत होणाऱ्या श्वासोच्छ्वासाचा तिप्पट ताल ज्याच्यामध्ये श्वसनाचा अवधी उच्छ्वसनाच्या अवधीच्या दुप्पट असतो.

भारतामध्ये मानवी आवाजाला ध्वनीचे परिपूर्ण वाद्य म्हणून समजले जाते. म्हणून हिंदू संगीतामध्ये आवाजाच्या तीन पट्टया (ऑक्टेव्हस) मध्य, मंद्र व तार अशा ठरविलेल्या आहेत. आणि त्याच कारणाकरिता भारतीय संगीतामध्ये माधुर्य म्हणजे स्वरांचा क्रम याला

सुसंबद्धतेपेक्षा म्हणजे एकाच वेळी काढलेल्या स्वरांच्या परस्परसंबंधापेक्षा जास्त महत्व दिलेले आहे.

भारतीय संगीत ही आत्मनिष्ठ, आध्यात्मिक व वैयक्तिक कला आहे आणि त्या कलेचे ध्येय हे सामुदायिक उत्कटता साध्य करणे नसून परमात्म्याशी वैयक्तिक तल्लीनता प्राप्त करून घेणे हे आहे. भारतामधील सगळी सुप्रसिद्ध गाणी ही परमेश्वराच्या भक्तीची भजने आहेत. गायकाला संस्कृत शब्द 'भागवतार' हा आहे. भागवतार म्हणजे परमेश्वराचे भजन करणारा.

संकीर्तने ही योगाभ्यासाची प्रभावी साधने होत. या साधनेला तीव्र एकाग्रतेची व विचार व ध्वनी यांचे बीजामध्ये ग्रहण याची फार आवश्यकता असते. ज्याअर्थी मनुष्य हा स्वतःच सृजन शब्दाचा आविष्कार आहे त्याअर्थी ध्वनी त्याच्यावर फार प्रभावी व सत्वर परिणाम घडवून आणतो. पूर्व व पश्चिम दोन्हीकडील महान धार्मिक अशा संगीताच्या आलापाने मनुष्यास आनंद प्राप्त होतो. याचे कारण असे की, ते संगीत श्रवण करीत असताना त्याच्या मेरूदंडाच्या सहा चक्रांपैकी [8] एका चक्रास उद्दीपिता किंवा तात्पुरती जागृती आणली जाते. त्या दिव्य आनंदाचा अनुभव घेत असताना त्याला आपल्या दिव्य उत्पत्तीची अंधुकशी स्मृती येते.

श्रीयुक्तेश्वरांनी आश्रमातील आपल्या दुसऱ्या मजल्यावरील बैठकीच्या खोलीतून उत्सवप्रसंगी आपले संकीर्तन सुरू केले की त्याच्या श्रवणापासून खाली स्वयंपाकघरात तापलेल्या कट्टयापाशी काम करणाऱ्या आचाऱ्यांना सुद्धा स्फूर्ती मिळत असे. माझे शिष्यबंधू व मी असे आम्ही ताल धरून ध्रुवपद गात असू.

सूर्यास्ता पर्यंत आम्ही शेकडो अतिथिंना खिचडी, भाजीचा रस्सा आणि तांदळाच्या खिरापतीचे वाढप केले. आम्ही अंगणात बिछायत केली आणि लवकरच श्रीयुक्तेश्वरांचे ज्ञानोपदेश पूर्ण मनोयोगाने ऐकत शांतपणे जनमंडळ तारकाच्छादित आकाशाखाली बसले. आपल्या उपदेशामध्ये त्यांनी क्रिया योग, आत्म सन्मानाचे जीवन, शांति, दृढ संकल्प, साधे आहार आणि नियमित व्यायामाचे महत्व अधोरेखित केले.

काही तरुण शिष्यांच्या मेळाव्याने थोडी स्तोत्रे व भजने म्हटली. उत्सवाची सांगता संकीर्तनाने झाली. दहा वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंत आश्रमवासियांनी भांडी, तपेल्या, कढया साफ केल्या व प्रांगण झाडून स्वच्छ केले. नंतर गुरुजींनी मला जवळ बोलावून घेतले.

"तू आज आनंदाने जे श्रम घेतलेस आणि गेल्या आठवड्यात समारंभाच्या तयारीसाठी जी मेहनत घेतलीस त्याबद्दल मला फार संतोष झाला आहे. आज तू माझ्याजवळच राहा आणि माझ्या बिछान्यावरच रात्री झोप."

अशा तऱ्हेचा खास हक्क माझ्या वाट्याला येईल, अशी माझी कधीच कल्पना नव्हती. साधारण दहा-एक मिनिटांनी आम्हाला झोप लागली असेल. इतक्यात गुरुजी उठले. "गुरुजी, काय झाले?" गुरुजींच्या शेजारी झोपण्याचा जो मला आनंद झाला होता त्यावर ताबडतोब विरजण पडले.

"मला असे वाटते की, काही थोड्या विद्यार्थ्यांची पुढील गाडी चुकली आहे आणि ते आता येथे येऊन पोहोचतील. त्यांच्याकरिता आता आपण काही जेवण्याचे तयार करू."

"गुरुजी, मध्यरात्री एक वाजता कोणी येईल असे वाटत नाही."

"तू पडून राहा. तू फार काम केलेले आहेस. पण मी स्वयंपाक करायला जातो."

श्रीयुक्तेश्वरांनी असे निश्चयपूर्वक सांगितल्यावर मी एकदम उठलो व त्यांच्यापाठोपाठ दुसऱ्या मजल्यावरील गच्चीच्या शेजारील खोलीपर्यंत गेलो. त्या खोलीचा स्वयंपाकघरासारखा उपयोग होत असे.

भात व वरण थोड्या वेळातच शिजू लागले.

गुरुजींनी प्रेमभराने स्मित केले. "आज रात्री तू कष्टाला जुमानले नाहीस व कठीण कामाची तुला भीती वाटली नाही. आयुष्यात पुढे ह्या गोष्टीमुळे तुला कधीही त्रास होणार नाही."

असे हे आयुष्यभर पुरणारे आशीर्वादाचे शब्द त्यांनी उच्चारले न उच्चारले तोच अंगणामध्ये पावले वाजली. मी जिन्यावरून खाली धावलोच आणि काही विद्यार्थी आले होते त्यांना आत घेतले.

एक विद्यार्थी म्हणाला, "भाई, गुरुजींना अशा वेळेला तसदी द्यावयाला आमच्या अगदी जिवावर येते. गाडीची वेळापत्रके सांभाळण्यात आमच्या हातून चूक झाली; पण गुरुजींचे दर्शन घेतल्याखेरीज घरी परत जावयास आमचे मन घेईना."

"ते तुमची वाटच पाहात आहेत आणि आता तुमचा स्वयंपाक तेच करून ठेवीत आहेत."

श्रीयुक्तेश्वरांचा स्वागतपर आवाज मोठ्याने ऐकू आला. आश्चर्याने स्तंभित झालेल्या पाहुण्यांना घेऊन मी स्वयंपाकघरात गेलो. गुरुजींनी माझ्याकडे पाहून डोळे मिचकावले.

"आता तुझा पडताळा पाहून झाला ना? आता तुझी खात्री झाली ना की आपल्या पाहुणेमंडळींची खरोखरीच गाडी चुकली म्हणून?"

अर्ध्या तासाने गुरुजी आपल्या खोलीत झोपावयास गेले. मी पण त्यांच्यापाठोपाठ गेलो. ईश्वरसदृश गुरुंच्या शेजारी झोपावयाचे भाग्य मला आता मिळणार ह्या सुखसंवेदना माझ्या मनास होऊ लागल्या.

1 १९३९ मध्ये शोधून काढलेल्या सूक्ष्मदर्शक रेडिओ ने आतापर्यंत अज्ञात अशा किरणांचे एक नवीन जग उघडे करून दिले. असोशिएटेड प्रेसने निवेदन केले आहे की, "मनुष्य तसेच तथाकथित साऱ्या प्रकारच्या अचल वस्तू सतत किरण प्रसृत करीत असतात. ज्यांचा परचित्तज्ञान (telepathy), द्वितीय दृष्टी (second sight) व दूरदृष्टी (clairvoyance) ह्या गोष्टींवर विश्वास आहे, त्यांना ह्या निवेदनात एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे खरोखरी प्रवास करणाऱ्या अदृश्य किरणांच्या अस्तित्वाचे पहिल्याप्रथमच असे शास्त्रीय प्रमाण आढळून आले. रेडिओचे हे यंत्र म्हणजे प्रत्यक्ष रेडिओ-फ्रीक्वेन्सी-स्पेक्ट्रॉस्कोपच. तारे ज्या अणूंनी बनलेले आहेत, त्यांची निरनिराळी मूलतत्त्वे शोधून काढण्याच्या कामी स्पेक्ट्रॉस्कोपचा जो उपयोग होतो तोच उपयोग या यंत्राचा थंड व दीप्तिहीन पदार्थांच्या बाबतीत होतो ... शास्त्रज्ञांना कित्येक वर्षे मनुष्य आणि इतर सजीव प्राणी यांमधून उद्भूत, प्रसृत होणाऱ्या किरणांच्या अस्तित्वाबद्दल शंका वाटत असे. आज त्या किरणांच्या अस्तित्वाचे प्रयोगसिद्ध प्रमाण मिळाले आहे. हा शोध असे दर्शवितो की, निसर्गातील प्रत्येक अणू, परमाणू हे एक सतत चालू असणारे आकाशवाणी- ध्वनिक्षेपण केंद्र आहे. म्हणजे मृत्यु घडून आल्यानंतर सुद्धा जो देह पूर्वी एक मनुष्य म्हणून होता त्या देहामधून कोमल किरण बाहेर पडतच असतात. ह्या किरणांच्या तरंगांची दैर्ध्य आजच्या ध्वनिप्रसारणामध्ये जी वापरली जाते त्यातील दैर्ध्यापेक्षा अतिशय कमी असून ती हळूहळू जास्त जास्त वाढत जाऊन रेडिओलहरींची कमाल मर्यादा गाठते. ह्या

लहरींची, किरण-तरंगांची ही गुंतागुंत समजण्यास फार अवघड आहे. अशा ह्या कोट्यवधी लहरी आहेत. अगदी एकच असा मोठा अणू एकाच वेळी, १,०००,००० वेगवेगळ्या मर्यादेच्या आकाराच्या लहरी निर्माण करू शकतो. ह्या प्रकारच्या लांबीच्या लहरी रेडिओलहरींसारख्या सुगमतेने व गतीने प्रवास करीत असतात ... ह्या नवीन रेडिओ-किरणांमध्ये व प्रकाशकिरणांसारख्या नेहमीच्या परिचयाच्या किरणांमध्ये एक विलक्षण फरक असतो. तो हा की, अचल स्थूल पदार्थांमधून या रेडिओलहरी हजारो वर्षेपर्यंत अशाच लहरी, तरंग प्रसृत करीत असतात.

2 २८ प्रकरणामधील पहिली टीप पाहा.

3 "आपले सहावे इंद्रिय" या पुस्तकाचा लेखक (रायडर अँड कं., लंडन).

4 सत् म्हणजे शब्दशः "असणे." व्यापकार्थाने "तत्त्व, सत्य." संग म्हणजे समुदाय. श्रीयुक्तेश्वरांनी आपल्या आश्रम-संस्थेला 'सत्संग' हे नाव दिले होते. सत्संग म्हणजे "सत्याशी सोबत."

5 "आणि म्हणून जर तुला एकच डोळा असेल तर तुझे सारे शरीर तेजःपुंज होऊन जाईल." — मॅथ्यू ६:२२ (बायबल). तीव्र ध्यानामध्ये हा एकमेव किंवा आध्यात्मिक नेत्र कपाळाच्या मध्यभागी दृग्गोचर होतो. धर्मग्रंथांमध्ये ह्या सर्वज्ञ नेत्राचे अनेक तऱ्हांनी वर्णन केलेले आहे. तृतीय नेत्र, पूर्वेकडील तारा, अंतर्नेत्र, स्वर्गातून अवतरण झालेले कबुतर, शंकराचा डोळा व अंत:स्फूर्तिनेत्र अशी त्याची निरनिराळी नावे आढळून येतात.

6 "ज्याने कान दिला, त्याला ऐकू येणार नाही काय? ज्याने डोळा तयार करून दिला, त्याला पाहता येणार नाही काय? ... ज्याने माणसाला ज्ञान शिकविले, त्याला स्वतःला समजणार नाही काय?" — साम (Psalms) ९४:९-१० (बायबल).

7 सर्व ठिकाणच्या लोकांमध्ये लोकगीतांमध्ये निसर्गावर मंत्रोच्चार जो प्रभाव दाखवितो त्याची वर्णने आहेत. अमेरिकेतील पूर्वीचे रहिवासी जे रेड इंडियन्स ह्यांच्यामध्ये पाऊस व वारा यांना आवाहन करणारे मंत्र बरेच प्रभावशाली होते. त्या मंत्रांचे तंत्र बरेच विकास पावलेले होते. भारतातील विख्यात संगीतज्ञ आपल्या गाण्याने आग विझवीत असे. कॅलिफोर्नियामधील प्रसिद्ध निसर्गशास्त्रज्ञ, चार्लस केलॉग याने न्यूयॉर्क अग्निशामक कर्मचाऱ्यांपुढे १९२६ मध्ये आगीवर स्वर-कंपनांच्या परिणामाचे प्रात्यक्षिक करून दाखविले होते. ॲल्युमिनियमच्या एका नादकाट्यावरून त्याने व्हायोलिन वाजविण्याच्या बोपेक्षा एका मोठ्या काठीने घर्षण केले; आणि अशा तऱ्हेने रेडिओमधून जसा चीत्काराचा आवाज यावा तसा आवाज निर्माण केला. त्याबरोबर एका पोकळ काचेच्या नळीत ठेवून दिलेली दोन फूट उंचीची पिवळी ज्योत जी इकडे तिकडे नळीमध्ये खेळत होती, ती एकदम सहा इंच उंचीची लहान झाली व तिचा प्रकाश मंदमंद होत होत निळा बनला. पुनः एकदा त्या काठीने त्या 'बो'वर घर्षण केले, तसा त्या घर्षणातून दुसऱ्या एक तऱ्हेचा चीत्कार बाहेर उमटला व त्याने ती ज्योत विझवून टाकली.

8 मेरूदंडातील चक्रांची जागृती घडवून आणणे हे योग्याचे पवित्रतम ध्येय असते. पाश्चिमात्य धर्मवेत्त्यांना नव्या करारातील 'रेव्हेलेशन्स' या प्रकरणाचा खरा अर्थ कळला नाही. या प्रकरणात येशूने जॉन व आपल्या इतर निकटवर्ती शिष्यांस उपदेशिलेल्या योगविद्येचे लाक्षणिक विवेचन आहे. (रेव्हे १:२०). "सात तारकांचे गूढ" आणि "सात प्रार्थना-मंदिरे" ह्या सूचक शब्दांचा संबंध सात प्रकाशमान कमलांशी, योगग्रंथात वर्णन केलेल्या मेरुदंडातील 'सात द्वारांशी' आहे. परमेश्वराने रचलेल्या ह्या द्वारांतून योगी शास्त्रशुद्ध असा ध्यानसाधनेने ह्या देहाच्या गुलामगिरीतून बाहेर पडतो व परमात्म्याशी मीलित असलेल्या अशा आपल्या निजस्वरूपाचा अनुभव घेतो. (प्रकरण २६ पाहावे)

सातवे चक्र म्हणजे सहस्रदलकमल. सहस्रार हे अनंत चिच्छक्तीचे सिंहासन आहे. ह्या दिव्य दर्शनाचा लाभ झाल्यावर योग्यास ब्रह्मस्वरूप, ईश्वरस्वरूप पद्मजरूपाने दिसू लागते.

पद्मासनाला पद्मासन नाव देण्याचे कारण असे की, ह्या परंपरेने चालत आलेल्या आसनामध्ये आसन स्थिर केल्यावर योग्यास मेरुदंडामधील ह्या विविधरंगी पद्मांचे दर्शन घडून येते. प्रत्येक कमलातील पाकळ्यांची संख्या वेगवेगळी असते. ह्या पाकळ्या म्हणजे प्राणकिरणच होत. ह्या पद्मांना चक्रे असेही म्हणतात. पद्मासनात मेरुदंड एकदम सरळ ठेवला जातो व शरिरास अशा स्थिर अवस्थेत जखडले जाते की, जिच्यामध्ये सविकल्प समाधीत गेल्यावर पुढे किंवा मागे पडण्याची शक्यता नसते. ह्या कारणाने पद्मासन हे योग्यांचे सर्वात आवडते आसन होय. परंतु नवशिक्या लोकांना पद्मासनात बसण्यास काही कठीणता वाटण्याची शक्यता आहे व अशा लोकांनी फक्त योग्य हठयोग्याच्या मार्गदर्शनाखालीच त्याचा प्रयत्न करावा.

प्रकरण - १६

# 16. ग्रहांवरती मात

“मुकुंदा, तू फलज्योतिषविषयक कंकण हातात का बांधून घेत नाहीस?”

“गुरुजी, घ्यावे की काय तसे मी? माझा ज्योतिषशास्त्रावर विश्वास नाही.”

“हा काही विश्वासाचा प्रश्न नाही. प्रत्येकाने कोणत्याही विषयाची शास्त्रीय पद्धतीने चिकित्सा करावी की, तो विषय खरा आहे किंवा नाही. गुरुत्वाकर्षणाचा नियम न्यूटनच्या पूर्वी जितका अबाधित होता तितकाच त्याच्यानंतरही होता. जर ह्या नियमाचे पालन अबाधितपणे चालू राहिले नाही आणि त्याच्या चालनाला माणसाच्या विश्वासाची जर जरुरी लागू लागली, तर साऱ्या विश्वात गोंधळच गोंधळ उडून जाईल.

“दांभिक लोकांनी प्राचीन ज्योतिषशास्त्राची मोठी विटंबना करून सोडली आहे व त्या शास्त्राला आजच्या दुर्गतीस आणून सोडले आहे. ज्योतिषशास्त्र हे फार अफाट आहे. दोन्ही दृष्टींनी; गणितशास्त्राच्या [1] व तत्त्वज्ञानाच्या त्या शास्त्राचे आकलन अतिशय प्रगल्भ अशा पंडितांखेरीज इतरांस होत नाही. अडाण्यांनी जर आकाशतील ग्रहांचे मूर्खासारखे निरीक्षण केले व अर्थाचा अनर्थ केला, तर ते ह्या अपक्व जगाच्या दृष्टीने अपेक्षितच आहे. पण मनुष्याने ज्ञानी लोकांची वासलात लावण्याबरोबर ज्ञानाची वासलात लावू नये.

“सृष्ट पदार्थांचे गुणधर्म एकात एक गुंतवलेले आहेत; आणि त्यांचा एकमेकांवर प्रभाव पडत असतो. आदान आणि प्रदान; देव आणि घेव ह्यांसमध्येच ह्या विश्वाची समतोल सुसंबद्धता बद्धमूल केलेली आहे.” गुरुजींनी आपले बोलणे चालू ठेवले. “मनुष्यास मानवी दृष्टीने दोन शक्तींशी सामना द्यावा लागतो. एक म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ह्या पंचमहाभूतांच्या संमीलनाने त्याच्या शरीरात चालू असलेले संघर्ष आणि दुसरी म्हणजे बाह्य निसर्गाची विच्छेदक शक्ती. जोपर्यंत मनुष्याला आपल्या मर्त्यपणाशी सामना द्यावा लागतो तोपर्यंत आकाश व पृथ्वी ह्यामधील असंख्य विकारांचा त्याच्यावर प्रभाव पडत असतो.

“ज्योतिषशास्त्र म्हणजे ग्रहांच्या उत्तेजक प्रेरणांशी मनुष्य जी प्रक्रिया करतो त्याचे शास्त्र आहे. ग्रहांना कोणाबद्दलही बुद्धिपुरस्सर मित्रत्व किंवा शत्रुत्व नसते. ते फक्त धन किंवा ऋण प्रकाशकिरण सोडीत असतात. ते आपण होऊन माणसास मदत किंवा त्याचे नुकसान करीत नाहीत. प्रत्येक माणसाने भूतकाळामध्ये कार्यकारणाला अनुसरून जी गती सोडून दिलेली असते, ती गती बाह्यतः गतिमान होण्याच्या दृष्टीने काही प्रवाह मार्ग करून देत असतात.

“एखादे मूल त्याच दिवशी व वेळेला जन्मास येते, ज्या वेळी आकाशस्थ प्रकाशकिरण त्याच्या वैयक्तिक गतकर्मांशी गणितानुसार सुसंबद्ध असतात त्याची कुंडली म्हणजे आव्हान देणारे एक चित्रच होय. त्या कुंडलीमध्ये ज्यात काही फरक होऊ शकत नाहीत, असा

त्याचा भूतकाळ दर्शविला जातो; तसाच त्याचा संभाव्य भविष्यकाळही दर्शविला जातो. पण ही कुंडली फक्त अंतःस्फूर्तीची माणसेच बरोबर वर्तवू शकतात. अशी माणसे अर्थात फार थोडीच असतात.

"जन्माच्या वेळी अंतरिक्षाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जो संदेश उजळपणे प्रकाशित केला जातो त्याचा हेतू, त्याचे नशीब—त्याचे पूर्वार्जित पापपुण्य—निश्चित करण्याचा नसून त्याच्या इच्छाशक्तीस उद्दीपित करण्याचा असतो; की ज्या इच्छाशक्तीच्या जोरावर तो ह्या विश्वाच्या गुलामगिरीतून मुक्त होऊ शकतो. त्याने जे कर्म केले असेल ते त्याला नष्ट करता येते. ज्या कारणाचे परिणाम त्याला सध्याच्या आयुष्यात भोगावे लागतात, ती कारणे व तशी कार्ये त्याने स्वतःच करून ठेविलेली असतात; दुसऱ्या कोणी नव्हे. तो कोणतीहि मर्यादा उल्लंघू शकतो; कारण ती मर्यादा आपल्या स्वतःच्या कर्माने प्रथम त्यानेच घातलेली असते. आणि त्याच्या ठिकाणी अशी काही आध्यात्मिक साधनसामग्री असते की, जी ग्रहांच्या शुभाशुभ दृष्टीला जुमानीत नाही. माणसाला ज्योतिषशास्त्राची त्याच्या भोळसरपणामुळे भीती वाटते. आणि त्यामुळे तो एक निर्जीव यंत्रच बनतो व त्या यांत्रिक साहाय्यावर गुलामासारखा सर्वस्वी अवलंबून राहतो. परंतु जो मनुष्य शहाणा आहे तो ह्या ग्रहांना जुमानीत नाही; तो आपल्या पूर्वकर्मांनी खचून जात नाही; तो आपली निष्ठा सृष्टीवरून काढून सृष्टिकर्त्याच्या ठायी अर्पण करतो व त्यामुळे तो ग्रहांवर व आपल्या पूर्वकर्मांवर मात करू शकतो. परमात्मतत्त्वाशी सायुज्यतेचा जसजसा अनुभव येत असतो तसतसा त्या सृष्ट पदार्थांचा वरचष्मा कमीकमी होत जातो. आत्मा हा सदैव मुक्तच असतो; त्याला मरण नाही. कारण त्याला जन्मही नाही. ग्रह त्याला आपल्या अधिकाराच्या चौकटीत बसवू शकत नाहीत.

"मनुष्य हा आत्मा आहे आणि त्याला शरीर आहे. ज्या वेळी तो आपला स्वरूपभाव योग्य ठिकाणी ठेवतो, त्या वेळी तो सक्तीच्या कर्तव्यांना बाजूला सारतो. जोपर्यंत त्याला आपल्या स्वरुपाची विस्मृती झालेली असते व तो सामान्य व्यवहारामध्ये गुंतून राहतो, तोपर्यंत त्याला परिस्थितीच्या नियमांचे सूक्ष्म बंधन पाळावे लागते. परमेश्वर म्हणजे एक सुसंबद्धता आहे. ही एक कार्यकारण नीती आहे.

ज्या वेळी एखादा भक्त परमेश्वराशी एकरूप होतो, त्या वेळी त्याच्या सर्व कृती, प्रवृत्ती ज्योतिषशास्त्राच्या अगदी बरोबरच आणि वक्तशीर घडून येतात. निष्ठापूर्ण प्रार्थना आणि ध्यान केल्याने तो त्या दिव्य चिच्छक्तीशी संपर्क साधतो. ह्या आंतरिक रक्षणशक्तीच्यापेक्षा दुसरी कोणतीही शक्ती अधिक बलवान नसते."

"मग, गुरुजी, मी हातामध्ये फलज्योतिषविषयक कंकण घालावे असे आपल्याला का वाटते?" बराच वेळ गप्प बसून मी हा प्रश्न भीतभीतच विचारला. श्रीयुक्तेश्वरांचे हे सुबोध विवेचन मनात रुजविण्याचा मी प्रयत्न केला होता. ह्या विवेचनातील विचार मला नवीन होते.

"प्रवासी आपल्या मुक्कामावर पोहोचल्यानंतरच त्याने आपल्याजवळचे नकाशे टाकून देणे बरोबर ठरते. प्रवासात त्याने सोयीच्या, जवळच्या मार्गाचा अवलंब करणे जास्त फायदेशीर ठरते. ह्या मायावादाच्या सक्तमजुरीच्या शिक्षेची मुदत कमी करण्याचे प्राचीनकालच्या

ऋषींनी अनेक मार्ग शोधून काढलेले आहेत. कर्मविषयक नीतिनियमांमध्ये असे काही यांत्रिक धर्म आहेत की, त्याचा बुद्धिमान माणसास कुशलतेने सोडवणुकीच्या दृष्टीने उपयोग करता येतो.

"माणसावर जी काही आपत्ती येते, त्याचे कारण तो कोणत्या तरी विश्वव्यापी निसर्गनियमाचे उल्लंघन करतो, हे होय. धर्मग्रंथांचे असे नेहमी सांगणे आहे की, माणसाने निसर्गनियमांचे काटेतोलपणे पालन करावे, आणि त्याच वेळी परमेश्वराच्या सर्वशक्तिमत्त्वाची जाणीव सतत मनात ठेवावी. त्याने म्हणावे, "परमेश्वरा, तुझ्यावर माझा सारा भरंवसा आहे. मी हे जाणून आहे की, तू मला जरूर मदत करशील. पण मी सुद्धा जे काही दुष्कर्म माझ्या हातून घडले असेल त्याच्या बदली सत्कर्म करून दाखवीन." अनेक मार्गांनी — इच्छाशक्तीने, प्रार्थनेने, योगमार्गानुसार ध्यान करून, संतांशी विचारविनिमय करून, ज्योतिषविषयक कंकणे वापरुन पूर्वीच्या पापकर्माचे अनिष्ट परिणाम कमी करता येतात किंवा नाहीसे करता येतात.

"ज्याप्रमाणे छपरावर तांब्याच्या काठीचा विद्युत्निवारक बसवून वीज पडण्याचा धोका टाळता येतो, त्याप्रमाणे ह्या शरीरमंदिराचे काही विवक्षित मार्गांनी रक्षण करता येते.

"विद्युत् व चुंबकीय उत्सर्जन विश्वामध्ये अविरतपणे संचरत असतात. त्यांचा मनुष्याच्या शरीरावर बरावाईट परिणाम होत असतो. कित्येक युगांच्या पूर्वी आपल्या ऋषींनी ह्या प्रश्नाचा फार खोलवर विचार केला की, कोणत्या मार्गांनी ह्या सूक्ष्म विश्वव्यापी लहरींच्या अनिष्ट परिणामापासून शरीराचे रक्षण करता येईल? त्या ऋषींनी असे शोधून काढले की, शुद्ध धातू पारलौकिक प्रकाश सोडू शकतात व हा प्रकाश ग्रहांच्या अनिष्ट परिणामास जोरदारपणे प्रतिकार करतो. काही वनस्पतींची कलमे सुद्धा अशी सापडली की, त्यांचाही उपयोग या कामी होऊ शकला आणि सगळ्यात जास्त गुणकारी अशी दोन कॅरटच्यापेक्षा जास्त भारमानाची शुद्ध रत्ने सापडली.

"ज्योतिषशास्त्राच्या अशा ह्या व्यावहारिक प्रतिबंधक उपयोगाचा भारताबाहेर क्वचितच अन्यत्र इतका कळकळीने अभ्यास केला गेला असेल. ह्या बाबतीत विशेष माहीत नसलेली गोष्ट अशी आहे की, ही उपयोगात आणली जाणारी रत्ने, धातू आणि मिश्रधातू ही काही एक विवक्षित वजनाची घेतली नाहीत तर त्यांचा काही उपयोग होत नाही; तसेच अशा प्रकारची जी कंकणे वापरतात त्यांचा वापरणाऱ्या व्यक्तीच्या त्वचेशी स्पर्श होत राहणे आवश्यक असते.

"गुरुजी, जरूर मी आपल्या उपदेशाप्रमाणे हातात कंकण वापरीन. ग्रहांवर मात करण्याच्या विचाराने मला जरा गंमत वाटते आहे!"

"सर्वसाधारण उपयोगाकरिता मी सोने, रूपे आणि तांबे या तीन धातूंनी बनविलेल्या कंकणांची शिफारस करतो, पण काही एका विशिष्ट उपयोगाकरिता तू रुपे आणि शिसे यांचे बनविलेले कंकण वापरावेस असे मला वाटते." श्रीयुक्तेश्वरांनी अगदी काळजीपूर्वक अशा सूचना दिल्या.

"गुरुजी, कोणत्या विशिष्ट उपयोगाकरिता किंवा हेतूकरिता आपण म्हणता?"

“मुकुंदा, ह्या ग्रहांची तुझ्यावर जरा अनिष्ट दृष्टी पडणार आहे. घाबरू नकोस. तुझे रक्षण होईल. साधारण एक महिन्यात तुझे यकृत बिघडून तुला बराच त्रास होईल. हे दुखणे तुला सहा महिने त्रास देईल. पण फलज्योतिषविषयक कंकण जर तू वापरलेस, तर हा सहा महिन्यांचा काल कमी होईल. तो चोवीस दिवसांपर्यंत येईल.”

दुसऱ्याच दिवशी मी एका जवाहिऱ्याकडे गेलो व असे कंकण तयार करवून घेतले व वापरू लागलो. माझी तब्बेत तशी चांगली होती. गुरुजींनी वर्तविलेले भाकीत माझ्या स्मरणातून गेले. तेवढ्यात गुरुजी सेरामपूरहून वाराणशीला गेले. वर सांगितलेले आमचे बोलणे झाल्यानंतर तीस-एक दिवसांनी एकाएकी माझ्या पोटात यकृताजवळ दुखू लागले. त्यानंतर काही आठवडे मला ह्या पोटातील यातनांनी अगदी कासावीस करून सोडले. गुरुजींना काही तसदी देऊ नये म्हणून हे दुखणे मी एकट्याने सहन करावे व त्यांना काही सांगू नये असे मी ठरविले.

पण तेवीस दिवस या यातना सहन केल्यावर माझ्याने धीर निघेना. मी वाराणशीला जायला निघालो. तेथे श्रीयुक्तेश्वरांनी माझे स्वागत केले. या वेळी त्यांच्या स्वागतात नेहमीपेक्षा जास्त जिव्हाळा होता. पण खाजगीरीत्या माझ्या ह्या यातनांची कहाणी त्यांच्या कानांवर घालायला त्यांनी मला मुळी संधीच दिली नाही. कित्येक भक्त त्या दिवशी गुरुजींना भेटून गेले. ते फक्त त्यांच्या केवळ दर्शनाकरिताच [2] आले होते. मी एका कोपऱ्यास बसून होतो. यातनेने जर्जर झालो होतो; आणि माझ्याकडे कोणी लक्षही दिले नाही. सगळी पाहुणेमंडळी जायला संध्याकाळ झाली. पाहुणेमंडळी जेवून गेली, तेव्हा गुरुजींनी मला तेथल्या घरातल्या अष्टकोनाकृती गच्चीवर बोलावून घेतले.

“यकृताच्या दुखण्याच्या कारणाने तू येथे आला असशील?” श्रीयुक्तेश्वरांनी जरा तिरक्या नजरेने पाहिले. ते येरझारा घालीत होते. त्यामुळे चंद्रप्रकाश मधून मधून बंद होत होता. “बघू मला. चोवीस दिवस हे तुझे दुखणे चालू आहे ना? होय की नाही?”

“होय, गुरुजी.”

“पोटाचा व्यायाम मी तुला शिकविला तो कर पाहू.”

“गुरुजी, माझ्या व्यथेच्या तीव्रतेची जर आपल्याला कल्पना येईल तर आपण मला हा व्यायाम करावयास सांगणार नाही.” तरी पण त्यांच्या आज्ञेप्रमाणे तो व्यायाम करण्याचा मी एक दुबळा प्रयत्न करून पाहिला.

“दुखतंय म्हणतोयस काय तू? पण मला काही तसे दिसत नाही. असा विरोधाभास कसा असू शकेल?” गुरुजी माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहत होते.

मी गोंधळलो पण व्यथा मिटत चालली. त्या आनंदाने मी भारावून गेलो. कितीएक आठवडे त्या ठणक्याने माझी झोप उडविलेली होती. ती सतत ठणका देत असलेली व्यथा कमी होऊ लागली. ठणका बंद होऊ लागला. श्रीयुक्तेश्वरांच्या तोंडून शब्द बाहेर पडल्यावर ती वेदना जणू पूर्वी नव्हतीच अशी निघून गेली.

कृतज्ञतेने त्यांच्या पाया पडण्याकरिता मी वाकलो पण त्यांनी ताबडतोब मला तसे करू दिले नाही.

“पोरकटासारखा वागू नकोस. ऊठ आणि गंगेवरील ही चांदण्यांची शोभा पाहून घे. किती आल्हाददायक आहे ही शोभा!” पण गुरुजींचे डोळे आनंदाने चमकत होते. मी त्यांच्या शेजारीच गुपचूप उभा होतो. त्यांच्या वागण्याच्या पद्धतीवरून हे माझ्या ध्यानात आले की, मला बरे करणारे ते नसून परमेश्वरच होता, हे मी समजून घ्यावे असे त्यांना वाटत होते.

ते जडसे रूपे आणि शिसे यांचे कंकण मी अजून सुद्धा वापरीत आहे. त्या दिवसाची—फार पूर्वीच्या दिवसाची—सदैव आनंद देणारी ती एक स्मृती आहे. फिरून एकदा माझ्या ध्यानात आले की, खरोखरी एका अतिमानुष अशा महात्म्याच्या सहवासात मी वावरत आहे. त्यानंतर काही प्रसंगी जेव्हा मी माझ्या मित्रांना श्रीयुक्तेश्वरांकडे दुखणी बरी करण्याकरिता आणीत असे, तेव्हा ते न चुकता रत्नांचा किंवा कंकणांचा [3] उपयोग करावयास सांगत आणि ज्योतिषशास्त्रदृष्ट्या अशी कंकणे फार उपयोगी असतात अशी प्रशंसा करीत.

लहानपणापासून ज्योतिषशास्त्राबद्दल माझ्या मनात एक तऱ्हेची अढी होती; याचे एक कारण असे होते की, पुष्कळ लोक मेंढरासारखे ज्योतिषाच्या पाठीमागे जात व दुसरे असे की, आमच्या घराण्याच्या ज्योतिष्याने माझ्याबद्दल असे भाकीत केले होते की, ‘तू दोनदा विधुर होशील आणि तू एकूण तीन लग्ने करशील.’ ही गोष्ट माझ्या मनात सारखी घोळत असे. तीन वेळा नवरदेव होऊन लग्नवेदीपुढे बळी द्यावयास काढलेल्या बोकडासारखी माझी गत झाली होती.

माझा भाऊ अनंतदादा याने मुळी चक्क सांगूनच टाकले होते, “तू आपल्या नशिबापुढे मान तुकवावी हेच बरे. तुझ्या कुंडलीमध्ये अगदी स्पष्ट लिहिलेले आहे की, तू अगदी लहानपणीच हिमालयात जाण्याकरिता घरातून पळून जाशील आणि नंतर मग बळजबरीने तुला घरी परत यावे लागेल. आणि आता तुझ्या लग्नाच्याबाबतचे भविष्य सुद्धा असेच खरे ठरणार आहे.”

एके दिवशी मला अंतःस्फूर्ती झाली की, हे सारे वर्तविलेले भविष्य खोटे ठरणार आहे. माझ्या पत्रिकेच्या भेंडोळ्याला मी काडी लावली; आणि त्या राखेची पुरचुंडी करून त्याच्यावर लिहून ठेवले, “दिव्य सुज्ञतेच्या धगीत जर पूर्वकर्मांची बीजे जाळून टाकली तर ती उगवत नाहीत.” आणि ती पुरचुंडी येणाऱ्या-जाणाऱ्याच्या साधारण ध्यानात यावी अशा ठिकाणी ठेवली. ज्योतिषाला न जुमानणारे असे ते माझे भाष्य अनंतदादाने ताबडतोब वाचले.

“हे कागदाचे भेंडोळे जितक्या सहजपणे तू जाळून टाकलेस त्याप्रमाणे सत्य हे तू काही जाळू शकणार नाहीस.” दादा उपहासाने हसला.

आता ही गोष्ट खरी आहे की, मी वयात येण्याच्या अगोदरच तीन वेळी माझे लग्न ठरविण्याचा घरातील मंडळींनी प्रयत्न केला. पण प्रत्येक वेळी त्यांचा हा बेत [4] मी हाणून पाडला. याचे कारण असे की, ज्योतिषविद्येच्या भविष्यकथनापेक्षा परमेश्वरावरील माझी श्रद्धा फार जबरदस्त होती हे मला पुरते माहीत होते.

“माणसाला झालेली आत्मप्रचीती जितकी खोल असेल त्या मानाने तो आपल्यापासून निर्माण होणाऱ्या सूक्ष्म आध्यात्मिक स्पंदनांनी साऱ्या विश्वाला प्रभावित करतो आणि विश्वातील घटनांना आपल्या स्वतःवर प्रभाव पाडण्यास फारच कमी अवसर देतो.” गुरुजींचे

हे शब्द माझ्या कानांत घुमून फिरून फिरून आठवण करून देत व त्याबरोबर स्फूर्तीही देऊन जात.

कधी कधी मी ज्योतिष्यांना सांगून ठेवतो की, ग्रहांच्या स्थितीवरून माझ्या आयुष्यातील अतिशय वाईट दिवस मला काढून द्या आणि अशा दिवसांत सुद्धा मी माझे नियोजित काम पुरे करून टाकतो. आता हे खरे की, ज्या वेळी मला चांगले यश मिळते त्या वेळेच्या थोडे अगोदर अडचणींनी मला गांजून टाकलेले असते. पण परमेश्वर आपला पाठीराखा आहे असा विश्वास बाळगावा आणि त्याने दिलेल्या इच्छाशक्तीचा योग्य उपयोग करावा. या दोन गोष्टींचे सामर्थ्य आकाशस्थ ताऱ्यांच्या प्रकाशापेक्षा जास्त जबरदस्त आहे याबद्दल माझी पुरती खात्री पटली आहे. आणि हा जो माझा आत्मविश्वास आहे तो यथायोग्य आहे असे अनेक अनुभवांती मला पटले आहे.

माणसाच्या जन्माच्या वेळी कुंडली तयार करतात, त्याचा अर्थ माझ्या मते असा नाही की, त्याने त्या कुंडलीतील फलादेशावर सर्वस्वी विसंबून राहावे व स्वतःस आपल्या पूर्वकर्माच्या हातातील बाहुले समजावे. याच्या उलट माझे म्हणणे आहे, कुंडलीतील फलादेश समजून घेतल्यावर मनुष्याने आपल्या स्वाभिमानास धक्का द्यावा व कुंडलीतील ग्रहांवर मात करण्याचा प्रयत्न करावा. सारे गगनमंडळ माणसाच्या दृढ निश्चय-शक्तीस चेतना आणते व त्याला सांगते की, ‘बाबारे, तू या मर्यादांना न जुमानता बाहेर निसटून जा. परमेश्वराने प्रत्येक मनुष्यास जीवात्मा म्हणून निर्माण केलेला आहे; त्याला त्याचे विशेष व्यक्तित्व असे दिलेले आहे. ह्या विश्वरचनेत त्याचे असे काही विशिष्ट स्थानही आहे, मग ते कामचलाऊ खांबासारखे स्वतंत्र असो की परावलंबी असो. त्याची मुक्ती, तो जर तशी इच्छा करील तर कायमची व ताबडतोब सुद्धा होण्यातली आहे. ती साध्य करावयास त्याला दुसऱ्या कोणत्याही गोष्टीवर अवलंबून राहण्याची जरुरी नाही. त्याने फक्त आपल्या अंतर्मनावर जय मिळवावा म्हणजे झाले.

श्रीयुक्तेश्वर यांनी २४००० वर्षाचे संवत्सरचक्र किंवा कल्प कल्पून काही गणिती पद्धतीने त्याचा आधुनिक युगाशी [5] संबंध जोडून दाखविला आहे. प्रत्येक चक्राचे त्यांनी दोन भाग केले. प्रत्येक भाग १२००० वर्षाचा. पहिला आरोह-कमान व दुसरा अवरोह-कमान. प्रत्येक कमानीत चार युगे. कली, द्वापर, त्रेता व सत्य. ही चार युगे ग्रीक कल्पनेप्रमाणे लोहयूग, ब्राँझयुग, रौप्ययूग व सुवर्णयुग ह्या युगांशी जुळतात.

गुरुजींनी काही निरनिराळ्या गणिती आडाख्यांवरून असे शोधून काढले की, आरोह-कमानीतील शेवटले कलियुग हे इ. स. ५०० च्या सुमारास सुरू झाले. हे लोहयुग १२०० वर्षे टिकले. ह्या युगामध्ये भौतिकवादास, जडवादास भर आला होता. ह्या युगाची समाप्ती इ. स. १७०० मध्ये झाली. त्या वर्षी द्वापरयुगास सुरूवात झाली. द्वापरयुगाचा काळ २४०० वर्षे. ह्या युगात विद्युत आणि अणुशक्ती या शक्तींचा विकास घडून येणार आहे. हे युग म्हणजे दूरसंदेशवहन (टेलिग्राफ), आकाशवाणी (रेडिओ), हवाई जहाजे (विमाने) व आकाशावर मात करणारी इतर मानवनिर्मित यंत्रे यांचे युग.

याच्यापुढील जे त्रेतायुग ते ३६०० वर्षांचे असेल. त्याची सुरुवात इ. स. ४१०० ला होणारी आहे. ह्या युगामध्ये मनोविज्ञानाने होणारे संदेशवहन व इतर काळावर मात करणारी मानवनिर्मित यंत्रसाधने ह्याचे ज्ञान अगदी सर्वसामान्य ज्ञान होईल. नंतर आरोह-कमानीमधील शेवटचे युग जे सत्ययुग ते येईल. त्याचा कालावधी ४८०० वर्षांचा असेल. ह्या युगामध्ये मनुष्याची बुद्धिमत्ता फारच विकसित व प्रगल्भ होईल. या युगात तो परमेश्वरी योजनेनुसार किंवा ह्या योजनेशी सुसंगत असेच कार्य करील.

अवरोह-कमानीतील १२००० वर्षाचे गणित असे: पहिली सुरुवात उतरत्या कमानीतील सुवर्णयुगापासून. हे सुवर्णयुग ४८०० वर्षांचे. ह्या कमानीची सुरुवात इ. स. १२५०० मध्ये होणार. ह्या युगात मनुष्य हळूहळू ज्ञानविहीन होत जाणार. ही संवत्सरचक्रे म्हणजे मायेचे निरंतर खालीवर होत असलेले फेरे होत. या कालावधीत भौतिक विश्वात [6] परस्परविरोध व सापेक्षता यांचे साम्राज्य माजणार. माणसे एकापाठीमागून एक अशी ह्या सृष्टीच्या द्वैतमूल बंदीतून बंधमुक्त होत जातील आणि तशी ती होत असताना कारणीभूत म्हणून त्यांच्या ठिकाणी विधात्याची दिव्य, कधीही अलग न होणारी अशी सायुज्यतेची, एकत्वाची जागृत झालेली जाणीवही व्यक्त होईल.

गुरुजींनी माझे ज्योतिषशास्त्राचेच नव्हे तर जगातील सर्व धर्मांचे ज्ञान सुद्धा फार वाढविले. हे पवित्र धर्मग्रंथ ते आपल्या मनाच्या निष्कलंक मेजावर ठेवून त्यांतील मजकुराचे आपल्या अंतःस्फूर्तीच्या व तर्कबुद्धीच्या चाकूने विच्छेदन करीत व द्रष्ट्यांनी मुळात दर्शविलेल्या सत्यांमधून नंतरच्या भाष्यकारांची चुकीची विधाने व आपले स्वतःचे अर्थ त्यांतून ते बाहेर काढून टाकीत.

“आपली दृष्टी नाकाच्या शेंड्यावर स्थिर ठेवा.” भगवद्गीतेमधील ह्या श्लोकाचा [7] पौर्वात्य पंडितांनी व पाश्चिमात्य भाषांतरकारांनी फार चुकीचा अर्थ लावलेला आहे, अशी, गुरुजी उपहासात्मक टीका करीत.

ते म्हणत, “योग्याचा मार्ग हा अगोदरच एकमार्गी आहे. तर त्याला आणखी एका डोळ्याने दुसऱ्या डोळ्याकडे व तसेच उलट पाहावयास लावण्याची काय जरुरी आहे? ‘नासिकाग्रम्’ ह्याचा खरा अर्थ नासिकेचे उगमस्थान हा आहे. ‘नाकाचे टोक’ हा नव्हे. नाक दोन भुवयांमधील बिंदूतून उगम पावते. दोन भुवयांमधील हा बिंदू म्हणजे दिव्य दृष्टीचे [8] स्थान होय.

“एक सांख्यसूत्र [9] असे आहे: ‘ईश्व असिद्धे=’ [10] (परमेश्वराचे अस्तित्व सिद्ध करता येण्याजोगे नाही.) ह्या सूत्रवाक्याचा आधार घेऊन बहुतेक विद्वान सर्व सांख्य तत्त्वज्ञानाला नास्तिकवादी समजतात.”

श्रीयुक्तेश्वर असा खुलासा करीत: “हे सूत्र नास्तिकवादी नाही. ते फक्त एवढेच सांगते की, अप्रगल्भ मनुष्याला ज्याचे अंतिम निर्णायक ज्ञान होणे हे त्याच्या ज्ञानेंद्रियांवर अवलंबून असते, त्याला ईश्वराचे अस्तित्व समजावयाचेच नाही; व त्याच्या दृष्टीने ईश्वर अस्तित्वातच नाही, असे ठरेल. सांख्य दर्शनाचे सच्चे अनुयायी, की ज्यांची दृष्टी ध्यानामुळे निश्चल

झालेली असते असे, परमेश्वराचे अस्तित्व मानतात व तो ज्ञेय आहे असे प्रतिपादन करतात."

गुरुजींनी ख्रिस्ती बायबलाचे अशाच सुंदर स्पष्टतेने निरूपण केले आहे. माझे गुरुजी काही ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या सभेचे सदस्य नव्हते; पण अशा हिंदू गुरूकडून बायबलमधील अमरत्वाचे ज्ञान मी ग्रहण केले आणि ख्रिस्ताच्या पुढील वचनामधील सत्य समजू शकलो. हे वचन म्हणजे अत्यंत रोमांचकारी आणि चिरंतन अर्थाचे उच्चारण आहे. "स्वर्ग आणि पृथ्वी नाहीशी होतील पण माझे वाक्य अमर राहील." [11]

ज्या ईश्वरसदृश ध्येयांनी येशू ख्रिस्ताचे जीवन प्रेरित झाले होते त्याच ध्येयांनी भारतातील संत-महात्म्यांनी सुद्धा आपले जीवनक्रम प्रेरित केले होते. "जो कोणी माझ्या पित्याच्या इच्छेप्रमाणे वर्तन ठेवील, तोच माझा भाऊ किंवा तीच माझी बहीण किंवा आई होऊ शकते." [12] ख्रिस्ताने पुढे असे सांगितले आहे की, "जर तुम्ही माझ्या शब्दाप्रमाणे चालाल तर तुम्ही माझे खरे शिष्य व्हाल आणि तुम्हांला सत्याचा बोध होईल आणि ते सत्य तुम्हांला मुक्त करील." [13] सर्व जीवन्मुक्त, स्वतःचे स्वामी, भारतातील ख्रिस्तसदृश योगी हे सर्व ह्याच अमर श्रेणीतील होत. त्यांनाच एकमेव परमतत्त्वाचे मुक्तिप्रदायक ज्ञान प्राप्त झालेले आहे.

"आदम आणि ईव्ह ह्यांच्या कथेचे रहस्य मला काही समजलेले नाही." रूपकात्मक कथेचा खरा अर्थ समजून घेण्याच्या माझ्या अगदी सुरुवातीच्या धडपडीमध्ये एके दिवशी मी अगदी तापून निघालो आणि वरील वक्तव्य केले. "परमेश्वराने अयशस्वी दांपत्यासच नव्हे तर निर्दोष अशा भावी प्रजेला सुद्धा का शिक्षा केली?"

गुरुजींना माझ्या अज्ञानापेक्षा माझ्या आवेशाची जास्त गंमत वाटली. ते स्पष्टीकरण देऊ लागले, "उत्पत्तिशास्त्र (जेनेसिस) फार सांकेतिक आहे आणि त्याचा खरा बोध केवळ शाब्दिक अन्वयार्थापासून होणारा नाही. त्या कथेमधील 'जीवनवृक्ष' म्हणजे मानवी शरीर, मेरुदंड म्हणजे उपटून उलट करून ठेवलेला वृक्ष, माणसाचे केस म्हणजे त्या वृक्षाची मुळे आणि त्याच्या धमन्या व शिरा म्हणजे त्या वृक्षाच्या फांद्या. ह्या ज्ञानतंतूच्या वृक्षाला पुष्कळ स्वादिष्ट फळे येतात. ती फळे म्हणजे पाच ज्ञानेंद्रिये. दृष्टी, श्रवण, वास, स्वाद आणि स्पर्श. ह्या फळांचा माणसाने अधिकाराने उपभोग घ्यावा. पण त्याला लिंगज्ञानाचा अनुभव वर्ज्य केला होता. लिंगज्ञान म्हणजे मध्यभागी असलेले किंवा ह्या देहरूपी उपवनातील [14] 'सफरचंदाचे फळ.'

"'सर्प' म्हणजे नागिणीसारखी गुंडाळून ठेवलेली मेरुदंडातील शक्ती, जी लैंगिक ज्ञानतंतूंना उद्दीपित करते. 'आदम' म्हणजे विवेकशक्ती आणि 'ईव्ह' म्हणजे भावना. ज्या वेळी मानवप्राण्यामध्ये भावना किंवा ईव्हची जाणीव हिच्यावर लैंगिक विचारांचा पगडा बसतो त्या वेळी त्याची विवेकशक्ती किंवा आदम हाही शरण जातो. [15]

"परमेश्वराने मानवजाती, आपल्या स्वतःच्या इच्छाशक्तीच्या जोरावर, पुरुष व स्त्री यांची स्थूल शरीरे बनवून निर्माण केली. ह्या नवीन निर्माण केलेल्या जातीला त्याने अशाच निष्कलंक किंवा स्वर्गीय पद्धतीने अपत्य निर्माण करण्याची शक्ती प्रदान केली. [16]

आतापर्यंत व्यक्तिगत आत्म्यांच्या स्थूलीकरणाचा कार्यक्रम त्याने पशूपर्यंतच आणला होता. ह्या पशूमध्ये केवळ फक्त उपजतबुद्धीच असून पूर्ण विवेकबुद्धीचा अभाव होता. म्हणून परमेश्वराने ही आदम व ईव्ह अशी सांकेतिक संज्ञा देऊन, ही पहिली दोन मानवी शरीरे निर्माण केली. उत्क्रांति दृष्ट्या त्यांची पुढील प्रगती सोयीची व्हावी म्हणून त्याने ह्या दोघांना दोन पशूंचे [17] आत्मे किंवा दिव्य सत्त्व काढून दिले. आदम किंवा पुरुष यांच्यामध्ये विवेकशक्तीचे प्राधान्य ठेवले व ईव्हमध्ये भावनेचे प्राधान्य ठेवले. अशा तऱ्हेने हे द्वैत किंवा हे दोन ध्रुव ह्या सृष्टीच्या निर्मितीस मूलभूत झाले. जोपर्यंत कोणत्याही माणसाचे मन पशुवृत्तीच्या—सर्पशक्तीच्या आहारी जात नाही, तोपर्यंत त्याची विवेकबुद्धी आणि भावना एकत्र आनंदाचा स्वर्गीय अनुभव घेत असतात.

"अशा तऱ्हेने मनुष्याचे शरीर हे पशूच्या शरीरापासून उत्क्रांत होत होत सर्वस्वी तयार झाले असे नाही, तर परमेश्वराने प्राणी निर्माण करण्याच्या एका विशिष्ट कृतीने त्याचे शरीर निर्माण केले आहे. इतर प्राण्यांची शरीरे पूर्ण दिव्यत्वाचा विकास व्हायला योग्य नव्हती. ती ओबडधोबड होती. आद्यमानव पुरुषाला व स्त्रीला त्याने अप्रतिम असे प्रचंड मानसिक सामर्थ्य बहाल केले. ते सामर्थ्य म्हणजे मेंदूमधील सुप्त सर्वज्ञता धारण करणारे सहस्रदलकमल, त्याचबरोबर मेरुदंडामधील तीव्रतेने जागृत झालेली गूढ चक्रे.

"ह्या प्रथमच निर्माण केलेल्या जोडप्यामध्ये परमेश्वर किंवा दिव्य चैतन्य वास करीत होते. त्याने त्या जोडप्याला सर्व मानवी वासनांचा उपयोग घेण्यास मुभा दिली. फक्त एक अपवाद ठेवला. तो अपवाद म्हणजे लैंगिक भोगवासना. [18] ह्या वासनेचा उपभोग घेण्यास त्याला मनाई केली. ह्या जोडप्याने आपल्या ह्या इंद्रियांचा उपयोग करू नये असा निर्बंध घातला. कारण असे केले असता मनुष्यजातीची प्रजोत्पत्ती कनिष्ठ पशुपद्धतीने होण्याचा संभव होता. पशुवृत्तीचे आंतरिक, मानसिक पुनः स्मरण करू नये, ही ताकीद मानवाने जुमानली नाही. प्रजोत्पत्तीचा पशूंचा मार्ग त्याने पुनः अनुसरलाच, आणि परिणामी आदम आणि ईव्ह जे सुरुवातीला पूर्ण मनुष्य होते व पूर्ण मनुष्याला सदृश अशा स्वर्गीय आनंदाचा अनुभव घेत होते, त्या दिव्य अवस्थेतून त्यांचे पतन झाले. ज्या वेळी त्यांना वाटले की, आपण नग्न आहोत त्याच वेळी त्यांची अमरत्वाची जाणीव नष्ट झाली. परमेश्वराने त्यांना ताकीद दिली असताना सुद्धा, त्यांनी आपणा स्वतःस केवळ भौतिक विधिनियमांचे गुलाम केले, ज्यानुसार शारीरिक जन्मानंतर शारीरिक मृत्यु टाळता येत नाही.

त्या सर्पाने ईव्हला चांगले आणि वाईट ह्याचे ज्ञान प्राप्त करून देण्याचे वचन दिले. ह्या ज्ञानाचा संबंध मायेशी येतो. ह्या मायेमुळे मर्त्य मानवांना द्वैत-भावाचा व विरोध-भावाचा अनुभव घ्यावा लागतो. मानवास मायेच्या वर्चस्वाखाली राहावे लागते. आपल्या भावनेचा व विवेकबुद्धीचा दुरुपयोग करून किंवा स्त्री आणि पुरुष अशी पृथक भावना मनात बाळगावयास सुरुवात करून मनुष्य हा मायाजालात गुरफटून गेला आणि दिव्य स्वयंपूर्णतेच्या [19] स्वर्गीय भावनांमध्ये प्रवेश करण्याचा हक्क त्याने गमावला. प्रत्येक मनुष्यप्राण्याची वैयक्तिक जबाबदारी अशी आहे की, त्याने आपल्या द्वैतभावरूपी 'मातापित्यां'ना पूर्ववत सुसंबद्ध एकत्वामध्ये वा ईडनच्या बागेमध्ये पुन्हा प्रस्थापित करावे."

श्रीयुक्तेश्वरांनी आपले प्रवचन संपविले, व्यूत्पत्तिशास्त्राच्या (जेनेसिसच्या) पुस्तकाकडे मी आता आदराने पाहू लागलो.

"प्रिय गुरुजी," मी म्हणालो, "अगदी प्रथमच आदम आणि ईव्ह ह्यांच्याकडे यथायोग्य असा पितृभाव मला वाटत आहे." [20]

---

1 प्राचीन हिंदू वाङ्मयामध्ये जे काही ज्योतिषशास्त्रविषयक उल्लेख आहेत, त्यांवरून अभ्यासूंनी त्या ग्रंथकारांचा कालनिर्णय केलेला आहे. ऋषींचे भौतिक शास्त्रज्ञान फार अगाध होते. कौशीतकी ब्राह्मणामध्ये असे काही निश्चित स्वरूपाचे ज्योतिषशास्त्रविषयक उतारे सापडले आहेत. त्यांवरून असे दिसून येते की, ख्रि. पू. ३१०० कालामध्ये हिंदू लोक ज्योतिषशास्त्रामध्ये फार प्रगत झालेले होते. ह्या ज्योतिषशास्त्राचा ते मंगल प्रसंगासाठी मुहूर्त शोधून काढण्याकरिता व्यावहारिक उपयोग करीत. ज्योतिष ह्या विषयासंबंधी "ईस्ट-वेस्ट" ह्या मासिकाच्या फेब्रूवारी १९३४ च्या अंकात एक लेख आलेला आहे तो असा: "ह्यात असे वैज्ञानिक ज्ञान आहे की, त्यायोगे भारतास प्राचीन काळच्या राष्ट्रांमध्ये अग्रेसरत्व दिले गेले होते. आणि भारत म्हणजे जणू ज्ञानसंशोधकांचे मक्का शहर बनले होते. ब्रह्मगुप्त नावाचा असाच एक ज्योतिषशास्त्रविषयक ग्रंथ आहे. त्या ग्रंथामध्ये पुष्कळ विषयांची चर्चा केलेली आहे. उदाहरणार्थ, सूर्यमालेमधील ग्रहांची सौरगती; सूर्यमार्गावरील तिरकसपणा; पृथ्वीचा गोलाकार; चंद्रावरील परावर्तित प्रकाश; पृथ्वीचे आपल्या आसाभोवती चालू असलेले भ्रमण; आकाशगंगेतील स्थिर अशा काही ध्रुव ताऱ्यांचे अस्तित्व; गुरुत्वाकर्षणाचा नियम आणि इतर दुसरी वैज्ञानिक माहिती, की जी पाश्चिमात्य जगामध्ये कोपर्निकस व न्यूटन यांच्या काळापर्यंत कोणाच्याही ध्यानीमनी आली नव्हती."

त्याचप्रमाणे संख्यांक; ज्यांना अरबी संख्यांक म्हणतात व ज्यांचा उपयोग पाश्चिमात्य गणितशास्त्राच्या विकासाला आवश्यक असतो; हे युरोपमध्ये नवव्या शतकामध्ये हिंदुस्थानातून अरबस्थानच्या मार्गे आले. भारतात ही संख्यांकांची गणनापद्धती फार पूर्वीच्या काळात रचलेली होती. भारताच्या ह्या अफाट विज्ञानाच्या वारशाबद्दल आणखी काही माहिती खालील ग्रंथांत आढळून येईल. सर पी. सी. रॉय यांची 'हिस्ट्री ऑफ हिंदू केमिस्ट्री,' बी. एन. सील यांचे 'पॉझिटिव्ह सायन्सेस ऑफ दि एन्शंट हिंदूझ,' बी. के. सरकार यांचे 'हिंदू अचीव्हमेंटस इन एक्झॅक्ट सायन्स' आणि 'दि पॉझिटिव्ह बॅकग्राऊंड ऑफ हिंदू सोशिऑलॉजी' व यू. सी. दत्त यांचा 'मटेरिया मेडिका ऑफ दि हिंदूझ.'

2 संतजनांच्या केवळ दृष्टिक्षेपाने कल्याण होते त्यास 'दर्शन' म्हणतात.

3 २५ व्या प्रकरणाच्या शेवटी दिलेली टीप पाहावी.

4 घरातल्या मंडळींनी माझ्याकरिता पसंत केलेल्या एका मुलीचे लग्न पुढे माझ्या चुलत भावाशी, प्रभासचंद्र घोष याच्याशी झाले. (ते योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया चे उपाध्यक्ष होते.) (प्रकाशकीय टिपण) श्री घोष २४ जानेवारी १९७५ रोजी वारले.

5 ही संवत्सरचक्रांची, कल्पांची कल्पना स्वामी श्रीयुक्तेश्वरांनी आपल्या 'द होली सायन्स' या पुस्तकात विशद केली आहे. 'द होली सायन्स' (योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया द्वारा प्रकाशित.)

6 हिंदू धर्मग्रंथानुसार सध्याचे युग कलियुगात मोडते आणि ह्या कलियुगाचा विश्वाच्या कालमर्यादेत अंतर्भाव होतो. विश्वाची ही वयोमर्यादा श्रीयुक्तेश्वरांच्या २४००० वर्षांच्या संवत्सरचक्रापेक्षा फार मोठी आहे. हिंदू धर्मग्रंथांनुसार विश्वाची वयोमर्यादा ४,३०,०५,६०,००० वर्षांची आहे. ह्याला ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणतात, किंवा ज्या आकाशामध्ये आपली ग्रहमाला टिकून राहील त्या काळाचा हा अवधी होय. ऋषींनी ठरविलेली ही अतिविशाल संख्या एका गणितावर बसविलेली आहे. ते गणित म्हणजे हा वर्षाचा अवधी आणि पी. आय. चा गुणक यांमधील संबंध (पाय म्हणजे ३.१४१६ म्हणजे वर्तुळामधील परीघ व व्यास यांच्यामधील गुणोत्तर).

प्राचीन द्रष्ट्यांच्या मतानुसार ह्या अखिल विश्वाची आयुर्मर्यादा ३१४,१५९,०००,०००,००० सौर वर्षांची आहे. ह्याला "ब्रह्मदेवाचे युग" किंवा "कल्प" म्हणतात.

हिंदू धर्मग्रंथ असे सांगतात की, आपली पृथ्वी जशी आहे अशी पृथ्वी दोनपैकी एका कारणाने विसर्जन पावते. ह्या पृथ्वीवरील सारे रहिवासी हे संपूर्णतया सज्जन तरी होतील किंवा संपूर्णतया दुर्जन तरी होतील. जगाचे सामुदायिक मन अशा तऱ्हेची एक शक्ती निर्माण करते की, जी शक्ती ह्या पृथ्वीमध्ये एकत्र बांधून धरलेल्या बंदिस्त परमाणूंना मुक्त करते.

ह्या जगाचा अंत कसा एकदम होईल ह्याबद्दलच्या भयानक घोषणा मधून मधून प्रसिद्ध केल्या जातात. तथापि ग्रहगोलांची आयुर्मर्यादा ही एका शिस्तबद्ध परमेश्वरी योजनेने आखलेली असते. जगाचा अंत सध्या दृष्टिपथात नाही. ह्या आपल्या विद्यमान आकारातील ग्रहाला अजून पुष्कळ आरोह आणि अवरोह—संवत्सरचक्रांतून जावयाचे आहे.

7 'संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं' । अध्याय ६, श्लोक १३.

8 "शरीराचा प्रकाश म्हणजे डोळा होय. म्हणून तुमचा डोळा जेव्हा एकच असेल तेव्हा सर्व शरीर सुद्धा प्रकाशाने भरून जाईल. पण ज्या वेळी तुमचा डोळा पापी असेल त्या वेळी हे शरीर सुद्धा अंधकारमय होऊन जाईल. म्हणून सांगतो की, तुमच्यामध्ये हा जो प्रकाश आहे, त्याचा अंधकार होऊ नये अशी काळजी घ्या." ल्यूक ११:३४-३५ (बायबल).

9 सांख्यसूत्रें १:९२.

10 सांख्य दर्शन हे हिंदू तत्त्वज्ञानातील सहा दर्शनांपैकी एक दर्शन आहे. सांख्य दर्शनात पंचवीस तत्त्वे गृहीत धरलेली आहेत. पहिले तत्त्व म्हणजे प्रकृती किंवा निसर्ग आणि शेवटले तत्त्व म्हणजे पुरुष किंवा आत्मा. ह्या पंचवीस तत्त्वांच्या ज्ञानाने मोक्षप्राप्ती होते, असा या दर्शनाचा अभिप्राय आहे.

11 मॅथ्यू २४:३५ (बायबल).

12 मॅथ्यू १२:५० (बायबल).

13 जॉन ८:३१-३२ (बायबल). सेंट जॉन खात्रीपूर्वक सांगतो, "पण जितक्यांनी त्याचा अंगीकार केला तितक्या तितक्यांना त्याने आकाशातील पित्याचे पुत्र होण्याची शक्ती दिली. एवढेच नव्हे तर जे त्याच्या नावावर विश्वास बाळगून होते त्यांना सुद्धा ती शक्ती त्याने दिली; (आणि जे कूटस्थ चैतन्यामध्ये पूर्ण स्थित होते त्यांनाही ती शक्ती दिली.)" जॉ १:१२.

14 "बागेमधील झाडाचे फळ आम्ही खावे पण बागेच्या मध्यभागी जे झाड आहे त्या फळाबद्दल परमेश्वराने बजावलेले आहे की, तुम्हांला ते फळ खाण्याची मनाई आहे; त्याला तुम्ही स्पर्शसुद्धा करू नका. नाहीतर नाहक मृत्युमुखी पडाल." जेनेसिस ३:२-३ (बायबल).

15 "स्त्री, जिला तू माझ्याजवळ दिलेस आणि तिने मला झाडाचे फळ खावयास दिले आणि ते मी खाल्ले. स्त्री म्हणाली, त्या सर्पाने मला भुलविले आणि मी ते फळ खाल्ले." जेने ३:१२-१३ (बायबल).

16 "म्हणून परमेश्वराने मनुष्यास आपल्या प्रतिमेबरहुकूम निर्माण केले परमेश्वराची प्रतिमा त्याने त्याच्यामध्ये ओतली; त्याने पुरुष आणि स्त्री असे दोघे निर्मिले आणि परमेश्वराने त्यांना आशीर्वाद दिला आणि परमेश्वर त्यांना म्हणाला, "तुम्ही फलद्रूप व्हा आणि प्रजावृद्धी करा आणि पृथ्वीला समृद्ध करा आणि तिला आपल्या वर्चस्वाखाली ठेवा." जेने १:२७-२८ (बायबल).

17 "आणि परमेश्वर प्रभूने जमिनीतील धुळीपासून मनुष्य निर्माण केला आणि त्याच्या नाकपुड्यांत जिवंतपणाच्या श्वसनाचा श्वासोच्छ्वास तयार केला आणि अशा तऱ्हेने मनुष्य हा जिवंत आत्मा म्हणून तयार झाला." जेने २:७ (बायबल).

18 "आणि तो सर्प (लैंगिक भावना) हा जमिनीवर वावरणाऱ्या कोणत्याही पशूपेक्षा अधिक कुशाग्र होता." जेने ३:१ (बायबल).

19 "आणि परमेश्वर प्रभूने ईडनमध्ये पूर्वेच्या बाजूस एक बाग केली आणि तेथे त्याने स्वतः निर्माण केलेल्या मनुष्यास ठेवून दिले." जेने २:८ (बायबल). "आणि म्हणून परमेश्वर प्रभूने ईडनच्या त्या बागेतून मानवाला हाकलून लावून ज्या जमिनीवरून त्यास काढून टाकले होते त्यास ती जमीन कसावयास लावली." जेने ३:२३ (बायबल). परमेश्वराने प्रथम जो दिव्यरूपी मानव निर्माण केला त्याची चैतन्यशक्ती त्याच्या कपाळामधील (पूर्वेकडचा) एकच अशा सर्वशक्तिमान अशा डोळ्यांत केंद्रित झाली होती. ज्या वेळी तो आपल्या जडस्वरूपाचे शेत कसावयास लागला तेव्हा त्याच्या त्या शक्ती नाश पावल्या.

20 हिंदूंची 'आदम व ईव्ह' कथा श्रीमद्भागवत ह्या प्राचीन पुराणग्रंथात दिली आहे. स्त्री-पुरुषाचे पहिले युग्म (पार्थिव शरीरधारी प्राणी) यास स्वायंभूव मनू (विधात्यापासून जन्म झालेला तो मानव) व त्याची बायको शतरुपा अशी नावे दिली आहेत. त्याच्या पाची मुलांनी प्रजापतीशी (पूर्ण असा जो वाटेल तो जड देह धारण करणारा प्राणी) आपापसांत लग्ने केली. ह्या पहिल्या दिव्य कुटूंबामध्ये मानवजातीचा जन्म झाला.

श्रीयुक्तेश्वरांच्या इतक्या सखोल, आध्यात्मिक अंतर्दृष्टीने पौर्वात्य व पाश्चिमात्य जगात ख्रिस्ती धर्मशास्त्राचे इतके सुरेख विश्लेषण कोणी केल्याचे माझ्या ऐकण्यात नाही. गुरुजी म्हणत, "शास्त्रीमंडळींनी ख्रिस्ताच्या शब्दाचा चुकीचा अर्थ लावलेला आहे. 'मीच मार्ग, मीच सत्य, आणि मीच प्राण आहे. माझ्या मार्फतीशिवाय कोणताही मनुष्य पित्याप्रत पोचू शकणार नाही.' (जॉन १४:६, बायबल) अशासारख्या उताऱ्यामध्ये येशूच्या म्हणण्याचा असा आशय नव्हता, की मीच फक्त ईश्वराचा पुत्र आहे; तर त्याच्या म्हणण्याचा असा अर्थ आहे की, कोणाही मनुष्यास प्रथम पुत्राची भूमिका अभिव्यक्त केल्याखेरीज किंवा कूटस्थ चैतन्यास सृजनास कार्यप्रवृत्त केल्याखेरीज निर्गुण परब्रह्माची सृष्टीपलीकडील वरच्या स्तरातील परमेश्वराची प्राप्ती होणारी नाही. येशू ख्रिस्त कूटस्थ चैतन्याशी सर्वथैव एकरूप झाला होता; आणि म्हणून तो त्याच्याशी इतका समरस होऊ शकला, कारण त्याने आपल्या अहंकाराचे केव्हाच मागे विसर्जन केले होते." (पहा पृ. २०८ टी.)

आणि पुढे जेव्हा पॉल म्हणतो, "परमेश्वर .... आणि त्याने सर्व गोष्टी येशू ख्रिस्ता द्वारे निर्माण केल्या." (एफिशियन्स ३:९, बायबल) आणि पुनः जेव्हा ख्रिस्त म्हणतो, "अब्राहम होण्यापूर्वी मी आहे." (जॉन ८:५८, बायबल). ह्या म्हणण्याचा अगदी स्पष्ट अर्थ म्हणजे फक्त व्यक्तिनिरपेक्षच होता; म्हणजे व्यक्ती म्हणून त्याने हे वरील बोलणे केलेले नव्हते.

एका प्रकारचा आध्यात्मिक भेकडपणा सांसारिक मनुष्यांना हा विश्वास करवून देतो की, केवळ एकच मनुष्य ईश्वर-पुत्र होता. ते तर्क करतात: "ख्रिस्ताचे निर्माणच अद्वितीय होते, मग मी, एक साधारण मर्त्य मानव, त्यांची बरोबरी कसा बरं करणार?" पण सर्व मनुष्यांचे सृजन ईश्वरानेच केले आहे, आणि कोणत्या तरी दिवशी त्यांना ख्रिस्ताची आज्ञा पाळावीच

लागणार: “म्हणुन तुम्ही परिपूर्ण बना, जसे स्वर्गात असलेले तुमचे परमपिता परिपूर्ण आहेत.” (मॅथ्यू ५:४८, बायबल). “पहा आमच्या पित्याने आम्हाला कसे प्रेम दिले आहे की आम्हाला ईश्वर-पुत्र म्हणता आले पाहिजे.” (१ जॉन ३:१ बायबल).

कर्माच्या गतीबद्दल आणि तदनुषंगिक पूर्वजन्माच्या विषयाबद्दल बायबलमध्ये जागोजाग संदर्भादाखल उतारे दाखविता येतील. उदाहरणार्थ, “जो कोणी मनुष्याचे रक्त पाडेल त्याचे रक्त दुसरा कोणीतरी मनुष्य पाडल्याखेरीज राहणार नाही.” (जेने ९:६, बायबल). जर प्रत्येक खुनी माणसास दुसऱ्या कोणीतरी माणसाने बदला म्हणून मारावयाचे म्हणजे ही प्रतिक्रिया पुरी होण्याकरिता उघडच पुष्कळ बाबतीत त्याला एकापेक्षा जास्त जन्म घ्यावे लागतील. कारण एकाच जन्मात आजकालचे पोलीस त्याचा इतका बंदोबस्त करू शकणार नाहीत!

ख्रिस्ती धर्माच्या विकासाच्या सुरुवाती सुरुवातीस धर्मोपदेशक मंडळींनी पुनर्जन्माच्या तत्त्वांचा अंगीकार केलेला होता, असे दिसते; व ते तत्त्व ग्नॉस्टिक्सनी व अनेक धर्मोपदेशकांनी विशद केलेले होते. त्यात ॲलेक्झांड्रिआचा क्लेमंट व सुप्रसिद्ध ऑरिजेन (दोघेही तिसऱ्या शतकातील) आणि सेंट जेरोम (पाचव्या शतकातील) यांचा समावेश होतो. पण ह्या तत्त्वाचा अगदी पहिल्या प्रथमच चेटूक म्हणून इ. स. ५५३ मध्ये कॉन्स्टनिन्टनोपलच्या दुसऱ्या कौन्सिलने निर्णय दिला. त्या वेळी पुष्कळ ख्रिस्ती लोकांना पुनर्जन्माचे तत्त्व पटलेले होते. त्यांच्या मते पुनर्जन्माच्या तत्त्वामुळे एखाद्याला ताबडतोब मोक्ष मिळविण्याकरिता भरपूर प्रमाणात काळ व वेळ मिळतो. पण खरी गोष्ट दाबली गेल्यामुळे त्याच्या अनुषंगाने पुष्कळ चुका उत्तरोत्तर होतच गेल्या. कोट्यवधी माणसांना ह्या एकमेव जीवितकालाचा परमेश्वरप्राप्तीकरिता उपयोग करता आला नाही, उलट त्यांनी ह्या जगाचा ऐहिक उपभोगाकरिताच उपयोग करून घेतला व तो इतक्या विलक्षण पद्धतीने की, थोड्याच वेळात त्यांचे कायमचे पतन झाले! सत्य इतकेच की, मनुष्याला आपण परमेश्वराचा पुत्र आहोत ह्या योग्यतेचा जाणीवपूर्वक आस्वाद घेईपर्यंत ह्या भूतलावर अनेक जन्म घ्यावे लागतील.

## प्रकरण - १७

# 17.शशी आणि तीन नीलम रत्ने

"तू आणि माझा मुलगा स्वामी श्रीयुक्तेश्वरांबद्दल फार वाखाणणी करता तेव्हा त्यांना भेटायचे मी ठरवलेय." डॉ. नारायणचन्द्र रॉय मला म्हणाले. त्यंच्या बोलण्याच्या आवाजाची पद्धत असे दर्शवीत होती की, आम्हा वेडपट मुलांच्या लहरीशी जरा मिळते घ्यावे. एका धर्मप्रचारकाच्या श्रेष्ठ परंपरेनुसार मी माझा राग मनातल्या मनात दाबला.

माझे हे सोबती कलकत्त्याला पशुवैद्य होते. ते अगदी पक्के अज्ञेयवादी होते. त्यांचा मुलगा संतोष ह्याने मला त्याच्या वडिलांकडे लक्ष घालण्यास विनवणी केली होती. आतापर्यंत मी जी काही बहुमूल्य अशी मदत केली तिचे स्वरूप अदृश्यच होते.

दुसऱ्या दिवशी मी डॉ. रॉय यांना घेऊन सेरामपुरच्या आश्रमात गेलो. गुरुजींनी त्यांना मुलाखत दिली ती अगदी थोडा वेळ व त्यातही बहुतेक वेळ निर्विकार मौनच अवलंबिले होते. पाहुणेमहाशयांनी थोडेसे चिडून असभ्यपणे तेथून लवकरच पाय काढला.

तो संशयग्रस्त मनुष्य गेल्यावर त्याच्या पाठीमागे दार वाजले तेव्हा श्रीयुक्तेश्वरांनी माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले आणि ते मला म्हणाले, "अशा मेलेल्या मनुष्याला तू आश्रमात कशाला आणतोस?"

"पण गुरुजी, डॉक्टर तर चांगले जिवंत आहेत!"

"पण थोड्याच कालावधीत त्यांचा मृत्यु होणार आहे."

मला धक्काच बसला. "गुरुजी, त्यांच्या मुलाला तर ह्याने मोठा भयंकर धक्का बसेल. संतोषला त्याच्या वडिलांचा अगदी व्यवहारी, जडवादी स्वभाव बदलण्याची अजून उमेद आहे. गुरुजी, मी आपल्याला विनवणी करतो, या माणसाला वाचवा."

"बरे, केवळ तुझ्याकरिता." गुरुजींचा चेहरा निर्विकार होता. "तो गर्विष्ठ घोड्यांचा डॉक्टर ना, त्याचा मधुमेह फार पुढे गेलेला आहे आणि त्याची त्याला काही कल्पना नाही. पंधरा दिवसांत तो अंथरुणाला खिळेल. त्याच्यावर मग काही डॉक्टरी इलाज चालण्यातला नाही. या भूलोकावरील त्याची आयुष्याची मर्यादा आजपासून फक्त सहा आठवड्यांपुरती आहे. तथापि तू मध्यस्थी करतोयस म्हणून तो त्या दिवशी मरणार नाही. पण एका अटीवर तो त्या दिवशी वाचेल. तू त्याला ज्योतिषविषयीचे कंकण वापरावयाला लावले पाहिजेस. ऑपरेशनच्या पूर्वी त्याचा घोडा ज्याप्रमाणे त्रास देतो, त्याप्रमाणे तो घोड्यांचा डॉक्टरसुद्धा नक्कीच त्या गोष्टीला कबूल होणार नाही. जोराचा विरोध करील." गुरुजी गालांतल्या गालांत हसून म्हणाले.

थोडा वेळ आम्ही गप्प बसलो. मी विचार करत होतो की, या डॉक्टरांची संतोष व मी दोघांनी मिळून गोड बोलून कशी समजूत काढावी व त्यांना या गोष्टीला तयार करावे? श्रीयुक्तेश्वरांनी आणखी काही गोष्टी स्पष्ट सांगितल्या.

“त्या इसमाला जरा बरे वाटल्याबरोबर मांसाहार वर्ज्य करायला सांगा. हा सल्ला तो मनावर घेणार नाही. आणि सहा महिन्यांत जेव्हा त्याला आपण पूर्णपणे बरे झालो आहोत असे वाटेल, अगदी त्याच वेळी तो मृत्युमुखी पडेल.” गुरुजी पुढे म्हणाले, “ही जी त्याच्या आयुर्मर्यादेमध्ये सहा महिन्यांची वाढ केली ती केवळ तुझ्या विनवणीमुळे.”

दुसऱ्या दिवशी मी संतोषला सांगितले की, असे एक कंकण सोनाराकडून तयार करून घे. सात दिवसांत ते तयार झाले. पण डॉ. राय यांनी ते घालण्याचे नाकारले.

“माझी तब्येत अगदी उत्तम आहे. ह्या ज्योतिषी भाबडेपणाच्या गोष्टीनी तू माझे मन काही वळवू शकणार नाहीस.” आणि डॉक्टरांनी माझ्याकडे अगदी विरोधपूर्ण अशा युयुत्सू नजरेने पाहिले.

आणि ह्या वेळी मला गुरुजींच्या उद्‌गारांची आठवण झाली. गुरुजींनी त्याची एका अगडबंब घोड्याशी तुलना केली होती. असेच आणखी सात दिवस गेले. आणि डॉक्टरमहाशय एकदम आजारी पडले; आणि मग त्यांनी ते कंकण हातात घालावयास निमूटपणे संमती दिली. त्यानंतर दोन आठवड्यांनी त्यांना औषधोपचार करणाऱ्या डॉक्टरांनी मला सांगितले की, या रोग्याची आता काही आशा नाही. ह्या मधुमेहाच्या रोग्यांची अगदी किती विकल व भयानक स्थिती होते ह्याचे त्यांनी हृदयविदारक वर्णन करून सांगितले.

मी नकारार्थी मस्तक हालविले, “माझ्या गुरुजींनी असे सांगितले आहे की, एक महिन्याच्या आजारपणानंतर डॉ. राय दुखण्यातून पूर्णपणे बरे होणार आहेत.”

डॉक्टरांनी माझ्याकडे विश्वास नसलेल्या नजरेने पाहिले. पण त्यांनी मला पंधरवड्यानंतर गाठले व आपले चुकले म्हणून स्पष्ट कबुली दिली.

डॉक्टर म्हणाले, “डॉ. रॉय यांची प्रकृती एकदम सुधारली आहे. माझ्या पाहण्यातली ही पहिलीच इतकी आश्चर्यकारक केस. मरणाच्या दारी पडलेला रोगी अशा तऱ्हेने काहीएक खुलासेवार कारण न समजता पूर्ववत बरा झालेला मी आतापर्यंत कधीही पाहिलेला नाही. तुझा गुरु कोणी तरी असाध्य रोग बरा करणारा सिद्धयोगी असला पाहिजे!”

डॉ. रॉय यांची व माझी पहिली मुलाखत झाली. मुलाखतीच्या वेळी निरामिष आहाराबद्दल श्रीयुक्तेश्वरांचा कसा कटाक्ष असे, याबद्दल डॉक्टरमहाशयांना मी सांगितले. त्यानंतर सहा महिने ते परत दिसलेच नाहीत. एक दिवस संध्याकाळी मी आमच्या घरातील चौकात ओट्यावर बसलो होतो. ते अचानकपणे मला भेटले व बोलण्याकरिता मुद्दाम थांबले.

“तुझ्या गुरुला सांग की, मांसाशन वारंवार करून माझी ताकद मी पूर्ववत मिळविलेली आहे. आहारवरचे त्यांचे अशास्त्रीय विचार मला कधीच पटले नाहीत.” आता ही गोष्ट खरी आहे की, डॉ. रॉय या वेळी सुदृढ शरीरप्रकृतीचे एक आदर्श उदाहरण दिसत होते.

पण अगदी दुसऱ्याच दिवशी संतोष माझ्याकडे अगदी धावतच आला त्याचे घर आमच्या अगदी शेजारच्याच ब्लॉकमध्ये होते. तो घाबरून म्हणाला, “आज सकाळी बाबा एकाएकी वारले!”

गुरुजींच्या सान्निध्यातील अनेक विलक्षण प्रसंगांतील हा सर्वात जास्त विलक्षण प्रसंग. त्यांनी त्या अश्रद्ध पशूवैद्याला त्याचा विश्वास नसताना सुद्धा दुखण्यातून बरे केले, आणि केवळ माझ्या विनवणीखातर त्याचे निसर्गदत्त आयुर्मान सहा महिन्यांनी वाढविले. आपल्या

शिष्याच्या अगदी तातडीच्या विनवणीस श्रीयुक्तेश्वर मान देत आणि त्या वेळी ते जी दयार्द्रबुद्धी दाखवीत त्यास सीमा नसे.

कॉलेजच्या माझ्या मित्रांना गुरुजीकडे आणण्यात मला अभिमान वाटे व एक तऱ्हेचा तो माझा खास हक्क आहे असे वाटत असे. त्यांपैकी पुष्कळसे आश्रमात तरी आपला धर्माविषयींचा शंकेखोर स्वभाव जरा बाजूला ठेवीत.

माझा एक मित्र, शशी शनिवारी संध्याकाळी सुट्टीचा सेरामपुरला यायचा व आमचा वेळ अगदी मजेत जायचा. गुरुजींना तो मुलगा फार आवडे आणि त्याचे जीवन अनिर्बंध व बेताल असल्याचे त्यांना फार वाईट वाटे.

"शशी, तू आपल्या वागण्यात जर सुधारणा केली नाहीस तर बरोबर एक वर्षाने तू अगदी अत्यवस्थ असा आजारी पडशील." श्रीयुक्तेश्वरांनी माझ्या मित्राकडे प्रेमळ पण क्रोधपूर्ण नजरेने पाहिले. "याला मुकुंदा साक्षीदार आहे. नंतर मग तू म्हणू नकोस की, मी तुला सावध केले नाही म्हणून."

शशी हसला. "गुरुजी, माझ्या करुणाजनक परिस्थितीत एक मधुरशी दयापूर्ण दृष्टी दाखविण्यास आपण विराट स्वरूपास प्रवृत्त करावे की नाही, हे मी आपल्याकडेच सोपवितो. माझा आत्मा तयार आहे, पण दैहिक इच्छाशक्ती तितकीशी तयार नाही. आपणच माझे या भूलोकवरचे तारणहार आहात. दुसऱ्या कोणावरही माझा भरवसा नाही."

"निदान तू दोन कॅरटचे नीलम रत्न वापरावेस. तुला फायदा होईल."

"माझी ऐपत नाही. पण प्रिय गुरुजी, काहीही झाले तरी, जर एखादा असा दुर्दैवाचा प्रसंग आला तर आपण माझे तारण करावयास आहातच की."

श्रीयुक्तेश्वर उत्तरादाखल म्हणाले, "एक वर्षाच्या अवधीत तू हे तीन खडे आणशील, पण त्या वेळी त्याचा काही उपयोग व्हावयाचा नाही."

थोड्याफार फरकाने हा संवाद नेहमी असा चालावयाचा. शशी विनोदाने पण निराशेने म्हणावयाचा, "माझ्यात काही सुधारणा व्हावयाची नाही; पण गुरुजी, आपल्या ठिकाणी माझा जो विश्वास आहे तो कोणत्याही रत्नमाणकापेक्षा अधिक मौल्यवान आहे!"

अशा तऱ्हेने एक वर्ष गेले. एक दिवस मी गुरुजींना कलकत्त्याला भेटावयास गेलो. त्या वेळी ते तेथे आपले शिष्य नरेनबाबू यांच्याकडे उतरले होते. सकाळची दहा वाजण्याची वेळ असेल. श्रीयुक्तेश्वर आणि मी दिवाणखान्यात दुसऱ्या मजल्यावर बसलो होतो. इतक्यात एकदम पुढला दरवाजा उघडला गेला. गुरुजींचे शरीर एकदम ताठ झाले.

"शशीच आहे तो," गुरुजी गंभीरपणे म्हणाले, "एक वर्ष आता पुरे झाले आणि त्याची दोन्ही फुफ्फुसे खलास झाली आहेत. त्याने माझा सल्ला जुमानला नाही. सांग त्याला की, माझी त्याला भेटावयाची इच्छा नाही."

श्रीयुक्तेश्वरांच्या ह्या कठोरपणाने मी अर्धाअधिक गारच पडलो. मी खाली जिन्यावरून धावतच गेलो. शशी वर येत होता.

"अरे मुकुंदा, गुरुजी येथेच आहेत ना? मला अशी अंतःप्रेरणा आली की ते येथेच असावेत."

"होय. आहेत. पण त्यांच्या आरामात कोणी व्यत्यय आणू नये, अशी त्यांची इच्छा आहे."

शशी जोरात रडू लागला व मला बाजूला ढकलून पुढे गेला आणि त्याने श्रीयुक्तेश्वरांच्या पायांशी लोटांगण घातले व त्यांच्यापुढे ती तीन नीलम रत्ने ठेविली.

"सर्वज्ञ गुरुजी, मला क्षय झाला आहे, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. तीन महिन्यांचाच फक्त तू सोबती आहेस, असे ते म्हणताहेत! मी आपल्या दयेची भीक मागत आहे. आपण मला बरे कराल हे मला माहीत आहे!"

"जीविताबद्दल चिंता बाळगायला आता तुला जरा उशीरच नाही का झाला? जा, तुझी रत्ने घेऊन जा. त्यांचा आता काही उपयोग नाही." असे म्हणून गुरुजी अगदी पुतळ्यासारखे उग्र मौन धारण करून बसले. मधून मधून त्या मुलाच्या हुंदक्यांनी ती भेसूर शांतता भंगावत होती.

अंतःस्फूर्तीने माझी अशी खात्री झाली की, रोगनिवारक दैवी शक्तीवर शशीची कितपत निष्ठा आहे याची श्रीयुक्तेश्वर फक्त कसोटी पाहत होते. एक तास असाच तंग वातावरणात गेला. नंतर गुरुजींनी आपल्या पुढ्यात पडलेल्या माझ्या मित्राकडे स्नेहपूर्ण दृष्टीने पाहावयास सुरुवात केली.

"शशी, ऊठ पाहू; काय तू ही दुसऱ्याच्या घरात गडबड चालविली आहेस! ती रत्ने आता जव्हेऱ्याला परत देऊन टाक. त्याचा खर्च आता अनाठायी होणार. पण आता एका ज्योतिष्याकडून हस्तकंकण घे आणि ते वापर. भिऊ नकोस. थोड्याच दिवसांत तू बरा होशील."

शशीच्या मुखावर आलेले स्मित, गवताळ जमिनीवर जसा सूर्य एकदम उगवावा त्याप्रमाणे, अश्रूंनी बिघडलेल्या त्याच्या चेहऱ्यावर चमकू लागले. "प्रिय गुरुजी, डॉक्टरांनी सांगितलेली औषधे आता मी घेऊ का?"

"घे किंवा टाकून दे. तुला जसे वाटेल तसे कर. त्याने त्यात काही फरक होणार नाही. सूर्य किंवा चंद्र आपली स्थाने एक वेळ आपापसांत बदलतील, पण तू क्षयाने कधी मरणार नाहीस आता." श्रीयुक्तेश्वर एकाएकी म्हणाले, "माझ्या मनात बदल होण्याच्या अगोदर इथून निघून जा!"

क्षुब्ध मनःस्थितीत त्याने प्रणाम केला व माझा मित्र घाईघाईने निघून गेला आणि पुढे काही दिवसांत मी त्याला कित्येक वेळा भेटलो पण त्याची तब्येत अधिकाधिकच बिघडत चालली. मी अगदी घाबरून गेलो.

"आता शशीची ही रात्रसुद्धा निभणे कठीण आहे." डॉक्टरांचे हे निर्वाणीचे शब्द; आणि समोर दिसत असलेला माझ्या मित्राच्या शरीराचा सांगाडा. मी ताबडतोब सेरामपुरला गेलो. मी साश्रु नयनांनी सारी हकीकत सांगितली. गुरुजींनी अगदी थंडपणे ती ऐकून घेतली.

"मला त्रास द्यायला येथे का आलास? शशी दुखण्यातून बरा होईल. मी त्याला खात्री दिलीय तशी आणि तुझ्या कानांवर आहे ते."

मला आश्चर्य वाटले आणि भीतीही वाटली. मी त्यांना वाकून नमस्कार केला आणि मागे सरकत सरकत दरवाज्याकडे गेलो. जातेवेळी श्रीयुक्तेश्वर एक शब्दही बोलले नाहीत. ते गप्पच बसले. त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या बिलकुल हलत नव्हत्या. त्या डोळ्यांची दृष्टी वेगळ्याच जगाचा वेध घेत होती.

मी लगोलग कलकत्त्याला परतलो व शशीच्या घरी गेलो. आणि काय आश्चर्य! माझा मित्र बसून दूध पीत होता, असे दृश्य मला दिसले.

“मुकुंदा! काय चमत्कार सांगू? चार तासांपूर्वी ह्या खोलीत मला गुरुजींची चाहूल लागली. माझ्या रोगाची भयंकर लक्षणे ताबडतोब नाहीशी झाली. मला असे वाटतेय की, त्यांच्या कृपेमुळेच मी पूर्णपणे बरा झालो आहे.”

थोड्याच दिवसांत शशी पुनः धट्टाकट्टा झाला आणि पूर्वी कधी नव्हती इतकी त्याची प्रकृती सुधारली. [1] पण तब्येत बरी झाल्यावर त्याची प्रतिक्रिया मात्र तितकीशी बरी झाली नाही. त्यात कृतज्ञतेचा भाव पुरता उतरला नाही. तो पुनः श्रीयुक्तेश्वरांकडे क्वचितच जाई! पण माझ्या मित्राने मला एके दिवशी असे सांगितले की, “माझे चुकले. चुकीच्या मार्गाने मी गेलो. त्यामुळे मला गुरुजींना भेटायला जायची लाज वाटते.”

या त्याच्या बोलण्यावरून मी इतकाच तर्क केला की, शशीच्या दुखण्यामुळे त्याच्या मनावर अगदी उलटा परिणाम घडून आला. त्याची इच्छाशक्ती प्रबळ झाली आहे, पण वागण्याची पद्धत पुर्वीइतकी सौजन्याची राहिली नाही.

स्कॉटिश चर्च कॉलेजमधील माझा दोन वर्षाचा अभ्यासक्रम आता संपत आला. वर्गामध्ये माझी हजेरी यथातथाच होती. जो काही थोडाबहुत अभ्यास केला त्याचा उपयोग इतकाच झाला की, घरातील माणसांची आता माझ्याविरुद्ध काही तक्रार राहिली नाही. मला शिकविणारे दोन खाजगी शिक्षक नियमितपणे आमच्या घरी येत असत आणि मीही नियमितपणे त्या वेळी गैरहजर असावयाचा. अभ्यासाच्या बाबतीत माझा हा एकच असा अनियमितपणा माझ्या चांगला ध्यानात आला.

हिंदुस्थानात कॉलेजमध्ये पहिल्या दोन वर्षाचा अभ्यासक्रम झाला म्हणजे इंटरमीजिएट आर्टस्चा डिप्लोमा मिळतो. नंतर आणखी दोन वर्षाचा अभ्यासक्रम पुरा झाला म्हणजे त्याला बी. ए. डिग्री मिळते.

माझी इंटरमीजिएट आर्टस्ची शेवटची परीक्षा अगदी जवळ येऊन ठेपली होती. मी पुरीला पलायन केले. तेथे गुरुजी काही दिवस जाऊन राहिले होते. ह्या फायनल परीक्षेला तुला बसावयाची काही जरुरी नाही असे काही तरी गुरुजी म्हणतील, अशी मला आपली वेडी आशा होती. मी गुरुजींना चक्क सांगितले की, परीक्षेची माझी काही तयारी झालेली नाही.

माझे थोडेसे समाधान करावे या हेतूने गुरुजींनी किंचित स्मित केले. “तू आपली आध्यात्मिक कर्तव्ये अंतःकरणपूर्वक बजावलेली आहेस. आणि त्यामुळे कॉलेजच्या अभ्यासाकडे तुझे साहजिकच दुर्लक्ष झाले. आता एक आठवडा उरला आहे. तेवढ्या अवधीत जोराने अभ्यास कर; आणि नापास न होता तू ह्या दिव्यातून पार पडशील.”

मी कलकत्त्याला परतलो. वरचेवर माझ्या मनात शंका-कुशंकाचे जे काहूर उठे, त्या शंका-कुशंका मी मनातल्या मनात जोराने दाबून ठेवीत असे. माझ्या टेबलावर पुस्तकांचा पर्वत पडलेला मी पाहत असे, त्या वेळी अरण्यामध्ये वाट चुकलेल्या मुशाफिराप्रमाणे माझी स्थिती होत असे.

बराच वेळ मी ध्यान लावून बसलो. त्याचा असा गमतीचा परिणाम झाला की, अभ्यास करण्याचे माझे बरेचसे श्रम वाचले. कोणतेही पुस्तक वाटेल त्या पानावर उघडावे आणि माझ्या डोळ्यांसमोर जो मजकूर दिसे त्याचाच फक्त मी अभ्यास करी. उरलेल्या एका आठवड्यात दररोज अठरा तास वरील पद्धतीने मी अभ्यास केला. घोकंपट्टी करण्यात मी अगदी पटाईत झालो.

पुढे आमची परीक्षा सुरू झाली. माझा वरील पद्धतीने केलेला, सकृद्दर्शनी असा तसा केलेला, अभ्यास बरोबर ठरला. मी सर्व विषयांत अगदी काठावर यश मिळविले. मित्रमंडळींनी आणि घरातील माणसांनी माझे अभिनंदन केले. अभिनंदनाच्या त्यांच्या उद्गारामध्ये आश्चर्य व्यक्त करणाऱ्या शब्दांचे विचित्रसे मिश्रण होते.

पुरीहून सेरामपुरला परत आल्यावर श्रीयुक्तेश्वरांनी मला एक आश्चर्याची सुवार्ता दिली.

ते म्हणाले, “तुझा आता कलकत्त्याला राहून करण्याचा अभ्यास संपला. विश्वविद्यालयाचा आता शेवटच्या दोन वर्षांचा अभ्यास तुला येथेच सेरामपूरला राहून करता येईल, अशी व्यवस्था करतो.”

मी गोंधळात पडलो. “पण गुरुजी, या शहरात बेचलर ऑफ आर्टस्च्या अभ्यासक्रमाची सोय नाही.” शहरात उच्च शिक्षण देणारे जे सेरामपूर कॉलेज होते. त्यात फक्त इंटरमीजिएट आर्टस्च्या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाची सोय होती.

गुरुजी गंमतीने हसले. “तुझ्याकरिता एखादे बी. ए. कोर्सचे कॉलेज स्थापन करण्याकरिता देणग्या मिळविण्यासाठी खटपट करण्याचे माझे वय राहिले नाही. मला वाटते की, ह्या बाबतीत दुसऱ्या कोणाच्या तरी मदतीने मला हे काम करावे लागेल.”

यावर दोन महिने उलटले. सेरामपूर कॉलेजचे अध्यक्ष प्रोफेसर हॉवेल्स यांनी असे जाहीर केले की, चार वर्षाच्या कोर्सचे शिक्षण देण्याकरिता पुरेसे आर्थिक साहाय्य त्यांनी जमविलेले आहे. यथावकाश सेरामपूर कॉलेज हे कलकत्ता विश्वविद्यालयाला जोडलेले असे कॉलेज झाले. सेरामपूरला बी. ए. चा विद्यार्थी म्हणून नाव दाखल केलेल्या पहिल्या तुकडीमध्ये मी होतो.

“गुरुजी, माझ्यावर किती ममता आहे तुमची! कलकत्ता सोडून इथे सेरामपूरला तुमच्याजवळ राहायची माझी किती इच्छा होती! प्रोफेसर हॉवेल्सना कल्पना नसेल की, आपली त्यांना किती सुप्त मदत होते आहे!”

लटक्या रागाने श्रीयुक्तेश्वरांनी माझ्याकडे पाहिले. “आता तुला प्रवास करण्यात तासन तास वेळ घालवायची जरुरी नाही. तुला अभ्यासाला आता किती मोकळा वेळ मिळेल! आता तुला अगदी आयत्या वेळी घोकंपट्टी करून काठावर पास होऊन चालायचे नाही. नंबर वरती आला पाहिजे.”

पण काही म्हणा, त्यांच्या आवाजात स्वतःच्या बोलण्याची खात्री [2] नव्हती.



*श्री योगानंद वयाच्या सोळाव्या वर्षी*

1 १९३६ मध्ये मी चौकशी केली व मला समजले की, शशीची तब्येत अजून उत्कृष्ट स्थितीत आहे.

2 इतर पुष्कळ सत्पुरुषांप्रमाणे श्रीयुक्तेश्वरांना सुद्धा आधुनिक शिक्षणाची गाडी जडवादाकडे, भोगवादाकडे झुकत आहे याबद्दल वाईट वाटत असे. खऱ्या सुखाचा लाभ आध्यात्मिक नीतिनियमांच्या पालनानेच होतो; परमेश्वराला भिऊन वागण्यानेच किंवा आपल्याला निर्माण करणाऱ्याबद्दल आदरयुक्त भीतीची भावना सदैव मनात बाळगल्यानेच आयुष्याला योग्य वळण लागते व त्यातच शहाणपणा आहे ही गोष्ट फारच थोड्या शाळांतून विशद करून सांगितली जाते.

शाळांमधून आणि कॉलेजांमधून तरुण मुलांना आजकाल असे शिकविले जाते की, मनुष्य हा फक्त एक 'सुसंस्कृत पशू' आहे. असे तरुण पुढे नास्तिक बनतात. ते आत्मशोधनाचा कधी प्रयत्न करीत नाहीत किंवा आपण मूलतः परमेश्वरस्वरूपाचेच प्रतिबिंब आहोत असे मानीत नाहीत. इमर्सन म्हणतो: "आपल्या अंतरंगी जे आहे तेच फक्त आपण बाहेर पाहू शकतो. आपल्याला जर परमेश्वर भेटत नसेल तर त्याचे कारण हे की, आपण ईश्वरच मुळी मानीत नाही." जो आपल्या स्वतःचे पशूपणच फक्त सत्यस्वरूप आहे असे समजतो, अशी कल्पना करून घेतो, त्याचा दिव्य आकांक्षांशी ताबडतोब संबंध तुटतो.

ज्या शैक्षणिक पद्धतीत मानवप्राण्याच्या अस्तित्वाचा मध्यवर्ती गाभा हा आत्मा आहे या तत्त्वाचा पुरस्कार केला जात नाही, ती शैक्षणिक पद्धती अविद्येचा प्रसार करते. "तू म्हणतोस मी श्रीमंत आहे; आणि माझ्याजवळ धनदौलत नि मालमत्ता आहे आणि मला कशाचीही वाण नाही; पण तुला समजत नाही की, तू करंटा आहेस, अभागी आहेस, दरिद्री आहेस, आंधळा आहेस आणि तुझ्या अंगावर वस्त्र सुद्धा नाही." (रेव्हे ३-१७, बायबल).

प्राचीन भारतामध्ये मुलांना शिक्षण देण्याची पद्धती आदर्श होती. वयाच्या नवव्या वर्षी मुलाचा गुरुकुलामध्ये (गुरुगृही—शाळेमध्ये) 'पुत्र' म्हणून प्रवेश होई. प्रोफेसर एस. व्ही. वेंकटेश्वर 'इंडियन कल्चर थ्रू द एजेस' (व्हॉ १; लांगमन्स ग्रीन ॲण्ड कं.) या ग्रंथात लिहितात: "आधुनिक काळातील विद्यार्थी प्रत्येक वर्षी आपला एकअष्टमांश वेळ शाळेत घालवितो. भारतातील विद्यार्थी आपला सगळा वेळ तेथेच घालवीत असे—तेथे जूट व जवाबदारीची स्पृहणीय भावना जागृत असे; आणि त्या ठिकाणी स्वावलंबन व व्यक्तित्व यांचा विकास होण्यास भरपूर वाव असे. तेथे म्हणजे गुरुकुलात संस्कृती, स्वयंनियंत्रित शिस्त, कर्तव्यदक्षता, निःस्वार्थ कार्य, स्वाभिमान व दुसऱ्यांच्याबद्दल पुज्यभाव ह्या गुणांनी युक्त अशी त्यागवृत्ती, या गुणांचे परिमाण फार उच्च दर्जाचे होते. त्या ठिकाणी बौद्धिक दर्जा उच्च श्रेणीचा होता; त्या ठिकाणी अभिजात गुण वास करीत होते; मानवी आयुष्याचे उच्च ध्येय काय आहे याची पुरेपूर जाणीव होती.

प्रकरण - १८

# 18. एक मुसलमान जादूगार

"पुष्कळ वर्षे झाली, अगदी ह्याच खोलीत जिथे तू सध्या राहत आहेस तिथे एका मुसलमान किमयागाराने माझ्यासमोर चार चमत्कार करून दाखविले होते!"

माझ्या नवीन जागेत प्रथमच जेव्हा श्रीयुक्तेश्वर आले तेव्हा त्यांनी हे वरील विधान केले. सेरामपूर कॉलेजमध्ये दाखल झाल्याबरोबर अगदी ताबडतोब मी जवळच एका बोर्डिंग हाऊसमध्ये एक खोली घेतली. त्या बोर्डिंग हाऊसचे नाव होते 'पंथी' गंगेच्या दर्शनी असलेली ती एक जुन्या पद्धतीची विटांची इमारत होती.

"गुरुजी, काय योगायोग आहे! ह्या नवीनच सुशोभित केलेल्या भिंतीच्या पाठीमागे जुन्या स्मृतींचा खरोखरी काही इतिहास आहे काय?" आता मी सभोवार अगदी साध्या पद्धतीने तयार केलेल्या खोलीमध्ये एका नवोदित कुतूहलाने पाहू लागलो.

"ती फार लांबलचक गोष्ट आहे." गुरुजींनी जुन्या आठवणींना उजाळा देत स्मित केले. "त्या फकिराचे नाव होते अफझलखान. एका हिंदू योग्याशी त्याची अचानकपणे गाठ पडली आणि त्या योग्यापासून त्याला असामान्य सिद्धी प्राप्त झाल्या.

"बेटा, मला तहान लागली आहे, थोडे पाणी आण." ही अशी विनंती एका धुळीने माखलेल्या संन्याशाने एके दिवशी अफझलला केली. अफझलचे त्या वेळी अगदी लहान वय होते व तो पूर्वबंगालमध्ये एका लहानशा खेड्यामध्ये राहत होता.

"महाराज, मी मुसलमान आहे. आपण हिंदू, माझ्या हातचे आपण कसे पाणी घेणार?"

"बेटा, तुझ्या खरे बोलण्याने मला आनंद झाला. जातीयतेच्या भेदभावांनी भरलेल्या स्पर्शास्पर्शाच्या अधार्मिक नियमांना मी मान्यता देत नाही. जा, लवकर पाणी घेऊन ये."

अफझलने आदरपूर्वक आज्ञापालन केले. त्याचे बक्षीस म्हणून की काय, त्या योग्याने त्याच्याकडे एक प्रेमळ दृष्टिक्षेप केला.

"तुझे पूर्वजन्मीचे सुकृत चांगले आहे," त्यांनी गंभीरपणे सांगावयास सुरुवात केली. "मी तुला एक योगक्रिया शिकविणार आहे की, जिच्यामुळे तुला अदृश्य लोकांवर हुकुमत गाजविता येईल. जी महान सिद्धी मी तुला देणार आहे, तिचा उपयोग फक्त योग्य कारणाकरिताच केला पाहिजे. स्वार्थाकरिता त्याचा कधीही उपयोग करू नकोस. पण दुर्दैव असे की, तू आपल्याबरोबर मागील जन्मातील काही विध्वंसक प्रवृत्ती आणल्या आहेस, असे मला दिसत आहे. त्या विध्वंसक प्रवृत्तींच्या बीजांना आणखी काही दुष्कृत्यांचे पाणी घालून अंकुर फुटू देऊ नकोस. तुझ्या पूर्वसंचिताची अशी गुंतागुंत आहे की, त्यामुळे तुझ्या योगिक सिद्धी तू उच्च व परोपकारी ध्येयाकरिता वापराव्यास."

ह्या बोलण्यामुळे तो मुलगा अगदी चकित झाला. त्याला एक अवघड योगतंत्र शिकवून तो संन्यासी नाहीसा झाला.

अफझलने निष्ठापूर्वक वीस वर्षे त्या योगक्रियेचे आचरण केले. त्याच्या चमत्कारामुळे अगदी दूरवरच्या लोकांचे लक्ष त्याच्याकडे वेधू लागले. त्याच्याबरोबर एक विदेही आत्मा सतत वावरत असे, असा तर्क आहे. त्याला तो ‘हझरत’ या नावाने संबोधीत असे. ही अदृश्य व्यक्ती त्या फकिराची अगदी क्षुल्लकशीही इच्छा पूर्ण करीत असे.

आपल्या गुरूने दिलेली ताकीद न जुमानता अफझल आपल्या शक्तीचा दुरूपयोग करू लागला. कोणतीही वस्तू तो जेव्हा हातात घेई आणि ती परत जागच्या जागी ठेवी, तेव्हा ती वस्तू अगदी बेमालूम नाहीशी होत असे. अशा बेचैन व अस्वस्थ करणाऱ्या संभवनीय गोष्टींमुळे त्या मुसलमान फकिराला कोणी बोलावीत नसत!

त्याने कलकत्त्यामधील जवाहिऱ्याच्या मोठमोठ्या पेढ्यांतून गिऱ्हाईक म्हणून भेट द्यावी व त्याने एखाद्या रत्नास हात लावावा, की तो दुकानातून बाहेर पडल्यावर थोडक्याच वेळात ती वस्तू नाहीशी होत असे.

अफझलच्या भोवती नेहमी शेकडो चेल्यांचा घोळका असावयाचा. आपल्या उस्तादजीचे इल्म आपण शिकू, अशी त्यांची उमेद असावयाची. फकीर प्रसंगोपात्त त्यांना आपल्याबरोबर प्रवासास जायच्या वेळी बोलावीत असे. स्टेशनवर गेल्यावर तिकिटांच्या गठ्ठयाला तो कोणत्या ना कोणत्या तरी निमित्ताने हात लावी. नंतर तो ती तिकिटे कारकुनाकडे परत देई व म्हणे, “आमचा विचार आम्ही आता बदलला आहे. तेव्हा ही तिकिटे आम्ही काही घेत नाही.” पण जेव्हा तो आपल्या मंडळीसह गाडीमध्ये चढून बसत असे, तेव्हा ती सर्व तिकिटे [1] त्याच्याजवळ बिनचूक येत.

अशा ह्या उद्योगांमुळे सर्वत्र हाहाकार उडाला. बंगालमधील सराफ व रेल्वेवरील तिकिट-कारकून यांच्यामध्ये मोठी घबराट उडाली. त्यांच्या मनावर अनिष्ट परिणाम होऊ लागला. त्याला पकडावयास निघणाऱ्या पोलिसांनी त्याच्यापुढे हात टेकले. त्याच्याविरुद्ध गोळा केलेला पुरावा तो वाटेल तसा नाहीसा करी. ‘हझरत, हे घेऊन जा’ असे फक्त म्हणे.

श्रीयुक्तेश्वर आपल्या जागेवरून उठले व माझ्या खोलीच्या समोरील गॅलरीत उभे राहिले. समोरच गंगेचे पात्र होते. मीही त्यांच्या पाठोपाठ गेलो. त्या रहस्यमय मुसलमान फकिराच्या गोंधळात पाडणाऱ्या पराक्रमांची आणखी हकीकत ऐकण्याची माझी उत्सुकता वाढू लागली. ते सांगू लागले:

“ही ‘पंथी’ इमारत पूर्वी माझ्या एका मित्राच्या मालकीची होती. त्याचीही अफझलशी ओळख झाली आणि त्याने त्याला येथे बोलावले. माझ्या मित्राने आणखी वीस-एक शेजारी बोलाविले, त्यांत मीसुद्धा एक होतो. मी त्या वेळी किशोरावस्थेमध्ये होतो; आणि ह्या कुप्रसिद्ध फकिराबद्दलची माझी जिज्ञासा आता अगदी तीव्र झाली होती.” गुरुजी हसून म्हणाले, “मी काही-एक किमती जिन्नस बरोबर न घेण्याची खबरदारी घेतली होती! अफझलने माझ्यावरून कुतूहलपूर्ण दृष्टी फिरविली व नंतर तो म्हणाला.

“तुझे हात चांगले मजबूत आहेत. खाली बागेत जा आणि एक चांगला गुळगुळीत दगड घेऊन ये आणि त्याच्यावर तुझे नाव खडूने लिही आणि मग गंगेमध्ये तुला जेथपर्यंत फेकता येईल तो दगड फेकून दे.”

"हुकुमाची अंमलबजावणी झाली. अगदी दूर प्रवाहात लाटांमध्ये तो दगड नाहीसा झाल्यावर तो मुसलमान फकीर मला सांगू लागला.

"'ह्या घराच्या समोरील गंगेच्या पाण्याने हा एक लोटा भरून घेऊन ये.'

आणि त्याप्रमाणे पाण्याचा लोटा घेऊन आल्यावर फकीर ओरडला 'हझरत, ह्या लोट्यात दगड टाक!'

"ताबडतोब एक दगड त्या पाण्यावर प्रकटला. दगड त्या लोट्यातून मी बाहेर काढला आणि त्याच्यावर माझी सही अगदी स्पष्ट, जशी मी केली होती तशी, केलेली मला आढळून आली.

"त्या खोलीत बाबू [2] नावाचा माझा एक मित्र पण होता. तो एक सोन्याचे जुने, जडसे घड्याळ व साखळी वापरीत असे. फकीर ते घड्याळ व साखळी कौतुकाने पाहू लागला. ते कौतुक कसले! आपत्तीच ओढवलेली! झाले, थोड्याच वेळात दोन्ही जिनसा गायब झाल्या!

"'अफझल, माझ्या जिनसा परत कर पाहू, वाडवडिलार्जित किमती जिनसा आहेत त्या माझ्या!' बाबू अगदी रडकुंडीस आला होता.

"त्या मुसलमान फकिराने थोडा वेळ औदासीन्यपूर्ण मौन धारण केले. नंतर म्हणाला, 'लोखंडी तिजोरीत तुझे पाचशे रुपये आहेत ते घेऊन ये. मग तुला सांगतो तुझे घड्याळ कुठे आहे ते.'

"बाबूची वेड्यागत स्थिती झाली. तो निमूटपणे ताबडतोब आपल्या घरी गेला, थोड्याच वेळात परत आला व त्याने मुकाट्याने रक्कम अफझलच्या स्वाधीन केली.

"'तुझ्या घराजवळच्या लहान पुलाजवळ जा.' फकिराने बाबूला फर्मावले. 'हझरतचे नाव पुकार आणि तुझे घड्याळ व साखळी त्याला द्यायला सांग.'

"बाबू लागलीच निघाला. परत जेव्हा आला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे चिन्ह होते, पण जवळ जिनसा काही नव्हत्या.

"'सांगितल्याप्रमाणे मी हझरतच्या नावाचा पुकारा केला,' तो जाहीरपणे सांगू लागला, 'आणि माझे घड्याळ हवेतून घरंगळत माझ्या उजव्या हातात आले! ते घेऊन लगोलग मी घरी गेलो. तिजोरीत ते बंदोबस्ताने ठेवले आणि नंतर हा पुढे तुमच्यासमोर येऊन उभा राहिलो आहे!'

"बाबूचे मित्र ह्या हास्य-करुणाजनक नाट्यपूर्ण प्रसंगाचे प्रत्यक्ष साक्षीदार होते. ते अफझलकडे रागाने पाहत होते. तो आता समजूत घालण्याच्या दृष्टीने बोलू लागला.

"'तुम्हांला जे कोणते पेय पाहिजे असेल ते सांगा. हझरत ते आणून देईल.'

"पुष्कळजणांनी दूध मागितले. काहींनी फळांचा रस मागितला. घाबरून गेलेल्या बाबूने व्हिस्की मागितली! मला इतकासा धक्का बसला नाही. त्या मुसलमान फकिराने ऑर्डर दिली. हुकुमाचा ताबेदार जो 'हझरत' त्याने सीलबंद बाटल्या घरंगळत आणवून जमिनीवर आदळल्या. त्या बाटल्यांत प्रत्येकाला आपापल्या पसंतीचे पेय आढळून आले.

"त्या दिवशीचा चौथा चमत्कार काही अपूर्वच होता. आमच्या यजमानाला त्याने अगदी संतोष दिला. अफझलने सगळ्यांना ताबडतोब एक खाना मागविला!

“बाबूने उदासपणे सूचना केली, ‘आपण अगदी उंची खाद्यपेये मागवू या. माझ्या पाचशे रुपयांच्या किमतीचे अगदी विविध पक्वान्नांनी भरलेले असे भोजन मला पाहिजे. सगळ्यांना सोन्याच्या ताटांत भोजन दिले पाहिजे.’

“प्रत्येकाने जसजशी आपल्या आवडीच्या पदार्थांची नावे सांगितली, तसतसा हुकूम, फकिराने कधीही थकून न जाणाऱ्या ‘हझरत’ला फर्मावला. भांड्यांचा खडखडाट एकदम सुरू झाला. सोन्याची ताटे नाना तऱ्हेच्या पक्वान्नांनी आणि षड्रसांनी भरलेली कोठून तरी आमच्या पुढ्यात येऊन पडली. त्या ताटांमध्ये नाना तऱ्हेच्या मसाल्यांनी भरलेल्या खमंग भाज्या, गरमागरम लुची आणि ह्या दिवसांत न आढळणारी फळे भरलेली होती. सर्व खाद्यपदार्थ अगदी रुचकर होते. एक तासभर साधारण आम्ही भोजनाचा आस्वाद घेत होतो. नंतर आम्ही खोलीबाहेर पडलो. त्याबरोबर एक मोठा खडबडाट, जसा ताटे एकावर एक ठेवल्यावर होतो तसा ऐकू आला. आम्ही मागे वळून पाहिले, आणि काय आश्चर्य! ती चमकदार ताटे एकदम गायब झाली. उष्ट्या-खरकट्याची एक निशाणीसुद्धा तिथे दिसेना.”

मी मध्येच बोललो, “गुरुजी, जर अफझलला सोन्याची ताटे इतक्या सुलभपणे मिळत होती तर त्याने दुसऱ्याच्या मालमत्तेचा लोभ का धरावा?”

श्रीयुक्तेश्वर खुलासा करू लागले, “तो फकीर आध्यात्मिक दृष्ट्या फार प्रगत झालेला नव्हता. त्याला फक्त एक योगतंत्र माहीत होते. त्या सिद्धीच्या जोरावर तो एका अन्य लोकात प्रवेश मिळवी आणि त्या लोकात कोणत्याही इच्छेची ताबडतोब पूर्ती होत असे. हझरत नावाच्या एका परलोकातील प्राण्याच्या मार्फतीने तो मुसलमान फकीर अंतरिक्षातून (Etheric Energy) कोणत्याही पदार्थाच्या परमाणूंना आपल्या प्रभावी इच्छाशक्तीच्या जोरावर पाचारण करी; पण असे सूक्ष्म परलोकात उत्पन्न झालेले पदार्थ बनावटीच्या दृष्टीने क्षणिक असतात. ते फार काळ टिकू शकत नाहीत. [3] अफझलला अजूनपर्यंत ऐहिक संपत्तीची हाव होती, जी मिळविण्यास जरी अधिक कष्ट होतात तरी ती अधिक काळ टिकत असे.”

मी हसलो. “ती सुद्धा अशीच अचानकपणे नाहीशी होते!”

“अफझल हा काही साक्षात्कारी पुरुष नव्हता,” गुरुजी पुढे म्हणाले, “स्थायी आणि परोपकारी स्वरूपाचे चमत्कार फक्त खऱ्या सिद्धसंतांना करून दाखविता येतात. कारण की, ते सर्वशक्तिमान परमात्म्याशी एकरूप झालेले असतात. अफझल हा केवळ एक सामान्य माणूस होता. पण त्याला सूक्ष्म अशा परलोकात भेदून जाण्याची एक असामान्य शक्ती होती; की जी शक्ती सामान्यतः मृत्यूपावेतोपर्यंत मर्त्य अशा मानवांना प्राप्त होऊ शकत नाही.”

“मला समजले आता, गुरुजी. हा परलोक मोठा मनोहारी असेल नाही?”

गुरुजींनी संमती दिली. “त्यानंतर मला कधी अफझल दिसला नाही. पण काही थोड्या वर्षांनी एकदा बाबू माझ्या घरी आला आणि त्याने मला त्या मुसलमान फकिराच्या जाहीर कबुलीजबाबाची वर्तमानपत्रांत आलेली हकीकत दाखविली. त्यावरूनच त्याला एका हिंदू गुरूकडून अल्पवयात अनुग्रह प्राप्त झाल्याची जी हकीकत मी तुला आता सांगितली ती मला कळून आली.”

त्या छापलेल्या हकीकतीचा पुढच्या भागाचा सारांश जो मला पुढे श्रीयुक्तेश्वरांनी सांगितला तो असा: “मी, कबुलीजबाब देणारा अफझल खान, असा जबाब देतो की, मला आता मोठा अनुताप झाला आहे व प्रायश्चित्त म्हणून मी असे कबूल करीत आहे. सिद्धिसामर्थ्यांची ज्यांना हाव आहे त्यांनाही ही धोक्याची सूचना दिल्यासारखी आहे. किती एक वर्षे परमेश्वरकृपेने प्राप्त झालेल्या व माझ्या गुरूने मला दिलेल्या ह्या विस्मयकारी सिद्धिसामर्थ्याचा मी दुरुपयोग करीत होतो. अहंकाराने व दंभाने मी माजलो व सामान्य लोकांना लागू असलेल्या नीतिनियमांच्या पलीकडे मी स्वतःला मानू लागलो. माझा शेवटचा न्यायाचा दिवस उजाडला.

“नुकताच मला कलकत्त्याच्या बाहेर रस्त्रयावर एक म्हातारा इसम भेटला. तो रस्त्रयावरून लंगडत चालला होता. त्याला वेदना होत होत्या. त्याच्या हातात एक चकाकणारी वस्तू होती. ती सोन्यासारखी दिसत होती. लोभी अंतःकरणाने मी त्याला म्हणालो.

‘मी तो प्रसिद्ध फकीर अफझल खान. काय आहे तुझ्याजवळ ते?’

‘हा सोन्याचा गोळा म्हणजे माझी एकुलती एक चीजवस्तू आहे. फकिराला त्याचा काय उपयोग आहे? बाबा, मी तुला विनवणी करतो, माझे हे लंगडेपण बरे करशील काय?’

“मी त्या गोळ्याला स्पर्श केला आणि काही उत्तर न देता पुढे चालू लागलो. तो म्हातारा माझ्या पाठीमागे फरफटत धावला आणि मोठ्याने आरडाओरडा करू लागला—‘माझं सोनं चोरीला गेलं हो गेलं!’

“मी त्याच्याकडे लक्ष दिले नाही, पण एकदम त्याने मोठ्या, खणखणीत आवाजात त्याच्या दुबळ्या शरीरातून क्वचितच निघू शकणाऱ्या अशा आवाजात बोलावयास सुरुवात केली.

‘मला ओळखलं नाहीस काय तू?’

“मी अवाक् झालो; ज्या महात्म्याने मला फार फार वर्षांपूर्वी योगाची दीक्षा दिली तोच हा अगदी सामान्य असा दिसणारा म्हातारा लंगडा इसम होय, हे जेव्हा बऱ्याच वेळाने माझ्या लक्षात आले तेव्हा मी आश्चर्याने घाबरूनच गेलो. त्याने स्वतःचे शरीर ताठ केले. त्याचे शरीर एकदम धडधाकट व तरुणासारखे झाले.

‘अस्से!’ माझ्या गुरूंची दृष्टी खदिरांगारासारखी दिसत होती. ‘मी माझ्या डोळ्यांनी पाहत आहे की, तू आपल्या योगसिद्धी दीनदुबळ्यांना मदत करण्यासाठी वापरत नसून त्यांच्यावर चोरासारखा चरण्यासाठी वापरत आहेस. मी तुझ्या सिद्धी काढून घेतो. हझरतला तुझ्यापासून आता मुक्त केले आहे. आता बंगालमध्ये तुझी कोणालाही यापुढे भीती वाटावयाची नाही.’

“मी हझरतच्या नावाने केविलवाण्या आवाजात पुकारा केला. आता पहिलीच वेळ अशी आली की, माझ्या अंतर्दृष्टीला तो दिसून येईना. पण एक काळा अंधकारमय पडदा उचलला गेला. माझ्या जीवनामधील ईश्वरद्रोह मला स्पष्ट दिसून आला.

‘गुरुमहाराज, इतक्या वर्षांचा माझा भ्रम दूर करण्यास आपण आलात; फार आभारी आहे.’ मी त्यांच्या पायांशी हुंदके देत देत रडत होतो. ‘ह्या दुनियेतील साऱ्या आकांक्षांवर, अभिलाषांवर उदक सोडण्याचे मी वचन देतो. आता मी परमेश्वराच्या एकान्त चिंतनासाठी गिरिकंदरात निघून जातो. तेथे माझ्या दुष्कृत्यांबद्दल मला प्रायश्चित्त मिळेल अशी आशा आहे.’

“माझ्या गुरूंनी माझ्याबद्दल शांत करुणाभाव प्रदर्शित केला. ते शेवटी म्हणाले, ‘तुझा प्रामाणिकपणा मी ओळखतो; पुर्वी सुरुवातीला तू अतिशय आज्ञाधारक होतास, आणि आता तुला पश्चात्ताप झालेला आहे, म्हणून मी तुला एक वर देतो. तुझ्या इतर सिद्धी आता गेलेल्या आहेत. पण जेव्हा जेव्हा तुला अन्न आणि वस्त्र यांची जरूर लागेल तेव्हा तू हझरतला हाक मारावीस तो त्या वेळी जरूर येईल व तुझी नड भागवील. गिरिकंदरातील एकान्तामध्ये दिव्यत्वाची जाणीव होण्याकरिता संपूर्ण अंतःकरणाने भक्ती कर!’

“माझे गुरू नंतर अदृश्य झाले. मला आता अश्रू ढाळण्यापलीकडे व चिंतन करण्यापलीकडे दुसरे काही राहिले नाही. दुनिये, हा तुला माझा शेवटचा सलाम! मालिकची माफी मागण्यासाठी मी आता निघून जातो.”

1 माझ्या वडिलांनी पुढे मला सांगितले होते की, त्यांच्या बंगाल-नागपूर रेल्वे कंपनीलासुद्धा ह्या अफझलखानाने चांगलेच फसवलेले होते.

2 श्रीयुक्तेश्वरांच्या ह्या मित्राचे नक्की नाव मला आता काही आठवत नाही. तेव्हा त्यांचा ‘बाबू’ ह्या साध्या नावाने उल्लेख करीत आहे.

3 ज्याप्रमाणे सूक्ष्म परलोकात निर्माण झालेले माझे रुप्याचे ताइत शेवटी या भूलोकातून नाहीसे झाले. (परलोकाचे वर्णन ४३ व्या प्रकरणात दिले आहे.)

प्रकरण - १९

# 19. माझे गुरू कलकत्त्यात असूनही सेरामपूरमध्ये प्रकट होतात

"नास्तिकवादाचे संशय मला वारंवार पछाडीत. असे असून एक क्लेशकारक तर्क मधून मधून मला त्रास देतो. आत्म्याच्या स्वरूपाविषयी अद्याप काही संभवनीय तर्क असू शकणार नाहीत काय? मनुष्याने जर आत्मशोधनाची काहीएक खटपट केली नाही, तर त्याच्या खऱ्या अंतिम भवितव्यापासून तो वंचित होणार नाही ना?"

'पंथी' बोर्डिंग हाऊस मधल्या खोलीमधील माझा सहवासी दिजेनबाबू याच्या तोंडून वरील उद्‌गार, मी जेव्हा गुरुजींना भेटावयास बोलाविले त्या वेळी, बाहेर पडले.

"श्रीयुक्तेश्वरजी तुला क्रियायोगाची दीक्षा देतील," मी उत्तर केले. "त्या साधनेने आंतरिक दिव्यत्वाची खात्री पटल्यावर मनामधील हा सारा द्वैताचा झगडा आपोआपच मिटेल."

त्या दिवशी संध्याकाळी दिजेन माझ्याबरोबर आश्रमात आला. गुरुजींच्या सान्निध्यात माझ्या मित्राच्या मनाला इतकी आध्यात्मिक शांती मिळाली की, पुढे तो आश्रमात वारंवार येऊ लागला.

दैनिक जीवनातील किरकोळ गोष्टींनी माणसाच्या अतिगूढ अशा गरजा भागत नाहीत. ज्ञान प्राप्त करून घेण्याची सुद्धा माणसाची एक नैसर्गिक भूक असते. श्रीयुक्तेश्वरांच्या शब्दांनी दिजेनला आपल्या अंतर्यामी असलेल्या खऱ्या 'अहं'च्या शोधनाची प्रेरणा दिली. क्षणिक जीवनाच्या क्षुद्र 'अहं' भावनेने त्याचे समाधान होईना.

दिजेन आणि मी दोघे सेरामपूर कॉलेजमध्ये बी. ए. चा अभ्यास बरोबर करीत होतो. दररोज अभ्यासाचे वर्ग संपले की मग नंतर आश्रमापर्यंत बरोबर चालत चालत जाण्याचा आम्हांला सराव झाला. श्रीयुक्तेश्वर बहुधा दुसऱ्या मजल्यावरील बाल्कनीत उभे असावयाचे आणि तिथूनच आमचे स्वागत करावयाचे.

एके दिवशी दुपारी आश्रमातील एक तरुण रहिवासी कनई आम्हांला दारावरच भेटला व आमचा हिरमोड होईल अशी बातमी देऊन गेला.

"गुरुजी आता येथे नाहीत. काही तातडीच्या निरोपावरून ते कलकत्त्याला निघून गेले आहेत."

दुसऱ्या दिवशी गुरुजींकडून मला एक पोस्टकार्ड मिळाले. "बुधवारी सकाळी मी कलकत्त्याहून निघेन." त्यांनी लिहिले होते. "तू आणि दिजेन दोघे सेरामपूर स्टेशनवर सकाळी नऊच्या गाडीला भेटा. बुधवारी सकाळी सुमारे साडेआठ वाजता माझ्या मनात श्रीयुक्तेश्वरांचा दूरध्वनिद्वारा संदेश सारखा थडकू लागला की, 'मला निघायला उशीर झाला आहे. नऊच्या गाडीला माझी वाट पाहू नका.'

नुकताच हाती आलेला निरोप मी दिजेनला कळविला. तो कपडे करून बाहेरच जायला निघाला होता.

"तू आणि तुझी अंतःस्फूर्ती!" माझ्या मित्राच्या आवाजात तिरस्काराची कड आली होती. "गुरुजींच्या लेखी पत्रावर मी अधिक विश्वास ठेवणार."

मी खांदे हलविले व शांतपणे खाली बसलो. रागाने पुटपुटत दिजेन दरवाज्यापर्यंत गेला आणि मोठ्या आवाजाने दार लावून घेऊन बाहेर पडला.

खोलीत जरा अंधार होता म्हणून मी जरा रस्त्र्याकडे असलेल्या खिडकीकडे पुढे सरकलो. कमी कमी होत जाणारा सूर्यप्रकाश एकदम उलट वाढू लागला व त्याचे पर्यवसान अत्यंत झगझगीत तेजस्वी प्रकाशात झाले. लोखंडी गजांची खिडकी अजिबात नाहीशी झाली. ह्या देदीप्यमान प्रकाशझोताच्या पार्श्वभूमीवर श्रीयुक्तेश्वरांची अगदी स्पष्ट अशी स्थूल मूर्ती दृग्गोचर झाली!

धक्का बसावा इतका मी गांगरून गेलो. खुर्चीवरून उठून मी त्यांच्यापुढे ओणवा झालो. गुरुजींच्या पादवंदनाच्या माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मी त्यांच्या पादत्राणांना स्पर्श केला. त्यांच्या पादत्राणांची ही जोडी माझ्या चांगल्या परिचयाची होती. त्यांची पादत्राणे म्हणजे सणाचा तळवा असलेले भगव्या रंगाचे कॅनव्हास शूज. त्यांचे भगव्या रंगाचे वस्त्र मला स्पर्श करत होते. त्यांच्या अंगरख्याच्या कापडाची धाटणी मी बरोबर ओळखली. त्यांच्या पादत्राणांचा खरखरीतपणा आणि त्या पादत्राणांमध्ये त्यांचे पायांचे आंगठे दाब देत असल्याचे माझ्या ध्यानात आले. मी अगदी अवाक् झालो; आणि त्यांच्याकडे फक्त प्रश्नार्थक मुद्रेने नुसता पाहू लागलो.

"तुला माझा प्रेरित निरोप मिळाला; ठीक झाले. आनंद वाटला मला." गुरुजींचा आवाज शांत, अगदी नेहमीसारखा होता. "माझे कलकत्त्यातले काम संपले आहे. आता मी सेरामपूरला दहाच्या गाडीने येत आहे."

मी फक्त शुंभासारखा त्यांच्याकडे पाहत राहिलो आहे, हे पाहून श्रीयुक्तेश्वर बोलू लागले, "हे काही माझे भूत नाही, रक्तमांसाचा हा माझा खराखुरा देह आहे. पृथ्वीवर ज्याचा अनुभव क्वचितच मिळू शकतो, असा हा अनुभव तुला घडवून आणण्यास मला परमेश्वराने आज्ञा केली आहे. मला स्टेशनवर भेट. दिजेनला आणि तुला मी तुमच्याकडे येताना दिसेन, त्या वेळी माझ्या अंगावर कपडे आता आहेत तसेच असतील. माझ्या अगोदर एक दुसरा उतारू येईल. एक लहानसा मुलगा हातात एक चांदीचा लोटा घेऊन येताना दिसेल."

गुरुजींनी माझ्या मस्तकावर दोन्ही हात ठेवले व आशीर्वादाचे शब्द ते पुटपुटले. ज्या वेळी त्यांनी "तबे असि" [1] ह्या निरोप घेण्याच्या वेळचे शब्द उच्चारले, तेव्हा मी एक विलक्षण चमत्कारिक घरघरणारा आवाज [2] ऐकला. त्या विदारक प्रकाशात त्यांचा देह वितळू लागला. प्रथम त्यांची पावले व पाय नाहीसे झाले; नंतर धड व डोके, जशी एखादी कागदाची सुरनळी गुंडाळत जावी तसे त्यांचे शरीर गुंडाळत नाहीसे झाले. अगदी शेवटच्या घटकेपर्यंत त्यांची बोटे माझ्या केसांवर टेकलेली मला वाटत होती. देदीप्यमान प्रकाश

अंधुक होऊ लागला. आणि माझ्यासमोर ती गजांची खिडकी आणि फिक्का सूर्यप्रकाश यांखेरीज काही उरले नाही.

मी अर्धवट गुंगीत होतो. 'चित्तभ्रम तर नाही ना मला झाला?' असे मी माझ्या मनाला विचारीत होतो. चेहरा हिरमुसलेला असा दिजेन खोलीत प्रवेश करिता झाला.

"नऊच्या गाडीला काय किंवा साडेनऊच्या गाडीला काय, गुरुजी दिसलेच नाहीत." थोड्याशा क्षमायाचनेच्याच आवाजात माझ्या मित्राने ही घोषणा केली.

"चल, मला माहिती आहे की ते दहा वाजता येतील." मी दिजेनचा हात धरला व त्याला जबरदस्तीने बाहेर काढले. त्याने पुष्कळ कुरकुर केली. त्याला मी जुमानले नाही. दहा मिनिटांत आम्ही स्टेशनच्या आवारात शिरलो. गाडी प्लॅटफॉर्मवर येत येत धुसधुस करीत थांबण्याच्या बेतात आली होती.

"सगळी गाडी गुरुजीभोवतीच्या तेजोवलयाच्या प्रकाशाने भरून गेली आहे, ते पाहा तेथे." मी एकदम आनंदाने ओरडलो.

दिजेन चेष्टा करीत हसत म्हणाला, "स्वप्नात आहेस की काय तू?"

"आपण येथे थांबू या." नंतर मी माझ्या मित्राला गुरुजी आता आपल्याला कशा तऱ्हेने भेटतील याचा तपशील सांगू लागलो. माझे वर्णन संपत आहे तोच श्रीयुक्तेश्वर दृष्टिपथात आले. थोड्याच वेळापूर्वी त्यांच्या अंगावर जे कपडे मी पाहिले होते, अगदी तेच कपडे त्यांच्या अंगावर असलेले मला आढळून आले. ते सावकाश एका लहान मुलाच्या पाठोपाठ येत होते. त्या मुलाच्या हातात एक चांदीचा लोटा होता.

एक क्षणभर माझ्या अंगातून भीतीची एक थंडगारशी ऊर्मी लहरून गेली. अनुभव इतका विलक्षण; कोणाचा विश्वास बसायचा नाही खरोखरी! मला असे वाटू लागले की, हे विसाव्या शतकातले भौतिकवादी, जडवादी जग माझ्यामधून घसरून जात चालले आहे. समुद्रावर पीटरच्या समोर येशू अवतीर्ण झाला अशा प्राचीन काळात मी वावरत आहे की काय मला कळेना.

अर्वाचीन काळातील ख्रिस्त योग्यासमान असे श्रीयुक्तेश्वर जेव्हा दिजेन व मी अगदी मुखस्तंभासारखे उभे होतो त्या ठिकाणी आले, तेव्हा गुरुजींनी माझ्या मित्राकडे पाहून हास्य केले व म्हणाले.

"मी तुला सुद्धा संदेश पाठविला होता. पण तुला तो ग्रहण करता आला नाही."

दिजेन गप्प होता. पण तो माझ्याकडे संशयी नजरेने पाहू लागला. आम्ही नंतर गुरुजींना आश्रमापर्यंत पोचविले आणि नंतर माझा मित्र आणि मी सेरामपूर कॉलेजकडे जावयास निघालो. दिजेन रस्त्र्यावर मध्येच थांबला. त्याच्या नसानसांतून क्रोध उफाळत होता.

"असे काय? गुरुजींनी मला संदेश पाठविला होय? आणि इतके असून तू हे सगळे लपवून ठेवलेस ना? मला याचा खुलासा पाहिजे!"

"तुझ्या मनाचा आरसा इतक्या अस्थिरतेने सारखा इकडे तिकडे हालतोय की, त्यात गुरुजींच्या संदेशाचे प्रतिबिंब बरोबर उमटत नाही, त्याला मी काय करू?" मी त्याला टोमणा दिला.

दिजेनच्या चेहऱ्यावरच्या रागाचा पारा उतरला. “समजलो मी काय म्हणतोयस तू ते.” तो मजबुरीने बोलू लागला, “पण मेहेरबानी करून हे मला सांग की, भांडे हातात घेऊन येणाऱ्या मुलाबद्दल तुला कसे समजले?”

त्या दिवशीची सकाळची बोर्डिंग हाऊसच्या समोर गुरुजींचे साकार दर्शन झाल्याची हकीकत मी सांगण्याची पुरी करीतोपर्यंत आम्ही सेरामपूर कॉलेजपर्यंत येऊन पोचलो.

दिजेन म्हणाला, “आपल्या गुरुजींच्या यौगिक सामर्थ्याची जी हकीकत मी आता ऐकून घेतली, त्यावरून मला आता असे वाटू लागले आहे की, जगातील कोणतेही विश्वविद्यालय म्हणजे केवळ एक बालमंदिरच (किंडरगार्टनच) आहे.” [3]

---

1 निरोप घेण्याच्या वेळचा बंगाली शब्द. शब्दशः अर्थ घेतला तर विरोधाभास आहे. “तर मी आता येतो.”

2 दैहिक परमाणूंच्या स्थूल स्वरूपाचा जेव्हा नाश होत जातो त्या वेळी होणारा एक विशिष्ट ध्वनी.

3 “अशा गोष्टी माझ्या निदर्शनाला आल्या आहेत की, मला असे वाटते की, जे काही मी आतापर्यंत लिहिले त्याला काडीचीही किंमत नाही.”

“पंडितांचा राजा” म्हणून ज्याला म्हणत, अशा सेंट थॉमसने वरील उद्‌गार, त्याचा चिटणीस त्याला ‘सम्मा थिऑलॉजिए’ हा ग्रंथ पुरा करण्याबाबत काकुळतेने विनवणी करीत असताना काढले. इ. स. १२७३ मध्ये एके दिवशी नेपल्समधील एका चर्चमध्ये धर्मविधि चालू असता सेंट थॉमसने आपल्या डोळ्यांसमोर एक उदात्त गूढ दृश्य पाहिले. दिव्य ज्ञानाच्या वैभवपूर्ण दर्शनाने तो इतका भारावून गेला की, त्यापुढे त्याने बुद्धिमंतांच्या कोणत्याही गोष्टीकडे लक्ष दिले नाही. त्यात त्याला काही गम्य वाटेनासे झाले.

तुलनेच्या दृष्टीने पाहा सॉक्रेटिसचे उद्‌गार (प्लेटोच्या ‘फेद्रूस’ मधील). “माझ्याबद्दल मला फक्त हे ज्ञान आहे की, मी पक्का अज्ञानी आहे.”

प्रकरण - २०

# 20. काश्मीर यात्रेला व्यत्यय

“बाबा, उन्हाळ्याच्या सुट्टीत हिमालयाच्या पायथ्याशी मी सहलीला जाणार आहे, तेव्हा गुरुजींना आणि माझ्या चार मित्रांना घेऊन जाणार आहे. तेव्हा काश्मीरचे सहा रेल्वेपास व प्रवासखर्चाकरिता पुरेसे पैसे द्याल काय?”

माझ्या अपेक्षेप्रमाणे वडील गदगदा हसले. “तीच बनावट गोष्ट सांगून देण्याची ही तुझी तिसरी वेळ. अशीच विनंती तू गेल्या उन्हाळ्याच्या सुट्टीत आणि त्याच्याही अगोदरच्या वर्षी केली नव्हतीस काय? अगदी शेवटल्या घटकेला श्रीयुक्तेश्वर जायचे रद्द करतात.”

“हे खरे आहे, बाबा, की गुरुजी काश्मीरला [1] जाण्याबाबत नक्की मला सांगत नाहीत. पण मी जर त्यांना सांगितले की, तुमच्याकरिता मी अगोदर तिकिटे काढून ठेवली आहेत, तर मग ते प्रवास करायला कसे तरी ह्या वेळी कबूल होतील.”

त्या वेळी वडिलांची खात्री पटली नाही; पण दुसऱ्याच दिवशी थोडी थट्टामस्करी केल्यानंतर त्यांनी सहा पास व दहा दहा रुपयांच्या बऱ्याचशा नोटा माझ्या स्वाधीन केल्या.

“तुझ्या ह्या तात्त्विक प्रवासाला अशा काही प्रत्यक्ष आधारांची खरोखरी जरुरी आहे असे मला वाटत नाही; तरी पण हे असू दे.” त्यांनी भाष्य केले.

त्या दिवशी दुपारी श्रीयुक्तेश्वरांकडे जाऊन त्यांना ही सामग्री दाखविली. माझा उत्साह पाहून त्यांनी कौतुकपूर्ण स्मित केले, पण शब्दांत गुंतले नाहीत. “जायची माझी इच्छा आहे. पाहू या.” आश्रमातील त्यांचा लहानसा शिष्य कनई यालाही मी बरोबर यायचेय म्हणून सांगितले, त्या वेळीही गुरुजी काही बोलले नाहीत. बाकीच्या तिघांही मित्रांना मी सांगून टाकले: राजेंद्रनाथ मित्र, जोतीन ऑडी, आणखी एक मुलगा. आमचा निघावयाचा दिवस पुढला सोमवार ठरला.

शनिवारी आणि रविवारी मी कलकत्त्याला घरीच राहिलो. आमच्याकडे माझ्या एका चुलत भावाच्या लग्नसमारंभाचे काही धार्मिक विधी चालू होते. सोमवारी अगदी पहाटे माझे प्रवासाचे सामान घेऊन मी सेरामपूरमध्ये येऊन दाखल झालो. राजेंद्र मला आश्रमाच्या दाराशीच भेटला.

“गुरुजी बाहेर गेले आहेत फिरायला. यायचे नाही म्हणताहेत.”

मी जितका रागावलो तितकाच हट्टास पेटलो. “आमची काश्मीरची सफर कल्पितच होती, अशी चेष्टा करायला मी वडिलांना तिसरी संधी देणार नाही. बाकीचे आपण जाऊ.”

राजेंद्र कबूल झाला. एखादा नोकरमनुष्य मिळतोय का हे पाहण्याकरिता मी आश्रमाच्या बाहेर पडलो; कारण कनई काही गुरुजींच्याशिवाय सफरीला बाहेर पडणार नाही हे मला माहीत होते; आणि सामानाकडे पाहायला कोणाची तरी जरुरी होती. आमच्या घरी पूर्वी काम करीत असलेल्या नोकराची, बिहारीची मला या वेळी आठवण झाली. तो आता सेरामपूरला

एका शाळामास्तराकडे कामास होता. मी जोराने पुढे चालू लागलो तो सेरामपूरच्या कोर्टकचेरीजवळच्या ख्रिश्चन चर्चसमोरच मला गुरुजी भेटले.

"कुठे चाललायस तू?" श्रीयुक्तेश्वरांच्या मुद्रेवर स्मित बिलकुल नव्हते. "गुरुजी, तुम्ही आणि कनई आम्ही ठरविलेल्या सफरीला येत नाही असे मला कळलेय. तेव्हा बिहारीला शोधतोय. तुम्हांला माहीत आहे की गतवर्षी तो काश्मीरला जायला एवढा नादावला होता की, काही पगार न घेता त्याने नोकरी करायचे कबूल केले होते."

"आठवतेय मला ते. तरी पण मला नाही वाटत की बिहारी या वेळी यायला कबूल होईलसे."

मी चिडून म्हणालो, "तो ह्या संधीची अगदी उत्कंठेने वाटच पाहत आहे!"

गुरुजींनी पुनः शांतपणे चालावयास सुरुवात केली. मी थोडयाच वेळात मास्तरांच्या घरी जाऊन पोचलो. बिहारी अंगणातच होता. मित्रभावाच्या उमाळ्याने त्याने माझे स्वागत केले. पण काश्मीरचे नाव काढल्याबरोबर त्याने तोंड वेडेवाकडे केले. दिलगिरीचे काही अस्पष्ट शब्द पुटपुटुन तो माझ्यापुढून निघाला व आपल्या मालकाच्या घरात शिरला. अर्धाएक तास मी त्याची वाट पाहत राहिलो. मला आपले वाटे की, प्रवासाची तयारी करतोय म्हणून उशीर लागलाय. शेवटी पुढल्या दरवाज्यावर मी थाप मारली.

"बिहारी मागच्या जिन्याने केव्हाच निघून गेला; साधारण तीसएक मिनिटे झाली असतील." एका माणसाने मला माहिती दिली. किंचितसे स्मित त्याच्या ओठांवर दिसून येत होते.

निराश होऊन मी तेथून निघालो. मला काही समजेना की, माझे निमंत्रण त्याला सक्तीचे वाटले की गुरुजींचे त्याच्यावर अदृश्य असे दडपण आले? ख्रिश्चन चर्चच्या बाजूने जाता जाता गुरुजी मला पुनः सावकाश माझ्याकडे येत असताना दिसले. माझा अहवाल ऐकून घेण्यापूर्वीच ते म्हणाले.

"तर मग काय बिहारी सुद्धा येत नाही? मग आता काय ठरवले आहेस तू?"

कडक शिस्तीच्या बापाची अवज्ञा करावयास निघालेल्या एखाद्या उद्दाम पोराप्रमाणे मला वाटले. "गुरुजी, मी माझ्या काकांना त्यांचा नोकर लालधारी देण्याबद्दल विचारणार आहे."

"भेट वाटले तर आपल्या काकांना तू," श्रीयुक्तेश्वरांनी गालातल्या गालात हसून उत्तर दिले," पण ही सफर तुझी आनंदात होईल असे काही मला वाटत नाही."

मला मनात थोडी साशंक भीती वाटली; पण बंडखोर वृत्तीने मी गुरुजींपासून निघालो आणि सेरामपुरच्या कोर्टाच्या आवारात शिरलो. माझे काका शारदा घोष सरकारी वकील होते. त्यांनी माझे ममतेने स्वागत केले.

"आज मी माझ्या काही मित्रांबरोबर काश्मीरच्या सहलीवर निघालो आहे. ह्या हिमालयांतील सफरीकडे माझे बरेच दिवस डोळे लागून राहिले होते."

"मुकुंदा, मला आनंद वाटतो. तुझा प्रवास अधिक सुखावह होण्याकरिता मला काही करता येण्यासारखे आहे का?"

ह्या गोड शब्दांनी मला जरा हायसे वाटले. मला हुरूप आला. मी म्हणालो. "काका, आपला नोकर जो लालधारी त्याला माझ्याबरोबर प्रवासात द्याल काय?"

ह्या माझ्या साध्या विनंतीने जणू धरणीकंपाचा धक्का दिला. काका इतक्या जोराने उठले की, त्यांची खुर्ची मागच्या मागेच कोलमडून पडली; आणि टेबलावरचे कागद इतस्ततः उडाले आणि त्यांचा हुक्का व नारळाच्या देठाची गुडगुडीची नळी जमिनीवर मोठा आवाज करीत आदळून पडली.

रागाने कापत ते ओरडले, “किती अप्पलपोटा पोरगा आहेस तू? काय मूर्खासारखी कल्पना! तुझ्या चैनीच्या सहलीबरोबर माझा नोकर गेल्यावर माझ्याकडे इकडे कोण पाहणार?”

माझ्या मनातील आश्चर्य मी दाबले. मी विचार करू लागलो. एरवीच्या माझ्या काकांच्या गोडव्या स्वभावात असे एकदम परिवर्तन का घडून आले? एका दिवसांत घडून येणाऱ्या व काही अर्थ न समजणाऱ्या अशा गूढ रहस्यमय घटनांपैकीच ही आणखी एक विलक्षण घटना होती. कोर्टाच्या आवारातून मी बाहेर पडलो. माझी ही पीछेहाट गांभीर्यपूर्ण असण्यापेक्षा उत्साहीच अधिक होती.

मी आश्रमाकडे परतलो. तेथे माझे मित्र माझी वाट पाहत होते. माझी आता खात्री पटत चालली की, गुरुजींच्या ह्या विचारापाठीमागे काही एक पुरेसा, पण अतिगहन असा विशिष्ट हेतू असावा. गुरुजींच्या इच्छेविरुद्ध जाण्याची धडपड करण्याबद्दल मला आता पश्चात्ताप वाटू लागला.

“मुकुंदा, माझ्यापाशी आणखी काही वेळ बसावेसे तुला वाटत नाही काय?” श्रीयुक्तेश्वरांनी विचारले. “राजेंद्र आणि बाकीचे आता पुढे जातील आणि कलकत्त्याला तुझी वाट पाहत बसतील. कलकत्त्याहून काश्मीरला जाणारी शेवटची गाडी पकडायला तुला खूप वेळ मिळेल.”

“गुरुजी, तुमच्याखेरीज जाण्याचे मला इतके अगत्य नाही,” मी शोकाकुल होऊन म्हणालो.

माझ्या मित्रांनी माझ्या म्हणण्याकडे बिलकुल लक्ष दिले नाही. त्यांनी गाडी बोलावली व सामानसुमान घेऊन प्रयाण केले. कनई व मी गुरुजींच्या पायाशी निमुटपणे बसलो. अर्धा एक तास अशा शांततेत बसल्यावर गुरुजी उठले व दुसऱ्या मजल्यावरील जेवणाच्या जागेकडे चालू लागले.

“कनई, मुकुंदाला जेवायचे वाढ. याची गाडी लवकरच निघायची आहे.”

माझ्या ब्लँकेटच्या आसनावरून मी उठलो. इतक्यात मला एकदम मळमळ आली. वांती होईलसे वाटू लागले. झोक जाऊ लागला. पोटात भयंकर डळमळू लागले. पोटशूळाची व्यथा इतकी जबरदस्त होऊ लागली की, कोणी भयंकर नरकात मला एकदम लोटून देत आहे असे वाटू लागले. गुरुजींच्या पुढे चाचपडत मी जाऊ लागलो आणि त्यांच्यापुढे कोसळून पडलो. भयंकरशा एशियाटिक कॉलऱ्याची सारी लक्षणे माझ्या ठिकाणी दिसू लागली. श्रीयुक्तेश्वरांनी आणि कनईने मला बैठकीच्या खोलीत नेले.

मी वेदनेने ओरडू लागलो, “गुरुजी, मी माझे आयुष्य तुम्हांला समर्पण करतो.” कारण ते माझ्या कुडीपासून जलद हटत होते, असे मला चांगलेच वाटू लागले होते.

श्रीयुक्तेश्वरांनी माझे डोके आपल्या मांडीवर घेतले व देवदूताच्या कनवाळूपणाने त्यांनी माझ्या कपाळावरून हात फिरवावयास सुरुवात केली.

“पाहिलेस, तू जर आपल्या मित्रांबरोबर स्टेशनवर गेला असतास तर तुझे काय झाले असते?” ते म्हणाले, “मला ह्या अशा चमत्कारिक तऱ्हेने तुझ्या प्रकृतीकडे पाहावे लागत आहे; कारण ह्या विशिष्ट वेळेला तू सफरीला बाहेर पडू नकोस म्हणून मी तुला सांगितले, ते न जुमानता तू निघावयाचे ठरविलेस.”

अखेर मला पटून आले. योगी-महात्म्यांना आपल्या सिद्धींचे सामर्थ्य उघडपणे दाखविण्यास क्वचितच योग्य वाटते. त्याप्रमाणे आजच्या दिवसातील घटना वरवर पाहणाऱ्याला त्यामध्ये विशेष, नेहमीपेक्षा वेगळे असे, काही वाटले नसते. माझ्या गुरुजींनी जो हस्तक्षेप केला तो इतका सूक्ष्म होता की, तो सहसा कोणाच्या ध्यानात येण्यासारखा नव्हता. त्यांनी आपली इच्छाशक्ती कोणाच्या ध्यानातही येणार नाही अशा तऱ्हेने बिहारी, माझे काका, राजेंद्र आणि इतर लोक यांच्या मध्यस्थीने, माध्यमाने चालविली. कदाचित माझ्याखेरीज प्रत्येकाला ह्या सर्व घटना अगदी तर्कशुद्ध व नेहमीप्रमाणे घडून येणाऱ्या अशाच वाटत होत्या.

श्रीयुक्तेश्वर सामाजिक रीतभात, आचारविचार व्यवस्थित पाळीत असत. त्यांनी कनईला डॉक्टरला बोलवायला व माझ्या काकांच्या कानांवर ही हकीकत घालायला सांगितले.

“गुरुजी,” मी हरकत घेऊ लागलो, “फक्त तुम्हीच मला बरे करू शकाल. कोणत्याही डॉक्टरच्या आवाक्याबाहेर मी गेलो आहे.”

“पोरा, दिव्य अशी परमेश्वरी कृपा तुझे रक्षण करीतच आहे. डॉक्टरबद्दल मनाला काही त्रास करून घेऊ नकोस. तुझी ही अवस्था काही त्यांच्या दृष्टीस पडणार नाही. तू अगोदरच बरा झालेला आहेस.”

गुरुजींच्या या शब्दांनी माझ्या दुखण्याच्या वेदना कुठल्या कुठे पळाल्या. मी स्वतःला सावरत उठून बसलो. लवकरच डॉक्टरही आले आणि त्यांनी मला बारकाईने तपासले.

“तू अगदी अत्यवस्थेतून बाहेर पडला आहेस,” ते म्हणाले, “मी काही नमुने (स्पेसिमेन्स) माझ्याबरोबर लॅबोरेटरीमध्ये तपासणीसाठी नेतो.”

दुसऱ्या दिवशी सकाळी डॉक्टर घाईघाईने आले. मी हुशारीने बसलो होतो.

“ठीक ठीक, अगदी हसत खेळत आहेस. कल्पना नाही तुला की मृत्यूच्या किती जवळून तू निसटून आला आहेस.” त्यांनी माझा हात हळूवारपणे हातात घेतला. “माझी कल्पना नव्हती की तू असा जिवंत राहशील; कारण त्या नमुन्यांवरून मला स्पष्ट आढळून आले की, तुला एशियाटिक कॉलरा झाला आहे. पोरा, तू नशीबवान आहेस खरा! रोग बरा करणारा, दिव्य सामर्थ्य अंगी असलेला तुला गुरू लाभला! माझी खात्री झाली आहे अगदी!”

मी अंतःकरणाने डॉक्टरांशी संपूर्ण सहमत झालो. डॉक्टर जायला निघाले आणि राजेंद्र व ऑडी दाराशी दत्त म्हणून उभे. त्यांच्या चेहऱ्यांवरच्या रागाचे त्यांनी डॉक्टरांकडे पाहिल्यावर आणि मग माझ्या उतरलेल्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर सहानुभूतीमध्ये पर्यवसान झाले.

“ठरल्याप्रमाणे कलकत्त्याच्या गाडीला तू आला नाहीस म्हणून आम्ही तुझ्यावर फार रागावलो होतो. तू आजारी पडलास काय?”

“होय.” माझ्या मित्रांनी आपले सामानसुमान कोपऱ्यात ठेवले. कालही तसेच ते तेथे ठेवलेले होते. मला हसू आले. मी खुलासा करू लागलो.

“एक जहाज होते. ते स्पेनला जायला निघाले; पण ते तेथे पोचण्यापूर्वीच परत आले!”

गुरुजींनी खोलीत प्रवेश केला. तब्येत सुधारत असताना जे स्वातंत्र्य रुग्ण घेतो ते स्वातंत्र्य घेऊन मी गुरुजींचा हात प्रेमाने हातात घेतला.

“गुरुजी!” मी म्हणालो, “माझ्या वयाच्या बाराव्या वर्षापासून हिमालयापर्यंत पोचायचे मी पुष्कळ अयशस्वी प्रयत्न करून पाहिलेले आहेत. आता माझी पुरी खात्री झाली आहे की, आपल्या आशीर्वादाखेरीज देवी पार्वती [2] मला तिकडे येऊ देणार नाही!”

1 गुरुजींनी याबाबत जरी काही खुलासा केला नाही, तरी ह्या दोन्ही उन्हाळ्यांमध्ये काश्मीरला आपण का जाऊ नये, याचे कारण त्यांना अगोदर माहीत असावे की, त्यांना तिकडे दुखणे यायची अद्याप वेळ आली नव्हती.

2 शब्दशः अर्थ “पर्वताची.” पुराणानुसार पार्वती ही हिमालय (शब्दशः “हिमाचे आलय, घर”) राजाची मुलगी. हिमालयाचे निवासस्थान तिबेटच्या सरहद्दीवर एका गिरिशिखरावर. त्या दुर्गम शिखराच्या खालून जाणारे, आश्चर्यचकित होऊन जाणारे प्रवासी एका बर्फाच्या आकृतीमध्ये तो राजवाडा असल्याचा अनुभव घेतात. त्यांच्या दृष्टीला त्या भव्य बर्फाकृतीमध्ये राजवाड्याचा कळस, घुमट, मनोरे यांचे दर्शन होते.

पार्वती, काली, दुर्गा, उमा व इतर देवता ही सारी जगन्मातेची विविध स्वरूपे होत; आणि ती जे कार्य अमुक वेळी करते ते दर्शविण्यासाठी वेगवेगळ्या नावांनी ती ओळखिली जाते. ह्या सृष्टीमध्ये ईश्वर अथवा शिव हा त्याच्या परप्रकृतीप्रमाणे निष्क्रिय आहे. शिवाने आपली शक्ती (चैतन्य, क्रियाशील प्रेरणा) ही आपल्या सहधर्मचारिणीस देऊन टाकलेली आहे. निर्माण करणारी ही ‘नारी’ शक्ती ह्या विश्वातील अनंत जड स्वरूपाचे प्रकटीकरण शक्य करून दाखविते.

पुराणांतील वर्णनाप्रमाणे शिव हा हिमालयात राहतो. स्वर्गातून अवतरलेली गंगामाता हिमालयामधून बाहेर पडणाऱ्या गंगा नदीची अधिष्ठात्री देवता आहे. ह्याचाच अर्थ कवीच्या भाषेत सांगावयाचा म्हणजे, गंगा नदी ही योगिराज शिवाच्या जटेमधून बाहेर पडली, असा आहे. शिव हा त्रिमूर्तीमधील संहारक व संरक्षक अशा दोन्ही स्वरूपांत विद्यमान आहे. “भारताचा शेक्सपीयर” जो कालिदास कवी त्याने हिमालयास “शिवाचा अट्टहास” म्हणून संबोधिलेले आहे. एफ. डब्ल्यू. थॉमस आपल्या ‘लीगसी ऑफ इण्डिया’ या पुस्तकात लिहितो, “वाचकांनी जरी शंकराच्या पांढऱ्या शुभ्र दंतपंक्तीची कल्पना डोळ्यांपुढे आणली, तरी पण ह्या चित्राची पुरेपूर कल्पना त्यास येणे शक्य नाही. त्याकरिता आपणांस आकाशगामी पर्वत-प्रदेशात शाश्वत विराजमान अशा भव्य योगिराजाची कल्पना करावयास हवी. म्हणजे ह्या पर्वत-प्रदेशात गंगा नदी शिवाच्या शिखररूपी जटेमधून कशी खाली बाहेर पडते व त्या जटेमध्ये चंद्र तुऱ्यासारखा कसा विराजमान झाला आहे हे ध्यानात येईल.”

हिंदू कलेमध्ये शिव हा हरणाचे मऊ काळे कातडे पांघरत आहे, असे दाखवितात. हे चर्म अंधकार व रात्रीचे गुह्य यांचे प्रतीक आहे. ह्या दिगंबर नीलांबरधारी शिवाचे हेच फक्त वस्त्र आहे. आपल्या दैवताच्या आदरार्थ, सन्मानार्थ कितीएक शैवपंथीय लोक कोणतेच वस्त्र अंगावर ठेवीत नाहीत. शिव जसा निष्कांचन तसा सर्वसंपत्तिमानही आहे.

चौदाव्या शतकात काश्मीरमध्ये लल्ला योगेश्वरी नावाची एक लोकप्रिय संत स्त्री होऊन गेली. ती दिगंबर अशी शिवभक्त होती. तिच्या काळातल्या एका पाखंडी कुचेष्टेखोराने तिला अशा नग्नावस्थेत राहण्याचे कारण विचारले. तेव्हा त्या संत महिलेने जबाब दिला की, “माझ्या आसपास मी कोणा पुरुषालाच मुळी पाहात नाही.” ज्या व्यक्तीला आत्मसाक्षात्कार झाला नसेल तो ह्या संत-महिलेच्या दृष्टीने मुळी ‘पुरुष’ या अधिकाराला पात्र नव्हता. ही संत-महिला क्रियायोगासारखी एक योगसाधना आचरीत असे. ह्या साधनेच्या मुक्तिदायक अशा प्रभावाचे तिने अनेक पदांत वर्णन केले आहे त्यांपैकी एका पदाचा अनुवाद मी खालीलप्रमाणे करीत आहे:

दुःखाचा कोणता घुटका, प्राशिला मी नसे स्वये।
असंख्य जन्ममृत्यूच्या, चक्रफेऱ्यांतुनी तशी।।
मुक्तता जाहली माझी, वारंवार फिरोनिया।
पाहा, श्वासक्रियेमध्ये, कंठ दाटून येतसे।।
घोट हा अमृताचा की, मज वाटे खरोखरी।

ह्या संत-महिलेने साधारण प्रतीचे मानवी मरण पत्करले नाही. तिने आपल्या स्थूल देहाचा अग्नीमध्ये त्याग केला. त्यानंतर ती आपल्या शोकाकुल गावकऱ्यांपुढे प्रकट झाली. त्या वेळी तिची मूर्ती जिवंत व सुवर्णवस्त्रांनी अलंकृत अशी होती. अंती तिने

पूर्ण वस्त्र परिधान केले तर!

## प्रकरण - २१

# 21. आम्ही काश्मीरला जातो

"तू आता प्रवास करायला चांगला धडधाकट झाला आहेस. मी आता येईन तुझ्याबरोबर काश्मीरला." एशियाटिक कॉलऱ्याच्या दुखण्यातून अगदी चमत्कृतिपूर्ण तऱ्हेने बरा झाल्यावर दोन दिवसांनी श्रीयुक्तेश्वर मला म्हणाले.

त्या दिवशी संध्याकाळी आम्ही सहाजण उत्तरेच्या दिशेने गाडीत बसलो. आमचा पहिला आरामशीर मुक्काम सिमल्याला झाला. सिमला हे राजविलासी शहर हिमालय पर्वताच्या सिंहासनावर बसलेले आहे. आम्ही त्या शहरातील चढ-उताराच्या रस्त्र्यांवरून वाटेने जाताना रम्य वनश्री वाखाणीत इकडे तिकडे खूप हिंडलो.

"इंग्लिश स्ट्रॉबेरी कुणाला घ्यायच्या आहेत का?" एक म्हातारी एका वैचित्र्यपूर्ण खुल्या बाजाराच्या जागी जमिनीवर विकायला बसली होती.

ती लहान-लहान लाल फळे पाहून गुरुजींना मोठे कुतूहल वाटले. त्यांनी एक मोठी टोपली घेतली व माझ्या व कनईच्या हवाली केली. आम्ही जवळच होतो. मी एक बेरी तोंडात टाकली, पण लगोलग खाली जमिनीवर थुंकून टाकली.

"गुरुजी, काय आंबट फळ आहे हे! मला ह्या स्ट्रॉबेरी कधीच आवडायच्या नाहीत!"

गुरुजी हसले. "अरे तुला त्या आवडतील—पण कुठे, अमेरिकेत. तिथे भोजनाच्या वेळी, तुझी यजमानीण स्ट्रॉबेरी तुझ्यापुढे साखर व मलई यांबरोबर ठेवून देईल. नंतर काट्याने तिने बेरी फोडून मलई व साखर यांमध्ये मिसळून दिल्यावर तू त्यांची चव घेशील आणि तूच म्हणशील, 'काय स्वादिष्ट स्ट्रॉबेरी आहेत ह्या!' नंतर मग तुला सिमल्यामधील या दिवसाची आठवण होईल."

(श्रीयुक्तेश्वरांची ही भविष्यवाणी माझ्या मनातून गेली; पण पुनः तीन वर्षांनी माझ्या मनात उमटली. अमेरिकेत आल्यावर थोड्याच दिवसांत वेस्ट सॉमरव्हिल, मॅसॅच्यूसेट्स येथील श्रीमती ॲलिस टी हॅसे यांच्याकडे भोजनाचा योग आला. भोजनोत्तर स्ट्रॉबेरीची मुखशुद्धी टेबलावर आली व यजमानीणबाईने काटा उचलला व बेरी फोडून त्यात साखर व मलई मिसळली. "फळ जरा आंबटसर आहे तर असे मिसळून खाऊन पाहा; आवडेल तुम्हांला." ती म्हणाली. मी त्या घासभर खाल्ल्या आणि उद्गारलो, "काय स्वादिष्ट स्ट्रॉबेरी आहेत ह्या!" आणि एकदम त्या वेळी सिमल्यामध्ये गुरुजींनी वर्तविलेली भविष्यवाणी माझ्या स्मृतीच्या अथांग गुहेतून वर बाहेर आली. मी आश्चर्याने अगदी स्तंभितच झालो. श्रीयुक्तेश्वरांच्या परमात्म्याशी एकरस पावलेल्या मनाने भविष्यकाळच्या ईथरवर भटकणाऱ्या कार्मिक घटनेचा कार्यक्रम अगदी बिनचूकपणे टिपून ठेवला होता, हे समजल्यावर माझ्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.)

आम्ही मंडळींनी लवकरच सिमला सोडले व रावळपिंडीच्या गाडीत आम्ही बसलो. तेथून काश्मीरची राजधानी जी श्रीनगर तेथे जाण्यास सात दिवसांच्या प्रवासाकरिता आम्ही एक

मोठी दोन घोड्यांची लॅण्डो गाडी भाड्याने ठरविली. उत्तर दिशेकडील आमच्या प्रवासाचा दुसरा दिवस संपल्यावर आम्हांला हिमालयाच्या भव्यतेचे खरे दर्शन झाले. गरम खडकाळ रस्त्र्यावरून आमच्या गाडीची लोखंडी चाके जसजशी आवाज करू लागली, तसतसे पर्वतराजींच्या भव्यतेचे नित्य बदलत जाणारे मनोहारी देखावे आम्हांला दिसू लागले व आमची मने थरारून गेली.

"महाराज," ऑडी गुरुजींना म्हणाला, "आपल्या पवित्र सहवासात हे सुंदर व भव्य देखावे पाहण्यात मला फार आनंद वाटतो आहे."

ऑडीने ही जी गुणग्राहकता दाखविली त्यामुळे मला सुखसंवेदना झाली. कारण ह्या सफरीचा मीच खरा यजमान होतो. श्रीयुक्तेश्वरांनी माझी विचारशलाका पकडली. ते माझ्याकडे वळून हलक्या आवाजात म्हणाले.

"स्वतःची खुशामत करून घेऊ नकोस. ह्या रम्य वनश्रीने ऑडी इतका लोभावला नाही, जितका तो सिगरेट ओढण्याकरिता आपणापासून अलग होऊन पुरेसा वेळ मिळेल या आशेने लोभावलेला आहे."

मला धक्काच बसला. "गुरुजी," मी खालच्या आवाजात बोलू लागलो, "अशा अप्रिय शब्दांनी, आपली येथे जी सुसंगती जमली आहे तिच्यात, कृपा करून, बिघाड आणू नका. मला नाही वाटत की, ऑडीला सिगरेट ओढण्याची इतकी तल्लफ आली आहे." साधारणपणे कोणतीही गोष्ट मुकाट्याने सहन न करणाऱ्या गुरुजींकडे मी जरा भीतभीतच पाहिले.

"ठीक आहे. ऑडीला मी काही बोलणार नाही." गुरुजी गालातल्या गालांत हसले. "पण तू लवकरच पाहशील की गाडी थांबल्यावर तो लगेच मिळाल्या संधीचा ताबडतोब फायदा घेईल."

एका लहान धर्मशाळेपाशी गाडी थांबली. गाडीचे घोडे सोडून गाडीवान त्यांना पाणी पाजायला जसा घेऊन जायला निघाला, तसा ऑडी चौकशी करू लागला की, "गुरुजी, मी जरा ड्रायव्हरबरोबर जाऊन घोड्यावरून रपेट करून येऊ का? थोडीशी बाहेरची मोकळी हवा घेईन म्हणतो."

श्रीयुक्तेश्वरांनी परवानगी दिली, पण मला म्हणाले, "त्याला मोकळा धूर सोडायचाय; मोकळी हवा नकोय त्याला."

लॅण्डो गाडीने धुळीने माखलेल्या रस्त्र्यावरून आवाज करीत करीत पुनः आपल्या प्रवासास सुरुवात केली. गुरुजींचे डोळे चमकत होते. ते मला सांगू लागले, "हे पाहा, गाडीच्या दरवाज्यातून मान बगळ्यासारखी वरती कर आणि पाहा ऑडी हवेशी काय करीत आहे!"

मी त्याप्रमाणे डोकावून पाहिले आणि ऑडीला सिगरेटच्या धुराची वलये उच्छ्वासाबाहेर टाकीत असताना पाहून मी दचकलो. मी श्रीयुक्तेश्वरांच्याकडे क्षमायाचनेच्या मुद्रेने पाहिले.

"गुरुजी, नेहमीप्रमाणे तुमचे आतासुद्धा बरोबर ठरले. ऑडी रम्य वनश्रीचा दृष्टिलाभ घेत आहे व धूम्रपानाचाही आस्वाद घेत आहे." मी तर्क केला की, आमच्या दोस्ताने गाडीच्या कोचमनपासून सिगारेट मागून घेतली असावी. कारण मला माहीत होते की, कलकत्त्याहून निघताना त्याने सिगारेटस् काही बरोबर घेतल्या नव्हत्या.

गुंतागुंतीच्या बिकट पहाडी रस्त्र्यावरून आम्ही मार्गक्रमण सुरू केले. वाटेने जाताना रम्य वनश्रीचा आस्वाद घेत होतो. मार्गामध्ये नद्या, खोरी, अणकुचीदार कडे आणि नाना तऱ्हेचे एकावर एक रचलेले असे पर्वतांचे थरच्या थर दृष्टीसमोरून जाऊ लागले. दररोज रात्रीच्या वेळी एखाद्या चट्टीत (गावठी धर्मशाळा) आम्ही मुक्काम करीत असू व तेथे स्वयंपाकपाणी करीत असू. माझ्या आहाराबद्दल श्रीयुक्तेश्वर विशेष काळजी घेत. प्रत्येक जेवणात मी लिंबू घ्यावे असा त्यांचा जोर असे. अजूनही मी तसा अशक्तच होतो. पण प्रकृती दररोज हळूहळू सुधारत होती. पण रस्त्र्यावरून खडखडत जाणारा आमचा रथ मात्र आम्हांला चांगलाच वारंवार त्रास देण्याचे कार्य बरोबर करीत होता.

जसजसा काश्मीरचा मध्यवर्ती भाग आमच्या दृष्टिपथात येऊ लागला, तसतशी आमची हृदये आनंदाच्या अपेक्षेने भरून जाऊ लागली. काश्मीर म्हणजे कमल-सरोवरांचे नंदनवन. झुलते बगीचे, शृंगारलेल्या छतांचे शिकारे, अनेक पुलांखालून वाट काढणारी झेलम नदी, आणि विविध फुलांनी विखुरलेली हिरवळ आणि सभोवती पसरलेला हिमालयाचा परिसर.

श्रीनगरमध्ये प्रवेश करण्याचा आमचा मार्ग उंच, स्वागत करणाऱ्या झाडांच्या कमानींमधून होता. उंच पहाडावर सहज दृष्टिक्षेप जेथून टाकता येईल अशा एका सराईत, दुसऱ्या मजल्यावर, आम्ही खोल्या घेतल्या. वाटेत नळाचे पाणी नव्हते म्हणून आम्ही जवळच्याच एका विहिरीतून पाणी उपसून काढत असू. वसंतऋतूची ती हवा, अगदी आदर्श अशी होती. दिवस जरा ऊबदार व रात्री किंचित थंड.

श्रीनगरमध्ये श्री आद्य शंकराचार्यांच्या नावाचे एक जुने मंदिर आहे. तेथे जाऊन आम्ही दर्शन घेऊन आलो. आकाश न्याहाळणारा गिरिशिखरावरील तो आश्रम पाहून मला अत्यानंदाची तंद्री लागली. एका दूरवरच्या देशामध्ये एका टेकडीवर एक सुंदर निवासस्थान आहे. तेथील एक मनोरम दृश्य मला दिसले. श्रीनगरमधील उंच अशा त्या शंकराचार्यांच्या मंदिराचे एका प्रासादामध्ये परिवर्तन झाल्याचे मला दिसून आले. त्याच ठिकाणी काही वर्षांनी अमेरिकेमधील सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपच्या मुख्य केंद्राची मी स्थापना केली. (मी ज्या वेळी कॅलिफोर्नियामधील लॉस एंजेलिसला अगदी पहिल्याप्रथम गेलो आणि माऊंट वॉशिंग्टनच्या शिखरावर ती भव्य इमारत पाहिली तेव्हा चटकन माझ्या ध्यानात आले की, काश्मीर आणि अन्यत्र जी मला अनेकदा दृश्ये दिसली ती त्या प्रासादाचीच होती.)

श्रीनगरला आम्ही काही दिवस राहिलो; नंतर साडेआठ हजार फूट उंचीवरील गुलमर्गला ('फुलांचा मार्ग') गेलो. तेथे मी माझी पहिली रपेट एका मोठ्या घोड्यावरून केली. राजेंद्र एका लहान तट्टूवर बसला. त्या तट्टाला भरभर पुढे जाण्याची महत्त्वाकांक्षा असायची. निमुळत्या खिलनमर्ग दरीमध्ये जाण्याचे आम्ही धाडस केले. रस्ता घनदाट अरण्यातून होता. अरण्यामध्ये झाडे-झुडपे भरपूर होती; आणि त्यांतून जाणारी पायवाट मधून मधून नाहीशी व्हायची. पण राजेंद्राचे तट्टू फार वेगवान; ते आमच्या अबलख वारूला एक क्षणभरही, अगदी धोक्याच्या वळणावर सुद्धा उसंत देत नसे. राजेंद्राचे तट्टू सारखा रस्ता तुडवीत होते. त्याला आनंद फक्त शर्यतीचा, चढाओढीचा.

ह्या आमच्या शर्यतीचे बक्षीसही आम्हांला मिळाले. आमच्यासमोर असा एक देखावा आला की, आमचा श्वास कुंठित झाला. ह्या आयुष्यात अगदी प्रथमच मी सर्व दिशांनी त्या उत्तुंग

बर्फाच्छादित हिमालय पर्वताचे दर्शन घेतले. उत्तर ध्रुवावरील अस्वलाचे जसे एकाकृतीचे चित्राचे नमुने कापावे, तसे एकाच आकृतीचे डोंगराचे थरच्या थर एकमेकांवर रचलेले दिसत होते. सूर्यप्रकाशात नीलवर्ण आकाशाशी स्पर्धा करीत असणाऱ्या अशा बर्फाच्छादित पर्वतांच्या ओळीच्या ओळी पाहून माझ्या डोळ्यांचे पारणे फिटले.

माझ्या तरुण सोबत्यांबरोबर मी इकडे तिकडे चकचकणाऱ्या त्या पांढऱ्या शुभ्र दरडींवरून मजेने हिंडलो. आमच्या सगळ्यांच्या अंगात गरम ओव्हरकोट होते. आम्ही खाली उतरत असताना आमच्यासमोर एक पिवळ्या फुलांचा अवाढव्य असा गालिचा पसरलेला दिसून आला. त्या पिवळ्याजर्द फुलांनी त्या पर्वतावरील उघडे बोडके भाग पार झाकून टाकले होते.

नंतर आमची सहल तेथील प्रसिद्ध अशा जहांगीर बादशहाच्या शालीमार व निशात बाग या विहार-उद्यानांकडे गेली. निशात भाग येथील प्राचीन प्रासाद हा एका निसर्गनिर्मित जलप्रपातावरच बांधलेला आहे. पर्वतावरून खाली जोराने येणारा हा अवखळ जलप्रपात, काही कौशल्यपूर्ण युक्त्यांचा अवलंब करून, नियंत्रित करून, त्याचे पाणी रंगीबेरंगी सौध प्रदेशांवरून आणि फुलांच्या ताटव्यात उभारलेल्या कारंजांतून उंच फवाऱ्यांनी उडणाऱ्या जलधारांतून खेळविलेले आहे. हा प्रवाह तसाच प्रासादातील निरनिराळ्या दालनांतून खेळवीत आणून शेवटी खाली सरोवरात एखाद्या जलपरीस जसे अलगद सोडून द्यावे, असा सोडून दिला आहे. ह्या विशाल उद्यानात रंगीबेरंगी फुलांनी डवरलेल्या वृक्षांची रेलचेल आहे. गुलाब, जास्वंद, कमल, कूजा, पेन्सी, लवेंडर आणि पॉपी यांची शोभिवंत फुले ठायीठायी दिसत होती. वर्तुळाकार उगवलेल्या चिनार, सायप्रस व चेरी यांच्या झाडांची एक सारखी ओळ नीलवर्ण आकाशास झाकून टाकीत होती; आणि ह्या वृक्षराजींच्या पलीकडे हिमालयाच्या उग्र तपस्व्यांसारख्या दिसणाऱ्या उत्तुंग शुभ्र हिमाच्छादित शिखरांचे दर्शन होत होते.

काश्मीरची मशहूर द्राक्षे कलकत्यात क्वचितच मिळतात. राजेंद्र, आपल्याला काश्मीरमध्ये द्राक्षांची मोठी मेजवानी मिळणार म्हणून बडबडत होता. त्याची येथे आल्यावर मोठी निराशा झाली. कारण येथे द्राक्षाचे मळे असे कुठे दिसलेच नाहीत. निराधार गोष्टीवर विसंबून अपेक्षा राखल्याबद्दल मी त्याला सारखा चिडवी.

“ओह, द्राक्षांचा माझ्याभोवती इतका वेढा पडला आहे की मला पाऊल ठेवायला जागा नाही!” मी म्हणे, “ह्या माझ्या पोटात ही पाहा गडप झालेली द्राक्षे!” त्यानंतर पुढे आम्हांला समजले की, काबूलमध्ये काश्मीरच्या पश्चिमेला गोड द्राक्षे वाटेल तितकी होतात. पिस्ता टाकलेल्या रबडीच्या आईस्क्रीमवर आम्ही समाधान मानले.

आम्ही शिकाऱ्यांमधून (पाण्यावरील घरासारख्या नावांमधून) पुष्कळ सफरी केल्या. ह्या शिकाऱ्यांचे वरचे छत (चांदवा) लाल जरीच्या कापडाचे केलेले असे. ह्या नावा डल सरोवराच्या एकात एक गुंतलेल्या कालव्यांमधून भटकंती करीत. हे कालवे म्हणजे कोळ्याच्या जाळ्याचे धागे जसे एकमेकांत विणलेले असतात तसे असत. पाण्यात वासे टाकून, फळ्या टाकून कामचलाऊ केलेल्या जमिनीवर माती टाकून त्यावर झुलल्या बागा तयार करतात. ह्या बागा येथे येणाऱ्या प्रवाशाला आश्चर्यचकित करून टाकतात. पाण्यामध्ये भाजीपाला,

कलिंगडे उगवलेली पाहून पहिल्या प्रथम खरेच वाटत नाही. मधेच एखादा शेतकरी ‘जमिनीशी चिकटलेला’ ह्या पदवीचा जणू अव्हेर करीत, आपले चौरसाकृती शेत अनेक फाटे फुटलेल्या त्या सरोवरामध्ये इकडून तिकडे ओढून नेत असताना दिसून येतो.

मजल्यावर मजले लागून असलेल्या ह्या काश्मीरच्या खोऱ्यामध्ये जगाच्या विविध सौंदर्याचे संक्षिप्त स्वरूप आढळून येते. ह्या काश्मीरसुंदरीचा मुकुट पर्वताचा आहे; गळ्यात माळा सरोवराची आहे; व पादत्राण फुलांचे आहे. पुढे कित्येक वर्षांनी पुष्कळशा देशांतून प्रवास केल्यावर काश्मीरला बहुधा जगातील अप्रतिम सौंदर्यस्थळ का म्हणतात हे मला कळून आले. काश्मीरच्या ठिकाणी स्विस-आल्प्सची, स्कॉटलंडमधील लॉक लोमंडची आणि उत्कृष्ट अशा इंग्लिश सरोवरांची पुष्कळशी मोहकता आहे. काश्मीरमध्ये प्रवास करणाऱ्या अमेरिकन प्रवाशाला पुष्कळदा अलास्काच्या ओबडधोबड भव्य सौंदर्याची व डेन्वरजवळील पाईक्स पीकच्या सौंदर्याची आठवण होते.

प्रादेशिक निसर्गसौंदर्याच्या चढाओढीत पहिले बक्षीस मी एक तर मेक्सिकोमधील सोचीमिल्कोच्या भव्य व शोभिवंत दृश्याला देईन किंवा काश्मीरमधील सरोवरांना देईन. सोचीमिल्कोमध्ये पाण्याच्या असंख्य प्रवाहांमध्ये आकाश, पर्वत आणि उंच पॉपलर वृक्ष यांची प्रतिबिंबे पडतात, तर काश्मीरमधील सरोवरांचे रक्षण सुंदर कुमारिकांच्यासारखे उग्र अशा हिमालयाकडून होते. ही दोन स्थाने पृथ्वीवरील दोन सुंदर अशी स्थाने म्हणून माझ्या स्मृतीमध्ये ठळकपणे राहिली आहेत.

होय; यलोस्टोन नॅशनल पार्कमधील, कोलोरॅडोच्या ग्रॅंड कॅनिओनचे व अलास्कामधील आश्चर्ये जेव्हा मी पाहिली तेव्हाही मी असा आश्चर्याने थरारून गेलो. यलोस्टोन हा पृथ्वीवरील असा घड्याळाच्या नियमितपणाने हवेमध्ये उंच फवारे उडवीत असतात. ह्या ज्वालामुखी प्रदेशामध्ये निसर्गाने अगोदरच्या सृष्टीमधील एखादा अवशेष ठेवून दिला असावा. अत्यंत गरम गंधकयुक्त पाण्याचे झरे; स्फटिक आणि इंद्रनील मण्यांची आभा व्यक्त करणारे जलाशय; अत्यंत वेगाने उडणारे गरम पाण्याचे झरे आणि स्वैरपणे विहार करणारी अस्वले, लांडगे, गवे आणि इतर हिंस्र पशू वगैरे हे सर्व जुन्या सृष्टीचेच अवशेष होत. वायोमिंगमधील रस्त्र्यांवरून मोटरमधून जात असताना उष्ण गरम चिखलाचे बुडबुडे पाहिल्यावर, त्याचप्रमाणे खळखळ वाहणारे झरे, गैसरचे फवारे पाहिल्यावर मला असे वाटले की, यलोस्टोनला या अप्रतिमत्वाबद्दल खास बक्षीस द्यावयाला हवे.

कैलिफोर्निआमधील योसेमाइट पार्कमधील प्राचीन सूचिपर्ण वृक्ष आकाशामध्ये उंच उंच मनोरे तयार करीत असतात. ते जणू एका दिव्य शिल्पकलेने घडविलेल्या अशा हिरव्यागार नैसर्गिक प्रार्थना-मंदिरांच्या शिखरांप्रमाणे दिसतात. पूर्व गोलार्धात प्रेक्षकांना थक्क करून सोडणारे असे अनेक धबधबे आहेत; पण त्यांपैकी कशालाही कॅनडाच्या सरहद्दीवरील न्यूयॉर्क प्रांतामधील नायगाराच्या प्रचंड सुंदर धबधब्याची सर नाही. केंटकीमधील मॅमॉथ केव्ह व न्यू मेक्सिकोमधील कार्ल्सबाद कॅव्हर्न्स ही स्थाने म्हणजे जणू विलक्षण अशी परीस्थाने होत. गुहांच्या छतांमधून टपकणारे आणि भूगर्भामधील पाण्यामध्ये आपली प्रतिबिंबे निर्माण करणारे असे लांबच लांब खडकाचे थर पाहिले असता, माणसाने कल्पिलेल्या अशा अन्य जगातील देखाव्यांचे दर्शन होते.

काश्मीरमधील मानवी सौंदर्य जगद्विख्यात आहे. येथील पुष्कळसे लोक युरोपियनांइतके गोरे आहेत व त्यांचे अवयव व हाडाची ठेवण युरोपियनांच्या सारखी आहे. पुष्कळांचे डोळे निळे असून केस फिकट रंगाचे आहेत. साहेबी पोशाखात ते अमेरिकनांसारखे दिसतात. हिमालयाच्या थंडाव्यामुळे काश्मीरी लोकांचे सूर्याच्या प्रखर व घर्मोत्पादक उष्णतेपासून रक्षण होते; आणि त्यांचा मूळ गौरवर्ण अबाधित राहतो. प्रवासी जसा दक्षिणेकडे जात जात हिंदुस्थानात विषुववृत्ताकडे जातो, तसतसा त्याला लोकांचा शरीरवर्ण काळसर व अधिकाधिक काळा होत जाताना दिसून येतो.

काश्मीरमध्ये असे काही आठवडे आनंदात घालविल्यावर सेरामपूर कॉलेजमधील दुसऱ्या सहामाहीसाठीं मला बंगालकडे परतण्याची जरुरी पडली. श्रीयुक्तेश्वर, कनई व ऑडी हे आणखी काही दिवस श्रीनगरमध्येच राहणार होते. निघण्यापूर्वी थोडा वेळ अगोदर गुरुजींनी असे सुचविले की, आपल्या शरीराला काश्मीरमध्ये थोडाबहुत त्रास होणार.

“पण गुरुजी, आपली प्रकृती तर अगदी उत्तम आहे.” मी विरोध दर्शविला.

“एखाद्या वेळी हे जगच सोडून जाण्याचा माझा योग आहे.”

“गुरुजी!” विनवणी च्या भावाने मी त्यांच्या पाया पडलो. “कृपा करून ह्या शरीराचा त्याग आताच करणार नाही, असे वचन द्या, तुमच्याखेरीज पुढील जीवनक्रम रेटण्यास माझी अजून काहीही तयारी नाही.”

श्रीयुक्तेश्वर स्तब्ध राहिले. पण माझ्याकडे पाहून त्यांनी ममतेने स्मित केले. मला दिलासा वाटला. नाखुशीने त्यांना सोडून मी निघालो.

“गुरुजी अत्यवस्थ!” सेरामपूरला परतल्यावर थोड्याच दिवसांत मला ही अशी ऑडीची तार मिळाली.

मी बेभानपणे गुरुजींना तारेने उत्तर पाठविले, “गुरुजी, मला सोडून जाऊ नका म्हणून मी तुमचे वचन घेतले होते. देह टिकवून धरा, नाही तर मी सुद्धा देहत्याग करीन.”

काश्मीरहून गुरुजींचा जबाब आला, “जशी तुझी इच्छा.”

ऑडीचे थोड्याच दिवसांनी पत्र आले. गुरुजींची तब्येत बरी झाल्याचे त्याने कळविले. मी जेव्हा सेरामपूरला दोन आठवड्यांनी परत आलो तो गुरुजी वजनाने निम्मे झाल्याचे पाहिले. मला फार वाईट वाटले.

त्यांच्या शिष्यांचे नशीब म्हणून श्रीयुक्तेश्वरांनी आपल्या काश्मीरच्या तापाच्या ह्या मोठ्या दुखण्याच्या अग्नीमध्ये आपल्या शिष्यांची पुष्कळशी पापे जाळून टाकिली. अशा तऱ्हेने रोग एका शरीरातून दुसऱ्या शरीरात नेण्याची ही आध्यात्मिक पद्धती अतिशय उच्च कोटीला गेलेल्या योग्यांना माहीत असते. एखादा सशक्त मनुष्य अशक्त माणसाला त्याचा जड बोजा आपल्याकडे घेऊन मदत करू शकतो. आध्यात्मिक अतिमानव आपल्या शिष्यांच्या शारीरिक व मानसिक यातना, त्यांच्या कर्मांच्या ओझ्यापैकी काही एक भाग उचलून कमी करू शकतात. ज्याप्रमाणे एखादा श्रीमंत मनुष्य आपल्या उधळ्या मुलाचे मोठे कर्ज फेडून टाकण्याकरिता काही पैशांवर पाणी सोडतो आणि त्यायोगे तो मुलगा आपल्या मूर्खपणाच्या भयंकर परिणामापासून वाचतो, तद्वत सिद्धयोगी आपण होऊन आपल्या शरीरसंपत्तीचा आपल्या शिष्यांचे दुःख हलके करण्याकरिता अंशतः त्याग करतो.

एका गूढ योगिक पद्धतीनुसार योगी आपले मन आणि सूक्ष्म देहवाहन एखाद्या दुखणाईत व्यक्तीच्या मनाशी व सूक्ष्म देहाच्या वाहनाशी जोडतो. त्यायोगे त्या दुखणाईत व्यक्तीचा रोग पूर्णपणे किंवा अंशतः त्या योग्याच्या रक्तमांसाच्या शरीरात उतरतो. शारीरिक स्तरावर किंवा ह्या देहीच परमेश्वराचा शोध घेतल्यावर सिद्ध योग्यास आपल्या शरीराची पर्वा राहत नाही. जरी त्याने आपले शरीर दुसऱ्या लोकांच्या वेदना दूर करण्याकरिता आपण होऊन रोगी करविले असले तरी त्याचे मन शुद्ध व निरागस राहते. त्याच्यावर त्या रोगाचा काही परिणाम होत नाही. अशा तऱ्हेची मदत करता आली म्हणून तो योगी स्वतःस भाग्यवान समजतो. परमात्म्याच्या ठिकाणी पूर्ण सायुज्यता मिळविणे म्हणजे मानवी शरीराचे कार्य पुरे झाले आहे हे ओळखणे होय. सिद्धयोगी त्यानंतर आपल्या शरीराचा आपल्याला योग्य वाटेल त्या कारणाकरिता उपयोग करतो.

गुरुजनांचे ह्या जगातील कार्य म्हणजे मनुष्यजातीचा दुःखभार हलका करणे हे होय. मग ते कार्य तो आध्यात्मिक साधनांनी करो की बुद्धीला पटेल अशा तऱ्हेचा उपदेश करून करो; किंवा इच्छाशक्तीने करो; किंवा रोगाची एका शरीरापासून दुसऱ्या शरीराकडे पालट करून करो. अशा सिद्धयोग्यास अतींद्रिय अवस्थेमध्ये केव्हाही जाता येते. आणि मग त्याला शारीरिक दुखण्याच्या यातना होत नाहीत. कधीकधी शिष्यांच्यापुढे उदाहरण ठेवण्यासाठी तो शारीरिक दुःख निर्विकारपणे सहन करतो. दुसऱ्याची दुःखे आपण स्वतः सहन करून योगी त्याच्याकरिता कार्य व कारण ह्यांचा कर्मविषयक नियम सिद्ध करून दाखवितो. हा नियम यांत्रिक दृष्ट्या किंवा गणितशास्त्रदृष्ट्या नेहमी बिनचूक कार्य करीत असतो. आणि अशा तऱ्हेने तो नियम किंवा सिद्धांत कार्य करीत असताना दिव्यज्ञानी योगीजन त्यात शास्त्रीय दृष्ट्या फेरफार करू शकतात.

आता ह्या आध्यात्मिक सिद्धान्ताचा अर्थ असा नव्हे की, गुरूने दुसऱ्याचे दुःख हरण करावे म्हणून स्वतः आजारी पडावे. दुसऱ्याचे दुखणे बरे करण्याकरिता साधुजन अशा काही निरनिराळ्या सत्वर तात्कालिक गुणकारी अशा पद्धतींचा अवलंब करतात की, जेणेकरून आध्यात्मिक दृष्ट्या बरे करणाऱ्याला काही इजा पोचू नये. क्वचित प्रसंगी मात्र ज्या वेळी गुरूला आपल्या शिष्यांची उत्क्रांती, प्रगती द्रुतगतीने घडवून आणावयाची असेल तेव्हा तो स्वतः आपण होऊन आपल्या शरीरावर शिष्यांच्या अनिष्ट कर्मांचा पुष्कळसा बोजा धारण करतो.

येशू ख्रिस्त आपल्यासंबंधी असे सुचवितो की, ‘मी म्हणजे दुसऱ्यांची दुःखे आपणाकडे घेऊन जणू लाचच देतो.’ स्वतःच्या ठिकाणी इतके दिव्य सामर्थ्य [1] असताना ख्रिस्ताने जर कार्य व कारण यांच्या सूक्ष्म अशा विश्वव्यापी सिद्धान्तानुसार त्या सिद्धान्ताच्या बजावणीमध्ये राजीखुशीने सहकार्य दिले नसते तर वधस्तंभावर त्याला मारून टाकता आले नसते. त्याने अशा रीतीने दुसऱ्यांच्या—विशेषेकरून आपल्या शिष्यांच्या—कर्मांचे परिणाम आपल्यावर ओढून घेतले त्यामुळे ते शिष्य पराकोटीचे शुद्ध झाले. आणि त्यांच्या ठायी होली घोस्टचे (विश्वव्यापक कूटस्थ चैतन्याच्या बाह्य व्यक्त स्वरूपाचे) स्वागत करण्याची किंवा सर्वव्यापी चैतन्यशक्ती ग्रहण करण्याची, जे पुढे त्यांच्यामध्ये उतरले, पात्रता आली. [2]

फक्त साक्षात्कारी योगी प्राणशक्तीचे संक्रमण करू शकतो किंवा दुसऱ्याचे रोग आपल्या शरीरात घेऊ शकतो. सामान्य माणसाला रोग बरे करण्याची ही योगपद्धती वापरता यायची नाही आणि त्याने तशी ती वापरूही नये. कारण शरीराचे अपक्व वाहन किंवा रोगट शरीर हे सखोल ध्यानसाधनेला अडथळा आणते. हिंदू शास्त्रांची शिकवण अशी आहे की, प्रत्येकाने आपले शरीर सुस्थितीत ठेवणे अगत्याचे आहे, नाही तर त्याचे मन हे भक्तिपूर्ण एकाग्रतेमध्ये स्थीर होऊ शकणार नाही.

तरी सुद्धा मन जर अतिशय बलवान असेल तर ते ह्या शारीरिक अडचणी उल्लंघून जाते आणि आत्मसाक्षात्कार करून घेते. पुष्कळ साधुसंतांनी आजारीपणाची पर्वा केली नाही व तरी सुद्धा ते दिव्यत्वाच्या शोधात यशस्वी ठरले. असिसीचा सेंट फ्रान्सिस हा व्याधिग्रस्त होता. पण त्याने बऱ्याच लोकांना रोगमुक्त केले, एवढेच नव्हे तर मेलेल्यांना सुद्धा जिवंत केले.

हिंदुस्थानातील माझ्या माहितीच्या एका संताला आपल्या पूर्ववयात अर्ध्या शरीरावर फोड झालेले होते. त्याला मधुमेहाचीही व्यथा होती. ती इतकी तीव्र होती की, एकाच वेळी पंधरा मिनिटांपेक्षा जास्त निमूटपणे त्याला बसता येत नसे. पण त्याची आध्यात्मिक आकांक्षा, तीव्र इच्छा दुर्दमनीय होती. “परमेश्वरा,” तो प्रार्थना करी, “तू माझ्या ह्या भग्न देवळात येशील काय?” अविरत अशा प्रचंड इच्छाशक्तीच्या सामर्थ्यावर तो संत हळूहळू पद्मासन घालून दररोज अठरा तास समाधि-अवस्थेमध्ये बसू लागला. त्याने मला सांगितले होते, “आणि तीन वर्षांच्या अखेरीस अनंतत्वाची दिव्य ज्योत माझ्यामध्ये प्रकाशू लागली. त्या दिव्यानंदात मी शरीराला पूर्ण विसरलो. त्यानंतर मला असे आढळून आले की, त्या दिव्य कृपाप्रसादाने माझे शरीर पूर्ण बरे झाले.”

इच्छाशक्तीने रोग बरा करण्याविषयी इतिहासात बाबर बादशहाची (१४८३-१५३०) गोष्ट आहे. बाबर हा भारतातील मोगल साम्राज्याचा संस्थापक. त्याचा मुलगा हुमायूं फार आजारी पडला. पित्याने संत्रस्त निश्चयाने परमेश्वराची प्रार्थना केली की, मुलाचे दुखणे त्याच्यावर यावे व मुलाचे प्राण वाचावे. हुमायूं [3] बरा झाला पण बाबर ताबडतोब आजारी पडला आणि त्याच दुखण्याने त्याच काळात त्याचा अंत झाला.

पुष्कळ लोकांची अशी समजूत असते की, सिद्ध योग्याची शरीरप्रकृती व ताकद अगदी सँडोसारखी [4] असावी. ह्या समजुतीला काही आधार नाही. शरीर दुबळे असले म्हणजे त्याचा अर्थ असा होत नाही की, गुरूला काही दिव्य सिद्धी नाहीत आणि तसेच सर्व आयुष्यभर आरोग्यसंपदा चांगली असली तरी त्याचा अर्थ असा होत नाही की, त्यास अंतर्ज्योतीचे ज्ञान झाले आहे. गुरूची, योग्याची विशिष्ट लक्षणे ही शारीरिक नसून आध्यात्मिक स्वरूपाची असतात.

पुष्कळशा भांबावून गेलेल्या साधकांना असे चुकीने वाटते की, अध्यात्मशास्त्रावर प्रवचन करणारा एखादा चांगला प्रभावी वक्ता किंवा लेखक हा योगी असला पाहिजे. अध्यात्माचा अभ्यासू तो योगी किंवा गुरू म्हणावा की, जो आपल्या इच्छेनुसार श्वासरहित अवस्थे मध्ये (सविकल्प समाधीत) जातो व ज्यास अक्षय आनंद (निर्विकल्प समाधी) साध्य

होते. ऋषींनी असे सांगितलेले आहे की, ही पात्रता ज्याच्या अंगी आली आहे, असाच मनुष्य आपण मायेवर जय मिळविला आहे असे प्रत्यक्ष दाखवू शकतो. साक्षात्काराच्या धुक्यातून तोच फक्त म्हणू शकतो की "एकम् सत्" ("फक्त एकच आहे").

> महान अद्वैतवादी श्रीशंकराचार्य म्हणतात की, "अविद्येमुळे, अज्ञानामुळे जेव्हा द्वैताचा भास होतो तेव्हा मनुष्याला सर्व गोष्टी आपल्याहून भिन्न आहेत असे वाटते. सर्व काही आहे ते तो स्वतःच आहे, असे जेव्हा त्याला समजून येते तेव्हा एक परमाणू सुद्धा आपणाहून भिन्न आहे असे त्यास वाटत नाही ....ज्याप्रमाणे जाग आल्यावर स्वप्नाचे काही अस्तित्वच नसते तसेच सत्यस्वरूपाचे एकदा ज्ञान मनात उमटले म्हणजे शरीराच्या क्षणभंगुरत्वामुळे मनुष्याला आपल्या पूर्वसंचिताचे फळ भोगावे लागत नाही."

फक्त मोठ्या श्रेणीचेच गुरू आपल्या शिष्यांच्या कर्मांचा भार वाहण्यास समर्थ असतात. श्रीयुक्तेश्वरांना, जर आपल्या अंतरात्म्याकडून आपल्या शिष्यांना तशा चमत्कारिक पद्धतीने मदत करण्याबाबत परवानगी मळाली नसती, तर त्यांना श्रीनगरमध्ये [5] अशा मोठ्या दुखण्यापासून इतका त्रास सोसावा लागला नसता. परमेश्वराचे ठिकाणी एकरूप झालेल्या माझ्या गुरुदेवांखेरीज फारच थोड्या महात्म्यांना परमेश्वरी आज्ञा पालन करण्यासाठी त्यांच्याहून जास्त संवेदनाशीलतेने युक्त असे ज्ञान असेल.

त्यांचे शरीर इतके कमी झाले हे पाहून त्यांच्याबद्दल सहानुभूतीचे थोडे शब्द बोलण्याचे मी धाडस केले, तेव्हा माझे गुरुदेव गमतीने म्हणाले.


"त्यालाही काही चांगली बाजू आहे. माझ्याजवळ काही लहान गंजीफ्रॉक आहेत. ते मी इतकी वर्षे वापरले नाहीत. ते आता माझ्या अंगाला होतील!"

गुरुजींचा हा हास्यविनोद ऐकून मला सेंट फ्रान्सिस द सेलेसच्या शब्दांची आठवण झाली. "संत जो दुःखी असतो तो एक दुःखी संत असतो."



*श्री योगानंदांनी 1925 मध्ये माउंट वॉशिंगटनवर स्थापन केलेल्या सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिपच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालयाच्या कार्यालयाची इमारत, लॉस एँजेलिस, अमेरिका*

# Successors to Paramahansa Yogananda



*श्री श्री राजर्षि जनकानंद, योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिपचे आध्यात्मिक प्रमुख आणि अध्यक्ष, 1952-1955*



*श्री श्री दया माता, राजर्षि जनकानंदांनंतर, फेब्रुवारी 1955 मध्ये त्या पदावर आल्या. 2010 मध्ये त्यांच्या निधनापर्यंत, ५५ वर्षांपेक्षा अधिक काळ त्या सेवारत होत्या.*



*श्‍री मृणालिनी माता, महान गुरुची आणखी एक निकटतम शिष्या. त्यांच्या शरीर त्यागानंतर त्यांचे कार्य पुढे चालवण्यासाठी त्यांनीच निवडलेल्या आणि प्रशिक्षण दिलेल्यांपैकी एक, यो.स.सो./एस.आर.एफ. च्या त्या सद्ध्याच्या अध्यक्षा आणि आध्यात्मिक प्रमुख आहेत.*

1 क्रूसावर नेण्यापूर्वी अगदी थोडा वेळ अगोदर ख्रिस्त म्हणाला, “तुला असे वाटते काय की, मी माझ्या पित्याची आता प्रार्थना करू शकत नाही आणि तो माझ्याकडे देवदूतांच्या बारापेक्षा जास्त अशा सैन्याच्या तुकड्या पाठवील? पण मग शास्त्रात लिहून ठेवलेले आहे ते खरे कसे होणार की, हे असे असे घडून येणारच?” —मॅथ्यू, २६:५३-४ (बायबल).

2 ॲक्टस १:८ आणि २:१-४ (बायबल).

3 अकबर याचा हुमायूं हा पिता. आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीस कडव्या मुसलमानाच्या उत्साहाने अकबराने हिंदूंना छळले. पुढे तो म्हणाला, “मला जसजसे ज्ञान प्राप्त झाले तसतशी मला माझी स्वतःची फार लाज वाटू लागली. प्रत्येक पंथाच्या, धर्माच्या मंदिरामध्ये चमत्कार घडू शकतात.” त्याने भगवद्‌गीतेचे फारसी भाषांतर करविले आणि आपल्या दरबारात किती एक जेसुईट पाद्री रोमहून बोलाविले. अकबराने पुढील मजकूर, चुकीने का होईना पण मोठ्या भक्तिभावपूर्वक व प्रेमाने ख्रिस्ताने म्हण्टलेला असा मानिला आहे. (अकबराने नवीन बसविलेल्या फतेहपूर सिकरि या शहरातील विजयकमानीवर खोदलेला); येशू, मेरीचा पुत्र (ज्याच्यावर शांती नांदो) म्हणाला, “हे जग म्हणजे एक पूल आहे. त्या पुलावरून जा, पण त्याच्यावर घर बांधू नका.”

4 सुप्रसिद्ध जर्मन पहिलवान (मृ. १९२५). जगातील “सर्वांत जास्त ताकदवान मनुष्य” अशी याची ख्याती होती.

5 श्रीनगर ही काश्मीरची राजधानी आहे. हे शहर सम्राट अशोकाने ख्रि. पू. तिसऱ्या शतकामध्ये वसविले. त्याने तेथे ५०० धर्ममठ स्थापन केले होते. त्यांपैकी १००, त्यानंतर हजार वर्षांनी जेव्हा चिनी प्रवासी ह्यू-एन-त्सँग याने या शहरास भेट दिली त्या वेळी अस्तित्वात होते. दुसरा एक चिनी प्रवासी फा हैं (पाचवे शतक) ह्याने पाटलिपुत्र (हल्लीचे पटना शहर) येथील अशोकाच्या अवाढव्य राजवाड्याचे अवशेष पाहिले होते. तो म्हणतो की, “ह्या प्रासादाची रचना त्यातील कलाकौशल्याच्या आणि सजावटीच्या दृष्टीने इतकी सुंदर, उत्कृष्ट व अनुपम होती की, अशा तऱ्हेचे अवाढव्य आणि सुंदर शिल्प कोण्या मानवी हातांनी बांधलेलेच नसावे.”

## प्रकरण - २२

# 22. पाषाणहृदय मूर्ती

"एक पतिव्रता हिंदू स्त्री म्हणून मला माझ्या पतीबद्दल काही तक्रार करायची नाही, पण त्यांचे हे जडवादी भौतिक विचार पालटावे अशी मला तळमळ लागली आहे. माझ्या ध्यानाच्या खोलीमध्ये जी साधुसंतांची चित्र आहेत त्यांची कुचेष्टा करण्यात त्यांना आनंद वाटतो. माझ्या प्रिय भावा, तू त्यांच्या स्वभावात पालट घडवून आणशील अशी माझी पुरती खात्री आहे. करशील ना तू माझे काम?"

माझी सर्वांत वडील बहीण रमा माझ्याकडे अजीजीच्या मुद्रेने पाहत होती. गिरीश विद्यारत्न गल्लीमध्ये तिच्या कलकत्त्यामधील घरी मी तिला थोडा वेळ भेटण्याकरिता गेलो होतो. तिच्या विनंतीमुळे माझे मन द्रवले. माझ्या बालपणीच्या आयुष्यावर तिचा खोल असा आध्यात्मिक विचारांचा ठसा उमटला होता; आणि आईच्या मृत्यूमुळे आमच्या कुटुंबात जी पोकळी निर्माण झाली होती, ती पोकळी आपल्या ममतेने भरून टाकण्याचा तिने आटोकाट प्रयत्न केला होता.

"ताई, जरूर, मला शक्य आहे ते मी करीन." मी स्मित केले. तिचा नेहमीचा चेहरा साधारणपणे शांत व आनंदी असायचा; पण हल्ली तिच्या चेहऱ्यावर विषण्णतेची छटा असायची. ती छटा नाहीशी करण्याकरिता मला उत्सुकता लागली होती.

रमा आणि मी मार्गदर्शनाकरिता थोडा वेळ शांतपणे प्रार्थनेला बसलो एक वर्षापूर्वी माझ्या बहिणीने क्रियायोगाची दीक्षा देण्याबद्दल मला विचारले होते. त्या साधनेमध्ये ती बरीच प्रगती करीत होती.

मला एकदम स्फूर्ती आली. मी म्हणालो, "उद्या मी दक्षिणेश्वरला कालीमातेच्या मंदिरात जाणार आहे. तू माझ्याबरोबर चल आणि आपणा दोघांबरोबर येण्याकरिता तुझ्या यजमानांचे मन वळव. मला वाटते की, त्या पवित्र स्थानाच्या वातावरणात जगन्माता त्यांच्या हृदयाला स्पर्श करील. पण त्यांना आपण तेथे कशाकरिता नेत आहोत हे कळू देऊ नको."

बहिणीने मोठ्या आशेने होकार दिला. दुसऱ्या दिवशी अगदी पहाटे रमा आणि तिचे यजमान या सहलीला जाण्यास्तव तयार असलेले पाहून मला फार आनंद झाला. आमची घोडागाडी खडखड आवाज करीत दक्षिणेश्वरच्या दिशेने अप्पर सर्क्युलर रोडवरून जशी जायला लागली तेव्हा माझे मेव्हणे सतीशचंद्र बोस यांनी गुरुजनांच्या योग्यतेची टवाळी करण्यास सुरुवात केली. रमा गुपचूपपणे अश्रू ढाळीत होती, हे मी पाहिले.

"ताई, रडू नकोस!" मी तिला हळूच सांगितले. "त्यांची ही चेष्टा आपण गंभीरतेने मनावर घेत आहोत याचे त्यांना समाधान मिळवून देऊ नकोस."

सतीशबाबू म्हणत होते, "मुकुंदा, तू ह्या नालायक भोंदू लोकांच्याबद्दल कसा आदर दर्शवितोस? साधूचा नुसता चेहराच मला किळस आणतो. ह्यांचे शरीर एक तर एखाद्या हाडांच्या सापळ्यासारखे असते किंवा एखाद्या हत्तीसारखे गलेलठ्ठ असते!"

मी खदखदून हसलो. अशी ही प्रतिक्रिया झालेली पाहून सतीशबाबूंना राग आला. ते एकदम चिडून गप्प बसले. जशी आमची गाडी दक्षिणेश्वरमधील मंदिराच्या परिसरात आली तसे ते उपहासपूर्वक मला म्हणाले.

“मला वाटते, ही जी सहल आहे ती मला सुधारण्याकरिताच एक योजना आहे!”

काही उत्तर न देता मी जेव्हा वळलो तेव्हा त्यांनी माझा हात पकडला आणि ते म्हणाले, “तरुण साधुबुवा, आपल्या दुपारच्या भोजनाची सोय मंदिरातील व्यवस्थापकांच्याकडून व्यवस्थितपणे करून घेण्याचे विसरू नका.” सतीशबाबूंना तेथल्या पुजाऱ्यांशी बोलण्याचे टाळावयाचे होते.

“मी आता ध्यानाला बसणार आहे. दुपारच्या जेवणाची काही काळजी करू नका,” मी तुटकपणे बोललो, “जगन्माता तिकडे लक्ष देईल.”

“जगन्मातेवर माझा बिलकुल विश्वास नाही. एक साधी गोष्ट सुद्धा ती माझ्याकरिता करील असे मला वाटत नाही. पण माझ्या जेवणाबद्दल मी तुला जबाबदार धरणार आहे.” सतीशबाबूंच्या अावाजामध्ये धमकीचा सूर होता.

कालीमातेच्या (प्रकृतिमातेच्या स्वरूपातील ईश्वर) भव्य मंदिराच्या समोरील ओसरीकडे मी जावयास निघालो. तेथील एका खांबाजवळ सावलीची जागा मी पसंत केली व तेथे पद्मासन घालून बसलो. सकाळचे फक्त सातच वाजले होते; पण सूर्याचे ऊन तापदायक वाटू लागले होते.

जसजसा मी भक्तिभावाने समाधि-अवस्थेमध्ये जाऊ लागलो, तसतसे हे जग माझ्यापासून निसटू लागले. माझे मन कालीमातेच्या ठिकाणी केंद्रित झाले होते. दक्षिणेश्वरमधील ह्याच मंदिरातील तिची मूर्ती महान सद्गुरू श्रीरामकृष्ण परमहंस यांना फार प्रिय असे. त्यांच्या तळमळीच्या हाकेला ही दगडाची मूर्ती सजीव देह धारण करून उत्तर देत असे; त्यांच्याशी बोलत असे.

“पाषाणमूर्तीमध्ये वास करीत असणाऱ्या मूक अशा हे जगन्माते,” मी प्रार्थना करू लागलो, “तुझ्या प्रिय भक्ताकरिता, रामकृष्णांकरिता, त्यांच्या प्रार्थने वर तू मानवी रूप धारण केलेस. तर मग ह्या तुझ्या तळमळणाऱ्या लेकराच्या आक्रंदनाला का बरे उत्तर देत नाहीस?”

जसजसा मी ध्यानात मग्न होत गेलो तसतशी माझी उत्कंठाही अमर्यादपणे वाढत जाऊ लागली; आणि दिव्य शांतीचा लाभ होऊ लागला. असे पाच तास निघून गेले. आणि ज्या मातेस मी अंतःश्चक्षूंनी न्याहाळीत होतो तिने उत्तर दिले नाही तेव्हा मी जरासा नाउमेद झालो. कधी कधी भक्ताच्या आळवणीला उत्तर देण्यास परमेश्वर त्याची कसोटी घेण्याकरिता विलंब लावतो. पण नंतर शेवटी चिकाटी धरणाऱ्या भक्ताला तो त्याला प्रिय अशा रूपामध्ये दर्शन देतो. श्रद्धाळू ख्रिस्ती भक्ताला येशूचे दर्शन होते; हिंदू भक्ताला भगवान श्रीकृष्णाचे दर्शन होते, कालीमातेचे दर्शन होते आणि निर्गुणाची उपासना करणाऱ्याला वृद्धिंगत होणारी ज्योत दिसू लागते.

नाखुशीने मी माझे डोळे उघडले आणि पाहिले तो पुजारी, त्याच्या शिरस्त्र्यानुसार मंदिराचे दरवाजे दुपारच्या वेळी बंद करीत होता. ओसरीमधील एकांतातील जागेवरून मी उठलो व

अंगणात पाऊल टाकले. अंगणामधील दगडाची फरसबंदी माध्यान्हीच्या प्रखर उन्हाने तापून निघत होती. माझे अनवाणी पाय पोळून निघत होते.

“जगन्माते,” मी मनातल्या मनात शांतपणे तक्रार करू लागलो, “तू मला दर्शन दिले नाहीस आणि आता ह्या मंदिराच्या दरवाज्याच्या आड लपून राहिली आहेस. आज मला माझ्या मेव्हण्याकरिता एक खास प्रार्थना करावयाची होती.”

मनातल्या मनात मी केलेला हा अर्ज ताबडतोब मंजूर झाला. प्रथम एक सुखद अशी थंडगार लाट माझ्या पाठीवरून घरंगळत जाऊन पायांखाली गेली व तिने माझी सारी अस्वस्थता दूर करून टाकली. आणि काय आश्चर्य! सारे मंदिर मोठे मोठे होत गेले आणि त्या मंदिराचा भव्य दरवाजा उघडू लागला. कालीमातेची पाषाणमूर्ती दृष्टीपुढे हळूहळू दिसू लागली. हळूहळू त्या मूर्तीने एक जिवंत रूप धारण केले. हसत हसत तिने मान हलवून माझे स्वागत केले. माझ्या अवर्णनीय आनंदाला पारावार राहिला नाही. एखाद्या जादूच्या पिचकारीने ओढून घ्यावा तसा माझा श्वास फुफ्फुसांतून ओढून घेतला गेला. माझे शरीर अगदी जरी शिथिल झाले नाही, तरी निश्चल झाले.

आणि मग जाणीव किंवा चेतना एका दिव्य उन्मादाने वृद्धी पावू लागली. माझ्या डावीकडे गंगानदीवर किती एक मैल अंतरावर आणि मंदिराच्या पलीकडे साऱ्या दक्षिणेश्वरच्या मोहल्ल्यातील सर्व काही दिसू लागले. घरांच्या भिंती पारदर्शक पातळशा दिसावयास लागल्या आणि त्यांमधून माणसे मोठमोठ्या अंतरावरून इकडे तिकडे जात आहेत, अशी दिसू लागली.

माझा श्वास जरी थांबला होता, आणि शरीर जरी एका निश्चल अवस्थेमध्ये होते, तरी माझे हातपाय मी मोकळेपणे हालवीत होतो. कितीएक मिनिटे मी माझ्या डोळ्यांची उघडझाप करून पाहिली. दोन्ही अवस्थांमध्ये मी दक्षिणेश्वरचा सारा भूप्रदेश अगदी स्पष्ट असा पाहू शकत होतो.

आध्यात्मिक प्रकाश हा ‘क्ष’ किरणांसारखा जडवस्तूंमधून भेदून पुढे जातो. दिव्य तेज हे सर्वत्र वर्तुळाच्या केंद्रवत आहे. त्याला परीघ असा नाही. त्या सूर्यप्रकाशाने उजळून निघालेल्या त्या प्रांगणामध्ये मी असा उभा असता मला पटून आले की, मनुष्य हा साधारणपणे परमेश्वराचे एक उधळखोर व नाठाळ पोर असतो व ह्या पार्थिव जगाच्या स्वप्नात तो रममाण होऊन राहातो हे स्वप्न बुडबुड्यासारखे असून त्याला पाया असा काहीच नाही. अशा ह्या उधळखोर पोराच्या अवस्थेमधून मनुष्य जेव्हा बाहेर पडतो, तेव्हा त्याचे जे शाश्वत, चिरंतन असे जगत आहे आणि ज्या जगताचा तो जन्मतः वारसदार आहे, त्याचा त्याला पुनरपि लाभ घडून येतो. आकुंचित व्यक्तिमत्त्वामध्ये गढून गेलेल्या माणसाला कोठून तरी निसटून जाणे हे जरुरीचे मानले तरी सर्वव्यापकतेपेक्षा चांगली अशी दुसरी कोणती सुटका आहे?

दक्षिणेश्वरमधील ह्या माझ्या दिव्य आणि पवित्र अनुभवात असाधारणपणे वृद्धिंगत झालेल्या म्हणजे दोनच वस्तू, एक मंदिर व दुसरी कालीमातेची मूर्ती. बाकीच्या इतर वस्तू त्यांच्या नेहमीच्या आकारांत दिसत होत्या. फक्त प्रत्येक वस्तूच्या भोवती एका मंद प्रकाशाचे—श्वेत, नील, व सौम्य अशा इंद्रधनुष्यातील रंगांच्या छटांचे वलय होते. माझे स्वतःचे शरीर मला हलकेसे आणि सहज हवेत वरती सरकू लागल्यासारखे वाटू लागले.

माझ्या सभोवतील जड वस्तूंच्या अस्तित्वाची पुरती जाणीव असूनही मी सभोवार पाहू लागलो आणि त्या दिव्य दर्शनाचे सातत्य बिघडू न देता थोडीफार जमिनीवर पावले टाकू लागलो.

आणि एकदम मंदिरातील भितींच्या पाठीमागे माझे मेव्हणे मला एका पवित्र बिल्ववृक्षाच्या काटेरी फांद्यांखाली बसून राहिलेले आढळले. त्यांच्या विचारांची दिशा मला काही एक प्रयत्न न करता कळून येऊ लागली. दक्षिणेश्वरच्या पवित्र वातावरणामध्ये त्यांच्या मनावर जरा पारमार्थिक परिणाम झाला खरा. पण त्यांच्या मनात अजून माझ्याबद्दल अनुदारपणाचे विचार होते. मी एकदम कालीमातेच्या कृपाळू मूर्तीकडे दृष्टी वळविली.

"जगन्माते," मी प्रार्थना करू लागलो, "काय तू माझ्या बहिणीच्या नवऱ्याच्या मनामध्ये आस्तिक्यबुद्धी निर्माण नाही करणार?"

येथवर स्तब्ध असलेली ती सुंदर मूर्ती शेवटी बोलली.

"तुझी इच्छा प्रमाण!"

मी सतीशबाबूंकडे हर्षमुद्रेने पाहिले. एखादी आध्यात्मिक शक्ती कार्यकरीत आहे, हे जणू उपजत बुद्धीने समजावे, त्याप्रमाणे ते जमिनीवरील आपल्या आसनावरून रागाने उठले. मंदिराच्या पाठीमागे ते धावतच गेले. ते माझ्याकडे मूठ हालवीतच आले.

ते सर्वंकष दिव्य दर्शन दृष्टीआड झाले. ती कृपाळू जगन्माता मला दिसेनाशी झाली. मंदिराचे पारदर्शकत्वही नाहीसे झाले व त्याने आपला पूर्वीचा आकार धारण केला. पुनः माझे शरीर त्या प्रखर उन्हाने उकडून घामाघूम झाले. मी ओसरीच्या आश्रयास उडी मारून गेलो आणि तेथपर्यंत क्रोधायमान अशा सतीशबाबूंनी माझा पाठलाग केला. मी घड्याळाकडे पाहिले. एक वाजला होता. ते दिव्य दर्शन एक तासभर टिकले होते.

"मूर्ख पोरा," माझे मेव्हणे किंचाळतच उठले, "तासन् तास तू मांडीवर मांडी घालून आणि एक डोळा दुसऱ्या डोळ्यावर लावून बसला आहेस. मी येथे सारखा जात-येत असताना पाहतोय तुला. आमचे जेवण कुठे आहे? आता मंदिर बंद झाले. मंदिरातील अधिकाऱ्यांना तू त्याबद्दल सूचना द्यायची विसरलास. आता आमची जेवणाची व्यवस्था करायला उशीर झालाय!"

जगन्मातेचे दर्शन झाल्याचा उन्माद माझ्यामध्ये अजून टिकून होता. त्या कैफात मी म्हणालो, "जगन्माता आपल्याला जेवू घालील."

"एकदा मला पाहायचे आहे," सतीशबाबू ओरडून म्हणाले, "ती तुझी जगन्माता आम्हांला अगोदर काही व्यवस्था न करता कशी जेवण देणार आहे!"

त्यांनी ते शब्द उच्चारले न उच्चारले तोच मंदिरातील पुजारी अंगण ओलांडून आमच्याकडे आला.

"मुला," तो बोलू लागला, "तुझे कित्येक तास ध्यान चालू असताना मी तुझी मुद्रा पाहत होतो. गंभीर व तेजस्वी दिसली मला ती. आज सकाळी तुम्ही मंडळी आलेली मी पाहिली व तुमच्या जेवणासाठी भरपूर अन्न बाजूला ठेवायची मला इच्छा झाली. ज्यांनी अगोदर वर्दी दिली नाही त्यांना जेवण द्यायचे नाही, असा ह्या मंदिरातील शिरस्ता आहे. पण मी तुमच्या बाबतीत अपवाद करतो."

मी त्याचे आभार मानले व सतीशबाबूंच्या डोळ्यांकडे सरळ नजर फेकली. भावनेने त्यांचा ऊर भरून आला व पश्चात्तापाने त्यांनी आपली नजर खाली केली. आम्हांला अगदी मेजवानीचेच जेवण मिळाले. आंब्याचा हंगाम नसताही जेवणात आंबे होते. परंतु आमच्या मेव्हण्यांना विशेष भूक नसावी हे माझ्या ध्यानात आले. ते गोंधळून गेले होते व विचारांच्या समुद्रामध्ये खोलवर बुडी घेत होते.

कलकत्त्याला परत येत असताना सतीशबाबूंनी माझ्याकडे मवाळ मुद्रेने मधून मधून पाहिले. त्यांच्या मुद्रेवरील भाव क्षमायाचनेचा होता. पण ह्या प्रसंगानंतर त्यांनी त्याबद्दल तोंडावाटे एक चकार शब्दही कधी काढला नाही. जणू काय सतीशबाबूंनी आव्हान दिले म्हणूनच की काय, पुजारी आम्हांला भोजनाचे आमंत्रण द्यायला आला.

दुसऱ्या दिवशी मी बहिणीला भेटण्याकरिता तिच्या घरी गेलो. तिने ममतेने माझे स्वागत केले.

ती म्हणाली, “भाऊराया, काय नवल पण! काल संध्याकाळी हे माझ्यापुढे उघडपणे रडले.

“ते म्हणाले, ‘देवी, तुझ्या भावाने माझ्यात परिवर्तन घडवून आणण्याकरिता योजना आखली. मला किती आनंद झाला म्हणून सांगू? मला त्याचे शब्दांत वर्णन करून सांगता येत नाही. मी तुझ्या बाबतीत जो आजपर्यंत अन्याय केला आहे, त्याचे आता मी परिमार्जन करणार आहे. आज रात्रीपासून आपली मोठी जी झोपण्याची खोली आहे तिचे देवघर करू या. आणि तुझी जी ध्यानाची लहानशी खोली आहे तिचा झोपण्याची खोली म्हणून उपयोग करू मी भावाची कुचेष्टा केली म्हणून मला फार वाईट वाटते. मी ज्या बेशरमपणे त्याच्याशी वागलो त्याबद्दल मी स्वतःला शिक्षा करून घेणार आहे. पारमार्थिक मार्गावर माझी थोडीबहुत प्रगती झाल्याखेरीज मी मुकुंदाशी न बोलण्याचे ठरविले आहे. जगन्मातेची आता मी दररोज यापुढे भक्ती करीत जाणार. कधी काळी मला तिचे दर्शन घडो!”

पुष्कळ वर्षांनी (१९३६ मध्ये) माझ्या मेव्हण्याला मी दिल्लीमध्ये भेटलो. आत्मसाक्षात्काराच्या मार्गावर त्यांनी बरीच प्रगती केल्याचे पाहून मला फार आनंद वाटला आणि त्यांना जगन्मातेचे दर्शनही झाले असे कळले. त्यांच्या घरी माझा मुक्काम असताना रात्रीचा बराचसा वेळ ते ध्यानात घालवीत असत हे माझ्या लक्षात आले. तरी त्यांना एक मोठे दुखणे होते व दिवसभर ते कचेरीच्या कामात गुंतलेले असत.

एकदा माझ्या मनात असा विचार आला की, आमच्या मेव्हण्याचे आयुष्य आता फारसे राहिले नाही. रमाने माझ्या मनाचा कानोसा घेतला असावा.

“भाऊराया!” ती म्हणाली, “माझी तब्येत चांगली आहे; पण ह्यांना बरे नसते. तरी पण हे तू ध्यानात ठेव की, एखाद्या पतिव्रता हिंदू स्त्रीप्रमाणे मी ह्यांच्याअगोदर मरणार आहे. [1] आता मी फारशी जगेन असे वाटत नाही.”

त्या तिच्या अशुभसूचक शब्दांनी मी दचकलो. पण त्यांतील सत्याचा अंश माझ्या ध्यानात आला. हे तिने भाकीत केल्यावर सुमारे अठरा महिन्यांनी ती वारली. त्या वेळी मी अमेरिकेत होतो. माझा धाकटा भाऊ विष्णु याने मला पुढे सारी सविस्तर हकीकत सांगितली.

“ज्या वेळी ती वारली तेव्हा ती व सतीश दोघे कलकत्त्यात होते,” विष्णूने मला सांगितले, “त्या दिवशी तिने अगदी लग्नाच्या वेळचा साजशृंगार धारण केला होता.”

“आज हा विशेष पोशाख कशाकरिता?” सतीशबाबूंनी विचारले.

“ह्या भूलोकावर आपली सेवा करण्याचा हा माझा अखेरचा दिवस.” रमाने उत्तर दिले. आणि थोड्याच वेळाने तिला हार्ट अटॅक (हृदयविकाराचा झटका) आला. तिचा मुलगा डॉक्टर वगैरे आणण्याकरिता बाहेर पडणार तेवढ्यात ती म्हणाली, “बाळ, मला सोडून जाऊ नकोस. आता काही कशाचा उपयोग नाही. डॉक्टर येण्याच्या अगोदरच मी गेलेली असेन.” दहा मिनिटांनंतर तिने आपल्या पतीचे पाय भक्तिभावाने धरले व पूर्ण शुद्धीत असता रमाने अगदी सुखाने व काही एक क्लेश न होता देहत्याग केला.

“आपल्या पत्नीच्या मरणानंतर सतीशबाबू अगदी तपस्व्यासारखे वागू लागले,” विष्णू पुढे सांगू लागला, “एक दिवस तो आणि मी रमाच्या एका हसऱ्या फोटोकडे पाहत होतो.

‘का हसते आहेस तू?’ सतीशबाबूंनी एकदम उद्गार काढले. जणू त्यांची पत्नी खरोखरीची जिवंतच होती. ‘तुला काय वाटले, तू मोठी हुशार आहेस माझ्या अगोदर जाण्याचे ठरविण्यात? तू माझ्यापासून जास्त काळ दूर राहणार नाहीस, हे मी दाखवून देणार आहे. मी लवकरच तुझ्या भेटीला येतो.’

“ह्या सुमारास सतीशबाबू आपल्या दुखण्यातून चांगले बरे झाले होते आणि त्यांची तब्येतही तशी उत्तम होती. तरी ते विशेष काही कारण न घडता व त्या फोटोग्राफच्या पुढे वर सांगितलेले विचित्रसे उद्गार काढल्यानंतर काही दिवसांतच वारले.”

अशा तऱ्हेने माझी प्रिय बहीण रमा आणि तिचे यजमान सतीशबाबू या दोघांनी योगीजनसदृश असा देहत्याग केला. सतीशबाबूंचे दक्षिणेश्वरला एका साधारणशा संसारी माणसाचे एका मूक संतपुरुषामध्ये परिवर्तन घडून आले होते.

1 आपल्या नवऱ्यादेखत जर आपल्याला मरण आले, तर ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे लक्षण आहे, असे हिंदू स्त्री समजते. अशा मरणाला ‘भरल्या कुंकवाचे मरण’ समजतात. पतीच्या एकनिष्ठ सेवेचे ते निदर्शक आहे, असे समजतात.

प्रकरण - २३

# 23. मला विश्वविद्यालयाची पदवी मिळते

"तत्त्वज्ञानाच्या पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमाकडे तू दुर्लक्ष करीत आहेस. परीक्षेत पास होण्याकरिता तू फारसे कष्ट न करता आपल्या 'अंतः स्फूर्तीवर' विसंबून असतोस हे खरे, पण तू ह्याहून जास्त अशा विद्यार्थ्यांच्या पद्धतीनुसार जर अभ्यास केला नाहीस तर तू ही परीक्षा कशी पास होतोस हे मी पाहतो."

सेरामपूर कॉलेजचे प्राध्यापक डी. सी. घोषाल मला कडक शब्दांत सांगत होते. मी जर त्यांच्या वर्गातल्या फायनल लेखी चाचणी परीक्षेत नापास झालो तर मग मला शेवटच्या परीक्षेस बसता आले नसते. कलकत्ता विश्वविद्यालयाच्या फॅकल्टीने असे नियम घालून दिले होते. सेरामपूर कॉलेज कलकत्ता विश्वविद्यालयाला जोडलेले होते. भारतीय विश्वविद्यालयांमध्ये जर एखादा विद्यार्थी बी. ए. परीक्षेमध्ये एका विषयात नापास झाला तर पुढील वर्षी त्या परीक्षेला बसताना त्याला सर्व विषय घेऊन बसावे लागते.

सेरामपूर कॉलेजमधले प्राध्यापक मला बहुधा ममतेने वागवीत असत. त्यांना माझ्या वागण्याची थोडी गंमतही वाटत असे. "मुकुंदाला देवाधर्माचे वेड लागले आहे," अशा तऱ्हेची सारवासारव करीत ते मला वर्गातील प्रश्नांची उत्तरे देण्याची तसदी देण्याचे टाळीत असत. त्यांना असे वाटावयाचे की, फायनल लेखी चाचणीमध्ये मी नापास झालो म्हणजे बी. ए. परीक्षेच्या उमेदवारांच्या यादीमध्ये माझे नाव आपोआपच गाळले जाईल. माझ्या सहाध्यायी विद्यार्थ्यांनी माझ्याबद्दल निर्वाळा देऊन टाकलाच होता. त्यांनी मला "वेडा फकीर" (मॅड मंक) असे टोपण नाव पाडले होते. प्राध्यापक घोषाल यांनी तत्त्वज्ञानाच्या परीक्षेमध्ये नापास होण्याची जी धमकी दिली होती ती खोटी पाडण्याकरिता मी एक युक्ती योजिली. फायनल चाचणीच्या परीक्षेचे निकाल जाहीररीत्या प्रसिद्ध होणार होते. त्याच वेळी माझ्या एका सहाध्यायाला माझ्याबरोबर प्राध्यापकांच्या अभ्यासिकेत येण्याबद्दल मी विचारले.

"चल, मला एक साक्षीदार पाहिजे." मी माझ्या सोबत्याला सांगितले, "ह्या प्राध्यापकांना खोटे पाडण्याचे जर मला जमले नाही तर माझी मोठी निराशा होईल."

माझ्या पेपरला किती गुण दिले गेले आहेत हे मी प्राध्यापकांना विचारले तेव्हा त्यांनी नुसती मान हलविली.

ते विजयोन्मादाने म्हणाले, "यशस्वी उमेदवारांच्या यादीत तुझे काही नाव नाही." त्यांनी आपल्या टेबलावरील कागदांच्या चळतीतून धुंडून पाहिले. "तुझा पेपर काही यात नाही. तू नापास झाला आहेस—काही नाही तर परीक्षेला बसला नाहीस म्हणून."


मी गालांतल्या गालांत म्हणालो, "पण सर, मी परीक्षेला बसलो होतो. मी स्वतः पाहू का माझा पेपर या गठ्ठ्यात?"

दुसरा काही इलाज नसल्यामुळे प्राध्यापक महाशयांनी परवानगी दिली. मी चटकन माझा पेपर शोधून काढला. पेपरवर माझ्या 'रोलकॉल नंबरा' खेरीज माझ्या निशाणीचे असे काही

चिन्ह मी ठेवलेच नव्हते. अशा तऱ्हेने माझ्या नावाचा ‘लाल झेंडा’ नसल्यामुळे प्राध्यापक महाशयांनी माझ्या पेपरला भरपूर गुण दिले होते, जरी त्या पेपरात पाठ्यपुस्तकांतील अवतरणे देऊन मी माझी उत्तरे सजविली नव्हती तरी!” [1]

ही माझी युक्ती ध्यानात आल्यावर ते आता ओरडून म्हणाले, “केवळ नशीब!” आणि पुढे जणू आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ म्हणाले, “तू बी. ए. च्या फायनलमध्ये नक्की नापास होणार.”

इतर विषयांतील चाचणी परीक्षांसाठी मला माझा प्रिय मित्र व चुलत भाऊ प्रभासचंद्र घोष याने मदत केली. तो माझे काका शारदा यांचा मुलगा. माझ्या सर्व फायनल चाचणी परीक्षांत अगदी कमीत कमी पास होण्याला आवश्यक इतके गुण मिळविण्याकरिता मला ती त्रासदायक धडपड करावी लागली, पण मला यश मिळाले.



*प्रभास चंद्र घोष आणि परमहंस योगानंद, कोलकाता येथे, डिसेंबर 1919. श्री योगानंदांचे भाऊ, जीवनभरचे मित्र आणि शिष्य, श्री घोष 1975 मध्ये त्यांच्यानिधनापर्यंत, जवळ जवळ चाळीस वर्षे योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष होते.*

आता कॉलेजमध्ये चार वर्षे घालविल्यावर मी बी. ए. च्या परीक्षेला बसायला पात्र झालो. तरी सुद्धा या खास हक्काचा फायदा घेण्याची माझी मनापासून इच्छा नव्हती. बी. ए. डिग्रीच्या कलकत्ता विश्वविद्यालयाचे पेपर्स इतके कठीण असावयाचे की, त्या मानाने सेरामपूर कॉलेजमधील पेपर्स म्हणजे पोरखेळ असायचा. मी दररोज श्रीयुक्तेश्वरांना भेटायला जायचो तेव्हा कॉलेजला हजर राहायला मला वेळच नसे. वर्गात माझ्या गैरहजेरीपेक्षा हजेरीच माझ्या वर्गबंधूंना बोलायचा व आश्चर्य प्रदर्शित करण्याचा विषय व्हावयाची.

माझा दैनिक कार्यक्रम असा: बहुतकरून दररोज सकाळी साडेनऊच्या सुमारास सायकलवरून निघायचे. एका हातात गुरूजींना द्यावयास फुले घेत असे. ही फुले 'पंथी' बोर्डिंग हाऊसच्या बागेमधली असत. गुरुजी प्रेमळपणे माझे स्वागत करीत व जेवावयास थांबवून घेत. त्यांचे हे जेवणाचे आमंत्रण मी बहुधा स्वीकारीत असे. तेवढाच एक दिवस कॉलेजबद्दलचा विचार मनातून जात असे. सबंध दिवसभर श्रीयुक्तेश्वरांच्या ज्ञानाचा निरुपम वाग्ओघ ऐकत बसे किंवा आश्रमातील कामामध्ये मदत करीत असे आणि मध्यरात्रीच्या सुमारास नाखुशीने 'पंथी' मध्ये परत जायला निघत असे. मधून मधून मी गुरुजींच्या सहवासात रात्र घालवायचा. मी त्यांच्या बोलण्यामध्ये इतका रंगून जात असे की, रात्र संपून पहाट केव्हा झाली याचा मला पत्ता नसायचा.

एके दिवशी रात्री अकराच्या सुमाराला बोर्डिंग हाऊसकडे परत जाण्याला निघालो असता बूट घालू लागलो, तेव्हा गुरुजींनी मला गंभीरपणे विचारले.

"तुझी बी. ए. ची परीक्षा केव्हा सुरू होत आहे?"

"पाच दिवसांनी, गुरुजी."

"मग तुझी तयारी असेलच."

मी घाबरून गेलो. हातातला बूट हवेत तसाच्या तसा राहिला. "गुरुजी," मी तक्रारीच्या आवाजाने बोललो, "तुम्हांला माहिती आहे की, माझा सारा वेळ प्रोफेसरांच्याकडे न जाता तुमच्याचजवळ गेला. आणि आता मी त्या कठीण फायनल परीक्षांना बसून काय स्वतःची फजिती करून घेऊ?"

श्रीयुक्तेश्वरांनी माझ्याकडे भेदक डोळे रोखले. "तुला बसलेच पाहिजे." त्यांनी थंडपणे हुकुमच केला. "आश्रमात जीवन व्यतीत करण्याबद्दल तू जी ही पसंती दर्शविलीस त्याबद्दल तुझे वडील व इतर नातेवाईक यांना टीका करण्यास जागा देता कामा नये. मला फक्त एवढेच वचन दे की तू ह्या परीक्षेला बसशील व सर्व प्रश्नपत्रिकांची उत्तरे तुला येतील तितक्या उत्कृष्ट रीतीने देशील."

माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. त्यांचा प्रवाह मला थांबवेना. मला असे वाटले की, गुरुजींची ही आज्ञा सयुक्तिक नाही आणि अगदी थोडक्यात सांगावयाचे म्हणजे त्यांनी ही दाखविलेली कळकळ इतकी उशिरा दाखविली की, तिचा आता काही उपयोग नव्हता.

“जर आपली इच्छा असेल तर मी बसेन, “मी हुंदका देत म्हणालो, “पण परीक्षेची पुरेशी तयारी करायला आता वेळच उरलेला नाही.” मी माझ्याशीच पुटपुटलो. “प्रश्नांची उत्तरे म्हणून मी आपल्या शिकवणुकीने पेपरांचे कागद भरून टाकीन!”

दुसऱ्या दिवशी जेव्हा मी नेहमीच्या वेळेला आश्रमात गेलो, तेव्हा श्रीयुक्तेश्वरांना फुलांचा गुच्छा दुःखित अंतःकरणाने दिला. माझा दुःखी चेहरा पाहून त्यांना हसू आले.

“मुकुंदा, परमेश्वराने तुला परीक्षेत काय किंवा अन्यत्र काय अपयश दिले आहे काय?”

“नाही, गुरुजी,” मी जरा उत्तेजित होऊन उत्तर दिले. कृतज्ञतेच्या स्मृती एखाद्या पुरासारख्या ताज्यातवान्या होऊन आल्या.

गुरुजी कृपाळूपणे म्हणाले, “कॉलेजमधील सन्मान मिळविण्याच्या मार्गात तुझ्या आळशीपणाने नव्हे, तर परमेश्वराबद्दलची ज्वलंत निष्ठा आड आलेली आहे.” थोडा वेळ स्तब्ध राहून त्यांनी बायबलमधील एक सूक्तिवचन सांगितले, “प्रथम परमेश्वराच्या राज्याचा आणि त्याच्या सच्चरिताचा शोध घे आणि मग सर्व गोष्टी तुला आपोआप मिळून जातील.” [2]

गुरुजींच्या सान्निध्यात माझ्यावरील हा बोजा उचलला गेल्याची ही हजारावी वेळ. आमचे जरा लवकरच जेवण झाले; त्यानंतर मी ‘पंथी’ला लगोलग परत जावे, असे त्यांनी सुचविले.

“काय रे, तुझा तो मित्र, रमेशचंद्र दत्त, अजून बोर्डिंग हाऊसमध्ये राहतो काय?”

“होय, गुरुजी.”

“त्याला जाऊन भेट. तुला परीक्षेत मदत करण्याकरिता परमेश्वर त्याला प्रेरणा देईल.”

“ठीक आहे गुरुजी, पण रमेशला फार अभ्यास आहे. तो आमच्या वर्गातला अती हुशार विद्यार्थी आहे आणि त्याचा अभ्यासक्रम इतरांच्यापेक्षा मोठा आहे.”

गुरुजींनी माझ्या हरकती बाजूला सारल्या. “पण रमेशला तुझ्याकरिता वेळ सापडेल. जा पाहू आता.”

मी ‘पंथी’कडे पुनः सायकलने परतलो. बोर्डिंग हाऊसच्या आवारामध्ये अगदी पहिला जो इसम भेटला, तो म्हणजे ‘स्कॉलर’ रमेश. जणू काही त्याला वेळ मोकळा होता अशा आविर्भावाने माझी ही आत्मविश्वासशून्य विनंती त्याने मान्य केली.

“जरूर, मी तुला वाटेल ती मदत करीन.” असे म्हणून त्याने त्या दिवसाचे व पुढल्या थोड्या दिवसांचे किती एक तास मला निरनिराळ्या विषयांत तयार करण्यात खर्च केले.

“मला वाटते की, इंग्लिश वाङ्मयावरीलच्या पेपरमध्ये पुष्कळसे प्रश्न, ज्या मार्गाने ‘चाइल्ड हॅरोल्ड’ गेला त्याबद्दल असतील.” तो सांगू लागला. “चल, आपल्याला एक नकाशाचे पुस्तक ताबडतोब मिळविले पाहिजे.”

मी ताबडतोब शारदाकाकांच्या घरी गेलो व एक नकाशाचे पुस्तक उसने घेतले. रमेशने त्यामधील युरोपच्या नकाशावर जी जी ठिकाणे बायरनच्या साहसप्रिय प्रवाशाने प्रवासात पाहिलेली होती, त्या त्या ठिकाणी खुणा केल्या. ही त्याची शिकवणी चालू असता त्याच्या तोंडून ऐकायला माझे काही वर्गबंधू माझ्याभोवती जमा झाले होते. “रमेश तुला चुकीचे सांगतोय,” त्यापैकी एक म्हणाला, “साधारणपणे पन्नास टक्के प्रश्न पुस्तकातील मजकुराबद्दल असतात. बाकीचे निम्मे प्रश्न लेखकांच्या जीवनक्रम विषयावर असतात.”

इंग्लिश वाङ्मयावरील परीक्षेला जेव्हा मी बसलो, तेव्हा पेपरवर प्रथम नजर टाकली आणि कृतज्ञतेचे अश्रू माझ्या गालांवर ओघळून खाली पेपरवर टपकले. वर्गपर्यवेक्षक माझ्या डेस्कपाशी आला व त्याने सहानुभूतिपर माझी चौकशी केली.

"माझ्या गुरूने असे भविष्य केले होते की, रमेश तुला मदत करील," मी खुलासा करू लागलो, "आणि पाहा जे प्रश्न त्याने मला सुचविले होते, अगदी तेच नेमके प्रश्न या पेपरमध्ये आहेत." आणखी मी त्याला सांगितले, "माझ्या नशिबाने या वर्षी ज्या ब्रिटिश लेखकांच्या जीवनक्रमाबद्दल मी अभ्यास केलाच नव्हता (की ज्यांचा जीवनक्रम माझ्या दृष्टीने अत्यंत गूढ होता) त्यांच्याबद्दल थोडे प्रश्न आले आहेत."

मी जेव्हा माझ्या खोलीवर परतलो, तेव्हा साऱ्या बोर्डिंग हाऊसमध्ये ही गडबड! ज्या मुलांनी रमेशवरती निष्ठा असल्याबद्दल माझी कुचेष्टा केली होती, त्यांच्या अभिनंदनपर शब्दांनी आता माझ्या कानठळ्या बसल्या होत्या. त्या आठवड्यात परीक्षा चालू असताना मी जास्तीत जास्त वेळ रमेशच्या बरोबर घालवू लागलो. प्राध्यापक जे प्रश्न घालतील असे त्याला वाटले, ते प्रश्न तो तयार करू लागला आणि दररोज ते रमेशचे प्रश्न जसेच्या तसे त्याच शब्दांत परीक्षेच्या पेपर्समध्ये येत!

आणि हळूहळू साऱ्या कॉलेजमध्ये अशी बातमी पसरत चालली की, काहीसा चमत्कारासारखा एक प्रकार होत आहे आणि लक्ष कधीच ठिकाणी नसलेला "वेडा फकीर" हा परीक्षा पास होण्याच्या मार्गात आहे. मी ही गोष्ट लपवून ठेवण्याचा काही प्रयत्न केला नाही. कलकत्ता विश्वविद्यालयाच्या फॅकल्टीने काढलेल्या पेपर्समध्ये स्थानिक प्राध्यापक काही फेरफार करू शकत नव्हते.

इंग्लिश वाङ्मयाच्या पेपरबद्दल मी नंतर जेव्हा विचार करू लागलो, तेव्हा एके दिवशी सकाळी माझ्या ध्यानात आले की, एक मोठी घोडचूक मी पेपरमध्ये करून ठेवली आहे. काही प्रश्न दोन विभागांमध्ये विभागलेले होते. अ किंवा ब आणि क किंवा ड. प्रत्येक विभागातील एकेक प्रश्न सोडविण्याच्या ऐवजी मी एका विभागातले दोन प्रश्न सोडविले व दुसऱ्या विभागाकडे पूर्ण दुर्लक्ष केले. असा निष्काळजीपणा माझा झाला आणि त्या पेपरमध्ये जास्तीत जास्त मला ३३ मार्क्स मिळाले असते. म्हणजे पास होण्याला आवश्यक ३६ मार्क्सहून तीन कमी.

मी गुरुजींच्याकडे धावतच गेलो व काय घोटाळा झाला तो त्यांना समजावून सांगितला.

"गुरुजी, माझ्या हातून एक अक्षम्य चूक झाली आहे. रमेशच्या मदतीने परमेश्वरी कृपा होण्याची माझी पात्रता नाही. मी अगदी नालायक आहे."

"धीर धर, मुकुंदा." श्रीयुक्तेश्वरांचा आवाज अगदी मृदू होता. काही विशेष झालेच नाही, असे त्यांना वाटत असावे. त्यांनी वरती आकाशाच्या निळ्या घुमटाकडे बोट दाखविले. "एखादे वेळी सूर्य व चंद्र आकाशामधली आपली स्थाने बदलतील; पण तुला पदवी मिळणार नाही, असे होणार नाही."

आकडेवारीच्या हिशेबाने पाहता मी पास होणे हे केवळ अशक्य होते. तरी सुद्धा मी जरा शांत मनाने आश्रमातून बाहेर पडलो. आकाशाकडे भीत भीत मी एक-दोन वेळा पाहिले. तेथे दिनमणी रविमहाराज आपल्या नित्याच्या मार्गावरून सुस्थितपणे जात असताना दिसले.

पंथी पर्यंत जाऊन पोहोचलो, तसे एका सहाध्यायाचे उद्‌गार कानी ऐकू आले: “मी असे ऐकले आहे की, ह्या वर्षी अगदी पहिल्याप्रथमच, इंग्लिश वाङ्मयाच्या पेपरमध्ये पास होण्यास कमीत कमी लागणारे गुण आणखी कमी करण्यात येणार आहेत.”

मी त्या विद्यार्थ्याच्या खोलीत इतक्या जोराने प्रवेश केला की, तो घाबरून माझ्याकडे पाहू लागला. मी त्याला उत्सुकतेने विचारु लागलो.

तो हसून म्हणाला, “लांब केसवाल्या फकिरा, अभ्यासाच्या गोष्टीत एवढे लक्ष केव्हापासून घालायला लागलास? अगदी शेवटल्या घटकेला आरडाओरडा करून काय उपयोग आहे? पण पास होण्यासाठी लागणारे मार्क्स ३३ पर्यंत खाली आणले आहेत, ही गोष्ट खरी.”

मी माझ्या खोलीत आनंदाने उड्या मारीतच गेलो. तेथे मी गुडघे टेकले व परमेश्वराच्या अचूक गणिताबद्दल त्याची स्तुती केली.

रमेशच्या माध्यमाने मला मार्गदर्शन करीत असलेल्या परमेश्वरी अनुग्रहाबद्दलची माझी जाणीव दर दिवशी वृद्धिंगत होऊ लागली व मी थरारून जात चाललो. परीक्षेमधील बंगाली भाषेच्या पेपरच्या बाबतीत एक विशिष्ट प्रकारची गोष्ट घडून आली. एके दिवशी काय झाले! मी बोर्डिंग हाऊसमधून परीक्षेच्या हॉलकडे जायला निघत होतो. तेवढ्यात रमेशने मला हाक मारली. रमेशने काही मला या पेपरबद्दल तयार केले नव्हते.

एक वर्गबंधू मला घाईघाईने म्हणाला, “तो पाहा तुला रमेश हाक मारतोय. पण तू परत फिरू नकोस. आपल्याला हॉलमध्ये जायला उशीर होईल.”

त्याच्या उपदेशाकडे लक्ष न देता मी बोर्डिंग हाऊसकडे धावतच गेलो.

रमेश म्हणाला, “बंगाली भाषेच्या पेपरमध्ये आपण बंगाली मुले साधारणपणे सहजच पास होतो. पण मला अगदी इतक्यातच अशी अंतः प्रेरणा (hunch) झाली आहे की, या वर्षी प्रोफेसरलोक पाठ्य पुस्तकांवरच जास्त प्रश्न घालून विद्यार्थ्यांची कत्तल करणार आहेत.” नंतर त्याने मला विद्यासागरांच्या आयुष्यामधल्या दोन गोष्टींचा सारांश सांगितला. विद्यासागर हे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी बंगालमध्ये एक मोठे प्रसिद्ध परोपकारी पुरुष होऊन गेले.

मी रमेशचे आभार मानले व लगोलग सायकल चालवून हॉलमध्ये हजर झालो. तेथे मला आढळून आले की, बंगालीच्या पेपरचे दोन विभाग होते. पहिलीच सूचना अशी होती की, “विद्यासागरांच्या [3] दातृत्वाची दोन उदाहरणे द्या.” अगदी नुकतेच मिळविलेले ह्या विषयावरचे ज्ञान मी पेपरमध्ये ओतले व मनाशी आभारप्रदर्शनाचे थोडे शब्द पुटपुटलो की, अगदी आयत्या वेळी मी रमेशच्या ह्या तातडीच्या हाकेकडे लक्ष दिले. विद्यासागरांच्या परोपकारांबद्दल (त्यांत एक परोपकार माझ्यावर झाला तो वेगळाच) मला जर काही एक माहिती नसती, तर बंगालीच्या पेपरमध्ये मी पास झालो नसतो.

पेपरामध्ये दुसरी सूचना अशी होती: “ज्याने तुम्हांला सगळ्यांत जास्त स्फूर्ती दिली आहे अशा पुरुषाच्या जीवनक्रमाबद्दल बंगालीमध्ये निबंध लिहा.” प्रिय वाचक, या विषयाकरिता मी कोणत्या पुरुषाची निवड केली, हे आपणांस सांगावयास नकोच. गुरुजींच्या स्तुतीने मी पानावर पाने भरून काढली आणि मी जे भविष्य पुटपुटलो होतो की, “प्रश्नांची उत्तरे म्हणून

मी आपल्या शिकवणुकीने पेपराचे कागद भरून टाकीन," ते अगदी तंतोतंत खरे ठरल्याबद्दल माझे मलाच हसू आले.

तत्त्वज्ञानाच्या पेपरबद्दल रमेशला काही विचारण्याची मला जरूर वाटली नाही. श्रीयुक्तेश्वरांच्या हाताखाली मला त्या विषयावर बरेच ज्ञान प्राप्त झाले होते, त्यावर विसंबून, पाठ्य पुस्तकात जे काही दिले होते त्याकडे मी बिलकुल पाहिले नाही आणि सगळ्यांत जास्त गुण मला तत्त्वज्ञानाच्या पेपरमध्ये मिळाले. बाकी इतर विषयांत मला पास होण्यास कमीत कमी जेवढे गुण लागतात तेवढे मिळाले.

माझा निःस्वार्थी मित्र जो रमेश याला सन्मानासह पदवी मिळाली हे नमूद करण्यास मला फार आनंद वाटतो.

मी ग्रॅज्युएट झाल्याचे पाहून वडिलांना तर हसूच लोटले. "मुकुंदा, तू पास होशील असे मला कधीच वाटले नाही," त्यांनी स्पष्ट कबुली दिली. 'तू तुझ्या गुरूच्या सान्निध्यात एवढा वेळ घालवतोस—' माझ्या वडिलांच्या ह्या अनुच्चारित टीकेचा गुरुजींनी बरोबर कानोसा घेतला होता.

माझ्या नावाच्या पाठीमागे बी. ए. ची कधी काळी पदवी लागेल याबद्दल मला कितीएक वर्षे जबरदस्त शंका वाटे. मी त्या पदवीचा क्वचितच उपयोग करतो. कारण माझ्या मनात असा विचार येतो की, ती पदवी म्हणजे मला एक दिव्य देणगी दिलेली आहे. तिचे मला काही अज्ञात कारणांस्तव प्रदान झालेले आहे. प्रसंगोपात्त कॉलेजमध्ये शिकून गेलेली माणसे पदवीधर झाल्यानंतर आपण घोकंपट्टी केलेले फारच थोडे ज्ञान आपल्यापाशीं शिल्लक राहिलेले आहे; असा शेरा मारताना आढळून येतात. ती त्यांची कबुली ऐकली म्हणजे मला जरा हायसे वाटते व माझ्यामध्ये नक्की वास करीत असणाऱ्या शैक्षणिक उणीवांची जाणीव मला त्यामुळे होत नाही.

१९१५ मधील जून महिन्यात ज्या दिवशी मला कलकत्ता विश्वविद्यालयाची पदवी मिळाली, त्या दिवशी मी माझ्या गुरूंच्या पाया पडलो व त्यांचे जे आशीर्वाद त्यांच्या जीवनातून [4] माझ्या जीवनात उतरले, त्याबद्दल त्यांचे आभार मानले.

"ऊठ मुकुंदा," ते लाडाने म्हणाले, "परमेश्वराला सूर्य व चंद्र यांची परस्परांची स्थाने बदलण्यापेक्षा तुला पदवीधर करून टाकणे अधिक सोयीचे वाटले, दुसरे काय?"

---

1 मला हे कबूल केले पाहिजे की, प्राध्यापक घोषाल यांचे व माझे संबंध जे बिघडलेले होते, त्यात त्यांचा काही दोष नव्हता. त्याचे कारण एवढेच होते की, मी त्यांच्या वर्गाला कधीही हजर नसायचा. तसे त्यांना तत्त्वज्ञान विषयाचे गाढ ज्ञान होते व ते उत्तम वक्तेही होते. पुढे काही वर्षांनी त्यांच्याशी माझे संबंध पुष्कळ सुधारले.

2 मॅथ्यू ६:३३ (बायबल).

3 ह्या सूचनेमध्ये प्रत्यक्ष शब्द काय होते ते मला आता आठवत नाहीत. पण मला एवढे नक्की आठवते की, विद्यासागरांच्याबद्दल ज्या गोष्टी मला रमेशने नुकत्याच सांगितल्या होत्या, त्याबद्दलच ती सूचना होती. पंडित ईश्वरचंद्र आपल्या विद्वत्तेमुळे साऱ्या बंगालमध्ये नुसत्या "विद्यासागर" या पदवीने सुविख्यात होते.

4 दुसऱ्यांच्या मनावर आपल्याला जरूर तो परिणाम घडवून आणणे व घटनांच्या नैसर्गिक क्रमामध्ये बदल घडवून आणणे याला पातंजलीने आपल्या योगसूत्रामध्ये (III-24) विभूती म्हटलेले आहे. (मैत्र्यादिषु बलानि ।). त्यात विभूती म्हणजे "विश्वरूप सहानुभूतीचा," मित्रत्वाचा परिणाम असे स्पष्टीकरण केलेले आहे. [ह्या सूत्रांवर दोन विद्वत्तापूर्ण पुस्तके 'योग-सिस्टम ऑफ पातंजली' (ग्रंथ १७, ओरिएंटल सीरिज, हार्वर्ड वि. वि.) आणि दासगुप्तांचे 'योग फिलॉसॉफी' (ट्रुबनर, लंडन) आहेत.]

सर्व धर्मग्रंथ अशी ग्वाही देतात की, परमेश्वराने मनुष्यास आपल्या सर्वशक्तिमान स्वरूपाचे प्रतिबिंब म्हणून निर्माण केले आहे. सर्व विश्वावर नियंत्रण ठेवता येणे हे सकृद्दर्शनी अतिमानुष स्वरूपाचे वाटेल; पण खरोखरी पाहता अशा तऱ्हेचे सामर्थ्य मनुष्याच्या ठिकाणी येणे हे अगदी स्वाभाविक आहे असे दिसून येईल. फक्त त्या माणसास आपल्या दिव्य उत्पत्तीची यथातथ्य स्मृती झाली पाहिजे. श्रीयुक्तेश्वरांसारख्या साक्षात्कारी महात्म्यांना अहंकाराची बिलकुल बाधा नसते की त्यापासून निर्माण होणाऱ्या वैयक्तिक वासनांचा गंधही नसतो. खऱ्या गुरुजनांचे आचरण हे 'ऋतम्,' 'निसर्गदत्त ऋजुता' याला अनुसरून असते व ते सुद्धा स्वाभाविक व विनासायास असे असते. इमर्सनच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे सर्व महात्मे हे "'गुणी' नसून प्रत्यक्ष 'गुणच' असतात आणि यातच सर्व सृष्टीच्या हेतूचे उत्तर मिळते आणि परमेश्वर संतुष्ट होतो."

ज्याला साक्षात्कार झालेला आहे असा कोणीही मनुष्य चमत्कार करून दाखवू शकतो; कारण त्याला सृष्टीचे सूक्ष्म नियम समजलेले असतात. पण सर्वच महात्मे आपल्या सिद्धींचे प्रदर्शन करू इच्छित नाहीत. प्रत्येक संत महात्मा हा आपापल्या एका विशिष्ट पद्धतीने परमेश्वराचे आपल्यामध्ये परावर्तन घडवून आणतो. ह्या जगामध्ये भिन्नता, वेगळेपण हे मुळापासून आहे. पाहा की, वाळुचे दोन कणसुद्धा अगदी एकसारखे कधीही नसतात.

परमेश्वरी साक्षात्कार झालेल्या संतांबद्दल काही निश्चित नियम असे बांधता येत नाहीत; काही चमत्कार करून दाखवितात तर काही दाखवीत नाहीत; काही निष्क्रिय असतात तर काही (प्राचीन भारतातील जनक राजासारखे किंवा ॲव्हिलाच्या सेंट थेरेसासारखे) आपणास मोठमोठ्या कामांत गुंतवून घेतात. काही लोकांना शिकवितात, यात्रा करतात व शिष्य करून घेतात, तर काही एकांतात शांतपणे, कुठेही काही समाजात न मिसळता, छायेसारखे आपले आयुष्य व्यतीत करतात. प्रत्येक संतमहात्म्याच्या कर्माचा आराखडा वेगवेगळा असतो. त्या आराखड्यातील अक्षरे वेगवेगळ्या लिप्यांत लिहिलेली असतात. अशा तऱ्हेचा हा गुप्त आराखडा किंवा पट जगातील कोणत्याही भाष्यकाराला, विवेचकाला वाचता येण्यासारखा नसतो.

# 24. स्वामी परंपरे मध्ये माझे संन्यास ग्रहण

"गुरुजी, बंगाल-नागपूर रेल्वेमध्ये एखादी अधिकाराची जागा मी पत्करावी म्हणून वडिलांचा फार आग्रह आहे. पण मी कबूल झालो नाही." आणि पुढे मी आशेने बोलू लागलो, "गुरुजी, मला संन्यासी करून घ्याल काय तुम्ही?" मी अजीजीच्या मुद्रेने गुरुजींकडे पाहत राहिलो. पूर्वी पुष्कळदा मी त्यांना हीच विनंती करून पाहिली होती. पण माझा निश्चय किती दृढ आहे हे पाहण्याकरिता त्यांनी आजपर्यंत ही विनंती अमान्य केली होती. पण आज त्यांनी माझ्या विनंतीवर कृपाळूपणे स्मित केले.

"ठीक आहे, उद्या तुला मी स्वामिधर्माची दीक्षा देतो," ते शांतपणे बोलू लागले, "मला फार संतोष वाटतो की, ही तुझी इच्छा अजून कायम आहे. लाहिरी महाशय नेहमी म्हणत असत, 'उन्हाळ्याच्या दिवसांत तुम्ही ईश्वराला तुमच्याकडे येण्याचे निमंत्रण दिले नाही, तर तो तुमच्या आयुष्याच्या हिवाळ्यात तुमच्याकडे येणार नाही.'

"पूज्य गुरुजी, आपल्यासारखा स्वामी-संन्यासी होण्याची माझी इच्छा मी कधीही सोडू शकलो नाही." त्यांच्याकडे पाहत असीम प्रेमाने मी स्मित केले.

"ज्याने लग्न केले नाही तो अशा गोष्टींची चिंता करतो की, ज्या ईश्वराच्या आहेत; की मी ईश्वरास कसे प्रसन्न करू; पण ज्याचे लग्न झाले आहे तो फक्त ऐहिक गोष्टींबद्दलच चिंता करतो; की, मी माझ्या बायकोस कसे प्रसन्न करू?" [1] माझ्या पुष्कळ मित्रांनी काही आध्यात्मिक यमनियमादींचे पालन केल्यावर लग्ने केली. त्यांच्या आयुष्याचे मी विश्लेषण केले आहे. एकदा सांसारिक जबाबदारीच्या महार्णवात उतरल्यावर दीर्घ व सखोल ध्यान करण्याचा त्यांनी केलेला निश्चय ते विसरून गेले.

परमेश्वराला आपल्या आयुष्यात दुय्यम स्थान [2] देणे, हे मला अशक्य होते; असा विचारही करता येणे अशक्य होते. तो ह्या अखिल विश्वाचा एकमेव प्रभू आहे. तो शांतपणे मनुष्यावर जन्माजन्मामधून देणग्यांचा वर्षाव करीत असतो. त्यांच्या बदली मनुष्याला एकच गोष्ट त्याला अर्पण करण्यासारखी आहे, आणि ती म्हणजे प्रेम—की जे देण्याचा किंवा राखून ठेवण्याचा अधिकार त्याच्या जवळ आहे.

निर्माण केलेल्या अणुपरमाणूंमधून आपले स्वतःचे अस्तित्व परमेश्वराने फारच गुप्त व रहस्यपूर्ण ठेवण्यात अपार कष्ट घेतलेले आहेत; आणि तसे करण्यात परमेश्वराचा एकच हेतू, एकच भावनापूर्ण इच्छा असली पाहिजे आणि ती ही की, माणसाने आपल्या स्वतंत्र इच्छेने त्याचा शोध घ्यावा. सर्वशक्तिमान अशा आपल्या लोखंडी हाताभोवती त्याने आपल्या विनम्रतेचा मुलायम हातमोजा गुंडाळला नाही काय?

पुढला दिवस म्हणजे माझ्या आयुष्यातील एक अत्यंत संस्मरणीय दिवस होता. मला वाटते, तो जुलै १९१४ मधील एक गुरुवार होता. ऊन चांगले स्वच्छ पडले होते. कॉलेजमधून पदवी घेतल्यावर थोडे आठवडे लोटले होते. सेरामपूरच्या आश्रमातील आतल्या पडवीवर गुरुजींनी

पांढऱ्या रेशमाचा एक कोरा कपडा भगव्या रंगात बुडवून ठेवला. भगवा रंग म्हणजे संन्याशाच्या वस्त्राचा परंपरेने आलेला रंग. तो कपडा वाळल्यावर गुरुजींनी संन्याशाचे वस्त्र म्हणून माझ्याभोवती गुंडाळला.

"एक दिवस तू पश्चिमेस जाशील. तेथे लोक रेशीम अधिक पसंत करतात," ते म्हणाले, "चिन्ह म्हणून, प्रतीक म्हणून नेहमीप्रमाणे साधे कापडाचे वस्त्र वापरण्याऐवजी मी हे रेशमाचे वस्त्र पसंत केले आहे."

भारत देशात साधू, संन्यासी दारिद्र्याचा अंगीकार करतात. तेव्हा रेशमी वस्त्र परिधान केलेला असा क्वचितच दृष्टीस पडतो. तथापि पुष्कळ योगीपुरुष रेशमाची वस्त्रे अंगावर घेतात. त्याचे कारण असे की, रेशीम कापसापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे काही सूक्ष्म शारीरिक प्रवाह रोखू शकतात.

"मी संस्कारक्रियाकांडाच्या विरुद्ध आहे," श्रीयुक्तेश्वर म्हणाले, "मी तुला विद्वत्-संन्यास (उत्सवरहित) देतो."

विविदिशा किंवा संन्यासधर्म देण्याची विस्तृत दीक्षा जी असते, त्यामध्ये एका होमाचा समावेश होतो; की ज्यामध्ये तांत्रिक असे अंत्यसंस्कार केले जातात. शिष्याचे भौतिक शरीर हे मेलेले असे समजावयाचे असते. त्याचे ज्ञानाच्या अग्नीमध्ये दहन करावे लागते. नवीन केलेल्या स्वामीला किंवा संन्याशाला एक मंत्र दिला जातो तो असा: "अहं ब्रह्माऽस्मि" [3] किंवा "तत्त्वमसि"; किंवा "सोऽहम." श्रीयुक्तेश्वरांना साधेपणा फार आवडत असे आणि म्हणून त्यांनी विधियुक्त संस्कार करण्याचे टाळून मला फक्त एक नवीन नाव पसंत करण्यास सांगितले.

"ते तू स्वतः पसंत करण्याचा खास हक्क मी तुला देतो." ते स्मितपूर्वक म्हणाले.

"योगानंद!" [4] क्षणभर विचार केल्यानंतर मी उत्तर दिले. या नावाचा शब्दशः अर्थ —"युक्तावस्थेत नित्य राहिल्याचा आनन्द."

"तथास्तु! याच्यापुढे तुझे मुकुंदलाल घोष हे कौटुंबिक नाव जाऊन त्याच्याऐवजी योगानंद ह्या संन्यासधर्माच्या 'गिरी' श्रेणीमधील नावाने तू ओळखला जाशील."

मी श्रीयुक्तेश्वरांच्या पुढे गुडघे टेकून त्यांना नमस्कार केला आणि जेव्हा त्यांनी माझ्या नवीन नावाचा अगदी पहिल्याच वेळी उच्चार केला. तेव्हा माझे हृदय कृतज्ञतेने भरून आले. त्यांनी हा मुलगा, मुकुंदा, पुढे एके दिवशी योगानंद या नावाने संन्यासी व्हावा म्हणून प्रेमळपणे, अविश्रांत असे किती कष्ट केले होते! श्रीशंकराचार्यांच्या [5] एका प्रसिद्ध स्तोत्रामधील काही श्लोक मी आनन्दाने गाऊ लागलो. (—श्रीशंकराचार्य—निर्वाणषट्क)


"मनो बद्ध्यहंकारचित्तानि नाहम्
न च व्योमभूतिर्न वा सप्तधातुः
चिदानन्दरूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ।
न मे मृत्युशंका न मे जातिभेदाः
पिता नैव मे नैव माता च जन्म
चिदानन्दरूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ।

अहं निर्विकल्पी निराकाररूपी
विभुत्वाच्च सर्वत्र सर्वेन्द्रियाणाम्।
न चासंगतं नैव मुक्तिर्न बन्धः
चिदानन्दरूपः शिवोऽहम् शिवोऽहम्”

प्रत्येक स्वामी हा त्या संन्यासाश्रमाचा सदस्य असतो. ह्या आश्रमधर्माला भारतामध्ये फार प्राचीन कालापासून मान मिळत आला आहे. आद्य शंकराचार्यांनी काही शतकांपूर्वी सध्याच्या स्वरूपात आढळून येत असलेली, संन्यासधर्माची पुनर्रचना केली आणि त्या वेळेपासून ह्या संस्थेतील प्रमुख धर्मोपदेशकांची एक अखंडित परंपरा चालत आलेली आहे. (ह्यांपैकी प्रत्येकाला जगद्गुरू शंकराचार्य [6] ही पदवी दिलेली असते.) साधारणपणे एक दशलक्ष संन्यासी ह्या संन्यासधर्माचे अधिकारी असावेत. ह्या आश्रमात प्रवेश करण्यापूर्वी जे खुद्द स्वामी आहेत, त्यांच्यापासूनच दीक्षा घेणे अगत्याचे असते. म्हणजे स्वामीश्रेणीचे सर्व संन्यासी अशा तऱ्हेने आपली आध्यात्मिक परंपरा आद्य शंकराचार्यांकडेच—एकाच मूळ जगद्गुरूकडे जोडतात. ते अपरिग्रह वृत्ती (कोणत्याही तऱ्हेच्या मालमत्तेबद्दल, पैशाबद्दल अनासक्ती), ब्रह्मचर्य आणि गुरू किंवा आध्यात्मिक अधिकारी पुरुष यांचे आज्ञापालन यांची शपथ घेतात. पुष्कळ अंशांनी कॅथॉलिक ख्रिश्चन धर्मोपदेशकांच्या संस्थेचे ह्या प्राचीन संन्यासधर्माशी साम्य आहे.

स्वामी किंवा संन्यासी जे नवीन नाव धारण करतो त्याच्या शेवटी तो एक शब्द जोडतो व त्या शब्दावरून स्वामी-पदवीच्या दहा श्रेणींपैकी कोणत्या श्रेणीचा तो स्वामी आहे, त्याचा बोध होतो. ह्या दहा श्रेणीमध्ये पुढील श्रेणींचा समावेश होतो: गिरी (पर्वत); ज्या श्रेणीमध्ये स्वामी श्रीयुक्तेश्वर यांचा व त्यांच्यामुळे माझा अंतर्भाव होतो. बाकीच्या श्रेणींमध्ये सागर (समुद्र), भारती (देश), पुरी (प्रदेश), सरस्वती (विद्या), अरण्य (जंगल), तीर्थ (यात्रेचे ठिकाण) ही येतात.

ज्या स्वामीच्या आश्रमधर्मीय नावाच्या शेवटी बहुधा आनंद हा शब्द येतो, त्याचा अर्थ असा आहे की, तो स्वामी मोक्षप्राप्तीकरिता अमुक एका मार्गाने, अवस्थेने किंवा आध्यात्मिक गुणाने मोक्षप्राप्ती करून घेण्याची आकांक्षा बाळगतो. ते गुण किंवा मार्ग म्हणजे प्रेम, ज्ञान, विवेक, भक्ती, सेवा आणि योग वगैरे. बहुतेक स्वामींचे ध्येय मनुष्यमात्राची निरपेक्ष सेवा करणे आणि वैयक्तिक पाशबंधनांचा व आकांक्षांचा त्याग करणे हे असते; व त्यामुळे असे स्वामी भारतामध्ये व प्रसंगी परदेशांत परोपकाराच्या व शैक्षणिक कार्याला वाहून घेतात. जाती, पंथ, वर्ग, वर्ण, स्त्रीपुरुषभेद किंवा वंशभेद यांमुळे उत्पन्न झालेल्या पूर्वग्रहांना बाजूला सारून स्वामी समानबंधुत्वाच्या आदर्शाचा पाठपुरावा करतात. परमतत्त्वाशी पूर्ण सायुज्यता मिळविणे, ऐक्य साधने हे त्यांचे ध्येय असते. जागृत अवस्थेमध्ये आणि निद्रित अवस्थेमध्ये तो ‘सोऽहम्’ या विचाराशी समरस होऊन या जगतामध्ये संतोषाने, समाधानाने वावरत असतो. त्याच वेळी आपण ह्या जगाचे कोणीच नव्हे, ही भावना त्याच्या ठिकाणी रुजलेली असते. अशा तऱ्हेने तो आपले ‘स्वामी’ हे नाव सार्थक करतो. स्वामी म्हणजे जो आपल्या स्वतःशी ‘स्व’-शी तादात्म्य मिळविण्याचा प्रयत्न करतो.



*श्री श्री परमहंस योगानंदांचे पारिवारिक घर, गरपार रोड, कोलकाता. जुलै 1950 मध्ये, त्यांनी प्राचीन स्वामी परंपरेतील संन्यासधर्माची शपथ घ्यायच्या आधीपर्यंतचे घर*

श्रीयुक्तेश्वर हे स्वामी व योगी असे दोन्हीही होते. स्वामी बहुधा संन्यासी असून संन्यासधर्माशी निगडित असतो. परंतु तो नेहमी योगीच असतो असे नाही. जो मोक्षप्राप्तीकरिता एक तऱ्हेचे विशिष्ट असे शास्त्रीय तंत्र अवलंबितो, तो योगी. मग तो विवाहित असो की अविवाहित असो; गृहस्थाश्रमी असो की अन्य वर्णाश्रमी असो.

स्वामी हा शुष्क वादविवादाचा, विरक्तीचा मार्ग अनुसरतो, तर योगी हा क्रमाक्रमाने उत्क्रांत होत गेलेल्या एका विशिष्ट साधनापद्धतीचा अवलंब करतो की, जेणेकरून शरीर व मन ही नियंत्रित होतात, शिस्तबद्ध होतात आणि त्यामुळे तो हळूहळू मुक्त होत जातो. कोणतीही गोष्ट भावनेच्या आधारावर किंवा अंधश्रद्धेवर ग्राह्य न धरता योगी प्राचीन ऋषिप्रणीत अनुभवाने सिद्ध व सफल ठरलेल्या अशा आध्यात्मिक प्रक्रियांचा अभ्यास

करतो. भारतामध्ये प्रत्येक युगात अशा तऱ्हेचे योगाचे आचरण करणारे अनेक योगी निर्माण झालेले आहेत की, जे खऱ्या योगी-ख्रिस्तासारखे जीवन्मुक्त झालेले आहेत.

इतर भौतिक शास्त्रांप्रमाणे योगाचा अभ्यास हा कोणत्याही हवामानाच्या प्रदेशातल्या किंवा काळातल्या लोकांना करता येतो. काही अज्ञानी लेखकांनी अशी मतप्रणाली प्रसृत केलेली आहे की, योगाभ्यास हा पाश्चिमात्यांना “धोक्याचा” किंवा “गैरसोयीचा” आहे. ही विचारसरणी चूक आहे आणि ह्या चुकीच्या प्रचारामुळे पुष्कळशा निष्ठावंत साधकांना त्या साधनेच्या अनेकविध लाभांपासून वंचित केलेले आहे.

योग ही चित्तवृत्तिनिरोध करण्याची एक पद्धती आहे. विचारांचा हा जो प्रक्षोभ होत असतो, तो प्रक्षोभ काढून टाकून विचारांना काबूत ठेवण्याची ही एक पद्धत आहे. हे विचार काबूत न ठेवल्यास ते सर्वच लोकांना मग ते कोणत्याही देशातील असोत, तत्त्वाच्या सत्यस्वरूपाच्या दर्शनापासून बाजूला सारतात. ज्याप्रमाणे सूर्यप्रकाश हा सर्वांनाच सारखा आरोग्यप्रद असतो, त्याप्रमाणे योगसाधना ही सर्वांनाच, पौर्वात्यांना तसेच पाश्चिमात्यांनाही लाभदायी आहे. बहुतेक माणसांचे विचार अस्थिर व लहरी असतात, त्यामुळे योगाभ्यासाची, चित्तवृत्तिनिरोधशास्त्राची गरज अगदी उघड आहे.

प्राचीन महर्षी पातंजली [7] याने योगाचे ‘चित्तवृत्तिनिरोधः’ असे वर्णन केले आहे. [8] त्याने लिहिलेली संक्षिप्त पण अत्युत्कृष्ट अशी योगसूत्रे ही हिंदू तत्त्वज्ञानाच्या सहा शाखांपैकी एक शाखा म्हणून समजली जातात. भारतीय तत्त्वज्ञानाच्या सहा दर्शनांपैकी [9] हे एक दर्शन आहे. ही सहा दर्शने केवळ तात्त्विक उपदेश देत नसून ती तत्त्वज्ञानाची व्यावहारिक बाजू सुद्धा विशद करून सांगतात. बुद्धीला उमजेल अशी आत्मविषयक प्रत्येक प्रकारची चिकित्सा करून भारतीय तत्त्वज्ञानाने सहा विशिष्ट साधनांचा पुरस्कार केलेला आहे. ह्या साधनांचा हेतू म्हणजे दुःखाची कायमची निवृत्ती करणे आणि कालनिरपेक्ष अशा आनंदाची प्राप्ती करून घेणे, हा होय.

अगदी अलीकडच्या उपनिषदांमध्ये ह्या षड्दर्शनापैकी योगसूत्रांना सरळ सत्यशोधन करण्याची सर्वोत्तम पद्धत मानले जाते. योगासारख्या प्रात्यक्षिक तंत्राचा अभ्यास करून मनुष्य तर्क-कुतर्काचा वैराण मुलूख पाठीमागे टाकून परमतत्त्वाचा, अंतिम सत्याचा अनुभव करून घेतो.

पातंजलीच्या योगपद्धतीला अष्टांगयोगपद्धती असेही म्हणतात. [10] ह्या पद्धतीची पहिली दोन अंगे म्हणजे (१) यम—नैतिक व्यवहार, आणि (२) नियम—धार्मिक व्रते. यम म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह; आणि नियम म्हणजे शौच, तप, संतोष, स्वाध्याय आणि ईश्वर-प्रणिधान.

पुढील अंगे म्हणजे (३) आसन (बसण्याची शास्त्रशुद्ध बैठक). मेरूदंड ताठ असला पाहिजे आणि शरीर ध्यानाच्या दृष्टीने सुखावह अशा आसनामध्ये स्थिर असले पाहिजे; (४) प्राणायाम (प्राण, सूक्ष्म जीवनप्रवाह यांवर नियंत्रण ठेवणे); आणि (५) प्रत्याहार (बाह्य वस्तूंपासून इंद्रियांना आत खेचून घेणे).

शुद्ध योगाची शेवटची दोन अंगे म्हणजे (६) धारणा (एकाच विचारावर मन केन्द्रित करणे); (७) ध्यान, आणि (८) समाधी (अतींद्रिय ज्ञानाचा अनुभव). ह्या अष्टांगयोगाच्या साधनेने कैवल्यप्राप्ती होते म्हणजे योगी बुद्धियुक्त अवलोकनाच्या पलीकडे जाऊन सत्यदर्शनाचा अनुभव घेतो.

एखादा असा प्रश्न करील की, “मोठा कोण? स्वामी की योगी?” तर त्याला उत्तर असे की, एकदा ईश्वराच्या ठिकाणी तादात्म्य पावल्यावर निरनिराळ्या मार्गांमधील भेदभाव नष्ट होतात. परंतु भगवद्गीतेमध्ये असे सांगितले आहे की, योगमार्ग हा सर्वंकष, सर्वग्राही असा मार्ग आहे. योगमार्गाचे तंत्र हे केवळ काही विशिष्ट प्रकारच्या आणि स्वभावधर्माच्या लोकांकरिता, उदाहरणार्थ, संन्यासमार्गाकडे ज्यांच्या मनाचा कल आहे अशाच थोड्या साधकांकरिता आहे असे नाही. योगाभ्यासाला कोण्या एका पंथाशी एकनिष्ठ राहिले पाहिजे असेही नाही. योगशास्त्राने सर्व लोकांची एक गरज भागविली जाते. म्हणून सर्व लोकांना त्याचे एक नैसर्गिक आकर्षण वाटते.

खरा योगी ह्या जगामध्ये फक्त आपले नियत कर्म करीत राहतो. पाण्यामध्ये जसे लोणी तरंगावे तसा तो ह्या जगात अलिप्तपणे वावरतो. न घुसळलेल्या व सहजरीत्या पाणी मिसळून पातळ केलेल्या दुधाप्रमाणे म्हणजे आचारविचारशून्य अशा सामान्य मनुष्याप्रमाणे त्याचे वागणे नसते. ऐहिक कर्म करावयाचे म्हणजे ईश्वरापासून अलिप्त राहण्याची जरुरी नाही. फक्त त्याने अहंकारजनित वासनांपासून मानसिक दृष्ट्या अनासक्त राहिले पाहिजे. आणि ह्या जगामध्ये आपल्या कर्तव्याचा भाग ही परमेश्वराचीच आज्ञा असे समजून पार पाडला पाहिजे.

आज असे पुष्कळ महात्मे आहेत की, जे अमेरिकन किंवा युरोपियन किंवा हिंदूव्यतिरिक्त शरीरांमध्ये वास करीत असून आणि ज्यांनी योगी किंवा स्वामी ही नावे सुद्धा ऐकिली नसतील, पण ते ह्या शब्दांच्या व्याख्येला पूर्णपणे उतरतील. हे महात्मे मनुष्यमात्राची निःस्वार्थपणे सेवा करीत असतात; किंवा विचार व विकार यांवर पूर्ण स्वामित्व मिळविले असल्याने, किंवा परमेश्वराविषयी एकनिष्ठपणे प्रेम बाळगल्याने किंवा धारणेच्या महान सामर्थ्याने ते खऱ्या अर्थाने योगीच असतात. योगाचे ध्येय जे आत्मसंयमन ते त्यांनी आपल्यापुढे ठेवलेले असते. अशा माणसांना जर योगाचे निश्चित शास्त्र शिकविले असते, तर ती माणसे याहूनही उच्च कोटीला गेली असती. कारण योगशास्त्राच्या पद्धतशीर अभ्यासाने मनुष्याच्या मनाला व जीवनाला अधिक जाणीवपूर्वक वळण मिळू शकले असते.

पुष्कळशा पाश्चिमात्य लेखकांनी योगाचा वरवर अभ्यास केल्याने, खरा योग म्हणजे काय याबद्दल त्यांची चुकीची कल्पना झालेली असते. योगशास्त्रावर टीका करणारे लोक हे योगाभ्यासाचे प्रत्यक्ष आचरण करीत नाहीत. योगावर विचारपूर्वक मतप्रदर्शन करणाऱ्यांमध्ये डॉ. सी. जी. युंग ह्या प्रसिद्ध स्विस मानसशास्त्रज्ञाचे नाव नमूद करण्यासारखे आहे.

डॉ. युंग लिहितात, [11] “जेव्हा एखाद्या धार्मिक पद्धतीची ती शास्त्रीय पद्धती आहे म्हणून शिफारस केली जाते, तेव्हा पाश्चिमात्य जगात तिचा स्वीकार केला जातो. योगशास्त्र ही

अपेक्षा पुरी करते. योगाचा नवीनच अभ्यास करू लागल्याने जे त्या शास्त्रावर मोहित झाले व योगाचा अर्धामुर्धा अभ्यास केल्याने ज्यांच्या मनात त्या शास्त्राबद्दल कुतूहल निर्माण झाले, असे लोक सोडले तरी योगाभ्यासाचे अनुयायी पुष्कळच आहेत व त्याची कारणेही तशी सबळ आहेत. योगशास्त्राने आपल्याला नियमबद्ध अनुभव मिळविणे शक्य असते व त्यामुळे अनुभवजनित प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी पुढे मांडण्याची शक्यता असते; आणि त्या तशा पुढे मांडल्या गेल्या म्हणजे शास्त्रज्ञाचे समाधान होते. शिवाय योगशास्त्राच्या रुंदीमुळे, खोलीमुळे आणि त्याच्या पुरातनत्वामुळे, त्याच्या तत्त्वज्ञानपद्धतीमुळे—की ज्यामध्ये जीवनाच्या प्रत्येक कक्षेचा समावेश होतो—योगशास्त्राचे भवितव्य कल्पनेच्या बाहेर उज्वल आहे.

“प्रत्येक धार्मिक किंवा तत्त्वज्ञानविषयक आचाराला एक तऱ्हेची मानसिक शिस्त किंवा मानसिक आरोग्याच्या नियमांची शिकवण ही आलीच. योगाची [12] अनेकविध शारीरिक आसने पण शरीराचे शुद्धीकरण घडवून आणतात. कारण योगासने ही जुजबी, शारीरिक व्यायामापेक्षा, कसरतीपेक्षा आणि श्वसनांच्या व्यायामापेक्षा उच्च दर्जाची असतात; कारण ती नुसतीच यांत्रिक व वैज्ञानिक नसून त्यांत तत्त्वज्ञान भरलेले असते. योगासनामुळे शरीराच्या निरनिराळ्या अवयवांना हालचाल करावी लागते आणि त्या हालचाली चालू असता त्यांचा आत्म्याशी संपर्क साधला जातो. ह्या बाबतीतले ठळक उदाहरण द्यावयाचे म्हणजे प्राणायामाच्या क्रियेचे देता येईल. आता प्राण म्हणजे श्वास खरा, पण प्राण म्हणजे ब्रह्मांडाची विश्वसंचालक शक्ती सुद्धा होय....

“ज्या मूलभूत विचारांवर योगशास्त्र आधारलेले आहे, ते विचार जर सोडून दिले तर त्यांविरहित योगाभ्यास हा फलदायी होत नाही. योगाभ्यासामध्ये शरीर व मन यांची एकमेकांत सांगड घातलेली असते आणि ती सांगड अगदी असाधारण स्वरूपाची असून परिपूर्ण असते.

“पौर्वात्य देशात जेथे हे विचार व ही साधना विकास पावलेली आहे आणि जेथे कित्येक हजारो वर्षांच्या एका अखंडित परंपरेने तो आध्यात्मिक पाया घातलेला आहे, तेथे माझा असा विश्वास आहे की, योग ही शरीर व मन यांचे निःशंक एकत्व साधण्याची एक परिपूर्ण व यथायोग्य पद्धत आहे. एकत्व हे अशा तऱ्हेची मनोवृत्ती व स्वभाव निर्माण करते की जेणेकरून अंतःप्रेरणा मिळविणे शक्य होते; एवढेच काय, पण चैतन्याच्या वरच्या थरावरही योगाभ्यासी जाऊ शकतो.”

ज्या वेळी मनःसंयमाचे आन्तरिक शास्त्र हे बाह्य सृष्टीवर विजय मिळवून देणाऱ्या भौतिक शास्त्रांइतकेच पाश्चिमात्य जगाला अगत्याचे वाटेल ती वेळ लवकरच येत आहे. वस्तुजात हे वास्तविक पाहता शक्तीचे घन स्वरूप आहे, हे सत्य आता शास्त्रीय दृष्ट्या निरपवाद ठरलेले आहे; आणि हे सत्य माहीत झाल्याने अणुयुगात माणसांची मते गंभीर आणि विशाल बनतील. मनुष्याचे मन दगडापेक्षा व धातूपेक्षा जास्त शक्ती धारण करू शकते आणि ती शक्ती त्याने आपल्या अंतर्गतामध्ये मुक्त केली पाहिजे. नाही तर हा नवीनच निर्माण झालेला जडस्वरूप अणुराक्षस ह्या जड सृष्टीवरच उलटेल व त्याचा अमानुष नाश करून टाकील. मनुष्याला अणुबाँबबद्दल जे हे ज्ञान प्राप्त झाले आहे, त्याचा एक अप्रत्यक्ष फायदा घडून येत

आहे. त्यामुळे विनाशाची कल्पना येऊन त्याला योगशास्त्रामध्ये [13] व्यावहारिक स्वरूपाची आस्था वाटू लागली आहे. जणू योगशास्त्र म्हणजे खरेखुरे 'बॉम्बपासून वाचविण्याचे सुरक्षित स्थानच' होय.



*श्री शंकराचार्य यो.स.सो.-एस.आर.एफ.च्या आंतरराष्ट्रीय मुख्यालयात*
*पुरीचे श्री जगद्गुरु शंकराचार्य भारतीकृष्ण तीर्थ सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिपच्या लॉस एँजेलिस येथील आंतरराष्ट्रीय*

*मुख्यालयात, 1958. शंकराचार्यांचा अमेरिकेतील हा तीन महिन्याचा दौरा सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिप (योगदा सत्संग सोसायटी) ने आयोजित केला होता.*

1 कॉरिंथिअन्स ७:३२-३३ (बायबल).

2 "जो ईश्वराला दुय्यम स्थान देतो तो त्याला स्थानच देत नाही."
—रस्किन.

3 शब्दशः "आत्मा हे तत्त्व आहे." परमतत्त्व, अजन्मा; संपूर्ण मुक्त, निरापद (नेति नेति; असे नाही, असे नाही). पण वेदान्तामध्ये त्याचा निर्देश सच्चिदानंद या नावाने करतात. म्हणजेच ते सत्य आहे; चैतन्य आहे व आनंदरूप आहे.

4 "योगानंद" हे संन्यासधर्मीयांमध्ये अगदी नित्य परिचयाचे नाव आहे.

5 शंकर यांचा बहुधा शंकराचार्य या नावाने उल्लेख करतात. आचार्य म्हणजे धर्मोपदेशक. शंकराचार्यांच्या निश्चित कालाबद्दल विद्वानांचे नेहमीप्रमाणे मतभेद आहेत. काही उपलब्ध लेखांवरून असे दिसून येते की, हा अद्वितीय अद्वैतवादी ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात होऊन गेला. आनन्दगिरी हे त्यांचा काल ख्रिस्तपूर्व ४४-१२ दर्शवितात. पाश्चिमात्य इतिहासकार त्यांचा काल फार पुढे इ. स. ८व्या शतकाच्या उत्तरार्धावर नेतात. बरीच शतके पुढे नेण्याची आवडच ही?

6 पुरी येथील प्राचीन गोवर्धन पीठाचे माजी जगद्गुरू श्रीशंकराचार्य हिज होलिनेस भारती कृष्णतीर्थ यांनी १९५८ मध्ये अमेरिकेस भेट दिली होती. ते अमेरिकेत तीन महिने होते. पश्चिमेकडे प्रवास करणारे ते पहिले शंकराचार्य होत. त्यांची ही अमेरिकेतील ऐतिहासिक भेट परमहंस योगानंदांनी स्थापन केलेल्या सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप व योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया या संस्थांनी घडवून आणली होती. जगद्गुरूंनी अमेरिकेतील प्रमुख विश्वविद्यालयांपुढे भाषणे केली व तेथील प्रसिद्ध इतिहासज्ञ डॉ. अर्नोल्ड टोयनबी यांच्याबरोबर जागतिक शांतता या विषयावरील चर्चेत भाग घेतला.

१९५९ मध्ये पुरीच्या श्रीशंकराचार्यांनी संघमाता श्री दयामाता यांच्या निमंत्रणावरून योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया व सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप या संस्थांच्या गुरुपरंपरेला अनुसरून व त्या भूमिकेने दोन योगदा सत्संगी साधकांस संन्यासधर्माची दीक्षा दिली होती. हा दीक्षाविधी त्यांनी पुरी येथील योगदा सत्संग आश्रमातील श्रीयुक्तेश्वरांच्या मंदिरात शास्त्रोक्त पद्धतीने केला. (प्रकाशकांची टीप)

7 पातंजलीचा काल अनिश्चित आहे. काही विद्वान तो ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात झाला असे मानतात. प्राचीन ऋषींनी अनेक विषयांवर इतक्या अंतर्दृष्टीने व सूक्ष्म अभ्यासाने ग्रंथ लिहिलेले आहेत की, अनेक शतके जरी लोटून गेली तरी त्यांच्या लिखाणात काही फेरफार करता येत नाहीत, की त्यातील विषयांच्या मांडणीला जुनाटपणा येत नाही. आणि म्हणूनच की काय, ह्या प्राचीन महर्षींनी आपल्या स्वतःचा काल किंवा आपले स्वतःचे जीवन ह्याविषयी आपल्या अमूल्य वाङ्मयकृतींमध्ये कोठेही उल्लेख करण्याचा प्रयत्न केला नाही.

8 "चित्तवृत्तिनिरोधः" (योगसूत्रे १:२). याचे असेही भाषांतर करता येईल: चित्तवृत्तीमध्ये जो बदल होतो तो थांबविणे. चित्त हा शब्द विचारतत्त्वाचा सर्वव्यापक अर्थ दर्शविणारा आहे. त्यामध्ये प्राणशक्ती, मानस, अहंकार आणि बुद्धी यांचा समावेश होतो. आणि वृत्ती म्हणजे शब्दशः 'भोवरा' म्हणजे विचार व भावना यांच्या ज्या लहरी मनामध्ये किंवा मनुष्याच्या जाणीवेमध्ये उत्पन्न होतात व नंतर नाहीशा होतात. त्यांचा निरोध करणे; त्यांना थांबविणे, त्यांना नाहीसे करणे. त्यांना नियंत्रित करणे.

9 ही सहा पुरातन (वेदांवर आधारलेली) दर्शने म्हणजे सांख्य, योग, वेदान्त, मीमांसा, न्याय आणि वैशेषिक.

10 ह्या अष्टांगयोगाचा बौद्ध धर्मातील आठ मार्गांशी घोटाळा करू नये. बौद्धांचे सदाचरणाचे ते आठ मार्ग म्हणजे (१) सम्यक आदर्श, (२) सम्यक हेतू, (३) सम्यक वाणी, (४) सम्यक कर्म, (५) सम्यक जीवन, (६) सम्यक प्रयत्न, (७) सम्यक स्मरण (आत्म्याचे) आणि, (८) सम्यक दर्शन (समाधी).

11 डॉ. युंग हे १९३७ साली भारतीय विज्ञान महासभे मध्ये हजर होते आणि कलकत्ता विश्वविद्यालयाने त्यांना मानद पदवी दिली होती.

12 डॉ. युंग हे येथे हठयोगाचा उल्लेख करीत आहेत. हठयोग हे आरोग्य व दीर्घायुष्य साध्य करण्याकरिता आसने व तंत्र यांचे एक विशिष्ट योगशास्त्र आहे. हठयोग तसा उपयुक्त असतो. हठयोग विलक्षण शारीरिक कसरती करून दाखवितो, पण आध्यात्मिक उन्नती ज्यांना साध्य करावयाची आहे, असे योगी हठयोगाचा फार थोडा उपयोग करतात.

13 ज्यांना योगशास्त्राचे काही ज्ञान नाही, ते त्या शास्त्राला काही विलक्षण सिद्धी मिळविण्याकरिता गूढपणे आचरली जाणारी जादूटोण्याची विद्या किंवा हठयोग समजतात. ज्या वेळी विद्वान लोक योगशास्त्राबद्दल किंवा राजयोगाबद्दल बोलतात त्यावेळी ते पातंजलीप्रणीत योगसूत्रांबद्दल बोलतात. या योगसूत्रांमध्ये एवढे भव्य व उच्च कोटीचे तत्त्वज्ञान सांगितले गेले आहे की, त्यावर भारतामधील काही सर्वांत मोठ्या विचारवंतांनी भाष्ये लिहिली आहेत. त्यात सदाशिवेंद्रांची विद्वत्ताप्रचुर टीका प्रसिद्ध आहे. (पाहा ४१वे प्रकरण शेवट)

तत्त्वज्ञानाच्या इतर पाच शाखांप्रमाणे योगशास्त्र सुद्धा तत्त्वज्ञानविषयक संशोधन बिनचूक होण्याच्या दृष्टीने नैतिक पावित्र्याच्या “जादूस” (यमनियमादि ईश्वरप्रणीत निर्बंधास) एक अनिवार्य, अगत्याची, आवश्यक गोष्ट समजते. वैयक्तिक स्वरूपाची ही जी आवश्यक बाब आहे त्याच्यावर पाश्चिमात्य जगात विशेष भर दिला जात नाही. पण ह्या नैतिक पावित्र्याच्या आवश्यकतेमुळे भारताच्या ह्या षड्दर्शनांमध्ये एक अविनाशी सामर्थ्य प्राप्त झाले आहे. हा विश्वास धारण करणारे जे विश्वरूपी आधारतत्त्व ‘ऋत,’ त्या तत्त्वाहून मनुष्याचे भवितव्य निश्चित करणारे नीतितत्त्व भिन्न नाही, वेगळे नाही. आणि ज्या संशोधकांची ह्या विश्वस्वरूपी नीतितत्त्वाचे पालन करण्याची तयारी नाही त्याला हा सत्यशोधनाचा मार्ग अनुसरावयाची निष्ठा नाही, असेच समजावयास पाहिजे.

योगसूत्रांच्या तिसऱ्या विभागास ‘विभूतिपाद’ असे नाव आहे. यामध्ये निरनिराळे चमत्कार करून दाखविणाऱ्या शक्तींचा उल्लेख आहे. ह्या शक्तींना विभूती किंवा सिद्धी म्हणतात. खरे ज्ञान हे शक्तीसारखेच आहे. योगमार्गाचे चार सोपान, पाद केलेले आहेत. प्रत्येक पादास त्याच्या विभूतीचे असे वैशिष्ट्यपूर्ण नाव दिलेले आहे. काही एक सिद्धी प्राप्त झाल्यावर योग्यास समजून येते की, या चार पादांपैकी, सोपानांपैकी एक सोपान यशस्वीपणे पार केला आहे. काही एक विशिष्ट शक्ती अंगी क्रमानुसार प्रकट होत असल्याकारणाने योगज्ञानाचे शास्त्रीय रचनात्मक स्वरूप सिद्ध होते, की ज्यामध्ये साधकास आपली ‘आध्यात्मिक प्रगती’ झाली आहे हा खोटा भ्रम काढून टाकता येतो. कारण ती तशी प्रगती झाल्याचे सिद्ध व्हावे लागते.

पातंजलीने साधकास बजाविले आहे की, ‘परमतत्त्वाशी एकत्व मिळविणे’ हे योग्याचे ध्येय आहे; सिद्धीची प्राप्ती हे नव्हे. सिद्धी, विभूती म्हणजे ह्या पवित्र मार्गावर सहजासहजी सापडणारी फुले आहेत. ह्या सिद्धींचा शाश्वत असा जो दाता आहे, त्याचा शोध घेतला पाहिजे. तो प्रसंगोपात्त सिद्धींच्या देणग्या देत असतो. त्या मिळविणे हे काही योग्याचे ध्येय नव्हे. जो साधक हलक्याशा वस्तूंच्या लाभाने संतुष्ट होतो, त्याच्यापुढे तो सिद्धिदाता आपले स्वरूप प्रकट करून दाखवीत नाही. म्हणून जो योगी योग्य मार्गाने योगसाधना करीत असतो, तो चमत्कार करून दाखविण्याच्या भानगडीत पडत नाही. कारण सिद्धींचा असा अपव्यय केल्याने योग्याच्या ठिकाणी मिथ्या दंभ उपजतो व अंतिम ध्येय जे कैवल्य ते प्राप्त करून घेण्याच्या मार्गापासून तो च्युत होतो.

जेव्हा योग्यास आपल्या अंतिम ध्येयाची, अनंतत्वाची प्राप्ती होते, तेव्हा तो आपल्या मर्जीनुसार ह्या विभूतींचा उपयोग करतो किंवा करीत नाही. त्यानंतरच्या त्याच्या सर्व कृती चमत्कारपूर्ण किंवा सामान्य प्रकारच्या अशा तऱ्हेने केल्या जातात की, त्यांत त्याच्या कर्माचा काही संबंध येत नाही. कारण ते पूर्वीच संपलेले असते. कर्माचे अवशेष म्हणजे जणू लोखंडाचा कीस. वैयक्तिक अहंकाराचा जोपर्यंत शरीरात लवलेश आहे, तोपर्यंत त्या लोहचुंबकाकडून कर्माचे अवशेष आकर्षित केले जातात.

प्रकरण - २५

# 25. अनंतदादा व बहीण नलिनी

"अनंता आता फार दिवस जगणार नाही. ह्या जन्मातील त्याच्या कर्माचा प्रवाह संपलेला आहे."

एके दिवशी सकाळी मी ध्यानात अगदी गढून गेलो असताना, हे कर्णकठोर शब्द माझ्या आंतरचैतन्यसंवित्तीला जाऊन पोचले. स्वामिधर्माची दीक्षा घेतल्यानंतर थोड्याच दिवसांनी मी माझे जन्मस्थान जे गोरखपूर तेथे गेलो. तेथे माझा वडील बंधू अनंतदादा राहत होता. त्याच्याचकडे मी उतरलो. अचानकपणे आजारी पडून तो बिछान्याला खिळून राहिला. मी त्याची अगदी प्रेमभावाने शुश्रूषा केली.

ह्या गंभीर आतल्या आवाजाने मला फार दुःख झाले. मला वाटले की, आता गोरखपूरला यापुढे राहू नये; कारण माझा भाऊ लवकरच माझ्या असहाय्य डोळ्यांसमोरून नाहीसा होणार होता. मला जी पहिली बोट मिळाली त्या बोटीने मी हिंदूस्थान सोडले. माझ्या नातेवाइकांना माझ्या या चमत्कारिक वर्तनाचे आकलन झाले नाही. त्यांनी माझ्यावर खूप टीका केली. बोट ब्रह्मदेशाच्या किनाऱ्याने जात जात चिनी समुद्रात शिरली व पुढे जपानला पोचली. मी कोबेला उतरलो. तेथे मी थोडे दिवस राहिलो. आसपासची प्रेक्षणीय स्थळे पाहण्याला मी बाहेर पडलो नाही. माझे हृदय दुःखाने जड झालेले होते.

हिंदुस्थानात परत येतेवेळी आमची बोट शांघायला लागली. तेथे बोटीवरील डॉक्टर, डॉ. मिश्र यांनी मला कित्येक अपूर्व वस्तूंच्या दुकानात नेले. दुकानात श्रीयुक्तेश्वर, माझ्या घरातील मंडळी व मित्रमंडळी यांना भेट म्हणून देण्यासाठी मी कित्येक वस्तू पसंत केल्या. अनंतदादाकरिता मी एक मोठा कोरलेला बांबूचा तुकडा खरेदी केला. तो बांबूचा संस्मरणीय तुकडा चिनी सेल्समन माझ्या हातात देतो न देतो तोच मी तो जमिनीवर टाकला आणि मोठ्याने ओरडून म्हणालो, "हा मी माझ्या प्रिय अशा मृत भावाकरिता विकत घेतला आहे!"

आणि एक स्पष्ट साक्षात्कार माझ्यावरून वाहत निघून गेला की, त्याचा आत्मा अगदी नुकताच शरीरातून बाहेर पडून अनंतत्वात विलीन होऊन जात आहे. ती बांबूची संस्मरणीय वस्तूदेखील खाली पडून तुटली. हे तिचे तुटणे अर्थसूचक होते. अश्रू ढाळीत त्या बांबूच्या पृष्ठभागावर मी लिहिले, "माझ्या दिवंगत प्रिय अनंतदादास."

माझ्याबरोबर आलेले डॉक्टर माझी कृती बारकाईने न्याहाळीत होते. त्यांनी उपरोधिक स्मित केले.

ते म्हणाले, "इतक्यात अश्रू कशाला ढाळता? एकदा ते खरोखरच वारले की नाही हे नक्की कळू तर द्या."

जेव्हा आमची बोट कलकत्त्याला पोचली, तेव्हाही डॉ. मिश्र माझ्याबरोबर होते. माझा सगळ्यांत धाकटा भाऊ विष्णू गोदीवर माझे स्वागत करायला आला होता.

“मला माहीत आहे की अनंतदादा वारला.” मी विष्णूला तो मला काही सांगण्यापूर्वीच म्हणालो, “आता सांग मला व ह्या डॉक्टरांना की अनंतदादा केव्हा वारला.”

विष्णूने तारीख सांगितली. ज्या दिवशी मी शांघायला त्या संस्मरणीय वस्तू घेतल्या तीच ती तारीख होती.

डॉ. मिश्र आश्चर्याने उद्‌गारले, “हे पाहा, ही गोष्ट बाहेर पसरू देऊ नका. नाही तर प्रोफेसर लोक मेडिकल कोर्सला आणखी एका वर्षाचा मानसिक संदेशवहनाचा विषय जोडतील. अगोदरच मेडिकल कोर्स लांब आहेत!”

कलकत्त्याला घरी पोचल्यावर वडिलांनी मला ममतेने कवटाळले. ते सौम्य आवाजात म्हणाले, “आलास घरी तू?” दोन मोठे अश्रुबिंदू त्यांच्या डोळ्यांतून खाली पडले. ते बहुधा आपल्या भावना अशा व्यक्त करीत नसत. ममतेची ही बाह्यदर्शने त्यांनी आजवर मला कधीही दाखविली नव्हती. वडील बाह्यदर्शनी गंभीर असत; पण अंतःकरणाने ते आईसारखे लवकर विरघळून जात. कुटुंबाच्या सर्व बाबतींत ते अशी दुहेरी भूमिका नेहमी घेत असत.

अनंतदादा निवर्तल्यावर थोड्याच दिवसांनी माझी धाकटी बहीण नलिनी हिला एका दैवी उपचाराने मृत्यूच्या दाढेतून परत आणली होती आता ही हकीकत सांगण्यापूर्वी मी आमच्या पूर्वायुष्यातील काही घटनांविषयी सांगतो.

लहानपणी नलिनी व माझे नाते काही विशेष सलोख्याचे नव्हते. मी हडकुळा होतो व ती माझ्यापेक्षाही हडकुळी होती. मी माझ्या बहिणीची तिच्या अशा शरीरयष्टीबद्दल नेहमी कुचेष्टा करीत असे. ह्यात माझा अजाणतेपणे काय हेतू असावा हे फक्त मानसशास्त्रज्ञांनी ओळखून काढावे. माझी बहीण ही अगदी लहान, हूड आणि तितकीच फटकळ. तेव्हा तिचे टोमणेही तसेच मर्मभेदक असायचे. कधीकधी आई मध्ये पडायची व मला (मोठा भाऊ म्हणून) कानपिचक्या देऊन आमचे पोरकट भांडण तात्पुरते मिटवायची.

शाळेतील शिक्षण संपल्यावर नलिनीचे लग्न डॉ. पंचानन बोस यांच्याशी ठरले होते. डॉ. बोस हे कलकत्त्याचे एक तरुण डॉक्टर असून त्यांचा स्वभाव प्रेमळ होता. विवाहाचे सर्व विधी योग्य वेळी केले गेले. लग्नाच्या रात्री कलकत्त्याच्या आमच्या घरी दिवाणखान्यात बरीच आप्तेष्ट मंडळी जमली होती. वातावरण आनंदाचे व उत्साहाचे होते. मी त्या आनंदी मंडळीत सामील झालो. नवरदेव एका मोठ्या जरीच्या वेलबुट्टीच्या तक्क्याला टेकून बसलेले होते. शेजारी नलिनी बसली होती. ती भपकेदार जांभळ्या रंगाची रेशमी साडी नेसली होती, पण तिची किरकोळ शरीरयष्टी झाकून गेली नव्हती. मीही माझ्या नवीन मेव्हण्याच्या तक्क्याच्या पाठीमागे आसरा घेतला व मित्रत्वाच्या नात्याने त्यांच्याकडे पाहून स्मित केले. लग्नाच्या दिवसापर्यंत त्यांनी नलिनीला पाहिले नव्हते. लग्नाच्या लॉटरीत आपल्याला काय मिळणार आहे, हे त्यांना त्याच दिवशी समजले.

माझी सहानुभूती मिळावी, या अंदाजाने डॉ. बोस यांनी संकोचाने नलिनीकडे बोट दाखवून माझ्या कानांत ते म्हणाले, “बोला, काय आहे हे?”

“काय डॉक्टर,” मी उत्तर दिले, “तुमच्या परीक्षणाकरिता तो एक हाडांचा सापळा आहे!”

जसजशी वर्षे लोटत गेली तसतसे डॉ. बोस आमच्या घरात प्रिय होत गेले. आणि आमच्या घरात जेव्हा कोणी आजारी असे तेव्हा आम्ही त्यांना बोलावीत असू. ते आणि मी

फार चांगले मित्र बनलो. आम्ही पुष्कळदा थट्टामस्करी—ती बहुधा नलिनीची—करीत असू.

"डॉक्टरी विद्येला हे एक कुतूहल आहे." माझे मेव्हणे मला एके दिवशी म्हणाले, "तुमच्या सडपातळ बहिणीवर सर्व इलाज केले—कॉडलिव्हर ऑईल, लोणी, पिठाचे सत्त्व, मध, मासे, मांस, अंडी, शक्तिवर्धक औषधे—सगळी देऊन पाहिली. पण ती आकाराने, जाडीने एकशतांश इंच सुद्धा वाढत नाही."

काही दिवसांनी मी बोस यांच्या घरी गेलो. माझे काम थोड्या मिनिटांतच संपले. मला वाटले, नलिनीने मला काही पाहिले नाही. मी जेव्हा पुढल्या दरवाज्यापर्यंत गेलो, तेव्हा मी तिचा आवाज ऐकला. तिच्या आवाजात अगत्य होते तसा हुकमीपणाही होता.

"दादा, इकडे ये. तू या वेळी काही मला फसवून जाणार नाहीस. मला तुझ्याशी बोलायचे आहे.

तिच्या खोलीच्या पायऱ्या चढून मी वर गेलो. तिच्या डोळ्यांत अश्रू पाहून मला आश्चर्य वाटले.

"दादा!" ती म्हणाली, "जुन्या गोष्टी आता आपण विसरू या. पारमार्थिक मार्गावर तुझे पाय आता रुतले आहेत हे मला दिसतंय. मलाही आता तुझ्यासारखेच सर्वतोपरी व्हायचे आहे." आशेने तिने पुढे म्हटले, "तुझी तब्येत आता चांगली धडधाकट आहे; तर मग मला मदत कर ना! माझे यजमान माझ्या जवळ सुद्धा येत नाहीत आणि त्यांच्यावर तर माझे फार प्रेम आहे. परंतु माझी खरी इच्छा परमेश्वरप्राप्तीच्या मार्गाने मी प्रगती करावी अशी आहे. मग मी हडकुळी व सुमार दिसले तरी चालेल."

तिची ही विनंती ऐकून माझे हृदय हेलावले. आमची ही नवीनच झालेली मैत्री हळूहळू वाढत चालली. एके दिवशी तिने माझी शिष्या होण्याची इच्छा दर्शविली.

"तुला योग्य वाटेल त्या मार्गाने तू मला तयार कर. औषधांपेक्षा परमेश्वरावर माझा विश्वास आहे." तिने पुष्कळशा औषधांच्या बाटल्या एकत्र जमविल्या आणि आपल्या खिडकीतून त्यांतील औषधे खाली गटारात ओतून दिली.

तिच्या श्रद्धेची कसोटी पाहण्याकरिता मी तिला आहारातून मासे, मांस व अंडी वर्ज्य करण्यास सांगितले.

मी सांगितलेले नियम नलिनीने कडकपणे पाळल्यानंतर आणि अनेक अडचणींना न जुमानता अगदी पूर्ण असा शाकाहार स्वीकारल्यानंतर कित्येक महिन्यांनी मी तिला एकदा भेटावयाला गेलो.

"ताई, तू आध्यात्मिक बंधनांचे, नियमांचे मनःपूर्वक पालन करीत आहेस. त्याचे फळ आता तुला लवकरच मिळेल." आणि मी मिस्किलपणे हसलो, "तुला किती लठ्ठ व्हायचे आहे? आपल्या आत्याइतके का? जिने आपले स्वतःचे पाय स्वतःच्या डोळ्यांनी कित्येक वर्षांत पाहिलेले नाहीत?"

"नाही; पण तू जेवढा लठ्ठ आहेस तेवढाच लठ्ठपणा मला पाहिजे आहे."

मी गंभीरपणे उत्तर दिले, “परमेश्वराच्या कृपेने मी नेहमी खरेच बोलत आलो आहे; आणि आताही [1] मी खरेच बोलणार आहे. दैवी कृपाप्रसादाने आजपासून तुझ्या प्रकृतीत निश्चितपणे बदल होत जाईल. एका महिन्यात तू माझ्याइतकी लट्ठ होशील.”

माझ्या अंतःकरणातून निघालेले हे शब्द खरे ठरले. तीस दिवसांत नलिनीचे वजन माझ्याइतके झाले. शरीराला गोलाकार आल्याकारणाने तिला सौंदर्य आले. तिचे यजमान तिच्यावर फार प्रेम करू लागले. आणि त्यांच्या वैवाहिक जीवनास—ज्याची सुरुवात अशुभ रीतीने झाली होती, त्यास—हे आदर्श व सुखकारक वळण मिळाले.

जपानहून मी परत आल्यावर मी नसताना नलिनी मुदतीच्या तापाने बिछान्याला खिळून राहिली आहे असे कळले. मी लगबगीने तिच्या घरी गेलो; आणि तिचे ते कृश शरीर पाहून मी घाबरून गेलो. ती ग्लानीमध्ये होती.

माझे मेव्हणे मला म्हणाले, “दुखण्याने तिचे मन अस्वस्थ होण्यापूर्वी ती नेहमी म्हणे, ‘मुकुंददादा इथे असता तर माझी अशी स्थिती झाली नसती.’” डोळ्यांत पाणी आणून ते पुढे म्हणाले, “मला आणि इतर डॉक्टरांना आता काही आशा दिसत नाही. मुदतीच्या तापाशी इतके दिवस झगडल्यानंतर, आता तिला रक्ती आव सुरू झाली आहे.”

प्रार्थना करून मी स्वर्ग आणि पृथ्वी हलवून सोडली. मी तिच्या शुश्रूषेकरिता एक अँग्लो-इंडियन नर्स ठेविली. तिने चांगले काम बजावले. बहिणीला बरे करण्याकरिता मी निरनिराळ्या यौगिक पद्धतींचा उपयोग केला. रक्ताची आव थांबली.

पण डॉ. बोस यांनी दुःखाने मान फिरविली. “रक्त पडण्याइतके तिच्या अंगात रक्तच उरलेले नाही.”

“ती बरी होईल,” मी निश्चयाने म्हणालो, “सात दिवसांत तिचा ताप उतरेल.”

सात दिवसांनी नलिनीने डोळे उघडले. मी आश्चर्याने थरारून गेलो. आणि प्रेमाने माझ्याकडे दृष्टी फिरवून ओळखल्याचे तिने दाखविले. त्या दिवसापासून तिची तब्येत झपाट्याने सुधारू लागली. जरी दुखण्यातून बरी झाल्यावर तिचे वजन पूर्वीइतके झाले होते, तरी ह्या जिवावरच्या दुखण्याची एक दुःखद खूण राहिली होती. पक्षाघाताने तिचे पाय अधू झाले. हिंदी व इंग्लिश तज्ज्ञ डॉक्टरांनी चक्क सांगून टाकले की, ती आता पांगळी झाली आहे.

ती जगावी म्हणून प्रार्थना करून करून जो झगडा मी सारखा लढत होतो त्याने मी थकून गेलो. श्रीयुक्तेश्वरांची मदत घेण्याकरिता मी सेरामपूरला गेलो. नलिनीच्या यातनांची करुण कहाणी त्यांच्या कानांवर घातली. त्यांनी फार सहानुभूती दाखविली.

“तुझ्या बहिणीचे पाय एका महिन्यात पूर्वीसारखे होतील,” ते म्हणाले, “दोन कॅरटच्या भोक न पाडलेल्या मोत्यांनी जडवलेली वाकी तिने दंडावर घट्ट बांधावी.”

अशा तऱ्हेचे हे आनंदपूर्ण आश्वासन मिळाल्याने मला केवढा धीर आला. मी गुरुजींच्या पायांवर साष्टांग लोटांगण घातले.

“गुरुजी, आपण गुरू आहात. ती बरी होईल असा आपला एकच शब्द पुरे आहे. पण आपला जर आग्रहच असेल तर मी वाकी ताबडतोब करवितो.”

गुरुजींनी मान हलविली; “होय, तसेच कर.” नंतर त्यांनी नलिनीला जरी कधी पूर्वी पाहिले नव्हते तरी तिचे शारीरिक व मानसिक स्वभावविशेष बिनचूक सविस्तरपणे सांगावयास सुरुवात केली.

“गुरुजी,” मी पृच्छा केली, “हे काय ज्योतिषावरून आपण सांगत आहात काय? पण आपल्याला तिची जन्मवेळ, दिवस वगैरे काहीच माहीत नाही.”

श्रीयुक्तेश्वरांनी स्मित केले, “ज्योतिषाहून खोल, गहन असे एक शास्त्र आहे. ते शास्त्र पंचांग किंवा घड्याळे यांचा आधार घेत नाही. प्रत्येक मानव हा ह्या विराट् पुरुषाचा एक अंश आहे. त्याला दोन शरीरे असतात; एक पार्थिव किंवा जड व दुसरे स्वर्गीय. पार्थिव डोळा फक्त पार्थिव शरीराचा आकार पाहू शकतो. पण अंतश्चक्षू जो आहे तो अधिक सखोलपणे प्रत्येक मानव ज्या विश्वव्यापक रचनेचा एक अंतर्गत व व्यक्तिगत भाग असतो, अशा रचनेपर्यंत भेदून पोचू शकतो.”

मी कलकत्त्याला परतलो व नलिनीकरिता एक मोती [2] विकत घेतले. एका महिन्यानंतर पक्षाघाताने निरुपयोगी झालेले तिचे पाय पूर्णपणे बरे झाले.

गुरुजींना आपली अंतःकरणपूर्वक कृतज्ञता कळविण्याविषयी बहिणीने मला सांगितले. त्यांनी तो निरोप शांतपणे ऐकून घेतला. पण त्यांचा निरोप घेतेवेळी त्यांनी गर्भितार्थपूर्ण उद्गार काढले:

“पुष्कळ डॉक्टरांनी तुझ्या बहिणीला सांगितले आहे की, तिला कधी मुले व्हावयाची नाहीत. थोड्याच वर्षांच्या अवधीत तिला दोन मुली होतील, असे तिला खात्रीपूर्वक माझ्या वतीने सांग.”

काही वर्षांनी नलिनीला एक मुलगी झाली. तिच्या आनंदाला सीमा राहिली नाही. आणि काही वर्षांनी तिला आणखी एक मुलगी झाली.



*श्री श्री दया माता ईश्वरी तादात्म्यमध्ये*

*श्री दया माता, योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिपच्या अध्यक्षा, ध्यानमग्न, एका भारत भेटीच्या वेळी, 1968. "परमहंस योगानंदांनी आम्हाला रीती शिकविली," त्यांनी लिहिले आहे, "त्यांच्या केवळ शब्दांनी आणि दैवी उदाहरणानेच नव्हे, तर आम्हाला ध्यानाच्या शास्त्रीय यो.स.सो./एस.आर.एफ. पद्धती देऊन. आत्म्याची तहान सत्याविषयीचे वाचन करून भागवता येणे शक्य नाही. एखाद्याला सत्याच्या स्त्रोताचे म्हणजेच ईश्वराचे गाढपणे प्राशन करणे आवश्यक आहे. आत्म-साक्षात्काराचा अर्थच मुळी हा आहे: ईश्वराचा प्रत्यक्ष अनुभव."*

*ज्या प्रमाणे त्यांचे नाव दया माता सूचित करते, प्रत्यक्षात देखील "दयेची माता," होत्या; त्यांच्या जीवनाचा मूळ विषयच ईश्वरावर प्रेम करणे आणि ते प्रेम सर्वांबरोबर वाटणे हा होता.*

1 हिंदू धर्मग्रंथ अशी घोषणा करतात की, जे नेहमी सत्य भाषणच करतात त्यांना आपले शब्द खरे करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. आपल्या हृदयातून ज्या आज्ञांचा ते उच्चार करतात त्या आज्ञांचे पालन केले जाते; त्यांची बजावणी होते. योगसूत्रे २:३६

ह्या जगताची उभारणी सत्यावर झालेली असल्याने सर्व धर्मग्रंथ सत्य ह्या गुणाची प्रशंसा करतात. ह्या गुणामुळेच मनुष्य आपले जीवन अनंतत्त्वाशी समरस करू शकतो. महात्मा गांधी नेहमी म्हणत; "सत्य म्हणजे परमेश्वर." सर्व आयुष्यभर त्यांनी विचार, उच्चार व आचार यांमध्ये पूर्ण सत्य साधण्याकरिता आटोकाट प्रयत्न केले. युगायुगांमधून सत्याचे हे व्रत किंवा ध्येय हिंदू समाजाने आदर्श मानलेले आहे. मार्को पोलो लिहितो की, "ब्राह्मण जगावरील कोणत्याही गोष्टीच्या लोभाने असत्य भाषण करीत नाहीत." हिंदुस्थानात नोकरी केलेल्या विल्यम स्लीमन नावाच्या एका इंग्लिश न्यायाधीशाने आपल्या 'जर्नी थ्रू औध इन १८४९-५०' या पुस्तकात म्हटले आहे: "माझ्यापुढे शेकडो मुकद्दमे आलेले होते, की ज्यांमध्ये माणसाची मालमत्ता, स्वातंत्र्य किंवा जीवित ही त्याच्या केवळ खोट्या जबानीवर अवलंबून होती. पण त्याने तशी खोटी जबानी देण्याचे कबूल केले नाही."

2 मोती आणि इतर रत्ने, तसेच धातू व काही वनस्पतीही मनुष्याने आपल्या शरीरावर नित्य बाळगिली तर त्यांचा शरीरामधील पेशींवर इलेक्ट्रोमॅग्नेटिक परिणाम घडून येतो. मनुष्याच्या शरीरात कार्बन व इतर विविध मूलद्रव्य धातू असतात. तसेच ते वनस्पती, धातू व रत्ने यांच्याहीमध्ये असतात. ह्या क्षेत्रात जे शोध ऋषींनी लावलेले आहेत ते शोध कधी तरी आधुनिक शरीरशास्त्रज्ञांकडून निःसंशयपणे मान्य केले जातील. मनुष्याचे शरीर हे संवेदनशील आहे; त्यात अनेक विद्युन्मय प्राणशक्तीचे प्रवाह वाहत असतात. अद्याप आकलन न झालेल्या अशा अनेक गूढ गोष्टींचे ते केंद्र आहे.

रत्ने व धातूच्या बांगड्या ह्यांचा शरीराला काही उपचारासारखा जरी उपयोग होत असला, तरी श्रीयुक्तेश्वर ह्या गोष्टी वापरण्याची जी शिफारस करीत, त्याचे आणखी एक कारण होते. योगीजनांना-गुरुजनांना मोठे चिकित्सक म्हणवून घेण्याची इच्छा नसते. बरे करण्याचे काम फक्त परमेश्वराचेच आहे; म्हणून साधुसंत, परमेश्वराकडून आपल्याला नम्रपणे प्राप्त झालेल्या शक्ती लपविण्याकरिता अनेक युक्त्यांचा उपयोग करतात. मनुष्य बहुधा आपली श्रद्धा कोणत्या तरी प्रत्यक्ष अशा जड वस्तूवर ठेवीत असतो. ज्या वेळी लोक आरोग्यप्राप्तीच्या उद्देशाने गुरुजींकडे येत तेव्हा ते त्यांना बांगड्या, कंकणे, माणिक-रत्ने वापरण्यास सांगत. आणि त्याचे असे होई की, आरोग्यप्राप्तीच्या दृष्टीने त्यांच्या अंतःकरणात त्या विविध वस्तूंविषयी श्रद्धा उपजे आणि गुरुजींच्यावरचे त्यांचे लक्ष दुसरीकडे वळविले जाई. कंकणे, रत्ने यांच्यामध्ये त्यांचे मूळचे अंगचे इलेक्ट्रो-मॅग्नेटिक स्वरूपाचे आरोग्यप्रदायी गुण असतातच. पण त्यामागे गुरुजींचे सुप्त आध्यात्मिक आशीर्वादही असत.

प्रकरण - २६

# 26. क्रियायोगाचे शास्त्र

“क्रियायोगाच्या शास्त्राचा उल्लेख ह्या पुस्तकात जागोजाग आलेला आहे. ह्या शास्त्राचा प्रसार सांप्रत साऱ्या भारतात लाहिरी महाशय यांच्या विद्यमाने झालेला आहे. ते माझे परमगुरू (गुरूंचे गुरू) होत. क्रिया ह्या शब्दात ‘कृ’ हा संस्कृत धातू आहे. ‘कृ’ म्हणजे करणे, बनविणे. कृती करणे, प्रतिकृती करणे. तीच धातू कर्म ह्या शब्दात आहे. कर्म म्हणजे कारण व परिणाम; म्हणून क्रियायोग म्हणजे “एका विशिष्ट क्रियेने, कृतीने जीवात्म्याचे परमात्मस्वरूपाशी घडवून आणलेले मीलन.” जो योगी ही क्रिया पद्धतशीरपणे करतो तो विराटविश्व व्यापून राहिलेल्या कारण—परिणामांच्या शृंखलेपलीकडे जाऊन हळूहळू कर्मबंधनांपासून मुक्त होतो.

हे पुस्तक सामान्य वाचकांकरिता लिहिलेले असल्यामुळे, काही पारंपरिक प्रथेनुसार क्रियायोगाचे संपूर्ण स्पष्टीकरण किंवा विवेचन ह्या पुस्तकात देता येत नाही. पुरातन काळात होऊन गेलेल्या क्रियायोग्यांचा असा दंडकच आहे. क्रियायोगाची वास्तविक प्रविधि योगदा सत्संग सोसायटी/सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपने [1] खास परवानगी दिलेल्या क्रियायोग्यांकडून घ्यावी. येथे फक्त स्थूल माहिती पुरे.

क्रियायोग हा एक साधा, सोपा मानसिक व शारीरिक क्रिया अंतर्भूत केलेला योगसाधनेचा प्रकार आहे. ह्या साधनेमुळे मनुष्याच्या शरीराच्या रक्तातील कार्बन बाहेर पडून रक्त प्राणवायूने परिपूर्ण होते. प्राणवायूचे आधिक्य झाले म्हणजे त्याच्या अणूंचे जीवनशक्तीमध्ये रूपांतर होऊन त्यामुळे मेंदू व पृष्ठवंशरज्जूमधील विविध केंद्रे यांचे पुनरुज्जीवन होते; व रक्तातील दूषित द्रव्ये साचण्याचे थांबते व योग्यास आपल्या शरीरातील पेशींचा, तंतूंचा जो अहर्निश नाश होत असतो, तो थांबविता येतो. प्रगत झालेला योगी आपल्या शरीरातील पेशींचे ऊर्जेमध्ये परिवर्तन करू शकतो. इलिजा, येशू, कबीर आणि इतर पुष्कळ प्रेषित (सिद्धयोगी) हे क्रियायोग किंवा तत्सदृश अन्य योगसाधनेमध्ये प्रवीण होते व त्यामुळे त्यांना आपले शरीर इच्छेनुरूप अदृश्य करता येत असे व तसेच परत जडस्वरूपात आणता येत असे.

क्रिया (क्रियायोग) एक फार प्राचीन विज्ञान आहे. लाहिरी महाशय यांना त्यांचे गुरू, बाबाजी यांच्याकडून त्याचे ज्ञान झाले. तमोयुगात ही साधना लुप्तप्राय झाली होती; ती बाबाजींनी परत शोधून काढली व त्या साधनेच्या आचारपद्धतीचे तंत्र स्पष्ट केले व या योगसाधनेला क्रियायोग असे साधे नवीन नाव दिले.

बाबाजी लाहिरी महाशयांना म्हणाले, “फार जुन्या काळी, भगवान श्रीकृष्णांनी ही योगसाधना अर्जुनास सांगितली आणि ती पुढे पातंजली, येशू ख्रिस्त, सेंट जॉन, सेंट पॉल आणि त्याचे इतर शिष्य ह्यांनाही माहीत झाली होती. तिचे क्रिया-योग या नव्या नावाखाली पुनरुज्जीवन करून ह्या एकोणिसाव्या शतकात तुझ्यामार्फत मी ती जगास देत आहे.”

भगवद्‌गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी क्रियायोगाबद्दल दोनदा उल्लेख केलेला आहे. एक श्लोक असाः “योगी प्राणवायूचे अपानवायूमध्ये विसर्जन करतात व अपानवायूचे प्राणवायूमध्ये विसर्जन करतात व अशा तऱ्हेने प्राण व अपान या दोन्ही वायूच्या गती अवरुद्ध करून प्राणायाम सिद्ध करतात; दोन्ही वायू एकमेकांत विलीन करून टाकतात आणि अशा पद्धतीने योगी आपल्या हृदयातून प्राणशक्ती बाहेर काढून तिला आपल्या ताब्यात आणतात.” [2] याचा अर्थ असा: “योगी हृदय व फुफ्फुसे यांमध्ये होत असलेली क्रिया स्थगित करून आपल्या शरीरातील घटकावयवाचा जो अहर्निश नाश होत असतो, तो नाश, त्यांना प्राणवायूचा (जीवनशक्तीचा) जास्त पुरवठा करवून, वाचवू शकतो. तसेच तो अपानवायूचा (उत्सर्जक प्रवाहाचा) निरोध करून पेशीच्या वाढ होण्यामधील होणारा बदलही थांबवू शकतो. अशा तऱ्हेने नाश व वाढ या दोन्हींना नाहीसे करून योगी आपल्या प्राणशक्तीवर स्वामित्व मिळवितो.”

गीतेमधील दुसरा श्लोक असा: “तो ध्यानप्रवीण (मुनी) हा निरंतर मुक्तीची प्राप्ती करून घेतो की, जो परमोच्च ध्येय साध्य करण्याच्या हेतूने स्वतःची दृष्टी बाह्य पदार्थांवरून काढून घेऊन दोन्ही भुवयांच्या मध्यभागी केंद्रित करून, प्राण व अपानवायूंचे समप्रवाह नासिका व फुफ्फुसे यांमध्ये एकत्र करवितो व इंद्रियांच्या आहारी गेलेले चित्त व बुद्धी फिरून आपल्या स्वतःच्या ताब्यात आणतो व त्यायोगे आपल्या मनामधून वासना, भीती व क्रोध ही घालवून लावतो.” [3]

भगवान कृष्ण पुढे सांगतात [4] की, पूर्वीच्या कोणत्या तरी जन्मात हे कधीही नाहीसे न होणारे ज्ञान, त्यांनी द्रष्टा विवस्वत यास सांगितले. विवस्वताने ते मनूला सांगितले. मनू हा मोठा कायदेकानून करणारा राजा होऊन गेला. [5] मनूने इक्ष्वाकूला सांगितले. इक्ष्वाकू ह्याने भारतातील प्रतापी अशा सूर्यवंशीय राजघराण्याची संस्थापना केली. ह्याप्रमाणे एकाकडून दुसऱ्याकडे व दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे जात जात, हे राजयोगाच्या ज्ञानाचे सातत्य ऋषींनी टिकविले. पुढे जडवादी युग आले. [6] तेव्हा पुरोहितांनी हे ज्ञान गुप्त ठेवण्यास सुरुवात केली व सर्वसाधारण लोकांनी या ज्ञानाची उपेक्षा केली. तेव्हा ही पवित्र विद्या हळूहळू दुर्लभ झाली.

योगशास्त्राचे अग्रेसर प्रणेते भगवान पातंजली ह्यांनी ह्या ‘क्रियायोगा’चा दोनदा उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात की, “क्रियायोग म्हणजे शारीरिक यम, मनःसंयम व ॐ (प्रणवमंत्र) यावरील ध्यान.” [7] ध्यानात स्पष्ट ऐकू येणारा हा विराट शब्द म्हणजेच परमेश्वर असे पातंजली म्हणतात. [8] हा सृजनवाचक शब्द. जणू कंपनात्मक यंत्राची घरघर हा त्याचा साक्षी [9] होय. योगाभ्यासास ज्याने नुकतीच सुरुवात केली आहे, अशाला सुद्धा लवकरच आतून हा ॐचा आश्चर्यजनक ध्वनी ऐकू येऊ लागतो. आणि अशा तऱ्हेच्या आनंदमय आध्यात्मिक उत्तेजनामुळे साधकाच्या मनाची खात्री होऊ लागते की, आपण दिव्यलोकामध्ये खरोखरी संपर्क साधीत आहोत.

पातंजलींनी ह्या क्रियायोगाचा किंवा जीवनशक्ति-निरोधाचा दुसऱ्यांदा उल्लेख केला आहे; “श्वास व उच्छ्वास यांचे प्रवाहमार्ग एकमेकांपासून अलग करून प्राणायाम सिद्ध केला, तर त्या प्राणायामाच्या अभ्यासाने मुक्ती मिळते,” [10]

सेंट पॉलला क्रियायोगाचे किंवा तत्सदृश साधनेचे तंत्र माहीत होते आणि त्या तंत्राचा उपयोग करून तो इंद्रियांमधून चैतन्य बाहेर काढून घेत असे व पुनः त्यांमध्ये ते आणीत असे आणि म्हणूनच त्याला म्हणता आले की, “ख्रिस्तमय झाल्याने मला जो आनंद होतो त्याच आनंदात मी जाहीर करतो: [11] दररोजच मी मरत असतो.” शारीरिक प्राणशक्ती साधारणपणे माणसाच्या फक्त बाह्य दिशेने किंवा इंद्रियगोचर जगाच्या दिशेनेच प्रवृत्त होत असते. ती विरुद्ध दिशेने म्हणजे अंतर्यामी केंद्रित करून, सेंट पॉल हा दररोज ख्रिस्त-संवेदनाच्या परमानंदाचा अनुभव, खऱ्याखुऱ्या संलग्नावस्थेचा अनुभव मिळवीत असे. अशा अवस्थेमध्ये आपण मृत आहो किंवा इंद्रियांच्या मोहजालापासून, मायेपासून मुक्त झालो आहो, ह्याचे त्याला ज्ञान होई.

परमेश्वर-संपर्क साधण्याच्या प्रयत्नात सुरुवातीच्या अवस्थेत (सविकल्प समाधीमध्ये) साधकाची जाणीव विश्वरूपात विलीन होते आणि मग त्याची प्राणशक्ती (life force) शरीरातून बाहेर पडते व त्यामुळे त्याचे शरीर मेल्यासारखे, निर्जीव व ताठ होते. आपल्या शरीराची चेतना थोडाच वेळ गेली असल्याची योग्यास पूर्ण जाणीव असते. तो जसजसा आध्यात्मिक मार्गावर प्रगत होत जातो (निर्विकल्प समाधीच्या दिशेने) तसतसा तो जागेपणी सुद्धा किंवा संसारातील नेहमीची कर्मे करीत असताना सुद्धा शरीराचे आसन स्थिर न करताही परमेश्वराशी बोलू शकतो. [12]

“‘क्रियायोग’ हे मानवाची उत्क्रांती जलद घडवून आणण्याचे असे एक साधन आहे,” असे श्रीयुक्तेश्वर आपल्या शिष्यांना सांगत असत, “पुरातन काळातील योग्यांनी असे शोधून काढलेले आहे की, विश्वरूपसंवेदनाचा व श्वास-उच्छ्वास या क्रियांवरील प्रभुत्वाचा फार निकटचा संबंध आहे. जगाच्या ज्ञानभांडारास भारताने दिलेली ही देणगी अद्वितीय व तशीच कधीही नष्ट न होणारी अशी आहे. प्राणशक्ती ही साधारणपणे हृदयाची क्रिया अविरत चालू राखण्याकडे उपयोगात आणली जाते; पण तिचा उपयोग त्याहूनही उच्च दर्जाच्या कार्याकरिता एका विशिष्ट पद्धतीने श्वास व उच्छ्वास यांची ही अविरत गती शांत व स्थगित करून करावयास पाहिजे.”

क्रियायोगी मनाने आपली प्राणशक्ती पृष्ठवंशरज्जूमध्ये षट्चक्रांमधून वरती खेचू शकतो व खाली आणू शकतो. ती षट्चक्रे अशी: आज्ञाचक्र, विशुद्धचक्र, अनाहतचक्र, मणिपूरचक्र, स्वाधिष्ठानचक्र व मूलाधार चक्र. ही चक्रे म्हणजे राशिचक्रातील बारा राशी होत. हे राशिचक्र म्हणजे विराटपुरुष होय. माणसाच्या पृष्ठवंशरज्जूमधून प्राणशक्ती किंवा ऊर्जा हिचे वरपर्यंत जाणे व नंतर खालपर्यंत येणे अर्धा मिनिट जरी झाले, तरी त्यायोगे माणसाच्या उत्क्रांतीच्या दृष्टीने सूक्ष्म अशी प्रगती होत जाते. जर क्रिया अर्धे मिनिट केली तर तिची किंमत एका वर्षाच्या नैसर्गिक आध्यात्मिक प्रगतीइतकी असते.

मनुष्याच्या सूक्ष्म शरीरातील ही जी सहा चक्रे (दोन्ही बाजूंनी धरली तर बारा) ती त्याच्या सर्वज्ञानप्रदायी दिव्य अशा अंतश्चक्षूच्या सूर्याभोवती फिरत असतात; त्यांचा संबंध सूर्यमालेतील सूर्य व बारा राशी यांच्याशी आहे. म्हणजे सर्व मानवप्राण्यांवर अंतर्विश्व व बाह्यविश्व यांचा परिणाम होत असतो. प्राचीन ऋषिमुनींनी असे शोधून काढलेले आहे की,

मानवप्राण्यास त्याच्या सभोवतालची ऐहिक व पारलौकिक परिस्थिती दर बारा वर्षांनी ह्या नैसर्गिक मार्गावर प्रगत करीत असते. धर्मशास्त्रांमध्ये असे सांगितले आहे की, मनुष्याला आपली मानवी बुद्धी विश्वात्मक बुद्धीमध्ये, जाणीवेमध्ये पुरेशा प्रमाणात परिणत करावयास, अन्य मार्गाने साधारण हिशेबाने, निरामय, निर्बाध उत्क्रांतीची दशलक्ष वर्षे लागतात.

दररोज साडेआठ तासांत एक हजार क्रिया करणाऱ्या योग्यास एकाच दिवसात तितकी प्रगती प्राप्त होते, जी मिळविण्यास साध्या माणसाला एक हजार वर्षे लागतात. ह्या हिशेबानुसार अशा योग्यास एका वर्षात ३६५००० वर्षांची उत्क्रांतावस्था प्राप्त होते. तीन वर्षांच्या तीव्र साधनेने क्रियायोग्यास ती परिणतावस्था मिळते, जिला नैसर्गिक गतीनुसार दशलक्ष वर्षे लागतात. पण हा क्रियायोगाचा, मोक्षप्राप्तीचा जवळचा रस्ता फक्त ज्यांची या मार्गावर चांगली प्रगती झाली आहे अशा योग्यांनीच अनुसरावयाचा असतो. गुरूच्या निदर्शनाखाली अशा योग्यांनी साधनेच्या तीव्र अभ्यासाने उत्पन्न झालेली शक्ती सहन करण्याकरिता, ग्रहण करण्याकरिता आपली शरीरे व मज्जासंस्था पात्र केलेली असतात.

साधक सुरुवातीस दररोज दोन वेळा फक्त चौदा ते चोवीस क्रिया करतो. पुष्कळसे क्रियायोगी सहा किंवा बारा किंवा चोवीस किंवा अठ्ठेचाळीस वर्षांच्या अवधीमध्ये मुक्ती प्राप्त करतात. एखाद्या योग्यास मुक्ती मिळण्यापूर्वी, पूर्ण साक्षात्कार होण्यापूर्वी, मरण आले, तर पुढील जन्मी ह्या जन्मीचे क्रिया-योगसाधनेचे पुण्य, सत्कर्म तो बरोबर घेऊन येतो व त्या जन्मी तो स्वभावतःच आपल्या अंतिम ध्येयाप्रत पुढे ढकलला जातो, प्रगत होत जातो.

सर्वसामान्य माणसाचे शरीर हे पन्नास वॉट पॉवरच्या विजेच्या दिव्यासारखे आहे. ते असे की, क्रियायोगाच्या आखीव अभ्यासाने उदित होणारी कोट्यवधी वॉटस्ची प्रकाशशक्ती तो पन्नास वॉट पॉवरचा दिवा ग्रहण करू शकत नाही. क्रियेच्या ह्या साध्या व कुणालाही करता येणाऱ्या पद्धतीने, पायरीपायरीने व एका ठराविक क्रमाने वाढवत जाऊन केलेल्या अभ्यासाने मनुष्याच्या शरीरात प्रत्येक दिवशी सूक्ष्म परिवर्तन घडत जाते आणि अंती ते शरीर इतके सामर्थ्यवान केले जाते की, परमात्मतत्त्व दृश्य व जड स्वरूपात प्रकट होण्याकरिता जेवढी असीम स्तराची विश्वशक्ती प्रकट होते, तेवढी शक्ती ते शरीर धारण करू शकते.

पुष्कळसे अत्युत्साही व चुकीच्या मार्गावर असलेले लोक वेड्यावाकड्या रीतीने श्वासोच्छ्वास करण्यास शिकवितात. अशा प्राणायामपद्धतीशी क्रियायोग ह्या योगसाधनेचा तादृश काही संबंध नाही. श्वास फुफ्फुसांमध्ये कोंडून धरून श्वासनिरोधनाचे जे अनेक प्रकार आहेत, ते अनैसर्गिक व निःसंशय क्लेशकारक असतात; उलटपक्षी क्रियायोगसाधना ही प्रारंभापासून प्रसन्नता निर्माण करते. तिच्यायोगे मेरुदंडामध्ये नवचैतन्य येत असल्याची सुखसंवेदना भासमान होत जाते.

पुरातनकालापासून चालत आलेले हे योगसाधनेचे तंत्र प्राणवायूचे निःश्वासाचे मनःसत्त्वामध्ये (Mind-stuff) परिवर्तन घडवून आणीत असते. आध्यात्मिक उन्नती प्राप्त झाल्यावर साधकास श्वास म्हणजे एक मनोभावना, मनाची एक क्रिया, जणू मनानेच आपण श्वास घेत आहो, असे त्यास वाटते.

माणसाची श्वासोच्छ्वासाची क्रिया दर मिनिटाला किती होते ह्याचा व त्याच्या जाणीवेच्या अवस्थेत कमी-जास्त जो फरक होतो याचा गणितशास्त्रदृष्ट्या संबंध आहे. याची पुष्कळ उदाहरणे देता येतील. जेव्हा माणसाचे लक्ष एखादा बारीक गुंतागुंतीचा बुद्धिगम्य असा मुद्दा समजून घेण्याकडे लागलेले असते किंवा एखादी नाजूक किंवा अवघड शारीरिक कसरत करण्याकडे लागलेले असते तेव्हा त्याची श्वसनक्रिया आपोआप मंद होऊ लागते. लक्ष स्थित, केंद्रित करणे मंद श्वसनक्रियेवर अवलंबून असते. ज्या वेळेस श्वासोच्छ्वास जलद किंवा अनियमित होऊ लागतो त्या वेळेस नक्की समजावे की, माणसाच्या मनात शरीराला हानिकारक अशा भीती, काम, क्रोध अशा विकारांच्या भावना उत्पन्न झालेल्या आहेत. माकड नेहमी काही तरी खटपट, धडपड करीत असते; माणसाच्या दर मिनिटास १८ श्वासोच्छ्वासाच्या तुलनेत त्याची श्वसनक्रिया दर मिनिटास ३२ आहे. हत्ती, कासव, साप आणि इतर काही प्राणी की, ज्यांची आयुर्मर्यादा पुष्कळशी आहे त्यांच्या श्वसनक्रियेचे मान माणसाच्यापेक्षा कमी असते. कासवाचे उदाहरण घ्या. कासव तीनशे वर्षे जगते. ते दर मिनिटाला फक्त चारच वेळा श्वासोच्छ्वास करते.

झोपेने माणसाला टवटवी येते व त्याची झालेली झीज भरून येते, त्याचे कारण असे की, त्याचे शरीराचे भान थोडा वेळ गेलेले असते व श्वसनक्रियेचा त्याला तेवढ्या वेळेपुरता विसर पडलेला असतो, हे होय. झोपलेल्या माणसाचा श्वास अधिक मंद व नियमित चालतो. झोपण्याच्या अवस्थेत मनुष्य योगी झालेला असतो. दररोज रात्री तो अजाणतेपणे योगसाधना करीत असतो. ती योगसाधना म्हणजे शरीराशी आपण निगडित आहोत ही जाणीव बाहेर काढून घेणे व प्राणशक्तीचे तिच्या रोगनिवारक, आरोग्यदायी प्रवाहांसकट मुख्य मज्जासंस्थेच्या केंद्रात व मेरूदंडातील सहा ऊर्जा निर्माण करणाऱ्या चक्रांमध्ये उतरविणे व खेळविणे. अजाणतेपणे झोपणाऱ्या माणसाच्या शरीरात विराटशक्तीचा पुनरपि संचार होतो. ही विराटशक्ती सर्व प्राणिमात्रांस धारणा देत असते.

स्वतः होऊन साधना करणारा योगी एक साधा व नैसर्गिक अनुक्रम जाणतेपणे पाळतो; एखाद्या मंद झोपाळूप्रमाणे अजाणतेपणे नव्हे. क्रियायोगी आपल्या तंत्राचा उपयोग आपल्या शरीरातील सर्व पेशींना अविनाशी प्रकाशाने भरण्यास व त्यांना अशा रीतीने आध्यात्मिक चुंबकीय अवस्थेत ठेवण्यास करतो. शास्त्रशुद्ध दृष्ट्या तो स्वतःपुरती श्वासोच्छ्वासाच्या क्रियेचीच जरुरी नाहीशी करतो. ती साधना चालू असता तो झोपी जात नाही की त्याची शरीराची जाणीव नाहीशी होत नाही, की ते शरीर निर्जीव होत नाही.

मनुष्यमात्र हा मायेच्या किंवा निसर्गनियमांच्या अधीन असतो. त्याच्या शरीरात वाहत असणारा प्राणशक्तीचा प्रवाह हा बहिर्मुख असतो. ह्या प्रवाहाचा इंद्रियांकडून दुरुपयोग होतो व नाश होतो. क्रियायोगाच्या अभ्यासाने ह्या प्रवाहाची दिशा बदलली जाते. आणि प्राणशक्तीचा विनियोग हा अंतर्विश्व उद्दीपित करण्यात होतो आणि तिचे मेरुदंडात संचरणाऱ्या कुंडलिनीशक्तीशी पुनरपि मीलन घडवून आणले जाते. प्राणशक्तीच्या अशा तऱ्हेने केलेल्या उद्दीपनाने, योग्याचे शरीर आणि त्याच्या मेंदूच्या पेशी जणू अमृतप्रवाहाने नवजीवन पावतात.

योग्य समतोल आहार व सात्त्विक, सुसंबद्ध विचार ठेवून, भरपूर सूर्यप्रकाश घेऊन ज्या माणसांचा आयुष्यक्रम फक्त नैसर्गिक नियमांनुसार व्यतीत होतो, अशा माणसांना मुक्ती प्राप्त होण्यास दशलक्ष वर्षे लागतात. मज्जासंस्थेच्या अंतर्गत अगदी अल्प अशी जरी सुधारणा करावयाची म्हटली, तरी साधारणपणे बारा वर्षे लागतात व त्या अवधीत जीवनक्रम आरोग्याच्या नियमांनुसार आखावा लागतो. परमात्मस्वरूपाचे पर्याप्त प्रमाणात ग्रहण करण्याकरिता मेंदूतील ज्ञानसंस्थेच्या बैठकीस पवित्र व शुद्ध करण्यासाठी दशलक्ष वर्षे लागतात. परंतु क्रियायोगाच्या ह्या आध्यात्मिक योगसाधनेचा उपयोग करून, योग्यास नैसर्गिक नियमांचे इतके दीर्घकाल काटेकोर पालन करून मुक्ती मिळविण्यासाठी वाट पाहण्याची जरुरी राहत नाही.

जीवाला जडदेहाशी संलग्न करून टाकणाऱ्या श्वास-उच्छ्वासरूपी रज्जूस तोडून टाकून या क्रियेने आयुष्य वाढते आणि साधकाची जाणीव परमात्मस्वरूप समजण्याकरिता व्यापक होते. मन व जडदेहात जखडलेली इंद्रिये यांच्यामध्ये चालत असलेला हा विग्रह योगतंत्र थांबवते आणि साधकास शाश्वत सुखाचा पुनरपि लाभ मिळवून देते आणि मग त्याला ज्ञान होते की, त्याचे खरे अस्तित्व हे देहाच्या पिंजऱ्यात किंवा श्वास-उच्छ्वासांत कोंडलेले नाही. हवा ही मानवी जीवनाची अगदी पहिली अशी प्राथमिक गरज. मर्त्य मनुष्य त्या हवेचा श्वास-उच्छ्वासरूपाने गुलाम झालेला आहे.

अशा तऱ्हेने शरीर व मन ह्यांवर स्वामित्व मिळवून क्रियायोगी आपला शेवटला शत्रू जो मृत्यू त्यावर विजय मिळवितो. [13]

मृत्यूवरती जगुनी रहा तू, मनुजां जो ग्रासितो।
मृत्यू मेला एकवार की, मरणे मग ते कुठे राहते।। [14]

मन आणि इंद्रिये यांस प्राणशक्तीने एकत्र बांधून टाकलेली आहेत. अंतर्निरीक्षण व मौन यांच्या द्वारा त्यांना जबरदस्तीने अलग करणे, हे अशास्त्रीय आहे. मन जेव्हा चिंतन करीत असते तेव्हा ते परमात्मस्वरूपात परत जाण्याचा प्रयत्न करीत असते. त्या मनाला इंद्रिये आपल्या प्रभावाने शरीराकडे, परत पाठीमागे सतत खेचीत असतात. क्रियासाधना, जिच्यामध्ये जीवनशक्ती मार्फत मनाला प्रत्यक्ष रीतीने काबूत आणले जाते, ही परमतत्त्वाकडे पोचण्याचा सोपा, सगळ्यात परिणामकारक व सगळ्यांत शास्त्रशुद्ध मार्ग आहे. परमतत्त्वाकडे जाणारे इतर सावकाशीचे विहित मार्ग आहेत. त्यांना जर मंदगतीने व अनिश्चितपणे चालणाऱ्या गाडीची उपमा दिली तर क्रियायोगास एखाद्या हवाई जहाजाची समर्पक उपमा द्यावी लागेल.

योगशास्त्राची उभारणी धारणा व ध्यान यांच्या अभ्यासाच्या सर्व पद्धतींचा अनुभव घेऊन विचारान्ती केलेली आहे. योगाभ्यासामुळे दृष्टी, श्रवण, वास, चव आणि स्पर्श यांच्या इंद्रियांपासून प्राणशक्तीला आपल्या इच्छेनुसार साधक वाटेल तेव्हा बाहेर खेचू शकतो. आणि अशा तऱ्हेने ज्ञानेंद्रियांपासून आपली जाणीव, संवित् अलग केल्यावर तो आपले चित्त इच्छेनुसार पारलौकिक किंवा ऐहिक विषयांकडे वळवू शकतो. त्यास आडदांड मनोविकार व

अस्वस्थ विचार यांनी भरलेल्या ऐहिक क्षेत्रांकडे प्राणशक्ती, त्याच्या मनाविरुद्ध परत आणू शकत नाही.

पुष्कळच प्रगती केलेल्या क्रियायोग्याच्या जीवनक्रमावर गतकालातील कर्मांचा काही परिणाम होत नाही. आत्माच फक्त त्याला मार्गदर्शन करीत असतो. क्रियायोगाच्या अभ्यासूला हा सामान्य जीवनाचा अहंकारयुक्त व चांगल्या आणि वाईट कर्मांबरोबर मंदगतीचा टप्प्याटप्प्याने उन्नत होत जाणारा मार्ग टाळता येतो. गरुडाची झेप घेणाऱ्याला गोगलगाईचा कंटाळवाणा नि सावकाशीचा वेग कसा परवडणार?

आत्मोन्नतीच्या ह्या उच्च प्रतीच्या साधनेने योगी अहंकाराच्या बेडीतून मुक्त होतो आणि तो सर्वव्यापकतेच्या खुल्या हवेचा आस्वाद घेतो. याच्या उलट सामान्य माणसाच्या जीवनाची गती गुलामगिरीची असून त्याला आयुष्यात हानिकारक असे अपमान, अवहेलना सहन कराव्या लागतात. उत्क्रांतीच्या नैसर्गिक टप्प्याटप्प्यांच्या अवस्थांतून तो यथाकाल, यथाक्रमच उन्नत होत जातो. निसर्गाकडून त्यास द्रुतगतीच्या काही सवलती मिळत नाहीत. जरी तो शरीर आणि मन यांच्या नियमनाचे काटेतोलपणे पालन करीत राहिला, तरी त्याला अनेक निरनिराळे मुखवटे धारण करणारे जन्म घ्यावे लागतात व असे जन्म घेत घेत त्यास अंतिम मुक्ती मिळविण्यास दशलक्ष वर्षे लागतात.

योग्याच्या ह्या दुर्बिणीच्या पद्धतींची ज्यांच्या द्वारे स्वतःला शरीर व मन यांच्या ह्या संलग्नावस्थेतून मोकळे करता येते व आपले खरे जीवन यांव्यतिरिक्त आहे हे जाणून घेता येते. अशा साधकांना शिफारस करण्यात येते की, ज्यांना हजारो वर्षे उत्क्रांतावस्थेत खितपत पडावयाचे नाही. जो सर्वसाधारण मनुष्य आपल्या स्वतःच्या विवेकबुद्धीच्याच केवळ विरुद्ध नव्हे, तर निसर्गनियमांच्याही विरुद्ध आचरण करतो व अनैसर्गिक गुंतागुंतीच्या मार्गाचा अवलंब करून आपले विचार व विकार मोहाच्या ताब्यात देऊन निसर्गास दुखवितो, अशा मनुष्याला तर मुक्ती मिळविण्यासाठी वीस लक्ष वर्षेही पुरणार नाहीत.

स्थूल मानव क्वचितच अनुभवतो की, त्याचे शरीर एक साम्राज्य आहे, ज्याच्याबर बुद्धीच्या सिंहासनावर आरुढ आत्मा रूपी सम्राट, मेरुदंडातील सहा चक्रे किंवा चैतन्यकेंद्रांच्या राजप्रतिनिधिंच्या साहाय्याने शासन करतो.

ह्या ईश्वरसत्ताक एकछत्री राज्यामध्ये असंख्य आज्ञाधारक सेवक असतात त्यांमध्ये सत्तावीस सहस्र-अब्ज पेशींचा व पाच कोटी खालच्या थरातील विचारांचा व भावनांचा आणि माणसाच्या सरासरी साठ वर्षांच्या आयुष्यातील आलटून पालटून येणाऱ्या अवस्थांचा समावेश होतो. ह्या सत्तावीस सहस्रअब्ज पेशींना निःसंशयपणे स्वयंचलित प्रज्ञा-बुद्धी दिलेली असते व त्याकरवी या पेशी शरीरात वाढ, फरक व विसर्जन यांची सर्व कार्ये करीत असतात.

मनुष्याच्या शरीरात किंवा मनात ह्या सम्राटरूपी आत्म्याची थोडी जरी अवज्ञा झाली तरी त्याचे पर्यवसान शरीरात रोग किंवा मनामध्ये विकृती होण्यात होते. ही अवज्ञा, जी ह्या शरीराच्या नम्र प्रजाजनांकडून होते ती काही राजनिष्ठेच्या अभावापासून होत नसून, तिचा उद्भव हा माणसाचे व्यक्तित्व व स्वतंत्र बुद्धी यांच्या पूर्वी झालेल्या व चालू राहत असलेल्या दुरुपयोगापासून होत असतो. ही स्वतंत्र बुद्धी, हे व्यक्तित्व मनुष्याला परमेश्वराने त्याच्या आत्म्याबरोबरच प्रदान केलेले असते व ते त्याच्यापासून कधीही परत घेतले जात नाही.


मनुष्य आपल्या निरर्थक अहंकारामध्ये फार समरस होतो. त्याचमुळे तो 'मी विचार करतो, मी कार्य करतो, मलाच वाटते, अन्नाचे पचन मीच करतो, मीच स्वतःला जिवंत ठेवतो,' अशी अहंभावना सतत मनात ठेवतो. त्याने थोडा जरी विचार केला तरी त्याला असे समजून येईल की, नेहमीच्या दैनंदिन जीवनात मनुष्य स्वतः स्वतंत्र असे काहीच करीत नाही. मनुष्य जे काही करीत असतो त्या सर्व कृतींमध्ये तो स्वतंत्र बुद्धीने काही करीत नसून, ज्याप्रमाणे त्यास आज्ञा होईल त्या आज्ञेप्रमाणे तो सारी कामे पूर्वकर्म, निसर्ग व सभोवतालची परिस्थिती जसे सांगतील त्याप्रमाणे एखाद्या सांगकाम्याप्रमाणे करीत असतो. प्रत्येक मनुष्याच्या बौद्धिक प्रतिक्रिया, भावना, मनःस्थिती आणि सवयी ह्या त्याच्या पूर्वजन्मीच्या किंवा चालू जन्मातील कार्यकारणसंबंधामुळे निश्चित केल्या जातात. ह्या सर्व कार्यकारणसंबंधांपलीकडे, वरती, हा राजन्य आत्मा राज्य करीत असतो. किंचित्काल खऱ्या वाटणाऱ्या गोष्टींचा अव्हेर करून, स्वतंत्र बेलगामी विचारांना फाटा देऊन, क्रियायोगी ह्या सर्व भ्रममूलक मायाजालातून बाहेर पडतो आणि अनिर्बंध अशा परमतत्त्वाप्रत जातो. जगातील सर्व धर्मग्रंथ, शास्त्रे असेच प्रतिपादन करीत असतात की, मनुष्य म्हणजे काही दूषित होणारे शरीर नव्हे, तर तो जिवंत आत्मा आहे; आणि क्रियायोगाच्या मार्गाने त्यास ह्या आध्यात्मिक सत्याची प्रचीती करून घेता येते.

"बाह्य कर्मकांडाच्या अवडंबराने अज्ञानाचा नाश होत नाही; कारण हे दोन्ही एकमेकांशी विसंगत किंवा विरोधक नाहीत." शंकराचार्यांनी आपल्या 'शतश्लोकी'त म्हण्टले आहे: "अनुभूतींच्या ज्ञानानेच अज्ञानाचा क्षय होतो. ज्ञान हे जिज्ञासेखेरीज, शोध घेतल्याखेरीज प्राप्त होत नाही. 'मी कोण,' 'हे विश्व कसे निर्माण झाले,' 'ह्याचा कर्ता कोण,' 'ह्याचे भौतिक निमित्तकारण काय,' अशा तऱ्हेची जिज्ञासा, चौकशीची भूमिका हवी." ह्या प्रश्नांची उत्तरे केवळ बुद्धिवाद देऊ शकत नाही म्हणून प्राचीन ऋषि-मुनींनी आध्यात्मिक संशोधनाचे एक तांत्रिक शास्त्र निर्माण केले व त्यास योगशास्त्र हे नाव दिले.

खरा योगी हा शारीरिक वासनांशी मिथ्यारूपाने निगडित होणारे आपले विचार, आपल्या इच्छा, भावना पाठीमागे खेचून घेतो व आपले मन, चित्त मेरुदंडातील चक्रामध्ये वास करीत असलेल्या अतींद्रिय शक्तींशी युक्त करून, परमेश्वराने ज्या स्वरूपात हे जग निर्माण केले त्या स्वरूपाच्या जगात राहतो. गतकालात संस्कारांमुळे उत्पन्न झालेल्या प्रवृत्तींनी किंवा माणसाच्या निर्बुद्धपणाच्या द्योतक अशा नवीन नवीन कार्यास प्रवृत्त करणाऱ्या कल्पनांनी तो उद्युक्त केला जात नाही. आपली परमोच्च आकांक्षा सफल झाल्यावर तो अक्षय परमानंदमय तत्त्वाच्या अंतिम लोकामध्ये सुरक्षित राहतो.

योग हे खात्रीचे व नियमबद्धतेमुळे फलदायी होणारे असे शास्त्र आहे. त्या संदर्भाने योगशास्त्र व तंत्रपारंगत अशा योगीजनांची भगवान श्रीकृष्ण पुढील शब्दांत स्तुती करतात: "तप करणाऱ्या तपस्व्याहून योगी अधिक उच्च आहे; तो ज्ञानी जनांहूनही अधिक श्रेष्ठ मानलेला आहे. योगी हा कर्मकांडाहूनही श्रेष्ठ होय. म्हणून, हे अर्जुना, तू योगी हो!" 15

क्रियायोगाचे भगवद्‌गीतेत जागोजाग 'हुताग्नी' म्हणून स्तुतिपर वर्णन केलेले आहे. योगी आपल्या देहधर्मीय वासना, आकांक्षा यांची एका एकेश्वररूपी अग्नीमध्ये आहुती टाकतो आणि ती आहुती अद्वितीय अशा परमेश्वरास अर्पण करतो. हा खरोखरी एक तऱ्हेचा यौगिक यज्ञच होय. या यज्ञामध्ये गत व विद्यमान कालातील वासनांचा, इंधन म्हणून, ईश्वरीप्रेमाच्या अग्नीमध्ये होम केला जातो. आणि मग अंतिम ज्योतीत मानवाचा हा सारा मूर्खपणा अर्पण केला जातो आणि मानव अकल्मष (दोषरहित) बनून जातो. रूपकाच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे अस्थीवरून वासनारूप मांस निघून जाऊन कर्मांचा सांगाडा बोधरूपी जंतुघ्न सूर्यप्रकाशात अगदी सफेत धुऊन निघतो. आणि मग तो मनुष्य व विधाता या दोघांपुढे निर्दोष, निरपराध असा उभा राहतो व शेवटी निरंजन अवधूत होऊन जातो.



*समाधी मध्ये एक पाश्चिमात्य*
*राजर्षि जनकानंद (जेम्स जे. लिन्न)*

*एन्सिनिटास, कॅलिफोर्निया येथील एका खाजगी समुद्रतटावर, जानेवारी, 1937 मध्ये.पांच वर्षे दररोजच्या क्रियायोगच्या अभ्यासानंतर श्री लिन्न यांना समाधीमध्ये (उच्च जाणीवेत) भगवत-दर्शनः अंतरित-निवासित वैभवरूपी अनंत ईश्वराची प्राप्ती झाली.*

*"श्री लिन्न यांचे संतुलित जीवन सर्वांसाठी प्रेरणादायक ठरू शकेल," योगानंद म्हणाले होते. सद्सद्विवेकबुद्धीने त्यांच्या भौतिक जीवनाची कर्तव्ये पार पाडत असतांना सुद्धा ईश्वरावर गाढ ध्यान करण्यासाठी ते रोज वेळ काढत असत. यशस्वी व्यावसायिक*

*एक प्रबुद्ध क्रियायोगी बनले.*

*परमहंस योगानंद अधिकदा प्रेमाने त्यांचा "संत लिन्न" असा उल्लेख करत असत आणि 1951 मध्ये त्यांना "राजर्षि जनकानंद" (प्राचीन कालीन भारतातील आध्यात्मिक तेजप्रबुद्ध राजा जनक यांच्या नावावरून) हे आश्रमवासी नाव प्रदान केले. राजर्षि, शब्दश: अर्थाने "राज ऋषि".*

1 श्री श्री परमहंस योगानंदांनी त्यांच्या नंतर होणारे त्यांच्या संस्थेचे (योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप) अध्यक्ष आणि आध्यात्मिक प्रमुख ह्यांना योग्य साधकांस क्रिया योगाची दीक्षा देण्यासाठी किंवा योगदा सत्संग सोसायटी च्या स्वामीं पैकी कुणाला ह्या कार्यासाठी नेमून देण्याचे अधिकार दिले आहेत. त्यांनी आपल्या योगदा सत्संग पाठांकरवी क्रियायोगाचा शाश्वत प्रसार पण निश्चित करुन दिला आहे. हे पाठ योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया कडे उपलब्ध आहेत.

2 भगवद्गीता, अ. ४, श्लोक २९.

3 भगवदगीता, अ. ५, श्लोक २७-२८.

4 तोच संदर्भ, अ. ४, श्लोक १-२.

5 इतिहासपूर्वकाळातील मानवधर्मसूत्रांचा किंवा मनुस्मृतीचा कर्ता. ह्या स्मृतीमधील निर्देशिलेले विधी, नियम अजूनपर्यंत भारतात पाळले जातात.

6 हिंदू धर्मशास्त्रातील गणिताप्रमाणे ह्या जडवादी युगाची सुरुवात ख्रिस्तपूर्व ३१०२ या वर्षी झाली. ह्याच वर्षी विषुवचक्राचे (Equinoctial cycle) अवरोही द्वापरयुग सुरु झाले. आणि त्याच वर्षी वैश्विक चक्राच्या (Universal cycle) कलियुगास सुरुवात झाली. बहुतेक मानववंशशास्त्रज्ञ असे समजतात की, १०,००० वर्षांपूर्वी अश्मयुगात मनुष्यप्राणी हा अत्यंत रानटी अवस्थेत राहत होता आणि लेमुरिया, अटलांटिस, भारत, चीन, जपान, इजिप्त, मेक्सिको आणि इतर पुष्कळसे देश यांमध्ये भरभराटीला आलेल्या प्राचीन संस्कृतीची लोकविश्रुत अशी परंपरा केवळ कल्पित आहे, म्हणून, ते त्या संस्कृतींची दखल घेत नाहीत.

7 योगसूत्रे II:१ क्रियायोग ह्या संज्ञेचा उपयोग करताना पातंजली एकतर बाबाजींनी पुढील काळात उपदेशिलेल्या क्रियायोगाचा संदर्भ देत असावेत किंवा तत्सदृश दुसऱ्या कोणत्या तरी तंत्राचा संदर्भ देत असावेत. पण काही झाले तरी पातंजलींनी जीवनशक्तीच्या निरोधाच्या एका विशिष्ट तंत्राचा निर्देश केलेला असावा, हे त्यांच्या योगसूत्रांमधील सूत्र II:४९ यामधून दिसून येते.

8 तोच संदर्भ, I:२७.

9 "ह्या गोष्टी असे सांगतात की, आमेन, हा विश्वसनीय आणि खरा साक्षी शब्द, परमेश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीच्या प्रारंभी होता" —रेव्हेलेशन ३:१४ (बायबल).

"सुरुवातीला शब्द झाला आणि तो शब्द ईश्वराने उच्चारला; आणि तो शब्द म्हणजे खुद्द ईश्वर … सगळ्या वस्तू त्याने निर्माण केल्या (शब्द किंवा ॐ); आणि जे निर्माण केले गेले ते त्याच्या विरहित असे निर्मिले गेले नाही." —जॉन I:१-३ (बायबल). वेदांमधील ॐ हाच शब्द तिबेटी योग्यांनी हुम या पवित्र शब्दाने व्यक्त केला. मुसलमानधर्मीय त्याच अर्थाने अमीन हा शब्द उच्चारतात. प्राचीन मिसरमधील लोक, ग्रीक, रोमन, यहुदी व ख्रिश्चन हे आमेन या शब्दाचा उच्चार याच अर्थाने करतात. हिब्रू भाषेमध्ये त्याचा अर्थ 'खात्रीचा, विश्वासू' असा आहे.

10 योगसूत्रे II:४९.

11 कॉरिन्थिअन्स १५:३१ (बायबल).

12 'विकल्प' ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ 'फरक, भेदभाव,' एकरूपत्व न भासणे असा आहे. सविकल्प समाधी म्हणजे ज्या समाधीच्या अवस्थेमध्ये मनात विकल्प, भिन्नभाव हा राहतो. निर्विकल्प समाधीमध्ये मनात कोणत्याही तऱ्हेचा विकल्प, भिन्नभाव राहत नाही. म्हणजे सविकल्प समाधीमध्ये साधकास अजूनही आपण ईश्वरापासून वेगळे आहोत, ही भावना राहते. निर्विकल्प समाधीमध्ये परमात्मस्वरूपात पूर्ण संलग्न झाल्याचा, युत झाल्याचा साधकास अनुभव येतो.

13 "शेवटला शत्रू जो मारला जाईल तो म्हणजे मृत्यू" —कॉरिंथिअन्स १५:२६ (बायबल). परमहंस योगानंदांचे शरीर त्यांच्या मरणानंतर तसेच अबाधित राहिले त्यावर पंचमहाभूतांचा परिणाम झाला नाही. यावरून ते पूर्णत्वास पोचलेले क्रियायोगी होते, हे स्पष्ट दिसून आले. तथापि सगळ्याच सिद्धयोग्यांची शरीरे मरणानंतर अबाधित राहत नाहीत. (पहा पृ. ४३१) हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे असे चमत्कार काही विशिष्ट हेतूनेच घडून येतात. परमहंसजींच्या बाबतीत तो विशिष्ट हेतू म्हणजे पाश्चिमात्य जगाला योगाचे महत्त्व पटवून देणे, निःसंशयपणे हाच होता. योगानंदांना बाबाजी आणि श्रीयुक्तेश्वरजींनी पाश्चात्य जगाच्या सेवेचे आदेश दिले होते. परमहंसजींनी आपल्या जीवनात व मरणोत्तरही त्या आदेशांचे पालन केले. (प्रकाशकांची टीप)

14 शेक्सपिअर, सॉनेट १४६.
15 तपस्विभ्योऽधिकोयोगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ।।
भगवद्गीता अ. ६ श्लो. ४६

श्वसनक्रिया थांबवून (कुंभक-प्राणायाम सिद्ध करून) शरीर व मन यांवर उपचार व इंद्रियव्यापारांचे पुनरुज्जीवन घडवून आणण्याच्या दृष्टीने जे विलक्षण परिणाम घडून येतात, त्याचे शोध लावण्यास आधुनिक भौतिक शास्त्रज्ञांनी सुरुवात केली आहे. न्यूयॉर्कमधील कॉलेज ऑफ फिझिशिअन्स अँड सर्जन्सचे डॉ. ॲलवन एल. बरॅक यांनी क्षयरोगावर—फुफ्फुसांवर तेवढ्याच भागावरती करावयाची अशी उपचारपद्धती शोधून काढली आहे. या उपचारांनी क्षयरोगाच्या पुष्कळशा रोग्यांस बरे केलेले आहे. ही उपचारपद्धती अशी: कोठींमध्ये (Chambers) वेगवेगळ्या ठिकाणी हवा ठेवून तिचा दाब सम करून रोग्यास आपला श्वासोच्छ्वास थांबविता येतो. डॉ. बरॅक यांच्या ह्या संशोधनाचे ‘दि न्यूयॉर्क टाइम्स’ या पत्राच्या १ फेब्रुवारी १९४७च्या अंकात खालीलप्रमाणे वर्णन आले आहे: “मध्यवर्ती मज्जासंस्थेवर श्वासोच्छ्वास थांबविण्याने पुष्कळच परिणाम झालेला आढळून येतो. अवयवांच्या टोकांकडील ऐच्छिक स्नायूंची चलनवलनाची नैसर्गिक प्रवृत्ती नजरेत भरेल अशी कमी होते. कोठीमध्ये आजारी मनुष्य तास न् तास नुसता पडून राहतो. त्याच्या बोटांची हालचाल होत नाही की तो एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर होत नाही. दररोज सिगारेटची दोन-दोन पाकिटे फस्त करणाऱ्या रुग्णांना ऐच्छिक श्वसनक्रिया स्थगित झाल्यावर सिगरेट ओढण्याची वासनाच होत नाही. काही काही प्रयोगांत तर असे आढळून आले की, रुग्णास विश्रांती एवढ्या प्रमाणात मिळते की, त्याला करमणुकीची अशी जरूरच राहत नाही.” १९५१ साली डॉ. बरॅक यांनी या उपचारपद्धतिनुसार केलेल्या उपचारांनी किती समाधानकारक परिणाम घडून आलेला आहे, याचे जाहीररीत्या निवेदन केले. ते म्हणाले, ‘केवळ फुफ्फुसांनाच विश्रांती मिळते असे नव्हे तर, तर सर्व शरीराला, किंबहुना मनाला सुद्धा विश्रांती मिळते. हृदयाचे उदाहरण घ्या. हृदयाची क्रिया पुर्वीच्या एकतृतीयांश हिश्श्याने कमी होते. आमचे रुग्ण कोणत्याही गोष्टीची चिंता करण्याचे सोडून देतात आणि कोणाला कंटाळवाणेही वाटत नाही.’”

ह्या हकीकतींवरून योगी दीर्घकालपर्यंत निःस्तब्ध, निवांत, गडबड न करता कसे बसतात हे कोणाच्याही ध्यानात येईल. गडबड करण्यासाठी त्यांना कोणत्याही तऱ्हेचे निकडीचे शारीरिक किंवा मानसिक कामही नसते. अशा तऱ्हेच्या निःस्तब्ध शांततेने आत्म्याला परमात्म्याकडे परत जाण्याचा मार्ग सापडतो. अशा तऱ्हेचा निःश्वसनाचा लाभ प्राप्त करून घेण्याकरिता सामान्य माणसांना जरी समान दाब ठेवण्याच्या कोठीमध्ये (Equalizing pressure Chamber) राहावे लागले, तरी योग्यास तशी काही आवश्यकता नसते. शरीर व मन यांसंबंधीची पूर्णता आणि आत्म्याची जाणीव ठेवण्यास्तव योग्याला क्रियायोगसाधनेच्या शास्त्राखेरीज दुसऱ्या कशाचीही आवश्यकता राहत नाही.

प्रकरण - २७

# 27. रांची येथे योगविद्यालयाची स्थापना

“संस्था चालविण्याचे काम तुला का आवडत नाही?”

गुरुजींच्या या प्रश्नाने मला थोडे घाबरवून टाकले. आता हे खरे की, संस्था चालविण्याचे काम करावयाचे म्हणजे आपण होऊन मधमाश्यांच्या पोळ्यातून मधमाशा उठविण्यापैकीच होय, असे माझे स्वतःचे मत होते.

“गुरुजी, हे काम म्हणजे कोणाचा भलेपणा मिळायलाच नको,” मी उत्तर दिले, “पुढारी काही करो की न करो; त्याच्यावर टीका ही व्हावयाचीच.”

“दिव्य स्वरूपाची ही दुधाची मलई तुला आपल्या एकट्यालाच ठेवून घ्यायला पाहिजे होय?” गुरुजींनी मला टोमणा दिला व एक कटाक्ष माझ्याकडे फेकला, “जर उदारमनस्क गुरूंच्या परंपरेने आपले स्वतःचे ज्ञान दुसऱ्यांना देण्याचे खुशीने ठरविले नसते, तर योगसाधनेच्या द्वारे तुला काय किंवा दुसऱ्या कोणाला काय आत्मसाक्षात्कार करून घेता आला असता काय?” ते पुढे म्हणाले, “परमेश्वर म्हणजे मध आहे. संस्था म्हणजे मधाची पोळी आहेत. दोन्हीही गोष्टींची जरुरी आहे. अर्थात आत्मतत्त्वाखेरीज नुसत्या बाह्य आकाराला काही किंमत नाही; पण आध्यात्मिक अमृताने पुरेपूर भरलेली अशी मधाची पोळी तू का उभारत नाहीस?”

त्यांच्या ह्या सल्ल्याने मला विचार करायला लावले. अर्थात बाह्यात्कारी मी काही उत्तर दिले नाही; पण, एक दृढ निश्चय माझ्या हृदयात जोर धरू लागला. गुरुजींच्या पायांशी ज्या अचल सत्याचे मला दर्शन घडून आले, त्याविषयीचे ज्ञान, माझ्याकडून जेवढे होईल तेवढे, माझ्या इतर बांधवांना मी का देऊ नये! “परमेश्वरा,” मी प्रार्थना करू लागलो, “माझ्या भक्तिमंदिरामध्ये तुझ्या प्रेमाचा प्रकाश सदैव प्रज्वलित राहो आणि सगळ्यांच्या अंतःकरणांमध्ये तुझ्याविषयीचे प्रेम जागृत करण्याकरिता तू मला समर्थ कर.”

मी संन्यास घेण्यापूर्वी एकदा श्रीयुक्तेश्वरांनी अनपेक्षित असे उद्गार काढले होते.

“तुझ्या उतार वयात पत्नीच्या सहवासाला तू किती बरे मुकशील?” ते म्हणाले होते, “गृहस्थी मनुष्य जो आपल्या बायकोचा व मुलांचा निर्वाह चालविण्यात मग्न असतो तोही ईश्वराच्या दृष्टीने त्याच्या कृपाप्रसादाला पात्र होत नाही काय?”

“गुरुजी,” मी घाबरून त्यांना विरोध दर्शविला, “आपण जाणताच की, विश्वस्वरूपाच्या प्रियेची प्राप्ती करून घेणे एवढीच ह्या आयुष्यातील माझी इच्छा आहे.”

गुरुजी अगदी मनापासून हसले आणि त्यामुळे मी समजलो की, त्यांनी हे उद्गार माझी परीक्षा घेण्याकरिताच काढले होते.

“ध्यानात ठेव,” ते सावकाशपणे म्हणाले, “जो स्वतःची कौटुंबिक कर्तव्ये टाकून देतो त्यास एका विशाल कुटुंबाच्या कोणत्या तरी प्रकारच्या जबाबदारीचे काम घेऊन आपल्या वागण्याचे समर्थन करावे लागते.”

तरुण पिढीला योग्य शिक्षण पुरविण्याचे ध्येय, हे माझ्या फार आवडीचे असे काम होते. सामान्य पद्धतीच्या शिक्षणामुळे शरीराची व बुद्धीचीच वाढ होते आणि त्याचे शुष्क परिणाम मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहतच होतो. नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना केल्याखेरीज कोणाही मनुष्यास सुखाचा लाभ होणार नाही. आणि ह्या मूल्यांचा हल्लीच्या सर्वसाधारण अभ्यासक्रमात समावेश होत नाही. तेव्हा तरुण मुलांचा सर्वांगीण विकास होऊन त्यांच्यामध्ये पूर्ण विकसित असे मनुष्यत्व निर्माण व्हावे, या उद्देशाने मी एक शाळा काढावयाचे ठरविले; आणि त्या दिशेने मी प्रारंभ केला. प्रथम बंगालमधील दीहिका नावाच्या एका लहान गावामध्ये मी सात मुलांना घेऊन शाळा चालवायला सुरुवात केली.

एक वर्षानंतर, १९१८ मध्ये कासिमबझारचे महाराजसाहेब सर मणींद्रचंद्र नंदी यांच्या दातृत्वाचे फल म्हणून फार जलदपणे वृद्धिंगत होणारा हा माझ्या शाळेचा पसारा मी रांचीला हलवू शकलो. बिहारमधील हे शहर कलकत्त्याहून सुमारे दोनशे मैल अंतरावर असून, ह्या ठिकाणचे हवामान हिंदुस्थानातील अत्युत्कृष्ट व आरोग्यकारक अशा हवामानांपैकी आहे. रांचीमधील कासिमबझार वाडा ही ह्या नवीन शाळेची मुख्य इमारत झाली. ह्या नवीन शाळेला मी 'योगदा सत्संग ब्रह्मचर्य विद्यालय' [1] असे नाव दिले.

व्याकरण व हायस्कूलचा अभ्यास या दोन्हींचा समावेश करून, मी एक अभ्यासक्रमाचा आराखडा तयार केला. ह्या आराखड्यामध्ये शेतकीविषयक, औद्योगिक, वाणिज्य व निव्वळ शैक्षणिक विषयांचा समावेश केला. ऋषिप्रणीत शैक्षणिक ध्येयास अनुसरून (ज्यांचे विद्यादान करण्याचे आश्रम वनांत असत, तेथे ते कुमारांना व्यावहारिक व धार्मिक शिक्षण देत.) बहुतेक विषयांचे शिक्षण मोकळ्या उघड्या जागेत द्यावयाचे ठरविले.

रांचीस विद्यार्थ्यांस योगध्यानाचे शिक्षण दिले जाते. आरोग्य व शारीरिक विकास साधण्याच्या दृष्टीने १९१६ मध्ये मी 'योगदा' नावाची एक पद्धती शोधून काढली होती, तिची तत्त्वे शिकविली जातात.

मनुष्याचे शरीर ही एक विजेची बॅटरी आहे, असे समजून मी असा युक्तिवाद केला की, ती बॅटरी मनुष्याच्या इच्छाशक्तीच्या सरळ साहाय्याने पुनः शक्तीने संचारित करता येईल. ज्या अर्थी इच्छेखेरीज कोणत्याही प्रकारची कृती होऊ शकत नाही, त्या अर्थी मनुष्याने ह्या इच्छाशक्तीच—ह्या मूलभूत आयुधाचा—असा उपयोग करून घेतला पाहिजे की, ज्यायोगे त्याच्या ताकदीचे, काही एक त्रासदायक उपकरणांखेरीज किंवा यांत्रिक कसरतीखेरीज, पुनरुज्जीवन व्हावे. साध्यासुध्या अशा 'योगदा' तंत्राचा अवलंब करून कोणालाही जाणतेपणे व ताबडतोब आपली प्राणशक्ती (की जी मेरुदंडशीर्षामध्ये—Medula oblongata मध्ये केंद्रित असते) विश्वशक्तीच्या अमर्याद कोठारातून पुनरपि प्राप्त करून घेता येते.

रांचीच्या विद्यार्थ्यांनी 'योगदा' तंत्राच्या शिक्षणास चांगलीच साथ दिली. शरीराच्या एका भागापासून दुसऱ्या भागाकडे प्राणशक्ती वळवून नेण्याची व विकट अशा योगासनांमध्ये बिनचूकपणे आसन स्थिर करण्याची विलक्षण अशी पात्रता विद्यार्थ्यांनी साध्य केली. ताकदवान अशा मोठ्या माणसांना जे करून दाखविता येणार नाहीत असे शक्तीचे व सहनशीलतेचे प्रयोग व कसरती ते विद्यार्थी करू लागले.

माझा सर्वात धाकटा भाऊ विष्णूचरण घोष [2] याने रांचीच्या शाळेत नाव घातले. तो पुढे विख्यात व्यायामपटू झाला. तो व त्याचा एक विद्यार्थी अशा दोघांनी १९३८-३९ मध्ये पश्चिमेकडे प्रवास केला व तेथे जागोजाग शक्तीचे व स्नायुनियंत्रणाचे प्रयोग करून दाखविले. न्यूयॉर्कमधील कोलंबिया विश्वविद्यालयातील प्रोफेसरमंडळी व अमेरिका आणि यूरोपमधील पुष्कळ दुसऱ्या विश्वविद्यालयांतील लोक यांना, शरीरावर मनाचे प्रभुत्व दर्शविणाऱ्या ह्या प्रयोगांनी आश्चर्याने थक्क करून सोडले.

रांचीमध्ये शाळा स्थापन केल्यापासून, पहिल्याच वर्षाच्या अखेरीस प्रवेश मिळविण्यासाठी दोन हजारांपर्यंत अर्ज येऊन ठेपले. पण शाळा त्या वेळी फक्त वसतिगृहापुरतीच होती आणि त्यामुळे फक्त शंभरच विद्यार्थी घेता येत होते. त्यानंतर फक्त दिवसाच येणाऱ्या विद्यांर्थ्यांनाही आम्ही शाळेत दाखल करून घेऊ लागलो.

विद्यालयामध्ये मुलांच्या दृष्टीने मला दोन्हीही भूमिका—पित्याच्या व मातेच्या—अशा पार पाडाव्या लागल्या, व संस्था चालविताना अनेक अडचणींशी सामना करावा लागला. पण मला येशू ख्रिस्ताच्या खालील वचनांची नेहमी आठवण होत असे; “असा कोणीही मनुष्य नाही की, ज्याने आपले घर-दार, अथवा भाऊ, अथवा बहिणी, अथवा वडील, अथवा आई, अथवा बायको वा मुले, अथवा शेतवाडी माझ्याकरिता व शास्त्रातील उपदेशाखातर सोडले; पण त्याला ह्याच जन्मी शतपट घरेदारे, आणि भाऊ, आणि बहिणी, आणि आया आणि मुले आणि जमिनी मिळाल्या नाहीत आणि समाजाचा छळ सोसावा लागला नाही, आणि इतउत्तरच्या जगात शाश्वत जीवनाचा लाभ मिळाला नाही.” [3]

श्रीयुक्तेश्वरांनी ह्या सुक्तिवचनाचा असा अर्थ लाविला: “जो साधक लग्न व संसार रूढ पद्धतीने करण्याचे सोडून देतो व त्यापेक्षाही अधिक अशा जबाबदाऱ्या—व्यापक अशा समाजाच्या (“ह्या जन्मीची शतपट घरे-दारे, भाऊ”) पत्करण्याकरिता कार्य करतो; त्याला दुनियेकरवी छळ सहन करावा लागतो; कारण दुनिया त्याच्याबद्दल चुकीचा समज करून घेते व तिला त्याच्या कार्याचे महत्त्व समजत नाही. पण अशा तऱ्हेने व्यापक क्षेत्रात काम करून अगदी दूरदूरच्याही लोकांच्या हितसंबंधांत समरस झाल्याने त्याच्या जन्मजात स्वार्थदृष्टीचा पूर्ण लोप होतो व त्याच्यावर परमेश्वराचा अनुग्रह होतो.”

एके दिवशी माझे वडील रांचीला आले. ते पितृत्वाचे आशीर्वाद द्यावयास आले होते. बंगाल-नागपूर रेलवेमध्ये त्यांनी मला अधिकाराची नोकरी आणली होती व ती नाकारून मी त्यांना दुखविले होते; त्यामुळे ह्या आशीर्वादाचे प्रदान बरेच दिवस लांबले होते.

“मुला,” ते म्हणाले, “आयुष्याचे ध्येय म्हणून जो मार्ग तू पसंत केला आहेस, त्याच्याविरुद्ध आता मी नाही. तुला ह्या सुखी, उत्सुक बाळगोपाळांमध्ये पाहून मला फार आनंद होतो. तुझे स्थान ह्यांच्यामध्येच आहे; रेलवे टाईमटेबलांच्या त्या निर्जीव आकड्यांत नाही.” माझ्या मागे-मागे फिरत असलेल्या एक डझन लहान मुलांच्या घोळक्याकडे त्यांनी बोट दाखविले व डोळे मिचकावीत म्हणाले, “मला फक्त आठ मुले झाली; पण तुझ्या अवस्थेबद्दल मला कल्पना आहे.”

सत्तर बिघे सुपीक जमीन आमच्या ताब्यात आली होती. तेव्हा विद्यार्थी, शिक्षक व मी असे आम्ही बागकामात व इतर मोकळ्या हवेतील कामात दररोज तासन् तास वेळ घालवीत असू. आम्ही बरीच पाळीव जनावरे ठेवली होती. त्यांत एक छोटेसे हरीण होते. ते मुलांना फार आवडायचे. त्याचा त्यांना फार लळा लागला होता. मला सुद्धा ते हरीण फार आवडायचे; इतके की, त्याला माझ्या खोलीत झोपु देत असे; आणि पहाटेच्या वेळी ते लहानसे पाडस उड्या मारीत माझ्या बिछान्याजवळ यायचे व माझ्याकडून कुरवाळून घ्यायचे.

एके दिवशी रांची शहरात काही कामानिमित्त मला जावे लागले. म्हणून त्या हरणाच्या पाडसाला मी नेहमीपेक्षा जरा लवकरच खाऊ घातले; आणि त्याला मी येईतोपर्यंत कोणीही खायला घालू नये, असे मुलांना बजावून ठेवले. एका मुलाने माझी आज्ञा पाळली नाही, आणि त्या हरणाच्या पाडसाला पुष्कळसे दूध प्यायला दिले. संध्याकाळी जेव्हा मी परत आलो, तेव्हा माझ्या कानी वाईट बातमी आली: "जास्त खाऊ घातल्याने हरीण जवळ जवळ मरायला टेकले आहे."

माझ्या डोळ्यांत अश्रू आले मी त्या मरणोन्मुख झालेल्या पाडसाला मांडीवर घेतले व परमेश्वराची त्याचा जीव वाचविण्याकरिता कळवळून प्रार्थना केली. काही तासांनी त्या पाडसाने आपले डोळे उघडले व ते उठून उभे राहिले आणि अशक्तपणाने हळूहळू चालू लागले. साऱ्या शाळेत आनंदाच्या आरोळ्या उठल्या.

पण त्या रात्री मला असा एक गहन धडा मिळाला की, तो मी कधीही विसरणार नाही. मी त्या पाडसाजवळ रात्री दोन वाजेपर्यंत बसलो होतो. नंतर मला झोप लागली. ते हरीण माझ्या स्वप्नात आले आणि माझ्याशी बोलू लागले:

"तुम्ही मला रोखून धरीत आहा. मेहरबानी करून मला जाऊ द्या; मला जाऊ द्या!"

"बरेय," मी स्वप्नातच उत्तर दिले.

मी ताबडतोब उठलो आणि मोठ्याने ओरडलो, "मुलांनो, पाहा, हरीण मरत आहे!" मुले माझ्याकडे धावतच आली.

मी खोलीच्या ज्या कोपऱ्यात ते पाडस ठेवले होते, तिकडे मी धावतच गेलो. त्याने उठण्याचा एक शेवटचा प्रयत्न करून पाहिला; माझ्याकडे येण्याकरिता ते थोडे धडपडले; नंतर माझ्या पायांशी मरून पडले.

जनावरांचे प्रारब्ध ठरविणारा आणि त्या प्रारब्धाचे नियमन करणारा जो कर्मांचा कायदा आहे, त्या कायद्याप्रमाणे ह्या हरिणाचे जीवन पुरे झाले होते; आणि हरिणाहून उच्चयोनीकडे जावयास त्याची तयारी झाली होती; पण त्याच्याबद्दलच्या माझ्या तीव्र आसक्तीमुळे—की जी स्वार्थहेतुक होती हे मला पुढे कळून आले;—आणि माझ्या कळकळीच्या प्रार्थनेने मी त्याला हरिणाच्याच योनीमध्ये डांबून ठेवू पाहत होतो आणि त्या योनीतून, त्या शरीराच्या मर्यादेतून त्या हरिणाचा आत्मा सुटून जाण्यासाठी धडपडत होता. त्यामुळे त्या हरिणाच्या आत्म्याने मला स्वप्नात भेटून विनंती केली, का की माझी प्रेमळ परवानगी मिळाल्याखेरीज तो आत्मा त्या कुडीतून बाहेर पडू इच्छीत नव्हता. ते हरीण मरून पडले.

माझा शोक निमाला. परमेश्वर असे इच्छितो की त्याच्या लेकरांनी प्रत्येक वस्तुला त्याचेच अंश समजुन प्रेम करावे आणि मृत्यू म्हणजे सगळ्या गोष्टींचा शेवट आहे, असे

चुकीचे व भ्रममूलक समजून घ्यावयास नको असते, ही गोष्ट मला आता नव्यानेच कळली. अज्ञानी माणूस दुर्लंघनीय अशी मृत्यूची भिंत पाहतो; जो मृत्यू त्याच्या प्रिय मित्रांना जणू कायमचे दूर नेऊन लपवून ठेवतो. पण जो मनुष्य ज्ञानी आहे, अनासक्त आहे; जो इतर सर्वांवर ते सारे परमेश्वराचे अंश आहेत असे समजून त्यांच्यावर प्रीती करतो त्याला समजून चुकते की, मरणाचे वेळी ती प्रिय व्यक्ती फक्त त्या परमात्म्याच्या ठिकाणी थोडासा क्षणिक आनंद मिळविण्याकरिता परतली आहे.

लहान व साध्या सुरुवातीपासून रांचीची शाळा एक मोठी अशी संस्था झाली. ती संस्था आता बंगाल व बिहारमध्ये सुप्रसिद्ध आहे. ऋषींप्रणीत शैक्षणिक ध्येयानुसार शिक्षणपद्धतीचा पुरस्कार केल्यामुळे ज्या सज्जनांना संतोष झाला, अशा कित्येकांनी शाळेला देणग्या दिल्या आहेत व त्या देणग्यांतूनच शाळेचे पुष्कळसे कार्यक्रम चालू केलेले आहेत; तसेच मिदनापूर व लखनपूर येथेही शाळेच्या शाखा स्थापन झालेल्या आहेत.

आसपासच्या गोरगरीब लोकांच्या सोयीसाठी रांचीचे मुख्य कार्यालय एक दवाखाना चालवीत असते आणि औषध व वैद्यकीय सेवा विनामूल्य दिल्या जाते. खेळांच्या चढाओढीमध्ये सुद्धा विद्यालयाने चांगली प्रगती केली आहे व शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा रांचीचे पदवीधर पुढे विश्वविद्यालयामध्ये चांगले चमकलेले आहेत.

गेल्या तीस वर्षांमध्ये रांचीच्या विद्यालयाला पश्चिमेकडील व पूर्वेकडील पुष्कळशा सुप्रसिद्ध आणि विख्यात स्त्रीपुरुषांनी भेट देऊन शाळेविषयी आदर दर्शविलेला आहे. वाराणशीचे ‘द्विदेही’ संत, स्वामी प्रणवानंद १९१८ मध्ये रांचीला काही थोडे दिवस राहण्याकरिता आले होते. ज्या वेळी त्या महात्म्याने झाडाखाली भरलेल्या वर्गांचे सुंदर दृश्य पाहिले आणि संध्याकाळच्या वेळी किशोरावस्थेतील मुले ज्या वेळी तास न् तास निश्चल अशी ध्यानामध्ये बसलेली पाहिली, तेव्हा त्यांचे हृदय आनंदाने उचंबळून निघाले.

“मला फार आनंद होत आहे की, बालकां करितां योग्य तऱ्हेचे शिक्षण देण्याचे लाहिरी महाशयांचे ध्येय या शाळेने मूर्त स्वरूपात आणलेले आहे. माझ्या गुरूंचे आशीर्वाद या संस्थेला मिळोत,” ते म्हणाले.

माझ्या शेजारी एक लहान मुलगा बसला होता; त्याने धाडस करून त्या महायोग्याला एक प्रश्न विचारला.

“महाराज,” तो म्हणाला, “मी साधू होणार आहे काय? माझे आयुष्य फक्त परमेश्वराकरिताच आहे काय?”

जरी स्वामी प्रणवानंदांनी किंचितसे स्मित केले, तरी त्यांचे डोळे त्याचे भविष्य न्याहाळीत होते.

त्यांनी उत्तर दिले, “मुला, तू जेव्हा मोठा होशील, तेव्हा एक सुंदरशी वधू तुझी प्रतीक्षा करीत असेल.” (ह्या मुलाने संन्यासी होण्याचे स्वप्न कित्येक वर्षे मनात रंगविलेले होते. पण शेवटी त्याने लग्न केले.)

स्वामी प्रणवानंदांनी रांचीला भेट दिल्यानंतर काही दिवसांनी मी वडिलांच्या बरोबर कलकत्त्याला, ज्या घरी ते उतरले होते तेथे त्यांना भेटावयास गेलो. प्रणवानंदांनी कित्येक

वर्षांपूर्वी भविष्य केले होते की, 'तू आपल्या वडिलांबरोबर असा मला पुढे भेटावयाला येशील,' त्याची आठवण झाली.

जेव्हा वडील स्वामीमहाराजांच्या खोलीमध्ये शिरले, तेव्हा ते महायोगी आपल्या आसनावरून उठले व त्यांनी माझ्या वडिलांना प्रेमपूर्वक व आदरपूर्वक आलिंगन दिले.

प्रणवानंद म्हणाले, "भगवती, तू काय चालवले आहेस? तुझा मुलगा परमेश्वराकडे दौडत चालला आहे, हे तुला दिसत नाही काय?" माझ्या वडिलांच्या समोर माझी स्तुती केलेली ऐकून मला लाजल्यासारखे झाले. स्वामीमहाराज पुढे म्हणाले, "आपले पूज्य गुरू वारंवार म्हणत ते ध्यानात आण! 'बनत बनत बन जाय.' [4] तर क्रियायोग अखंडितपणे आचरीत जा व दिव्य दालनापर्यंत त्वरेने जाऊन पोच."

ज्या वेळी वाराणशीला त्यांची-माझी पहिली आश्चर्यकारक अशी भेट झाली होती, त्या वेळी त्यांची शरीरयष्टी सशक्त व चांगली होती आणि आता जरी ते अगदी ताठ बसत, तरी सुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर वार्धक्याची छटा आली होती.

"स्वामीजी," मी विचारले. त्यांच्या डोळ्यांवर मी दृष्टी लावली. "मला सांगा, आपल्याला आता उतारवय जाणवत नाही काय? शरीर दुबळे होत आहे तर आपल्या परमेश्वरदर्शनामध्ये काही उणेपणा आपणास भासतो काय?"

त्यांनी एखाद्या देवदूतासारखे स्मित केले. "माझा प्रिय परमेश्वर, पूर्वी कधीही नव्हता इतका, माझ्या आता सान्निध्यात आहे." त्यांच्या ह्या संपूर्ण आत्मविश्वासाने माझे मन व माझा आत्मा भारावून टाकला. ते पुढे सांगू लागले, "अजून सुद्धा मला ती दोन्ही पेन्शने मिळत आहेत. एक भगवतीचे व एक वरचे." थोडा वेळ त्यांनी आपले बोट आकाशाकडे केले व लगोलग त्यांची समाधी लागली. त्यांच्या मुद्रेवर एक दिव्य तेज चमकू लागले. माझ्या प्रश्नाला किती समर्पक उत्तर!

प्रणवानंदांच्या खोलीमध्ये मला पुष्कळशी रोपटी व बियांच्या पुड्या आढळल्या. तेव्हा मी त्यांना त्याचे प्रयोजन विचारले.

ते म्हणाले, "मी वाराणशी आता कायमची सोडली आहे. आणि मी हिमालयाकडे जाण्याच्या मार्गावर आहे. तेथे मी आपल्या शिष्यांकरिता आश्रम उघडणार आहे. ही जी बियाणे मी बरोबर घेतली आहेत त्यांच्यापासून पालक व इतर भाजीपाला तयार करणार आहे. माझे प्रिय शिष्य तेथे अगदी साधेपणाने राहतील; आपला सारा वेळ परमेश्वरचिंतनाच्या आनंदात घालवतील. दुसऱ्या कशाचीही तेथे जरुरी नाही."

वडिलांनी आपल्या गुरुबंधूला विचारले, "तुम्ही कलकत्त्याला केव्हा परतणार आहात?"

त्या संताने जबाब दिला, "आता पुनः कधी नाही; लाहिरी महाशयांनी मला सांगितले होते की, याच वर्षी मी माझे आवडते वाराणशी शहर कायमचे सोडून हिमालयाकडे जाणार आणि तिकडेच मी हा देह त्याग करणार म्हणून."

हे त्यांचे शब्द ऐकून माझे डोळे पाण्याने भरून आले. पण स्वामीमहाराज शांतपणे स्मित करीत होते. त्यांच्याकडे पाहून मला आईच्या मांडीवर शांतपणे बसलेल्या लहान मुलाची आठवण झाली. स्वामीमहाराजांची माता म्हणजे जगन्माता. ह्या योगिराजाच्या ठिकाणी

असलेल्या अत्युच्च आध्यात्मिक सिद्धीच्या वर त्यांच्या ह्या वाढलेल्या वयाच्या बोजाचा काही सुद्धा वाईटसा परिणाम घडून आला नव्हता. इच्छेप्रमाणे ते आपले शरीर पुनरुज्जीवित करू शकतात. वृद्ध होत जाण्याची जी नैसर्गिक क्रिया ती मंद करावी, असे त्यांना बिलकुल वाटत नव्हते; उलट आपले संचित कर्म ह्याच देही फेडले जावे याचेच त्यांना अगत्य होते. सध्याच्या शरीराकडून कर्मांची फेड करून टाकणे हेच त्यांना योग्य वाटत होते. कारण ह्या शरीराचा भरपूर उपयोग न केल्यास उरलेल्या कर्मांचे अवशेष फेडण्याकरिता त्यांना आणखी एक नवीन जन्म घ्यावा लागला असता.

काही महिन्यांनी माझा एक जुना मित्र सनंदन, मला भेटला. तो प्रणवानंदांच्या अगदी निकटवर्ती शिष्यांपैकी एक होता.

तो हुंदके देत देत मला सांगू लागला, “माझे परमपूज्य गुरू इहलोक सोडून गेले. त्यांनी हृषीकेशजवळ एक आश्रम स्थापन केला होता व तेथे ते आम्हांला प्रेमळपणे शिकवीत. जेव्हा आम्ही ह्या मार्गावर स्थिर झालो व त्यांच्या सहवासात द्रुतगतीने आध्यात्मिक प्रगती करू लागलो, तेव्हा त्यांनी हृषीकेशच्या एका मोठ्या जनसमाजाला अन्नदान देण्याचे ठरविले. मी त्यांना विचारले की, ‘एवढ्या मोठ्या समूहाची काय जरुरी आहे?’

“ते म्हणाले, ‘हा माझा शेवटला उत्सव-समारंभ आहे.’ त्यांच्या ह्या शब्दांचा पूर्ण गर्भितार्थ मला त्या वेळी समजला नाही.

“प्रणवानंदांनी फार मोठ्या प्रमाणावर स्वयंपाक करण्याच्या कामी मदत केली. आम्ही साधारण दोन हजार लोकांना अन्नदान केले. जेवणावळ झाल्यानंतर ते एका उंच व्यासपीठावर बसले आणि त्यांनी परमात्म्यावर एक स्फूर्तिदायक प्रवचन दिले. शेवटी हजारो लोक पाहत असता, ते माझ्याकडे वळून एका मोठ्या विलक्षण जोराच्या आवाजाने म्हणाले. त्या वेळी मी व्यासपीठावर त्यांच्याच शेजारी बसलो होतो.

‘सनन्दन, तयार हो. मी ह्या देहाच्या कुडीला [5] लाथ मारतो पाहा.

“थोडा वेळ निःस्तब्ध शांती पसरली. मी जोराने ओरडलो, ‘गुरुजी, कृपा करून तसे करू नका! कृपा करून तसे करू नका!’ जमाव शांत राहिला. माझ्या शब्दांचा अर्थ त्यांना कळेना. प्रणवानंदजींनी माझ्याकडे पाहून स्मित केले, पण त्यांची दृष्टी अगोदरच अनंतत्वाकडे लागली होती.

“ते म्हणाले, ‘तू स्वार्थी होऊ नकोस आणि माझ्याकरिता शोकही करू नकोस. मी आजवर तुम्हा सर्वांची आनंदाने सेवा केली. आता आनंदात राहा आणि मला परमेश्वराकडे जाण्याकरिता निरोप द्या. मी आता प्रिय अशा माझ्या परमात्म्याच्या भेटीला जात आहे.” आणि मग हलक्या आवाजात प्रणवानंदजी म्हणाले, “मी आता लवकरच नवीन जन्म घेणार आहे. दिव्यानंदाचा अल्पकाळ उपभोग घेतल्यानंतर मी परत भूलोकावर येईन आणि बाबाजींच्या [6] भेटीस जाईन. केव्हा आणि कोठे माझा आत्मा एका नव्या शरीरात प्रवेश करील, ते तुला लवकरच कळेल.”

“त्यांनी पुनः हाक मारली, ‘सनन्दन, हे पहा, मी क्रियायोगाची दुसरी क्रिया करून हे शरीर टाकून देतो.’” [7]

"नंतर त्यांनी आमच्या समोर जमलेला मानवसागर आपल्या डोळ्यांनी पाहिला व थोडक्यात सर्वांना आशीर्वाद दिले. नंतर त्यांनी आपली दृष्टी आपल्या तृतीय, आध्यात्मिक नेत्राकडे वळविली आणि ते निश्चेष्ट पडले. समोर जमलेल्या मानवसागराला बुचकळ्यात पडल्यासारखे झाले. त्यांना असे वाटले की, योगीराज समाधि-अवस्थेतच आहेत. पण त्यांनी हाडामांसाच्या शरीराचा केव्हाच त्याग केला होता आणि आपला आत्मा अपार अशा विश्वरूपात विलीन केला होता. शिष्यांनी त्यांच्या पद्मासनस्थ अशा शरीराला स्पर्श केला; पण त्यामध्ये आता जिवंतपणाची अशी काही धुगधुगी राहिली नव्हती. त्यांचे शरीर ताठ व कडक झाले होते. त्या शरीरात वास करणारा भाडेकरू, तेथून निघून अमरत्वाच्या पैलतीरी पोहोचला."

सनंदनाने जशी आपली हकीकत संपविली तसा माझ्या मनात विचार आला—'दोन देह धारण करणाऱ्या ह्या महात्म्याचे जीवन व मरण दोन्ही तितकेच नाट्यपूर्ण होते!'

प्रणवानंदांनी आता पुढे नवीन जन्म कोठे घेतला आहे, हे मी त्याला विचारले.

"ती हकीकत म्हणजे एक पवित्र विश्वस्त रहस्य आहे, असे मी समजतो." सनंदनाने उत्तर दिले, "मला ते कोणालाही सांगता येत नाही. तुम्ही दुसरा कोणता तरी मार्ग पाहावा."

काही वर्षांनी मला स्वामी केशवानंदांकडून [8] कळले की, प्रणवानंदांनी नवीन जन्म घेतल्यानंतर थोड्याच वर्षांनी ते हिमालयात बदरीनारायणला गेले व तेथे महापुरुष बाबाजी यांच्याभोवती जो संतांचा मेळावा होता त्यात ते सामील झाले.



*योगदा सत्संग सोसयटी ऑफ इंडियाचे शाखा मठ व आश्रमाचे रांची येथील कार्यालय*

1 विद्यालय—शाळा. येथे ब्रह्मचर्य याचा उल्लेख जो केला आहे तो वेदप्रणीत मानवी आयुष्यास विहित असा जो चार अवस्थांचा आश्रमधर्म आहे, त्यांपैकी एक आश्रम आहे. ते चार आश्रम म्हणजे (१) ब्रह्मचर्याश्रम, (२) गृहस्थाश्रम, (३) वानप्रस्थाश्रम, (४) संन्यासाश्रम.

रांचीतील योगदा सत्संग विद्यालयाबाबत अधिक माहिती प्रकरण ४० मध्ये दिली आहे.

2 विष्णूचरण घोष ९ जुलै १९७०ला कलकत्त्याला दिवंगत झाले (प्रकाशकांची टीप).

3 मार्क १०:२९-३० (बायबल).

4 लाहिरी महाशयांचे एक प्रिय वचन. आपल्या शिष्यांची ध्यानसाधना दृढ होण्याकरिता व त्यांना उत्तेजन देण्याकरिता, ते हे वाक्य उच्चारीत. या वाक्याचा शब्दशः अर्थ: “तयार होत होत तुम्ही एक दिवस तयार होऊन जाल.” व त्याचा आशय असा की, “प्रयत्न करीत राहा, प्रयत्न करीत राहा. आणि पाहा, एके दिवशी ते दिव्य ध्येय तुम्ही साध्य कराल.”

5 म्हणजे देहाचा त्याग केला.

6 लाहिरी महाशयांचे गुरू. हे अजून जिवंत आहेत. (प्रकरण ३३ पाहा)

7 स्वामी प्रणवानंदांनी उपयोग केलेली ही प्रविधि योगदा सत्संग मार्गावर क्रियेच्या उच्च स्तरांमध्ये दीक्षित झालेल्या लोकांना तृतीय क्रिया म्हणुन माहिती आहे. श्री श्री लाहिड़ी महाशयांनी, स्वामी प्रणवानंदांना देण्याचे वेळी ही त्या योगावतारांकडून त्यांना मिळालेली द्वितीय क्रिया होती. ह्या क्रियेमध्ये दक्ष झाल्या वर साधक केव्हाही जाणतेपणे शरीर सोडू शकतो आणि त्यात परतही येऊ शकतो. प्रगत झालेले योगी ही क्रिया प्रविधि महानिर्वाणाच्या वेळी वापरतात—अशा क्षणाला ज्याची त्यांना अगोदरच माहिती झालेली असते.

महान योगी आध्यात्मिक नेत्रातून, जे मुक्तिचे ताराकृती प्राणशक्ती-द्वार असते, ‘आत-बाहेर’ येत जात असतात. ख्रिस्ताने म्हटले आहे: “मी द्वार आहे: माझ्या द्वारे जो कोणीही आत शिरेल, तो मुक्त होईल, आणि आत-बाहेर जाऊ शकेल, आणि त्याला चराऊ कुरण मिळेल. चोर (माया) कोणत्याच दुसऱ्या हेतुने नाही तर चोरी करण्यास, प्राण घेण्यास आणि नाशासाठीच येतो: मी (ख्रिस्त चैतन्य) यांसाठी आलो आहे की, त्यांना सचेतनता मिळो आणि अधिक विपुलतेने मिळो.” (जॉन १०:९-१०, बायबल)

8 केशवानंदांशी जी माझी भेट झाली त्याचे वर्णन प्रकरण ४२ मध्ये दिलेले आहे.

प्रकरण - २८

# 28. काशीचा पुनर्जन्म व शोध

"कृपा करून खोल पाण्यात जाऊ नका. बादलीत पाणी भरून घेऊन त्यानेच आपण स्नाने करू या."

रांचीच्या शाळेच्या तरुण मुलांना मी सांगत होतो. रांचीपासून आठ मैलांवर एका टेकडीवर सहलीकरता ही मुले माझ्याबरोबर आली होती. आमच्यासमोर एक चांगले तळे होते. कारण काही का असेना; पण माझ्या मनात त्या तळ्याबद्दल ग्रह चांगला झाला नाही. मुलांपैकी बहुतेकांनी आपल्या बादल्या पाण्यात बुडवून घ्यायला सुरुवात केली; पण काही थोड्या मुलांना त्या थंड पाण्याचा मोह आवरेना. पाण्यात उतरून त्यांनी बुचकळ्या मारावयास सुरुवात केली न केली तोच त्या पाण्यातल्या पाणसापांनी त्यांच्याभोवती वळवळावयास सुरुवात केली; आणि मग नंतर आरोळ्या काय आणि गोंधळ काय! पाण्यातून बाहेर पडण्याची ती धांदल काय!

मुक्कामावर गेल्यावर आम्ही वनभोजनाचा आनंद घेतला. मी एका झाडाखाली बसलो; माझ्याभोवती मुलांनी वेटोळे घातले. मला अंतःस्फूर्ति च्या भावात पाहून त्यांनी माझ्यावर प्रश्नांचा भडिमार सुरू केला.

"गुरुजी, कृपा करून सांगा," एका मुलाने विचारले, "मी तुमच्याबरोबर नेहमीच या संन्यस्त मार्गात राहीन काय?"

मी उत्तर दिले, "बिलकुल नाही; तुला तुझ्या घरी जबरदस्तीने नेतील आणि नंतर मग तू लग्न करशील."

'अशक्य' म्हणून त्याने जोराचा विरोध केला. "मी एक वेळ मरण पत्करीन, पण घरी जाणार नाही." (पण थोड्याच महिन्यांत त्याचे आईवडील त्याला घेऊन जाण्यास आले. त्याने रडून रडून होईल तितका प्रतिकार केला. काही वर्षांनी पुढे त्याने लग्न केले.)

पुष्कळशा प्रश्नांना उत्तरे दिल्यानंतर, काशी नावाच्या एका मुलाने मला प्रश्न विचारला. बारा वर्षांचा होता तो. मोठा हुशार व सगळ्यांना आवडायचा.

"गुरुजी," त्याने विचारले, "माझ्या नशिबात काय आहे?"

"तू अल्पायुषी आहेस," एका दुर्दमनीय शक्तीने जणू माझ्या ओठांतून हे शब्द बाहेर काढले.

ह्या भविष्यकथनाने मला व बाकीच्या सर्वांना धक्का व मनस्ताप दिला. एखाद्या लहान मुलाने, काही तरी एखादा अप्रासंगिक प्रश्न विचारावा व गोंधळात टाकावे, तसे मला झाले. मी माझी स्वतःची खूप निर्भर्त्सना केली, आणि पुढे प्रश्नांची उत्तरे देण्याचे बंद केले.

शाळेत परत आल्यावर, काशी माझ्या खोलीत आला. रडत रडत त्याने मला विचारावयास सुरुवात केली, "मी जर मेलो तर, पुनः जन्माला आल्यावर तुम्ही मला शोधून काढाल काय आणि पुनः पारमार्थिक मार्गावर न्याल ना?"

ही बिकट गूढ स्वरूपाची जबाबदारी घेण्याचे नाकारणे मला अशक्य झाले. पण पुढे काशीने या प्रश्नाने माझा पिच्छा पुरविला. उत्तर न मिळाल्यामुळे त्याचा फार हिरमोड झाला. आता त्याला जास्त अधीर ठेवण्यात अर्थ नाही, असे वाटून मी त्याचे शेवटी समाधान करू लागलो.

मी त्याला वचन दिले, “होय; परमेश्वराने जर मदत केली तर मी तुला शोधून काढण्याचा प्रयत्न करीन.”

उन्हाळ्याच्या सुट्टीत मी एका लहानशा प्रवासाला निघालो. बरोबर काशीला घेता आले नाही, म्हणून मला जरा वाईट वाटले. पण निघण्यापूर्वी मी त्याला खोलीवर बोलावून घेतले व काळजीपूर्वक बजावले की, कोणी कितीही आग्रह केला तरी, तू शाळेच्या पवित्र अशा स्पंदनलहरींच्या वातावरणातच टिकून राहा. कारण काही का असेना, मला असे वाटले की, तो जर घरी गेला नाही तर त्याच्यावर येऊ घातलेली आपत्ती टळू शकेल.

मी गेल्यानंतर लगोलग काशीचे वडील रांचीला आले. पंधरा दिवस त्यांनी मुलाचा घरी न येण्याचा दृढनिश्चय मोडून टाकण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांचे म्हणणे असे की, काशीने कलकत्त्याला आईला भेटायला चार दिवस यावे व मग आश्रमात परत यावे. काशीने चिवटपणे प्रतिकार केला. शेवटी त्याच्या वडिलांनी अशी धमकी दिली की, पोलिसांच्या मदतीने ते मुलाला घेऊन जातील. ह्या धमकीमुळे काशी बेचैन झाला. आपल्यामुळे शाळेची बदनामी व्हावी, हे त्याला आवडेना. त्याला आता जाण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नाही.

थोड्या दिवसांनी मी रांचीला परत आलो. काशीला तेथून कसे हालविले, हे मला कळल्याबरोबर मी ताबडतोब कलकत्त्याच्या गाडीत बसलो. तेथे पोचल्यावर मी एक घोडा गाडी ठरविली. गंगेवरील हावडा ब्रिजच्या पलीकडे माझी गाडी जाऊन पोचली तो मला आश्चर्याचा धक्का बसला. प्रथम जे मला दृष्टीला आढळले ते काशीचे वडील व आप्त. ते सुतकी वेषात दिसत होते. गाडीवाल्याला मी थांबावयास सांगितले; गाडीतून मी खाली उडीच मारली आणि त्या दुर्दैवी बापाकडे टवकारून पाहिले.

“खुनी माणसा,” मी जरा अविचारानेच ओरडून त्याला म्हणालो, “तू माझ्या मुलाला मारलेस!”

काशीच्या वडिलांना मुलाला बळजबरीने कलकत्त्याला आणण्यात आपली चूक झाली, हे कळून चुकले होते. कलकत्त्याला आल्यावर जे काही थोडे दिवस तो तेथे होता, त्या अवधीत त्याच्या खाण्यात दूषित अन्न आले. त्याला कॉलरा झाला व त्यात तो दगावला.

काशीवर असलेले माझे प्रेम व मरणानंतर त्याला शोधून काढण्याचे त्याला दिलेले वचन ह्या दोन गोष्टी माझ्या मनात रात्रंदिवस खिळून राहिल्या होत्या. जेथे जेथे मी जाई तेथे तेथे त्याचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोर उभा राही. त्याच्याकरिता मी संस्मरणीय असा शोध करायला सुरुवात केली. असाच शोध मी पूर्वी माझ्या दिवंगत आईकरिता घेतला होता.

मला असे वाटले की, ज्या अर्थी परमेश्वराने मला तारतम्य बुद्धी दिली आहे, त्या अर्थी तिचा वा माझ्या सर्व आध्यात्मिक शक्तींचा उपयोग करून, त्या दिवंगत मुलाचा परलोकातील ठावठिकाणा शोधून काढण्याकरिता जे सूक्ष्म नियम आहेत त्यांचे ज्ञान प्राप्त करून घ्यावे. मला असे वाटले की, त्याचा आत्मा अपूर्त वासनांच्यामध्ये दोलायमान होत असावा.

परलोकाच्या अंतरिक्षामध्ये जे कोट्यवधी तेजस्वरूपी आत्मे तरंगत असतात, त्यांमध्येच त्याच्या आत्म्याचा हा तेजस्वी पुंजका कुठेतरी तरंगत असावा. पण इतर आत्म्यांच्या दोलायमान होत असलेल्या प्रकाशपुंजक्यांमध्ये त्याला मी कसे शोधून काढावे?

योगतंत्राची एक गूढ रहस्यमय क्रिया करून मी काशीच्या आत्म्यावरील माझे प्रेम आध्यात्मिक अशा तृतीय नेत्राच्या "ध्वनिक्षेपकामधून" प्रसारित केले. ह्या तृतीय नेत्राचे स्थान दोन भुवयांच्या मध्ये असते. [1] माझी अंतःप्रेरणा मला असे सांगत होती की काशी लवकरच भूलोकावर परत येणार आणि मी जर त्याला ध्वनिक्षेपण करून सारखी हाक मारली, तर त्याचा आत्मा माझ्या हाकेला पडसाद देईल. मला माहीत होते की, काशीने थोडासा जरी आवेश क्षेपित केला तरी, तो माझ्या बोटांना, हातांना, आणि मेरुदंडाला व ज्ञानतंतूंना कळून येईल.

हात व बोटे उभारून, अंतरिक्षातील स्पंदनलहरी पकडण्यासाठी त्यांचा अणकुचीदार विद्युतसंग्राहकांसारखा उपयोग करून, मी आंगणामध्ये गोलगोल फिरलो. ज्या ठिकाणी मला वाटले की, त्याचा पुनर्जन्म होऊन तो गर्भवासात असावा, त्या ठिकाणाच्या दिशेने मी वारंवार फेर घातला. माझ्या हृदयाच्या रेडिओमध्ये धारणेच्या जोरावर त्याच्याकडून पडसाद मिळविण्याची मी आशा बाळगली.

काशीच्या मृत्यूनंतर, उत्साह ओसरू न देता, जवळ जवळ सहा महिने मी अविचलपणाने हा यौगिक मार्ग अनुसरला. एके दिवशी सकाळी, कलकत्त्यामधील गजबजलेल्या अशा बहुबाजार मोहल्ल्यात माझ्या काही मित्रांबरोबर जात होतो. तेव्हा माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मी हात उंच केले, आणि प्रथमच असा मला पडसाद मिळाला. माझ्या बोटांमधून व तळव्यांमधून विद्युतसंवेदना संचरली व माझे अंग थरारले. विद्युत्संवेदनेच्या ह्या प्रवाहांचे एका प्रभावी विचारामध्ये रूपांतर झाले व तो विचार माझ्या जाणिवेच्या खोल कुहरामधून प्रगट होऊ लागला; "मी तो काशी; मी तो काशी, माझ्याकडे या!"

आणि जसजशी मी माझ्या हृदयाच्या रेडिओवरती धारणाशक्ती केंद्रित करू लागलो, तसतसा तो विचार मूळ धरू लागून मला हळूहळू ऐकू येऊ लागला. काशीच्या [2] थोड्याशा घोगऱ्या व कुजबुजणाऱ्या विशिष्ट आवाजात तो मला सारखे बोलावीत आहे, असे ऐकू येऊ लागले. मी माझ्या सोबत्याचा दंड पकडला व त्याच्याकडे पाहून आनंदाने स्मित केले.

"काशीला शोधून काढल्यासारखे मला वाटत आहे खरे!"

मी गोल गोल फिरावयास लागलो. माझ्या मित्रांच्या व जाणाऱ्यायेणाऱ्या वाटसरूंच्या करमणुकीचा विषय झालो. पण ते माझ्या ध्यानातही नव्हते. ज्या वेळी मी सर्पेंटाइन लेन नावाच्या रस्त्र्याकडे तोंड करत होतो तेव्हाच माझ्या बोटांतून संवेदना संचरित होत्या. मी जेव्हा इतर दिशेने वळलो तेव्हा ते सूक्ष्म प्रवाह वाहावयाचे थांबले.

मी मनाशीच उद्गारलो, "काशीचा आत्मा जवळच कोठेतरी एका मातेच्या उदरामध्ये वास करीत असला पाहिजे व तिचे घर ह्याच गल्लीमध्ये असले पाहिजे."

मी व माझे सोबती सर्पेंटाइन लेनमधून पुढे जाऊ लागलो; माझ्या उभारलेल्या हातांमध्ये संवेदना जोराने वाहू लागल्या; काहीतरी निश्चित अर्थ त्यांतून सुचू लागावयास सुरुवात

झाली. जसे एखाद्या लोहचुंबकाने ओढून घ्यावे, तसा मी रस्त्र्याच्या उजव्या बाजूकडे ओढला गेलो. त्या बाजूकडील एका घराच्या दरवाजापाशी पोचल्यावर तेथेच मी जखडल्यासारखा झालो. मला फार आश्चर्य वाटले. माझा श्वास रोखल्यासारखा झाला. मनाच्या क्षुब्ध अवस्थेत मी ते दार ठोठावले. मला वाटले की, हा माझा बराच वेळ चाललेला विलक्षण शोध संपण्याच्या बेतात आला असून शेवटी आपल्याला यश मिळणार.

एका नोकराने दरवाजा उघडला व मालक घरात आहेत म्हणून सांगितले. तेवढ्यात दुसऱ्या मजल्यावरून स्वतः मालकच खाली येऊ लागले आणि माझ्याकडे पाहून प्रश्नार्थकमुद्रेने स्मित केले. प्रश्न कसा काय विचारावा, हे मला कळेना. कारण प्रश्न तसा म्हणावा तर प्रासंगिकही होता व अप्रासंगिकही होता.

“माफ करा, महाराज, पण आपण व आपले कुटुंब गेले सहा महिने एका अपत्याची अपेक्षा करीत आहा काय?” [3]

“होय, खरे आहे ते.” त्यांनी माझ्या भगव्या रंगाच्या संन्याशाच्या वेषावरून मी स्वामी आहे, हे ओळखले व पुढे ते नम्रतेने म्हणाले, “पण आपल्याला ही माझी कौटुंबिक बाब कशी काय कळली? समजेल का मला?”

मग मी त्यांना काशीची सारी हकीकत सांगितली, व त्याला मी काय वचन दिले होते, हेही सांगितले. त्यांना ही सारी हकीकत ऐकून फार आश्चर्य वाटले व ती हकीकत खरी वाटली.

मी त्यांना म्हणालो, “आपल्याला चांगला गोऱ्यापान वर्णाचा मुलगा होईल. त्याचा चेहरा चांगला रुंद असेल व त्याच्या कपाळावर पाठीमागे झुकलेला असा केसांचा झुपका असेल. त्याची नैसर्गिक प्रवृत्ती आध्यात्मिक स्वरूपाची राहील.” नवीन जन्मास येणाऱ्या मुलाच्या ठिकाणी अशा खुणा येतील, अशी मला खात्री वाटली, ह्या खाणाखुणा काशीच्या होत्या.

नंतर काही दिवसांनी त्या मुलाला मी पाहायला गेलो. त्याच्या आईवडिलांनी त्याचे जुने नाव काशी हेच त्याला ठेवले. अगदी अर्भकावस्थेत सुद्धा त्याचे, माझा रांचीचा विद्यार्थी जो काशी त्याच्याशी अगदी विलक्षण चटकन ध्यानात येण्यासारखे, असे साम्य होते. त्या मुलाला माझा अगदी ताबडतोब लळा लागला. पूर्वजन्मीचे आकर्षण ह्या जन्मी दुप्पट तीव्रतेने जागृत झाले.

काही वर्षांनी त्या मुलाने, किशोरावस्थेत आल्यावर, मी अमेरिकेत असताना, मला पत्र लिहिले होते. संन्यस्त पारमार्थिक मार्गच आयुष्यात अनुसरण्याची आपली उत्कट इच्छा आहे, असे त्याने लिहिले होते. त्याला मी हिमालयातील एका योग्याचे नाव सुचविले आणि त्या योग्याने त्या पुनर्जन्म पावलेल्या काशीस शिष्य करून घेतले.



*काशी*
*रांची विद्यालयाचा विद्यार्थी*

1 दोन भुवयांच्या मधील बिंदूतून मनातली इच्छा, मनातला विचार बाहेर फेकला जातो आणि त्या प्रकाराला योगी लोक विचारक्षेपणाचे यांत्रिक साधन समजतात. ज्या वेळी हृदयावरती भावना ही शांतपणे केंद्रित केली जाते, तेव्हा ती मानसिक रेडिओसारखी क्रिया करीत असते; आणि दूरच्या किंवा जवळच्या इतर लोकांचे संदेश ग्रहण करते. दूरसंदेशवहनामध्ये (telepathy) एका मनुष्याच्या मनामधील विचारांच्या सूक्ष्म लहरी परलोकाच्या ईथरच्या सूक्ष्म लहरींच्या मधून त्यानंतर जडपृथ्वीच्या ईथरमध्ये क्षेपित केल्या जातात. त्यांपासून विद्युल्लहरी व त्यांपासून पुढे त्यांचे दुसऱ्या एका मनुष्याच्या मनातील विचारलहरींमध्ये रूपांतर केले जाते व पहिल्या मनुष्याचे विचार दुसऱ्या मनुष्याला कळून येतात.

2 प्रत्येक आत्मा हा शुद्धावस्थेमध्ये सर्वज्ञ असतो. काशीच्या आत्म्याला, काशी ह्या मुलाच्या सर्व स्वभावविशेषांची स्मृती होती. म्हणून त्या आत्म्याने घोगऱ्या आवाजात त्याच्या आवाजाची अशी नक्कल केली की, मी त्या आवाजावरून त्यास ओळखावे.

3 जरी काही माणसे पार्थिव शरीराच्या मृत्यूनंतर परलोकात—सूक्ष्म लोकात ५०० किंवा १००० वर्षे राहतात तरी दोन जन्मांच्या मध्ये आत्मा ह्या सूक्ष्म परलोकात किती वर्षे राहातो याचा नियम असा काही नाही. (प्रकरण ४३ पाहावे) कोणत्याही माणसाचे पार्थिव जगातील किंवा परलोकातील जीवमान हे त्याच्या कर्माने अगोदरच निश्चित केलेले असते.

झोप म्हणजे "एक लहानसा किंचित्काळ टिकणारा असा एक मृत्यूच" होय. निद्रा आणि मृत्यू ह्या गोष्टी मर्त्य जीवाला आवश्यक अशा आहेत. त्यायोगे अप्रबुद्ध अशा मनुष्य प्राण्यांची थोडा वेळ का होईना, इंद्रियव्यापारांच्या जाणिवेपासून मुक्तता किंवा सुटका होते. मनुष्याचे मूळस्वरूप हे आत्मिक आहे. त्यामुळे त्याला झोपेमध्ये व मृत्यूच्या वेळी आपण शरीरी नव्हेत याचे पुनः पुनः ठासून स्मरण दिले जाते. हिंदू धर्मशास्त्रामध्ये कर्माचा समतोलत्वाचा नियम फार विशद करून सांगितलेला आहे. हा नियम सत्यावर आधारलेला आहे. ह्या नियमानुसार कृती आणि प्रतिकृती, कारण आणि परिणाम, पेरणे आणि त्याचे फळ मिळविणे ह्या सर्व गोष्टी तुल्यबळ व एकमेकीविरुद्ध अशा असतात. स्वाभाविक अशा पवित्र न्यायाधिष्ठित आचरणाने (ऋत) प्रत्येक मनुष्य आपल्या स्वतःच्या विचारांमुळे आणि कृतींमुळे आपल्या स्वतःचे भवितव्य घडवून आणीत असतो. ज्या काही विश्वव्यापक शक्ती तो स्वतः शहाणपणाने किंवा मूर्खपणाने क्रियाशील करीत असतो आणि त्या शक्ती जेथून निघाल्या त्या ठिकाणी परत आल्याच पाहिजेत. बिंदू धरून वर्तुळ काढावयास सुरुवात केली की, काही झाले तरी तो बिंदू वर्तुळ काढल्यानंतर परत आपल्या जागच्या जागी येतो. "हे जग म्हणजे बीजगणितामधील एखाद्या समीकरणासारखे आहे. ह्या समीकरणामध्ये तुम्ही कोणतीही संख्या डावीकडून उजवीकडे किंवा उजवीकडून डावीकडे नेली, तरी प्रत्येक वेळी दोन्ही बाजू समानसंख्याक अशा राहतात. प्रत्येक गूढ हे उकलले जाते; प्रत्येक गुन्ह्याला शिक्षा केली जाते. प्रत्येक गुणाला बक्षीस दिले जाते आणि प्रत्येक अन्यायाची शांतपणे पण निश्चित अशी भरपाई केली जाते." (इमर्सन यांच्या 'इन कॉँपेनसेशन' या ग्रंथातून). जगतामध्ये दिसून येणारी जी विषमता आहे त्याच्या पाठीमागे हा कर्माच्या न्यायावर आधारलेला विधिनियम आपले काम बिनचूकपणे करीत असतो, ही एकदा मनुष्याच्या मनाची खात्री झाली म्हणजे तो मनुष्य दुसऱ्या मनुष्याला किंवा परमेश्वराला आपल्या स्वतःच्या कर्माबद्दल दोष देत नाही.

प्रकरण - २९

# 29. रवींद्रनाथ आणि मी आपापल्या शाळांची तुलना करतो

"रवींद्रनाथ टागोरांनी आम्हांला, पक्ष्यांप्रमाणे सहज रीत्या, स्वतःच्या भावनांचा नैसर्गिक पद्धतीने आविष्कार करण्याकरिता गाण्याचे शिकविले आहे."

माझ्या रांचीच्या शाळेमध्ये भोलानाथ नावाचा चौदा वर्षांचा एक चुणचुणीत मुलगा होता. एके दिवशी सकाळी त्याने सुरेल गाण्याची लकेर सोडली, तेव्हा मी त्याला शाबसकी दिली. त्या वेळी त्याने आपल्या गाण्याचे वरीलप्रमाणे मला स्पष्टीकरण दिले. काही निमित्ताने किंवा निमित्ताशिवाय त्या मुलाने असे हे आल्हादकारक सुरेल संगीताचे सूर काढले. तो पूर्वी बोलपूरमधील टागोरांच्या प्रसिद्ध "शांतिनिकेतन" विद्यालयामध्ये शिकत होता.

"रवींद्रनाथांची गीते अगदी लहानपणापासून माझ्या अगदी ओठांवर आहेत," मी माझ्या सोबत्याला सांगितले, "साऱ्या बंगालमध्ये, अगदी अडाणी शेतकऱ्यापर्यंत त्यांच्या उच्च काव्याची फार आवड आहे."

त्यानंतर भोलाने व मी, दोघांनी मिळून टागोरांच्या गीतांची काही थोडी ध्रुवपदे एकत्र गायिली. हजारो कविता, काही स्वतःच्या व काही अगदी पुरातन काळच्या, टागोरांनी संगीतात आणून सोडल्या होत्या.

आमचे गाणे संपल्यानंतर मी म्हणालो, "वाङ्मयाबद्दल नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर थोड्याच दिवसांनी मी रवींद्रनाथांना भेटलो होतो." "मी त्यांना भेटायला गेलो याचे कारण असे की, आपल्या वाङमयाच्या टीकाकारांची ते अगदी रोखठोक वासलात लावीत, या त्यांच्या नीतिधैर्याबद्दल मला त्यांची स्तुती करावीशी वाटे." मी गालातल्या गालात हसत म्हणालो.

भोला उत्सुक झाला व त्याने सारी हकीकत मला विचारली.

मी हकीकत सांगायला सुरुवात केली, "टागोरांनी बंगाली कवितेमध्ये एक नवीन ढब सुरू केल्याबद्दल विद्वानांनी त्यांच्यावर जोराचा हल्ला चढविला. टागोरांनी बोलभाषिक शब्द व अभिजात शब्द हे एकमेकांत स्वैरपणे मिसळून टाकले. अशा तऱ्हेची गोलमाल करू न देण्याबद्दल पंडितलोकांचा परंपरागत कटाक्ष असे. त्यांच्या काव्यामध्ये खोल तत्त्वज्ञानविषयक सत्य भावनेला उद्दीपित करणाऱ्या शब्दांमध्ये गुंफलेले असायचे. मग ते गुंफताना वापरलेली वाङ्मयीन रचना परंपरागत रूढ किंवा मान्य अशी असो वा नसो; त्याचा त्यांना विधिनिषेध नसावयाचा.

"एका प्रतिष्ठित टीकाकाराने रवींद्रनाथांना 'एक रुपयास आपले काव्यरूपी घुमणे छापवून घेणाऱ्या एका पारव्याची' उपमा दिली. पण टागोरांनी त्या निघृण टीकेला ताबडतोब उत्तर दिले. त्यांनी आपल्या 'गीतांजली'चे स्वतः इंग्लिशमध्ये भाषांतर केले व त्यांच्या ह्या असामान्य कृतीची पाश्चिमात्य साहित्यजगताने दखल घेतली व त्यांचा बहुमान केला. साऱ्या

जगातून मानसम्मान त्यांच्या पायांशी लोळत आले. गाडीभर पंडितांचा ताफा—की ज्याने टागोरांवर एके काळी टीकास्त्र जारी ठेवले होते—तो आता त्यांचे अभिनंदन करण्यासाठी शांतिनिकेतनला गेला.


"रवींद्रनाथांनी आपल्याला भेटावयास आलेल्या लोकांची भेट घेण्याला मुद्दाम वेळ लावला व त्यांनी केलेली प्रशंसा अगदी निर्विकारपणे व विरक्तबुद्धीने ऐकून घेतली. शेवटी त्यांनी त्या टीकाकारांच्या टीकास्त्रांचा त्यांच्याचविरुद्ध उपयोग केला.

"'सज्जनहो,' ते म्हणाले, "तुम्ही आज जी ही सन्मानाची फुले माझ्यावर उधळीत आहात, त्या फुलांच्या सुवासात तुम्ही विसंगतिपूर्ण असा जो माझ्याबद्दल तिरस्कार दाखविला होता त्याची दुर्गंधी मिसळलेली आहे. मला नोबेल प्राईझ मिळणे व तुमची सूक्ष्म काव्यसमीक्षक बुद्धी एकाएकी जागृत होगे याचा अर्थाअर्थी काही संबंध आहे काय? वंग साहित्याच्या मंदिरात काव्यदेवतेपुढे विनम्रपणे फुले अर्पण करणारा व आजवर आपल्या सर्वांच्या नाराजीचा विषय झालेला तोच कवी मी आहे.'

"टागोरांनी आपल्या टीकाकारांची अशी जी सडेतोड हजेरी घेतली, त्याचा वृत्तान्त वर्तमानपत्रांनी प्रसिद्ध केला. खुशामतीने मोहित न झालेल्या अशा त्या माणसाच्या सडेतोड वक्तव्याचे मला कौतुक वाटले." मी पुढे म्हणालो, "रवींद्रनाथांशी माझा परिचय कलकत्त्यामध्ये त्यांचे चिटणीस मि. सी. एफ. अँड्रयूझ [1] यांनी करून दिला. मी जेव्हा त्यांना भेटलो, तेव्हा त्यांचा वेष अगदी साधा होता. बंगाली पद्धतीने त्यांनी धोतर परिधान केलेले होते. टागोरांचा उल्लेख त्यांनी प्रेमळपणे 'गुरुदेव' म्हणून केला.

"रवींद्रनाथांनी माझे सौजन्यपूर्वक स्वागत केले. त्यांच्याभोवती सौंदर्य, संस्कृती व खानदानीचे एक वलय भासमान होत होते. त्यांच्या वाङ्मयीन पार्श्वभूमीबद्दल मी जेव्हा पृच्छा केली, तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, त्यांच्यावर आपल्या धार्मिक महाकाव्यांची व चौदाव्या शतकातील एक लोकप्रिय कवी विद्यापती यांच्या ग्रंथांची छाप पडलेली आहे."

ह्या जुन्या स्मृतींनी मला स्फूर्ती आली आणि मी एका जुन्या बंगाली गीताचे टागोरांनी केलेले रूपांतर गाऊ लागलो. त्या गीताचे शब्द असे: "लाईट द लॅम्प ऑफ दाय लव्ह" ('दीप तुझ्या प्रीतीचा उजळु दे कसा तो'). विद्यालयाच्या पटांगणावर फेरफटका मारीत असताना भोला आणि मी वरील गाणे आनंदाने गुणगुणू लागलो.



*रविंद्रनाथ टागोर*
*बंगालचे प्रेरित कवी आणि साहित्याचे नोबल पारितोषकप्राप्त*

रांचीची शाळा स्थापन केल्यावर सुमारे दोन-एक वर्षांनी मला रवींद्रनाथांकडून त्यांच्या शांतिनिकेतनला भेट देण्याकरिता आणि आम्हा उभयतांची जी शैक्षणिक ध्येये आहेत त्याबद्दल चर्चा करण्याकरिता आमंत्रण आले. त्याप्रमाणे मी आनंदाने तिकडे गेलो. मी जेव्हा तेथे प्रवेश केला, तेव्हा कविवर्य आपल्या अभ्यासिकेत बसले होते. त्यांची व माझी जेव्हा पहिली भेट झाली होती, त्या वेळच्या सारखीच मला ह्याही वेळी कविवर्यांची मूर्ती, जशी एखाद्या चित्रकाराने मनात योजावी अशी, अत्युच्च मानवतेचा आदर्श दर्शविणारी व ताबडतोब डोळ्यांत भरणारी अशी वाटली. त्यांचा सुंदर व रेखीव चेहरा, त्या चेहऱ्यावरील खानदानीचे तेज त्यांच्या लांब केसांमध्ये व रुळणाऱ्या दाढीमध्ये दृग्गोचर होत होते. त्यांचे डोळे विशाल व

प्रेमळ होते; त्यांचे स्मित एखाद्या सिद्धयोग्याचे होते. त्यांचा आवाज बासरीसारखा असून ऐकणाऱ्याला अक्षरशः मुग्ध करून टाकणारा होता. त्यांची शरीरयष्टी सुदृढ व उंच होती. त्यांच्यामध्ये स्त्रीचे मार्दव व लहान मुलाचे आल्हाददायक ऋजुत्व यांचा गोड मिलाफ आढळून येत होता. कवी म्हणून एखादी आदर्श व यथायोग्य मूर्ती घडविण्याकरिता, ह्या सौम्य गायकाच्या मूर्तीपेक्षा दुसरा नमुना शोधून काढणे अशक्य होते.

टागोर व मी दोघे थोड्याच वेळात चर्चेत रंगून गेलो. चर्चेचा विषय म्हणजे आमच्या दोघांच्या शाळांची परस्परांशी तुलना हा होता. दोन्हीही शाळा अभिनव पद्धतीवर स्थापन केलेल्या होत्या. दोन्ही शाळांच्या शिक्षणपद्धतीमध्ये समान वैशिष्ट्ये म्हणजे झाडांच्या छायेखाली भरविले जाणारे वर्ग, साधेपणा व मुलांच्या रचनात्मक वृत्तीला मिळत असणारा भरपूर वाव, ही होत. तथापि रवींद्रनाथांनी वाङ्मय व काव्य ह्यांच्या अभ्यासावर व संगीत आणि काव्य ह्यांमधून होणाऱ्या अभिव्यक्तीवर फार जोर दिला. भोलामध्ये मला ह्या गोष्टी अगोदरच आढळून आल्या होत्या. शांतिनिकेतनमधील मुले काही तास मौन पाळीत असत, पण खास असे योगशिक्षण त्यांना दिले जात नसे.

शक्ती व स्फूर्ती देणाऱ्या “योगदा” व्यायामाच्या प्रकारांचे व रांचीमधील सर्व विद्यार्थ्यांना शिकविल्या जाणाऱ्या योगधारणेच्या तंत्राचे शिक्षण, याचे मी केलेले वर्णन कविवर्यांनी लक्षपूर्वक ऐकले.

आपल्या आयुष्याच्या आरंभीच्या शैक्षणिक संघर्षां बद्दल टागोर सांगू लागले. “पाचव्या यत्तेनंतर मी शाळेतून पळून गेलो,” असे ते हसत हसत म्हणाले. त्यांच्या आंतरिक व नाजूक अशा कवि हृदयाला शाळेतील वर्गाचे रुक्ष व शिस्तबद्ध वातावरण मानवणारे नव्हते, हे मला ताबडतोब कळून चुकले.

“आणि म्हणून मी शांतिनिकेतनमधील वर्ग वृक्षच्छायेमध्ये व आकाशाच्या भव्यतेखाली घेण्यास सुरुवात केली.” त्या सुंदर बगीचामध्ये अभ्यास करीत बसलेल्या मुलांच्या एका घोळक्याकडे त्यांनी सूचकपणे बोट दाखविले, “मुलाचे नैसर्गिक वास्तव्य हे फुलांमध्ये व गाणाऱ्या पक्ष्यांमध्ये असते. तेथेच मूल आपल्या सुप्त अशा वैयक्तिक गुणसंपत्तीची वाढ करू शकते. खरे शिक्षण हे कोठून बाहेरील कोठारातून खेचून काढून, मुलांच्या मनात ठासून भरावयाची काही वस्तू नसते, तर मुलामध्ये मुळातच [2] असलेल्या असीम अशा सुज्ञतेच्या रत्नभांडारास वरती पृष्ठभागावर आणणे, हे खरे शिक्षण असते.”

मला हे पटले आणि मी पुढे म्हणालो, “सर्वसाधारण शाळांमध्ये मुलांच्या ध्येयवादी व विभूतिपूजेच्या प्रवृत्तींची उपासमार होते. मुलांना फक्त निरनिराळ्या आकडेवारीच्या व सनावळ्यांच्या तक्त्यांचे नीरस व शुष्क खाद्य खावे लागते.”

कविवर्यांनी आपले वडील जे देवेंद्रनाथ यांच्याविषयी मोठे प्रेमळ उद्गार काढले. शांतिनिकेतन काढण्याची स्फूर्ती त्यांना त्यांच्या वडिलांपासून मिळाली.

रवींद्रनाथ मला सांगू लागले, “वडिलांनी मला ही सुपीक जमीन बक्षीस दिली. इथे अगोदरच त्यांनी एक पथिकाश्रम व देऊळ बांधलेले होते. मी येथे १९०१ साली फक्त दहा

मुलांना घेऊन माझ्या शैक्षणिक प्रयोगाला सुरुवात केली. नोबेल प्राईझचे बक्षिस म्हणून जे आठ हजार पौंड मला मिळाले, ते सगळे मी शाळेत घातले.

त्यांचे वडील देवेंद्रनाथ ह्यांना 'महर्षी' असे म्हणत व त्यांचा लौकिक फार दूरवर पसरलेला होता. त्यांच्या आत्मचरित्रावरून ते एक मोठे नामांकित पुरुष होते, हे दिसून येते. वयात आल्यावर त्यांनी दोन वर्षे हिमालयात ध्यान करण्यात घालविली. तसेच त्यांचे वडील द्वारकानाथ टागोर हे साऱ्या बंगालभर आपल्या दातृत्वाने व परोपकारी वृत्तीमुळे प्रसिद्ध होते. अशा ह्या प्रसिद्ध वंशवृक्षात बुद्धिमान माणसे निर्माण झाली. केवळ एकटे रवींद्रनाथच नव्हेत, तर त्यांचे सगळे नातेवाईक कोणत्या ना कोणत्या तरी विधायक कार्यक्षेत्रात चमकून गेले. त्यांचे पुतणे, गगनेंद्र व अवनींद्र हे भारतामधील प्रसिद्ध असे कलावंत, चित्रकार होते. [3] रवींद्रनाथांचा भाऊ, द्विजेंद्र हा एक अति प्रगल्भ असा तत्त्वज्ञ होऊन गेला. तो तर पक्ष्यांवर व वन्य पशूंवर प्रीती करीत असे.

आपल्या पथिकाश्रमात रात्री मुक्काम करावा म्हणून रवींद्रनाथांनी मला बोलावले. संध्याकाळी पडवीमध्ये कविवर्य आपल्या विद्यार्थ्यांसमवेत बसले असताना, विद्यार्थ्यांनी मूकनाट्याचा प्रयोग करून दाखविला. त्या प्रयोगाने मी हर्षाने भारावून गेलो. गतस्मृतींची आठवण झाली. माझ्यासमोर पुरातन कालातील एका आश्रमाचे चित्र उभे राहिले. आनंदाने भारावून गेलेल्या गायकाच्याभोवती त्याच्या शिष्यांचे वेटोळे पडलेले होते. ते सर्व शिष्य दिव्यानंदाने तसेच भारावून गेलेले होते. मित्रत्वाची प्रत्येक ग्रंथी टागोर सुसंबद्धतेच्या दोऱ्याने बांधीत होते. त्यांची भूमिका आग्रहाची नव्हती. एक प्रकारच्या अनिवार्य अशा चुंबकशक्तीने प्रत्येकाचे हृदय ओढून घेत व अंकित करीत. परमेश्वराच्या उपवनामधील काव्यप्रतिभेची ही कलिका आपल्या नैसर्गिक व सहज अशा सुगंधाने इतरांस आकर्षित करीत होती.

नवीनच रचलेल्या, काही उत्कृष्ट कविता रवींद्रनाथांनी आपल्या सुरेल आवाजात मला गाऊन दाखविल्या. त्यांच्या बहुतेक कविता व नाट्ये त्यांनी शांतिनिकेतनमध्ये आपल्या विद्यार्थ्यांकरिता लिहिली होती. कवितांमधील प्रत्येक ओळीत जे सौंदर्य मला आढळून आले त्याचे कारण असे की, बहुतेक प्रत्येक कडव्यात परमेश्वराचे पवित्र नाव अगदी उघडपणे न घेता, कलापूर्ण रीतीने संदिग्ध असे ठेवलेले असे. ते लिहीत, "गाण्याच्या आनंदाने बेहोष होऊन, मी स्वतःला विसरून जात असे आणि तो जो माझा प्रभू त्याला मी मित्र म्हणून आळवीत असे."

दुसऱ्या दिवशी भोजनोत्तर मी कविवर्यांचा जड अंतःकरणाने निरोप घेतला. मला हे नमूद करावयास फार आनंद वाटतो की, त्यांनी सुरू केलेली ही लहानशी शाळा, आज 'विश्वभारती' [4] ह्या नावाच्या एका अंतरराष्ट्रीय विश्वविद्यालयाच्या विशाल वृक्षात परिवर्तित झाली आहे ह्या विश्वविद्यालयात जगाच्या कोनाकोपऱ्यांतून विद्यार्थी येतात व त्यांस येथे एका आदर्श परिसराचा अनुभव घडून येतो.

"जेथे चित्ता भय लव नसे; शीर्ष उत्तुंग राहे।
जेथे ज्ञाना अडसर नसे; विश्व जेथे अखंड।।

जेथे आकुंचित मन नसे भेद ना भाव कारी
भूलोकाचे लव लव असे खंड ना ठायि ठायी।। १।।
सत्यार्थाच्या गहन कुहरातून ये शब्द जेथे।
जेथे कष्टां विराम नसुनी पूर्णता ये करांसी।।
बुद्धीचा अप्रतिहत असा वाहतो स्त्रोत धीर।
ज्याची धारा गत संवयिच्या निर्जनी वाळवंटी।। २।।
लुप्तप्राया स्थगित अथवा होतसे ना कुठेही।
जेथे चित्ता गति मिळतसे त्वत्कृपेने सदैव।।
मार्गी जाता मति कृति जिथे होतसे वर्धमान।
स्वातंत्र्याच्या गगनि रवि ये जेधवा सुप्रभाती।। ३।।
तत्तेजाने सकल जगता जागृती ये जशी ही।
येवो तैशी परम पुरुषा माझिया जन्मभूमी।।" 5

—रवींद्रनाथ टागोर

---

1 एक इंग्लिश लेखक, सार्वजनिक विषयांची चर्चा करणारे, महात्मा गांधीचे निकटवर्ती स्नेही.

2 "वारंवार जन्म घेऊन, किंवा, जसे हिंदुमध्ये म्हटले जाते, 'हजारो जन्मांमधून अस्तित्त्वाच्या मार्गाची यात्रा करुन,' म्हणुन आत्म्यासाठी असे काहीच नाही, ज्याचे त्याला ज्ञान झाले नाही. त्यात आश्चर्य नाही की जे त्याला पूर्वीच्या काळात माहीत होते ते तो पुनः आठवू शकतो, कारण चौकशी आणि ज्ञान मिळवणे म्हणजे खऱ्या अर्थी पूर्व स्मृतींना जागृत करणेच होय."

3 आपल्या वयाच्या साठोत्तर काळामध्ये रवीन्द्रनाथांचा पण कल चित्रकलेच्या गहन अध्ययनाकडे झाला. काही वर्षांपूर्वी यूरोपीय राजधानींमध्ये आणि न्यूयॉर्कला त्यांचे चित्र प्रदर्शित करण्यात आले.

4 ह्या प्रिय कवीचे निधन १९४१ साली झाले तथापि त्यांची ही विश्वभारती संस्था आजही तेजीने वाढत आहे. जानेवारी १९५० मध्ये विश्वभारतीमधील पासष्ट शिक्षक व विद्यार्थी यांनी योगदा सत्संग विद्यालयाला रांचीमध्ये दहा दिवसांची भेट दिली होती.

5 गीतांजली (मॅकमिलन कं.) ह्या कवि वर विचारपूर्ण अध्ययन, प्रसिद्ध विद्वान् सर एस. राधाकृष्णन द्वारा लिखित *द फिलॉसॉफी ऑफ रवीन्द्रनाथ टागोर* (मॅकमिलन, १९१८) मध्ये उपलब्ध आहे.

प्रकरण - ३०

# 30. चमत्कारांचे नियम

जगविख्यात कादंबरीकार लिओ टॉलस्टाय [1] याने एक मोठी गमतीची गोष्ट लिहिलेली आहे. गोष्टीचे नाव—“तीन संन्यासी.” ह्या गोष्टीचा मथितार्थ निकोलस रोरिच याने काढलेला आहे तो असा:

“एका बेटावर तीन संन्यासी राहत होते. ते अगदी सरळ साधेभोळे होते. ते फक्त एकच प्रार्थना करीत. “आम्ही तिघेजण आहोत. तूही त्रिमूर्तीच आहेस. आमच्यावर कृपादृष्टी ठेव.” आणि ही अशा तऱ्हेची विलक्षण पण अभिनव प्रार्थना करीत असताना मोठे चमत्कार घडून येत.

तेथल्या परिसरातला जो पाद्री [2] होता त्याच्या कानांवर संन्याशांची ही हकीकत आली व त्यांच्या ह्या निषिद्ध जगावेगळ्या प्रार्थनेचा प्रकारही त्याच्या कानांवर आला. त्याने असे ठरविले की, संन्याशांना भेटावे व त्यांना परमेश्वराची शास्त्रशुद्ध प्रार्थना कशी करावी, हे शिकवावे. तो त्या बेटावर गेला व त्या संन्याशांना भेटला. त्यांना त्याने समजावून सांगितले, “बाबांनो, ही जी तुमची प्रार्थनेची तऱ्हा आहे ती अगदी गावंढळ आहे.” असे म्हणून त्याने त्यांना पद्धतशीर प्रार्थना कशी करतात ते शिकविले. नंतर पाद्रीमहाराज परत निघाले. नावेत बसले आणि त्यांनी पाठीमागे वळून पाहिले, तो काय, नावेच्या दिशेने लगोलग येत असलेला एक मोठा प्रकाशाचा झोत त्यांना दिसला. तो झोत थेट नावेपर्यंत येऊन पोचल्यावर त्यांना त्यात ते तिघे संन्यासी दिसले. त्यांनी एकमेकांचे हात धरले होते व नाव गाठण्यासाठी पाण्यावरून धावतच ते येत होते.

पाद्रीमहाराजांपर्यंत येऊन पोचल्यावर ते मोठ्याने ओरडून म्हणाले, “महाराज, तुम्ही शिकविलेली प्रार्थना आम्ही विसरून गेलो. आता पुनः आम्हांस ती समजावून सांगा. आणि म्हणून आम्ही असे धावत धावत आलो.”

पाद्रीमहाराज घाबरून गेले. नुसते डोके हालवूनच त्यांनी नम्रपणे उत्तर दिले, “बाबांनो तुम्ही जशी प्रार्थना करीत असता तीच चालू ठेवा.”

आता हे तिघे संन्यासी पाण्याच्या प्रवाहावर कसे चालू शकले?

येशू ख्रिस्त क्रूसावरून पुनः जिवंतपणे कसा बाहेर आला?

लाहिरी महाशय व श्रीयुक्तेश्वरजी चमत्कार कसे करून दाखवीत?

आधुनिक भौतिक शास्त्रात ह्याला उत्तर नाही. अजूनपर्यंत तरी नाही. आता अणुयुगास सुरुवात झाली आहे. माणसाच्या मनाची झेप उंचावली आहे. ‘अशक्य’ ह्या शब्दाचा वापर मानवाच्या शब्दकोशात आता हळूहळू कमी होऊ लागला आहे.

वेदग्रंथांनुसार हे ऐहिक जग म्हणजे *माया* आहे. ही माया सापेक्षता व द्वैत यांमधून निर्माण झाली आहे. परमेश्वर जो आहे, तो पूर्णतया एकमेव आहे. फक्त तोच त्यानेच निर्माण केलेल्या वस्तुमात्रांमध्ये वेगळासा व भिन्न-भिन्न स्वरूपांत आढळून येतो. त्याचे हे आवरण, त्याने

निर्मिलेली सृष्टी खोटी आहे; मिथ्या आहे. हे जे द्वैतभावाचे मोहमयी आवरण म्हणजेच माया. [3] प्राचीन ऋषिमुनींचा हा साधासुधा सिद्धान्त आता आधुनिक शास्त्रीय शोधांनी मान्य केलेला आहे.

न्यूटनचा गतिविषयक जो सिद्धान्त आहे, तो म्हणजे मायाविषयकच सिद्धान्त होय. न्यूटन म्हणतो, "कोणत्याही प्रेरणेला तिच्याशी तुल्यबल व तिच्या विरुद्ध दिशेने प्रेरित होणारी प्रतिप्रेरणाही नित्य असतेच. दोन वस्तूंमधील परस्परसंबंधीच्या क्रिया ह्या नेहमी समतुल्य व परस्परविरोधी असतात." क्रिया व प्रतिक्रिया ह्या अशा तऱ्हेने समतुल्य व विरुद्ध दिशांनी कार्य करीत असतात. "केवळ एकटीच अशी प्रेरणा संभवत नाही. प्रेरणांचे हे द्वंद्व नेहमीचेच आहे; समतुल्य व परस्परविरोधी दिशांनी चालणारे."

साऱ्या मूलगामी नैसर्गिक क्रियांचा उगम हा मायेतून निर्माण होतो. उदाहरणार्थ, वीज घ्या. अपसरण व आकर्षण तेथे आहेच. ऋणधर्मी विद्युत्कण (Electrons) व धनधर्मी विद्युत्कण (Protons) असे परस्परविरोधी चुंबक आहे. त्याला धन ध्रुव (Pole) व ऋण ध्रुव हे आहेत. सृष्टीची ही सारी घडण ह्या धन व ऋण ध्रुवांच्या नियंत्रणाखाली आहे. पदार्थविज्ञानशास्त्रातील, रसायनशास्त्रातील किंवा इतर कोणत्याही भौतिक शास्त्रातील कोणताही सिद्धान्त घ्या. प्रत्येक सिद्धान्तामध्ये ही परस्पर-विरोधी असलेली तत्त्वांची जुळण, जोडणी अगदी पहिल्यापासून आढळून येते.

सारांश, भौतिक शास्त्रे मायेच्या पलीकडे आपले असे काही वेगळे सिद्धांत मांडू शकत नाहीत. सर्व सृष्टीची घडण व हा सारा प्रपंच मायेने उभारलेला आहे. निसर्ग म्हणजे मायाच. भौतिक शास्त्रांना ही मायेची गुंतवण पत्करूनच, पुढे मार्ग काढावा लागतो. निसर्गाचे अधिराज्य आपल्या परीने अपार व शाश्वत आहे. भविष्यकाळातील शास्त्रज्ञ सुद्धा निसर्गाच्या ह्या विविध अनंतत्वामध्येच एका रहस्यामागोमाग दुसरे रहस्य शोधून काढण्यापलीकडे काही करु शकत नाहीत. भौतिकशास्त्रांची गती ही अशी निरंतर कुंठित होते. तिला अंतिम निर्णायक सिद्धांत मांडता येत नाहीत. अगोदरच अस्तित्वात असलेल्या व कार्य करीत असलेल्या विश्वाचे नियम ही शास्त्रे शोधून काढू शकतील. पण ह्या अखिल विश्वाचा कर्ता व एकमेव नियंता कोण आहे, हे शोधून काढण्याची त्यांची ताकद नाही. गुरुत्वाकर्षण व विद्युत् यांचे हे भव्य विराटस्वरूपी सामर्थ्य आता समजून चुकले आहे. पण गुरूत्वाकर्षण व विद्युत् यांचे वास्तविक स्वरूप काय आहे याचा कोणालाही अद्याप पत्ता लागलेला नाही. [4]

अशा ह्या मायेचा पगडा दूर सारण्याचे महाकठीण कर्म मनुष्यजातीवर हजारो वर्षापूर्वी होऊन गेलेल्या ऋषिमुनींनी, द्रष्ट्यांनी टाकून दिलेले आहे. सृष्टीमधील द्वैतभावाच्या पलीकडे जाऊन विधात्याच्या अद्वैत स्वरूपाची ओळख करून घेणे, हे मनुष्याचे सर्वोच्च ध्येय मानले गेलेले आहे. जे मायेच्या मोहात गुंतून पडतात, त्यांना ही विरोधी द्वंद्वाची जाचणूक सहन करावी लागते. ही अगदी अपरिहार्य आहे. भरती आणि ओहोटी; उदय आणि अस्त; दिवस आणि रात्र; सुख आणि दुःख; चांगले आणि वाईट; जन्म आणि मरण. जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून हजार-एक वेळा फिरून आल्यावर मानवाला ह्या कालचक्राचा अथवा पुनः पुन्हा

तीच द्वंद्वे, तीच सुखदुःखे अनुभविण्याचा कंटाळा येतो व मग त्याला ही सगळी मायेची जबरदस्ती आहे हे कळून येते व मग तो मायेच्या जाळ्यातून बाहेर पडण्यास तयार होतो व त्यापलीकडे आशाळभूत नजरेने पाहू लागतो.

मायेचा पडदा बाजूला सारणे म्हणजे ह्या विश्वनिर्मितीचे गूढ उकलणे होय. विश्वाचे असे हे स्वरूप जो उघडे करतो तोच खरा एकेश्वरवादी. बाकीचे सगळे अधार्मिक मूर्तिपूजक. जोपर्यंत मनुष्य हा ह्या द्वैतमयी मायेच्या मोहात गुरफटून राहत आहे, तोपर्यंत त्याचे दैवत म्हणजे ही अक्राळविक्राळ माया. त्याला खऱ्या एकमेव परमेश्वराची ओळख होणे शक्य नाही.

ही विश्वमोहिनी माया माणसाच्या मनात अविद्या निर्माण करते. शब्दशः अविद्या म्हणजे ज्ञानाचा अभाव, अज्ञान, भ्रम. माया किंवा अविद्या यांचा नाश बौद्धिक युक्तिवादाने किंवा शाब्दिक पृथःकरणाने होऊ शकत नाही. फक्त निर्विकल्प समाधी साध्य केल्यावरच हा मायामोह नष्ट होतो. ‘जुन्या करारा’तील प्रेषित व निरनिराळ्या देशांत व युगांत होऊन गेलेल्या द्रष्ट्यांनी मनाच्या ह्याच अवस्थेतून, तुरीयावस्थेतून ही गोष्ट जगाला स्पष्ट करून सांगितली आहे.

ईझिकेलने म्हटलेले आहे [5] : “त्यानंतर त्याने मला एका दरवाजापाशी आणले. तो दरवाजा पूर्वाभिमुख होता; आणि चमत्कार पहा की, इस्रायलच्या परमेश्वराचे सारे वैभव त्या पूर्वदिशेतून प्रतीत होत होते. पाण्याच्या अनेक प्रवाहांतून जसा एक विशिष्ट आवाज घुमून बाहेर पडतो तसा त्याचा आवाज ऐकू येऊ लागला आणि त्याच्या वैभवाने पृथ्वी तेजस्वी दिसू लागली.” कपाळामध्ये मधोमध (पूर्व) स्थित असलेल्या दिव्य नेत्रातून योग्यास सर्वव्यापकतेची जाणीव होते आणि पाण्याच्या अनेक प्रवाहातून एकवटलेला असा एक आवाज म्हणजे ‘ॐ’ शब्द त्यास ऐकू येऊ लागतो. प्रकाशाच्या झोतामधून ही दृष्टिगोचर सृष्टी निर्माण झाली.

विश्वाच्या कोट्यवधी रहस्यांमध्ये सर्वांत गूढ रहस्य म्हणजे प्रकाशलहरी. ध्वनिलहरीच्या वहनाला हवा किंवा इतर जड माध्यमाची जरुरी लागते; पण प्रकाशलहरी अंतरिक्षामध्ये विखुरलेल्या विविध तारकापुंजांमधून पसरलेल्या निर्वात आकाशामधून अनिर्बंधपणे जाऊ शकतात. आंदोलन सिद्धांताच्या भूमिकेत निरनिराळ्या ग्रहांच्या सभोवार प्रकाशलहरींच्या संचाराचे वहनाचे माध्यम ईथर (Ether) म्हणून मानले जाते. पण आईनस्टाईनच्या म्हणण्याप्रमाणे ईथर म्हणून काही माध्यम मानण्याची जरूरी नाही. त्याच्या मते अंतरिक्षातील आकाशाबाबत भूमितिदृष्ट्या विचार करता असे माध्यम मानण्याची आवश्यकता राहत नाही. दोन्ही विचारभूमिकांतून पाहता, प्रकाशलहरी अगदी सूक्ष्मतम व कोणत्याही जड व नैसर्गिक पदार्थावर अवलंबून नसणाऱ्या अशा आहेत.

आईनस्टाईनच्या अजस्र विचारसरणीनुसार, प्रकाशलहरीचा हा जो प्रचंड वेग आहे—दर सेकंदाला १८६,३०० मैल—ह्याने सापेक्षता-सिद्धांतावर फार मोठा परिणाम घडवून आणलेला आहे. त्याने गणिताने असे सिद्ध केले आहे की, माणसाच्या बुद्धीचा आवाका लक्षात घेता, ह्या नित्य बदलत जाणाऱ्या विश्वात एकच शाश्वत गोष्ट दिसून येते व ती म्हणजे

प्रकाशलहरींचा वेग. प्रकाशलहरींच्या ह्या शाश्वत आधारावर काल व आकाशविषयक मानवाची सर्व मूल्यमापने अवलंबून आहेत. आतापर्यंत समज असा होता की, काल व आकाश ही रहस्ये फार गूढ व पुरातन आहेत; पण आता असे समजून आले आहे की, ती एकमेकांशी संबद्ध-संलग्न आहेत; व त्यांचे मूल्यमापन करता येण्यासारखे आहे. त्यांच्या अवस्थांचे मूल्यमापन करण्याचे एकमेव साधन म्हणजे प्रकाशलहरींचा वेग.

आकाशास सापेक्षतावादातील कक्षांमध्ये सामावून घेण्याच्या कामात, कालाच्या वाजवी स्वरूपात थोडीफार छाटाछाट करावी लागते. त्यामध्ये असंदिग्ध असे काही राहतच नाही. काल व अवकाश यांची परस्पर-संबंधीची समीकरणे तयार करून आईनस्टाईनने ह्या दोघांचे स्वतंत्र अस्तित्व विश्वातून नाहीसे केले व राहता राहिली एकमेव शाश्वत व निरंतर टिकणारी चीज व ती म्हणजे प्रकाशलहरी.

ह्या विख्यात शास्त्रज्ञाने पुढे सापेक्षतावादाचा सिद्धांत अधिक विकसित व व्यापक करून, एक नवीन ‘युनिफाइड फील्ड थीअरी’ पुढे मांडली. ह्या थीअरीमध्ये गुरुत्वाकर्षणाचा नियम व इलेक्ट्रोमॅग्नेटिझमचा नियम या दोन्हींचा एका गणितसूत्राने समन्वय केला आहे. विश्वाची घटना ही एका साध्या नियमावर आधारून आईनस्टाईन पार मागे जात जात, ह्या सर्व सृष्टीची निर्मिती एका नित्य बदलणाऱ्या मायेपासून झाली आहे, [6] असे गर्जूना सांगणाऱ्या प्राचीन ऋषिमुनींपर्यंत पोचला.

सापेक्षतावादाच्या ह्या युगप्रवर्तक सिद्धांतातून अंतिम अणूबाबत गणिताच्या दृष्टीने मूलगामी संशोधन करणे शक्य झाले. मोठमोठे शास्त्रज्ञ सुद्धा आता निःसंदेहपूर्वक स्पष्ट सांगू लागले आहेत की, अणू हा पदार्थ नसून शक्ती आहे. एवढेच नव्हे, तर अणुशक्ती ही तत्त्वतः खरोखरी मनोमय (Mind stuff) आहे.

सर आर्थर स्टॅन्ले एडिंग्टन आपल्या ‘दि नेचर ऑफ दि फिझिकल वर्ल्ड’ [7] ह्या पुस्तकात लिहितात, “भौतिक शास्त्रे, ही खरोखरी पाहता, ज्या जगाचा अभ्यास करतात, संशोधन करतात ते जग हे मिथ्या आहे; आणि शास्त्रज्ञांनी याची कबुली दिलेली आहे व ही प्रामाणिकपणे दिलेली कबुली हीच खरी शास्त्रांमध्ये झालेल्या खऱ्याखुऱ्या प्रगतीची द्योतक आहे. पदार्थविज्ञानशास्त्राच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे, हा सारा प्रपंच म्हणजे एक छायांचे फार मोठे नाटक आहे. ह्या छाया सदैव अस्थिर असतात, कमी-जास्त होतात. म्हणजे माझी ही हातरूपी छाया टेबलरूपी छायेवर पडली आहे; आणि कागदरूपी छायेवर शाईची छाया पडली आहे, असेच म्हणावयास पाहिजे. हे सारे जग केवळ चिन्हात्मक आहे. म्हणून पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ चिन्हात्मक वस्तूंचा विचार करण्याचे सोडून देतो. नंतर रासायनिक मन पुढे येते. ते मन चिन्हांचे परिवर्तन करते. सारांश इतकाच की, हे सारे जग केवळ आभास आहे; मनोमय आहे.”

अलीकडे एक इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शक यंत्रा निघाले आहे. त्यातून बारकाईने पाहिले असता, अणू-परमाणू ह्यांचे अंतिम स्वरूप प्रकाशलहरींचेच असून निसर्गामध्ये सर्वत्र परस्पर-विरोधी द्वंद्व, द्वैतभाव भरून राहिलेला आहे, ही गोष्ट निखालसपणे प्रचीतीस येते. ‘अमेरिकन ॲसोसिएशन फॉर दि ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स’ या संस्थेच्या एका

अधिवेशनापुढे १९३७ साली इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शक यंत्राचे प्रात्यक्षिक झाले; त्याचा 'न्यूयार्क टाईम्स' पत्राने वृत्तान्त दिला होता तो खालीलप्रमाणे:

"टंगस्टन या धातूची स्फटिकाकृती परमाणू-रचना आतापर्यंत 'क्ष' किरणांच्या साहाय्याने, अप्रत्यक्षपणे का होईना, थोडीफार ध्यानात येत होती. पण आता ती एका विशिष्ट पडद्यावर चांगली स्पष्ट दिसून आली. पडदा, आजकालच्या ट्यूबलाईटच्या काचेप्रमाणे दिसणाऱ्या (Fluorescent) पदार्थाचा बनवलेला असतो. अशा पडद्यावर जी आकृती दिसते तिच्यामध्ये ९ परमाणू असून त्यांची परस्परांपासूनची अंतरे ठरलेली असतात; एक घनाकृती आणि तिच्या प्रत्येक कोपऱ्यात एक एक परमाणू व केंद्रस्थानी एक अशी ती परमाणूंची रचना त्या आकृतीत आढळून येते. टंगस्टन धातूच्या ह्या स्फटिकाच्या चौकटीतील परमाणू, ह्या फ्लोरेसंट पडद्यावर ज्योतीचे किंवा प्रकाशाच्या पुंजक्यासारखे, एखाद्या भूमितीमधील आकृतीसारखे आढळून येतात. अशा ह्या प्रकाशमय स्फटिक घनाकृतीमध्ये मोकळ्या जागेत हवेचे अणू इतस्ततः धक्के मारीत असताना दिसून येतात. त्यांचे हे इतस्ततः संचलन म्हणजे ज्योतिबिंदूंचा जणू नाच. सूर्याचा प्रकाश पाण्यावर पडावा व ते पाणी हलावे म्हणजे जसा सूर्याचा प्रकाश फाटल्यासारखा दिसावा, त्याचे तुकडेतुकडे झालेले दिसावे, तसा.

"इलेक्ट्रॉन्सच्या सूक्ष्मदर्शक यंत्राचे तत्त्व प्रथम १९२७ मध्ये डॉ. क्लिंटन जे. डेव्हीसन व डॉ. लेस्टर एच. गर्मर या शास्त्रज्ञांनी न्यूयॉर्क सिटीमधील बेल टेलिफोन लॅबोरेटरीमध्ये शोधून काढले. त्यांना असे आढळून आले की, इलेक्ट्रॉनचे स्वरूप दोन प्रकारांचे आहे. त्याच्यामध्ये काही गुणधर्म कणाचे आहेत व काही गुणधर्म लहरीचे [8] आहेत. लहरीच्या गुणधर्मामुळे इलेक्ट्रॉनला प्रकाशाचे गुणधर्म आले. आणि मग ज्या पद्धतींनी काचेच्या भिंगातून प्रकाशकिरण केंद्रित करता येतात त्याचप्रमाणे इलेक्ट्रॉन्सचे केंद्रीकरण कोणत्या पद्धतींनी होऊ शकेल यावर संशोधन सुरू झाले.

"इलेक्ट्रॉनचे हे जेकिल-हाइड प्रकारचे दुटप्पी गुणधर्म शोधून काढल्याबद्दल व ज्या शोधाच्या योगे, अखिल वस्तुमात्रास दोन तऱ्हेचे अस्तित्व असते, असे सिद्ध झाले त्या शोधाबद्दल डॉ. डेव्हीसन यांना पदार्थविज्ञानशास्त्रामध्ये नोबेल बक्षीस देण्यात आले."

सर जेम्स जीन्स आपल्या 'दि मिस्टिरिअस युनिव्हर्स' [9] पुस्तकात लिहितात. "ज्ञानगंगेचा ओघ आता हळूहळू ज्यात यांत्रिकतेचा लवलेशही नाही, अशा एका नितान्त सत्यस्वरूपाकडे वाहत आहे. हे सारे विश्व एक विराट यंत्र नसून, ते शेवटी एखाद्या अतिविशाल, अतिप्रगल्भ मनाच्या क्रियेसारखे, विचारासारखे भासू लागते."

विसाव्या शतकातील भौतिक शास्त्रांचे हे निवेदन वाचले म्हणजे ते जणू अतिप्राचीन वेदवचनासारखे वाटते.

म्हणजे आता भौतिक शास्त्रांकडून सुद्धा मनुष्याला असे शिकावे लागत आहे की, हे विश्व जडस्वरूपी नाही. तत्त्वज्ञानाचे अंतिम निवेदन हेच आहे की, ह्या विश्वाची सारी घडण, सारे आडवे-उभे तंतू म्हणजे केवळ भ्रम आहे. माया आहे. पृथःकरण केल्यावर तिचे खरे स्वरूप उघडे पडते; ते खोटे मृगजलवत भासते. भौतिक विश्वाचे, जड विश्वाचे कोनेकोपरे जेव्हा तो तपासून पाहावयास लागतो, तेव्हा माणसाला त्याच्या अंधश्रद्धेची जाणीव होऊ

लागते; ज्या मूर्तीची, श्रद्धेची त्याने आजवर पूजा केली, ती मूर्ती हिणकस वाटू लागते; “माझ्यासमोर असता, तुला दुसऱ्या कोणत्याही देवाची पूजा करण्याचे कारण नाही,” [10] ह्या परमेश्वरी आज्ञेची त्याला आठवण होते.

वस्तूमान आणि शक्ती किंवा ऊर्जा यांचे परस्परसंबंधीचे समीकरण आईनस्टाईनने तयार केले आहे, हे सुप्रसिद्ध आहे आईनस्टाईनने सिद्ध केलेले आहे की, पदार्थाच्या कोणत्याही एका कणामधील ऊर्जा (Energy) ही त्याचे वस्तुमान किंवा वजन आणि प्रकाशाच्या वेगाच्या वर्गाच्या गुणाकार या बरोबर असते. जड पदार्थांचे कण विदीर्ण करून अणु-ऊर्जा फार मोठ्या प्रमाणावर उत्पन्न होते. पदार्थ केवळ जडच आहे या समजुतीचे पूर्ण निराकरण होऊन, नवीन असे अणुयुग जन्मास आले आहे.

प्रकाशाचा वेग हा गणितशास्त्रात एक अधिकृत प्रमाण किंवा एक कायमसंख्याक (Constant) मानला गेला आहे. त्याचे कारण, हा वेगदर सेकंदास १८६,३०० मैल असा ठरीव आकड्यांत आहे म्हणून नसून, त्याचे खरे कारण सांगावयाचे म्हणजे कोणताही जड पदार्थ, ज्याचे वस्तुमान वेगाबरोबर वाढत जाते असा, प्रकाशाच्या वेगाची बरोबरी करु शकत नाही, हे होय. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे ज्याचे वस्तुमान हे अमर्याद आहे तोच जड पदार्थ प्रकाशाच्या वेगाची बरोबरी करु शकेल.

ही समजूत एकदा पटली म्हणजे चमत्कारांचे तंत्र समजणे सुलभ होईल.

जे सिद्धयोगी आपले शरीर व इतर जड पदार्थ प्रकट करु शकतात किंवा अंतर्धान करु शकतात; दिसेनासे करु शकतात आणि जे प्रकाशाच्या महान वेगाने गतिमान होऊ शकतात आणि जे सृष्टी निर्माण करणारे, असे हे प्रकाशकिरण क्षणार्धात दृश्य व जड स्वरूपात उतरवू—आणू शकतात, ते ह्या नियमाचाच अवलंब करतात—त्यांचे वस्तुमान अमर्याद बनते.

जो योगी पूर्ण अवस्थेला पोचलेला आहे, तो आपली जाणीव, संवेदनक्षमता स्थूल शरीराशीच फक्त निगडित, बद्ध करून ठेवीत नाही; तो ती थेट विश्वापर्यंत पोहोचवितो. आणि हे अचाट कृत्य तो अगदी सहजपणे, काही एक कष्ट न घेता करू शकतो. गुरुत्वाकर्षणास, मग न्यूटन प्रेरणा हे नाव देवो, आईनस्टाईन त्याला जडत्वाचे दृश्य स्वरूप असे नवीन नाव देवो; ते योग्याला वजनबद्ध करु शकत नाही; त्याला पृथ्वीकडे खेचू, ओढू शकत नाही. गुरुत्वाकर्षणाचे हे वैशिष्ट्य योग्याच्या बाबतीत अपवाद करते. जो स्वतःला सर्वव्यापी ब्रह्मस्वरूप समजतो, त्याला जड पदार्थांचे आकाश व कालविषयक भौतिक शास्त्रांचे नियम लागू होत नाहीत. जसा एखाद्या द्रव पदार्थात विद्राव्य पदार्थ संपूर्णपणे विरघळून जातो, त्याप्रमाणे योगी अखिल ब्रह्मांडात एकरस होऊन जातो. परमात्मस्वरूपाची अवस्था त्यास प्राप्त होते.

विश्व निर्माण करण्याच्या प्रारंभी ते त्यासाठी आवश्यक असा जो प्रकाश तो पडो, असे पहिले आवाहन, पहिली आज्ञा परमेश्वराने केली, “प्रकाश पडो आणि प्रकाश पडला.” [11] जडत्व ज्याच्या ठिकाणी बिलकुल नाही, असे जे हे माध्यम, जो प्रकाश त्याच्या शलाकांवर परमेश्वराने ही आपली विविध व्यक्त व जड स्वरूपे निर्माण केली, दाखविली. प्रत्येक युगात होऊन गेलेल्या संतमहात्म्यांनी परमेश्वराचे पहिले दर्शन म्हणजे, ज्योत व प्रकाश असेच

निश्चयपूर्वक सांगितलेले आहे. सेंट जॉन सांगतो, “त्याचे डोळे म्हणजे एक अग्नीची ज्योत; त्याची मुद्रा म्हणजे प्रत्यक्ष सूर्य; देदीप्यमान सूर्य.” [12]

ध्यानात पूर्णता मिळवून, योगी पुरुषाने आपली जाणीव, आपली संवेदनक्षमता, आपली प्रज्ञा परमेश्वराच्या ठायी विलीन केलेली असते व त्यामुळे त्याला सर्व ब्रह्मांडाचे मूलतत्त्व म्हणजे प्रकाश (चिद्‌शक्तीची आंदोलने) हे समजून चुकलेले असते. त्याच्या दृष्टीने पाणी उत्पन्न करणारे प्रकाशकिरण व दगड उत्पन्न करणारे प्रकाशकिरण यांत काही फरक नाही. जडदेहाच्या जाणिवेपासून मुक्त होऊन, अवकाशासह तिन्ही अक्षांच्या (Axes) पलीकडे जाऊन, व चौथा अक्ष, जो काल त्यालाही मागे सारून, योगी आपले ज्योतिर्मय, प्रकाशमय शरीर पृथ्वी, पाणी, अग्नी आणि हवा ह्यांच्या प्रकाशकिरणांमधून, किरणांवरून अगदी सहजपणे फिरवू शकतो.

“आणि जर तुला फक्त एकाच डोळ्याने दिसणे शक्य झाले, तर तुझे सारे शरीर प्रकाशमय होईल.” [13] जीवन्मुक्ती साध्य करून देणाऱ्या तिसऱ्या डोळ्यावर, तृतीय नेत्रावर, दीर्घधारणा केल्याने योग्यास जडसृष्टीचा आभास, तिचे अस्तित्व, जड पदार्थांस खेचून धरणारे गुरुत्वाकर्षण, हे सर्व नाहीसे करता येते. परमेश्वराने प्रथम जशी सृष्टी निर्माण केली, त्या अवस्थेत त्याला ती दिसू शकते; एक अविभिन्न, प्रकाशाचा प्रचंड लोळ.

हार्वर्डचे डॉ. एल. टी. ट्रोलँड आपल्यास सांगतात की, “प्रकाशाने निर्माण केलेली प्रतिबिंबे आपल्या साध्या ‘हाफ-टोन’ कोरण्यांच्या (Engravings) तत्त्वावरच झालेली असतात. म्हणजे ती प्रतिबिंबे अगदी बारीक ठिपक्यांची बनलेली असतात. ते ठिपके इतके सूक्ष्म असतात की, साध्या डोळ्यांना ते दिसत नाहीत; पण नेत्र-पडद्याची संवेदनक्षमता इतकी प्रचंड असते की, हे किरण बरोबर पडले, तर संख्येने कमी असूनही पडद्यावर दृष्टीचा परिणाम करु शकतात.”

*आणि ज्या मनुष्याला सर्व सृष्टीच्या निर्मितीचे मर्म हे प्रकाशातच अंतर्भूत आहे, हे साक्षात्काराद्वारा समजलेले आहे, तो मनुष्य चमत्कार करून दाखवतो* . योगी पुरुषास प्रकाशाचे हे दिव्य ज्ञान माहीत झालेले असते व ह्या ज्ञानाच्या बळावर तो, अदृश्य असे प्रकाशांच्या किरणांचे पुंजके व्यक्त व दृश्य स्वरूपात आणू शकतो; स्थूल करु शकतो. ते स्थूल स्वरूप मग कोणत्याही जड पदार्थाचा आकार घेते. (झाड, औषधी, मानवी शरीर वगैरे.) त्यास कोणता आकार द्यावा, हे तो योगी पुरुष आपल्या इच्छेनुसार व दृष्टिक्षमतेनुसार ठरवितो.

मनुष्य झोपेत स्वप्नावस्थेत असतो आणि त्या वेळेपुरता त्याला दिवसभरातील अहंकारयुक्त, खोट्या व तोटक्या देहधर्मांचा विसर पडतो. झोपेत त्याचे मन स्वैरपणे कोठेही पुनः पुनः भराऱ्या मारून येते. स्वप्नात तो आपल्या जुन्या दिवंगत प्रिय मित्रांना भेटून येतो; त्रिखंडात फिरून येतो. आपले बालपण, आपला स्मृतिशेष झालेला भूतकाळ डोळ्यांसमोर आणतो.

ही जी सामान्य माणसांची अनिर्बंध व स्वैरपणे संचार करणारी, स्वप्न म्हणून ओळखिली जाणारी मनाची अवस्था, ह्याच अवस्थेत साक्षात्कार झालेला संत-महात्मा कायमचा व पूर्णपणे विलीन झालेला असतो. त्याने काल व आकाश यांच्यावर विजय मिळविलेला असतो. त्याला वैयक्तिक आकांक्षा अशा काही उरलेल्या नसतात. साक्षात्कार झालेला असल्यामुळे, वाटेल ती वस्तू निर्माण करण्याचे इच्छासामर्थ्य त्याच्या ठायी आलेले असते. आणि त्या इच्छासामर्थ्याच्या जोरावर तो भक्ताच्या कळकळीच्या विनंतीनुसार विश्वाच्या प्रकाशरूप अणूंची योग्य ती पुनर्रचना करु शकतो.

"आणि मग परमेश्वर म्हणाला: आता आपण आपल्या प्रतिमेसारखा मनुष्य बनवू या; आपल्यासारखाच त्याला घडवू या आणि त्याला जलचर, भूचर व विहग यांच्यावर स्वामित्व देऊ या. म्हणजे पाण्यातील मासे, पृथ्वीवर वावरणारे पक्षी वगैरे, गुरेढोरे, हवेत उडणारे पक्षी व जमिनीच्या पृष्ठभागावर सरपटणारे प्राणी या सर्वांवर त्याला अधिकार देऊ या." [14]

या हेतूने त्याने मनुष्य व ही सृष्टी निर्माण केली; का की, माणसाने सृष्टीवर दिलेले हे वर्चस्व ओळखून मायेवर मात करावी.

१९१५चे साल असावे. नुकताच मी स्वामी परंपरेत संन्यासाश्रमाचा स्वीकार केला होता; आणि एका चमत्कारिक दृश्याचे मला दर्शन झाले. त्या दृश्यात मनुष्यमात्रास भासमान होणारी शरीरसंवेदना व तिचे तारतम्य हे हुबेहूब दाखविले होते. मायेच्या दुःखदायी द्वैतापाठीमागे एका शाश्वत प्रकाशाचे अद्वैत स्वरूप माझ्या दृष्टीला स्पष्ट दिसून आले. ते दृश्य माझ्यावर वरतून उतरू लागले. त्या वेळी मी वडिलांच्या गुरपार रोडवरील घरात एका लहानशा पोटमाळेवजा खोलीत सकाळचा बसलो होतो. पहिल्या महायुद्धाची त्या वेळी बरेच महिने धुमश्चक्री चालू होती. नित्य असंख्य माणसे मृत्युमुखी पडत, त्याचे मला फार वाईट वाटे.

मी ध्यान करू लागलो व डोळे मिटले. माझ्या डोळ्यांसमोर एकदम एक युद्धनौका दिसू लागली. युद्धनौका, तिचा कप्तान, त्याचे शरीर; त्या शरीराशी मी मनाने एकरूप झालो. समुद्रकिनाऱ्यावरील आणि जहाजावरील तोफा यांच्यामध्ये गोळागोळी सुरू झाली; आणि त्या आवाजाने दशदिशा दणाणून निघाल्या. किनाऱ्यावरून एक मोठा तोफेचा गोळा आमच्या जहाजावर आला आणि तो जहाजाच्या पावडर मॅगझीनवर जोराने आदळला व जहाजाचे दोन तुकडे झाले. मी पाण्यात उडी टाकली. ह्या स्फोटातून जे काही थोडे खलाशी वाचले त्यांनीही माझ्याबरोबर पाण्यात उड्या टाकल्या.

हृदय धडधडत असताना मी किनाऱ्याला नीट लागलो; पण काय दुर्दैव! तिथे पोचल्यावर सुद्धा एक अचानकपणे सुटलेली गोळी माझ्या छातीत शिरली व रुतून बसली. वेदनेने मी अगदी तळमळून गेलो. माझे सारे शरीर जणू अचेतन होऊ लागले. झोपी गेलेल्या माणसाला आपल्या हातापायांची जेवढी संवेदना असते, तितकीच संवेदना माझ्या शरीराची मला त्या वेळी त्या बेहोष स्थितीत झाली.

मला वाटले की शेवटी मृत्यूची चाहूल मला लागली. मृत्यूचा पाश माझ्या गळ्याभोवती लागला असावा. आणि आता या शरीराचा शेवटचा हुंदका द्यावा व पूर्ण बेहोष स्थितीत पडावे,

असा जो मी विचार करीत आहे, तोच एकदम दृश्य पालटले व मी पुनः स्वतःला या जगात गुरपार रोडवरील खोलीमध्ये पद्मासन घालून बसलेला असा पाहता झालो.

माझ्या डोळ्यांतून झपाटल्या स्थितीतल्यासारखे अश्रू आले. मी खरोखरीच जिवंत आहे की नाही, हे पाहण्याकरिता मी माझ्या हातापायांना चिमटे घेऊन पाहिले. थापटून पाहिले. छातीत गोळी कुठे रुतून बसली आहे, हे चाचपून पाहू लागलो. गोळी कुठे हातास लागेना. किती हायसे मला वाटले! मी इकडे तिकडे गडबडून लोळून पाहिले. श्वास, उच्छ्वास घेऊन मी खरोखरी जिवंत आहे की नाही, हे पाहून घेतले आणि मी खरोखरीच जिवंत आहे, म्हणून समाधानाचे उद्‌गार जो काढतो आहे, तो काय; जहाजाचा कप्तान जो स्फोटात ठार झाला, त्याचे किनाऱ्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेले शरीर माझ्या डोळ्यांसमोर आले; त्या शरीराशी माझे भान एकरूप झाले. आता माझ्या मनाचा पुरता गोंधळ उडून गेला.

मी देवाची प्रार्थना केली. विचारले, “देवा, खरोखरी सांग, मी जिवंत आहे की मेलेलो आहे?”

आणि एवढ्यात साऱ्या क्षितिजावर प्रकाशाचा तेजस्वी झोत भरून राहिला. त्या प्रकाशात गरजणारे एक आंदोलन निर्माण झाले व त्यातून मेघगर्जनेसारखी वाणी बाहेर पडली:

“जीवन व मरण याचा प्रकाशाशी काय संबंध आहे? माझ्याच प्रकाशाची प्रतिमा, तुझ्यामध्ये ओतून मी तुला निर्माण केले. जीवित व मरण यांचा परस्परांशी संबंध म्हणजे विराट देहातील एक स्वप्नच होय. स्वप्नविरहित असे तुझे अस्तित्व तू जाण. ऊठ, माझ्या वत्सा, ऊठ.”

मनुष्य झोपेतून जसा पायरीपायरीने जागा होतो, त्याच पद्धतीने परमेश्वर शास्त्रज्ञांना ह्या सृष्टीची रहस्ये योग्य वेळी व स्थळी उकलण्यासाठी प्रवृत्त करतो. पुष्कळ आधुनिक शोधांमुळे माणसाला कळून चुकले आहे की, विश्व हे एकाच गोष्टीचे—प्रकाशाचे विविध असे व्यक्त स्वरूप आहे; आणि ही विविधता निर्माण करण्याच्या कामी दैवी प्रज्ञा, बुद्धी कार्य करते. हल्लीचे निरनिराळे आश्चर्यकारक शोध, उदाहरणार्थ, रेडिओ, टेलीविजन, रडार, सर्व निरीक्षक विद्युत् नेत्र अशी फोटो इलेक्ट्रिक सेल ह्या सर्वांचे तत्त्व प्रकाशलहरींच्या विद्युत्-चुंबकीकरणावर (Electro magnetic) आधारलेले आहे.

चलच्चित्रकला कोणताही चमत्कार दाखवू शकेल. दृश्य स्वरूपात दाखविण्याच्या दृष्टीने ट्रिक-फोटोग्राफी कोणताही चमत्कार करून दाखवू शकते. उदाहरणार्थ, आपल्या जड देहातून मनुष्य बाहेर पडून पारदर्शक, धूम्रमय अशा लिंग देहात तो प्रवेश करीत आहे, असे दाखविता येते. मनुष्य पाण्यावरून चालत आहे, मृतांना जिवंत करीत आहे, नैसर्गिक घटनांचा क्रम उलटा फिरवीत आहे, अशी अनेक दृश्ये करून दाखविता येतात. सारांश, काल व स्थल यांच्या संबंधाने ही ट्रिक-फोटोग्राफी अगदी कहर करून टाकू शकते. जो त्यातला तज्ज्ञ आहे तो ही फोटोग्राफिक प्रतिमाचित्रे आपल्याला जशी पाहिजेत, त्या त्या पद्धतीने जुळवितो व सामान्य माणसाच्या डोळ्यांना चमत्कार करून दाखवितो, अगदी अशाच पद्धतीने सिद्धयोगी प्रत्यक्ष अशा प्रकाशकिरणांस मूर्त, स्थूल स्वरूप देऊन चमत्कार करून दाखवितो.

चलच्चित्रे ही वस्तूंच्या हुबेहूब प्रतिमा उलट-सुलट करून दाखवितात, त्यावरून ह्या सृष्ट पदार्थांच्या बाबतीत पुष्कळ बोध होतो. विश्वनियंता जो परमेश्वर हा एक नाटक-लेखक आहे आणि निरनिराळ्या युगांकरिता, काळाकरिता साजेशी, शोभणारी अशी असंख्य पात्रे तो योजितो. अगदी प्राचीन तमोयुगापासून तो प्रकाशकिरणांचे झोत टाकून, निरनिराळ्या युगांत, कालात फिल्मस्—चित्रे पडद्यावर दाखवितो. कालांतराने ही चित्रे अवकाशाच्या सांदीकोपऱ्यात, अडगळीत पडून राहतात.

जशी ही सिनेमातील चित्र पाहणाऱ्याला खरी वाटतात, पण वस्तुतः ती प्रकाश व छाया —पांढरा व काळा रंग एकमेकांत आलटून-पालटून कमीजास्त प्रमाणात मिसळून निर्माण केली जातात, त्याचप्रमाणे विश्वातील ही विविधता अशीच आभासमय आहे. हे निरनिराळे ग्रहगोल व त्यांवरील असंख्य योनींमधील जीवमात्र हे खरे अस्तित्वातच नाहीत. एका विराटस्वरूपी सिनेमाच्या पडद्यावरील ही चित्रेच आहेत. ह्या अनंत सृष्टि-निर्मितिद्वारा मनुष्याच्या मनोपटलावर ही क्षणभर, अल्पकाल टिकणारी दृश्ये टाकली जातात. मनुष्याला मात्र आपल्या पंच ज्ञानेंद्रियांच्या प्रभावामुळे ती खरी वाटतात इतकेच.

सिनेमाला जाणाऱ्या प्रेक्षकाने जरा वर पाहावे, म्हणजे त्याला असे आढळून येईल की, पडद्यावरची सारी चित्रे एका प्रतिबिंबविहीन प्रकाशाच्या झोतातून पडद्यावर स्पष्ट व सुसंबद्ध दिसत आहेत. त्याचप्रमाणे हे विविध रंगरूपांचे विश्वरूपी नाटक, असेच एका पांढऱ्या प्रकाशातून महाव्योमाच्या उगमापासून बाहेर व्यक्त होत आहे. परमेश्वराचे चातुर्य अगाध आहे. तो आपल्या लाडक्या मुलांसाठी हे अतिविराटस्वरूपी जणू खेळणे, त्यांच्या मनोरंजनासाठी घडवीत असतो. ह्या पृथ्वीग्रहाच्या रंगमंचावर तो आपल्या मुलांना नट म्हणून काम करावयाला लावतो व प्रेक्षक म्हणून नाटक पाहावयासही लावतो.

युरोपमधील रणभूमीवरचे वृत्त देणारे चलच्चित्र पाहावे म्हणून, एकदा मी सिनेमागृहात गेलो. पश्चिमेत पहिले महायुद्ध चालूच होते. चलच्चित्राने मनुष्यसंहार इतक्या भयानक रीतीने व जशाचा तसा दाखविला की, मला ती दृश्ये पाहवेनात; व्यथित मनाने मी सिनेमागृहातून बाहेर पडलो.

"परमेश्वरा," मी त्याची प्रार्थना केली, "का बरे इतके दुःख इतक्या यातना निर्माण करतोस?"

आणि काय सांगावे? आश्चर्यच खरोखरी! एका क्षणात माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले. माझ्या डोळ्यांसमोर युरोपातील रणभूमीचे प्रत्यक्ष दृश्य उभे राहिले. त्या रणभूमीवर माणसे मरून पडलेली होती; काही मरत होती. ह्या दृश्यांमधील क्रौर्य कमालीचे. आतापर्यंत सिनेमाच्या चित्रपटातसुद्धा इतके करुण, भेसूर दृश्य कोणी दाखविले नसेल!

"नीट पाहा," एक सौम्य आवाज माझ्या अंतर्ज्ञानाला ऐकू आला. "हे पाहा, ही फ्रान्सच्या रणभूमीवरील प्रत्यक्ष लढाईची दृश्ये. पण ही खरी नव्हेत. काळ्या व पांढऱ्या आकृती आलटून-पालटून दिसत आहेत एवढेच. ही दृश्ये म्हणजे त्या महान विराट स्वरूपाचीच चलच्चित्रे होत. तू जो आताच थिएटरमध्ये चित्रवार्तापट पाहिलास त्यामधल्यासारखीच खरी व खोटी चित्रे. खेळात खेळ."

माझ्या मनाचे तरीही समाधान होईना. दिव्य वाणी पुढे ऐकू आली: “सृजन म्हणजे प्रकाश व छाया दोन्हीही. त्याखेरीज कोणतेही चित्र काढता येणार नाही. मनाचा भलेपणा व वाईटपणा यांचा वरचढपणा त्यात आलटून-पालटून दृष्टोत्पत्तीस येतो. ह्या जगात माणसाला जर आनंदच सारखा मिळत राहिला तर त्याला हे जग सोडून दुसऱ्या लोकात जावेसे वाटणार नाही. या सुखात रममाण झाल्याने, प्राणिमात्राचे जे अंतिम शाश्वत स्थान, परमात्मपद याचा त्याला पूर्णपणे विसर पडलेला असतो. आपत्ती आली म्हणजे त्या शाश्वत स्थानाची आठवण त्यास होऊ लागते. मुक्तीचा मार्ग ज्ञानातूनच निघतो. मृत्यूने ओढविलेली आपत्ती, ही खरी आपत्ती नव्हे. मृत्यूचे ज्याला भय वाटते, त्याची स्थिती नाटकातील एखाद्या भाबड्या नटासारखी असते. त्या नटाच्या अंगावर गोळी झाडली पण ती गोळी खोटी असते हे त्याला समजत नाही. खरोखरीची गोळी लागली म्हणून मरणाच्या भीतीने तो खरोखरीच खाली जमिनीवर मरून पडतो. माझी मुले, ही लेकरे प्रकाशातून निर्माण केलेली आहेत. ह्या मायेच्या मोहनिद्रेत त्यांना मी कायमची पडू देणार नाही.”

मायेच्याविषयी मी निरनिराळ्या शास्त्रपुराणांत पुष्कळ वाचलेले होते. पण ते वाचून मला इतकासा बोध झाला नव्हता. आता हा दृष्टान्त व त्याबरोबरची उद्घोषित झालेली ही दिव्य वाणी यांनी जो मला संदेश दिला, त्याने हे रहस्याचे खरे गूढ अंतरंग उकलून दाखविले व मनाला समाधानाचा दिलासा दिला. ही सारी सृष्टी म्हणजे एक विराट चलच्चित्र आहे; त्यात दुसरे काही नाही. मनुष्य त्या चित्रात जो वावरताना दिसतो, तो खरोखरीचा वावरत नाही, त्याचे खरे अस्तित्व त्यापलीकडे आहे, अशी एकदा माणसाच्या मनाची खात्री करून दिली म्हणजे त्याच्या या जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल होतो.

मी हे प्रकरण लिहून पुरे केल्यानंतर बिछान्यावरच पद्मासन घालून बसलो. खोलीत [15] आच्छादन घातलेल्या दोन दिव्यांचा अंधुक प्रकाश पडलेला होता. मी वरती पाहिले. तक्तपोशीवर तिळाएवढ्या पिवळसर ठिपक्यांचा जमाव जमत असल्याचे आढळून आले. त्या ठिपक्यांची चमक रेडियमसारखी मधूनमधून लुकलुकणारी व हलणारी दिसत होती. त्या ठिपक्यांतून असंख्य काट्यांसारखे प्रकाशकिरण पावसाच्या सरीसारखे एकत्र जमून त्यांचा एक पारदर्शक झोत बनून माझ्यावर अगदी निःस्तब्धपणे वर्षाव होऊ लागला.

आणि एकदम माझ्या शरीराचे जडत्व, नाहीसे झाले आणि त्याचे सूक्ष्म-लिंगदेहात परिवर्तन झाले. मी हवेत तरंगत आहे, बिछान्यावरचा माझा स्पर्शसंबंध तुटत चालला आहे, माझे वजनरहित हलके शरीर थोडे डाव्या बाजूला, थोडे उजव्या बाजूला कलू लागले आहे असे मला वाटू लागले. मी खोलीत सभोवार पाहिले. भिंत, टेबल, खुर्ची वगैरे जसेच्या तसे होते. परंतु सुरुवातीस लहान दिसणारा प्रकाशाचा पुंजका, आता जास्त जास्त फुगीर बनत चालला होता व त्यामुळे खोलीतली तक्तपोशी दिसेनाशी झाली होती. मी आश्चर्यचकित झालो.

“ही ह्या विराट चलच्चित्राची यांत्रिक रचना आहे.” त्या प्रकाशामधून एक स्पष्ट वाणी ऐकू आली. “तुझ्या बैठकीवरील पांढऱ्या पडद्यावर त्या प्रकाशाचा झोत पडत आहे व त्यामुळे

तुझ्या शरीराचे चित्र उमटत आहे. पण तुझे शरीर म्हणजे केवळ प्रकाश; दुसरे काही नाही."

मी माझ्या हातांकडे पाहिले व ते मागेपुढे फिरविले. पण त्यांचा जडपणा, स्थूलपणा मला भासेना. माझ्या आनंदाला पारावर नाहीसा झाला. माझे शरीर म्हणजे अखिल ब्रह्मांडास भरून टाकणाऱ्या प्रकाशाची जणू एक शलाका. ते म्हणजे चित्रपटगृहातल्या प्रॉजेक्शन-खोलीमधून बाहेर पडलेल्या प्रकाशाच्या झोतातून पडद्यावर पडलेले एक दिव्य चित्र.

ह्या माझ्या शरीराचा, ह्या चलच्चित्राचा, खोलीतील बिछान्यावर अंधुक प्रकाशात मी बराच वेळ अनुभव घेत होतो. आतापर्यंत मला अनेक दृष्टान्तासारखी दृश्ये दिसली; पण हे दृश्य काही वेगळेच. माझ्या ह्या स्थूल देहाचे हे मोहजाल जेव्हा पुरते वितळले आणि सर्व वस्तुमात्राचा गाभा हा केवळ प्रकाशस्वरूप आहे, हे मला अगदी पूर्णपणे समजले, तेव्हा मी वरवर उचंबळून येणाऱ्या जीवनोन्मादाच्या (लाइफ-ट्रॉन्सच्या) फवाऱ्यांकडे नुसता पाहतच राहिलो; आणि तळमळीने विनवणी केली—

"हे ज्योतिर्मय अनंता, ह्या माझ्या दीन देहाचे चित्र तुझ्या दिव्यरूपात सामावून घे. एलिजाला नाही का तू एका ज्योतिरूप रथातून स्वर्गांत तुझ्याकडे ओढून घेतलेस?" 16

ही माझी विनवणी अगदी विलक्षण होती. तो प्रकाशाचा स्रोत नाहीसा झाला. माझ्या शरीराने पुनरपि वजन व जडता धारण केली. मी बिछान्यावर कोसळून पडलो. तक्तपोशीवरचे चमकणारे व लुकलुकणारे तेजस्वी ठिपक्यांचे पुंजके मिणमिण होऊ लागले व काही वेळाने विझून गेले. ह्या जगाचा निरोप घेण्याची माझी वेळ अद्याप आली नाही, हे मात्र खरे होते.

एक तात्त्विक विचार मनात येऊन गेला—'हा कल्पनाविलास एलिजाला कदाचित पटणार नाही.'

---

1 टॉलस्टॉय यांची विचारसरणी महात्मा गांधींच्या विचारसरणीशी पुष्कळच जुळत असे. अहिंसेच्या सिद्धांतावर ते एकमेकांना लिहीत असत. टॉलस्टॉय यांच्या मताप्रमाणे येशू ख्रिस्ताच्या शिकवणीचे सार अशा शब्दांत आहे: "अपकाराचा प्रतिकार अपकाराने करू नका." (मॅथ्यू ५:३९, बायबल) अपकाराचा प्रतिकार उपकाराने किंवा प्रेमानेच करावा.

2 ह्या गोष्टीस थोडी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. संपादकाच्या एका टीपेवरून असे कळते की, हे जे पाद्री होते ते आर्चेंजलहून स्लोव्हेट्स्की मठाकडे जात होते व त्यांना हे तिघे संन्यासी वाटेत भेटले. हा मठ द्विना नदीच्या मुखावर आहे.

3 पृष्ठ ६० वरील टीपा पाहाव्यात.

4 प्रसिद्ध संशोधक मार्कोनी याने शास्त्रांच्या अंतिम असमर्थत्वाची कबुली खालील शब्दांत दिलेली आहे: "जीव म्हणजे काय हे गूढ उकलण्याच्या कामी भौतिक शास्त्रे निखालसपणे असमर्थ ठरली आहेत. ही वस्तुस्थिती फार भयानक आहे. पण एकाच गोष्टीमुळे ती भयानकता कमी झालेली आहे. ती गोष्ट म्हणजे श्रद्धा. जीवाचे गूढ ही खरोखरी एक मोठी कठीण समस्या मनुष्याच्या विचारशक्तीपुढे कायमची उभी ठाकलेली आहे."

5 ईझिकेल ४३:१-२ (बायबल).

6 आईनस्टाइन ला पूर्ण विश्वास होता कि विद्युत् चुंबकत्व आणि गुरुत्वाकर्षण यामधला संबंध एक गणितीय सुत्रा द्वारे व्यक्त करणे शक्य आहे. (द युनिफाइड फील्ड थीअरी). हे पुस्तक लिहिण्यात येत असतांना ते ह्या विषयावर कार्य करीत होते. आपले कार्य पुरे होत पर्यंत ते जगले नाहीत, तथापी पुष्कळसे आधुनिक पदार्थ शास्त्रज्ञ त्यांच्या मताला मान देतात की असला संबंध कधी तरी शोधून घेण्यात येईल.

7 मॅकमिलन कंपनी.

8 म्हणजे, पदार्थ व शक्ती दोन्हीही.

9 केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस.
10 एक्झोडस २०:३ (बायबल).
11 जेनेसिस १:३ (बायबल).
12 रेव्हेलेशन्स १:१४-१६ (बायबल).
13 मॅथ्यू ६-२२ (बायबल).
14 जेनेसिस १:२६ (बायबल).
15 एन्सिनिटास, कॅलिफोर्निआ येथील सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपच्या आश्रमातील ही खोली. (प्रकाशकांची टीप)
16 II किंग्स २:११ (बायबल).

'चमत्कार' म्हणजे साधारणपणे एखादा परिणाम किंवा एखादी घटना की जिला कोणताही नियम लागू नाही; किंवा जी कोणत्याही अशा नियमांपलीकडे असते. ह्या आपल्या विश्वाची रचना अगदी काटेतोलपणे आखलेली आहे व त्यामधील साऱ्या घटना या अगदी सूत्रबद्ध असतात व सूत्रानुसार या स्पष्टपणे समजावून सांगता येतात. सिद्धयोगी ज्या सामर्थ्यावर हे चमत्कार करून दाखवितो, त्या प्रकाराची व्युत्पत्ती अशी आहे की, सिद्धयोग्यास ह्या संवेदनांच्या अंतर्विश्वाच्या अंतरंगाच्या बाबतीत जे सूक्ष्म नियम कार्य करीत असतात, त्यांचे अगदी बिनचूक ज्ञान असते.

तसे पाहिले तर, कोणत्याही गोष्टीला खरोखरी 'चमत्कार' म्हणून संबोधता येतच नाही. व्यापक अर्थाने पाहिले तर, प्रत्येक गोष्ट, प्रत्येक घटना म्हणजे एक चमत्कारच आहे. आपल्यापैकी प्रत्येकजणास ह्या गुतागुंतीने बारकाईने घडविलेल्या देहात कोंडून ठेविलेले आहे; आणि ह्या असंख्य आकाशस्थ तारकांमधून भ्रमण करणाऱ्या पृथ्वीगोलावर त्या देहास सोडून दिलेले आहे. ह्याच्याहून कोणती गोष्ट अधिक सामान्य आहे की, अधिक चमत्कृतिपूर्ण आहे?

येशू ख्रिस्त आणि लाहिरी महाशयांसारखे सिद्ध महात्मे बहुधा अनेक चमत्कार करून दाखवितात. ह्या महात्म्यांना मानवजातीकरिता एक मोठे अवघड कार्य करावयाचे असते. जे आर्त आहेत, जे दुःखीकष्टी आहेत, व्याधिग्रस्त आहेत त्यांना चमत्कार करून दाखवून त्यांचा दुःखभार कमी करावयाचा असतो; त्यांच्या आधिव्याधी नष्ट करावयाच्या असतात. त्यांचे असाध्य रोग नाहीसे करण्यास आणि मनुष्यजातीच्या अनेक बिकट समस्या सोडविण्यास परमेश्वरी साक्षात्काराची, चमत्कारांची जरुरी असते. एक श्रीमंत मनुष्य केपरनॉम या गावी येऊन ख्राईस्टला भेटला व मरणाच्या दारी ठेपलेल्या आपल्या मुलास वाचवा म्हणून त्याने काकुळतीने विनंती केली. तेव्हा ख्रिस्ताने किंचित छद्मी उत्तर दिले, "दृष्टांत व चमत्कार पाहिल्याखेरीज तुझा विश्वास बसणार नाही;" पण त्याचबरोबर "जा बाबा जा; तुझा मुलगा वाचेल," असे म्हणून त्याने त्याच्या मुलाला वाचविले. —जॉन ४:४६-५४ (बायबल).

ह्या प्रकरणात माया ह्या संज्ञेचा मी वैदिक अर्थ दिला आहे. माया म्हणजे ह्या वास्तव जगतामध्ये व्यापून राहिलेले मोहजाल. ह्या अणुपरमाणूंनी बनलेल्या वस्तुजातामध्ये असत्चे मायाजालच व्यापून राहिलेले आहे, असे पाश्चिमात्य भौतिक शास्त्रज्ञांनी संशोधनान्ती शोधून काढिलेले आहे. माया म्हणजे त्यात सापेक्षवाद, विरोध, द्वैत, व्युत्क्रम, द्वंद्वभाव हे सारे येते. अशा मायेच्या साम्राज्यात नुसते वस्तूजातच नव्हे तर त्यात मानवाचाही (त्याच्या जड देहाचा) समावेश होतो.

मायेचे अस्तित्व फक्त ऋषि-मुनींनीच शोधून काढले असे समजण्याचे कारण नाही. जुन्या करारातील द्रष्टे मायेस सैतान नावाने ओळखतात. (शब्दशः हिब्रू भाषेमध्ये 'प्रतिपक्षी') ग्रीक करारामध्ये 'सैतान' याचा वाचक शब्द diablus किंवा Devil (भूत-पिशाच) वापरलेला आहे. सैतान किंवा माया म्हणजे एक निराकार सत्य दडविण्यासाठी अनेक रंगरूपे, अनेक आकार धारण करणारा, विश्व व्यापून राहिलेला जादूगार आहे. परमेश्वराच्या योजनेमध्ये किंवा लीलेमध्ये सैतान किंवा माया यांचे कार्य एवढेच की, मनुष्याला आत्मशोधनापासून वंचित करून जड सृष्टीकडे आकृष्ट करणे; त्याला सत्यापासून विचलित करणे.

ख्रिस्ताने मायेचे वर्णन मोठे गमतीदार केले आहे. तो मायेला 'भूत, पिशाच, खुनी, खोटे बोलणारी' असे म्हणतो. हे भूत पहिल्यापासूनच खुनी आहे. त्याला सत्याची बिलकुल कदर नाही; कारण त्याच्या ठिकाणीच सत्य नाही. ते जेव्हा खोटे बोलते, तेव्हा ते आपल्या मनचेच बोलते. ते नेहमी खोटेच बोलते. त्यानेच खोटेपणा जगात उत्पन्न केला." (जॉन ८:४४, बायबल).

"हे भूत सुरुवातीपासून खोटे बोलत आलेले आहे. त्याचकरिता ईश्वराचा पुत्र प्रगट झाला की, त्याने ह्या भूताच्या दुष्कृत्यांचा नाश करावा." (I जॉन ३:८, बायबल). म्हणजे मनुष्यामधली ख्रिस्त असल्याची जाणीव (Christ consciousness) हे मायाजाल किंवा ह्या भुताची दुष्कृत्ये विशेष त्रास न घेता नाहीसे करते. माया ही अनादी आहे. (जीजस आणि जॉन निर्देश करतात त्याप्रमाणे 'सुरुवातीपासून') कारण ह्या घडविलेल्या सृष्टीत ती मूळापासूनच समाविष्ट केलेली आहे. ही विविध सृष्टी म्हणजे चैतन्याच्या अविकारी स्वरूपास सतत विरोध करणारा व बदलत जाणारा मायेचा मल.

प्रकरण - ३१

# 31. पूज्य माताजींशी झालेली मुलाखत

"पूज्य माताजी, अगदी लहानपणीच आपल्या अवतारी यजमानांकडून मी पावन झालो होतो. ते माझ्या पित्याचे व माझे स्वतःचे गुरू जे श्रीयुक्तेश्वरजी, यांचे गुरू होते. आपल्या पवित्र जीवनातील काही थोडे प्रसंग ऐकण्याची माझी इच्छा आहे. तर ते मला सांगाल काय?"

लाहिरी महाशयांच्या जीवनसाथी श्रीमती काशीमणी यांना उद्देशून मी बोलत होतो. वाराणशीला काही थोडे दिवस माझा मुक्काम झाला, तेव्हा ह्या आदरणीय माताजींना भेटण्याची माझी बरेच दिवसांची इच्छा मी पुरी करीत होतो.

वाराणशीच्या गरुडेश्वर मोहल्ला भागातील लाहिरी कुटुंबाच्या घरी मी त्यांना भेटलो. त्यांनी माझे सौजन्यपूर्वक स्वागत केले. त्यांचे वय झाले होते, तरी पण कमळाप्रमाणे त्यांच्या शरीरातून एका दिव्य सुगंधाचा शांत असा स्रोत वाहत होता. त्यांची शरीरयष्टी मध्यम, वर्ण गौर, मान बारीक आणि डोळे विशाल व तेजस्वी होते.

"बाळा, तुझे इथे स्वागत आहे. वरती ये."

काशीमणींनी मला वरती एका लहान खोलीमध्ये नेले. त्या खोलीत त्या काही काळ आपल्या यजमानांबरोबर राहिल्या होत्या. ज्या अप्रतिम गुरुवर्यांनी, ज्या मंदिरामध्ये आपल्या संसारलीलेच्या नाटकातील भूमिका बजावली होती, त्या स्थलाचे दर्शन घेतल्यावर एक प्रकारचे पावित्र्य मी अनुभवीत होतो. माताजींनी विनयपूर्वक मला आपल्याशेजारी एका तक्क्याला टेकून बसावयास सांगितले.

त्यांनी बोलावयास सुरुवात केली: "माझे यजमान हे साक्षात्कारी पुरुष आहेत, हे समजून येण्यास मला बरीच वर्षे लागली. एके दिवशी रात्री ह्याच खोलीत एक स्पष्ट स्वप्नदर्शन झाले. माझ्या डोक्यावरती तेजस्वी देवदूतांचा एक समुदाय तरंगू लागला; ते लावण्यपूर्ण दृश्य काय वर्णावे! ते दृश्य इतके खरेखुरे होते की, मी एकदम जागी झाले. खोलीभर एक झगझगीत प्रकाश भरून राहिला होता.

"माझे यजमान पद्मासनामध्ये खोलीच्या मध्यभागी हवेत अधांतरी तरंगत होते; आणि त्यांच्याभोवती देवदूत जमले होते. एका याचकवृत्तीच्या अभिनिवेशाने ते देवदूत हात जोडून त्यांना नमस्कार करीत होते.

"माझ्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. माझी खात्री झाली की, मी अजूनही स्वप्नातच आहे."

"'बाई,' लाहिरी महाशय म्हणाले. 'तू स्वप्नात नाहीस. झोप तू आता कायमची टाकून दे.' जसजसे ते भूमीवर उतरू लागले त्याबरोबर मी त्यांच्या पायांशी लोटांगण घातले.

"मी म्हणाले, 'गुरुदेव, मी आपल्याला पुनःपुन्हा वंदन करत्ये. मी आपल्याला फक्त माझे यजमानच समजले, याबद्दल मला क्षमा करा. ज्यास आत्मजागृती झाली आहे, अशा

महापुरुषाच्या सान्निध्यात मी अज्ञानाने निद्रितावस्थेत राहिले, हे समजल्यावर मी लाजेने अगदी मेल्यासारखी झाल्ये आहे. आज रात्रीपासून आपण माझे पतिराज नसून गुरू आहात. ह्या माझ्या क्षुद्र जीवाला शिष्य [1] करून घ्याल काय?'

"गुरुदेवांनी मला हळूवारपणे स्पर्श केला. 'पवित्र आत्म्या, ऊठ. तुझा स्वीकार केलेला आहे.' देवदूतांच्याकडे त्यांनी निर्देशन केले, 'ह्या पवित्र संतांपैकी प्रत्येकाला क्रमाने वंदन कर.'

"माझे हे वंदन करण्याचे कार्य संपल्यावर, ते देवदूत एखाद्या पुरातन धर्मग्रंथातील सांघिक गीतासारखे, एक आवाजाने बोलू लागले:

"'हे दिव्यात्म्याच्या अर्धांगिने, तू भाग्यवान आहेस. आम्ही तुला नमस्कार करतो.' ते माझ्या पायां पडले. आणि पाहा काय आश्चर्य! बघता बघता त्यांच्या तेजस्वी आकृती अंतर्धान पावल्या. खोलीत अंधार पसरला.

"माझ्या गुरूंनी क्रियायोगाची दीक्षा घेण्याविषयी मला सांगितले.

"मी उत्तर दिले, 'जरूर, आतापर्यंत आयुष्यात ती दीक्षा मी घेतली नाही, याचे मला वाईट वाटते.'

"'वेळ पक्व झाली नव्हती.' लाहिरी महाशयांनी स्मितपूर्वक समाधान केले, 'तुझ्या पुष्कळशा कर्मांचा क्षय करण्यात मी मदत केली आहे. आता तुला इच्छा झाली आहे व तुझी तयारीही झाली आहे.'

"त्यांनी माझ्या कपाळाला स्पर्श केला. प्रकाशाची वलयांपाठीमागून वलये डोळ्यांसमोर आली. हा प्रकाश हळूहळू आकुंचित व्हावयास लागून, त्याचे एका निळसर वर्णाच्या पारदर्शक आध्यात्मिक नेत्रामध्ये रूपांतर झाले. त्या नेत्राभोवती सोनेरी वर्तुळाची किनार होती आणि त्या नेत्राच्या केंद्रभागी एक श्वेतवर्णी पंचकोनी तारा होता.

"'त्या ताऱ्यामधून अनंतत्वाच्या साम्राज्यामध्ये तुझी जाणीव तू भेदून ने,' माझ्या गुरुदेवांच्या आवाजामध्ये एक नवीनशी, दूरवरच्या संगीतासारखी मृदू अशी वाणी ऐकू आली.

"माझ्या आत्मरूपी किनाऱ्यावर दृश्यांमागून दृश्ये समुद्रावरील लाटांसारखी आदळू लागली. हे सर्व बाजूंचे समग्र देखावे अखेर एका अत्यानंदाच्या समुद्रात वितळू लागले. त्या उसळणाऱ्या दिव्यानंदात मी बुडून गेल्ये. काही तासांनी जेव्हा मला त्या जगाची जाणीव पुनरपि झाली, तेव्हा गुरुदेवांनी मला क्रियायोगाचे तंत्र शिकविले.

"त्या रात्रीनंतर लाहिरी महाशय कधीही माझ्या खोलीत झोपले नाहीत. त्यानंतर ते कधीही झोपलेच नाहीत. ते नेहमी तळमजल्यावर दर्शनी खोलीमध्ये आपल्या शिष्यांच्या मेळाव्यात रात्रंदिवस बसलेले असत."

माताजी नंतर बोलावयाच्या थांबल्या. त्या उन्नत योगिराजांशी त्यांचे असलेले हे निकटवर्ती वैयक्तिक नाते लक्षात घेऊन मी, शेवटी त्यांना आणखी काही आठवणी विचारण्याचे धाडस केले.

"बेटा, तू हावरा आहेस. बरे आणखी एक गोष्ट मी तुला सांगते," त्यांनी लाजून स्मित केले, "आता माझ्या पति-गुरुदेवांशी वागण्यात मी जे एक पातक केले, ते तुला सांगून

टाकते." त्या सांगू लागल्या: "मी दीक्षा घेतल्यानंतर बऱ्याच महिन्यांनी मला एकाकी व निराधारसे वाटू लागले. एके दिवशी सकाळी लाहिरी महाशय या लहानशा खोलीत काही एक वस्तू घेण्याकरिता आले. मी त्यांच्या पाठोपाठ गेले. मायेने पछाडल्यामुळे मी त्यांना थोडे रागाने बोलले.

"'तुम्ही सारा वेळ आपल्या शिष्यमंडळीत घालवता. तुम्हांला बायकामुलांची काही काळजी आहे की नाही? संसाराकरिता जास्त काही मिळविण्याची काही खटपट तुम्ही करीत नाही, याबद्दल मला फार खेद होतो."

"गुरुदेवांनी माझ्याकडे फक्त एक दृष्टिक्षेप केला. आणि काय नवल! ते एकदम दिसेनासे झाले. मी भ्याले, आश्चर्याने स्तंभित झाले. खोलीच्या प्रत्येक भागातून एक आवाज घुमून बाहेर येऊ लागला:

"'हे सगळे शून्य आहे. तुला समजत नाही काय? मी जेथे शून्य आहे, तेथे मी तुझ्याकरिता पैसा कसा उभारू?'

"'गुरुजी, मी लाख वेळा आपली क्षमा मागते! माझ्या पातकी डोळ्यांना आपण दिसेनासे झाला. पवित्र अशा आपल्या दृश्य स्वरूपात प्रगट व्हा.'

"'मी येथे आहे,' माझ्या डोक्यावरून असे उत्तर आले. मी वर पाहिले. गुरुजी हवेमध्ये स्थूल देह धारण करीत होते. त्यांचे डोके तक्तपोशीला स्पर्श करीत होते. त्यांचे डोळे खदिरांगारासारखे पाहणाऱ्याला अंध करीत होते. मी अगदी घाबरून गेले. आणि जेव्हा ते जमिनीवर शांतपणे उतरले, तेव्हा त्यांच्या पायांशी बसून मी रडू लागले.

"'बाई,' ते म्हणाले, 'दैवी संपत्तीच्या पाठीमागे लाग, ऐहिक संपत्ती ही कवडीमोल आहे. आंतरिक संपत्तीचा खजिना एकदा मिळविल्यावर आवश्यक गोष्टींचा पुरवठा तुला आपोआप केला जाईल व हे तुझ्या ध्यानातही येईल.' ते पुढे म्हणाले, 'आध्यात्मिक मार्गावरील माझ्या लेकरांपैकी एक तुझी सोय करील.'

"आणि माझ्या गुरुदेवांचे शब्द अगदी सहजपणे खरे ठरले. त्यांच्या एका शिष्याने आमच्या संसाराकरिता बऱ्याचशा रकमेची सोय करून दिली."

हे आश्चर्यकारक अनुभव [2] सांगितल्याबद्दल मी काशीमणींचे मनःपूर्वक आभार मानले. दुसऱ्या दिवशी पुनः मी त्यांच्या घरी गेलो व कित्येक तास तिनकौरी व दुकौरी लाहिरी यांच्यासमवेत तत्त्वज्ञानविषयक चर्चेत घालविले. भारताच्या ह्या महान योग्याचे हे दोन साधुपुत्र आपल्या वडिलांच्या ध्येयानुसार चालले. दोघेही गोरेपान, उंच, सुदृढ, भरपूर दाढी असलेले असे होते. त्यांच्या आवाजात मार्दव होते; आणि त्यांच्या वागण्यात खानदानीपणा होता.

लाहिरी महाशयांची बायको ही त्यांची एकच शिष्या होती, असे नव्हे. त्यांच्या शेकडो शिष्या होत्या. माझी आईही त्यांत एक होती. एकदा एका शिष्यमहिलेने गुरुजींपाशी त्यांचे एक छायाचित्र मागितले. त्यांनी तिला एका छायाचित्राची प्रत दिली व ते म्हणाले, "आपत्तीच्या प्रसंगी त्या फोटोने तुझे संरक्षण होईल असा तुझा विश्वास असेल तर त्याचा तसा उपयोग होईल; नाहीतर तो एक साधा फोटोच ठरेल."

पुढे काही दिवसांनी एकदा ती महिला व लाहिरी महाशयांची सून, अशा दोघी भगवद्गीतेचा अभ्यास टेबलापाशी बसून करीत होत्या. त्या टेबलाच्या पाठीमागे भिंतीवर गुरुजींचा फोटो लावून ठेवलेला होता. इतक्यात एकदम हवेत जोराचे वादळ सुरू झाले. विजांचा चमचमाट सुरू झाला.

त्या स्त्रिया घाबरून गेल्या. गुरुजींच्या तसबिरीस वंदन करून म्हणाल्या, “लाहिरी महाशय, आमचे रक्षण करा!” विजेचा चमचमाट होऊन ती त्या टेबलावर पडली व पुस्तक जळून खाक झाले; पण त्या दोघी शिष्यमहिलांना काहीही दुखापत झाली नाही.

“मला असे वाटले की, त्या पोळून टाकणाऱ्या उष्णतेने आम्हांला काही इजा देऊ नये म्हणून बर्फाचा जणू एक थर आमच्याभोवती गुंडाळलेला आहे,” त्या शिष्यमहिलेने सांगितले.

लाहिरी महाशयांची अभया नावाची एक शिष्या होती. तिच्यासंबंधाने त्यांनी दोन चमत्कार करून दाखविले. तिचे यजमान कलकत्त्याला वकील होते. ते दोघे एकदा गुरुजींना भेटण्याकरिता वाराणशीस जाण्यास निघाले. निघण्याच्याच वेळी रहदारी फार असल्याकारणाने, त्यांच्या गाडीला पुढे सरकायला विलंब लागला. ते कलकत्त्यामधील हावडा स्टेशनला पोचले न पोचले, तोच वाराणशीची गाडी निघण्याच्या तयारीत होती. गाडी सुटण्याची शिट्टी फक्त त्यांनी ऐकली.

तिकीट-ऑफिसच्याजवळ अभया आपली निमूटपणे उभी राहिली होती.

“लाहिरी महाशय, मी आपली प्रार्थना करते; आपण गाडी रोखावी!” तिने मनातल्या मनात प्रार्थना केली. “आपले दर्शन घेण्याकरिता आता आणखीन एक दिवस वाट पाहावी लागेल. त्या विलंबाच्या यातना मला सहन करवणार नाहीत.”

फुसफुस करणाऱ्या त्या आगगाडीची चाके जागच्या जागीच फिरत राहिली. पण पुढे काही सरकेनात. हा चमत्कार पाहावयास इंजिनियर आणि उतारू प्लॅटफॉर्मवर उतरले. एक इंग्लिश रेलरोड गार्ड अभया व तिचा नवरा जेथे उभे होते तेथे आला. आपल्या शिरस्त्याच्या विरुद्ध त्या गार्डने आपण होऊन त्यांना मदत करण्याची इच्छा दर्शविली. तो म्हणाला, “बाबू, मला पैसे द्या, तुम्ही गाडीत बसायला लागा, मी तुमची तिकिटे आणतो.”

जेव्हा ते जोडपे गाडीत बसले व त्यांना तिकिटे मिळाली, तेव्हाच गाडी पुढे सरकली. घाईघाईत इंजिनियर व उतारू आपापल्या जागी कसे तरी गाडीत चढले. गाडी का थांबली होती व ती आता पुनः कशी सुरू झाली, हे कुणासही उमजले नाही.

वाराणशीला लाहिरी महाशयांच्या घरी पोचल्यावर अभयाने गुरुजींच्या पुढे निमूटपणे साष्टांग दंडवत घातले व त्यांच्या पायांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला.

ते म्हणाले, “अभया, शांत राहा. मला त्रास द्यायला तुला काय गंमत वाटते! जणू काय तुला दुसऱ्या गाडीने येता आले नसते!”

अशाच एक संस्मरणीय प्रसंगी अभया लाहिरी महाशयांना जाऊन भेटली. ह्या प्रसंगी तिला त्यांची मध्यस्थी गाडी थांबविण्याकरिता नको असून एका वेगळ्या कारणाकरिताच — एका अर्भकाकरिता पाहिजे होती.

“महाराज, मी विनवणी करिते; माझं हे नववे मूल जगो,” ती म्हणाली, “मला आठ मुलं झाली; पण ती सगळी जन्मल्यानंतर लवकरच वारली.”

गुरुजींनी स्मित करून सहानुभूती दाखविली. "आता तुला जे मूल होईल, ते जगेल. मी सांगतो ते नीट ऐक. तुला मुलगी होईल. रात्रीच्या वेळी तिचा जन्म होईल. हे पाहा, समई किंवा तेलाची पणती अगदी पहाटेपर्यंत तू तेवत ठेव. झोपी जाऊ नकोस आणि पणती मालवू देऊ नकोस."

अभयाला मुलगी झाली — रात्रीच्याच वेळी. सर्व काही सर्वज्ञ गुरूंनी सांगितल्याप्रमाणे झाले. बाळंतिणीने सुईणीला रात्रभर दिवा तेलाने भरून ठेवण्यास सांगितले. दोन्ही बायका अगदी पहाटेपर्यंत डोळ्यांत तेल घालून जागल्या; पण शेवटी त्यांना झोप लागली. दिव्यात तेल संपत आले होते; व ज्योत अगदी मंद जळत होती. इतक्यात खोलीचे दार वाजले. आणि कोणीतरी मोठा जोराचा आवाज करून उघडले. बायका घाबरून उठल्या; आणि समोर पाहतात तो काय? लाहिरी महाशयांची मूर्ती. त्या आश्चर्यचकित झाल्या.

"अभया, पाहा, दिवा जाण्याच्या बेतात आला आहे." त्यांनी दिव्याकडे बोट दाखविले. सुईण त्यात घाईघाईने तेल घालू लागली. जसा तो दिवा पुनः चांगला जळू लागला, तसे गुरुजी नाहीसे झाले. दरवाजा बंद झाला. कोणी तरी अदृश्य अशा व्यक्तीने दाराला कडी घातली.

अभयाचे नववे मूल जगले. १९३५ मध्ये मी जेव्हा चौकशी केली तेव्हा ते जिवंत होते.

पूज्य कालीकुमार रॉय हे लाहिरी महाशयांचे एक शिष्य होते. त्यांनी मला गुरुजींविषयी त्यांच्या अनुभवाच्या कित्येक मनोरंजक गोष्टी सांगितल्या.

रॉय मला सांगू लागले, "त्यांच्या वाराणशीच्या घरी कधी कधी कित्येक दिवस माझा मुक्काम असायचा. रात्रीच्या वेळी कितीतरी संतमंडळी, दंडीस्वामीसारखी, [3] त्यांच्याकडे येत; ती त्यांच्या पायांशी बसलेली मी पाहिली आहेत. कधी कधी त्यांची ध्यानाच्या विषयावर व तत्त्वज्ञानावर चर्चा चाले; आणि पहाटेच्या वेळी ही सगळी महंत मंडळी जावयास निघत. माझा तेथे मुक्काम असेतोपर्यंत, लाहिरी महाशयांना मी झोपण्याकरिता पडलेले म्हणून कधीही पाहिलेले नाही.

"गुरुजींशी माझा जो परिचय झाला त्याच्या आरंभी माझ्या मालकाकडून त्याला फार विरोध झाला. त्या विरोधाशी मला झगडावे लागले. मालक म्हणजे ऐहिक जगात अगदी पूर्ण रममाण झाला होता," रॉय सांगू लागले.

"तो कुचेष्टेने म्हणायचा, 'माझ्या ऑफिसमध्ये मला अशी खुळी, देवभोळी माणसे नकोत. मला जर कधी हा तुझा ढोंगी बाबा भेटला, तर त्यास मी अशा काही गोष्टी सुनावीन की, त्यांची आठवण त्याला कायमची राहील.'

"ह्या त्याच्या धमकावणीचा माझ्या कार्यक्रमावर काहीही परिणाम झाला नाही. मी गुरुजींना भेटायला दररोज संध्याकाळी हा जायचाच. एके दिवशी रात्री, माझा मालक माझ्यापाठोपाठ आला व गुरुजींच्या बसायच्या खोलीत जोराने उद्धटपणे शिरला. आपण जे काही बडबडणार म्हणून त्याने मला धमकी दिली होती, त्याप्रमाणे त्याला नक्की काही बडबडायचे होते. तो जसा खाली बसला, तसे लाहिरी महाशयांनी तेथे बसलेल्या आपल्या सुमारे बारा शिष्यांना उद्देशून बोलावयास सुरुवात केली.

“तुम्हांला एक चित्र पाहायचे आहे का?”

“आम्ही जशी संमती दर्शविली, तसे त्यांनी खोलीत अंधार करावयास सांगितले. ‘एकाच्या पाठीमागे एक असे एका वर्तुळात बसा,’ त्यांनी सांगितले. ‘आणि तुमच्यासमोर बसणाऱ्याचे डोळे आपल्या स्वतःच्या हाताने झाका.’

“गुरुजींचा हा आदेश नाखुशीने का होईना, आमचा मालक पाळीत होता. मला त्याचे आश्चर्य वाटले नाही. काही थोड्या मिनिटांनी आम्हांला काय दिसतेय म्हणून लाहिरी महाशयांनी विचारले.

“मी उत्तर दिले, ‘महाराज, मला एक सुंदर स्त्री दिसतेय. ती एक लाल किनारीची साडी नेसली आहे व ती हत्तीच्या कानाएवढ्या पानांच्या झाडाशेजारी उभी आहे.’ बाकीच्या सगळ्या शिष्यांनी तसेच वर्णन केले, गुरुजी नंतर माझ्या मालकाकडे वळले. ‘तू त्या स्त्रीला ओळखतोस काय?’

“‘हो, ओळखतो.’ त्याच्या स्वभावाला अपरिचित अशा भावनांशी तो झगडत होता, हे उघड होते. ‘माझी बायको जरी चांगली आहे, तरी या बाईकरिता मी मूर्खासारखा पैसा खर्च करीत आहे. ज्या हेतूने मी येथे आलो त्याबद्दल मला लाज वाटते. आपण मला क्षमा कराल काय व शिष्य म्हणून स्वीकार कराल काय?’

“‘तू जर सहा महिन्यांपर्यंत नीट रीतीने वागलास, तर मी तुझा स्वीकार करीन. नाही तर तुझ्यावर मला अनुग्रह करण्याची जरुरच पडणार नाही,’ गुरुजी म्हणाले.

“तीन महिनेपर्यंत माझा मालक मोहापासून दूर राहिला; नंतर त्याला राहवेना. त्या बाईकडे त्याने पुनः जायला सुरुवात केली. दोन महिन्यांनी त्याचा मृत्यु झाला. अशा प्रकारे मला कळून आले की, आमच्या मालकाला अनुग्रह घेण्याचा योग नव्हता; आणि हे भविष्य गुरुजींनी असे संदिग्ध स्वरूपात सांगितले होते.”

लाहिरी महाशयांचे एक विख्यात मित्र होते. त्यांचे नाव त्रैलंगस्वामी. ते जवळजवळ तीनएकशे वर्षांवर जगले, अशी त्यांची प्रसिद्धी होती. हे योगीद्वय पुष्कळदा ध्यानाला एकत्र बसत असत. त्रैलंगस्वामींची ख्याती इतकी दूरवर पसरलेली आहे की, त्यांच्या विस्मयकारी चमत्कारांच्या गोष्टीबद्दल अविश्वास दाखविणारे फारच थोडे लोक असतील. जर येशू ख्रिस्त आज पुनः भूलोकावर उतरला आणि न्यूयॉर्कच्या गजबजलेल्या रस्त्यातून चालू लागला आणि आपल्या दिव्य सामर्थ्याने चमत्कार करून दाखवू लागला, तर लोकांमध्ये जेवढा त्याच्याबद्दल भीतियुक्त आदर निर्माण होईल, तेवढाच भीतियुक्त आदर जेव्हा त्रैलंगस्वामी काही वर्षांपूर्वी वाराणशीच्या गल्लीमधून हिंडू-फिरू लागत, तेव्हा वाराणशी-वासियांच्या मनामध्ये निर्माण होत असे. काळाच्या प्रवाहापासून भारताचे अभेद्य रक्षण करणारे जे सिद्ध पुरुष होऊन गेले त्यांपैकी त्रैलंगस्वामी एक होते.

पुष्कळदा स्वामीजी जहाल विष प्राशन करीत असताना दिसत असत; व त्या विषाचा त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अनिष्ट परिणाम घडून आलेला दिसत नसे. त्रैलंगस्वामींना गंगेच्या प्रवाहावर तरंगत असताना हजारो लोकांनी पाहिलेले होते; व त्यांपैकी काही आज हयात आहेत. पाण्यावर ते कित्येक दिवस बसून राहत किंवा पाण्यामध्ये बराच वेळ लपून राहत. काशीच्या मणिकर्णिका घाटावर तळपत्या प्रखर उन्हामध्ये, शरीराला फोड यावेत

इतक्या तापलेल्या फरशीवर स्वामीजी बसून राहत व हे दृश्य त्या वेळी सर्वांच्या पाहण्यातले होते.

असे चमत्कार करून दाखविण्यात त्रैलंगस्वामींचा असा हेतू होता की, मनुष्याचे जगणे हे केवळ ऑक्सिजनवर अवलंबून नसून किंवा काही आवश्यक गोष्टींवर, किंवा काही गोष्टी टाळण्यावर ते अवलंबून नाही हे लोकांना कळावे. ते महायोगी पाण्यात असोत, की पाण्यावर असोत; किंवा त्यांचे शरीर प्रखर तळपत्या उन्हाला दाद देत असो की नसो, त्यांनी आपण दैवी जाणिवेवर, चिद्शक्तीवर जगत आहो, हे सिद्ध केले. मृत्यु त्यांना स्पर्श करू शकला नाही.

हे योगीराज केवळ आध्यात्मिक दृष्ट्या मोठे होते असे नव्हे, तर शरीराने सुद्धा ते मोठे होते. त्यांचे वजन तीनशे पौंडांवर होते. जितकी वर्षे त्यांचे आयुष्य तितके पौंड त्यांचे वजन. आयुष्याच्या प्रत्येक वर्षाला एकेक पौंड वाढ! आणि त्यात ते क्वचितच खात. त्यामुळे हे कोडे अधिकच बिकट व्हायचे. तथापि जो सिद्धपुरुष असतो तो काही एका विशिष्ट कारणाकरिता आणि जेव्हा तो तशी इच्छा करतो, त्या वेळी शरीरविज्ञानशास्त्राचे सर्वसाधारण नियम गुंडाळून ठेवतो. हे विशिष्ट कारण बहुधा इतके सूक्ष्म असते की, ते त्यांचे त्यांनाच समजते.

महात्म्यांना जेव्हा ह्या विश्वरूप मायेच्या स्वप्नातून जागृती आलेली असते आणि ज्यांना हे जग म्हणजे दिव्य-मनातून उद्भूत झालेली एक कल्पना आहे, हे उमजलेले असते ते आपल्या शरीराशी आपली जशी इच्छा असेल, त्याप्रमाणे वागतात. कारण त्यांना हे पूर्ण माहीत झालेले असते की, शरीर हे शक्तीचे स्थगित किंवा गोठलेले रूप आहे व त्या शरीराला ते वाटेल तो आकार देऊ शकतात. पदार्थविज्ञानाचे शास्त्र आज जरी कबूल करीत असले की, वस्तुजात म्हणजे गोठलेली किंवा स्थूल रूप पावलेली ऊर्जा किंवा शक्तीच होय; पण जे योगी प्रगत असतात ते ह्या तात्त्विक सिद्धांताचे प्रत्यक्षीकरण, वस्तुमात्रावर स्वामित्व मिळवून करून दाखवितात.

त्रैलंगस्वामींच्या अंगावर वस्त्र कधीही नसे. वाराणशीच्या पोलिसांनी त्यांच्यापुढे हात टेकले. ईडन बागेमधील आदिमानव जो आदम त्याच्याप्रमाणे ह्या दिगंबरस्वामींना आपल्या नग्नत्वाची कधीच जाणीव नसे. पण पोलिसांना त्यांच्या नग्नत्वाची जाणीव असल्याने त्यांनी त्यांना सरळ तुरुंगात टाकले. तुरुंगात ठेवल्यावर सगळीकडे गोंधळ उडाला. त्रैलंगस्वामींचे अवाढव्य शरीर अगदी सगळेच्या सगळे तुरुंगाच्या छपरावर दिसू लागले. त्यांच्या कोठडीला चांगले भरभक्कम असे कुलूप लागलेले होते व त्यातून ते कसे निसटले, हे कोणाला कळेना.

कायद्याच्या अंमलदारांमध्ये आता काही उत्साह उरलाच नव्हता. पण त्यांनी परत आपले कर्तव्य बजावायला सुरुवात केली. स्वामीजींच्या कोठडीपुढे ह्या वेळी त्यांनी एक पाहरेकरी ठेवून दिला. शक्तीने पुनः युक्तीच्यापुढे माघार घेतली. लवकरच योगिराज छपराच्या वर स्वच्छंदपणे येरझारा घालत असताना दिसून आले.

न्यायदेवता ही आंधळी असते. त्रैलंगस्वामींच्या बाबतीत फजीत झालेल्या पोलिसांनी तिचे अनुकरण करावयाचे ठरविले.

हे महायोगी नेहमी मौन आचरीत. [4] त्रैलंगस्वामींचा चेहरा गोल असून पोट फार मोठे, एखाद्या पिपासारखे होते. त्रैलंगस्वामी मधून मधून कधी तरी खात. कित्येक आठवडे ते अन्नावाचून राहात. मग भक्तांनी दिलेल्या दह्याच्या कावडी ते खाऊन फस्त करीत व आपले उपोषण सोडीत. एका संशयी माणसाने त्रैलंगस्वामी हे ढोंगी आहेत, असे दाखवायचे एकदा ठरविले. त्याने एक बादली चुन्याने भरून — जो रंगसफेतीकरिता भिंतींना लावतात त्याने भरून — स्वामीजींच्या पुढे ठेविली.

लटका आदर दाखवून तो नास्तिक म्हणाला, “महाराज, हे मी आपल्याकरिता दही आणलेय, तर हे कृपेने प्राशन करा.”

त्रैलंगस्वामींनी का कू न करता तो धगधगणारा चुना शेवटच्या थेंबापर्यंत पिऊन टाकला. थोड्याच मिनिटांनी तो पापी मनुष्य वेदनेने ओरडत जमिनीवर पडला.

तो ओरडू लागला, “स्वामी महाराज, वाचवा, वाचवा! माझ्या पोटात आगीचा डोंब उठला आहे! माझ्या दुष्कृत्याची मला क्षमा करा!”

त्या महायोग्याने आपले नेहमीचे मौन सोडले. ते म्हणाले, “चांडाळा, मला जेव्हा तू हे विष प्राशन करायला दिलेस तेव्हा तुला असे वाटले नाही की तुझा नि माझा जीव एक आहे. मला जर हे ज्ञान नसते की, प्रत्येक निर्मिलेल्या पदार्थमात्रातील अणुपरमाणूंमध्ये जसा ईश्वर भरून आहे, तसाच माझ्या पोटातही तो आहे, तर ह्या चुन्याने माझा जीव घेतला असता. आता तुला ह्या बुमरँगचा दैविक अर्थ समजला असेल. आता पुनः कोणावरती असे प्रयोग करू नकोस.”

त्रैलंगस्वामींच्या ह्या शब्दांनी त्या पातक्याची वेदना शमली व चोरासारखा तो तिथून निघून गेला.

ह्या ज्या शारीरिक वेदना उलटल्या त्या काही योगीराजांनी तसे मनात आणले म्हणून उलटल्या असे नव्हे, तर तो परिणाम न्यायबुद्धीवर [5] आधारलेल्या एका नियमानुसार घडून आला. हा जो न्यायाचा नियम आहे त्याच्या कक्षेत सृष्टीमधील अगदी दूरवरचासुद्धा भ्रमण करीत असलेला गोल येतो. त्या दिव्य अशा विधिनियमाचे पालन त्रैलंगस्वामींसारख्या पुरुषांना अगदी ताबडतोब घडवून आणता येते; कारण त्यांनी आपल्या मनातून अहंतेचे उलटसुलट, विरोध करणारे प्रवाह, पूर्णतया व कायमचे घालवून टाकलेले असतात.

ऋजुता किंवा सात्त्विक भाव याचे हे स्वयंस्फूर्त असे प्रतिपालन व मानवी व्यवहारातील कमीजास्तपणा सारखा केला जाण्याची ही जी नैसर्गिक व्यवस्था आहे, त्यावर एकदा विश्वास बसला, म्हणजे संसारातील मानवी व्यवहारात जो जागोजागी आपल्याला अन्याय दिसून येतो, त्याबद्दल मनातील रागाचे पुष्कळसे शमन होते. (त्रैलंगस्वामी आणि तो नास्तिक मनुष्य की ज्याने खुनाचे पातक केले असते त्यांच्यामध्ये जशी अनपेक्षित पद्धतीने वेदनांची थारेपालट झाली; त्या पद्धतीने पुष्कळदा हा नियम कार्य करीत असतो हे ध्यानात येते.) “बदला घेण्याचे काम माझे आहे. मी त्याचा बरोबर बदला घेईन,” ईश्वर [6] म्हणाला. माणसासारख्या पामराने काय सूड घ्यावा? सूड घेण्याचे यथायोग्य काम ह्या विश्वात आपोआप घडून येत असते.

ज्यांची बुद्धी मंद आहे अशा माणसांचा, असा हा परमेश्वरी न्याय सर्वत्र अंमल करीत असतो ह्या सिद्धांतावर विश्वासच बसत नाही. स्वर्गीय प्रेम, सर्वज्ञता आणि अमरत्व ह्या गोष्टी धादांत खोट्या आहेत, असे त्यांना वाटत असते. ह्या सगळ्या पुराणांतल्या बाष्कळ कल्पना आहेत असा निर्वाळा देऊन ते ह्या कल्पना आपल्या मनातून काढून टाकतात. अशी जी माणसे असतात की, ज्यांना अशा तऱ्हेचे व्यवहार गोचर होत नाहीत, त्यांना अशा अघटित घटनांचा विस्मय वाटत नाही. ते आपले नित्याचे व्यवहार परस्पर-विरोधी असे करीतच असतात; पण अखेरीस त्या बऱ्यावाईट कर्मांची वजावट होऊन त्यांच्या ठिकाणी बोध निपजतो; त्यांना ज्ञान प्राप्त करून घेण्याची जरुरी भासते.

ज्या वेळी येशू ख्रिस्ताने जेरुसलेममध्ये विजयोत्साहाने प्रवेश केला, त्या प्रसंगी त्याने ह्या आध्यात्मिक स्वरूपाच्या विधिनियमाच्या सर्व सामर्थ्याबद्दल निर्देश केलेला होता, त्या वेळी त्याचे शिष्य आणि माणसांचा जमाव आनंदाने "स्वर्गांत शांतता असो; ईश्वराचा महिमा अगाध आहे" अशा आरोळ्या मारीत सुटले. तेथे हजर असलेले काही फॅरिसिस पुजारी ह्या ओंगळ प्रकाराने चिडून प्रभू येशूकडे तक्रार करू लागले की, "प्रभो, आपल्या शिष्यांना आवरा; त्यांना रागे भरा."

पण प्रभू येशूने असे उत्तर दिले, "मी जर शिष्यांना गप्प केले, तर इथले दगड ताबडतोब ओरडत उठतील." [7]

फॅरिसिस पुरोहितांना येशू ख्रिस्ताने हा जो ठपका दिला त्याच्यामागे त्याला असे सांगावयाचे होते की, ईश्वरी न्याय ही काही केवळ एक अलंकारिक कल्पना नाही, तर ती एक निश्चित अशी विश्वव्यापी व्यवस्था आहे, आणि ती अशी की, एखाद्या शांतिप्रिय माणसाची जीभ टाळ्यापासून उपटून काढली, तरी त्याला त्याची वाचा परत मिळू शकेल आणि त्याला ह्या सृष्टिरचनेच्या तळाशी संरक्षण मिळू शकेल.

येशू ख्रिस्त पुढे म्हणू लागला, "तुम्हांला जर शांतिप्रिय माणसाला जबरदस्तीने गप्प बसवायचे असेल तर ते शक्य नाही. एक वेळ तुम्ही ईश्वराचा आवाजच बंद पाडण्याची ईर्षा मनात बाळगू शकाल की, ज्या ईश्वराचा महिमा हे दगडसुद्धा गातात आणि त्याचे सर्वव्यापक वर्णन करतात. माणसांनी स्वर्गामध्ये शांतीच्या प्रीत्यर्थ एकत्र जमून उत्सव वगैरे काही करू नये, असा तुम्ही आग्रह धराल का? पृथ्वीवर फक्त लढाईच्याच वेळी ते एकत्र आले असता तशा वेळी त्यांना तुम्ही एकत्वाच्या भावनेविषयी उपदेश करण्याचे मनात आणाल काय? तर मग, फॅरिसिस पुरोहित हो! तर मग ह्या जगाचा जो आधारस्तंभ आहे, तो उखडून टाकण्याची तुम्ही तयारी करा. पण हे पुरते ध्यानात ठेवा की, ह्या सृष्टीमध्ये ईश्वरप्रणीत असा जो सुसंबद्धतेचा न्याय आहे त्याच्या काटेतोलपणाबद्दल साक्ष देण्याकरिता म्हणून ही सज्जन माणसेच काय, पण ह्या जमिनीवरचे हे दगड, पाणी आणि हवा सुद्धा तुमच्याविरुद्ध बंड करून उठेल."

येशू ख्रिस्तासमान अशा त्रैलंगस्वामींचा माझ्या मामांच्यावर एकदा अनुग्रह झाला होता. एके दिवशी सकाळीं मामांनी ह्या योगीराजांना काशीस घाटावर भक्तांच्या मेळाव्यात पाहिले. त्यांनी कसेही करून धक्काबुक्की करीत करीत, त्यांच्या अगदी जवळ येऊन त्यांच्या

पायांना स्पर्श करण्यात यश मिळविले. आणि मामांना एकदम महदाश्चर्य वाटले — त्यांचा एक जुनाट रोग त्यांना सारखा सतावत असलेला ताबडतोब अजिबात नष्ट झाला. [8]

ह्या महान योग्याचा सध्या हयात असा एकच शिष्य आहे व ती स्त्री आहे. त्या स्त्रीचे नाव शंकरीमाईजी. ही त्रैलंगस्वामींच्या एका शिष्याची मुलगी. तिने अगदी लहानपणीच स्वामीजींकडून उपदेश घेतला होता. तिने चाळीस वर्षे बदरीनाथ, केदारनाथ, अमरनाथ व पशुपतिनाथ ह्यांच्या जवळील एका बाजूस असलेल्या हिमालयातील अनेक गुहांमध्ये वास्तव्य केले होते. ह्या ब्रह्मचारिणीचा जन्म १८२६ मध्ये झाला होता. म्हणजे आज तिचे आयुर्मान शंभरीच्यावर गेलेले आहे; पण तिचे केस अजून काळेभोर आहेत. चेहऱ्यावर अजून वार्धक्याची छटा नाही. दात अजून शाबूत व उत्साह आश्चर्य करण्यासारखा आहे. ती नेहमी एकान्तात असते; पण काही एक वर्षांनी जेव्हा मेळे भरतात, तेव्हा एकान्तातून बाहेर येते.

ही संत स्त्री लाहिरी महाशयांना पुष्कळदा भेटत असे. तिने अशी हकीकत सांगितली की, एके दिवशी ती कलकत्त्याजवळ बैरकपूर विभागात लाहिरी महाशयांच्या शेजारी अशी बसली होती आणि इतक्यात त्या खोलीत परम गुरू बाबाजी संथपणे आले आणि त्या दोघांशी त्यांनी बराच वेळ संभाषण केले. तिने आठवण करून सांगितले की, “त्या मृत्युंजय महात्म्याच्या अंगावर एक ओले वस्त्र होते, जणू नुकतेच ते नदीत बुचकुळी मारून आले होते. काही आध्यात्मिक उपदेश देऊन त्यांनी मला आशीर्वाद दिला.”

त्रैलंगस्वामींनी आपले नेहमीचे मौन एका प्रसंगी सोडले होते. तो प्रसंग म्हणजे लाहिरी महाशयांचा जाहीर सम्मान करावयाच्या वेळी त्रैलंगस्वामींच्या एका शिष्याने हरकत घेतली तेव्हाचा.

तो म्हणाला, “महाराज, आपण स्वतः स्वामी व संन्यासी आहात; तर मग एका गृहस्थाश्रमी इसमाला आपण इतका सम्मान का देता?”

त्रैलंगस्वामींनी उत्तर दिले, “लाहिरी महाशय म्हणजे मांजरीचे एक स्वर्गीय पिल्लू आहे. विश्वजननी त्याला जेथे ठेवून देईल तिथे ते निमूटपणे राहते. संसारी माणसाची भूमिका बजावीत असताना त्यांना पूर्ण साक्षात्कार घडून आलेला आहे; आणि तो साक्षात्कार मला स्वतःला प्राप्त करून घेण्याकरिता मला माझ्या सर्वस्वाचा — माझ्या लंगोटीचासुद्धा — त्याग करावा लागला आहे!”



*शंकरी माई जिउ, त्रैलंग स्वामींची हयात असलेली एकमात्र शिष्या, कुंभ मेळा, हरिद्वार येथे, 1938 मध्ये. त्या वेळी ह्या योगिनीचे वय 112 वर्षांचे होते.*

1 "त्याचा जन्म देवाकरिता होता; आणि तिचा त्याच्यामधील देवत्वाकरिता होता." —मिल्टन.

2 ह्या परमपूज्य मातुश्री २५ मार्च १९३० रोजी वाराणशीस निवर्तल्या.

3 एका श्रेणीचे संन्यासी. हे ब्रह्मदंडाचे चिन्ह म्हणून नेहमी हातांत विधियुक्त असा एक दंड धारण करतात. ब्रह्मदंड म्हणजे मानवी शरीरांतील मेरुदंडाचे एक प्रतीक आहे. त्या मेरुदंडामधील सात चक्रांमध्ये जागृती झाली म्हणजे मोक्षाचा मार्ग मोकळा होतो.

4 ते मुनि होते, किंवा संन्यासी, जे मौन, आध्यात्मिक शांतता आचरतात. संस्कृत शब्द मुनि हा ग्रीक शब्द मोनोस, "एकटा, एक,"चा समकुलीन आहे. ज्याच्यापासून मंक (Monk) आणि मोनिज्म (Monism) सारखे इंग्रजी शब्द घेण्यात आले.

5 संदर्भ साम्य: २ किंग्स. २:१९-२४ (बायबल). जेरिकोमध्ये पाणी आरोग्यप्रद करण्याचा "एलिशाने चमत्कार करून दाखविल्यावर पोरांच्या एका घोळक्याने त्याची कुचेष्टा केली." आणि जंगलातून दोन अस्वलिनी बाहेर आल्या व त्यांनी बेचाळीस पोरांना फाडून खाऊन टाकले.

6 रोमन्स १२:१९ (बायबल).

7 ल्यूक १९:३७-४० (बायबल).

8 त्रैलंगस्वामी व इतर महान योगी, यांच्या जीवनवृत्तांताचे निरीक्षण केल्यानंतर येशू ख्रिस्ताच्या पुढील शब्दांची आठवण होते: "आणि ज्यांची श्रद्धा आहे, त्यांना ह्या खुणा पटतील. माझ्या नावाने (कूटस्थ चैतन्य) भूतपिशाचांची बाधा काढून टाकता येईल. ते नवीन शब्दांनी, बोलींनी बोलू लागतील. ते सर्वांना पकडू शकतील आणि त्यांनी विष प्राशन केले तर त्यांना ते काही अपाय करू शकणार नाही; दुखणाईत माणसांच्या अंगावर जर त्यांनी हात ठेवला, तर ती माणसे दुखण्यातून बरी होतील." — मार्क १६:१७-१८ (बायबल)

## प्रकरण - ३२

# 32. राम पुनः जिवंत होतो

"आणि आता कोणी एक मनुष्य, लॅझॅरस नावाचा, आजारी होता ... जेव्हा येशूला ते समजले तेव्हा तो म्हणाला, 'ह्या दुखण्यात तो काही मरणार नाही. पण त्यामुळे ईश्वराचा महिमा वाढेल का की, ईश्वराच्या पुत्राचा मोठेपणा त्यात दिसून येणारा आहे.'" [1]

सेरामपूरच्या आश्रमात एका रविवारी सकाळी श्रीयुक्तेश्वर ख्रिस्ताच्या शिकवणुकीवर प्रवचन देत होते. गुरुजींचे इतर काही थोडे शिष्य बसले होते. मीही त्यात माझ्या रांचीच्या काही थोड्या विद्यार्थ्यांना घेऊन बसलो होतो.

"ह्या उताऱ्यात येशू आपणा स्वतःला ईश्वराचा पुत्र असे म्हणवून घेत आहे. जरी त्याचे परमेश्वराच्या ठिकाणी पूर्ण तादात्म्य झाले होते, तरी ईश्वराबद्दल त्याने येथे जो उल्लेख केला आहे, त्याचा वैयक्तिक अर्थ घ्यावयाचा नाही," गुरुजी सांगू लागले, "ईश्वराचा पुत्र म्हणजे कूटस्थ चैतन्य; माणसामधील आपण ख्रिस्त आहोत; आपण ईश्वराचे अंश आहोत, ही जाणीव मर्त्य असा जो मानव तो काही ईश्वराचा महिमा वाढवू शकणार नाही. आपणास ज्याने उत्पन्न केले, त्या परमेश्वराचा मनुष्यप्राणी एकाच प्रकारचा सन्मान करू शकेल. तो म्हणजे त्याचा शोध घेणे. ईश्वराच्या स्वरूपाचे ज्याला ज्ञान नाही, असा मनुष्य अमूर्त अशा केवल कल्पनेचे गुणगान करू शकणार नाही. संतांची दिव्य प्रभा किंवा त्यांच्या मस्तकाभोवती जे तेजोवलय असते त्यावरून दिव्यत्वाचा गौरव करण्याचे त्यांचे सामर्थ्य प्रतीत होते."

लॅझॅरसच्या परत जिवंत होण्याची विस्मयकारी कथा श्रीयुक्तेश्वर पुढे वाचू लागले. वाचून झाल्यावर गुरुजी बराच वेळ स्तब्ध बसले. पवित्र 'बायबल' ग्रंथ त्यांच्या पुढ्यात ठेवलेला होता.

"अशा तऱ्हेचा चमत्कार पाहण्याचे सद्भाग्य मला सुद्धा लाभले होते." गुरुजींनी मौन संपविले आणि एका प्रकारच्या गंभीर आवेशाने ते बोलू लागले, "लाहिरी महाशयांनी माझ्या अशाच एका मित्राला मेल्यानंतर पुनः जिवंत केले होते."

माझ्या बाजूला जी कुमारमंडळी बसली होती त्यांची उत्सुकता जागृत झाली. माझ्यामध्ये सुद्धा थोडी बालवृत्ती होतीच. गुरुजींचे तात्त्विक बोलणे तर कळावेच, पण आपल्या गुरूच्या सहवासातल्या काही विस्मयकारी अनुभवांच्या हकीकती गुरुजींच्या तोंडून ऐकायला मिळाव्या हीही जिज्ञासा माझ्या ठिकाणी होतीच.

"माझा मित्र राम व मी अशी आमची नेहमी जोडी असायची," गुरुजी सांगू लागले, "पण त्याचा स्वभाव लाजरा व एकांतप्रिय होता, त्यामुळे तो गुरुजी लाहिरी महाशयांच्या दर्शनाला मध्यरात्र व पहाट या दरम्यान जायचा; का की, त्या वेळी दिवसा येणाऱ्या भक्तांची गर्दी असायची नाही. मी रामचा अगदी जिवलग मित्र होतो. त्यामुळे तो मला त्याचे पुष्कळसे गूढ

असे आध्यात्मिक अनुभव सांगत असे. त्याच्या आदर्श मैत्रीमध्ये मला एक तऱ्हेची प्रेरणा मिळत असे.” गुरुजींची मुद्रा त्याच्या आठवणींनी किंचित मृदू झाली.

श्रीयुक्तेश्वर सांगू लागले, “रामला एकाएकी एका मोठ्या कसोटीला तोंड द्यावे लागले. तो एशियाटिक कॉलऱ्याने आजारी पडला. अत्यवस्थ स्थितीमध्ये डॉक्टरला बोलवायला गुरुजी कधीही हरकत घेत नसत. तेव्हा दोन तज्ज्ञ डॉक्टरांना बोलावून आणले. आजारी माणसाच्या शुश्रूषेची वगैरे गडबड चालू होती, त्या गडबडीतच मी लाहिरी महाशयांची दैवी उपचाराकरिता प्रार्थना केली. मी त्यांच्या घरी गेलो व रडतरडत त्यांना सारी हकीकत सांगितली.

‘डॉक्टर लोक रामची तब्येत पाहत आहेत. तो बरा होईल,’ गुरुजी आनंदाने हंसले.

“माझ्या मनावरचे ओझे हलके झाले व मी मित्राला पुनः जेव्हा भेटायला गेलो, तेव्हा तो अगदी मरणोन्मुख स्थितीमध्ये होता.

“एका डॉक्टराने अगदी निराशेच्या सुरामध्ये मला सांगितले, ‘एक किंवा दोन तासांपेक्षा जास्त वेळ तो जगू शकणार नाही.’ पुनः एकदा मी लाहिरी महाशयांच्याकडे धाव घेतली.

“‘डॉक्टर लोक चांगले कळकळीचे आहेत. राम बरा होईल. माझी खात्री आहे,’ गुरुजींनी मला आनंदाने निरोप दिला.

“रामच्या घरी मी जेव्हा जाऊन पोचलो त्या वेळी दोन्ही डॉक्टर तेथून निघून गेले होते. एकाने माझ्यासाठी एक चिठ्ठी लिहून ठेविली होती — ‘आम्ही प्रयत्नांची शिकस्त केली, पण ह्याची काही आशा नाही.’

“माझा मित्र म्हणजे मृत्यूच्या दारी पोचलेल्या मनुष्याचे चित्र होते. लाहिरी महाशयांचे शब्द खोटे कसे ठरावेत, हे मला काही समजेना. झपाट्याने रामचे आयुष्य संपत आल्याचे ते दृश्य पाहून, माझ्या मनात असा सारखा विचार येई ‘की हे आता सारे संपले.’ अशा तऱ्हेने श्रद्धा व संशय यांच्या एक सोडून एक येणाऱ्या अशा दोन लाटांमध्ये मी फेकला जात होतो, तरी पण माझ्या मित्राची जेवढी शुश्रूषा मला करता येणे शक्य होते तेवढी मी केली. तो एकदम ओरडतच उठला.

“‘युक्तेश्वर गुरुजींकडे धावत जा व त्यांना मी गेलो म्हणून सांग. अंत्यसंस्कारापूर्वी माझ्या शरीराला आशीर्वाद देण्यास सांग.’ एवढे शब्द बोलून रामने एक दीर्घ निःश्वास घेतला आणि आपल्या देहाचा त्याग केला. [2]

“त्याच्या बिछान्याशी बसून मी तासभर रडलो. नेहमी शांत आयु ष्याचा भोक्ता, असा तो आता मृत्यूच्या पूर्ण निपचित अशा अवस्थेप्रत पोचला होता. इतक्यात आणखी एक शिष्य तेथे आला. मी बाहेरून जाऊन परत येईतोपर्यंत त्याला घरात बसावयास सांगितले. अर्धवट गोंधळलेल्या स्थितीत मी गुरुजींकडे रखडत गेलो.

“‘रामचे कसे काय आहे?’ लाहिरी महाशयांचा चेहरा जणू आनंदाने फुलून निघाला होता.

“‘गुरुजी, पाहालच आता तुम्ही ते.’ मी भावनावश होऊन चटकन बोलून गेलो. ‘आता अगदी थोड्या तासांतच दहनभूमीकडे जाण्यापूर्वी आपण त्याचे शरीर पाहालच.’ मी रडत सुटलो व मोठ्याने विलाप करु लागलो.

"युक्तेश्वर, धीर धर. शांतपणे जरा बस आणि ध्यान कर पाहू." आणि नंतर गुरुजींची समाधी लागली. ती दुपार व त्यानंतरची रात्र निघून गेली. त्यांची समाधी भंग पावली नाही. मी मन शांत ठेवण्याकरिता आटोकाट प्रयत्न केले, पण यश आले नाही.

"पहाटेच्या वेळी लाहिरी महाशयांनी जरा कोठे डोळे उघडले व मला धीर दिला. 'अजून तुझे मन अस्वस्थ आहे. मी रामला औषधाच्या रूपाने प्रत्यक्ष मदत करावी, असे तुला वाटत होते हे तू मला काल का सांगितले नाहीस? गुरुजींनी एका कपासारख्या दिसणाऱ्या दिव्याकडे बोट दाखविले. त्या दिव्यात एरंडीचे हलके तेल होते. 'ह्या दिव्यातल्या तेलाने एक लहानशी बाटली भर, आणि त्यातून सात थेंब तू रामच्या तोंडांत घाल.'

"मी नाराजी दर्शविली, 'गुरुजी, तो काल दुपारीच वारला. आता तेलाचा काय उपयोग आहे?'

'काही हरकत नाही. सांगतो तसे कर.' गुरुजींच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा कशी होती याचा अर्थच मला समजेना. त्याच्या वियोगामुळे झालेल्या माझ्या मानसिक यातना अजून कमी झाल्या नव्हत्या. बाटलीत थोडे तेल ओतून मी रामच्या घराकडे निघालो.

"मृत्यूच्या पाशामुळे माझ्या मित्राचा देह अगदी ताठ झाला होता. त्याच्या त्या भयंकर अवस्थेकडे न पाहतां मी आपल्या पहिल्या बोटाने त्याचे ओठ उघडले आणि डाव्या हाताने, बुचाच्या साहाय्याने त्या तेलाचे एक-एक थेंब त्याच्या घट्ट बसलेल्या दातांवर टाकले. त्याच्या थंडगार ओठावर जेव्हा सातवा थेंब पडला, तेव्हा रामचे शरीर थंडी भरल्यासारखे जोराने कापू लागले. त्याच्या शरीरातील डोक्यापासून पायापर्यंतचे सगळे स्नायू कंपायमान झाले व तो आश्चर्य करीत उठून बसला.

"'एका प्रकाशाच्या झोतात मला लाहिरी महाशय दिसले!' तो ओरडला, 'ते सूर्यासारखे चमकत होते.' त्यांनी मला जणू हुकूम केला, 'ऊठ, पुरे झाली झोप, युक्तेश्वराबरोबर मला भेटायला ये.'

"रामने कपडे केले व या भयंकर दुखण्यातून बरे होऊन गुरुजींच्या घरापर्यंत जाण्याइतकी परत त्याच्या अंगात ताकद आलेली पाहिल्यावर माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसेना. तेथे गेल्यावर त्यानी लाहिरी महाशयांना साष्टांग नमस्कार घातला. त्या वेळी त्याच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू उभे राहिले.

"गुरुजींना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. त्यांचे डोळे खोडसाळपणे माझ्याकडे पाहून चमकत होते."

"ते म्हणाले, 'युक्तेश्वर, तू आता नक्कीच एरंडेल तेलाची बाटली बरोबर ठेवण्यास विसरणार नाहीस. जेव्हा जेव्हा तू प्रेत पाहशील तेव्हा तू या तेलाचा उपयोग कर. दिव्यातील तेलाचे सात थेंब यमाला नक्कीच परत धाडतील नाही का?'

"'गुरुजी, तुम्ही माझी चेष्टा करताय. मला काही समजत नाही. माझी चूक काय झाली ते मला सांगा.'

"राम बरा होईल हे मी तुला दोनदा सांगितले; पण त्याच्यावर तुझा पुरता विश्वास बसला नाही." लाहिरी महाशय स्पष्टीकरण देऊ लागले, "'डॉक्टर लोक त्याला बरे करतील असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नव्हता. फक्त ते त्याची तब्येत पाहतील. शुश्रूषा करतील एवढेच

मला म्हणावयाचे होते. मला त्यांच्या औषधोपचारात ढवळाढवळ करावयाची नव्हती. नाहीतरी त्यांनासुद्धा पोट भरायचेच आहे की!' आनंदाने उकळ्या फुटणाऱ्या आवाजाने ते पुढे म्हणाले, 'सर्वशक्तिमान परमात्मा सर्व काही बरे करतो हे लक्षात ठेव; डॉक्टर असो की नसो.'

"'माझी चूक मला आता कळली.' मी पश्चात्तापपूर्वक कबूल केले. 'आता मला पुरते समजले की, आपला एक साधा शब्द, पण हे सारे ब्रह्मांड त्या शब्दाप्रमाणे चालते."

श्रीयुक्तेश्वरांनी आपली ही अद्भुत गोष्ट संपविली. रांचीच्या एका मुलाने एक प्रश्न विचारावयाचे धाडस केले. असा प्रश्न मुलाने विचारावा हे सहज समजण्यासारखे होते.

त्याने विचारले, "गुरुजी, आपल्या गुरुजींनी एरंडेल तेल का आणायला सांगितले?"

"मुला, तेल देण्यामध्ये विशेष असा काही हेतू नव्हता. काहीतरी एखादी जड स्वरूपाची वस्तू लाहिरी महाशयांनी औषध म्हणून द्यावी म्हणून त्यांनी जवळ दिसली ती वस्तू मला औषध म्हणून वापरावयास सांगितली. हेतू हा की, जडस्वरूपी चिन्हाने तरी माझा जास्त विश्वास बसावा. माझा अंशतः त्यांच्या शब्दाबर विश्वास बसला नाही म्हणून गुरुजींनी रामला मरू दिले; पण परमगुरू जो परमात्मा त्यास माहीत होते की, आपल्या भक्ताने असे म्हण्टले होते की, रोगाचे निवारण हे झालेच पाहिजे. मग त्याला रामची मृत्यूच्या दाढेतून सुटका करावयास लागली तरी हरकत नाही. त्याचा रोगही असाच होता की, त्यात मनुष्य हा दगावयाचाच!"

श्रीयुक्तेश्वरांनी नंतर बाकीच्या सगळ्यांना जावयास सांगितले व मला आपल्या पायांशी एका ब्लँकेटवर बसावयाची खूण केली.

नेहमीपेक्षा जास्त गंभीरपणे ते म्हणाले, "योगानंद, तुझ्या अगदी जन्मापासून तुझ्याभोवती लाहिरी महाशयांचे पट्टशिष्य वावरत आहेत. त्या महायोग्याने आपले उदात्त जीवन साधारणपणे एकांतात घालविले आणि आपल्या शिकवणुकीबाबत आपल्या शिष्यांना कसलीही संस्था काढण्याबाबत मनाई केली होती. तशी संस्था काढू नये, असा त्यांचा आग्रह असे. तरीपण त्यांनी एक सूचक भविष्य केले होते.

"ते म्हणाले होते, 'मी गेल्यानंतर साधारण पन्नास वर्षांनी माझे जीवनचरित्र लिहिले जाईल. पाश्चिमात्य जगात योगसाधनेबद्दल जास्त आवड उत्पन्न होईल, हे त्याचे कारण ठरेल. योगसाधनेचा संदेश साऱ्या जगभर पसरेल. माणासामाणसांमध्ये बंधुत्वाची वाढ होण्यास त्याने मदत होईल. सर्व मानवांनी आपला परमपिता हा एकच आहे, हे ज्ञान करून घेण्याने एका तऱ्हेचे जे ऐक्य निर्माण होईल त्यामुळे बंधुत्वाच्या भावनेस जोर येईल."

श्रीयुक्तेश्वर पुढे म्हणाले, "योगानंदा, माझ्या मुला, हा संदेश पसरविण्याचे आणि त्या पवित्र जीवनाचे चरित्र लिहिण्याचे काम तुलाच करावे लागेल."

लाहिरी महाशय १८९५ साली वारले. बरोबर पन्नास वर्षांनी म्हणजे १९४५ मध्ये हे पुस्तक लिहून पूर्ण झाले. आणि १९४५ सालीच आणखी एक योगायोगाची घटना घडून आली. ह्याच वर्षी एका नव्या क्रांतिकारी अशा अणुशक्तियुगास सुरुवात झाली. आजपर्यंत विचारी मनाला जेवढी काळजी आणि जरुरी, जागतिक शांतता व विश्वबंधुत्व यांच्या निकडीच्या प्रश्नांबाबत वाटली नाही, तेवढी आज वाटू लागली आहे. अन्यथा या पाशवी शक्तीच्या सतत केलेल्या उपयोगाने, साऱ्या मनुष्यमात्राची या जगाच्या पाठीवरून

हकालपट्टी होणार आहे आणि त्याच्याबरोबर त्याचे प्रश्नसुद्धा आपोआप खलास होणार आहेत.

काल किंवा अणुबाँब हा मानवजातीस आणि त्याच्या कृतीस ह्या जगातून पुरते नाहीसे करणार आहे; इतके की, त्याचा मागमूसही कोठे राहणार नाही; तरीपण भगवान सूर्याच्या दैनंदिन कार्यक्रमात काही फरक होणार नाही; आकाशातील देदीप्यमान तारे आपले रखवालदारीचे काम तसेच करत राहतील; त्यात खळ पडणार नाही. विश्वाला लागू असलेले नियम हे कधीही स्थगित करता येत नाहीत किंवा बदलताही येत नाहीत. माणसाला त्या नियमांनुसारच चालले पाहिजे आणि त्यांतच त्याचे हित आहे. जर विश्वरचनेचा रोख पाशवी शक्तीच्या विरुद्ध असेल; जर सूर्य अंतरिक्षामध्ये संघर्ष न करता, आपल्या ठराविक वेळेस अस्तंगत होऊन रात्रीच्या वेळी अंतरिक्षातील ताऱ्यांना त्यांचा थोडाबहुत लुकलुकणारा प्रकाश देण्यास अवसर देत असेल, तर ह्या पाशवी शक्तीचा मग उपयोग काय? त्यातून काही शांतता निर्माण होणार आहे काय? ह्या विश्वरचनेचे धागेन् धागे हे सद्भावनांच्या रज्जूंनी बांधले जात असतात; निर्दय, निर्घृण कृत्यांनी नव्हे. ज्या वेळी मानवप्राणी खऱ्याखुऱ्या शांततेचा अनुभव घेईल, त्याच वेळी त्याला निसर्गावर आपण मिळविलेल्या विजयांचे फळ अखंडितपणे चाखता येईल व त्या फळाची चव ही ह्या रक्तलांछित भूमीवर निर्माण केलेल्या फळापेक्षा अधिक स्वादिष्ट असेल.

मानवाच्या संयुक्त अंतःकरणांची बिननावी संस्थाच सर्वांत परिणामकारक अशी संयुक्त राष्ट्रांची संस्था होय. ऐहिक यातना नष्ट करण्याकरिता व्यापक सहानुभूतीची आणि खोलवर विचार करण्याची फार जरुरी आहे आणि ह्या जरुरीचे ज्ञान सहजासहजी होत नाही. मानवी व व्यवहारातील विविधतेच्या अगदी बुद्धिप्रामाण्याने केलेल्या विचारांनी ही जरुरी, ही आवश्यकता पटणारी नाही. ही आवश्यकता पटावयास एकच गोष्ट उपयोगी पडेल आणि ती म्हणजे सर्व मानवप्राण्यांमध्ये एकत्व अगदी खोलवर सामावून आहे आणि आपण सर्व परमेश्वराची लेकरेच आहोत आणि म्हणून आपणा सर्वांचे एकमेकांशी बंधुत्वाचे नाते आहे, ही भावना मनात रुजणे ही होय. ऐहिक जीवनाचे परमोच्च ध्येय म्हणजे समानबंधुत्व आणि त्यातून निर्माण होणारी शांतता. हे ध्येय साध्य करावयाच्या दृष्टीने, योगाभ्यासाचा — जीवात्मा व परमात्मा ह्यांचे ऐक्य घडवून आणणाऱ्या ह्या शास्त्रीय ज्ञानाचा सर्व देशांतील सर्व मानवप्राण्यांना हा संदेश यथाकाल पोचविण्याच्या कामी फार उपयोग आहे. हे कार्य योगाभ्यासच करील.

भारताची संस्कृती ही जगातील कोणत्याही इतर देशाच्या संस्कृतीपेक्षा अधिक पुरातन आहे, ही गोष्ट जरी निर्विवाद असली, तरी आजवर इतके आघात सोसूनसुद्धा ती इतकी टिकून राहिली ही काही केवळ यदृच्छेने घडून येणारी गोष्ट नव्हे, तर त्याचे कारण वेगळे आहे, हे फारच थोड्या इतिहासकारांना समजले आहे. भारत देशामध्ये प्रत्येक पिढीत अतिउत्तम माणसे जन्मास आलेली आहेत आणि त्यांनी सनातन सत्याच्या शोधार्थ आपली भक्ती अर्पण केलेली आहे. त्या भक्तिभावाचा हा एक साधा घडून येणारा परिणाम आहे, हेच त्याचे खरे कारण आहे. केवळ नुसते टिकून राहून युगायुगांमधून वाहणाऱ्या वाऱ्यांच्यापुढे स्वतःला ताठ ठेवून (आणि अशी किती युगे लोटली ते जडभरित विद्वानच जाणोत) भारताने

कालाच्या ह्या आघाताला असे समर्पक उत्तर दिले आहे की, तसे कोणत्याही लोकांना देता आले नाही.

बायबलमध्ये एक गोष्ट आहे. अब्राहमने परमेश्वरास [3] अशी विनंती केली की, सोडोम शहरामध्ये जर दहा सच्चरित माणसे आढळली, तर त्या शहराचा नाश करू नये. तेव्हा परमेश्वराने उत्तर दिले: “दहांच्या करता मी ह्या शहराचा नाश करणार नाही.” ह्या परमेश्वराच्या वचनाचा अर्थ उघड आहे. भारत देश हा कालाच्या उदरात गडप झाला नाही, याचे कारण या उक्तीमध्ये सापडते. भारताला समकालीन अशी मोठमोठी साम्राज्ये — युद्धनीतीमध्ये नैपुण्य ज्यांनी मिळविलेले होते, अशी मिसर, बाबिलोन, ग्रीस व रोम येथील अवाढव्य साम्राज्ये आज धुळीला मिळालेली आढळतात.

परमेश्वराच्या ह्या उक्तीचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. एखादा देश हा जो टिकून राहतो तो त्याने केलेल्या भौतिक प्रगतीमुळे नसून, त्या देशाने जी नररत्ने, आदर्श पुरुषोत्तम निर्माण केले असतील त्यांच्यामुळे टिकून राहतो.

तेच परमेश्वराचे शब्द आता या विसाव्या शतकात पुनः कानी ऐकावयास येवोत. निम्मे अधिक शतक संपते न संपते तोच रक्तलांछित अशी दोन महायुद्धे होऊन गेली. जो न्यायाधीश लाच देऊन वश होत नाही, अशा परमेश्वराच्या दृष्टीने उत्तम अशी दहा माणसे एखाद्या राष्ट्रात निपजली तरी त्या राष्ट्रास विनाशाचे भय राहत नाही.

परमेश्वराच्या ह्या उक्तीचा फायदा घेऊन भारताने काळाच्या हजारो आघातांपुढे टिकाव धरलेला आहे व स्वतःला शाबूत ठेवलेले आहे. प्रत्येक शतकामध्ये या देशात साक्षात्कारी पुरुष निर्माण झालेले आहेत व त्यांनी ही भूमी पुनीत केली आहे. येशू ख्रिस्तासमान लाहिरी महाशय आणि श्रीयुक्तेश्वर यांच्यासारखे सत्पुरुष निर्माण होऊन, त्यांनी जगाला संदेश दिलेला आहे की, योगशास्त्राचे ज्ञान — परमेश्वरी साक्षात्कार घडवून आणण्याचे शास्त्र माणसाला खरे सुख मिळण्याच्या दृष्टीने व राष्ट्र टिकून राहण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

लाहिरी महाशयांच्या जीवनाबद्दल व त्यांच्या जागतिक तत्त्वप्रणालीबद्दल फारच थोडी माहिती छापून [4] प्रसिद्ध झालेली आहे. जवळजवळ तीसएक वर्षे मी भारत, अमेरिका व युरोप येथे जागोजागी हिंडलो व मला असे आढळून आले की, मोक्षदायी अशा ह्या यौगिक ज्ञानाच्या संदेशाबद्दल लोकांमध्ये आत्यंतिक व कळकळीची जिज्ञासा आहे. ह्या गुरुजींच्या आयुष्याचा लेखी आढावा तयार करण्याची आज जरुरी आहे व त्यांनी तसे भविष्यही केले होते.

लाहिरी महाशयांचा जन्म एका जुन्या घराण्याच्या पवित्र ब्राह्मण कुटुंबात ३० सप्टेंबर १८२८ रोजी झाला. बंगालमधील नदिया जिल्ह्यातील कृष्णनगरजवळील घुरणी या खेडेगावी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गौरमोहन लाहिरी व आईचे नाव मुक्तकाशी. त्यांच्या वडिलांची ही दुसरी बायको. ते आपल्या आईचे सर्वांत धाकटे पुत्र. (त्यांच्या वडिलांची पहिली बायको यात्रा करीत असताना मृत्यू पावली. तिला तीन मुले झाली.) लाहिरी महाशय लहान असतानाच त्यांची आई वारली. तिच्याबद्दल विशेष काही माहिती

नाही. शास्त्रपुराणांत “योगीराज” म्हणून ज्यास म्हण्टलेले आहे, त्या भगवान शंकराची ती निःस्मीम भक्त होती एवढीच तिच्याबद्दल माहिती मिळते.

मुलाचे संपूर्ण नाव श्यामाचरण लाहिरी. त्याची लहानपणची वर्षे घुरणीस त्यांच्या वाडवडलांच्या घरात गेली. वयाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षी हा मुलगा वाळूत दडून राहिलेला, फक्त डोके वरती, असा काही एका प्रकारच्या योगासनात बसलेला, असा आढळून येत असे.

१८३३ साली हिवाळ्यात लाहिरी कुटुंबाच्या जमिनींच्या शेजारून जाणाऱ्या जलंगी नदीने आपला प्रवाह बदलला व ती गंगेच्या खोल प्रवाहात नाहीशी झाली. त्याच सुमारास घराण्याच्या जमिनी वाहून गेल्या. त्या पाण्याच्या प्रवाहात त्यांचे घरही वाहून गेले व त्यांच्या पूर्वजांनी बांधलेले शंकराचे देऊळही वाहून गेले. कोण्या भक्ताने पाण्याच्या भोवऱ्यातून शंकराची मूर्ति शोधून काढली व तिची पुनः प्राणप्रतिष्ठा करून नवीन देऊळ बांधले. त्या देवळास ‘घुरणीचे शिवमंदिर’ म्हणून आजही लोक ओळखतात.

त्यानंतर गौरमोहन लाहिरी व त्यांचे कुटुंब यांनी घुरणी गाव सोडून दिले व सगळी मंडळी वाराणशीस आली व तेथे स्थायिक झाली. तेथे आल्यावर वडिलांनी लवकरच शंकराचे एक देऊळ बांधले. वेदशास्त्रप्रणीत अशा आश्रमधर्मानुसार त्यांनी गृहस्थाश्रम चालविला. दररोजची नित्य कर्मे, वेदोक्त पूजापाठ, दानधर्म, अतिथिसत्कार, शास्त्राध्ययन ते यथासांग करीत. त्यांचा स्वभाव न्यायी व दिलदार असायचा, तरी पण नवीन युगातील विचारसरणीच्या उपयोगी तत्त्वांचा त्यांनी कधी अव्हेर असा केला नाही.

वाराणशीच्या अभ्यासक्रमामध्ये हिंदीचा व उर्दूचा अभ्यास या मुलाने केला. जयनारायण घोषाल यांनी काढलेल्या शाळेत त्यांनी संस्कृत, बंगाली, फ्रेंच आणि इंग्लिश या भाषांचे अध्ययन केले. वेदशास्त्राचा सखोल अभ्यास करण्याच्या अनुरोधाने नागभट्ट नावाच्या एका महाराष्ट्रीय पंडिताची विद्वत्ताप्रचुर अशी वेदान्तावरची चर्चात्मक प्रवचने या तरुण योग्याने ध्यानपूर्वक ऐकिली होती.

श्यामाचरण हा एक प्रेमळ स्वभावाचा, विनयशील व धैर्यशाली असा तरुण होता. त्याच्या सोबत्यांचे त्याच्यावर फार निस्सीम प्रेम असायचे. त्याचे शरीर, सुदृढ, सशक्त व प्रमाणबद्ध होते. त्याला चांगले पोहायला येत असे व शारीरिक शक्तीच्या अनेक कसरतींमध्ये तो प्रवीण होता.

१८४६ मध्ये श्यामाचरण लाहिरींचे श्रीमती काशीमणींबरोबर लग्न झाले. श्रीमती काशीमणीच्या वडिलांचे नाव श्री देवनारायण संन्याल. ती एक आदर्श संसारी स्त्री होती. संसाराचे सारे काम ती आनंदाने करी. आल्यागेल्याचा पाहुणचार व गोरगरिबांना दानधर्म ती अगदी व्यवस्थित करी. या जोडप्याला एकूण चार अपत्ये झाली. दोन सुवृत्त पुत्र — तिनकौरी व दुकौरी आणि दोन मुली. तेवीस वय असताना १८५१ मध्ये लाहिरी महाशयांना ब्रिटिश सरकारच्या मिलिटरी इंजिनियरिंग डिपार्टमेंटमध्ये अकाऊंटंट म्हणून नोकरी लागली. नोकरीमध्ये असताना त्यांना बऱ्याच बढत्या मिळाल्या. म्हणजे परमेश्वराच्या दृष्टीने ते एक साधुपुरुष जरी होते, तरी व्यवहारामध्ये कचेरीत काम करीत असताना मानवी जीवनाच्या नाटकातील भूमिका सुद्धा त्यांनी यशस्वीपणे केल्या.

नोकरीत असताना त्यांच्या वेळोवेळी गाझीपूर, मिर्झापूर, नैनीताल, दाणापूर व वाराणशी येथे बदल्या झाल्या. वडील वारल्यावर तरुणपणीच त्यांनी साऱ्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याची जबाबदारी घेतली. वाराणशीच्या परिसरात गरुडेश्वर मोहल्ल्यासारख्या एकांत जागी त्यांनी कुटुंबाकरिता एक घरही खरेदी केले.


या जगावर आपण ज्या कारणाकरिता जन्म घेतला, त्याची पूर्तता लाहिरी महाशयांच्या तेहतिसाव्या वर्षी झाली. त्या साली त्यांना परमगुरू बाबाजी हिमालयामध्ये राणीखेतजवळ भेटले व त्यांनी त्यांना क्रियायोगाची दीक्षा दिली.



*हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या पहाडांमध्ये, द्वाराहाट जवळ योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया आश्रम आणि एकांताश्रम. जवळपासच असलेल्या पहाडांमध्ये गुहा आहे, जिथे महावतार बाबाजींचे काही काळ वास्तव्य होते. जिथे 1861 मध्ये त्यांनी लाहिरी महाशयांना क्रियायोगची दीक्षा दिली आणि आधुनिक जगतासाठी प्राचीन लुप्त आध्यात्मिक शास्त्राचे पुनरुज्जीवन केले.*

ही शुभ घटना केवल लाहिरी महाशयांच्या बाबतीतच घडून आली असे नव्हे, तर साऱ्या मानवजातीच्या दृष्टीने सुद्धा ती एक भाग्यशाली घटना झाली. दीर्घकाल कालाच्या उदरात गडप झालेल्या किंवा नष्ट झालेल्या अत्युच्च अशा योगसाधनेचे पुनरुज्जीवन झाले.

पुराणातील कथेप्रमाणे गंगा [5] ही स्वर्गातून पृथ्वीवर आली व आपला भक्त जो भगीरथ त्याच्या तृषातुर मुखामध्ये आपल्या दिव्य प्रवाहाची धारा जशी गंगेने सोडली, तद्वत क्रियायोगाचा स्वर्गीय स्रोत हिमालयाच्या गुप्त अशा खडकाळ प्रदेशातून सर्वसाधारण माणसाच्या धूलिधूसर झोपडीपर्यंत वाहावयास सुरुवात झाली आहे.



*श्री श्री लाहिरी महाशय*

*"मी आत्मा आहे. जे सर्वव्यापी अदृश्य आहे त्याचा फोटो तुझा कॅमेरा कधी घेऊ शकेल काय ?" पुष्कळ फोटो-फिल्म वापरल्यावरही लाहिरी महाशयांची तसबीर काढण्याच्या कामी यश लाभले नाही, मग शेवटी योगावताराने आपल्या "देह मंदिराचा" फोटो काढण्यास परवानगी दिली. श्री योगानंद लिहितात: "यानंतर ह्या महान गुरुंनी पुनः कधीच आपला फोटो काढू दिला नाही; निदान माझ्यातरी पाहण्यात नाही."*

1 जॉन ११:१-४ (बायबल).

2 कॉलरा चा रोगी सामान्यपणे शेवटपर्यन्त पूर्ण शुद्धीमध्ये असतो.

3 जेनेसिस १८:२३-३२ (बायबल).

4 त्यांचे एक लहानसे चरित्र, “श्री श्री श्यामाचरण लाहिरी महाशय” १९४१ मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्या चरित्राचे लेखक कोणी स्वामी सत्यानंद होते. त्या पुस्तकातून लाहिरी महाशयांच्याबद्दल ह्या भागात मी काही उताऱ्यांचे भाषांतर केले आहे.

5 हिंदुमात्राला पवित्र अशा गंगामाईचा उगम हिमालयाच्या बर्फाच्छादित गुहेमध्ये व चिरंतन हिमाच्छादित व प्रशांत अशा परिसरामध्ये झाला. आज शतकानुशतके हजारो साधुसंतांनी गंगेच्या परिसरात वास करण्यात आनंद मानलेला आहे व त्यांच्या तिच्या तीरावरील वास्तव्याने तेथे एक तऱ्हेचे शुभदायक असे तेजोवलय निर्माण झालेले आहे. (पहा. प्रकरण २०, शेवटची टीप)

गंगेच्या पाण्याचे एक विलक्षण व असाधारण असे वैशिष्ट्य आहे. ते कधीहि दूषित होत नाही. तिचे शुद्धत्व कधीहि बिघडत नाही. त्यात रोगजंतू निर्माण होत नाहीत. लाखो हिंदू लोक ते पाणी पिण्याकरिता व स्नानाकरिता वापरतात. त्यापासून त्यांना काही अपाय होत नाही. आधुनिक शास्त्रज्ञांना या गोष्टीचा अचंबा वाटतो. डॉ. जॉन हॉवर्ड नॉर्थरॉप हे अशाचपैकी एक शास्त्रज्ञ होते. त्यांना १९४६ मध्ये रसायनशास्त्रामध्ये नोबेल प्राईझ अंशतः मिळालेले होते. त्यांनी नुकतेच असे म्हण्टलेले आहे, “आम्हास माहीत आहे की, गंगेचे पाणी फार दूषित आहे. इतके असूनसुद्धा भारतीय लोक ते पितात, त्याच्यामध्ये पोहतात आणि त्यांना त्यापासून काही अपाय झालेला दिसत नाही.” ते नंतर पुढे असे अनुमान करतात की, “कदाचित तिच्या पाण्यामध्ये असणारे बॅक्टेरिओफेज (बॅक्टेरिया नाहीसे करणारे रोगनाशक जंतू) नदीच्या पाण्यास शुद्ध करीत असावेत.”

नैसर्गिक चमत्कार जे आहेत, त्या सर्वांकडे वेद आदराने पाहतात. असिसीच्या सेंट फ्रान्सिसने जी स्तुती केली आहे ती भाविक हिंदू मनुष्याला सहज कळू शकेल: “माझा प्रभू अन्य होय; की, ज्याने भगिनीसदृश असे हे पाणी आमच्यासाठी उत्पन्न केले; जे इतके उपयोगी, नम्र, शुद्ध व बहुमोल असे आहे.”

## प्रकरण - ३३

# 33. बाबाजी — आधुनिक भारताचे महावतार

बद्रीनारायणजवळील उत्तर हिमालयाचा भूभाग, लाहिरी महाशयांचे गुरू जे बाबाजी यांच्या जिवंत वास्तव्याने अजूनही पुनीत झालेला आहे. ह्या एकांतवासी महापुरुषाने आपला देह अनेक शतकांवर कायम ठेवलेला आहे — कदाचित सहस्रावधी वर्षेसुद्धा. अमर असे बाबाजी हे अवतारी पुरुष आहेत. ‘अवतार’ या संस्कृत शब्दाचा अर्थ ‘उतरणे.’ मूळ धातू ‘अव’ म्हणजे ‘खाली’ आणि ‘तृ’ म्हणजे ‘पुढे जाणे.’ हिंदू धर्मशास्त्रामध्ये ‘अवतार’ याचा अर्थ परमेश्वराने हाडामांसाचा देह धारण करणे असा होतो.

श्रीयुक्तेश्वरांनी मला सांगितले, “बाबाजींच्या आध्यात्मिक अवस्थेची कल्पना मानवी मनाला येण्यासारखी नाही. माणसाची आकुंचित दृष्टी अनेक स्तरांपलीकडील तारकासदृश अशा बाबाजींच्या स्थानापर्यंत पोचू शकत नाही. त्यांच्या अवतारी स्वरूपाचे आकलन करण्याचा प्रयत्नसुद्धा कोणास करता येण्यासारखा नाही. त्याचे ज्ञान होणेसुद्धा अशक्य आहे.”

आध्यात्मिक प्रगतीच्या अवस्थांचे वर्गीकरण उपनिषदांनी फार बारकाईने केलेले आहे. सिद्ध (“पूर्णावस्थेला गेलेला प्राणी”) हा जीवन्मुक्त (“जिवंत असतानाच मुक्त”) अवस्थेपासून परिणत होऊन परममुक्त (“संपूर्णपणे मुक्त”—मृत्यूवर जय मिळविल्याने) अवस्थेप्रत पोचलेला असतो. ह्या अंतिम अवस्थेत प्राणी मायेच्या बंधनातून सुटून जाऊन जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होतो. म्हणून परममुक्त जो असतो तो क्वचितच देह धारण करतो; जर त्याने देह धारण केला, तर त्याला अवतार म्हणतात. हे अवतार म्हणजे ह्या भूलोकावर स्वर्गीय कृपाप्रसादाचा वर्षाव करण्याकरिता परमेश्वराने नियुक्त केलेले एक माध्यमच. अवतारांस विश्वरचनेचे किंवा व्यवस्थेचे नियम लागू नाहीत. त्याचे शुद्ध शरीर, जे एखाद्या प्रकाशप्रतिमेसारखे दृष्टिगोचर असते, त्यास निसर्गाचे कोणतेच बंधन लागू नसते.

वरवर पाहणाऱ्याला अवतारी पुरुषाच्या ठिकाणी विलक्षण असे काही दिसणार नाही. परंतु प्रसंगी अवतारी पुरुषाच्या देहाची सावली पडत नाही किंवा जमिनीवर चालल्यानंतर त्याच्या पावलाचा ठसा उमटत नाही. अज्ञान आणि भौतिक बंधने यांपासून अवतारी पुरुष अंतःस्थपणे मुक्त असतो. ह्या स्थितीच्या ह्या बाहेरून दिसणाऱ्या लाक्षणिक खुणा होत. अशा तऱ्हेचा ईश्वरी पुरुषच जन्ममरणाच्या सापेक्षतेपलीकडील सत्य जाणू शकतो. उमर खय्यामबद्दल लोकांना यथार्थ परिचय झालेला नाही. तो आपल्या ‘रुबायत’ नामक अमर काव्यात परममुक्त पुरुषाचे खालीलप्रमाणे वर्णन करतो:

“आनंदाचा निज मम शशी; अस्त ना ज्यासि काही,
स्वर्गीचा हा पुनरपि शशी येतसे दिक्प्रदेशी;
अंती माझे गमन घडल्यानंतरी तो कितीदा,
सांगे पाहू, उपवनि पुनः शोध घे; व्यर्थची ना!” [1]

आता ह्या कवितेमधील “आनंदाचा निज मम शशी, अस्त ना ज्यासि काही” म्हणजे परमेश्वर — शाश्वत ध्रुव; जो कधीही कालविसंगत असू शकत नाही. “स्वर्गीचा हा पुनरपि शशी येतसे दिक्प्रदेशी” म्हणजे बाह्य विश्व, जे काही नियमांनुसार काही ठरीव कालावधींनी उदय व अस्त पावत असते. साक्षात्कार झाल्यावर ह्या फारसी द्रष्ट्याने ह्या पृथ्वीतलावर-निसर्गाच्या किंवा मायेच्या ‘उपवनी’ पुनःपुनः जन्म घेऊन येण्यापासून आपली स्वतःची सुटका करून घेतली आहे; तर मग “अंती माझे गमन घडल्यानंतरी तो कितीदा … शोध घे; व्यर्थची ना!” आश्चर्याने स्तिमित झालेल्या ह्या विश्वाची, प्रकृतीची, माझ्या वियोगाने झालेली ही केवढी दारुण निराशा!

येशू ख्रिस्ताने ह्या मुक्ततेचे वेगळ्या तऱ्हेने वर्णन केलेले आहे. “आणि तेथे एक पुरोहित आला आणि प्रभूला म्हणाला, “प्रभो, तू जेथे जेथे जाशील तेथे तेथे मी तुझ्याबरोबर येईन.” तेव्हा येशू त्याला म्हणाला, “कोल्ह्यांना सुद्धा राहावयास खोपटी असतात, हवेतील पक्ष्यांची घरटी असतात; परंतु मानवाच्या पुत्राला डोके टेकण्यासाठी एकही निवाऱ्याची जागा नाही.” [2]

सर्वत्र वावरत असल्यामुळे व्यापक अशा येशू ख्रिस्ताच्या पाठोपाठ जाता येणे शक्य आहे काय? त्याच्याबरोबर जाणे म्हणजे विश्वात भरून राहिलेल्या अनंत चैतन्याच्या पाठोपाठ जाणे होय.

कृष्ण, राम, बुद्ध आणि पातंजली हे भारत देशातील प्राचीन काळचे अवतार आहेत. तामीळ भाषेमध्ये पुष्कळसे काव्यवाङ्मय अगस्त्र्य ऋषीच्यासंबंधी रचले गेलेले आहे. अगस्त्र्य ऋषी हे दक्षिण भारतामध्ये अवतारच होऊन गेले. त्यांनी ख्रिस्ताच्या जन्माच्या पूर्वीच्या शतकामध्ये व त्याच्यानंतरच्या शतकामध्ये अनेक चमत्कार करून दाखविलेले आहेत. अगस्त्र्य ऋषी अजूनही ऐहिक देह धारण करून संचार करीत असतात, अशी त्यांची ख्याती आहे.

अवतारी पुरुषांनी आपली खास कामगिरी पार पाडावी म्हणून त्यांना मदत करण्याचे महत्कार्य बाबाजींनी आपल्याकडे घेतलेले आहे. म्हणजे शास्त्रात वर्णन केल्याप्रमाणे त्यांची गणना महावतारांत होते. वर्णाश्रमधर्माची संस्थापना करणाऱ्या शंकराचार्यांना [3] आपण योगदीक्षा दिली होती, असे त्यांनी सांगितले आहे. तसेच मध्ययुगीन काळातील सुप्रसिद्ध योगीपुरुष महात्मा कबीर यासही योगदीक्षा त्यांनी दिली होती. एकोणिसाव्या शतकातील त्यांचे प्रमुख शिष्य म्हणजे ज्यांनी नष्टप्राय झालेल्या क्रियायोगाचे पुनरुज्जीवन केले, ते आपल्या परिचयाचे लाहिरी महाशय.

बाबाजी हे नेहमी येशू ख्रिस्ताशी संपर्क साधीत असतात. ते दोघे प्राणिमात्रांच्या मुक्ततेसाठी विचारस्पंदने प्रसृत करीत असतात; आणि ह्या युगाच्या उद्धारासाठी योजनांचे आध्यात्मिक तंत्र तयार करीत असतात. ह्या दोन पूर्ण जागृत अशा महात्म्यांचे — एक सदेही व दुसरा विदेही — कार्य राष्ट्राराष्ट्रांना परस्परांशी युद्ध करण्यापासून, परस्परांचा द्वेष करण्यापासून परावृत्त करणे, धार्मिक बाबतीत लोकांना पंथवादापासून अलिप्त ठेवणे आणि लोकांना भोगवादाच्या त्यांच्यावर परत उलटणाऱ्या अशा आपत्तींपासून वाचविणे हे

होय. बाबाजींना आधुनिक काळाच्या प्रवृत्तीचे पूर्ण ज्ञान आहे. विशेषकरून पाश्चिमात्य संस्कृतीवर ह्या काळाचे जे परिणाम होतात आणि त्यामुळे जे गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात त्यांबद्दल त्यांना भरपूर कल्पना आहे. त्यांच्या मते योगसाधनेच्या मोक्षदायक मार्गाची शिकवण पश्चिमेस व पूर्वेस सारख्याच प्रमाणात देण्याची जरुरी आहे.

बाबाजींबद्दल इतिहासामध्ये कुठे उल्लेख नाही म्हणून आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. हे महायोगी जगद्गुरू कोठल्याही देशामध्ये अगदी उघडपणे असे वावरलेच नाहीत. त्यांच्या सहस्र वर्षांच्या योजनेमध्ये जाहिरातबाजीच्या खोट्यानाट्या प्रचाराला जागा नाही. सदैव शांतपणे कार्य करीत असलेल्या एकमेव परमेश्वराप्रमाणे बाबाजी आपले कार्य गुप्तपणे व नम्रपणे करीत असतात.

येशू ख्रिस्त आणि भगवान श्रीकृष्ण यांच्यासारखे महान द्रष्टे एका विशिष्ट आणि लोकांच्या नजरेस भरण्यासारख्या कार्याकरिता पृथ्वीवर अवतार घेतात. ते त्यांचे कार्य झाले म्हणजे ते ह्या जगातून निघून जातात. बाबाजींसारख्या अवतारी पुरुषांचे कार्य जरा वेगळ्या स्वरूपाचे असते. इतिहासामध्ये एखादा विशेषपणे उठून दिसणारा प्रसंग घडवून आणण्यापेक्षा, मनुष्यजातीच्या शतकाशतकांतून होत जाणाऱ्या उत्क्रांतीमध्ये प्रगती घडवून आणण्याचे कार्य ते करीत असतात. अशा तऱ्हेचे महात्मे जुजबी लोकांच्या नजरेला आपण पडू नये म्हणून गुप्त राहतात आणि आपल्या इच्छेनुसार अदृश्यही होऊ शकतात. ह्या कारणामुळे आणि विशेषेकरून ते आपल्या शिष्यांना आपल्या स्वतःसंबंधी मौन बाळगण्याबाबत कटाक्षाने बजावून सांगत असतात. म्हणून अशा तऱ्हेच्या उच्च कोटीच्या आध्यात्मिक व्यक्ती जगामध्ये अज्ञात स्वरूपात राहतात. मी ह्या पुस्तकात बाबाजींच्या जीवनक्रमाबद्दल जी थोडीबहुत माहिती देत आहे, तीसुद्धा ज्या काही थोड्या हकीकती त्यांच्या दृष्टीने योग्य व प्रसिद्ध व्हावयास उचित अशा आहेत त्याच देत आहे.

आपल्या चरित्रनायकाच्या जन्मस्थलाची व कुटुंबाची माहिती देण्यास कोणाही इतिहासकाराला आवडते; पण तशी मर्यादित स्वरूपाची माहिती बाबाजींच्या बाबतीत उपलब्ध अशी नाही. ते साधारणपणे हिंदी भाषेत बोलत, पण ते तसे कोणत्याही भाषेत स्पष्ट संभाषण करतात. त्यांनी बाबाजी [4] (पूज्य वडील) असे साधेसुधे नाव धारण केलेले आहे; लाहिरी महाशयांच्या शिष्यांनी त्यांना आणखीन काही आदरार्थी नावे दिलेली आहेत. ती म्हणजे महामुनी बाबाजी महाराज (अत्युच्च समाधीअवस्थेतील संत), महायोगी (योग्यांमध्ये श्रेष्ठ), त्रिंबकबाबा-शिवबाबा (शंकराच्या अवतारांची नावे). पूर्ण साक्षात्कारी अशा ह्या महापुरुषाची वंशपरंपरा माहीत करून घेण्याची काही जरुरी आहे का?

लाहिरी महाशय म्हणत, “जेव्हा जेव्हा कोणी बाबाजींचे नाव अत्यंत पूज्य बुद्धीने घेत असतो, तेव्हा तेव्हा त्या भक्तावर ताबडतोब अनुग्रह होतो.”

अमर अशा ह्या परमगुरूंच्या शरीरावर वयाची अशी कोणतीही खूण नाही. ते तरुण भासतात. त्यांचे वय पंचविसापेक्षा जास्त दिसत नाही. गौरवर्णीय, मध्यम शरीरयष्टीचे व उंचीचे, सुंदर व सुदृढ शरीराचे बाबाजी, आपल्याभोवती सहज दिसून येणारे असे तेजोवलय धारण करीत असतात. त्यांचे डोळे काळेभोर, स्थिर व नाजूक; त्यांचे केस लांबलचक व

ताम्रवर्णीय आहेत. कधीकधी त्यांचा चेहरा लाहिरी महाशयांच्या चेहऱ्यासारखा दिसतो. एखाद्या प्रसंगी हे साम्य इतके जुळते की, लाहिरी महाशयांच्या उत्तरआयुष्यात ते तरुण दिसणाऱ्या बाबाजींचे वडील म्हणून सहज समजले गेले असते.

माझे संस्कृतचे संतशिक्षक स्वामी केवलानंद हे बाबाजींच्या बरोबर हिमालयांत काही काळ राहिले होते.

केवलानंदांनी मला सांगितले, “अद्वितीय असे हे महायोगी आपल्या मेळाव्याबरोबर गिरिकंदरी एका जागेवरून दुसऱ्या जागेवर भ्रमण करीत असतात.” त्यांच्या लहानशा मेळाव्यात अतिप्रगत असे दोन अमेरिकन शिष्य आहेत. बाबाजी एके ठिकाणी काही वेळ राहिल्यानंतर ‘डेरा दंडा उठाओ,’ असे म्हणत. त्यांच्या हातात एक दंडा असतो. मेळाव्याने ताबडतोब दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करावे, अशी ही शब्दांनी दिलेली सूचना असे. सूक्ष्म देहाने स्थलांतर करण्याची ही पद्धत ते नेहमीच अवलंबितात असे नव्हे. ह्या गिरिशिखरावरून त्या गिरिशिखरावर कधीकधी ते पायांनीच जात.

“बाबाजींची जेव्हा इच्छा असते, तेव्हाच ते इतरांच्या दृष्टीस पडतात किंवा त्यांना ओळखू येतात. निरनिराळ्या भक्तांना ते थोड्याफार फरकाच्या वेगवेगळ्या स्वरूपांमध्ये दर्शन देतात. कधीकधी दाढी-मिशा ते धारण करतात, तर कधी कधी त्यांविरहित ते वावरतात. अक्षय अशा त्यांच्या शरीराला अन्न असे लागत नाही. म्हणून हे परमगुरू क्वचितच खातात. भेटायला येणाऱ्या शिष्यांकडून शिष्टाचार म्हणून ते फळे किंवा दूधभात किंवा तूप स्वीकारतात.

केवलानंद पुढे म्हणाले, “बाबाजींच्या जीवनातले दोन विस्मयकारी प्रसंग मला माहीत आहेत. एकदा रात्रीच्या वेळी होमाच्याभोवती त्यांचे शिष्य बसले होते. गुरुजींनी त्यातले एक पेटलेले लाकूड घेतले आणि होमाच्या जवळच बसलेल्या एका चेल्याच्या उघड्या खांद्यावर ठेवले.

“लाहिरी महाशय त्या वेळी तेथे उपस्थित होते. त्यांनी आपली नापसंती दर्शविली, ‘महाराज, काय ही निष्ठुरता!’

“‘त्याच्या पूर्वकर्मविपाकाप्रमाणे तो तुझ्या डोळ्यांदेखत जळून खाक झालेला तुला पाहवेल काय?’

“असे म्हणून बाबाजींनी चेल्याच्या भाजलेल्या खांद्यावर जखम बरी करणारा हात ठेवला. ‘आज रात्री तुला मी मृत्यूच्या यातनेतून वाचविले आहे. विस्तवामुळे थोडेसे भाजल्याने तुझ्या पूर्वसंचिताची, पापाची भरपाई झालेली आहे.’

“अशाच एका दुसऱ्या प्रसंगी बाबाजींचे शिष्य वेटोळे घालून बसले होते. तेवढ्यात एक परका मनुष्य तेथे आला. त्याच्या येण्यामुळे त्यांना जरा व्यत्यय झाल्यासारखे वाटले. गुरुजींच्या राहुटीशेजारी असलेल्या एका चढता न येण्यासारख्या खडकावर तो मोठ्या शिताफीने चढून आला होता.

“‘महाराज, आपणच ते महात्मा बाबाजी आहात,’ त्या माणसाच्या चेहऱ्यावर अवर्णनीय आदरभावाचे तेज दिसत होते. ‘आज कित्येक महिनेन् महिने मी ह्या दुर्गम कड्या-कपारीतून

आपला शोध काढीत आहे. शिष्य म्हणून माझा स्वीकार करावा अशी माझी आपल्याला विनवणी आहे.'

"जेव्हा त्या परमगुरूंनी काहीच उत्तर दिले नाही, तेव्हा त्या माणसाने त्या कड्याच्या कंगोरेदार खडकांच्या खालच्या दरीकडे बोट दाखविले व तो म्हणाला, 'माझा जर आपण स्वीकार केला नाहीत, तर मी या खडकावरून उडी टाकीन. दिव्यत्वाचे दर्शन घडून यावे, याकरिता जर मला आपली मदत मिळाली नाही, तर या आयुष्याचा मला आता पुढे काही उपयोग नाही.'

"'मग टाक उडी' बाबाजी अगदी निर्विकारपणे म्हणाले, 'तुझ्या सध्याच्या साधनेच्या अवस्थेत तुझा मला स्वीकार करता येत नाही.'

त्या माणसाने ताबडतोब कड्यावरून स्वतःला लोटून दिले. बाबाजींच्या शिष्यांना धक्का बसला. त्यांना त्यांनी त्या परक्या माणसाचे शरीर शोधून आणावयास सांगितले. ते छिन्नविच्छिन्न शरीर घेऊन ते परत आले, तेव्हा त्या परमगुरूंनी त्या मृत माणसावर हात ठेवला आणि पाहा काय चमत्कार! त्याने आपले डोळे उघडले आणि उठून त्या सर्वशक्तिमान गुरूपुढे साष्टांग दंडवत घातले.

"'तू आता शिष्य होण्यास पात्र झाला आहेस.' बाबाजींनी त्या पुनरुत्थान झालेल्या आपल्या शिष्याच्या चेहऱ्याकडे प्रेमपूर्ण नजरेने पाहिले, 'एक मोठी बिकट कसोटी [5] तू धैर्याने पार केली आहेस. मृत्यू तुला फिरून स्पर्श करणार नाही; तू आता आमच्या अमर मंडळीत सामील झाला आहेस.' नंतर प्रयाणापूर्वीचे नेहमीचे आपले शब्द त्यांनी उच्चारले, 'डेरा दंडा उठाओ'; आणि मग नंतर तो सगळा मेळावा त्या गिरिकंदरातून दिसेनासा झाला."

अवतारी पुरुष सर्वव्यापक चैतन्य स्वरूपात वास करीत असतात. त्यांच्या दृष्टीला दूरचे असे काही असत नाही. बाबाजींना आपला जड, पार्थिव देह ह्या शतकातून त्या शतकात धारण करण्यास एकच गोष्ट कारणीभूत आहे, ती म्हणजे मनुष्याला आपण काय काय साध्य करू शकू, याचे प्रत्यक्ष उदाहरण पुरविणे ही त्यांची इच्छा. जर मनुष्याला आपल्या मर्त्य देहामध्ये वास करीत असलेल्या ईश्वरी अंशाचे कधीच दर्शन घडून आले नसते तर तो सदैव मायेच्या अनिवार्य अशा भ्रमामध्येच अडकून राहिला असता आणि त्याला मृत्यूवर कधीच विजय मिळविता आला नसता.

येशू ख्रिस्ताला अगदी सुरुवातीपासून आपल्या आयुष्याचा जीवनक्रम माहीत होता. त्या आयुष्यातील प्रत्येक प्रसंग त्याने अनुभविला आणि ह्याचे कारण काही संचित फलद्रूप करावयाचे नसून, त्याचा हेतू एकच होता; आणि तो म्हणजे विचारवंत माणसाने आपली उन्नती साधावी हा होय. बायबलचे जे चार उपदेशक—मॅथ्यू, मार्क, ल्यूक व जॉन—यांनी पुढील पिढ्यांकरिता जीवनप्रसंगाचे नाट्यपूर्ण व अविस्मरणीय असे वर्णन केलेले आहे.

बाबाजींच्या दृष्टीने भूत, वर्तमान व भविष्य असे तीन वेगवेगळे काळ नाहीतच. अगदी सुरुवातीपासून आयुष्यक्रमाच्या सगळ्या अवस्था त्यांनी अनुभविलेल्या होत्या. माणसाची विचारशक्ती व बुद्धी ही मर्यादित आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांनी आपल्या दिव्य आयुष्यातील पुष्कळ प्रसंग एक किंवा अनेक साक्षीदार ठेवून घडवून दाखविलेले आहेत.

उदाहरणार्थ, जेव्हा बाबाजींना शरीराचे अमरत्व हे शक्य आहे हे जोराने प्रतिपादण्याकरितां वेळ योग्य आहे असे वाटले, त्या वेळी तेथे लाहिरी महाशयांचा एक शिष्य हजर होता; त्यांनी ही वचनोक्ती राम गोपाळ मुझुमदार यास सांगितली. हेतू हा की, इतर मुमुक्षू साधकांना स्फूर्ती मिळविण्याच्या दृष्टीने त्या उक्तीचा अर्थ समजून यावा. जे महात्मे असतात, ते असेच आपले शब्द उच्चारतात आणि सर्वसाधारण प्रसंगामध्ये भागही घेतात; पण तो एकाच हेतूने की, मानवाचे कल्याण व्हावे. येशू ख्रिस्ताने सुद्धा असेच म्हटलेले आहे, “हे परमपिता, मला माहीत आहे की, तुला माझे बोलणे नेहमी ऐकू येते. *पण मी बोलतो, ते हे जे लोक माझ्याजवळ उभे आहेत त्यांच्याकरिता;* का की, तू मला ह्या भूलोकावर पाठविले आहेस त्यावर त्यांचा विश्वास बसावा.” [6]

राम गोपाळ हे कधीच झोप न घेणारे असे महात्मा [7] होते. त्यांना मी एकदा रणबाजपूरला जाऊन भेटलो होतो. बाबाजींच्या बरोबर झालेली पहिल्या मुलाखतीची विस्मयकारी हकीकत त्यांनी मला सांगितली.

राम गोपाळ मला सांगू लागले: “वाराणशीस लाहिरी महाशयांच्या पायांशी बसण्याकरिता मी कधी कधी माझी एकांतातील गुहा सोडून येत असे. एकदा मध्यरात्रीच्या वेळेस बऱ्याचशा शिष्यांसमवेत मी शांतपणे ध्यान करीत बसलो आणि इतक्यात गुरुजींनी मला जरा बुचकळ्यात पाडण्यासारखी विनंती केली.

“ते म्हणाले, ‘राम गोपाळ, ताबडतोब दशाश्वमेध घाटावर जा.’

“मी तडकच त्या एका बाजूला असलेल्या घाटाकडे गेलो. चांदणी रात्र होती. तारे चांगले लुकलुकत होते. मी तेथे काही वेळ शांतपणे बसल्यावर माझी नजर माझ्या पायांशी असलेल्या एका मोठ्या शिळेकडे गेली. ती शिळा हळूहळू वर येत चालली व तिच्याखाली एक भुयारी गुहा दिसू लागली. काही वेळाने शिळा वरवर यायची थांबली; व निश्चल झाली; जणू काही अज्ञात अशा आधाराने तिला वरच्यावर धरून ठेवलेले होते. आणि त्या भुयारातून एक तरुण, सुवस्त्राभूषित व अत्यंत लावण्यवती स्त्री हवेत अधांतरी वर येऊ लागली. तिच्याभोवती एक सौम्यसे तेजोवलय होते. ती माझ्या पुढ्यात येऊन निश्चल अशी उभी राहिली. ती दिव्यानंदात तल्लीन होती. काही वेळाने शेवटी तिने हालचाल केली व मृदू आवाजाने ती माझ्याशी बोलू लागली.

“‘माझे नाव माताजी. [8] मी बाबाजींची बहीण. मी त्यांना आणि लाहिरी महाशयांना माझ्या गुहेजवळ आज रात्री काही महत्त्वाच्या गोष्टीसंबंधी बोलणे करण्याकरिता बोलाविले आहे.’

“एक धूसरसा प्रकाश गंगानदीवर वेगाने पसरू लागला. तो चमत्कारिकसा प्रकाश पाण्यामध्येही परावर्तित होऊ लागला. तो हळूहळू जवळ येऊ लागला आणि माताजींच्या जवळ येऊन ठेपल्यावर एकदम त्याचा डोळे दिपविणारा चकचकाट झाला. आणि त्या प्रकाशातून एकदम लाहिरी महाशयांच्या मानवी देहाची आकृती स्थूल स्वरूपात प्रकट झाली. त्यांनी त्या स्त्रीमहात्म्याच्या पायांवर नमस्कार केला.

“गोंधळून व घाबरून गेलेल्या स्थितीतून मी जरा किंचित बाहेर पडतो न पडतो तोच, आणखी एक चमत्कार झाला. त्या चमत्काराने मी स्तंभितच झालो. आकाशामध्ये एका गूढ

अशा प्रकाशाचा वलयाकारी पुंजका दिसू लागला. तो पुंजका खाली खाली येऊ लागला. जसजसा तो जमिनीवर येऊ लागला तसे त्याने झंझावाताचे रूप धारण केले. त्या आवर्तामधून जिभांसारख्या ज्योती बाहेर येत होत्या. तो आवर्त शेवटी आम्ही बसलो होतो तेथपर्यंत येऊन ठेपला. आणि त्यातून एक सुंदर तरुणाची शरीराकृती स्थूलरूपात प्रकट झाली, आणि तो तरुण म्हणजे बाबाजी हे मी चटकन ओळखले. ते लाहिरी महाशयांसारखे दिसत होते. फरक इतकाच की, बाबाजी त्यांच्याहून जास्त तरुण दिसत होते आणि त्यांचे केस लांबलचक व तेजस्वी होते.

"लाहिरी महाशय, माताजी व मी असे तिघे त्यांच्या पायां पडलो. मी त्यांच्या दिव्य शरीराला स्पर्श केल्यावर माझ्या शरीरातील तंतून् तंतू गौरवशाली व सुखद अशा ईथीरिक संवेदनेने थरारून गेला.

"'पूज्य ताई,' बाबाजी म्हणाले. 'हा स्थूल देह सोडून देण्याचा व विश्वचैतन्याच्या प्रवाहामध्ये मिसळून जाण्याचा माझा विचार आहे.'

"'प्रिय गुरुदेव, आपला बेत माझ्या अगोदरच ध्यानात येऊन चुकला आहे. त्याबद्दलच मला आज रात्री बोलायचेय. आपल्याला देह सोडून देण्याची काय जरुरी आहे?' ती तेजस्वी स्त्री त्यांच्याकडे विनवणीच्या मुद्रेने पाहात होती.

"'माझ्या चैतन्याच्या सागरावर मी एक दृश्य किंवा अदृश्य तरंगाचे रूप धारण केले, तर काय फरक आहे?'

"माताजींनी विनोदगर्भ असे थोडक्यात उत्तर दिले. 'अमर गुरुदेव; जर काही फरक पडत नसेल तर तुम्ही ह्या देहाचा [9] कधीच त्याग करू नका.'

"'तथास्तु,' बाबाजी गंभीरपणे म्हणाले, 'मी हा पार्थिव देह कधीच टाकून देणार नाही. या जगामधील थोड्या लोकांना हा दिसेलच. तुझ्या मुखातून परमेश्वराने आपली इच्छा दर्शविली आहे.'

"ह्या दोन महानुभावांचे संभाषण मी भीतियुक्त आदराने ऐकत असताना ते परमगुरू माझ्याकडे अनुग्रह करण्याच्या उद्देशाने वळून म्हणाले."

"'भिऊ नको, राम गोपाळ,' ते म्हणाले, 'हे अमर वचन मी देत असल्याचा तू साक्षीदार आहेस. तू खरा भाग्यवान आहेस.'

"बाबाजींच्या आवाजाचा मंजुळ ध्वनी हळूहळू मंद होत गेला. त्यांचा आणि लाहिरी महाशयांचा असे दोन्ही देह हळूहळू हवेत तरंगत वर वर जाऊ लागले आणि गंगेच्या प्रवाहावरून मागे मागे जाऊ लागले, ते देह रात्रीच्या आकाशात जसे विरून जाऊ लागले तसतसा त्यांच्याभोवती दिपवून टाकणारा झगझगीत प्रकाश जमू लागला. माताजींचा देह गुहेमध्ये तरंगत तरंगत खाली गेला. दगडाची शिळा खाली आली व गुहेच्या दाराशी बरोबर जाऊन बसली. गुहेचे तोंड बंद झाले. हे सर्व काही आपोआप जणू एखाद्या अदृश्य अशा यांत्रिक तरफेकरवी केले जात होते.

"ह्या दृश्यामुळे मला जी स्फूर्ती मिळाली तिला सीमा नव्हती. मी नंतर लाहिरी महाशयांच्या घरी परत येण्यास निघालो. त्यांच्या घरी पोचलो. पहाटेची वेळ झाली. मी त्यांच्यापुढे वाकून


जेव्हा त्यांना नमस्कार केला, तेव्हा मला सर्व प्रकार माहीत आहे, हे समजल्याचे जाणून ते किंचित हसले.

"ते म्हणाले, 'राम गोपाळ, तुझी बाबाजींना आणि माताजींना भेटण्याची फार इच्छा होती. मला किती तरी वेळा ती तू बोलून दाखविलीस. आज ती इच्छा अशा आश्चर्यकारक तऱ्हेने फलद्रूप झाली. मला फार संतोष झाला.'

"माझ्या इतर गुरुबंधूंनी मला असे सांगितले की, मध्यरात्री मी येथून निघाल्यापासून लाहिरी महाशय आपल्या बसल्या जागेवरून—व्यासपीठावरून मुळी हललेच नाहीत.

"एका चेल्याने मला सांगितले की, 'तू दशाश्वमेध घाटावर गेल्यावर त्यांनी 'अमरत्व' या विषयावर एक स्तिमित करणारे प्रवचन दिले.' धर्मग्रंथांमध्ये, शास्त्रांमध्ये कित्येक श्लोकांत असे सांगितलेले आहे की, साक्षात्कारी मनुष्य एकाच वेळी दोन किंवा अधिक देह धारण करून निरनिराळ्या ठिकाणी वावरू शकतो. त्याचा खरेपणा प्रथमच असा माझ्या प्रचीतीस आला."

राम गोपाळने आपली हकीकत संपविताना सांगितले की, "लाहिरी महाशयांनी मला नंतर ह्या पृथ्वीसंबंधी परमेश्वराची काय गुप्त योजना आहे, याबद्दल काही आध्यात्मिक मुद्दे समजावून सांगितले. ह्या कल्पाच्या अवधीपर्यंत बाबाजींनी देह ठेवून द्यावा आणि त्याकरिता परमेश्वराने त्यांची निवड केली आहे. अनेक युगे येतील व जातील परंतु अमर असे हे गुरुदेव [10] शतकानुशतके विविध नाट्यप्रसंग पाहात पृथ्वीच्या रंगमंचावर सदैव वावरत राहतील.



*श्री श्री महावतार बाबाजी श्री श्री लाहिरी महाशयांचे गुरु*

1 एडवर्ड फिट्चगेराल्डच्या इंग्रजी भाषांतराचा अनुवाद.

2 मॅथ्यू ८:१९-२० (बायबल).

3 शंकराचार्यांचे गुरू गोविंद यती नावाचे होते, असा इतिहासात उल्लेख आहे. त्यांना बाबाजींकडून वाराणशीमध्ये क्रियायोगाची दीक्षा मिळाली होती. त्यासंबंधीची हकीकत लाहिरी महाशय व स्वामी केवलानंद यांना सांगत असताना ह्या अद्वैतसिद्धान्तवादी आचार्यांशी त्यांची जी भेट झाली होती, त्या भेटीच्या वेळच्या पुष्कळ मनोरंजक हकीकती बाबाजी सांगत असत.

4 बाबाजी (पूज्य वडील) ही एक सर्वसामान्य अशी पदवी आहे. भारतात पुष्कळशा उपदेशकांना "बाबाजी" या नावाने संबोधतात. तथापि त्यांपैकी लाहिरी महाशयांचे गुरू जे बाबाजी ते नव्हेत. 'ऑटोबायॉग्रफी ऑफ अ योगी' ह्या १९४६ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात ह्या महावतारी पुरुषाचे अस्तित्व अगदी पहिल्याप्रथम असे जनतेत जाहीर केले गेले.

5 ही जी कसोटी घेतली त्यामध्ये आज्ञापालन कसे केले जाते हे पाहण्याचा हेतू होता. ज्या वेळी साक्षात्कारी गुरूंनी सांगितले की, “उडी टाक” आणि त्या माणसाने उडी टाकली. त्याने जर मागे-पुढे केले असते तर त्याने स्वतःलाच खोटे पाडले असते. कारण तो म्हणाला होता की, बाबाजींच्या मार्गदर्शनाखेरीज आपले आयुष्य निरर्थक आहे. तशी त्याची समजूत झालेली होती. त्याने जर मागे-पुढे केले असते तर गुरुजींच्या शब्दांवर आपला पूर्ण विश्वास नाही, असेच त्याने दर्शविले असते आणि म्हणून ही कसोटी जरी कडक व असाधारण होती तरी परिस्थितीच्या दृष्टीने परिपूर्ण अशी होती.

6 जॉन II:४१-४२ (बायबल).

7 तारकेश्वर मंदिरामध्ये मूर्तीपुढे मी नमस्कार केला नाही हे ह्या सर्व ठायी विद्यमान अशा योगी पुरुषाने पाहिले होते. (प्रकरण १३)

8 माताजींची सुद्धा हयात अनेक वर्षांची आहे. आपल्या भावाइतक्या साधारण त्याही आध्यात्मिक दृष्ट्या प्रगत झालेल्या आहेत. दशाश्वमेध घाटाजवळ एका गुप्त अशा भुयारी गुहेमध्ये त्या समाधिअवस्थेमध्ये असतात.

9 हा प्रसंग वाचल्यावर थेल्स या ग्रीक तत्त्वज्ञान्याची आठवण होते. जीवन आणि मृत्यू यांत काही फरक नाही, असे त्याचे सांगणे असे. एका टीकाकाराने विचारले, “तर मग तुम्ही मरत का नाही?” थेल्सने उत्तर दिले, “कारण त्यांत फरकच काही नाही.”

10 “आणि मी तुम्हांला सांगतो की, जर मनुष्य मी सांगितल्याप्रमाणे वागेल (कूटस्थ चैतन्यामध्ये अविरतपणे वास करीत राहील), तर त्याला मृत्यू कधीही येणार नाही.” (जॉन ८:५१, बायबल).

ह्या शब्दांकरवी येशू ख्रिस्ताचा ऐहिक देहामध्ये वास करणाऱ्या अमर जीवनाबाबत बोलण्याचा रोख नव्हता. ऐहिक देह म्हणजे एक तऱ्हेचे कंटाळवाणे बंधन की, जे परमेश्वराने सज्जनालाच काय पण पापी माणसाच्या सुद्धा वाट्याला देऊ नये! ज्या प्रगत मनुष्याबद्दल येशू ख्रिस्त बोलत आहे तो असा आहे की, जो अज्ञानाच्या मृत्यूमय गुंगीतून जागा होऊन अमर जीवनाप्रत गेलेला आहे. (४३वे प्रकरण पाहावे).

माणसाचे खरे स्वरूप हे निराकारी सर्वव्यापक तत्त्व असे आहे. देह हा कर्मानुसार धारण करावा लागतो किंवा जो टाळणे शक्य असत नाही, ह्याचे कारण म्हणजे अविद्या, अज्ञान. हिंदू धर्मशास्त्रात असे सांगितले आहे की, जन्म आणि मरण हा सगळा मायेचा खेळ आहे. सापेक्षतावादाने भरून गेलेल्या ह्या जगातच जन्म व मरण याला काही अर्थ आहे.

बाबाजींचे अस्तित्व हे काही एका विशिष्ट भौतिक शरीरापुरते मर्यादित नाही किंवा त्यांचा संचार ह्या ग्रहापुरताच मर्यादित आहे असे नाही. परमेश्वराच्या इच्छेनुसार ते ह्या भूलोकाकरिता काही एक विशिष्ट असे कार्य करीत असतात.

प्रणवानंदासारखे महात्मे (पृष्ठ ३६० पाहावे) जे ह्या पृथ्वीवर नवीन देह धारण करून येतात त्याची काही कारणे असतात; व ती कारणे त्यांना माहीत असतात. ह्या ग्रहावर ते जो अवतार घेतात, त्याला कर्माची नेहमीची कडक बंधने लागू नसतात. अशा तऱ्हेचे जे ऐच्छिक पुनर्जन्म हे महात्मे घेतात त्याला ‘व्युत्थान’ असे म्हणतात. ‘व्युत्थान’ म्हणजे मायापाशापासून मुक्त झाल्यावर पार्थिव देहामध्ये पुनः प्रवेश करणे.

मरणाचे काहीही कारण असो, ते साधारण किंवा चमत्कारिक असो, पूर्ण साक्षात्कार झालेला महात्मा हा आपल्या देहाचे पुनरुत्थान करू शकतो आणि ह्या संसारी लोकांच्या डोळ्यांपुढे मूर्त स्वरूपात प्रकट होऊ शकतो. बहुतेक देहांचे परमाणू पुनः मूर्त स्थूल स्वरूपात आणण्यासाठी अशा महात्म्यांना काही त्रास पडत नाही, असे महात्मे परमेश्वराच्या ठिकाणी तादात्म्य पावलेले असतात. सूर्यमालेतील ग्रहांची गणिते ते खोटी पाडू शकतात.

येशू ख्रिस्ताने अशी ग्वाही दिलेली आहे, “मी ह्या शरीराचा अशाकरिता त्याग करीत आहे की, तो देह मला पुनः धारण करता यावा. कोणीही माझ्याकडून कोणतीही गोष्ट हिरावून घेत नाही. मी ती स्वतः होऊनच खाली ठेवून देतो. कोणतीही गोष्ट खाली ठेवून देण्याचे सामर्थ्य जसे माझ्या अंगी आहे तसे ती गोष्ट परत घेण्याचेही सामर्थ्य माझ्या ठिकाणी आहे.” (जॉन १०:१७-१८, बायबल).

## प्रकरण - ३४

# 34. हिमालयामध्ये प्रासाद निर्माण

"बाबाजींची आणि लाहिरी महाशयांची भेट म्हणजे एक रोमांचकारी हकीकत आहे. अशा थोड्याच गोष्टींपैकी ती एक आहे की, जिच्या योगे अमर अशा त्या गुरुदेवांची सविस्तर झांकी मिळते."

ह्या शब्दांनी स्वामी केवलानंदांनी आपली आश्चर्यकारक हकीकत सांगण्यास सुरुवात केली. पहिल्या वेळी जेव्हा त्यांनी ती सांगितली, तेव्हा ती ऐकून मी अगदी मंत्रमुग्ध झालो. त्यानंतर ती हकीकत सांगण्याकरिता मी माझ्या ह्या संस्कृत शिक्षकांना फार आग्रह करी. पुढे हीच हकीकत श्रीयुक्तेश्वरांनी जवळ जवळ त्याच शब्दांत सांगितली. लाहिरी महाशयांच्या ह्या दोन्ही शिष्यांनी ही विस्मयजनक हकीकत आपल्या गुरुजींच्या तोंडूनच सरळ ऐकिली होती.

लाहिरी महाशय म्हणाले होते, "बाबाजींशी जेव्हा माझी पहिली भेट झाली, तेव्हा माझे वय तेहतीस वर्षांचे होते. १८६१च्या पावसाळ्यात सरकारच्या मिलिटरी इंजिनिअरिंग खात्यामध्ये माझी अकाउंटंट म्हणून दानापूरला नेमणूक झाली होती. एके दिवशी सकाळी आमच्या ऑफिस मॅनेजरने मला बोलावणे पाठविले.

"'लाहिरी,' ते म्हणाले, 'आपल्या मुख्य कचेरीतून आत्ताच एक तार आली आहे. तुमची बदली राणीखेतला करण्यात आली आहे. तेथे आता एक लष्करी ठाणे [1] ठेवण्यात येत आहे."

"त्या ५०० मैलांच्या प्रवासाला मी एक नोकर घेऊन निघालो. कधी घोडागाडीतून तर कधी घोड्यावरून प्रवास करीत करीत राणीखेते [2] या हिमालयातील गावी आम्हाला पोचायला तीस दिवस लागले.

"माझे ऑफिसमधले कामकाज काही विशेष त्रासदायक नव्हते. त्या भव्य गिरिप्रदेशात भटकायला मला बराच वेळ मिळे. तेवढ्यात माझ्या कानांवर अशी बातमी आली की, हा भूप्रदेश काही संतमहात्म्यांनी आपल्या वास्तव्याने पुनीत केला आहे. त्यामुळे त्यांचे दर्शन घेण्याची मला अगदी तीव्र इच्छा उत्पन्न झाली. असाच एकदा मी तिसऱ्या प्रहराच्या वेळी भटकत असताना, माझ्या नावाने तरी मला दुरून मारलेली हाक ऐकून, मी आश्चर्यचकित झालो. द्रोणगिरी पर्वतावर मी जोराने चढण चढण्याचे चालू ठेवले. मनात बेचैन करणारा असा विचार चमकून जायचा की, जंगलात रात्र पडण्याच्या पूर्वी मी परत फिरू शकेन की नाही.

"शेवटी मी एका लहानशा मोकळ्या जागेपर्यंत येऊन पोचलो. त्याच्या चारी बाजूंना गुहा होत्या. आणि तेथे एका कड्याच्या कपारीवर एक स्मितमुखी तरुण मनुष्य उभा असलेला आढळला. तो माझे हाताने स्वागत करीत होता. त्या तरुणाचे माझ्याशी विलक्षण साम्य होते. फक्त त्याचे केस ताम्रवर्णीय होते, हे पाहून मला आश्चर्य वाटले.

“‘लाहिरी, [3] आलास तू?’ त्या महात्म्याने मोठ्या प्रेमाने मला हिंदीत विचारले, ‘ह्या गुहेत जरा विश्रांती घे. मीच तुला ती हाक मारली.’

“मी त्या लहान व्यवस्थित अशा गुहेत शिरलो. त्या गुहेत पुष्कळशा कांबळ्या व काही थोडे कमंडलू ठेवलेले होते.

“‘लाहिरी; ते बसायचे आसन तुला आठवते काय?’ त्या योग्याने कोपऱ्यात घडी करून ठेवलेल्या एका घोंगडीकडे बोट करून दाखविले.

“‘नाही महाराज,’ माझ्या ह्या चमत्कारिक धाडसाने मी गोंधळून गेलो होतो. मी पुढे म्हणालो, ‘रात्र पडण्यापूर्वी मला येथून निघाले पाहिजे. उद्या सकाळी ऑफिसमध्ये मला काम आहे.’

“त्या रहस्यमय योग्याने मला इंग्लिशमध्ये उत्तर दिले, ‘तुझ्याकरिता ऑफिस येथे आणले; ऑफिसकरिता काही तुला येथे आणलेले नाही.’

“मी आश्चर्याने अवाक् झालो. हा अरण्यामध्ये राहणारा बैरागी नुसता इंग्लिशमध्ये सफाईदार बोलत होता, एवढेच नव्हे, तर येशू ख्रिस्ताच्या शब्दांमध्येच [4] बोलत होता.

“‘माझ्या तारेचा परिणाम झाला एकूण.’ योग्याच्या या बोलण्याचा मला अर्थ कळला नाही. तेव्हा मी त्याचा अर्थ विचारला.

“‘तुला ह्या निर्जन ठिकाणी जे बोलावले तीच ती तार. तुझ्या वरिष्ठ अधिकाऱ्याने तुझी बदली राणीखेतला करावी, असे मीच त्याला गुप्तपणे सुचविले. मनुष्यमात्राशी जो तादात्म्य पावतो, त्याला सर्व माणसांची मने समजतात; आणि मग तो कोणत्याही माणसाच्या मनामधून संदेश पाठविण्याचे काम करू शकतो.’ नंतर तो पुढे म्हणाला, ‘लाहिरी, ही गुहा तुझ्या परिचयाची नाही का वाटत तुला?’

“ह्या प्रश्नाला मी काही उत्तर देऊ शकलो नाही. गोंधळून गेल्याकारणाने गप्प बसलो. तेव्हा त्या साधुपुरुषाने जवळ येऊन माझ्या कपाळावर सौम्यसा आघात केला. लोहचुंबकासारखा तो स्पर्श झाल्यावर विस्मयकारी प्रवाह माझ्या मेंदूतून वाहू लागला व माझ्या पूर्वजन्मीच्या सुखद स्मृतींचे अवशेष आठवू लागले.”

“‘आठवते मला!’ आनंदाच्या हुंदक्यांनी माझा आवाज अर्धाअधिक कुंठित झाला. ‘आपण माझे गुरु, बाबाजी आणि जे सदैव माझे आहात. माझ्या मनामध्ये पूर्वस्मृतींची दृश्ये दिसू लागली आहेत, अगदी स्पष्टपणे. माझ्या मागच्या जन्मी मी ह्या गुहेमध्ये कित्येक वर्षे काढली आहेत.’ कधीही पुसल्या न जाणाऱ्या अशा पूर्वस्मृतींनी मला भारावून टाकले; तेव्हा साश्रु नयनांनी माझ्या गुरुदेवांचे मी पाय धरले.

“‘तू परत येशील, म्हणून तीस वर्षांवर मी तुझी सारखी वाट पाहात आहे.’ दिव्य प्रेमाने बाबाजींच्या आवाजाला नाद येऊ लागला. मरणापलीकडील आयुष्याच्या वादळी लाटांमध्ये तू निसटलास व नाहीसा झालास. तुझ्या कर्माच्या जादूच्या कांडीने तुला स्पर्श केला आणि तू गायब झालास. तुला जरी मी दिसेनासा झालो असलो तरी तू मला कधीही दिसेनासा झाला नाहीस. त्या देदीप्यमान अशा सूक्ष्म विश्वसागरावर मी तुझा सारखा पाठलाग केला. ह्या सागरावरून देवदूत नेहमी इतस्ततः संचार करीत असतात. अंधेरी येवो, वादळ येवो, लाटांचे

तांडव सुरू होवो; विजांचा चमचमाट सुरू होवो. सगळ्या परिस्थितीतून जशी एखादी पक्षीण आपल्या पिल्लाला उरापोटाशी धरून सांभाळून घेत असते, त्याप्रमाणे मी तुझ्या सारखा पाठीशी होतो. गर्भावस्थेतून बाहेर पडल्यावर, अर्भक म्हणून रांगू लागल्यावर माझे डोळे सतत तुझ्यावर लागून राहिलेले होते. लहानपणी घुर्णी नदीच्या वाळवंटात पद्मासन घालून तू ध्यान करण्याकरिता बसावयाचास, त्या वेळी तुझ्या त्या सानुल्या आकृतीवर माझी सारखी नजर राहावयाची. मी अदृश्य अवस्थेत हजर असे. महिनेन् महिने, वर्षन् वर्ष मी तुझी सतत संथपणे वाट पाहिली, ती आजपर्यंत. आज तो पूर्णावस्थेचा दिवस उगवला. आता तू मला भेटलास. फार छान झाले. ही तुझी पूर्वीची गुहा, तुझी आवडती. पाहा मी कशी स्वच्छ करून तुझ्याकरिता तयार करून ठेविली आहे. हे तुझे पवित्र असे कांबळ्याचे आसन. ह्या आसनावर बसून ईश्वरप्रेमाने वृद्धिंगत होणारे हृदय तू पूर्वी दररोज भरून टाकीत असत. हा घे तुझा पितळेचा पेला. चकचकीत करून ठेवला आहे मी तो. कारण तू केव्हातरी येथे येऊन पिण्याकरिता तो वापरशील, माझ्या राजसा, आत्मन्, समजले का तुला आता?”

“‘गुरुजी, मी काय बोलणार?’ मी मोडक्यातोडक्या आवाजात पुटपुटलो, ‘ज्या प्रेमाला कधी अंत नाही, असे हे प्रेम कधी कोणी पाहिले आहे काय?’ मी माझ्या गुरुदेवांकडे, जीवन आणि मरण अशा दोन्ही अवस्थांतून, त्या माझ्या चिरंतन भांडाराकडे, बराच वेळ, भारावलेल्या नजरेने सारखा पाहू लागलो.

“‘लाहिरी, तुला शुद्ध करायला हवे. ह्या पेल्यातील तेल पी आणि नदीच्या वाळवंटात जरा पडून सहा.’ बाबाजींची व्यावहारिक सुज्ञता ही नेहमी अशी दृष्टोत्पत्तीस यायची, हे माझ्या चटकन ध्यानात आले व मी त्या पूर्वस्मृतीने चटकन स्मितसे केले.

“मी त्यांची आज्ञा पाळली. सभोवार ती बर्फाळ हिमालयातील रात्र जगतावर आपले अवगुंठन घालीत होती; तरी एक प्रकारचा ऊबदार, सुखद चैतन्यप्रवाह माझ्या नसानसांतून, शरीरातून वाहू लागला. मी आश्चर्य करू लागलो. त्या अनोळखी अशा तेलामध्ये ऊब देण्याचे दिव्य सामर्थ्य होते काय?

“सभोवार अंधकाराचे साम्राज्य पसरलेले होते. त्यात भयाण वारे माझ्या अंगाला झोडपून काढीत होते; व ते किंचाळी फोडत मला भीषण आव्हान देत होते. गोगाश नदीच्या खडकाळ किनाऱ्यावर हातपाय पसरून मी पहुडलो होतो. नदीच्या गार अशा बारीक लाटा माझ्या अंगाखांद्यांवर येत होत्या. जवळपास जंगलातून वाघांच्या डरकाळ्या ऐकू येत होत्या; पण माझ्या हृदयाला भीती अशी काही वाटली नाही. ज्या दिव्यशक्तीचा प्रादुर्भाव माझ्यामध्ये झाला होता तिने मला जणू असे आश्वासन दिले होते की, तुझ्यावर कोणी काही हल्ला करणार नाही. किती एक तास जलद निघून गेले. पूर्वजन्माच्या अंधुक झालेल्या स्मृती पुनः ताज्यातवान्या होऊन माझ्या साक्षात्कारी गुरूची ही जी आज भेट घडून आली त्या उत्कृष्ट प्रसंगाच्या संदर्भाने नवीनपणे विणल्या जाऊ लागल्या.

“जवळ येत जाणाऱ्या पावलांच्या आवाजाने माझ्या ह्या एकान्तात चाललेल्या गुंजनामध्ये व्यत्यय आला. आणि त्या अंधारात एका माणसाच्या हाताने मला उभे राहण्यास मदत केली आणि काही कोरडे कपडे दिले.

“माझा सोबती म्हणाला, ‘चला, बंधु, गुरुजी आपली वाट पाहात आहेत.’ त्याने एका जंगलातून मार्ग काढला. जाता जाता एका वळणावर दूर अंतरावर एक स्थिर असा चमकणारा प्रकाश दृष्टीस पडला.

“‘सूर्य उगवला आहे की काय?’ मी विचारले, ‘रात्र तर अजून संपून गेलेली नाही?’

“‘आता मध्यरात्रीची वेळ आहे.’ माझा मार्गदर्शक थोडा हसला, ‘पलीकडे तो झगझगीत प्रकाश दिसतोय तो एका सुवर्णप्रासादाचा चकचकाट आहे. हा प्रासाद आज रात्रीच अद्वितीय अशा बाबाजींनी स्थूलसृष्टीत निर्माण केला आहे. एका फार पूर्वीच्या जन्मी राजवाड्याचे सौंदर्य उपभोगावयाची तुला इच्छा झाली होती व तशी इच्छा तू प्रदर्शित केली होतीस. आपले गुरुदेव तुझी ती इच्छा आज पुरी करीत आहेत; आणि अशा तऱ्हेने तुझ्या कर्माच्या [5] शेवटल्या बंधनातून तुला मुक्त करीत आहेत.’ तो पुढे म्हणाला, ‘आणि ह्या भव्य प्रासादात आज रात्री तुझा क्रियायोगाचा दीक्षाविधी होणार आहे. आणि ह्या तुझ्या दीर्घ अज्ञातवासाच्या अंती होणाऱ्या भव्य स्वागतामध्ये भाग घेण्याकरिता तुझे हे सगळे गुरुबंधू उपस्थित राहणार आहेत. सावधान!’

“आमच्या दृष्टीसमोर एक भव्य प्रासाद उभा होता. त्यावरील सुवर्ण चकाकत होते. असंख्य रत्नांनी त्या प्रासादाला अलंकृत केलेले होते. सुशोभित अशा मोकळ्या उपवनामध्ये तो उभारलेला होता. त्याचे प्रतिबिंब जलाशयाच्या निश्चल पाण्यामध्ये उमटत होते. त्या अप्रतिम, भव्य सौंदर्याची शोभा काय वर्णावी? त्या प्रासादातील उंच उंच कमानींवर जागोजाग मोठमोठे हिरे, इंद्रनीलमणी व पाचूचे खडे जडविलेले होते. दरवाजांवरती माणिकाचे लाल खडे चकाकत होते. त्या दरवाजांवरती देवदूतासारखे दिसणारे रखवालदार उभे होते.

“माझ्या सोबत्याबरोबर मी पुढे चालू लागलो. आम्ही एका भव्य अशा दिवाणखान्यात आलो. हवेतून अगरबत्तीचा व गुलाबांचा सुवास दरवळून येत होता. मंद असे दिवे अनेक रंगांच्या ज्योतींचा प्रकाश सोडीत होते. भक्तगणांचे लहान लहान जमाव; काही गौरवर्णीय, काही श्यामवर्णीय, हळू आवाजात गीतगान करीत होते; किंवा ध्यानाच्या आसनामध्ये बसून आंतरिक शांततेचा अनुभव घेत होते. सगळ्या वातावरणात एक तऱ्हेचा स्पंदायमान होणारा आनंद भरून राहिला होता.

“‘डोळे भरून पाहा. ह्या प्रासादाच्या कलापूर्ण वैभवाने मन संतोषित कर; कारण हा सगळा प्रासाद तुझ्या गौरवार्थ निर्माण करण्यात आला.’ माझ्या मार्गदर्शकाने माहिती दिली. मी जेव्हा आश्चर्याने उद्‌गार काढले तेव्हा त्याने सहानुभूतिपूर्वक स्मित केले.

“‘बंधु, मी म्हणालो, ह्या वास्तूचे सौंदर्य माणसाच्या कल्पनेच्या मर्यादेला सुद्धा मागे टाकणारे आहे. तो कसा निर्माण केला त्याचे गुपित मला कृपा करून समजावून सांग.’

“‘आनंदाने मी तुला ती माहिती पुरवीन.’ माझ्या सोबत्याचे काळेभोर डोळे सुज्ञतेच्या आविर्भावाने चमकले. ‘येथे प्रासाद जो निर्माण केला आहे तो कसा केला गेला हे समजावयास काही अवघड नाही. हे सारे विश्व विधात्याच्या विचारातून निर्माण झालेले आहे. ही पृथ्वी म्हणजे अंतरिक्षात तरंगत राहणारे असे एक ढेकूळ आहे. ते म्हणजे परमेश्वराचे एक

स्वप्न आहे. ज्याप्रमाणे मनुष्य आपल्या स्वप्नामध्ये निरनिराळे प्राणी व एक स्वप्नसृष्टी निर्माण करतो आणि त्या सृष्टीमधील प्राण्यांमध्ये प्राणशक्ती भरतो त्याप्रमाणे परमेश्वराने ह्या सर्व गोष्टी आपल्या मनातून निर्माण केल्या.

"'ही पृथ्वी अशा तऱ्हेने प्रथम परमेश्वराच्या कल्पनेतून निर्माण झाली. नंतर परमेश्वराने त्या कल्पनेला चालना दिली. त्यानंतर अणुशक्ती आणि वस्तुमात्र अस्तित्वात आले. नंतर त्याने पृथ्वीच्या अणु-परमाणूंना एका घन गोलाच्या साच्यात बसविले. ह्या गोलातील सर्व अणू परमेश्वराच्या इच्छेच्या कारणामुळे एकत्र घट्ट असे धरून ठेवले जातात. ज्या वेळी परमेश्वर आपली इच्छा परत घेतो, काढून घेतो त्या वेळी पृथ्वीचे हे अणू-परमाणू आपोआप विरळ होतात; व त्यांचे शक्तीमध्ये रूपांतर होते. अणुशक्ती परत आपल्या उगमाप्रत येते. तो उगम म्हणजे चैतन्य, जाणीव. अशा तऱ्हेने कल्पनारूप पृथ्वी जड स्वरूपातून नाहीशी होते.

"'स्वप्नस्रष्ट्याच्या अन्तर्मनाच्या विचारामुळे स्वप्नाचा विषय हा स्थूल स्वरूपात निर्माण होतो. जेव्हा कल्पनांना एकत्र आणणारा तो विचार जागृत अवस्थेमध्ये बाहेर खेचला जातो तेव्हा ते स्वप्न आणि ती स्वप्नसृष्टी विसर्जन पावते. मनुष्य डोळे मिटतो आणि मनाने एक स्वप्नसृष्टी निर्माण करतो. तो जेव्हा जागा होतो तेव्हा ती स्वप्नसृष्टी आपोआप नाहीशी होते. ह्या कृतीमध्ये मनुष्य दिव्य शक्तीच्या रचनात्मक कृतीचेच अनुकरण करतो त्याचप्रमाणे मनुष्याला विश्वचैतन्याचे दर्शन झाले म्हणजे ह्या भौतिक जगाच्या मायावी सृष्टीचे आपोआप विसर्जन होते.'

"'अमर्याद अशा कामधेनूसारख्या इच्छाशक्तीशी एकरूप झाल्याने बाबाजी आपल्या आज्ञेनुसार मूलतत्त्वांच्या अणू-परमाणूंना एकत्र आणून त्यांतून कोणत्याही आकाराची स्थूल आकृती निर्माण करू शकतात. हा जो सुवर्णप्रासाद एका क्षणात निर्माण केला तो खरोखरीचाच आहे. जशी ही पृथ्वी खरोखरीची आहे तितकाच हा प्रासादही खराखुरा आहे. ज्याप्रमाणे परमेश्वराने आपल्या कल्पनेमधून ही सृष्टी निर्माण केली व आपल्या इच्छाशक्तीने ती स्थूल रूपात धरून ठेविली आहे त्याप्रमाणे हा सुंदर प्रासाद बाबाजींनी आपल्या मनाने निर्माण केलेला आहे.'

"तो पुढे म्हणाला, 'या प्रासादाचे कार्य झाले म्हणजे बाबाजी तो नाहीसा करून टाकतील.'

"मी आश्चर्ययुक्त भीतीने नुसता आ वासून उभा राहिलो, तेव्हा त्या मार्गदर्शकाने हात पुढे करून मला दाखविले, 'हा झगमगणारा रत्नजडित व सुशोभित केलेला प्रासाद काही मानवी प्रयत्नाने तयार केलेला नाही. त्यावरील सोने व रत्ने ही काही कोठल्या खाणीतून मेहनत करून काढलेली नाहीत. तो हा असा डोंगरासारखा उभा आहे. जणू तो मनुष्याला [6] प्रचंड असे आव्हानच देत आहे. जो कोणी आपणा स्वतःला ईश्वराचा पुत्र असे म्हणवून घेत असेल आणि त्याला तशी अनुभूती झाली असेल—जशी बाबाजींना झाली तशी—त्याला कोणतेही ध्येय आपल्या स्वतःमध्ये सुप्त अशा अमर्याद शक्तीने प्राप्त होऊ शकेल. एक साधासुधा दगड घ्या. त्याच्यामध्ये अवाढव्य अशी अणुशक्ती [7] सुप्तपणे वास करीत असते; एवढेच

काय, पण हलक्यांतला हलका असा जरी प्राणी घेतला तरी त्याच्या ठिकाणी ईश्वरी शक्ती सुप्तपणे वास करीत असते.'

"नंतर त्या साधूने जवळच्या एका टेबलावरून एक सुंदर फुलदाणी उचलली. तिची मूठ जडविलेल्या हिऱ्यांनी चकाकत होती. तो पुढे सांगू लागला, 'आमचे जे परमगुरू आहेत त्यांनी करोडो विश्वकिरणांना स्थूल रूप करून हा प्रासाद निर्माण केला आहे. ह्या फुलदाणीचा व तिच्यावरील हिऱ्यांचा स्पर्श घे, हे हिरे इंद्रियजन्य स्पर्शाच्या सगळ्या कसोटीला खरे उतरतील.'

"मी ती फुलदाणी न्याहाळून पाहिली. त्यावरील रत्ने एखाद्या राजाच्या जवाहिरखान्यात शोभण्यासारखी होती. मी दालनातील भिंतींवरून हात फिरविला. त्या भिंतींवर चमकणारे सोन्याचे जाड पत्रे पसरलेले होते. माझ्या मनाला अत्यंत समाधान वाटले. भूतकाळातील अनेक जन्मांपूर्वीची एक दबलेली वासना, इच्छा आत्ताचा हा प्रासाद पाहिल्यावर पुरी झाली आणि ती वासनाही त्याबरोबर नाहीशी झाली.



*हिमालयातील बाबाजींची गुहा*

*राणीखेत जवळ याच गुहेत लाहिरी महाशयांना त्यांच्या एकांतवासी गुरुंची भेट झाली होती, ज्यांनी त्यांना क्रियायोगाची दीक्षा दिली. लाहिरी महाशयांचा नातू, आनंद मोहन लाहिरी (श्वेत वस्त्रांमध्ये) आणि तीन इतर भक्त ह्या पवित्र स्थळाला भेट देत असतांना.*

माझ्या त्या दरबारी सोबत्याने मला शोभिवंत कमानींतून आणि गॅलरींमधून नेऊन मोठमोठ्या दिवाणखान्यांतून फिरविले. ह्या दिवाणखान्यांमध्ये नाना तऱ्हेचे बैठकीचे सामान एखाद्या बादशहाच्या महालासारखे सजविलेले होते. आम्ही एका भव्य दिवाणखान्यात प्रवेश केला. त्याच्या मध्यभागी एक सिंहासन होते. त्याला रत्ने जडविलेली होती. त्या रत्नांचा विविध रंगांचा प्रकाश सभोवार पसरलेला होता. तेथे पुरुषोत्तमरूपी बाबाजी पद्मासन घालून बसले होते. त्यांच्या पायांशी त्या चमकणाऱ्या जमिनीवर वाकून मी त्यांना प्रणाम केला.

"'लाहिरी, सुवर्णप्रासाद पाहण्याची तुझी स्वप्नातील इच्छा अजून तृप्त झाली नाही काय?' माझ्या गुरुजींचे डोळे त्यांच्या स्वतःच्या इंद्रनील मण्याप्रमाणे चमकत होते. 'ऊठ, जागा हो, या तुझ्या सर्व ऐहिक वासना आता कायमच्या पूर्त होणार आहेत.' आणि नंतर त्यांनी आशीर्वादात्मक असे काही गूढ शब्द पुटपुटले. 'बेटा, ऊठ. ईश्वराच्या साम्राज्यात प्रवेश करून देणाऱ्या क्रियायोगाची दीक्षा घे.'

"बाबाजींनी आपले हात पुढे केले तत्क्षणी होमाग्नि प्रकट झाला. सभोवार फळे व फुले ठेविली होती. त्या वेदीतील अग्निनारायणासमोर मोक्षदायक असे हे योगतंत्र मी ग्रहण केले.

"क्रियायोगाच्या दीक्षेचे विधी पहाटेच्या सुमारास संपले. माझ्या त्या समाधिअवस्थेमध्ये मला झोपेची जरूरच वाटली नाही. मी त्या प्रासादाच्या निरनिराळ्या दालनांतून हिंडलो जे मूल्यवान खजिने आणि उत्कृष्ट कलाकृतींने परिपूर्ण होते. मी बागेत गेलो. बागेशेजारीच काल पाहिलेल्या त्या गुहा व डोंगरांचे अनावृन्त खडक माझ्या दृष्टीस पडले. परंतु ते त्या भव्य प्रासादाला व त्यावरील फुलझाडांनी भरलेल्या गच्ची वगैरेंच्या अगदी जवळ चिकटलेले असे दिसत नव्हते.

"नंतर पुनः मी प्रासादात प्रवेश केला. त्या थंडगार अशा हिमालयाच्या सूर्यप्रकाशात तो चमकत होता. मी गुरुजींच्याकडे गेलो. ते तसेच सिंहासनावर बसलेले होते; आणि त्यांच्याभोवती शिष्यसमुदाय शांतपणे बसलेला होता.

"'लाहिरी, तुला भूक लागली आहे,' बाबाजी पुढे म्हणाले, 'डोळे मीट.'

"मी जेव्हा डोळे उघडले, तेव्हा तो अद्भुत प्रासाद आणि ती उपवने नाहीशी झालेली होती. नाहीशा झालेल्या प्रासादाच्या जागेवर उघड्या जमिनीवर माझे शरीर उभे होते व बाबाजी आणि त्यांचे शिष्य ह्यांच्याही शरीराकृती त्या जमिनीवर बसलेल्या होत्या. त्या गिरिकंदरामधील गुहांच्या तोंडाशीच आम्ही बसलो होतो. सूर्यप्रकाशामुळे त्या चांगल्याच उजळल्या होत्या. नंतर माझ्या ध्यानात आले की, माझा मार्गदर्शक मला म्हणाला होता की, हा प्रासाद स्थूल स्वरूपातून नाहीसा केला जाईल आणि त्या स्थूल वास्तूत कोंडून ठेवलेले अणू-परमाणू जेथून ते बाहेर खेचून आणले होते, त्या विचारकल्पनांमध्ये पूर्ववत निघून जातील. मी जरी आश्चर्याने स्तब्ध झालो असलो तरी गुरुजींच्याकडे मी पाहात होतो. त्यांचा मला आधार वाटत होता. ह्या चमत्कारांच्या दिवशी आता पुढे काय घडून येणार आहे, हे मला कळेना.

"'ज्या कार्याकरिता हा प्रासाद उभा केला होता त्या कार्याची पूर्तता झाली आहे.' बाबाजींनी स्पष्ट केले. नंतर त्यांनी जमिनीवर ठेवलेले एक मातीचे पात्र उचलले. 'ह्या पात्रावर हात ठेव आणि पाहिजे तो खाण्याचा पदार्थ घेऊन घे.'

"मी त्या पसरटशा मोकळ्या भांड्यावर हात ठेवला, त्याबरोबर तूप लावलेल्या चपात्या, भाज्या व मिष्टान्नाचे पदार्थ समोर आले. ते खात असताना मी पाहिले की ते पात्र सदा भरलेलेच राही. माझे जेवण संपल्यावर पाण्याकरिता मी इकडे तिकडे पाहिले. गुरुदेवांनी माझ्या समोरच्या पात्राकडे बोट केले. त्यातील खाण्याचे पदार्थ नाहीसे झाले होते; आणि त्यांच्याऐवजी त्यात आता पाणी होते.

"'फारच थोड्या मर्त्य माणसांना माहीत असते की, ईश्वराच्या राज्यात सर्व भौतिक वासनांच्या पूर्तीचा समावेश होत असतो. बाबाजी म्हणाले, 'हे जे ईश्वरी राज्य आहे ते पृथ्वीपर्यंत पोचलेले आहे. परंतु पृथ्वी ही मायावी, आभासमय असल्याकारणाने तिच्यात सत्यस्वरूपाच्या तत्त्वाचा अंतर्भाव होत नाही.'

"'परमप्रिय गुरुजी, काल रात्री स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांमधील सौंदर्य जोडणारी साखळी आपण मला दाखविलीत. अंतर्धान पावलेल्या प्रासादाची आठवण मनात आल्याबरोबर मी किंचित स्मित केले. कोण्याही साध्यासुध्या योग्याला अशा तऱ्हेची दीक्षा—परमतत्त्वाच्या उदात्त अशा रहस्याची दीक्षा आणि अशा भव्य व शोभिवंत परिसरात मिळाली नसेल. या दोन दृश्यांमधील स्पष्ट दिसून येणारी विषमता मी पाहू लागलो. ती उघडी खरखरीत जमीन, आकाशाचे ते भव्य छप्पर; त्या गुहा, आदिमानवाची ती निवाऱ्याची ठिकाणे. ही सर्व नैसर्गिक दृश्ये जणू माझ्या आजूबाजूला बसलेल्या देवदूत आणि संतमंडळी यांना साजेशीच होती.

"त्या दिवशी मी दुपारी माझ्या कांबळ्याच्या आसनावर बसलो. अनेक पूर्वजन्मांच्या स्मृती माझ्या मनामधून ओघळून गेल्या. माझे दिव्य गुरुदेव माझ्याजवळ आले आणि त्यांनी माझ्या मस्तकावरून हात फिरविला. मी निर्विकल्प समाधिअवस्थेत उतरलो आणि त्या दिव्यानंदात सात दिवस अखंडित राहिलो. आत्मज्ञानाच्या एकामागून एक अशा स्तरांच्या पायऱ्या ओलांडीत मी सत्य तत्त्वाच्या अमर धामाप्रत जाऊन पोचलो. मायेची सर्व बंधने तुटून पडली. मर्यादा ओलांडल्या गेल्या. माझा आत्मा विश्वचैतन्याच्या वेदीवर भक्कम रीतीने संस्थापित झाला.

"आठव्या दिवशी मी गुरुदेवांच्या चरणांवर पडलो. ह्या पवित्र अरण्यामध्ये मला सदैव आपल्यापाशीच ठेवून घेण्याची मी त्यांना विनवणी केली.

"बाबाजींनी मला आलिंगन दिले व ते म्हणाले, 'बेटा, ह्या जन्मी तुला कार्य जनसंमर्दांमध्ये राहून त्यांच्या डोळ्यांना दिसेल असे करावयाचे आहे. तुझे पूर्वीचे पुष्कळसे जन्म एकांतवासात, ध्यानात गेले आहेत. आता तुला लोकांत मिसळून कार्य करावे लागेल.

"'ह्या जन्मी तुझे लग्न होऊन, मुले-बाळे होऊन कामधंदा केल्यानंतर बरीच वर्षे लोटल्यानंतर तुझी-माझी भेट झाली यात एक मोठा गूढ हेतू आहे. हिमालयात संचार करणाऱ्या ह्या आमच्या गुप्त मंडळीत सामील होण्याचा विचार तू काढून टाक. तुझे आयुष्य शहरातील गर्दीच्या कोलाहलामध्ये राहण्याचे आहे आणि ते अशाकरिता की, एक आदर्श गृहस्थी-योगी कसा असतो हे दिसून यावे.

"'गोंधळून गेलेल्या आणि व्याकुळ झालेल्या अनेक स्त्री-पुरुषांचा आक्रोश महात्म्यांच्या कानांवर पडलेला आहे.' ते पुढे म्हणाले, 'असंख्य निष्ठावंत साधकांना क्रियायोगाच्या साधनेच्या द्वारे आत्मिक शांती देण्याकरिता तुझी निवड झालेली आहे. कौटुंबिक बंधनांनी जखडलेल्या आणि जगाच्या संसारात कर्तव्ये करीत राहिलेल्या अशा लोकांना तुझ्यापासून एक नवीन दिलासा मिळेल. कारण तू त्यांच्यासारखाच गृहस्थी असून संसार करीत आहेस. तू त्यांना असे समजावून सांगावेस की, संसारी मनुष्याला सुद्धा अत्युच्च अशी योगसाधना अप्राप्य नाही. ह्या जगात राहून सुद्धा जो योगी आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या सचोटीने पार

पाडतो आणि ते करताना कोणताही वैयक्तिक हेतू किंवा कोणतीही वैयक्तिक वासना मनात ठेवीत नाही, त्या योग्याला अंतिम मुक्तीचा मार्ग मोकळा असतो.

"'तुला हे जग सोडून जावयास तसे काही जरुरीचे कारण नाही; कारण आंतरिकरीत्या तू कर्माचे बंधन अगोदरच तोडून टाकलेले आहेस. तू ह्या जगाचा नाहीस, पण तुला ह्या जगात राहावे लागेल. अजून पुष्कळ वर्षे तुला तुझी कुटुंबविषयक, व्यवसायाविषयक, सामाजिक आणि आध्यात्मिक कर्तव्ये अंतःकरणपूर्वक पार पाडावयाची आहेत. संसारी माणसांच्या वैराण हृदयामध्ये दिव्य आशेचा एक नवीन गोड किरण संचार करील. तू व्यतीत करीत असलेल्या विदेही जीवनामुळे त्यांना असा बोध होईल की, बाह्य वैराग्यापेक्षा आन्तरिक वैराग्य मुक्तीच्या दृष्टीने अधिक उपयुक्त आहे.'

"हिमालयाच्या त्या एकांताच्या भूप्रदेशात मी गुरुजींच्या सान्निध्यात हे सर्व ऐकत बसलो असताना माझे कुटुंब, माझे ऑफिस आणि सारे जग हे मला किती दूर असल्यासारखे वाटले! पण त्यांच्या शब्दांत कठोर सत्य होते. शांतीचा हा दिव्य स्वर्ग सोडून द्यावयास मी राजी झालो. नंतर बाबाजींनी गुरूकडून शिष्याला ह्या योगविद्येचे ज्ञान देण्याचे पुरातन, तांत्रिक कडक असे विधिनियम समजावून दिले.

"'ही क्रियायोगाची गुरुकिल्ली फक्त अधिकारी शिष्यांसच तू द्यावीस.' बाबाजी म्हणाले, 'जो दिव्यतत्त्वाच्या शोधार्थ सर्वस्वाचा त्याग करावयास बद्धवचन झालेला आहे. तोच फक्त ध्यानविद्येच्या साधनेने ह्या जीविताचे अंतिम गूढ रहस्य उकलून काढण्यास योग्य असा आहे.'

"'गुरुजी, आपण देवदूत आहात. ह्या नष्ट झालेल्या क्रियायोगसाधनेचे पुनरुज्जीवन करून आपण अगोदरच मनुष्यमात्रावर अगणित उपकार करून ठेवले आहेत. तर आता त्या विद्येचा उपयोग अधिक लोकांना व्हावा, या हेतूने ती विद्या प्रदान करण्याविषयी शिष्यत्वाच्या पात्रतेसंबंधीचे कडक नियम जरा शिथिल करून मनुष्यजातीवर आणखीन् थोडे उपकार आपण कराल काय?' मी बाबाजींकडे विनवणी करून आतुरतेने पाहू लागलो. 'मी प्रार्थना करतो; ही क्रियायोग दीक्षा सर्व निष्ठावंत साधकांना, जरी ते सुरुवातीस सर्वस्वाचा, आंतरिक त्याग करावयाची शपथ घेऊ शकले नाहीत तरी, प्रदान करण्याची आपण मला अनुज्ञा द्यावी. ह्या जगातील संसारी स्त्री-पुरुष त्रिविध तापांनी [8] पोळलेले आहेत. त्यांना खास अशा प्रोत्साहनाची जरुरी आहे. जर त्यांना क्रियायोगाच्या दीक्षेपासून वंचित केले तर ते मोक्षमार्गाकडे जावयाचा कधीही प्रयत्न करणार नाहीत.'

"'तथास्तु. तुझ्या मुखातून परमेश्वरानेच आपली इच्छा प्रकट केली. जे विनम्रपणे मदतीची याचना करतील त्या सर्वांना क्रियेची दीक्षा प्रदान कर.' परमदयाळू गुरुदेवांनी अशा शब्दांत उत्तर दिले. [9]

"नंतर काही वेळ स्तब्ध राहून बाबाजी बोलू लागले, 'तुझ्या प्रत्येक शिष्यास भगवद्गीतेतील [10] पुढील श्लोकवचनाचा व्यापक अर्थ समजावून सांग:

"स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात।"

(ह्या धर्माचे किंवा धर्माचरणाचे किंचित जरी पालन केले, तरी महद्भयापासून तुझे रक्षण होईल—पुनर्जन्मांच्या चक्राच्या फेऱ्यातून जात असताना होणाऱ्या अनंत यातना म्हणजे

महद्भय.)

“दुसऱ्या दिवशी सकाळी निरोप घेण्याच्या वेळी गुरुजींच्या चरणांना मी जेव्हा नमस्कार केला, त्या वेळी त्यांना सोडून जाण्यास मी अगदी अनुत्सुक आहे, हे त्यांनी अजमावले.

“‘बेटा, माझ्या लाडक्या, आपणा दोघांमध्ये वियोग असा कधी होणारच नाही.’ त्यांनी प्रेमळपणे माझ्या खांद्यावर हात ठेवला. ‘म्हणून तू जेथे असशील आणि जेव्हा तू मला बोलाविशील, तेव्हा मी ताबडतोब तुला भेटावयास येईन.’”

ह्या आश्चर्यप्रद वचनाने, आश्वासनाने माझे समाधान झाले. दिव्य अशा ईश्वरी साक्षात्काराने समृद्ध होताना मी त्या गिरिशिखरावरून खाली येऊ लागलो. ऑफिसमध्ये परत गेल्यावर माझ्या सहकाऱ्यांनी माझे चांगले स्वागत केले. त्यांची अशी समजूत झाली होती की, मी हिमालयाच्या अरण्यात नाहीसाच झालो. हेड ऑफिसमधून लवकरच एक पत्र आले.

“‘लाहिरी यांना दानापूरच्या [11] ऑफिसमध्ये पाठवून द्यावे,’ असा त्यातील मजकूर होता. राणीखेतला त्यांची चुकून बदली केली गेली. दुसऱ्याच मनुष्याला राणीखेतचे काम करावयास पाठवायला पाहिजे होते.’

“हिंदुस्थानाच्या अगदी शेवटच्या टोकाला मला घेऊन जाणाऱ्या घटनेच्या परस्परविरोधी गुप्त प्रवाहांचा मी जेव्हा विचार करू लागलो, तेव्हा मला हसू आले.

“दानापूरला जाण्यापूर्वी मी काही दिवस मुरादाबादला एका बंगाली कुटुंबामध्ये घालविले. सहा माणसे माझे स्वागत करावयास एकत्र जमली होती. आध्यात्मिक विषयांकडे मी जेव्हा बोलण्याचा रोख वळविला तेव्हा आमच्या यजमानाने उदासपणे एक वक्तव्य केले:

“‘ओह, आता हिंदुस्थानात संतमहात्मे असे दिसतच नाहीत!’

“‘बाबूजी,’ मी जोराने विरोध केला. ‘ह्या भूमीवर आज सुद्धा असे संतमहात्मे जरूर आहेत!’

“अति उल्हासाच्या आवेशामध्ये हिमालयप्रदेशात मी अनुभविलेल्या चमत्कारिक प्रसंगांचे वर्णन करण्याची मला प्रेरणा झाली. ही जी थोडी माणसे येथे होती ती काही विशेष श्रद्धावान नव्हती. पण त्यांची अश्रद्धा तितकीशी तीव्र नव्हती.”

“‘लाहिरी,’ त्यांपैकी एक माझे सांत्वन करण्याच्या हेतूने म्हणाला, ‘त्या पहाडी विरल हवेमुळे तुमच्या मनावर काही दाब पडला असावा. हे जे तुम्ही काही वर्णन सांगितले ते एखादे दिवास्वप्न असावे.’

“सत्याचा उत्साह माझ्यामध्ये ज्वलंत होता. तेव्हा सारासार विचार न करता मी बोलून गेलो. ‘मी जर बोलाविले तर माझे गुरु अगदी येथेच, याच घरात प्रगट होतील.’

“त्याबरोबर प्रत्येकाच्या डोळ्यांत औत्सुक्याची चमक दिसून आली. अशा तऱ्हेचा चमत्कार पाहावयास मिळावा अशी त्या मंडळींची उत्सुकता असावी, यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नव्हते. काही खुशीने, काहीशा नाखुशीने एक शांत खोलीची जागा व दोन नवी लोकरीची ब्लँकेटस् मी मागितली.

“‘गुरुजी ईथरमधून स्थूल रूपाने अवतीर्ण होतील.’ मी बोललो, ‘दरवाजाच्या बाहेर जरा शांतपणे उभे राहा. मी तुम्हांला लवकरच आत बोलावतो.’

“नंतर मी ध्यान करावयाला लागलो व गुरुजींना येण्याचे नम्रपणे पाचारण करू लागलो. त्या अंधाऱ्या खोलीत एक प्रकारचा मंद आल्हादकारक प्रकाश भरू लागला व त्यामधून हळूहळू बाबाजींची तेजस्वी मूर्ती प्रगट झाली.

“‘लाहिरी, तू काय मला क्षुल्लक गोष्टीकरिता बोलवतोस?’ गुरुजींची नजर जरा कडक होती. ‘सत्य हे फक्त निष्ठावंत जिज्ञासू लोकांकरिता आहे, रिकामटेकड्या चिकित्साखोरांकरिता नाही. जेव्हा एखादी वस्तू प्रत्यक्ष डोळ्यांना दिसते, तेव्हा ती कोणी नाकबूल करीत नाही. अतीन्द्रिय सत्य पाहण्याकरिता पात्रता पाहिजे. नैसर्गिक-भौतिक-संशयी वृत्तींवर ज्याने पूर्ण ताबा मिळविलेला आहे, अशांनाच ते फक्त दिसते.’ नंतर ते गंभीरपणे म्हणाले, ‘मला जाऊ दे आता!’

“मी त्यांच्या पायांशी पडून काकुळतीच्या स्वराने आर्जवे केली. ‘दिव्य गुरुदेव, माझी घोडचूक मला कळली. मी आपली नम्रपणे क्षमा मागतो. आध्यात्मिक दृष्ट्या आंधळे असलेल्या ह्या लोकांच्या हृदयात श्रद्धा निपजावी, म्हणून मी आपल्याला बोलाविण्याचे धाडस केले. आणि आपण माझ्या प्रार्थनेला मान देऊन उदारपणे येथे प्रगटही झालात. तेव्हा ह्या माझ्या मित्रांना आशीर्वाद दिल्याखेरीज आपण जाऊ नका. अश्रद्ध खरे ते, पण माझ्या विलक्षण प्रकारच्या हकीकतीचे सत्य अजमाविण्याकरिता त्यांनी तयारी दाखविली होती.’

“‘ठीक आहे, मी थोडा वेळ थांबतो. तुझा शब्द तुझ्या मित्रांपुढे खोटा पडावा, अशी माझी इच्छा नाही.’ बाबाजींचा चेहरा किंचित सौम्य झाला, पण त्यानंतर त्यांनी संथपणे मला बजावले, ‘यापुढे बेटा, जेव्हा तुला माझी जरुरी आहे, तेव्हाच फक्त मी येईन. तू बोलावशील तेव्हा असा मी नेहमी येणार नाही.’ [12]

“मी जेव्हा खोलीचे दार उघडले, तेव्हा जमलेल्या मंडळींमध्ये निस्तब्ध शांतता पसरलेली होती. माझ्या मित्रमंडळींनी ब्लँकेटच्या आसनावर बसलेली ती देदीप्यमान आकृती पाहिली. त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना.

“‘हा तर अनेक लोकांवर केलेला नजरबंदीचा प्रयोग दिसतोय!’ त्यांतील एक इसम उद्धटपणे हसला. ‘आपल्याला समजल्याखेरीज कोणीही ह्या खोलीत शिरणे शक्य नाही!’

“बाबाजी हसत हसत पुढे आले आणि त्या प्रत्येकाला त्यांनी आपल्या उष्ण शरीराचा स्पर्श घेऊन पाहण्यास सांगितले. संशयाचे निराकरण झाले. माझ्या मित्रमंडळींना अचंबा व पश्चात्ताप वाटला व त्यांनी जमिनीवर त्यांच्यापुढे साष्टांग लोटांगण घातले.

“‘हलवा तयार करा.’ मला माहीत होते की, बाबाजींच्या अशा सांगण्यापाठीमागे आपल्या अस्तित्वाचा खरेपणा पटवून द्यायचा होता. ज्या वेळी हलवा तयार होत होता, त्या वेळी गुरुजी सगळ्यांशी मोकळेपणाने गप्पा मारीत होते. संत-महात्म्यांच्या चमत्कारशक्तीबद्दल संशय घेणाऱ्या अश्रद्ध लोकांच्या मनोवृत्तींत आध्यात्मिक फरक घडून आला. आमचे खाणे आटोपल्यावर बाबाजींनी आमच्यापैकी प्रत्येकाला आशीर्वाद दिला. मग एकदम प्रकाशाचा झगझगाट झाला आणि एका निमिषार्धात बाबाजींच्या मूलतत्त्वांच्या इलेक्ट्रॉन्सचे विरलीकरण होऊन, त्यामधून एक धूमसदृशसा प्रकाश आसमंतात पसरला. परमेश्वराने एकरूप करून दिलेल्या बाबाजींच्या इच्छाशक्तीने आपल्या स्वतःच्या स्थूल शरीरात एकत्र धरून ठेवलेल्या

ईथिरिक परमाणूंवरील आपला ताबा ढिला केला आणि त्याबरोबर करोडो अतिसूक्ष्म असे लाइफ-ट्रॉन्स (तेजोरेणू) च्या ठिणग्या बाहेर पडून अमर्याद अशा आकाशामध्ये अंधुक होत होत शेवटी नाहीशा झाल्या.

"त्या मंडळीत 'मैत्र' [13] नावाचे एक सद्गृहस्थ होते; ते भक्तिभावपूर्वक म्हणाले, 'मी स्वतः माझ्या डोळ्यांनी मृत्युंजय महात्मा पाहिला.' नुकत्याच झालेल्या आत्मजागृतीच्या आनंदामुळे त्यांचा चेहरा उल्लसित झाला होता. 'जसे लहान मूल पाण्यात बुडबुड्यांशी खेळते तद्वत ह्या परमगुरूने स्थल व काळ यासमवेत क्रीडा केली.'

"नंतर लवकरच मी दानापूरला परत आलो." लाहिरी महाशय आपल्या हकीकतीचा समारोप करीत म्हणाले, "अशा तऱ्हेने परमतत्त्वाचे पूर्ण ज्ञान झाल्यावर मी परत संसाराकडे वळलो व कौटुंबिक व व्यवसायाची कामे संसारी माणसाप्रमाणे करण्यास सुरुवात केली."

लाहिरी महाशयांनी बाबाजींशी झालेल्या अशाच एका भेटीची हकीकत स्वामी केवलानंद व श्रीयुक्तेश्वर यांना सांगितली होती. परमगुरूंनी मागे जे वचन दिले होते, "जेव्हा तुला माझी जरुरी आहे तेव्हाच मी येईन," त्या वचनानुसार जे प्रसंग घडले त्यांतलाच तो प्रसंग होता.

"हा प्रसंग अलाहाबादला कुंभमेळ्याच्या वेळी घडून आला," लाहिरी महाशय आपल्या शिष्यांना सांगत होते, "त्या ठिकाणी मी एकदा, ऑफिसला थोड्या दिवसांची सुट्टी झाली होती तेव्हा, गेलो होतो. तेथे त्या पवित्र सोहळ्यामध्ये उपस्थित होण्याकरिता दूर दूर अंतरावरून संन्यासी, बैरागी व साधू यांचे तांडेच्या तांडे आले होते. त्या गर्दीत मी भटकत होतो. इतक्यात एकदम मी एका राख फासलेल्या बैराग्यापुढे क्षणभर थांबलो. त्याच्या हातात एक भिक्षापात्र होते. त्या वेळी माझ्या मनात असा विचार आला की, हा बैरागी ढोंगी असावा. बाहेरून विरक्ती दाखविणारी (बैराग्याची) वस्त्रे त्याने घातली होती; पण आतून त्याला तशी विरक्ती झालेली नसावी.

"ह्या बैराग्याच्या जवळून मी पुढे जातो न जातो, तोच माझी नजर बाबाजींकडे गेली. मी आश्चर्यचकित झालो. बाबाजी एका जटाधारी तपस्व्यापुढे गुडघे टेकून त्याला नमस्कार करीत होते.

"'गुरुजी,' मी चटकन त्यांच्या बाजूला वळून म्हणालो, 'महाराज, आपण येथे काय करीत आहात?'

"'मी या संन्याशाचे पाय धूत आहे. नंतर मी त्याची स्वयंपाकाची भांडी घासणार आहे.' बाबाजींनी माझ्याकडे पाहून एखाद्या बालकाप्रमाणे हास्य केले. मला कळून चुकले की, मी कोणावरती टीका करू नये. उच्चनीच असा भाव मनात न धरता, प्रत्येक मंदिररूपी जीवामध्ये परमात्म्याचा सारखाच वास असतो, हे मला समजावे, असे त्यांना वाटत होते.

"ते परमगुरू पुढे म्हणाले, 'सुज्ञ आणि अज्ञानी अशा दोन्ही प्रकारच्या लोकांची सेवा करून सगळ्यांत जो मोठा गुण आहे—आणि जो गुण परमेश्वराला सर्वांत जास्त पसंत आहे—तो गुण अंगी बाणविण्याचा मी प्रयत्न करीत आहे. तो गुण म्हणजे—नम्रता." [14]

1 पुढे येथे सॅनिटोरियम बांधले गेले. १८६१च्या सुमारास ब्रिटिश सरकारने तारखाते नवीनच सुरू केले होते.

2 राणीखेत, जिल्हा अलमोडा. नंदादेवी शिखराच्या पायथ्याशी आहे. नंदादेवी हे हिमालयाच्या अत्युच्च शिखरांपैकी एक शिखर. (२५,६६१ फूट)

3 बाबाजींनी त्यांना 'गंगाधर' नावाने संबोधिले. गंगाधर हे लाहिरी महाशयांचे आदल्या जन्मीचे नाव होते. गंगाधर हे भगवान शंकरांचे एक नाव आहे. (शब्दशः गंगाधर म्हणजे गंगेस, गंगा नदीस धारण करणारा.) पुराणातील कथेनुसार गंगा ही पवित्र नदी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली व तिच्या अवतरणाचा व प्रवाहाचा वेग पृथ्वीस सहन करता येणार नाही म्हणून श्रीशंकरांनी गंगेच्या प्रवाहाला आपल्या जटेत धारण केले. तेथून ती संथ प्रवाहाने खाली वाहू लागली. 'गंगाधर'चा आध्यात्मिक लक्षणेने अर्थ असा—जो आपल्या मेरुदंडात जीवनप्रवाहाच्या नदीच्या प्रवाहावर ताबा ठेवतो तो.

4 "रविवारचा सुट्टीचा दिवस मी माणसाकरिता नेमला; त्याच्याकरिता काही मनुष्यास निर्मिले नाही."—मार्क २:२७ (बायबल).

5 प्रारब्धकर्माच्या नियमाप्रमाणे प्रत्येक वासनेची शेवटी पूर्तता होते. म्हणजे वासना ही एक शृंखला आहे, जी मनुष्यमात्रास पुनर्जन्मांच्या चक्रामधून जावयास लावते.

6 "'चमत्कार तो काय म्हणावा! —असे टोमणा मनुजाला'
'अहंकार-मद ज्याच्या ठायी, उपालंभ की असे तयाला.'"
—'नाईट थॉटस्' काव्य—एडवर्ड यंग.

7 वस्तुमात्राची रचना कणांनी (अणू-परमाणू) झालेली आहे, असा सिद्धान्त प्राचीन भारतीय वैशेषिक आणि न्याय तत्त्वप्रणालींनी—दर्शनांनी प्रतिपादन केलेला आहे. प्रत्येक अणूच्या पोकळीमध्ये अफाट विश्वे सामावलेली असतात. तसेच एका सूर्यकिरणामध्ये अनंत रजःकण इतस्तः विखुरलेले असतात. (योगवासिष्ठ)

8 शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक तापत्रय. हे त्रिविध ताप रोगव्याधींमध्ये, मानसिक विकृतींमध्ये व आत्म्याच्या अज्ञानामध्ये व्यक्त होत असतात.

9 प्रथम बाबाजींनी फक्त लाहिरी महाशयांना दुसऱ्यांना क्रियायोग शिकविण्याची परवानगी दिली. योगावतारांनी नंतर आपल्या काही थोड्या शिष्यांना क्रिया शिकविण्याचा अधिकार मागून घेतला. बाबाजींनी संमती दिली. पण अशी आज्ञा केली की, जे क्रियामार्गावर प्रगत झाले आहेत आणि ज्यांना लाहिरी महाशयांनी अधिकार दिलेला आहे किंवा ज्यांना योगावतारांच्या अधिकृत शिष्यांकरवी संस्थापित पद्धतीकरवी अधिकार प्राप्त झालेला आहे, त्यांच्यापुरताच क्रियाविषयक शिक्षण देण्याचा अधिकार मर्यादित राहावा. क्रियायोगाची दीक्षा अधिकृत आचार्यांकडून ज्यांनी घेतली आहे अशा सर्व श्रद्धावान व एकनिष्ठ क्रियायोगी साधकांच्या जन्मोजन्मीच्या आध्यात्मिक कल्याणाची जबाबदारी वाहण्याचे बाबाजींनी कृपाळूपणे वचन दिले.

भारतातील योगदा सत्संग सोसायटी व सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप यांच्याकरवी ज्यांनी क्रियायोगाची दीक्षा घेतलेली आहे, त्यांना असे वचनपत्र सही करून द्यावे लागते की, आपण दुसऱ्यांना क्रियायोगाचे तंत्र उघडे करून सांगणार नाही. अशा तऱ्हेने हे अगदी साधे पण तंतोतंत असे क्रियातंत्र इतर अनधिकृत उपदेशकांकरवी होऊ शकणाऱ्या फेरबदलांपासून व विकृत करण्यापासून अबाधित असे राखले गेले आहे व त्याच्या मूळच्या अनाक्षित अशा स्वरूपात ते टिकून राहिले आहे.

बहुतसमाजाला क्रियायोगाचा फायदा घेता यावा म्हणून बाबाजींनी वैराग्य व संन्यासधर्माचा स्वीकार करण्याचे प्राचीन निर्बंध काढून टाकले असले तरी बाबाजींनी लाहिरी महाशयांना व त्यांच्या ह्या मार्गातील उत्तराधिकाऱ्यांना (यो.स.सो./से.रि.फे.-गुरू) काही विशिष्ट नियम घालून दिलेले आहेत की, ज्यास दीक्षा द्यावयाची त्याने काहीएक कालावधीपर्यंत आध्यात्मिक अध्ययनाची पूर्वतयारी करावी. क्रियेसारख्या उच्च दर्जाच्या तंत्रसाधनेला आध्यात्मिक जीवन व्यवस्थित पाहिजे, त्यात गैरशिस्तपणा चालणार नाही. क्रियायोग हे फक्त ध्यानाचे एक तंत्र नाही; ती एक विशिष्ट प्रकारची जीवनसरणी सुद्धा आहे. त्याकरिता क्रियायोगाच्या दीक्षिताला काही विशिष्ट यमनियम व निर्बंध पाळावे लागतात. योगदा सत्संग सोसायटी व सेल्फ-रिअलाईझेशन फेलोशिप या संस्थांनी महावतार बाबाजींनी व त्यानंतर लाहिरी महाशय, स्वामी श्रीयुक्तेश्वर व परमहंस योगानंद यांनी घालून दिलेल्या नियम-निर्बंधांचे कटाक्षाने पालन केलेले आहे. यो. स. सो., एस. आर. एफ. पाठांमधून व यो. स. सो./एस. आर. एफ.च्या अधिकृत प्रतिनिधींकडून हाँग-सॉ व 'ओम्' तंत्र शिकविले जाते. ही दोन्ही तंत्रे क्रियायोगाच्या पूर्वतयारीची असून क्रियायोग साधनेचा अंतर्भाग आहेत. ही पूर्वसाधना साधकाची मनोभूमी स्वानुभवाप्रत नेण्यास व मोक्षप्राप्तीच्या दृष्टीने फार उपयोगी असते.

10 अध्याय २:४०.

11 वाराणशीजवळील एक गाव.

12 अनंत तत्त्वाच्या शोधामध्येही लाहिरी महाशयांसारखे साक्षात्कारी गुरुजन सुद्धा उत्साहाचा अतिरेक दर्शवितात; तेव्हा त्यांना काही शिस्त अशी पाळावी लागते. भगवद्गीतेमध्ये सुद्धा आपणांस असे पुष्कळ उतारे आढळून येतात की, जेथे भगवान जगद्गुरू श्रीकृष्ण भक्तोत्तम जो अर्जुन त्यास दोष देतात.

13 हे सद्गृहस्थ पुढे मैत्रेयमहाशय या नावाने ओळखले गेले. ते स्वानुभूतीच्या मार्गात फार प्रगत झाले होते. मी हायस्कूलमधून बाहेर पडल्यावर थोड्याच दिवसांनी मैत्रेयमहाशयांना भेटलो होतो. आणि मी जेव्हा वाराणशीला राहात होतो,

तेव्हा त्यांनी तेथील 'महामंडळ' आश्रमाला भेट दिली होती. तेथे त्यांनी मला ही मुरादाबादमधील काही मंडळींसमोर बाबाजी स्थूल शरीरात अवतीर्ण झाल्याची गोष्ट सांगितली; त्या वेळी मैत्रेयमहाशयांनी मला सांगितले की, "ह्या चमत्कारामुळे मी पुढे लाहिरी महाशयांचा शिष्य म्हणून राहिलो."

14 "स्वर्गातील आणि पृथ्वीवरील वस्तू पाहता याव्या म्हणून (तो) स्वतःला फार नम्र करतो."—(साम्स ११३:६, बायबल). "जो स्वतःला उच्च समजेल त्याचे पतन होईल; आणि जो नम्र होईल तो उच्चपदी जाईल." —मॅथ्यू २३:१२ (बायबल).

जो स्वतःची अहंता किंवा स्वतःचे मायावी खोटे स्वरूप नम्र करतो त्यास आपल्या अनंत स्वरूपाची पुनः ओळख होते.

## प्रकरण - ३५

# 35. लाहिरी महाशयांचे अवतार सदृश जीवन

“ह्या प्रमाणे सात्त्विकतेची [1] बूज राखणे हा आपला धर्म आहे,” येशूने बॅप्टिस्ट जॉनशी बोललेल्या ह्या शब्दांवरून व जॉनला आपणास बाप्तिस्मा देण्याबद्दल केलेल्या येशूच्या विनंतीवरून असे दिसते की, येशू आपल्या गुरूच्या दिव्य अधिकारांची कबुली देत होता.

बायबलचा पौर्वात्य दृष्टिकोनातून [2] आणि भाविकपणे अभ्यास केल्यावर आणि अंतःस्फूर्तीच्या दृष्टीने जे ज्ञान प्राप्त झाले, त्यावरून माझी खात्री झालेली आहे की, बॅप्टिस्ट जॉन हा येशू ख्रिस्ताच्या पूर्वजन्मीचा गुरू होता. बायबलमध्ये असे कित्येक उतारे आहेत की, ते जर बारकाईने पाहिले तर असे आढळून येईल की, जॉन आणि येशू हे कोणत्या तरी मागच्या जन्मी एलिजा आणि त्याचा शिष्य एलिशा असे होते. (हे उच्चार जुन्या करारातील आहेत. ग्रीक भाषांतरात त्यांचे उच्चार एलिआस व एलिसीयस असे केलेले आहेत आणि नव्या करारात हे शब्द त्या बदललेल्या उच्चाराने आलेले आहेत.)

जुन्या कराराच्या शेवटी एलिजा आणि एलिशा यांचा पुनर्जन्म होणार आहे, असे सरळ भविष्यच दिले आहे. “आणि हे पाहा, परमेश्वराचा तो महान व भयंकर दिवस येण्यापूर्वी मी तुमच्याकडे याला दूत म्हणून पाठवितो.” [3] अशा तऱ्हेने “परमेश्वराचा ... येण्यापूर्वी” जो जॉन (एलिजा) पाठविला, तो ख्रिस्ताच्या जन्माच्या थोडासा अगोदरच जन्मास आला होता. अशाकरिता की, आता यापुढे ख्रिस्ताचा जन्म होणार आहे हे सर्वांना कळावे. त्याचा पिता जो झकेरियास त्याला देवदूताने येऊन सांगितले की, जन्मास येणारा तुझा मुलगा जो जॉन तो एलिजाच (एलिआस) आहे.

“पण तो देवदूत त्याला म्हणाला, झकेरिआस, तू भिऊ नकोस. कारण तुझी प्रार्थना परमेश्वराने ऐकिली आहे. तुझी बायको जी एलिजाबेथ तिला मुलगा होईल, आणि त्याचे नाव तू जॉन ठेव ... आणि पुष्कळशा यहुदी लोकांना (इस्रायलच्या प्रजेला) तो परमार्थाच्या मार्गावर लावील आणि तो हुरूपाने व सामर्थ्याने एलिआससारखा त्याच्या प्रभूच्या [4] अगोदर लोकांमध्ये पुढे सरसावेल आणि वडिलांची मने मुलांकडे वळवीत व जे आज्ञा जुमानीत नाहीत त्यांना न्यायाची कदर बाळगावयास लावून, अशा रीतीने प्रभूच्या आगमनासाठी लोकांना तयार करील.” [5]

एलिजा (एलिआस) हा जॉन असल्याचे दोन वेळा येशूने अगदी असंदिग्ध शब्दांत सांगितले आहे. “एलिजा आलेला आहे, पण तुम्हाला तो ओळखता आला नाही ... तेव्हा शिष्यांना समजून आले की, तो त्यांना बॅप्टिस्ट जॉनबद्दलच सांगत होता.” [6] पुनः येशू म्हणतो की, “सर्व प्रेषितांनी आणि शास्त्रांनी पण जॉनसंबंधी असेच भविष्य वर्तविले आहे आणि हे भविष्यकथन स्वीकारले तर, जो एलिजा येणार आहे तो हाच आहे, हे तुम्हांला समजून येईल.” [7]

ज्या वेळी जॉनने आपण एलिजा [8] असल्याचे नाकबूल केले, त्या वेळी नाकबूल करण्याचा त्याचा आशय इतकाच होता की, 'महान गुरू जो एलिजा याच्या बाह्यस्वरूपातील उच्च कोटीला मी कसा पोचू शकेन.' पूर्वीच्या जन्मी त्याने आपला गौरवाचा 'झगा' व आध्यात्मिक संपत्ती आपला शिष्य जो एलिशा याला देऊन टाकली होती आणि एलिशा म्हणाला, 'मी तुझी प्रार्थना करतो की, तुझ्या दुप्पट मोठेपण मला प्राप्त होवो;' त्यावर तो (एलिजा) म्हणाला की, "ही फार अवघड गोष्ट तू मागत आहेस, तरीपण मी जेव्हा तुझ्यापासून दूर जाईन तेव्हा जर तू मला पाहु शकला, तुझ्या म्हणण्या (मागण्या) प्रमाणे घडून येईल ... आणि मग त्याने एलिजाचा झगा जो खाली पडला होता तो आपल्या अंगावर धारण केला." [9]

ह्या दोन्ही व्यक्ती ह्या नवीन जन्मात उलटसुलट होऊन आल्या. कारण की, एलिशा—येशू यास आता संपूर्ण दिव्य स्वरूप प्राप्त झालेले असल्याने त्याला बोध करण्याकरिता एलिजा-जॉनसारख्या गुरूची तादृश जरुरी राहिली नव्हती.

पर्वतावर [10] जेव्हा येशूचे रूपांतरण झाले, त्या वेळी त्याच्यासमोर त्याचा गुरू एलियास, मोझेसबरोबर आलेला त्याने पाहिला. वधस्तंभावरती त्या निर्वाणीच्या क्षणी येशूने आक्रोश केला; "एलि एलि लामा सबक्थानी" म्हणजे "हे परमेश्वरा, हे परमेश्वरा, तू मला का बरे विसरलास? तेथे जे लोक उभे राहिलेले होते त्यांपैकी काहींनी ते ऐकिले आणि म्हणाले, हा इसम एलियासच्या नावाने पुकारा करीत आहे. पाहू या आपण एलियास ह्याच्या मदतीला येतो की काय!" [11]

अशा तऱ्हेचा गुरू-शिष्यांमधील हा चिरंतन संबंध जो जॉन व येशू यांमध्ये होता तोच बाबाजी व लाहिरी महाशय यांच्यामध्ये होता. आपल्या शिष्याचे पूर्वीचे जे दोन जन्म होऊन गेले तो काळ जाईतोपर्यंत अमर गुरुदेव सहृदयपणे, व्याकुळतापूर्वक आपल्या शिष्याची प्रतीक्षा करीत होते. त्यानंतर प्रथम लहान मूल म्हणून आणि पुढे वयात आलेला पुरुष म्हणून लाहिरी महाशयांनी ज्या दोन अवस्था व्यतीत केल्या त्या वेळी सुद्धा त्यांना ते मार्गदर्शन करीत राहिले. आपल्या शिष्याचे तेहतिसावे वय होईपर्यंत बाबाजींना आपला पूर्वजन्मीचा व कधीही न तुटणारा असा गुरुशिष्यांचा संबंध पुन्हा प्रस्थापित करावयास योग्य वेळ आली आहे असे वाटले नाही.

राणीखेतला जी अल्पकाळ भेट झाली त्यानंतर त्या निःस्वार्थी गुरूंनी आपल्या प्रिय शिष्याला आपल्याजवळ असे फार वेळ ठेवले नाही; पण लाहिरी महाशयांना त्यांनी या जगात काही लोककार्य करण्याकरिता मोकळे केले. "बेटा, जेव्हा तुला माझी जरुरी वाटेल त्या वेळी मी तुला भेटेन." कोणता मर्त्य असा प्रेमी अशा वचनाचे, असीम बंधन पुरे करू शकेल?

सामान्य समाजाला कल्पनाही नसेल अशा परिस्थितीत, वाराणशीच्या एका दूर कोपऱ्यात, १८६१ साली महान आध्यात्मिक पुनरुज्जीवनास सुरुवात झाली. जसा फुलांचा सुगंध फार वेळ लपवून ठेवता येत नाही, त्याप्रमाणे आदर्श प्रापंचिकासारखे संसारी पुरुष लाहिरी महाशय जरी शांतपणे आपला जीवनक्रम व्यतीत करीत होते, तरी त्यांचे नैसर्गिक तेज झाकले जाईना. भारताच्या प्रत्येक भागातून भक्तरूपी भ्रमर जीवन्मुक्त अशा गुरुदेवांच्याकडून दिव्य अमृताचे प्राशन करण्याकरिता जमू लागले.

त्यांच्या ऑफिसमधला वरिष्ठ जो इंग्रज मनुष्य होता, तो लाहिरी महाशयांना प्रेमाने, “आनंदी बाबू” असे म्हणायचा. आपल्या हाताखालच्या माणसामध्ये जो विलक्षण आध्यात्मिक स्वरूपाचा उच्च स्तराचा बदल झाला तो प्रथम त्याच्या ध्यानात आला.

“साहेब, आपण उद्विग्न दिसता; काय झाले आहे आपल्याला?” एके दिवशी सकाळी लाहिरी महाशयांनी आपल्या वरिष्ठाची सहानुभूतिपूर्वक चौकशी केली.

“माझी बायको इंग्लंडमध्ये फार आजारी आहे. काळजीने मी खचून गेलो आहे.”

“मी त्यांच्याबद्दल काही माहिती आणून देतो.” लाहिरी महाशय नंतर त्या खोलीतून बाहेर आले आणि एका बाजूच्या जागी थोडा वेळ एकांतात बसल्यावर परत आले व त्यांची चिंता निवारण करणारे मृदू हास्य त्यांनी केले.

“आपल्या पत्नींची तब्येत सुधारत आहे. त्या आता आपल्याला पत्र लिहीत बसल्या आहेत.” त्या सर्वज्ञ योग्याने नंतर त्या पत्रातील काही भाग बोलून दाखविला.

“आनंदी बाबू, तुम्ही काही साधारण माणसांसारखे नव्हेत, हे मला माहीत आहे. तरीपण तुम्ही आपल्या इच्छेने काळ व स्थल यांवर मात करु शकता असा माझा विश्वास बसत नाही!”

ज्या पत्राचे असे भाकीत केले ते पत्र अखेर येऊन पोचले. त्या पत्रामध्ये आपली बायको पूर्णपणे पूर्ववत बरी झाली आहे, एवढेच वृत्त नसून त्यांत त्या महान गुरुजींनी काही आठवड्यांपूर्वी उच्चारलेली वाक्ये सुद्धा तशीच्या तशी लिहून आली होती. साहेब आश्चर्याने गार पडले.

साहेबांच्या पत्नी नंतर काही दिवसांनी हिंदुस्थानात आल्या. त्या आल्यावर लाहिरी महाशयांना मोठ्या भक्तिभावपूर्वक भेटल्या.

“महाराज,” त्या म्हणाल्या, “लंडनमध्ये, मी बिछान्यावर दुखण्याने खिळून राहिले असताना, कित्येक महिन्यांपूर्वी मी आपली आकृती पाहिली होती. त्या आकृतीभोवती एक तेजोवलय दिसत होते. आणि त्याच क्षणी मी पूर्ण बरी झाले. आणि त्यानंतर लवकरच हिंदुस्थानला येण्याकरिता लांबलचक समुद्रावरचा प्रवास करू शकले.”

दररोज ते परमपूज्य गुरू एक-दोन शिष्यांना क्रियायोगाची दीक्षा देत. ही पारमार्थिक कर्तव्ये करून, त्याशिवाय नोकरीचे काम सांभाळून व प्रपंचाची जबाबदारी पार पाडून परम गुरुजी शिक्षणाच्या कामात कळकळीने लक्ष घालीत. त्यांनी पुष्कळ अभ्यासमंडळे तयार केली व वाराणशीच्या बंगाली टोला विभागात एक मोठे हायस्कूल स्थापण्याच्या कामी फार मेहनत घेतली. आठवड्यातून एक दिवस ते एकत्र जमत. त्या सभांना त्यांनी “गीता-मंडळ” नाव दिले. त्या दिवशी गुरुजी पुष्कळ उत्सुक सत्यान्वेषी साधकांपुढे अध्यात्मावर प्रवचने देत.

हे सगळे उद्योग करून लाहिरी महाशय जणू सर्वसामान्य तक्रारीला उत्तर देत. तक्रार अशी, “स्वतःचा कामधंदा सांभाळून, सामाजिक कर्तव्ये पार पाडून, पुढे भक्तिभावपूर्वक ध्यानाला बसावयाला वेळ कुठे राहतो?” ह्या महान संसारी प्रापंचिक गुरूचे सुसंबद्ध असे ऐहिक व पारमार्थिक जीवन हजारो स्त्री-पुरुषांना स्फूर्तिस्थान असावयाचे. त्यांचा पगार बेताचा असायचा, पण त्यांची राहणी काटकसरीची व साधी होती. त्यात भपका कधी नसे.

ते कोणालाही भेटावयास मोकळे असत. अशा तऱ्हेने गुरुजी हे संसारी जीवन शिस्तबद्ध रीतीने साधेसुधे व आनंदात व्यतीत करीत.

ब्रह्मत्वाच्या उच्च आसनावर आरूढ होऊन सुद्धा लाहिरी महाशय वेगवेगळ्या स्वभावविशेषाच्या व्यक्तींना सारखाच मान देत. त्यांचे भक्त जेव्हा त्यांना वंदन करीत तेव्हा ते सुद्धा त्यांना उलट वंदनच करीत. त्यांची नम्रता सुद्धा अगदी लहान मुलासारखी असे. ते पुष्कळदा दुसऱ्यांच्या पायांना आदराने स्पर्श करीत, पण स्वतः मात्र आपले पाय धरु देत नसत. जरी पादवंदन करणे हा एक गुरुजनांविषयी आदर दाखविण्याचा सर्वमान्य असा पौर्वात्य शिरस्ता आहे, तरी त्या शिरस्त्र्याचा ते स्वतःच्या बाबतीत अपवाद करीत.

लाहिरी महाशयांच्या जीवनाचे एक वैशिष्ट्य असे होते की, ते क्रियायोगाची दीक्षा कोणत्याही धर्माच्या अनुयायांना देत असत. केवळ हिन्दुच नव्हे तर मुस्लिम आणि ख्रिस्ती लोक पण त्यांच्या मुख्य शिष्यांमध्ये होते. अद्वैतवादी असोत, किंवा द्वैतवादी असोत, किंवा कोणत्याही पंथाचे, किंवा धर्माचे अनुयायी असोत, किंवा नसोतही. असे हे विश्वगुरु भेदभाव न करता शिष्य म्हणून सर्वांचा स्वीकार करीत. त्यांच्या अतिशय प्रगत अशा चेल्यांमध्ये अब्दुल गफूरखान नावाचा एक मुसलमान होता. लाहिरी महाशय स्वतः अत्युच्च वर्णाचे म्हणजे ब्राह्मण वर्णाचे होते. त्यांच्या काळामध्ये जातीयतेचे फार स्तोम होते. पण जातीयवादाची तीव्रता व कटुता कमी करण्याकरिता त्यांनी धडाडीचे प्रयत्न केले. समाजातील प्रत्येक व्यवसायातील मनुष्य गुरुजींच्या सर्वव्यापी पंखांखाली आश्रय घेण्यास येत असे. इतर ईश्वरी साक्षात्कार घडून आलेल्या प्रेषितांप्रमाणे लाहिरी महाशय बहिष्कृत लोकांना व दीनदुबळ्या व दलित लोकांना आशेचा ओलावा देत.

“हे ध्यानात ठेवा की, तुम्ही कोणाचे नव्हत आणि तुमचेही कोणी नाही. एक दिवस तुम्हांला घाईघाईने या जगातील प्रत्येक वस्तू आहे तशी ठेवून येथून जावयाचे आहे; तर तुम्ही परमेश्वराचा परिचय आताच करून घ्या.” गुरुवर्य असे आपल्या शिष्यांना सांगत. “दिव्य दर्शनाच्या विमानामध्ये दररोज बसण्याचा सराव करून मृत्यूच्या पारलौकिक अशा आगामी प्रवासाची तयारी करा. अज्ञानामुळे, भ्रमामुळे आपण हाडे व मांस यांत सामावलेले आहोत व आपण म्हणजे तेच आहोत असे तुम्ही चुकीने मानत आहात. आणि हा हाडामांसाचा देह म्हणजे साऱ्या यातनांचे कारण आहे. [12] अविरत ध्यान करीत जा, म्हणजे परमतत्त्वाचेच आपण अंश आहोत आणि कोणत्याही यातनेपासून आपण मुक्त आहोत, हे तुमच्या चटकन ध्यानात येईल. देहाचे बंधन तोडून टाका. आणि क्रियेच्या गुरुकिल्लीचा उपयोग करून परमतत्त्वात मिसळून जा. परमतत्त्वात विलीन होऊन तुम्ही या बंधनातून सुटून जा.”

आपल्या वेगवेगळ्या शिष्यांना आपापल्या धर्माप्रमाणे परंपरागत चालत आलेल्या आचारसंहितेचे पालन करण्यास गुरुजी सांगत. क्रियायोग ही एक मुक्तिप्रदायक योगसाधना आहे व या साधनेमध्ये सर्व मार्गांचा समावेश होतो, हा मुद्दा आपल्या शिष्यांना लाहिरी महाशय पटवून देऊन परत त्यांना असे सांगत की, “तुम्ही आपापल्या परिस्थितीप्रमाणे व राहणीप्रमाणे आचारधर्म पाळावयास मोकळे आहात.”

“मुसलमानाने आपला नमाज [13] दिवसातून पाच वेळा करावा,” गुरुजी सांगत, “हिंदूधर्मीय साधकाने दिवसातून अनेक वेळा ध्यानाला बसावे. ख्रिस्तीधर्मीयाने दिवसातून अनेक वेळा गुडघे टेकून परमेश्वराची प्रार्थना करावी व नंतर बायबल वाचावे.”

प्रत्येक माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार सूज्ञ विचक्षणेने गुरुजी आपल्या अनुयायांना भक्तिमार्ग, कर्ममार्ग, ज्ञानमार्ग किंवा राजमार्ग अशा मार्गांप्रमाणे जावयास सांगत. भक्तांनी संन्यासमार्गाचा अवलंब करण्याबाबत जर त्यांना विचारले, तर ते त्यांना तशी अनुज्ञा विलंबाने देत. ती देण्यापूर्वी संन्यासी जीवनाचा आचारधर्म किती कडक आहे व त्याचे पालन करणे किती बिकट आहे, याची ते त्यांना यथातथ्य कल्पना देत.

धर्मशास्त्रावर तात्त्विक चर्चा टाळण्याविषयी त्या परमगुरूंची शिष्यांना शिकवण असे. ते म्हणत, “तोच खरा शहाणा की, जो शास्त्रपुराणे नुसतीच न वाचता त्यांतील तत्त्वे आपल्या प्रत्यक्ष आचरणात उतरवितो, आत्मसात करतो. ध्यानाच्याच [14] मार्गाने जाऊन तुम्ही आपले सर्व प्रश्न सोडवा. निष्कारण धार्मिक वादविवादांत पडण्याऐवजी तुम्ही ईश्वराशी प्रत्यक्ष एकत्व साधण्याबाबत निष्ठेने प्रयत्न करीत राहा.

पंथवादाची केवळ कर्मकांडाची घाण आपल्या मनातून काढून टाका. सरळ आत्मसाक्षात्काररूपी आरोग्यप्रद असा जलप्रवाह तुमच्यामध्ये येऊ द्या. आंतरिक दिव्य मार्गदर्शनाशी प्रामाणिकपणे एकनिष्ठ व्हा. तो दिव्य नाद तुमच्या जीवनातील प्रत्येक पेचप्रसंग सोडवून देईल. कोठल्या तरी भानगडीत पडून त्यात गढून जाण्याकरिता माणसाची बुद्धी चांगली चालते. त्या भानगडींना अंत नाही. पण हे ध्यानात ठेवा की, अनंत, अमर असा जो सहाय्याचा, दयालुत्वाचा परमेश्वरी ठेवा आहे तोही तितकाच अमर्याद आहे.”

गुरुजींच्या सर्वव्यापकतेचा प्रत्यय एकदा त्यांच्या शिष्यांना असाच अकस्मात आला. तो प्रसंग असाः एक दिवस गुरुजींचे शिष्यांच्या समोर भगवद्गीतेवर प्रवचन चालू होते. त्या वेळी ‘कूटस्थ चैतन्य’ अथवा स्पंदनात्मक सृष्टीमध्ये व्यापून राहिलेला ‘ख्रिस्त चेतनेचा भाव’ या शब्दाचा अर्थ ते स्पष्ट करून सांगत होते. तेव्हा एकदम लाहिरी महाशय दचकून ओरडले.

“जपानच्या किनाऱ्यावर बाजूला थोड्या अंतरावर अनेक आत्म्यांच्या रूपाने मी बुडून जात आहे!”

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या शिष्यांनी वर्तमानपत्रांत हकीकत वाचली की, जपानच्या नजीक समुद्रामध्ये काल रात्री एक जहाज समुद्रात बुडाले व त्यावरील अनेक उतारू मृत्यूमुखी पडले.

लाहिरी महाशयांच्या पुष्कळ दूर अंतरावरच्या शिष्यांना त्यांच्या ह्या सर्वव्यापक अस्तित्वाचा अनुभव होता. “जे नित्यनेमाने क्रिया करतात त्यांच्या सान्निध्यात मी सदैव असतो.” जे शिष्य त्यांच्यापाशी राहू शकत नसत त्यांचे समाधान ते अशा शब्दांनी करीत. “सदैव वृद्धिंगत होत जाणाऱ्या तुमच्या आत्मदर्शनाने मी तुम्हांला दिव्यधामापर्यंत पोचण्याच्या कामी मदत करीत जाईन.”

परमगुरूंचे एक आज हयात असलेले शिष्य श्री भूपेंद्रनाथ संन्याल [15] असा अनुभव सांगतात की, लहान असताना त्यांना गुरुजींना भेटावयास वाराणशीस जाता येत नसे; तेव्हा

ते आपल्याला आध्यात्मिक ज्ञान देण्याबाबत त्यांची नुसती मनातल्या मनात प्रार्थना करीत. लाहिरी महाशय भूपेंद्रांच्या स्वप्नात आले आणि त्यांनी त्यांना दीक्षा दिली. त्यानंतर हा मुलगा वाराणशीला गेला व दीक्षा द्या म्हणून त्याने गुरुजींना सांगितले. त्यावर लाहिरी महाशयांनी उत्तर दिले, "काय, मी तर तुला स्वप्नातच अगोदर दीक्षा देऊन टाकली आहे."

जर एखाद्या शिष्याने आपल्या प्रपंचाच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष केले, तर गुरुजी त्याच्या वागण्यात सुधारणा घडवून आणीत व त्यास शिस्त लावीत.

"शिष्यांच्या चुकांबद्दल स्पष्ट बोलायचा जरी त्यांना प्रसंग आला तरी लाहिरी महाशयांचे शब्द सौम्य असत व ते ऐकून शिष्यांना बरे वाटत असे." श्रीयुक्तेश्वरांनी मला एकदा सांगितले आणि पुढे ते म्हणाले, "गुरुजींच्या तारेच्या कुंपणातून कोणीही शिष्य कधी बाहेर पळून गेला नाही." मला हसू आवरेना. श्रीयुक्तेश्वरांना मी खात्रीपूर्वक असे सांगितले की, त्यांचे शब्द कडक असोत की नसोत, माझ्या कानाला ते गोड संगीतासारखे वाटत.

लाहिरी महाशयांनी फार विचार करून क्रियासाधनेचे एकाहून प्रगत असा दुसरा, असे चार टप्पे केले [16] पहिल्या टप्प्याच्या साधनेने शिष्याने काही एक निश्चित आध्यात्मिक प्रगती करून दाखविली, तरच ते त्याला वरच्या तीन टप्प्यांच्या दीक्षा देत. एक चेला होता; त्याला असे मनातून खात्रीपूर्वक वाटे की, गुरुजींनी आपली योग्यता बरोबर ओळखली नाही. तेव्हा त्याने आपला असंतोष एके दिवशी गुरुजींच्याकडे प्रकट केला.

तो म्हणाला, "गुरुजी, दुसरी दीक्षा मिळण्याकरिता मी खरोखरच पात्र आहे." आणि नेमक्या त्याच वेळी दरवाजा उघडून एक गरीबसा शिष्य आत आला. त्याचे नाव वृंदा भगत. तो वाराणशीमध्ये पोस्टमनचे काम करीत असे.

"वृन्दा, माझ्याजवळ येथे जरा बैस बरे." असे म्हणून ते परमगुरू त्याच्याकडे ममतेने पाहून हसले. "सांग पाहू मला, दुसरी दीक्षा घ्यायला तुझी तयारी झाली आहे काय?"

पोस्टमनने हात जोडून नम्र विनंती केली. त्याला भीतीच वाटली आणि तो म्हणाला, "गुरुदेव, आता नवीन काही दीक्षाबीक्षा मला नको. ही उच्च अशी तंत्रविद्या मला कशी आत्मसात करता येईल? मी आज फक्त येथे आपला आशीर्वाद मागायला आलो आहे. कारण क्रियेच्या पहिल्याच श्रेणीच्या अभ्यासाने मी इतका मस्त झालो आहे की, माझ्या हातून पत्रे सुद्धा नीट वाटली जात नाहीत."

"वृंदा अगोदरच चैतन्यसागरामध्ये पोहत आहे." लाहिरी महाशयांचे हे शब्द ऐकून पहिल्या शिष्याने शरमेने खाली मान घातली.

"गुरुजी," तो म्हणाला, "मला वाटते मी एक साधा कामकरी आहे व हत्यारांबद्दल मी तक्रार करीत राहिलो आहे."

तो साधा पोस्टमन विशेष शिकलासवरलेला नव्हता; पण पुढे क्रियासाधनेने अंतर्दृष्टी प्राप्त झाल्यामुळे तो इतका प्रगत झाला की, विद्वान मंडळी प्रसंगविशेषी धर्मशास्त्रामधील काही गुंतागुंतीच्या प्रश्नांवरही त्याचा अभिप्राय विचारीत. पापपुण्य व व्याकरण वगैरेंविषयी पूर्ण अनभिज्ञ असूनही लहानशा वृंदाने विद्वान मंडळींत फार ख्याती मिळविली.

वाराणशीमधील अनेक शिष्यांखेरीज लाहिरी महाशयांचे हिंदुस्थाना-मधील दुसऱ्या दूरदूरच्या भागांतून शेकडो शिष्य त्यांच्याकडे येत. आणि त्यांनी स्वतः बंगालमध्ये पुष्कळच प्रवास केला होता. आपल्या दोन्ही व्याह्यांकडे ते वरचेवर जात. अशा रीतीने त्यांच्या अस्तित्वामुळे पवित्र झालेल्या बंगालमध्ये जागोजाग मधमाश्यांच्या पोळ्यासारखी क्रियायोग करणाऱ्यांची मंडळे स्थापन झाली. विशेषकरून कृष्णनगर व विष्णुपूर या जिल्ह्यांमध्ये आजसुद्धा विशेष गाजावाजा न करता काही शिष्यांनी आध्यात्मिक ध्यानाचा अदृश्य प्रवाह चालू ठेवलेला आहे.

लाहिरी महाशयांच्याकडून क्रियायोगाची दीक्षा घेणाऱ्यांमध्ये नाव घेण्यासारखे महात्मे म्हणजे वाराणशीचे प्रख्यात स्वामी भास्करानंद सरस्वती व देवगढचे उच्च कोटीचे तपस्वी बालानंद ब्रह्मचारी हे होत. काही काळ लाहिरी महाशय हे वाराणशीचे महाराज ईश्वरी नारायण सिंह बहादूर यांच्या मुलाचे खाजगी शिक्षक होते. गुरुजींच्या आध्यात्मिक उन्नतीची ओळख झाल्यावर महाराजसाहेबांनी व युवराजांनी क्रियादीक्षा घेतली; त्याचप्रमाणे महाराजा जोतिंद्र मोहन ठाकूर यांनीही दीक्षा घेतली होती.

लाहिरी महाशयांच्या पुष्कळशा वजनदार व मान्यवंत शिष्यांना अशी इच्छा होई की, क्रियायोगाच्या साधनेचा जाहिराती वगैरे देऊन अधिक प्रचार करावा. पण त्याला गुरुजींनी परवानगी दिली नाही. तसेच एका चेल्याने—तो काशी नरेशांचा राजवैद्य होता—गुरुजींचा 'काशीबाबा' [17] या नावाने शिस्तबद्ध प्रचार करण्यास सुरुवात केली. पण त्यालाही गुरुजींनी मनाई केली.

ते म्हणत, "क्रियारूपी फुलाचा सुगंध वाऱ्यासारखा आपोआप पसरू द्या. क्रियासाधनेची बीजे आध्यात्मिक दृष्ट्या सुपीक अशा अंतःकरणात खात्रीने मूळ धरल्याखेरीज राहणार नाहीत."

जरी ह्या महान गुरूंनी एखाद्या संस्थेसारख्या आधुनिक पद्धतीच्या माध्यमाच्या द्वारे, किंवा वर्तमानपत्रात प्रसिद्धी देऊन प्रचारपद्धतीचा अवलंब केला नव्हता, तरी त्यांना हे पूर्ण माहीत होते की, त्यांच्या संदेशाचे सामर्थ्य एखाद्या अनिर्बंध पुराच्या पाण्याच्या प्रवाहासारखे वाढत जाईल व स्वतःच्या शक्तीने मानवी मनांच्या तीरांमधून आत जोराने घुसून जाईल. शिष्यांच्या मनाचे परिवर्तन व शुद्धीकरण झाले म्हणजे क्रियायोगाचे अमर असे ज्वलंत स्वरूप कायमचे टिकेल अशी साधी पण स्पष्ट खात्री पटण्यासारखी होती.

१८८६ मध्ये, म्हणजे राणीखेतला दीक्षा मिळाल्यानंतर, पंचवीस वर्षांनी लाहिरी महाशय सेवानिवृत्त झाले व त्यांनी पेन्शन [18] घेतले. पुढे मग दिवसाच्या वेळी सुद्धा त्यांची भेट घेणे शक्य झाल्यामुळे त्यांच्याकडे येणाऱ्या भक्तांची गर्दी उत्तरोत्तर वाढू लागली. त्यामुळे गुरुदेव आता बहुतेक वेळ मौन धारण करून पद्मासन घालून बसत. ते आपली लहानशी खोली क्वचितच सोडीत. ते बाहेर फिरायलाही जात नसत की घरातल्या घरात सुद्धा इतरत्र हिंडत नसत. सतत शिष्यांचे मेळावे शांतपणे आपल्या गुरूंचे दर्शन घेण्यासाठी येत.

लाहिरी महाशयांच्या दर्शनार्थ जे येत त्यांना त्यांच्या शरीराकडे पाहून आश्चर्ययुक्त भीतीच वाटे. त्यांच्या नेहमीच्या शारीरिक अवस्थेत अतिमानुष गुण असावयाचे. उदाहरणार्थ,

त्यांची श्वसनक्रियाच कधी कधी बंद असावयाची. ते कधी कधी झोपच घेत नसत. त्यांच्या नाडीचे ठोके कधी कधी बंद पडत, तर कधी कधी हृदय सुद्धा आपले अविरत चाललेले कार्य थांबवीत असे. त्यांचे डोळे निश्चल असे कित्येक तास तसेच राहत. आणि त्यांच्याभोवती शांतीचे एक तेजोवलय दिसत असे. त्यांच्याकडे दर्शनार्थी जो येई, त्याला आपल्यामध्ये काही तरी पारमार्थिक उन्नती घडून आली आहे याची खात्री होई. ईश्वराच्या एका सच्च्या मनुष्याचे शांत आशीर्वाद आपल्याला प्राप्त झाले आहेत याची सगळ्यांना खात्री असायची.


आता गुरुजींनी आपल्या पंचानन भट्टाचार्य नावाच्या शिष्याला कलकत्त्याला, "आर्य मिशन इन्स्टिट्यूशन" या नावाचे एक योगकेंद्र काढावयास परवानगी दिली. ह्या केंद्रात काही योगिक वनस्पतींची औषधे [19] देत आणि भगवद्गीतेची स्वस्तातल्या स्वस्तात आवृत्ती प्रसिद्ध करीत. बंगालमध्ये अशा तऱ्हेचा हा धार्मिक प्रचार प्रथमच सुरू झाला. अशा तऱ्हेची ही हिंदी व बंगाली भाषांमध्ये प्रसिद्ध केलेली आर्य मिशनची गीता घरोघरी जाऊ लागली.

एका पुरातन रिवाजाप्रमाणे गुरुजी सगळ्यांना कित्येक रोगांवर औषध म्हणून सर्वसाधारणपणे कडुलिंबाचे [20] तेल देत. जेंव्हा गुरुजी एखाद्या शिष्याला हे तेल लिंबापासून काढावयास सांगत तेव्हा तो शिष्य ते काम सहज करून दाखवी. पण जर इतराने हे काम हाती घेतले तर त्याला त्या कामात विलक्षण अडचणी यावयाच्या. तेल काढावयाच्या ऊर्ध्वपातनाच्या पद्धतीत अनेक अडथळे यावयाचे. कढणातील पाणी पूर्णपणे निघून जावयाचे नाही. याचा अर्थच असा की ह्या साऱ्या कृतीसाठी गुरुकृपा ही आवश्यक असे.

बंगाली लिपीमधील लाहिरी महाशयांचे हस्ताक्षर व सही या ग्रंथात छापलेली आहे. त्यातील ओळी एका शिष्याला लिहिलेल्या पत्रातील आहेत त्यात परमगुरूंनी एका संस्कृत श्लोकाचा अर्थ विशद केला आहे: "जो प्रशांतात्मा झाला आहे आणि ज्या अवस्थेमध्ये त्याच्या डोळ्यांच्या पापण्या मिचकत नाहीत त्याला शांभवी मुद्रा [21] साध्य झाली असे समजावे."

इतर पुष्कळ महात्म्यांप्रमाणे लाहिरी महाशयांनी स्वतःची अशी काही पुस्तके लिहिलेली नाहीत. पण ते आपल्या शिष्यांना धर्मशास्त्रांवर आपली मते सांगत असत. गुरुजींचे एक दिवंगत झालेले नातू, श्री आनंद मोहन लाहिरी खालीलप्रमाणे लिहितात:

"भगवद्गीता आणि महाभारताचे इतर भाग यांमध्ये जागोजाग गुंतागुंतीचे मुद्दे (व्यास-कूटे) आढळून येतात. ह्या मुद्दयांबद्दल काही प्रश्न विचारू नका; आणि त्या ठिकाणी तुम्हांला असे आढळून येईल की, तेथे फक्त चमत्कारिक पौराणिक गोष्टी दिलेल्या आहेत, की ज्याचा खरा अर्थ कोणाच्या ध्यानात सहसा येऊ नये. अशा विवाद्य मुद्दयांचे स्पष्टीकरण करण्याचा त्रास घेऊ नका आणि अशामुळे आपण एक मोठे शास्त्रीय ज्ञान गमावलेले आहे की, जे ज्ञान पौर्वात्यांनी हजारो वर्षांच्या प्रयोगांती [22] अगदी अमानुष अशा चिकाटीने जतन करून ठेवलेले आहे.



५, श्रावण (सही) “श्री श्यामा चरण देव शर्मन”

शास्त्रीय भाषेच्या शब्दजंजाळातून आणि कल्पनांच्या जाळ्यातून दृष्टीला सहजासहजी दिसून न येणारे असे एक धर्मशास्त्र लाहिरी महाशयांनी शोधून काढले आहे; की ज्यामध्ये रूपकात्मक गूढ, सुप्त अर्थाच्या कथा बाजूला काढून ठेवलेल्या आहेत. अशा ह्या धर्मशास्त्रामध्ये बुद्धीला अगम्य अशा शब्दांची कसरत न करता वैदिक कर्मकांडामध्ये शास्त्रीय अर्थ पुरेपूर भरलेला आहे हे सिद्ध करून दाखविलेले आहे …

“आपणा सर्वांना माहीत आहे की, साधारणतः मनुष्यप्राणी दुष्ट मनोविकारांच्या, कामनांच्या उग्र हल्ल्यापुढे हतबल होतो, लाचार होतो; पण क्रियायोगाच्या साधनेने जेव्हा त्याच्या मनामध्ये एका अत्युच्च व चिरंतन अशा दिव्यानंदाच्या जाणिवेची प्रभात होते, जागृती होते, तेव्हा त्या कामनांच्या पूर्तीमध्ये मनुष्याला गोडी वाटत नाही, त्या त्याला निरर्थक वाटतात. आणि मग त्यांचा प्रभाव त्याच्यापुढे चालत नाही. क्रियायोगाच्या साधनेमध्ये तुम्ही काही गोष्टींचा त्याग करता, खालच्या दर्जाचे मनोविकार नाहीसे करता, पण त्याचबरोबर तुम्ही एक नवीन गोष्ट ग्रहण करता; ती म्हणजे परमसुखानंद. आणि ती ग्रहण करीत असल्याचे तुम्ही आग्रहपूर्वक सांगता. अशा तऱ्हेच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या योगसाधनेखेरीज नुसते नकारात्मक निर्देश देणारे नीतिवचन आपल्याला काहीएक उपयोगाचे नाही.

“सर्व दृश्यमान घटनांच्या मागे एका महान शक्तीचे अनंत तत्त्व दडून राहिलेले असते. आपल्यामध्ये ऐहिक गोष्टींबद्दल जी उतावीळ चालू असते, त्यामुळे आपल्यामधील आध्यात्मिक जिज्ञासा व उत्कंठा मारली जाते. आधुनिक भौतिक शास्त्रे आपल्याला निसर्गाच्या शक्तीचा कसा उपयोग करून घ्यावा, हे फक्त शिकवितात, पण त्यामुळे ह्या नामरूपात्मक सृष्टीमागील जे महान जीवन आहे त्याचे आपल्याला काहीच आकलन करता येत नाही. निसर्गाशी आपला फार परिचय झाल्याने निसर्गाच्या अंतिम रहस्याबद्दल आपल्या मनामध्ये एक प्रकारचा तिटकारा उत्पन्न झाला आहे. निसर्गाशी आपण करीत असलेला व्यवहार हा अगदी धंदेवाईक स्वरूपाचा आहे. आपण जणू काय निसर्गाला छेडतो, अशाकरिता की निसर्गाने आपली चाकरी करावी. अशा तऱ्हेच्या नवीन नवीन युक्त्या काढून आपण निसर्गाला

डिवचतो. निसर्गाच्या शक्तीचा आपण उपयोग करून घेतो. पण ती शक्ती कोठून येते ह्याचा आपल्याला पत्ता नसतो. विज्ञानाच्या दृष्टीने आपला निसर्गाशी संबंध म्हणजे एक उद्धट मालक व त्याचा नोकर अशांसारखा आहे; किंवा तत्त्वज्ञानाच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे निसर्गाला आपण साक्षीदाराच्या पिंजऱ्यामध्ये कैदी म्हणून उभे करतो, त्याची आपण उलटतपासणी घेतो, त्याला आपण आव्हान देतो आणि निसर्ग जो पुरावा देतो त्याचे मूल्यमापन आपण बारकाईने मानवी तराजूने करतो आणि हा आपला तराजू सुप्त अशा मूल्यमापनाकरिता अगदी निरुपयोगी ठरतो.

उलटपक्षी ज्या वेळी आत्मा परमतत्त्वाशी एकरूप झालेला असतो, त्या वेळी निसर्ग आपोआप मनुष्याने दिलेल्या आज्ञा अगदी निमूटपणे पाळतो. आणि अशा तऱ्हेची निसर्गावरची ही विनासायास गाजविलेली हुकमत, अल्पसमजुतीच्या भोगवाद्यास चमत्कारासारखी आढळते.

"योग ही काही गूढ साधना नाही. ह्याचे उत्तम उदाहरण लाहिरी महाशयांच्या जीवनक्रमामुळे जगापुढे ठेवले गेले. भौतिक शास्त्रांच्या जडवादास बाजूस सारून निसर्गाशी आपला खरा संबंध काय आहे हे समजून घेणे, सर्व सृष्ट घटनांविषयी, मग त्या दैनंदिन घडणाऱ्या असोत की गूढ असोत, आध्यात्मिक आदरबुद्धी [23] मनात बाळगणे ह्या गोष्टी मनुष्याला क्रियायोगाच्या साधनेने शक्य होतात. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, एक हजार वर्षांपूर्वी जी गोष्ट चमत्कारासारखी वाटत असे, ती आज तशी वाटत नाही व आज जी चमत्कारासारखी वाटते, ती आणखी शंभर वर्षांनी सरळ तर्कबुद्धीला पटेल अशा तऱ्हेने समजू शकेल.

"क्रियायोगाचा नियम हा शाश्वत आहे. गणितशास्त्रासारखा तो खरा आहे. बेरीज-वजाबाकींच्या साध्यासुध्या नियमांसारखा तो खरा आहे. क्रियायोगाच्या नियमाचा नाश कधीही होणारा नाही. गणिताची सारी पुस्तके जरी जाळून टाकली, तरी तर्कबुद्धीने चालणारा मनुष्य ती सगळी सत्ये पुनः शोधून काढील. योगशास्त्रावरील सारी पुस्तके जरी नष्ट करून टाकली, तरी शुद्ध सात्त्विक भक्तीचा व त्या भक्तीमुळे ज्याला शुद्ध ज्ञान प्राप्त झाले आहे असा योगी पुनः अवतीर्ण होऊन, त्या शास्त्राचे मूलसिद्धांत परत विशद करून सांगेल."

बाबाजी जसे महावतार (सर्व अवतारांमध्ये महान) आहेत, श्रीयुक्तेश्वरांना जसे ज्ञानावतार म्हणता येईल, त्याप्रमाणे लाहिरी महाशय हे योगावतार [24] होत.

गुणवत्ता व संख्याधिक्य दोन्ही दृष्टींनी गुरुजींनी समाजाचा आध्यात्मिक दर्जा वरती नेला. आपल्या निकटवर्ती शिष्यांना ख्रिस्ताच्या योग्यतेप्रत नेण्याच्या सामर्थ्याच्या बाबतीत व बहुजनसमाजामध्ये सत्याचा प्रसार करण्याच्या बाबतीत लाहिरी महाशयांची जगाच्या उपकारकर्त्यांत गणना होते.

क्रियासाधनेच्या बाबतीमध्ये त्यांनी जी एक निश्चित पद्धत सांगितली व तिचा अवलंब करावा म्हणून व्यावहारिक दृष्ट्या जोर दिला, यातच प्रेषित म्हणून त्यांचे अद्वितीयत्व सिद्ध होते. पहिल्या प्रथम त्यांनीच योगशिक्षणाचे दरवाजे सर्वांना खुले केले. स्वतःच्या


हयातीमधील जे चमत्कार त्यांनी करून दाखविले ते बाजूस ठेवून दिले, तरी प्राचीन अशा योगशास्त्राची दुर्बोधता व बिकटता कमी करून, त्या शास्त्राचा बोध व त्याची प्रत्यक्ष आचार—साधना सामान्य माणसाच्या दृष्टीने सुबोध व सुगम करून दाखविण्याचा मोठ्यातला मोठा चमत्कार योगावतारांनी करून दाखविला.

चमत्कारांचा विषय निघाला की, लाहिरी महाशय नेहमी म्हणत, “सूक्ष्म असे नैसर्गिक नियम, ज्यांचे कार्य अबाधित व अव्याहत असे नित्य चालू असते व ज्यांच्याबद्दल सामान्य माणसांना काही ज्ञान नसते, त्या नियमांबद्दल उघड सार्वजनिक चर्चा करू नये, की काही तारतम्य न बाळगता ते प्रसिद्ध करू नयेत.” ह्या ग्रंथात जर मी त्यांनी दिलेल्या काही निषेधात्मक सूचना तंतोतंत पाळल्या नसतील तर त्याचे कारण असे आहे की, त्यांनी मला एक प्रकारचे आंतरिक आश्वासन दिले आहे. तथापि बाबाजी, लाहिरी महाशय आणि श्रीयुक्तेश्वर यांच्या जीवनक्रमाविषयी माहिती देताना त्यांच्या चमत्कारांच्या काही हकीकती मी दिल्या नाहीत. त्या देऊ नयेत असे मला वाटले. त्या हकीकती जर दिल्या असत्या, तर त्यांचे स्पष्टीकरण करण्याकरिता अत्यंत गूढ अशा तत्त्वज्ञानाबद्दल एक स्वतंत्र ग्रंथच मला लिहावा लागला असता.


संसारी गृहस्थी जीवन व्यतीत करून, प्रपंच करून, योगसाधनाही साध्य करणारे असे जे लाहिरी महाशय त्यांनी आजच्या जगाला आवश्यक असा व्यावहारिक संदेश दिला आहे. आज भारतामध्ये प्राचीन काळची उत्कृष्ट अशी आर्थिक आणि धार्मिक समाजव्यवस्था राहिली नाही, म्हणून ह्या महायोग्याने समाजापुढे पुरातन काळातील योग्याचा—हातात कमंडलू घेऊन भटकणाऱ्या बैराग्याच्या जीवनाचा—आदर्श समाजापुढे ठेवलेला नाही; तर त्यांनी प्रत्यक्ष आचरणाने असे दाखवून दिले की, योग्याने आपला निर्वाह आपल्या स्वतःच्या कमाईने करून, अगोदरच पुष्कळ भार ज्याच्यावर पडलेला आहे अशा समाजावरती मदतीकरिता अवलंबून न राहता, योगसाधना आपापल्या घरी खाजगी तऱ्हेने आचरावी; आणि असा जो सल्ला ते देत त्याचे समर्थन त्यांनी स्वतःच्या आयुष्याचे उदाहरण दाखवूनच केले आहे. ते एक तऱ्हेचे आधुनिक पद्धतीचे, पाण्याच्या प्रवाहाचा जसा सरळरेषेत पाट काढावा अशा शिस्तबद्ध वळणाचे होते. जगाच्या सर्व भागांतील योगशास्त्राच्या मुमुक्षू साधकांना एका विवक्षित जीवनपद्धतीने मार्गदर्शन मिळावे, असा त्यांचा जीवनक्रम होता व बाबाजींनी तसा तो आखूनच दिला होता.

योगावतारांनी घोषणाच करून ठेवलेली आहे. “आधुनिक युगातील माणसाकरिता नवीन आशा, दिव्य सायुज्यता ही स्वतःच्या प्रयत्नाने साध्य करून घेता येते. ती प्राप्त करून घेण्याच्या कामी तुम्हाला धर्म, पंथ यांमधील मतामतांचा काही आधार घ्यावयाला नको; की एखाद्या हुकूमशाही अशा विश्वगुरूचा लहरीनुरूप दिलेला संदेश ग्रहण करावयास नको.”

क्रियायोगाच्या गुरुकिल्लीचा उपयोग करून, ज्या माणसांना इतर माणसांमध्ये दिव्यत्वाचा अंश आहे, असा विश्वास होत नाही त्यांची निदान स्वतःमध्येच पूर्ण दिव्यत्व वास करीत आहे ह्याची शेवटी खात्री होईल.



*श्री श्री लाहिरी महाशय (1828-1895)*
*"योगावतार"*
*महावतार बाबाजींचे शिष्य, श्री श्री स्वामी श्रीयुक्तेश्वरांचे गुरु*



*पंचानन भट्टाचार्य*
*श्री श्री लाहिरी महाशयांचे शिष्य*

1 मॅथ्यू ३:१५ (बायबल).
2 बायबलमध्ये असे पुष्कळ उतारे आहेत की, ज्यांवरून असे स्पष्ट दिसून येते की, ज्यांनी जुना व नवा करार लिहिला त्यांना पुनर्जन्माचा सिद्धांत माहीत होता व मान्य होता.
3 मालाची ४:५ (बायबल).

4 “त्याच्या अगोदर” म्हणजे “प्रभूच्या अगोदर.”
5 ल्यूक १:१३-१७ (बायबल).
6 मॅथ्यू १७:१२-१३ (बायबल).
7 मॅथ्यू ११:१३-१४ (बायबल).
8 जॉन १:२१ (बायबल).
9 II किंग्ज २:९-१४ (बायबल).
10 मॅथ्यू १७:३ (बायबल).
11 मॅथ्यू २७:४६-४९ (बायबल).
12 “असे कितीएक प्रकारचे मृत्यू आपल्या शरीरात असतात! त्या शरीरात मृत्यूशिवाय दुसरे काही नाही.” —मार्टिन ल्यूथर.
13 मुसलमानांची प्रमुख प्रार्थना.
14 “ध्यान करूनच सत्याचा शोध घ्या. नुसती जुनाट पुस्तके पालथी घालून तुम्हांला तो शोध घेता यावयाचा नाही. चंद्र पाहायचा असेल तर आकाशात पाहा, डबक्यात नका पाहू.” —एक फारसी म्हण.
15 श्री संन्याल १९६२ मध्ये वारले. (प्रकाशकांची टीप)
16 क्रियायोगाच्या अनेक शाखा आहेत. लाहिरी महाशयांनी त्या साधनेच्या चार पायऱ्या किंवा यत्ता शोधून काढल्या. त्यांचा प्रत्यक्ष उपयोग फार उच्च दर्जाचा आहे.
17 लाहिरी महाशयांना त्यांच्या शिष्यांनी आणखी काही पदव्या दिल्या होत्या, त्या अशा: योगीवर, योगिराज आणि मुनिवर. त्यांत योगावतार ह्या पदवीची मी आणखी भर घातली आहे.
18 म्हणजे एकूण त्यांनी सरकारच्या एका खात्यात पस्तीस वर्षे नोकरी केली.
19 हिंदू वैद्यकशास्त्राला आयुर्वेद असे नाव आहे. वैदिक काळाचे वैद्य शस्त्रक्रियेच्या नाजुक उपकरणांचा उपयोग करीत होते, प्लास्टिक सर्जरी करीत होते, विषारी वायुच्या प्रभावांचे निराकरण माहीत होते, सिजरियन ऑपरेशन आणि मेंदूची शल्यक्रिया पण करीत होते. तसेच आवश्यकतेनुरुप औषधींचे सामर्थ्य वाढविण्याचे कौशल्य पण त्यांच्या ठायी होते. हिप्पोक्रेटस (ख्रिस्तपूर्व चौथे शतक) ने त्याच्या मटेरिया मेडिका मधली बहुतेक माहिती हिंदू मुळापासून घेतली आहे.
20 पूर्व भारतातील एका तऱ्हेचे लिंबाचे झाड. ह्याच्या औषधी गुणांचा प्रत्यय आता पाश्चिमात्य जगात येऊ लागला आहे. आता तिकडे सुद्धा लिंबाच्या झाडाच्या सालीचा शक्तिवर्धक औषधासारखा उपयोग करतात. आणि त्याच्या बिया व फळ यांपासून काढलेल्या तेलाचा महारोगावर व इतर रोगांवरही चांगला उपयोग होतो.
21 शांभवी मुद्रा म्हणजे आपली नजर भ्रूमध्य भागावर कायम राखणे. ज्या वेळी योगी मानसिक शांतीच्या एका निश्चित अवस्थेप्रत पोचतो, त्या वेळी त्याच्या पापण्यांची उघडझाप बंद होते. स्वतःच्या आंतरिक जगामध्ये तो लय पावतो.

साधारणपणे मुद्रा म्हणने बोटांची व हातांची एक विशेष स्थिति. पुष्कळशा मुद्रा मज्जातंतूंना प्रभावित करुन शांतता उत्पन्न करतात. प्राचीन हिंदू शास्त्रांमध्ये नाडीचे बारीक पृथक्करण केलेले आहे (शरीरामध्ये ७२,००० ज्ञानतंतू आहेत) व त्यांचा मनाशी जो संबंध आहे तो स्पष्ट केलेला आहे. पूजेमध्ये व योगसाधनेमध्ये ज्या मुद्रा केल्या जातात, त्याला शास्त्रीय आधार आहे. मुद्राविषयक सविस्तर वर्णन हिंदूंच्या धार्मिक नृत्यांमध्ये व मोठमोठ्या मंदिरांमध्ये खोदलेल्या चित्रांमधून आढळते.
22 “सिंधू नदीच्या खोऱ्यात फार पुरातन काळातील वास्तुविशेषांचे उत्खनन नुकतेच झालेले आहे. ही संस्कृती इसवीसनापूर्वी तीन हजार वर्षांपूर्वी नांदत असावी असे दिसते. ह्या उत्खननामध्ये त्या वेळचे पुष्कळ शिक्के आणि नाणी सापडलेली आहेत. तसेच उत्खननामध्ये ध्यानस्थ आसनांच्या पुष्कळ मूर्ती सापडलेल्या आहेत. ती आसने योगिक आसनेच होत. त्यावरून असा निष्कर्ष निघतो की, त्या काळात सुद्धा योगविद्येचे निदान जुजबी स्वरूप तरी त्या त्या काळातील लोकांना माहीत होते. आपल्याला असा सयुक्तिकपणे निष्कर्ष काढता येतो की, नीट काळजीपूर्वक अभ्यासिलेल्या पद्धतींच्या मदतीने शास्त्रशुद्ध असे अन्तर्शोधन भारतामध्ये गेली पाच हजार वर्षे चालत आलेले आहे.” —अमेरिकन कौन्सिल ऑफ लर्नेड सोसायटीज, वॉशिंग्टन डी. सी. यांच्या ‘बुलेटिन’मधील प्रो. डब्ल्यू. नॉर्मन ब्राऊन यांच्या लेखामधील उतारा.

परंतु हिंदू धर्मशास्त्रात सांगितलेले जर ग्राह्य मानले तर योगशास्त्राचा अभ्यास भारतामध्ये असंख्य युगे लोकांना परिचित होता असे दिसून येते.
23 “जो मनुष्य आश्चर्यचकित होत नाही किंवा ज्याला आश्चर्य पावण्याची (आणि पूजा करण्याची) सवय नाही असा मनुष्य असंख्य रॉयल सोसायट्यांचा अध्यक्ष असला … आणि त्याच्या एकमेव डोक्यात सर्व प्रयोगशाळा व वेधशाळा आणि त्यांचे निरीक्षणपरिणाम गर्दी करून राहिले, तरी तो मनुष्य चक्षुविहीन असतो; त्याचे डोळे म्हणजे फक्त चष्म्याच्या दोन काचा आहेत.” कार्लाईल, ‘सार्टार रिझरटस’ ग्रंथामध्ये.

24 श्रीयुक्तेश्वरांनी आपल्या शिष्याचा—परमहंस योगानंदांचा 'प्रेमावतार' म्हणून उल्लेख केलेला होता. परमहंसजींचे निर्याण झाल्यावर त्यांचे प्रधान शिष्य राजर्षी जनकानंद (श्री जेम्स जे. लिन) यांनी योगानंदजींना 'प्रेमावतार' अशी अत्यंत समर्पक पदवी देऊन टाकली. (प्रकाशकांची टीप)

प्रकरण - ३६

# 36. बाबाजींना वाटणारी पाश्चिमात्य जगाबद्दलची आस्था

"गुरुजी, तुम्हांला कधी बाबाजींचे दर्शन घडले का?"

सेरामपूरला आश्रमात दुसऱ्या मजल्यावरच्या पडवीत मी श्रीयुक्तेश्वरांच्या बाजूला बसलेलो होतो. वसंतऋतूमधील ती प्रशांत अशी रात्र होती. आकाश निरभ्र होते. विषुववृत्त कटिबंधात दिसणारे मोठे तारे आकाशात आमच्या डोक्यावरती चमकत होते.

"होय," माझा हा सरळ प्रश्न ऐकून गुरुजींनी स्मित केले. त्यांच्या डोळ्यांमध्ये आदरबुद्धी चमकू लागली. "त्या अमर गुरुदेवांच्या दर्शनाचा मला तीनदा लाभ घडून आलेला आहे. पहिले त्यांचे दर्शन मला अलाहाबादला कुंभमेळ्यात झाले."

हिंदुस्थानामध्ये फार पुरातन काळापासून धार्मिक यात्रेकरूंचे मेळावे भरत असतात. त्यांस कुंभमेळे म्हणतात. या कुंभमेळ्यांच्या द्वारे बहुजनसमाजापुढे आध्यात्मिक ध्येय सतत दृष्टीसमोर ठेवण्याचे कार्य केले जाते. श्रद्धाळू हिंदू लोक दर सहा किंवा बारा वर्षांनी सर्व प्रकारच्या हजारो साधुसंतांची, योग्यांची, संन्यासी, बैरागी यांची भेट व्हावी म्हणून लाखांच्या संख्येने एकत्र जमतात. त्यांमध्ये असे पुष्कळ साधू असतात की, जे नेहमी एकांतात राहतात; फक्त मेळ्याच्या वेळी बाहेर पडतात व संसारी स्त्री-पुरुषांना आशीर्वाद देऊन जातात.

"माझी जेव्हा बाबाजींशी भेट झाली, तेव्हा मी स्वामी झालेलो नव्हतो," श्रीयुक्तेश्वर पुढे सांगू लागले, "पण मला क्रियायोगाची दीक्षा लाहिरी महाशयांकडून अगोदरच मिळालेली होती. अलाहाबादला १८९४च्या जानेवारीमध्ये जो मेळा भरणार होता, त्याला जाण्याकरिता त्यांनी मला प्रोत्साहन दिले. कुंभमेळ्याला जाण्याची ही माझी पहिलीच वेळ. तेथल्या गर्दीने व गडबडीने मी जरा दिपून गेलो. मी सभोवार शोधक दृष्टीने पाहू लागलो; पण साक्षात्कारी पुरुष मला कोणी आढळेना. गंगेच्या काठावरील पुलावरून जात असता जवळच उभा राहिलेला एक ओळखीचा चेहरा वाटला. त्याने भिक्षापात्र पुढे केले.

'ही यात्रा म्हणजे सारा गोंधळ आहे. काय आवाज आणि हे भिकारी पाहा!' माझा जणू भ्रमनिरास झाला. 'मला वाटते की, परमेश्वराला, धर्माच्या नावावर भीक मागणाऱ्या रिकामटेकड्या भिकाऱ्यांपेक्षा, मानवजातीच्या खऱ्याखुऱ्या कल्याणाकरिता ज्ञानाची दालने विस्तृत करण्यासाठी संथपणे प्रयत्न करणारे शास्त्रज्ञ जास्त प्रसन्न करीत असतील.'

"समाजसुधारणेविषयी माझ्या मनात वरील विचार धुमसत असताना एका उंच संन्याशाच्या आवाजाने मला जरा भानावर आणले. तो संन्यासी अगदी माझ्या पुढ्यात येऊन उभा राहिला.

"तो म्हणाला, 'महाराज, एक साधू तुम्हांला बोलावीत आहे.'

"'कोण आहे तो?'

"'या आणि स्वतःच पाहा.'

“थोड्या नाखुशीने ह्या संक्षिप्त सूचनेला अनुसरून मी पुढे सरलो आणि एका झाडापाशी आलो. त्या झाडाच्या फांद्यांच्या आश्र्याखाली एक गुरुजी बसलेले होते व त्यांच्याभोवती तरतरीत शिष्यही बसलेले होते. त्या गुरूंचा चेहरा विलक्षण तेजस्वी होता. त्यांचे काळेभोर डोळे चमकत होते. मी गेल्याबरोबर ते उभे राहिले आणि त्यांनी मला आलिंगन केले.

“‘स्वामीजी, आपले स्वागत आहे’ ते प्रेमळपणे म्हणाले.

“‘महाराज, मी स्वामी नाही,’” मी स्पष्टपणे त्यांना सांगितले.

“‘परमेश्वरी आदेशानुसार मी ज्यांना ‘स्वामी’ ही पदवी बहाल करतो ते ती पदवी कधीही टाकून देत नाहीत,’ साधुमहाराज माझ्याशी साध्या भाषेत बोलत होते; पण त्यांच्या शब्दांमध्ये सत्याबद्दलचा दांडगा आत्मविश्वास होता. क्षणार्धात आध्यात्मिक अनुग्रहाच्या तरंगामध्ये मी गुरफटून गेलो. अशा तऱ्हेने ह्या प्राचीन संन्यासधर्मामध्ये [1] माझी ही जी बढती झाली त्याचे मला जरा हसू आले. अशा रीतीने ज्यांनी मला सन्मानित केले, त्या मानवी देहात वावरणाऱ्या देवदूतासमान असलेल्या महात्म्याच्या चरणांना मी वंदन केले.

“बाबाजींनी—आणि ते खरेच ते होते—मला झाडाखाली त्यांच्याशेजारी बसण्याकरिता खुणावले. त्यांचे शरीर सुदृढ होते व दिसायला ते तरुण होते; आणि अगदी लाहिरी महाशयांसारखे ते दिसत होते. पण ते साम्य त्या वेळी माझ्या ध्यानात आले नाही. ह्या दोन गुरुजींच्या चेहऱ्यांमध्ये विलक्षण साम्य होते, हे मी खरोखरी ऐकलेही होते. बाबाजींना अशी एक सिद्धी होती की, जिच्यामुळे ते कोणाही माणसाच्या मनामध्ये कोणताही एक विशिष्ट विचार येऊ देत नसत. परमगुरूंची अशी इच्छा होती की, त्यांच्यासमोर मी अगदी पूर्णपणे नेहमीसारखे वागावे व ते कोण आहेत हे समजल्यावर घाबरून आश्चर्यचकित होऊन जाऊ नये, हे उघड दिसत होते.

“‘कुंभमेळ्याबद्दल तुला काय वाटते?’

“‘महाराज, माझी मोठी निराशा झाली होती—’ मी म्हणालो, पण चटकन दुरुस्ती केली. ‘—आपली भेट होईतोपर्यंत. कारण काही समजत नाही, पण हे साधुसंत व हा एवढा जनसंमर्द व कोलाहल हे दृश्य जरा विसंगत दिसते.’

‘बेटा,’ गुरुजी म्हणाले — जरी मी त्यांच्या दुप्पट वयाचा दिसत होतो — ‘पुष्कळ लोकांच्या ठिकाणी असलेल्या दोषांवरून सगळेच तसे आहेत असे समजू नको. पृथ्वीवर सगळे मिश्रित स्वरुपाचे आहे. साखर आणी वाळू जशी एकत्र मिसळावी तसे हे मिश्रण आहे. ह्यातून, एखाद्या मुंगीच्या शहाणपणाने, वाळूला स्पर्श न करता फक्त साखरच उचलून काढ. अजून कित्येक साधू मायेच्या फापटपसाऱ्यात भटकत आहेत, परंतु काही थोड्या साक्षात्कारी पुरुषांमुळे ह्या मेळ्याला पवित्र स्वरूप प्राप्त झाले आहे.’

“आणि आता परमगुरूंची प्रत्यक्षच भेट झाल्याकारणाने मी त्यांचे म्हणणे चटकन कबूल केले.

“‘महाराज,’ मी बोलू लागलो, ‘माझ्या डोक्यात पाश्चिमात्य जगातील प्रमुख अशा शास्त्रीय संशोधकांबद्दल विचार चालू होते. युरोप आणि अमेरिकेसारख्या दूरच्या भूखंडात राहून आणि वेगवेगळे धर्मपंथ अनुसरत असून आणि येथे जमलेल्या बहुतेक लोकांपेक्षा अधिक

बुद्धिमान जे आहेत त्यांना ह्या अशा भरलेल्या मेळ्यांबद्दल काही माहिती नाही. अशा मेळ्यांची तादृश काय जरुरी आहे, काय उपयुक्तता आहे याची त्यांना काहीच कल्पना नाही. भारतातील गुरुजनांना भेटून, त्यांच्याशी चर्चा करून त्यांना पुष्कळ फायदा होणारा आहे. बौद्धिक ज्ञानसंपादनामध्ये त्यांनी जरी उच्च स्थान प्राप्त केले असले, तरी असे बहुतेक पाश्चिमात्य पंडित नितांत जडवादी, भोगवादी असतात. काही शास्त्र आणि तत्त्वज्ञान अशा दोन्हींमध्ये पारंगत असून सर्व धर्मांची मूलतः एकवाक्यता आहे, हे ते जाणत नाहीत. त्यांचे धर्मपंथ म्हणजे दुर्लंघ्य असे अडसर आहेत. असे अडसर मध्येच उभे करून ते स्वतःला आपणासारख्या पौर्वात्यांपासून कायमचे दूर आणि अलिप्त ठेवतात.'

"'पूर्व आणि पश्चिम या दोन्हीमध्येही तुला सारखीच आस्था वाटत आहे हे मी पाहिले.' हे पसंत असल्याचे जणू सूचक असा त्यांचा चेहरा प्रफुल्लित झाला. सर्व मनुष्यप्राण्यांसंबंधी तुला कळकळ वाटते, त्यांच्याबद्दल तुझ्या अंतःकरणाला ज्या वेदना होतात त्या मला समजून आल्या आणि म्हणूनच मी तुला येथे बोलावून आणले.

"'पूर्व आणि पश्चिम या दोन्हींमध्ये कर्मवाद आणि अध्यात्म अशा दोन्हींचा एक सुवर्णमध्य साधला गेला पाहिजे,' त्यांनी आपले बोलणे पुढे चालू ठेवले, 'पाश्चिमात्य जगापासून भौतिक विकासाचे पुष्कळच शिक्षण भारतास घ्यावयास हवे आहे आणि त्याच्या बदली भारतही पाश्चिमात्य जगाला त्यांच्या धार्मिक समजुती योगशास्त्राच्या दृढ पायावर कशा बसवाव्यात याच्या सर्वंकष साधनापद्धतीबद्दल ज्ञान देऊ शकेल.

"'स्वामीजी, पूर्व आणि पश्चिम या दोन्हींमध्ये हा जो सुसंगत विचारविनिमय होणारा आहे, त्यात तुम्हांला भाग घ्यावा लागेल. काही वर्षांनी मी तुमच्याकडे एक शिष्य पाठवीन. त्याला तुम्ही पाश्चिमात्य जगात योगशिक्षण प्रसृत करण्यास तयार करा. तेथील अनेक मुमुक्षू आत्म्यांच्या विचारलहरींच्या लाटांचा ओघ माझ्याकडे सारखा येत आहे. अमेरिका व युरोपमध्ये अशा अनेक व्यक्ती मला डोळ्यांपुढे दिसत आहेत की, ज्या पुढे जागृत होऊन योगीपुरुष होतील.'"

हकीकत येथपर्यंत आल्यावर श्रीयुक्तेश्वरांनी आपली सगळी नजर माझ्याकडे वळविली.

"बेटा," ते म्हणाले. त्या चांदण्याच्या उज्ज्वल प्रकाशात त्यांच्या मुद्रेवर स्मित विराजमान झाल्याचे दिसत होते. "बाबाजींनी कित्येक वर्षांपूर्वी असा एक शिष्य तुझ्याकडे पाठवून देतो म्हणून जे वचन दिले होते त्याप्रमाणे तूच तो शिष्य आहेस."

बाबाजींनीच माझी रवानगी श्रीयुक्तेश्वरांकडे केली, हे ध्यानात आल्यावर मला जरा आनंद वाटला हे खरे; पण हा साधा, प्रशांत असा आश्रम सोडून, प्रिय अशा गुरुदेवांना सोडून, दूर कोठे तरी पश्चिमेकडील जगात मी योगज्ञानाचा प्रसार करीत हिंडत आहे असे चित्र डोळ्यांसमोर आणल्यावर मला क्लेश झाले.

"बाबाजी नंतर भगवद्गीतेवर बोलू लागले." श्रीयुक्तेश्वरांनी आपली हकीकत पुनः सुरू केली. "गीतेतील निरनिराळ्या अध्यायांवर मी भाष्य लिहिले आहे ही गोष्ट त्यांना माहीत असावी, हे त्यांनी त्यावर जे काही स्तुतिपर उद्गार काढले त्यावरून मला दिसून आले. मला मोठे आश्चर्य वाटले.

"'स्वामीजी, माझी तुम्हांला विनंती आहे की, असेच दुसरे काम हाती घ्या.' परमगुरू म्हणाले, 'ख्रिस्ती व हिंदू धर्म या दोन्ही धर्मांत आढळून येणारी एकता या विषयावर तुम्ही एक लहान ग्रंथ लिहा. स्फूर्ती मिळालेल्या परमेश्वराच्या पुत्रांनी जी नितांत सत्ये सांगितली आहेत त्यांचे समानार्थी संदर्भ द्या. ही एकता सांप्रत माणसांच्या पंथविशेष मनभेदांनी अंधुक झालेली आहे.'

"'महाराज,' मी भीतभीतच म्हणालो, 'ही कशी आज्ञा आहे! माझ्या हातून हे काम होईल काय?'

"बाबाजींनी मृदू हास्य केले. 'बेटा, का, तुला अशी खात्री वाटत नाही?' मला प्रोत्साहन देत ते म्हणाले, 'खरोखरी, कोणाचे कार्य आहे हे? आणि सर्व कृतींचा कर्ता कोण आहे? परमेश्वराने जे माझ्या तोंडून वदविले ते खरे होणारच!'

"त्या महात्म्याच्या आशीर्वादाने मला एक नवीन सामर्थ्य माझ्या अंगी आल्यासारखे वाटले; आणि मी पुस्तक लिहावयाचे कबूल केले. आता निरोप घेण्याची वेळ आल्यासारखी वाटली आणि पानांच्या आसनावरून मी नाखुशीनेच उठलो.

"'तुझी लाहिरीशी ओळख आहे काय?' गुरूंनी चौकशी केली. 'तो मोठा पुण्यात्मा आहे, नाही का? आपली जी ही भेट झाली ती हकीकत त्याला सांग.' नंतर त्यांनी मला लाहिरी महाशयांकरिता निरोप दिला.

"त्यांचा निरोप घेण्यापूर्वी मी जेव्हा त्यांना नमस्कार केला तेव्हा त्यांनी कृपाळूपणे स्मित केले; 'जेव्हा तुझे पुस्तक लिहून पुरे होईल, तेव्हा मी तुला पुनः भेटेन,' त्यांनी मला वचन दिले. 'आता मी जातो.'

"दुसऱ्या दिवशी मी अलाहाबाद सोडून वाराणशीच्या गाडीत बसलो. गुरुजींच्या घरी गेल्यावर कुंभमेळ्यामध्ये घडून आलेल्या विस्मयकारी महात्म्याशी झालेल्या भेटीची सारी हकीकत मी त्यांना सांगून टाकली.

"'अरे तू त्यांना ओळखले नाहीस?' लाहिरी महाशयांचे डोळे हास्याने फुलले होते. 'नाही ओळखलेस तू त्यांना. त्यांनीच तुला ओळखू दिले नाही. अरे, ते तर माझे अतुलनीय गुरू, सुप्रसिद्ध बाबाजी!'

"'बाबाजी!' आश्चर्याने स्तंभित होऊन तेच शब्द माझ्या तोंडून बाहेर पडले. 'ख्रिस्त-योगी बाबाजी! दृश्यअदृश्य जगदुद्धारक बाबाजी! अरेरे, भूतकाळात जाऊन त्यांना पुनः भेटून पद्मासनात बसलेल्या त्यांच्या पायांशी भक्तिभावपूर्वक बसता आले असते तर किती छान होईल?"

"'काही हरकत नाही,' लाहिरी महाशय माझे समाधान करीत म्हणाले, 'तुला परत भेटण्याचे त्यांनी वचन दिले आहे ना?'

"'गुरुदेव, त्या स्वर्गीय गुरूंनी तुम्हांला एक निरोप दिलेला आहे.' 'लाहिरीला सांग,' ते म्हणाले, 'ह्या जीवनातील साचवलेली सारी शक्ती आता संपुष्टात आली आहे.'

"ह्या गूढ शब्दांचा उच्चार केल्याबरोबर लाहिरी महाशयांचे शरीर विजेच्या स्पर्शाबरोबर जसे कापावे तसे थरारू लागले. एका क्षणात त्यांच्या भोवतालचे सर्व काही शांत झाले. त्यांची हसरी मुद्रा एकदम गंभीर झाली; कोणाचा विश्वास बसणार नाही इतकी. एखाद्या

लाकडी पुतळ्याप्रमाणे आपल्या बसल्या ठिकाणीच ते गंभीर व निश्चल झाले. त्यांचे शरीर निस्तेज पडले. मी घाबरलो, गोंधळून गेलो. आयुष्यात कधीही आतापर्यंत त्यांचा आनंदी चेहरा इतका भयानकपणे गंभीर झालेला मी कधी पाहिला नव्हता. जवळ बसलेले इतर शिष्य पण भीतीने डोळे वासून नुसते पाहतच राहिले.

"अशा निःस्तब्धतेत तीन तास गेले. नंतर लाहिरी महाशयांनी आपली नेहमीची प्रसन्न मुद्रा धारण केली व शिष्यांपैकी प्रत्येकाशी ते प्रेमळपणाने पूर्ववत बोलू लागले. प्रत्येकाने सुटकेचा निःश्वास टाकला.

"बाबाजींनी जो संदेश दिला त्याची माझ्या गुरुजींवर अशी प्रतिक्रिया झाली की, व त्या संदेशाने जणू असा अचूक बावटा दाखविला की, त्यांच्या शरीरातून थोड्याच अवधीत ते आता निघून जाणार. त्यांची भयानक निःस्तब्धता असे दर्शवीत होती की, गुरुजींनी आता आपले मन ताबडतोब निरुद्ध केले असून, ह्या भौतिक जगाशी बद्ध करणाऱ्या आसक्तीची शेवटली ग्रंथी तोडून टाकून ते आता परमतत्त्वाच्या चिरंतन स्वरूपामध्ये विलीन होऊन गेले. बाबाजींच्या उद्‌गारांचा त्यांच्या भाषेत असा अर्थ होता की, 'मी सदैव तुझ्याबरोबरच आहे.'

"जरी बाबाजी व लाहिरी महाशय सर्वज्ञ होते आणि त्यांना एकमेकांशी विचारविनिमय करायला किंवा बोलायला माझ्या किंवा दुसऱ्या कोणाही मध्यस्थाची जरुरी नव्हती, तरी दोघेही ह्या मानवदेहरूपी नाट्यात भाग घेण्याकरिता खाली उतरत असत. प्रसंगी ते आपले भविष्य-संदेश कोणा निरोप्याकरवी नेहमीच्या पद्धतीने पाठवीत असत आणि मग त्यांच्या सांगण्याप्रमाणे घटना घडून आली म्हणजे ज्यांनी ही हकीकत पुढे ऐकिली असेल त्यांची ह्या महात्म्यांवरची श्रद्धा वृद्धिंगत होई. असे श्रद्धावान लोक बरेच असत.

"मी लवकरच वाराणशी सोडून सेरामपूरला गेलो व बाबाजींनी सांगितलेल्या धर्मग्रंथाच्या लेखनाला लागलो." श्रीयुक्तेश्वर पुढे म्हणाले, "मी लिहायला सुरुवात केल्याबरोबर त्या अमर गुरुदेवांच्या स्तवनाची एक कविता मला स्फुरली. संस्कृत कविता मी पूर्वी कधीही करण्याचा प्रयत्न केला नव्हता, पण या वेळी मधुर काव्यपंक्ती माझ्या लेखणीतून आपोआप कागदावर उतरू लागल्या.

"रात्रीच्या प्रशांत वेळी मी माझ्या उद्योगाला बसायचो. उद्योग म्हणजे बायबल व सनातन धर्मविषयक [2] ग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास करणे. प्रभू येशू ख्रिस्ताच्या शब्दांचा आधार देऊन मी असे दाखवून दिले की, त्याची शिकवण आणि वेदप्रणीत बोधवचने ही तत्त्वतः व मूलतः एकच आहेत. माझ्या परमगुरूंच्या [3] कृपाप्रसादाने माझे पुस्तक 'दि होली सायन्स' [4] (पवित्र धर्मशास्त्र) लवकरच लिहून पुरे झाले.

गुरुजींनी पुढे बोलणे सुरू केले. "माझी ही वाङ्‌मयीन कृती पुरी झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी मी रायघाटाला गंगास्नानाला गेलो. घाटावर कोणी नव्हते. सकाळचे ते सोनेरी ऊन अंगावर घेत, त्या प्रशांत वातावरणाचा आस्वाद घेत थोडा वेळ मी नुसताच निःस्तब्ध असा उभा राहिलो. गंगेच्या चकचकणाऱ्या पाण्यात एक बुडी मारून मी घरी परत जायला निघालो. त्या प्रशांत वातावरणात एकच ध्वनी होत होता, तो म्हणजे गंगेच्या पाण्याने भिजलेल्या माझ्या वस्त्राचा दर पावलागणिक होणारा आवाज. गंगेच्या तीरावरील त्या प्रचंड

वटवृक्षाच्या जागेवरून पुढे गेल्यावर पाठीमागे जरा वळून पाहावे म्हणून एक तीव्र इच्छा माझ्या मनात उत्पन्न झाली. तेथे त्या वटवृक्षाच्या छायेखाली काही थोड्या शिष्यांसमवेत महान बाबाजी बसलेले मला आढळले!

"'नमस्कार, स्वामीजी!' गुरुदेवांची सुंदर मंजूळ आवाजातील हाक ऐकू आली. मी स्वप्नात नाही याची मला त्यामुळे खात्री झाली. 'मला वाटते आता तुमचे पुस्तक लिहून पुरे झाले आहे, खरे ना? मी वचन दिल्याप्रमाणे तुमचे आभार मानावयास हजर आहे येथे.'

"माझ्या हृदयाचे ठोके फार जोरात सुरू झाले. मी त्यांना साष्टांग लोटांगण घातले. 'परमगुरुजी,' मी विनवणी करीत म्हणालो, 'आपण व आपले शिष्य जवळच असलेल्या माझ्या घरी येऊन ते पुनीत करणार नाही काय?"

"परमगुरूंनी स्मितपूर्वक माझी विनंती नाकारली. 'नाही रे बाळा,' ते म्हणाले, 'आम्हा लोकांना झाडाचाच आश्रय आवडतो. ही जागा फार आरामशीर आहे.'

"'गुरुजी, आपण जरा थोडा वेळ थांबाल काय?' मी त्यांच्याकडे विनवणीपूर्वक पाहत राहिलो. 'काही खास मिठाई [5] घेऊन मी लगोलग परत येतो.'

"मी जेव्हा मिठाईचे ताट घेऊन थोड्या मिनिटांत तेथे परत आलो, तेव्हा त्या विशाल वटवृक्षाखाली ही दिव्य मंडळी नव्हती. मी सारा घाट धुंडाळून काढला, पण मनात मी उमजलो की, ही मंडळी अगोदरच स्वर्गीय पंखांच्या साहाय्याने उडून गेली.

"माझ्या हृदयात खोल जखम झाली. 'आता जरी बाबाजी मला पुनः भेटले तर मी त्यांच्याशी बोलणारच नाही' मी स्वतःशी म्हणालो. मला असे एकदम टाकून जाण्यात त्यांनी निष्ठुरपणा दाखविला आहे. हा माझा प्रेमाचा राग होता; दुसरे काही नव्हते. काही महिन्यांनंतर मी लाहिरी महाशयांना भेटावयास वाराणशीला गेलो. मी बैठकीच्या खोलीत शिरतो, तोच गुरुजींनी माझे हसून स्वागत केले.

"'ये, युक्तेश्वर ये,' ते म्हणाले. 'ह्या खोलीच्या उंबरठ्यावर तुला बाबाजी आता दिसले का?'

"'का? नाही,' मी आश्चर्याने उत्तर दिले.

"'ये इकडे,' लाहिरी महाशयांनी माझ्या कपाळावर सौम्यसा स्पर्श केला; आणि एकदम, दाराच्याजवळ बाबाजींची आकृती मी पाहिली — अगदी उमललेल्या पूर्ण कमळासारखी.'

"माझ्या हृदयाला झालेली पूर्वीची जखम मला आठवली आणि मी त्यांना नमस्कार केला नाही. लाहिरी महाशय माझ्याकडे आश्चर्याने पाहतच राहिले.

"त्या दिव्य गुरूंनी अथांग नेत्रांनी माझ्याकडे टक लावून पाहिले. 'तुला माझा राग आला काय?'

"'महाराज, का नये येऊ?' मी उत्तर दिले, 'अंतरिक्षातून आपण इंद्रजालमय मंडळींसमवेत आलात आणि परत त्या विरल वातावरणात अदृश्य झालात.'

"'मी तुला भेटेन म्हणून सांगितले होते; पण तेथे किती वेळ राहीन हे काही बोललो नव्हतो.' बाबाजींनी मृदू हास्य केले. 'तुझ्या मनामध्ये खळबळ उडून गेली होती. आता मी तुला

खात्रीने सांगतो, की, तुझ्या ह्या अस्वस्थ मनःस्थितीमुळे झाले काय; तर त्याच्या प्रभावाने आम्ही जवळ-जवळ ईथरमध्ये नाहीसे झालो.'

"ह्या प्रांजळपणे दिलेल्या स्पष्टीकरणाने माझे ताबडतोब समाधान झाले. मी त्यांच्या पायांवर नमस्कार केला. त्या परमगुरूंनी माझ्या खांद्यांवर हात ठेवून मला थोपटले.

"'मुला, तू ध्यान जास्त करीत जा,' ते म्हणाले. 'तुझी दृष्टी अजून निर्दोष झाली नाही — सूर्यप्रकाशाच्या पाठीमागे दडलेल्या मला तू पाहू शकला नाहीस.' एका स्वर्गीय वेणूमधून जसा मधुर ध्वनी निघावा अशा आवाजात वरील शब्द बोलून बाबाजी गूढ अशा तेजोमंडळात अंतर्धान पावले.

"गुरुजींना भेटायला वाराणशीला जाण्याची ही माझी शेवटली खेप," श्रीयुक्तेश्वरांनी आपले भाषण संपविले. कुंभमेळ्याच्या वेळी बाबाजींनी सांगितल्याप्रमाणे लाहिरी महाशयांचा गृहस्थी अवतार संपुष्टात आला होता. १८९५ सालच्या उन्हाळ्यामध्ये त्यांच्या तशा धडधाकट शरीरावर पाठीला एक लहानसे गळू झाले. ते कापून काढायला त्यांनी विरोध दर्शविला. आपल्या काही शिष्यांचे अनिष्ट कर्म बाकी राहिले होते. त्याचे क्षालन ते आपल्या स्वतःच्या शरीरमांसाच्या देहामध्ये यातना सहन करून करीत होते. शेवटी काही शिष्यांनी फारच आग्रह धरून त्यांना विचारले, तेव्हा त्यांनी जरा गूढच उत्तर दिले:

"'शरीराचा मृत्यू व्हावयास काही तरी कारण उपस्थित व्हावे लागते. तुम्हांला काय करायचेय ते करा. माझी काही हरकत नाही.'

"त्यानंतर काही दिवसांनी त्या अप्रतिम गुरूंनी आपला देह वाराणशीस ठेवला. त्यांच्या त्या लहान खोलीमध्ये त्यांना भेटण्याचे मला आता काही कारण उरले नाही. पण दररोज त्यांच्या सर्वव्यापी मार्गदर्शनाने मला माझे जीवन अनुगृहीत झाल्यासारखे वाटे."

लाहिरी महाशयांच्या निर्याणप्रसंगीच्या फार आश्चर्यकारक अशा तपशीलवार गोष्टी त्यांचे एक प्रगत शिष्य स्वामी केशवानंद [6] यांच्या तोंडून मी काही वर्षांनी नंतर ऐकल्या.

केशवानंदांनी मला सांगितले, "गुरुजींनी देहविसर्जन करण्यापूर्वी थोडे दिवस अगोदर, हरद्वारला मी माझ्या आश्रमात बसलो असताना, मला स्थूल स्वरूपात येऊन दर्शन दिले होते.

"'वाराणशीला ताबडतोब निघून ये,' एवढे शब्द बोलून लाहिरी महाशय अंतर्धान पावले.

"मी ताबडतोब वाराणशीच्या गाडीत बसलो. गुरुजींच्या घरी बरेच शिष्य जमलेले आढळले. त्या दिवशी [7] कित्येक तास त्यांचे गीतेवर प्रवचन चालले होते. नंतर ते आम्हांला साध्या शब्दांत सांगू लागले.

"'मी आता घरी जात आहे.'

"आमचे दुःखाचे हुंदके एकदम बाहेर पडले. त्यांचा आवेग आवरेना."

"'घाबरू नका, शांत राहा. मी पुनः येईन,' असे बोलून लाहिरी महाशय आपल्या जागेवरून उठले, तीनदा त्यांनी स्वतःभोवती प्रदक्षिणा घातली, उत्तराभिमुख होऊन पद्मासन घालून बसले आणि अशा वैभवशाली अवस्थेत महासमाधीमध्ये [8] प्रवेश केला."

“आम्हा शिष्यांना प्रिय झालेल्या अशा लाहिरी महाशयांच्या सुंदर शरीराचे, पवित्र गंगानदीच्या तीरावर मणिकर्णिका घाटावर गृहस्थाश्रम-धर्मानुसार दहन झाले.” केशवानंद पुढे सांगू लागले, “दुसऱ्या दिवशी सकाळी, दहा वाजता, वाराणशीतच मी होतो, त्या वेळी, माझ्या खोलीमध्ये एकदम तेजस्वी प्रकाश प्रकट झाला व त्याने ती सारी खोली भरून टाकली. आणि पाहा काय आश्चर्य? लाहिरी महाशयांचा प्रत्यक्ष हाडामांसाचा देह माझ्यापुढे उभा राहिला. त्यांच्या पूर्वीच्या देहासारखाच तो देह होता; फक्त जरा तरुण व अधिक तेजस्वी दिसत होता. दिव्य गुरुदेव माझ्याशी बोलू लागले.

“‘केशवानंद,’ ते म्हणाले, ‘मीच तो आहे. दहन केलेल्या माझ्या शरीराच्या सुट्या पडलेल्या परमाणूंतून मी ही नवीन देहाकृती धारण केली आहे. या भूलोकातील माझे संसाराचे कार्य संपले; पण मी भूलोकाचा सर्वस्वी त्याग केलेला नाही. आता यापुढे मी काही काळ बाबाजींच्या सहवासात हिमालयात व्यतीत करणार आहे. त्यानंतर त्यांच्याशी कारणविश्वात संपर्क साधणार आहे.’

“नंतर मग आशीर्वादाचे थोडे शब्द बोलून ते अप्रतिम गुरुदेव अंतर्धान पावले. एका विस्मयकारी स्फूर्तीने माझे हृदय भरून निघाले. माझ्यामधील चैतन्य उन्नत झाले. ही अवस्था येशू ख्रिस्त व कबीर [9] यांच्या शिष्यांनी अनुभविलेली होती. त्यांनाही आपल्या गुरूचे पार्थिव देहाच्या अन्त्यसंस्कारानंतर असेच प्रत्यक्ष दर्शन झालेले होते.

केशवानंद पुढे सांगू लागले, “नंतर मी जेव्हा हरद्वारला माझ्या एकांतातील अशा आश्रमात परत आलो तेव्हा मी येताना गुरुजींची काही रक्षा आणिली. मला माहीत होते की ते देशकाळपरिस्थितींनी मर्यादित अशा पिंजऱ्यातून मुक्त झाले होते. सर्वव्यापकतेचा पक्षी बाहेर पडला होता. तरी सुद्धा ती रक्षा देव्हाऱ्यात ठेवून माझ्या हृदयाला समाधान मिळत होते.”

गुरुजींच्या पुनरूत्थान पावलेल्या शरीराचे ज्यास दर्शन झाले त्या त्यांच्या दुसऱ्या एका शिष्याचे नाव पंचानन भट्टाचार्य. [10] मी त्यांना त्यांच्या राहत्या घरी कलकत्त्याला भेटलो; त्यांनी गुरुजींच्याबरोबर कित्येक वर्षे घालविली त्यासंबंधीच्या हकीकती त्यांच्या तोंडून ऐकिल्या व त्यामुळे मला फार आनंद झाला. शेवटी त्यांनी त्यांच्या स्वतःच्या आयुष्यातला एक अत्यंत चमत्कारपूर्ण असा प्रसंग सांगितला.

“येथे कलकत्त्यामध्ये,” पंचानन सांगू लागले, “त्यांच्या दहनानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता लाहिरी महाशय आपल्या पूर्वीच्या शरीरामध्ये प्रकट झाले. ते शरीर तेजःपुंज दिसत होते.”

स्वामी प्रणवानंद म्हणजे “दोन देह धारण करणारे महात्मा.” यांनी सुद्धा मला अतींद्रिय अनुभवाच्या हकीकतीची विस्तारपूर्वक माहिती सांगितली. राँची विद्यालयामध्ये ते एकदा आले असता प्रणवानंदांनी मला सांगितले:

“आपला देह विसर्जन करण्यापूर्वी काही दिवस अगोदर मला लाहिरी महाशयांच्याकडून एक पत्र मिळाले. त्या पत्रात त्यांनी मला वाराणशीत ताबडतोब भेटून जाण्याची विनंती केली होती. मला काही अपरिहार्य कारणामुळे निघावयास विलंब लागला व मी ताबडतोब निघू शकलो नाही. जेव्हा वाराणशीस जाण्याच्या तयारीला मी लागलो तेव्हा सकाळी दहा

वाजता मला माझ्या खोलीमध्ये गुरुजींच्या देदीप्यमान शरीराचे दर्शन झाले. आनंदाने मी एकदम भारावून गेलो.

"'आता वाराणशीस जाण्याची काय घाई आहे?' लाहिरी महाशय हसून म्हणाले, 'तेथे तुला आता मी दिसणार नाही.'"

"त्यांच्या शब्दांच्या मथितार्थाचा जेव्हा मला बोध झाला, तेव्हा मी अगदी हृदय पिळवटून रडलो. मला वाटले की, ते जे मला दिसले तो भास असावा."

"गुरुजी माझे समाधान करण्याकरिता जवळ येऊन म्हणाले, 'हे पाहा माझ्या अंगाला स्पर्श कर; पाहा मी नेहमीसारखाच जिवंत आहे की नाही. माझ्याकरिता तू शोक करू नकोस; मी तुझ्याजवळ निरंतर असा नाही काय?'"

ह्या तीन मोठ्या शिष्यांच्या तोंडून एकच अद्भुत सत्य कहाणी समोर आली: लाहिरी महाशयांचा पार्थिव देह दहन केल्यानंतर दुसऱ्या दिवशी बरोबर सकाळी दहा वाजता गुरुजींच्या शरीराचे पुनरूत्थान झाले. त्या वेळी त्यांचे शरीर मूळचेच पण रूपांतरित असे दिसले व ते तीन शिष्यांना, वेगवेगळ्या शहरी दिसले.

"आणि ज्या वेळी देहधर्माने अशुद्ध झालेला हा आत्मा विशुद्ध होऊन जाईल; जे नाशवंत ते अमर होऊन जाईल आणि त्या वेळी ही सूक्तिवचने सार्थ ठरतील, त्या विजयामध्ये मृत्यूस गिळंकृत केले आहे; हे मृत्यो, कुठे आहे तुझा तो पाश? दफनभूमीचा, दहनभूमीचा आता कुठे आहे विजय?" 11

1 श्रीयुक्तेश्वरांना पुढे स्वामीपरंपरेमध्ये विधिपूर्वक दीक्षा बुद्धगयेच्या महंतांनी दिली.

2 शब्दशः "चिरकालिक धर्म." वेदांमधील बोधवचनांना हे नाव दिलेले आहे. सनातन धर्माला हिंदू धर्म असे नाव पडायला कारण म्हणजे शिकंदरच्या ग्रीक सेनेने उत्तरपश्चिम भारतावर आक्रमण केले आणि सिंधूनदीच्या तीरावरील लोकांना इंड्स किंवा हिंदू असे नाव दिले.

3 परमगुरू म्हणजे शब्दार्थाने "पलीकडील गुरू." यात गुरुपरंपरेचा अर्थ अभिप्रेत असतो. बाबाजी हे लाहिरी महाशयांचे गुरू व श्रीयुक्तेश्वरांचे परमगुरू.

वाय.एस.एस./एस.आर.एफ. च्या सर्व अनुयायींच्या आध्यात्मिक कल्याणाची जबाबदारी स्वतःवर घेणाऱ्या भारतीय गुरुजनांच्या परंपरेमध्ये महावतार बाबाजी हे सर्वोच्च परमगुरु आहेत.

4 हे पुस्तक आता योगदा सत्संग सोसायटी ऑफ इण्डिया, यांनी प्रसिद्ध केले आहे.

5 गुरुजनांच्या पुढे काही अर्पण केले नाही तर भारतामध्ये त्यांचा अनादर झाला असे समजतात.

6 केशवानंदांच्या आश्रमाला जी मी भेट दिली त्याचे वर्णन प्रकरण ४२ मध्ये आहे.

7 लाहिरी महाशयांनी २६ सप्टेंबर १८९५ रोजी देहविसर्जन केले. आणखी काही दिवसांनी त्यांचे वय सदुसष्ट झाले असते.

8 योगीजनांना आपल्या देहविसर्जनाचा अंतिम समय केव्हा येत आहे, याचे अगोदर ज्ञान होत असते; व तो देह विसर्जन करण्यापूर्वी काही वैदिक विधींचे ते आचरण करतात. त्या विधीमधलाच, उत्तराभिमुख होऊन, स्वतःभोवती त्रिवार प्रदक्षिणा घालण्याचा एक भाग आहे. महासमाधी म्हणजे मोठी समाधी; शेवटले ध्यान; ज्या ध्यानामध्ये योगीपुरुष आपल्या स्वतःस परमतत्त्वामध्ये, ओंकारामध्ये विलीन करतो.

9 कबीर हे सोळाव्या शतकात मोठे संत होऊन गेले. त्यांचे असंख्य अनुयायी असून त्यांत हिंदू व मुसलमान दोन्ही धर्मांचे लोक आहेत. कबिराच्या मरणानंतर त्यांच्या शिष्यांत कलहप्रसंग निर्माण झाला की, अंत्यविधी कोणत्या धर्मानुसार करावयाचे. त्यामुळे त्या महान भगवद्भक्ताला त्रास झाला व महानिद्रेतून उठून त्याने आपल्या अनुयायांना समजावून सांगितले, "माझे निम्मे अवशेष मुसलमानी धर्मानुसार दफन करा व निम्म्या अवशेषांचे हिंदू धर्मानुसार दहन करा." त्यानंतर गुरू अंतर्धान पावले. ज्या वेळी शिष्यांनी त्यांच्या शरीरावर घातलेली चादर काढून घेतली त्या वेळी त्यांना त्या ठिकाणी सुंदर सुवासिक फुलांचा ढीग

आढळला. मुसलमान अनुयायांनी त्यांच्या आज्ञेप्रमाणे निम्मी फुले उचलून मगहर येथे त्यांचे दफन केले. आजही त्या ठिकाणी तो दर्गा आहे व लोकांमध्ये त्याबद्दल नितांत श्रद्धा आहे. निम्म्या फुलांचे हिंदू पद्धतीप्रमाणे वाराणशीला दहन केले गेले.

कबीर तरुण असताना त्यांच्याकडे दोन शिष्य आले. गूढ अशा परमार्थमार्गावर त्यांना कबिराकडून बौद्धिक मार्गदर्शन हवे होते. गुरूने साध्याशब्दांत त्यांना उत्तर दिले:

पुसे प्रश्न कोणी, गुरो दावि पंथा
जयाचेनि योगे मिळे मुक्ति भक्ता।
जरी पंथ बोलू, तरी दूरतेचा
निघे अर्थ तो सत्य कैचा वदावा।। १।।
असे ईश जो सन्निधी मानवाच्या
कशाला हवा पंथ तो जावयाचा।
हसू ये मला बोल जे येति कानी
समुद्रात मासा तृषाकांत होई।। २।।
(पानी मे मीन पियासी, मोहे सुनसुन आवत हाँसी।
भीतर को प्रभु जान्यो नाही, बाहर खोजन जासी।)

10

11 कॉरिंथिअन्स १५:५४-५५ (बायबल)

"परमेश्वर मेलेल्याला पुन्हा जिवंत करू शकतो यावर तुझा विश्वास का नाही?" —ॲक्ट्स २६:८ (बायबल)

प्रकरण - ३७

# 37. मी अमेरिकेस जातो

'अमेरिका! ही माणसे सगळी नक्की अमेरिकनच आहेत!' माझ्या अंतश्चक्षूपुढून पाश्चिमात्य लोकांच्या चेहऱ्यांची एक मालिका सरकून गेली तेव्हा माझ्या मनामध्ये हा विचार आला.

रांची विद्यालयाच्या कोठीमध्ये [1] काही जुनी लाकडाची खोकी पडली होती; त्यांवर धूळ साचलेली होती. त्या ढिगाऱ्याच्या पाठीमागे मी ध्यानस्थ बसलो होतो. त्या लहान मुलांमध्ये माझा सारा वेळ जात असे. एक निवांतसे स्थळ ध्यानाकरिता मला सापडणे दुरापास्त होते!

ती दृश्ये चलच्चित्रपटासारखी चालू राहिली. माणसांचा [2] मोठा समुदाय माझ्याकडे निरखून पाहात होता. जाणिवेच्या व्यासपीठावर तो एका बाजूने दुसऱ्या बाजूकडे नाटकातील पात्रांसारखा पुढे पुढे सरकत होता.

इतक्यात कोठीचे दार उघडले. नेहमीप्रमाणे एका छोट्या मुलाने माझी लपून राहण्याची जागा शोधून काढिली.

"ये विमल, ये," आनंदाने मी त्याला मोठ्याने हाक मारली. "तुला एक बातमी सांगायची आहे: परमेश्वर मला अमेरिकेला बोलावीत आहे!"

"अमेरिकेला!" त्या मुलाने माझ्या आवाजाची अशा सुरात नक्कल केली की, मी जणू "चंद्रलोकावरच" जात आहे.

"होय! कोलंबसाप्रमाणे मी अमेरिकेचा शोध करायला निघणार आहे. कोलंबसाला वाटले की, आपण हिंदुस्थान शोधून काढले. अगदी निश्चितपणे ह्या दोन उपखंडांमध्ये कर्मबंधनांची एक जोडणारी साखळी आहे!"

विमलने पळ काढला. लगोलग ह्या दोन पायांच्या वर्तमानपत्राने साऱ्या शाळेभर ही बातमी पसरवून टाकली.

गोंधळून गेलेल्या शिक्षक मंडळींना मी तातडीने बोलाविले व शाळेची व्यवस्था त्यांच्यावर सोपविली.

मी त्यांना म्हणालो, "मला खात्री आहे की, लाहिरी महाशयांचे शिक्षणविषयक योगिक ध्येय आपण सतत डोळ्यांपुढे ठेवाल. मी तुम्हांला वरचेवर लिहीत जाईन. परमेश्वराची इच्छा असेल तर मी भारतात पुनः परत येईन."

मी त्या लहान मुलांच्यावरून नजर फिरविली. सूर्यप्रकाशाच्या सोनेरी कोवळ्या उन्हामध्ये चमकणारी ती रांचीच्या आश्रमाची भूमी जाण्यापूर्वी न्याहाळिली तसेच माझे डोळे भरुन आले. माझ्या आयुष्यातील एक निश्चित असा कालखंड संपला होता. मला माहीत होते की, मी आता दूरदेशी जाणार आहे. ध्यानातले दृश्य माझ्यासमोरून गेल्यावर काही वेळाने मी कलकत्त्याला जाणाऱ्या गाडीत बसलो. दुसऱ्याच दिवशी अमेरिकेस भरणाऱ्या 'इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ रेलिजस लिबरल्स इन अमेरिका' ह्या अधिवेशनाला भारतातील प्रतिनिधी

म्हणून मला निमंत्रण मिळाले. हे अधिवेशन ह्या वर्षी अमेरिकन युनिटेरीअन ॲसोसिएशनच्या विद्यमाने बोस्टनला भरणार होते.

माझ्या डोक्यात विचारांचा गोंधळ झाला. मी सेरामपूरला श्रीयुक्तेश्वरांकडे धाव घेतली.

"गुरुजी, अमेरिकेत एका धर्मविषयक परिषदेमध्ये भाषण करण्याकरिता मला आमंत्रण आले आहे. काय मला गेले पाहिजे?"

"सर्व दरवाजे तुला उघडे आहेत," गुरुजींनी साध्या शब्दांत उत्तर दिले, "जायचे तर आताच जा, नाही तर पुनः अशी संधी येणार नाही."

"पण गुरुजी," मी घाबरत म्हणालो, "मला सभेमध्ये भाषण कधी करता येते? मी कधी काळी एखादे व्याख्यान दिले असेल; आणि इंग्लिशमध्ये तर कधीच नाही."

"इंग्लिशमध्ये किंवा इंग्लिशशिवाय, योगावरचे तुझे भाषण पाश्चिमात्य लोक ऐकून घेतील."

मला हसू आले. "पण प्रिय गुरुजी, मला नाही वाटत की, अमेरिकन लोक बंगाली भाषा शिकतील! इंग्रजी भाषेमधील [3] हे अडसर बाजूला सारून पुढे जाण्याकरिता आपण मला आशीर्वाद द्या."



*परमहंस योगानंद स्मृती-मंदिर*

*यो.स.सो.च्या रांची येथील स्मृती-मंदिराची, पूर्वीच्या भांडाराच्या जागी स्थापना केली गेली आहे, जिथे परमहंसजींना जगभरात योगाच्या शिकवणुकींच्या प्रसारासाठी त्यांना पश्चिमेकडे पुकारत असलेला भविष्यसुचक दृष्टांत झाला. त्या ऐतिहासिक घटनेच्या पंच्चाहत्तराव्या स्मृतीदिनानिमित्त हस्त-कोरीव काम केलेल्या शुभ्र-संगमरवराचे हे मंदिर 1995 मध्ये अर्पण केले गेले.*

मी जेव्हा वडिलांना ह्या माझ्या बेताची बातमी सांगितली, तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यांना अमेरिका फार दूरशी वाटली. मी त्यांना पुनः कधी भेटणार नाही अशी त्यांना

भीती वाटली.

"तू कसा जाणार?" ते जरा कडकपणे म्हणाले, "कोण तुझा खर्च करणार?" त्यांनी आपुलकीने आजपर्यंतचा माझ्या शिक्षणाचा व माझ्या साऱ्या आयुष्याचा खर्च सोसला होता. तेव्हा साहजिकच त्यांना असे वाटले की, पैशाच्या अभावी माझ्या ह्या बेताचा डोलारा सारा कोलमडून पडणार.

"परमेश्वर मला खात्रीने पैशाची मदत करील," असे जेव्हा मी उत्तर दिले, तेव्हा असेच उत्तर मी कित्येक वर्षांपूर्वी अन्य प्रसंगी माझा भाऊ अनंता आग्ऱ्यास असताना दिले होते, त्याची आठवण झाली. अधिक चलाखी न दाखविता, मी पुढे म्हणालो, "बाबा, कदाचित परमेश्वर तुमच्या मनामध्ये मला मदत करण्याची प्रेरणा उत्पन्न करील."

"नाही, कदापि नाही!" त्यांनी माझ्याकडे दयार्द्र बुद्धीने दृष्टिक्षेप केला."

त्यामुळे दुसरे दिवशी जेव्हा वडिलांनी एका मोठ्या रकमेचा चेक माझ्या स्वाधीन केला तेव्हा मला जरा आश्चर्य वाटले.

ते म्हणाले, "हे जे मी तुला पैसे देत आहे ते वडील या नात्याने नसून लाहिरी महाशयांचा एक श्रद्धावान शिष्य म्हणून देत आहे. तू त्या पाश्चिमात्य जगात जा आणि तेथे क्रियायोगाच्या पंथनिरपेक्ष अशा योगसाधनेचा प्रसार कर."

ज्या निःस्वार्थ बुद्धीने वडिलांनी माझ्याबद्दलची वैयक्तिक आकांक्षा इतक्या जलद बाजूला सारली त्याने माझे हृदय हेलावून निघाले. आदल्या रात्रीच त्यांना जाणीव झाली की, कोणत्याही सर्वसामान्य इच्छेने मी ह्या परदेशगमनास प्रेरित झालेलो नाही.

"कदाचित ह्या जन्मी आता आपण एकमेकांना भेटणार सुद्धा नाही," वडील उदासीनतेने म्हणाले. त्यांचे वय आता सदुसष्ट वर्षांचे झाले होते.

मला एका अंतःस्फूर्तीने असे उत्तर द्यायला लावले, "परमेश्वर निश्चित आपली पुनः एकदा भेट घडवून आणील."

आणि जसा मी अमेरिकेसारख्या अनोळखी प्रदेशात जाण्याकरिता माझ्या गुरुजींचा व माझ्या मातृभूमीचा निरोप घेण्याच्या तयारीला लागलो, तसतशी मला धास्ती वाटू लागली. पाश्चिमात्य जगाच्या जडवादी व भोगवादी जीवनाबद्दल मी पुष्कळ ऐकले होते. आणि हे जीवन शतकानुशतके संतमहात्म्यांच्या तेजोवलयामध्ये व्यतीत होत असलेल्या भारतीय जीवनापेक्षा भिन्न होते.

मी विचार करू लागलो—'ह्या पश्चिमेतील वातावरणाशी टक्कर देण्याकरिता एका पौर्वात्य शिक्षकाने हिमालयातील थंडीच्यापेक्षा जास्त कठीण अडचणींशी मुकाबला करण्याकरिता कंबर कसली पाहिजे!'

एके दिवशी सकाळी मी प्रार्थनेला बसलो आणि मनाशी दृढनिश्चय असा केला की, मेलो तरी हरकत नाही पण परमेश्वराचा आवाज ऐकू येईतोपर्यंत मी प्रार्थनेतून, ध्यानातून उठणारच नाही. पाश्चात्त्यांच्या उपयोगितावादाच्या धुक्यामध्ये मी नाहीसा होऊन जाऊ नये म्हणून मला परमेश्वराचे आशीर्वाद व आश्वासन पाहिजे होते. अमेरिकेला जावयास माझ्या मनाची आता तयारी झाली होती; पण दिव्य अशा अनुज्ञेचा दिलासा मला मिळावा अशी माझी अधिक तीव्र व उत्कट इच्छा होती.

मी सारखा प्रार्थना करीत राहिलो; मधूनमधून हुंदके येऊ लागले. पण काही उत्तर येईना. दुपारी अगदी कळस झाला. माझ्या यातनांच्या भाराखाली माझे डोके भ्रमण करू लागले. मला वाटले, जर मी आणखीन आक्रोश केला, आणि माझ्या अंतर्भावनेची खोली वाढविली तर माझा मेंदू फुटून जाईल.

आणि त्याच क्षणी आमच्या गरपाररोड वरील घराच्या दारावर एक थाप ऐकू आली. मी दार उघडले. आणि काय आश्चर्य! माझ्या दृष्टीसमोर संन्याशाच्या अल्पशा वेषात एक तरुण आला. त्याने घरात प्रवेश केला.

'हे बाबाजीच असावेत!' माझ्या मनात विचार आला. मी दिपून गेलो. कारण त्या तरुणाचा चेहरा लाहिरी महाशयांच्या तरुणपणाचा होता. माझ्या विचाराला त्यांनी उत्तर दिले, "होय. मी बाबाजीच आहे." ते हिंदीमध्ये मंजुळपणे बोलू लागले. "आपल्या स्वर्गस्थ पित्याने तुझी प्रार्थना ऐकिली आहे. त्यांनी मला तुला सांगण्याविषयी आज्ञा केली आहे. आपल्या गुरूंच्या आज्ञेप्रमाणे अमेरिकेस जा. भिऊ नको. तुझी सगळी काळजी घेतली जाईल."

थोडा वेळ थांबल्यानंतर बाबाजी मला पुनः सांगू लागले, "पाश्चिमात्य जगाला क्रियायोगाचा संदेश देण्यास व त्या साधनेचा तिकडे प्रसार करण्याकरिता मी तुझी निवड केली आहे. पुष्कळ वर्षांपूर्वी मला तुझे गुरू युक्तेश्वर कुंभमेळ्यात भेटले होते. मी त्यांना त्या वेळी सांगितले होते की, तुला त्यांच्याकडे शिक्षणाकरिता पाठवीन."

त्यांना पाहिल्याबरोबर मी भक्तिभावातिरेकाने निःशब्द झालो. श्रीयुक्तेश्वरांच्याकडे मला पाठविण्यात त्यांनीच मार्गदर्शन केले, हे त्यांच्याच तोंडून ऐकल्यावर माझे मन हेलावून गेले. त्या अमर गुरुदेवांच्यापुढे मी साष्टांग लोटांगण घातले. त्यांनी अनुग्रहपूर्वक मला उचलून धरले. माझ्या स्वतःच्या आयुष्याबद्दल त्यांनी मला पुष्कळ गोष्टी सांगितल्या. काही वैयक्तिक उपदेशही केला; काही गुप्त भाकितेही उच्चारिली. शेवटी गांभीर्यपूर्वक ते म्हणाले, "ईश्वरी साक्षात्कार करवून घेण्याची ही क्रियायोगाची शास्त्रीय तांत्रिक साधना सर्व देशांत माहीत होईल आणि त्यायोगे मनुष्यास परमपित्याचे, प्रत्यक्ष वरच्या स्तरावर जाऊन, दर्शन घडून येईल; आणि तसे घडून आले म्हणजे राष्ट्राराष्ट्रांतील संबंध प्रेमाचे होतील."

एखाद्या राजबिंड्या पुरुषाने केवळ दृष्टिकटाक्षाने जसे भारावून टाकावे तद्वत गुरुजींनी आपल्या विश्वव्यापी चैतन्यबुद्धीच्या कृपाकटाक्षाने मला विद्युत-प्रवाहासारखे भारावून टाकले.

"दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।
यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः" ।। [4]

सहस्र सूर्य आकाशी द्युतिमान जाहले जरी ।
महात्म्याच्या प्रकाशाची करू ते ना बरोबरी ।।

नंतर थोड्याच वेळाने बाबाजी दरवाज्याकडे जाण्यास निघाले, आणि म्हणाले, "माझ्या पाठीमागे येऊ नकोस. तुला तसे करता यावयाचे नाही."

"बाबाजी, कृपा करून जाऊ नका," मी सारखा आक्रोश करीत राहिलो, "मला आपल्याबरोबर घेऊन जा."

त्यांनी उत्तर दिले, "आताच नाही, पुढे केव्हा तरी."

भावनेच्या उद्रेकाने मी त्यांची ताकीद जुमानली नाही. जेव्हा मी त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा मला असे आढळून आले की, माझे पाय जणू जमिनीला चिकटूनच राहिले आहेत. दरवाजातून त्यांनी माझ्याकडे प्रेमळपणाने एक दृष्टिक्षेप केला. आशीर्वाद देताना त्यांनी हात वरती उचलला व नंतर ते पुढे चालू लागले; तेव्हा माझे डोळे त्यांच्यावर आधाशीपणे खिळून राहिले.


काही थोड्या मिनिटांनी माझे पाय मोकळे झाले. मी खाली बसलो आणि ध्यानात मग्न झालो. परमेश्वराने माझी नुसती प्रार्थनाच ऐकिली नाही, तर त्याने मला बाबाजींची भेट घडवून देण्याचे सद्भाग्य दिले, याबद्दल मी परमेश्वराचे सारखे आभार मानीत होतो. त्या पुरातन व चिरतरुण अशा गुरुदेवांच्या स्पर्शामुळे माझे शरीर पुनीत झाले होते. त्यांचे दर्शन घडून यावे, अशी तीव्र इच्छा मी किती एक वर्षे उराशी बाळगून होतो.

बाबाजींशी ही जी माझी भेट झाली, तिची हकीकत मी आजपर्यंत कधी कुणाला सांगितली नाही. मनुष्याला मिळणाऱ्या अनुभवांमध्ये हा अत्यंत पवित्र अनुभव असल्याने तो मी माझ्या हृदयात दडवून ठेवला होता. पण माझ्या मनात असा विचार आला की, ह्या आत्मचरित्राच्या वाचकांचा, एकांतवासात राहत असलेल्या पण जगाच्या कल्याणाबाबत आस्था बाळगणाऱ्या बाबाजींबद्दल त्यांच्या अस्तित्वाबद्दल, मी त्यांना प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे, असे सांगितले तर अधिक विश्वास बसेल. प्रस्तुत पुस्तकासाठी आधुनिक भारताच्या ह्या ख्रिस्तसदृश योग्याचे एक खरेखुरे चित्र काढण्याच्या कामी मी एका चित्रकाराला बरीच मदत केली आहे.

अमेरिकेस जाण्याच्या आदल्या दिवशी संध्याकाळी मी श्रीयुक्तेश्वरांच्या पवित्र दर्शनाला गेलो. "तू हिंदू लोकांत जन्माला आला आहेस हे विसरून जा आणि अमेरिकन लोकांचे सर्व काही उचलू नकोस. दोन्ही समाजांतील जे उत्तम आहे ते घे," ते अगदी शांतपणे उपदेशाचे शब्द बोलले. "तू ईश्वराची संतान आहेस हे समजून स्वतःशी एकनिष्ठ राहा. पृथ्वीवरती पसरलेले जे निरनिराळे मानववंश आहेत त्या तुझ्या बंधूंचे सद्गुण तू शोधून काढून आत्मसात कर."

नंतर त्यांनी मला आशीर्वाद दिला. "जे कोणी तुझ्याकडे परमेश्वर शोधण्याकरिता निष्ठेने येतील त्या सर्वांना तुझ्याकडून मदत होईल. तू त्यांच्याकडे जसा पाहशील, तसा तुझ्या डोळ्यांमधील एक आध्यात्मिक प्रवाह निघून त्यांच्या मेंदूपर्यंत जाऊन पोचेल आणि त्यांच्या भोगवादी सवयींमध्ये फरक पडून त्यांची परमार्थाकडे वृत्ती होईल!" नंतर हसून ते पुढे म्हणाले, "जे आत्मे कळकळीचे आहेत त्यांना आपल्याकडे ओढून घेण्याचे तुझे खरोखरीच भाग्य आहे. तू जेथे जेथे जाशील, अगदी वैराण मुलखात जरी गेलास तरी तेथे सुद्धा तुला मित्र मिळतील."

श्रीयुक्तेश्वरांचे दोन्ही आशीर्वाद फलद्रूप झाले. मी जेव्हा अमेरिकेत एकटा आलो, तेव्हा मला एकही मित्र नव्हता. पण तेथे मला आत्म्याचा अमर संदेश ग्रहण करण्याकरिता हजारो लोक उत्सुक दिसले.



*परमहंस योगानंद*
*1920 मध्ये कोलकाता येथे घेतलेला पासपोर्ट फोटो*

मी १९२० ऑगस्टमध्ये हिंदुस्थान सोडले. आम्हांला नेणारी प्रवासी बोट 'दि सिटी ऑफ स्पार्टा' ही पहिले महायुद्ध संपल्यानंतर अमेरिकेस जाणारी पहिलीच बोट होती. पासपोर्ट मिळविण्याच्या बाबतीत लाल फितीच्या कारभारामुळे पुष्कळ अडचणी आल्या; पण थोड्याफार चमत्कृतीपूर्ण घटनांनी त्या अडचणी दूर झाल्या आणि मला माझा प्रवासपरवाना मिळविता आला.

आमचा प्रवास दोन महिने चालला. बोटीवर एका सहप्रवाशाने, मी बोस्टन काँग्रेसला भारतीय प्रतिनिधी म्हणून जात आहे, हे ओळखले.

"स्वामी योगानंद," तो म्हणाला. आणि हे शब्द बोलताना त्याने जे काही वेडेवाकडे उच्चार केले, त्या उच्चारांचा मला पुढे अमेरिकेत लोकांकडून माझ्या नावाचा उच्चार करताना परिचय होणार होता. "पुढल्या गुरुवारी रात्री आम्हा प्रवाशांच्याकरिता एक प्रवचन द्या. जीवनसंग्राम व त्याच्याशी सामना कसा करावा, या विषयावर आपण बोला. आम्हां सर्वांना त्या प्रवचनापासून लाभ होईल."

काय दुर्दैव! मला स्वतःलाच जीवनाशी संग्राम करावयाचा होता. बुधवारीच मला त्याची जाणीव झाली. माझे विचार प्रवचन-स्वरूपात इंग्रजी भाषेमध्ये उतरविण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला. शेवटी ही सारी तयारी मी टाकून दिली. माझी स्थिती रिकिबीकडे पाहणाऱ्या एका जंगली अडाणतट्टूसारखी झाली. इंग्रजी व्याकरणाचे नियमच मुळी माझ्या गळी उतरेनात. शेवटी गुरुजींनी मागे दिलेल्या आश्वासनावर मी सारी भिस्त ठेवली; आणि गुरुवारी बोटीवरच्या सभागृहामध्ये श्रोत्यांच्या पुढे प्रवचन देण्यास मी उभा राहिलो. माझी ही मनाची घाबरलेली स्थिती सुमारे दहा मिनिटे चालू होती. श्रोत्यांनी माझी झालेली तारांबळ ओळखली आणि ते हसू लागले.

पण माझ्या दृष्टीने परिस्थिती भयानक होती. संतापून मी शेवटी गुरुजींची मूक प्रार्थना करावयास लागलो.

"तू बोलू शकतोस! बोलावयास लाग!" ताबडतोब त्यांचा आवाज माझ्या जाणिवेमध्ये निनादला.

आणि नंतर माझे विचार इंग्रजी भाषेमध्ये मित्रत्वाच्या नात्याने उतरू लागले. पुढे पंचेचाळीस मिनिटे माझे भाषण चालले. श्रोते अजून लक्षपूर्वक माझे भाषण ऐकत होते. ह्या भाषणामुळे मला नंतर अमेरिकेमधील वेगवेगळ्या संस्थांपुढे भाषणाची कितीएक निमंत्रणे त्याचवेळी मिळाली.


पण मी त्या वेळी जे काही बोललो त्याचा एकही शब्द पुढे मला कधी आठवला नाही. सहप्रवाशांपैकी पुष्कळांना मी मुद्दाम विचारले. ते म्हणाले, "तुमचे भाषण फार स्फूर्तिदायक झाले. त्यामधील इंग्रजी अगदी बिनचूक व जोरदार होते." ही आनंददायक हकीकत जेव्हा मला कळली तेव्हा विनम्रपणे मी गुरुजींचे, त्यांनी ही जी अगदी आयत्या वेळी योग्य मदत केली त्याबद्दल आभार मानले. ह्या प्रसंगाने मला हेही कळून चुकले की, गुरुजी हे सदैव माझ्याबरोबर आहेत आणि काळ व स्थळ यांच्या परोक्षत्वाच्या शृंखला ते बाजूला काढून ठेवतात.

पुढे समुद्रावरील आमचा बाकीचा प्रवास चालू असताना एक वेळ बोस्टन काँग्रेसमध्ये माझ्या इंग्रजी भाषणाच्या दिव्याचा कसा फजितवडा होईल या भीतीच्या वेदना मी अनुभविल्या.

"परमेश्वरा," मी कळवळून प्रार्थना केली, "तूच मला स्फूर्ती व प्रेरणा दे. तूच एकमेव असा माझा आधार आहेस."

‘दि सिटी ऑफ स्पार्टा’ बोट सप्टेंबरच्या अखेरीस बोस्टनजवळ धक्क्याला लागली. ६ ऑक्टोबर १९२० रोजी मी काँग्रेसच्यापुढे भाषण केले. ते माझे अमेरिकेतील पहिले भाषण होय. ते भाषण लोकांना फार आवडले. मी सुटकेचा निःश्वास टाकला. अमेरिकन युनिटेरियन ॲसोसिएशनच्या दिलदार चिटणिसांनी काँग्रेसच्या सभेच्या प्रसिद्ध केलेल्या [5] अहवालामध्ये खालीलप्रमाणे मजकूर लिहिला होता:

“रांचीच्या ब्रह्मचर्य आश्रमाचे प्रतिनिधी, स्वामी योगानंद यांनी आपल्या संस्थेची काँग्रेसला सदिच्छा आणली होती. अस्खलित इंग्लिशमध्ये आणि दमदार वक्तृत्व करून त्यांनी Science of Religion (धर्माचे शास्त्र) अशा तत्त्वज्ञानाच्या विषयावर सुंदर भाषण केले. त्यांचे हे भाषण व्यापक प्रसार होण्याच्या दृष्टीने एका लहानशा पुस्तकाच्या स्वरूपात छापून प्रसिद्ध केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे धर्म हा विश्वव्यापी स्वरूपाचा असून सगळ्यांचा एकच आहे. काही विशिष्ट चालीरीती आणि संकेत आपण जगातील सर्व समाजांना लावू शकत नाही. पण धर्मामधील सामान्य तत्त्व जे आहे ते सर्व जगाला लागू करता येईल आणि त्याप्रमाणे सर्वांनी आचरण करावे व त्या तत्त्वाचे पालन करावे, असा आपण आग्रह धरू शकू.”



*अमेरिकेतील बॉस्टन येथे ऑक्टोबर 1920 मध्ये भरलेल्या इंटरनॅशनल कांग्रेस ऑफ रिलिजियस लिबरल्सच्या काही प्रतिनिधिंसमवेत परमहंस योगानंद. येथे योगानंदांनी आपले अमेरिकेतील लोकसभेतील पहिले भाषण दिले.*

वडिलांनी उदारपणे चेक दिलेला असल्यामुळे काँग्रेसचे अधिवेशन संपल्यावरही मी अमेरिकेत राहू शकलो. बोस्टनमध्ये अगदी साधारण स्थितीत तीन वर्षे सुखात गेली. मी

जाहीर भाषणे केली; वर्ग चालविले आणि ‘साँग्स ऑफ दि सोल’ (आत्म्याचे गुंजन) नावाचे एक गीतांचे पुस्तक लिहिले. त्याला प्रस्तावना सिटी ऑफ न्यूयॉर्क कॉलेजचे प्रेसिडेंट डॉ. फ्रेडरिक बी. रॉबिनसन यांनी लिहिली होती.

१९२४ मध्ये सर्व खंडभर मी एक मोठा दौरा काढला. प्रत्येक मोठ्या शहरामध्ये हजारो लोकांच्यापुढे मी व्याख्याने दिली. सिॲटलमध्ये पोचल्यावर सुट्टी म्हणून उत्तरेकडील सुंदर अशा अलास्काच्या भूप्रदेशात काही काळ घालविण्याचे मी ठरविले.

१९२५ सालच्या अखेरीस उदारहृदयी विद्यार्थ्यांच्या मदतीने कैलिफोर्निआमध्ये लॉस एंजेलिस या ठिकाणी मौंट वॉशिंग्टन इस्टेटमध्ये एक अमेरिकन केंद्र स्थापन केले. ही जी इमारत बांधली ती मला कित्येक वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये असताना मनश्चक्षूंपुढे दिसली होती. दूर अमेरिका खंडामध्ये मी जे हे कार्य सुरू केले, त्याचे फोटो मी श्रीयुक्तेश्वरांच्याकडे त्वरेने पाठविले. त्यांनी त्याचे मला पोस्टकार्डामध्ये बंगालीत उत्तर पाठविले; त्याचा अनुवाद खाली देत आहे:

११ ऑगस्ट, १९२६.

माझ्या हृदयात राहणाऱ्या योगानंदा!

तुझ्या शाळेचे व विद्यार्थ्यांचे फोटो पाहिल्यावर माझ्या जीवनात जो आनंद झाला तो मला शब्दांत वर्णन करून सांगता येत नाही. निरनिराळ्या शहरामध्ये हे जे तुझे विद्यार्थी योगसाधना करीत आहेत त्यांना पाहून मी आनंदाने द्रवत आहे.

भावपर भजने म्हणजे, आरोग्यप्रदायी स्पंदने निर्माण करणे, व रोगनिवारण करण्यासाठी परमेश्वराची सहेतुक प्रार्थना करणे याविषयीच्या तुझ्या पद्धतींबद्दल वाचले. ते वाचून अंतःकरणापासून तुझे आभार मानल्याखेरीज राहवत नाही.

मौंट वॉशिंग्टनखाली पसरलेली रम्य वनश्री; खालून वरती आश्रमापर्यंत येणारा नागमोडी वळणाचा टेकडीवरूनचा रस्ता; आश्रमाचे प्रवेशद्वार हे सर्व फोटोतून पाहिल्यावर ते सर्व प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहावयाची इच्छा अनिवार होते.

इकडील सर्व व्यवस्थित चालले आहे. परमेश्वरकृपेने तू सर्वदा आनंदात असावेस.

श्रीयुक्तेश्वर गिरी

अशीच अनेक वर्षे गेली. ह्या नवीन भूप्रदेशाच्या प्रत्येक भागात मी व्याख्याने दिली. शेकडो संघ, कॉलेजे, चर्च आणि प्रत्येक नामाभिधान धारण करणारे जनसमूह यांच्यासमोर प्रवचने दिली. १९२० ते १९३० या दरम्यानच्या दहा वर्षांमध्ये हजारो अमेरिकनांनी माझ्या योगाच्या वर्गास हजर राहून आस्था दर्शविली. त्या सर्वांना अर्पण करण्याकरिता म्हणून मी १९२९ मध्ये प्रार्थनांचे आणि आत्म्याच्या विचारांचे एक नवीन पुस्तक प्रसिद्ध केले. त्याचे नाव ‘व्हिस्पर्स फ्रॉम इटर्निटी’ (अनंतत्वाचे कानोसे). त्याला प्रस्तावना सुप्रसिद्ध गायिका मॅडम एमेलिटा गॅली-कर्ची यांनी लिहिली होती.

कधी कधी (साधारणपणे महिन्याच्या पहिल्या तारखेला सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप संस्थेचे मुख्य केंद्र जे मौंट वॉशिंग्टनचे केंद्र हे चालविण्याकरिता होणाऱ्या खर्चाच्या बिलांची भेंडोळी जसजशी येत होती) तसतशी मला भारतातील शांततापूर्ण जीवनाची आठवण होऊ लागली. परंतु प्रत्येक दिवशी पाश्चिमात्य व पौर्वात्य यांमध्ये एकमेकांना समजून घेण्याची प्रवृत्ती जसजशी वाढू लागली, तसतसा मला आनंद होऊ लागला.

“ह्या देशाचे जनक” असे जे जॉर्ज वॉशिंग्टन यांना पुष्कळ प्रसंगी आपणास परमेश्वराकडून मार्गदर्शन होत आहे असे वाटत असे. आणि असे त्यांनी बोलूनही दाखविले

होते. त्यांनी "फेयरवेल एड्रेस" ह्या भाषणात अमेरिकेस आत्मिक प्रेरणाविषयक जो संदेश दिला त्यातील काही भाग असा:

"आणि ते राष्ट्र स्वतंत्र, प्रबुद्ध व थोड्याच काळात महान राष्ट्र होईल. आणि अशा त्या महान राष्ट्राला साजेसे असे त्याच्याकडून कार्यही होईल. एक प्रकारची उच्चतम न्यायबुद्धी व उदारबुद्धी यांच्या प्रेरणेने राष्ट्र किती विशाल व अभिनव प्रकारचे होऊ शकते याचे एक उत्तम उदाहरण मानवजातीपुढे ठेवले जाईल. या तत्त्वांशी एकनिष्ठ राहिल्यामुळे काही क्षणिक स्वरूपाचे फायदे गमवावे लागतील, हे खरे; पण अशा योजनेमुळे ते नुकसान लवकरच अनेक पटींनी भरून निघेल यात संशय नाही. ईश्वर अशा एका राष्ट्राला त्याच्या उत्तम गुणांबद्दल शाश्वत सुख मिळवून देणार नाही काय?"

### ***वॉल्ट व्हिटमनचे "अमेरिकेचे यशोगान." (हिम् टू अमेरिका)***

*("दाउ मदर विथ दाय ईक्वल ब्रूड"मधून)*


"भविष्यात तुझ्या स्वरूपात मोठ्या,
   दिसे मन्मना भाग्य मोठे उदेले।
जिथे मानवे सुज्ञ नारी नरे ही,
   विकासे जिथे पूर्णता सर्व ठायी।। १।।

मनी प्रीति अध्यात्ममार्गी जनांच्या,
   ठरे नीति चित्ती, कृती सत्प्रवृत्ती
दिसे नीति संपत् दिसे सभ्यता ही,
   विना संगती जीचिया पार्श्वभागी।। २।।

फुकाची ठरे संस्कृती भोगवादी,
   जिच्या वैभवाचा जना गर्व भारी।
तुझ्या सर्व समृद्ध सर्वांगव्यापी,
   प्रथा पूजनी ह्या विधात्या प्रभूच्या।। ३।।

नसे फक्त तो ग्रंथ की बैबलाचा,
   जना तारतो जो भवाब्धीमधूनी।
तुला तारणारे किती एक होती
   तुझ्या खुद्द रूपी विराजू पहाती।। ४।।

जया शक्ति उद्धारणी त्या प्रभूची
   दिसे सर्व काही मला त्वत्स्वरूपी।
फुकाचे नव्हे बोल माझे असे हे
   वदे आजि मी जे पुढे व्हावयाचे।। ५।।



*श्री योगानंद, त्यांच्या संपूर्ण अमेरिका खंडातील भाषणाच्या दौरयावर असतांना अलास्काच्या दिशेने चाललेल्या त्यांच्या बोटीवरील केबिनमध्ये, सन 1924.*



*व्यासपीठावर श्री योगानंद, डेनवरमध्ये योग वर्ग घेतांना, कोलोरॅडो, यू.एस.ए., 1924*




*कॅलिफोर्निआतील लॉस एँजेलिस येथील फिलहार्मोनिक ऑडिटोरियम मध्ये श्री श्री परमहंस योगानंद भाषण करीत असताना, 1925.*



*आपल्या थोर-हृदय शिष्यांच्या मदतीने योगानंदांनी 1925 मध्ये माऊंट वॉशिंग्टन एस्टेट्स विकत घेतली. व्यवहार पूर्ण व्हायच्या आधीच त्यांनी आपली पहिली सभा - ईस्टर सूर्योदय प्रार्थना आयोजित केली, त्या इमारतीच्या भूमीवर जी लवकरच त्यांच्या संस्थेचे जागतिक मुख्यालय बनायचे होते.*




*परमहंस योगानंद, माऊंट व्हरनॉन, व्हर्जिनिया येथील जॉर्ज वॉशिंगटनच्या शव-कक्षापाशी फुलांचा गुच्छ ठेवत आहेत, फेब्रुवारी 22, 1927*



*परमहंस योगानंद व्हाईट हाऊसमध्ये*

*परमहंस योगानंद आणि श्री जॉन बालफोर, राष्ट्राध्यक्ष कॅल्विन कुलीजच्या (खिडकीतून बाहेर पाहात आहेत) भेटीनंतर व्हाईट हाऊसमधून बाहेर पडताना.*

*वॉशिंगटन हेराल्ड ने जानेवारी 25, 1927 ला छापले होतेः "स्वामी योगानंद यांचे....श्री कूलिज यांनी स्पष्ट आनंदात स्वागत केले आणि त्यांना म्हणाले की ते त्यांच्याबदल खुपकाही वाचून आहेत. भारताच्या इतिहास हा पहिलाच प्रसंग आहे की जेव्हा एका स्वामींचे राष्ट्राध्यक्षांकडून अधिकृतरित्या स्वागत केले गेले."*



*योगानंदांनी 1929 मध्ये मेक्सिको शहरास भेट दिली तेव्हा मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष माननीय ऐमिलिओ पॉर्तेस गिल त्यांचे यजमान होते.*



*मैक्सिको येथील सोचीमिल्को सरोवरात एका नावेवर श्री योगानंद ध्यान करीत आहेत, सन 1929*

1 १९९५ मध्ये ज्या ठिकाणी परमहंसजींना हा दृष्टांत झाला त्या रांची येथील पूर्वीच्या कोठीच्या जागेवर एक सुंदर स्मृती मंदीर संस्थेने लोकार्पित केले. (प्रकाशकांची टीप)

2 ह्यांपैकी बरेचसे चेहरे पुढे मला अमेरिकेत आढळून आले आणि ते मी ताबडतोब ओळखले.

3 श्रीयुक्तेश्वर आणि मी साधारणपणे बंगालीमध्ये बोलत असू.

4 भगवद्गीता अध्याय ११, श्लोक १२.

5 न्यू पिलग्रिमेजेस ऑफ दि स्पिरिट (बोस्टन: बीकन प्रेस, १९२१).

प्रकरण - ३८

# 38. ल्यूथर बरबँक—गुलाबबागेतील संत

“वनस्पतीमध्ये चांगली सुधारलेली कलमे करण्याचे, हे त्यांमधील शास्त्रीय ज्ञान वगळल्यास, एक गुपित आहे; आणि ते म्हणजे प्रेम.” कॅलिफोर्नियामधील सांतारोझा या ठिकाणी ल्यूथर बरबँक यांची बाग होती. त्या बागेत त्यांच्याबरोबर हिंडत असताना त्यांनी वर दिलेले हे सुज्ञ उद्‌गार काढले. खाद्योपयोगी अशा एका निवडुंगाच्या ताटव्याशेजारी आम्ही थांबलो.

त्यांनी आपले भाषण चालू ठेवले. “बिनकाट्यांचा असा निवडुंग निर्माण करण्याचे प्रयोग करीत असताना मी वनस्पतींशी पुष्कळदा बोलत असे; हेतू हा की, वातावरणात प्रेमाच्या लहरी निर्माण व्हाव्या. मी असा बोलू लागे, “तुला भिण्याचे काही कारण नाही. तेव्हा रक्षणाकरिता हे काटे बाळगण्याची तुला जरुरी नाही. मी तुझे रक्षण करीत जाईन.” हळूहळू वाळवंटातील ह्या उपयुक्त झाडाचे काटे गळू लागले व एक कंटकविरहित अशी निवडुंगाची जात निर्माण झाली.”

चमत्काराची ही हकीकत ऐकून मी गार पडलो. “प्रिय ल्यूथरमहाशय, ह्या निवडुंगाची काही पाने मला कृपा करून द्या. मी ती आमच्या मौंट वॉशिंग्टनमधील बागेत लावून टाकतो.”

जवळच असलेला एक माळी लगेच त्या निवडुंगाची काही पाने तोडू लागला. बरबँकनी त्याला मना केले.

“स्वामीजींकरिता मी स्वतः तोडतो.” त्यांनी तीन पाने माझ्या हवाली केली. ती पुढे मी लावली व त्यांतून विशाल आकाराची निवडुंगाची झाडे तयार झाली; मला फार आनंद झाला.

त्या महान वनस्पतिशास्त्रज्ञांनी मला सांगितले की, त्यांनी आपला पहिला प्रयोग एका मोठ्या आकाराच्या बटाट्यावर केला व तो फार यशस्वी ठरला. त्या बटाट्याची जात त्यांच्याच नावाने आता विश्रुत झालेली आहे. एका अमर्याद अशा बुद्धिसामर्थ्याने त्यांनी शेकडो नवीन नवीन वनस्पती तयार केल्या व त्या ह्या जगास दान देऊन टाकल्या. शेकडो वनस्पती; एकमेकांवर कलमे करून तयार केलेल्या. चेरी, प्लम, नेक्टरीन, बेरी, पॉपी, लिली, गुलाब, असा.

ल्यूथर बरबँकनी मला एका प्रसिद्ध नामांकित अशा अक्रोडाच्या झाडाजवळ नेले. त्या झाडावर त्यांनी प्रयोग करून असे सिद्ध केले आहे की, वनस्पतींमधील नैसर्गिक वाढ व उत्क्रांती ही अनेक पटींनी वाढविता येणे शक्य आहे. मी आता जास्त लक्ष देऊन ऐकू लागलो.

ते म्हणाले, “फक्त सोळा वर्षांत हे अक्रोडाचे झाड फळ देऊ लागले आहे. आणि ते फळ सुद्धा अगदी अमाप. नैसर्गिक वाढीत जर काहीएक फरक केला नसता, तर ह्याच्या दुप्पट वर्षे फळ द्यायला ह्या झाडाला लागली असती.”

इतक्यात बरबँकची लहानशी मानलेली मुलगी तेथे बागेत आपल्या कुत्र्याबरोबर बागडत आली.

"ही मुलगी म्हणजे मी मानवरूपाने लावलेले एक रोपटेच होते," तिच्याकडे बोट दाखवून ल्यूथर प्रेमळपणे म्हणाले, "सर्वं मानवजात मी एक विशाल वृक्षच समजतो. त्याची अत्युच्च व सर्वंकष वाढ होण्यासाठी ज्या गोष्टींची जरुरी आहे त्या म्हणजे अशा: एक प्रेम; खुल्या हवेचे नैसर्गिक वरदान; आणि शोधक बुद्धीने केलेली त्यावरील वेचक कलमे. माझ्या स्वतःच्याच हयातीत वनस्पतींच्या वाढीमध्ये व उत्क्रांतीमध्ये मी इतकी आश्चर्यजनक प्रगती स्वतःच्याच डोळ्यांनी पाहिलेली आहे, की, ह्यापुढील प्रजेला जर साध्या व बुद्धिपुरस्सर अशा नियमबद्ध राहणीची तत्त्वे शिकविली, तर मला वाटते की एक निरोगी सुखी नवीन दुनियाच निर्माण होईल. मला अशी आशा वाटते. आपण सर्वांनी पुनः निसर्गाकडेच व निसर्गदेवतेकडेच परत वळले पाहिजे."

"ल्यूथरमहाशय, आम्ही आमच्या रांचीच्या शाळेमध्ये वर्ग बाहेर मोकळ्या जागी घेतो; की जेथे वातावरण आनंदाचे व साधेपणाचे असू शकते. हे ऐकून आपल्याला नक्की संतोष होईल."

हे माझे शब्द ऐकल्यावर बरबँक यांच्या हृदयाच्या अगदी जवळच्या धमनीला स्पर्श केला गेला — त्यांच्या आवडीचा विषय — बालकांचे शिक्षण. त्यांनी लगेच माझ्यावर प्रश्नांचा भडिमार केला. त्यांच्या खोल व गंभीर डोळ्यांमध्ये औत्सुक्याची चमक उमटली.

शेवटी ते म्हणाले, "स्वामीजी, आपली ही शाळा पुढील अनेक पिढ्यांना आशेचा किरण दाखवीत राहील. सध्याच्या ह्या आपल्या काळात शिक्षणपद्धती निसर्गापासून वंचित झालेली आहे. निसर्गाशी तिचा संबंध तुटलेला आहे. व्यक्तित्त्वाची वाढ त्या पद्धतीने खुडून टाकलेली आहे. शिक्षणपद्धतीच्या ह्या आपल्या व्यावहारिक ध्येयाशी मी पूर्ण सहमत आहे."

ह्या शांतमूर्ती ऋषितुल्य शास्त्रज्ञाचा निरोप घेतेवेळी त्यांनी एका लहान पुस्तकावर स्वाक्षरी केली व ते पुस्तक मला [1] भेट केले.

ते म्हणाले, "हे माझे पुस्तक, दि ट्रेनिंग ऑफ दि ह्यूमन प्लँट. [2] शिक्षणपद्धतीत नवीन प्रकारांची जरुरी आहे. त्यासाठी प्रयोग करावयास हवेत. ते करताना कोणाची भीडमुर्वत ठेवता कामा नये. माझ्या बाबतीत बोलावयाचे म्हणजे फळांमध्ये व फुलांमध्ये उच्च गुण आणण्याकरिता मला फार धोक्याचे प्रयोग करावे लागले; पण त्यांत मला यश आले. लहान मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत अशाच अधिक व धाडसाच्या नवीन नवीन सुधारणा कराव्या लागतील."

त्या रात्री त्यांचे ते लहान पुस्तक मी अतिशय लक्षपूर्वक व आस्थेने वाचले. त्यांच्या दृष्टीला ह्या मानवजातीचे भवितव्य उज्ज्वल दिसत होते. ते आपल्या पुस्तकात लिहितात: "ह्या दुनियेमध्ये सगळ्यांत बिकट अशी जर कोणती गोष्ट असेल; ज्यात फेरबदल घडवून आणणे अतिशय कठीण असेल तर ती म्हणजे एक रोपटे; की ज्याला काही विशिष्ट सवयी लावून ठेवल्या आहेत … हे लक्षात ठेवा की, ह्या रोपट्याने आपले वैशिष्ट्य युगायुगांमधून जतन करून ठेवलेले आहे. कदाचित त्याच्या उत्पत्तीचे मूळ युगे नव्हे तर कल्पांताच्याही

पाठीमागे जाऊन खुद्द खडकांच्या अंतरंगामध्ये शोधावयास पाहिजे. त्याच्या स्वरूपात इतकी युगे लोटली तरी विशेषसा फरक घडून आलेला नाही. आपल्याला असे वाटत नाही काय की, इतकी युगे पुनः पुनः पुनरुत्पत्ती अनुभवीत अनुभवीत त्या वनस्पतीच्या ठिकाणी एका प्रकारची इच्छाशक्ती — दुर्दमनीय इच्छाशक्ती निर्माण झाली असेल; मग त्याला तुम्ही इच्छाशक्ती म्हणा किंवा दुसरे एखादे नाव द्या. खरोखरीच अशा काही वनस्पती आहेत; काही तालवृक्षांसारख्या, की ज्यांनी आपले मूळचे स्वरूप इतके चिवटपणे जतन करून ठेवले आहे की, कोणाही मानवाला; शास्त्रज्ञ-मानवाला ते अद्यापपावेतो बदलता आलेले नाही. वनस्पतीच्या इच्छाशक्तीपुढे मानवाची इच्छाशक्ती दुबळी ठरते. पण पाहा ह्या सगळ्या वनस्पतींचा हा जन्मापासून टिकून राहिलेला चिवटपणा फक्त एकाच क्रियेने मोडला जातो. आणि ती क्रिया म्हणजे तिच्यावर कलम करणे; तिच्या नसानसांमध्ये नवीन जीवाचे आरोपण करणे. ती क्रिया केल्याबरोबर त्या वनस्पतीच्या जीवनामध्ये पूर्ण आणि प्रभावी फरक घडून येतो. ज्या वेळी मूळ स्वरूप बदलू लागते, तेव्हा त्याच्या ठिकाणी पिढ्यान् पिढ्या सतत जागरूकपणे केलेल्या प्रयोगांचा व निवडीचा उपयोग करून पाहा. त्याच ठिकाणी एक नवीन वनस्पती उत्पन्न होते; नवीनच असा आपला जीवनक्रम क्रमू लागते. आणि परत ती पूर्वीच्या स्वरूपाकडे सुतराम् जात नाही. पाहा काय चमत्कार आहे! दुर्दमनीय अशा त्या इच्छाशक्तीचा मोड झाला. तिच्यात आमूलाग्र फरक घडून आला.

ल्यूथर बरबँक
सांतारोझा, कॅलिफोर्निया,
यू.एस.ए.

डिसेंबर २२, १९२४

स्वामी योगानंदांच्या योगदा पद्धतीचे मी परीक्षण केले आहे. आणि माझ्या मते मानवाच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक स्वभावविशेषांमध्ये सुसंगती साधण्याच्या दृष्टीने व तसे शिक्षण देण्याच्या दृष्टीने ती एक आदर्श साधना आहे. स्वामीजींचे ध्येय जगभर "जीवन कसे जगावे" याचे मार्गदर्शन देणाऱ्या शाळा काढण्याचे आहे. अशा की ज्या शाळेंमध्ये बौद्धिक विकासाकडेच फक्त लक्ष दिले जाणार नाही, तर त्याबरोबर, शरीर, इच्छाशक्ती व भावना यांच्याही विकासाकडे लक्ष पुरविले जाईल.

धारणा व ध्यान यांच्यासारख्या साध्या व शास्त्रशुद्ध पद्धतींचा अवलंब करून शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक गुणांचा योगसाधनापद्धतीद्वारा विकास घडवून आणल्याने जीविताचे पुष्कळसे बिकट प्रश्न सोडविता येतील; आणि शांतता व सुहृद्भाव पृथ्वीवर नांदू शकतील. योग्य शिक्षणाची स्वामीजींची कल्पना म्हणजे कोणत्याही प्रकारची गूढविद्या व अव्यवहार्यता यांच्यापासून अलिप्त असे साधेसुधे व्यवहारज्ञान अशी आहे. तसे नसते तर त्या साधनापद्धतीस मी माझी संमती दिली नसती.

जीवन कसे जगावे ह्या कलेचे शिक्षण देणारी आंतरराष्ट्रीय विद्यालये स्थापन करावीत, अशी स्वामीजी विज्ञप्ती करीत आहेत. अशी विद्यालये जर स्थापन झाली, तर हजारो लोकांना मला परिचित अशा ध्येयाच्या शक्य तितक्या जवळजवळ ती आणू शकतील. म्हणून स्वामीजींच्या ह्या विज्ञप्तीस माझा अंतःकरणपूर्वक पाठिंबा देण्याची ही संधी मी घेत आहे व त्याबद्दल मला फार हर्ष होत आहे.




ल्यूथर बरबँक



*ल्यूथर बरबँक आणि योगानंद, सांता रोझा, कॅलिफोर्निआ, 1924*

"आणि ती इच्छाशक्ती जेव्हा एखाद्या लहान मुलाच्या स्वभावाप्रमाणे नाजूक व जशी वळवावी तशी बनते तेव्हा हा प्रश्न सोडविण्याचे काम फार सुकर होते."

एखाद्या लोहचुंबकाने जसे आकर्षित करावे, त्याप्रमाणे ह्या महान अमेरिकन सद्गृहस्थाकडे मी ओढला गेलो. त्यांना नंतर मी अनेकवार भेटलो. एके दिवशी सकाळी मी जेव्हा त्यांना भेटलो तेव्हा पोस्टमनची यायची वेळ होती. पोस्टमनने त्यांच्या अभ्यासिकेत जवळजवळ एक हजार पत्रे टाकली असतील. जगाच्या सर्व भागांतून वनस्पतिशास्त्रज्ञ व बागबागायतसंबंधीचे वैज्ञानिक त्यांच्याशी पत्रव्यवहार करीत.

"स्वामीजी, बरे आलात तुम्ही; आता मला येथून बागेत निसटायला बरी सबब सापडली," ल्यूथर मजेत म्हणाले, नंतर त्यांनी आपल्या टेबलाचा एक ड्रॉवर उघडला. त्यात शेकडो प्रवासी चित्रांची बांधलेली पुडकी होती.

"हे पाहा," ते म्हणाले, "प्रवासाच्या वेळी हा माझा उद्योग असतो. बागेतली झाडे आणि हा अफाट पत्रव्यवहार यांमध्ये मी सारा वेळ जखडला गेलो असल्याकारणाने, निरनिराळ्या देशांत प्रवास करून तेथील भूप्रदेश पाहण्याची हौस मी ही चित्रे पाहून भागवून घेतो.

माझी गाडी त्यांच्या फाटकापाशीच उभी होती. ल्यूथरमहाशय व मी नंतर त्या लहान गावातील रस्त्र्यांवरून फेरफटका करावयास बाहेर पडलो. त्या गावातील बांगातून जागोजागी

त्यांनीच कलमे बांधून निर्माण केलेली सांतारोझा, पीचब्लो आणि बरबँक गुलाबपुष्पे अगदी टवटवीत व तजेलदार अशी दिसत होती.

त्यांच्या-माझ्या भेटीगाठीच्या अगदी सुरुवातीसच त्या महान शास्त्रज्ञाने माझ्यापासून क्रियायोगाची दीक्षा घेतली होती. ते म्हणाले, "स्वामीजी, ही क्रियायोगाची साधना मी अगदी निष्ठापूर्वक करतो." योगशास्त्राच्या विविध अंगोपांगांविषयी त्यांनी मला पुष्कळ विचारपूर्वक प्रश्न विचारले आणि नंतर हळूच त्यांनी उद्‌गार काढले:

"पौर्वात्यांजवळ खरोखरी ज्ञानाचे इतके अफाट खजिने आहेत की, त्यांचा शोध घेण्याच्या खटपटीला पाश्चिमात्य आता कुठे लागले आहेत!" [3]

निसर्गाशी अगदी घनिष्ठ संबंध ठेवल्याकारणाने बरबँकमहाशयांना निसर्गाने अगदी दक्षतेने जपून ठेवलेल्या आपल्या अनेक गुपितांची उकल करून दिली होती आणि त्यामुळे त्यांच्या ठिकाणी अमर्याद असे आध्यात्मिक आदरणीय व्यक्तित्व निर्माण झाले होते.

"कधीकधी मला परमात्मशक्तीच्या अगदी जवळ आल्यासारखे वाटते," त्यांनी हळूच आपले रहस्य मला सांगितले. त्यांच्या भावनाप्रधान व सुंदर बांध्याच्या चेहऱ्यावर त्यांच्या स्मृती उजळल्या. "आणि मग माझ्याजवळ जमलेल्या दुखणेकरी माणसांना बरे करण्याचे सामर्थ्य माझ्या अंगी येते. वनस्पतीसुद्धा, ज्यांना काही रोग झाला आहे त्यासुद्धा, मी बऱ्या करू शकतो; त्यांचा रोग काढू शकतो."

मग त्यांनी मला आपल्या आईबद्दल सांगितले. माऊली मोठी श्रद्धाळू अशी ख्रिस्ती स्त्री होती. "ती वारल्यानंतर पुष्कळ प्रसंगी मला तिच्या दर्शनाचा सूक्ष्म शरीरात दिसून आलेला असा लाभ घडून आलेला आहे. ती माझ्याशी बोललेली सुद्धा आहे." ल्यूथरमहाशय म्हणाले.

नंतर आम्ही त्यांच्या घराकडे नाखुशीनेच परत वळलो. तेथे हजारो पत्रे त्यांची वाट पहात होती.

"ल्यूथरमहाशय," मी म्हणालो, "पौर्वात्य आणि पाश्चिमात्य यांच्या सत्यान्वेषणाविषयी एखादे मासिक काढण्याचा माझा विचार आहे. तर ह्या मासिकाला योग्य, समर्पक असे नाव सुचवता का?"

आम्ही बराच वेळ पुष्कळ नावांचा विचार केला व शेवटी "ईस्ट-वेस्ट" [4] हे नाव द्यावयाचे ठरविले. नंतर पुन्हा आम्ही जेव्हा त्यांच्या अभ्यासिकेत गेलो, तेव्हा त्यांनी "सायन्स अँड सिव्हिलाइझेशन" मध्ये स्वतः लिहिलेला लेख मला वाचावयाला दिला.

"ईस्ट-वेस्ट या मासिकाच्या पहिल्या अंकात हा लेख छापून टाकू." मी कृतज्ञताबुद्धीने म्हणालो.

पुढे आमची मैत्री जसजशी दाट होऊ लागली तेव्हा बरबँकमहाशयांना, मी माझे "अमेरिकन संत" असे म्हणू लागलो. मी म्हणे, "हा मनुष्य पाहा, याच्यामध्ये काही कपट असे नाही!" [5] त्यांचे अंतःकरण फार खोल असे. त्यास अंत नसे. त्यांच्या अंतःकरणाला दीर्घकाळ नम्रता, धीरता व त्याग यांची ओळख होती. गुलाबाच्या ताटव्यामध्ये बांधलेले त्यांचे घर अगदी भलतेच साधे होते. ऐषआरामात काही अर्थ नाही, हे त्यांना पुरते माहीत होते. स्वतःच्या अशा अगदी थोड्याच वस्तू ठेवण्यात काय आनंद आहे तो त्यांनी अनुभविला होता.

वनस्पतिशास्त्रज्ञ म्हणून त्यांची जी अपार कीर्ती झाली, त्याबद्दल त्यांना अभिमानाचा लवलेशही नसे. त्यांच्याकडे पाहून मला वारंवार आठवण व्हावयाची की, ज्या वृक्षांवर पिकणाऱ्या फळांची दाटी झाली आहे ती वाकू लागतात व ज्या झाडाला फळच म्हणून काही येत नाही ते मात्र नुसतेच पोकळ गर्वाने हवेत उंचच उंच वाढत जात असतात.

माझे हे सन्मित्र, प्रिय मित्र १९२६ मध्ये वारले, त्या वेळी मी न्यू यॉर्कमध्ये होतो. माझ्या डोळ्यांत अश्रू आले. माझ्या मनात विचार आला, 'अरेरे! इथून सांतारोझापर्यंतचे सारे अंतर मी आनंदाने चालत जाईन; पण त्या महात्म्याचे एक तरी अंतिम दर्शन झाले तर किती बरे होईल!' नंतरचा एक दिवस मी व माझे चिटणीस यांनी भेटी बाजूस सारून अगदी एकांतवासात घालविला.

दुसऱ्या दिवशी ल्यूथरमहाशयांच्या एका मोठ्या चित्रासमोर मी अंत्यसंस्काराची वैदिक प्रार्थना म्हण्टली. शरीराची पंचतत्त्वे जी पृथ्वी (फुले), आप, तेज वगैरे यांचे निबोधक चिन्ह जे फूल ती फुले अर्पण करीत असताना व ती पंचतत्त्वे, त्यांचे उगमस्थान जे परमतत्त्व त्यामध्ये विलीन व्हावी म्हणून प्रार्थना म्हणताना माझे काही अमेरिकन शिष्य अगदी संस्कारसमयीचे पवित्रसे हिंदू वेष परिधान करून प्राचीन स्तुतिस्तोत्रांचे, गीतांचे पठण करीत होते.

---

1 स्वतःचे स्वाक्षरी चित्रसुद्धा बरबँक महाशयांनी मला दिले. एका हिंदू व्यापाऱ्याने लिंकनचे एक चित्र एक मौलिक चीज म्हणून जपून ठेवले आहे; अगदी त्याचप्रमाणे मी ते चित्र जपून ठेवले आहे. तो हिंदू व्यापारी अमेरिकेत यादवी युद्धाच्या वेळी होता. आणि त्याला लिंकनबद्दल इतकी आदरबुद्धी वाटली की, त्या मानवजातीच्या उद्धारकाचे एक मोठे चित्र मिळविल्याखेरीज तो अमेरिका सोडावयास तयार होईना. लिंकन यांच्या घराच्या दरवाजात तो धरणे धरून बसला व तेथून तो उठेचना. प्रेसिडेंट लिंकन अगदी हतबुद्ध होऊन गेले. शेवटी त्यांनी आपले तैलचित्र काढून घ्यावयास त्यां व्यापाऱ्यास परवानगी दिली. त्याने डॅनियल हंटिंग्टन या प्रसिद्ध न्यूयॉर्कमधील चित्रकाराकडून ते चित्र काढविले. ते चित्र जेव्हा पुरे झाले, तेव्हा त्याने ते मोठ्या विजयोत्साहाने कलकत्त्यास नेले.

2 न्यूयॉर्क: सेंचरी कं. १९२२.

3 सुप्रसिद्ध इंग्लिश प्राणिशास्त्रज्ञ, डॉ. जुलियन हक्सले यांनी नुकतेच एके ठिकाणी भाषणात सांगितले आहे की, पाश्चिमात्य वैज्ञानिकांनी समाधीअवस्थेच्या आणि श्वासनिरोधाच्या पौर्वात्य तंत्रसाधनेचा अभ्यास करावा. ते म्हणाले, "काय होतेय? ते कसे शक्य आहे?" ॲसोसिएटेड प्रेसच्या लंडनच्या २१ ऑगस्ट ११४८च्या एका निवेदनात म्हटले आहे, "डॉ. हक्सले यांनी दि न्यू वर्ल्ड फेडरेशन फॉर मेंटल हेल्थच्या सदस्यांना असे सांगितले की, त्यांनी पौर्वात्यांच्या गूढ विद्येचा जरासा कानोसा घ्यावा. त्यांनी त्या मानसशास्त्रज्ञांना असा उपदेश केला की, ह्या विद्येचे जर शास्त्रीय संशोधन केले, तर मला वाटते की, तुमच्या क्षेत्रात मोठी प्रगती घडून आली आहे असे होईल."

4 १९४८ मध्ये ह्याच मासिकाचे 'सेल्फ-रिअलायझेशन मॅगझिन' असे नवीन नाव ठेवले.

5 जॉन १:४७ (बायबल).

प्रकरण - ३९

# 39. कॅथॉलिक महिला थेरेसा नॉयमन

"हिंदुस्थानात परत ये. आज पंधरा वर्षे मी तुझी उत्कंठेने वाट पाहत आहो. लवकरच मी आता ह्या शरीराचा त्याग करणार आहे आणि प्रज्वलित अशा निजधामाप्रत जाणार आहे. योगानंदा ये!"

मौंट वॉशिंग्टनमधील आमच्या मुख्य कार्यालयात मी ध्यानस्थ बसलो असताना माझ्या कानांच्या अंतर्भागी श्रीयुक्तेश्वरांचे शब्द ऐकू येऊ लागले. डोळ्याची पापणी लवण्याच्या आत दहा हजार मैल प्रवास करून त्यांचा निरोप विजेच्या एखाद्या चमचमाटाप्रमाणे मला भेटून गेला.

पंधरा वर्षे! होय. आता चालू वर्ष १९३५. पंधरा वर्षे गुरुजींची शिकवण मी अमेरिकेत शिकवत राहिलो. तिचा प्रसार केला. आता ते मला परत बोलावीत आहेत.

थोड्या वेळाने माझा हा अनुभव मी माझे प्रिय मित्र श्री. जेम्स जे. लिन यांना वर्णन करून सांगितला. क्रियायोगाची दररोज नित्य नेमाने साधना करून त्यांची आध्यात्मिक प्रगती इतकी झाली होती की, मी त्यांना पुष्कळदा "संत लिन" अशा नावाने हाक मारीत असे. त्यांच्यामध्ये आणि इतर पुष्कळ पाश्चिमात्यांमध्ये बाबाजींच्या भविष्यवचनाची सत्यता आढळून येई. मला फार आनंद वाटे. बाबाजींनी भविष्य केले होते की, पाश्चिमात्य जगात सुद्धा ह्या प्राचीन योगमार्गाच्या साधनेने स्वानुभव प्राप्त झालेले संत निर्माण होतील.

माझ्या प्रवासाच्या खर्चाचा भार उचलण्याचा श्री लिन यांनी औदार्यपूर्वक अगदी आग्रह धरला. झाले, खर्चाचा प्रश्न सुटला. मी यूरोपमार्गे हिंदुस्थानात जाण्याची तयारी केली. मार्च १९३५ मध्ये मी सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप ही संस्था कैलिफोर्निया संस्थानाच्या कायद्याप्रमाणे पंथनिरपेक्ष, कोणत्याही तऱ्हेचे अर्थसंपादन न करणारी, चिरंतन कार्य करीत राहणारी अशी एक संस्था म्हणून नोंदविली. सेल्फ-रिअलायझेशन संस्थेला मी माझी सारी मालमत्ता माझ्या सर्व लिखाणाच्या हक्कांसहित दान केली. मी लिहिलेल्या सगळ्या पुस्तकांचे हक्क संस्थेला देऊन टाकले. ही संस्था इतर बहुतेक शैक्षणिक व धार्मिक संस्थांप्रमाणे त्यांच्या सभासदांच्या व इतर लोकांच्या देणग्यांवर चालत आहे.

"मी परत येत आहे," मी विद्यार्थ्यांना सांगितले, "अमेरिकेचा मला कधीही विसर पडणार नाही."

माझ्यावर प्रेम करणाऱ्या मित्रांनी लॉस एंजेलिसमध्ये प्रयाण करण्यापूर्वी मला एक मेजवानी दिली. त्या वेळी मी त्यांच्या प्रेमळ चेहऱ्यांकडे पाहिले व कृतज्ञताबुद्धीने मनाशी विचार करू लागलो, 'परमेश्वरा, एकमेव दाता तू आहेस, हे ज्याला समजून चुकले आहे त्याला मानवांमध्ये मित्रत्वाच्या गोडव्याची वाण पडणार नाही.'

९ जून, १९३५ रोजी 'यूरोपा' या बोटीने मी न्यूयॉर्कहून प्रवासास निघालो. माझ्याबरोबर दोन विद्यार्थीही होते. एक माझे चिटणीस श्री. सी. रिचर्ड राईट व दुसरी सिनसिनाटी या

ठिकाणची एक वयस्कर महिला होती—मिस एटि ब्लेच. समुद्रावरून बोटीने सावकाशपणे प्रवास करताना आम्हांस चांगलीच शांतता मिळाली. प्रवासाला निघण्यापूर्वी आमची अगदी काय गडबड उडून गेली होती. पण असे हे आमचे शांततेचे दिवस लवकरच संपले. आधुनिक जमान्यातील ह्या बोटींचा वेग हा आमच्या-शांतताभंगाला कारणीभूत झाला!

इतर चौकस प्रवाशांप्रमाणे आम्हीही त्या अवाढव्य व प्राचीन लंडन शहरामध्ये इकडेतिकडे हिंडलो. आम्ही इंग्लंडमध्ये उतरल्यावर अगदी दुसऱ्याच दिवशी मला व्याख्यानाचे आमंत्रण आले. कैक्सटन हॉलमध्ये सभा होती. सभेला समाजही मोठा होता. लंडनच्या श्रोतृजनांना माझा परिचय सर फ्रान्सिस यंगहजबंड यांनी करून दिला. नंतर आम्हा मंडळींना सर हैरी लॉडर यांनी आपल्या स्कॉटलंडमधील प्रशस्त निवासस्थानी एक दिवस पाहुणे म्हणून बोलाविले. आमचा तो दिवस फार मजेत गेला. मी व माझे दोन सहप्रवासी यांनी लवकरच इंग्लिश खाडी ओलांडून युरोप खंडावर पदार्पण केले. कारण मला बव्हेरियामध्ये एका विशेष यात्रेच्या ठिकाणी जाऊन यायचे होते. आणि ती यात्रा उरकायला हीच एक संधी होती. माझा विचार कौनर्सरायथची प्रसिद्ध कॅथॉलिक गूढवादी संतमहिला थेरेसा नॉयमन हिची भेट घ्यायचा होता.

काही वर्षापूर्वी थेरेसाबद्दल मी विस्मयकारक हकीकत वाचली होती. त्या लेखात जी माहिती दिली होती ती अशी:

(१) थेरेसाचा जन्म १८९८ साली गुडफ्रायडेच्या दिवशी झाला. विसाव्या वर्षी तिला एक अपघात झाला. त्यामुळे ती आंधळी झाली व तिला पक्षघाताचा विकार झाला.

(२) १९२३ साली सेंट थेरेसा ऑफ लीस्यू—'दि लिटल फ्लॉवर' हिची प्रार्थना केल्याने तिला दृष्टी आली व थेरेसा नॉयमनचे अवयव ताबडतोब बरे झाले.

(३) १९२३ नंतर थेरेसा काही एक अन्नपाणी ग्रहण करीत नाही. फक्त दररोज सकाळी एक लहानसा पवित्र केलेला वेफर घेते.

(४) येशू ख्रिस्ताला क्रूसावर दिल्यावेळी जशा जखमा झाल्या तसे पवित्रसे तसेच व्रण थेरेसाच्या डोक्यावर, छातीवर, हातांवर व पायांवर १९२६ साली उमटले. दर शुक्रवारी [1] येशू ख्रिस्ताबद्दल इतिहासात नमूद केलेल्या त्यांच्या त्या देहयातनांचा आणि मनोभावनांचा तिला अनुभव येतो.

(५) तिची भाषा म्हणजे तिच्या गावची सर्वसाधारण लोकांची साधी सोपी जर्मन बोली. पण दर शुक्रवारी जेव्हा ती त्या मनोभावना अनुभवते तेव्हा ती काही चमत्कारिक शब्द पुटपुटते. भाषाशास्त्रज्ञांनी ते शब्द जुन्या अरॅमिक भाषेतील शब्द होत असे ओळखून काढले. तिला जेव्हा भास होतात, तिच्या मनश्चक्षूपुढे दृश्ये दिसतात तेव्हा योग्य प्रसंगी ती हिब्रू किंवा ग्रीक बोलते.

(६) धर्मखात्याच्या परवानगीने थेरेसाची अगदी कसून शास्त्रीय दृष्ट्या तपासणी झाली आहे. एका प्रौटेस्टंट जर्मन वर्तमानपत्राचे संपादक, डॉ. फिट झ गेर्लिक एकदा कौनर्सरॉयथला "हे कॅथॉलिक लोकांचे थोतांड" लोकांपुढे स्पष्ट करण्याकरिता गेले होते; पण तेथे गेल्यावर काय झाले? मोठ्या भक्तिभावाने तिचे चरित्र लिहून ते परत आले.

नेहमीप्रमाणे, पौर्वात्य रिवाजाप्रमाणे काय की पाश्चिमात्य रिवाजाप्रमाणे काय, संत-महात्म्यांची भेट घेण्याची मला उत्कंठा झाली. त्यामुळे त्या चमत्कारिक अशा कोनर्सरॉयथ खेडेगावात १६ जुलैला आम्ही मंडळी जेव्हा येऊन पोचलो तेव्हा मला साहजिकच आनंद वाटला. आमच्या फोर्ड गाडीची (आम्ही ती अमेरिकेतून आमच्याबरोबर आणली होती) आणि आम्हा भिन्नभिन्न मंडळींची — एक अमेरिकन तरुण मनुष्य, एक वयस्कर स्त्री आणि एक सावळ्या वर्णाचा आपले लांब केस आपल्या गळ्यापाशी बांधून ठेवणारा पौर्वात्य—त्या बव्हेरियन शेतकऱ्यांना मोठी मौज वाटली.

थेरेसाची झोपडी स्वच्छ व नीटनेटकी होती. शेजारीच एका जुनाट विहिरीजवळ जिरैनियमची फुले चांगली उमललेली होती; पण आमचे दुर्दैव असे की, ती झोपडी बंद होती. शेजाऱ्यांना, जवळून एक पोस्टमन जात होता त्यालाही आम्ही विचारले, पण त्यांना काही माहिती देता येईना. आणि तितक्यात पाऊस पडू लागला. माझ्या बरोबरीच्या मंडळींचे म्हणणे पडले की, आता आपण निघावे.

“नाही,” मी हट्टाने म्हणालो, “थेरेसाबाईकडे जाण्याचा मार्ग सापडेपर्यंत मी असाच येथे बसून राहणार.”

दोन तास झाले. आम्ही तसेच त्या भयानक पावसात आमच्या गाडीत बसून राहिलो. “परमेश्वरा,” मी तक्रारीच्या सुरात करुणाजनक प्रार्थना केली, “ती बाई जर येथून नाहीशी झाली असेल, तर मग तू मला इथपर्यंत आणलेस तरी कशाला?”

तेवढ्यात एक इंग्लिश बोलणारा मनुष्य आमच्या शेजारी येऊन थांबला व विनयपूर्वक आमची चौकशी करू लागला.

“थेरेसा बाई कोठे असते हे नक्की मला माहीत नाही,” तो म्हणाला, “पण ती बाई पुष्कळदा प्रोफेसर फ्राँझबुझ्च् यांच्या घरी येते. येथून ऐंशी मैलांवर असलेल्या आइकस्टेंट युनिव्हर्सिटीमध्ये ते परकीय भाषांचे प्रोफेसर आहेत.”

झाले, दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही मंडळी त्या आइकस्टाट गावी मोटारीने गेलो. डॉ. बुझ्च् यांनी आपल्या घरी आमचे चांगले स्वागत केले. “होय, थेरेसा बाई येथे आहेत.” कोणी पाहुणे भेटावयास आले आहेत म्हणून त्यांनी बाईंना कळविले. लवकरच त्यांचा जवाब घेऊन एक मनुष्य आला.

“बिशपसाहेबांनी जरी मला त्यांची परवानगी घेतल्याशिवाय कोणासही भेटावयाचे नाही म्हणून बजावले आहे, तरी हिंदुस्थानातून आलेल्या त्या देवमाणसाला मी भेटेन.”

ह्या शब्दांनी मला अगदी गहिवरून आले. मी बुझ्च् यांच्या पाठोपाठ वरच्या मजल्यावर उठाबसायच्या खोलीत गेलो. थेरेसाबाई खोलीमध्ये ताबडतोब आल्या. त्यांच्याभोवती प्रसन्नता व आनंद यांचे तेजोवलय होते. त्यांनी काळा झगा घातला होता व अगदी शुभ्र पांढरी अशी टोपी घातली होती. जरी त्या वेळी त्यांचे वय सदतीस वर्षांचे होते, तरी त्या पुष्कळच तरुण दिसत होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर बालसदृश तजेला व गोडवा दिसत होता. त्यांची प्रकृती चांगली धडधाकट, सुडौल व आनंदी दिसत होती. त्यांच्या गालांवर गुलाबी छटा आलेली होती. काहीही अन्नग्रहण न करणारी अशी ती संतमहिला होती!

थेरेसाबाईंनी फार सौम्य असे हस्तांदोलन करून माझे स्वागत केले. आम्ही दोघे एका मूकभाषेत एकमेकांशी बोलू लागलो. परमेश्वराचे भक्त दोघे आम्ही परस्परांची अशी ओळख करून घेतली.

डॉ. बुझ्च् यांनी मोठ्या दयाळूपणे दुभाष्याचे काम पत्करले. आम्ही आपापल्या जागेवर जसे बसून घेतले तसे थेरेसाबाई माझ्याकडे एका अभिनव औत्सुक्याने पहात होत्या, असे माझ्या ध्यानात आले. आणि खरेच बव्हेरियामध्ये हिंदू मनुष्य आढळून येणे क्वचितच.

“आपण काही खात नाही काय?” मला या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या तोंडून पाहिजे होते.

“नाही खात; फक्त दररोज सकाळी सहा वाजता एक होस्ट [2] तोंडात टाकते.”

“होस्ट कितीसे मोठे असते?”

“होस्ट अगदी पापुद्र्यासारखे; एखाद्या लहान नाण्याच्या आकाराचे असते.” त्यांनी आणखी माहिती दिली. “मी ते धार्मिक संस्काराचे असते म्हणून घेते. ते जर तसे पवित्र केलेले नसेल तर ते मला गिळता येत नाही.”

“पण बारा पुरी वर्षे तुम्ही त्याच्यावरच केवळ जगू शकला नाहीत हे निश्चित?”

“परमेश्वर जो प्रकाश देतो त्यावर मी जगते.”

किती साधे उत्तर त्या बाईचे. जणू आईनस्टाईनच्या पद्धतीचे!

“म्हणजे मला वाटते की, ईथर, सूर्य व हवा यांकरवी आपल्या शरीरात शक्ती येते.”

त्यांच्या मुद्रेवर एक स्मित झळकून गेले. “मी कशी जगते हे आपण ओळखलेत. मला किती आनंद झाला!”

“आपला पवित्र जीवनक्रम म्हणजे येशू ख्रिस्ताने उच्चारलेल्या उद्‌गारांचा दररोज दाखविला जाणारा प्रत्यक्ष पुरावाच आहे. त्याने म्हटलेले आहे की, ‘मनुष्य केवळ भाकरीवरच जगतो असे नाही तर परमेश्वराच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक शब्दावर तो जगत असतो.’ [3]

मी असे स्पष्टीकरण दिल्यावर त्यांनी आनंद झाल्याचे दाखविले.

“खरोखरीच तसे आहे. मी ही जी या जगावर वावरत आहे त्याचे एक कारण म्हणजे मनुष्य केवळ अन्नावरच जगत नाही, तर तो परमेश्वराच्या अदृश्य प्रकाशावर जगतो, हे सिद्ध करणे हे होय.”

“आपण दुसऱ्यांना अन्नाखेरीज कसे राहता येते हे शिकवू शकाल काय?”

त्यांना थोडासा जरा धक्का बसल्यासारखे दिसले. “नाही. मला तसे शिकविता येणार नाही. परमेश्वराची तशी इच्छा नाही.”

त्यांच्या तशा बळकट व सुडौल हातांकडे माझी जशी नजर गेली, तसे थेरेसाबाईंनी आपल्या प्रत्येक हाताच्या पाठीमागे नुकतीच बरी झालेली अशी चौरसाकृती जखम दाखविली. तसेच प्रत्येक हाताच्या तळव्यावर एक त्याहून लहान चंद्राकृती, नुकतीच बरी झालेली अशी एक जखम दाखविली. प्रत्येक जखम हातातून आरपार गेलेली होती. हे दृश्य पाहिल्याबरोबर मला त्या मोठ्या आकाराच्या व चंद्राकृती टोकांच्या लोखंडी खिळ्यांची

स्पष्ट आठवण झाली. हे खिळे अजून पूर्वेकडील देशांत वापरतात, पण पाश्चिमात्य देशात कुठे पाहिल्याचे मला स्मरत नाही.

त्या संतमहिलेने मग मला दर आठवड्यास तिच्या अंगात येते त्याबद्दल सांगितले. त्या म्हणाल्या, “एका असाहाय प्रेक्षकाप्रमाणे येशू ख्रिस्ताची ती संपूर्ण यंत्रणा मी न्याहाळते.” प्रत्येक आठवड्याला, गुरुवारी रात्रीपासून शुक्रवारी दुसऱ्या प्रहरापर्यंत एक वाजेपर्यंत त्यांच्या जखमा उघडतात व त्यांतून रक्त वाहू लागते. त्यांचे नेहमीचे वजन १२१ पौंडांचे आहे; त्यापैकी दहा पौंड वजन कमी होते. सहानुभूतीपर प्रेमामुळे त्या या यातना सहन करतात. आणि त्यामुळे आपल्या प्रभूच्या त्या साप्ताहिक आभासाचा अनुभव आनंदाने घेतात.

मी ताबडतोब ओळखले की, त्यांचे हे असे आयुष्य विलक्षण बनवून टाकण्यामध्ये परमेश्वराचा काही निश्चित हेतू असला पाहिजे आणि तो म्हणजे सर्व ख्रिस्तीजनांना नवीन करारामध्ये नमूद केलेली येशू ख्रिस्ताची हकीकत व त्यास क्रूसावर कसे छळून मारले, ही हकीकत ऐतिहासिक दृष्ट्या खरी वाटावी व तसेच गैलीलियातील प्रभु व त्याचे भक्त यांच्यामध्ये हा जो भक्तीचा जिवंत दुवा असतो तो प्रत्यक्ष दाखवावा.

नंतर प्रोफेसर बुझ्च् यांनी त्या संतमहिलेविषयीचे आपले स्वतःचे असे काही अनुभव सांगितले.

“आम्ही कित्येकजण थेरेसाबाईंना घेऊन पुष्कळदा साऱ्या जर्मनीभर प्रेक्षणीय स्थळे पाहण्याकरिता सहलीत दिवसन दिवस घालवितो,” ते मला सांगू लागले, “हा मोठा चटकन ध्यानात भरणारा फरक असे. बाई काहीही न खाणाऱ्या आणि बाकीचे तिघे आम्ही दिवसातून तीन वेळा पोटभर जेवण घेणारे. पण त्यांना थकवा वगैरे कधी काही यायचा नाही. त्या एखाद्या ताज्या गुलाबाच्या फुलाप्रमाणे टवटवीत दिसायच्या. बाकीच्या आम्हांला जेव्हा भूक लागायची तेव्हा आम्ही जवळपास कुठे खाणावळ आहे की काय हे शोधत बसायचे आणि थेरेसाबाई गमतीने हसू लागायच्या.”

नंतर प्रोफेसरसाहेबांनी आम्हांला त्यांच्या शरीरप्रकृतीबद्दल आणखी काही माहिती सांगितली. “थेरेसाबाई काही एक खात नाहीत त्यामुळे त्यांचे पोट अगदी आत आकसून गेले आहे. त्यांना मलमूत्रविसर्जनविधी करावे लागत नाहीत; फक्त त्यांच्या धर्मोत्पादक पेशी कार्य करीत असतात. त्यांची त्वचा ही नेहमी मऊ आणि जशीच्या तशी राहते.”

निरोप घ्यावयाच्या वेळी, त्यांच्या अंगात जेव्हा येते तेव्हा मला पाहायला यायचेय, अशी माझी इच्छा त्यांना मी बोलून दाखविली.

“होय; या की कौनर्सरौयथला पुढल्या शुक्रवारी,” त्या मोठ्या दिलदारपणे म्हणाल्या, “बिशप तुम्हांला परवाना देतील. तुम्ही मला आइकस्टाटमध्ये शोधून काढलेत, मला फार संतोष वाटला.”

थेरेसाबाईंनी मग आमच्याशी अगदी सौम्यपणे हस्तांदोलन केले; पुष्कळदा केले व त्या आम्हा मंडळींना फाटकापर्यंत पोचवावयास आल्या. श्री राईट यांनी मग आमच्या गाडीतील रेडिओ सुरू केला. त्या संतमहिलेने तो बारकाईने पाहून काही उत्साहपूर्ण चीत्काराचे उद्गार काढले. नंतर थेरेसाबाई आपल्या घरात परत गेल्या. आम्ही नंतर त्यांना खिडकीशी उभ्या

असलेल्या पाहिल्या. त्या आमच्याकडे निरखून पहात होत्या व एखाद्या लहान मुलाप्रमाणे हात हालवीत होत्या.

दुसऱ्या दिवशी थेरेसाबाईंच्या दोन भावांकडे आम्ही गेलो व बोलत बसलो. ते दोघेही मोठे दयाळू व प्रेमळ स्वभावाचे होते. त्यांच्याकडून आम्हांला असे कळले की, बाई रात्री फक्त एक किंवा दोन तास झोपतात. त्यांच्या शरीरावर जरी अनेक जखमा होत्या तरी त्या सारख्या काम करतात व त्यांच्या अंगी उत्साह भरपूर असतो. त्यांना पक्ष्यांची फार आवड आहे. त्यांनी एक मत्स्यालय तयार केले आहे व बागेतच पुष्कळदा काम करीत असतात. त्यांचा पत्रव्यवहार फार मोठा आहे. कॅथॉलिक भक्त त्यांना त्यांच्या प्रार्थनेकरिता व रोगविमुक्त होण्यासाठी त्यांच्या आशीर्वादाकरिता नेहमी लिहीत असतात. पुष्कळ भक्तांची अगदी दुर्धर रोगांतून त्यांच्या आशीर्वादांनी मुक्तता झालेली आहे.

त्यांचा भाऊ फर्डिनंड सुमारे तेवीस वर्षांचा आहे. त्याने आम्हाला सांगितले की, थेरेसाबाई दुसऱ्यांच्या व्याधी आपल्या स्वतःच्या शरीरावर घेतात व त्यांना त्या व्याधीपासून मुक्त करतात. अशी शक्ती त्यांच्या ठिकाणी आहे. या संतमहिलेची अन्नग्रहण न करण्याची कहाणी फार जुनी आहे. त्यांच्या पॅरिशमध्ये एक तरुण होता. त्याला पाद्री व्हावयाचे होते. पण त्याला घशाची व्याधी होती. बाईनी ती व्याधी आपल्याकडे घेतली. बाईचा आहार सुटला व त्या तरुणाची व्याधी कायमची नाहीशी झाली.

गुरुवारी दुपारी आम्ही मंडळी त्या बिशपांच्या घरी गेलो. बिशपसाहेब माझ्या रुळणाऱ्या केसांकडे थोड्याशा आश्चर्याने पाहतच राहिले. त्यांनी जरूर तो परवाना ताबडतोब लिहून दिला. त्याची फी वगैरे काही नव्हती. चर्चने एवढाच निर्बंध बांधून दिला होता की, अशा ह्या निमित्ताने येणाऱ्या प्रवाशांनी त्यांना गर्दी करून सतावू नये. असे हे प्रवासी पूर्वी शुक्रवारी हजारोंनी येऊन गर्दी करीत असत.

कॉनर्सरॉयथला आम्ही शुक्रवारी सकाळी साडेनऊला पोचलो. त्यांच्या लहानशा झोपडीत त्यांच्या बसायच्या खोलीवर छप्पर काचेचे होते व त्यातून त्यांच्या खोलीत उजेड भरपूर येण्याची सोय होती, हे माझ्या ध्यानात आले. त्यांच्या खोलीची दारे आता चांगली उघडून ठेविली होती, हे पाहून आम्हांला आनंद वाटला. उघडी दारे जणू आमचे आतिथ्यपूर्वक स्वागत करीत आहेत, असे आम्हांस वाटले. आमच्यासारखे एकूण वीस प्रवासी आले होते. प्रत्येकाजवळ परवाना होता. हा गूढ स्वरूपाचा अंगात येण्याचा प्रकार प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहण्याकरिता त्यांपैकी पुष्कळसे अगदी लांबून आलेले होते.

थेरेसाबाई माझ्या पहिल्या कसोटीतून प्रोफेसरमहाशयांच्या घरीच पार पडल्या होत्या. मी त्यांना भेटण्याकरिता काही नुसता चमत्कार पाहण्याच्या उत्सुकतेने आलेलो नसून काही आध्यात्मिक कारणाकरिता आलो आहे, हे बाईनी अंतर्ज्ञानाने ओळखले होते, ही माझी पहिली कसोटी होती.

आता आम्ही तेथे गेल्यावर मी त्यांच्या वरच्या मजल्यावरच्या खोलीत गेलो व चटकन आसन घालून समाधी लावली. उद्देश हा की, त्यांच्याशी मनोविज्ञानाने व दूरान्वेषणाने संपर्क साधून संभाषण करावे. त्या काय पडसाद देतात हे पाहणे ही माझी दुसरी कसोटी होती. मी त्यांच्या खोलीत प्रवेश केला तेव्हा ती खोली प्रेक्षकांनी अगदी भरून गेली होती. बाई

बिछान्यावर पांढरे कपडे घालून पहुडलेल्या होत्या. माझ्या पाठीमागे श्री राईट होते. खोलीचा उंबरठा ओलांडल्यावर आमच्यासमोर एक विलक्षण व अतिशय भीषण असे करुण दृश्य दृष्टीस पडले व त्यामुळे आम्ही भीतिपूर्ण आश्चर्याने स्तंभितच झालो.

थेरेसाबाईंच्या डोळ्यांच्या खालच्या पापण्यांतून एक इंच रुंदीच्या रक्ताचा प्रवाह थोडाथोडा पण सारखा वाहत होता. त्यांची दृष्टी ऊर्ध्व झाली असून कपाळाच्या मध्यभागी असलेल्या अध्यात्म-नेत्राकडे केंद्रित झालेली होती. त्यांच्या कपाळावरती जे फडके गुंडाळलेले होते, ते त्या काटेरी मुगुटाच्या जखमांतून ओघळलेल्या रक्ताने भिजून चिंब झाले होते. त्यांच्या छातीवर—हृदयाजवळ जी जखम झालेली होती त्यावर एक पांढरे फडके गुंडाळलेले होते ते सुद्धा रक्ताने भिजून तांबडेलाल झाले होते. अगदी त्याच ठिकाणी कित्येक वर्षांपूर्वी येशू ख्रिस्ताच्या शरीरावर एका सोजिराने भाला खुपसून त्याच्या शरीराची अवहेलना केली होती व त्याचा उपमर्द केला होता.

थेरेसाबाईंचे हात पुढे केलेले होते. जसे एखाद्या मातेने लेकरावर मायेची पाखर धरावी असे ते जणू विनवीत होते. त्यांच्या चेहऱ्यावर यातनांनी कासावीस झालेली पण तितकीच दिव्य अशी छटा दिसत होती. त्यांची देहयष्टी बारीक झालेली दिसत होती, पण अनेक आंतरिक व बाह्य प्रकारांनी त्यांच्या शरीराचे सूक्ष्म असे परिवर्तन होत होते. त्यांच्या इंद्रियातीत दृष्टीसमोर उभ्या असलेल्या माणसांना उद्देशून त्या काही एका परभाषेतील शब्द आपल्या काहीशा थरथरणाऱ्या ओठांतून पुटपुटत होत्या.

त्यांच्या मनोभावांशी मी अगदी एकसुर झालो होतो आणि त्यामुळे त्यांच्या मनश्चक्षूंपुढे काय दृश्य दिसत होते ते मी पाहावयास सुरुवात केली. त्यांच्या डोळ्यांपुढे येशू ख्रिस्ताचे चित्र उभे होते. येशू क्रूसाची लाकडी चौकट आपल्या खांद्यावर घेऊन चालला आहे आणि सभोवती लोकांचा समुदाय त्याची टवाळी करीत आहे. [4] आणि एकदम त्यांनी आपले डोके भीतीने वरती उचलले. तो महात्मा त्या निर्दयपणे लादलेल्या ओझ्याने खाली जमिनीवर कोसळून पडला आहे. आणि इतक्यात ते दृश्य नाहीसे झाले. त्या करुणाजनक थकव्यामुळे थेरेसाबाई आपल्या उशीवरच खाली कोसळून पडल्या.

आणि नंतर माझ्या पाठीमागे एक थाप मारल्यासारखा आवाज मी ऐकला. एक क्षणभर मी डोके बाजूला वळविले आणि पाहिले तो दोन माणसे एका पडलेल्या माणसाला उचलून नेत होती. पण मी एका खोल अशा अतींद्रिय अवस्थेतून बाहेर येत असल्यामुळे, तो पडलेला मनुष्य कोण आहे, हे मी ताबडतोब ओळखू शकलो नाही. पुनः मी माझी दृष्टी थेरेसाबाईंच्या चेहऱ्यावर केंद्रित केली. रक्ताचे ओघळ वाहत असल्याने त्यांचा चेहरा निस्तेज झाला होता. त्याच्यावर मृत्यूची अवकळा आलेली होती. पण आता तो चेहरा शांत झाला होता. त्यातून शुचिता व धर्मनिष्ठा यांचे तेज बाहेर पडत होते. मी नंतर माझ्या पाठीमागे पाहिले तो श्री राईट आपल्या गालांवर हात ठेवून उभे असलेले असे माझ्या दृष्टीस पडले. त्यांच्या गालांमधून रक्ताचे थेंब पडत होते.

“डिक!” मी घाबरून विचारले, “जो पडलेला माणूस होता तो तूच काय?”

“होय; ते भीषण दृश्य पाहून मीच बेशुद्ध होऊन पडलो.”

“हे पाहा,” मी सांत्वन करण्याच्या हेतूने म्हणालो, “पुनः परत येऊन ते दृश्य तुम्हांला परत पाहवले. तुम्ही धीराचे खरे!”

यात्रेकरूंची रीघ लागलेली आहे; व ते अगदी धीमेपणाने दर्शन मिळण्याची वाट पाहात आहेत ही गोष्ट आमच्या ध्यानात आल्यावर आम्ही, श्री राईट व मी, थेरेसाबाईंचा निरोप घेतला व त्यांच्या पवित्र सहवासातून [5] बाहेर निघालो.

दुसऱ्या दिवशी आमची लहानशी तुकडी मोटारीने दक्षिण दिशेने निघाली. आम्हांला एक समाधान असे होते की, आम्ही रेलगाडीवर अवलंबून नव्हतो. आम्हांला आमची फोर्डगाडी वाटेत कोठेही निसर्गसौंदर्य पाहण्याकरिता थांबविता येत असे. जर्मनीमधून आम्ही जी ही सहल काढली त्यातील आमचा प्रत्येक क्षण मजेत गेला. तशीच मौज हॉलंड, फ्रान्स व स्विस आल्प्समधुन संचार करताना आम्ही अनुभविली. इटलीमध्ये प्रवेश केल्यावर असीसिला आम्ही तेथील विनम्रतेचा उपासक जो सेंट फ्रान्सिस याच्याबद्दल आमचा आदरभाव व्यक्त करण्याकरिता आवर्जून गेलो. यूरोपमधील आमची ही सफर ग्रीसमध्ये संपली. तेथे आम्ही अथेन्समधली देवळे पाहिली. आणि ज्या तुरुंगात सौक्रेटीसला [6] ठेवले होते व त्यास विष प्यायला लावले होते व जेथे त्याचा अंत झाला ती तुरुंगाची जागा आम्ही पाहून घेतली. प्राचीन ग्रीक लोक कोणतेही बांधकाम असो त्यात आपल्या कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याची पराकाष्ठा करीत. त्यांच्या शिल्पकृतीचे हे अवशेष, त्यांतील कलाकुसर पाहिल्यावर पाहणाऱ्याला त्यांचे कौतुक केल्याखेरीज राहवत नाही.

नंतर आम्ही बोटीत बसून भूमध्य समुद्र ओलांडला व पैलेस्टाईनमध्ये उतरलो. त्या पवित्र भूमीवर रोज रोज हिंडून यात्रा करण्याचे काय महत्त्व आहे, याची मला पुरेपूर खात्री पटली. ज्याचे अंतःकरण भावनाप्रधान आहे त्याला येशू ख्रिस्ताचा आत्मा सर्व पैलेस्टाईनभर संचार करीत आहे असे वाटते. मी त्या पुण्यात्म्याच्या सहवासात बेथलेम, गेथस्मेन, कैलव्हरी, पवित्रसा मौंट ऑफ औलिव्हझ ही स्थळे पाहून घेतली. तसेच त्याच्या सहवासात जॉर्डन नदी व गैलिलीचा समुद्र ह्यांच्या परिसरातही हिंडून घेतले.

त्याचप्रमाणे आम्ही मंडळींनी जेथे येशूचा जन्म झाला ते जोसेफ सुताराचे दुकान, लैझैरसचे दफन-स्थान, मार्था व मेरी यांचे घर. अंतिम भोजनाचे दालन ही स्थानेही पाहून घेतली. प्राचीन कालाचा पट खोलला गेला. त्यामधील एकेक दृश्ये नजरेसमोर येऊ लागली. शतकानुशतके लोकांच्या ध्यानात राहावा असा तो नाट्यप्रसंग, दिव्य स्वरूपाचे जे नाट्य येशू ख्रिस्ताने करून दाखविले ते मी डोळ्यांनी पाहिले.

नंतर आम्ही इजिप्तमध्ये गेलो. ते आधुनिक पद्धतीचे कैरो शहर व ते पुरातन काळातील पिरैमिड. नंतर तांबड्या समुद्रातून बोटीने लांबलचक प्रवास करून आम्ही त्या अफाट अरबी समुद्रात उतरलो. आणि तेथून पुढे भारताकडे जावयास निघालो.



*थेरेसा नॉयमन, सी. रिचर्ड राइट आणि परमहंस योगानंद, आइखस्टाट, बवेरिया, 1935*

1 गेल्या महायुद्धाच्या वेळेपासून थेरेसाच्या अंगात ख्रिस्ताचे मनोविकार दर शुक्रवारी असे येत नाहीत; पण वर्षातून काही धार्मिक सणांच्या दिवशी फक्त येतात. तिच्याबद्दल पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत, ती खालीलप्रमाणे: थेरेसा नॉयमन: ए स्टिग्मैटिस्ट ऑफ अवर डे'; आणि 'फर्दर क्रॉनिकल्स ऑफ थेरेसा नॉयमन' दोन्ही पुस्तकांचा लेखक फ्रेडरिक रिटर फॉं लामा. आणि 'दि स्टोरी ऑफ थेरेसा नॉयमन: लेखक ए. पी. शिमबर्ग (१९४७). सर्व पुस्तकांचे प्रकाशक: ब्रूस पब्लि. कं. मिलवौकी, विस्कॉन्सिन आणि 'थेरेसा नॉयमन': लेखक जोहारिस स्टेनर; प्रकाशक: आल्वा हाऊस, स्टेटर आयलंड, न्यूयॉर्क, यू. एस. ए.

2 धार्मिकदृष्ट्या पवित्र केलेला पिठाचा वेफर (पातळ तुकडा)

3 मैथ्यू ४:४. मनुष्याची शरीररूपी विजेरी ही काही फक्त ओबड-धोबड अन्नावर (भाकरीवर) चालते असे नाही; तर ती स्पंदनात्मक अशा विश्वशक्तीवर (शब्द किंवा ओम्) चालत असते. ही अदृश्य शक्ती मनुष्याच्या शरीरात मेरुदंडशीर्षाच्या द्वाराने प्रवेश करते. हे शरीरातील सहावे केंद्र हे मानेच्या पाठीमागे मेरुदंडातील पाची चक्रांच्या वरती असते. (चक्र हा संस्कृत शब्द. अर्थ चाक किंवा केंद्र; प्राणशक्ती प्रसृत करणारे.)

मेरुदंडशीर्ष हे विश्वशक्ती (ओम्) ग्रहण करण्याने शरीरातील प्रमुख द्वार आहे. ह्याचा दोन्ही भुवयांमध्ये स्थित असलेल्या एकमेव नेत्राशी, कूटस्थ चैतन्यकेंद्राशी ध्रुव टोकासारखा सरळ संबंध आहे. हे कूटस्थ चैतन्यकेंद्र म्हणजे माणसाच्या इच्छाशक्तीचे वसतिस्थान होय. त्यानंतर विश्वशक्ती ही मेंदूमधील सातव्या केंद्रामध्ये अपरिमित ग्रहणशक्ती असलेल्या ह्या कोठारामध्ये साठविली जाते. (ह्या सातव्या केंद्रास वैदिक वाङ्मयामध्ये सहस्रदलकमल म्हणून संबोधिलेले आहे). बायबलमध्ये 'ओम्' चा उल्लेख 'होली घोस्ट' म्हणून केलेला आहे. होली घोस्ट म्हणजे साऱ्या सृष्टीस दिव्यरूपाने धारण करणारी अदृश्य अशी प्राणशक्ती. "काय? तुला माहीत नाही काय की, तुझे शरीर म्हणजे तुझ्यात जे विद्यमान त्या होली घोस्टचे मंदीर आहे; जे तुला परमेश्वरापासून मिळालेले आहे आणि तू तुझा असा नाहीस?" —१ कैरिंथिअन्स ६:१९.

4 मी तेथे येण्यापूर्वी काही तास अगोदर थेरेसाबाईंच्या अंगात येऊन गेले होते; आणि त्या अवस्थेत येशू ख्रिस्ताच्या आयुष्याच्या शेवटच्या भागातील दृश्ये त्या अनुभवीत होत्या. त्यांना हे जे अंगात येई त्याची सुरुवात बहुधा येशूच्या हयातीतले शेवटचे जेवण

जे झाले त्या प्रसंगापासून होई. त्यांना जी पवित्र दृश्ये दिसत त्यांचे पर्यवसान क्रूसावर येशूच्या मृत्यूच्या प्रसंगात होत असे. कधी कधी त्यास थडग्यामध्ये ठेवलेल्या प्रसंगातही त्याचा शेवट होई.

5 युद्धोत्तर काळात (मार्च २६, १९४८) जर्मनीतून एक. आय. एन. एस. वृत्तनिवेदन बाहेर पडले होते; ते असे: "एक जर्मन खेडूत स्त्री परवाच्या गुडफ्रायडेच्या दिवशी आपल्या बिछान्यावर पहुडलेली असताना तिच्या डोक्यांतून, हातातून व खांद्यांतून रक्त ओघळू लागले. येशू ख्रिस्ताला क्रूसावर खिळ्यांनी ठोकून मारले असताना व त्याच्या डोक्यावर काटेरी मुगुट ठेवला असताना येशूच्या शरीराच्या ज्या भागांतून रक्त ओघळले त्या त्या भागांतून त्या खेडूत बाईच्या अंगातून रक्ताचे ओघळ बाहेर आले. ते दृश्य हजारो जर्मन व अमेरिकनांनी भीतियुक्त आश्चर्याने थेरेसा नॉयमनबाईच्या बिछान्याशी उभे राहून शांतपणे पाहून घेतले." (ही संतमहिला कौनर्सरॉयथला १९६२ मध्ये १८ सप्टेंबर रोजी वारली.) [प्रकाशकांची टीप]

6 यूसिबिअसमध्ये एक हकीकत दिलेली आहे. एकदा सौक्रेटीस व एक हिंदू साधू यांच्यामध्ये जो एक भेटीचा प्रसंग घडून आला त्याचे वर्णन तीत दिलेले आहे. "प्रख्यात वादनकार औरिस्टोक्झेनस हिंदी लोकांबद्दल अशी गोष्ट सांगतो की, एक हिंदी मनुष्य एकदा सौक्रेटीसला अथेन्समध्ये भेटला आणि त्याने त्याला विचारले की, 'तुझ्या तत्त्वज्ञानाचे क्षेत्र कोठपर्यंत आहे?' सौक्रेटीसने उत्तर दिले, 'मानवी घटनांचा शोध घेणे.' त्यावर ज्याने सौक्रेटीसला प्रश्न विचारला तो हिंदी मनुष्य नुसता हसूच लागला. तो म्हणाला, 'मानवी घटनांमध्ये जो अर्थ भरलेला आहे त्याचा तुला कसा शोध लागणार? आधी तुला दिव्य घटनांचा काही पत्ता लागला आहे का?'

पाश्चिमात्य तत्त्वज्ञानामध्ये ग्रीक आध्यात्मिक ध्येयाचा प्रतिध्वनी उठला आहे, तो असा: ग्रीक तत्त्वज्ञान म्हणते, "मनुष्या, तू तुला जाणून घे." भारतीय तत्त्वज्ञान म्हणेल, "मनुष्या, तू स्वतःला जाणून घे." डेस्कार्टिस नेहमी म्हणे, "मला वाटते म्हणून मी आहे." ही उक्ती तत्त्वज्ञानाबद्दलच्या कामी बरोबर ठरणारी नाही. माणसाने कितीही तर्कशुद्ध वादविवाद केला तरी आपले खरे अंतिम स्वरूप काय आहे याच्यावर तो काही प्रकाश पाडू शकत नाही. मनुष्याचे मन हे त्या क्षणभंगुर जगास ओळखते व त्या क्षणभंगुर जगाप्रमाणे तेही निरंतर कमीजास्त रूपात वावरत असते. त्याला निश्चित असा आकार कधी धारण करता येत नाही. बुद्धीचे समाधान होणे हे काही परमध्येय नव्हे. परमेश्वर-स्वरूपाचा जो शोध घेऊ लागतो तोच विद्येचा, अक्षर अशा सत्यतत्त्वाचा विद्यार्थी. बाकीचे सर्व काही जे आहे ती अविद्या आहे. ते परोक्ष ज्ञान आहे.

## प्रकरण - ४०

# 40. मी हिंदुस्थानात परत येतो

"हिंदुस्थानातील त्या पवित्र हवेचे श्वसन मी कृतज्ञतापूर्वक करीत होतो. आमची बोट 'राजपुताना' मुंबईच्या भव्य बंदरास २२ ऑगस्ट १९३५ रोजी लागली. जहाजातून उतरल्यावर माझा पहिला दिवस अगदी गडबडीचा गेला. पुढील वर्ष कसे जाईल याची जणू ती सूचना होती. अगदी बंदरावरच मित्रमंडळी हारतुरे घेऊन स्वागत करण्यास आली होती. आम्ही ताजमहाल हॉटेलमध्ये उतरलो. आमच्या प्रशस्त दालनात वृत्तपत्राचे बातमीदार व फोटोग्राफर यांची ही गर्दी झाली!

मुंबई शहर हे मला नवीन होते. मला ते आधुनिक पद्धतीचे व उत्साहपूर्ण वातावरणाचे वाटले. पाश्चिमात्य जगातील पुष्कळ नवीन रीतिरिवाजांचे अनुकरण झालेले तेथे मला आढळून आले. प्रशस्त रस्त्रयांच्या दोन्ही बाजूंनी उंच अशी माडाची झाडे, प्राचीन देवळांच्या जोडीने भव्य प्रासादतुल्य निवासस्थाने प्रेक्षकाचे मन आकर्षित करीत होती. परंतु इकडे तिकडे स्थळे पाहावयास आम्हांस फार थोडा वेळ होता. गुरुजी आणि माझी इतर सुहृद् मंडळी यांस भेटावयाची मला उत्कंठा लागली होती. आमची फोर्डगाडी बैगेजकार म्हणून बरोबर घेऊन आम्ही मंडळी घाईघाईने कलकत्त्याच्या [1] दिशेने लवकरच प्रवास करू लागलो.

आम्ही हावडा स्टेशनवर येऊन पोचलो. आमचे स्वागत करावयास स्टेशनवर लोकांची एवढी भयंकर गर्दी जमली होती की आम्हांला गाडीतून खाली उतरता येणेच मुश्कील झाले. स्वागत समितीचा पुढाकार कासिमबझारचे तरुण महाराज व माझा भाऊ विष्णु यांनी घेतला होता. आमच्या लहानशा तुकडीचे त्यांनी जे प्रेमळ व भव्य स्वागत केले त्याने माझे मन भारावून गेले.

पुढे आमची मिरवणूक निघाली. आमच्यापुढे मोटारी व मोटार-सायकली; आणि त्यांबरोबर वाद्यांची तुतारी व शंखनाद. नखशिखान्त फुलांच्या हारांनी भरून गेलेलो आम्ही तिघे, कु. ब्लेच, श्री राईट व मी अगदी मंदगतीने माझ्या वडिलांच्या घरी जाऊ लागलो.

माझ्या वृद्ध वडिलांनी मला आलिंगन दिले. जणू मी मेलेलो पुनः जिवंत होऊन त्यांना भेटावयास आलो आहे असे त्यांना वाटले. आम्ही एकमेकांकडे नुसतेच बराच वेळ पाहत राहिलो. आनंदाने आमच्या तोंडातून शब्द फुटेना. आमच्याभोवती भाऊ, बहिणी, चुलते, काक्या, माम्या, चुलतमामे भावंडे आणि जुने मित्र यांचा घोळका जमला होता; आणि प्रत्येकाच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते. ज्याची आठवणच फक्त एक पुरातन अवशेष म्हणून राहिली आहे, असे प्रेमळ पुनर्मीलनाचे दृश्य माझ्या अंतःकरणात अगदी अविस्मरणीय असे राहते. माझे गुरू श्रीयुक्तेश्वर यांची जी माझी भेट झाली त्याचे शब्दांनी वर्णन करता येत नाही. माझ्या चिटणिसाने त्या प्रसंगाचे वर्णन जे केले आहे ते पुरेसे आहे. ते असे:

“आज, अतिशय उच्च अशा आकांक्षा बाळगून मी योगानंदजींबरोबर कलकत्त्याहून सेरामपूरला मोटारीने गेलो.” श्री राईट आपल्या प्रवासाच्या रोजनिशीत लिहितात.

“आम्ही गमतीगमतीच्या दुकानांवरून गेलो; त्यांपैकी एक दुकान असे होते की, कॉलेजच्या दिवसांत योगानंदजी फराळाकरिता तेथे जायचे; त्यांचे ते अगदी आवडीचे दुकान होते. शेवटी आम्ही एका अरुंद, दोन्ही बाजूंना उंच उंच भिंती असलेल्या अशा गल्लीत शिरलो. पुढे एकदम डाव्या बाजूला वळल्यावर आमच्यासमोर एक साधीसुधी, दुमजली आश्रमाची इमारत उभी राहिली. वरच्या मजल्यावरची गच्ची पुढे आलेली होती. एकंदर चोहोकडे शांततापूर्ण एकांताचे वातावरण नांदत होते.

“एका गंभीर विनयशीलतेने मी योगानंदजींच्या पाठोपाठ आश्रमाच्या भिंतीच्या आत आंगणामध्ये गेलो. माझ्या हृदयाचे ठोके जलद पडत होते. सिमेंटच्या जुन्या पायऱ्यांवरून आम्ही वरती गेलो. सत्याच्या शोधार्थ बाहेर पडलेल्या असंख्य साधकांनी त्या पायऱ्या आपल्या पायांखालून घातल्या असतील. जसजसे आम्ही पुढे चालू लागलो, तसतशी आमची उत्कंठा वाढू लागली. जिन्याच्या वरच्या टोकाला त्या महात्म्याची — स्वामी श्रीयुक्तेश्वरजींची, एका ऋषीला साजेशी अशी — उमदी मूर्ती शांतपणे उभी असलेली आमच्या दृष्टीस पडली.

“त्यांच्या उदात्त सान्निध्यात आल्याने मला धन्यता वाटली व त्याने माझे हृदय हेलावले व उचंबळून आले. जेव्हा योगानंदजींनी त्यांच्यापुढे गुडघे टेकून, आणि विनम्र मस्तकाने आपल्या गुरूंच्या पायांना हाताने स्पर्श करून आणि नंतर विनयशील आज्ञाधारकपणाने आपले मस्तक त्यावर ठेवून आपल्या आत्म्याची कृतज्ञता दर्शविली व त्यांना अभिवादन केले, तेव्हा माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले व माझ्या डोळ्यांसमोर त्यामुळे अंधुकता आली. ते मग उठले आणि नंतर श्रीयुक्तेश्वरजींनी त्यांना दोन्ही बाजूंनी आपल्या हृदयाशी धरले.

“सुरुवातीला कोणी बोललेच नाही; पण अतीच तीव्र अशा भावना आत्म्याच्या मूक भाषेत व्यक्त केल्या जात होत्या. काय त्यांचे ते डोळे चमकत होते; आत्म्यांच्या पुनर्मीलनाच्या उष्णतेने त्यांच्या डोळ्यांना तेज चढले होते! त्या शांत दालनात वाऱ्याची एक झुळूक येऊन गेली आणि प्रत्यक्ष सूर्यनारायणाने सुद्धा ढगांना बाजूला सारून आपल्या देदीप्यमान वैभवाचा त्यावर मुलामा चढविला.

“मी पण गुडघे टेकून गुरुजींच्या पुढे विनम्र झालो व माझे स्वतःचे अव्यक्त प्रेम व आभार त्यांच्या पायांना स्पर्श करून व्यक्त केले. त्यांचे पाय उतारवयामुळे व इतकी दीर्घ काल सेवा केल्यामुळे आता अगदी सुरकुतल्यासारखे झाले होते. त्यांचा मी आशीर्वाद घेतला. मी नंतर उभा राहिलो व दोन सुंदर, खोल, अंतर्दृष्टीमुळे धुंद झालेले पण आनंदाने प्रफुल्ल असे नेत्र माझ्या दृष्टीस पडले. आम्ही त्यांच्या बसायच्या खोलीत गेलो. त्या खोलीची एक बाजू गच्चीला लागून उघडी होती. ती आम्हांला रस्त्रयावरून येताना दृष्टीला पडली होती. गुरुजींच्या पुढ्यात एक जुनाट बैठे टेबल होते. गुरुजी सिमेंटच्या फर्शीवर एका चादर घातलेल्या जाजमावर बसले होते. योगानंदजी आणि मी गुरुजींच्या पायांशी बसलो. आम्हांला टेकावयाला व गवताच्या चटईवर हातपाय सैल करून अंग हलके करावयाला भगव्या रंगाचे अभ्रे घातलेले तसे तक्के ठेवलेले होते.

दोन स्वामीजींमध्ये चालत असलेले बंगाली भाषेतील संभाषण समजून घेण्याचा मी वारंवार प्रयत्न केला. (कारण मी पाहिले की, ते दोघे जेव्हा एकमेकांशी बोलत तेव्हा इंग्लिश भाषेचा ते उपयोग करीत नसत. परंतु स्वामीजीमहाराज, त्यांना कित्येक परमगुरू असेही संबोधितात इंग्रजी बोलू शकतात व पुष्कळदा बोलतातही). पण त्या महात्म्याचे साधुत्व, अंतःकरणाला ऊब आणणारे त्यांचे स्मित व त्यांचे ते चमकणारे डोळे यांच्या साहाय्याने मी ओळखले, त्यांच्या शब्दांचा — मग ते शब्द विनोदाने वापरलेले असोत की गंभीरपणे म्हटले जावोत — एक गुण माझ्या चटकन ध्यानात आला तो हा की, त्यांच्या विधानात स्पष्टपणा, निश्चितता ही हटकून असायची. ही निश्चितार्थता साधुपुरुषांच्या वाणीमध्येच असते. कारण आपण काय जाणतो हे त्यास माहीत असते; कारण खुद्द परमेश्वरासच साधुपुरुष जाणत असतो. त्यांची गाढ प्रज्ञा, ध्येयनिष्ठता व दृढनिश्चय हा प्रत्येक बाबतीत दिसून येई.

“आदरबुद्धीने त्यांच्या वृत्तीचा मी वारंवार अभ्यास केल्यावर, माझ्या असे ध्यानात आले की, त्यांची शरीरयष्टी सुदृढ व व्यायामाने कमावलेली आहे; आणि तिला कठीण कसोटीच्या प्रसंगांनी व संन्यस्तवृत्तीच्या त्यागाने आणखी कठीणपणा आणलेला आहे. त्यांची मुद्रा व त्यांचा आविर्भाव राजन्य आहे. त्यांचे कपाळ निश्चितपणे वरवर जात होते; जणू स्वर्ग शोधावयासच ते निघाले होते. पण त्या कपाळामुळे त्यांच्या दिव्य अशा चेहऱ्याला शोभा आणली होती. त्यांचे नाक जरा मोठे होते. आपले नाक, काही करमत नसले म्हणजे करमणुकीकरिता ते एखाद्या लहान मुलासारखे बोटांनी चिमटीत धरून रूंदावीत व कोरीत. त्यांचे डोळे तेजस्वी व काळे असून त्या डोळ्यांच्या भोवती इथिरियल निळ्या रंगाचे पवित्रसे वलय असे. त्यांच्या केसांचा मधोमध भांग पाडलेला असून ते कपाळवरती पांढरे झालेले होते; व अन्यत्र मधूनमधून रुपेरी सोनेरी व पेरी काळे असे झालेले असून त्यांच्या वळ्या त्यांच्या खांद्यावर रुळलेल्या असत. त्यांच्या दाढी-मिशा तुरळक होत्या. पण तशा असूनही त्या त्यांच्या अवयवांना उठाव देत. त्यांच्या स्वभावधर्माप्रमाणे त्याही एकाच वेळी खोल व तशाच बारीकही होत्या.

“त्यांचे हसणे अगदी दिलखुलास व मजली असे. ते त्यांच्या छातीच्या खोलवरच्या कोपऱ्यातून बाहेर येई व ते असे आले म्हणजे त्या आनंदी व मनापासूनच्या हसण्याने त्यांचे सारे शरीर अगदी गदगदून निघे. त्यांचा चेहरा व त्यांची शरीरयष्टी प्रभावशाली आहे तितकेच त्यांचे पीळदार स्नायूंचे हात मजबूत आहेत. त्यांची चाल धीरोदात्त व ताठ आहे.

“त्यांचा वेष अगदी साधा होता. एक साधारणसे धोतर व कुडता. एके काळी दोन्ही वस्त्रे केशरी रंगाने रंगविली होती, पण आता त्यांचा रंग फिकट नारिंगी असा होता.



*स्वामी श्रीयुक्तेश्वर गिरी आणि श्री योगानंद, कोलकाता, 1935*

“इकडेतिकडे पाहिल्यावर माझ्या ध्यानात आले की, खोली साधारण मोडकळीच्या अवस्थेत आली आहे. त्यामुळे खोलीच्या मालकाचे ऐहिक सोयी-सवलतींकडे बिलकुल लक्ष नसावे हे दिसून येते. भिंतींवरून चुन्याच्या पांढऱ्या रंगाचे हवा, पाऊस यांच्यामुळे जागोजाग टवके उडालेले आहेत व त्याच्या आतील निळ्या रंगाचे प्लॅस्टर मधून डोकावत आहे. खोलीच्या एका टोकाला लाहिरी महाशयांचे एक चित्र टांगलेले आहे. आणि त्या तसबिरीला एक साधा हार घातला आहे. खोलीत आणखी एक जुने चित्र टांगलेले आहे. त्या चित्रात

योगानंदजी प्रथम बोस्टनमध्ये आलेले व काँग्रेस ऑफ रेलिजन्समध्ये इतर प्रतिनिधींबरोबर उभे असलेले असे दिसत आहे.

“प्राचीन व अर्वाचीन वस्तूंचा एक विचित्र समन्वय मी तेथे पाहिला. एक मोठे काचेच्या लोलकांचे मेणबत्त्या लावायचे हंड्यांचे झुंबर दिसत होते व त्याचा बरीच वर्षे काही उपयोग न झाल्याकारणाने त्याच्यावर कोळिष्टके साचली होती, तर भिंतीवर एक चकचकीत अद्ययावत कैलेंडर टांगलेले होते. सबंध खोलीत शांतता व सुख यांचा एक प्रकारचा सुगंध दरवळून राहिला होता. गच्चीच्या (बाल्कनीच्या) पलीकडे उंच माडाची झाडे शांतपणे रखवाली करीत असलेली दिसत होती.

“तेथे मला एक गमतीची गोष्ट आढळून आली. गुरुजींनी टाळी वाजवावी व ती वाजवून संपते न संपते, तोच तेथे कोणी एक बालशिष्य ताबडतोब येऊन हजर राहावा. योगायोग असा; त्यांपैकी एकाचा; अगदी किरकोळ यष्टीच्या प्रफुल्ल [2] नावाच्या मुलाचा मला विशेष लळा लागला. त्याचे केस काळेभोर असून ते त्याच्या खांद्यांवर रुळत होते. त्याचे डोळेही काळेभोर असून त्याची दृष्टी भेदक होती. आणि त्याच्या चेहऱ्यावरचे मृदू हास्य स्वर्गीय होते. त्याच्या ओठांच्या कडा जशा उघडल्या जातात तसे त्याचे डोळे संधिप्रकाशात प्रकाशणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे व चंद्रकोरीप्रमाणे चमकू लागत.

“आपला शिष्य परत भेटावयास आला, म्हणून स्वामी श्रीयुक्तेश्वरजींना अलोट आनंद झाला होता (आणि त्यांना माझ्याबद्दलही, शिष्याच्या शिष्याबद्दलही थोडीशी जिज्ञासा वाटली.) परंतु महात्म्याच्या स्वभावाच्या तारतम्यबुद्धीच्या प्रादुर्भावाने भावनांच्या बाह्य आविष्काराला त्यांनी थोपवून धरले.

“योगानंदजींनी त्यांना काही भेटी दिल्या. जेव्हा शिष्य गुरूला परत भेटायला जातो, तेव्हा गुरूला भेट देण्याचा प्रघात आहे. नंतर आम्ही जेवावयास बसलो. जेवण अगदी साधे पण चांगले शिजविलेले होते. सर्व पदार्थ शाकाहारी होते व त्यांत भाताचे केलेले वेगवेगळे पदार्थ होते. मी हिंदी रिवाजांचा, पद्धतींचा — उदाहरणार्थ, मी हातांनी जेवलो — पुष्कळसा अवलंब केला आहे हे पाहून त्यांना आनंद वाटल्यासारखा दिसला.

“पुष्कळ तास बंगाली भाषेत जोरजोराने संभाषण झाल्यावर आणि हास्यपूर्ण व आनंदपूर्ण अशा दृष्टींची भेट-प्रतिभेट झाल्यावर, आम्ही गुरुजींच्या चरणांना वंदन केले व त्यांना प्रणाम [3] करून आम्ही त्यांचा निरोप घेतला. आणि एका पवित्र भेटीची कायमची स्मृती हृदयात ठेवून कलकत्त्याला जायला निघालो. जरी मी हे वर्णन मला गुरुजींबद्दल जे बाह्यतः काही वाटले त्याचे मुख्यत्त्वेकरून करीत आहे तरी त्यांच्या आध्यात्मिक वैभवाची मला सतत जाणीव होती. त्यांचे सामर्थ्य मला भासत होते आणि तो अनुभव म्हणून मी सतत बाळगीत आहे.”

श्रीयुक्तेश्वरांकरिता मी अमेरिका, युरोप व पैलेस्टाईनमधून भेटीदाखल कित्येक जिनसा आणल्या होत्या. त्या त्यांनी स्मितपूर्वक स्वीकारल्या; पण त्याबद्दल ते काही बोलले नाहीत. माझ्या स्वतःच्या उपयोगाकरिता जर्मनीतून मी एक कळीची छत्री आणली होती. हिंदुस्थानात आल्यावर ती गुरुजींना द्यावी असे मी ठरविले.

"ही तुझी देणगी मला फार पसंत आहे!" अशा तऱ्हेचा अनपेक्षित शेरा मारल्यावर गुरुजींची नजर माझ्याकडे वळली. त्या नजरेत प्रेमळपणा व समजूतदारपणा भरलेला होता. सगळ्या जिनसांतून ही कळीची छत्री नेमकी ते आल्यागेल्यांना माझी भेट म्हणून दाखवीत.

"गुरुजी, ह्या बैठकीच्या खोलीला एक नवे जाजम घालू या." एके ठिकाणी जाजम फाटले होते त्यावर श्रीयुक्तेश्वरांचे व्याघ्रांबर टाकले होते हे माझ्या नजरेस आले.

"तुला पाहिजे तर घाल." गुरुजींच्या आवाजात उत्साह असा नव्हता. "हे पाहा. माझे वाघाच्या कातड्याचे आसन सुंदर आणि स्वच्छ आहे ह्या माझ्या लहानशा राज्यात मी राजा आहे. त्याच्यापलीकडे हे अफाट जग आहे. त्या जगाला बाह्य गोष्टीबद्दलच आस्था आहे."

आणि हे शब्द जेव्हा त्यांनी उच्चारले, तेव्हा एकदम कित्येक वर्षांपूर्वीच्या आठवणींना उजाळा दिला गेला. पुनः मला मी एक लहानसा शिष्य आहे असे वाटू लागले व दररोज काही ना काही निमित्ताने गुरुजींकडून बोलून घेत आहे, असा मला भास झाला!"



*सेरामपुर आश्रमामध्ये श्री योगानंद (मध्ये बसलेले) व स्वामी श्रीयुक्तेश्वर (उजवीकडे उभे), 1935*

सेरामपुरातून व कलकत्त्यातून मी जेव्हा मोकळा झालो, तेव्हा श्री राईटना घेऊन रांचीला जावयास निघालो. काय ते स्वागत तेथले; अगदी हृदयस्पर्शी स्वागत! माझ्या पंधरा वर्षांच्या गैरहजेरीत शाळेचा यशोध्वज ज्यांनी सतत उंच फडफडत ठेवला त्या निःस्वार्थी शिक्षकांना आलिंगन देताना माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. वसतिगृहातील व दररोज बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे तजेलदार चेहरे आणि त्यांची प्रसन्न सुहास्य वदने पाहिल्यावर त्यांना शाळेत शिक्षण व योगसाधना किती काळजीपूर्वक शिकविली जात होती याची मला पुरेपूर खात्री पटली.

परंतु काय दुर्दैव! रांचीची संस्था फार बिकट अशा आर्थिक अडचणीत होती. ज्यांचा 'कासिमबझार-प्रासाद' आम्ही शाळेची मध्यवर्ती इमारत म्हणून वापरत होतो व ज्यांनी इतरही पुष्कळ मोठ्या देणग्या उदारहस्ताने संस्थेला दिल्या होत्या ते वृद्ध असे कासिमबझारचे महाराज, सर मणींद्रचंद्र नंदी आता निवर्तलेले होते. पुरेशा सार्वजनिक आश्रयाच्या अभावी शाळेची पुष्कळ स्वतंत्र स्वरूपाची व कल्याणकारी शैक्षणिक अंगे चालू ठेवण्याच्या मार्गात गंभीर स्वरूपाच्या अडचणी निर्माण झाल्या होत्या.

मी अमेरिकेत पुष्कळ वर्षे घालविली व त्याबरोबर तेथील लोकांचे व्यवहारी शहाणपण व कोणत्याही अडचणींना तोंड देण्याची त्यांची निर्भय वृत्ती ही मी शिकून घेतली होती. रांचीत मी एक आठवडा राहिलो व तेथल्या कठीण समस्या सोडवीत बसलो. नंतर कलकत्त्यातील प्रमुख पुढाऱ्यांना व शिक्षणतज्ज्ञांना भेटलो. कासीमबझारच्या तरुण महाराजांची प्रदीर्घ मुलाखत घेतली. वडिलांकडे आर्थिक साहाय्याची याचना केली. आणि पाहा काय आश्चर्य! रांची विद्यालयाचा डळमळणारा पाया हळूहळू भक्कम होऊ लागला. आणि त्यात पुष्कळशा देणग्या माझ्या अमेरिकन विद्यार्थ्यांकडून अगदी नेमक्या वेळी आल्या.

मी हिंदुस्थानात आल्यावर थोडक्याच महिन्यांत रांची विद्यालयाची स्थापना व घटना कायदेशीर करून टाकली. मला मोठा संतोष झाला. माझ्या आयुष्यातील एक सुखद स्वप्न होते की, योगशिक्षण देणारी एक कायमची आर्थिक सोय झालेली संस्था काढावी. ते शैक्षणिक केंद्र करावे. ही माझी मनीषा पुरी झाली. १९१७ साली केवळ सात मुलांना बरोबर घेऊन मी अगदी अल्पशी सुरुवात केली होती व ती करताना ह्याच स्फूर्तीने मला कार्यप्रवृत्त केले होते.

ही शाळा 'योगदा सत्संग ब्रह्मचर्य विद्यालय' या नावाने ओळखली जाते. शाळेत व्याकरण व माध्यमिक विद्यालयाचे विषय शिकविले जातात व वर्ग उघड्यावर वृक्षराजीखाली भरतात. वसतिगृहातील विद्यार्थी व रोज बाहेरून येणारे विद्यार्थी, दोघांनाही कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचे व्यावसायिक शिक्षण दिले जाते.

शाळेतील पुष्कळसे उपक्रम विद्यार्थी स्वतःच स्वयंसंचालित समितीद्वारा चालवीत असतात. शिक्षक या भूमिकेच्या अगदी सुरुवातीपासून माझ्या ही गोष्ट ध्यानात आली होती की, जी मुले शिक्षकाला खोडसाळपणे त्रास देण्यात आनंद मानतात तीच मुले त्यांच्यापैकी काहींनी जर आपापसांत शिस्तीचे नियम केले तर ते नियम अगदी आनंदाने पाळतात. मी आदर्श विद्यार्थी असा कधीच नव्हतो; त्यामुळे मुलांच्या ह्या खोड्या व त्यांचा खोडसाळपणा

मला आवडत असे. मुलांच्या प्रश्नांकडे पाहण्यास व त्यांचा सहानुभूतिपर विचार करण्यास मी नेहमीच तत्पर असे.

खेळ दोन्ही प्रकारचे—मर्दानी व मैदानी. दोन्ही प्रकारच्या खेळांना येथे उत्तेजन दिले जाते. क्रीडांगणे हॉकीच्या व फूटबॉलच्या खेळांनी दणाणून निघतात. खेळांच्या आंतर्शालेय स्पर्धामध्ये रांचीची मुले हटकून बक्षिसाचे पेले मिळवितात. मुलांना इच्छाशक्तीने स्नायूंमध्ये शक्ती भरविण्याची; शरीराच्या कोणत्याही भागाकडे प्राणशक्ती मानसिक प्रेरणेने पुरविण्याची योगदा व्यायामपद्धती शिकविली जाते. त्यांना, आसने, तलवार वापरणे, लाठी व जुजुत्सू—कुस्तीचा प्रकार यांचेही शिक्षण दिले जाते. प्राथमिक उपचार पद्धतीमध्ये तयार केलेले असल्यामुळे रांचीच्या विद्यार्थ्यांनी प्रांतामध्ये महापूर, दुष्काळ यांसारख्या आपत्तींच्या प्रसंगी बहुमोल मदत केलेली आहे. आश्रमातील आवारात मुले भाज्या लावतात व चरख्यावर सूत कातून त्याचे कापडही तयार करतात.

प्रांताच्या कोल, संताळ व मुंडा यांच्यासारख्या आदिवासी जमातींच्या मुलांना प्राथमिक शाळेत हिंदीमधून शिक्षण दिले जाते. जवळपासच्या खेड्यांतून फक्त मुलींकरिताच वर्ग चालविले जातात.

रांचीचे वैशिष्ट्य म्हणजे, क्रियायोगाची दीक्षा देणे हे होय. मुले दररोज आध्यात्मिक व्यायाम करतात; गीतापठण करतात आणि त्यांना उपदेश व प्रत्यक्ष उदाहरण यांकरवी साधेपणा, स्वार्थत्याग, अभिमान व सत्याची आवड हेही गुण शिकविले जातात. पाप किंवा दुष्कर्म म्हणजे ज्यायोगे दुःख उत्पन्न होते ते व पुण्य किंवा सत्कर्म म्हणजे ज्यायोगे खऱ्या सुखाचा लाभ होतो ते; असे त्यांना शिकविले जाते. पाप किंवा दुष्कर्मास, ज्यात विष मिसळून दिलेले आहे अशा मधाची उपमा देता येईल. असा मध, मध म्हणून मनुष्यास ओढून घेतो पण विषमिश्रित असल्याकारणाने तो घेतल्यास मरण ओढवते.

शरीर व मन यांच्यामधील अस्वस्थता, एकाग्रतासाधनेच्या तांत्रिक शिक्षणाने काढून टाकता येते ह्याचे येथील प्रयोग फारच यशस्वी ठरले. रांचीला कोवळी नऊ-दहा वर्षांची मुले एक तास किंवा त्याहूनही जास्त अशी न हालता आसनांमध्ये मांडी घालून व आपली नजर स्थिर करून ती अध्यात्म किंवा तृतीय नेत्राकडे केंद्रित करून बसलेली पाहणे ही गोष्ट काही अपरिचित नाही.

आश्रमाच्या वृक्षराजीमध्ये एक शिवमंदिर आहे. तेथे परमपूज्य परात्पर गुरू लाहिरी महाशय यांचा एक पुतळा आहे. आम्रवृक्षांखाली बागेत दररोज प्रार्थनेचे व धार्मिक पठणाचे वर्ग घेतले जातात.

रांचीच्या आश्रमातील योगदा सत्संग सेवाश्रमामध्ये वैद्यकीय व शस्त्रक्रियेची मदत भारतामधील हजारो गोरगरिबांना मोफत दिली जाते.

रांची हे ठिकाण समुद्रसपाटीहून २००० फूट उंचीवर आहे. येथील हवामान सौम्य व सम आहे. आश्रमाच्या जागेचे आवार सत्तर बिघ्यांचे आहे. त्यात एक मोठे तळे आहे. त्याचा आंघोळीकरिता उपयोग करता येतो. आवारात वृक्षराजी अतिशय सुंदर प्रकारची आहे. एकूण पाचएकशे झाडे आहेत. आंबा, खजूर, माड, पेरू, लिची, फणस अशी निरनिराळ्या प्रकारची झाडे बागेत आहेत.

रांचीच्या पुस्तकालयामध्ये अनेक मासिके येतात. तेथे पाश्चिमात्य व पौर्वात्य अशा दोन्ही लोकांनी देणगी म्हणून दिलेली हजारो इंग्रजी व बंगाली पुस्तके आहेत. जगातील सर्व धर्मग्रंथांचा तेथे संग्रह आहे. एक पदार्थ-संग्रहालय असून त्याचे वेगवेगळे व्यवस्थित विभाग पाडलेले आहेत. त्या संग्रहालयामध्ये मौल्यवान दगड व पुरातत्त्वशास्त्र, भूस्तरशास्त्र आणि मानववंशशास्त्र दृष्ट्या अनेक महत्त्वाच्या वस्तू ठेवलेल्या आहेत. जगाच्या वेगवेगळ्या भागांत मी हिंडलो, तेव्हा त्या देशाटनामध्ये मला मिळालेल्या अनेक संस्मरणीय वस्तू त्या संग्रहालयामध्ये ठेवून दिल्या आहेत. [4]

माध्यमिक शाखा-विद्यालयेही, रांचीच्या विद्यालयाच्या धर्तीवर वसतिगृहाची सोय असलेली व योगशिक्षण देणारी, उघडली आहेत व ती चांगल्या स्थितीत चालू आहेत. लखनपूर येथे मुलांकरिता योगदा सत्संग विद्यापीठ आहे. पश्चिम बंगालमधील पुरुलिया जिल्ह्यातील इस्मालिचाक येथे व मिदनापूर जिल्ह्यात योगदा विद्यालय व आश्रम आहेत. [5]

दक्षिणेश्वर येथे १९३९ मध्ये गंगेच्या समोरच योगदा मठाला एक प्रशस्त इमारत व जागा मिळाली. हा मठ कलकत्त्याच्या उत्तरेस काही मैलांवर असून शहरातील गडबडीला कंटाळलेल्या नागरिकांना येथे आश्रमामध्ये शांततेच्या स्वर्गसुखाचा लाभ घडून येतो.

दक्षिणेश्वर येथील मठ हे हिंदुस्थानातील योगदा सत्संग सोसायटीचे व या सोसायटीच्या भारतातील इतर भागांतील शाळांचे, केंद्रांचे आणि आश्रमांचे मुख्य व मध्यवर्ती ठिकाण आहे. योगदा सत्संग सोसायटी [6] ही संस्था कायदेशीरपणे कॅलिफोर्नियामधील (यू. एस. ए.) लॉस एंजेलिस येथील सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप या आंतरराष्ट्रीय मुख्य केंद्राला जोडलेली आहे. संस्थेची जी कामे चालतात त्यात ‘योगदा मॅगेझिन’ या त्रैमासिकाच्या प्रकाशनाचा व हिंदुस्थानातील निरनिराळ्या ठिकाणांच्या विद्यार्थ्यांकडे यो. स. सो./एस. आर. एफ. पाठ नियमितपणे महिन्यातून दोनदा टपालाने पाठविणे यांचा समावेश होतो. हे पाठ शक्तिवर्धन, धारणा व ध्यान यासंबंधीच्या तंत्राविषयी सविस्तर शिक्षण देतात.

त्यांच्या काटेकोर नियमबद्ध साधनेच्या योगाने क्रियायोगातील उच्च प्रतीच्या शिक्षणासाठी साधकाची आवश्यक ती सुरुवातीची तयारी होते. हे शिक्षण पुढील पाठांत सुपात्र साधकांसाठी दिलेले असते.

योगदाचे हे जे विविध शैक्षणिक, धार्मिक व मानवताविषयक कार्यक्रम आहेत, त्यांकरिता पुष्कळ शिक्षकांची व कार्यकर्त्यांची सेवा व निष्ठा यांची जरूरी असते. मी त्यांची नावे येथे देत नाही. कारण ती यादी बरीच मोठी आहे. पण माझ्या हृदयात त्यांच्यापैकी प्रत्येकासाठी एक विशिष्ट अशी उजळ जागा आहे.

श्री राईट यांची रांचीच्या बऱ्याचशा विद्यार्थ्यांशी मैत्री जमली. त्यांनी धोतर वगैरे नेसून त्यांच्या सहवासात काही दिवस घालविले. माझे चिटणीस श्री राईट हे सर्व ठिकाणी हिंडले. मुंबई, रांची, कलकत्ता, सेरामपूर, त्यांना हुबेहूब व समर्पक वर्णन करण्याची दैवी देणगी आहे. त्यांनी माझ्या प्रवासाची रोजनिशी लिहून ठेवली आहे. त्यात त्यांनी स्वतःचे असे काही अनुभव नमूद केले आहेत. एके दिवशी संध्याकाळी मी त्यांना प्रश्न केला.

“डिक, हिंदुस्थानबद्दल तुमचे काय मत आहे?”

“शांती,” त्यांनी विचारपूर्वक उत्तर दिले, “येथील लोकांची विचारसरणी शांतताप्रधान आहे.”



*यमुना नदीच्या पात्रातून नावेच्या सहलीवर श्री योगानंद, भगावन कृष्णाच्या जन्म आणि बालपणाशी संबंधित पवित्र शहर मथुरा येथे, 1935 मध्ये. (बसलेले, मधून उजवीकडे) अनंत लाल घोष (श्री योगानंदांचे वडील भाऊ) यांची कन्या; सानंद लाल घोष (योगानंदजींचे धाकटे भाऊ); आणि सी. रिचर्ड राइट*




परमहंस योगानंद

जवळपास असलेल्या दिहिका येथील 1917 मध्ये त्यांच्या स्थापित मुलांच्या पहिल्या शाळेच्या स्थानाला भेट देते वेळी, दामोदर, भारत येथे 18 डिसेंबर 1935 ला घेतलेले छायाचित्र. संपुष्टात येत असलेल्या बुरुजाच्या प्रवेशद्वारात ते ध्यानस्थ आहेत, जो एकेकाळी त्यांच्या एकांतासाठीचा आवडीचा कोपरा होता.



श्री योगानंद (केन्द्रस्थानी) आणि त्यांचे सेक्रेटरी, सी. रिचर्ड राइट (उजवीकडे, बसलेले), रांची मध्ये, 17 जुले, 1936. त्यांच्या सभोवताली श्री योगानंदांच्या स्थापित आदिवासी मुलींच्या शाळेचे शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी दिसत आहेत.



*योगदा सत्संग सोसायटीच्या मुलांसाठीच्या शाळेचे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासमवेत श्री योगानंद, सन 1936. योगानंदांनी स्थापना केलेली ही शाळा कासिमबझारच्या महाराजांच्या सहाय्यतेने 1918 साली पं. बंगाल मधील दिहिका येथून सद्ध्याच्या स्थानी स्थानांतरित केली गेली.*



*दक्षिणेश्वर येथील गंगातीरावरचा योगदा सत्संग मठ*
*योगदा सत्संग सोसयटी ऑफ इंडियाचे परमहंस योगानंदांनी 1939 मध्ये स्थापन केलेले रजिस्टर्ड कार्यालय*

1 आम्ही मध्येच भरतखंडाच्या अगदी मध्यभागी मध्यप्रांतात वर्ध्याला महात्मा गांधींना भेटण्यासाठी म्हणून उतरलो. त्या भेटीची हकीकत प्रकरण ४४ मध्ये दिली आहे.

2 जेव्हा गुरुजींच्याजवळ नाग येऊन ठेपला त्या वेळी त्यांच्याबरोबर जो मुलगा होता, तोच हा प्रफुल्ल.

3 शब्दशः "संपूर्ण नमन" मूळ संस्कृत धातू 'नम्' नमस्कार करणे किंवा खाली वाकणे. आणि प्र हा उपसर्ग; त्याचा अर्थ सपूर्णपणे.

4 परमहंस योगानंदांनी अशा कित्येक वस्तु अमेरिकेत सुद्धा अशा एका संग्रहालयात ठेवून दिलेल्या आहेत. पश्चिमी जगतातील हे संग्रहालय कॅलिफोर्नियामधील पैसिफिक पैलिसेडस लेक श्राईन येथे सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपच्या जागेत आहे. (प्रकाशकांची टीप)

5 त्यानंतर मुलांमुलीकरिता पुष्कळ योगदा शैक्षणिक संस्था भारतातील अनेक ठिकाणी स्थापन झाल्या. त्या फार चांगल्या चालल्या आहेत. त्या संस्थांत अगदी किंडरगार्टनपासून ते तहत कॉलेजपर्यंत शिक्षण दिले जाते.

6 'योगदा' हा शब्द योग या शब्दापासून तयार केला आहे. योग म्हणजे युती, संगती, समतोलत्व आणि 'दा' म्हणजे देणारी. 'सत्संग' हा शब्द सत म्हणजे सत्य व 'संग' म्हणजे सहवास, मैत्री अशा शब्दांपासून तयार झालेला आहे.

योगदा हा शब्द परमहंस योगानंदांनी १९१६ मध्ये बनविला. त्या साली त्यांनी मनुष्याचे शरीर हे विश्वचैतन्यामधून शक्तिसंचार पुन्हा पुन्हा करवून घेते या सिद्धान्ताचा शोध लाविला.

श्रीयुक्तेश्वरांनी आपल्या आश्रमसंस्थेचे नाव सत्संग (सत्याशी सहवास) ठेवले होते. त्यांचे शिष्य परमहंसजी यांनीही स्वाभाविकपणे तेच नाव राहू द्यावयाचे ठरविले.

योगदा सत्संग सोसायटी ऑफ इण्डिया ही काहीही नफा न घेणारी अशी एक संस्था आहे व ती कायम टिकावी अशी योजना आहे त्या संस्थेच्या नावाने योगानंदांनी भारतात आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोविली. आता त्या संस्थेचे संचालक मंडळ हे कार्य प.

बंगालमधील दक्षिणेश्वर येथील योगदा मठातून समर्थपणे चालवीत आहे. यो. स. सो. ची अनेक ध्यान केंद्रे भारतातील निरनिराळ्या भागांत निघालेली असून ती भरभराटीस येत आहेत.

पश्चिमेत संस्कृत शब्दांचा उपयोग टाळण्याच्या दृष्टीने योगानंदजींनी आपल्या ह्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संस्थेचे नाव 'सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप' असे ठेविले. १९५५ पासून श्री श्री दयामाता ह्या 'एस. आर. एफ.' व 'यो. स. सो.' या दोन्ही संस्थांच्या अध्यक्ष आहेत.

१९५४ मध्ये श्री प्रभासबाबू दक्षिण कॅलिफोर्नियामध्ये येऊन गेले. ते तेथे सात आठवडे होते. त्यांनी तेथील आंतरराष्ट्रीय मध्य केंद्राला भेट दिली होती आणि दिवंगत, पूजनीय झालेले अध्यक्ष श्री जेम्स जे. लिन यांच्याशी त्यांच्या भेटीगाठी झाल्या होत्या. त्याचे वर्णन कॅलिफोर्निआ, लॉस एंजेलिस, अमेरिका, येथील 'सेल्फ-रिअलायझेशन मैगेझिन'च्या चुलै-ऑगस्ट ११५४च्या अंकात दिले आहे. (प्रकाशकांची टीप)

## प्रकरण - ४१

# 41. दक्षिण हिंदुस्थानातील प्रवास

"डिक, त्या देवळात प्रवेश करणारा तू पहिलाच पाश्चिमात्य आहेस. आतापर्यंत पुष्कळांनी प्रयत्न करून पाहिले, पण कोणासही जमले नाही."

हे माझे शब्द ऐकून श्री राईट दचकल्यासारखे दिसले; पण लगेच त्यांना बरे वाटले. दक्षिण हिंदुस्थानातील म्हैसूर शहरावर वरून विहंगमावलोकन करणारे पहाडामधील सुंदर असे चामुंडीदेवीचे मंदिर पाहून आम्ही नुकतेच बाहेर पडलो होतो. चामुंडीदेवी ही म्हैसूरच्या राजघराण्याची कुलस्वामिनी आहे. देवीच्या देवळातले सिंहासन सोन्याचांदीचे आहे. त्याच्यापुढे वाकून आम्ही नमस्कार केला.

"ह्या अद्वितीय सन्मानाचे स्मारक म्हणून," मि. राईट काही गुलाबाच्या पाकळ्या नीट गुंडाळून ठेवून म्हणाले, "ह्या पाकळ्या मी निरंतर काळजीपूर्वक जपून ठेवीन. तेथल्या पुजाऱ्याने याच्यावर गुलाबपाणी शिंपडून प्रसाद म्हणून त्या मला दिल्या आहेत."

माझे सोबती व मी [1] असे दोघे म्हैसूरच्या महाराजांचे पाहुणे म्हणून तेथे एक महिना काढला. नोव्हेंबर १९३५. महाराजांचे वारस युवराज श्री श्रीकृष्ण नरसिंगराज वाडियार यांनी मला व माझ्या चिटणिसांना आपले सुविद्य व प्रगतिशील संस्थान पाहून जाण्याकरिता निमंत्रण दिलेले होते.

गेल्या पंधरवड्यात म्हैसूर शहरात मी टाऊन हॉलमध्ये, महाराज कॉलेजमध्ये, युनिव्हर्सिटी मेडिकल स्कूलमध्ये तेथील नागरिकांपुढे व विद्यार्थ्यांपुढे व्याख्याने दिली होती. त्याचप्रमाणे बंगलोरमध्ये अफाट समाजापुढे तीन व्याख्याने दिली होती. एक नॅशनल हायस्कूलमध्ये, दुसरे इंटरमिजिएट कॉलेजमध्ये व तिसरे चेट्टी टाऊन हॉलमध्ये ह्या व्याख्यानाला तर तीन हजार लोक आले होते.

अमेरिकेचे मनोहारी चित्र, मी जे रंगविले ते आतुरतापूर्वक ऐकण्यास आलेल्या त्या श्रोत्यांना पटले की नाही, हे काही मला समजले नाही. पण जेव्हा जेव्हा मी पाश्चिमात्य जग व पौर्वात्य जग यांना एकमेकांपासून परस्परांना लाभदायक असे अनेक गुण शिकण्यासारखे आहेत, या मुद्दयावर जोर दिला तेव्हा तेव्हा टाळ्यांचा कडकडाट अगदी जोराचा होत होता.

श्री राइट व मी असे दोघे आता विषुववृत्त कटिबंधात जी शांतता आहे त्या शांततेमध्ये विराम घेत होतो. म्हैसूरबद्दल त्यांना काय वाटले याची त्यांच्या रोजनिशीत हकीकत खालीलप्रमाणे आहे:

"परमेश्वराच्या ह्या सदैव बदलत जाणाऱ्या पडद्याकडे, सृष्टीवरील एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे नुसते पाहण्यात माझे कित्येक उन्मादकारी क्षण, अगदी जवळजवळ लक्ष न देताही व्यतीत झाले आहेत. हा पडदा असा आहे की, त्यावर वावरणाऱ्या आकृतींमध्ये केवळ त्याचा स्पर्शमात्रच नवजीवनाचा रंग भरू शकतो. मनुष्य त्या रंगांच्या नुसत्या बनावटींची जेव्हा नक्कल करू लागतो, तेव्हा रंगांचे ते यौवन नष्ट होऊन जाते; कारण परमेश्वर हे रंग जे

भरतो त्यांना काही तेलाची वा रोंगणाची जरुरी असत नाही. तो फक्त रंग भरण्याला प्रकाशकिरणांचा उपयोग करतो. परमेश्वराचे रंग भरण्याचे हे असे साधे पण प्रभावी माध्यम आहे. तो इकडे काही प्रकाशकिरणांचा झोत उडवून देतो की, त्याचा रंग तांबडा बनतो तर तो पुनः आपला कुंचला दुसरीकडे फिरवितो की झाला त्या लाल रंगाचा नारिंगी किंवा सोनेरी रंग. आणि मग तो ढगांवरती एक निळसर छटेचा वार करतो की त्या प्रहाराबरोबर जखम होऊन त्या जखमेतून एक लाल रंगाचे वलय निर्माण होते. आणि अशा तऱ्हेने तो नेहमी खेळत असतो; रात्री, दिवसा, सकाळी, संध्याकाळी; त्याचा हा खेळ सारखा चालू असतो. नेहमी खेळाचा प्रकार बदलतो; नेहमी नवीन नवीन, ताजेतवाने असे हे खेळ चालू असतात. त्यांत नक्कल अशी काही नाही. खेळांचा साचा, रंग, नेहमी अभिनव. हिंदुस्थानामध्ये निसर्गात हा जो सारखा फरक होत जातो; दिवसाचा रात्री, आणि रात्रीचा दिवसात; ह्या फरकांचे सौंदर्य काही आगळे आहे. ह्याला दुसरी उपमा अशी काही देता येण्यासारखी नाही. कधी कधी आकाशात इतके रंग भरून जातात की, जणू परमेश्वराने आपल्या पोतडीतले सारे रंग बाहेर काढून एका अजस्र कैलेडीओस्कोपमधील रंगांसारखे आकाशभर इतस्ततः उडवून दिले आहेत.

"एके दिवशी संध्याकाळी योगानंदजी व मी कृष्णराजसागर धरण [2] पाहण्याकरिता लहानशा सफरीवर निघालो. हे धरण म्हैसूर शहरापासून बारा मैलांच्या अंतरावर आहे. आम्ही एका लहान बसमध्ये बसलो आणि एका लहान मुलाला सरकारी पट्टेवाला म्हणून बरोबर घेतले. आमची गाडी सरळ धुळीच्या रत्स्यावरून धुळीचे झोत उडवीत निघाली. आकाशात सूर्यनारायणाचा रंग एखाद्या परिपक्व टोमॅटोसारखा दिसत असून तो टोमॅटो जसा दाबून फुटावा तसा देखावा क्षितिजावर दिसत होता.

"आमचा रस्ता सपाट, चौरसाकृती भातखाचरांतून, चित्तास आल्हादकारक अशा वटवृक्षांच्या राजीतून; मधूनमधून गगनाकडे झुकलेल्या उंच उंच अशा ताडमाडांच्या झाडांमधून जात होता. जवळजवळ सगळीकडे झाडी इतकी दाट होती की जणू जंगलच. शेवटी आम्ही एका टेकडीच्या टोकावर आलो व आमच्या दृष्टीसमोर एक विशाल असे कृत्रिम सरोवर आले. त्या सरोवरातील पाण्यात आकाशातील तारे, ताडमाडांच्या झाडांचे व इतर वृक्षांचे शेंडे प्रतिबिंबित झालेले दिसत होते. त्या सरोवराभोवती सुंदर बगीचांचे मजले व विद्युद्दीपांच्या रांगा दिसत होत्या.

"ह्या धरणाच्या कडेच्या खाली आम्ही एक देदीप्यमान दृश्य पाहिले. निरनिराळ्या रंगांचे झोत 'गायसर' सारख्या कारंजांवरून खेळविले होते. त्यांचा प्रकाश पाहिला की, निरनिराळ्या रंगांच्या जणू शायाच ओतल्या जात आहेत, असा भास होई. भडक निळ्या रंगाचे प्रपात—तसेच तांबड्या लाल रंगाचे प्रवाह, मधूनमधून हिरव्या व पिवळ्या रंगांचे तुषार फेकून दिले जात होते आणि ते आपल्या सोंडेतून पाण्याचा फवारा उडविणारे अजस्र शिलामय गजराज हे सारे दृश्य अति आकर्षक होते. हे धरण (त्यावरील प्रकाशमान कारंजी मला १९३३ मध्ये शिकागोत भरलेल्या जागतिक प्रदर्शनाची आठवण करून देत होती) हे अतिशयच आधुनिक पद्धतीचे आहे व त्यामुळे ह्या जुन्यापुराण्या देशात, भातखाचरांच्या व

रांगड्या लोकांच्या देशात अगदी उठून दिसते. हिंदी लोकांनी आमचे इतके प्रेमळ स्वागत केले की, मला अशी भीती वाटते की, योगानंदजींना परत अमेरिकेत नेण्यासाठी माझ्या अंगात आता ताकद राहणार नाही.

"आणखी एक गोष्ट; जिचा लाभ क्वचितच भाग्यवशात होतो, ती म्हणजे हत्तीवरची स्वारी. काल आम्हांला युवराजसाहेबांनी आपल्या वसंतप्रासादामध्ये मुद्दाम बोलाविले. त्यांच्या गजशाळेतील एका अवाढव्य हत्तीवर बसून रपेट करण्याकरिता त्यांनी आम्हांला बोलाविले होते. मी हौद्यात बसण्यासाठी वरती चढण्याकरिता लावलेल्या शिडीच्या पायऱ्यांवर पाऊल ठेवले. हौदा एखाद्या पेटीसारखा असून आतील बैठकीभोवती रेशमाचे तक्के ठेवलेले होते. हत्तीने चालावयास सुरुवात केल्याबरोबर त्याचे ते एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे झुलणे, मध्येच धक्का देणे; मध्येच थांबून दम घेणे आणि डोलणे सर्व काही अगदी रोमांचकारक; काही बोलायला किंवा काळजी करायला काही फुरसतच उरली नाही. ह्या दिव्यातून जीव बचावून बाहेर कसा पडतो ही काळजी!"

दक्षिण हिंदुस्थान ऐतिहासिक व प्राच्य अवशेषांच्या बाबतीत अति समृद्ध आहे. ह्या प्रदेशाचे एक निश्चित असे सौंदर्य आहे, अशी रमणीयता आहे की, तिचे वर्णन करता येण्यासारखे नाही. म्हैसूर संस्थानच्या वरती हैदराबाद संस्थान. हा एक चित्रविचित्र पठार प्रदेश असून त्यामधून प्रतापी अशी गोदावरी नदी वाहते. शिवाय विस्तृत सुपीक खोरी आहेत. रमणीय असा नीलगिरी पर्वत आहे. तसेच काही भागांत उघडेबोडके चुनखडीने व खडकाने भरलेले डोंगर आहेत. हैदराबादचा इतिहास फार जुना व मनोरंजक आहे. त्या इतिहासाला सुरुवात तीन हजार वर्षांपासून आंध्रवंशीय राजांच्या राजवटीपासून होते. त्यानंतर किती एक हिंदूधर्मीय राजघराणी. ती इ. स. १२९४ पर्यंत, त्या वर्षी हा प्रदेश एका मुसलमान राजवंशाच्या ताब्यात गेला.

अखिल भारतातील अगदी आश्चर्याने तोंडात बोट घालायला लावणारे कलाकौशल्य, शिल्पकला आणि चित्रकला, सर्व भारतामध्ये जर कोठे पाहायची असेल, तर ती हैदराबाद संस्थानात वेरूळ व अजंठ्याच्या जुन्या काळी डोंगरात खोदलेल्या लेण्यांमध्ये सापडेल. [3] एकाच दगडामधून कोरून काढलेल्या वेरूळच्या कैलास मंदिरातील देवांच्या मूर्ती, माणसे व पशू यांच्या अवाढव्य आकृती इतक्या मोठ्या आहेत की, त्या मायकेल अँजेलोच्या आकृतीशी अगदी सहज बरोबरी करतात. अजिंठ्याच्या लेण्यात पाच मंदिर व पंचवीस मठ आहेत; ही सगळी प्रचंड खडकात कोरलेली असून प्रचंड कातरून काढलेल्या खांबांवरती आधारून ठेविली आहेत. या खांबांवर कारागीर आणि शिल्पकार यांनी आपली कला अमर करून ठेवलेली आहे.

हैदराबाद शहराची भूषणे म्हटली म्हणजे एक उस्मानिया विश्व-विद्यालय व दुसरे म्हणजे भव्य अशी मक्का मसजिद. या मशिदीत दहा हजार मुसलमान प्रार्थनेसाठी पुष्कळदा एकत्र जमतात.

म्हैसूर संस्थानचा प्रदेश समुद्रसपाटीपासून तीन हजार फूट उंचीवर आहे व त्यात उष्ण कटिबंधातील घनदाट अरण्ये आहेत. या अरण्यात रानटी हत्ती, गवे, अस्वले, चित्ते व वाघ हे

संचार करीत असतात. संस्थानामधील दोन प्रमुख शहरे म्हणजे म्हैसूर व बंगलोर. ही दोन्ही शहरे मोठी स्वच्छ व रमणीय आहेत. त्या शहरांत सुंदर उद्याने व सार्वजनिक बागा आहेत.

कलाकौशल्य व शिल्पकला ही म्हैसूरमध्ये अकराव्या ते पंधराव्या शतकामधील हिंदू राजांच्या आश्रयाखाली अगदी कळसास पोचली होती. अकराव्या शतकात विष्णुवर्धन राजाच्या कारकीर्दीत बेलूर येथील मंदिराची रचना पूर्ण झाली. हे मंदिर म्हणजे त्या शतकातील कलाकृतीचा अगदी उत्कृष्ट नमुना आहे. या कलाकृतीत तपशिलाचा बारकावा व भरघोस कल्पनाशक्ती इतकी अप्रतिम आहे की, त्याला जगात इतरत्र कोठेही तोड नाही.

म्हैसूर संस्थानच्या उत्तर भागात जे शिलालेख कोरलेले आढळतात, ते कोरीव काम ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात झालेले आहे. ते लेख पाहिले असता सम्राट अशोकाची [4] स्मृती जागृत होते. अशोकाच्या अवाढव्य साम्राज्यात हिंदुस्थान, अफगाणिस्तान व बलुचिस्तान यांचा समावेश होत होता. अशोकाचे हे शिलालेख निरनिराळ्या लोकभाषांत खोदलेले आहेत; त्यावरून त्या काळात समाजामध्ये साक्षरता किती होती याचा बोध होतो. शिलालेख तेरावा; यात युद्धांचा निषेध केलेला आहे. “धर्माच्या विजयाखेरीज इतर कोणताही विजय खरा नाही” शिलालेख दहावा; यात असे म्हटले आहे की, राजाचा खरा पराक्रम, तो आपल्या प्रजेला तिची नैतिक पातळी उंच करण्यात किती मदत करतो यावर अवलंबून आहे. नवव्या शिलालेखात “खऱ्या दानाची” व्याख्या केली आहे. खरे दान म्हणजे काही मालमत्तेचे दान नव्हे; तर सत्त्वगुणाचे, सत्याच्या प्रसाराचे दान होय. सहाव्या शिलालेखात तो प्रजावत्सल सम्राट आपल्या प्रजेला सार्वजनिक कामाच्या चर्चेकरिता “कोणत्याही वेळेला, रात्री, दिवसा” पाचारण करीत आहे, व पुढे असे म्हणत आहे की, राजाची अशी कर्तव्ये प्रामाणिकपणे बजावीत असताना तो “आपल्या प्रजाजनांसंबंधीचे जे ऋण आहे त्यापासून स्वतःची मुक्तता करून घेत आहे.”

अशोक हा महाबलाढ्या चंद्रगुप्त मौर्याचा नातू. ह्या चंद्रगुप्ताने महान शिकंदराने हिंदुस्थानात ठेवून दिलेल्या राखीव शिबंदीला पिटाळून लावले व ख्रिस्तपूर्व ३०५ या साली आक्रमण करणाऱ्या सेल्यूकसच्या मैसिडोनियन सैन्याचा पराभव केला. ह्या चंद्रगुप्ताच्या पाटलीपुत्र [5] येथील दरबारात ग्रीक परराष्ट्र वकील म्हणून मेगॅस्थेनीस हा होता. त्याने जे त्याच्या वेळच्या हिंदुस्थानचे वर्णन लिहून ठेवले आहे. त्यावरून येथील लोक सुखी व धाडसी होते असे दिसून येते.

ख्रिस्तपूर्व २९८ साली विजयशाली चंद्रगुप्ताने आपल्या राज्याची सूत्रे आपल्या मुलाच्या स्वाधीन केली व त्याने दक्षिण हिंदुस्थानात म्हैसूरजवळ श्रवणबेळगोळा येथे एका दगडी गुहेमध्ये अगदी निष्कांचन अशा वैराग्याप्रमाणे आपल्या आयुष्याची शेवटली बारा वर्षे आत्मानुभव मिळविण्याच्या हेतूने घालविली. आज श्रवणबेळगोळा हे पवित्र ठिकाण समजले जाते. याच ठिकाणी जगातील सर्वांत मोठा असा प्रचंड शिलाखंडात कोरलेला भव्य दगडी पुतळा आहे. हा पुतळा जैनांनी इ. स. ९८३ या साली जैनमुनी गोमतेश्वर याच्या स्मरणार्थ स्थापिला.

शिकंदर ज्या वेळी हिंदुस्थानावर स्वारी करून आला, त्या वेळी त्याच्याबरोबर व त्याच्यानंतर आलेल्या ग्रीक इतिहासकारांनी आणि इतरांनी मनोरंजक गोष्टी बारकाईने लिहून ठेवलेल्या आहेत. एरियन, डिओडोरस, प्लूटार्क व स्ट्रेंबो जो भूगोलशास्त्रज्ञ होता यांनी जी वर्णने लिहून ठेवली आहेत, त्यांची भाषांतरे डॉ. जे. डब्ल्यू. मैकक्रिंडल [6] यांनी लिहून ठेविली आहेत. त्यांवरून प्राचीन भारतातील तत्कालिन लोकस्थितीवर चांगला प्रकाश पडतो. शिकंदरची ही स्वारी अयशस्वी झाली खरी, पण ह्या स्वारीचे वैशिष्ट्य असे आहे की, या स्वारीच्या निमित्ताने शिकंदराने भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय करून घेतला; येथल्या योगी, साधू पुरुषांच्या भेटी घेतल्या आणि त्यांच्या सहवासात तो राहिला. मैसिडोनचा हा योद्धा उत्तर हिंदुस्थानातील तक्षशिला या ठिकाणी आल्यावर, तेथील एक सुप्रसिद्ध संन्याशी दंडामीस याला बोलावण्याकरिता शिकंदराने डिओजिनिस याच्या हेलेनिक तत्त्वज्ञान प्रणालीचा एक शिष्य ओनेसिक्रिटोस यास पाठविले.

"हे ब्रह्मोपदेशक, आपले स्वागत असो!" दंडामीस यांना त्यांच्या अरण्यातील आश्रमामध्ये शोधून काढल्यावर ओनेसिक्रिटोस याने त्यांना अभिवादन केले. "पराक्रमी असा जो देव झ्यूज, त्याचा मुलगा शिकंदर जो सर्वलोकाधिपती आहे त्याने आपल्याला बोलावले आहे. जर आपण त्याच्याकडे जाल तर तो तुम्हांला मोठमोठ्या देणग्या देईल. जर आपण त्याचे आमंत्रण नाकारले तर तो तुमचे मुंडके उडवील!"

योग्याने हे सक्तीचे आमंत्रण शांतपणे ऐकून घेतले व आपल्या पर्णशय्येच्या आसनावर बसलेले असताना, आपले मस्तक किंचितसुद्धा वर केले नाही.

"जर शिकंदर झ्यूजचा पुत्र असेल तर तसा मीही आहे." त्याने बोलावयास सुरुवात केली. "जे शिकंदरजवळ आहे त्यांपैकी मला काहीही नको आहे; कारण माझ्याजवळ जे काही आहे त्यावर मी संतुष्ट आहे. तो शिकंदर आपले सैन्य घेऊन निरनिराळ्या मुलखांतून, समुद्रावरून सारखा भटकत आहे. कशासाठी, काही समजत नाही; त्याच्या ह्या भटकण्याचा शेवट म्हणून काही येत नाही.

"जा, त्या शिकंदरला सांग की, परम सत्ताधीश जो ईश्वर तो कोणतीही गर्वोद्धत अशी अनिष्ट गोष्ट करीत नाही; तो प्रकाश, शांती, जीवन, उदक, मनुष्यप्राणी व सर्व आत्मे यांना शरीरे निर्माण करतो. जेव्हा मानवप्राणी मरणोत्तर मुक्त होतो तेव्हा त्यांना तो आपल्याजवळ आणतो; तो प्राणी त्या वेळी कोणत्याही प्रकारच्या आधिव्याधीने बद्ध नसतो. मी ज्यास अभिवादन करावे असा तोच फक्त एक ईश्वर आहे. तो कत्तली करीत नाही की लढाया उकरून काढीत नाही.

"शिकंदर म्हणजे काही ईश्वर नाही; कारण त्याला मरणाची चव चाखावी लागणारच आहे." त्या साधूने आपले बोलणे चालू केले. त्याच्या बोलण्यात तिरस्कार आढळून येत होता. "त्याने जोपर्यंत आपल्या आंतरिक विश्वव्यापी साम्राज्याच्या सिंहासनावर आपले आसन स्थिर केले नाही, तोपर्यंत तो ह्या पृथ्वीचा मालक कसा होऊ शकेल? त्याने अजून पाताळात जाऊन राहून पाहिलेले नाही; तसेच ह्या पृथ्वीच्या कोणकोणत्या अफाट अशा भूप्रदेशांवरून

सूर्य भ्रमण करीत जातो, हे त्याला अजून माहीत झालेले नाही. ह्या पृथ्वीवरील कितीतरी देशांतील लोकांनी त्याचे नावही अद्याप ऐकले नसेल!”

अशा तऱ्हेने त्याची खरडपट्टी काढल्यावर, आणि ती खरडपट्टी अशी की, त्या ‘जगज्जेत्या’ शिकंदराच्या कानांनी इतकी तिखट कधी ऐकिली नसेल, त्या साधूने पुढे उपहासाने बोलावयाचे चालू केले. “जर शिकंदराचे सध्याचे साम्राज्य त्याच्या महत्त्वाकांक्षेला अपुरे वाटत असेल, तर त्याने गंगा नदी पार करावी; त्या नदीपलीकडे त्याला असा देश आढळून येईल की, जो त्याच्या साऱ्या सैन्याला [7] पोसू शकेल.

“तर हे समजून घे; ज्या देणग्या शिकंदर मला देऊ पाहत आहे त्यांचा मला काही उपयोग नाही. मी ज्या वस्तूंना किंमत देतो आणि ज्या खरोखरी मौल्यवान आहेत ती म्हणजे ही झाडे, जी मला आसरा देतात; ह्या फुलारणाऱ्या वनस्पती, ज्या मला दररोज अन्न पुरवितात आणि हे पाणी, जे माझी तहान भागविते. जिवाचा आटापिटा करून कमावलेली धनदौलत ही ती कमावणाऱ्याचा नाश घडवून आणते, तिच्यापासून यातना व दुःख मात्र होते. ज्यांच्या मनात खरीखुरी जागृती झाली नाही त्यांना हा त्रास होतोच.

“माझ्याबद्दल बोलावयाचे म्हणजे असे पाहा की, मी या रानातील पानांवर पहुडतो आणि काही जतन करावयाचे नसल्यामुळेच मला झोप अगदी शांत व गाढ अशी येते; ह्याच्या उलट मजजवळ जर काही मालमत्ता असती, तर तिच्या काळजीच्या ओझ्याने माझी झोप गेली असती. मला जे काही पाहिजे आहे ते मला ह्या जमिनीतून मिळते. जशी आई आपल्या अर्भकाला दूध पुरविते तद्वत मला ह्या माझ्या धरणीमातेकडून सर्व काही मिळते. मला जेथे जायचे असेल तिकडे मी अगदी निःशंकपणे जातो; कारण माझ्यापाठीमागे प्रपंचाची कटकट अशी नसते.

“शिकंदराने जरी माझे डोके उडविले, तरी तो माझ्या आत्म्याचा नाश करू शकत नाही. कत्तल केल्यावर माझे डोके अगदी शांत होईल आणि माझे हे शरीर एखाद्या फाटक्या वस्त्राप्रमाणे ह्या पृथ्वीवर पडून राहील. ह्या मातीतूनच ते प्रथम निर्माण झालेले होते. मी मग आत्मरूप होऊन परमात्म्याकडे धाव घेईन. त्यानेच हा आपला रक्तामांसाचा देह बनविला आणि ह्या पृथ्वीवर सोडून दिले आणि अशाकरिता की, त्याच्या आज्ञा आपण ह्या पृथ्वीवर राहून बरोबर पाळतो की नाही हे त्याला दिसावे. आणि हा देह सोडल्यावर आपल्याला आपल्या सर्व कृत्यांचा त्याच्यापुढे जाब द्यावा लागेल. उद्धट आणि जुलमी लोकांच्या कृत्यांचा तोच निवाडा करणारा आहे; दुःखीकष्टी लोकांचे आर्त स्वर तोच ऐकणार आहे; जुलमी लोकांचे पारिपत्य तोच करणार आहे.

“तर ज्या लोकांना संपत्तीचा लोभ आहे व जे मरणाला भीत असतील त्यांना वाटले तर शिकंदराने दमदाटी करून भिववून सोडावे. ब्राह्मणांच्या समोर त्याची हत्यारे कुचकामाची ठरतील. आम्हांला सोनेनाणे नको आहे. आम्ही मरणाला भीत नाही. तर जा येथून आणि त्या शिकंदराला असे सांग: तुझ्याजवळ जे काही आहे त्याची दंडामीसला काही जरुरी नाही आणि म्हणून तो तुझ्याजवळ येऊ इच्छीत नाही; आणि तुला जर दंडामीसकडून काही पाहिजे असेल तर तू त्याच्याकडे जा.”

ओनेसिक्रिटोसने हा निरोप रीतसर पोचविला. शिकंदराने तो सर्व लक्षपूर्वक ऐकून घेतला; आणि आता त्याला दंडामीसला भेटण्याची पूर्वीपेक्षा जास्त उत्कंठा लागली. आता दंडामीस वृद्ध होता; नंगा साधू होता; पण अनेक देश ज्याने पादाक्रांत केले होते अशा त्या जगज्जेत्या शिकंदराला, तोच एकटा प्रतिस्पर्धी भेटला की, ज्याच्यापुढे त्याची मात्रा काही चालेना.

शिकंदराने पुष्कळ ब्राह्मण संन्यासी तक्षशिलेला भेटावयास बोलाविले. हे ब्राह्मण तत्त्वज्ञानविषयक प्रश्नांना अगदी मुद्देसूद व विद्वत्ताप्रचुर उत्तरे देण्यात निष्णात होते. प्लूटार्कने अशा एका संवादाची हकीकत टिपून ठेविली आहे. सगळे प्रश्न शिकंदराने स्वतः तयार केले.

"अधिकसंख्याक कोण आहेत? जिवंत लोक की मेलेले लोक?"

"जिवंत; कारण मेलेले असे लोक असतच नाहीत."

"मोठ्या आकाराचे प्राणी कुठे उत्पन्न होतात? समुद्रात की जमिनीवर?"

"जमिनीवर; कारण समुद्र हा केवळ जमिनीचाच एक भाग आहे."

"सगळ्यांत हुशार पशू कोणता?"

"माणसाला अजून ज्याचा परिचय झालेला नाही असा कोणी एक प्राणी" (ज्याची ओळख झालेली नसते अशा वस्तूला मनुष्य भितो.)

"प्रथम काय निर्माण झाले; दिवस की रात्र?"

"दिवस हा एका दिवसाने अगोदर झाला." हे उत्तर ऐकून शिकंदर गारच पडला. त्यानंतर ब्राह्मणाने पुस्ती जोडली, "अशक्य प्रश्नांना अशक्यच उत्तरे द्यावी लागतात."

"मनुष्य हा आपल्याला लोकांचा आवडता असा कसा करू शकेल?"

"जो मनुष्य आपल्या ठिकाणी पुष्कळ सामर्थ्य असूनही आपल्याबद्दल इतरांच्या मनांत भीती उत्पन्न करीत नाही, तो मनुष्य सगळ्यांना प्रिय होतो."

"मनुष्य देव कसा होऊ शकेल?" [8]

"माणसाला जे करता येणे शक्य नाही ते करून दाखवून."

"अधिक सामर्थ्यवान कोण, जीवन की मरण?"

"जीवन, जीवनात अनेक अनिष्ट गोष्टी सहन कराव्या लागतात."

हिंदुस्थानातून आपल्याबरोबर एका खऱ्या योग्याला आपला उपदेशक म्हणून घेऊन जाण्यात शिकंदरला यश आले. हा योगी म्हणजे कल्याण (स्वामी स्फीनस); ज्याला "कालानोस" या नावाने ग्रीक इतिहासकार ओळखतात. हा योगी शिकंदराबरोबर इराणमध्येही आलेला होता. अमुक एका नियोजित दिवशी इराणमध्ये सुसा या शहरी समस्त मैसिडोनियन सैन्याच्या डोळ्यादेखत त्याने दग्ध चिते मध्ये प्रवेश करून आपल्या जीर्ण शरीराचा त्याग केला. इतिहासकारांनी असे नमूद करून ठेवले आहे की, अशा तऱ्हेने स्वतःस जाळून घेत असताना योग्याने हूं की चूं केले नाही; त्याला वेदनांची किंवा मृत्यूची भीतीच नव्हती. हे पाहून सर्व सैनिकांनी आश्चर्याने तोंडांत बोटे घातली. चितेमध्ये प्रवेश

करण्यापूर्वी कालानोसने आपल्या जिवलग मित्रांना प्रेमाने आलिंगन दिले, पण शिकंदरचा तसा निरोप घेतला नाही. त्याला तो फक्त एवढेच म्हणाला:

"मी तुला नंतर बाबिलोनमध्ये भेटेन."

शिकंदरने नंतर इराण सोडले व एक वर्षाने तो बाबिलोनमध्ये मरण पावला. भारतीय गुरूच्या म्हणण्याचा आशय म्हणजे भविष्यवाणी होती की, मी शिकंदराबरोबर त्याच्या हयातीत व त्याच्या मरणाच्या वेळी असेन.

ग्रीक इतिहासकारांनी हिंदुस्थानातील समाजस्थितीबद्दल पुष्कळ भरघोस व उत्साहपूर्ण वर्णन केले आहे. एरियन आपणांस असे सांगतो की, हिंदू कायदा हा समाजाचे रक्षण करतो आणि असा आदेश देतो की, समाजापैकी कोणीही व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत गुलाम ठेवू शकली जात नाही. सर्व व्यक्तींना समान स्वातंत्र्य असून प्रत्येक व्यक्तीने हा हक्क आपल्याबरोबर इतरांनाही तसाच आहे हे ओळखावयास पाहिजे." [9]

दुसऱ्या एका ठिकाणी असे नमूद केले आहे की, "भारतीय लोक व्याजबट्टयाचा धंदा करीत नाहीत व जेव्हा ते ऋण काढतात तेव्हा ते रीतसर कायदेशीर कागदपत्र करीत नाहीत. कोणावरही अन्याय करणे किंवा अन्याय केलेला उघड्या डोळ्याने निमूटपणे पाहणे, हे हिंदू लोकांच्या मूलभूत चालीरीतीच्या विरुद्ध आहे आणि त्यामुळे त्यांच्यात करारमदार वगैरे काही होत नाहीत की जामीन वगैरे घेत नाहीत." असेही लिहिले आहे की, रोग हे साध्या निसर्गोपचार पद्धतींनी बरे केले जातात. औषधे न वापरता आहारनियमन करून पुष्कळसे रोग बरे करतात. मलमे व मलमपट्टया बांधणे ह्यांचा उपयोग प्रशस्त समजला जातो. दुसरे इतर उपचार हानिकारक समजले जातात." युद्धामध्ये भाग घेणे हा व्यवसाय क्षत्रियांपुरताच मर्यादित आहे. जमिनीवर काम करीत असणाऱ्या कोणत्याही शेतकऱ्यास, चालून येणाऱ्या कोणत्याही शत्रूने इजा-दुखापत करू नये, असा दंडक आहे. कारण कृषिवल हा वर्ग लोकोपयोगी समजला जातो व त्यास कोणी इजा-दुखापत करीत नाही. जमिनीवर, शेतीव्यवसायावर असे कोणाचे आक्रमण होत नाही आणि जमिनीत पिकेही भरपूर येत असल्यामुळे लोकांना अन्नधान्याचा भरपूर पुरवठा होतो व जीवनोपयोगी आवश्यक अशा वस्तू मिळत असल्यामुळे जीवन सुखद होते."

म्हैसूरमधील ही अतिविशाल धार्मिक देवळे दक्षिण भारतातील अनेक मोठ्या संतांच्या स्मृतीला उजाळा आणतात. ह्यांपैकी थय्यूमनावर ह्या संताचे पुढील कवन अगदी अमर असे आहे.

मदांधा हत्तीसी सहजचि तुम्ही अंकित रता
रिस व्याघ्रादींची वदनकमले बंद करता।

भुजंगाशी क्रीडा, मृगपतिसही वाहन करा
तसे पोटासाठी विविध रसही प्राशन करा।।

तसे साऱ्या ठायी असुन बहुधा गुप्त करिता
तसे देवा साऱ्या अनुचर करा, यौवन सदा।

तसे चालू जाता जलधिवरुनी की वसतिला
करू जाता अग्नि; विविध अशिही दुर्घट जनी । ।
करा कृत्ये सारी; बिकट परि त्याहून असते
मनाच्या आवेगा दमन करणे जे सुखदसे ।

भारताच्या अगदी दक्षिण टोकाला त्रावणकोरचे अतिशय सुंदर व सुपीक असे संस्थान आहे. तेथे परिवहन नद्यांवरून व कालव्यांवरून चालते. येथील राजा दर वर्षी हातून घडलेल्या पापांचे व भूतकाळात अनेक मुलूख पादाक्रांत करून आपल्या राज्यांत सामील केलेल्या पातकांचे वंशपरंपरागत रिवाजानुसार प्रायश्चित्त घेतो. दर वर्षी छप्पन्न दिवस महाराज दररोज तीन वेळा मंदिरामध्ये येऊन वेदपठन ऐकतात व प्रायश्चित्त घेतात. नंतर एक लाख दीपांची दीपमाळ लावतात.

हिंदुस्थानच्या आग्नेय बाजूच्या किनाऱ्यावर मद्रास इलाखा आहे. ह्या इलाख्यात मैदानावर वसलेले, विस्तृत व समुद्राची कड असलेले मद्रास शहर व 'सुवर्णनगर' कांचीवरम हे शहर आहे. हे शहर पल्लव राजघराण्याचे राजधानीचे शहर होते. ह्या घराण्यातील राजांनी खिस्ती सनातील पहिली काही शतके राज्य केले. आजच्या मद्रास इलाख्यात महात्मा गांधींच्या अहिंसा तत्त्वप्रणालीने बराच प्रभाव दाखविला आहे. पांढऱ्या रंगाच्या वैशिष्ट्यपूर्ण 'गांधी टोप्या' सर्वत्र दिसून येतात. विशेषेकरून दक्षिणमध्ये महात्मा गांधींनी 'अस्पृश्या'च्या मंदिरप्रवेशाबद्दल व जातिभेदनिर्मूलनाच्या दृष्टीने बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या आहेत.

जातिसंस्थेचा उगम मनुस्मृतीमध्ये आढळून येतो. मनु हा प्राचीन काळातील सुप्रसिद्ध विधिज्ञ स्मृतिकार. त्याने ज्या उद्देशाने ही संस्था प्रस्थापित केली, ते उद्देश खरोखरीच स्तुत्य होते. त्याला असे आढळून आले की, माणसांचे त्यांच्या नैसर्गिक उत्क्रांतिअवस्थेच्या दृष्टीने चार प्रमुख भाग पडतात. जे प्रत्यक्ष शरीरकष्ट करून समाजाची सेवा करतात, ते शूद्र; जे समाजाची सेवा मानसिक दृष्ट्या, आपले कौशल्य वापरून कृषी, व्यापार, वाणिज्य, उद्योगधंदा करून करतात ते वैश्य; ज्यांची बुद्धी राज्यकारभारांत उपयोगी पडते; किंवा इतर कारभारांत उपयोगी पडते व जे समाजाचे संरक्षण, शिपाई किंवा सैनिक होऊन, लढाईवर जाऊन करतात, ते क्षत्रिय; आणि ज्यांचा स्वभावधर्म, आध्यात्मिक चिंतनाकडे नैसर्गिक दृष्ट्या असतो, ज्यांना आध्यात्मिक स्फूर्तीची देणगी असते व जे दुसऱ्यांमध्ये आध्यात्मिक स्फूर्ती निर्माण करतात, ते ब्राह्मण. महाभारतात म्हटले आहे "जन्म किंवा संस्कार किंवा अध्ययन किंवा कुल हे एखाद्याचा वर्ण, तो द्विज आहे की नाही हे निश्चित करू शकत नाही. फक्त त्याचे शील व त्याचा आचार ते निश्चित करू शकते." [10] मनूने समाजास असा आदेश दिला होता की, फक्त अशाच व्यक्तीस समाजाने मान द्यावा की, ज्यांच्या ठिकाणी सुज्ञता, गुणवत्ता, वडीलपणा किंवा ज्येष्ठ आप्तसंबंध व सर्वांत शेवटी ज्यांच्याजवळ संपत्ती आहे. वैदिक काळात भारतामध्ये संपत्तीचा, तिचा नुसताच संग्रह केल्यास किंवा ती परोपकाराकरिता न वापरल्यास, निषेध केलेला आहे. स्वार्थी, अनुदार लोकांना, मग त्यांच्याजवळ कितीही पैसा असेना का, समाजात खालचा दर्जा दिलेला आहे.

ज्या वेळी जातिसंस्था आनुवंशिकतेवर—जन्मावर आधारली गेली तेव्हा ती अगदी साचेबद्ध झाली व त्यामुळे अनिष्ट परिणाम घडून आले. १९४७ पासून भारत आता स्वयंसत्ताक झालेला आहे व तो आता जातिसंस्थेच्या पूर्वीची, म्हणजे उच्चनीचत्व केवळ जन्मावर अवलंबून नसून ते नैसर्गिक गुणवत्तेवर अवलंबून आहे, अशा मूल्यांवर आधारलेली नवीन समाजरचना घडवून आणीत आहे व त्या दृष्टीने त्याने निश्चितच प्रगतीही केलेली आहे. ह्या भूतलावरील प्रत्येक राष्ट्राला आपले स्वतःचे असे वैशिष्ट्यपूर्ण दुःखदायक असे कर्म आचरावे लागते व ते सन्मानपूर्वक, त्याचा अनादर न करता संपवून टाकावे लागते. भारत सुद्धा आपल्या वैचित्र्यपूर्ण व दुर्दमनीय अशा जिद्दीने ह्या जातिसंस्थेच्या सुधारणेच्या प्रश्नाशी समर्थपणे सामना करीत आहे.

दक्षिण भारतातील भूप्रदेश इतका रमणीय आहे की श्री राईट यांना व मलाही हा आमचा ग्रामीण प्रवास अधिक लांबवावा असे वाटले. पण आम्हांला वेळ असा बिलकुल नव्हता. त्याने पूर्वापारच्या आपल्या उद्धट पद्धतीनुसार आमचा दौरा वाढविण्याच्या योजनेत खो घातला. कलकत्ता युनिव्हर्सिटीत भरलेल्या अखिल भारतीय तत्त्वज्ञानविषयक काँग्रेसच्या शेवटल्या अधिवेशनाला हजर राहून मला भाषण करावयाचे होते. म्हैसूरच्या सफरीच्या शेवटी इंडियन ॲकेडेमी ऑफ सायन्सचे अध्यक्ष सर चं. व्यं. रमण यांची मी भेट घेतली. त्यांच्याशी माझे बोलणे झाले. मला फार आनंद वाटला—ह्या हुशार पदार्थविज्ञानशास्त्रज्ञाला १९३० मध्ये त्यांच्या “रमण इफेक्ट” या शोधाबद्दल नोबेल प्राईझ दिले गेले. हे महत्त्वाचे संशोधन प्रकाशाच्या विरलीकरणा (diffusion) बाबत आहे.

मद्रासमध्ये तेथे जमलेल्या विद्यार्थ्यांच्या समुदायाचा श्री राईट व मी, दोघांनी मोठ्या नाखुशीने निरोप घेतला व आम्ही उत्तरेकडे प्रवास सुरू केला. वाटेत आम्ही एक लहान मंदिर पाहण्यासाठी थांबलो. हे मंदिर अठराव्या शतकातील एक सुप्रसिद्ध संत सदाशिव ब्रह्मन् [11] यांच्या स्मरणार्थ बांधले आहे. त्यांच्या चमत्कारांच्या पुष्कळ गोष्टी सांगतात. ह्यापेक्षाही मोठे असे सदाशिवमंदिर नेरूरला आहे. ते पुदुकोट्याच्या राजाने बांधलेले आहे. ते मोठे यात्रेचे ठिकाण असून तेथे दैवी उपचाराने रोग बरे केले जातात, अशी ख्याती आहे. सदाशिव ब्रह्मन् यांनी १७५० साली त्या वेळच्या राजाला, त्याच्या उपयोगासाठी म्हणून जे धर्मविषयक नियम घालून दिले व त्याचे टिपण करून दिले ते त्या राजाचे नंतरचे वारस अत्यंत पवित्र मानतात व ते त्यांनी अगदी एखाद्या मौल्यवान ठेव्याप्रमाणे जतन करून ठेविले आहेत.

सदाशिव ब्रह्मन् हे मोठे प्रेमळ व पूर्णावस्थेला पोचलेले असे योगी होते. त्यांच्या पुष्कळशा चमत्कारांच्या गोष्टी तेथील दक्षिण भारतीय शेतकऱ्यांमध्ये विश्रुत आहेत. एके दिवशी ते कावेरी नदीच्या तीरावर समाधी लावून बसले असताना नदीला एकदम पूर आला व ते वाहून गेले. काही आठवड्यां नंतर ते कोईंबतूर जिल्ह्यात कोडूमुडी नावाच्या गावी मातीच्या एका ढिगाऱ्यात खोल खाली गाडून गेलेले आढळून आले. गावच्या लोकांनी कुदळी मारून मातीचा ढीग फोडून त्यांना उकरून काढले. त्याबरोबर ते एकदम उठले व मोठ्या वेगाने चालावयास लागून दूर निघून गेले.

एकदा त्यांनी एका वयस्क अशा वेदान्ती—प्रकांडपंडिताशी वितंडवाद घातला, तेव्हा त्यांच्या गुरूने त्यांची निर्भर्त्सना केली. तेव्हापासून सदाशिव ब्रह्मन् यांनी मौन धारण केले. गुरू त्यांना बोलले, “पोरा, सैल सुटलेली तुझी ही जीभ आवरायला तू केव्हा शिकणार?”

“आपल्या आशीर्वादाने, आतापासूनच.”

सदाशिव ब्रह्मन् यांच्या गुरूचे नाव स्वामी श्रीपरमशिवेंद्र सरस्वती. त्यांनी ‘दहरविद्या प्रकाशिका’ नावाचा ग्रंथ व ‘उत्तरगीते’वर एक विद्वत्ताप्रचुर भाष्य लिहिले आहे. परमेश्वरभक्तीने मूढ झालेले सदाशिव ब्रह्मन्, हे पुष्कळदा रस्त्यावर ‘दिगंबर’ स्थितीत नाचताना आढळून येत; तेव्हा काही लोकांना ते फार अशिष्ट वाटे व त्यांनी त्यांच्या गुरूकडे त्यांच्याविरूद्ध तक्रार नेली. त्यांनी सांगितले, “महाराज, सदाशिव हा एक वेडा माणूस आहे.”

पण परमशिवेंद्र गमतीने हसले आणि म्हणाले, “अरेरे, असे वेडेपण इतरांच्या ठिकाणी असते तर काय बहार झाली असती!”

सदाशिव ब्रह्मन् यांच्या आयुष्यात पुष्कळ विलक्षण व सुंदरशा घटना घडून आल्या; त्यांमध्ये दैवी शक्तीचा हात होता असे दिसून येते. या जगात जागोजाग अन्याय घडून येत आहे असे वाटते; पण परमेश्वरास अन्याय ताबडतोब दिसून येतो व अशा त्याच्या न्यायबुद्धीची असंख्य उदाहरणे त्याचे भक्त लोकांपुढे दाखवून देतात. एकदा रात्रीच्या वेळी समाधिअवस्थेतच ते एका श्रीमंत गहस्थाच्या धान्याच्या कोठारापाशी थांबले. त्याचे तीन नोकर चोरांच्या शोधात होते. त्यांच्या दृष्टीला हे साधुबोवा पडले. त्यांना वाटले की हा चोरच आहे. म्हणून त्यांनी त्याच्यावर काठ्या उगारल्या पण पाहा काय आश्चर्य! त्यांचे हातच जड होऊन तिथल्या तेथेच स्थंभित झाले. अगदी पुतळ्यासारखे त्यांचे हात वरच्यावरच अधान्तरी तरंगत राहिले. ते तिघे नोकर त्या अवस्थेत सदाशिव ब्रह्मन् पहाटेच्या वेळी तेथून निघून जाईपर्यंत तसेच राहिले.

दुसऱ्या एका प्रसंगी एका लाकडाच्या कंत्राटदाराने त्यांना वेठीला धरले. त्याचे इतर मजूर लाकडाच्या मोळ्या डोक्यावर वाहून नेत होते. ह्या महाराजांनी अगदी शांतपणे डोक्यावर मोळी वाहून नेली आणि मुक्कामाला पोचल्यावर लाकडांच्या एका मोठ्या ढिगाऱ्यावर ती मोळी ठेवून दिली. ठेवल्याबरोबर त्या सगळ्या लाकडांनी पेट घेतला व सर्व लाकूड जळून गेले.

सदाशिव ब्रह्मन् त्रैलंग स्वामींप्रमाणे दिगंबर, नग्न असत. एकदा एके दिवशी सकाळी हे दिगंबर साधुबोवा एका मुसलमान नबाबाच्या राहुटीत शिरले. तेथल्या दोन स्त्रियांनी घाबरून आरडाओरडा केला. त्या नबाबाने सदाशिव ब्रह्मन् यांच्यावर तलवारीने एक असा अमानुष प्रहार केला की, त्यांचा एक हात अगदी खांद्यापासून तुटून खाली जमिनीवर पडला व सदाशिव ब्रह्मन् काही पर्वा न करता तिथून निघाले. त्या नबाबाचे हृदय आश्चर्याने व पश्चात्तापाने भरून आले. त्याने तो तुटलेला हात उचलला व तो सदाशिव ब्रह्मन् यांच्या पाठोपाठ जाऊ लागला. नंतर योगीराजांनी सावकाश तो हात रक्तबंबाळ झालेल्या खांद्यावर पुनरपि जसा पूर्वी होता तसा बसविला. त्या नबाबाने मग जेव्हा नम्रतेने आपणास काही बोध करावा म्हणून विनविले, तेव्हा त्यांनी वाळूमध्ये बोटांनी लिहून दाखविले.


"तुला जे करावेसे वाटते ते तू करू नकोस. मग तू वाटेल ते कर."

त्या मुसलमान नबाबास ह्या बोधामृताने वरच्या विशुद्ध अशा मनःस्थितीप्रत नेले. सकृतदर्शनी या उपदेशात विरोधाभास दिसत होता; पण त्याचा सांकेतिक अर्थ असा होता की, तुम्ही अहंकारावर जय मिळवा की मोक्षाचा दरवाजा आपोआप उघडेल. ह्या थोड्या पण वेचक शब्दांचा त्या लढवय्यावर इतका प्रभाव पडला की, तो त्यांचा एक सुयोग्य असा शिष्य बनला. त्याचे पूर्वीचे चरित्र सगळे बदलून गेले.

एकदा गावातल्या मुलांनी सदाशिव ब्रह्मन् यांच्याकडे हट्ट धरला कि आम्हांला मदुरेला धार्मिक महोत्सव पाहायला घेऊन चला. आता मदुरा राहिली १५० मैलांच्या अंतरावर. योगिराजांनी मुलांना सांगितले कि माझ्या अंगाला स्पर्श करा, आणि पाहा काय चमत्कार! एका क्षणात ती सगळी बाळगोपाळ मंडळी मदुरेत जाऊन पोचली. त्या हजारो यात्रेकरूंत ती मुले इकडे-तिकडे मजेत हिंडली. काही तासांनी योगिराजांनी त्या सगळ्या मुलांना अगदी साध्या वाहून नेण्याच्या पद्धतीने घरी परत आणले. मुलांनी घरी आपल्या आईबापांना मदुरेतील रथयात्रेची रसभरित वर्णने सांगितली. त्यांपैकी कित्येक मुलांनी यात्रेत घेतलेले मिठाईचे पुडेच्या पुडे आपल्या आईबापांना दाखविले, तेव्हा ते अगदी आश्चर्याने थक्क झाले.

एक नास्तिक तरुण इसम होता. त्याने योगीराजांची वरच्या हकीकतीवरून गंमत करावयाचे ठरविले. पुढल्या महोत्सवाच्या प्रसंगी; त्या वर्षी महोत्सव श्रीरंगम्ला भरला होता; तो सदाशिव ब्रह्मन् यांच्याकडे आला व छद्मी भावनेने म्हणाला, "महाराज, या मुलांना जसे तुम्ही मदुरेला नेले तसे मला श्रीरंगम्च्या महोत्सवाला का नेत नाही?"

सदाशिवांनी न्यायचे कबूल केले. झाले; त्या तरूण माणसाला त्यांनी एकदम त्या दूरवरच्या शहरात यात्रेच्या गर्दीत उभे केले. पण हाय! त्या तरूण माणसाला परत जायच्या वेळी योगिराज कुठे होते? त्याअगोदरच थकून गेलेल्या तरूणाला सगळा रस्ता, सगळे अंतर, कंटाळवाण्या अशा पायांच्या चालीने घरी परत यायला, पार करावे लागले.



*रमण महर्षि आणि श्री योगानंद,*
*श्री रमणांच्या अरुणाचल आश्रमात*



*स्वामी श्रीयुक्तेश्वर आणि परमहंस योगानंद धार्मिक मिरवणुकीत, कोलकाता, 1935*

1 कुमारी ब्लेच यांना माझा व श्री राईट यांचा तुफानी दौरा झेपेना, तेव्हा त्या कलकत्त्यालाच माझ्या नातेवाईकांकडे राहिल्या.

2 ह्या धरणावर पाण्याच्या दाबाने वीज उत्पन्न करण्याचा मोठा प्रकल्प आहे. त्या विजेवर म्हैसूर शहरातील दिवे चालतात. तसेच त्या विजेवर रेशीम, साबण व चंदनी तेलाचे कारखाने चालतात.

3 १९५० मध्ये सीमा रेषांचे पुनःनिर्धारण झाल्या पासून ह्या लेण्यां महाराष्ट्र राज्यात आहेत. (प्रकाशकीय टिपण)

4 सम्राट अशोकाने हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या प्रदेशांतून ८४००० स्तूप बांधविले. त्यांपैकी १४ शिलालेख व दहा दगडी स्तंभ फक्त आज उरलेले अवशेष आहेत. प्रत्येक स्तंभ म्हणजे बांधणीचा, वास्तुशास्त्राचा, शिल्पशास्त्राचा एक अजब नमुना आहे. तसेच त्याने पुष्कळ तलाव, धरणे व कालवे बांधून काढले; दूरवर जाणारे रस्ते बांधले व त्या रस्त्यांवरील प्रवाशांकरिता सावलीसाठी जागोजाग झाडे लावली व उतरण्याकरिता धर्मशाळा बांधल्या; औषधांकरिता वनस्पतींच्या मोठमोठ्या बागा तयार करविल्या आणि प्रजेकरिता व दीनदुबळ्या प्राण्यांकरिता सुद्धा रूग्णालये बांधली.

5 ह्या पाटलीपुत्र शहराचा (आजचे पाटणा) मोठा मनोरंजक इतिहास आहे. भगवान बुद्धाने ह्या शहरास ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात भेट दिली होती. त्या वेळी हे ठिकाण म्हणजे साधारण प्रतीचा किल्ला होता. त्याने त्या वेळी असे भविष्य करून ठेवले होते की, “जेथपर्यंत आर्यलोक वसाहत करीत जातील, जेथपर्यंत व्यापाऱ्यांचे तांडे प्रवास करीत जातील, तेथपर्यंत त्यांच्या दृष्टीने पाटलीपुत्र हे प्रमुख शहर राहील. आपल्या सर्व तऱ्हेच्या मालांच्या अदलाबदलीचे हे प्रमुख केंद्र राहील.”

(महापरिनिर्वाण सूत्र). दोन शतकांनंतर पाटलीपुत्र हे चंद्रगुप्त मौर्याच्या अवाढव्य साम्राज्याचे राजधानीचे शहर बनले. त्याचा नातू जो सम्राट अशोक याने ह्या राजधानीचे वैभव व सौंदर्य आणखी वाढविले.

6 प्राचीन भारत. (Ancient India) ६ भाग (कलकत्ता: चक्रवर्ती चैतर्जी अँड कं. १५ कॉलेजस्क्वेअर: १८७९, द्वितीय प्रकाशन १९२७.)

7 शिकंदर किंवा त्याचा कोणी सेनापती गंगा पार करून पलीकडे गेला नाही. हिंदुस्थानच्या वायव्य भागात निकराचा प्रतिकार होत आहेसे पाहून, मैसिडोनियन सैन्याने बंड उभारले व आता पुढे कुठेच जाण्याचे नाकारले; आणि शिकंदराला हिंदुस्थान सोडून देणे भाग पडले. त्याने पुढे इराणमध्ये मुलूख पादाक्रांत केला.

8 ह्या प्रश्नावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, 'इय़ूजच्या पुत्राला' स्वतःच्या पूर्णत्वप्राप्तीबद्दल मधून मधून शंका येत असे.

9 भारतात गुलामगिरीची चाल नाही याबद्दल सर्व ग्रीक इतिहासकार स्तुती करतात. ग्रीक समाजरचनेपेक्षा अगदी भिन्न अशी भारतीय समाजरचना होती.

प्रो. बिनयकुमार सरकार यांनी 'क्रिएटिव्ह इंडिया' म्हणून एक पुस्तक लिहिले आहे व त्या पुस्तकात भारताच्या प्राचीन व आधुनिक काळास सदृश अशा कामगिरींचे व अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, वाङ्मय, कला व सामाजिक तत्त्वज्ञान अशा विविध शास्त्रामधील भारताचे जे वैशिष्ट्य आहे त्याबद्दल सविस्तर वर्णन दिलेले आहे. (लाहोर: मोतीलाल बनारसीदास, प्रकाशक १९३७, पृष्टे ७१४).

एस. व्हे. वेंकटेश्वर यांचे 'इंडियन कल्चर थ्रू द एजेस' (न्यूयॉर्क, लाँगमन्स, ग्रीन अँड कं.) ह्याही पुस्तकाची शिफारस केली आहे.

10 अगदी पुरातन काळात व्यक्तीचा वर्ण जन्मावरून ठरत नसे, तर त्याच्या नैसर्गिक कर्तृत्वशक्तीवरून. जी कर्तृत्वशक्ती, त्याने आपल्या आयुष्यात जे ध्येय ठरविले असेल, ते संपादन करण्यात दाखविली तिच्यावरून ठरत असे. 'ईस्ट-वेस्ट' मासिकाच्या जानेवारी १९३५च्या अंकातील एका लेखावरून असे दिसून येते. हे ध्येय खालील प्रकारचे असू शकेल. (१) 'काम' म्हणजे कर्मेंद्रियांशी रत होऊन जीवन जगणे (शूद्रावस्था). (२) 'अर्थ' म्हणजे अर्जन, वासनांची पूर्ती करणे पण त्यांच्या सर्वस्वी आहारी न जाणे (वैश्य अवस्था). (३) 'धर्म' म्हणजे संयम, जबाबदारीचे व योग्य कर्तव्य बजावण्याचे जीवन (क्षत्रिय अवस्था). (४) 'मोक्ष' म्हणजे मुक्ती म्हणजे आध्यात्मिक व धर्मोपदेशकाचे जीवन (ब्राह्मण अवस्था). अशा तऱ्हेने हे चारी वर्ण (क) शरीर, (ख) मन, (ग) इच्छाशक्ती, (घ) आत्मतत्त्व यांच्या द्वारा मानवतेची, समाजाची सेवा करतात.

ह्या चारी अवस्थांचा तमस्, रजस् व सत्त्व या बाह्य गुणांशी अनुक्रमिक संबंध आहे. विरोध, क्रियाशक्ती आणि विकास, किंवा घनत्व, शक्ती आणि बुद्धी असे हे बाह्य गुण आहेत. हे चारी निसर्गानुरूप बसविलेले वर्ण ह्या गुणांपैकी काही विशिष्ट गुणांनी दर्शविले जातात. उदाहरणार्थ: (१) तमस् — (अज्ञान), (२) तमस्-रजस् (अज्ञान व क्रियाशक्ती यांचे मिश्रण), (३) रजस्-सत्त्व (योग्य कर्तव्य व बोध) यांचे मिश्रण, (४) सत्त्व, (बोध, प्रकाश) अशा तऱ्हेने निसर्गाने प्रत्येक व्यक्तीस अमुक एक विशिष्ट असा वर्ण मूळचाच दिलेला आहे. म्हणजे त्याच्यामध्ये निसर्गतःच ह्या गुणांपैकी एक किंवा अधिक गुणांचे प्राधान्य आहे. अर्थात प्रत्येक मनुष्यामध्ये हे तिन्ही गुण कमी-अधिक प्रमाणात असतातच. कोणत्याही व्यक्तीचा वर्ण किंवा त्याची उत्क्रांतावस्था गुरू बरोबर निश्चित करू शकतो.

"काही एका प्रमाणात सर्व मानववंश व राष्ट्रे ही वर्णव्यवस्था आचरणात आणीतच असतात. जेथे व्यक्तिस्वातंत्र्य अनिर्बंध आहे; विशेषेकरून जेथे अतिशय उच्च व अतिशय नीच अशा जातीमध्ये आंतरजातीय विवाह घडून आले तर ती जातच हळूहळू कमी होत जाते व शेवटी नाहीशी होते. पुराणसंहितेमध्ये अशा संततीची वर्णसंकराशी तुलना केलेली आहे. उदाहरणार्थ: खेचर, जे पुढे वंश वाढवू शकत नाही. कृत्रिम जाती शेवटी नाश पावतात. इतिहासामध्ये अशा मोठ्या वंशांची, की ज्यांचे वारस आजच्या घटकेस अस्तित्वात नाहीत, अशी अनेक उदाहरणे आहेत. हिंदुस्थानामधील ह्या वर्णव्यवस्थेची प्रगल्भ अशा विचारवंतांनी स्तुतीच केली आहे. ह्या व्यवस्थेमुळे अनिर्बंध विवाहसंबंधांना असा आळा बसतो की, जेणेकरून वंशाचे शुद्धत्व टिकविले जाते आणि त्यामुळे हजारो वर्षांच्या अनेक घडामोडीतून तो वंश टिकून राहतो; आणि ज्या प्राचीन वंशांनी अशा प्रकारची वर्णव्यवस्था पाळली नाही ते वंश आज नामशेष झालेले आहेत."

11 त्यांचे व्यावहारिक नाव स्वामी श्रीसदाशिवेंद्र सरस्वती असे होते; व त्या नावानेच त्यांनी आपले ग्रंथ लिहिले. (ब्रह्मसूत्रे व पातंजलीप्रणीत योगसूत्रे यांवरील भाष्ये.)

शृंगेरी मठाचे दिवंगत शंकराचार्य, श्रीचंद्रशेखर स्वामीनाथ भारती, म्हैसूर यांनी सदाशिव ब्रह्मन् यांस अर्पण म्हणून एक स्फूर्तिदायक कवन केलेले आहे.

प्रकरण - ४२

# 42. गुरुजींच्या सहवासातील शेवटले दिवस

"गुरुजी, आज सकाळी तुम्ही एकटेच आहात हे पाहून मला किती बरे वाटले." मी नुकताच सेरामपूरच्या आश्रमात येऊन पोचलो होतो. बरोबर मी चांगल्या फळांची व सुवासिक फुलांची करंडी आणली होती. श्रीयुक्तेश्वर माझ्याकडे अगदी निमूटपणे पाहात होते.

"काय प्रश्न आहे तुझा?" गुरुजी खोलीत सभोवार न्याहाळीत होते; जणू कुठून तरी त्यांना बाहेर पडावयाचे होते.

"गुरुजी, मी जेव्हा प्रथम तुमच्याकडे आलो तेव्हा हायस्कूलमधील विद्यार्थी होतो. आता मी चांगला वयातीत मनुष्य झालो आहे, माझे एक-दोन केसही पांढरे झाले आहे. अगदी पहिल्या घटकेपासून आतापर्यंत तुम्ही माझ्यावर इतके प्रेम दाखविले आहे, इतका लोभ दाखविला आहे! कोणाच्याही ध्यानात यायचे नाही, पण एकदा तरी आपली भेट झाली असताना तुम्ही प्रत्यक्ष शब्दांनी कधी म्हटले आहे का की, मला तू आवडतोस." आर्जवी स्वरात मी त्यांच्याकडे पाहात होतो.

गुरुजींनी आपली नजर खाली केली. "योगानंद, माझ्या ह्या निःस्तब्ध हृदयात, अगदी जतन करून ठेवलेल्या ज्या तुझ्याबद्दलच्या माझ्या सुखद नि प्रेमळ भावना आहेत त्या शब्दावडंबराच्या भावहीन पद्धतीने व्यक्तच करावयास पाहिजेत काय?"

"गुरुजी, मला माहीत आहे की, तुमचे माझ्यावर प्रेम आहे, पण माझ्या ह्या मर्त्य शरीराच्या कानांना ते शब्द प्रत्यक्ष ऐकायची तळमळ लागली आहे."

"जशी तुझी इच्छा. मी जेव्हा संसारात होतो, तेव्हा मला नेहमी वाटायचे की मला एक मुलगा असावा; त्याला मी योगमार्गावर बरोबर तयार केला असता, पण माझ्या आयुष्यात तू जेव्हा पदार्पण केलेस तेव्हा मला समाधान वाटले. तुला मी माझा मुलगाच समजतो." श्रीयुक्तेश्वरांचे डोळे भरुन आले. "योगानंद, तुझ्यावर माझे सदैव प्रेम आहे."

"आपले हे शब्द म्हणजे स्वर्गामध्ये जाण्याचा जणू परवानाच आहे." माझ्या हृदयावरचे एक जड ओझे उचलले गेल्यासारखे मला वाटले. त्यांच्या ह्या शब्दांनी ते कठीण काम करून टाकले. मला माहीत होते की, त्यांचा स्वभाव आपल्या मनोभावना शब्दांनी व्यक्त करण्याचा नाही व ते त्या आपल्या मनातच ठेवतात. पण त्यांच्या ह्या गप्प बसण्याचे मला पुष्कळदा नवल वाटे. कधी कधी मला अशी शंका वाटायची की, मी त्यांना सर्वस्वी संतुष्ट करू शकलो नाही; आणि मग माझे मन भ्यायचे, त्यांचा स्वभाव जरासा विलक्षण होता; कोणाला कधी त्याचा पत्ता लागायचा नाही; फार खोल आणि शांत; बाहेरच्या जगाला त्यांच्या विचारांचा थांग लागायचा नाही. ऐहिक वस्तूंचे मूल्यमापन त्यांनी मागेच करून टाकले होते.

त्यानंतर काही दिवसांनी कलकत्त्याला ॲल्बर्ट हॉलमध्ये एका मोठ्या समुदायापुढे माझे भाषण झाले. व्यासपीठावर संतोषचे महाराज व कलकत्त्याचे महापौर बसले होते. त्यांच्याबरोबर व्यासपीठावर बसायचे श्रीयुक्तेश्वरांनी कबूल केले. माझे भाषण चालू

असताना मी त्यांच्याकडे मधूनमधून पाहत होतो. त्यांनी प्रत्यक्ष तसे उद्‌गार काढले नाहीत, पण माझे भाषण त्यांना आवडल्यासारखे दिसले.

त्यानंतर सेरामपूर कॉलेजमधील विद्यार्थ्यांसमोर माझे भाषण झाले. मी माझ्या जुन्या सहाध्यायांकडे पाहिले आणि तेही त्यांच्या जुन्या परिचयाच्या 'वेडया फकिरा'कडे कौतुकाने पाहात होते. माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू अगदी निःसंकोचपणे वाहू लागले. [1] तत्त्वज्ञानाचे माझे प्राध्यापक फटकळपणे बोलण्याची ज्यांची ख्याती, असे डॉ. घोषाल माझे स्वागत करण्यासाठी पुढे आले. त्या महान किमयागार अशा काळाच्या उदरात जुन्या गैरसमजुती गडप झाल्या होत्या.

सेरामपूरच्या आश्रमामध्ये डिसेंबर महिन्याच्या शेवटी मकरसंक्रांतीचा उत्सव साजरा झाला. नेहमीप्रमाणे श्रीयुक्तेश्वरांचे शिष्य अगदी दूरवरचेही, त्या वेळी एकत्र आले. उत्सव मोठ्या थाटात साजरा झाला. प्रख्यात बंगाली गायक क्रिस्तीदा यांनी आपल्या अमृतासारख्या मधुर आवाजात भावपूर्ण भजने गायिली; तरुण शिष्यांनी मेजवानीच्या भोजनाचे वाढप केले. आश्रमातील आंगणात भरगच्च अशा भक्तांच्या मेळव्यापुढे रात्री ताऱ्यांच्या प्रकाशात गुरुजींनी विद्वत्ताप्रचुर व हृदय हालवून टाकणारे प्रवचन केले. सगळ्या जुन्या आठवणी, पूर्वस्मृती! कित्येक वर्षांपूर्वीचा थाटामाटाचा व आनंददायी उत्सवसमारंभ! पण आज त्या उत्सवात एक नवीन कार्यक्रम आखला होता.

"योगानंद, ह्या जमलेल्या मंडळीपुढे आज भाषण कर इंग्रजीमध्ये." ही दोन अर्थांनी नेहमीपेक्षा वेगळी अशी विनंती करताना गुरुजींचे डोळे थोडे चमकले. बोटीवर चढल्यावर इंग्लिशमध्ये बोलायचा माझ्यावर जेव्हा अगदी पहिलाच असा प्रसंग आला तेव्हा माझी जी सुरुवातीला घाबरगुंडी उडाली होती, ती त्यांच्या अंत:श्चक्षुंपुढे आली की काय? माझ्या त्या गुरुबंधूंच्या श्रोतृवृंदांपुढे मी ती सारी हकीकत वर्णन केली व भाषणाच्या शेवटी गुरुजींची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

भाषणाचा समारोप करताना मी म्हणालो, "त्यांचे बिनचूक असे मार्गदर्शन मला केवळ बोटीवरच मिळत होते असे नसून, अमेरिकेसारख्या अफाट व आतिथ्यशील अशा देशात पुढे सतत पंधरा वर्षे, तेथल्या माझ्या वास्तव्यात मिळत राहिले."

सर्व मंडळी गेल्यावर श्रीयुक्तेश्वरांनी मला आपल्या झोपावयाच्या खोलीत बोलावून घेतले. ज्या खोलीत (फक्त एकदाच, अशाच उत्सवसमारंभानंतर) मी त्यांच्या परवानगीने त्यांच्या बिछान्यावर झोपलो होतो. आज रात्री गुरुजी ते थे शांतपणे बसले होते. त्यांच्या पायांशी शिष्यमंडळी अर्धवर्तुळाकार अशी बसली होती.

"योगानंद, तू आता कलकत्त्याला जायला निघाला आहेस काय? तर मग उद्या येथे जरूर परत ये. मला तुला काही गोष्टी सांगायच्या आहेत."

दुसऱ्या दिवशी दुपारी मी त्यांच्याकडे गेलो. त्यांनी साध्या थोड्या शब्दांत मला आशीर्वाद दिला आणि संन्यासधर्माची आणखी वरची अशी परमहंस [2] ही पदवी अर्पण केली.

"तुझ्या पूर्वीच्या 'स्वामी' या पदवीपेक्षा ही पदवी वरची आहे. पूर्वीची पदवी वापरण्याचे आता कारण नाही." मी त्यांना वाकून नमस्कार करीत असताना ते म्हणाले. माझ्या

पाश्चिमात्य विद्यार्थ्यांना आता ह्या 'परमहंसजी' [3] या शब्दाचा उच्चार करताना किती कष्ट पडणार हा विचार माझ्या मनामध्ये सारखा येत होता.

"ह्या भूलोकावरचे माझे कार्य आता संपले आहे. ते कार्य आता तुला पुढे चालवायला हवे." गुरुजी शांतपणे मला सांगू लागले. त्यांचे डोळे शांत व सौम्य होते. भीतीने माझे हृदय खालीवर होत होते.

"पुरीच्या आपल्या आश्रमाची व्यवस्था पाहायला तू कोणाला तरी तिकडे पाठव," श्रीयुक्तेश्वर सांगू लागले. "मी आता सारा कारभार तुझ्या स्वाधीन करणार आहे. तू आपल्या आयुष्याची व या साऱ्या संस्थेची नौका त्या दिव्य अशा पारमार्थिक पैलतीरावर यशस्वीपणे नेऊ शकशील."

मी त्यांच्या पायांना आलिंगन दिले. माझ्या डोळ्यांतून सारखे अश्रू वाहत होते. नंतर गुरुजी उभे राहिले व त्यांनी प्रेमळपणे मला आशीर्वाद दिले.

मी दुसऱ्याच दिवशी रांची हून स्वामी सेवानन्दांना बोलावून त्यांना पुरीच्या आश्रमाची व्यवस्था सांभाळायला पाठवले. त्यानंतर गुरुजींनी आपल्या इस्टेटीच्या व्यवस्थेसंबंधी कायदेशीर तपशिलाची चर्चा केली. आपली इस्टेट, दोन आश्रम व इतर मिळकत यांचा विनियोग फक्त दानधर्मासाठीच करावा अशी त्यांची इच्छा होती. आपल्या पश्चात आपल्या नातेवाइकांनी इस्टेटीचा ताबा घेण्याकरिता कोर्टकचेरी करू नये याबद्दल योग्य ती दक्षता घ्यावी, असे त्यांना मनापासून वाटे.

"गुरुजींनी किडरपूरला जावे म्हणून सगळी व्यवस्था केली होती; पण त्यांचे जाणे घडले नाही." माझा एक गुरुबंधू अमुल्यबाबू याने एके दिवशी दुपारच्या वेळी मला सांगितले. पूर्वसूचनेची एक थंडगार लहर माझ्या अंगावरून गेल्याचा मला भास झाला. मी जेव्हा त्यांना आग्रहपूर्वक विचारले तेव्हा श्रीयुक्तेश्वरांनी उत्तर दिले, "आता किडरपूरला माझे जाणे घडणार नाही." एक क्षणभर, गुरुजींच्या शरीराचा, एखाद्या घाबरलेल्या मुलाप्रमाणे थरकाप झाला.

(पतंजली आपल्या एका सूत्रात सांगतात की, "महान संतांच्या बाबतीत सुद्धा थोड्या प्रमाणात का होईना, पण शरीराबद्दल ओढ टिकून राहिलेली असते. ती ओढ पूर्व जन्म-मृत्यूच्या संस्कारांबद्दलच्या अनुभवापासून निर्माण झालेली असते. [4] गुरुजींचें मृत्यूवर जेव्हा प्रवचन चाले, तेव्हा ते नेहमी अशी पुस्ती जोडीत: "ज्याप्रमाणे बरीच वर्षे पिंजऱ्यात राहत असलेला पक्षी, पिंजऱ्याचे दार उघडल्यावर ते परिचित घर सोडण्यास तितकासा तयार नसतो त्याप्रमाणे.")

"गुरुजी," हुंदका देत मी त्यांना विनंती करू लागलो, "नका बोलू तसे! त्या शब्दांचा माझ्यासमोर कृपा करून कधीही उच्चार करू नका!"

श्रीयुक्तेश्वरांच्या चेहऱ्यावर एक शांतपूर्ण स्मित उमटले व त्यांच्या मनाला बरे वाटले. त्यांचे वय आता एक्यांशीच्या जवळ आले होते, तरीपण त्यांची प्रकृती चांगली सुदृढ दिसे.

अशा तऱ्हेने रोजरोज गुरुजींच्या प्रेमाच्या सूर्यप्रकाशात मी ऊन घेत राहिलो. ते आपले प्रेम तसे कधीही बोलून दाखवीत नसत, पण त्यांच्या अंतर्यामाला मात्र ते कळे; आणि त्या

आनंदात आपली निर्याणाची वेळ आता समीप येत चालली आहे, त्याबद्दलच्या ज्या काही निरनिराळ्या पूर्वसूचना ते देत, त्या सूचना मी माझ्या जाणत्या मनातून काढून टाकलेल्या होत्या.

"गुरुजी, ह्या महिन्याला अलाहाबादला कुंभमेळा भरणार आहे." बंगाली पंचांगातून [5] मी त्यांना मेळ्याच्या तारखा काढून दाखविल्या.

"तुला खरेच जायचे आहे काय?"

मी त्यांना सोडून जावे, असे त्यांच्या मनात नव्हते, पण त्यातील अर्थाचा सुगावा मला लागला नाही. मी आपले बोलणे पुढे चालू ठेवले "अशाच एका कुंभमेळ्याच्या प्रसंगी अलाहाबादला आपल्याला बाबाजींचे पुण्यदर्शन झाले होते. कदाचित ह्या वेळेला माझे तसेच भाग्य उजळेल."

"मला नाही वाटत, तू त्यांना तिथे भेटू शकशील." गुरुजी मग स्तब्ध राहिले; माझा बेत मोडून टाकण्याची त्यांची इच्छा नव्हती.

दुसऱ्या दिवशी आम्ही थोडी मंडळी अलाहाबादला जाण्यास निघालो. निघण्यापूर्वी गुरुजींनी आपल्या नेहमीच्या पद्धतीनुसार शांत मनाने मला आशीर्वाद दिला. श्रीयुक्तेश्वरांच्या मनामध्ये काय चालले होते, वागण्यामध्ये काय दिसत होते, हे माझ्या चटकन ध्यानातच आले नाही असे दिसले; कारण परमेश्वराची इच्छाच तशी होती की, त्यांच्या निर्याणप्रसंगी त्यांच्या वियोगाचे दुःख अगदी असहायपणे मला सहन करावयास लागू नये. माझ्या आयुष्यात असे अनेकदा घडून आलेले आहे की, मी ज्यांच्यावर मनापासून प्रेम केले, अशा प्रियजनांच्या निधनप्रसंगी परमेश्वराने अशी दयाळूपणे योजनाच करून ठेविली की मला तो दुःखद प्रसंग [6] पाहावयास लागू नये; मी त्या वेळी कोठेतरी दूर असावे.

आम्ही मंडळी कुंभमेळ्याला जानेवारी २३, १९३६ ला जाऊन पोचलो. जवळजवळ वीस लाख लोक मेळ्याला आले होते. काय ती बेसुमार गर्दी! मनावर दडपण टाकणारे असे ते प्रेक्षणीय दृश्य होते. हिंदुस्थानातील लोकांच्या मनोभूमिकेचे असे वैशिष्ट्य आहे की, अगदी हलक्यातला हलका जरी किसान घेतला तरी त्याला, आत्मज्ञानाबद्दल व ज्यांनी ते ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी ऐहिक बंधनांचा त्याग केला आहे अशा साधुसन्याशांबद्दल नितांत आदर वाटतो. फसवे व ढोंगी लोक त्यांत असतात हे खरे; पण भारतीय मनुष्य, आपल्या दिव्य आशीर्वादाने, अनुग्रहाने ह्या भूमीस उच्च्वल करणाऱ्या अशा अल्पसंख्याक संतजनांच्या खातर, सर्वच लोकांना मान देतो. कालाच्या घावास न जुमानता कधीही न आटणारा असा सामर्थ्याचा ओघ, भारतामध्ये जो दृष्टीस पडतो, त्याचे मूळ, निदान जो आध्यात्मिक उत्साह लोकांमध्ये वावरत असतो, तो जवळून पाहण्याची ही केवळ दुर्मिळ अशी संधी होती.

आम्ही मंडळींनी पहिला दिवस निव्वळ इकडेतिकडे बघण्यातच घालविला. पापक्षालनाकरिता पवित्र अशा गंगानदीमध्ये हजारो यात्रेकरूंनी स्नान केले. पंड्यांनी पूजेचे धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने केले. मौनधारी संन्याशांच्या पायांशी लोक भक्तिभावाने फळे, फुले, खाद्यापदार्थ ठेवीत होते. हत्तींची रांग, त्यांच्यामागून शृंगारलेले घोडे, नंतर संथ मंदगतीने चालणारे राजस्तानी उंट आणि त्यांच्या मागून नग्न दिगंबर साधूंची

चमत्कारिक दिसणारी अशी, धार्मिक मिरवणूक चालली होती. त्या नग्न साधूंच्या हातांत सोनेरी व रुपेरी राजदंड असून ते आपल्या हातातील मऊमऊ असे रेशमी ध्वज फडकावीत संथ गतीने चालत होते.

शरीरावर फक्त लंगोटीच धारण करणारे असे बैरागी लहानलहान मेळाव्यात शांतपणे बसलेले होते. त्यांनी आपल्या शरीरावर राख फासलेली असल्यामुळे त्यांचे थंडी आणि उष्णता यांपासून निवारण होत होते. त्यांच्या कपाळावरील चंदनाचा टिळा त्यांच्या आध्यात्मिक नेत्राचे स्थान स्पष्टपणे दर्शवीत होता. मुंडन केलेले व भगवी वस्त्रे परिधान केलेले संन्यासी हजारोंनी दिसत होते. प्रत्येकाच्या हातात एक बांबूचा दंडा व भिक्षापात्र होते. ते इकडून तिकडे वावरत असताना किंवा आपल्या चेल्यांबरोबर तत्त्वज्ञानविषयक चर्चा करीत असताना त्यांच्या मुखांवर संन्यस्तवृत्तीचे व प्रशांतमनस्कतेचे तेज दिसत होते.



*स्वामी कृष्णानंद, कुंभ मेळा, अलाहाबाद येथे, 1936 मध्ये, त्यांच्या मानसाळवलेल्या सिंहीणीसह, जी खोलवर, आकर्षक गुरगुरण्यात "ओम" उच्चारत असे.*

जागोजाग झाडांखाली, जळत असलेल्या लाकडांच्या प्रचंड धुनींभोवती चित्रविचित्र साधू [7] बसलेले दिसत होते. त्यांनी केसांच्या जटा वेणीसारख्या वाढविलेल्या असून त्या

डोक्यावरती मुकुटासारख्या धारण केलेल्या होत्या. काहींच्या दाढ्या लांबलचक कित्येक फूट लांबीच्या लोंबकळत होत्या. त्यांच्या वळ्या करून टोकाला गाठी मारलेल्या होत्या. ते ध्यानस्थ बसले होते किंवा त्यांच्या पुढून जाणाऱ्या यात्रिकांना ते हात पसरून आशीर्वाद देत होते. त्या मेळाव्यात एकच गर्दी झाली होती. भिकारी, हत्तीवरून अंबारीत बसून मिरवीत जाणारे राजे-महाराजे. विविध रंगांच्या साड्या परिधान केलेल्या स्त्रिया; त्यांच्या हातांतील बांगड्या व पायांतील नूपुर रुणझुण आवाज करीत होते. बैरागी आपले हडकुळे हात वरती करून उभे राहिलेले होते. कशातरी टेकणावर कोपर ठेवून ध्यान आचरणारे ब्रह्मचारी तेथे आढळून येत होते. विनयशील साधू गंभीर मुद्रा धारण करून बसलेले होते. त्यांच्या मुद्रेवरील गांभीर्याच्या आत त्यांना होत असलेला आंतरिक दिव्यानंद दडलेला होता. आणि ह्या सगळ्या कोलाहलाच्यावर ताण म्हणून की काय, देवळांतील घंटा सारखा घंटानाद करीत होत्या.

दुसऱ्या दिवशी मी व माझे सोबती निरनिराळ्या आश्रमांत व हंगामी झोपड्यांत जाऊन तेथे मुक्काम करणाऱ्या साधुसंतांना भेटून त्यांना आदरयुक्त नमस्कार केले. संन्यास-आश्रमाच्या 'गिरी' शाखेच्या प्रमुखास आम्ही भेटलो. त्यांनी आम्हांला आशीर्वाद दिले. हे प्रमुख किरकोळ शरीरयष्टीचे, पण हास्ययुक्त पाणीदार डोळ्यांचे, एक विरक्त संन्यासी आहेत. नंतर आम्ही मंडळी एका आश्रमात गेलो. तेथे जे गुरू होते त्यांनी गेली नऊ वर्षे मौनव्रत पाळलेले होते व ते केवळ फलाहार घेत होते. आश्रमातील एका व्यासपीठावर एक अंध साधू, 'प्रज्ञाचक्षू' [8] बसलेले होते. ते धर्मशास्त्रांमध्ये पारंगत असून सर्व पंथ त्यांना फार मान देत.

वेदान्तावर हिंदीमध्ये मी थोडे प्रवचन दिल्यावर, आम्ही मंडळी त्या शांत आश्रमातून बाहेर पडून जवळच बसलेल्या स्वामींना वंदन करण्याकरिता वळलो. हे स्वामी कृष्णानंद मोठे देखणे होते. त्यांचे गाल गुलाबी असून त्यांचे खांदे रुबाबदार होते. त्यांच्या शेजारी एक गरीबशी सिंहीण पहुडलेली होती. त्या योगिराजांच्या आध्यात्मिक प्रभावामुळे (माझी खात्री आहे की, त्यांच्या शारीरिक सामर्थ्यामुळे नव्हे) ते जंगली जनावर फक्त दूधभात खात असे. मांस बिलकुल घेत नसे. स्वामीजींनी त्या सोनेरी केसांच्या जनावराला 'ओम्' मंत्र म्हणण्यास शिकविला होता व ते जनावर तो मंत्र अगदी खोल, आकर्षक गंभीर आवाजात म्हणत असे. मार्जारयोनीतील साधकच तो!

नंतर आमचा मोर्चा एका विद्वान तरुण अशा साधूकडे वळला. त्याची आम्ही मुलाखत घेतली. त्या मुलाखतीचे वर्णन श्री राईट यांनी आपल्या चटकदार प्रवास-रोजनिशीत लिहून ठेवले आहे:

"गंगेच्या खालच्या प्रवाहावरील, एका नावांच्या तराफ्याच्या डळमळणाऱ्या अशा कच्च्या पुलावरून फोर्डगाडीमधुन आम्ही पुढे निघालो. त्या गर्दीतून एखाद्या सापासारखी आम्ही वाट काढीत होतो. अरुंद, जागोजागी वळणे घेणाऱ्या अशा गल्लीतून वाट काढीत होतो. ज्या ठिकाणी बाबाजींची व श्रीयुक्तेश्वरजींची भेट झाली म्हणून योगानंदजींनी मला दाखविले, त्या नदीतीरावरील ठिकाणावरून आम्ही पुढे गेलो. नंतर थोड्याच वेळाने आम्ही गाडीतून

उतरलो व पायी चालू लागलो. साधुबैराग्यांच्या पेटलेल्या धुनींच्या जाड अशा धूम्रपटलांतून आणि पायांखाली सरकणाऱ्या वाळूतून मार्ग काढीत काढीत काही अंतर चालल्यावर, आम्ही मातीने माखलेल्या गवतांच्या झोपड्यांच्या एका वस्तीपाशी येऊन पोचलो. एका हंगामी झोपडीसमोर आम्ही येऊन थांबलो. तिला आत जावयास दार असे नव्हते. एक लहानसा झरोका होता. या ठिकाणी करपात्री रहात होते. करपात्री हे एक तरुण भटकणारे साधू असून प्रखर असामान्य बुद्धीबद्दल त्यांची ख्याती होती. तेथे ते एका चकचकीत अशा पिवळसर गवताच्या गंजीवर मांडी घालून बसले होते. त्यांच्या अंगावर फक्त एकच वस्त्र होते. पर्यायाने इहलोकीची त्यांची तेवढीच मालमत्ता होती. ते वस्त्र म्हणजे त्यांची भगव्या रंगाची छाटी, खांद्यांवरून पांघरलेली अशी.

"आम्ही त्या झोपडीत अक्षरशः रांगून आत गेलो. गेल्यावर दिव्य अशा मुद्रेने त्यांनी आमच्याकडे पाहून स्मित केले. उद्दीपित अशा ह्या आत्म्याच्या पायांना आम्ही प्रणाम केला. झोपडीच्या दाराशी एक रॉकेलचा कंदील ठेवलेला होता. त्याची वात कमी-जास्त होत होती व त्या कंदिलाच्या प्रकाशात आमच्या छाया त्या गवताने सारवलेल्या भिंतीवर वर-खाली अशा जणू नाचत होत्या. त्या साधुमहाराजांचे डोळे संतोषाने चमकले. त्यांची सुदृढ अशी दंतपंक्ती चकाकली. मला त्यांचे हिंदी तितकेसे समजले नाही, तरी त्यांच्या चेहऱ्यावर जे मनोभाव दिसले, तेच बोलके होते. त्यांच्या ठिकाणी उत्साह. प्रेमभाव व आध्यात्मिक तेज पुरेपूर भरलेले होते. त्यांच्या मोठेपणाबद्दल कुणाला शंका घेण्यास अशी जागा नव्हती.

"ह्या ऐहिक जगाविषयी पूर्ण अनासक्त असे ज्याचे जीवन आहे त्याला किती सुख होत असावे याची कल्पना कराः कपड्यालत्त्याचा काही प्रश्न नाही, खाद्य पदार्थांच्या लालसेपासून मुक्त, भिक्षा कधी मागायची नाही, शिजविलेले अन्न फक्त एक दिवसाआड घ्यायचे; भिक्षापात्र असे जवळ ठेवायचेच नाही; पैसे जवळ बाळगण्याची कटकट नाही; हिशेब-ठिशेब ठेवायची भानगड नाही; कधी कोणत्याही वस्तूचा संग्रह करायचा नाही; परमेश्वराच्या ठिकाणी सदैव विश्वास बाळगून राहायचे; प्रवासाची दगदग नाही; गाडी-घोडा, मोटार सारख्या वाहनांतून हिंडण्याची, फिरण्याची कधी पाळी यायची नाही; पण पवित्र नद्यांच्या तीरांवरून काठाकाठाने सतत भ्रमण करीत राहायचे; कोणत्याही ठिकाणी, तेथील कोणत्याही वस्तूबद्दल मनात आसक्ती उत्पन्न होऊ नये म्हणून, सात दिवसांपेक्षा जास्त राहायचे नाही; असे हे आयुष्य; कल्पना करा की किती सुखावह असेल ते!

"अशा तऱ्हेचा हा विनयशील आत्मा! वेदशास्त्रपारंगत, एम. ए. पदवीविभूषित; बनारस विश्वविद्यालयाची 'शास्त्री' पदवी धारण करणारा; त्याच्या पायांशी बसल्यावर अतिगंभीर विचारांनी माझ्या मनाचा ताबा घेतला; तो अनुभव म्हणजे खऱ्या प्राचीन भारताचे मला दर्शन घडून यावे, या माझ्या इच्छेची पूर्ती होय; कारण ही व्यक्ती म्हणजे आध्यात्मिक महापुरुषांनी अलंकृत केलेल्या ह्या देशाची खरोखरीची प्रतिनिधिस्वरूप व्यक्ती होती."

मी करपात्रींना त्यांच्या भटक्या आयुष्याबद्दल विचारले.

"हिवाळ्याकरिता काही जास्त कपडे आपण ठेवीत नाही काय?"

"नाही. हे पुरेसे आहेत."

"आपण पुस्तके वगैरे काही बरोबर नेता का?"

"ज्यांना माझे ऐकावयाचे आहे, त्यांना मी माझ्या स्मरणशक्तीचा उपयोग करून शिकवितो."

"आपण दुसरा काय उद्योग करता?"

"गंगेच्या काठाकाठाने हिंडत असतो."

हे त्यांचे शांतपणे उच्चारलेले शब्द ऐकून, मलासुद्धा असेच साधेसुधे जीवन व्यतीत करावयाची तळमळ लागली. माझ्या डोळ्यांसमोर माझे ते अमेरिकेतील जीवन, आणि माझ्या खांद्यांवर असलेली ती सर्व तऱ्हेची जबाबदारी माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली.

"नाही, योगानंदा," एक क्षणभर माझ्या मनात विषण्ण विचार आला. "नाही. गंगातीरावरून भ्रमण करण्याचे भाग्य तुझ्या ह्या जन्मी नशिबी नाही."

त्या साधुमहाराजांनी आपल्या स्वतःच्या साक्षात्काराबद्दल काही गोष्टी सांगितल्यावर मी त्यांना एकदम प्रश्न विचारला,

"आपण हे जे अनुभव सांगता, ते प्राचीन ग्रंथांतून वाचून सांगता की स्वानुभवाचे सांगता?"

"निम्मे ग्रंथ वाचून व निम्मे स्वानुभवावरून," त्यांनी सरळ स्मितपूर्वक उत्तर दिले.

नंतर आम्ही थोडा वेळ ध्यान लावून बसलो. फार आनंद वाटला आम्हांला. त्यांच्या पवित्र अशा सान्निध्यातून आम्ही जेव्हा बाहेर पडलो, तेव्हा मी श्री राईट यांना म्हणालो.

"पिवळसर गवताच्या सिंहासनावर बसलेला तो एक राजाच आहे."

त्या दिवशी रात्री आम्ही त्या मेळ्याच्याच मैदानात उघड्यावर चांदण्यात जेवण घेतले. जेवण साध्या पत्रावळीवर वाढलेले होते. हिंदुस्थानात जेवण झाल्यावर ताटवाटी विसळण्याचे काम अगदी कमीत कमी असे करून ठेवलेले आहे!

अशा त्या मोहमयी कुंभमेळ्यात आम्ही आणखी दोन दिवस घालविले. नंतर वायव्य दिशेने यमुनेच्या किनाऱ्याकिनाऱ्याने आम्ही आगऱ्यास गेलो. पुनः एकदा आम्ही ताजमहालवर दृष्टी टाकली. संगमरमरामध्ये उतरविलेल्या त्या स्वप्नाकडे भारावलेल्या मनाने पाहात असता माझ्या स्मृतीमध्ये जितेंद्र शेजारी उभा होता. नंतर तेथून पुढे वृंदावन, स्वामी केशवानंदांच्या आश्रमात.


केशवानंदांना हुडकून काढण्याचा माझा हेतू या पुस्तकासंबंधी होता. लाहिरी महाशयांचे चरित्र मी लिहावे, अशी जी श्रीयुक्तेश्वरांनी मला विनंती केली होती ती मी कधीही विसरलो नाही. भारतामधील माझ्या वास्तव्यात, योगावतारांचे प्रत्यक्ष शिष्य व नातेवाईक यांच्या भेटी घेण्याची प्रत्येक संधी मी घेत असे. त्यांच्याशी माझे जे संभाषण वेळोवेळी झाले त्याची टिपणे मी करून ठेविली आहेत. ही टिपणेच ग्रंथवजा झाली आहेत. मी निरनिराळे प्रसंग व तारखा तपासून घेतल्या आणि फोटोग्राफ, जुनी पत्रे व कागद गोळा केले. माझी लाहिरी महाशयांची धारिका (फाईल) फुगत चालली. माझ्यापुढे आता ग्रंथ लिहिण्याचे किचकट व कष्टाचे काम पडलेले आहे हे मला आता कळून चुकले आणि माझ्या मनात त्या दडपणाने थोडीशी धडकीही भरली. त्या महापुरुष अशा परमगुरूंचे चरित्र माझ्या हातून यथास्थित उतरावे, याबद्दल मी परमेश्वराची प्रार्थना केली. त्यांच्या पुष्कळशा शिष्यांना अशी

भीती वाटे की, गुरुदेवांच्या चरित्रलेखनामध्ये त्यांच्या जीवनातील काही प्रसंगांचे महत्त्व कमी दाखविले जाईल किंवा त्यांचे चुकीचे वर्णन देण्यात येईल.

"अवतारी पुरुषाचे जीवन थंडगार गद्य अशा शब्दांत उतरविणे जरा अवघडच आहे." पंचानन भट्टाचार्य यांनी असा शेरा माझ्यापाशी एकदा मारला.

त्यांच्या इतर निकटवर्ती शिष्यांना सुद्धा योगावतारांचे जीवनचरित्र, आपल्याच हृदयाच्या कोपऱ्यात, अमर उपदेशक असे जतन करून ठेवण्यातच समाधान वाटत होते. तरीपण, लाहिरी महाशयांनी आपल्या चरित्राबद्दल जे भविष्य वर्तविले होते, ते ध्यानात ठेवून त्यांच्या बाह्य जीवनातील घटनांची माहिती मिळविण्याच्या कामी व त्यांना आधार मिळविण्याच्या कामी मी बिलकूल हयगय केली नाही.

वृंदावनला आपल्या कात्यायनी पीठ आश्रमामध्ये आम्हा मंडळींचे स्वामी केशवानंदांनी मोठ्या आनंदाने स्वागत केले. तो आश्रम म्हणजे विटांनी बांधलेली एक भव्य इमारत होती. इमारतीमध्ये भव्य असे काळ्या रंगाचे सुरूचे खांब होते व त्या इमारतीच्या भोवती एक सुंदरसे उद्यान होते. त्यांनी आम्हांला थेट आपल्या बैठकीच्या खोलीत नेले. तेथे लाहिरी महाशयांचे एक मोठे तैलचित्र भिंतीवर लावलेले होते. स्वामीजींचे वय जवळजवळ नव्वदाच्या घरात गेले होते. पण त्यांचे सुदृढ व मांसल शरीर ताकद व आरोग्य व्यक्त करीत होते. त्यांचे केस लांब असून दाढी बर्फासारखी पांढरीशुभ्र होती. त्यांचे डोळे आनंदाने चमकदार दिसत होते. त्या आश्रमाचे ते चांगले कुलपती शोभत होते. भारतातील संतमहात्म्यांवरती मी जो ग्रंथ लिहिणार आहे, त्यात आपल्या नावाचा मी उल्लेख करणार आहे, असे मी त्यांना सांगितले.



*स्वामी केशवानंद (डावीकडे, उभे), लाहिरी महाशयांचे नव्वद वय असलेले शिष्य, श्री योगानंद व सी. आर. राईट, वृन्दावन येथील केशवानंदांच्या आश्रमात, 1936 मध्ये*

"आपल्या पूर्वायुष्याबद्दल मला काही माहिती सांगता का?" मी त्यांना सुहास्य वदनाने विनंती केली. महान योगी बहुधा आपल्याबद्दल कधी सांगत नसतात.

केशवानंदांनी नम्रतेचा आविर्भाव केला, "त्यात विशेष काही सांगण्यासारखे नाही. जवळजवळ माझे सारे आयुष्य मी हिमालयात एकांतवासात घालविलेले आहे. एका गुहेतून दुसऱ्या गुहेत मी पायी चालत गेलेलो आहे. मी हरद्वारच्या परिसरात सभोवताली उंच अशा वृक्षराजीमध्ये आश्रमही ठेवला होता. ती जागा मोठी शांत होती. कोणी विशेष त्या आश्रमात येतही नसत, कारण तेथे सगळीकडे सापांचा उपद्रव असे." केशवानंद हे सांगताना गालांतल्या गालांत हसले. "नंतर एकदा गंगेला महापूर आला व त्यात तो आश्रम व ते साप सगळे वाहून गेले. नंतर माझ्या शिष्यांनी मला वृंदावनमधील आश्रम बांधण्यास मदत केली."

आम्हा मंडळीपैकी एकाने स्वामीजींना विचारले की, हिमालयातील वाघांपासून [9] त्यांनी स्वतःचा कसा बचाव केला?

केशवानंदांनी मान हलविली. ते म्हणाले, “त्या उच्च अशा आध्यात्मिक वातावरणात हिंस्र पशू योगीजनांच्या वाटेस जात नाहीत. एकदा जंगलात वाघ अगदी माझ्यासमोर आला. आणि मी एकदम आरोळी मारल्यावर वाघ जागच्या जागी दगडासारखा खिळून राहिला.” ही आठवण झाल्याबरोबर स्वामीजी गालांतल्या गालांत हसले.

“माझ्या गुरूंना वाराणशीत भेटण्यास जात असे त्या वेळी मी एकान्त आयुष्याचा त्याग करी. हिमालयातील जंगलामध्ये माझे जे हे भ्रमण चालत असे त्यावर ते विनोद करीत.

“‘तुझ्या पायावर शकटयोग आहे.’ ते मला एकदा म्हणाले, ‘पवित्र हिमालयपर्वत इतका अफाट आहे की तो तुझ्या ह्या भ्रमंतीला पुरून उरणार आहे, ह्यात मला संतोष वाटतो.’”

केशवानंद पुढे सांगू लागले, “ह्या जगातून प्रयाण करण्यापूर्वी व नंतरही पुष्कळदा लाहिरी महाशयांनी पार्थिव देहाने मला भेट दिलेली आहे. त्यांना हिमालयाचे कोणतेही शिखर उंच असे नसे!”

दोन तासांनी ते आम्हांला जेवणाच्या दालनात घेऊन गेले. मनातल्या मनात मी घाबरून गेलो होतो व निःश्वास टाकीत होतो. आणि आता हे निरनिराळे पंधरा पदार्थ केलेले जेवण! भारतामध्ये येऊन मला एक वर्ष सुद्धा अजून झाले नव्हते. पण येथल्या आतिथ्यामुळे माझे वजन मात्र पन्नास पौंडांनी वाढले! तरी पण माझ्या सन्मानार्थ ह्या ज्या सारख्या मेजवान्या चालत होत्या त्यांमधील अतिशय दक्षतेने व कलाकुसरीने केलेल्या खाद्यपदार्थांचा थोडा तरी आस्वाद घेण्याचे नाकारणे, हे शिष्टाचाराला शोभले नसते. उद्धटपणाच वाटला असता तो. भारतात तरी (दुर्दैवाने अन्य ठिकाणी जरी नाही) गुबगुबीत चेहऱ्याचा धष्टपुष्ट स्वामी पाहावयास मिळणे म्हणजे एक संतोषकारक दृश्य होते.

जेवण झाल्यानंतर केशवानंदांनी मला जरा बाजूला एकांतात नेले.

ते म्हणाले, “तुझे येथे येणे हे अनपेक्षित नाही; तुझ्याकरिता एक निरोप आहे.”

मला आश्चर्य वाटले. केशवानंदांना भेटावयाचा माझा बेत मी कोणासही सांगितला नव्हता.

स्वामींनी आपले बोलणे पुढे चालू ठेवले. “गतवर्षी उत्तर हिमालयात बद्रीनारायणाच्या परिसरात भ्रमण करीत असता, मी एकदा वाट चुकलो. जवळच एक मोठी गुहा दिसली. तिथे निवाऱ्याकरिता जावे म्हणून ठरविले. गुहा मोकळीच होती; तरीपण त्या खडकाच्या भूमीतील एका खळग्यात अग्नी धुमसत होता. ह्या अशा एकांत स्थळी कोण राहत असावे ह्याचे मी मनात आश्चर्य करीत राहिलो. मी विस्तवाजवळ बसलो. माझे डोळे गुहेच्या प्रवेशद्वारावर खिळून राहिले. द्वारावर सूर्याचे ऊन तळपत होते.

“‘केशवानंद, तू आलास. फार बरे वाटले मला.’ असे शब्द माझ्या पाठीमागून मला ऐकू आले. मी वळून पाठीमागे पाहिले; घाबरून गेलो होतो मी. आणि समोर बाबाजी उभे असलेले पाहताच मी दिपूनच गेलो! त्या परम गुरुवर्यांनी त्या गुहेच्या कोपऱ्यात पार्थिव देहात आगमन केले होते. कित्येक वर्षांनी त्यांचे हे दर्शन झाल्याने मला अत्यानंद झाला. मी त्यांच्या पवित्र चरणांवर लोटांगण घातले.

“बाबाजी बोलू लागले, ‘मीच तुला येथे बोलाविले. म्हणूनच तुझी वाट चुकली आणि ह्या गुहेत माझ्या तात्पुरत्या राहावयाच्या ठिकाणी तू असा वाट चुकून आलास. आपली भेट झाल्याला बराच काळ लोटला. तुझे पुनः स्वागत करण्यास मला फार आनंद वाटतो.’

"त्या अमर गुरुदेवांनी आध्यात्मिक साहाय्याचे आशीर्वादपर शब्द उच्चारले आणि ते पुढे म्हणाले, 'योगानंदाला देण्यासाठी मी तुला एक संदेश देतो. हिंदुस्थानात परत भेट देण्याचे वेळी तो तुझ्याकडे येईल. त्याला आपल्या गुरूच्या व्यवहारांबद्दल पुष्कळ पाहावे लागेल. तसेच लाहिरीच्या उरल्यासुरल्या शिष्यांच्या गाठीभेटी घ्याव्या लागतील, त्यांत तो गुंतून राहील. तर त्याला सांग की, या वेळी काही त्याच-माझी भेट होणार नाही. त्याची खूप इच्छा आहे पण त्याला काही इलाज नाही. पण पुनः केव्हा तरी त्याला मी जरूर भेटेन.'"

केशवानंदांच्या तोंडून बाबाजींचे हे मनाला समाधान देणारे वचनपर शब्द ऐकून माझे हृदय हेलावले. माझ्या हृदयात एक थोडीशी जी जखम झाली होती ती बुजली. कुंभमेळ्याच्या प्रसंगी बाबाजींचे दर्शन झाले नाही म्हणून, माझ्या मनाला जे दुःख झाले होते ते दुःख आता पार नाहीसे झाले. श्रीयुक्तेश्वरांनी असे सुचविलेच होते.

एक रात्र आश्रमात आम्ही पाहुणे म्हणून राहिलो. दुसऱ्या दिवशी दुपारी आम्ही मंडळींनी कलकत्त्यास प्रयाण केले. यमुना नदीवरील पुलावरून जात असता आम्ही वृंदावनच्या प्रेक्षणीय अशा क्षितिजरेषेचा देखावा पाहिला. संध्याकाळची वेळ होती. पश्चिम क्षितिजावरील त्या अग्निगोलाचे प्रतिबिंब आमच्या खाली प्रशांत अशा पाण्यामध्ये उमटले होते.

यमुना-तीर हे बालमुकुंदाच्या स्मृतींनी पुनीत झालेले आहे. येथे त्याने गोपींबरोबर आपल्या मुग्ध लीला केल्या. अवतारी पुरुष व त्याचे भक्त यांमध्ये स्वर्गीय प्रेमभाव कसा असू शकतो, याचे ते अप्रतिम उदाहरण आहे. पाश्चिमात्य टीकाकारांना भगवान श्रीकृष्णाच्या जीवनाचा बरोबर बोध झालेला नाही. धार्मिक ग्रंथातील रूपकात्मक घटनांचा गद्य-वाङ्मयी मनाला उमज पडत नाही. भाषांतरकार कशी घोडचूक करतो हे खालील उदाहरणावरून दिसून येईल. ही गोष्ट रविदास नावाच्या एका चांभार जातीच्या मध्ययुगीन संताबद्दल आहे. त्याने आपल्या वृत्तीला अनुरूप अशा भाषेत मानवप्राण्यामध्ये सुप्त असे जे आध्यात्मिक वैभव वावरत असते त्याचे साध्यासुध्या शब्दांत बहारीचे वर्णन केले आहे:

अस्मानाच्या सुनील पडद्याखाली अवगुंठित
चर्मपटांतरी दिव्यत्वाची ज्योत सदा तेवत।

ह्या रविदासाच्या सुंदर काव्यपंक्तींवर एका पाश्चिमात्य टीकाकाराने जे जाता जाता प्राकृत भाष्य केले आहे ते ऐकल्यावर मनुष्याला आपले हास्य लपविण्याकरिता तोंड वळवावे लागते:

"नंतर त्याने एक झोपडी बांधली; मग त्याने कातड्याची एक मूर्ती तयार केली आणि त्या मूर्तीची तो पूजा करू लागला."

रविदास हा संत कबीर याचा गुरुबंधू होता. रविदासांची एक उच्च कोटीची शिष्या म्हणजे चितोडची राणी होती. तिने एकदा आपल्या गुरूच्या सन्मानार्थ एक मोठे ब्राह्मणभोजन घालण्याचे ठरविले; पण त्या भोजनाला एका चांभाराबरोबर बसावे लागेल म्हणून कोणीही ब्राह्मण येईना. आणि शेवटी त्यांनी आपले अन्न वेगळे काढून आपली वेगळी पंगत बसविली तेव्हा काय चमत्कार झाला! प्रत्येक ब्राह्मणाला आपल्या शेजारी रविदास बसल्याचे आढळून आले. ह्या सामुदायिक चमत्कारामुळे चितोडमध्ये पारमार्थिक जागृती मोठ्या प्रमाणात घडून आली.

थोड्या दिवसांत आम्ही मंडळी कलकत्त्यास येऊन पोचलो. श्रीयुक्तेश्वरांना भेटण्याकरिता मी अगदी अधीर झालो होतो. पण ते सेरामपूर सोडून पुरीला गेले आहेत, हे कळल्यावर माझी मोठी निराशा झाली. पुरी हे दक्षिणेला तीनशे मैल अंतरावर आहे.

“पुरी आश्रमात ताबडतोब निघून ये,” अशी तार ८ मार्चला एका गुरुबंधूने, कलकत्त्यामधील गुरुजींच्या एका शिष्याला, अतुलचंद्र रॉय चौधरी यांना, पाठविली होती. ही बातमी माझ्या कानांवर आली. त्या तारेचा अर्थ माझ्या ध्यानात आल्यावर माझ्या मनाला क्लेश झाले. मी गुडघे टेकले आणि परमेश्वराची प्रार्थना केली की, त्याने माझ्या गुरुदेवांचे प्राण वाचवावे. मी वडिलांचे घर सोडून गाडीतून जाण्यास निघालो आणि मला आतला आवाज सांगू लागला.

“आज रात्री पुरीला जाऊ नकोस. तुझी प्रार्थना निष्फल होईल.”

“परमेश्वरा,” दुःखित हृदयाने मी म्हणालो, “पुरीला माझ्याशी रस्सीखेच खेळण्याची तुझी इच्छा नाही. गुरुदेवांचे प्राण वाचावे म्हणून माझी जी सारखी प्रार्थना चालली आहे, ती तू अव्हेरणार आहेस. तुझी अशी इच्छा आहे काय की, त्यांनी याहूनही उच्च असे कार्य करण्याकरिता हा देह सोडावा?”

आतल्या आवाजाचा संदेश ऐकून मी त्या रात्री पुरीस जावयास निघालो नाही. त्या दिवशी संध्याकाळी मी आगगाडीत बसलो. संध्याकाळी सात वाजता, आकाशात एक काळ्या रंगाचा सूक्ष्म स्वरूपाचा ढग दृष्टिगोचर झाला, व त्याने एकदम आकाश [10] व्यापून टाकले. नंतर गाडी पुरीच्या दिशेने जेव्हा मोठा आवाज करीत चालली, तेव्हा श्रीयुक्तेश्वर एका दृश्य स्वरूपात माझ्यापुढे उभे राहिले. ते बसलेले होते; त्यांची मुद्रा अतिगंभीर दिसत होती. त्यांच्या दोन्ही बाजूंना प्रकाशाचे वलय होते.

“सगळे आटोपले काय?” विज्ञप्ती करण्याच्या हेतूने मी माझे हात वरती उचलले.

त्यांनी मान हलविली आणि हळूहळू ते अदृश्य झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुरी स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उभा असताना एक अपरिचित मनुष्य मला भेटला. माझ्या मनातली आशा अजून गेली नव्हती.

त्याने मला फक्त एवढेच सांगितले, “तुमचे गुरू गेले, हे तुम्हांला समजले काय?” मला पुढे कधीही समजले नाही की, ही निरोप देणारी व्यक्ती कोण व तिला मी कोठे भेटेन हे समजले कसे?

मला धक्काच बसला. प्लॅटफॉर्मच्या भिंतीवरच मी पडलो. गुरुजी मला निरनिराळ्या प्रकारांनी आपल्या निधनाची वार्ता कळवीत आहेत, हे मी समजलो. एखाद्या बंडखोरासारखा माझा आत्मा एखाद्या ज्वलंत पर्वतासारखा धगधगत होता. पुरीच्या आश्रमात मी कसाबसा पोचलो. पण तेथे पोचल्यावर मी कोसळून पडलो. माझा आतला आवाज मला सारखे सांगत होता, “धीर धर; शांत रहा.”

मी आश्रमातील आतील दालनात गेलो. गुरुजींचा देह, अगदी जिवंतपणी जसा दिसत असे तसा, पद्मासनामध्ये बसलेला माझ्या दृष्टीस पडला. आरोग्य व प्रेमळपणा यांचे ते प्रतीक होते. निधनापूर्वी गुरुजींना थोडा ताप आला होता; पण महानिर्याणाच्या दिवशी

त्यांची प्रकृती अगदी पूर्णपणे सुधारली. मी त्यांच्या त्या प्रिय अशा देहाकडे अनेकवार पाहिले. त्या कुडीतून प्राण निघून गेलेला आहे, याचा मला बोध होईना. त्यांच्या देहाची त्वचा मृदू होती; त्यांच्या मुद्रेवर प्रशांततेचा एक सुंदरसा आविष्कार होता. काही गूढ संदेश आल्यावर त्यांनी पूर्ण जाणतेपणे आपल्या पार्थिव शरीराचा त्याग केला होता.

"गेला, बंगालचा सिंह गेला!" मी दिङ्मूढ होऊन रडू लागलो.

१० मार्चला मी त्यांचे अन्त्यसंस्कार केले. प्राचीन रिवाजानुसार श्रीयुक्तेश्वरांचा देह, ते स्वामी असल्यामुळे, आम्ही पुरीच्या आश्रमाच्या बागेमध्येच पुरला. [11] पुढे वासंतिक संक्रमणाच्या वेळी त्यांच्या स्मृतीनिमित्त त्यांचे पुष्कळ शिष्य तेथे दूरदूर ठिकाणांहून आले होते. कलकत्त्याच्या प्रमुख वर्तमानपत्रात, 'अमृतबझार पत्रिके'त त्यांच्या अन्त्यविधीचा वृत्तांत आला होता; व त्यांचे चित्रही छापले होते. तो वृत्तांत असा:

श्रीमत् स्वामी श्रीयुक्तेश्वर गिरी महाराज यांच्या निधनसमयीचा भंडाराविधी पुरीस २१ मार्चला झाला. महाराजांचे निधनसमयी वय ८१ होते. त्यांचे बरेचसे शिष्य विधीकरिता मुद्दाम पुरीस आले होते.

भगवद्गीतेवरील प्रमुख भाष्यकार, असे हे स्वामीमहाराज, काशीच्या योगिराज श्रीश्यामाचरण लाहिरी महाशय यांचे मोठे शिष्य असून, त्यांनी हिंदुस्थानात योगदा सत्संगाची (सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप) अनेक केंद्रे स्थापन केली; आणि त्यांचे प्रधानशिष्य, जे स्वामी योगानंद यांनी पाश्चिमात्य जगात जो योगविद्येचा प्रसार केला त्याच्या पाठीमागे ह्यांचीच प्रेरणा होती. श्रीयुक्तेश्वरांची भविष्य वर्तविणारी शक्ती व त्यांचे साक्षात्कारी विभूतिमत्त्व यांनीच स्वामी योगानंदांस, साता समुद्रापलीकडे अमेरिकेत जाऊन, भारताच्या ऋषिवरांचा दिव्य संदेश तिकडे पोचविण्यास स्फूर्ती दिली.

भगवद्गीता आणि इतर धर्मग्रंथ यांवरील त्यांच्या टीकांवरून श्रीयुक्तेश्वरांचे पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाविषयीचे गाढ ज्ञान दृष्टोत्पत्तीस येते; व त्यावरून पूर्व व पश्चिम यांमध्ये जी वैचारिक एकता आहे, ती स्पष्टपणे नजरेस येते. सर्व धर्मांतील एकवाक्यतेवर त्यांची श्रद्धा असल्याने, श्रीयुक्तेश्वर महाराजांनी निरनिराळ्या धर्मांच्या व पंथांच्या पुढाऱ्यांच्या सहकार्याने, धर्मविषयक समजुतीस एक शास्त्रीय दृष्टी लावण्याच्या हेतूने, 'साधु-सभा' नावाची एक संस्था काढली. आपल्या निधनापूर्वी त्यांनी स्वामी योगानंदांस ह्या 'साधु-सभे'चे अध्यक्ष म्हणून आपले वारस नियुक्त केले होते.

अशा महात्म्याच्या निधनाने भारताची मोठी हानी झालेली आहे. त्यांच्यामध्ये भारतीय संस्कृतीचे खरे रहस्य व साधना ही मूर्तिमंत उतरलेली होती. त्यांच्या सान्निध्यात येण्याचे भाग्य ज्यांना लाभले आहे, अशा त्यांच्या भक्तांनी त्यांच्या व्यक्तित्वाचा आविष्कार आपल्या स्वतःच्याठिकाणी करून दाखवावा.

मी नंतर कलकत्त्याला परत आलो. सेरामपूरच्या आश्रमात जाऊन येण्याचे धाडस मला करवेना. तेथील पवित्र आठवणी सारख्या माझ्या मनात येत. तेथील श्रीयुक्तेश्वरांचा लहान शिष्य, प्रफुल्ल यास मी कलकत्त्यास बोलावले व त्यास रांचीच्या विद्यालयात घालण्याची व्यवस्था केली.

प्रफुल्लने मला सांगितले, “ज्या दिवशी सकाळी तुम्ही अलाहाबादला मेळ्यासाठी गेलात, त्याच वेळी गुरुजी बाकड्यावरच कोसळून पडले.”

“ते मोठ्याने ओरडून म्हणाले, ‘योगानंद गेला तर! योगानंद गेला!’ आणि मग गूढार्थाने बोलले, ‘होय, मला त्याला दुसऱ्या वेगळ्या पद्धतीने सांगितले पाहिजे.’ आणि त्यानंतर मग ते कित्येक तास स्तब्धच बसले.”

माझे दिवस व्याख्याने देण्यात, वर्ग घेण्यात, मुलाखती देण्यात आणि जुन्या मित्रांना भेटण्यात गेले. माझ्या पोकळ हसण्याच्या व अविश्रांत गडबडीच्या कामांच्या मागे एका काळसरशा औदासिन्याच्या प्रवाहाने माझ्या आंतरिक आनंदाच्या नदीतील प्रवाहास दूषित करून टाकले. तो आंतरिक आनंद आज कित्येक वर्षे माझ्या निरीक्षणांच्या वाळवंटातून नागमोडी मार्ग काढीत होता.

‘तो दिव्य महर्षी कोठे निघून गेला?’ व्यथित हृदयाच्या अगदी खोल अशा कप्प्यातून मी शांतपणे आक्रंदन केले.

त्याचे उत्तर आले नाही.

‘गुरुजींनी विश्वचैतन्याच्या बरोबर जर संपूर्ण सायुज्यता मिळविली असेल तर उत्तमच झाले.’ माझे मन मला खात्री देत होते, ‘ते अमरत्वाच्या साम्राज्यामध्ये चिरकाल देदीप्यमान होऊन राहिले आहेत.’

पण माझे अंतःकरण शोक करू लागले, ‘त्या जुन्या सेरामपूरच्या हवेलीमध्ये काही तुला आता पुनः कधीही ते दिसणार नाहीत. मित्रांना घेऊन त्यांना भेटावयास तुला आता कधी जाता येणार नाही. पुनः कधीही तुला गौरवाने असे म्हणता येणार नाही की, पहा, भारताचे ज्ञानावतार तेथे बसलेले आहेत!’

श्री राईट यांनी आम्हा मंडळींची, मुंबई सोडून परत पश्चिमेकडे जूनच्या सुरुवातीला जायची व्यवस्था करून ठेवली होती. मे महिन्याचा दुसरा पंधरवडा कलकत्त्यामध्ये, निरोप देण्याची भाषणे व मेजवान्या यांत गेला. आणि नंतर कु. ब्लेच, श्री राईट व मी असे आम्ही तिघे फोर्ड गाडीतून मुंबईकडे निघालो. तेथे आम्ही पोचल्यावर, जहाजांच्या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आमचे जाणे रद्द करावयास लावले. त्यांचे म्हणणे असे पडले की, आमच्या फोर्ड गाडीला बरोबर नेण्यास त्या बोटीवर जागा नव्हती; आणि गाडीची तर आम्हांला यूरोपमध्ये फार जरूर होती.

“काही हरकत नाही,” मी श्री राईट यांना उदासपणे म्हणालो, “मला पुरीला पुनः एकदा जाऊन यायचे आहे.” आणि मग शांतपणे मी त्यांना सांगितले, “माझ्या गुरुदेवांचे समाधिस्थान मला माझ्या अश्रूंनी पुनः एकदा भिजवू द्या.”



*स्वामी श्रीयुक्तेश्वर मकरसंक्रमण उत्सवाचे शेवटचे पर्व साजरे करीत आहेत, डिसेंबर 1935. उत्सवप्रसंगी श्रीरामपुर आश्रमातील प्रांगणात टेबलाजवळ श्री योगानंद आपल्या महान गुरुंच्या (मध्यभागी) शेजारी बसलेले दिसत आहेत.*



*श्री योगानंद (केंद्रस्थानी, गडद झग्यात), क्रियायोग च्या त्यांच्या काही विद्यार्थ्यांसोबत, जे त्यांच्या वडिलांच्या कोलकाता येथील घरी त्यांच्या योगदा (सेल्फ-रिअलाइझेशन) च्या शिकवणीच्या वर्गास उपस्थित होते, 1935 साली. मोठ्या संख्येत उपस्थिति असल्याकारणाने, योगानंदांचे धाकटे बंधू, नामांकित शरीर-संवर्धन तज्ञ, बिष्णु घोष यांच्या मोकळ्या हवेतील, शेजारीच असलेल्या व्यायामशाळेत वर्ग एकत्रित झाला होता.*



*स्वामी श्रीयुक्तेश्वरांचे पुरी येथील समाधी मंदिर*

1 परमहंसजींच्या महासमाधीनंतर सेरामपूर कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. ई. आब्राहाम यांनी सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपला एक मोठे पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, “स्वामीजींना सेरामपूर कॉलेजबद्दल फार, जिव्हाळा वाटत असे, हे मला माहीत आहे. आणि या गोष्टीचे अगदी यथायोग्य स्मारक म्हणून योगानंद शिष्यवृत्ती आम्ही ठेवली आहे.” (प्रकाशकांची टीप)

2 ‘अहं सः’ किंवा हंसा याचा शब्दशः अर्थ, ‘मी तो आहे’ असा आहे. ह्या दोन सामर्थ्यशाली संस्कृत मंत्राक्षरांचा श्वास व उच्छ्वास यांच्याशी स्पंदनात्मक संबंध आहे. म्हणजे प्रत्येक श्वासोच्छ्वासाच्या क्रियेमध्ये मनुष्य अभावितपणे ‘मी तो आहे’ ह्या सत्याचा उच्चार करीत असतो.

‘परमहंस’ शब्दशः ‘परम’ म्हणजे अत्युच्च, व ‘हंस’ म्हणजे हंसपक्षी. पुराणामध्ये श्वेतहंस हे ब्रह्मदेवाचे वाहन म्हणून सांगितलेले आहे. हा पवित्र पक्षी दूध व पाणी यांच्या मिश्रणातून निर्भेळ दूध वेगळे काढू शकतो. अशा तऱ्हेची विवेकशक्ती त्याच्या ठिकाणी असते. त्यास ‘निरक्षीर विवेक’ म्हणतात.

3 मला ‘सर्’ असे संबोधून त्यांनी ह्या अडचणीचे निवारण केलेले आहे.

4 म्हणाजे फार पुरातनकाळात ज्याची मुळे रुतली आहेत. अशा व मरणाच्या पूर्वीच्या अनुभवाच्या संस्कारातून निर्माण झालेली.

‘स्वरसवाही विदुषोऽपि तथारूढोऽभिनिवेशः । ।’ पातंजली —योगसूत्रे २-९

5 अशा धार्मिक मेळ्यांचा महाभारतात उल्लेख आहे. चिनी प्रवासी ह्यूएनत्सांग याने अलाहाबाद येथे इ. स. ६४४ मध्ये भरलेल्या विराट कुंभमेळ्याचे वर्णन लिहून ठेवलेले आहे. कुंभमेळा तीन वर्षांतून एकदा भरतो. एकदा हरद्वारला, एकदा प्रयागला (अलाहाबादला), नंतर नाशिक, नंतर उज्जयिनी व फिरून बारा वर्षांचे वर्तुळचक्र पुरे करून परत हरद्वारला भरतो. प्रत्येक ठिकाणी पूर्ण कुंभ भरल्यानंतर सहा वर्षांनी अर्धकुंभ भरतो. म्हणजेच कुंभ व अर्धकुंभ हे दर तीन वर्षांनी निरनिराळ्या शहरी भरतात.

ह्यूएनत्सांग पुढे असे लिहितो की, उत्तर भारतातील प्रसिद्ध सम्राट हर्षवर्धन याने आपल्या राज्यातल्या तिजोरीतील सारी संपत्ती (पाच वर्षांची शिल्लक) संन्यासी, भिक्षू व यात्रेकरू यांना कुंभमेळ्याच्या प्रसंगी वाटून टाकली होती. ह्यू-एन-त्संग जेव्हा चीनला परत यायला निघाला, तेव्हा हर्षवर्धनाने दिलेली भेट म्हणजे रत्ने आणि सुवर्ण ही घेऊन जाण्याचे त्याने नाकारले. पण त्याने त्यांच्याऐवजी अतिशय मौल्यवान अशा ६५७ पोथ्या (धार्मिक हस्तलिखिते) आपल्याबरोबर नेल्या.

6 माझ्या आईच्या, माझा थोरला भाऊ अनंता ह्याच्या, वडील बहीण रमा हिच्या, गुरुजींच्या, वडिलांच्या व इतर अनेक प्रियजनांच्या मृत्यूच्या प्रसंगी मी हजर नव्हतो.

(वडील १९४२ मध्ये कलकत्त्याला वारले. त्या वेळी त्यांचे वय एकोण नव्वद वर्षांचे होते.)

7 लाखो साधूंचे नियंत्रण एका कार्यकारी समितीमार्फत होत असते. ह्या समितीत सात पुढारी असतात. एकेक पुढारी भारतातील एकएका मोठ्या संघाचा प्रतिनिधि असतो. महामंडलेश्वर किंवा अध्यक्ष श्री श्रीजयेंद्र पुरी यांना मी भेटलो. हे संतसज्जन अतिशय मितभाषी आहेत; पुष्कळदा ते आपले भाषण तीन शब्दांवरच भागवून नेतात. सत्य, प्रेम आणि कर्म बस्स, झाले भाषण.

8 एक पदवी. शब्दशः अर्थ "जो आपल्या प्रज्ञेने पाहतो तो." (ज्याला चर्मचक्षू नाहीत तो.)

9 असे दिसते की, वाघावर मात करण्याने पुष्कळ मार्ग आहेत. फ्रान्सिस बर्टल्स ह्या ऑस्ट्रेलियन संशोधकाने असे नमूद केले आहे की, हिंदुस्थानातील जंगले, "विविध प्रकारची, रमणीय व तशी बिनधोक्याची" आहेत. संरक्षण करण्याची त्याची युक्ती म्हणजे फ्लायपेपर; आणि मग त्याने असा खुलासा केला की, "दररोज रात्री मी हे फ्लायपेपर माझ्या राहुटीभोवती पसरून ठेवी. मला कधीही मग त्रास झाला नाही. याचे कारण थोडेसे मानसिक स्वरूपाचे आहे. वाघ हा असा प्राणी आहे की, त्याला आपल्या उमदेपणाची फार जाणीव आहे. तो इकडेतिकडे स्वैरपणे माणसाला न जूमानता हिंडतो, पण फ्लायपेपरजवळ आला की माघारी फिरतो. चिकट अशा फ्लायपेपरवर एकदा बसल्यावर कोणताही उमदा वाघ मग माणसाच्यासमोर उभा राहत नाही."

10 श्रीयुक्तेश्वरांनी ह्याच वेळी म्हणजे ७ वाजता संध्याकाळी मार्च ९, १९३६ रोजी महासमाधी घेतली.

11 हिंदू धर्मात अन्त्यसंस्काराचे रिवाज दोन प्रकारचे आहेत; गृहस्थी लोकांकरिता दहन व स्वामी, संन्याशी व इतर योगीजनांकरिता दहन नसून दफन. (या रिवाजाला कधी अपवादही असतात.) साधुसंन्यासी जेव्हा संन्यासधर्माची दीक्षा घेतात, तेव्हा त्यांच्या ठिकाणी जी प्रज्ञा जागृत होते, त्या प्रज्ञेच्या अग्नीतच त्यांच्या पार्थिव देहाचे लाक्षणिक दृष्टया दहन होते, असा समज आहे.

प्रकरण - ४३

# 43. श्रीयुक्तेश्वर महाराजांचे पुनरुत्थान

"मुंबईतील रीजेंट हॉटेलमध्ये मी माझ्या खोलीत बसलो होतो. माझी खोली तिसऱ्या मजल्यावर होती. रस्त्र्याच्या पलीकडे एका उंच इमारतीच्या छपरावर एक चमत्कार खोलीतल्या लांब उघड्या खिडकीतून बाहेर पहात असताना माझ्या दृष्टीस पडला. स्मृतीमधून कधीही पुसले न जाणारे ते दृश्य एकदम माझ्या दृष्टीसमोर येऊन प्रगट झाले. "भगवान कृष्ण"—कृष्णावताराचे ते सुंदर चित्र मंद प्रकाशाने युक्त असे माझ्या दृष्टीसमोर उभे राहिले.

त्या दिव्य आकृतीने मला खुणावले. त्याच्या मुद्रेवर स्मिताची छटा होती. अभिवादन म्हणून त्या आकृतीने आपले मस्तक किंचित हलवले. भगवान श्रीकृष्णांचा नक्की संदेश काय होता हे मला काही कळेना. हे पाहिल्यावर त्या आकृतीने फक्त आशीर्वाद दिल्याची हालचाल केली व नंतर ती अंतर्धान पावली. काय आश्चर्य! मला जणू उचलले गेल्यासारखे झाले. काही तरी दिव्य साक्षात्कार—दृष्टान्त मला पहावयास मिळणार असे मला वाटू लागले.

अमेरिकेस माझे जाण्याचे, निदान काही दिवस तरी, स्थगित झाले. मुंबईत माझे बरेचसे सार्वजनिक सत्कार-समारंभ ठरले होते. त्यानंतर मी परत कलकत्त्याला व पुरीला जाणार होतो.

भगवान श्रीकृष्णांनी दिव्य दर्शन दिल्याला एक आठवडा झाला होता. जून १९; १९३६. दुपारी तीनची वेळ. मुंबईत रीजंट हॉटेलमध्ये मी बिछान्यावरच ध्यानस्थ बसलो असताना, एका सुंदर तेजस्वी प्रकाशाच्या झोताने मी एकाएकी जागा झालो. खोलीमधील वातावरणात एक चमत्कृतिकारक जग भासमान होऊ लागले. सूर्यप्रकाशात एक दिव्य छटा दृग्गोचर होऊ लागली.

श्रीयुक्तेश्वरांचा पार्थिव देह पाहताच माझ्या सर्व शरीरावर रोमांच उभे राहिले.

"बेटा," गुरुजींच्या तोंडून सौम्य शब्द बाहेर पडले. त्यांच्या मुखावर जगास वेड लावणारे एखाद्या देवदूताचे मुग्ध स्मित होते.

गुरुजींचे दर्शन झाल्याबरोबर त्यांच्या पाया पडलो नाही, अशी ही माझ्या आयुष्यातली पहिलीच वेळ. पण हे दिव्य दर्शन होताक्षणीच मी गुरुजींच्या त्या पार्थिव देहास अगदी दृढालिंगन दिले. काय दिव्य आनंद तो! त्यांचे देहावसान झाल्यानंतर माझ्या मनाला ज्या काही यातना झाल्या त्या मी ताबडतोब विसरून गेलो व माझे मन एका पूर्ण व दिव्य आनंदामध्ये पोहू लागले.

"गुरुजी, ह्या आपल्या लाडक्या शिष्यास सोडून आपण असे एकाएकी का बरे निघून गेलात?" हर्षातिरेकाने माझे मन अगदी भारावून गेले होते. "कुंभमेळ्यास जा म्हणून आपण मला का सांगितले? आपणांस सोडून जाताना माझ्या स्वतःचाच मला किती राग आला होता!"

“बेटा, ज्या ठिकाणी पूज्य बाबाजींचे मला प्रथम दर्शन झाले त्या पुण्यक्षेत्राच्या यात्रेला तू निघालेला; त्या तुझ्या आनंदावर विरजण पडू नये, तुझ्या मनाचा हिरमोड होऊ नये म्हणून मी तुझ्या कार्यक्रमात व्यत्यय आणला नाही. तुझा-माझा तो विरह फक्त थोड्याच वेळाचा होता; नाही का? पण आता मी तुझ्या अगदी जवळ आहे ना?”

“पण गुरुदेव, पुरीच्या वाळवंटात जो आपला हाडामांसाचा, खराखुरा देह भूमातेच्या उदरात दृष्टीआड झाला त्यासारखाच हा आपला देह आहे काय?”

“होय बेटा, तोच माझा हा देह. तेच हे हाडामांसाचे शरीर. माझ्या दृष्टीला ते दिव्य शरीर भासते, पण तुझ्या दृष्टीला ते खरेखुरेच वाटेल. स्वर्गीय परमाणूमधून (cosmic atoms) मी हे अगदी नवीनच शरीर निर्माण केले आहे. पुरीच्या स्वप्नमय वाळवंटात तुमच्या स्वप्नमय ऐहिक जगात, जे माझे हाडामांसाचे शरीर तुम्ही विलीन केले तेच हे स्वर्गीय स्वप्नमय पार्थिव शरीर (cosmic dream physical body). माझे पुनरुत्थान झाले आहे, पण भूलोकात नव्हे परलोकात (astral planet). ह्या परलोकातील रहिवाशांना भूलोकातील रहिवाशांपेक्षा माझ्या उच्च अवस्थेचे जास्त आकलन होते. ह्याच परलोकामध्ये, तू आणि उच्च कोटीस पोचलेले तुझे प्रियजन एके दिवशी येतील व मला भेटतील.”

“अमर गुरुदेव, बोला, आणखी बोला.”

गुरुदेवांनी गमतीने किंचित हास्य केले आणि ते म्हणाले, “बेटा, तुझ्या बाहूपाशांची मिठी जरा सैल करशील का? अगदी थोडी.”

गुरुदेवांना मी जणू एखाद्या कोळ्याप्रमाणे आठ बाजूंनी घट्ट आवळून धरलेले होते. त्यांच्या त्या दिव्य शरीरातून एका नैसर्गिक मंद सुगंधाचा परिमल दरवळत होता. अगदी तसाच परिमल, पूर्वी ते हयात असताना, त्यांच्या पार्थिव शरीरातून दरवळत असे. गुरुदेवांच्या ह्या दिव्य शरीराच्या भेटीच्या वेळी माझ्या बाहूंना व हातांच्या तळव्यांना त्यांचा जो स्पर्श झाला, त्या स्पर्शाचे रोमांच माझ्या शरीरावर त्या दिव्य दर्शनाची आठवण झाल्याक्षणी अजूनही उठतात. श्रीयुक्तेश्वर पुढे बोलू लागले, “आपल्या शारीरिक कर्मांची पूर्तता करण्याच्या कामी मदत करण्यासाठी म्हणून असे संतप्रेषित भूलोकात अवतीर्ण होतात. त्याचप्रमाणे परमेश्वराने मला ह्या परलोकात (astral world) साहायक म्हणून पाठविले आहे.” श्रीयुक्तेश्वरांनी खुलासा केला, “ह्या परलोकाला हिरण्यलोक असेही म्हणतात (illumined astral planet). ह्या लोकांत ज्या उच्च कोटीच्या व्यक्ती आहेत, त्यांना त्यांच्या पारलौकिक कर्मांची (astral karma) पूर्तता करण्याच्या कामी व पारलौकिक पुनर्जन्मापासून मुक्तता करण्याच्या कामी, मी मदत करीत असतो. ह्या हिरण्यलोकातील रहिवासी आध्यात्मिक दृष्ट्या फार वरच्या कोटीला गेलेले असतात. मृत्यूच्या वेळी आपल्या इच्छेनुसार पार्थिव देहाचा त्याग करण्याची शक्ती, त्या सर्वांनी आपल्या पूर्वीच्या भूलोकातील आयुष्यामध्ये, ध्यानाच्या बळावर संपादन केलेली असते. आपल्या पूर्वीच्या भूलोकातील आयुष्यामध्ये सविकल्प व निर्विकल्प समाधीचा [1] अनुभव घेतल्याखेरीज, कोणासही ह्या हिरण्यलोकात प्रवेश मिळत नाही.

पृथ्वीवरील बहुतेक सर्व जीवांस मरणोत्तर ह्या साधारण स्वरूपाच्या परलोकगोलांमधून (astral spheres) जावे लागते आणि हिरण्यलोकातील रहिवासी ह्या अशा परलोकगोलांमधून अगोदरच जाऊन आलेले असतात. ह्या परलोकांतील वास्तव्यात त्यांनी परलोकांतील आपल्या पूर्वसंचिताशी संलग्न असलेल्या कर्मांची बीजे नष्ट करून टाकलेली असतात. ह्या परलोकातील वास्तव्यात [2] अगदी उच्च कोटीप्रत पोचलेल्या सिद्धांखेरीज इतरांस हे ऋणमोचनाचे कार्य व्यवस्थितपणे करता येत नाही. परलोकातील कर्माच्या सर्व अवशेषांपासून त्यांच्या आत्म्यांना पूर्ण मुक्ती मिळविण्यासाठी, स्वर्गलोकातील नियमांनुसार ह्या मुमुक्षूंना परत हिरण्यलोकात, परलोकात किंवा स्वर्गात (heaven) नवीन परलोक देह (new astral body) धारण करून जन्म घ्यावा लागतो आणि तेथे मी त्यांना त्या कामी मदत करीत असतो. ह्या हिरण्यलोकात अगदी जवळजवळ मुक्त किंवा अवधूत मुमुक्षू, ह्याहूनही श्रेष्ठ अशा कारणलोकातून, (causal world) आलेले असतात.

माझे मन गुरुदेवांच्या ठिकाणी आता इतके तल्लीन झाले होते की, ते आपले जणू चित्रमय शब्द, काही शब्दांनी व काही विचारलहरींच्या द्वारा मला ऐकवीत होते. आणि अशा तऱ्हेने मी त्यांचे बोलणे ऐकत होतो. जणू कल्पनांच्या—विचारांच्या गोळ्या घेत होतो.

गुरुदेवांनी आपले भाषण चालू ठेवले: “धर्मग्रंथांतून व पुराणांतून आपण वाचतो की, परमेश्वराने मानवी आत्म्यास तीन देहांची उपाधी लाविलेली आहे. ही उपाधी म्हणजे बंधनेच होत, पहिले बंधन म्हणजे जड पार्थिव शरीर, दुसरे सूक्ष्म लिंगशरीर की ज्या अवस्थेत मनुष्यप्राण्याच्या वासना व भावना मृत्यूनंतर तशाच राहतात; व तिसरे म्हणजे कल्पनारूपी कारणशरीर (gross material body; subtle astral body & the idea or causal body). पृथ्वीवरील जडदेहात शारीरिक इंद्रिये वास करतात. सूक्ष्म लिंगशरीर, जाणीव व भावना यांच्यावर चालते. हे सूक्ष्म लिंगशरीर लाइफ-ट्रॉन्सचे (प्राणकणांचे) [3] बनलेले असते. कारणशरीर धारण करणारा जीव एका सुखकारक अशा केवळ कल्पनासृष्टीतच वावरत असतो. सूक्ष्म लिंगदेह धारण करणाऱ्या जीवास कारणशरीरात प्रवेश किंवा कारणशरीर धारण करणाऱ्या जीवास तेथेच प्रवेश मिळवून देण्याच्या कामी मदत करण्याचे काम मी ह्या लोकात सध्या करीत असतो.”

“पूज्य गुरुदेव, ह्या परलोक अंतराळाबद्दल मला आणखी काही माहिती सांगता का?” गुरुदेवांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना घातलेली मिठी मी जरा सैल केली. पण माझ्या बाहूंनी त्यांना कवटाळलेलेच होते. मला भेटण्याकरिता मृत्यूला न जुमानणाऱ्या ह्या माझ्या गुरुदेवांच्या दृष्टिगोचर देहाच्या आलिंगनाचे हे सुख खरोखरी काय वर्णावे? त्याची योग्यता सांगता येणार नाही; किंमत करता येणे शक्य नाही.

गुरुदेवांनी सुरुवात केली, “असे परलोक अनेक आहेत व त्यांत वास करणारेही अनेक आहेत. त्यांची भ्रमण करण्याची वाहनेही ह्या लोकांस साजेशी अशीच आहेत. ही वाहने म्हणजे तेजाचे किंवा प्रकाशाचे पुंजके एका ग्रहावरुन दुसऱ्या ग्रहावर विजेच्या किंवा रेडिओअॅक्टिव्ह शक्तीच्या वेगापेक्षा जास्त वेगाने गमन करू शकतात. हे परलोकविश्व प्रकाश व रंग यांच्या सूक्ष्म आंदोलनांचे, लहरींचे बनलेले आहे; आणि ते जडविश्वाच्यापेक्षा

शेकडो पटींनी मोठे आहे. परलोकगोलाच्या ह्या अजस्र तेजोमय फुग्याला जणू बांधलेली एक लहानशी घनरूपी खड्यासारखी टोपली म्हणजेच जणू ही सगळी जडसृष्टी. ज्याप्रमाणे अंतराळात अनेक जडस्वरूपी सूर्य व तारे (material suns & stars) भ्रमण करीत असतात, त्याचप्रमाणे ह्या लोकांतही असंख्य सूर्यमाला व ताऱ्यांचे पुंजके इतस्ततः भ्रमण करीत असतात. हे परलोकातील (astral) सूर्य व चंद्र भूलोकातील सूर्यचंद्रापेक्षा अधिक सुंदर व मोहक असतात. हे परलोकीचे (astral) तेजोगोल (luminaries) पृथ्वीच्या उत्तर ध्रुवावरील ध्रुवीय प्रकाशा (आरोरा वोरिआलिस सारखे असतात. ह्या परलोकाच्या सूर्याचा किरणसंभार हा सौम्यप्रकाशी व चंद्राच्या किरणसंभारापेक्षा अधिक नेत्रदीपक, उजळ असतो. ह्या लोकाचे दिवस व रात्र भूलोकावरील दिवस व रात्र यांपेक्षा मोठे असतात. हे ह्या लोकाचे विश्व (astral universe) अमर्याद कोटीचे सुंदर, स्वच्छ, शुद्ध आणि सुसंबद्ध असते. ह्या लोकांत, ज्यावर काही एक प्राणी वावरत नाहीत असे ग्रह नसतात की ओसाड भूखंडे नसतात. भूलोकातील रानगवत, रोगजंतू, कृमी साप ह्यांसारखी किल्मिषे (blemishes) या लोकात नसतात. पृथ्वीवर हवामान व ऋतू वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे असतात. पण ह्या लोकात ते सगळीकडे सारखेच असतात; अगदी चिरकाल टिकणाऱ्या वसंत ऋतूप्रमाणे. फक्त कधीकधी तेजस्वी हिमवर्षाव व अनेक रंगांच्या प्रकाशाचा पाऊस मात्र पडतो. ह्या परलोकात विविधरंगी पाण्याची सरोवरे, तेजाने लखलखणारे सागर व इंद्रधनुष्याच्या नद्या असतात.

“ह्या सर्वसाधारण परलोकविश्वात (ordinary astral universe) लाखो परलोकदेह धारण करणारे जीव वास करीत असतात. हे बहुतेक भूलोकातून नुकतेच येथे आलेले असतात. ह्याखेरीज ह्या लोकात अनेक पऱ्या, मत्स्यकन्या, मत्स्य, प्राणी, भुते, खुजे राक्षस, यक्ष, गंधर्व, मृतात्मे हेही वास करीत असतात. हे सर्व आपापल्या कर्मानुसार— भूलोकीच्या पापपुण्यानुसार या लोकीच्या निरनिराळ्या ग्रहांवर वास करीत असतात. ह्या परलोकविश्वाखेरीज, ह्याहूनही सूक्ष्म असे हिरण्यलोकविश्व असते ते वेगळेच. या परलोकविश्वात पुण्यात्मे व पापात्मे यांच्याकरिता वेगवेगळी गोल निवासस्थाने किंवा आंदोलन पावणारे असे अंतरिक्ष-विभाग करून ठेवलेले असतात. पुण्यात्म्यांना अंतराळात स्वैरसंचार करता येतो. भूलोकावर जसे मनुष्यप्राणी जमिनीवर, मासे पाण्यात व पक्षी हवेत राहतात व संचार करतात; त्याचप्रमाणे ह्या लोकीचे रहिवासी सुद्धा वेगवेगळ्या श्रेणीत विभागलेले असतात व त्यांची वसतिस्थाने वेगवेगळी ठेविलेली असतात. ही वसतिस्थाने स्पंदन-आंदोलनशील अशी असतात.

निरनिराळ्या परलोकांतून पतित झालेले काळेकुट्ट देवदूत आपापसात झगडतात. त्यांच्यात युद्धे पण होतात; पण त्यांची लढण्याची शस्त्रास्त्रे म्हणजे प्राणकणरूपी (lifetronic) बॉम्ब किंवा मनोजन्य मांत्रिक [4] स्पंदनशील प्रकाशकिरण (mental-mantric-vibratory rays) हे पतितात्मे परलोकअंतराळाच्या (astral cosmos) अगदी खालच्या थरात वास करतात. तेथे पूर्ण अंधकार असतो, आणि तेथे हे पतितात्मे आपआपल्या पापी कर्मांचे क्षालन भिन्न असतात.

“आणि ह्या अंधकारमय तुरुंगासारख्या वरील भागात सर्व काही चकचकीत व सुंदर असते. पृथ्वीपेक्षा हे परलोकविश्व (astral cosmos) परमेश्वरी इच्छेनुसार अधिक पूर्ण व योजनाबद्ध असते. ह्या परलोकविश्वातील प्रत्येक वस्तू ही प्रामुख्याने ईश्वरी इच्छेनुसार प्रकट होत असते. परमेश्वराने अगोदरच निर्माण केलेल्या कोणत्याही वस्तूत बदल करण्याचे किंवा त्याचे रंगरूप पालटण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी असते. परमेश्वराने ह्या आपल्या परलोकवासी बालकांना ह्या परलोकविश्वात आपल्या मर्जीनुसार बदल किंवा सुधारणा घडवून आणण्याचे स्वातंत्र्य व खास हक्क दिलेले आहेत. इहलोकावर घन पदार्थाचे द्रवरूपात किंवा अन्य रूपात नैसर्गिक किंवा रासायनिक पद्धतीनेच फक्त रूपांतर होऊ शकते. पण ह्या परलोकातील घन पदार्थ ह्या लोकास सदृश अशा द्रवरूपात किंवा वायुरूपात किंवा अणुशक्तीमध्ये केवळ येथील रहिवासी-आत्म्यांच्या एकमेव इच्छेनुसार व ताबडतोब परिवर्तित होऊ शकतात.”

गुरुजींनी आपले भाषण पुढे चालू ठेवले, “पाणी, जमीन व हवा या तिन्ही क्षेत्रांमध्ये भूलोकी सारखा संघर्ष चाललेला असतो. लढाया, खून, मारामाऱ्या सारख्या चालू असतात व त्यामुळे सर्व वातावरण अगदी बिघडून गेलेले असते; काळेकुट्ट झालेले असते परंतु ह्या परलोकातील अंतराळात एक तऱ्हेची सुखदायी सुसंबद्धता व समता वास करीत असते. ह्या परलोकातील आत्मे आपल्या स्वेच्छेनुसार पुनः जड देह घेतात व त्याचा त्यागही करतात. ह्या लोकीची फुले, मासे किंवा इतर प्राणी हे किंचित्काल आपल्या स्वेच्छेनुसार मानवी रूपे किंवा आकृती धारण करतात. ह्या लोकातील सर्व जीवांना, वस्तूंना कोणतेही रूप धारण करता येते व एकमेकांशी संबंध ठेवता येतो. कोणत्याही एका विशिष्ट निसर्गनियमांचे, निर्बंधांचे त्यांच्यावर बंधन नसते. उदाहरणार्थ, या लोकीचे एक झाड घ्या. ह्या झाडापासून वाटेल ते फळ किंवा वस्तू निर्माण होऊ शकते. आंब्याचे फळ म्हणा किंवा मोहोर म्हणा किंवा कोणतीही एखादी वस्तू म्हणा; ती स्वेच्छेनुसार त्यापासून निर्माण होऊ शकते. ह्या लोकी अर्थात काही पूर्वसुकृतानुसार निरनिराळी बंधने असतात हे खरे; पण येथील आत्मे आपल्या स्वेच्छेनुसार वाटेल ते रंगरूप धारण करू शकतात. सर्व काही परमेश्वराच्या निर्माणशक्तीच्या तेजामध्ये आंदोलन पावत असते (vibrant with God’s creative light).

“येथील सगळ्या व्यक्ती अगदी अयोनिसंभव आहेत. स्वर्गलोकात लय लावलेल्या आपल्या इच्छेच्या संदेशानुसार (cosmically attuned will) येथील व्यक्ती संतती निर्माण करतात; व ही संतती ह्या लोकाला सदृश अशा काही विवक्षित स्वरूपांमध्ये व आकृतीमध्ये निर्माण होते. ज्याचे पार्थिव शरीर विच्छिन्न झालेले आहे, असा भूलोकातून नुकताच नष्ट झालेला प्राणी ह्या लोकात जो येतो तो बोलावण्यावरून येतो. हे बोलावणे किंवा आमंत्रण त्या व्यक्तीच्या मानसिक व पारलौकिक वृत्तींनी त्याला दिलेले असते.

ह्या परलोकातील व्यक्तीस शीत, उष्ण किंवा इतर नैसर्गिक उपाधींची बाधा होत नाही. ह्या लोकाच्या देहामध्ये या लोकीला सदृश असा मेंदू असतो. ह्या मेंदूत सर्वज्ञ स्वरूपाचे असे सहस्र कमळांचे तेजोकमळ अंशतः कार्य करीत असते. आणि त्याप्रमाणे ह्या लोकाच्या देहातील सुषुम्ना (astral cerebrospinal axis) नाडीमधील जागृत झालेली सहा केंद्रे

सुद्धा कार्य करीत असतात. हृदय मेंदूपासून प्रकाश आणि अंतरिक्ष-शक्ती (cosmic energy) ग्रहण करते व ती ह्या लोकांच्या मज्जाजंतू व शरीरपेशी (body cells) यांमध्ये वाटून टाकते. येथील व्यक्ती आपल्या आकारांमध्ये, आकृतीमध्ये फरक करू शकतात. हे फरक प्राणकण-प्रेरणा (lifetronic force) आणि पवित्र मंत्रोच्चारांनी उत्पन्न झालेली आंदोलने यांच्या साहाय्याने केले जातात.

“बहुतेक व्यक्तींच्या बाबतीत त्यांचा ह्या लोकाचा देह हा त्यांच्या पूर्वीच्या पार्थिव देहासारखाच असतो. ह्या परलोकदेहाचे तोंड व त्याचा बांधा हा त्याच्या पूर्वीच्या भूलोकातील देहाच्या तारूण्यावस्थेत जसा होता तसा असतो. माझ्यासारखा एखाददुसराच आपल्या पूर्वदेहाच्या वृद्ध स्वरूपात या लोकी पदार्पण करतो.” हे म्हणताना गुरुदेवांनी एखाद्या तरुणाला साजेल असा हर्षपूर्ण चीत्कारोद्‌गार काढला.

“ह्या भूलोकात अवकाश धरून तीन अक्ष असतात (three dimensional) आणि त्याचे ज्ञान फक्त पाच ज्ञानेंद्रियांनी अवगत होऊ शकते. पण त्या परलोकविश्वात आणखी एका ज्ञानेंद्रियाची भर पडते. ते ज्ञानेंद्रिय म्हणजे अंतःस्फूर्ती किंवा अंतःसंवेदना. ह्या ज्ञानेंद्रियाने सर्व काही गोचर होते.” श्रीयुक्तेश्वरांनी आपले भाषण पुढे चालू ठेवले, “केवळ अंतःस्फूर्तीच्या साहाय्याने ह्या परलोकीच्या व्यक्ती पाहू, ऐकू वास घेऊ शकतात, चव घेऊ शकतात, स्पर्श करू शकतात. त्यांना तीन डोळे असतात; त्यांपैकी दोन थोडेसे मिटलेले असतात. तिसरा हा प्रमुख व खास या लोकांचा असा डोळा आहे. हा डोळा अगदी कपाळावर मध्यभागी उभा व उघडा आहे. या लोकाच्या वासीयांना डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा ही सगळी बाह्य ज्ञानेंद्रिये असतात. पण ह्या सगळ्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग येथील व्यक्ती देहाच्या कोणत्याही भागातून अंतःस्फूर्तीच्या साहाय्याने करू शकतात. त्या कानाने, नाकाने किंवा त्वचेचा उपयोग करून डोळ्याचे कार्य करू शकतात, पाहू शकतात. डोळ्याचा किंवा जिभेचा उपयोग करून ते ऐकू शकतात आणि कानाचा किंवा त्वचेचा उपयोग करून ते चव घेऊ शकतात वगैरे. [5]

“मनुष्याच्या पार्थिव शरीराला असंख्य धोके असतात व ते अगदी सहजरीत्या दुखावले जाते; विद्रूप केले जाते. पण हे परलोकशरीर असे आहे की, त्याला कधी जर दुखापत झाली किंवा ते कापले गेले तरी नुसत्या इच्छाशक्तीच्या जोरावर ते पुनः दुरुस्त केले जाते.

“गुरुदेव, ह्या सगळ्या परलोकवासी व्यक्ती सुंदर असतील नाही?”

“ह्या परलोकात सौंदर्य हा आत्मिक गुण आहे. भूलोकातल्यासारखा तो बाह्य रंगरूपावर आधारलेला नसतो.” श्रीयुक्तेश्वरांनी उत्तर दिले, “आणि म्हणून ह्या लोकांच्या व्यक्ती बाह्य रंगरूपास, मुख वगैरे अवयवांस फार थोडे महत्त्व देतात. पण त्या आपल्या इच्छेनुसार वाटेल तो देह—नवीन, रंगीबेरंगी—पण ह्या लोकीला साजेसा असा धारण करू शकतात; त्यास नटवू-सजवू शकतात. जसे भूलोकातील मानव, सणासुदीच्या दिवशी नवीन नवीन कपडे, दागदागिने घालतात तसेच ह्या लोकाच्या व्यक्ती कधी कधी काही एका विशिष्ट पद्धतीनुसार आपल्या देहावर शृंगार-साज चढवतात.

“परलोकातील हिरण्यलोकासारख्या अतिउच्च लोकांवर कधी कधी आनंदाचे उत्सव साजरे केले जातात. ते केव्हा? तर ज्या वेळी या लोकाची व्यक्ती आपल्या आत्मिक उन्नतीनुसार स्वर्गात किंवा कारणलोकात प्रवेश करण्यास निघते, तेव्हा तिला निरोप देण्याच्या वेळी येथे मोठा उत्सव-समारंभ साजरा केला जातो. अशा उत्सवप्रसंगी अदृश्य असा परमेश्वर व त्याच्या ठिकाणी विलीन झालेले संत-महात्मे, ह्या लोकावर ह्या लोकाचे देह धारण करून अवतरतात व ह्या उत्सव-समारंभात उत्साहाने भाग घेतात. आपल्या आवडत्या लेकरांच्या हट्टास्तव, परमेश्वर ते म्हणतील त्या आकाराचे रूप धारण करतो. भक्तिभावपूर्वक पूजा करणाऱ्या भक्ताला परमेश्वर मातेच्या (Divine Mother) स्वरूपात दिसतो. येशू ख्रिस्ताला या अनंताचे रूप पित्याच्या स्वरूपात जास्त आवडले व पटले. विधात्याने ही जी वैचित्र्यपूर्ण सृष्टी निर्माण केली आहे, त्यामुळे ह्या निर्माण केलेल्या प्राण्यांना परमेश्वर त्यांच्या कल्पनेप्रमाणे परिचित वा अपरिचित अशा निरनिराळ्या स्वरूपांत दिसतो.” गुरुदेव व मी दोघेही अगदी बरोबर, मनापासून हसलो.

“अन्य जन्मातील मित्रमंडळी ही ह्या लोकात एकमेकांस सहज ओळखून काढतात.” श्रीयुक्तेश्वरांनी आपले भाषण आपल्या सुंदर मधुर गोड आवाजात चालू ठेवले; “मैत्रीचे अमरत्व पटल्यामुळे या आत्म्यांना अगदी अपरिमित आनंद झालेला असतो. ऐहिक आयुष्याच्या समाप्तीच्या वेळी एकमेकांचा विरह त्यांना अगदी तापदायक व दुःसह झालेला असतो व प्रेमाच्या अनश्वरत्वावरचा त्यांचा विश्वास उडालेला असतो. आता त्या प्रेमीजनांच्या भेटी-गाठी झाल्यामुळे प्रेमाचे चिरकालित्व, अनश्वरत्व त्यांना पुनरपि पटू लागते.

ह्या लोकातील व्यक्ती स्फूर्तीच्या जोरावर हे आवरण दूर करतात आणि मनुष्यप्राण्यांचे सर्व व्यवहार पाहतात; परंतु मनुष्याला मात्र या लोकांच्या हालचाली, त्याचे सहावे ज्ञानेंद्रिय काहीसे विकसित झाल्याखेरीज दिसू शकत नाहीत; भूलोकातील हजारो माणसांना कधी कधी क्षणभर का होईना, पण ह्या परलोकविश्वाचे [6] किंवा येथील वासीयांचे किंचित दर्शन झालेले असते.

“हिरण्यलोकातील रहिवासी दिवसा व रात्री साधारणपणे उच्चतम निर्विकल्प समाधीच्या आनंदात असून जागृतावस्थेत असतात, आणि ते ह्या अंतरिक्षविश्वातील अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्यात आणि दुर्वृत्त, पृथ्वीबद्ध आत्म्यांच्या उद्धारात साहाय्य करीत असतात.

हिरण्यलोकवासी झोपतात तेव्हा त्यांना स्वप्नासारखी दिव्य दृश्ये दिसतात.

“ह्या परलोकविश्वातील सर्व ठिकाणचे रहिवासी मानसिक दुःखे, क्लेश वगैरेंपासून अलिप्त नसतात. या लोकाच्या हिरण्यलोकासारख्या ग्रहांवर ज्या उच्चपदस्थ विभूती असतात, त्यांची मने फार भावनाशील असतात व त्यांच्या हातून वागण्यात किंवा सत्यदर्शनामध्ये जर काही चूक झाली तर त्यांना अगदी फार दुःख होते. ह्या उच्चकोटीला गेलेल्या विभूती आपल्या प्रत्येक आचरणात, आचारविचारांत आध्यात्मिक विधिनियमांनुसार पूर्णता आणण्याचा प्रयत्न करीत असतात.

“ह्या परलोकविश्वात निरनिराळ्या जीवांमधील दळणवळण पूर्णपणे समभावनेवर (telepathy) व दूरवीक्षणावर (television) चालत असते. शब्द उच्चारलेला व लिहिलेला यांमध्ये जसा गोंधळ व समजुतीचा घोटाळा या भूलोकावर होतो, तसा गोंधळ व घोटाळा या परलोकविश्वात होत नाही.

“सिनेमागृहातील पडद्यावर प्रकाशाच्या झोतामध्ये जशी चित्रे, माणसे, पशु-पक्षी हालचाल करताना दिसतात, पण ती जिवंत नसतात; ती श्वासोच्छ्वास करीत नाहीत; त्याचप्रमाणे ह्या परलोक-लोकातील व्यक्ती प्रकाशमय व्यक्तित्वाने, सुबुद्ध व सुसंबद्ध रीतीने चालतात, फिरतात व कामे करतात. त्यांच्या हालचालींना प्राणवायूची आवश्यकता लागत नाही. मनुष्यप्राणी घन, द्रव, वायुरूप पदार्थांवर व हवेतील जीवशक्तीवर (life energy) अवलंबून असतो, पण परलोकविश्वातील रहिवासी प्रामुख्याने अंतरिक्षातील प्रकाशावर (cosmic light) जगत असतात.”

“गुरुदेव, हे परलोकवासी काही खातात काय?” मन, अंतःकरण व आत्मा या सगळ्यांच्या भावना एकवटून, गुरुजींच्या ह्या आश्चर्यकारक स्पष्टीकरणाचे—जणू अमृताचे मी पान करीत होतो. अतींद्रिय अनुभव (super conscious perceptions) हे निरंतर सत्य व अक्षर असतात. या उलट ज्ञानेंद्रियांचे विविध अनुभव क्षणभंगुर असतात; त्यांची आठवण सुद्धा मनुष्यास फार वेळ राहात नाही. माझ्या गुरुदेवांच्या ह्या शब्दांनी माझ्या मनावर व अस्मितेवर इतका जबरदस्त धक्का दिला की, पुढे आयुष्यात केव्हाही मी मनाला अतींद्रिय अवस्थेप्रत (super conscious state) नेऊन, ह्या दैवी सुखाची स्पष्ट आठवण जागृत करू शके.

“ह्या परलोकभूमीत वनस्पती प्रकाशमान किरणरूप असतात आणि त्या अगदी विपुल असतात,” त्यांनी उत्तर दिले, “ह्या लोकातील रहिवासी फळे, कंदमुळे, भाज्या खातात आणि येथील तेजस्वी प्रकाशाच्या कारंज्यांमधून आणि सूक्ष्म झरे व नद्यांमधून वाहणाऱ्या अमृताचे प्राशन करतात. ज्याप्रमाणे साधारणतः पृथ्वीवरील मानवप्राण्यांची अदृश्य प्रतिबिंबे ईथर (ether) मधून आकर्षून आणता येतात व दूरवीक्षणाच्या (television) साधनांनी दृष्टिपथात आणता येतात आणि नंतर फिरून आकाशामध्ये (space) ती नाहीशी करता येतात; त्याचप्रमाणे ह्या परलोकास योग्य अशा ईश्वरनिर्मित वनस्पतींच्या, शाकभाज्यांच्या, फळाफुलांच्या अदृश्य आकृती ईथरमध्ये तरंगणाऱ्या, येथील रहिवाशांच्या आज्ञेनुसार परलोकग्रहांवर परत विलीन करता येतात. त्याच पद्धतीने ह्या परलोकवासीयांच्या कल्पनेच्या भराऱ्यांतून विस्तीर्ण उद्याने-उपवने जडसृष्टीत निर्माण करता येतात; फिरून ही सगळी सृष्टी ईथरमध्ये अदृश्यतेत विलीन होते; नाहीशी होते.

“हिरण्यलोकासारख्या स्वर्गगोलावर राहणाऱ्या व्यक्तींना पुण्यवानांना खाण्यापिण्याची तादृश जरुरी भासत नाही; तरी पण ह्याही पलीकडे कारणविश्वात (causal world) जे पुण्यवान पूर्णस्वरूपी आत्मे वास करतात, आणि ज्यांच्या अस्तित्वाला कशाचीही खरोखरी गरज लागत नाही, त्यांचे अन्न म्हणजे सुखानंदाचे स्वर्गीय भोजन (manna of bliss).

“ह्या परलोकअंतराळात (astral cosmos) परलोकव्यक्तीला, निरनिराळ्या दिग्विभागांमध्ये, त्याचे भूलोकातील निरनिराळ्या जन्मांतील [7] असंख्य नातेवाईक, आप्त,

आईबाप, पतिपत्नी, मुलेबाळे आणि सगेसोयरे भेटतात. अनेक जन्मींचे-जन्मोजन्मींचे हे आप्तसंबंध असल्यामुळे कोणावर आता जास्त लोभ करावा, प्रेम दाखवावे हे त्याचे त्यास कळत नाही. मग तो त्यांच्यावर सारखेच, समभावाने प्रेम करतो. हे स्वर्गीय प्रेम होय. सर्व माणसे त्याला अगदी परमेश्वराची लेकरे, परमेश्वराचीच मूर्त स्वरूपातील रूपके वाटतात.

"ह्या आप्तेष्टांचे चेहरे-मुखवटे आता जरी थोडेबहुत बदललेले असले—आणि ते त्यांच्या भिन्नभिन्न पूर्वजन्मींच्या नव्यानव्या गुणावगुणांनुसार बदलतातही—तरी ह्या परलोकवासी रहिवाश्यांस ते सगळे आपल्या स्फूर्तीच्या बळावर अचूक ओळखून काढता येतात. ही सगळी आप्तेष्टमंडळी निरनिराळ्या जन्मांमध्ये त्याला प्रिय झालेली असते. ती पुनः त्याला येथे भेटल्यावर ह्या नवीन विश्वात तो त्यांचे अगदी हार्दिक स्वागत करतो—सृष्टीमधील प्रत्येक परमाणूस (atom) एक स्वतंत्र असे—इतर परमाणूंहून निवडून काढता येण्यासारखे—अस्तित्व [8] असते—आणि त्यामुळे ह्या लोकाचा मित्र—मग त्याचा बाह्य पोशाख कसाही असो—भूलोकावरील मित्र म्हणून सूक्ष्म अवलोकनाने त्याला चटकन हुडकून काढता येतो.

"ह्या परलोकगोलावर आर्युमर्यादा पृथ्वीवरच्या आर्युमर्यादेपेक्षा पुष्कळच जास्त असते. ऐहिक जगात संपादन केलेल्या पुण्यसंचयावर ह्या परलोकग्रहावरील आर्युमर्यादा अवलंबून असते. हे पुण्य संपले की त्याबरोबर त्या व्यक्तीची रवानगी फिरून भूलोकावर होते. काही व्यक्ती त्यांच्या जड शरीराच्या मृत्यूबरोबरच फिरून पृथ्वीवर जन्मास येतात; कारण ऐहिक आयुष्य भोगण्याची त्यांची तीव्र इच्छा राहिलेली असते. ह्या परलोकातील आर्युमर्यादा साधारणपणे उन्नत व्यक्तींच्या बाबतीत पाचशे ते हजार वर्षे असते. कालाचे हे परिमाण पृथ्वीवरील कालमापनास अनुसरून धरले आहे. इतर झाडांपेक्षा जशी वड-पिंपळाची झाडे जास्त काळ जगतात; किंवा साधारणपणे सामान्य माणसाची आर्युमर्यादा साठ वर्षांपर्यंत असली तरी योगीपुरुष अनेक शतके जगतो, त्याचप्रमाणे ह्या परलोकगोलावर काही अपवादात्मक व्यक्ती जवळजवळ दोन हजार वर्षांपर्यंत आयुष्य उपभोगतात.

"ह्या परलोकवासी व्यक्तीस आपल्या तेजस्वी शरीराचा त्याग करतेवेळी मृत्यूशी दुःखदायक, क्लेशकारक असा झगडा करावा लागत नाही. परंतु पुष्कळशा व्यक्तींना मात्र ह्या परलोकदेह टाकून स्वर्गीय देह (causal form) धारण करावयाच्या वेळी किंचितसे घाबरल्यासारखे वाटते, इतकेच. हे परलोकविश्व म्हणजे येथे वार्धक्याची, रोगराईची भीती नसते. मृत्यूची घटका आल्याबरोबर व्यक्ती नाखूश नसते. पृथ्वीवरच ह्या तीन भीतीचे संकट वाटते व मनुष्यमात्रास हे खरोखरी शापच आहेत. पण याचे खरे कारण असे की, भूलोकावरील मनुष्य हा स्वतःस—स्वतःच्या व्यक्तित्वास आपल्या दुबळ्या पार्थिव शरीराशी फारच समरस—संलग्न करतो आणि हे पार्थिव शरीर जगविण्यासाठी त्याला हवा, अन्न, निद्रा ह्यांपासून सारखी मदत घ्यावी लागते.

"भूलोकात मृत्यूच्या वेळी श्वासोच्छ्वास बंद होतो आणि शरीर कुजू लागते; मांसपेशी नासायला लागतात. पण ह्या लोकी मृत्यू म्हणजे लाइफट्रॉन्सचे—प्राणकणांचे विरळ होणे (dispersement). हे प्राणकण म्हणजे ह्या लोकाच्या व्यक्तींची शरीरे व्यापणाऱ्या स्वर्गीय शक्तीचे (cosmic energy) पुंजके (units). ज्या वेळी भूलोकावर मनुष्य मरतो, जेव्हा

त्याच्या अस्थि-मांस-चर्म यांनी भरलेल्या शरीराची त्याची जाणीव नाहीशी होते आणि त्याला ह्या लोकात नवीनच आलेल्या सूक्ष्म लिंगदेहाची (subtle astral body) जाणीव उत्पन्न होते, योग्य वेळी या परलोकातील सूक्ष्म लिंगदेहाच्या मरणाचा अनुभव घेऊन मनुष्य परत ह्या लोकाच्या जन्म-मृत्यूच्या अवस्थेतून ऐहिक किंवा भूलोकाच्या जन्म-मृत्यूचा अनुभव घ्यावयास जातो. आणि हे परलोक व भूलोक यांमधील जन्ममरणांचे रहाटगाडगे प्रत्येक अप्रबुद्ध किंवा असंस्कृत प्राण्याच्या नशिबी ठेवलेले असते; त्यातून त्याची सुटका होत नाही. पुराणात दिलेल्या स्वर्ग व नरक यांच्या कल्पना कधीकधी माणसाच्या अर्धजागृतीपेक्षा जास्त दूर गेलेल्या स्मृती जागृत करतात. या दीर्घकालात सुखदायक असे परलोकातील व निराशापूर्ण असे भूलोकातील त्यास जे जे काही अनुभव आलेले असतात, त्या असंख्य अनुभवांच्या ह्या स्मृती असतात."

"प्रिय गुरुदेव," मी विचारले, "भूलोकावरील पुनर्जन्म आणि परलोक व स्वर्ग यांमधील पुनर्जन्म यांमध्ये जो फरक आहे त्याचे आणखी खुलासेवार वर्णन कराल काय?"

गुरुजी स्पष्टीकरण देत म्हणाले, "मनुष्य हा एक व्यक्तिगत आत्मा असून तत्त्वतः तो कारणस्वरुपी (causal-bodied) आहे. पार्थिव स्थूल शरीर सोळा तत्त्वांचे (elements) बनलेले आहे. सूक्ष्म लिंगदेह एकोणीस तत्त्वांचा आहे. परमेश्वरास मूलगामी किंवा कारणरूपी विचार (basic or causal thought) निर्माण करावयास पस्तीस कल्पनांचा (ideas) आधार घ्यावा लागतो; व कारणशरीर (casual body) ह्या पस्तीस कल्पनांतून साचासारखे बनविलेले असते.

"सूक्ष्म लिंगदेहाची एकोणीस तत्त्वे मानसिक. अंतःस्फूर्ती (Emotion)च्या स्वरूपाची व प्राणकणाची (lifetronic) असतात. ही एकोणीस तत्त्वे म्हणजे बुद्धी, अहंकारभावना, ज्ञानेंद्रियरूपी मन (mind, sense-consciousness), पाच ज्ञानेंद्रिये—दृष्टी, श्रवण, वास, चव व स्पर्श; ह्या पाच ज्ञानांची सूक्ष्म लिंग स्वरूपे (astral counter parts); पाच कर्मेन्द्रिये—जनन, मलविसर्जन, वाचा, गती आणि शारीरिक कर्मे करण्यातील कौशल्य (manual skill) या कर्मशक्तींची (executive abilities) मानसिक समानरूपे (mental correspondence); जीवनशक्तीची (life-force) पाच साधने; ज्या साधनांनी शरीरास स्फटिकीकरण (crystallizing), अंतःशोषण (assimilating), निराकरण (eliminating), सूर्यप्रकाशाच्या साहाय्याने अन्नाचे रक्त-मांस-चरबीत रूपांतर करणे (metabolism) व अभिसरण (circulation) ही कार्ये करता येतात, ती पाच साधने. असा हा एकोणीस तत्त्वांचा सूक्ष्म लिंगदेहाचा पिंजरा पार्थिव शरीराच्या विनाशानंतर-मरणानंतर नाहीसा होत नाही; टिकून राहतो. पार्थिव शरीर हे सोळा स्थूल रासायनिक तत्त्वांचे बनलेले असते.

"परमेश्वराने स्वतःशीच भिन्नभिन्न कल्पना कल्पिल्या व त्या स्वप्नसृष्टीत उतरविल्या. कारण-स्वप्नसुंदरी (lady cosmic dream) अशा तऱ्हेने निर्माण पावली व तिने सापेक्षतेचे अनंत अलंकार भव्य स्वरूपात आपल्या अंगावर धारण केले व ही सृष्टी निर्माण केली.

"कारणदेहाची (causal body) निर्मिती पस्तीस विचारश्रेणीपासून (thought categories) केलेली असते. आणि ह्या विचारश्रेणी तयार करण्यात परमेश्वराने मनुष्याच्या

पार्थिव देहाच्या सोळा तत्त्वांचा व सूक्ष्म लिंगदेहाच्या एकोणीस तत्त्वांचा यथायोग्य अंतर्भाव केलेला असतो; परामर्ष घेतलेला असतो. प्रथम सूक्ष्म लिंगदेहाच्या व नंतर स्थूल देहाच्या स्पंदनात्मक शक्तीचे (vibratory forces) स्थूलीकरण (condensation) करून, परमेश्वराने प्रथम मानवाचे सूक्ष्म लिंगशरीर निर्माण केले व नंतर शेवटी पार्थिव शरीर निर्माण केले. सापेक्षतावादाच्या (relativity) अनुरोधाने मूळची सहजता (prime simplicity) बहुविध व चमत्कृतिपर व्यापकतेत विकास पावली आहे. कारणविश्व (causal cosmos) आणि कारणशरीर (causal body) ही परलोकविश्व (astral cosmos) व सूक्ष्म लिंगदेहाहून भिन्न आहेत. त्याचप्रमाणे पार्थिव विश्व व पार्थिव शरीर ही सुद्धा अन्य सृष्ट पदार्थाहून भन्न आहेत.

"रक्तमांसाचे शरीर हे विधात्याच्या स्वप्नाच्या स्थूल व विशिष्ट आकारांतून निर्माण झाले. भूतलावार द्वैत हे सदैव सर्वकाल सर्व गोष्टी व्यापून आहे. रोग-आरोग्य; सुख-दुःख, लाभ-हानी अशी ही द्वैत-द्वंद्वे भूतलावर थैमान घालीत असतात. तीन आसांच्या सृष्टीत (three dimensional matter) माणसाला आपले अस्तित्व मर्यादित करावे लागते; त्याला झगडावे लागते. माणसाच्या जगण्याच्या इच्छेला जेव्हा एखाद्या रोगाकडून वा अन्य कारणांमुळे हादरा बसतो, तेव्हा मृत्यूचे आगमन होते. रक्तमांसाचा हा बाहेरील जाडजूड आंगरखा किंचित्काल फेकून दिला जातो. आत्मा मात्र सूक्ष्म लिंगदेहात आणि कारणशरीरात [9] बद्ध स्वरूपात दडलेलाच असतो. ही तीन शरीरे ज्या एका संलग्नकारी शक्तीमुळे (adhesive force) एकत्र आणली जातात ती शक्ती म्हणजे वासना. आणि ह्या अपूर्त वासनांमधून जी शक्ती निर्माण होते त्यातून मनुष्यजातीच्या गुलामगिरीचा उगम होतो.

"अहंकार व विषयोपभोग यांपासून शारीरिक वासना उगम पावतात. परलोकवासाच्या आवडीपेक्षा किंवा कारणविश्वाच्या दर्शनापेक्षा (causal perceptions) इंद्रियभोगांच्या वासनांचा मोह किंवा जोर अधिक प्रबल व प्रभावी असतो.

"सूक्ष्म लिंगदेहाच्या वासनांची पूर्ती स्पंदन-संवेदनांवर केंद्रित झालेली असते. परलोकवासी व्यक्ती ह्या अंतरिक्षातील संगीताचा आनंद घेतात आणि ही सृष्टी पदार्थ वारंवार बदलत जाणाऱ्या प्रकाशाच्या अविरत आविष्कारातूनच (exhaustless expressions of changing light) जणू निर्माण होत आहे हे पाहून आह्लादित होत असतात. येथील व्यक्ती ह्या प्रकाशाचा वास, चव घेऊ शकतात, त्यास स्पर्श करू शकतात. सूक्ष्म लिंगदेहधारी सर्व सृष्ट पदार्थ व त्यांच्याबद्दलचे अनुभव ह्यांची कल्पना प्रकाशकिरणांच्या आविष्कारातून (forms of light) काढतो व त्याच्या वासना त्या कल्पनांशी संलग्न असतात. त्याचप्रमाणे विचार वा स्वप्ने यांचे स्थूलीकरण (condensation) करून त्यावर तो कल्पना बांधतो.

कारण-वासना (causal desires) ह्या फक्त समीक्षणांतून पूर्ण केल्या जातात. कारणशरीरात बद्ध झालेले आत्मे जवळजवळ मुक्तावस्थेपर्यंत पोचलेले असतात; आणि त्यांना सर्व विश्वात परमेश्वर भरून राहिलेला आहे, हे समजलेले असते. प्रत्येक गोष्ट ते केवळ विचाररूपानेच समजू शकतात. ऐहिक शरीराच्या भावना किंवा सूक्ष्म लिंगदेहाचे

हर्षविकार (delights) हे कारणदेही केवळ ओबडधोबड व आत्म्याच्या सूक्ष्म संवेदनांना गुदमरून टाकणारे असे समजतात. आपल्या वासनांचे ताबडतोब [10] स्थूलीकरण करून कारणदेही त्यांची पूर्ती करतात. ह्या कारणदेहीचे बाह्य कवच जणू एक पातळ पडदा असते. ते खुद्द परमेश्वराप्रमाणे सर्व ब्रह्माण्ड व्यक्त स्वरूपात आणू शकतात. सर्व सृष्ट पदार्थ कारण-स्वप्नरूपातून (cosmic dream-texture) निर्माण झालेले असल्याकारणाने, कारणरूपात किंचित अवगुंठित असलेल्या आत्म्याला विशाल शक्तीची प्रचीती झालेली असते.

"आत्मा तत्त्वतः अदृश्य आहे व त्याचे वैशिष्ट्य त्याने धारण केलेल्या शरीरावरून किंवा शरीरांवरून व्यक्त होते. आत्मा जेव्हा देह धारण करतो तेव्हा त्याचा अर्थ असा की, त्याच्या वासना अपूर्त [11] राहिलेल्या आहेत.

"जोपर्यंत एखाद्या मनुष्याचा आत्मा एक, दोन, किंवा तीन शरीररूपी बाटलीत कोंडला गेलेला आहे आणि त्यास अज्ञान आणि वासना यांची घट्ट बुचे लावलेली आहेत तोपर्यंत त्यास परमात्म्याच्या (spirit) महासागरात मिसळून जाता येत नाही. जेव्हा पार्थिव देहाची ओबडधोबड कुडी मृत्यूव्या घणांनी विदीर्ण केली जाते-नष्ट केली जाते तेव्हा त्याची दोन कवचे, सूक्ष्म लिंगदेह व कारणदेह ही तशीच राहतात व ती आत्म्याला सर्वव्यापी चैतन्यामध्ये जाणतेपणे विलीन होऊ देत नाहीत. प्रबुद्धतेच्या प्रभावामुळे जेव्हा वासनांचा संपूर्ण क्षय होतो, तेव्हा त्या शक्तीमुळे ह्याही दोन कवचांचा भेद होतो. सानुला मानवी आत्मा आता अगदी पूर्णपणे बंधमुक्त होतो व अमर्याद विशालत्वा (measureless amplitude) मध्ये विलीन होतो."

ह्या उच्च आणि विस्मयकारी कारणविश्वाबद्दल आणखी काही माहिती सांगण्याविषयी मी माझ्या देवस्वरूपी गुरुदेवांना विनंती केली.

"कारणविश्व फार सूक्ष्म आहे. इतके की, त्याचे वर्णन करता येत नाही," ते म्हणाले, "त्याचे ज्ञान होण्याकरिता जिज्ञासूला ध्यान इतके जबरदस्त लावावे लागते की, डोळे मिटल्याबरोबर त्याला अंतश्चक्षूंसमोर परलोकविश्व (astral cosmos) व पार्थिव/जड विश्व (physical cosmos) त्यांच्या अफाट-स्वरूपात, खाली जड टोपली अडकविलेल्या एखाद्या प्रकाशमान हवाई फुग्याप्रमाणे-केवळ कल्पनांनी कल्पिलेली अशी दिसली पाहिजेत. असे अतिमानुष ध्यान लावल्याने जर त्या जिज्ञासूला/मुमुक्षूला ही दोन्ही विश्वे त्यांच्या सगळ्या गुंतागुंतींच्या संभारासह, केवळ कल्पनांमध्ये रूपांतर करण्यात किंवा पृथक्करण करण्यात यश आले तर तो जिज्ञासू/मुमुक्षू कारणविश्वाला पोचेल आणि मग तो मन व वस्तुजात यांच्या संमीलनाच्या काठावर जणू ऊभा राहील. तेथे त्याला सर्व सृष्ट वस्तू-घन, द्रव, वायू हे पदार्थ, वीज, शक्ती, प्राणिजात, देव, मनुष्यप्राणी, वनस्पती, जीवजंतू सगळे काही फक्त मनोकल्पित अशा स्वरूपात दिसून येतील. ज्याप्रमाणे एखाद्याने आपले डोळे मिटावे आणि आपण अस्तित्वात आहो असे समजावे, मग त्याचे शरीर त्याच्या चर्मचक्षूंना जरी प्रत्यक्ष दिसले नाही तरी कल्पनेने ते पाहावे त्याप्रमाणे.

“मनुष्यप्राणी जे जे काही कल्पनेने करील ते ते कारणदेही सत्यस्वरूपात करू शकेल. कल्पनासृष्टीत अगदी अत्यंत अफाट स्वैरसंचार करणारी मानवी बुद्धी विचाराच्या एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे फक्त मनाने संचार करू शकते; मनाने एका ग्रहावरून दुसऱ्या ग्रहावर उड्या मारू शकते; किंवा जिला अंत नाही अशा अनंततेच्या खोल गर्तेमध्ये धडपडून पडते; किंवा तेजःपुंज अस्मानाच्या कमानीतून अग्निबाणा (रॉकेट) सारखी उंच भरारी मारू शकते; किंवा एखाद्या प्रकाशझोता (सर्चलाईट) प्रमाणे आकाशगंगेवरून आणि तारकांच्या पुंजक्यांमधून चमकू शकते. पण कारणविश्वामधील व्यक्तींना ह्याहूनही जास्त स्वतंत्रता असते. ते आपले विचार विनासायास ताबडतोब जडस्वरूपात (objectivity) व्यक्त करू शकतात. त्यांच्या ह्या शक्तीच्या व्यापारास जडदेहाची किंवा लिंगदेहाची आडकाठी होत नाही की कर्माची मर्यादा अवरोधू शकत नाही.

“पार्थिव विश्व हे मूलतः इलेक्ट्रॉन्सचे बनलेले नाही की परलोकविश्व हे मूलतः प्राणकणांचे (लाइफ-ट्रॉन्सचे) बनलेले नाही, हे कारणविश्वातील व्यक्तींना पूर्णपणे माहीत असते. दोन्ही विश्वे ही वस्तुतः ईश्वररुपी विचारांच्या (God thoughts) अत्यंत सूक्ष्म कणांनी निर्माण झालेली असतात. हे कण अत्यंत सूक्ष्म असून मायेने विभिन्न केलेले असतात. *माया* म्हणजे विधात्यापासून सृष्टी भिन्न आहे, असा भास दाखविणारा द्वैतरूपी सापेक्षवाद.

“कारणविश्वातील आत्मे एकमेकांना चिदानंदब्रह्माच्या (joyous spirit) व्यक्तिगतबिंदूंसारखे (individualised points) समजतात. त्यांच्या सभोवार वलये फक्त विचारांची कारणविश्वातील व्यक्ती आपल्या देहातील व विचारांतील फरक किंवा भिन्नता केवळ कल्पनाच आहेत, असे मानतात. ज्याप्रमाणे भूलोकावरील मनुष्य डोळे मिटून तेजस्वी झगझगीत पांढरा प्रकाश किंवा सौम्य धूसर निळसर प्रकाश अंतश्चक्षूने पाहू शकतो, त्याचप्रमाणे कारणविश्वातील व्यक्ती फक्त विचाराच्या साधनाने पाहू, ऐकू वास घेऊ, चव घेऊ, स्पर्श करू शकतात. ते कोणतीही वस्तू किंवा गोष्ट कारणरूपी मनाने (cosmic mind) निर्माण करू किंवा नष्ट करू शकतात.

“मृत्यू आणि पुनर्जन्म ह्या दोन्ही गोष्टी कारणलोकात फक्त विचाररूपात असतात. चिरंतन नव-ज्ञानाच्या (eternally new knowledge) अमृताचे हे कारणविश्व व्यक्ती आकंठ पान करतात. शांततेच्या झऱ्याचे पाणी पितात; अवलोकनाच्या (perception) निर्गम भूमीवर संचार करतात; अथांग, अगाध अशा ब्रह्मानंद-महोदधीमध्ये पोहतात; पाहा, त्यांची तेजस्वी विचारशरीरे (thought bodies) इकडून तिकडे परमेश्वराने निर्माण केलेल्या खर्व-निखर्व ग्रहगोलांमधून विश्वाच्या नवीन नवीन उद्भवत्या बुडबुड्यांमधून, ज्ञानतारकां (wisdom stars) मधून, अनंतत्वाच्या आकाशपोकळीतल्या सोनेरी तारकापुंजांच्या विविधरंगी (spectral) स्वप्नांमधून स्वैरपणे संचार करीत आहेत.

“ह्या कारणविश्वात पुष्कळसे आत्मे सहस्रावधी वर्षे वास करतात. मुक्त झालेले आत्मे नंतर आपल्या सूक्ष्म कारणशरीरातून सखोल स्फूर्तीच्या उद्रेकाच्या जोरावर बाहेर पडतात आणि कारणविश्वाचे अफाट स्वरूप धारण करतात. कल्पनांचे तुटक झालेले भोवरे (eddies), शक्ती, प्रेम, इच्छा, आनंद, स्तब्धता, स्फूर्ती, शांतता, आत्मदमन आणि ध्यान

यांच्या विवक्षित झालेल्या (particularised) लहरी, सतत आनंददायी अशा चिदानंद- (bliss) महोदधीमध्ये नाहीशा होतात. आत्म्याला मग जाणिवेच्या व्यक्तिगत लहरींमधून आनंदाचा उपभोग घेण्याची जरूर राहत नाही. तो आत्मा, आता आपल्या सदैव हास्य (eternal laughter), सविस्मय, संवेदना, उसासे या सगळ्या विचारलहरींसकट त्या कारणमहोदधीमध्ये (one cosmic ocean) संपूर्णपणे विलीन होतो.

"जेव्हा आत्मा ह्या तीन शरीरांच्या स्वयंनिर्मित कोशातून बाहेर पडतो, तेव्हा तो सापेक्षतेच्या नियमबंधनांतून कायमचा मुक्त होतो आणि मग तो स्वतःच अवर्णनीय असा अविनाशी, (Ever-Existent) [12] बनतो. पाहा, ते सर्व व्यापकतेचे रंगीबेरंगी पाखरू, त्याच्या पंखांवर तारे आणि चंद्र आणि सूर्य लटकलेले आहेत. ब्रह्मस्वरूपात विकास पावलेला आत्मा या प्रकाशहीन प्रकाशात, तमोहीन अंधकारात, विचारशून्य विचारात अगदी एकटाच राहतो. अंतरिक्ष सृष्टीचे विधात्याचे जे स्वप्न त्यात निमग्न झाल्यामुळे तो आत्मा आता एका परमानंदाच्या उद्रेकाने जणू बेहोष होऊन जातो."

"एक मुक्त आत्मा!" मी विस्मयात उद्गारलो.

"जेव्हा आत्मा शरीराभासाच्या ह्या तीन कुंभांतून शेवटी बाहेर पडतो," गुरुदेव म्हणाले, "तेव्हा तो अनंतात मिळून जातो. पण त्याचे व्यक्तित्वविशिष्टत्व नष्ट होत नाही. ख्रिस्ताला, ह्या अंतिम मुक्ततेचा, येशू म्हणून जन्मास येण्याच्या अगोदर, लाभ झालेला होता. येशू ख्रिस्ताने आपल्या ऐहिक आयुष्यात जन्म, मृत्यू व पुनरुत्थान अशा तीन अवस्था तीन दिवसांच्या अवधीत लाक्षणिकरीत्या अनुभविल्या. ह्या अवस्थांतून तो पूर्वीच गेलेला होता व त्यानंतर ईश्वराप्रत जाण्यास त्यास पूर्ण सामर्थ्य आले.

"ह्या तीन देहांतून बाहेर पडण्यास, ज्याचा विकास झाला नाही, अशा अप्रगल्भ माणसाला असंख्य ऐहिक, लिंगदेही व कारणदेही अशा अवस्थांतून जावे लागते. अशा पूर्णावस्थेला पोचल्यानंतर एखाद्या निरंजनास पृथ्वीवर पुनः अवतार घ्यावासा वाटतो; हेतू हा की, इतर अन्य मनुष्यप्राण्यांस मोक्षाचा लाभ घडवून द्यावा. किंवा त्या निरंजनास माझ्यासारखे परलोकविश्वातच राहणे पसंत पडते. भूलोकातील अवतारांमध्ये त्या तारण करणारास आपल्या भक्तांच्या कर्मांची [13] ओझी स्वतःच्या शिरावर वाहून घ्यावी लागतात आणि अशा तऱ्हेने तो तारणकर्ता आपल्या भक्तांचे जन्ममरणांचे रहाटगाडगे थांबवतो व त्यांना परलोकविश्वात प्रवेश मिळवून देतो; आणि पुढे तेथून नंतर त्यांना कारणविश्वात चिरंतन वास घडवून आणतो; किंवा तो मुक्तात्मा परत कारणविश्वात प्रवेश करतो आणि तेथील रहिवाशांची त्या विश्वातील राहण्याची कालमर्यादा कमी करवून त्यांस मदत करतो व त्यांना कैवल्यपदाची (Absolute Freedom) प्राप्ती करवून देतो."

"हे पुनरुत्थित आत्मन्, जे कर्म आत्म्यांना फिरून या तिन्ही लोकांत जन्म घ्यावयास लावते, त्याबद्दल मी जरा अधिक माहिती घेऊ इच्छितो."

माझ्या सर्वज्ञ गुरुदेवांचे हे उपदेश सतत ऐकतच राहावे असे मला वाटले. ते जिवंत असतांना इतक्या अल्पावधीत हे सगळे ज्ञान त्यांचेकडून ग्रहण करण्याचा मला कधीच योग आला नव्हता. जीवन आणि मरण यांच्या सारीपाटावरील मधल्या मोकळ्या जागांमधून

वावरणारी जी गूढ कोडी मला आजवर उमगली नाहीत, त्या कोड्यांचा मला आता स्पष्ट व स्वच्छ उलगडा होऊ लागला.

"मनुष्याचे पार्थिव कर्म किंवा त्याच्या वासना ह्यांचा प्रथम पूर्ण लोप झाला पाहिजे; त्यानंतरच त्यास परलोकात कायमचा प्रवेश मिळू शकतो." गुरुजींनी आपल्या थरारणाऱ्या आवाजात स्पष्टीकरण दिले. "परलोकात दोन प्रकारच्या व्यक्ती वास करतात. एक प्रकार म्हणजे, ज्यांचे पार्थिव कर्म भोगावयाचे राहिलेले आहे असे आणि म्हणून ज्यांना ते भोगण्याकरिता मरणानंतर परत फिरून ओबडधोबड असा नवा जन्म घेऊन पुनः या जगात आले पाहिजे अशा व्यक्ती. ह्या व्यक्ती म्हणजे या लोकात किंचित्काल वास करणारे पाहुणे. हे येथील कायमचे रहिवासी नव्हेत.

"ज्यांचे ऐहिक कर्म अजून नष्ट झालेले नाही, अशा व्यक्तींना आपल्या परलोक-मृत्यूनंतर (astral death) वर अंतराळकल्पनांनी भरलेल्या कारणगोलामध्ये प्रवेश मिळू शकत नाही. त्यांना भूलोक व परलोक यांमधून हेलपाटे मारावे लागतात. त्यांना जाणीव फक्त सोळा स्थूल तत्त्वांनी सिद्ध झालेल्या भूलोकीच्या देहाची व एकोणीस सूक्ष्म तत्त्वांनी सिद्ध झालेल्या परलोक-देहाची. प्रत्येक जडदेहाच्या विनाशानंतर पृथ्वीवर विकास न पावलेल्या व्यक्ती मृत्यु-निद्रेच्या गाढ गुंगीतच राहतात. अशा व्यक्तीला सुंदर अशा परलोक-गोलाचा काहीच अनुभव मिळत नाही. परलोकात किंचित्काल विश्रांती घेतल्यानंतर, अशी व्यक्ती परत जड पातळीवर विकास होण्याकरिता येते. अशा तऱ्हेने भूलोक व परलोक यांमधून अनेक हेलपाटे मारल्यावर त्या व्यक्तीला सूक्ष्म अशा परलोकाच्या जीवनाचा हळूहळू परिचय होऊ लागतो.

"परंतु परलोक-विश्वात कायमचे किंवा दीर्घकाल स्थायी झालेले जे रहिवासी असतात, त्यांना परत पृथ्वीच्या जड आंदोलनांचा अनुभव घेण्याची काही जरुरी राहिलेली नसते. भौतिक वासनांतून त्यांची कायमची मुक्तता झालेली असते. अशा व्यक्तींना आपले परलोक-कर्म व कारण-कर्म भोगून टाकावयाचे राहिलेले असते. परलोकातील मृत्यूनंतर ह्या व्यक्ती अत्यंत सूक्ष्म व परलोकाहून नाजूक अशा कारण-विश्वात प्रवेश करतात. कारणनियमांनुसार (cosmic laws) ज्याची अवधी-मर्यादा निश्चित ठरवलेली असते असा काल काढल्यानंतर ह्या उन्नत व्यक्ती हिरण्यलोक किंवा त्याहूनही उच्च अशा परलोक-ग्रहावर जातात व आपले उर्वरित परलोककर्म पूर्ण भोगून टाकण्या करिता परत परलोकशरीरात प्रवेश करतात.

"बेटा, एका ईश्वरी आदेशानुसार माझे पुनरुत्थान झालेले आहे, हे तुला आता पूर्णपणे समजले असेल," श्रीयुक्तेश्वरांनी आपले बोलणे चालू ठेवले, "पृथ्वीवरून परलोकात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीपेक्षा विशेषेकरून कारणलोकातून परत परलोकात अवतार धारण करणाऱ्या तारणकर्त्याप्रमाणे, ईश्वरी आदेशानुसार, मला हे पुनरागमन करावे लागत आहे. आपल्या जडदेहाच्या कर्माचे काही अवशेष अजून राहिलेले असतील, तर असे हे पृथ्वीवरून आलेले आत्मे हिरण्यलोकासारख्या अत्युच्च लोकापर्यंत पोचू शकत नाहीत.

"ध्यानाने प्राप्त झालेल्या नवीन दृष्टीने उच्च प्रतीचा आनंद व परलोकवासी जीवनातील फायद्यांविषयीचे ज्ञान भूलोकातील बहुतेक लोकांना मुळीच प्राप्त झालेले नसते आणि त्यामुळे ते मृत्यूनंतर भूलोकावरील अपुऱ्या व तोटक्या सुखांच्या उपभोगाकरिता परत भूलोकावर येऊ इच्छितात. पुष्कळशा परलोकवासी व्यक्तीचे अगदी असेच होते. त्यांची

परलोक-शरीरे यथाकाल नियमाप्रमाणे विदीर्ण होत असताना, जास्त स्थूल व भपकेदार परलोकसुखाने मोहित होऊन त्यावरच त्यांचे मन जडते. कारण-विश्वातील ब्रह्मानंदाच्या प्रगल्भ अवस्थेचे मनोमय चित्र त्यांचे मन निर्माण करू शकत नाही व ते परत परलोक-स्वर्गातच जाऊ इच्छितात, जाण्यास उतावीळ होतात. अशा व्यक्तींना आपल्या भरपूर साचलेल्या परलोक-कर्माचे विसर्जन केले पाहिजे; कारण त्यानंतर परलोकवास—मृत्यू घडून येतो व त्यानंतरच कारणविचारजगतामध्ये (causal thought world) कायमचे आसन मिळणे शक्य होते. कारणविश्वामधील वास म्हणजे जवळजवळ परमेश्वरस्वरूपी विलीन होणेच होय.

"ज्या वेळी एखाद्या व्यक्तीला, दृष्टीला सुखकारक अशा परलोकविश्वामधील विविध अनुभव घेण्याच्या आणखी वासना उरत नाहीत, आणि त्याला परत त्या लोकात जाण्याचा मोह उरत नाही अशीच व्यक्ती कारणविश्वामध्ये वास करते. तेथे सर्व कारणकर्मांचे परिक्षालन किंवा पूर्वीच्या उरल्यासुरल्या इच्छांच्या बीजांचे निर्मूलन करण्याचे काम पुरे करून, तो बंदिस्त आत्मा अज्ञानाच्या तीन बुचांपैकी शेवटचे बूच जोराने काढून, बाटलीच्या बाहेर पडतो आणि मग कारणशरीराच्या अंतिम बाटलीतून बाहेर पडल्यावर अनंतत्वात विलीन होतो.

"आता समजले का तुला?" हे सांगताना गुरुदेवांच्या मुखावर मोहक हास्याची छटा आली.

"होय. आपल्या कृपाप्रसादाने. आनंदाने व कृतज्ञतेने भारावून गेल्यामुळे मला काही बोलता येत नाही."

आजपर्यंत काव्य किंवा कल्पित कथेमधून इतके स्फूर्तिदायक ज्ञान मला मिळालेले नाही. आता हिंदू धर्मशास्त्रात व वेदान्तात कारण व लिंग-देहाबद्दल तसेच मानवाच्या ह्या तिन्ही शरीरांबद्दल जागोजाग उल्लेख आहेत; पण पुनरुत्थान पावलेल्या माझ्या गुरुदेवांच्या प्रचीतीपूर्ण व्याख्याना पुढे ते उल्लेख किती दूरवरचे व अर्थहीन वाटतात. खरोखर त्यांनी आपल्या व्याख्यानात ह्या त्रैलोक्य-ज्ञानातील असा एकही "शोध करावयाचा राहिलेला भूभाग सोडला नाही की, ज्यापासून कोणीही प्रवासी परत आलेला नाही!" [14]

"माणसाच्या तिन्ही शरीरांची एकमेकांशी ही जी संलग्नता आहे, ती त्याच्या त्रिविध स्वभावांतून अनेक प्रकारांनी दिसून येते." गुरुदेवांनी आपले प्रवचन चालू ठेवले, "भूलोकावर मनुष्यास जागृतावस्थेत असताना साधारणपणे तीन इंद्रियांची जाणीव असते. तो जेव्हा भोगेच्छेने खातो, वास घेतो, स्पर्श करतो, ऐकतो किंवा पाहतो, तेव्हा तो मुख्यत्वेकरून जड शरीरामार्फत कार्य करीत असतो. पण ज्या वेळी तो कल्पना करतो किंवा इच्छा मनात धरतो तेव्हा तो हे कार्य प्रामुख्याने आपल्या लिंगदेहामार्फत करीत असतो. आणि ज्या वेळी मनुष्य विचार करतो, किंवा गूढ आत्मशोधन करतो किंवा ध्यान लावतो, तेव्हा तो ही कार्ये कारणदेहामार्फत करीत असतो. जो मनुष्य नेहमी आपल्या कारणदेहाशी संपर्क ठेवतो, त्याच्या मनात बुद्धीस चालना देणारे आंतराळिक (cosmic) विचार येतात. ह्या अर्थाने प्रत्येक व्यक्तीचे 'पार्थिव पुरुष,' 'ऊर्जावान पुरुष' किंवा 'बुद्धिमान पुरुष' असे वर्गीकरण करता येईल.

"मनुष्य दिवसातून सोळा तास आपल्या शारीरिक इंद्रियांशी एकरूप होतो. नंतर तो झोपतो. त्याला जेव्हा स्वप्ने पडतात तेव्हा तो आपल्या लिंगदेह-परलोकरूप देहात वावरत असतो. आणि त्या देहात असताना तो लिंगदेहाप्रमाणे कोणतीही गोष्ट विनासायास निर्माण करु शकतो. मनुष्याची झोप जर गाढ असेल आणि त्याला स्वप्ने बिलकुल पडत नसतील, तर किती एक तास तो आपली जाणीव-बुद्धी किंवा अस्मिता कारण-देहाप्रत नेऊ शकतो आणि अशी झोप उत्साहवर्धक असते. परंतु ज्याला स्वप्ने पडतात तो स्वप्नावस्थेत आपल्या लिंगदेहाशी संपर्क ठेवतो; कारणदेहाशी नव्हे. त्याला मात्र अशा झोपेमुळे भरपूर तजेला मिळत नाही."

श्रीयुक्तेश्वर महाराज आपले हे विस्मयदायी स्पष्टीकरण करीत असताना त्यांच्याकडे मी प्रेम भक्तिभावपूर्वक अवलोकन करीत होतो.

"गुरुदेव, आपण साक्षात देवदूतच आहात," मी म्हणालो, "आपले हे शरीर पुरीच्या आश्रमात मला जसे दिसले आणि त्या अंतिम दर्शनाच्या वेळी मी रडलो, अगदी त्यासारखे तंतोतंत हे दिसत आहे."

"होय, अगदी बरोबर. माझे हे नवीन शरीर म्हणजे जुन्या शरीराची अगदी पूर्ण प्रतिमा आहे. हे शरीर, मी माझ्या इच्छेनुसार, वाटेल त्या वेळी निर्माण करू शकतो; नाहीसे करू शकतो. भूलोकावर असतानाही मी तसे करू शकत होतो. त्यापेक्षाही अधिक वेळा मी ह्या लोकात आता तसे करू शकतो. हे शरीर मी अगदी निमिषार्धात नाहीसे करून ताबडतोब प्रकाशाच्या द्रुतगतीने एका ग्रहावरून दुसऱ्या ग्रहावर, किंवा परलोकातून कारण-लोकात किंवा भूलोकावर जाऊ शकतो." माझे ब्रह्मीभूत गुरुदेव किंचित हसून म्हणाले, "हल्ली तू फार जलद इकडून तिकडे हिंडताना दिसतोस, तुला मुंबईत शोधायला मला काही अडचण पडली नाही."

"पण गुरुदेव, आपण गेलात त्या वेळी मला किती दुःख झाले!"

"अहा, पण मी मरण पावलोच कुठे? विसंगती नाही का ही?" श्रीयुक्तेश्वर महाराजांचे डोळे प्रेमाने व विनोदाने चमकू लागले.

"तुम्ही भूलोकावर फक्त स्वप्नसृष्टीत वावरत होता. भूलोकावर तुम्ही माझे स्वप्नमय शरीर पाहिले," गुरुजींनी आपले भाषण चालू ठेवले, "नंतर तुम्ही त्या माझ्या स्वप्नमय शरीराला दफन केले. आताचे हे माझे त्याहूनही सुरेख मांसल शरीर, जे तू पाहत आहेस आणि जे तू अजूनही जरा घट्टच धरून ठेवले आहेस, ते परमेश्वराच्या दुसऱ्या एका सूक्ष्मतर अशा स्वप्नग्रहावर पुनरुत्थान पावलेले आहे. एखादे दिवशी ते स्वप्नशरीर व तो सूक्ष्मतर स्वप्नग्रह (dream planet) नाहीसा होईल. तेही काही चिरंतन टिकणारे नाही. हे सगळे स्वप्नांचे बुडबुडे शेवटी अंतिम जागृतीचा स्पर्श (wakeful touch) झाल्यावर फुटणारच. बेटा, योगानंद, स्वप्न आणि वस्तुस्थिती यांमधील फरक ध्यानात धर!"

"काय आश्चर्य! ही वेदान्तात [15] दिलेली पुनरुत्थानाची कल्पना मला एकदम पटली. पुरीला माझ्या गुरुदेवांचे अचेतन शरीर पाहिल्यावर त्यांच्याबद्दल शोकविह्वळ होऊन जायची मला आता लाज वाटू लागली. शेवटी आता मला पुरते कळून चुकले की, माझे गुरुदेव

ईश्वररूपात सदैव अगदी पूर्णपणे जागृतावस्थेतच आहेत. त्यांचे खरे जीवन, पृथ्वीवर झालेले त्यांचे आगमन आणि त्यांचे हे पुनरुत्थान हे सर्व म्हणजे खरोखर अंतरिक्षस्वप्नामधील (cosmic dream) दिव्य कल्पनांचे सापेक्ष आविष्करणच (realtivities) होय.

"योगानंदा, माझे ऐहिक जीवन, माझे ऐहिक मरण आणि माझे हे पुनरुत्थान ह्या तिन्हीचे यथार्थ स्वरूप मी आतापर्यंत तुला सांगितले. माझ्याकरिता शोक करू नकोस. त्यापेक्षा विधात्याच्या स्वप्नातून निर्माण झालेल्या भूलोकातून परलोकात हे जे माझे पुनरुत्थान झाले, ते सगळीकडे जगजाहीर कर. दोन्हीही लोक म्हणजे विधात्याची स्वप्नसृष्टीच. आपत्तींनी गांजलेल्या व मरणाची भीती वाटणाऱ्या भूलोकात स्वप्ने अनुभविणाऱ्या लोकांच्या हृदयात यामुळे नवीन आशेच्या किरणांचा प्रकाश पडेल."

"होय, गुरुदेव!" त्यांच्या पुनरुत्थानाने मला झालेला आनंद दुसऱ्यांबरोबर उपभोगण्यात मला किती सुख होईल!

"भूलोकावर माझी वागण्याची पद्धत, विचारसरणी उच्च होती. सर्वसाधारण लोकांच्या स्वभावाशी ती जुळत नसे. त्यांना ती बेचैन व त्रस्त करीत असे. पुष्कळदा वाजवीपेक्षा जास्त मी तुझी खरडपट्टीही काढली आहे. पण माझ्या कसोटीला तू उतरलास. त्या सगळ्या निर्भर्त्सनांच्या ढगांमधून तुझे माझ्याविषयीचे प्रेम उजळून बाहेर आले." नंतर आवाज सौम्य करून ते म्हणाले, "आज सुद्धा मी तुला सांगण्यासाठीच आलो आहे. पुनः कधीही माझ्या चेहऱ्यावर तुला रागावणारी अशी क्रुद्ध मुद्रा दिसणार नाही. मी तुझी पुनः कधीही हजेरी घेणार नाही."

गुरुदेव आता मला यापुढे रागावून बोलणार नाहीत. किती वाईट वाटले मला! त्यांच्या रागावून बोलण्यापाठीमागे किती कळकळ होती! जणू देवदूताचाच दिलासा!

"परमप्रिय गुरुदेव! माझ्यावर हजार वेळा रागवा; अगदी आताच माझी हजेरी घ्या."

"मी तुझ्यावर यापुढे कधी रागावणार नाही." त्यांचा आवाज दिव्य, गंभीर असूनही त्यात हास्याची एक खालच्या थरातील छटा होती. "तू आणि मी पुनः एकत्र हसू या; जोपर्यंत आपल्या दोघांच्या आकृती विधात्याच्या मायाजालामुळे भिन्न दिसत आहेत. शेवटी आपल्या दोघांचे त्या सच्चिदानंदस्वरूपामध्ये मीलन होणारच आहे. आपले हसणे म्हणजे त्या जगन्नियंत्याचे हसणे; आपण दोघांनी गायिलेले हे आनंदगीत अनंतत्वात आंदोलन पावून, ईश्वरचरणी तल्लीन झालेल्या आत्म्यांना दिव्य संदेश देणारे ठरेल."

श्रीयुक्तेश्वर महाराजांनी आणखी काही विषयांवर मला मार्गदर्शन केले. त्याचा मला येथे उल्लेख करता येत नाही. मुंबईच्या हॉटेलमधल्या खोलीत दोन तास त्यांनी मला जे दर्शन दिले आणि माझ्याकरिता वेळ खर्च केला त्यात त्यांनी माझ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिले. १९३६ सालातल्या जून महिन्यातल्या त्या दिवशी त्यांनी निरनिराळ्या जागतिक प्रश्नांवर जी आपली भविष्यवाणी सांगितली, त्याबरहुकूम पुढे घटना घडून आलेल्या आहेत.

"प्रिय शिष्या, आता मी तुझा निरोप घेतो," हे शब्द निघताक्षणीच गुरुदेव माझ्या बाहुपाशांत जणू वितळू लागले; अदृश्य होऊ लागले.

“बाळा,” माझ्या अंतरंगात त्यांच्या शब्दांचा जणू प्रतिध्वनी उठला; “ज्या ज्या वेळी तू निर्विकल्प समाधी लावशील आणि मला बोलावशील, त्या वेळी मी आजच्यासारखा रक्तमांसाच्या शरीरात देह धारण करून तुला भेटेन.”

अशा प्रकारचे दिव्य वाणीने वचन देऊन श्रीयुक्तेश्वर महाराज माझ्या डोळ्यांसमोरून अंतर्धान पावले. संगीताच्या गडगडाटातून मेघगर्जना वारंवार संदेश देऊ लागली: “सांग, सगळ्यांना सांग. निर्विकल्प साक्षात्कारातून ज्याला ज्याला समजेल की, तुझे जग हे परमेश्वराने निर्मिलेले एक स्वप्न आहे, त्याने हिरण्यलोकासारख्या अतिसूक्ष्म स्वप्ननिर्मित ग्रहावर यावे. त्याला मी पृथ्वीवरील माझ्या हुबेहूब शरीरात पुनरुत्थान पावलेला दिसू शकेन. योगानंदा, सांग, सगळ्यांना सांग.”

आता गुरुदेव गेल्याचे दुःख नाहीसे झाले. त्यांच्या मृत्यूबद्दल माझी स्वतःची शोचनीय स्थिती व मनाला वाटणाऱ्या वेदना मी सर्व विसरलो. ह्या यातनांनी माझ्या मनाची शांती उडवून दिली होती आणि त्या यातना आता, जणू लाजेने मान खाली घालून, पळून जात होत्या. आत्मजागृतीच्या अनेक छिद्रांतून अविरत बाहेर पडणाऱ्या कारंजाच्या पाण्याच्या धारांसारखा दिव्य आनंद बाहेर उफाळून येत होता. आयुष्यातील आतापर्यंतच्या काळात ते कारंजे जणू अडगळीत पडलेले होते. ते आता दुरुस्त होऊन उपयोगात आणून त्यातून परमानंदाच्या जोरदार धारा बाहेर पडत होत्या. माझे पूर्वजन्म माझ्या अंतरनेत्रासमोरून एखाद्या चित्रपटातील चित्राप्रमाणे ओळीने दृश्य स्वरूपात पुढे सरकत होते. गुरुजींच्या ह्या दिव्य दर्शनाने माझी आजपर्यंतची चांगलीवाईट कर्मे, माझ्या भोवताली पसरलेल्या विश्वरूप तेजामध्ये विरून जात होती.

माझ्या आत्मचरित्रातील ह्या प्रकरणामध्ये गुरुजींच्या आज्ञेचे पालन करून, त्यांच्या दर्शनाचे शुभवर्तमान मी सगळ्यांना सांगितले आहे. जिज्ञासा न वाटणाऱ्या अशा ह्या पिढीतील लोकांना ते पुनः एकवार गोंधळात टाकून देणारे आहे. माणसाला खाली मान घालून उभे राहणे चांगले माहीत आहे. निराशा ही त्याची नेहमीचीच सहचरी आहे. परंतु ह्या गोष्टी विपरीत स्वरूपाच्या आहेत; माणूस इतका दुर्दैवी नाही. ज्या दिवशी मनुष्य दृढ निश्चय करतो तेव्हा त्याच्या मुक्ततेचा मार्ग मोकळा होतो; आत्मा हा ‘तू म्हणजे माती आहेस’ असे नैराश्यवादी वेदान्त सांगणाऱ्यांचे पुराण दीर्घकालपर्यंत ऐकतच आलेला आहे. आत्मा हा अजिंक्य आहे, हे त्यांच्या लक्षात आलेले नाही.

गुरुजींचे पुनरुत्थान झालेले पाहण्याचे भाग्य मला एकट्यालाच लाभले आहे असे नाही.

श्रीयुक्तेश्वरजींच्या शिष्यांमध्ये एक वृद्ध स्त्री होती. तिचे नाव ‘मा’ (माता). तिचे घर पुरीस आश्रमाजवळच होते. पुष्कळदा सकाळी हिंडावयास बाहेर पडले असताना, गुरुजी ‘मा’शी गप्पा मारण्याकरिता थांबत असत. १९३६ सालीं १६ मार्चच्या दिवशी संध्याकाळी ‘मा’ आश्रमात आल्या व गुरुजींचे दर्शन घ्यावयाचे आहे, असे म्हणाल्या.

पुरीच्या आश्रमाची व्यवस्था आता स्वामी सेवानंदांकडे आली होती. त्यांनी ‘मा’कंडे दुःखी अंतःकरणाने पाहिले व ते म्हणाले, “गुरुजी तर सात दिवसांपूर्वीच गेले.”

‘मा’ला पटेना. किंचित स्मित करून त्या म्हणाल्या, “शक्य नाही.” नंतर सेवानंदांनी त्यांना गुरुजींच्या अंत्यविधीची सगळी सविस्तर हकीकत सांगितली आणि ‘मा’ना ते म्हणाले, “चला.

मी तुम्हांला समोरच्या बागेत, जिथे त्यांची समाधी आहे, तेथे नेतो."

'मा'ना पटेना. डोके हालवून त्या म्हणाल्या, "समाधीचे काय सांगता? आज सकाळीच दहा वाजता ते नेहमीप्रमाणे हिंडावयास माझ्या दारावरून गेले. रस्त्रयावर चांगले ऊन पडलेले होते. मी त्यांच्याशी किती वेळ बोलत होते. आणि ते म्हणाले, 'संध्याकाळी आश्रमात या.'

"मी येथेच आहे! ह्या वृद्धेच्या मस्तकावर त्यांच्या आशीर्वादांचा वर्षाव झाला. गुरुजी अमर आहेत. त्यांना मला समजावून द्यायचे होते की, भूलोकाव्यतिरिक्त लोकामध्ये त्यांनी आज सकाळी मला दर्शन दिले!"

सेवानंद तर आश्चर्याने थक्क झाले. त्यांनी 'मा'ना वाकून नमस्कार केला आणि ते म्हणाले, "'मा', माझ्या हृदयावरचा दुःखाचा एक जड बोजा जणू तुम्ही उचललात! त्यांचे पुनरुत्थानच झाले!"

1 सविकल्प समाधीमध्ये साधकास परमात्मतत्त्वाशी आपल्या स्वरूपाच्या एकत्वाचा अनुभव प्राप्त झालेला असतो. पण त्याला आपल्या विश्वव्यापी चैतन्याची, स्थिर ध्यानातील स्थितीच्या अनुभवाव्यतिरिक्त, जाणीव झालेली नसते. सतत ध्यान आचरिल्याने त्याला ह्याहूनही वरच्या दर्जाची अशी जी निर्विकल्प समाधी हिचा लाभ घडून येतो. ह्या अवस्थेमध्ये साधक साऱ्या विश्वात स्वच्छंदपणे संचार करू शकतो व तो करीत असताना त्याला परमात्मैक दृष्टीबद्दल विकल्प बिलकूल राहिलेला नसतो.

निर्विकल्प समाधीमध्ये योगी आपल्या जडदेहाच्या किंवा ऐहिक कर्माच्या अगदी शेवटल्या अवशेषाचे क्षालन करीत असतो. तरी पण थोडेबहुत त्याचे पारलौकिक व कारणदेहाचे कर्म भोगावयाचे उरलेले असते. आणि म्हणून तो अतिउच्च स्पंदनांच्या स्तरांवरचे प्रथम पारलौकिक व नंतर कारणदेह धारण करीत असतो. (प्रकरण २६ या संदर्भात पाहावे)

2 कारण बहुतेक व्यक्ती परलोकातील अपूर्व अशा सौंदर्याचा उपभोग घेत असताना त्यापुढील आध्यात्मिक प्रगती साध्य करण्याच्या कामी तितके प्रयत्नशील राहत नाहीत.

3 श्रीयुक्तेश्वरांनी येथे 'प्राण' हा शब्द वापरला आहे. मी त्याचे इंग्रजी भाषांतर lifetrons ह्या शब्दाने केले आहे. हिंदू धर्मशास्त्रात केवळ अणू (atom) व परमाणु, "अॅटम पलीकडील" अतिसूक्ष्म इलेक्ट्रॉनिक शक्ती या शब्दांचाच उल्लेख आहे असे नाही, तर प्राण, "सृजनात्मक प्राणकण," "लाइफ-ट्रॉनिक प्रेरणा" अशा शब्दांचाही उल्लेख आहे. अणू व इलेक्ट्रॉन्स ह्या केवळ निर्जीव प्रेरणा आहेत. 'प्राण' यात मूलतःच बुद्धी अभिप्रेत आहे. प्राण मूलतःच चैतन्यमय आहे. उदाहरणार्थ: वीर्यबिंदू व रज यांमध्ये जे प्राणकण असतात, ते पूर्वकर्माच्या संस्काराप्रमाणे गर्भाशयामधील नवीन जीवाची वाढ करीत असतात.

4 मंत्राचे विशेषण. मंत्र म्हणजे सुरावर म्हटलेला व धारणेच्या मनरूपी तोफेतून डागलेला बीजध्वनी. पुराणांमधून देव व असुर यांच्यामधील मंत्रांकरवी लढविलेल्या युद्धांची वर्णने आढळून येतात. एका असुराने एकदा एका देवाला प्रभावी मंत्रसामर्थ्याने ठार मारण्याचा प्रयत्न केला; पण त्या मंत्रांचा उच्चार त्याच्याकडून बरोबर झाला नाही व त्यामुळे तो मंत्र बुमरँगसारखा उच्चार करणाऱ्यावरच उलटला व त्याने असुरालाच मारून टाकले.

5 अशा सिद्धीची उदाहरणे पृथ्वीवर सुद्धा मिळू शकतात. हेलन केलर व अशाच दुसऱ्या अपवादात्मक व्यक्ती ही उदाहरणे होत.

6 ह्या भूलोकावर शुद्ध मनांच्या मुलांना कधीकधी या लोकीच्या सुंदर रहिवाशांचे, पऱ्यांचे मूर्त स्वरूपात दर्शन होते.

सर्व धर्मशास्त्रांनी रसायने व मादक द्रव्ये ह्यांचे सेवन वर्ज्य मानलेले आहे. त्यांच्या सेवनाने मनुष्याची जाणीव, संवित्ती इतकी बेताल होऊन जाते की, त्यास परलोक-नरकातील हिडीस रूपे दिसू लागतात.

7 भगवान बुद्धांना एकदा, एका माणसाने सर्वांवर सारखेच प्रेम का करावे म्हणून विचारले. त्या महान धर्मोपदेशकाने उत्तर दिले, "प्रत्येकाला आपल्या असंख्य व निरनिराळ्या जन्मांमध्ये दुसरी प्रत्येक व्यक्ती केव्हा ना केव्हा तरी; या नाही त्या जन्मामध्ये—मानवी किंवा पशूच्या रूपात—प्रिय झालेली असते."

8 प्रत्येक निर्मिलेल्या जीवात, अगदी अणूपासून मानवापर्यंत आठ मौलिक गुण प्रवेश करतात. ते असे: भूमी, पाणी, अग्नी, वायू, ईथर, गती, मन आणि व्यक्तित्व.

"भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा । । ४ । ।"

—भगवद्‌गीता, अ. ७.

9 शरीर म्हणजे आत्म्यास बद्ध करून ठेवणारी, स्थूल किंवा सूक्ष्म पेटी. ही तीन शरीरे म्हणजे नंदनवनातील पक्ष्याचे पिंजरेच होत.

10 ज्याप्रमाणे प्रासाद निर्माण करून दाखविण्याची लाहिरी महाशयांची एका पूर्वजन्मीची अर्धसुप्त वासना तृप्त करून दाखविली. ह्याचे वर्णन प्रकरण ३४ मध्ये आलेले आहे.

11 आणि तो त्यांना म्हणाला, "जेथे कोठे शरीर पडलेले असेल तेथे हे सगळे गरुड पक्षी जमा होतील." ल्यूक १७:३७. आत्मा जेथे म्हणून बंदिस्त झालेला असतो—तो मग जड शरीरात असो की सूक्ष्म लिंग-शरीरांत असो की कारण-शरीरात असो, तेथे हे वासनांचे गरुड पक्षीही त्या आत्म्यास बंदिस्तच ठेवून देण्याकरिता गोळा होतात. ह्या गरुड पक्ष्यांचे भक्ष्य म्हणजे मनुष्याचे इंद्रियदौर्बल्य किंवा सूक्ष्म लिंग-देहाबद्दलची किंवा कारण-देहाबद्दलची आसक्ती हे होय.

12 "जो वासनांवर जय मिळवितो त्याला मी माझ्या ईश्वराच्या मंदिरात स्तंभ करून ठेवतो आणि नंतर मग कोठे त्याला बाहेर जावे लागत नाही; (म्हणजे त्यास पुनर्जन्म नाही) ... जो वासनांवर जय मिळवितो त्याला मी माझ्या सिंहासनावर माझ्या शेजारी बसावयास स्थान देती; ज्याप्रमाणे मी सुद्धा जय मिळविला आणि माझ्या पित्याच्या सिंहासनावर त्यांच्या शेजारी बसलेलो आहे." —रेव्हेलेशन ३:१३, २७ (बायबल).

13 श्रीयुक्तेश्वरांना असे सुचवायचे होते की, ह्या पृथ्वीवरच्या वास्तव्यात आपल्या शिष्यांच्या कर्मांचा बोजा हलका करण्याच्या हेतूने ते त्यांची दुखणी वगैरे कधीकधी स्वतःच्याच अंगावर घेत, त्याचप्रमाणे ह्या हिरण्यलोकात सुद्धा त्यांचे असेच उद्धार करण्याने कार्य चालले होते. तेथील रहिवाशांच्या पारलौकिक कर्मांचा बोजा स्वतः धारण करून ते त्यांना त्यावरच्या कारणलोकांप्रत त्वरेने जाण्यास, उत्क्रांत होण्यास मदत करीत.

14 हैम्लेट (अंक ३ प्रवेश १)

15 जीवन आणि मरण हे विचारांचेच सापेक्ष आविष्करण होय. वेदान्तानुसार परमेश्वर हेच फक्त एकमेव असे सत्य आहे. बाकीची सगळी सृष्टी किंवा जीवांचे वेगवेगळे असे अस्तित्व ही *माया* किंवा अज्ञान आहे. अद्वैत तत्त्वज्ञानाचे हे अत्युच्च आविष्करण किंवा पुरस्कार शंकराचार्यांनी उपनिषदांवरील आपल्या भाष्यात भरपूर केला आहे.

प्रकरण - ४४

# 44. वर्ध्यात महात्मा गांधींबरोबर

"आपले स्वागत असो!" वर्ध्याला महात्मा गांधी यांचे चिटणीस महादेव देसाई यांनी कु. ब्लेच, श्री राईट व मी अशा तिघांचे वरील अगत्यपूर्वक शब्दांत स्वागत केले; व खादीचे हार आमच्या गळ्यात घातले. ऑगस्ट महिन्याच्या एके दिवशी पहाटे आमची लहानशी तुकडी वर्धा स्टेशनवर उतरली. आम्ही गाडीतील धुरळ्याला व गरम हवेला कंटाळलो होतो. गाडीतून उतरल्यावर आम्हांला जरा हायसे वाटले. आमच्या बरोबरचे सामान एका छकड्यात टाकून आम्ही एका उघड्या मोटारगाडीत श्री देसाई यांच्याबरोबर बसलो. आमच्या बरोबर त्यांचे सहकारी बाबासाहेब देशमुख व डॉ. पिंगळे होते. खेडेगावातला रस्ता; चिखलाने भरलेला; थोडे अंतर गेल्यावर आम्ही मगनवाडीला आलो. हिंदुस्थानच्या राजकीय संताचा येथे आश्रम होता.

श्री देसाई यांनी आम्हांला ताबडतोब महात्मा गांधींच्या बैठकीच्या खोलीत नेले. तेथे ते मांडी घालून बसले होते. एका हातात पेन व दुसऱ्या हातात कागदाचा तुकडा; आणि चेहऱ्यावर भले-मोठे, लांब-रूंद, लोकांना जिंकून टाकणारे प्रेमळ हास्य!

"आपले स्वागत असो!" त्यांनी हिंदीमध्ये एका कागदावर लिहून दाखविले. तो सोमवार होता; सोमवार म्हणजे त्यांचा साप्ताहिक मौनाचा दिवस.

आमची जरी ही पहिलीच भेट होती, तरी आम्ही एकमेकांना प्रेमाने भारावून टाकले. १९२५ साली महात्मा गांधींनी रांची विद्यालयाला भेट दिली होती आणि तेथल्या पाहुण्यांच्या पुस्तकामध्ये शाळेच्या व्यवस्थेबद्दल गौरवपूर्ण उद्गार काढले होते.

महात्म्याचे वजन केवळ १०० पौंडांचे होते. पण त्यांच्या मुद्रेवर शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक आरोग्याचे तेज होते. त्यांचे मृदू, पिंगट रंगाचे डोळे बुद्धिमत्ता, कळकळ आणि विवेकबुद्धी यांनी चमकत होते. हा मुत्सद्दी हजारो कायद्यांच्या, सामाजिक व राजकीय संघर्षांच्या लढायांमध्ये आपल्या प्रतिस्पर्ध्यांना पुरुन उरला होता. जगातील कोणत्याही पुढाऱ्याने आपल्या लोकांच्या हृदयात इतके हमखास स्थान मिळविले नव्हते. गांधींनी हिंदुस्थानच्या कोट्यावधी अशिक्षित जनतेमध्ये एक अद्वितीय स्थान मिळविले होते. लोकांनी उत्स्फूर्त होऊन त्यांना 'महात्मा'ही पदवी बहाल केली होती. त्या जनतेकरिताच केवळ गांधी पंचा नेसत असत. व्यंगचित्रात त्यांचा तो पंचा नेहमी दाखविला जात असतो. त्यांचा पंचा म्हणजे दलित वर्गाला तेवढ्या वस्त्राखेरीज जास्ती वस्त्र घेणे परवडत नव्हते, याचा निदर्शक होता.

"आश्रमवासी लोक आपल्या सेवेलाच तत्पर आहेत. त्यांच्याकडून आपण कोणतीही सेवा करून घ्या." श्री देसाई, आम्हा मंडळींना बैठकीच्या खोलीतून पाहुण्यांच्या उतरण्याच्या जागेमध्ये नेत असता, महात्मा गांधींनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आतिथ्यशीलतेने माझ्या हातात वरील मजकुराची घाईघाईने लिहिलेली चिठ्ठी दिली.

आमच्या मार्गदर्शकाने आम्हांला फळबागेतून, फुलांनी भरलेल्या शेतांमधून एका कौलारू इमारतीकडे नेले. इमारतीला जाळीदार खिडक्या होत्या. श्री देसाईंनी आम्हांला सांगितले की, अंगणात जी पंचवीस फूट व्यासाची विहीर आहे, तिचे पाणी गुरे-ढोरे पितात आणि जवळच भात सडण्याची एक सिमेंटची चक्की आहे. आम्हांला दिलेल्या प्रत्येक खोलीमध्ये आवश्यक तितक्याच मोजक्या वस्तू ठेवलेल्या होत्या. नवारीची एक खाट; स्वयंपाकघराला पांढरा चुना फासलेला असून कोपऱ्यामध्ये एक पाण्याची तोटी होती; व दुसऱ्या कोपऱ्यामध्ये चूल होती. खेड्यात ऐकू येणारे साधे आवाज आमच्या कानांवर येऊ लागले. कावळ्यांची कावकाव, चिमण्यांची चिवचिव, गुरांचे हंबरणे आणि दगड फोडीत असताना होणारे छिन्नीचे आवाज.

श्री राईट यांच्याजवळ प्रवासाची रोजनिशी असलेली पाहून, देसाई यांनी ती उघडली व त्यामध्ये सत्याग्रह्यांनी सत्याग्रहाच्या [1] वेळी ज्या शपथा घ्यायच्या असतात त्यांची यादी लिहिली:

“अहिंसा; सत्य; अस्तेय; ब्रह्मचर्य; अपरिग्रह; शारीरिक श्रम; जिभेवर ताबा; निर्भयता; सर्व-धर्म-समभाव; स्वदेशी (स्वदेशात तयार झालेल्या मालाचा वापर); अस्पृश्यतेचा त्याग. ही अकरा व्रते नम्रतापूर्वक पाळण्याची असतात.”

(गांधींनी या पानावर दुसऱ्या दिवशी स्वहस्ते स्वाक्षरी केली व तारीखही—२७ ऑगस्ट १९३५ लिहिली).

आम्ही तेथे येऊन पोचल्यावर साधारण दोन तासांनी आम्हांला भोजनाचे बोलावणे आले. आपल्या बैठकीच्या खोलीसमोरच्या अंगणापलीकडे आश्रमाच्या सोप्याच्या कमानीखाली महात्माजी अगोदरच येऊन बसलेले होते. त्यांच्याबरोबर सुमारे पंचवीस सत्याग्रही ताट-वाट्या घेऊन जमिनीवर बसलेले होते. नंतर सगळ्यांनी सामुदायिक प्रार्थना केली. नंतर मोठमोठ्या पितळी भांड्यांतून जेवणाचे वाढप झाले. जेवणात तूप लावलेल्या चपात्या व भाजी आणि लिंबाचे लोणचे.

महात्माजींचे जेवण म्हणजे चपाती, उकडलेले बीटरुट, काही कच्च्या भाज्या आणि संत्री. त्यांच्या ताटामध्ये एका बाजूला अतिकडू असा कडूलिंबाचा पाला ठेवलेला होता. रक्तशुद्धीकरिता कडूलिंब प्रसिद्ध आहे. त्यांनी त्यापैकी काही चमच्याने काढून घेऊन माझ्या ताटात ठेवली. मी ती पाने पाण्याच्या घोटाबरोबर गिळून टाकली. लहानपणी, कडू औषध घ्यायच्या वेळी, आई मला ते पाण्याच्या घोटाबरोबर घ्यायला लावी त्याची मला आठवण झाली. गांधीजी मात्र ती लिंबाची पाने सावकाश, चवीने, चर्वितचर्वण करून खात होते.

हा प्रसंग क्षुल्लक खरा, पण त्यावरून महात्माजी हे इंद्रियांच्या ताब्यातून इच्छेनुसार बाहेर पडू शकत असत, हे दिसून येत होते. काही वर्षांपूर्वी त्यांच्यावर आंत्रपुच्छ (ॲपेंडिसायटिसवर) शस्त्रक्रिया करण्यात आली होती, त्याची मला आठवण झाली. शस्त्रक्रिया चालू असता क्लोरोफार्म घेण्याचे नाकारून ते आपल्या शिष्यांबरोबर शांत स्मित मुद्रेने वेदना काही एक होत नाहीत असे दाखवीत गप्पागोष्टी करीत होते.

दुपारी गांधीजींची प्रसिद्ध शिष्या, कुमारी मॅडेलीन स्लेड व आता मिरा बेन, यांच्याशी बोलण्याची संधी मला मिळाली. ह्या बाई एका इंग्लिश नौसेना प्रमुखाच्या कन्या होत्या. [2] अगदी बिनचूक अशा हिंदीमध्ये, आपल्या दैनिक कार्यक्रमाची हकीकत सांगताना त्यांच्या दृढनिश्चयी, शांत चेहऱ्यावर उत्साह दिसून येत होता.

"ग्रामोद्धाराचे कार्य हे खरोखरच फलदायी आहे! आम्ही काहीजण, सकाळी पाच वाजता उठून, शेजारच्या खेड्यांमध्ये जातो व तेथील खेडुतांना साध्यासुध्या आरोग्याचे नियम शिकवितो. आमचा, त्यांचे शौचघर आणि गवताचे छप्पर असलेल्या मातीच्या झोपडयांना स्वच्छ करण्यावर विशेष जोर असतो. खेडूत लोक अडाणी असतात; प्रत्यक्ष उदाहरणाखेरीज त्यांना समजत नाही," असे बोलून त्या गमतीने हसल्या.

जे भंग्याचे काम साधारणपणे अस्पृश्य लोक करतात, ते काम त्यांना सच्च्या ख्रिस्तीधर्मीयाची नम्रता करायला लावीत होती. अशा ह्या खानदानी इंग्लिश महिलेकडे पाहून मला मोठे कौतुक वाटले.

त्या मला सांगू लागल्या, "१९२५ साली मी हिंदुस्थानात आले. ह्या देशात आल्यावर माझ्या घरी आल्यासारखे मला वाटले. आता पूर्वीच्या आयुष्यामध्ये व पूर्वीच्या गोष्टींमध्ये मी लक्ष घालीन, असे वाटत नाही."

नंतर आम्ही काही वेळ अमेरिकेविषयी चर्चा केली. त्या म्हणाल्या, "हिंदुस्थानात जे अनेक अमेरिकन येतात ते आध्यात्मिक विषयांसंबंधी इतके लक्ष घालतात त्याचे मला नेहमी कौतुक आणि, आश्चर्य वाटते व आनंदही वाटतो." [3]

मिरा बेन नंतर लवकरच सूत कातायला बसल्या महात्माजींच्या प्रयत्नांमुळे चरखे आता हिंदुस्थानात खेडोपाडी सर्वत्र दिसून येतात.

ह्या ग्रामोद्योगाच्या पुनर्जीवनास उत्तेजन देण्यास गांधीजींजवळ अगदी समर्पक अशी आर्थिक व सांस्कृतिक कारणे आहेत; पण सर्वच आधुनिक सुधारणांना कडवा विरोध करावा, अशी त्यांची शिकवणूक नाही. त्यांच्या स्वतःच्या अवाढव्य जीवनात, यंत्रे, आगगाड्या, मोटारी, तारा यांचा त्यांनी भरपूर उपयोग करून घेतला आहे; व तो उपयोगही महत्त्वपूर्ण झालेला आहे! लोकसेवेत त्यांनी आतापर्यंत पन्नास वर्षे घालविली; काही तुरुंगात व काही तुरुंगाबाहेर; व राजकीय जीवनामध्ये दररोज व्यावहारिक तपशिलांशी व कठोर परिस्थितीशी त्यांना सतत झगडावे लागले आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांची समन्वयता, खुलेपणा, सुज्ञता ही वाढलेली आहेत; व ह्या चमत्कृतिपूर्ण मानवी जीवनाच्या दृश्यांचे ते विनोदबुद्धीने कौतुक करतात.



*वर्ध्याचा महात्मा गांधींचा आश्रम*

*गांधीजींनी (उजवीकडे) लिहिलेली एक चिठ्ठी श्री योगानंद वाचत आहेत (तो सोमवार - महात्माजींचा मौनदिन होता). त्याच्या पुढच्याच दिवशी, 27 ऑगस्ट 1935 ला, श्री योगानंदांनी गांधीजींना क्रियायोगाची दीक्षा दिली.*

त्यांचे अतिथि म्हणून बाबासाहेब देशमुखांकडे आम्ही त्रिकूटाने संध्याकाळी सहा वाजता जेवणाचा आनंद घेतला. सात वाजायच्या प्रार्थनेला आम्ही मगनवाडी आश्रमामध्ये परत आलो. तेथे गच्चीवर गांधीजींच्या भोवती अर्धवर्तुळाकार असे तीस सत्याग्रही जमावाने बसलेले होते. गांधीजी एका गवताच्या चटईवर बसलेले होते. त्यांच्या समोर एक पुरातन काळातले घड्याळ ठेवलेले होते. मावळत्या सूर्याची किरणे तेथल्या ताडांच्या व केळींच्या झाडांवर शेवटला तजेला देत होती. रातकिड्यांचा आवाज ऐकू येऊ लागला होता. वातावरण गांभीर्यपूर्ण होते. मी आनंदाने भारावून गेलो.

प्रथम श्री देसाईंनी एक गंभीरशी धून म्हटली; नंतर बसलेल्या सर्व मंडळींनी त्यास साथ दिली. नंतर गीतावाचन झाले. नंतर महात्माजींनी समारोपाची प्रार्थना मी म्हणावी म्हणून खूण केली. विचार आणि आकांक्षा यांचा काय हा दिव्य संयोग! चिरस्मरणीय आठवणच ती. उगवत्या ताऱ्यांच्या प्रकाशात वर्ध्याला गच्चीवर बसलेली ती ध्यानाची बैठक.

बरोबर आठ वाजता गांधींनी आपले मौन सोडले. आपल्या आयुष्यात अनेक बाबतींत प्रचंड परिश्रम त्यांस करावे लागत असल्याने त्यांनी प्रत्येक कार्यक्रमास अगदी काटेकोरपणे वेळेचे वाटप केलेले होते.

“स्वामीजी, या” या वेळचे त्यांचे स्वागत काही चिठ्ठीमार्फत नव्हते. आम्ही नुकतेच गच्चीवरून त्यांच्या बैठकीच्या खोलीत आलो होतो. खोलीत चटया घातलेल्या होत्या; (खुर्च्या नव्हत्या). उतरते लहानसे बैठे मेज; त्याच्यावर पुस्तके, कागद आणि काही साधे टाक (फाऊंटन पेन नव्हते); एक कोपऱ्यात ठेवलेले वर्णनास अवघड असे एक घड्याळ.

शांतता व भक्ती यांचे सर्वत्र साम्राज्य पसरलेले होते; गांधी आपले मोहक, पोकळ व दंतविरहित असे हास्य करीत होते.

ते खुलासा करू लागले, “आठवड्यात एक दिवस मौन पाळायला बऱ्याच वर्षांपासून मी सुरुवात केली; हेतू हा की पत्रव्यवहाराकडे पाहावयास वेळ मिळावा. पण आता हे चोवीस तास सगळे आध्यात्मिक कार्यांना लागू लागलेले आहेत; आणि म्हणून हे जे साप्ताहिक मौन मी पाळत असतो, त्याने मला त्रास तर काही होतच नाही. उलट फार आनंद वाटतो.”

त्यांचे म्हणणे मी अंतःकरणपूर्वक [4] मान्य केले. महात्माजींनी मला अमेरिका व युरोपबद्दल अनेक प्रश्न विचारले; तसेच हिंदुस्थानविषयक व जागतिक प्रश्न यांवरही आम्ही चर्चा केली.

“महादेव,” श्री देसाई खोलीत येताक्षणीच गांधी त्यांना म्हणाले; “उद्या रात्री टाऊन हॉलमध्ये स्वामीजींच्या योगावरील भाषणाची व्यवस्था करा.”

नंतर रात्री महात्माजींची परवानगी घेतेवेळी त्यांनी ध्यानात ठेवून निलगिरी तेलाची एक बाटली माझ्या हातात दिली.

“वर्ध्याच्या डासांना अहिंसेबद्दल [5] काही माहिती असावीसे दिसत नाही, स्वामीजी,” ते हसत हसत म्हणाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही मंडळींनी न्याहारीस गव्हाची खीर आणि दूध घेतले. साडेदहा वाजता आम्हांला जेवायचे बोलावणे आले. जेवणाची जागा आश्रमाच्या पडवीतच होती. पंक्तीला गांधीजी व त्यांचे सत्याग्रही होते. आजचा जेवणाचा बेत म्हणजे हातसडीच्या तांदळाचा भात, एक नवीन भाजी आणि वेलची दाणे असा होता.

दुपारी मी आश्रमात हिंडलो. आश्रमात गायी शांतपणे चरत होत्या. गोरक्षण म्हणजे गांधीजींचे व्रतच होते.

“गाय म्हणजे मला मनुष्येतर सारी प्राणिसृष्टी; की जेथपर्यंत मनुष्यजातीपलीकडे माणसाची भूतदया जाऊ शकते.” महात्माजींनी स्पष्टीकरण केले. “गायीच्या माध्यमाने मनुष्याने इतर प्राणिमात्रांशी समरस व्हावयास पाहिजे. प्राचीन ऋषींनी प्राणिमात्रामध्ये देवस्वरूप मानावयास गायीला का निवडले हे मला समजलेले आहे. हिंदुस्थानामध्ये सगळ्यांत जास्त सहवास गायीचा घडतो. समृद्धीची ती जननी आहे. ती नुसते दूधच देते असे नव्हे, तर शेतीच्या कामात तिची फार मदत होते. गाय म्हणजे कारुण्याचे एक जिवंत काव्य आहे; त्या मूक व गरीब प्राण्यात कारुण्यभाव हा मूर्तिमंत दिसुन येतो. हजारो लाखो मनुष्यप्राण्यांची ती दुसरी आईच आहे. गायीचे संरक्षण म्हणजे परमेश्वराने निर्माण केलेल्या साऱ्या मूक प्राणिसृष्टीचे संरक्षण करणे होय. ह्या खालच्या योनीतील सृष्टीचे परिपालन करणे, हे विशेष अगत्याचे ठरते. याचे कारण असेही आहे की, त्या सृष्टीस वाचा नाही. [6]

कर्मठ हिंदू मनुष्यास काही आचारधर्म हा दररोज पाळावा लागतो. ह्या आचारधर्मापैकी एक प्रमुख म्हणजे ‘भूतयज्ञ’. भूतयज्ञ म्हणजे प्राणिमात्रासाठी आपण जे अन्न अर्पण करतो ते. भूतयज्ञ हा कमी उत्क्रांत अशा प्राणिसृष्टीबाबत माणसाचे जे काही कर्तव्य आहे ते. त्याची जाणीव ह्या भूतयज्ञात आहे. ह्या प्राणिसृष्टीमध्ये स्थूल शरीराशी तादात्म्यता ही एक

सहजप्रवृत्तीच आढळून येते. ही प्रवृत्ती माणसाच्या ठिकाणी सुद्धा आहे; व त्यामुळे माणसाची हानीही घडून आलेली आहे. ही जी स्थूल शरीराशी तादात्म्य पावण्याची सहजप्रवृत्ती प्राणिमात्राच्या ठिकाणी आढळून येते, त्या प्रवृत्तीमुळे त्यांच्यामध्ये विवेकबुद्धीचा, तारतम्यबुद्धीचा पूर्ण अभाव आढळून येतो.

अशा तऱ्हेने भूतयज्ञ हा दीनदुबळ्या प्राण्यांना मदत करण्याच्या माणसाच्या प्रवृत्तीस उत्तेजन देतो. कारण की त्याच पद्धतीने उच्च कोटीतील अदृश्य जीव, माणसास अनेक प्रकारे तशीच मदत करीत असतात. मनुष्याला पृथ्वी, समुद्र आणि आकाश यांपासून ज्या असंख्य वस्तूंचा लाभ घडून येतो, त्यांसाठी तो त्यांचा ऋणी आहे. निसर्ग, पशुप्राणी, मनुष्य व इतर पारलौकिक मृतात्मे यांच्यामध्ये, कमीअधिक उत्क्रांतावस्थेमुळे, संवादहीनतेचे जे अडसर पडलेले असतात ते असे निःशब्द प्रेमाचे नित्य यज्ञ अर्पण केल्याने थोडेसे बाजूला सारले जातात.

दैनिक आचारधर्मांतले दुसरे आणखी यज्ञ म्हणजे पितृयज्ञ आणि नृयज्ञ. पितृयज्ञ म्हणजे पितरांना अर्पण केलेली आहुती; मनुष्याला आपल्या भूतकालीन पितरांचेही ऋण असते; त्यांच्याच प्रज्ञेमुळे त्याच्या ठिकाणी बुद्धी परंपरेने आलेली असते. त्या ऋणाची अंशतः परतफेड करणे हा पितृयज्ञामधील अभिप्रेत हेतू आहे. नृयज्ञ म्हणजे कोणाही अतिथीला किंवा गरिबाला केलेले अन्नदान. माणसाचे माणसाबद्दल, समकालीन व्यक्तींबद्दल जे कर्तव्य राहते, त्या कर्तव्याचे नृयज्ञ हे प्रतीक आहे.

दुपारी गांधींच्या आश्रमातील लहान मुलींना मी भेट दिली व अशा तऱ्हेने एक प्रकारचा नृयज्ञ उरकून आलो. ह्या दहा मिनिटांच्या फेरफटक्यामध्ये श्री राईट माझ्याबरोबर होते. लहान फुलांसारखे असलेले ते चित्र. विचित्र साड्यांच्यावरती शोभत असलेले चेहरे! मी त्यांच्याशी उघड्यावर हिंदीमध्ये थोडे बोललो; आणि एवढ्यात एक पावसाची सर आली. हसतहसत मी व श्री राईट दोघे गाडीमध्ये बसलो आणि मगनवाडीकडे गाडी हाकलली. पावसाच्या धारा चांदीच्या लड्यांसारख्या दिसत होत्या. उष्ण कटिबंधातले काय हे विषम हवामान! मध्येच ऊन काय अन् मध्येच पाऊस काय!

पुनः आम्ही अतिथिगृहात गेलो. तेथे दिसून आलेला अगदी कडक साधेपणा व ठायी ठायी आढळून आलेला स्वार्थत्याग पुनः माझ्या नजरेत भरून राहिला. गांधींनी अपरिग्रहाची शपथ, त्याचे व्रत आपल्या सांसारिक आयुष्याच्या अगदी सुरुवातीसच घेतले होते. दरसाल रु. ६०,००० पेक्षा अधिक होणाऱ्या उत्पन्नाची वकिलीतील मोठी प्राप्ती सोडून देऊन महात्माजींनी आपली सर्व मालमत्ता गरिबांना दान करण्यात खर्च करून टाकली.

संन्यस्तवृत्तीच्या अपुऱ्या व लोकांमध्ये रूढ असलेल्या समजुतींबद्दल श्रीयुक्तेश्वर नर्मविनोद करीत असत.

गुरुजी म्हणायचे, "भिकारी काही संपत्तीचा त्याग करू शकत नाही. एखादा मनुष्य विलाप करू लागला की, 'माझा धंदा बुडला; माझी बायको मला सोडून गेली; आता मी सर्वस्वाचा त्याग करतो व आश्रमात जातो.' आता ह्यात त्याने कशाचा त्याग केला? त्याने काही संपत्ती आणि प्रेमाचा त्याग केला नाही; संपत्ती व प्रेमानेच त्याचा त्याग केला!"

याच्या उलट गांधीजीसारख्या संतमहात्म्यांनी नुसता केवळ जड वस्तूंचा त्याग केला एवढेच नव्हे, तर त्यांनी त्याहूनही अधिक विकट अशा गोष्टीचा त्याग केलेला असतो. त्यांनी स्वार्थी हेतू व खाजगी ध्येय, आकांक्षा यांचा त्याग केलेला असून त्यांनी आपले सर्व आंतरिक व्यक्तित्व साऱ्या मानवतेच्या महोदधीमध्ये विलीन केलेले असते.

महात्माजींनी आपल्या संपत्तीचा विनियोग करतेवेळी काही थोडासा भाग आपल्या बायकामुलांकरिता बाजूला ठेवला नाही, त्याबद्दल त्यांची असाधारण पत्नी, कस्तुरबा यांनी कधीही आक्षेप घेतला नाही. गांधींचे लग्न अगदी किशोरावस्थेतच झाले होते आणि चार मुले [7] झाल्यावर त्या दोघांनी ब्रह्मचर्याचे व्रत पाळले होते. कस्तुरबा ही त्यांच्या एकत्र सांसारिक नाटकातील धीरोदात्त नायिका होती. आपल्या पतीबरोबर त्या तुरुंगांत गेल्या होत्या. त्यांच्याबरोबर त्यांनीही तीन आठवड्यांचे उपोषण केलेले होते आणि त्यांच्या, ज्याला अंत नाही अशा अनेक जबाबदाऱ्यांमध्ये त्यांनी आपला पुरेपूर वाटा उचलला होता. त्यांनी गांधीजींबद्दल पुढील गौरवपूर्ण शब्द काढले आहेत:

“आपल्याबरोबर आयुष्याची सोबतीण म्हणून व मदतनीस म्हणून राहण्याचे जे मला भाग्य लाभले, त्याबद्दल मी आपली फार आभारी आहे. आपले हे वैवाहिक जीवन अगदी परिपूर्ण असे झालेले आहे; कारण त्याची उभारणी ब्रह्मचर्यावर झालेली असून त्यात वैषयिकता सुतराम नाही; असे हे जीवन मला लाभले त्याबद्दल मी आपली फार आभारी आहे. हिंदुस्थानासाठी आपण जे जीवितकार्य म्हणून नियुक्त केले, त्यात मला आपल्याइतकेच मानले; त्याबद्दल मी आभारी आहे. आपण इतर पुरुषांसारखा जुगार, रेस, बायका, मद्यपान, गाणे-बजावणे यात कालाचा अपव्यय केला नाही व स्त्रीचा व मुलांचा कंटाळा केला नाही; जसा लहान मुलांना त्याच त्याच खेळण्यांचा चटकन कंटाळा येतो, त्याप्रमाणे तुम्ही माझा कंटाळा केला नाही. याबद्दल मी आपली फार आभारी आहे. दुसऱ्यांच्या श्रमावर आपण संपत्ती मिळवावी अशा विचारांच्या नवऱ्याप्रमाणे आपण नाही आहात, याबद्दल मी आपले किती आभार मानू?

“लाचलुचपतीच्या मोहाला बळी न पडता, आपण परमेश्वर व देश यांची कास धरलीत; आपली ठाम मते धैर्याने पुढे मांडलीत व परमेश्वराच्या ठिकाणी पूर्ण आणि सतत विश्वास बाळगलात, त्याबद्दल मी आपली किती आभारी आहे? आपण परमेश्वर व देशाला स्त्रीपेक्षा जास्त किंमत दिलीत, अशा पतीची मी किती ऋणी आहे? आपण मला सांभाळून घेतलेत; माझ्या तारुण्यसुलभ दोषांकडे लक्ष दिले नाहीत; ज्या वेळी आपण आपल्या राहणीमध्ये बदल केलात, उंची राहणीपासून साध्या राहणीपर्यंत येऊन पोचलात त्या वेळी मी कुरकूर केली, विरोध दर्शविलाच पण आपण मला समजावून दिले. त्याबद्दल मला कृतज्ञता वाटते.

“अगदी लहान मुली प्रमाणे मी आपल्या आई वडिलांच्या घरी राहिले; आपली आई मोठी साध्वी व मोठ्या मनाची; तिने मला सारे शिकविले. धीर कसा धरावा, हुशारीने व शौर्याने कसे वागावे, आपला मुलगा म्हणजे माझे भावी पती यांच्याबद्दल प्रेम आणि आदर कसा दाखवावा, हे तिने मला शिकविले. पुढे काळ लोटला व आपण हिंदुस्थानचे लाडके पुढारी झालात, तरी मला आपण माझ्याकडे दुर्लक्ष कराल अशी भीती बिलकुल वाटली नाही. इतर

दुसऱ्या देशांत नवरा यशाच्या सोपानावर वरवर चढत गेला म्हणजे त्याच्या बायकोची स्थिती मोठी केविलवाणी होते. मला माहीत होते की, मरणाच्या वेळी सुद्धा आपण पती व पत्नी असेच राहू."

कित्येक वर्षे कस्तुरबानी सार्वजनिक फंडाच्या खजिनदाराचे काम केले. देवत्वास पोचलेल्या महात्माजींनी लाखो रुपये फंडाकरिता गोळा केले होते, गांधीजींच्या व्याख्यानास जाताना आपल्या बायकांनी दागदागिने घालून जायच्या वेळी त्यांच्या पतिराजांना भीती वाटत असे व त्याबद्दल विनोदाचे चुटकेही प्रसृत झाले होते. महात्माजींच्या व्याख्यानास सुरुवात झाली आणि मंत्रमुग्ध वाणीने दलितवर्गाची बाजू ते हृदय पिळवटून टाकणाऱ्या शब्दांत सांगू लागले, म्हणजे त्यांच्या शेजारी ठेवलेल्या टोपलीमध्ये, सोन्याच्या बांगड्या, हिऱ्यांचे हार आपल्या मालकिणीचे हात व गळे सोडून आपोआप पडत असत!

एके दिवशी सार्वजनिक खजिनदार कस्तुरबा यांना चार रुपयांच्या खर्चाचा हिशेब देता येईना. गांधीजींनी रीतसर हिशेब प्रसिद्ध केले व त्यात बायकोच्या हातून झालेल्या चार रुपयांच्या चुकीचा निर्देश केला.

मी ही गोष्ट माझ्या अमेरिकन विद्यार्थ्यांपुढे वर्गात नेहमी सांगत असे. एके दिवशी संध्याकाळी सभागृहातील एका महिलेने यावर जोराचा आक्षेप घेतला.

"महात्मा असो की महात्मा नसो," ती म्हणाली, "ते जर माझे यजमान असते तर मी त्यांना ह्या विनाकारण केलेल्या जाहीर अपमानाबद्दल चांगली अद्दल घडविली असती!"

नंतर आमच्यामध्ये अमेरिकन बायका व हिंदू बायका या विषयावर काही हास्यविनोद झाल्यावर मी ह्या प्रकाराचे खुलासेवार स्पष्टीकरण केले.

"श्रीमती गांधी ह्या महात्माजींना आपले पती समजत नसून गुरू समजत असत. अर्थात गुरू म्हणून शिष्याला अगदी किरकोळ चुकीबद्दल सुद्धा शिस्त लावण्याचा अधिकार म. गांधींना होता." मी त्यांना समजावून दिले, "कस्तुरबांची अशी जाहीररीत्या हजेरी घेतल्यानंतर काही राजकीय आरोपाकरिता गांधीजींची तुरुंगात रवानगी झाली. तुरुंगात जाण्यापूर्वी ते आपल्या बायकोकडे निरोप घ्यावयास गेले. त्या त्यांच्या पाया पडल्या. 'महाराज,' त्या नम्रतेने म्हणाल्या, 'मी जर आपल्याला काही दुखविले असेल तर त्याची मला क्षमा करा.'"

त्या दिवशी दुपारी तीन वाजता वर्ध्याला मी अगोदर वेळ ठरवून त्या महात्म्याच्या बैठकीच्या खोलीत गेलो. त्या महापुरुषाने आपल्या बायकोस सुद्धा आपले निष्ठावंत शिष्य करून टाकले होते. क्वचितच दिसून येणारा चमत्कार तो! गांधींनी वरती पाहिले व अविस्मरणीय असे हास्य केले.

"महात्माजी," मी त्यांच्या शेजारी चटईवर बसून म्हणालो, "तुमची अहिंसेची काय व्याख्या आहे, हे मला जरा कृपा करून सांगा."

"कोणत्याही जिवंत प्राण्याला इजा करण्याचे मनाने किंवा कृतीने टाळणे."

"काय सुंदर कल्पना आहे! पण हे जग मात्र नेहमी विचारील; माणसाने एखाद्या लहान मुलाला किंवा स्वतःला सुद्धा वाचविण्यासाठी सापास-नागास ठार मारू नये काय?"

“माझ्या दोन व्रतांचा भंग केल्याखेरीज, एक म्हणजे निर्भयता व दुसरे म्हणजे अहिंसा, मी तो साप-नाग मारू शकणार नाही. त्या सापास मारण्याऐवजी मी प्रेमलहरी निर्माण करून त्याला अंतःस्थपणे शांत करीन. परिस्थितीला सोयीची पडावीत म्हणून माझी मूल्ये मला खालच्या दर्जावर आणता येणार नाहीत.” अशा तऱ्हेने अगदी आश्चर्यकारकपणे आपले म्हणणे स्पष्ट केल्यावर गांधीजी पुढे म्हणाले, “आता हे मला कबूल केले पाहिजे की, समोर साप असता तर मला हे संभाषण इतक्या गंभीरपणे चालवता आले नसते!”

त्यांच्या बैठ्या मेजावर आहार विषयावर नुकतीच प्रसिद्ध झालेली कित्येक पाश्चिमात्य पुस्तके आढळली, तेव्हा मी त्यांबद्दल विचारले.

“होय, सत्याग्रहाच्या मोहिमेमध्ये आहाराला इतर बाबतींतल्याप्रमाणे महत्त्व आहे,” गालातल्या गालांत हसून ते म्हणाले. “सत्याग्रह्यांच्या दृष्टीने संपूर्ण संयमन किंवा ब्रह्मचर्य अत्यावश्यक आहे, असे मी नेहमी प्रतिपादन करतो आणि म्हणून ब्रह्मचाऱ्याला योग्य असा कोणता आहार आहे ह्याच्या मी नेहमी शोधात असतो. जननक्षम सहजप्रवृत्तीवर नियमन ठेवण्याच्या अगोदर त्याने जिभेवर प्रथम ताबा मिळविला पाहिजे. अल्पाहार किंवा असमतोल आहार हे त्याला उत्तर नव्हे. अन्नग्रहणाची आंतरिक वासना भागवल्यानंतर सत्याग्रह्याने असा आहार चालू ठेवला पाहिजे की, ज्याच्यामध्ये सर्व जीवनसत्त्वे, खनिजे, कॅलरी वगैरे आवश्यक गोष्टींचा अंतर्भाव झालेला आहे. खाण्याच्या बाबतीत अंतस्थतः व बाह्यतः त्याने असा व्यवस्थितपणा ठेवला पाहिजे की, जेणेकरून सत्याग्रह्यांच्या वीर्याचे परिवर्तन सर्व शरीरास आवश्यक अशी शक्ती पुरविण्याच्या कामी, अगदी सहजरीत्या झाले पाहिजे.”

मांसाहाराच्या ऐवजी दुसरे कोणते शाकाहारी पदार्थ आहेत या विषयाबद्दल महात्माजींनी व मी दोघांनी तुलनात्मक दृष्ट्या ऊहापोह केला. “आवोकाडोची फळे ही फार उत्तम,” मी म्हणालो. “कॅलिफोर्नियामध्ये आमच्या केंद्राच्या जवळ आवोकाडोच्या कित्येक बागा आहेत.”

गांधीजींचा चेहरा औत्सुक्याने चमकला, “वर्ध्यामध्ये आवोकाडोच्या बागा लावता येतील की नाही त्याची मला कल्पना नाही. पण सत्याग्रह्यांना हे फळ नवीन अन्न म्हणून खास आवडेल.”

“लॉस एंजेलिसहून वर्ध्याला आवोकाडोची काही कलमे मी जरूर पाठवून देईन,” मी बोललो, “अंड्यांमध्ये प्रोटीन्सचे प्रमाण जास्त असते. सत्याग्रह्यांना अंडी देता येतील काय?”

“अंडी सजीव असता कामा नयेत,” काही आठवण होऊन महात्माजी हसले. “पुष्कळ वर्षे झाली, मी त्यांचा उपयोग केला नाही; आजही स्वतः मी ती कधी खात नाही. माझी एक सून होती. ती पौष्टिक आहाराच्या अभावी अगदी मरणाच्या दारी येऊन ठेपली होती. तिच्या डॉक्टरांनी अंडी खावी म्हणून आग्रह धरला. मी त्याला विरोध केला. अंड्यांच्या ऐवजी दुसरा काही पौष्टिक आहार द्यावा, असे मी त्यांना सुचविले.

“‘गांधीजी,’ डॉक्टर म्हणाले, ‘ह्या अफलित अंड्यांमध्ये जीव नसतो; तेव्हा ती खाण्याने काही हिंसा होत नाही.’”

“नंतर मी ती खाण्याला सूनबाईला परवानगी दिली. लवकरच तिची तब्येत सुधारली.”

त्याच्या अगोदरच्या रात्री लाहिरी महाशयांच्या क्रियायोगाची दीक्षा घेण्याची आपली इच्छा गांधीजींनी व्यक्त केली. गांधीजींच्या ह्या मनमोकळेपणाचा आणि जिज्ञासूवृत्तीचा माझ्या मनावर मोठा परिणाम झाला. दिव्यत्वाचा शोध घ्यायचा म्हणजे ते अगदी लहान मुलासारखे वागतात; त्यांची ती निरागस ग्रहणशीलता बाहेर पडते, की जी लहान मुलांमध्ये उपजत असते. येशू ख्रिस्ताने या गुणाबद्दल लहान मुलांची स्तुती केली आहे, '… स्वर्गाचे राज्य अशांनीच भरलेले आहे.'

त्यांना दीक्षा देण्याचे मी कबूल केले. दीक्षा देण्याची वेळ जवळ येऊन ठेपली. खोलीमध्ये कित्येक सत्याग्रही येऊन दाखल झाले. श्री देसाई, डॉ. पिंगळे आणखीन काही यांना क्रियायोगाची दीक्षा घेण्याची इच्छा झाली होती.

त्या छोट्याशा वर्गाला मी प्रथम व्यायामाची योगदा आसने शिकविली. या पद्धतीत शरीराचे वीस भाग कल्पिलेले आहेत; आणि त्या प्रत्येक भागाकडे इच्छाशक्ती ही शक्ती पुरविते, पाठविते. एखाद्या मानवी मोटारीप्रमाणे थोड्याच वेळात प्रत्येक जण माझ्यासमोर हलू लागला, स्पंदन पावू लागला. गांधीजींच्या शरीराचे वीसही भाग चांगले उठून दिसत होते. ते भाग स्पंदन पावत होते, हे अगदी स्पष्ट दिसत होते. त्यांची शरीराची काठी जरी किरकोळ होती तरी ते दिसायला वाईट दिसत नव्हते. त्यांची त्वचा मऊ असून तिला सुरकुत्या [8] पडलेल्या नव्हत्या.

त्यानंतर मी त्या मंडळींना मोक्षदायी अशा क्रियायोगाची दीक्षा दिली.

महात्माजींनी जगातील सर्व धर्मांचा आदरपूर्वक अभ्यास केलेला आहे. जैन धर्मग्रंथ, बायबलमधील नवीन करार व टॉलस्टॉय [9] यांचे समाजविषयक लिखाण हे गांधीजींच्या अहिंसेच्या तत्त्वप्रणालीचे आधारभूत ग्रंथ होत. त्यांनी आपली तत्त्वप्रणाली खालील शब्दांत सांगितलेली आहे:

"वेद ज्याप्रमाणे दैवी प्रेरणेने रचले गोले त्याचप्रमाणे बायबल, कुराण आणि झेंद-अवेस्था [10] हे ग्रंथही लिहिले गेले आहेत, असा माझा विश्वास आहे. गुरुपरंपरेवर माझी श्रद्धा आहे; पण सांप्रतच्या युगात लाखो लोकांना गुरू-शिवायच पुढे जावे लागते; कारण शुद्ध पावित्र्य व पांडित्य ही दोन्ही क्वचितच एके ठिकाणी आढळतात. परंतु आपल्या धर्माचे तत्त्व आपणांस समजले नाही म्हणून कोणीही निराश होण्याचे कारण नाही; कारण हिंदू धर्माची मूलभूत तत्त्वे इतर धर्मांच्या मूलभूत तत्त्वांसारखीच आहेत; त्यांत बदल असा होत नाही; आणि ती समजावयास सुद्धा सोपी आहेत.

"प्रत्येक हिंदू मनुष्याप्रमाणे माझा परमेश्वरावर, अद्वैत सिद्धांतावर, पुनर्जन्मावर व मोक्षकल्पनेवर विश्वास आहे … स्वतःच्या बायकोबद्दल जसे माझे मत मला सांगता येत नाही, त्याप्रमाणे हिंदू धर्माविषयी मला काय वाटते, हे मला सांगता येत नाही. जगातील दुसरी कोणतीही स्त्री मला इतके प्रेरित करीत नाही; याचा अर्थ असा नव्हे की, तिच्या ठिकाणी काही दोष नाहीत. तिच्या ठिकाणी मी पाहतो त्यापेक्षा जास्त दोष आहेत, हे मी नक्की सांगू शकतो; पण न तुटणारा असा भावनेचा दुवा तेथे आहे. त्याचप्रमाणे हिंदू धर्माबद्दल, त्या धर्मातील दोषांबद्दल, मर्यादित स्वरूपाबद्दल मला वाटते. गीता किंवा तुलसीदासाचे रामायण

यातील संगीतापेक्षा मला दुसरे कोणतेही संगीत किंवा गीत आनंद देऊ शकत नाही. मी जेव्हा अशी कल्पना करतो की, इहलोकीचा शेवटला श्वास मी घेत आहे. त्या वेळी गीताच मला समाधान, दिलासा देते.

"हिंदू धर्म हा काही प्रतिबंधक किंवा एकांगी धर्म नाही. त्या धर्मात जगातील [11] साऱ्या प्रेषितांची पूजा करण्यास पूर्ण मुभा आहे. सर्वसाधारण अर्थाने पाहता हिंदू धर्म हा प्रचारक-धर्म नाही. त्या धर्माने आपल्या उदरामध्ये अनेक जमाती सामावून घेतलेल्या आहेत; पण हे सामावून घेण्याचे कार्य हे उत्क्रांतिस्वरूपाचे व सहजासहजी कोणाच्या ध्यानात येणार नाही अशा तऱ्हेने झालेले आहे. प्रत्येकाने आपआपल्या श्रद्धेनुसार धर्मानुसार [12] आपल्या ईश्वराची पूजा करावी, अशी हिंदू धर्माची शिकवण आहे. आणि त्यामुळे हिंदू धर्म परधर्मसहिष्णू आहे."

येशू ख्रिस्ताविषयी गांधींनी असे म्हटले आहे, "माझी खात्री आहे की, जर येशू आजच्या घटकेला लोकांमध्ये वावरत असता, तर ज्यांनी त्याचे नावही कधी ऐकिलेले नाही अशा पुष्कळ लोकांना त्याने आशीर्वाद दिले असते ... 'हे परमेश्वरा, हे परमेश्वरा, मला जो सांगत आहे तोच केवळ एकटा नसून, माझ्या पित्याची जो आज्ञा पाळतो तोही ...' [13] असे म्हटल्याप्रमाणे, आपल्या स्वतःच्या आयुष्याचे उदाहरण देऊन येशू ख्रिस्ताने मनुष्यजातीला, आपण सर्वांनी जे ध्येय पुढे ठेवले पाहिजे त्याचा उच्च हेतू व एकमेव उद्दिष्ट दाखविलेले आहे. मला असे वाटते की, तो केवळ ख्रिस्ती धर्माचाच नसून साऱ्या जगाचा—सर्व देशांचा व सर्व मानववंशाचा आहे."

आमच्या वर्ध्यातील मुक्कामाच्या शेवटल्या दिवशी संध्याकाळी मी टॉऊनहॉलमध्ये व्याख्यान दिले. सभा श्री देसाई यांनी भरविली होती. त्या हॉलमध्ये जवळजवळ ४०० माणसे दाटीवाटीने, खिडक्यांतून सुद्धा माझे योगावरील व्याख्यान ऐकण्याकरिता बसली होती. मी प्रथम हिंदीतून बोलावयास सुरुवात केली व नंतर इंग्रजीमधून बोलू लागलो. आम्ही थोडीशीच मंडळी आश्रमात रात्रीच्या वेळी परत आलो; त्या वेळी गांधीजी शांतपणे बसलेले व पत्रव्यवहार पाहण्यात गढून गेलेले होते.

मी पाच वाजता पहाटे उठलो: तरी साधारण रात्रच होती. खेड्यातील जीवनाला हळूहळू सुरुवात झाली होती; प्रथम आश्रमाच्या दाराजवळून एक बैलगाडी निघाली. नंतर एक शेतकरी डोक्यावर एक भले मोठे बोचके सावरीत सावरीत निघाला. सकाळचा नास्ता झाल्यावर आम्ही त्रिवर्ग गांधीजींचा निरोप घेण्याकरिता त्यांना भेटलो, महात्माजी पहाटे चार वाजताच सकाळच्या प्रार्थनेकरिता उठत असत.

"महात्माजी, आता आम्ही निघालो!" त्यांच्या पायांना स्पर्श करण्याकरिता मी खाली वाकलो. "भारताचे भवितव्य आपल्या हातांत सुरक्षित आहे."

वर्ध्याची आमची ही सहल झाल्याला बरीच वर्षे लोटली. ही पृथ्वी, हे महासागर आणि हे आकाश या सर्वांना युद्धाच्या रणधुमाळीने काळोखी आलेली आहे. सर्व महान नेत्यांमध्ये गांधी हे एकच नेते असे आहेत की, ज्यांनी सशस्त्र शक्तीपुढे अहिंसेच्या उपयोगाचा पर्याय सुचविलेला आहे. दुःखनिवारण करण्याकरिता व अन्यायाचे निर्मूलन करण्याकरिता

महात्माजींनी अनेक वेळा अहिंसेच्या साधनांचा उपयोग करून त्यांची उपयुक्तता सिद्ध केलेली आहे. ते आपले तत्त्व, सिद्धांत खालील शब्दांत वर्णन करतात:

"विनाशामध्ये सुद्धा जीवन टिकून राहिलेले आहे असे मी पाहिलेले आहे. यावरून विनाशापेक्षा सुद्धा अधिक प्रभावी असा वरच्या प्रतीचा नियम निसर्गामध्ये असला पाहिजे. आणि त्याच नियमाखाली समाजाने वागले पाहिजे; म्हराजेच त्या समाजामध्ये सुसंबद्धता येईल व जगणे सुसह्य होईल.

"तो नियम जर जीवनाचा नियम असेल, तर त्या नियमाचा उपयोग आपण आपल्या रोजच्या जीवनामध्ये केला पाहिजे. ज्या ज्या वेळी युद्धे होतात; प्रतिस्पर्ध्याबरोबर सामना करण्याचा प्रसंग येतो; तेव्हा आपण आपल्या शत्रूला प्रेमाने जिंकले पाहिजे. मला तर माझा स्वतःच्या आयुष्यात असे आढळून आले आहे की, विनाशाच्या नियमाच्या बजावणीपेक्षा प्रेमाच्याच निश्चित अशा सिद्धांताने जीवनात सफलता आलेली आहे.

"हिंदुस्थानासारख्मा व्यापक क्षेत्रात ह्या अहिंसेच्या सिद्धांताचे दार्शनिक प्रदर्शन घडून आलेले आहे. मी असे म्हणत नाही की, हिंदुस्थानच्या ३६ कोटी प्रजेने हा सिद्धांत आत्मसात केला आहे; पण मला असे म्हणावयाचे आहे की, दुसऱ्या कोणत्याही सिद्धांतापेक्षा हा सिद्धांत, कल्पना करता येणार नाही, इतक्या अल्पावधीत त्यांच्या मनामध्ये खोलवर रुजला आहे.

"अहिंसेला पोषक अशी मनाची बैठक तयार करण्यासाठी अतिशय कडक अशा शिस्तीची जरुरी आहे. तो एक शिस्तबद्ध जीवनक्रम आहे; सैनिकाच्या जीवनासारखा. जेव्हा काया, वाचा व मन ह्यांची एकवाक्यता होते, तेव्हा पूर्णावस्था प्राप्त होते. जीवनामध्ये आपण सत्य आणि अहिंसा यांच्या व्रतांचे यथायोग्य पालन केल्यास प्रत्येक अडचणीतून बाहेर पडण्यास मार्ग सुचतो."

जगातील राजकीय घटनांची दारुण आगेकूच अचूकपणे हेच सत्य दर्शविते की, आध्यात्मिक दृष्टी आणल्याखेरीज लोकांस तरणोपाय नाही; त्याखेरीज त्यांचा विनाश हा ठरलेलाच आहे. धर्मसमजुतीने जरी नाही तरी भौतिक शास्त्रांनी, त्यांच्या विकासामुळे मानवामध्ये एक प्रकारची असुरक्षिततेची भीती निर्माण केली आहे आणि त्यांना सर्व ऐहिक वस्तूंच्या अशाश्वतेची कल्पना आणून दिली आहे. आता मानवाला आपल्या मूळ उगमस्थानाला जरी जाता येण्यासारखे नसले, तरी अंतर्यामीच्या सनातन तत्त्वाचा त्याला जरूर शोध घेता येण्यासारखा आहे.

इतिहासाकडे नजर फेकली असता, आपणांस असे वाजवी रीतीने सांगता येईल की, मानवाच्या समस्या पाशवी शक्तीच्या उपयोगाने सुटलेल्या नाहीत. पहिल्या महायुद्धाने भयानक कर्माचा एक थंडगार गोळा, सर्व जगाला गारठून टाकणारा असा, सोडून दिला, तोच पुढे फुगून त्यातून दुसरे महायुद्ध निर्माण झाले. हा जो सध्याचा रक्तलांच्छित अजस्र बर्फाचा गोळा निर्माण झालेला आहे, तो फक्त बंधुभावाच्या उष्णतेनेच वितळू शकेल; नाहीपेक्षा त्याचे पर्यवसान तिसऱ्या महायुद्धात होईल. काय हे विसाव्या शतकातील अशुभ त्रिकूट! तंटे मिटविण्याच्या कामी न्याय व विवेकबुद्धी यांचा उपयोग न करता जर जंगली विचारसरणीचा उपयोग केला गेला, तर ह्या जगाला एका जंगलाचे स्वरूप प्राप्त होईल. माणसे जीवनात

जरी भावाभावांसारखी वागली नसली, तरी भयानक अशा मृत्यूच्या दारी ती भाऊ भाऊ म्हणूनच एकमेकांच्या अंगाखांद्यावर बिलगलेली अशी मृत्युमुखी पडतील. अशा तऱ्हेची आपत्ती ओढवण्यासाठी, अणुशक्तीचा शोध लावण्यास परमेश्वराने, आपल्या मायेच्या पोटी, मनुष्यास अशा प्रकारची परवानगी नक्की दिली नसावी!

लढाई आणि गुन्हेगारी ह्यांमुळे कोणाचाच फायदा होत नाही; अब्जावधी डॉलर अणुबॉम्ब व स्फोटक द्रव्यो निर्माण करण्यात खर्च होऊन त्यांची राखरांगोळी झाली. त्यांचा जर बरोबर उपयोग केला असता, तर एक नवीन जग निर्माण झाले असते; एक नवीन जग असे की, त्यात रोगराईस स्थान नसते व ते दैन्य किंवा दारिद्र्य यांपासून पूर्ण मुक्त ठेवता आले असते; त्या जगात भीतीचे, अराजकतेचे, दुष्काळाचे, रोगराईचे आणि भोगविलासांचे यत्किंचितही अस्तित्व दिसून आले नसते. आणि त्याऐवजी तेथे शांतता, समृद्धी आणि नेहमी विकास पावत जाणारे ज्ञान यांचेच साम्राज्य झाले असते."

गांधीजींचा अहिंसेचा संदेश माणसाच्या अत्युच्च विवेकबुद्धीस आवाहन करतो. जगातील राष्ट्रांनी एकमेकांशी दोस्ती प्रतिपक्षीय राष्ट्रांना ठेचून टाकण्याकरिता करू नये, तर जीवन समृद्ध करण्याकरिता त्यांनी एकमेकांशी दोस्ती करावी. विनाशाकरिता नव्हे तर नवनिर्मितीकरिता; द्वेष, मत्सर याकरिता नव्हे, तर प्रेम व सुहृद्भाव यांचे विधायक चमत्कार घडवून आणण्याकरिता करावी.

महाभारतात एके ठिकाणी म्हटलेले आहे की, कोणत्याही तऱ्हेची हानी झाली तरी माणसाने क्षमाशीलता सोडू नये. ही जी मानवजात आजच्या घटकेला टिकून राहिलेली आहे ती त्याच्या क्षमाशील वृत्तीमुळे, क्षमाशीलता हे एक पावित्र्य आहे; शुचिता आहे; क्षमाशीलतेमुळे हे विश्व अधिक जवळ आणले जाते; क्षमाशीलता हे समर्थांचे सामर्थ्य आहे; क्षमाशीलता हा एक त्याग आहे; ती एक मनःशांती आहे. क्षमा आणि नम्रता ही आत्मसंयमी माणसाची लक्षणे आहेत. सनातन सद्‌गुणांचे ते प्रतीक आहे."

अहिंसा हा क्षमा आणि प्रेम यांच्या व्रतांचा पालन करण्याचा नैसर्गिक परिणाम आहे. गांधीजी ठासून सांगतात की, "धर्माकरिता, धर्मयुद्धाकरिता प्राण अर्पण करणे जरूरच झाले, तर माणसाने येशू ख्रिस्तासारखा स्वतःचा प्राण अर्पण करावा; दुसऱ्यांचा घेऊ नये. अशा तऱ्हेने या जगतात कमी रक्तपात होईल."

हिंदी सत्याग्रह्यांच्यावर—ज्यांनी द्वेषाचे उत्तर प्रेमाने दिले आहे, हिंसेचा सामना अहिंसेने केला आहे, आणि शस्त्र उचलण्याच्या ऐवजी स्वतःची कत्तल होऊ दिली आहे—त्यांच्यावर कधीतरी महाकाव्ये रचली जातील. काही ऐतिहासिक प्रसंग असे घडून आले आहेत की, शत्रुंनी आपली हत्यारे खाली टाकून पलायन केले आहे; लाज वाटून, ज्यांना स्वतःच्या प्राणांपेक्षा दुसऱ्यांच्या प्राणांची किंमत अधिक आहे अशा महात्म्यांच्या केवळ दर्शनाने त्यांच्यामधली सत्प्रवृत्ती हेलावून गेली व त्यांची त्यांनाच लाज वाटू लागली.


गांधीजी म्हणतात, "तशी जरूरच असेल तर, माझ्या देशाला स्वातंत्र्य मिळविण्याकरिता रक्तपात करावाच लागत असेल तर, मी युगेन युगे वाट पाहीन." बायबलमध्ये धोक्याची

सूचना दिली आहे: “जे जे हातात तलवार घेतात ते तलवारीनेच नाश पावतात.” [14] महात्माजींनी म्हटलेले आहे:

“मी स्वतःला राष्ट्रीय प्रवृत्तीचा म्हणतो, पण माझा राष्ट्रवाद हा विश्वव्यापी आहे. माझ्या राष्ट्रवादाच्या कक्षेत जगातील [15] सारी राष्ट्रे सामावली जातात. दुसऱ्या राष्ट्रांच्या राखरांगोळीवर भारताची उभारणी मला नको आहे. हिंदुस्थानने कोणाही एकासुद्धा इसमाला लुबाडता कामा नये. हिंदुस्थानने सामर्थ्यवान माझ्या दृष्टीने अशाकरिता व्हावयास पाहिजे की, त्याने आपल्या केवळ सामर्थ्याने दुसऱ्या राष्ट्रांस जरबेत ठेवावे. युरोपमधले आजचे कोणतेही राष्ट्र या कसोटीस उतरत नाही. ती राष्ट्रे दुसऱ्या राष्ट्रांना बलवान करू शकत नाहीत.

“प्रेसिडेंट विल्सन यांनी आपले चौदा मुद्दे फार सुंदरपणे पुढे मांडले; पण ते म्हणाले, ‘आणि शांतता प्रस्थापित करण्याकरिता आमचा हा प्रयत्न जर फसला तर आमची शस्त्रे मुकाबला करावयास आहेतच.’ मी ही भाषा उलटी करू इच्छितो, मी म्हणेन; ‘आमची शस्त्रास्त्रे आता कुचकामाची झाली आहेत; आता आपण नवीन साधनाच्या शोधात राहू या; प्रेमाच्या सामर्थ्याचा आपण उपयोग करू या; तसेच सत्यस्वरूप जो परमेश्वर त्यालाही आपण स्मरू या.’ ह्या जर गोष्टी आपणांस मिळाल्या तर आपल्याला दुसऱ्या कशाचीही जरुरी नाही.”

**महात्मा गांधीचे हिंदीतील हस्ताक्षर**



महात्मा गांधींनी योगदा सत्संग ब्रह्मचर्य विद्यालयाला भेट दिली होती. अतिथींच्या नोंदवहीमध्ये त्यांनी दयाशीलपणे वरील ओळी लिहिल्या आहेत. ते लिहितात:

“ह्या संस्थेचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला आहे. ह्या विद्यालयाबद्दल मी उच्च आशा बाळगतो की हे चरख्याच्या वापरास अधिक प्रोत्साहन देईल.”

सप्टेंबर १७, १९२५ (सही) मोहनदास गांधी

महात्माजींनी अशा तऱ्हेचे हजारो सत्याग्रही तयार केलेले आहेत. (सत्याग्रही म्हणजे ह्या प्रकरणाच्या सुरुवातीला दर्शविल्याप्रमाणे अकरा कडक व्रते पाळण्याची ज्यांनी शपथ घेतलेली आहेत ते.) हे सत्याग्रही त्या संदेशाचा प्रचार करत आहेत; हिंदुस्थानातील सर्वसाधारण जनतेला त्यांच्या तत्त्वज्ञानाचा परिचय करून देतील; अहिंसेचे आध्यात्मिक व तदनुषंगाने परिणामी भौतिकही फायदे काय आहेत हे त्यांना समजावून देतील; तसेच लोकांना अहिंसेच्या हत्याराने शस्त्रधारी करून, त्यांना युद्धप्रवृत्त करतील. ही शस्त्रे

म्हणजे अन्यायाशी असहकार आणि कोणत्याही तऱ्हेचा अपमान सहन करण्याची तयारी; तुरुंगवास पत्करण्याची किंबहुना प्रसंगी मरण पत्करण्याची तयारी; पण स्वतःहून हाती शस्त्र न धरणे. अशा शस्त्रास्त्रांनी संग्राम केल्यावर, असंख्य सत्याग्रही हुतात्म्यांची निर्मिती केल्यावर जगाची सहानुभूती आपल्याकडे वळवून संग्राम जिंकणे. गांधीजींनी लढाई प्रत्यक्ष करण्याचे टाळून मतभेदाचे प्रसंग मिटवून टाकणाऱ्या अहिंसेचे दिव्य सामर्थ्य कसे आहे, हे मोठ्या नाट्यपूर्ण पद्धतीने वर्णन केलेले आहे.

अहिंसेच्या मार्गाने जाऊन गांधीजींनी आपल्या देशाकरिता पुष्कळ राजकीय सवलती मिळविल्या आहेत. तशा सवलती इतर देशांतील कोणत्याही दुसऱ्या पुढाऱ्याने बंदुकीच्या उपयोगा शिवाय मिळविल्या नाहीत. अहिंसामार्गाचा उपयोग हा केवळ राजकीय क्षेत्रामध्येच अगदी डोळ्यांत भरण्यासारखा असा केलेला नसून हिंदुस्थानात समाजसुधारणेसारख्या नाजूक आणि गुंतागुंतीच्या क्षेत्रातही त्यांनी केलेला आहे. गांधीजी व त्यांचे अनुयायी ह्यांनी हिंदू व मुसलमान ह्यांमधील पूर्वापार चालत आलेले वैमनस्य पुष्कळ अंशाने कमी केलेले आहे. लाखो मुसलमान लोक महात्माजींकडे आपला पुढारी म्हणून पाहतात. अस्पृश्य जातींना तर ते आपले न भिणारे असे यशस्वी वाली वाटतात. गांधी लिहितात, “माझ्याकरिता जर आणखी जन्म लिहून ठेवला असेल तर अतिशूद्रांमध्ये अतिशूद्र म्हणून मला जन्म यावा; कारण त्यामुळे मला त्यांची अधिक प्रभावी सेवा करता येईल.”

महात्माजी खरोखरीच एक ‘महान आत्मा’ आहेत. पण ही पदवी त्यांना कोट्यवधी अशा अशिक्षित लोकांच्या पारखी दृष्टीने दिली आहे. ह्या सौम्यशा महात्म्यास त्याच्या देशामध्ये फार मान दिला जातो. अगदी हलक्यातल्या हलक्या खेडूताने गांधीजींच्या आवाहनास पडसाद दिलेला आहे. मनुष्यमात्राच्या ठिकाणी उपजत वास करीत असलेल्या दिव्यत्वावर महात्माजींचा पूर्ण विश्वास आहे. मनुष्याकडून होणाऱ्या प्रमादांनी हा विश्वास कमी झालेला नाही. असे प्रमाद होणे, हे अपरिहार्य आहे असे ते मानतात. ते लिहितात, “प्रतिस्पर्ध्याने जरी तुम्हांला वीस वेळा खोटे पाडले, तरी खरा सत्याग्रही त्याच्यावर एकविसाव्या वेळी सुद्धा विश्वास ठेवील; कारण मनुष्यस्वभावावर पूर्ण विश्वास ठेवणे, हे त्याच्या सिद्धांताचे सार आहे.” 16

“महात्माजी, आपली गोष्ट वेगळी, अपवादात्मक आहे. जगाने आपल्यासारखेच वागावे अशी आपण अपेक्षा करु नये.” एकदा एकाने त्यांच्यावर अशी टीका केली.

त्यावर गांधींजींनी उत्तर दिले, “शरीरात सुधारणा करता येते, पण आत्म्याच्या सुप्त शक्तीस जागृत करणे केवळ अशक्य आहे अशी कल्पना करून आपण आपलीच फसवणूक करतो, ही गोष्ट चमत्कारिक आहे. मी सध्या असे दाखविण्याच्या प्रयत्नात आहे की, यांपैकी कोणतीही शक्ती मला प्राप्त झाली तरी शेवटी मी एक तुमच्यासारखाच दीनदुबळा मर्त्य मनुष्य आहे; आणि तसे पाहिले तर माझ्याजवळ असामान्य असे कधी नव्हतेच व आजही नाही. इतर सर्वसाधारण मर्त्य मनुष्याप्रमाणे मी एक सीधासाधा माणूसच आहे व माझ्या हातून त्याप्रमाणे चुका होतात; परंतु चुका कबूल करण्याची विनयशीलता माझ्या ठिकाणी भरपूर आहे आणि त्या चुका दुरुस्त करण्याची माझी तयारी आहे. मी हे कबूल करतो की,

ईश्वरावरती व त्याच्या चांगुलपणावरती माझी अढळ श्रद्धा आहे. आणि सत्य व प्रेम ह्यांविषयी माझ्या अंतर्यामी निखालस असा अनुराग आहे; पण अशा तऱ्हेची श्रद्धा आणि अनुराग प्रत्येकाच्या ठिकाणी सुप्तपणे वास करीत असत नाही काय?" ते पुढे म्हणाले, "जरी आपण नवीन नवीन शोध लावले आणि योजना आखल्या, तरी त्याचा अर्थ असा होतो काय, की, आपण आध्यात्मिक क्षेत्रामध्ये दिवाळे काढावे? अपवादात्मक गोष्टी वाढविता वाढविता त्याचा नियमच असा बनविणे ही गोष्ट अशक्य आहे काय? मनुष्याने प्रथम पशुसारखे वागावयास सुरुवात करून नंतर माणसासारखे वागावे आणि हे सुद्धा शक्य झाले तर—असा त्याचा अर्थ आहे काय?" [17]

विलियम पेन याने, पेन्सिल्व्हानियामध्ये आपली सतराव्या शतकातील वसाहत स्थापन करण्याचे कामी जो अहिंसा तत्त्वाचा यशस्वीपणे प्रयोग केला त्याचे अमेरिकन लोकांनी अभिमानपूर्वक स्मरण करावे. त्या वेळी "काही किल्ले नव्हते, की शिपाई नव्हते, की फौज नव्हती की काही हत्यारे नव्हती." रेड इंडियन्स आणि नवीन वसाहतवाले यांच्यामध्ये चाललेल्या त्या सरहद्दीवरील भीषण लढायांत व कत्तलींत पेन्सिल्व्हानियाच्या क्वेकर्सनाच काही झळ लागली नाही. इतर लढाईत मारले गेले. काहींच्या कत्तली झाल्या. पण ह्यांना काही त्रास झाला नाही. "एकाही क्वेकर स्त्रीवर हल्ला झाला नाही; एकही क्वेकर मूल मारले गेले नाही की एकाही क्वेकर इसमाला शारीरिक यातना सहन कराव्या लागल्या नाहीत." जेव्हा क्वेकर्सना आपली सत्ता सोडून देण्यास भाग पडले तेव्हा "लढाईचा प्रसंग आला; व तीन क्वेकर मारले गेले. पण हे तिघे असे होते की, त्यांनी अहिंसा तत्त्वाचा त्याग करून हातांत बचावाकरिता हत्यारे घेतली होती."

फ्रँकलिन डी रूझवेल्ट यांनी असे नमूद केले आहे की, "पहिल्या महायुद्धामध्ये पाशवी शक्तीचा अवलंब केल्याने शांतता प्रस्थापित झाली नाही. जय आणि पराजय ह्या दोन्हींमधूनही काही निष्पन्न झाले नाही. हा धडा साऱ्या जगाने घ्यावयास पाहिजे होता."

लाओ-त्सूची शिकवण अशी असे, "हिंसेची साधने, हत्यारे जितकी जास्त तितक्या मनुष्यमात्राला यातना, दुःख जास्त. हिंसेच्या विजयोत्सवाचे पर्यवसान शेवटी शोकमहोत्सवातच होते."

गांधीजींची घोषणा अशी आहे, "विश्वात शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी हा माझा सारा झगडा आहे. हिंदुस्थानातील ही स्वराज्याची चळवळ अहिंसापूर्ण अशा सत्याग्रहाच्या भूमिकेवर यशस्वी झाली तर देशभक्ती या शब्दाला एक निराळा अर्थ येईल. एवढेच नव्हे तर मी असे म्हणेन की, प्रत्यक्ष जीवनाला सुद्धा एक नवीन अर्थ येईल."

गांधींच्या कार्यक्रमास एका स्वप्नाळू माणसाचा अव्यावहारिक कार्यक्रम समजून तो रद्दबातल करून टाकण्यापूर्वी पाश्चिमात्यांनी त्या गैलिलीच्या प्रभूची सत्याग्रहाची व्याख्या विचारात घ्यावी:

"तुम्ही असे म्हटलेले ऐकिले आहे की, हिंसेचा प्रतिकार हिंसेने करावा. डोळा फोडला तर तो फोडणाऱ्याचा डोळा फोडावा; दात उपटला तर त्याचा दात उपटावा; पण मी म्हणतो,

हिंसेचा, जुलमाचा प्रतिकार, हिंसेने (जुलमाने) करू नका; एवढेच काय पण, जर एखाद्याने तुमच्या उजव्या गालावर चपराक मारली, तर त्याच्यापुढे डावा गाल करावा." [18]

गांधींच्या काळातच नव्हे, शतकातच अगोदरच दोन सर्वसंहारक व भीषण जागतिक महायुद्धे झाली. दोन्ही महायुद्धे विश्वघटनांच्या एका अजब व सुबक अशा वेळापत्रकाप्रमाणे घडून आलेली आहेत. त्यांच्या जीवनाच्या शिलालेखात त्यांच्याच शब्दांत त्यांचा दिव्य संदेश खोदलेला आहे. भावाभावांमध्ये पुन्हा रक्तपात होऊ नये म्हणून ही जणू धोक्याची सूचना आहे.

[1] ह्या मूळ संस्कृत शब्दाचा शब्दशः अर्थ "सत्याचा आग्रह धरणे." सत्याग्रह ही गांधींनी चालविलेली प्रसिद्ध अहिंसात्मक चळवळ.

[2] महात्माजींनी त्यांना लिहिलेली अनेक पत्रे त्यांनी आता प्रसिद्ध केली आहेत. त्या पत्रांतील मजकुरावरून त्यांच्या गुरूंनी त्यांना आत्मसंयमनाच्या बाबतीत कसे तयार केले होते, हे स्पष्ट दिसून येते. ('गांधींची आपल्या एका शिष्यास पत्रे', न्यूयॉर्क हार्पर अँड ब्रदर्स, १९५०).

आपल्या पुढील एका पुस्तकात ('दि स्पिरिट्स पिलग्रिमेज,' कॉवर्ड मैक कॅन, १९६०) मिस स्लेड यांनी वर्ध्यास गांधीजींना भेटण्यास अनेक माणसे येत त्याबद्दल लिहिलेले आहे. त्या लिहितात, "आता बरीच वर्षे झाली, मला सगळे काही आठवत नाही. पण दोन व्यक्तींचे अगदी चांगले स्मरण आहे. एक म्हराजे टर्कीतील सुप्रसिद्ध महिला लेखिका हलीद एदिब हातूम व दुसरी म्हणजे अमेरिकेच्या सेल्फ-रिअलाईझेशनचे संस्थापक स्वामी योगानंद." (प्रकाशकांची टीप)

[3] मिस स्लेड यांनी मला आणखी एका प्रसिद्ध पाश्चात्य महिलेचे स्मरण करून दिले. ती म्हणजे, अमेरिकेचे महान राष्ट्राध्यक्ष यांची सर्वांत थोरली मुलगी, मिस मार्गारेट वूड्रो विल्सन. त्यांची-माझी न्यूयॉर्कमध्ये भेट झाली होती. त्यांना हिंदुस्थानबद्दल फार कळकळ वाटे. त्या नंतर पुढे पांडिचेरीला गेल्या आणि तेथेच त्यांनी आपल्या आयुष्याची शेवटची पाच वर्षे श्रीअरविंद घोष यांच्या पायाशी नियमबद्ध जीवन व्यतीत करण्यात आनंदाने घालविली.

[4] पुष्कळ वर्षे अमेरिकेत असताना मी मधूनमधून मौन पाळलेले आहे. त्याची माझ्याकडे येणाऱ्या लोकांना व माझ्या चिटणिसांना मोठी भीती वाटायची.

[5] निरुपद्रविता; अहिंसा. गांधींच्या तत्त्वज्ञानाच्या पायाचा दगड. गांधींच्या मनोवृत्तीवर जैन धर्माचा पुष्कळ प्रभाव पडला होता. जैन अहिंसेस मूलधर्म मानतात. जैन धर्म हा हिंदू धर्मातीलच एक पंथ आहे. ह्या धर्माचा प्रसार महावीराने ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात फार मोठ्या प्रमाणात केला. महावीर हे बुद्धाचे समकालीन होते. महावीर म्हणजे 'मोठा वीर.' कित्येक शतकांनी जन्मास आलेल्या आपल्या ह्या वीर पुत्र, गांधीजींच्याकडे तो कृपादृष्टीने पाहो!

[6] गांधीजींनी हजारो विषयांवर सुंदर लिखाण केले आहे. प्रार्थना विषयी त्यांनी म्हण्टले आहे: "प्रार्थना आम्हाला आठवण करुन देते कि ईश्वराच्या मदती शिवाय आम्ही असहाय्य आहोत. प्रार्थने खेरीज, ह्या स्पष्ट जाणीवे शिवाय कोणतेच परिश्रम पूर्ण नाही कि परमेश्वराच्या आशीर्वादाचा पाठिंबा असल्या शिवाय सर्वोत्तम मानवी प्रयत्न सुद्धा परिणामकारक होत नाही. प्रार्थना विनम्रतेला जागृत करते. प्रार्थना आत्मशुद्धि व आत्मशोध करते."

अशा तऱ्हेने भूतयज्ञ हा दीनदुबळ्या प्राण्यांना मदत करण्याच्या माणसाच्या प्रवृत्तीस उत्तेजन देतो. का की त्याच पद्धतीने उच्च कोटीतील अदृश्य जीव, माणसास अनेक प्रकारे तशीच मदत करीत असतात. मनुष्याला पृथ्वी, समुद्र आणि आकाश यांपासून ज्या असंख्य वस्तूंचा लाभ घडून येतो, त्यांसाठी तो त्यांच्या ऋणी आहे. निसर्ग, पशुप्राणी, मनुष्य व इतर पारलौकिक मृतात्मे यांच्यामध्ये, कमीअधिक उत्क्रांतावस्थेमुळे, संवादहीनतेचे जे अडसर पडलेले असतात ते असे निःशब्द प्रेमाचे नित्य यज्ञ अर्पण केल्याने थोडेसे बाजूला सारले जातात.

[7] गांधींनी आपले जीवनचरित्र अगदी थरारून टाकणाऱ्या स्पष्टतेने लिहिलेले आहे. त्यांच्या जीवनचरित्राचे नाव "माझे सत्याचे प्रयोग" असे आहे. (अहमदाबाद: नवजीवन प्रेस)

पुष्कळशा आत्मचरित्रांमध्ये प्रसिद्ध व्यक्तींच्या नावांची व मनोरंजक वर्णनांची रेलचेल असते. पण त्यांमध्ये लेखकाच्या मनाच्या व आंतरिक जीवनाच्या विकासाचे बिलकुल वर्णन नसते. आणि त्यामुळे ही पुस्तके वाचल्यावर वाचकाचे तितकेसे समाधान होत नाही. वाचक असे म्हणतो, "हा ग्रंथकर्ता असा आहे की, त्याची अनेक विख्यात पुरुषांशी ओळख आहे; पण स्वतःची मात्र त्याने कधीही ओळख करून घेतलेली नाही." अशा तऱ्हेची प्रतिक्रिया गांधीजींच्या आत्मचरित्राच्या वाचनाने होत नाही. आपले दोष व ते घालविण्याकरिता आपण काय प्रयत्न केले याचे वर्णन ते इतके प्रामाणिकपणे व सत्याची कास

धरून व्यक्तिनिरपेक्ष पद्धतीने करतात की तशी प्रामाणिकता व सत्यप्रियता कोणत्याही काळाच्या पुस्तकात सहसा आढळून येत नाही.

8 गांधीनी लहान-मोठी अशी पुष्कळ उपोषणे केली आहेत. त्यांची शरीरप्रकृती फारच चांगली आहे. 'खोराक अने खोराकनो सुधारो,' 'कुदरती उपचार अने तंदुरुस्तीनी चावी.' (किल्ली आरोग्याची) ही त्यांची पुस्तके नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद यांच्याकडे मिळतात.

9 थोरी, रस्किन आणि मॅझिनी हे ते तीन दुसरे पाश्चिमात्य लेखक की ज्यांचे समाजशास्त्रविषयक विचार गांधींनी काळजीपूर्वक अभ्यासिलेले आहेत.

10 झरतुष्ट्र याने हा पवित्र धर्मग्रंथ इ. स. पूर्व १०००. या काळात इराणला दिला.

11 जगातील सर्व धर्मांपेक्षा हिंदू धर्माचे एक वैशिष्टच असे आहे की, तो कोण्या एका मोठ्या संस्थापकाने स्थापन केलेला नसून अपौरुषेय अशा वेदग्रंथांतून प्रतिपादिलेला आहे. आणि त्यामुळे जगातल्या सर्व काळांतील आणि सर्व देशांतील प्रेषितांची पूजा, आदरभाव त्यात अंतर्भूत होतो. वैदिक ग्रंथ केवळ भक्तिपर साधनेची आचारप्रणाली नियंत्रित करीत नसून, सामाजिक चालीरीतींचे सुद्धा ते नियंत्रण करतात; हेतू हा की, मनुष्याची प्रत्येक कृती परमेश्वराच्या नीतिनियमानुसार व्हावी.

12 नियमांकरिता, कायद्याकरिता सर्व-अर्थ-पूर्ण असा संस्कृत शब्द; विधिनियमांचे पालन किंवा नैसर्गिक ऋजुता; परिस्थितीनुसार मनुष्यास एखाद्या विवक्षित वेळी करावे लागणारे कर्तव्य; धर्मग्रंथांनी धर्माची व्याख्या अशी दिली आहे. "अवमानित्व व यातना यांपासून स्वतःचा बचाव करण्याकरिता माणसाने पाळावयाचे निसर्गसिद्ध विश्वव्यापी नीतिनियम."

13 मॅथ्यू ७:२१ (बायबल).

14 मॅथ्यू २६:४२. बायबलमध्ये असे कित्येक उतारे आढळतात की, ज्यांच्यामध्ये पुनर्जन्माचे तत्त्व अभिप्रेत आहे. मानवी जीवनातील कितीएक गुंतागुंतीच्या समस्या न्यायावर आधारलेल्या ह्या पूर्वकर्माच्या सिद्धांताच्या समजूतीने सोडविता येतात. (या संदर्भात प्रकरण १६ पाहावे.)

15 "माणसाने, आपल्या देशावर मी प्रेम करतो, याचा अभिमान बाळगू नये. त्यापेक्षा त्याने, मी माझ्या मनुष्यजातीवर प्रेम करतो, याचा अभिमान बाळगावा"—एक फारसी म्हण.

16 "नंतर पीटर त्याच्याकडे आला आणि म्हणाला, प्रभो, माझ्या भावाने किती वेळा माझी कागाळी करावी व मी त्यास क्षमा करावी? सात वेळा! येशू त्यास म्हणाला, मी म्हणतो, सात वेळाच काय पण सत्तर गुणिले सात वेळा." मॅथ्यू १८:२१-२२. अशा तऱ्हेचा बुद्धीस न पटणारा सल्ला समजावून घेण्यास्तव मी परमेश्वराची फार उत्कटतेने प्रार्थना केली. मी विरोध दर्शवीत म्हणालो, प्रभो, असे वागता येईल काय? तेव्हा दिव्य वाणीने मला प्रतिसाद दिला, सर्व वस्तूंस नमविणारा असा एक प्रकाशाचा झोत आसमंतात पसरला:

"हे मनुष्या, तुमच्यापैकी प्रत्येकाला मी किती वेळा दररोज क्षमा करतो?"

17 प्रख्यात इलेक्ट्रिकल इंजिनिअर, चार्लस पी. स्टाइनमेट्झला एकदा श्री रॉजर डब्ल्यू. बॅबसन याने विचारले की, "पुढील पन्नास वर्षांत कुठल्या प्रकारच्या संशोधनाची सगळ्यांत जास्त वाढ होईल?" स्टाइनमेट्झ याने उत्तर दिले, "मला वाटते की, सगळ्यात मोठे संशोधन आध्यात्मिक मार्गात होईल. हा असा सामर्थ्यशाली मार्ग आहे की, ज्याच्याबद्दल इतिहास आपणास असे सांगतो की, मनुष्यजातीच्या विकासामध्ये ही सर्वांत मोठी शक्ती आहे. तरी पण ह्या मार्गाची आपण उपेक्षा करीत आहो आणि ज्या पद्धतीने, ज्या निष्ठेने आपण भौतिक शास्त्रांचा अभ्यास करतो, त्या मानाने ह्या मार्गाचा आपण कधीच अभ्यास केलेला नाही. एक दिवस असा येईल की, भौतिक सुखांनी आपल्याला खरेखुरे सुख मिळत नाही, असे लोकांना समजून येईल व समाजातील स्त्री व पुरुष यांना सामर्थ्यवान व क्रियाशील करण्याच्या कामी भौतिक सुखांचा काही एक उपयोग होत नाही, हे कळून चुकेल. आणि नंतर मग ह्या जगातले शास्त्रज्ञ आपल्या प्रयोगशाळा, आपले संशोधन, ईश्वरप्रार्थनेचे महत्त्व आणि अध्यात्मशक्ती अशा विषयांवर करू लागतील की, ज्या प्रांतामध्ये, ज्या बाजूकडे त्यांनी आतापर्यंत ढुंकूनही पाहिले नाही, त्या बाजूकडे त्या वळवाव्या लागतील. आणि असा जेव्हा सुदिन येईल तेव्हा जगाला असे आढळून येईल की, गेल्या चार पिढ्यांत जेवढा विकास घडून आला नाही त्याच्यापेक्षा जास्त विकास एका पिढीत घडून आला आहे."

18 मॅथ्यू ५:३८-३९ (बायबल).

# महात्मा गांधींच्या पवित्र स्मृतीस

"ते खरोखरीच शब्दार्थाने राष्ट्रपिता होते आणि एका वेड्या माणसाने त्यांची हत्या केली. कोट्यावधी लोक आज अश्रू गाळत आहेत. कारण ती ज्योत विझली आहे, तो प्रकाश निमाला आहे. .... जो प्रकाश आजवर ह्या देशावर प्रकाशत होता तो साधा प्रकाश नव्हता. तो प्रकाश अजून हजार वर्षे या देशात दिसत राहील आणि तो जगालाही दिसेल." वरील शब्द पं. नेहरू यांनी ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींचा दिल्लीत खून झाला त्या वेळी जे भाषण केले त्या भाषणातील आहेत.

पाचच महिन्यांपूर्वी हिंदुस्थानने शांततेच्या मार्गाने आपले राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविलेले होते. ७८ वर्षे वयाच्या गांधींचे कार्य झालेले होते. त्यांना कळून चुकले होते की, आपला अंत आता जवळ येत चालला आहे. ज्या दिवशी ही दुर्दैवी घटना घडून आली त्या दिवशी सकाळी ते आपल्या नातीला म्हणाले, "आभा, सगळे महत्त्वाचे कागद आणून ठेव; मला आज उत्तरे पाठविलीच पाहिजेत. उद्याचा दिवस कदाचित येणारही नाही." आपल्या लिखाणाच्या अनेक उताऱ्यांमध्ये गांधींनी आपल्या अंतिम भवितव्याचा निर्देश केलेला होता.

उपवासांनी आधीच जर्जर झालेल्या त्यांच्या कृश शरीरामध्ये तीन गोळ्या झाडल्या गेल्यावर मृत्युपंथाला लागलेले महात्माजी जमिनीवर हळुहळु पडू लागले तेव्हा त्यांनी आपले हात हिंदू परंपरेच्या पद्धतीप्रमाणे अभिवादन करण्याकरिता उचलले व मूकपणे मारणाऱ्याला क्षमा केली. आयुष्यातील साऱ्या कृती त्यांनी कलापूर्ण रीतीने केल्या आणि मरणाच्या ह्या अंतिम घटकेला सुद्धा त्यांनी आपण एक परमकोटीचे कलाभिज्ञ आहोत हे सिद्ध केले. सर्व आयुष्यभर त्यांनी जो आत्मत्याग केला त्यामुळेच त्यांना अशा तऱ्हेचा शेवटच्या क्षणाला सुद्धा प्रेमळ आविर्भाव करता आला.

महात्माजींना श्रद्धांजली अर्पण करताना आल्बर्ट आइनस्टाईन लिहितात, "कित्येक भावी पिढ्यांतील लोकांना कल्पना येणार नाही की, अशा तऱ्हेचा दिव्य पुरुष देह धारण करून ह्या भूतलावर होऊन गेला." रोमच्या पोपनी आपल्या संदेशात म्हटले, "महात्मा गांधींच्या खुनामुळे इकडे दुःखाची छाया पसरलेली आहे. ख्रिस्तीधर्मीय गुणांचे ते एक प्रतीक होते."

आपले काही एक नियोजित जीवनकार्य करण्याकरिताच पृथ्वीवर जन्म घेणाऱ्या, ह्या सगळ्या महापुरुषांच्या जीवनामध्ये काही एक सांकेतिक अर्थ भरलेला असतो. भारतामध्ये ऐक्यसाधनाच्या कार्याकरिता गांधीजींचा हा नाट्यपूर्ण अंत झाला; त्यामुळे त्यांचा संदेश—प्रत्येक खंडामध्ये बेदिली माजून गेलेल्या व शतधा विदीर्ण झालेल्या ह्या जगाला दिलेला त्यांचा अहिंसेचा संदेश—अधिकच अर्थपूर्ण व परिणामकारक वाटतो. तो संदेश त्यांनी आपल्या भविष्यवाणीमध्ये खालील शब्दांत दिलेला आहे:

"ह्या जगामध्ये अहिंसेचे आगमन झालेले आहे आणि ती ह्या जगात टिकून राहणार आहे. ह्या जगामध्ये जो पुढे शांतीचा दिवस उजाडणार आहे, त्याची ही पहाट आहे."

## प्रकरण - ४५

# 45. बंगाली आनंदमयी मा

“तर निर्मलादेवीचे दर्शन घेतल्याखेरीज हिंदुस्थान सोडून जाऊ नये. त्यांचे पावित्र्य फार मोठे आहे. त्यांना सर्वत्र ‘आनंदमयी मा’ या नावाने ओळखतात.” माझी भाची, अमिया बोस ही माझ्याकडे आग्रहाने पाहात होती.

“जरूर! मला त्या संतमहिलेला भेटण्याची फार उत्सुकता आहे,” मी म्हणालो, “ईश्वरी साक्षात्काराच्या दृष्टीने त्यांनी फार उच्च अवस्था प्राप्त करून घेतलेली आहे, असे मी वाचलेले आहे. ‘ईस्ट-वेस्ट’ मध्ये त्यांच्यासंबंधी काही वर्षांपूर्वी एक लहानसा लेखही आला होता.”

अमिया सांगत होती, “मी त्यांना भेटून आलेली आहे. आमच्या लहानशा गावी, जमशेदपूरला त्या नुकत्याच येऊन गेल्या. एका शिष्याच्या विनंतीवरून आनंदमयी मा मरणोन्मुख अशा एका इसमाच्या घरी गेल्या. त्या त्याच्या बिछान्याजवळ उभ्या राहिल्या. त्यांनी आपला हात त्याच्या कपाळावर ठेवला आणि त्याची मरणकाळची घरघर थांबली. त्या इसमाचा रोग ताबडतोब नाहीसा झाला; आणि आपण दुखण्यातून उठल्याबद्दल त्याला फार आनंद वाटला आणि आश्चर्यही वाटले.”

त्यानंतर काही दिवसांनी मी असे ऐकिले की, आनंदमयी मा कलकत्त्याला भवानीपूर भागामध्ये एका भक्ताकडे राहात आहेत. श्री राईट आणि मी दोघे कलकत्त्यातील माझ्या वडिलांच्या घरातून ताबडतोब तिकडे निघालो. भवानीपूरमधील घराजवळ आमची फोर्डगाडी येताक्षणीच आम्हा दोघांना रस्त्र्यावर एक अपूर्व दृश्य दिसले.

आनंदमयी मा एका उघड्या मोटारीमध्ये उभ्या होत्या. जवळ शंभर एक शिष्य जमलेले होते. भक्तजनांना त्या आशीर्वाद देत होत्या. त्या तेथून जाण्याच्या तयारीत होत्या असे दिसत होते. श्री राईट यांनी फोर्डगाडी काही अंतरावर उभी केली व त्या शांत अशा जमावाकडे जाण्याकरिता आम्ही निघालो. त्या संतमहिलेने आमच्या दिशेने एक दृष्टिक्षेप टाकला. त्या आपल्या गाडीतून खाली उतरल्या व आमच्याकडे येऊ लागल्या.

“पिताजी, आपण आलात!” असे जिव्हाळ्याचे शब्द बंगालीत उच्चारून त्यांनी आपला हात माझ्या गळ्याभोवती टाकला आणि आपले डोके माझ्या खांद्यावर टेकले. श्री राईट यांना मी नुकतेच म्हणालो होतो की, माझी या संतमहिलेशी काही ओळख नाही; आणि स्वागताचे हे अपूर्व दृश्य पाहून त्यांना मोठी गंमतच वाटली. शंभर भक्तांचे डोळे आमच्यावर एकदम आश्चर्ययुक्त नजरेने, ते प्रेमळ दृश्य पाहून, खिळले.

त्या संतमहिला समाधीच्या उच्च अवस्थेत आहेत, हे मी ताबडतोब ओळखले. बाह्यतः त्यांनी जरी स्त्रीदेह धारण केला होता, तरी आपण एक अविनाशी आत्मा आहोत हे त्या जाणून होत्या; आणि त्या भूमिकेवरून परमेश्वराच्या दुसऱ्या एका भक्ताचे त्या स्वागत करीत होत्या. त्यांनी मला हात धरून आपल्या गाडीत नेले.

“आनंदमयी मा, माझ्यामुळे आपल्याला निघायला विलंब होत आहे,” मी विरोध दर्शविला.

“पिताजी, युगायुगानंतर मी आपल्याला ह्या आयुष्यामध्ये प्रथमच भेटत आहे! [1] इतक्यात जाऊ नका,” त्या म्हणाल्या.

आम्ही दोघे गाडीमध्ये पाठीमागील आसनांवर जाऊन बसलो. आनंदमयी मा लवकरच समाधीअवस्थेत गेल्या. त्यांचे सुंदर डोळे आकाशाकडे लागले; आणि अर्धोन्मीलित असे ते एकदम निश्चल झाले; म्हटले तर जवळ म्हटले तर दूर अशा स्वर्गाकडे त्यांचे डोळे लागलेले होते. भक्तमंडळी हलक्या आवाजात “आनंदमयी मा की जय!” असे म्हणत होती.

ईश्वरी साक्षात्कार झालेले पुष्कळ संत मी हिंदुस्थानात पाहिलेले आहेत; पण अशा तऱ्हेची उच्च कोटीला पोचलेली संतमहिला मी पाहिलेली नव्हती. त्यांची मृदू, सौम्य अशी मुद्रा एका दिव्य आनंदाने झळकत होती आणि म्हणूनच त्यांना आनंदमयी मा असे नाव प्राप्त झाले होते. डोक्यावर त्यांनी पदर घेतलेला नव्हता; व त्यांचे लांब काळेभोर केस पाठीवर तसेच रुळत होते. त्यांच्या कपाळावर रक्तचंदनाचा टिळा होता व त्यांचा आध्यात्मिक नेत्र सतत उन्मीलितच आहे असे दर्शवीत होता. त्यांची लहानशी मुद्रा, त्यांचे लहानसे हात, लहानसेच पाय, त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीने थिटे दिसत होते!


आनंदमयी मा समाधीत असताना जवळच्या एका शिष्यमहिलेला मी काही प्रश्न विचारले.

त्या शिष्यमहिलेने मला माहिती दिली, “आनंदमयी मा हिंदुस्थानात सगळीकडे जातात. पुष्कळशा ठिकाणी त्यांचे शेकडो शिष्य आहेत. त्यांच्या धाडसी प्रयत्नांनी, बऱ्याच इष्ट अशा सामाजिक सुधारणा घडवून आणल्या आहेत. स्वतः ब्राह्मण असून त्या जातिभेद मानत नाहीत. आम्ही काहीजण प्रवासात नेहमी त्यांच्याबरोबर असतो. त्यांना कमीजास्त काय लागेल ते पाहात असतो. आम्हांला त्यांची आईसारखी शुश्रूषा करावी लागते, कारण त्या स्वतः आपल्या शरीराकडे काही लक्ष देत नाहीत. त्यांना जर कोणी खायला दिले नाही तर त्या खातही नाहीत किंवा मागतही नाहीत. त्यांच्यापुढे जेवणाचे ताट वाढून जरी ठेवले, तरी त्याला त्या—स्पर्श सुद्धा करीत नाहीत. त्यांनी ह्या जगातून निसटून जाऊ नये म्हणून आम्ही भक्तमंडळी आपल्या हातांनी त्यांना भरवितो. कित्येक दिवस त्या समाधीअवस्थेतच बहुधा असतात. त्या वेळी त्यांचा श्वासोच्छ्वास सुद्धा चालतो न चालतो; डोळ्यांची उघडझाप सुद्धा होत नाही. त्यांचे प्रमुख शिष्य म्हणजे त्यांचे यजमान, भोलानाथ. पुष्कळ वर्षे झाली. लग्न झाल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांनी मौनव्रत स्वीकारले आहे.”

त्या शिष्यमहिलेने नंतर मला एक व्यक्ती दाखविली. त्या व्यक्तीचे खांदे चांगले रुंद, अवयव सुरेख होते. केस लांबलचक असून दाढी पिकलेली होती. त्या गर्दीत ती व्यक्ती अगदी शांतपणे उभी होती. आणि तिचे हात, शिष्य भक्तिभावाने जसे हात जोडतो, तसे जोडलेले होते.

अनंतत्वामध्ये बुडी मारून ताजेतवाने झाल्यावर आनंदमयी मा आता आपली जाणीव, आपले लक्ष ह्या पार्थिव जगाकडे केंद्रित करू लागल्या.

“पिताजी, तुम्ही सध्या कोठे राहात आहा हे मला सांगा.” त्यांचा आवाज स्पष्ट आणि मधुर होता.



*श्री योगानंद, आनंदमयी मा व त्यांचे पती भोलानाथ यांच्या समवेत, कोलकाता येथे, 1935*

"सध्या कलकत्त्यास किंवा रांचीत; पण लवकरच मी अमेरिकेस परत जाणार आहे."

"अमेरिका?"

"होय, अध्यात्ममार्गावर असणाऱ्या तेथील लोकांना एका भारतीय संतमहिलेबद्दल कौतुक वाटेल. आपल्याला जायला आवडेल काय?"

"जर पिताजींनी नेले तर जाईन."

ह्या उत्तराने त्यांच्या जवळच्या भक्तमंडळींत भीतीची छाया पसरली.

त्यांपैकी एकाने मला ठामपूर्वक सांगितले, "आमच्यापैकी वीस इसम किंवा त्याहूनही जास्त असे आनंदमयी मा बरोबर नेहमी प्रवासात असतो. आम्हांला त्यांच्याशिवाय राहता येत

नाही. जिकडे त्या जातात तिकडे आम्हांला जावे लागते."

नाखुशीने मी तो विचार सोडून दिला; कारण त्यांना न्यायचे म्हणून त्यांच्याबरोबरच पुष्कळांना न्यावे लागावयाचे; म्हणजे अडचणच!

"निदान आपल्या भक्तमंडळीबरोबर रांचीला या," त्यांचा निरोप घेताघेता मी म्हणालो, "परमेश्वराचे अर्भक म्हणून तुम्ही स्वतःला मानता तेव्हा शाळेमधील लहानग्यांची सोबत तुम्हांला फार आवडेल."

"जेव्हाही पिताजी मला नेतील तेव्हा मी आनंदाने जाईन."

त्यानंतर थोड्याच दिवसांनी त्या संतमहिला येणार म्हणून रांची विद्यालयात एकदम गडबड उडून गेली. मुलांनी त्या आता कोणत्याही दिवशी येतील म्हणून त्या उत्सवाची वाट पाहावयास सुरुवात केली. अभ्यास बंद होणार; तास न तास संगीत आणि सगळ्यांत वर कडी म्हणजे एक मोठे जेवण—मेजवानी!

"जय हो! आनंदमयी मा की जय!" संतमहिला आणि त्यांच्या बरोबरची मंडळी ही जेव्हा शाळेच्या दरवाजातून आत आली तेव्हा उत्साहपूर्ण छोट्याछोट्या कंठांतून मोठ्या संख्येने वरील तालस्वर निनादून उठला. झेंडूच्या फुलांचा नुसता वर्षाव झाला. झांजा जोरजोराने वाजू लागल्या. शंख फुंकले गेले; आणि मृदंगावर जोराचा ठेका बसू लागला! आनंदमयी मा यांनी त्या कोवळ्या उन्हात शाळेच्या मैदानावरून थोडासा फेरफटका मारला; त्यांची मुद्रा हसरी होती. त्या सदैव आपल्या हृदयात सहज वाहून नेणारा स्वर्गीय आनंद बाळगीत होत्या.

"इथे कसे सगळे छान आहे." आनंदमयी मांना मी मुख्य इमारतीत नेताना त्यांनी प्रशंसेचे उद्‌गार काढले. त्या माझ्या शेजारी बसल्या; त्यांच्या मुद्रेवर बालसदृश स्मित विराजत होते. अगदी जिवलग मित्रासारख्या असूनही त्यांच्याभोवती एक प्रकारच्या परकेपणाचे वलय दिसून येत होते; अशा तऱ्हेने त्यांच्यामध्ये सर्वव्यापकता असूनही तुटकपणाचाही विरोधाभास दिसून येत होता. "आपल्या जीवनचरित्राबद्दल मला काही सांगाल काय?"

"पिताजींना सगळे काही माहीत आहे; त्याची पुनरुक्ती कशाला?" एका जन्माच्या अल्पावधीत घडलेला इतिहास विशेष महत्त्वाचा नाही असे त्यांना उघडपणे वाटले.

मला हसू आले; तरीपण त्यांना तीच विनंती जरा सौम्य आवाजात मी केली. "पिताजी, सांगण्यासारखे थोडेच आहे." त्या सांगू लागल्या. आपले सुंदर हात त्यांनी नापसंती दर्शविण्याच्या हेतूने पुढे केले. "माझी जाणीव ह्या नश्वर देहाशी कधीच निगडित, संबद्ध झालेली नाही. पिताजी, ह्या जगात जन्मास येण्यापूर्वी 'मी' [2] तशीच होते,' लहान मुलगी असताना 'तशीच होते' पुढे बाई झाले तरी 'तशीच सहिले,' पुढे घरातल्या माणसांनी ह्या देहाचे लग्न करण्याचे ठरविले; तरी 'तशीच होते.'

"आणि पिताजी, आताही तुमच्यासमोर आहे तरी 'तशीच आहे;' आणि यापुढेही अनंततेच्या दालनात चालत असलेला माझ्याभोवतीचा हा सृष्टीचा नाच जरी बदलत राहिला तरीही मी 'तशीच राहीन.'"

आणि त्यानंतर मग आनंदमयींना गाढ अशी ध्यानाची अवस्था आली. त्यांचे शरीर अगदी पुतळ्यासारखे निश्चल झाले. त्या आपल्या राज्यात, जेथून नेहमी त्यांना बोलावणे येत असते

अशा राज्यात निघून गेल्या, त्यांच्या डोळ्यांच्या काळ्या खाचा निर्जीव काचेसारख्या दिसू लागल्या. जेव्हा संतलोक आपली जाणीव पार्थिव शरीरातून बाहेर काढून घेतात, तेव्हा त्यांचे डोळे असेच दिसतात. त्यांचे शरीर त्या वेळी एका निर्जीव अशा मातीच्या गोळ्यासारखे दिसू लागते. अशा तऱ्हेच्या समाधीअवस्थेमध्ये आम्ही साधारण एक तास तसेच बसलो. त्यानंतर त्या ह्या जगात परत आल्या. त्या वेळी त्यांच्या मुद्रेवर एक मृदु हास्य विराजत होते.

“आनंदमयी मा,” मी म्हणालो. “कृपाकरून माझ्याबरोबर बागेत येता का? मि. राईट यांना काही फोटो घ्यायचे आहेत.”

“पिताजी, जरूर, आपली इच्छा तीच माझी इच्छा.” ज्या वेळी श्री राईट त्यांचे फोटो घेत होते त्या वेळी त्यांच्या तेजस्वी नेत्रांत कधीही कमीजास्त न होणारे, असे दिव्य तेज चमकत होते.

नंतर जेवणाची वेळ झाली! आनंदमयी मा आसनावर मांडी घालून बसल्या; त्यांच्या हाताशी त्यांना खाऊ घालायला एक भक्त बसला. चेल्याने तोंडापर्यंत आणलेला घास त्या संतमहिलेने, एखाद्या लहान मुलासारखा, आज्ञाधारकपणे गिळून टाकला. आनंदमयी मांना आमटी, कढी व पक्वान्न यांमधील काही एक फरक समजत नव्हता, हे स्पष्ट दिसून येत होते!

संध्याकाळ झाल्यावर संतमहिला आपल्या मंडळींबरोबर जावयास निघाल्या; त्या वेळी त्यांच्यावर गुलाबांच्या पाकळ्यांचा वर्षाव केला गेला. लहान मुलांना आशीर्वाद देण्याकरिता त्यांनी हात वर उचलले त्यांनी सहज दाखविलेल्या ममतेमुळे मुलांचे चेहरे आनंदाने प्रफुल्लित झाले.

“प्रभूवर, तू तुझ्या परमेश्वरावर अंतःकरणपूर्वक, तुझ्या संपूर्ण आत्मशक्तीने, संपूर्ण मनाने आणि संपूर्ण ताकदीने प्रेम करावेस;” येशू ख्रिस्ताने उद्घोषून सांगितलेले आहे, ही माझी पहिली आज्ञा होय. [3]

हलक्या प्रतीची प्रत्येक प्रकारची माया, आसक्ती बाजूला सारून आनंदमयी मा परमेश्वराच्या ठिकाणी आपले सर्व लक्ष, सर्वेकनिष्ठा लावतात. त्या बालसदृश संतमहिलेने मानवी जीवनातल्या एकमेव समस्येचा—ईश्वरसायुज्यतेची समस्या सोडविण्याचा—मार्ग दाखवून दिला आहे. ती समस्या सोडवून दाखविताना त्यांनी पंडितांसारखा अर्थाचा अनर्थ किंवा अर्थाचे श्लेष किंवा अर्थाचे सूक्ष्म-छेदन केले नाही. त्यांनी फक्त श्रद्धापूर्ण असे निखालस तर्कशास्त्र वापरले. मनुष्यप्राणी साधे, सहज, सुलभ तत्त्व विसरून गेलेला आहे. त्याच्याऐवजी त्याने त्या सहज तत्त्वाला लाखो फाटे फोडलेले आहेत. ईश्वरासंबंधी एकनिष्ठपणे भक्तिभाव न दर्शविता लोकांनी आपली अश्रद्धा, नास्तिकता लपविण्याकरिता, दानधर्माचा, सगुणोपासनेचा, मूर्तिपूजेचा मार्ग अनुसरलेला आहे. ही परोपकाराची कृत्ये सदाचारावर आधारलेली आहेत हे खरे; कारण एक क्षणभर तरी का होईना, ती माणसाचे मन त्याच्या स्वतः कडून दुसरीकडे नेतात; पण आयुष्यात एकमेव असे जे त्याचे कर्तव्य आहे, त्या कर्तव्यातून ती परोपकाराची कृत्ये त्याची सुटका करू शकत नाहीत. माणसाचे एकमेव कर्तव्य म्हणजे येशू ख्रिस्ताने जी पहिली आज्ञा दिली आहे तिचे पालन. श्वासोच्छ्वास


करावयास परमेश्वराने मनुष्याला हवा फुकट दिली आहे. त्या हवेच्या पहिल्या श्वासाबरोबरच ईश्वरावर प्रेम करण्याचे पहिले उच्च कर्तव्य त्याने पार पाडावयास पाहिजे हे ओघानेच येते. 4

रांचीला भेट दिल्यानंतर आणखी एका प्रसंगी काही महिन्यांनी आनंदमयी मांच्या भेटीचा सुयोग मला आला होता. त्या वेळी त्या सेरामपूर स्टेशनवर आपल्या शिष्यांच्या मेळाव्यात, गाडीची वाट पाहात उभ्या होत्या.

“पिताजी, मी हिमालयात जायला निघाले आहे,” त्या मला सांगू लागल्या, “काही दयाशील मंडळींनी डेहराडूनमध्ये आमच्याकरिता एक आश्रम बांधला आहे.”

त्या गाडीत चढल्या, पण मला सारखे असे आश्चर्य वाटे की, समाजात असोत, की गाडीत प्रवास करीत असोत, जेवणखाण करीत असोत की शांतपणे बसलेल्या असोत, त्यांचे डोळे ईश्वरापासून कधी ढळलेच नाहीत. माझ्या हृदयात मला त्यांचा आवाज अजून ऐकू येतो; अमर्याद गोडव्याचा तो प्रतिध्वनीच होय.

“हे पाहा, आताच आणि सदैव परमात्मस्वरूपी विलीन अशी सदैव मी तशीच असत्ये.”



*परमहंस योगानंद आणि मंडळींची आग्र्याच्या "संगमरवरातील स्वप्न" - ताजमहालला भेट, 1936*

1 श्री श्री आनंदमयी यांचा जन्म १८९६ साली पूर्व बंगालमधील त्रिपुरा जिल्ह्यातील खेवरा नावाच्या गावांत झाला.

2 श्री श्री आनंदमयी मा स्वतःला 'मी' म्हणून कधी संबोधीत नाहीत. द्राविडी प्राणायाम घालून त्या स्वतःचा "हे शरीर" किंवा "ही छोटी मुलगी" किंवा "तुमची मुलगी" असा उल्लेख करतात. तसेच त्या कोणासही आपला शिष्य असे म्हणत नाहीत. व्यक्तिनिरपेक्ष सुज्ञतेने त्या सर्वांवर सारख्याच प्रमाणात विश्वजननीच्या दिव्य प्रेमाची पाखर करतात.

3 मार्क १२:३०.

4 "पुष्कळांना नवीन चांगले जग निर्माण करावेसे वाटते. अशा विषयांवर विचार करीत बसण्याऐवजी तू अशावर मन एकाग्र करावेस, की, जेणेकरून पूर्ण शांती निर्माण होईल. ईश्वराचा किंवा सत्याचा शोध घेत राहाणे, हे मनुष्याचे कर्तव्य आहे." आनंदमयी मा.

## प्रकरण - ४६

# 46. निराहारी योगिनी

“मास्टर, आज सकाळी आपल्याला कुठं निघायचेय?” श्री राईट फोर्डगाडी चालवीत होते. त्यांनी रस्त्र्यावरून आपली दृष्टी काढून माझ्याकडे बराच वेळ प्रश्नार्थक मुद्रेने लावली. बंगालमधील कोणत्या भागात रोज रोज कुठे कुठे जायचे आहे हे त्यांना कळत नसे.

मी भाविकपणे उत्तर दिले, “परमेश्वराच्या कृपेने जगातील आठवे आश्चर्य बघण्याच्या मार्गावर आज आपण आहोत. केवळ वायुभक्षण करून राहणाऱ्या एका संतमहिलेला भेटायला आपण जात आहोत!”

“थेरेसा नॉयमननंतर सारखे चमत्कारच पाहात आहोत.” पण श्री राईट तितक्याच उत्कंठेने असे म्हणून हसले. एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या गाडीचा वेगही वाढविला. आज हे त्यांच्या प्रवासरोजनिशीला नवीन अधिक चमत्कारिक खुसखुशीत खाद्य! साधारण प्रवाशाला क्वचितच मिळणारे!

रांची विद्यालय नुकतेच पाठीमागे टाकले आणि आम्ही पुढे निघालो सूर्योदय होण्यापूर्वीच आम्ही उठलो होतो. माझे चिटणीस व मी याखेरीज आणखी तीन बंगाली मित्र आमच्या तुकडीत होते. सकाळची उत्साहपूर्ण हवा आम्ही घेत होतो; सकाळचे ते मादक पेयच. आमचा ड्रायव्हर गाडी चालवीत होता. सकाळचे प्रहरी काही शेतकरी आपल्या बैलगाडीतून जात असताना आम्हांला भेटले. त्यांच्या गाडीला चांगले धष्टपुष्ट बैल जोडलेले होते. रस्त्र्यावरून जाण्याचा आमच्याप्रमाणे त्यांनाही हक्क होता हे ते जणू दर्शवीत होते.

“मास्टर, उपोषण करून राहणाऱ्या या संतमहिलेबद्दल आम्हांला आणखी काही माहिती सांगा ना.”

“त्यांचे नाव गिरिबाला.” माझ्या सोबत्यांना मी माहिती दिली. पुष्कळ वर्षांपूर्वी स्थितिलाल नंदी नावाच्या एका विद्वान माणसाकडून मी त्यांच्याविषयी ऐकिलेले आहे. गुरपाररोडवरच्या आमच्या घरी माझा भाऊ जो विष्णू त्याला शिकवायला ते पुष्कळदा येत असत.

स्थितिबाबूंनी मला सांगितले, “मी गिरिबालांना चांगले ओळखतो. काही एका विशिष्ट योगिक तंत्रासाधनेचा उपयोग करून, त्या अन्नग्रहणाशिवाय राहू शकतात. इच्छापूरजवळ [1] नवाबगंजमध्ये मी त्यांच्या शेजारालाच राहायला होतो. त्यांना अगदी जवळून मी पाहिलेले आहे. त्यांनी कधी अन्नग्रहण केलेले किंवा पाणी प्यालेले मी पाहिले नाही. असा पुरावा सुद्धा मला कधी मिळाला नाही. ह्याविषयी माझी उत्सुकता एवढी वाढली की, शेवटी मी बरद्वानच्या महाराजांना [2] जाऊन भेटलो व त्यांना याबाबत कसून चौकशी करण्यास विनविले. माझी हकीकत ऐकून ते आश्चर्यचकित झाले. त्यांनी तिला राजवाड्यात बोलाविले. तिने कसोटी देण्याचे कबूल केले व राजवाड्याच्या एका लहानशा दालनात त्या दोन महिने राहिल्या. नंतर परत त्या राजवाड्यात वीस दिवस राहिल्या आणि तिसऱ्या वेळी परत पंधरा दिवस राहिल्या.

महाराजांनी मला स्वतः सांगितले की, 'आम्ही अगदी कसून, डोळ्यात तेल घालून परीक्षा केली. त्या काहीएक खात नाहीत अशी आमची पूर्ण खात्री झाली आहे.'"

"पंचवीस वर्षे माझ्या मनात स्थितिबाबूंची ही हकीकत घोळत होती," मी शेवटी म्हणालो, "अमेरिकेत असताना कधीकधी मला अशी भीती वाटायची की, ह्या योगिनी कालरूपी नदीच्या प्रवाहात वाहून तर गेल्या नसतील ना! मला त्या पुनः कधी भेटतील की नाही याची मला नेहमी शंका वाटे. आता त्या वयस्कर झाल्या असतील. आता त्या सध्या हयात आहेत की नाहीत व असल्यास कुठे असतात हे काही माहिती नाही. पण थोड्याच तासांत आपण पुरुलियाला जाऊन पोहोचू. त्यांच्या भावाचे तेथे घर आहे."

साडेदहाच्या सुमाराला आम्ही तेथे जाऊन पोहोचलो व त्यांचे बंधू, लंबोदर दे, पुरुलियाला जे वकील आहेत, त्यांच्याकडे जाऊन आम्ही त्यांच्याशी बोलत बसलो.

"होय, माझी बहीण हयात आहे. ती कधीकधी माझ्याकडे येथे राहते. पण सध्या ती आमच्या जुन्या घरी बिऊरला आहे." लंबोदरबाबूंनी आमच्या फोर्डगाडीकडे जरा साशंक नजरेने पाहिले. "स्वामीजी, आतापर्यंत कोणतीही मोटारगाडी बिऊरसारख्या अगदी आतल्या भागात गेली आहे असे मला वाटत नाही. मला वाटते की तुम्ही सगळी मंडळी आपल्या जुन्या जमान्यातल्या बैलगाडीने गेलात तर ठीक होईल!"

आम्ही सर्व मंडळींनी एका आवाजाने आमच्या फोर्डगाडीबद्दल एकनिष्ठता दर्शविली.

मी वकीलसाहेबांना समजावून सांगू लागलो, "ही फोर्डगाडी आम्ही अमेरिकेहून आणली आहे; तर तिला बंगालच्या भूमीतील अगदी अंतरंगातून प्रवास करण्याची जी संधी मिळत आहे, ती संधी गमावणे म्हणजे केवढी शरमेची गोष्ट आहे!"

"तो गणपती [3] तुमचे रक्षण करो!" लंबोदरबाबू हसत हसत म्हणाले. नंतर ते विनयपूर्वक सांगू लागले, "जर आपण तेथे पोचलात तर माझी खात्री आहे गिरिबालांना तुम्हांला भेटल्यावर आनंद वाटेल. आता सत्तरी त्या लवकरच गाठतील; पण तशी त्यांची तब्येत चांगली आहे.

"पण बाबूजी, आम्हांला हे सांगा की, खरोखरच त्या कधी काही खात नाहीत?" मी त्यांच्या डोळ्यांकडे रोखून पाहिले, कारण डोळे म्हणजे मनाचे प्रतिबिंबच आहे.

"खरी आहे गोष्ट ती." त्यांची दृष्टी मनोभाव स्पष्ट दर्शविणारी व अभिमानसूचक होती. "गेल्या पन्नास वर्षांत मी त्यांना कधी एक घाससुद्धा खाताना पाहिले नाही. जर अचानकपणे जगावर प्रलय ओढवला व ते विनाश पावले तरी सुद्धा मला आश्चर्य वाटणार नाही, पण ह्यांनी अन्नग्रहण केले तर जरूर आश्चर्य वाटेल!"

ह्या दोन अलौकिक घटनांच्या असंभवनीयतेवरून आम्ही आपापसांत गालांतल्या गालांत हसू लागलो.

लंबोदरबाबू पुढे सांगू लागले, "गिरिबालांना आपल्या योगसाधनेकरिता, जिथे कोणी येऊ शकणार नाही अशा एकांतवासाची कधी जरूर लागली नाही. सबंध आयुष्यभर त्यांच्याभोवती घरातील माणसे आणि इतर मित्रमंडळी ही नेहमी आहेतच. त्या सगळ्यांना आता त्यांच्या ह्या विलक्षण जीवनक्रमाची सवय झालेली आहे. जर गिरिबालांनी एकदम

खायचे ठरविले तर त्यांपैकी प्रत्येकाला महदाश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाही. आमची बहीण एका हिंदू विधवा स्त्रीप्रमाणे समाजात विशेष मिसळत नाही. पण पुरुलियामधील आणि बिऊरमधील आम्हा सर्व मंडळींना पुरते माहीत आहे की त्या म्हणजे अगदी विलक्षण अशा बाई आहेत."



*गिरिबाला, निराहारी संत महिला*

भाऊ अगदी खरे बोलत होता हे उघड होते. आमच्या छोट्याशा कंपूने त्यांचे आभार मानले व आम्ही बिऊरला जाण्याकरिता निघालो. वाटेत आम्ही एका दुकानात थांबलो; तेथे आम्ही पुरी-भाजी घेतली. श्री राईट हे आपल्या साध्या हिंदू पद्धतीप्रमाणे. [4] हाताने जेवत होते. ते पाहण्याकरिता आमच्याभोवती मुलांचा घोळका जमला. आम्हाला कडकडून भूक लागली होती. दुपारी आम्हाला काही खावयास मिळेल की नाही याची शंकाच होती; आणि पुनः इकडेतिकडे शोध करण्यात आम्हाला त्रास पडणार होता.

आता आमचा रस्ता बंगालच्या बरद्वान भागातून जात होता दोन्ही बाजूंना सूर्याच्या उन्हाने न्हाऊन निघालेली शाल्योदनाची शेते डोळ्यांचे पारणे फेडीत होती. रस्त्र्याच्या दोन्ही बाजूंना गर्द झाडी होती. त्या वृक्षांच्या छत्रीसारख्या फांद्यांतून मैनेचा आवाज व पट्टेदार कंठाच्या बुलबुल पक्ष्यांचे संगीताचे सूर ऐकू येत होते. मधूनमधून एखादी बैलगाडी आपल्या चाकांच्या

आसांचा व लोखंडी धावांच्या लाकडी चाकांच्या 'रिनी रिनी मंजु मंजु' असा आवाज करीत जात होती. हा चाकांचा आवाज व शहरातील अस्फाल्टच्या खानदानी रस्त्र्यावरून रुळत जाणाऱ्या रबरी धावांचा 'स्वश स्विश' असा आवाज यामधला फरक चटकन ध्यानात येत होता.

"डिक, थांब," माझ्या आकस्मिक अनुरोधाचे आमच्या फोर्डगाडीने एका हिसक्याने प्रतिरोध केले. "आंब्याच्या फळांनी लवलेले हे झाड आपल्याला बोलावतेय."

झाडाखाली आंब्यांची नुसती रास पडली होती. ती उचलण्याकरिता आम्ही पाचीजण नुसते पोरांसारखे धावलो. फळे पिकल्यावर झाडाने त्यांचा खाली उदारहस्ताने सडा शिंपला होता.

मी भाष्य करू लागलो, "काही आम्रफळे पिकून कधीहि ध्यानी न येती जशी। वाया जात अशीच ती मधुरता भूमीवरी खालती।"

शैलेश मुजुमदार हसून म्हणाले, "स्वामीजी, असे काही अमेरिकेत नसेल ना!" शैलेश माझे एक बंगाली विद्यार्थी होते.

आंबे खाऊन तृप्त झाल्यावर मी म्हणालो, "कबूल, अमेरिकेत असा काही प्रकार नाही; मला अमेरिकेत या फळाची किती आठवण होई! हिंदू मनुष्याला आम्रविरहित स्वर्गाची कल्पना करवत नाही!"

मी एक मोठासा दगड उचलला व त्यांबरोबर पानांआड दडलेले अगदी वरच्या फांदीवरचे रसाळ आंबे खाली आले.

"डिक," उन्हाने गरम झालेल्या रसाळ आंब्यांचा अमृतसदृश रस चाखत असता, मी विचारले, "सगळे कॅमेरे गाडीत आहेत ना?"

"होय, पाठीमागे सामानात आहेत."

"गिरिबाला जर खरोखर संत असतील तर त्यांच्याबद्दल अमेरिकेत लिहिण्याचा माझा विचार आहे, अशा स्फूर्तिप्रद सिद्धी असलेल्या एका हिन्दु योगिनीला जीवनात आणि मरणोत्तरही ह्या बहुतेक आंब्यांप्रमाणे अपरिचित राहायला नको."

त्यानंतर आणखी अर्धा एक तास आम्ही त्या वनश्रीमध्ये भटकत होतो.

श्री राईट म्हणू लागले, "मास्टर, गिरिबालांचे काही फोटोग्राफ घ्यायचे झाले तर तेथे आपल्याला संध्याकाळच्या आत पोचले पाहिजे." ते हसून म्हणाले, "पाश्चिमात्य लोक मोठे संशयी. फोटो पाहिल्याशिवाय त्यांचा अशा गोष्टीवर विश्वास बसावयाचा नाही!"

ही त्यांची सूचना निर्विवादपणे रास्त होती. मी माझा सगळा मोह आवरला व निमूटपणे परत गाडीत बसलो.

"डिक, बरोबर आहे म्हणणे तुझे," गाडीला वेग आल्यावर मी म्हणालो, "पाश्चिमात्यांच्या व्यवहारीपणाच्या वेदीवर मी ह्या आम्रमय स्वर्गाचा त्याग करतो. फोटोग्राफ आपल्याजवळ पाहिजेतच!"

पुढे रस्ता जास्त जास्त खराब लागू लागला. रस्त्र्यावर मातीची घट्ट झालेली वळवासारखी ढेकळे आमच्या मार्गात वारंवार अडथळा आणीत होती. श्री राईट यांना गाडी चालवायला मदत म्हणून आम्ही चौघे खाली उतरून तिला पाठीमागून ढकलत असू.

"लंबोदरबाबूंचे सांगणे बरोबर होते," शैलेशने कबूल केले. "गाडी काही आपल्याला नेत नाही; आपणच गाडीला नेत आहो!"

गाडीत वारंवार चढउतार केल्याने आलेला कंटाळवाणा मधून-मधून वाटेतली खेडी दृष्टीस पडल्याने दूर होऊन जायचा. प्रत्येक खेडे म्हणजे विलक्षण साधेपणाचे मूर्तिमंत दृश्यच होते.

श्री राईट यांनी आपल्या प्रवास-रोजनिशीत ५ मे १९३६ रोजी खालीलप्रमाणे नोंद केली आहे: "आमचा रस्ता ताडामाडांच्या झाडांमधून नागमोडी वळणाने जात होता. गावे पुरातन काळातली, आधुनिक संस्कार त्यांना अजून काही लागलेले नव्हते. सभोवारची वनश्री फार रमणीय होती. खेड्यांतून मातीने लिंपलेल्या, सारवलेल्या कुडाच्या भिंतींच्या झोपड्यांचे पुंजके मोठे मजेदार दिसत होते. झोपडीच्या दारावर कोणत्यातरी देवाचे नाव सुशोभितपणे कोरलेले असायचे. झोपड्यांमधल्या मोकळ्या जागांतून उघडी नागडी मुले खेळत असायची; त्यांच्या गावातून आमची काळ्या रंगाची बैल नसलेली मोठी गाडी रस्ता काढत काढत जायची तेव्हा ती मुले आम्हांला पाहायला थांबायची किंवा आम्हांला पाहून पळून जायची. स्त्रिया नुसत्या डोकावून पाहायच्या, तर पुरुष रस्त्यावरच्या झाडांखाली उभे राहून सावकाशीने गप्पा मारीत मारीत आमच्याकडे बेफिकीरपणे कुतूहलाने पाहायचे. एके ठिकाणी तर सगळे गावातले लोक एका तळ्यात मजेने आंघोळ करीत होते; काही तळ्याच्या पाण्याच्या बाहेर पडून आपले भिजलेले कपडे पिळून वाळत घालीत होते, तर बायका पाणी भरून नेत होत्या.

"आमचा रस्ता मधून मधून उंचवट्यावरून तर कधीकधी खालाटीतून जात होता. आणि जाता जाता खळगा आला की आम्ही उडायचो व एकमेकांवर आपटायचो. वाटेत ओढे लागत तेव्हा आमच्या अंगावर पाणी उडायचे; कधीकधी नदीच्या कडेला बांधलेला रस्ता मध्येच तुटलेला असायचा आणि मग आम्हांला बाजूने वळण घेऊन पुढे जायला लागायचे. तर कधीकधी नदीचे पात्र सुकल्यामुळे नदीच्या प्रवाहातून सरकत पुढे जायचे. अशा तऱ्हेचा प्रवास करीत करीत, शेवटी संध्याकाळी पाच वाजता आम्ही आमच्या मुक्कामाच्या गावी, बिऊर गावी, जाऊन पोचलो. हे अगदी लहान खेडे बांकुरा जिल्ह्याच्या अगदी आतल्या भागात असून दाट झाडीमध्ये दडलेले आहे. पावसाळ्यात ओढ्यांना पुराचे पाणी येते आणि रस्ते चिखलाने बरबटून जातात आणि मग प्रवाशांना मुळी तिकडे जाताच येत नाही.

"तेथे त्या गावात एका आडवाटेला शेतात एक लहानसे देऊळ होते. त्या देवळामध्ये देवदर्शनाला काही माणसे आली होती. त्यांच्यापैकी एकाला आम्ही वाटाड्यासारखा उपयोग करावा म्हणून विचारावयास लागलो, तो एक डझनभर उघडीनागडी पोरे आमच्याभोवती गोळा झाली; काही गाडीवर चढावयास लागली. गिरिबालांचे घर दाखवायला सगळी अगदी तयार.

"गिरिबालांच्या घराचा रस्ता म्हणजे एका नारळीपोफळींच्या बनातूनच जात होता. मधूनमधून मातीच्या झोपड्या दिसत होत्या. पण आम्ही त्यांच्या घरी जाण्यापूर्वीच आमच्या गाडीचे व आमचे फार हाल झाले. वाटेत एक क्षणभर धोक्याचे वळण घेत असता, गाडी एकदम एका बाजूस वरती झाली; पण लगेच खाली झाली; पुढे सरकत सरपटत, झाडांमधून, पाण्याच्या डबक्यांमधून, लहान लहान बांधांवरून, खळग्यांमधून आणि चिखलामधून सरपटत

सरपटत एका झुडुपामध्ये अडकून एका उंचवट्यावर आदळली. चाकांना लागलेली मातीची ढेकळे बाजूला सारीत सावकाश व काळजी घेत आम्ही पुढे चालवू लागलो. इतक्यात एक झुडुप मध्ये येऊन आमचा रस्ता बंद झाला. त्यामुळे आम्हांला परत फिरून बाजूने वळण घ्यावे लागले. ते वळण एका कड्यासारख्या अरूंद भिंतीवरून जात होते आणि त्याच्यापुढे पाणी आटलेले, पण चिखलाने भरलेले एक तळे होते. त्यातून पुढे जावयाचे म्हणजे चाकांवरची माती खोदून काढून नंतर मग गाडी सुरू करावी लागे. मधून मधून पुढे रस्ता काढणे अशक्य होई, तरी पण आम्ही गाडी पुढे रेटत नेली. कारण आम्हांला आमची यात्रा पुरी करायची होती. ह्या सर्व उद्योगात आम्हांला वाटेतल्या पोरांची फार मदत व्हायची. ती आम्हांला कुठून तरी कुदळी, आणून देत, कोणी फावडी तर कोणी पटाशा अशी आयुधे आणून देत. आणि अशा तऱ्हेने ती आमची सर्व विघ्ने (गणपतीच्या कृपेने)! दूर करीत. मुलांचा हा सगळा उद्योग त्यांचे आईबाप व इतर शेकडो मुले कौतुकाने पाहात व मनात हसत.

"थोड्या वेळाने आम्ही दोन जुन्या दरडींच्या कडेकडेने सुतासारखा मार्ग आक्रमू लागलो. गावातील बायका आपल्या झोपडीच्या दारातून आमच्याकडे डोळे वासून पाहायला लागल्या. पुरुष आमच्या बरोबर व पाठीमागून येऊ लागले. पोरांचा घोळका जमत जमत आमच्या मागे सारखा वाढतच चालला. त्यांच्या गावातल्या रस्त्र्यावरून जाणारी आमची ही पहिलीच मोटारगाडी होती. एरव्ही ह्या ठिकाणी राज्य बैलगाडीचे. जेव्हा गावातून मोटार हाकीत हाकीत आम्ही पुढे जाऊ लागलो, तेव्हा त्यांच्यामध्ये आमच्याबद्दल एक मोठे कुतूहल निर्माण झाले. आम्ही मंडळी आणि त्यांत गाडी चालविणारा अमेरिकन मनुष्य. आमची गाडी मधून मधून धुसफूस करायची; आणि त्या गावातल्या ऐन वस्तीतून आम्ही ती चालवीत होतो; जणू त्या गावातल्या पुरातन कालापासून चालत आलेल्या एकांतावर व पावित्रयावर आम्ही हल्ला करीत होतो!

"पुढे आम्ही एका अरुंद गल्लीच्या टोकाशी थांबलो. तेथून गिरिबालांचे वाडवडिलार्जित घर शंभर फुटांच्या अंतरावर होते. लांबलचक अशा रस्त्र्याशी जागोजागी झगडत आम्ही अखेरी गाठली. आमच्या श्रमाचे सार्थक झाले. आमची गात्रे रोमांचित झाली. आम्ही एका दुमजली अशा मोठ्या घरापाशी आलो. घर विटांचे व चुन्याचे होते, आणि त्यामुळे ते शेजारच्या बांबूंच्या झोपड्यांमध्ये उठून दिसले. घरामध्ये काहीतरी दुरुस्तीचे काम चालू असल्याचे दिसले; कारण घराभोवती बासे बांधलेले होते. उष्ण कटिबंधात अशा तऱ्हेचा बांबूचा उपयोग म्हणजे एक वैशिष्ट्य असते.

"आता आमची उत्सुकता शिगेला पोहोचली व आमच्या हृदयात आनंद मावेनासा झाला. आम्ही त्या घराच्या उघड्या असलेल्या दरवाजासमोर उभे राहिलो. ते घर एका व्यक्तीच्या वास्तव्याने पावन झाले होते त्या व्यक्तीला परमेश्वराने भूक न लागण्याचे वरदान दिले होते. गावातील मंत्रमुग्ध झालेले ग्रामीण, तरुण, म्हातारे, उघडीनागडी पोरे, बायकाही थोडासा संकोच बाळगून, पण कुतूहलपूर्वक आणि इतर माणसे भीड वगैरे बाजूस ठेवून आमच्या पाठोपाठ येऊन हे अपूर्व दृश्य पाहात होती.

"थोड्याच वेळात दरवाजामध्ये एक ठेंगणीशी व्यक्ती येऊन उभी राहिली—गिरिबाला! त्या एक फिके सोनेरी रंगाचे रेशमी वस्त्र अगदी वैशिष्ट्यपूर्ण भारतीय पद्धतीने नेसल्या होत्या.

डोक्यावरील स्वदेशी कापडाच्या वस्त्राच्या पदरातून त्यांनी आपले तोंड विनयाने पण घुटमळत बाहेर काढले. मस्तकाच्या छायेमध्ये त्यांचे डोळे एखाद्या धुमसणाऱ्या विस्तवाप्रमाणे चमकत होते. त्यांच्या कृपाळू व दयाशील मुद्रेने आम्ही आकर्षित केले गेलो. त्यांची मुद्रा अनुभूतीची, सुज्ञतेची असून तिच्यावर पार्थिव किंवा ऐहिक उपभोगांच्या वासनेचा यत्किंचितही विकार किंवा अंश नव्हता.

"विनयपूर्वक त्या आमच्याजवळ आल्या व त्यांनी आम्हांस आमच्या 'स्थिर' व 'चल' कॅमेऱ्यांतून [5] फोटो काढू देण्यास मूक संमती दिली. आम्ही त्यांचे फोटो काढून घेतले. फोटो काढून घेताना ढब (पोझ) बरोबर येण्याकरिता व सूर्यप्रकाश भरपूर येण्याकरिता त्यांना बरीच ऊठबस करावी लागली. पण त्याबद्दल त्यांनी कंटाळा किंवा बेचैनी बिलकुल दर्शविली नाही. शेवटी, आम्ही पन्नास वर्षांवर अन्न किंवा पाणी न घेणाऱ्या अशा दुनियेतील विख्यात व एकमेव स्त्रीचे, पुढील पिढीकरिता उपयोगी पडावे, म्हणून बरेचसे फोटो घेतले. (थेरेसी न्यूमन यांचे उपोषण १९२३ पासून आहे.) गिरिबाला जेव्हा आमच्यापुढे आल्या तेव्हा त्यांच्या मुद्रेवर मातृवात्सल्याची भावना अगदी उठून दिसत होती. सर्वांगावर परिधान केलेले सैलसे वस्त्र होते. त्या वस्त्रामधून त्यांचे तोंड, हात व लहानसे पाय फक्त दिसत होते. त्यांची नजर खाली लागलेली होती. त्यांच्या चेहऱ्यावर अपूर्व शांती व निरागस आविर्भाव विलसत होता. त्यांचे ओठ लहान मुलासारखे किंचितसे थरथरत होते. त्यांचे नाक स्त्रीला शोभण्यासारखे. डोळे अरुंद पण तेजस्वी, आणि मुद्रेवर उत्साहपूर्ण असे स्मित विराजत होते."

श्री राईट यांनी गिरिबालाचे जे हे वर्णन केले आहे, त्याच्याशी मी सहमत आहे. त्यांनी जसे सैलसे पण चमकदार वस्त्र परिधान केले होते त्याचप्रमाणे आध्यात्मिकतेने त्यांचे व्यक्तितत्त्व भारावून टाकलेले होते. संसारी मनुष्य संन्याशाला ज्या पद्धतीने नमस्कार करतो त्या पद्धतीने त्यांनी मला नमस्कार केला. त्यांचे साधे मोहक स्मित व त्यांची शांत मुद्रा यांनीच आमचे शर्करावगंठित शब्दांपेक्षा अधिक चांगले स्वागत केले. त्या स्वागताने आम्हांला विकट व चिखलाच्या रस्त्र्यावरून यावे लागल्याने, जो शीण आला होता तो कोठच्या कोठे निघून गेला.

लहानशा शरीरयष्टीची ती संतमहिला मांडी घालून पडवीत बसली होती. त्यांच्या चेहऱ्यावर जरी वार्धक्य दिसत होते, तरी शरीरयष्टी कृश नव्हती. त्यांचा गुलाबी रंगाचा वर्ण सतेज व उजळ होता.

"माताजी," मी बंगालीत त्यांच्याशी बोलू लागलो, "गेली पंचवीस वर्षे ही यात्रा करण्याची मी उत्कंठेने वाट पाहत होतो! आपल्या पवित्रशा जीवनाची हकीकत मला स्थितिलाल नंदीबाबूंकडून कळली."

त्यांनी संमतिदर्शक मान हालविली. "होय. नवाबगंजामध्ये त्यांचा आमचा चांगला शेजार होता."

"इतकी वर्षे झाली. मी साता समुद्रांवरून पलीकडे गेलो; पण आपली भेट घेण्याची माझी इच्छा मी कधीच विसरलो नाही. कोणाच्या ध्यानातही येणार नाही, असे जे आपण पवित्र

नाट्यापूर्ण जीवन कंठीत आहात ते जगापुढे प्रकर्षाने आले पाहिजे; कारण जगाला आपल्या अंतर्यामीच्या दिव्य अन्नाचा विसर पडलेला आहे."

त्या संतमहिलेने आपले डोळे क्षणभर वर केले; त्यांच्या चेहऱ्यावर गंभीर औत्सुक्याची छटा होती.

"बाबांना चांगले माहीत आहे," त्यांनी सौम्यपणे उत्तर दिले.

त्यांना माझ्या बोलण्याचा राग आला नाही याचाच मला आनंद झाला. प्रसिद्धीबाबत योगी व योगिनी यांची काय प्रतिक्रिया होईल याबद्दल कोणास कधीही सांगता येणार नाही. अशा तऱ्हेच्या प्रसिद्धीपासून साधारणपणे ते दूर राहतात. कारण गहन अशा आत्मशोधनामध्ये शांतपणे बसून राहणे, हेच त्यांना अधिक आवडते. जगातील इतर साधकांच्या कल्याणाकरिता आपल्या आयुष्याबद्दलची माहिती उघडपणे देण्याची जेव्हा वेळ येते, तेव्हा त्यांना त्यांच्या अंतर्यामातूनच तशी अनुज्ञा मिळते.

"माताजी," मी पुढे बोलू लागलो. "अनेक प्रश्न विचारून मी आपल्याला सतावीत आहे त्याबद्दल क्षमा असावी. तेव्हा ज्या प्रश्नांची उत्तरे द्यावयास आपल्याला आनंद वाटेल तेवढ्याच प्रश्नांची उत्तरे आपण द्यावीत. आपण काही जरी बोलला नाहीत तरी सुद्धा मी त्याचा अर्थ समजून घेईन."

कृपादृष्टिपूर्वक त्यांनी आपले हात पुढे केले. त्या म्हणाल्या, "माझ्यासारख्या सामान्य माणसाला जेवढी समाधानपूर्वक उत्तरे देता येतील तेवढी उत्तरे मी आनंदाने देईन."

"आपण सामान्य खास नव्हत," मी त्यांच्या बोलण्याला मनापासून विरोध केला, "आपण खरोखरी महात्मा आहात."

"मी सर्वांची एक नम्र चाकर आहे," त्या जरा विलक्षण अर्थाने बोलल्या, "मला स्वतःला काय आवडते म्हणाल तर स्वयंपाक करून लोकांना जेवू घालणे फार आवडते."

जो स्वतः कधीही अन्नग्रहण करीत नाही, अशा महात्म्याच्या दृष्टीने हा मोठा विलक्षणच वेळ घालविण्याचा व्यवसाय आहे!

"तर मग, माताजी, मला हे आपल्या तोंडून सांगा की, आपण खरोखरीच काही अन्न ग्रहण केल्याखेरीज राहता काय?"

"खरे आहे ते," एवढे बोलून काही वेळ त्या स्तब्ध राहिल्या, त्या जे पुढे बोलल्या त्यावरून मला समजून आले की, त्यांचा मनातल्या मनात काही हिशेब चालला होता. "माझ्या वयाच्या बारा वर्षे चार महिन्यांच्या वयापासून आजच्या माझ्या अडसष्टाव्या वयापर्यंत—छपन्न वर्षांच्या कालावधीत—मी कधी अन्न घेतले नाही की पाणी प्याले नाही."

"आपल्याला खाण्याचा कधी मोह होत नाही काय?"

"मला जर खाण्याची उत्कट इच्छा झाली तर अर्थातच मला खावे लागेल." हे सूत्रमय सत्य त्यांनी साध्या पण भारदस्त शब्दांत सांगितले. आता हे सत्य या जगातील मानवप्राण्यांना, तीन वेळा दिवसांतून भरपुर जेवणाऱ्या अशांना पुरेपूर माहीत आहे!

"पण आपण काही तरी खाताच," माझ्या आवाजांत विरोधाचा सूर होता.

"अलबत," माझ्या बोलण्याचा आशय चटकन समजून त्या हसल्या.

“आपले पोषण हवा व सूर्यप्रकाश [6] यांमधून येणाऱ्या सूक्ष्मतर अशा शक्तीच्या द्वारा होत असते; तसेच ते मेरुदंड-शीर्षामधून जी विराट विश्वशक्ती शरीरात पुनः पुनः ताकद देत असते तिच्याकरवीही होत असते.”

“बाबांना सर्व काही माहीत आहे,” त्यांनी पुनः माझ्या बोलण्याला संमती दिली. त्यांची बोलण्याची पद्धत गोड व सरळ होती.

“माताजी, आपल्या पूर्वायुष्याबद्दल आम्हांला काही सांगता का? भारतांतील सर्व लोकांना, एवढेच काय, पण साता समुद्रांपलीकडील आपल्या बंधु-भगिनींना ते बोधप्रद होईल.”

नंतर मग गिरिबालांनी आपला नित्याचा संकोच बाजूला सारला व संभाषणाच्या मनःस्थितीत येऊन त्या बोलू लागल्या.

“बरे तर,” त्यांचा आवाज बारीक पण स्पष्ट होता, “मी ह्याच वनक्षेत्रात जन्मास आले. माझे बालपण अगदी जुजबी, सामान्य स्वरूपाचे गेले. फक्त एकच विशेष गोष्ट अशी की मला मनस्वी भूक लागे.

“मी जेव्हा नऊ वर्षांची झाल्ये तेव्हा माझे लग्न ठरले.

“‘मुली,’ माझी आई मला नेहमी बजावी, ‘तू आपली भूक आवर. आता नवऱ्याच्या घरी जाशील आणि तुला जेव्हा परक्या माणसांत वागावे लागेल तेव्हा तू सारा वेळ खातच बसलीस तर तुला लोक काय म्हणतील?”

“ज्या आपत्तीच्या प्रसंगाची तिला कल्पना आली होती तो प्रसंग लवकरच घडून आला. पुढे माझे लग्न झाले. त्या वेळी माझे वय बारा वर्षांचे होते. लग्न झाल्यावर मी सासरी नवाबगंजमध्ये राहावयास आले. माझ्या खादाडपणाबद्दल माझी सासू सकाळी, दुपारी, रात्री सारखी बोलत असे. परंतु तिच्या बोलण्याचा एक चांगला परिणाम घडून आला. तिच्या ह्या सारख्या बोलण्याने माझ्यामधील सुप्त अशी आध्यात्मिक प्रवृत्ती जागृत झाली. एक दिवस सकाळी, ती फार बोलली; अगदी निर्दयपणे तिने माझी हजेरी घेतली.

“‘तुम्हांला मी लवकरच दाखवीन,’ मी अगदी चिडून संतापाने म्हणाले, ‘की आता यापुढे जिवंत असेपर्यंत मी अन्नाला स्पर्श सुद्धा करणार नाही.”

“माझी सासू उपहासाने हसली. ‘असं!’ ती म्हणाली, ‘खादाडल्याखेरीज तुला होत नाही तर तू उपाशी कशी राहणार?’

“ह्या तिच्या बोलण्याला उत्तर नव्हते! तरी पण मी माझ्या मनामध्ये लोखंडासारखा ठाम निश्चय केला. मी एका आडोशाच्या जागी गेले व परमेश्वराची प्रार्थना केली.

“‘परमेश्वरा,’ मी सारखी प्रार्थना करू लागले, ‘मला आता गुरुची भेट करवून दे. अन्न वर्ज्य करून केवळ तुझ्या प्रकाशावरच कसे जगावे असे शिकविणारा मला आता गुरू पाहिजे.”

“मी एका परमानंदाने भारावून गेले. एका सुखद प्रेरणेने प्रेरित होऊन, मी नवाबगंजमधील गंगेच्या घाटावर जायला निघाले. वाटेत आमच्या सासरचे पुरोहितबुवा मला भेटले.

“‘महाराज,’ मी त्यांना माझ्या मनाची व्यथा सांगितली.

"'अन्नग्रहण केल्याखेरीज कसे जगता येईल हे मला आपण कृपा करून सांगाल काय?'"

"ते माझ्याकडे नुसते बघतच राहिले. शेवटी सांत्वन करण्याच्या हेतूने ते मला सांगू लागले, 'मुली, आज संध्याकाळी देवळात ये. तुझ्याकरिता मी काही वैदिक हवन अनुष्ठान करीन.'"

"अशा संदिग्ध उत्तराने माझे समाधान होण्यातले नव्हते; मी घाटाकडे पुढे चालू लागले. प्रभातीच्या सूर्याचे बालकिरण पाण्यामध्ये घुसत होते. एखादी पवित्र दीक्षा घेण्यापूर्वी जसे स्नान करतात तसे मी गंगेच्या पाण्यात स्नान केले, शुचिर्भूत झाले. नंतर मी नदीवरून परतले. माझ्या अंगावर ओलेच वस्त्र होते. आता दिवस चांगला वरती आला होता. आणि इतक्यात माझ्यासमोर माझे गुरू प्रकट झाले!

"'मुली,' प्रेमळ व दयार्द्र बुद्धीने भरलेल्या आवाजात ते बोलू लागले, 'तुझी निकडीची प्रार्थना ऐकून परमेश्वराने मला येथे गुरू म्हणून तुला बोध करण्याकरिता पाठविले आहे. तुझ्या असामान्य व विलक्षण प्रार्थनेने परमेश्वराचे मन हेलावून निघाले होते. आजपासून तू केवळ सूक्ष्म प्रकाशावरच जगू शकशील. तुझ्या शरीरातील अणु-परमाणूचे पोषण विश्वाच्या ह्या अनंत प्रवाहामार्फत होऊ शकेल.'"

नंतर गिरिबाला बोलावयाच्या थांबल्या. श्री राईट यांची पेन्सिल व पॅड मी हातात घेतले व त्यांच्या माहितीकरिता काही तपशिलाच्या बाबी मी इंग्रजीमध्ये भाषांतर करून लिहू लागलो.

संतमहिला पुढे आपली हकीकत सांगू लागल्या. त्यांचा मंद आवाज नीटसा ऐकूही येईना. "घाटावर कोणी नव्हते. माझ्या गुरुजींच्या भोवती एक संरक्षक तेजोवलय होते. त्यामुळे आसपास स्नान करणाऱ्या इतर माणसांचा मला काही उपसर्ग झाला नाही. गुरुजींनी मला एका क्रियातंत्राची दीक्षा दिली. त्या तंत्राने मर्त्य माणसांच्या जड अन्नावरती अवलंबून राहण्यापासून शरीराला मोकळीक मिळते. ह्या तंत्रामध्ये एक विशिष्ट मंत्राचा [7] व साधारण माणसाला करावयास अवघड अशा एका प्राणायामाचा अंतर्भाव होतो. ह्या प्रकारात औषध-पाणी किंवा जादूटोणा असे काहीही नाही. क्रियेव्यतिरिक्त दुसरे काही नाही."

अमेरिकन वर्तमानपत्राच्या बातमीदासच्या पद्धतीनुसार—ही पद्धत मी त्यांच्याकडून नकळत शिकलो—मी गिरिबालांना इतर बाह्य जगाला कुतूहल वाटेल असे मला वाटलेले, पुष्कळ प्रश्न विचारले. त्यांनी मला जी थोडीथोडी माहिती दिली ती खालीलप्रमाणे:

"मला कधी मुले झालीच नाहीत. मला विधवा झाल्याला पुष्कळ वर्षे लोटली. मी झोप अशी फार थोडी घेते; कारण झोप आणि जागेपण ह्या दोन्ही गोष्टी मला सारख्याच. दिवसा मी माझी घरातली कामे करते व रात्री ध्यानाला बसते. ऋतू बदलताना मला हवामानात फरक फार थोड्याच प्रमाणात जाणवतो. मी कधी आजारीही पडले नाही, की मला कधी रोगही असा झाला नाही. जेव्हा एखादा अपघात होऊन मला इजा होते तेव्हा थोड्याशा वेदना होतात. मला मलमुत्रविसर्जन करावे लागत नाही. माझ्या नाडीवर व श्वसनक्रियेवर मी नियंत्रण ठेवू शकते. माझे गुरु व इतर महात्मे यांच्या भेटीचे मला दृष्टांत होतात.

"माताजी," मी विचारले, "अन्नावाचून जगण्याची विद्या आपण इतरांना का शिकवत नाही?"

जगाच्या कोट्यावधीं उपासमार होत असलेल्या लोकांबद्दल माझ्या आकांक्षा एकदम पार धुळीला मिळाल्या.

त्यांनी मान फिरविली. “नाही. हे गुपित फोडायचे नाही, अशी सक्त ताकीद माझ्या गुरूने मला दिली आहे. परमेश्वराच्या सृष्टीच्या ह्या नाटकामध्ये कोणी ढवळाढवळ करू नये अशी त्यांची इच्छा आहे. मी जर पुष्कळशा लोकांना उपाशी राहण्याचे शिकविले तर शेतकऱ्यांना बरे वाटणार नाही! रसाळ फळे जमिनीवर तशीच पडून फुकट जातील. असे दिसून येते की, दुःख, उपासमार व रोगराई ही आपल्या कर्मांचीच फळे असून तीच शेवटी आपल्याला जीवनाचा खरा अर्थ शोधून काढण्याच्या कामी प्रवर्तित करीत असतात.”

“माताजी,” मी सावकाशपणे म्हणालो, “आपण एकट्यानेच उपाशी, निराहारी राहण्यात काय स्वारस्य आहे?”

“मनुष्यप्राणी हा आत्मस्वरूप आहे हे सिद्ध करण्याकरिता.” त्यांच्या चेहऱ्यावर सुज्ञता झळकली. “पारमार्थिक प्रगतीने माणसाला अन्नावाचून नुसत्या चिरंतन प्रकाशावर जगता येते, हे त्याला हळूहळू समजावे हे दाखविण्याकरिता.” [8]

नंतर त्या संतमहिलेला गाढ ध्यानात तंद्री लागली. त्यांची दृष्टी अंतर्मुख झाली; त्यांच्या डोळ्यांच्या नाजूक खाचा अचेतन होऊन गेल्या. त्यांनी एक निःश्वास सोडला. हर्षोन्मादक निष्प्राण समाधीची ती पूर्वतयारी होती. काही वेळा त्या प्रश्नातीत स्तरावर, आंतरिक आनंदाच्या स्वर्गात जाऊन आल्या होत्या.

उष्ण कटिबंधातील अंधकार चोहीकडे पसरला. रॉकेलच्या लहानशा दिव्याचा मिणमिणीत प्रकाश त्या ग्रामीण जनांच्या डोक्यावरून फडफडत होता. त्या दिव्याखाली ते शांतपणे जमिनीवर मांडी घालून बसलेले होते. मधेच लुकलुकणारे काजवे आणि दूरवरच्या झोपड्यांमधले तेलाचे दिवे रात्रीरूप मखमलीमध्ये तेजस्वी पण भेसूर अशा आकृत्या काढीत होते. आता निरोप घेण्याची दुःखदायक वेळ येऊन ठेपली. आता आम्हा मंडळींपुढे तो धीमा कंटाळवाणा परतीचा प्रवास उभा राहिला.

“गिरिबाला,” त्या संतमहिलेने जेव्हा डोळे उघडले तेव्हा मी त्यांना म्हणालो, “तुमच्या साडीचा एक तुकडा आम्हांला आपले स्मरण म्हणून देता का?”

बनारसी रेशमाच्या कापडाचा एक तुकडा घेऊन त्या लगोलग परत आल्या. हात लांब करून तो तुकडा त्यांनी आम्हांला दिला व आमच्यापुढे जमिनीवर त्यांनी साष्टांग नमस्कार घातला.

“माताजी,” मी आदरपूर्वक त्यांना म्हणालो, “मला आपल्या पवित्र चरणांना स्पर्श करू द्या.”

---

1 बंगालच्या उत्तर भागात.

2 हि. हा. सर बिजयचंद्र महताब. ते आता दिवंगत झाले आहेत. गिरिबालांची ही तीन वेळा जी परीक्षा घेतली गेली त्याची नोंद त्यांच्या कुटुंबात जरूर जपून ठेवून दिलेली आहे.

3 “विघ्नहर्ता”; मंगलमूर्ती

4 श्रीयुक्तेश्वर नेहमी म्हणत असत "परमेश्वराने ह्या धरणीमातेकरवी आपणास फळे दिली आहेत. आपले ते अन्न आपण पाहू इच्छितो. त्याचा वास, त्याची चव घेऊ इच्छितो. आणि हिंदू मनुष्य त्याचा स्पर्शही घेऊ इच्छितो!" आणि तसे पाहिले तर त्या अन्नाचे श्रवणही करावयास हरकत नाही. आणि जवळपास जेवणाचे वेळी कोणी नसले तर ते श्रवणही करता येईल.

5 श्री राईट यांनी श्रीयुक्तेश्वरांचीही ते सेरामपूरला आपल्या हयातीच्या शेवटच्या मकर संक्रमण महोत्सवाला आले होते, तेव्हा बरीचशी चलच्चित्रे घेतली होती.

6 मेंफीस येथे ता. १७ मे १९३३ रोजी भरलेल्या डॉक्टरांच्या मेळाव्यापुढे क्लीव्हलंडचे डॉ. जॉर्ज डब्ल्यू. क्राईल हे भाषण देत असताना म्हणाले, "अत्यंत महत्त्वाचे असे हे किरणोत्सर्जन शरीरातील विद्युत्वलयास सूक्ष्म असा विद्युत्प्रवाह पुरवीत असते. शरीरातील विद्युतत्वलय म्हणजे शरीरातील मज्जासंस्था, नाड्या वगैरे. ह्या नाड्यांना, मज्जातंतूंना अशा तऱ्हेने सूर्यकिरणांकरवी अन्न मिळत असते." डॉ. क्राईल म्हणतात, "एक-एक अणू म्हणजे एक-एक सूर्यमाला आहे. अणू म्हणजे गुंडाळून ठेवलेल्या स्प्रिंगसारखी सूर्यकिरणांच्या उत्सर्जनांनी भरलेली वाहने होत. शक्तीने भरलेल्या या असंख्य अणूंचा अन्नासारखा उपयोग होतो. शक्तीने भरलेली ही वाहने जेव्हा शरीरामध्ये प्रवेश करतात, तेव्हा ती हळूहळू शरीरातील धातूंमध्ये रूपांतर पावतात. अशा तऱ्हेने हे किरणोत्सर्जन शरीरामध्ये नवीन नवीन रासायनिक शक्ती, नवीन नवीन विद्युत्प्रवाह निर्माण करीत असते. तुमचे हे शरीर अशा अणू-परमाणूंनी बनलेले आहे. तुमचे स्नायू, मेंदू, डोळे व कान ह्यांसारखी तुमची ज्ञानेंद्रिये अशा अणू-परमाणूंची बनलेली आहेत."

एक दिवस असा येईल की, मनुष्यप्राणी हा ह्या सूर्यशक्तीवर सरळपणे कशाच्याही मध्यस्थीखेरीज जगू शकतो, हे शास्त्रज्ञांना आढळून येईल. 'न्यूयॉर्क टाईम्स' मध्ये विल्यम एल. लॉरेन्स लिहितात, "सूर्यप्रकाश पकडून ती सूर्यशक्ती ओढून घेण्याची ताकद क्लोरोफिल ह्या एकमेव द्रव्याच्या ठिकाणी असते. निसर्गामध्ये क्लोरोफिल हे सूर्यप्रकाशातून शक्ती पकडून घेते व ती वनस्पतीमध्ये साठवून ठेवते. ह्या शक्तीखेरीज कोठलाही जीवजंतू, कोणतीही वनस्पती जगू शकणार नाही. ही सूर्यशक्ती वनस्पती आपल्या अंतरंगामध्ये साठवून ठेवतात. आपण ह्या वनस्पती खातो किंवा ह्या वनस्पती खाणाऱ्या प्राण्यांचे मांस खातो आणि अशा तऱ्हेने आपल्या जीवनाला आवश्यक तेवढी सूर्यशक्ती आपण प्राप्त करून घेतो. दगडी कोळसा किंवा खनिज तेल ह्यांमध्ये जी शक्ती असते, ती त्यांच्या ठिकाणी कोट्यवधी वर्षांपूर्वी त्या काळातल्या वनस्पतींनी, सूर्यशक्तीपासून मिळविलेला क्लोरोफिलचा जो साठा साठविलेला असतो, त्यापासून ती निर्माण झालेली असते. तसे पाहिले तर, आपण सूर्यावरच क्लोरोफिलच्या मध्यस्थीने जगत असतो."

7 प्रभावी स्पंदनात्मक जप. 'मंत्र' ह्या संस्कृत शब्दाचे शब्दशः भाषांतर "विचाराचे साधन" असे होईल. मंत्र हे सृष्टीची एक बाजू दर्शविणारे असे ध्येयात्मक, सहसा ऐकू न येणारे असे ध्वनी सुचवितात. अक्षरामध्ये ध्वनी प्रकट केल्यास मंत्राला 'सर्वव्यापी सर्वंकष' संज्ञा प्राप्त होते. (वेब्स्टर्स न्यू इंटरनैशनल डिक्शनरी: दुसरी आवृत्ती) ध्वनीस ही अमर्याद शक्ती ॐकारा मधूनच प्राप्त होते। ॐकार म्हणजे 'शब्द' किंवा विश्वचक्राचा सर्जक हुंकार.

8 गिरिबालांची ही निराहारी अवस्था ही एक प्रकारची सिद्धी आहे व ती पातंजली योगसूत्रांमध्ये पाद. ३:सूत्र ३१ मध्ये दिलेली आहे. विशुद्धचक्रावर परिणाम करणारा एक विशिष्ट प्राणायाम त्या करतात. विशुद्धचक्र हे मेरुदंडातील सूक्ष्म शक्तिप्रवाहाचे पाचवे चक्र होय. हे चक्र घशाच्या पाठीमागे असून ते आकाश किंवा ईथर ह्या पाचव्या तत्त्वावर (पंच महाभूतांपैकी पाचवे) नियंत्रण करते. हे महाभूत जड पेशीच्या अणू-परमाणूंमधील मोकळी जागा व्यापून असते. त्या विशुद्धचक्रावर ध्यान लावल्याने साधकाला केवळ आकाश-शक्तीवर किंवा हवेवर जगता येते.

थेरेसा नॉयमन ह्या कुठल्याही तऱ्हेचे जड स्वरूपाचे अन्न खात नाहीत की अन्न खावे लागू नये म्हणून कोणतीही शास्त्रीय योगिक तंत्रसाधनाही करीत नाहीत. त्यांच्या वैयक्तिक कर्मामध्ये पुष्कळशी गुंतागुंत असावी आणि त्यामुळेच अशा तऱ्हेचा हा प्रकार संभवत असावा. थेरेसा नॉयमन व गिरिबालासारख्या संतांनी बरेच जन्म परमेश्वरास समर्पित केलेले असतात, पण त्यांच्या बाह्य जगात व्यक्त करण्याच्या रीती वेगवेगळ्या असतात.

दोघींच्या पूर्वजन्मीच्या संस्कारांचे बाह्य आविष्करण वेगवेगळे आहे. अन्नग्रहण बिलकुल न करणारे असे बरेच ख्रिस्ती संत होऊन गेले (आणि त्यांच्या अंगावर येशू ख्रिस्ताला झालेल्या जखमाही दिसून येत). अशा संतांमध्ये पुढील नावे विशेष उल्लेखनीय आहेत: शीडॅमची सेंट लिड्विना, रेंटची पूज्य महिला एलिझाबेथ, सीनाची सेंट कैथराइन, डोमिनिका लाझारी, फोलिनोची पूज्य महिला एंजेला आणि १९ व्या शतकातील लुईझी लेतो. फ्लूचा सेंट निकोलस (ब्रूडर क्लॉस, पंधराव्या शतकातील साधू ज्याच्या आग्रहपूर्वक केलेल्या ऐक्याच्या विनवणीने स्विस संघराज्यास वाचविले) ह्याने तर वीस वर्षे काही एक खाल्ले नव्हते.

प्रकरण - ४७

# 47. माझे पश्चिमेस प्रत्यागमन

"मी हिंदुस्थानात व अमेरिकेत योगावर पुष्कळ प्रवचने पाठात्मक स्वरूपाची दिली आहेत; पण मला हे कबूल करावयास पाहिजे की, हिंदू मनुष्याच्या भूमिकेत इंग्लिश विद्यार्थ्यांकरिता योगाचा वर्ग चालविण्यात मला एक प्रकारचा अपूर्व आनंद प्राप्त होतो."

लंडनमधील माझे वर्ग-विद्यार्थी संमतीपूर्वक हसले. कोणत्याही प्रकारच्या राजकीय घडामोडीमुळे आमच्या योगाभ्यासजन्य शांतीमध्ये कधीही बिघाड झाला नाही.

हिंदुस्थानची आता फक्त पवित्रशी स्मृती राहिली होती. १९३६चा हा सप्टेंबर महिना. आज मी इंग्लंडमध्ये सोळा महिन्यांपूर्वी दिलेल्या वचनाची पूर्ती करण्याकरिता, लंडनमध्ये पुनः व्याख्यान देण्याकरिता आलो आहे.

इंग्लंडमध्ये सुद्धा कालातीत अशा यौगिक संदेशास पडसाद मिळतो. वार्ताहर व न्यूजरील घेणारे कॅमेरामन यांनी ग्रोसव्हेनॉर हाऊसमध्ये माझ्या मुक्कामाच्या ठिकाणी गर्दी करून सोडली. 'ब्रिटिश नैशनल कौन्सिल ऑफ द वर्ल्ड फेलोशिप ऑफ फेथ्स' यांनी व्हाईटफील्ड काँग्रेगेशनल चर्चमध्ये २९ सप्टेंबर रोजी माझे व्याख्यान ठरविले. तेथील श्रोतृवृंदापुढे 'बंधुत्वावरील श्रद्धेने मानव संस्कृतीस कसे वाचविता येईल?' अशा जड विषयावर मी व्याख्यान दिले. कैक्स्टन हॉलमध्ये माझी व्याख्याने संध्याकाळी आठला होत असत. चांगलीच गर्दी व्हायची. इतकी की, दोनदा श्रोत्यांनी विंडसर हाऊस सभागृहामध्ये साडेनऊ वाजता माझ्या दुसऱ्या व्याख्यानास हजेरी दिली. त्यानंतर कित्येक आठवडे योगाभ्यास-वर्गांना इतकी गर्दी व्हावयाची की, श्री राईट यांना दुसऱ्या सभागृहाची व्यवस्था करावी लागली.

इंग्लिश रक्ताचा चिवटपणा हा आध्यात्मिक संबंधाच्या विषयामध्येही फार मार्मिकपणे दिसून येतो. मी इंग्लंडमधून निघून गेल्यानंतरही लंडनमधील योगाभ्यास-विद्यार्थ्यांनी एक सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप केंद्र आपण होऊन निष्ठापूर्वक स्थापन केले आणि महायुद्धाच्या त्या कटू काळात सुद्धा ते दर आठवड्याला ध्यानाच्या बैठकी भरवीत असत.

इंग्लंडमधील अविस्मरणीय असा तो काळ. दिवसभर लंडन शहरातील प्रेक्षणीय स्थळे पाहात बसायची; नंतर सुंदर अशा त्या ग्रामीण निसर्गाचे दर्शन घ्यायचे. ब्रिटिश इतिहासातील मोठमोठे कवी आणि वीरपुरुष यांची जन्मस्थाने व थडगी ही सर्व पाहण्याकरिता श्री राईट व मी अशा दोघांनी आपल्या विश्वासू अशा फोर्डगाडीचा भरपूर उपयोग करून घेतला.

आमच्या लहानशा तुकडीने नंतर ऑक्टोबरच्या अखेरीस सौदम्पट्नहून 'ब्रेमेन' बोटीतून अमेरिकेस प्रस्थान ठेवले. न्यूयॉर्कमधील तो अजस्र स्वतंत्रतेचा पुतळा पाहून आम्ही आनंदात्मक भावनेचे आवंढे गिळले.

आमची फोर्डगाडी, पुरातन भूमीवरून प्रवास करण्यात धडपडली असूनही, अजून शाबूत होती. आता आमच्या ह्या रथाने अमेरिका खंड ओलांडून कॅलिफोर्नियात जाण्याचे महत्कर्म

आरंभिले. १९३६च्या अखेरीस, आम्ही मौंट वॉशिंग्टनकेंद्र गाठले.

वर्षअखेरीचे सुट्टीचे दिवस दरवर्षी, लॉस एंजेलिसच्या केंद्रामध्ये २४ डिसेंबरला (आध्यात्मिक क्रिस्मस्च्या दिवशी) [1] सतत आठ तास चालणाऱ्या ध्यानामध्ये घालविले जातात. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मेजवानी (सामाजिक क्रिस्मस्चा दिवस) असते. ह्या वर्षी आमच्या ह्या उत्सवप्रसंगी आणखी मौज आली होती. पृथ्वीपर्यटन करून परत आलेल्या तिघा मुसाफिरांचे स्वागत करण्याकरिता दूरदूरच्या शहरांहून आमची प्रिय मित्रमंडळी व विद्यार्थीगण आले होते.

क्रिस्मस्-दिवसाच्या मेजवानीला अनेक उत्तमोत्तम निवडक पदार्थ ठेवलेले होते. ह्या सुखद प्रसंगी वापरण्याकरिता पंधरा हजार मैलांवरून पदार्थ आणले होते. काश्मीरहून आणलेल्या गुच्ची मशरूम्स (आळंबी), डब्बाबंद रसगुल्ला, आम्र-पोळी, पापड, आणि आईसक्रीमवरती टाकण्याकरिता केवडाजल. संध्याकाळी आम्ही सारेजण एका भल्या मोठ्या दिव्यांनी लुकलुकणाऱ्या क्रिस्मस् झाडाखाली जमलो. जवळच एक धुनी पेटवून ठेविली होती. तिच्यात सुगंधी देवदाराच्या ढलप्या आम्ही टाकत होतो. त्या ढलप्या फुटल्याचा आवाज येत होता.

उपहार वाटण्याची वेळ! जगाच्या दूरदूरच्या कानाकोपऱ्यांतून आलेल्या भेटी. पैलेस्टाईन, इजिप्त, हिंदुस्थान, इंग्लंड, फ्रान्स, इटली. श्री राईट यांनी प्रत्येक मुक्कामाला परदेशांतून प्रवास करीत असताना, किती काळजीपूर्वक ट्रंकांची मोजदाद केली होती! अशासाठी की अमेरिकेतील प्रियजनांना देण्याकरिता आणलेल्या भेटी प्रवासामध्येच गहाळ होऊ नयेत. पवित्र भूमीतील ऑलिव्ह झाडाच्या शोभिवंत फांद्या, बैल्जियम व हॉलंडमधील नाजूक जरतारीचे भरतकाम, इराणी गालिचे, सुबक रीतीने विणलेल्या काश्मिरी शाली, म्हैसूरमधील कायम सुवास टिकणारे चंदन, मध्यप्रांतातून आलेले "नंदीचा डोळा" म्हणून ओळखले जाणारे दगड, हिंदुस्थानातील पुरातन नाणी, रत्नांनी मढवलेले पेले व पुष्पपात्रे, बारीक नमुने, भिंतीवर पसरण्याचे भपकेदार पडदे, देवळात वापरावयाच्या उदबत्त्या व सुगंधी धूप, स्वदेशी कापडाची छापलेली छिटे, लाखेवरील काम, म्हैसूरमधील हस्तिदंतावरील कोरलेल्या वस्तू, लांब, कोचदार अंगठावाल्या इराणी सपाता, जुने हस्तलिखित ग्रंथ, मखमल, बुट्टीदार कापडे, गांधीटोपी, मातीचे काम, भांडी, फरशा, पितळेची भांडी, प्रार्थनेकरिता वापरण्याचे लोकरी गालिचे—तीन खंडांतून जमा केलेली लूट!

ह्या सर्व भेटींची झाडाखाली रास करून ठेवली होती. भेटीच्या वस्तू चांगल्या कागदामध्ये सुबकपणे गुंडाळून ठेवलेल्या होत्या. त्या मी एक एक वाटू लागलो.

"सिस्टर ग्यानमाता!" असे नाव पुकारून त्यांना मी एक लांबशी पेटी दिली. सिस्टर ग्यानमाता ह्या एक अमेरिकन संतमहिला असून, त्यांच्या मुद्रेवर प्रेमळपणाची व साक्षात्काराची छटा दिसे. माझ्या गैरहजेरीमध्ये मौंट वॉशिंग्टनच्या केंद्राचा कारभार त्या पाहत होत्या. कागदांच्या भेंडोळ्यांतून त्यांनी एक सोनेरी बनारसी रेशमी शालू उचलला.

"गुरुजी, मी आपली आभारी आहे. हिंदुस्थानचा भपका, डामडौल ह्या शालूच्या रूपाने माझ्यापुढे मूर्तिमंत उभा राहात आहे."

"श्री डिकिन्सन!" ह्या दुसऱ्या पुडक्यामध्ये कलकत्त्याच्या बाजारामधून मी आणलेली एक वस्तू होती. त्या वेळी मला असे वाटले होते की, "श्री डिकिन्सन यांना ही वस्तू आवडेल." श्री ई. ई. डिकिन्सन मोठे प्रेमळ शिष्य. १९२५ साली मौंट वॉशिंग्टन केंद्र स्थापन झाल्यापासून प्रत्येक क्रिस्मस् उत्सवाला ते नियमाने हजर असत.

ह्या अकराव्या वार्षिक महोत्सवाच्या प्रसंगी एका लांबशा पुडक्याची दोरी सोडीत ते माझ्यापुढे उभे राहिले.

"चांदीचा पेला!" भावनेच्या उद्रेकाने ते त्या मोठ्या पाणी पिण्याच्या पेल्याकडे पाहत राहिले. गोंधळलेल्या मनःस्थितीत थोड्या अंतरावर ते जरा बसले. मी त्यांच्याकडे पाहून स्नेहपूर्ण स्मित केले व सांता क्लॉजचे वाटपाचे काम पुनरपि सुरू केले.

ती संध्याकाळ हास्यविनोदात गेली. शेवटी सर्व देणग्या देणाऱ्या परमेश्वराची प्रार्थना झाली. सगळ्यांनी मिळून नाताळचे सामुदायिक गीत म्हटले.

त्यानंतर काही वेळाने श्री डिकिन्सन व मी बोलत बसलो.

"गुरुजी," ते म्हणाले, "ह्या चांदीच्या पेल्याबद्दल मला आपले आभार मानू द्या. नाताळच्या रात्रीच्या वेळी मी कोणत्या शब्दांत आपले आभार मानावे, हे मला समजले नाही!"

"मी खास तुमच्याकरिता ती वस्तू आणली होती."

"गेली त्रेचाळीस वर्षे मी त्या चांदीच्या पेल्याबद्दल वाट पाहत होतो! मोठी लांबलचक कहाणी आहे ती; माझ्याजवळच ते गुपित मी ठेवले होते." श्री डिकिन्सन माझ्याकडे संकोचाने पाहत राहिले. "ह्या कहाणीची सुरुवात मोठी नाट्यपूर्ण आहे. मी बुडत होतो. नेब्रास्कामधील एका लहानशा गावात एक पंधरा फूट खोलीचा पाण्याचा हौद होता. तेथे माझा थोरला भाऊ व मी असे दोघे खेळत होतो. खेळता खेळता त्याने मला पाण्यात ढकलले. त्या वेळी माझे वय पाच वर्षांचे असावे. पाण्यात दुसऱ्यांदा मी बुडून जाणार होतो आणि त्या वेळी अकस्मात सर्व अवकाश भरून टाकणारा एक अनेक रंगांचा झगझगीत प्रकाश मला डोळ्यांपुढे दिसला. त्या प्रकाशाच्या मध्यभागी मला एक माणसाची आकृती दिसली. तिचे डोळे अगदी स्थिर होते व मुद्रेवर आश्वासन देणारे स्मित होते. तिसऱ्या वेळी जेव्हा मी पाण्यात बुडायला लागलो तेव्हा माझ्या भावाच्या एका सोबत्याने वाळूंजीच्या झाडाची एक लांबलचक व कोवळी फांदी पाण्यात इतकी खोलवर बुडविली की, मी माझ्या हताश झालेल्या बोटांनी ती फांदी पकडली. मुलांनी नंतर मग मला उचलून काठावर आणले आणि प्रथमोपचार करून मला शुद्धीवर आणले.

"बारा वर्षांनी आता मी सतरा वर्षांचा तरुण झालो होतो. मी एकदा आईबरोबर शिकागोला गेलो होतो. १८९३ सालचा सप्टेंबर महिना होता. त्या वेळी शहरात वर्ल्ड पार्लमेंट ऑफ रेलिजन्सचे विख्यात अधिवेशन चालू होते. आई व मी असे दोघे एका हमरस्त्र्यावरून चालत जात होतो; आणि पुनः मला तो अजस्र प्रकाशाचा झोत दिसला. काही थोड्या पावलांच्या अंतरावर एक इसम सावकाश आरामशीरपणे येरझारा घालीत होता. कित्येक वर्षांपूर्वी मला अगदी तोच इसम पाहिल्याचा भास झाला होता. त्या भव्य अशा सभागृहाकडे तो आला आणि नंतर दरवाजातून आत जाऊन नाहीसा झाला.

"'आई,' मी ओरडून म्हणालो, 'तोच तो मनुष्य मी बुडत असल्यावेळी माझ्याजवळ आला!'"

“आई व मी दोघे त्या इमारतीत शिरलो. तो मनुष्य व्यासपीठावर बसलेला होता. आम्हांला लवकरच नंतर कळले की, तो मनुष्य म्हणजे हिंदुस्थानातील स्वामी विवेकानंद. [2] आत्मिक शक्तीला गदगदून हालवून सोडणारे त्यांनी भाषण केल्यावर मी त्यांना भेटण्याकरिता पुढे सरसावलो. त्यांनी माझ्याकडे पाहून औदार्यपूर्ण स्मित केले. जणू आमची पूर्वीची मैत्री होती. मी त्या वेळी इतका लहान होतो की, माझ्या भावना शब्दांनी कशा व्यक्त कराव्या, हे मला समजत नव्हते. पण मनात मला असे वाटे की, त्यांनी माझे गुरू व्हावे. त्यांनी अंतर्ज्ञानाने माझे मन ओळखिले.

“‘नाही बेटा, मी तुझा गुरू नव्हे.’ विवेकानंद आपल्या सुंदर भेदक नजरेने माझ्या डोळ्यांकडे खोलवर पाहात होते. ‘तुला तुझे गुरू पुढे भेटतील. ते तुला एक चांदीचा पेला देतील.’ नंतर काही वेळ थांबून ते पुढे स्मित करून म्हणाले, ‘आज तुला ग्रहण करता येतील त्यापेक्षा अधिक आशीर्वाद ते तुझ्या ओंजळीत ओततील.’

“नंतर थोड्याच दिवसांनी आम्ही शिकागो सोडले.” श्री डिकिन्सन पुढे सांगू लागले, “पुढे मला स्वामी विवेकानंद कधीही दिसले नाहीत. पण त्यांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द माझ्या अंतर्यामी, कधीही पुसला न जाईल अशा रीतीने लिहिला गेला होता. पुष्कळ वर्षे लोटली. मला गुरू कोणी भेटला नाही. १९२५ साली एके दिवशी रात्री मी परमेश्वराची खूप प्रार्थना केली की, परमेश्वरा, माझा गुरू मला भेटव. काही तासांनी एका मधुर संगीताच्या मंद आलापांनी मी झोपेतून जागा झालो. माझ्या दृष्टीसमोर देवदुतांचा ताफा, हातात बासरी व इतर वाद्ये घेऊन उभा राहिला. स्वर्गीय संगीताने वातावरण भरून टाकून ती देवदूत मंडळी हळूहळू नाहीशी झाली.

“दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आपल्या प्रवचनाला लॉस एंजेलिसमध्ये मी हजर होतो. अगदी प्रथमचीच अशी ती वेळ. आणि आपले प्रवचन ऐकल्यानंतर माझी प्रार्थना परमेश्वराने ऐकिली, हे मला कळून चुकले.”

आम्ही दोघे एकमेकांकडे स्मित मुद्रेने शांतपणे पाहात राहिलो.

“त्यानंतर आता अकरा वर्षे झाली. मी आपला क्रियायोगाचा शिष्य आहे.” श्री डिकिन्सन पुढे सांगू लागले, “कधी कधी चांदीच्या पेल्याचा अर्थ समजण्याची उत्कंठा वाटायची. विवेकानंदांचे शब्द लक्षणात्मक आहेत अशी माझी मी समजूत करून घेतली होती.

“पण नाताळच्या रात्री ज्या वेळी आपण झाडाखाली ती लहान पेटी माझ्या हातात दिली तेव्हा त्या वेळी, अन् माझ्या आयुष्यातील तिसरा प्रसंग होता तो; मला तोच झगझगीत प्रकाश दिसला. आणि क्षणभरातच मी माझ्या गुरुदेवांनी दिलेली भेट पाहत होतो; जिच्याबद्दल विवेकानंदांनी त्रेचाळीस वर्षांपूर्वी [3] भविष्य वर्तविले होते—चांदीचा पेला!”



*श्री श्री परमहंस योगानंद, बॉस्टन येथे, 1922 मध्ये*

1 १९५० सालापासून २३ डिसेंबरला सर्व दिवसभर ध्यानाचा कार्यक्रम आयोजिला जातो. जगभर पसरलेले सदस्य त्या विशेष प्रसंगी आपापल्या घरी, सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप केंद्रांच्या ठिकाणी आणि मंदिरांत हा ख्रिस्मस् दिवस साजरा करतात. मुख्य केंद्राच्या ठिकाणी हा जो ध्यानाचा कार्यक्रम सर्व दिवसभर पार पाडला जातो त्या वेळी जमलेल्या साधकांच्या आंतरिक तादात्म्यांतून त्यांना आध्यात्मिक साहाय्य व आशीर्वाद मिळतात. काही लोक आपल्या काही विशिष्ट प्रश्नांचे निरसन व्हावे म्हणून सेल्फ-रिअलायझेशन महाकेंद्राचे ठिकाणी जे प्रेअर काऊन्सिल (प्रार्थना मंडळ) आहे तेथे प्रार्थना केल्या जातात. तेथे जे प्रार्थना करतात त्यांच्याशी ज्यांचे भावात्म्य होते त्यांनाही तशाच दिव्य उल्हासाचा कोणत्याही वेळी अनुभव प्राप्त होतो. (प्रकाशकांची टीप)

2 ख्रिस्तसदृश महात्म्याचे, रामकृष्ण परमहंसांचे प्रमुख शिष्य.

3 श्री डिकिन्सन स्वामी विवेकानंदांना सप्टेंबर १८९३ मध्ये भेटले होते. याच सालात परमहंस योगानंदांचा जन्म झाला (जाने. ५). योगानंद पुनः अवतार घेऊन अमेरिकेत भारतीय तत्त्वज्ञान शिकविण्यास जातील हे विवेकानंदांना स्पष्टपणे माहीत होते.

श्री डिकिन्सन यांना ‘योगाचार्य’ ही पदवी १९६५ साली देण्यात आली. त्यासाठी लॉस एंजेलिस येथे सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपच्या केंद्र ठिकाणी समारंभ आयोजित केला होता. डिकिन्सन यांचे वय त्या वेळी ८९ होते. तरीही त्यांची प्रकृती सुदृढ होती व ते नेहमीप्रमाणे काम करीत होते.

परमहंसजींबरोबर ते पुष्कळदा प्रदीर्घ ध्यान करीत असत. दिवसांतून तीनदा क्रियायोगाच्या साधनेत ते कधीही चुकले नाहीत.

ते १९६७ साली ३० जूनला निवर्तले. त्याच्या दोन वर्षांपूर्वी योगाचार्य डिकिन्सन यांनी एस. आर. एफ.च्या संन्याशां पुढे प्रवचन केले होते. त्या वेळी त्यांनी एक गमतीची हकीकत सांगितली, जी ते परमहंसजींना सांगावयास विसरले होते. ते म्हणाले, ‘‘शिकागोला व्यासपीठावर स्वामी विवेकानंदांशी बोलण्याकरिता मी गेलो व त्यांना अभिवादन करण्यापूर्वीच ते मला म्हणाले, ‘‘तरुण मित्रा, तू पाण्यापासून दूर राहावे अशी माझी इच्छा आहे.’’’

प्रकरण - ४८

# 48. कॅलिफोर्निआमधील एन्सिनिटासमध्ये

“गुरुजी, आम्ही आपल्याला आश्चर्यचकित करून सोडतो! परदेशांत आपण गेला असताना आपल्या गैरहजेरीत, आम्ही हा एन्सिनिटासमधील आश्रम बांधून काढला. ह्या भेटीने आम्ही आपले परत स्वागत करतो!” असे म्हणून श्री लिन, ग्यानमाता, दुर्गा-मा आणि थोडे इतर शिष्य यांनी हसत हसत मला एका फाटकातून आत, दोन्ही बाजूंना झाडांची सावली असलेल्या एका पायरस्त्र्यावरून टेकडीवर नेले.

नीलवर्ण अशा सागराकडे न्याहाळून पाहणाऱ्या एका पांढऱ्याशुभ्र बोटीसारखी एक इमारत पुढे आलेली मी पाहिली. ती पाहून मी अगदी आश्चर्यचकित झालो. माझ्या तोंडून प्रथम शब्द बाहेर पडेनात. नंतर “वाहवा,” “फार छान” असे शब्द बाहेर पडले; आणि नंतर आनंद व कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या मानवाच्या तोटक्या शब्दांनी, माझे समाधान व्यक्त करीत, मी तो आश्रम पाहू लागलो. सोळा प्रशस्त भव्य अशी दालने; प्रत्येक दालन व्यवस्थितपणे व योजनाबद्ध बांधलेले व सुशोभित ठेवलेले!

मध्यभागी एक प्रशस्त सभागार; त्याला बाजूला तक्तपोशीपर्यंत पोचणाऱ्या उंच खिडक्या, सभोवार हिरवळ, महासागर आणि आकाश. पाचू, स्फटिक व इंद्रनीलमणी अशा तीन रत्नांचे मिश्रण. सभागारामधील भिंतीतल्या मोठ्या विस्तवाच्या जागेवरच्या फळीवर ख्रिस्त, बाबाजी, लाहिरी महाशय व श्रीयुक्तेश्वर यांच्या तसबिरी टांगलेल्या होत्या. ते महापुरुष ह्या पाश्चिमात्य शांत अशा आश्रमावर आपले आशीर्वाद प्रदान करीत असावेत असे मला वाटले.

सभागाराच्या अगदी खाली, तळघरात ध्यानासाठी तयार केलेल्या अशा दोन गुहा. गुहांच्या समोर अथांग महासागर व विशाल गगन. जमिनीवर खाली सूर्यस्नान घेण्याकरिता मुद्दाम बांधलेल्या खोल्या; पायरस्त्र्यांच्या दोन्ही बाजूंना खुणेचे दगड; त्या पायरस्त्र्यांच्या टोकाकडील प्रशांत असे लताकुंज, गुलाबाचे बगीचे, युकेलिप्टसची वृक्षराजी आणि खाली पसरलेली विस्तृतशी फळबाग.


संत-महात्म्यांचे पुण्यवान व धैर्यशाली आत्मे येथे वास करोत (झेंद-अवेस्तामध्ये “निवासस्थान मिळावे” म्हणून एक प्रार्थना आहे व ती आश्रमाच्या दरवाजावर लिहिलेली आहे) आणि ते आमच्या बरोबर हातात हात घालून दुसऱ्यांची दुखणी बरी करण्याची त्यांची विद्या आम्हांस शिकवोत. ही विद्या पृथ्वीस पुरून उरेल व स्वर्गापर्यंत पोहोचेल!

कॅलिफोर्निआमधील एन्सिनिटास येथील ही मोठी मिळकत जेम्स जे. लिन यांनी सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपला देणगी म्हणून दिली आहे. त्यांनी जानेवारी १९३२ मध्ये क्रियायोगाची दीक्षा घेतली व तेव्हापासूनचे ते अगदी निष्ठावंत क्रियायोगी आहेत. श्री लिन हे अमेरिकेतील मोठे उद्योगपती असून त्यांचा व्यवसायाचा व्याप फार मोठा आहे. (अवाढव्य तेलाच्या कारखान्यांचे प्रमुख व आगीच्या विम्याचा व्यवसाय करणाऱ्या जगातल्या सर्वांत

मोठ्या कंपनीचे अध्यक्ष); इतके व्याप असूनही मि. लिन हे दररोज प्रदीर्घ आणि सखोल क्रियायोग ध्यानाला वेळ काढतात. अशा तऱ्हेने समतोल जीवनक्रम व्यतीत करत त्यांनी समाधीमधील अखंड शांतीचा दिव्य अनुभव प्राप्त करून घेतलेला आहे.

हिंदुस्थानात व युरोपात मी प्रवास करीत असताना (जून 1935 ते ऑक्टोबर १९३६ या दरम्यानच्या काळात) श्री लिन [1] यांनी प्रेमाच्या पोटी कॅलिफोर्निआमधील माझ्या पत्रव्यवहार करणाऱ्या मंडळींशी अशी व्यवस्था करून ठेविली होती की मला एन्सिनिटास येथे आश्रमाचे बांधकाम चालल्याचे काहीही वृत्त कळू नये. आणि त्यामुळे आता तो आश्रम प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिल्यावर मला काय आश्चर्य वाटले! काय आनंद वाटला!

अमेरिकेला गेल्यावर अगदी सुरुवातीच्या काळात मी कॅलिफोर्निआचा सारा किनारा, सागरतीरी आश्रम तयार करण्यासाठी योग्य अशी जागा शोधण्याकरिता पालथा घातला. जेव्हा जेव्हा सोयीची अशी एखादी जागा माझ्या ध्यानात येत असे, तेव्हा तेव्हा काही तरी विघ्न मध्ये येऊन ती जागा निश्चित करण्यापासून माझे मन परावृत्त होत असे. एन्सिनिटासमधील सूर्यप्रकाशाने न्हाऊन गेलेली ती अनेक एकरांची जमीन जेव्हा मी न्याहाळी, तेव्हा मला कित्येक वर्षांपूर्वी श्रीयुक्तेश्वरांनी जी भविष्यवाणी केली होती, तिची पूर्तता झाल्याची सदय अंतःकरणाने आठवण होई. — “समुद्रकिनाऱ्यावरील हिरव्यागार झाडीतील .... आश्रम.” [2]



*परमहंस योगानंद आणि जेम्स जे. लिन्न, नंतरचे राजर्षि जनकानंद. गुरु आणि शिष्य यो.स.सो./एस.आर.एफ. चे जागतिक मुख्यालय, लॉस एँजेलिस येथे ध्यानस्थ बसले असतांना, 1933 मध्ये. "काही जण म्हणतात, 'पाश्चात्य व्यक्ति ध्यान करू शकत नाही,' ते खरे नाही," योगानंदांनी म्हटले होते, "जेव्हा पासून श्री लिन्न ना क्रियायोग मिळाली आहे तेव्हापासून मी त्यांना कधीही अंतरितील ईश्वराशीच्या संवादावाचून पाहिलेले नाही."*

त्यानंतर काही महिन्यांनी, १९३७च्या ईस्टरमध्ये नवीन आश्रमातील त्या हिरवळीवर ईस्टरमधील सकाळची प्रार्थना घ्यावयास सुरुवात केली. जुन्या युगातील ज्ञानी पुरुषांप्रमाणे, माझ्याकडे तो दैनिक चमत्कार अनुभवीत असलेले ते कित्येक शेकडो विद्यार्थी भक्तिपूर्ण अंतःकरणाने आ वासून पाहत असत. पूर्वक्षितिजावरील सूर्योदयाच्या वेळचा विधी. पश्चिमेकडे अथांग असा पैसिफिक महासागर त्याचे गुणगान करीत पहुडलेला आहे. दूर अंतरावर एखादी लहानशी नौका पाण्यावर तरंगत आहे, मध्येच एखादा समुद्र-पक्षी एकटाच उडत आहे. “येशू; तू आता उठला आहेस!” केवळ त्या आकाशस्थ सूर्याप्रमाणेच नव्हे तर आत्म्याच्या शाश्वत उषःकालाप्रमाणे.

असेच आणखी कित्येक महिने मजेत गेले. एन्सिनिटासमधील त्या पूर्ण सौंदर्यपरिसरात बरेच दिवस मनात योजलेले “कॉस्मिक चँट्स” रचण्याचे काम पुरे केले. जवळजवळ चाळीस भजनांना मी इंग्लिश शब्दांचा पेहराव चढविला व पाश्चिमात्य संगीताची साथ दिली. त्या भजनात मी खालील स्तोत्रांचा, भजनांचा समावेश केला. शंकराचार्यांचे, “न मे मृत्युशंका न मे जातिभेदः” हे निर्वाणषट्क; पुरातन असे ब्रह्मस्तुतीचे स्तोत्र; टागोरांचे, “हृद्यमंदिरी मम कोण वसे?” ('हू ईज इन माय टेंपल'). पुष्कळशी भजने मी रचिली. “आय विल बी दाईन ऑल्वेज” (तुझा मी नित्य सर्वस्वी), “इन दि लँड बियॉण्ड माय ड्रीम्स” (स्वप्नसृष्टीपलीकडे), “आय गिव यू माय सोल कॉल” (मी देतो तुला हाक आत्म्याची), “कम, लिसन टू माय सोल साँग” (ऐक माझे आत्म गीत), आणि “इन द टेंपल ऑफ सायलेन्स,” (देउळी ह्या शांतशा). [3]

ह्या भजनाच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये ह्या पौर्वात्य भजनांविषयी पाश्चिमात्यांच्या प्रतिक्रियेबद्दलचा माझा पहिला ठळक अनुभव दिलेला आहे. तो प्रसंग न्यूयॉर्कमध्ये कार्नेगी हॉल या ठिकाणी, १८ एप्रिल १९२५ रोजी एका सार्वजनिक व्याख्यानाच्या वेळी घडून आला.

१७ एप्रिलला श्री ॲल्विन् हन्सिकर या अमेरिकन विद्यार्थ्याला मी म्हटले की, “मी आता श्रोतृवृंदाला 'ओ गॉड ब्यूटिफुल' [4] (ईश्वरा सुंदरा) हे एक जुने हिंदू भजन म्हणावयास सांगणार आहे.”

श्री हन्सिकर म्हणाले की, पौर्वात्य भजने ही अमेरिकींना एवढी चांगलीशी समजत नाहीत.

मी उत्तर दिले, “संगीताची भाषा जगाची एक आहे. ह्या अत्युत्कट भजनातील आत्म्याच्या आकांक्षेचा पडसाद अमेरिकन माणसाच्या हृदयात उठणार नाही असे नाही.”

त्या रात्री “ओ गॉड ब्यूटीफुल” या भजनाचे भक्तितत्पर सूर तीन हजारांवरील लोकांच्या मुखांतून एक तासापेक्षाही जास्त वेळ निनादले. प्रिय न्यूयॉर्कस्थ सज्जनांनो, आता यापुढे हताश होण्याचे तुम्हांला कारण नाही. एक साधेसुधे आनंदाने भरलेले स्तोत्रगीत म्हणता म्हणता तुमची हृदये उचंबळून आलेली आहेत. परमेश्वराचे पवित्र नाव मोठ्या भक्तीने घेऊन

ते भजन त्या दिवशी संध्याकाळी साधक म्हणत असताना त्यांच्यामध्ये दिव्य फरक होत असल्याचे आढळून आले.

१९३९ मध्ये मी बोस्टन येथील सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप (एस.आर.एफ.) केंद्राला भेट दिली. बोस्टन केंद्राचे प्रमुख, डॉ. एम. डब्ल्यू. लुईस यांनी माझी उतरण्याची व्यवस्था अगदी मुद्दाम आवर्जून शोभिवंत केलेल्या जागी केली आणि ते हसत हसत मला म्हणाले, “गुरुजी, अमेरिकेत जेव्हा तुम्ही प्रथम आलात तेव्हा तुम्हांला या शहरात एकाच खोलीच्या जागेत राहावे लागले; त्या खोलीला न्हाणीघर नव्हते. मला आता तुम्हांला असे दाखवायचे आहे की, बोस्टनमध्ये सर्व सुखसोयींनी युक्त व विलासी अशीही निवासस्थाने आहेत!”

कॅलिफोर्नियात अशीच बरीचशी वर्षे निघून गेली; आनंदात आणि कामाच्या अतिशय गडबडीत. १९३७ मध्ये एन्सिनिटासमध्ये एक एस. आर. एफ. वर्ल्ड ब्रदरहुड कॉलनी [5] स्थापन झाली. ह्या वसाहतीतील कार्य पुढीलप्रमाणे चालते: सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपच्या ध्येयानुसार साधकांस, त्यांची सर्वांगीण प्रगती करून देणारे शिक्षण दिले जाते. तसेच वसाहतीच्या आवारात विस्तृत प्रमाणावर लागवड केली जाते. तेथे तयार होणारा भाजीपाला एन्सिनिटास व लॉस एंजेलिस येथील केंद्रांमधील आश्रमवासियांच्या उपयोगास येतो.

“माणसाच्या साऱ्या राष्ट्रांना त्याने एका रक्ताचे करून टाकले आहे.” [6] ‘युद्धामुळे छिन्नविच्छिन्न झालेल्या ह्या जगाला आज जर कोणती तातडीची गरज असेल, तर ती जागोजागी आध्यात्मिक बैठकीवर, विश्वबंधुत्वाच्या तत्त्वावर उभारलेल्या अनेक वसाहती निर्माण करणे ही होय. “विश्वबंधुत्व” हा एक मोठा शब्द आहे. पण त्याचा थोडक्यात अर्थ असा की, माणसाने आपले सुहृद्यत्वाचे, सहानुभूतीचे क्षेत्र व्यापक करावे व आपण स्वतः ह्या अखिल जगाचे नागरिक आहोत ह्या दृष्टीने आचरण ठेवावे. आणि अशा भूमिकेनेच वर्तणारा नागरिक खऱ्याखुऱ्या अर्थाने समजू शकतो की, “ही माझी अमेरिका, हा माझा हिंदुस्थान देश, हे माझे फिलिपाईन्स, हे माझे युरोप, ही माझी आफ्रिका, वगैरे वगैरे.” आणि अशा तऱ्हेच्याच मनुष्याला खरोखरी उपयुक्त व सुखी आयुष्य कंठावयास कधीही अडचण पडणार नाही.

श्रीयुक्तेश्वरांचा पार्थिव देह हिंदुस्थानाव्यतिरिक्त कोणत्याही अन्य भूमीवर वावरला नाही तरी त्यांना हे विश्वबंधुत्वाचे तत्त्व पुरते माहीत होते:

“हे सारे जग माझीच जन्मभूमी आहे.”



*एस.आर.एफ. एन्सिनिटास आश्रमापाशी परमहंस योगानंद आणि फे राईट – नंतरच्या श्री दया माता, 1939 मध्ये.*
*एस.आर.एफ. आश्रमात फे राईट च्या प्रवेशानंतर लगेचच गुरूजी त्यांना म्हणाले होतेः "तू माझी 'भविष्यनिधी' आहेस. तू जेव्हा आलीस तेव्हाच मी जाणले की ईश्वराचे कित्येक खरे भक्त या मार्गाकडे ओढले जातील." ते एकदा प्रेमाने उद्गारले होते, "माझी फे, ती खुप चांगले कार्य करेल!....मला ठाऊक आहे की मी तिच्यामार्फत कार्य करू शकतो, कारण ती ग्रहणशील आहे."*



*सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिप आश्रम, एन्सिनिटास, कॅलिफोर्निया*



*टेकडीवर स्थित, प्रशांत महासागरावर दृष्टि टाकत असलेल्या एस. आर.एफ. एन्सिनिटास आश्रमाच्या धरतीवर परमहंस योगानंद, 1940*

1 परमहंसजींच्या महानिर्याणानंतर श्री लिन (राजर्षि जनकानंद) हे सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपचे व योगदा सत्संग सोसायटीचे अध्यक्ष झाले. आपल्या गुरूंबद्दल श्री लिन म्हणतात. ‘‘महात्म्याच्या सहवासात काय स्वर्गीय सुख आहे! ह्या आयुष्यात मला ज्या काही गोष्टींचा लाभ झालेला आहे, त्यांत परमहंसजींनी जो माझ्यावर अनुग्रह केला ती गोष्ट सर्वांत मौल्यवान अशी आहे. असे मी मानतो.’’ (प्रकाशकांची टीप)

श्री लीन यांनी १९५५ साली महासमाधी घेतली.

2 पान १६५ पाहावे.

3 योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया द्वारा प्रकाशित. ह्या ‘कॉस्मिक चँट्समधील काही भजनांच्या परमहंस योगानंदांच्या ध्वनिमुद्रिका घेऊन ठेवलेल्या आहेत, त्या योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया यांजकडे मिळतात. (प्रकाशकांची टीप)

4 गुरू नानकांच्या भजनातील शब्द खालील अर्थाचे आहेत:

ईश्वरा, सुंदरा हे ईश्वरा सुंदरा । ।
असशि तू हरित उपवनी ।
असशि तू उंच गिरिवरि ।
तटिनी जळी तू चंचल ।
गंभीर तू महदार्णवी ।
सेवका तू सेव्यभावी ।
प्रेमिका तू प्रेम निर्मळ ।
दुःखितांचे दुःख हरिसी ।
परमसुख तू योगीजनां ।
ईश्वरा सुंदरा, हे ईश्वरा सुंदरा ।
पदकमली तव नत मी । ।

5 आता तेथे एक आश्रमकेंद्र स्थापन झालेले आहे व त्याची भरभराट होत आहे. नवीन इमारती झाल्या आहेत. त्यात मूळचा मुख्य मठस्वामी व मातामंडळी यांच्याकरिता आश्रम, भोजनाची व्यवस्था व सभासद-चाहते यांच्यासाठी आकर्षक एकांतस्थान

यांचा समावेश होतो. त्या विस्तृत जागेवर मुख्य रस्त्रयाच्या समोर अनेक पांढरे स्तंभ उभारलेले आहेत व त्या स्तंभांच्या टोकावर सोनेरी पाकळ्यांची कमलपुष्पे बसविलेली आहेत. भारतीय चित्रकलेमध्ये कमलपुष्पास एक विशिष्ट स्थान आहे. मेंदूच्या जागी अवस्थित असलेले जे 'सहस्रार' चक्र त्याचे कमलदल हे प्रतीक आहे.

6 ॲक्ट्स १७:२६ (बायबल)

## प्रकरण - ४९

# 49. १९४०-१९५१चा काल

"आम्हांला आता ध्यानाची किंमत कळून चुकली आहे; आणि आमची आंतरिक मनःशांतता कशानेही बिघाड पावणार नाही हे आम्हांला आता पुरते कळून चुकले आहे. गेले काही आठवडे आम्ही ध्यानाला बसलो असताना हवाई हल्ल्याच्या धोक्याच्या सूचना आम्हांला ऐकू आल्या आणि जवळपास टाईमबाँब फुटल्याचे स्फोटही ऐकू आले; पण आमची विद्यार्थीमंडळी अशाही परिस्थितीत नियमितपणे जमतात व सामुदायिक ध्यानाचा व प्रार्थनेचा आनंद अनुभवितात." वरील धीरोदात्त मजकूर हा लंडनमधील सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप केंद्राच्या प्रमुखाच्या पत्रातील आहे. अशी अनेक पत्रे मला युद्धाच्या खाईत लोटलेल्या इंग्लंड व युरोपमधून मिळत असत. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने प्रवेश करण्यास अद्याप काही वर्षांचा अवधी होता.

लंडनमधील 'दि विस्डम ऑफ दि ईस्ट सेरीज' या मासिकाचे सुविख्यात संपादक, डॉ. एल. क्रैन्मर बिंग हे १९४२ साली मला एका पत्रात लिहितात:


"मी जेव्हा जेव्हा 'ईस्ट-वेस्ट' वाचतो तेव्हा तेव्हा मला कळून चुकते की, आपण दोघे वेगवेगळ्या जगात वावरत आहोत. लॉस एंजेलिसहून येणारी ही ईस्ट-वेस्टरूपी बोट आमच्या बंदरात प्रवेश करते. ती बोट आल्याने तेथून पाठविलेल्या सुंदरता, सुव्यवस्था, शांतता आणि निःस्तब्धता यांचा आम्हांला लाभ घडून येतो. शत्रूंनी घेरलेल्या ह्या आमच्या शहराला बोटीबरोबर आपले आशीर्वाद मिळतात व पवित्र पेला ज्याप्रमाणे मनास आनंद देतो, त्या प्रमाणे आम्हांस आनंद होतो.

"स्वप्नसृष्टीतील दृश्यांप्रमाणे आमच्या डोळ्यांसमोर आपल्या आश्रमातील ती तालवृक्षराजी, एन्सिनिटासमधील ते ध्यानमंदिर, त्याच्या आसमंतातील ती रमणीय पर्वतश्री व समोर पसरलेला प्रशांत महासागर ही सर्व दृश्ये झटकन येऊन जातात; आणि त्या सर्वांहूनही तेथे जमलेल्या पारमार्थिक विचाराच्या स्त्रीपुरुषांच्या बंधुभावनेचा ठसा आमच्या हृदयावर फार प्रामुख्याने उमटतो. पारमार्थिक विचाराचे हे सारे बंधुजन, एका एकत्वाच्या सूत्राने बद्ध झालेले असतात; काही एक विधायक कार्य करण्यात मग्न असतात आणि एकाग्रतेच्या अभ्यासामुळे त्यांची अंतःकरणे वारंवार उल्लसित होत असतात ... अशा बंधुजनांना एक सामान्य शिपाईगडी पहाट होण्याच्या अगोदर गस्त घालण्याच्या टॉवरमधून लिहीत आहे."

कॅलिफोर्निआमध्ये हॉलिवूड येथे सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप चर्च ऑफ ऑल रेलिजन्स एस. आर. एफ. कार्यकर्त्यांनी बांधले व १९४२ मध्ये अर्पण केले. नंतर एका वर्षाने कॅलिफोर्निआमध्ये सान डीयेगो येथे असेच एक एस. आर. एफ. मंदिर बांधले गेले आणि १९४७ मध्ये कॅलिफोर्निआमध्येच लाँगबीच येथे असेच एक चर्च तयार झाले." [1]

लॉस एंजेलिसमधील पैसिफिक पैलिसेडस भागातील फळाफुलांनी बहरलेले एक सुंदर उपवन एस. आर. एफ. संस्थेला १९४९ मध्ये दान म्हणून मिळाले. हे उपवन म्हणजे जगातील अत्यंत सुंदर व रमणीय अशा ठिकाणांतील एक ठिकाण आहे. या स्थानाचे एकंदर क्षेत्र बारा एकरांचे असून, हिरव्यागार टेकड्यांच्या मधोमध एखाद्या नैसर्गिक नाटकगृहाप्रमाणे ते बसलेले आहे. तेथे निसर्गदत्त असे एक सरोवर असून ते जणू ह्या पर्वतांच्या मुकुटावरून खाली पडलेल्या एका नीलमण्याप्रमाणे शोभून दिसते. ह्या अच्छोद सरोवरामुळे ह्या स्थानाला एस. आर. एफ. लेकश्राईन असे नाव मिळालेले आहे. ह्या परिसरात एक विचित्र असे डच पवनचक्कीगृह असून त्याच्या अंतर्भागी प्रशांत असे एक मंदिर आहे. खोलगट भागी एक बगीचा असून त्यामध्ये एक भव्य पाणचक्की संथपणे आपल्या तुषारांबरोबर संगीताचे सूर सोडीत असते. ह्या ठिकाणाला दोन संगमरमरी पुतळ्यांनी शोभा आणलेली आहे. हे पुतळे चीनमधून आणलेले आहेत. एक पुतळा भगवान बुद्धाचा असून दुसरा क्वान् यिनचा आहे (क्वान् यिन् म्हणजे जगन्मातेचे चिनी स्वरूप). एका जलप्रपाताच्या वरती टेकडीवर पुऱ्या आकृतीचा येशू ख्रिस्ताचा एक पुतळा उभारलेला आहे. त्या पुतळ्याची ती धीरगंभीर मुद्रा आणि खाली सोडलेला सैलसा व उठून दिसणारा आंगरखा हे रात्रीच्या वेळी विद्युत प्रकाशात चमकून दिसतात. मंदिराच्या आत भगवान श्रीकृष्ण आणि इतर अवतारी पुरुष यांचे पुतळे आहेत.

लेक श्राईन येथील महात्मा गांधी वर्ल्ड पीस मेमोरिअल १९५० मध्ये अर्पण केले गेले. त्या साली अमेरिकेत सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप संस्था स्थापन झाल्याला तीस वर्षे झाली. [2] हिंदुस्थानाहून पाठविलेली महात्मा गांधींच्या देहाची रक्षा त्या मेमोरिअलमध्ये एक जुन्या हजार वर्षापूर्वीच्या दगडी पेटीत प्रतिष्ठापित करुन ठेवली आहे.



*परमहंस योगानंद*
*सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिपच्या लेक श्राइनच्या समर्पणाच्या वेळी छायाचित्रित केलेले, पॅसिफिक पॅलिसेड्स, कॅलिफोर्निया, 20 ऑगस्ट, 1950*

१९५१ मध्ये हॉलिवूडला सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप—इंडिया केंद्र स्थापन झाले. ते अर्पण करण्याच्या प्रार्थना-विधीच्या वेळी कॅलिफोर्निआचे लेफ्टनंट गव्हर्नर श्री गुडविन् जे. नाईट व भारताचे कॉन्सल जनरल श्री एम. आर. आहुजा हे उपस्थित होते. त्या केंद्राच्या ठिकाणी आता मोठी दालने व सुमारे २५० माणसे बसतील असे एक सभागृह आहे.

एस. आर. एफ. केंद्रांमध्ये जे नवीन सभासद येतात त्यांना योगशास्त्राविषयीची जिज्ञासा फार असते. कधीकधी मला हा प्रश्न विचारला जातो की, "कांही संस्था सांगतात त्याप्रमाणे योगविद्या ही छापील मजकुराचा अभ्यास केल्याने बरोबर अवगत होणारी नसून, ती जवळच असणाऱ्या एखाद्या गुरूच्या मार्गदर्शनाखालीच अवगत होणे शक्य आहे, असे आहे की काय?"

ह्या अणुयुगात योगशास्त्राचे शिक्षण एस. आर. एफ. पाठांसारख्या [3] एका विशिष्ट क्रमानुसार पद्धतीने द्यावयास हवे; नाही तर ह्या मोक्षप्रदायिनी विद्येचे ज्ञान काही निवडक लोकांपुरतेच मर्यादित राहील. प्रत्येक विद्यार्थ्यास ह्या दिव्य ज्ञानामध्ये परिणत असा गुरू जर सन्निधच मिळाला असता तर ते एक मोठे अमोल वरदानच झाले असते. पण जगात खरे साधुसंत थोडेच असून "पापी" लोकांचाच भरणा जास्त असतो. अशा परिस्थितीत असंख्य लोकांना योगशास्त्राचे ज्ञान अप्रत्यक्ष पद्धतीनेच प्राप्त करून घेण्याखेरीज दुसरा मार्ग नाही. हे ज्ञान खऱ्या योगीजनांनी क्रमशः पाठांच्या स्वरूपात लिहून ठेवावे व ते पाठ जिज्ञासू अभ्यासकांच्या घरी पोचते करावे; व अशा तऱ्हेने त्यांना या शास्त्राच्या ज्ञानाचा लाभ घडवून द्यावा हा तो मार्ग आहे. याखेरीज दुसरा मार्ग नाही.

एकमात्र पर्याय हाच की सामान्य माणसाने ह्या योगशास्त्राच्या ज्ञानापासून वंचित राहावे; त्याला ह्या ज्ञानाचा लाभ घेता येऊ नये. परंतु ह्या नवीन युगाबाबत परमेश्वराची अशी इच्छा नसावी. सर्व निष्ठावंत क्रियायोग्यांना आपले ध्येय [4] प्राप्त करवून देण्याच्या दृष्टीने त्यांच्या साधनेत मार्गदर्शन करण्याचे आणि त्यांचे रक्षण करण्याचे वचन बाबाजींनी दिलेले आहे. त्या दिव्य प्रभूचे, परमपित्याचे आपण संतान आहोत हे नाते पुनरपि प्रस्थापित करण्याकरिता योग्य तो प्रयत्न जेव्हा मानवप्राणी करील तेव्हा अशा मानवाकरिता सुख, शांती व समृद्धी यांचा लाभ होणारा आहे. अशा तऱ्हेचे सुखसमृद्धीने परिपूर्ण भरलेले जग घडवून आणण्याच्या कामी, निर्माण करण्याच्या कामी, डझनांनी, किंवा शेकड्यांनी किंवा हजारांनी नव्हे तर लक्षावधी संख्येच्या क्रियायोग्यांची जरुरी आहे.

पाश्चिमात्य जगात सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप संस्थेची स्थापना करणे हे कार्य माझ्यावर माझे गुरू श्रीयुक्तेश्वर व माझे परम-परमगुरू बाबाजी यांनी सोपविलेले होते. अशी संस्था म्हणजे "आध्यात्मिक मध साचविण्यासाठी तयार केलेले एक मधाचे पोळेच" होय. हे कार्य, ही पवित्र जबाबदारी पुरी पाडण्याच्या कामी मला अनेक अडचणी आल्या.

"परमहंसजी, मला खरे सांगा. ह्या साऱ्या खटपटीचा काही उपयोग आहे का?" असा एक संक्षिप्त प्रश्न मला, एकदा संध्याकाळच्या वेळी, डॉ. लॉईड केनेल यांनी विचारला. डॉ. केनेल हे सान डियेगो येथील एस. आर. एफ. चर्चचे प्रमुख आहेत. माझ्या समजुतीप्रमाणे त्यांना असे विचारायचे होते की, 'तुम्हाला अमेरिकेत सुखसमाधान वाटले काय? योगविद्येचा प्रसार होऊ नये म्हणून जे काही चुकीच्या मार्गाने जाणारे लोक खटपट करीत असतात त्यांनी समाजात जी असत्ये पसरविली आहेत, त्यांबद्दल आपल्याला काय वाटते? संस्थेचे कार्य करीत असताना पुष्कळदा फसगतीचे प्रसंग आलेले आहेत; पुष्कळदा मनःस्ताप झालेला आहे, कधीकधी केंद्रांच्या प्रमुखांना बरोबर मार्गदर्शन करता आलेले नाही; कधीकधी विद्यार्थ्यांना बरोबर शिकविता आलेले नाही. त्याबद्दल आपल्याला काय म्हणावयाचे आहे?'

मी उत्तर दिले, "परमेश्वर ज्याची कसोटी घेतो, तो मनुष्य खरोखरीच भाग्यवान असतो. प्रत्येक वेळी माझ्या डोक्यावर काय बोजा ठेवावा हे त्याच्या पुरे स्मरणात असते." अशा वेळी माझ्या डोळ्यांपुढे ती निष्ठावंत विद्यार्थीमंडळी, त्यांचे ते माझ्यावरील निस्सीम प्रेम,

माझ्यावरील भक्ती व समजूतदारपणा; खरोखर ह्या सर्व गुणांनी अमेरिका देशाच्या ह्रदयाला तजेला दिलेला आहे. उजाळा आणलेला आहे. नंतर माझ्या शब्दांवर अल्पसा जोर देत मी पुढे बोलू लागलो, “ह्या सर्व प्रश्नांना माझे उत्तर होय असे आहे. हजार वेळा होय असे आहे. मला स्वप्नातही कल्पना कधी आली नाही की, इतक्या यशस्वी रीतीने मी पश्चिम व पूर्व यांना एकमेकांजवळ आणून, त्यांना आध्यात्मिक चिरंतन अशा बंधनाने बद्ध करून टाकले आहे.”

भारतातील ज्या महात्म्यांना पाश्चिमात्य जगाबद्दल आस्था वाटते, त्यांना आधुनिक काळातील परिस्थितीची पूर्ण कल्पना आहे. त्यांना हे पुरते माहीत आहे की, सर्व राष्ट्रांनी काही विशिष्ट असे पौर्वात्य व पाश्चिमात्य गुण समर्पकपणे आत्मसात केले नाहीत, तोपर्यंत जगातील स्थिती सुधारणार नाही. एका गोलार्धाला दुसऱ्या गोलार्धाच्या उत्तम अशा सदगुणांची जरुरी आहे.

मी जगभर प्रवास केला. मला जागोजाग दुःख आढळून आले. [5] मला वाईट वाटले. पुर्वेकडे ह्या दुःखाची कारणे ही भौतिक पातळीवर प्रामुख्याने आहेत, तर पाश्चिमात्य जगामध्ये दुःखाचा भर प्रामुख्याने मानसिक किंवा आध्यात्मिक पातळीवर असल्याचे मला आढळून आले. सर्वच राष्ट्रांना अशा असमतोल संस्कृतीचे दुःखद परिणाम भोगावे लागत आहेत. हिंदुस्थान व इतर अनेक पौर्वात्य देशांना अमेरिकेसारख्या पाश्चिमात्य राष्ट्रापासून पुष्कळ शिकण्यासारखे आहे. अमेरिकन लोकांचा व्यावहारिक दृष्टीचा व कार्यक्षमतेचा जर त्यांनी कित्ता गिरविला तर त्यांना पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. उलटपक्षी पाश्चिमात्य लोकांना जीवनामध्ये आवश्यक अशा आध्यात्मिक बैठकीची सखोल जाणीव आपल्या मनामध्ये बिंबविण्याची फार जरुरी आहे. ती त्यांना भारतापासून शिकता येण्यासारखी आहे. विशेषेकरून मनुष्यमात्राने जागृतबुद्धीने परमेश्वराशी संपर्क साधण्याचे ज्ञान, जे पुरातनकाळापासून भारताच्या भूमीवर प्रगत झालेले आहे, त्या तंत्राचा अभ्यास करणे पाश्चिमात्य जगाला फारच जरुरीचे आहे.



सर्व बाजूंनी विकसित झालेली अशी संस्कृती निर्माण करणे हे ध्येय केवळ कल्पनेतच राहणारे किंवा असंभाव्य आहे असे नाही. हजारो वर्षे भारतामध्ये ह्या दोन्ही गोष्टी, आध्यात्मिक दृष्टी व सुखसमृद्धी एकत्र अशा नांदलेल्या आहेत. हिंदुस्थानच्या प्रदीर्घ इतिहासामध्ये हा परवाचा २०० वर्षांचा दैन्याचा काळ म्हणजे त्या देशातील लोकांच्या पूर्वकर्माचा एक किंचित्काल टिकणारा, असा परिपाक आहे. जगाच्या इतिहासामध्ये कित्येक शतके 'हिंदुस्थानची संपत्ती' [6] असा परवलीचा शब्द झाला होता. समृद्धी, मग ती भौतिक असो की, आध्यात्मिक असो, ही 'ऋत' जे आहे त्यावर उभारलेली एक इमारत आहे. 'ऋत' म्हणजे विश्वव्यापक नियम अथवा सदाचार. ह्या दिव्यतेच्या देवतेमध्ये, निसर्गदेवतेमध्ये कृपणता अशी कोठेही नाही.

हिंदू धर्मशास्त्राची शिकवण अशी आहे की, मनुष्य हा जो ह्या विशिष्ट भूलोकाकडे आकर्षित केला जातो त्याचा हेतू हा की, त्याने आपल्या ठायी असलेल्या आत्म्याचा अधिक विकास होण्याकरिता प्रत्येक जन्माजन्मामधून क्रमाने अगणित मार्ग शिकावेत आणि भौतिक परिस्थितीवर वर्चस्व मिळवावे. हे महान सत्य पूर्व आणि पश्चिम ही वेगवेगळ्या पद्धतींनी शिकत असतात आणि म्हणून त्यांनी ह्या संशोधनात मिळालेल्या अनुभवाचा फायदा परस्परांना आनंदाने द्यावा. पृथ्वीवर जन्मास घातलेली आपली मुले प्रयत्नशील राहून आपली जागतिक संस्कृती दैन्य, रोगराई व आत्म्यासंबंधीचे अज्ञान ह्यांपासून मुक्त ठेवतात, हे पाहून त्या परमेश्वराला निःसंशय आनंदच होत असतो ही गोष्ट निर्विवाद खरी आहे. यात बिलकुल संशय नाही. मनुष्यास आपल्या आत्मिक सामर्थ्याचे विस्मरण होते (हे विस्मरण

त्याने आपल्या स्वतंत्र इच्छाशक्तीच्या [7] केलेल्या दुरुपयोगाचा परिणाम आहे); आणि हे त्याच्या सर्व दुःखांचे मूळ कारण आहे.



*श्री गुडविन जे. नाईट, कॅलिफोर्नियाचे ले.गव्हर्नर (मध्यभागी), श्री योगानंद आणि श्री ए. बी. रोज यांच्या सोबत, सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिप इंडिया सेंटर च्या समर्पणाच्या वेळी, हॉलीवुड, कॅलिफोर्निया येथे, 8 एप्रिल 1951*

"समाज" हा देवस्वरूप कल्पून त्या समाजाच्या शिरावर टाकलेली सर्व पातके वास्तविक पाहता प्रत्येक माणसाच्या [8] शिरावर टाकावयास पाहिजेत. कल्पनेचे मनोराज्य प्रथम आपल्या प्रत्येकाच्या स्वतःच्या हृदयामध्ये उगवायला पाहिजे आणि त्यानंतरच त्या मनोराज्याचा नागरिक-सद्गुणामध्ये विकास होऊ शकतो. अंतःशुद्धीमधूनच बाह्य शुद्धी परिणत होते, हा निसर्गाचा नियमच आहे. ज्या माणसाने आपल्या स्वतः ची प्रथम सुधारणा केली असेल, तोच मनुष्य इतर हजारो माणसांना सुधारू शकेल.

जगातील सर्व धर्मशास्त्रे ही कालाच्या कसोटीतून तावून सुलाखून निघालेली आहेत आणि ती तत्त्वतः एकच आहेत. माणसाने उच्च स्तराप्रत प्रगत व्हावे यासाठी ही धर्मशास्त्रे त्यास स्फूर्ती देत असतात. 'नवीन कराराच्या' काही भागांवर मी माझे भाष्य केलेले आहे आणि ते सेल्फ-रिअलायझेशन मैगेझीनकरिता मी माझ्या लघुलेखकास सांगत असताना माझा जो वेळ गेला तो माझ्या आयुष्यातील अत्यंत सुखाचा असा काळ होता. अत्यंत तळमळीने मी येशू ख्रिस्तास विनविले की, तुझ्या शब्दांचा, तुझ्या वाक्यांचा वास्तविक अर्थ शोधून काढण्याकरिता मला तू मार्गदर्शन कर. बायबलमधील पुष्कळ शब्दांचा अर्थ आज वीस शतके अगदी चुकीचाच लागलेला आहे.

एके दिवशी रात्री मी आपला शांतपणे प्रार्थनेत मग्न होतो. एन्सिनिटासच्या आश्रमामध्ये एका बैठकीच्या खोलीत मी बसलेलो होतो. इतक्यात त्या खोलीमध्ये नीलमण्यासारखा एक प्रकारचा निळसर प्रकाश भरून राहिला. आणि त्या प्रकाशात भगवान येशू ख्रिस्ताची देदीप्यमान मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली. येशू ख्रिस्ताची शरीरयष्टी अगदी पंचविशीच्या सुमाराच्या तरुण मनुष्याची होती. दाढी व मिशा तुरळक; पाठीमागे रुळणारे लांब केस आणि डोक्यावर त्या केसांच्या मधोमध भांग पाडलेला होता व मुखाभोवती सोनेरी रंगाचे तेजोवलय होते.

त्याचे डोळे चिरंतन स्वरूपाचे चमत्कृतीपूर्ण असे होते. त्या डोळ्यांतल्या अभिव्यक्तीमध्ये वारंवार जो सारखा दिव्य फरक होत होता त्यातील गर्भितार्थ मी माझ्या अंतःस्फूर्तीने समजून घेतला. त्याच्या त्या दिव्यदृष्टीमध्ये असंख्य विश्वांना धारण करण्याचे सामर्थ्य होते असे मला वाटले. त्याच्या मुखाशी एक पवित्र पेला मला दृष्टिगोचर झाला. तो तसाच माझ्या ओठापाशी आला आणि तेथून तो परत येशूकडे गेला. काही थोड्या क्षणांनी त्याने काही सुंदर शब्दांचा उच्चार केला. ते शब्द केवळ मलाच उद्देशून उच्चारलेले होते आणि म्हणून ते मी माझ्या हृदयात अगदी जपून ठेवलेले आहेत.

१९५० आणि १९५१ मध्ये कॅलिफोर्निआतील मोहावे वाळवंटाजवळील एका एस. आर. एफ. आश्रमामध्ये मी बरेच दिवस घालविले. तेथे राहून मी भगवद्गीतेचे भाषांतर केले आणि योगाच्या निरनिराळ्या मार्गांवरती मी एक सविस्तर टीका [9] लिहिली.

भारताच्या त्या सर्वोच्च धर्मग्रंथामध्ये एका योगक्रियेचा स्पष्टपणे असा दोनदा [10] उल्लेख केला गेलेला आहे. (भगवद्गीतेमध्ये सांगितलेला एकमेव योग आणि बाबाजींनी सोप्या शब्दांत सांगितलेला क्रियायोग हे दोन्ही एकच आहेत.) भारताच्या ह्या सर्वोच्च धर्मग्रंथामध्ये जो उपदेश केलेला आहे तो जसा नैतिक, आध्यात्मिक स्वरूपाचा आहे, तसा व्यावहारिक स्वरूपाचाही आहे. आपल्या स्वप्नसृष्टीच्या महासागरामध्ये श्वास हा एक भ्रम निर्माण करणारा विशिष्ट वादळाचा प्रकार आहे. त्या श्वासामुळे आपल्याला आपल्या ठिकाणी असलेल्या व्यक्तिविशिष्ट तरंगाची जाणीव होते. अशा तऱ्हेचे हे विविध तरंग निरनिराळी माणसे व इतर जड वस्तू निर्माण करतात. मनुष्याला आपल्या अहंतेची किंवा विवक्षित अस्तित्वाची जाणीव असते. खरे पाहिले तर त्याचे ते एक स्वप्नच असते आणि त्या स्वप्नामुळे त्याला जरा त्रासच होतो. ह्या स्वप्नाच्या अवस्थेतून त्याला उठविण्याकरिता नुसते तात्त्विक आणि धार्मिक ज्ञान देऊन कार्यभाग होत नाही, असे पाहिल्यावर भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाचे एका पवित्र विद्येकडे लक्ष वेधले. ह्या विद्येमुळे साधक-योगी आपल्या शरीरावर पूर्ण ताबा मिळवितो आणि आपल्या शरीराचे स्वेच्छेनुसार विशुद्ध अशा शक्तीमध्ये परिवर्तन घडवून आणतो. ही जी योगविद्येची मोठी कसरत आहे ती आधुनिक शास्त्रज्ञांच्या तात्त्विक विचारकक्षेच्या बाहेर बिलकुल नाही. आजच्या अणुयुगाचे हे आधुनिक शास्त्रज्ञ अग्रणी होत. सर्व वस्तुजात हे शक्तीमध्ये परिवर्तन पावू शकते ही गोष्ट आता प्रयोगांनी सिद्ध झालेली आहे.

हिंदू धर्मशास्त्रामध्ये योगविद्येची फार स्तुती केलेली आहे. कारण ही विद्या अशी आहे की, कोणत्याही साधारण माणसाने तिचा उपयोग करून घ्यावा. आता ही गोष्ट खरी की, प्राणाचे हे गूढ रहस्य मधूनमधून योगासारख्या तांत्रिक साधनेच्या प्रयोगाखेरीज उकलले गेलेले आहे. याचे उदाहरण द्यावयाचे म्हणजे असे की, हिंदूधर्मीयांव्यतिरिक्त अशा अवलियांनी परमेश्वरावरील आपल्या अत्युत्कट भक्तीने औपचारिक योगाभ्यासाशिवाय सिद्धी प्राप्त करून घेतल्या आहेत. असे ख्रिस्ती, मुसलमान व अन्य साधुसंत बरेच आहेत. त्यांनी सुद्धा श्वासरहित आणि निश्चल अशा सविकल्प समाधीचा [11] अनुभव घेतलेला आहे, असे आढळून आलेले आहे. सविकल्प समाधीखेरीज कोणत्याही साधकाला परमात्मदर्शनाच्या प्रथमावस्थेत प्रवेश करता येत नाही. (साधकाने ही निर्विकल्प समाधी प्राप्त करून घेतल्यावर तो परमात्मस्वरूपामध्ये पूर्ण विलीन होतो. तेथून त्याला पुनः परत बाहेर यावे लागत नाही. आणि त्या अवस्थेत तो गेल्यावर मग तो श्वास घेवो की न घेवो, तो स्थिर राहो, की चंचल राहो; असा प्रश्नच उरत नाही.)

१७व्या शतकातील ख्रिश्चन गूढवादी बंधू लॉरेन्स आपल्यास असे सांगतो की, त्याला परमात्मदर्शनाचा पहिला साक्षात्कार एक झाड पाहून झाला. आता जवळजवळ सर्व मनुष्यप्राण्यांनी झाड पाहिलेले आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, त्यांपैकी फारच थोड्यांना ते झाड पाहिल्यावर ते झाड निर्माण करणारा जो परमेश्वर त्याचे दर्शन झालेले आहे. अध्यात्ममार्गाने जाणाऱ्या सर्व धर्मातील एकाग्रचित्ती संतपुरुषांना अदम्य, उत्कट असे भक्तीचे सामर्थ्य विनासायास प्राप्त झालेले असते व तसे सामर्थ्य बहुतेक माणसांच्या ठिकाणी बिलकुल नसते. तरी सुद्धा सामान्य माणसाला [12] परमात्म्याशी संपर्क साधण्याच्या शक्यतेचा दरवाजा बंद करून टाकलेला नाही. आपल्या आत्म्याचे नष्ट झालेले स्मरण होण्यासाठी त्याने क्रियायोगाच्या तंत्राची साधना करावी. क्रियायोगाचा अभ्यास म्हणजे काही नैतिक दंडकांचे दररोज करावयाचे पालन आणि “हे परमेश्वरा, तुला जाणून घेण्याची मला तळमळ लागली आहे!” अशा तऱ्हेची कळकळीची प्रार्थना दररोज करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून घेणे हे होय.

योगविद्येची सर्व जगाला उपयुक्तता अशी आहे की, सर्वसाधारण मनुष्याला आपल्या दैनिक कार्यक्रमात आचरता येणाऱ्या शास्त्रीय पद्धतीने, साधनेने परमेश्वरप्राप्ती होऊ शकते. भक्तिमार्गाची उत्कटता साधारण माणसाच्या भावनाशक्तीच्या पलीकडील आहे.

हिंदुस्थानातील महान जैन उपदेशकांना तीर्थंकर म्हणतात. तीर्थ म्हणजे ‘नदीचे तीर पार करून देणारे.’ ह्या उपदेशकांना तीर्थंकर जे म्हणतात त्याचे कारण असे की, गोंधळून गेलेल्या व संत्रस्त झालेल्या माणसाला ह्या संसाररूपी वादळी समुद्रामधून पार पडण्याचा मार्ग ते दाखवितात. (संसार म्हणजे जन्म-मरणाचे रहाटगाडगे). शब्दार्थाने (संसार म्हणजे पुढे सरकते ते, म्हणजे सारखे बदलत जाणारे दृश्य जगत्.) संसारात राहिल्याने कमीत कमी लढण्याची, झगडण्याची सवय लागते. म्हणून “जो कोणी ह्या संसारी जगाचा मित्र होईल तो परमेश्वराचा शत्रू ठरेल.” [13] परमेश्वराचे मित्रत्व साध्य करावयाचे असेल, तर त्याला स्वतःची अनिष्ट कर्मे नाहीशी करावयास लागतील. ह्या पूर्वकर्मांमुळे तो ह्या मायावी जगाकडे

एखाद्या बंद्या गुलामाप्रमाणे निमूटपणे खेचला जातो. कर्मांविषयीच्या लोहसदृश नियमनाचे ज्ञान प्राप्त झाले म्हणजे ह्या कर्मपाशातून अंतिम मुक्तता मिळविण्याचा मार्ग जिज्ञासू व निष्ठावंत साधकाला खात्रीने सापडतो. मनुष्यप्राण्यांना ही जी कर्माची गुलामगिरी सहन करावी लागते, त्याचे मूळ कारण मायेने अंध झालेल्या चित्ताच्या वासनांमध्ये असते. आणि चित्तनिरोधावरच [14] योग्याच्या साधनेचा भर असतो. योगसाधनेने चित्तावर चढलेली कर्मजन्य अज्ञानाची पटले दूर होतात आणि मनुष्याला आपल्या खऱ्या स्वरूपाची ओळख होते.

ह्या पृथ्वीवर मनुष्यमात्राला जे काही काळ राहावे लागते, त्याचा हेतू एवढाच आहे की, त्याला जन्म आणि मरण यांचे रहस्य समजावे. जन्ममृत्यूच्या रहस्याचा श्वासाशी, प्राणाशी फार निकटचा संबंध आहे. श्वासविहीनत्व, निष्प्राणत्व म्हणजेच अमरत्व हे सत्य समजल्यामुळे ते ध्यानात ठेवून, हिंदुस्थानातील प्राचीन ऋषींनी श्वासोच्छ्वास हा एकमेव धागा पकडून, त्यावरून एक संक्षिप्त व विशुद्ध असे श्वासहीनतेचे शास्त्र तयार केले.

भारताने जगाला दुसरी काहीही देणगी दिली नसली, तरी क्रियायोगासारखे राजन्य अनुदान दिलेले आहे, ते पुरेसे आहे.

बायबलमध्ये असे कितीतरी उतारे आहेत की, ज्यांवरून असे स्पष्ट दिसून येते की, हिब्रू प्रेषितांना ही गोष्ट चांगली माहीत होती की, परमेश्वराने शरीर आणि मन यांना जोडणारा श्वास किंवा प्राण हा एक सूक्ष्म दुवा निर्माण केला आहे. 'जेनेसिस'मध्ये म्हटलेले आहे, "परमेश्वराने, त्या प्रभूने जमिनीवरील मातीमधून मनुष्य निर्माण केला आणि त्याच्या नाकपुड्यात प्राण घातला आणि अशा तऱ्हेने मनुष्य हा एक जिवंत आत्मा म्हणून तयार झाला." [15] मनुष्याच्या शरीरामध्ये जे रासायनिक व धातूंचे घटक आहेत तेच "जमिनीवरील मातीत" सापडतात. माणसाचा जड देह हा कोणत्याही तऱ्हेची क्रिया करीत नाही किंवा कोणत्याही प्रकारची गती किंवा शक्तीचा तो आविष्कार करीत नाही. प्राणप्रवाह त्या देहाला आत्म्याकडून श्वासामार्फत, वायूमार्फत जिवंतपणा पुरवितात. जर अबोध माणसांना असे चैतन्य पुरविले गेले नाही, तर ती माणसे काहीएक करू शकणार नाहीत. हे जे मनुष्याच्या शरीरामध्ये प्राणप्रवाह किंवा सूक्ष्म जीवनप्रवाह वाहत असतात ते पाच प्रकारचे आहेत. ह्या पंचप्राणांतून सर्वव्यापी अशा आत्म्याच्या ॐ स्पंदनाचा आविष्कार होत असतो.

शरीरातील पेशींवर जीवनाचे प्रतिबिंब किंवा पडछाया जी टाकली जाते, त्यामुळेच मनुष्याला शरीराबद्दल आसक्ती वाटते. तो मातीच्या एखाद्या ढेकळाबद्दल तसा इतका आदर किंवा तशी इतकी आस्था दाखविणार नाही हे उघड आहे. मनुष्यप्राणी आपल्या शरीराशी भ्रममूल असे जे तादात्म्य पावतो त्याचे कारण हे आहे की, आत्म्याकडून जीवनप्रवाह प्राणवायू घेऊन त्याच्या शरीरात इतक्या वेगाने वाहतो की, मनुष्य परिणामाला कारण समजून एखाद्या मूर्तिपूजकाप्रमाणे आपल्या स्वतःच्या शरीरालाच सजीव मानतो.

मनुष्याची जागृतावस्था म्हणजे शरीर व श्वास यांबद्दलचे त्यास असलेले भान. अर्धजागृत अवस्थेमध्ये म्हणजे झोपेत असल्याप्रमाणे त्याचे मन क्रियाशील असते; पण थोडा वेळ (अल्पकाळ), त्याचा शरीर व श्वास यांच्याशी संबंध तुटतो. इंद्रियातीत अवस्थेमध्ये त्याला

असे कळून चुकते की, शरीर व श्वास [16] ह्यांच्यावर आपले "अस्तित्व" अवलंबून नाही. हा एक भ्रम होता. त्याचे प्रतिबिंब म्हणून निर्मिलेला जो आत्मा त्याला ह्या इंद्रियातीत अवस्थेमध्ये अगदी प्रथमच अशी ह्या श्वसनरहित अवस्थेत स्वतःच्या स्वरूपाची जाणीव होते.

ज्या क्षणी आत्मा व शरीर ह्यांना सांधणारी श्वासरूपी कडी उत्क्रान्तिमय कर्माने तुटते, त्या वेळी "मरण" नावाने ओळखले जाणारे आकस्मिक स्थित्यंतर घडून येते. शारीरिक पेशी पुनरपि आपल्या नैसर्गिक अचेतनत्वाप्रत जातात; परंतु क्रियायोगी ही प्राणग्रंथी आपल्या इच्छेनुसार शास्त्रीय पद्धतीने तोडू शकतो; इतर सामान्य जनांसारखी कर्मिक आवश्यकतेच्या आघाताने नव्हे. योगी मनुष्यास प्रत्यक्ष अनुभवाने आपल्या मूलभूत अदेहीपणाचे ज्ञान झालेले असते आणि हा भौतिक देह भरवसा ठेवण्यासारखा नाही अशी मृत्यूकडून सूचना मिळण्याची त्याला जरूर राहत नाही.

जन्माजन्मांतून प्रत्येक मनुष्य आपापल्या पद्धतीनुसार व मान्यतेनुसार अशा देवत्वस्थितीप्रत प्रगती (आपापल्या चालीने, वेडीवाकडी का होईना) करीत असतो. अशा तऱ्हेची त्याची आगेकूच चालू असताना मरण त्याला रोखून धरत नाही. मरण केवळ त्याला पारलौकिक सूक्ष्म जगतामध्ये अधिक अनुकूल वातावरण निर्माण करून देते की, जेथे तो आपल्या मलाची विशेष रीतीने शुद्धी करू शकतो. "तू मनाला त्रास करून घेऊ नकोस. माझ्या पित्याच्या वाडीत मोठमोठ्या हवेल्या [17] आहेत." परमेश्वराने हा भूलोक किंवा याच्या वरचा भुवरलोक हे लोक रचण्यामध्येच आपली शक्ती व बुद्धी सर्वस्वी खर्च करून टाकलेली नाही. सारंगी वाजविण्यापेक्षा अधिक मनोरंजक असे आपल्या हाती परलोकात देण्यासारखे त्याच्याजवळ नाही काय?

मरण म्हणजे काही जीवनाचा शेवटला पूर्णविराम नाही किंवा जीवनातून कायमची मुक्तता नाही; किंवा मरण म्हणजे काही अमरत्वाचे प्रवेशद्वार नाही. ज्याने आपल्या आत्म्याला ह्या भूलोकाच्याच सुखांमध्ये तृप्त करून टाकलेले आहे, त्याला परलोकातील विविध प्रकारचे सूक्ष्म व तरल असे आनंदाचे प्रसंग उपभोगता येणार नाहीत. परलोकात तो केवळ सूक्ष्मतर दर्शनांचाच, दृश्यांचाच संग्रह करू शकेल आणि जे काही शिव (कल्याणरूपी) व सुंदर आहे; की जे दोन्ही एकरूपच आहे त्याचा अधिक संवेदनशीलतेने, जाणिवेने अनुभव घेऊ शकेल. मुमुक्षूने ह्या जड जगताच्या ऐरणीवरच आध्यात्मिक अमरत्वाचे सुवर्ण ठाकूनठोकून घेतले पाहिजे. अशा तऱ्हेने महाप्रयासाने मिळविलेला हा सोन्याचा खजिना आपल्या हातात घेऊन लोभी अशा यमराजाला एकमेव अशी त्याने स्वीकारण्याजोगी, देण्यासारखी देणगी आहे. ही देणगी देऊन मनुष्यप्राणी ह्या जन्ममरणाच्या फेऱ्यांतून कायमचा सुटतो, कायमची मुक्ती मिळवू शकतो.

कित्येक वर्षे मी एन्सिनिटास व लॉस एन्जेलिस येथे पातंजलीच्या योगसूत्रांवर व हिंदू तत्त्वज्ञानाच्या इतर गहन ग्रंथांवर वर्ग चालविले.



*एन्सिनिटास, कॅलिफोर्निया येथील एस.आर.एफ. आश्रमात परमहंस योगानंद, जुलै, 1950*



*योगानंदजी भारतीय राजदूतांचे स्वागत करीत आहेत*

*ह्या महायोग्याच्या निर्वाणाच्या अगदी तीन दिवसांपूर्वी, सेल्फ-रिअलाइझेशन फेलोशिपच्या लॉस एँजेलिस येथील आंतरराष्ट्रीय मुख्यालयात श्री योगानंदांसमवेत अमेरिकेतील भारताचे राजदूत श्री बिनय रंजन सेन, 4 मार्च 1952.11 मार्च, 1952 रोजी अंत्यसंस्काराच्या वेळी दिलेल्या स्तुतीपर भाषणात श्री सेन म्हणाले, "परमहंस योगानंदांसारखा पुरुष आज जर युनायटेड नेशन्समध्ये असता तर हे जग आजच्यापेक्षा खचितच चांगले झाले असते. माझ्या माहितीनुसार, भारतीय व अमेरिकन लोकांतील परस्पर संबंध वाढविण्याचे त्यांनी जेवढे कार्य केले, जितके स्वतःस अर्पण केले तेवढे इतर कोणीही केलेले नाही."*



*श्री श्री परमहंस योगानंद : "अंतिम स्मित"*

*त्यांच्या महासमाधीपूर्वी एक तास अगोदर, भारतीय राजदूत श्री बिनय रंजन सेन यांच्या सन्मानार्थ दिलेल्या मेजवानीच्या प्रसंगी घेतलेला फोटो, 7 मार्च 1952 रोजी, लॉस एँजेलिस, कॅलिफोर्निआ येथे.*

*ह्या फोटोत छायाचित्रकाराने त्यांचे प्रेमळ स्मित पकडले आहे; जे जणू त्यांच्या लाखो मित्र, विद्यार्थी व शिष्य यांतील प्रत्येकाला त्यांनी दिलेले अखेरचे आशीर्वादस्वरूपच भासत आहे. अनंतत्वामध्ये अगोदरच दृष्टी स्थिर झालेल्या त्यांच्या नेत्रांमधून अजूनही मनुष्यमात्रावरचे प्रेम व समज दृग्गोचर होत आहे.*

*परमेश्वराच्या ह्या अद्वितीय भक्तावर प्रत्यक्ष मृत्यूची विदारक शक्ती कार्य करू शकली नाही; त्यांच्या देहाने अगदी आश्चर्यकारक अक्षयत्व प्रकट केले.*

"परमेश्वराने आत्म्याची आणि शरीराची अशी ही सांगड का घालून दिली आहे?" वर्गातील एका विद्यार्थ्याने मला विचारले, "सृष्टीच्या ह्या उत्क्रांतिमय नाटकाला ही सुरुवातीची गती देण्यामध्ये त्याचा काय हेतू होता?" इतर असंख्य माणसांनी असाच प्रश्न अनेक वार विचारलेला आहे. तत्त्वज्ञान्यांना आजपर्यंत ह्या प्रश्नाचे समाधानकारक असे उत्तर देता आलेले नाही.

श्रीयुक्तेश्वर थोडेसे विनोदाने हसून कधीकधी म्हणत, "काही थोडी रहस्ये अनंत काळाला उलगडायला ठेवून द्या ना. मनुष्याची मर्यादित तर्कबुद्धी अजन्मी, अनादी अनंताचे अकल्पनीय हेतू कसे समजू शकेल? [18] दृश्य जगतामधील कार्यकारण-वादाच्या सिद्धांताने मर्यादित झालेली माणसाची तर्कबुद्धी अनादी आणि असृष्ट अशा ईश्वराच्या स्वरूपाचे गूढ रहस्य समजून घेण्याच्या कामी हतबुद्ध ठरते. तरीपण माणसाची तर्कबुद्धी सृष्टीचे हे कोडे उलगडण्याच्या कामी जरी कुचकामाची ठरली तरी प्रत्येक रहस्य शेवटी परमेश्वर स्वतःच आपल्या भक्तांना उलगडून दाखवतोच."

ज्या माणसाला ज्ञान मिळविण्याची तळमळ लागली आहे, तो ह्या दिव्य योजनेची ही साधी बाराखडी गिरविण्यात समाधान मानतो. कारण ह्या गोष्टीच्या शोधाकरिता त्याला अशीच सुरुवात करावी लागते जीवनाच्या "आइनस्टाईनच्या सिद्धांताचा" अगदी बिनचूक असा गणिती आलेख समजून घेण्याची तो घाई करीत नाही.

"कोणाही मनुष्याने आजवर कधीही ईश्वरास पाहिलेले नाही. (मर्त्य मनुष्य हा मायेचे [19] किंवा स्थलकालाचे सापेक्ष रूप असल्याने, त्या बंधनात तो अडकलेला असल्याने त्याला अनंतत्वाचे दर्शन होणे शक्य नाही.) पण पित्याच्या हृदयामध्ये विराजमान असा तो एकच पुत्र आहे आणि त्यानेच साकार रूप धारण करून आपल्या स्वतःला प्रकट केलेले आहे. [20] (प्रतिबिंबित झालेले कूटस्थ चैतन्य अथवा बहिर्मुखी, पूर्ण अशी प्रज्ञा, ही ओंकाराच्या द्वारा सगळ्या भौतिक दृश्य सृष्टीस मार्गदर्शन करीत असते; व ते करीत असताना परम ऐक्यामधून वैचित्र्याचा व विविधतेचा आविष्कार करण्यासाठी अजन्मा अशा दिव्यतेच्या कुहरामधून किंवा अंतरंगामधून प्रकट होत असते.)

येशू ख्रिस्ताने खुलासा करण्यासाठी असे सांगितले आहे, "खरे आहे, खरे आहे. मी तुम्हाला सांगतो की, पुत्र स्वतःचे असे काही करू शकत नाही. आपल्या पित्याला जे काही करताना पाहतो तेच तो करतो. पिता जे काही करतो त्याचप्रमाणे पुत्र करतो." [21]

ईश्वराची ही त्रिगुणात्मक प्रकृती ह्या दृश्यमान अशा विश्वामध्ये हिंदूशास्त्राप्रमाणे तीन प्रतीक स्वरूपांमध्ये प्रकट झालेली आहे. ब्रह्मदेव म्हणजे विधाता, विष्णू हा पालनकर्ता व शिव हा संहारकर्ता. ही त्रिगुणात्मक प्रकृती ह्या स्पंदनात्मक सृष्टीमध्ये अविरतपणे व्यक्त

होत असते. परमतत्त्व हे माणसाच्या विचारशक्तीच्या पलीकडील आहे म्हणून श्रद्धाळू हिंदू मनुष्य त्या परमतत्त्वाची ह्या त्रिमूर्तीच्या पवित्र मूर्तीमध्ये पूजा करतो. [22]

असे असूनही परमेश्वराचे हे विश्वाचे उत्पत्ती, पालन व संहार करणारे स्वरूप हे त्याचे अंतिम किंवा मूलभूत नाही (कारण ह्या विश्वाची निर्मिती ही केवळ त्याची लीला आहे; रचनात्मक खेळ आहे). [23] परमेश्वराच्या मूलभूत सत्य स्वरूपाचे ज्ञान त्रिमूर्तीची सर्व रहस्ये जाणूनही होणार नाही. कारण त्याचे बाह्य स्वरूप जे या दृश्य अशा अणुमय जगताच्या जड स्वरूपात प्रकट झालेले आहे, ते परमेश्वराचे मूळ स्वरूप दाखवीत नाही; फक्त त्याच्या कृतींचा आविष्कार करते. परमेश्वराच्या अंतिम स्वरूपाचे ज्ञान त्या वेळेलाच होते की ज्या वेळी "पुत्र पित्याकडे वरती जातो." [24] मुक्तात्मा त्या वेळी तरंगमय प्रदेशापार होऊन तरंगरहित अशा मूलतत्त्वामध्ये प्रवेश करतो.

मोठमोठे प्रेषित जरी झाले तरी अंतिम रहस्याची उकल करण्याकरिता आवर्जून विनंती केल्यावर सुद्धा ह्या प्रश्नाविषयी मौन बाळगतात. पायलेटने जेव्हा विचारले, "सत्य म्हणजे काय?" [25] तेव्हा येशू ख्रिस्ताने काही उत्तर दिले नाही. अर्थात पायलेटसारख्या लब्धप्रतिष्ठित बुद्धिवाद्यासारख्याचा हा अहंकारयुक्त प्रश्न त्याच्या जिज्ञासावृत्तीतून क्वचितच निघाला असेल. कारण आध्यात्मिक मूल्यांबद्दल [26] काहीएक श्रद्धा त्याच्या ठिकाणी नसल्यामुळे असे लोक पोकळ डौलाने असा प्रश्न विचारतात. त्यांना जणू वाटते की, आपण अगदी "मनमोकळे व पूर्वग्रहरहित" आहोत.

"ह्याच उद्दिष्टाकरिता मी जन्मास आलो आणि त्याच कार्याकरिता मी ह्या जगात प्रवेश केला, की ह्या सत्याचा मी साक्षात्कार करावा. जो सत्याचा प्रेमी असेल तो माझा उपदेश ऐकील." [27] ह्या थोडक्या शब्दांमध्ये येशू ख्रिस्ताने असंख्य गोष्टी सांगितल्या आहेत. परमेश्वराचा पुत्र आपल्या स्वतःच्या जीवनाने साक्षात्कार घडवून आणतो. तो म्हणजे सत्याचे प्रतीक. सत्य आणखीन त्याने स्पष्ट जर केले तर ते त्याचे औदार्य होय. कारण तसे स्पष्ट करण्याची तादृश जरूरीही नाही.

सत्य म्हणजे काही सिद्धांत नव्हे. सत्य म्हणजे काही तत्त्वज्ञानानुसार आधारलेली कल्पना नव्हे. सत्य म्हणजे काही बुद्धिवाद्यांची अन्तर्दृष्टी नव्हे. सत्य म्हणजे सत्स्वरूपाशी प्रत्यक्ष संपर्क. माणसाच्या दृष्टीने सत्य म्हणजे तो स्वतः आत्मा आहे; ह्या आपल्या खऱ्याखुऱ्या स्वरूपाचे न डळमळणारे असे ज्ञान. येशू ख्रिस्ताने आपल्या आयुष्यातील प्रत्येक शब्दाने आणि कृतीने असे सिद्ध केले की, त्याला आपल्या स्वरूपाचे सत्य माहीत होते. ते सत्य म्हणजे आपला उगम ईश्वराच्याचमध्ये आहे हे होय. आणि अशा तऱ्हेने विश्वव्यापी कूटस्थ चैतन्याशी संलग्न झाल्याचे तो साध्यासुध्या पण निश्चितार्थाच्या शब्दांत बोलू शकला की, "जो कोणी सत्याच्या पक्षाचा असेल त्याला माझा आवाज ऐकू येईल."

बुद्धाने सुद्धा अध्यात्मविद्येच्या अंतिम प्रश्नावर प्रकाश टाकण्यास इन्कार केला. त्याने फक्त वरवर एवढेच सांगितले की, माणसाने ह्या भूलोकावरील जे थोडे आयुष्य आहे त्याचा त्याने आपले नैतिक मूल्य परिपूर्ण करण्याकडेच उपयोग करावा हे उत्तम. चिनी गूढवादी लाओ-त्सू याची शिकवण अगदी बरोबर आहे. "ज्याला तत्त्व माहीत आहे, तो दुसऱ्याला

सांगत नाही आणि जो ते सांगतो ते त्याला माहीतच नसते." परमेश्वराविषयीचे अंतिम रहस्य हा काही चर्चेचा विषय नाही. त्याच्या ह्या स्वरूपाचे गुप्त रहस्य समजावून घेणे ही एक कला आहे. आणि ती कला अशी आहे की, ती एका माणसाला दुसऱ्या माणसाने शिकविता येणारी नाही. तेथे फक्त परमेश्वरच गुरू होय.

"निश्चल राहा आणि मी ईश्वर आहे हे समजावून घे." [28] परमेश्वराचा आवाज, त्याच्या सर्वव्यापकतेला बाधा न येता, अगदी निर्दोष अशा शांतीमध्ये, स्तब्धतेमध्ये ऐकू येतो. सृजनात्मक ॐकाराच्या स्पंदनाने तो हे सर्व विश्व गाजवून टाकतो आणि असा तो आद्य सनातन स्वर तत्क्षणीच आपल्या स्वतःचे अशा सुगम शब्दांमध्ये परिवर्तन करतो की, ते शब्द भक्ताला अगदी सहज आणि स्पष्टपणे समजावेत.

सृष्टी निर्माण करण्याचा परमेश्वराचा हेतू ह्या पद्धतीने मनुष्याच्या बुद्धीला समजावा, असा, वेदग्रंथांमध्ये विशद केलेला आहे. प्राचीन ऋषींनी असे सांगितले आहे की, प्रत्येक मनुष्यप्राणी हा आत्मा म्हणून परमेश्वराने निर्माण केला आणि तो असा की त्या आत्म्याने परमतत्त्वांत विलक्षण असा आविष्कार करावा. सर्व मनुष्यमात्र अशा तऱ्हेने ह्या दिव्य व्यक्तित्वाचा एकेक असा अंश आहे. सर्व माणसे परमेश्वराला सारखीच प्रिय असतात.

भारत हा सर्व राष्ट्रांमध्ये वडील भाऊ आहे. हे जे दिव्य ज्ञान भारताने साठविलेले आहे, त्या ज्ञानाची सर्व माणसे सारख्या हक्काने वारसदार आहेत. सर्व सत्याप्रमाणे वेदप्रणीत सत्य हेही परमेश्वराचे आहे; भारताचे नव्हे. ते महान ऋषी की, ज्यांच्या मनांनी वेदांमधील गूढ रहस्यांचे आकलन केले तेही मानवप्राणीच होते. त्यांनी ह्या भूलोकावरच जन्म घेतला होता. त्यांनी काही दुसऱ्या भूलोकावर जन्म घेतला नव्हता. त्या ऋषींना सर्वमानवतेची, मानव्याची समबुद्धीने सेवा करावयाची होती. सत्याच्या साम्राज्यात सर्व माणसे सारखी; तेथे राष्ट्राराष्ट्रांमध्ये किंवा वंशावंशांमध्ये भेदभाव निरर्थक आहेत. हे सत्य ग्रहण करण्यास एकच गुणवत्ता व ती म्हणजे आध्यात्मिक योग्यता.

परमेश्वर हा प्रेमस्वरूप आहे. सृष्टी निर्माण करण्याच्या त्याच्या हेतूचे मूळ, प्रेमातच आहे. हा एवढा साधा विचार मनुष्याच्या मनाला, अंतःकरणाला दिलासा देत नाही काय? त्याला पुस्तकी पांडित्याची काय जरुरी आहे? ज्याने ह्या सत्याच्या गाभ्याचा शोध घेतलेला आहे, तेथपर्यंत जो पोचलेला आहे, असा प्रत्येक संत-महात्मा निश्चयपूर्वक हेच सांगतो की, हे दिव्य विश्व एका योजनेबरहुकूम चाललेले आहे आणि ते सुंदर आहे; आनंदाने परिपूर्ण आहे.

इसाया प्रेषिताला परमेश्वराने आपला हेतू खालील शब्दांत सांगितलेला होता. [29]

माझ्या मुखातून जे काही बाहेर पडेल तो माझा शब्द; (सृजनकारी ओंकार) तो कधी निष्फळ असा परत येणार नाही. माझ्या इच्छेबरहुकूम तो आपले काम करून टाकील आणि ज्या ठिकाणी मी त्या शब्दास पाठविले त्या ठिकाणी तो समृद्धी आणील. तेव्हा तुम्ही जे बाहेर पडाल ते आनंदात बाहेर पडा आणि शांततेने वर्तत राहा. अशा तऱ्हेने जर तुम्ही वागलात तर हे पर्वत आणि हे डोंगर ह्यांच्यामधून संगीताच्या लकेरी बाहेर पडतील आणि मैदानातील ही सारी झाडे टाळ्या वाजवतील.

"तुम्ही जे बाहेर पडाल ते आनंदात बाहेर पडा आणि शांततेने वर्तत राहा." विसाव्या शतकातील परिस्थितीने भारावलेली माणसे ते अद्भुत वचन आतुरतेने ऐकत आहेत. ह्या वचनातील पूर्ण सत्य हे ईश्वराच्या प्रत्येक भक्ताने जाणलेले असते. तो भक्त मोठ्या बहादुरीने आपल्या वारसहक्काने आलेल्या मालमत्तेचा पुनरपि ताबा घेण्याचा प्रयत्न करीत असतो.

क्रियायोगाचा हा पवित्रसा प्रयोग पश्चिमेकडे आणि पूर्वेकडे नुकताच सुरू झालेला आहे. सर्व लोकांना असे समजून येवो की, मनुष्याच्या साऱ्या यातना, सारी दुःखे नाहीशी करण्याकरिता साक्षात्कार घडवून आणण्याचा एक निश्चित स्वरूपाचा, वैज्ञानिक पद्धतीचा तो तांत्रिक मार्ग आहे. चमकणाऱ्या रत्नांप्रमाणे जगभर पसरलेल्या हजारो क्रियायोगी साधकांना माझे प्रेमपूर्ण तरंग पाठवीत असताना मी पुष्कळदा कृतज्ञबुद्धीने विचार करू लागतो:

"परमेश्वरा, तू ह्या बैराग्याला केवढे मोठे कुटुंब दिले आहेस!"

1 लाँगबीच चॅपल छोटे पडू लागले म्हणून १९६७ सालाच्या सुमारास ते मंदीर (काँग्रेगेशन) कॅलिफोर्निआमधील फुलर्टन या शहरी सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपच्या एका विस्तृत मंदिरात नेऊन तेथे त्याची प्रतिष्ठापना झाली आहे. (प्रकाशकांची टीप)

2 हा वर्धापन दिन साजरा करण्याच्या वेळी मी लॉस एंजेलिसमध्ये २७ ऑगस्ट १९५० रोजी एक पवित्र उत्सव गुलाब-मेणबत्त्या वापरून साजरा केला. त्या उत्सवप्रसंगी मी ५०० विद्यार्थ्यांना क्रियायोगाची दीक्षा दिली.

3 ही सर्वसमावेषक गृह-अभ्यास माला योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया रांची, कडे उपलब्ध आहे, या संस्थेची स्थापना परमहंस योगानंदजींनी ध्यानाचे क्रियायोग विज्ञान आणि आध्यात्मिक जीवन पद्धति च्या प्रसारा साठी केली आहे. (पहा, पृ. ६९६) (प्रकाशकांची टीप)

4 परमहंस योगानंदजींनी पूर्व व पश्चिम अशा दोन्हीकडील विद्यार्थ्यांना सांगितलेले आहे की, सर्व क्रियायोग्यांच्या (योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप पाठांचे क्रियादीक्षा झालेले सदस्य. पहा, पृ. ४४६) योगसाधनेतील आध्यात्मिक प्रगतीवर मी या जगातून गेल्यावर सुद्धा माझे लक्ष राहील. ह्या त्यांच्या नितांतसुंदर अशा अभिवचनाचे खरेपण आता पूर्णपणे पटलेले आहे. कारण परमहंसजींनी महासमाधी घेतल्यानंतर पुष्कळ एस. आर. एफ./यो. स. सो. सदस्यांकडून पत्रे आलेली आहेत की, आम्हांला त्यांच्या सर्वव्यापक अशा मार्गदर्शनाचा लाभ नित्य होत असतो. (प्रकाशकांची टीप)

5 माझ्याभोवति नाद एक घुमतो प्रक्षुब्ध लाटेपरी
आहे का रसहीन भूमि तव ही? विद्रूप का एवढी? ।
होती का शकले तिची पसरती ते खंड चोहीकडे
सारे हे तुजपासुनी पळतसे काही न का ते ठरे । । १ । ।
याचे कारण जाण, पाहि निसटु तू माझियापासुनी
जे जे काय तुझे असे म्हणविशी ते घेत मी का बरे ।
हेतू त्यात नसे तुला किमपिही ते क्लेश सोसावया
हेतू हा इतकाच की मम करी त्वा येउनी शोधणे । । २ । ।
जे काही तव नष्ट तू समजशी, पुत्रास दोषी धरी
ते सारे जपुनी तुझ्यास्तव असे कोठीमधे ठेविले ।
चिंता सोडुनि कोणत्याहि परिची निभ्रांत चित्तासवे ।
ये वत्सा उठुनी धरी कर असा माझा मुदे निर्भरे । । ३ । ।
—फ्रॉन्सिस थॉम्पसन यांच्या "दि हाऊंड ऑफ हेवन" या कवितेमधील उताऱ्याचा अनुवाद.

6 अगदी १८व्या शतकापर्यंत हिंदुस्थान हा जगातील सर्व देशांमध्ये अत्यंत, सर्वांत जास्त संपन्न असा देश होता यास इतिहास साक्ष आहे. प्रसंगोपान्त नमूद करावेसे वाटते की, प्राचीन हिंदू वाङ्मयात किंवा परंपरेत पाश्चिमात्यांच्या वर्तमान प्रचलित ऐतिहासिक मतप्रणाली ला काहीच पुरावा आढळत नाही की आर्य लोक हे प्राचीन काळात आशियाच्या अन्य भागांतून किंवा यूरोपातून हिंदुस्थानात आले व त्यांनी या देशावर आक्रमण केले. हे काल्पनिक आगमन केव्हा सुरू झाले याचा तिथिनिर्णय विद्वान पंडितांना आतापर्यंत करता आलेला नाही. व तसा तो त्यांना का करता आला नाही हे समजून येण्यासारखे आहे. 'ऋग्वेदकालीन हिंदुस्थान' (ऋग्वेदिक इंडिया) नावाचा एक ग्रंथ अविनाशचंद्र दास यांनी लिहिलेला कलकत्ता विश्वविद्यालयाने १९२१ मध्ये प्रसिद्ध केलेला आहे. हा ग्रंथ मोठा अपूर्व व वाचनीय असा आहे. या ग्रंथात ग्रंथकाराने असे प्रतिपादन केले आहे की, हिंदभूमी हीच आर्यांचे प्राचीन, पुरातन वसतिस्थान होय; असा खुद्द वेदांमध्येच पुरांवा सापडतो. प्रा. दास असे लिहितात की, हिंदुस्थानातूनच प्राचीन काळात लोकवस्ती युरोप व आशिया या खंडांमधील वेगवेगळ्या भागांत स्थायिक झाली आणि तेथे त्या लोकांनी आपल्या आर्यभाषेचा व बोलीचा प्रसार केला. उदाहरणार्थ, लिथुआनियन भाषा. ही भाषा पुष्कळ अंशाने चटकन ध्यानात येण्यासारखी अशी संस्कृतसारखी भाषा आहे. कांट ह्या तत्त्ववेत्त्याला संस्कृतचा गंधही नव्हता. पण लिथुआनियन भाषेची सशास्त्र घटना त्याच्या जेव्हा ध्यानात आली, तेव्हा तो आश्चर्याने थक्क झाला. तो म्हणतो, "ह्या भाषेच्या ठिकाणी अशी एक गुरुकिल्ली आहे की, त्या गुरुकिल्लीमुळे तत्त्वज्ञानामधीलच नव्हे, तर इतिहासातल्या सुद्धा पुष्कळशा कूट प्रश्नांची उकल होते."

बायबलमध्ये हिंदुस्थानच्या समृद्धीचा उल्लेख आहे. एके ठिकाणी बायबलमध्ये असे लिहिले आहे की, "तारशीशच्या जहाजांमधून सॉलोमन राजाच्या दरबारात सोने, चांदी, हस्तिदंत, माकडे व मोर असे आणले" आणि "पुष्कळशी चंदनाची झाडे आणि रत्नांची मोठी रास" ही ओफीरहून (मुंबईकिनाऱ्याजवळील सोपारा) आणली. ग्रीक राजदूत मेगॅस्थेनीस (ख्रिस्तपूर्व चवथे शतक) ह्याने हिंदुस्थानातील समृद्धीचे मोठे सविस्तर वर्णन लिहून ठेवले आहे. प्लिनी (इ. स. चे पहिले शतक) असे लिहितो की, रोमन लोक दरसाल हिंदुस्थानातून आयात केलेल्या मालावर पाच कोटी सिस्टेर्सेस (५,०००,००० डॉलर्स) खर्चीत. त्या वेळी हिंदुस्थान हे एक मोठे दर्यावर्दी राष्ट्र होते. (II क्रॉनीकल्स ९:२१, १०)

चिनी प्रवाशांनी भारताच्या समृद्ध संस्कृतीबद्दल, तेथील मोठ्या प्रमाणावर असलेल्या ज्ञानाच्या प्रसाराबद्दल व अत्युत्तम शासनसंस्थेबद्दल वर्णन केलेले आहे. चिनी भिक्षू फाह्यान (पाचवे शतक) हा असे सांगतो की, हिंदुस्थानातील लोक हे सुखी, प्रामाणिक व धनवान आहेत. ह्या संबंधात सैम्युअल बील यांचे 'बुद्धिस्ट रेकॉर्डस ऑफ दि वेस्टर्न वर्ल्ड' (चिनी लोकांना हिंदुस्थान म्हणजेच

"पाश्चिमात्य जग" होते), ट्रबनर, लंडन व थॉमस वैटर्स यांचे 'ऑन युआन च्वांग'स ट्रॅव्हल्स इन इंडिया,' इ. स. ६२९-४५, रॉयल एशियाटिक सोसायटी, ही पुस्तके पाहावीत.

१५व्या शतकामध्ये कोलंबसाने जो नवीन जगाचा शोध लाविला तो शोध वास्तविक पाहता हिंदुस्थानाप्रत जाण्याचा, दळणवळणाचा अधिक जवळच्या मार्गाचा शोध होता. कित्येक शतके हिंदुस्थानातून माल आणण्याची युरोपला तळमळ लागून राहिलेली होती. नाना तऱ्हेची रेशमी वस्त्रे, बारीक मलमलीचे कापड (ते कापड इतके पातळ असे की, त्याला "विणलेली हवा" आणि "पारदर्शक धुके" अशी नावे मिळालेली होती), चिटाचे कापड, जिग, भरताचे काम, जरतारीचे काम, दुलया-रजया, चाक-कात्रया, चिलखते, हस्तिदंत व त्याच्या वस्तू, अत्तरे, ऊदधूप, चंदन, मातीची भांडी, औषधे, उटणी, तांदूळ, मसाले, प्रवाळ, सोने, चांदी, मोती, नीलमणी, पाचू आणि हिरे, अशा तऱ्हेचा हा माल असे.

पोर्तुगीज आणि इटालियन व्यापाऱ्यांनी विजयनगरच्या साम्राज्याचे (१३३६-१५६५), त्याच्या कल्पनातीत वैभवाचे, समृद्धीचे वर्णन लिहून ठेवलेले आहे. ते वैभव पाहून ते प्रवासी अगदी थक्क होऊन गेले होते. राजधानीच्या वैभवाचे वर्णन अरब राजदूत रझाक याने खालील शब्दांत केलेले आहे: "ह्या शहराच्या ऐश्वर्याशी जगातील इतर कोणत्याही ठिकाणच्या वैभवाची तुलना करता येणार नाही. हे ऐश्वर्य डोळ्यांनी कधी पाहिलेले नाही की कानांनी कधी ऐकिलेले नाही."

प्रदीर्घ अशा आपल्या इतिहासात प्रथमच असा १६व्या शतकात हिंदुस्थान देश बिगर-हिंदू राज्याखाली आला. तुर्कवंशीय बाबर बादशहाने ह्या देशावर १५२४ मध्ये स्वारी केली आणि येथे मुसलमान राजांची नवीन राजवट स्थापन केली. पण ह्या नवीन बादशहांनी ह्या देशामध्येच आपली कायमची वसती केली; व इथल्या संपत्तीचा ओघ परदेशात वळविला नाही. परंतु पुढे अंतःस्थ कलहांमुळे ही राजवट खिळखिळी झाली व हा समृद्ध हिंदुस्थान देश १७व्या शतकामध्ये अनेक लोभी अशा युरोपियन राष्ट्रांच्या कारवायांना बळी पडला. युरोपियन राष्ट्रांच्या ह्या आपापसातल्या झगड्यात, राज्यकर्ते म्हणून इंग्लंडने यश मिळविले. पुढे शांततेच्या मार्गाने हिंदुस्थान देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले.

इतर अनेक हिंदी लोकांप्रमाणे मलाही आता एक गोष्ट सांगावीशी वाटते. ती आता सांगावयास हरकत नाही. मी कॉलेजमध्ये शिकत होतो; त्या वेळी काही सहाध्यायी तरुणमंडळी पहिल्या महायुद्धाच्या वेळी माझ्याकडे आली आणि एक क्रांतिकारक चळवळ उभारण्याकरिता त्यांनी मला फार गळ घातली. मी त्यांच्या ह्या कळकळीच्या विनंतीला रुकार दिला नाही. मी म्हणालो, "आपल्या इंग्रज भाईबंधूंची हत्या करून हिंदुस्थानचे काही भले होणार नाही. हिंदुस्थानला स्वराज्य आध्यात्मिक सामर्थ्याच्याच जोरावर मिळेल; हिंसेच्या मार्गाने नव्हे." त्यानंतर मी माझ्या मित्रांना धोक्याची सूचनाही देऊन ठेविली की, ज्या दारुगोळ्यावर त्यांचा भर

होता तो दारूगोळा काही जर्मन जहाजांतून येत असून ती जहाजे बंगालमधील डायमंड हारबरमध्ये ब्रिटिशांकडून रोखिली जातील. पण आमच्या ह्या तरुण क्रांतिकारक मंडळींनी आपले काम ठरल्याप्रमाणे चालू केले. मी जी सूचना दिली होती त्याप्रमाणे त्यांचे काम बिनसू लागले व त्यांचे सगळे बेत फसले. त्यानंतर काही थोड्या वर्षांनी ती तरुण मंडळी तुरुंगातून सुटली. सुटका झाल्यानंतर त्यांनी हिंसामार्गावरील आपल्या श्रद्धेचा त्याग केला व त्यांच्यापैकी पुष्कळजण महात्मा गांधींच्या आदर्श अशा राजकीय चळवळीमध्ये सामील झाले. शेवटी अहिंसेच्या मार्गाने जाऊन शांततापूर्ण पद्धतीने चालविलेल्या अद्वितीय अशा "लढ्यामध्ये" त्यांनी जय मिळविला.

स्वातंत्र्य मिळाल्यावर हिंदुस्थानचे भारत व पाकिस्तान ह्यांमध्ये दुर्दैवाने विभाजन झाले; आणि त्या वेळी देशामधील काही भागांत थोडे दिवस जो रक्तपात झाला त्याचे वास्तविक कारण आर्थिक स्वरूपाचे होते. त्यात धार्मिक माथेफिरूपणाचा फारसा भाग नव्हता. (सदर दुर्दैवी घटनेमध्ये जे दुय्यम कारण आहे ते खोडसाळपणे मुख्य कारण सांगितले गेले) असंख्य हिंदू आणि मुसलमान हे पूर्वापारपासून आजवर शेजारी शेजारी गुण्यागोविंदाने नांदत आलेले आहेत. दोन्ही धर्मांचे असंख्य लोक पंथनिरपेक्ष अशा महात्मा कबीराचे (१४५०-१५१८) शिष्य झालेले आहेत; आणि आजही कबीरपंथीय नावाने ओळखिले जाणारे त्यांचे लाखो शिष्य आहेत. थोर अशा अकबर बादशहाच्या मुसलमान राजवटीत साऱ्या हिंदुस्थानभर प्रजेला धर्मस्वातंत्र्य अगदी भरपूर प्रमाणात दिलेले होते आणि आजही ह्या साध्याभोळ्या लोकांच्या ९५ टक्के लोकांमध्ये कोणत्याही तऱ्हेचे गंभीर स्वरूपाचे धार्मिक वैमनस्य नाही. खरा हिंदुस्थान की, ज्याला महात्मा गांधींची पुरती ओळख झालेली आहे, आणि जो महात्मा गांधींच्या पाठोपाठ जातो तो मोठमोठ्या गजबजलेल्या शहरांत नसून जेथे शांततेचे साम्राज्य नांदत आहे अशा ७००,००० गावांमध्ये आहे. ह्या गावांमध्ये अनादी कालापासून ग्रामपंचायतीमार्फत साध्या व न्यायावर आधारलेल्या पद्धतीवर राज्यकारभार चालत असतो. नवीनच स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानपुढे आज जे प्रश्न निर्माण झालेले आहेत ते यथाकाल अशाच महात्म्यांकडून खात्रीने सोडविले जातील. अशा महात्म्यांची हिंदुस्थान देशाला कधीच वाण पडलेली नाही.

7 सेवा आमुचि होत या क्षितिवरी स्वच्छंद बुद्धी जशी  
कोणा आदर प्रेमभाव कवणा, दाबू घृणाही तशी।  
युक्तायुक्त असे मुळी न बघता चाले जनी जीवन  
यामध्ये कधि येतसे यश कधी दुष्कीर्तिही होतसे।। १।।  
कोणी दुर्गति घोरशी अनुभवे त्याची अवज्ञा जशी  
स्वर्गातून पडून जात नरकी, ज्या अंत ना खालती।  
कोठे दिव्य स्थिती, कुठे अवनती, उच्चत्व नीचत्व ते  
दुर्दैवी मनुजा पडे नियतिने ह्या जन्मि भोगावया।। २।।

—मिल्टन, 'पॅराडाइझ लॉस्ट'

8 हे सारे जग परमेश्वराच्या 'लीले'मुळे अस्तित्वात आलेले आहे. 'लीला' म्हणजे स्रष्टा व सृष्टी यांमधील संबंध होय. ईश्वराला भेट म्हणून अर्पण करण्यासारखी फक्त एकच गोष्ट मनुष्याजवळ त्याची स्वतःची अशी आहे. ती म्हणजे त्याचे प्रेम. ते प्रेम परमेश्वराला अर्पण केले असताना त्याच्या कृपादृष्टीचा वर्षाव होतो. "तुम्ही मला लुटलेले आहे; तुम्ही ह्या सर्व लोकांना, ह्या राष्ट्राला लुटलेले आहे. तुम्ही लुटून आणलेल्या सर्व भेटी, सर्व चिजा ह्या कोठारामध्ये आणून टाका, म्हणजे माझ्या घरी खाद्यपदार्थांचा भरपूर पुरवठा होईल आणि ते अन्न मी सर्वांना वाटू शकेन," अशा तऱ्हेचे भाषण यजमानांच्या प्रमुखाने केले. तो पुढे म्हणाला, "जर मी तुमच्याकरिता स्वर्गाचे दार उघडले नाही आणि तुमच्यावर अनुग्रह केला नाही तर हे सर्व ठेवण्याकरिता येथे जागाच राहणार नाही."

— मैलैची, ३:९-१० (बायबल)

9 भगवद्गीतेवरील ह्या माझ्या टीकेचा मजकूर सेल्फ-रिअलायझेशन मैगेझिनमधून प्रसिद्ध होत असतो. भगवद्गीता हा भारताचा सर्वांत मोठा आवडता धर्मग्रंथ आहे. त्यात भगवान कृष्णाने आपला शिष्य जो अर्जुन, यास जो उपदेश केला तो दिलेला आहे. ह्या उपदेशात जे आध्यात्मिक मार्गदर्शन केलेले आहे ते सदासर्वकाळी साधकांना सारखेच लागू पडणारे आहे.

10 भगवद्गीता ४:२९ व ५:२७-२८

11 (प्रकरण २६ पाहावे.) ख्रिस्ती सिद्ध योग्यांमध्ये ज्यांना सविकल्प समाधीचा अनुभव प्राप्त झालेला आढळून आलेला आहे, अशांमध्ये ॲविलाच्या सेंट थेरेसाचा उल्लेख करता येईल. तिचे शरीर इतके निश्चल बनून राही की, मठातल्या इतर संतिणी आश्चर्याने थक्क होऊन जात. त्यांना तिची आसनाची बैठक बदलताही येत नसे किंवा तिला त्या समाधीतून बाह्य अशा भौतिक जगात आणताही येत नसे.

12 "सामान्य माणसाने" अध्यात्ममार्गावर सुरुवात कोठे तरी, केव्हा तरी करावयास पाहिजेच असते. लाओत्सूने म्हण्टलेले आहे की, "हजार मैलांच्या प्रवासात सुरुवात एकच पाऊल टाकल्याने होते." भगवान बुद्धाचे ह्या संबंधात असेच एक वचन आहे; ते असे: "कोणत्याही मनुष्याने आपल्या अंतर्यामातून उठणाऱ्या सत्प्रेरणेला तुच्छ समजू नये आणि असे म्हणू नये की, त्याची मला

प्राप्ती होणार नाही. पाण्याचे लहान लहान थेंब पडूनच घडा भरला जातो. माणसाने थोडे थोडे पुण्य गोळा करीत गेले तरी तो शेवटी सत्प्रवृत्तींनी, सद्‌गुणांनी परिपूर्ण होतो."

13 जेम्स ४:४ (बायबल)

14 यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता
योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः । । १९ । ।
यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति । । २० । ।
सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम् ।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः । । २१ । ।
यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते । । २२ । ।
तं विद्याद् दुःखसंयोगवियोगं योगसञ्ज्ञितम् ।
स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्ण चेतसा । । २३ । ।

—भगवद्‌गीता: अध्याय, ६ श्लोक १९-२३.

भावार्थः जेथे वारा नाही अशा ठिकाणी ठेवलेल्या दिव्याची ज्योत जशी फडफडत नाही, तसे योग्याचे मन असते. विकारांच्या वादळापासून ते अलिप्त असते. ते परमात्मस्वरूपी प्रज्वलित झालेले असते. त्या मनात कसलाही विचार येत नाही. एकाग्रतेच्या साधनेने जे निरुद्ध केलेले असते, ते आपल्याच स्वरुपाने निजस्वरूप पाहते आणि त्यातच संतोष मानून राहते आणि आत्यंतिक सुखाचा अनुभव घेते. ते सुख फक्त बुद्धीलाच, आत्म्यालाच समजते. इंद्रियांना त्याचे ज्ञान होत नाही. ते सुख इंद्रियातीत असते. त्या सुखाचा एकदा लाभ झाला, म्हणजे मनाला दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची वांच्छा अशी राहत नाही. दुसरा कोणताही लाभ याहून जास्त असत नाही. आणि त्या लाभात एकदा सुव्यवस्थित झाल्यावर कोणतीही मोठी आपत्ती येवो, ते मन विचलित होत नाही. त्या स्थितीला योग म्हणावे. कोणत्याही दुःखाच्या संयोगापासून वियुक्त अशी ती स्थिती असते. ही स्थिती ज्याला प्राप्त झाली, तोच पूर्णार्थाने खरा योगी होय.

15 जेनेसिस २:७ (बायबल)

16 "जोपर्यंत प्रत्यक्ष समुद्र तुमच्या नसानसांमधून वाहू लागत नाही; जोपर्यंत तुम्ही आकाशरूपी वस्त्र धारण केलेले आहे, आणि तुमच्या डोक्यावर तारकांचा मुकुट आहे; जोपर्यंत ह्या साऱ्या जगाचे आपण एकमेव वारस आहोत असे तुम्ही समजून घेत नाही, कारण तुमच्याचप्रमाणे ह्या जगातील इतर मनुष्य तुमच्यासारखाच ह्या जगाचा एकमेव वारस आहे, ही जाणीव तुम्हास झालेली नाही; कंजुष मनुष्य धनसंग्रहामध्ये आणि राजा आपल्या सत्तेच्या उपभोगामध्ये ज्याप्रमाणे रंगून जातो, त्याप्रमाणे जोपर्यंत तुम्ही परमेश्वराच्या ठिकाणी गाऊ, नाचू आणि आनंदाने रंगून जात नाही. जोपर्यंत तुम्ही तुमच्या नित्यातल्या आणि संसारी गोष्टीबद्दल फार आसक्त आहात; तुम्ही जोपर्यंत परमेश्वराने युगायुगांमधून निर्माण केलेल्या वस्तुमात्राशी तितक्याच आसक्तीने परिचित आहात; जोपर्यंत ह्या मायेमधून, शून्यामधून हे जे जग निर्माण झाले त्याच्याशी तुम्ही अगदी निकट असे निगडित राहिलेले आहात; तोपर्यंत ह्या जगातील वास्तव्याची, मुक्कामाची खरीखुरी मौज तुम्हांला अनुभविता येणार नाही." —थॉमस ट्रेहर्न, 'सेंचरीज ऑफ मेडिटेशन'मध्ये.

17 जॉन १४:१-२ (बायबल)

18 "कारण माझे विचार म्हणजे तुझे विचार नव्हेत. तुझा मार्ग म्हणजे माझा मार्ग नव्हे, असे परमेश्वराने म्हटलेले आहे. कारण हे पाहा की, पृथ्वीहून स्वर्ग जसा अधिक उंचीवर आहे तद्वत तुझ्या मार्गापेक्षा माझा मार्ग उच्च आहे व तुझ्या विचारांपेक्षा माझे विचार उच्च आहेत." —इसाया ५५:८-९. (बायबल)

डांटे याने आपल्या 'द डिव्हाईन कॉमेडी'मध्ये हाच दाखला दिला आहे. असेच निक्षून सांगितले आहे.

"होता भाग्यवशे सुखात रमलो स्वर्गातल्या जीवनी
व्योमी जेथ प्रकाश ये, प्रभुकृपे ते तेज हो आगळे ।
जो कोणी परतूनि ये तिथुनि त्या ज्ञान वा चाटुता
त्याचे कारण हेच की विषय जो वर्णावया घेतला । । १ । ।
त्याचे सन्निध येत तोच प्रतिभा हो जात भारावुनी
का की जो पथ आक्रमून परतू पाही न ये मागुता ।
जे काही पण ठेविले स्मृतिमधे त्या दिव्य विश्वातले
त्याचे वर्णन येथ मी करितसे जो गीत हे संपते । । २ । ।"

19 पृथ्वीची ही आपल्या आसाभोवती जी दैनंदिन गती आहे, की जिच्यामुळे प्रकाश व अंधार हा आलटूनपालटून होत असतो, ती मनुष्याला वारंवार आठवण करून देत असते की, ही सारी सृष्टी केवळ *माया* आहे आणि ती परस्परविरोधी गुणांनी किंवा भावांनी भरलेली आहे. (आणि म्हणून दिवस व रात्र याच्या संधिकाळाच्या वेळा, सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळा ध्यानाच्या दृष्टीने फार शुभ मानलेल्या आहेत.) मायेचे हे द्विविध आवरण किंवा पटल भेदून योगी पूर्ण एकत्वाची स्थिती प्राप्त करून घेतो.

20 जॉन १:१८ (बायबल).

21 जॉन ५:१९ (बायबल).

22 ह्या त्रिमूर्तिरूपक सत्याची एक वेगळी कल्पना आहे. ती म्हणजे सत् तत् ओम्. किंवा पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा. ब्रह्मा, विष्णू आणि शिव ही ईश्वराची तीन स्वरूपे आहेत. त्यांपैकी तत् किंवा पुत्र ह्यामध्ये स्पंदनात्मक सृष्टीमध्ये व्यापून राहिलेले कूटस्थ चैतन्य व्यक्त होते. शक्ती ही त्रिमूर्तीची अर्धांगी होय आणि ती ओंकाराचे किंवा पवित्र आत्म्याचे प्रतीक होय. हा ओंकार समस्त सृष्टीला स्पंदनाने कारणीभूत राहिलेला असतो.

23 "हे प्रभो, ... तू ह्या सगळ्या वस्तू निर्माण केल्यास आणि केवळ तुझ्या सुखाकरिता त्या निर्मिलेल्या आहेत व होत्या." — रेव्हिलेशन ४:११ (बायबल).

24 जॉन १४:१२ (बायबल)

25 जॉन १८:३८ (बायबल)

26 "प्रीती सद्गुण हेच ह्या अवनिचे वैशिष्ट्य लोकोत्तर,
स्वर्गारोहण मार्ग ते शिकविती सामर्थ्य त्यांचेच ते।
त्यांची ती क्षमता उणी जरि ठरे, प्रत्यक्ष स्वर्लोक तो
ये खाली वरुनी धरातलपथी, त्या द्यावया वंदना।।"
—मिल्टन, कोमस

27 जॉन १८:३७ (बायबल)

28 स्तोत्रे (Psalms) ४६:१० (बायबल). "ईश्वराला खऱ्या अर्थी जाणून घ्यायला" हवी ती आंतरिक शांतता मिळवून घेणे हेच योग विज्ञानाचे ध्येय होय.

29 इसाया ५५:११-१२ (बायबल)

# महान योगी — आजीव व मरणोत्तरही

७ मार्च १९५२ रोजी अमेरिकेत, कॅलिफोर्निआमध्ये, लॉस एंजेलिस येथे परमहंस योगानंदांनी महासमाधी घेतली. त्या दिवशी भारताचे अमेरिकेतील राजदूत बिनय आर. सेन यांच्या सन्मानार्थ मेजवानी होती. त्या वेळी परमहंसजी हजर असून त्यांनी आपले भाषण नुकतेच संपविले होते.

ह्या महान जगद्‌गुरूने योगशास्त्राचे महत्त्व केवळ आपल्या हयातीतच नव्हे तर मृत्यूनंतरही दाखवून दिले. त्यांचे निधन झाल्यावर कित्येक आठवड्यानंतर देखील त्यांचा चेहरा पूर्वीसारखाच तेजस्वी दिसत होता. त्यांच्या चेहऱ्यावर कुजण्याची काहीएक क्रिया घडून आली नाही. आणि त्यांचा चेहरा अविनाशित्वाच्या एका दिव्य तेजाने चकाकत होता.

लॉस एंजेलिस येथील फॉरेस्ट लॉन मेमोरिअल पार्क (जेथे ह्या महान योग्याचे शव थोडा वेळ ठेवले होते) येथील शवागाराचे संचालक श्री हैरी टी. रो यांनी सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप संस्थेला एक ‘ॲफिडेविट’वजा पत्र लिहिले होते; त्या पत्रामधून पुढील उतारा उद्धृत केला आहे:

“परमहंस योगानंदांच्या मृत शरीरामध्ये सडण्याची एकही खूण दृष्टोत्पत्तीस आली नाही, ही आमच्या अनुभविक निरीक्षणांतील सर्वांत मोठी विलक्षण गोष्ट होय … मृत्यूनंतर वीस दिवसांनीही त्यांच्या शरीराच्या कोणत्याही भागाचे विघटन होऊ लागले नव्हते … त्याचेवर बुरशीसारखे काही चिन्ह नव्हते, की त्वचेचे धागे किंवा कोश सुकल्यासारखे काही लक्षण नव्हते. आमच्या शवागारामधील नोंदणी-पुस्तकात, शरीर अशा तऱ्हेने पूर्णपणे अबाधित राहिल्याचा, दुसरा दाखला नाही … ज्या वेळी योगानंदांचे शव शवागारात आणले गेले तेव्हा तेथे काम करणाऱ्या माणसांनी शवपेटीच्या काचेतून पाहून नेहमीप्रमाणे ते शरीर हळूहळू कुजू लागेल अशी अटकळ केली होती; परंतु आमच्या निरीक्षणासाठी म्हणून ठेवलेल्या त्या शवावर काही दृश्य फरक घडून न येता एकामागून एक असे दिवस जेव्हा जाऊ लागले तेव्हा आमचे आश्चर्य वाढू लागले. योगानंदांचे शरीर एका अतिविलक्षण अशा अविनाशित्वाच्या अवस्थेमध्ये दिसत होते. त्याच्यावर विकार असा काही म्हणून दिसून येत नव्हता … त्यांच्या शरीरातून दुर्गंध असा कधीच आला नाही …

“मार्च २७ ला ज्या वेळी शवपेटीवरील ब्राँझचे झाकण रीतसर लावले त्यापूर्वी योगानंदांचे शरीर जसे दिसत होते तसेच ते ७ मार्चला आढळून आलेले होते. शरीरावर काहीएक फरक झालेला दिसून आला नाही. ज्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला त्या रात्री ते जसे ताजेतवाने दिसले तसेच ते २७ मार्चला दिसले. २७ मार्चला असे सांगण्यासारखे कोणतेही कारण नव्हते की त्यांच्या शरीरावर भौतिक विघटनाचे कसलेही चिन्ह दृष्टिगोचर व्हावे. या कारणांस्तव आम्ही पुनः जाहीरपणे नमूद करतो की, परमहंस योगानंदांच्या बाबतीत आम्हांला एक विलक्षण अनुभव आला.”




इ. स. १९७७ मध्ये, श्री श्री परमहंस योगानंदांच्या 'महासमाधी'च्या पंचविसाव्या पुण्यतिथिला भारत सरकारने त्यांच्या सन्मानार्थ हे स्मृति-तिकिट काढले. ह्या तिकिटाबरोबर सरकारने एक वर्णनात्मक पत्रक प्रसिद्ध केले. त्यातील अल्प भाग:

"ईश्वरावरील प्रेम आणि मानवजातीची सेवा यांचे आदर्श परमहंस योगानंदांच्या जीवनातून पूर्णपणे व्यक्त झाले आहेत ... त्यांच्या जीवनाचा बहुतांश भाग जरी भारताबाहेरच गेला असला, तरीही आमच्या महान संतांमध्ये त्यांचे अनन्य स्थान आहे. त्यांचे कार्य निरन्तर विस्तारत चालले आहे, अधिक तेजस्वीपणे, सर्वत्र लोकांना परमात्म्याच्या तीर्थयात्रेत आकर्षित करत."

# गुरु परंपरा

महावतार बाबाजी
योगावतार लाहिरी महाशय
ज्ञानावतार स्वामी श्री युक्तेश्वर
प्रेमावतार परमहंस योगानंद

क्रिया योग चा श्रद्धापूर्वक सराव करणाऱ्या योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया/सेल्फ-रियलायझेशन फेलोशिप च्या सदस्यांच्या आध्यात्मिक कल्याणाची जबाबदारी घेणाऱ्या गुरु परंपरेतले महावतार बाबाजी हे सर्वोच्च गुरु आहेत. त्यांनी वचन दिले आहे — “हा विशिष्ट जागतिक कालखंड संपेपर्यंत मी पृथ्वीवर शरीर धारण करून राहीन.” (प्रकरण ३३ आणि ३७ पाहा.)

सन १९२० मध्ये महावतार बाबाजींनी परमहंस योगानंदांना सांगितले, “क्रिया योग च्या संदेशाचा पश्चिमेत प्रसार करण्यासाठी मी तुझी निवड केली आहे.... ईश्वर-साक्षात्काराचे शास्त्रोक्त तंत्र अखेरीस सर्व राष्ट्रांमध्ये पसरेल आणि माणसाच्या अनंत पित्याच्या (ईश्वराच्या) वैयक्तिक, परलौकिक ज्ञानाद्वारे राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये ऐक्य घडवून आणण्यास मदत करेल.”

महावतार म्हणजे “महान अवतार” किंवा “ईश्वरी अवतार”; योगावतार म्हणजे “योगाचे अवतार”; ज्ञानावतार म्हणजे “ज्ञानाचे अवतार.”

प्रेमावतार म्हणजे “प्रेमाचे अवतार” — ही पदवी १९५३ मध्ये परमहंस योगानंदांना त्यांचे महान शिष्य राजर्षि जनकानंद (जेम्स. जे. लीन्न) यांनी बहाल केली.

# उद्देश्य आणि आदर्श
# योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया

आणि
सेल्फ-रियलाइझेशन फेलोशिप
***श्री श्री परमहंस योगानंद, गुरूदेव आणि संस्थापक***
***यांच्या द्वारा निश्चित केलेले***
*श्री श्री मृणालिनी माता, संघमाता आणि अध्यक्षा*

सर्व देशांमध्ये परमेश्वराचा साक्षात्कार मिळविण्याच्या निश्चित व शास्त्रशुद्ध तंत्रांच्या ज्ञानाचा प्रसार करणे.

स्वयं-प्रयत्नाने आपल्या मर्यादित मर्त्य चेतनेची ईश्वर चैतन्यामध्ये उत्क्रांती करणे हाच जीवनाचा खरा हेतू होय हे शिकविणे; व त्यासाठी जगात सर्वत्र परमेश्वरसंबंधाकरिता योगदा सत्संगाची मंदिरे स्थापित करणे आणि तसेच लोकांच्या घरांत व अंतःकरणांत परमेश्वराची देवळे स्थापित करण्यास उत्तेजन देणे.

भगवान श्रीकृष्णाने शिकविलेला मूळ योग व येशू ख्रिस्ताने शिकविलेला मूळ ख्रिस्ती धर्म यांची मूलभूत ऐक्यता व पूर्ण सुसंगती दाखविणे आणि त्यांची सत्य तत्त्वे म्हणजे सगळ्या खऱ्या धर्मांचा सर्वसाधारण पाया आहे हे दाखवून देणे.

जिकडे सर्व खऱ्या धार्मिक श्रद्धांचे मार्ग आपणास अखेरीस घेऊन जातात असा सर्वोच्च दिव्य मार्ग दाखविणे. हा म्हणजे नियमित, शास्त्रीय व भक्तीपूर्वक परमेश्वरध्यानाचा मार्ग होय.

मानवाला त्याच्या तीन तऱ्हेच्या दुःखांतून मुक्त करणे: शारीरिक रोग, मानसिक विसंगती व आध्यात्मिक अज्ञान.

लोकांना “साधी राहणी व उच्च विचारसरणी” हे तत्त्व पालन करण्यास उत्तेजन देणे; व त्यांना परमेश्वराशी नाते जोडण्यास शिकविणे. हे नाते म्हणजे लोकांच्या ऐक्यतेचा चिरंतन पायाच होय — जो बांधल्याने त्यांच्यामध्ये बंधुत्वाच्या भावनेचा प्रसार होईल.

मनाचे शरीरावरील व आत्म्याचे मनावरील श्रेष्ठत्व दर्शविणे.

वाइटाचा चांगल्याने, दुःखाचा आनंदाने, निर्दयतेचा दयाळूपणाने व अज्ञानाचा ज्ञानाने पराभव करणे.

शास्त्र व धर्म यांच्या मूलतत्त्वांच्या एकात्मतेचा अनुभव घेऊन त्यांच्यात ऐक्य घडवून आणणे.

पौर्वात्य व पाश्चिमात्य देशांमध्ये सांस्कृतिक व आध्यात्मिक समजुतीचे समर्थन करणे व त्यांच्यांतील अत्युत्तम विभिन्न गुणांचे आदान-प्रदान करणे.

मानवजात आपल्या आत्म्याचे विस्तारीत रूप आहे असे समजून त्याची सेवा करणे.

# परमहंस योगानंदाच्या
# क्रिया योग वरील शिकवणींची
# अतिरिक्त संसाधने

जगभरच्या शोधकांना मुक्तपणे साहाय्य करण्यास योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया समर्पित आहे. आध्यात्मिक प्रवचने, वर्ग, आमच्या केंद्रांतील ध्यान आणि प्रेरणादायक सेवा, साधना-शिबिरांची वेळापत्रके, आणि आमच्या आध्यात्मिक, तसेच वैद्यकीय, शैक्षणिक, आपात्कालीन मदत आणि इतर धर्मदायी उपक्रम यांच्या माहितीसाठी आमच्या वेबसाईट किंवा आमच्या शाखा मठास भेट देण्यास आम्ही आपणांस आमंत्रित करतो.

**Yogoda Satsanga Society of India**
Paramahansa Yogananda Path
Ranchi 834001, Jharkhand
Tel. (0651) 2460071, 2460074, 2461578
www.yssofindia.org

# Yogoda Satsanga Lessons

The Yogoda Satsanga Lessons are unique among Paramahansaji's writings in that they give his step-by-step instructions in yoga techniques for God-realization. The simple yet highly effective methods taught in the Lessons enable one to harmonize and recharge the body with life energy; to awaken the unlimited power of the mind; and, above all, to achieve direct, personal experience of God through the Kriya Yoga science of meditation.

In addition, the Lessons cover a broad range of other subjects—offering inspiration and practical guidance for living every day in greater harmony with oneself and others, and for coping with the multitude of problems that seem so pressing in today's world. A few of the many topics covered are:

- **Strengthening the Power of Will for All-Round Success**
- **Freeing Yourself From Bad Habits**
- **Banishing Fear, Worry, & Stress**
- **Spiritualizing Business**
- **Finding & Expressing Unconditional Love**
- **Understanding Karma & Reincarnation**
- **Creating Harmony in Family Life & Marriage**
- **The Art of Getting Along With Others**
- **Life After Death**
- **How to Build World Unity**
- **How to Weave God into Your Daily Life**
- **Yoga Principles of Rejuvenation & Healing**

*For free Introductory Literature, please write or call:*

**YOGODA SATSANGA SOCIETY OF INDIA**
Paramahansa Yogananda Path
Ranchi 834001, Jharkhand
Tel: (0651) 2460071, 2460074, 2461578
www.ysslessons.org

“तुमच्या वापरासाठी, मराठी आवृत्तीमधील शब्दसूची खाली समाविष्ट केली गेली आहे. ह्या ई-बुक आवृत्तीचे पृष्ठक्रमांकन मराठी आवृत्तीशी जुळत नसल्याकारणाने, तुम्हाला हव्या असलेल्या शब्दांना शोधण्यासाठी कृपया तुमच्या ई-रीडर मधील ‘सर्च फंक्शन’ वापरा.”

# सूची


### अ

अकबर बादशहा 226, 291-1, 677-1

अगस्त्य 423

अणुयुग 324, 383, 672, 680

अतिजागृत अवस्था, अतींद्रिय अवस्था, (याबरोबर, इंद्रियातीत अवस्था, अधि-चैतन्य शक्ती, ऊर्ध्व-चैतन्य शक्ती यावरीलही सूची पाहणे) 88-1, 158, 178-1, 201, 289, 586, 684

अधि-आत्मा 88-1

अधि-चैतन्य, शक्ती (याबरोबर अतिजागृत अवस्था, अतींद्रिय अवस्था, इंद्रियातीत अवस्था, ऊर्ध्व-चैतन्य शक्ती, यांवरीलही सूची पाहणे) 88-1, 158, 178-1, 201, 289, 586, 684

अध्यात्मविद्या 95, 171-1, 289

अनंतलाल घोष, माझा थोरला भाऊ 22, 25-2, 39-45, 47-52, 132, 135-138, 142, 144, 145, 146, 171, 238, 489, 560-1

त्याचे लग्न ठरते 19; हिमालयात जाताना मला पकडतो 23; आईचा शेवटल्या घटकेचा संदेश देतो 24; हिमालयाकडे पलायन करीत असताना दुसऱ्या वेळेस मोडता घालतो 43; मला वाराणशीच्या एका पंडिताकडे व त्याच्या मुलाकडे नेतो 48-50; आग्र्यास माझे स्वागत करतो 136; वृंदावनला माझी निष्कांचन स्थिती करून कसोटी घेतो 137; क्रियायोगाच्या दीक्षेसाठी विनंती करतो 146; मृत्यू 135, 327

अपक्व सृष्टी 245

अफझलखान, एक मुसलमान किमयागार 258-266

अबदुल गफूरखान, लाहिरी महाशयांचे मुसलमान शिष्य 459

अभयाची प्रार्थना, लाहिरी महाशयांनी गाडी थांबवावी म्हणून 399; आपले नवे मूल जगावे म्हणून 399

अमरमित्र, माझा हायस्कूलमधील सहाध्यायी, हिमालयाकडे आमचे पलायन 39-48, 50, 59

अमिया बोस, माझी पुतणी 632; अमुल्य, श्रीयुक्तेश्वरांचा शिष्य 558

अमेरिकन युनिटेरीयन अँसोसिएशन 488, 495

अर्जुन, भगवान श्रीकृष्णांचा भक्त व शिष्य 71, 335, 347, 450-1, 679-1

अर्ध-चैतन्य शक्ती, अर्ध-जागृत अवस्था, (याबरोबर सुप्त मन

यावरीलही सूची पाहणे) 69-1, 178-1, 201, 684

अरविंद घोष, श्री 609

अलकानंद 67

अवतार 96-1, 421

अवनींद्र, टागोरांचा पुतण्या 372; अविनाश 8; त्यास शेतात झालेले लाहिरी महाशयांचे दर्शन 9

अविनाशचंद्र दास, प्रो. 675-1

"अष्टांगयोग" पतंजलिप्रणीत 321

आहुजा एम. आर., भारताचे कॉन्सल-जनरल 671

अहंकार, अहंता 57-2, 61-62, 69-1, 145, 173, 220, 267, 313-1, 325-1, 344, 345, 405, 552, 591

अहिंसा 70-1, 158, 158-1, 159, 375-1, 608, 611-2, 617; गांधीजींचे अहिंसेवरील विचार 617, 622, 623, 626, 630; विल्यम पेन याचे अहिंसेबाबत प्रयोग 629

एंजेला, पुण्यात्मा, फोलिनोची, कधीच अन्नग्रहण न करणारी 655-1

अर्नोल्ड, सर एडविन, भगवद्‌गीतेचे इंग्रजी अनुवादकर्ते, उतारे 57-2, 71

ॲरिअन, ग्रीक इतिहासकार 541, 546

## आ

आइनस्टाईन यांचा सापेक्षतासिद्धांत 379, 383; यांनी केलेला गांधींचा गौरव 631

आई, माझी 3-12, 16, 19, 20, 21, 108, 109, 127, 327, 560-1, 608 बरेलीला मला घडलेले तिचे दर्शन 20; तिचा मृत्यू 21; तिचा अंतिम संदेश व तिने पाठ-विलेला मंतरलेला ताईत 24, 26

श्रीयुक्तेश्वरांची 132, 151, 163, 183, 184; लाहिरी महाशयांची 418

आचारधर्म, दैनिक, सनातनी हिंदूंचे 612

आत्मा 106-2, 182, 220, 233, 239, 242-3, 267, 316-1, 344, 345, 346, 364, 365-1, 589, 591, 592, 595, 596, 604, 690

आत्म्याचे गुंजन 496

आदम व ईव्ह, रूपकात्मक कथा 243

आध्यात्मिक नेत्र, (यात्रोबर एकमेव नेत्र व तृतीय नेत्र यावरीलही सूची पाहणे) 57-1, 222-2, 242, 246-1, 296, 339, 360, 364, 364-1, 379, 385, 396, 513-2, 517, 531, 561, 583, 634

आनन्दमयी मा 632-638; त्यांची रांची विद्यालयास भेट 636

आनन्दमोहन लाहिरी 466

आब्राहाम, डॉ. सी. ई., सेरामपूर कॉलेजचे प्रिन्सिपॉल, त्यांचे वक्तव्य 555-1

आर्य 675-1

आर्यसमाज 465

आश्रम, वाराणशीमधील, त्याचे वर्णन, जेथे मी लहानपणी राहिलो तो 123; वृंदावनामधील, जेथे मी निष्कांचन स्थितीत राहिलो तो 140; सेरामपूरमधील

श्रीयुक्तेश्वरांचा 132, 148, 523, 524; पुरीमधील, समुद्रकिनाऱ्या-वरील श्रीयुक्तेश्वरांचा 215, 604; हृषीकेशजवळील, जेथे प्रणवानंदांचे महानिर्वाण झाले तो 359; दक्षिणेश्वरमधील, योगदा आश्रम 531; वृंदावन-मधील, केशवानंदांनी बांधलेला 566; एन्सिनिटासमधील, सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप 664, 667

ऑडी, जे., काश्मीर-सफरीमधील माझा सोबती 273, 278, 281, 287

ऑरिजेन, याने पुनर्जन्माविषयी सांगितले 247-2

## इ

इच्छाशक्ती 75, 219, 351, 364-1, 513-2, 619

इजिप्त, माझा प्रवास 521

इण्टरनॅशनल काँग्रेस ऑफ रेलिजस लिबरल्स, बोस्टन येथे भरलेली, तेथील माझे अमेरिकेतील पहिले भाषण 488, 495

इन्द्रियातीत अवस्था, [यावरोबर अतिजागृत अवस्था, अतींद्रिय अवस्था, अधि-चैतन्य शक्ती यांवरीलही सूची पाहणे] 88-1, 158, 178-1, 201, 289, 586, 684

इमर्सन, उतारे 54-1, 88-1, 96-1, 257-1, 313-1, 366-1; मायेवरील कविता 60-2

इलिजा, एलिजा (इलियास) 392, 454

इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शक यंत्र 381

इक्ष्वाकू, भारतातील सूर्यवंशाचा मूळ पुरुष 336

## ई

ईश्वर 15-1

ईस्ट-वेस्ट मासिक (सेल्फ-रिअलायझेशन मॅगेझीनवरील सूची पाहणे)

## उ

उत्सवप्रसंग, भारतातील, (पाहा कुंभमेळा) श्रीयुक्तेश्वर साजरे करतात 150, 222, 224, 556

उपनिषदे, वैदिक विचारधारांचा सारांश 213, 321, 421, 601-1

उपाहारगृह, एन्सिनिटासमधील 667

उपेंद्रमोहन चौधरी, भादुरी महाशयांचे अधांत्री राहणे पाहतात 87

उमरखय्याम, फारसी गूढवादी 422

उमा, माझी वडील बहीण 19, 67; मला गळू झाले त्याविषयी 15; पतंग उडविला त्याविषयी 17

## ऊ

ऊर्ध्व-चैतन्य शक्ती, (यावरोबर अतिजागृत अवस्था, अतींद्रिय अवस्था, इंद्रियातीत अवस्था, अधि-चैतन्य शक्ती यांवरीलही सूची पाहणे) 88-1, 158, 178-1, 201, 289, 586, 684

### ऋ

ऋग्वेदकालीन भारत 675-1

ऋत, विश्वव्यापी नियम 313-1, 325-1, 675

ऋषि 53, 63, 90

### ए

एकमेव नेत्र, (आध्यात्मिक नेत्र व तृतीय नेत्र यांवरीलही सूची पाहणे) 57-1, 222-1, 242, 246-1, 296, 339, 360, 364, 364-1, 379, 385, 396, 513-2, 517, 531, 561, 583, 634

एकाग्रता साधना, रांची विद्यालया-मधील 531

एडिंग्टन सर आर्थर एस, उतारा, 'जग हे मनोमय आहे' यावरील 380

एनसायक्लोपेडिआ अमेरिकाना 28-1

एन्सिनिटास, एस. आर. एफ. आश्रम व वसाहत 664, 667

एलिजा, इलिजा, (इलियास) 392, 454

एलिझाबेथ, अनुग्रह झालेली, रेंटची, निराहारी 655-1

एलिशा (एलिस्यूअस) 405-1, 454

एस. आर. एफ. (सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपवरील सूची पाहावी)

### ओ

ओनेसिक्रिटोस, शिकंदराचा दूत, हिंदू साधूला येऊन भेटतो 541

ओम्, ॐ विश्वव्यापी, सृजनस्पंदन 16-1, 27-1, 207, 209-1, 225, 336, 379, 513-1, 653-1, 684, 687, 688-1, 690, 691

### औ

औलूक्य (कणाद) 101-1

### अं

अंतर्दृष्टी 61, 63, 96, 342

अंत:स्फूर्ती 219, 222-2, 240, 324, 583, 585

### क

कझिन व्हिक्टर, पौर्वात्य तत्त्वज्ञाना-वरील उतारा 107-1

कनई, श्रीयुक्तेश्वरांचा तरुण शिष्य 191, 273, 276, 277, 280, 287

कबीर, मध्ययुगीन संतमहात्मा 335, 423, 570, 677-1; त्याचे पुनरुत्थान 483-2

कमल (ले), लाक्षणिक अर्थ 97-1; शिष्याला नदीवरून जाण्यास शंकराचार्यांनी निर्माण केली 132-1; मेरुदंडातील चक्रे 228-1

कारणविश्व 578, 586, 593

कारणशरीर 579, 588-599

करपात्री, कुंभमेळ्यातील साधू 563

कर्म, आचरण्याची जरुरी 70-1, 172, 351; कार्यकारणाचा विश्वव्यापी नियम 48, 48-1, 232, 234, 239, 247-1, 259, 289, 290, 292, 313-1, 325-1, 334, 340, 345, 366-1, 424, 433-1, 437, 439-1, 481, 578, 580, 589, 595-1, 597, 625-1, 654-1, 682, 683

कर्मकांड, दैनिक, सनातनी हिंदूंचे 612
कर्मयोग, कर्माचरण करून ईश्वरप्राप्ती करून घेण्याचा मार्ग 346, 460
कलकत्ता विश्वविद्यालय 114, 256, 303, 305, 309, 550; मी तिथून बी. ए.ची पदवी घेतो 311
कलियुग, लोहयुग 240, 241-1
कविता, इमर्सनच्या 60-2; मिराबाईच्या 92; टागोरांच्या, जगदीशचंद्र बोस यांवरील 106; गीतांजलीमधील 374; शंकराचार्य यांच्या 132-1, 317; माझी 'समाधी'वरची 210; लल्ला योगीश्वरी यांची 278-1; शेक्सपिअरची 343; उमर खय्यामची 422; कबीरांची 484-1; वॉल्ट व्हिटमन यांची 498; थय्युमनावर यांची 547; रविदास यांची 570; नानक यांची 666-2; फ्रॅन्सिस थॉम्पसन यांची 674-1; मिल्टन यांच्या 677-1, 688-5; डांटे यांची 686-1
कस्तुरबा, गांधीजींच्या पत्नी 614
कांट, उतारा 675-1
कॅथेरीन सेंट, सीनाची, अन्नग्रहण न करणारी 655-1
कॅलिगॅरिस, प्रो. गेसेप्प 34-1
कार्नेगी हॉल, त्यामधील श्रोतृसमुदाय, प्राचीन हिंदू भजन गातो 666
कार्लाइल, उतारा 469-1
काल व स्थल, यांची सापेक्षता 380, 384
कालानोस, महान शिकंदराचा हिंदू शिक्षक 545
काली, परमेश्वराचे निसर्गमातेचे रूप 16, 59-3, 59, 112, 278-1, 296-299
कालीकुमार रॉय, लाहिरी महाशयांचा शिष्य 12, 400
कालीदास, हिंदुस्थानचा शेक्सपिअर उतारा 278-1
काशीमणी, लाहिरी महाशयांची बायको 394-397, 419; आपल्या पतीभोवती देवदूत जमलेले पाहते 395; त्यांचे चमत्कारपूर्ण निर्वाण पाहते 397
कॉंग्रेस ऑफ रेलिजन्स, बोस्तन-मधील 488, 495
कॉम्पेनसेशन,उतारा 366-1
कॉस्मिक चँटस 665
कुंडलिनीमधील चक्रे 37-1, 159, 228, 228-1, 244, 334, 338, 339, 341, 346, 400-1, 513-2, 582, 654-1
कुदरती उपचार 619-1
कुंभमेळा, जत्रा 408, 452, 472, 559; जेथे बाबाजी आणि श्रीयुक्तेश्वरांची पहिली भेट होते 473, 477; चिनी प्रवाशाने लिहून ठेवलेली हकीकत 559-1; मी मेळ्यास जातो 559-565
कुमार, सेरामपूरच्या आश्रमातील रहिवासी 179
कुचबिहारचे युवराज, यांचे व्याघ्रस्वामीस आव्हान 79, 80

कूटस्थ चैतन्य ('ख्राइस्ट कॉनशसनेस' वरीलही सूची पहावी) 11, 209-1, 461, 513-2
कृष्ण भगवान, परमेश्वराचा अवतार 139, 140, 142, 143, 225, 296, 335, 347, 423, 424, 450-1, 679, 679-1; वृंदावन-मधील बालपण 569, मला दर्शन झाले ते 575
कृष्णानंद, स्वामी, सिंहिणीला माणसाळवणारे, कुंभमेळ्यात भेटले ते 562
केदारनाथ, माझ्या वडिलांचे स्नेही 29, 30, 33, 38; त्यांना वाराणशीस घाटावर प्रणवानंदांचे दुसरे शरीर दिसते 32
केनेल, डॉ. लॉईड 673
केलर, हेलेन 583-1
केलॉग, चार्लस, यांचे स्वरलहरीं-वरील प्रयोग 226-1
केवलानंद, स्वामी, माझे संस्कृत शिक्षक 52-58, 152, 434, 452; यांचा बाबाजींबरोबरचा हिमालयातील सहवास 426
केशवानंद, स्वामी 360, 482; यांना लाहिरी महाशयांचे पुनरुत्थान पावलेले शरीर दिसते 483; वृंदावनच्या आश्रमात मला भेटतात 565; बाबाजींचा मला संदेश देतात 569
कोमस, उतारा 688-5
कोलंबस 91, 487, 676-1
कंकण 39, 131; हातात येते 26; नाहीसे होते 127, 263-1
कंकण भारलेले 231, 235, 236, 253, 333-1
क्रेन्मर थिंग, डॉ. एल., यांचे इंग्लंडहून पत्र 669
क्राईल, डॉ. जॉर्ज. डब्ल्यू 650-1
क्रियायोग, परब्रह्मप्राप्तीचे साधनातंत्र 10-1, 23, 53, 55, 144, 146, 168, 190, 194, 214, 267, 279-1, 294, 334-348, 357, 420, 443, 445, 446, 458-464, 467-471, 491, 503, 508, 531, 619, 679, 680, 681, 691; माझ्या मातापितरांनी दीक्षा घेतली 10; मी स्वतः दीक्षा घेतली 152; काशीमणींने घेतली 396; लाहिरी महाशयांची 443; व्याख्या 335; प्राचीनत्व 335; पूर्वापारचे नियम बाबाजींनी सैल केले ते 446; चार सोपान, श्रेणी 462; चे सनातन अधिष्ठान 469; बाबाजींचे त्यावरील भविष्य 491, 508
क्रियायोगी, (क्रियावान) बाबाजींनी लाहिरी महाशयांस प्रदान केलेल्या ह्या प्राचीन योग-साधनेचा अभ्यासी 334, 339, 672
क्वान् यिन्, जगन्मातेचे चिनी स्वरूप 671
क्वेकर्स, अहिंसेबाबत पेनसिल्व्हा-नियामधील 629

### ख

खोराक अने खोराकनो सुधारो 619-1

ख्राइस्ट, येशू 122-3, 164-1, 164-2, 185, 228-1, 242, 245-1, 245-2, 246-1, 270, 290, 296, 335, 337-3, 375-1, 376, 392-1, 402, 405, 407, 423, 424, 428, 433-1, 436, 454, 479, 483, 510, 513, 518, 521, 584, 596, 619, 621, 625, 628, 637, 671, 687, 688; त्यांचा जॉन द बॅप्टिस्टशी संबंध 454; एन्सिनिटासमध्ये मला झालेले त्यांचे दर्शन 679

ख्राइस्ट कॉनशसनेस 209-1, 243-3, 246-1, 337, 393-1, 409, 428, 461, 513-2, 688-1, 689

ख्रिस्ती चर्च, सुरुवातीचे, त्याची पुनर्जन्माची शिकवण 247-1

### ग

गगनेंद्र, टागोरांचा पुतण्या 372

गंगाधर, लाहिरी महाशयांचा फोटोग्राफर 13

गंगा नदी, पूर्वकहाणी 279-1; तिच्या पाण्याचे शुद्धत्व 420-1

'गंधबाबा' 64, 66-69, 71

गळू, माझी बहीण उमा हिला झाले तो प्रसंग 15

गाढ निद्रावस्था 88-1

गांधी, मो. क. ("महात्मा") 375-1, 522-1, 548, 606-631; अकरा शपथा 608; क्रियायोगाची दीक्षा घेतली 619; मौनावरचे विचार 611; गोरक्षणावरचे विचार 612; आहारावरचे विचार 618; ब्रह्मचर्यावरचे विचार 615; धर्मावरील विचार 620, 621; अहिंसेवरील विचार 607-1, 622-623, 629, 630; यांची स्त्री 614; यांची यो. स. सो.च्या विद्यालयाला भेट 606, 627; यांचे हस्ताक्षर 627; पवित्र स्मृती 631

गांधी वर्ल्डपीस मेमोरीअल, एस. आर. एफ. लेक श्राईन येथील 671

गिरी ("पर्वत") संन्यासधर्मांच्या दहा श्रेणींपैकी एक 151-2, 316, 318, 562

गिरिबाला, निराहारी संतमहिला 639-655; एका यौगिक तंत्राचा उपयोग करते 640, 653, 654-1

गीता, (भगवद्‌गीतेवरील सूची पाहावी)

गीतांजलि 369; मधील एक कविता 374

गुण, निसर्गाचे स्वभावधर्म 27-1, 548-1

गुरु (गुरुदेव), अध्यात्माचे उपदेशक 35, 54, 150, 198, 293, 339, 478, 479, 620; शंकराचार्यकृत आपल्या गुरुचा गौरव 132-1

गुरुदेव 153, 154, 185, 288, 292, 313-1, 333-1, 403, 404, 414, 433-1; (गुरु आणि योगी यांवरीलही सूची पाहावी.)

गेर्लिक डॉ. फ्रिट्झ, थेरेसा नॉयमनचा चरित्रकार 511

गोविंद यती, शंकराचार्यांचे गुरु 132-1
गौडपादाचार्य, शंकराचार्यांचे परमगुरु 132-1
गौरी मा, वृंदावनमधील आश्रमातील यजमानीण 140, 141
ग्यानमाता, भगिनी 659, 663
ग्रीक इतिहासकार, भारतावरील 541-547

घ

घाट 119, 402, 429, 479
घोष, माझे आडनाव 4
घोषाल, डी. सी., सेरामपूर कॉलेजमधील माझे प्रोफेसर 303, 304-1, 555

च

चक्रे, मेरुदंडातील 37-1, 159, 228, 228-1, 244, 334, 338, 339, 341, 346, 400-1, 513-2, 582, 654-1
चंद्रगुप्त, सम्राट, महान शिकंदराचा समकालीन 540
चमत्कार, तंत्र 68, 69, 164, 312-1, 383, 392-1, 441-1, 469, 470
चाइल्ड, हॅरोल्ड, संदर्भ परीक्षेच्या विषयाबाबत 308
चांदीचा पेला, श्री डिकिन्सन यांना भविष्य सांगितले ते 659
चालीरीती, हिंदुस्थानातील; पूजा 11; पतंगाच्या शर्यती 17; लग्न 19, 23, 328; दान देणे 26, 612, 613, 670; गुरुला देणगी देणे 92, 527; वडील भावाचा आदर राखणे 139; गुरुच्या चरणांस स्पर्श करणे 148, 459; अंत्यसंस्कार 184, 572-1; 'अतिथिदेवो भव' 199; संन्यासधर्माची दीक्षा घेणे 316; हाताने जेवणे 527, 642; दैनिक यज्ञ, आवश्यक करावयाची हवने 612
चिनी वृत्तांत, हिंदुस्थानविषयीचे 559-1, 675-1
चेला, शिष्य 169
चैतन्यशक्ती, त्या अवस्थांविषयीचा अभ्यास 69-1, 178-1

ज

जगदीशचंद्र बोस, सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ 95-107, 145
जगद्गुरु श्री शंकराचार्य, संन्यास-धर्मीयांच्या मुख्याची पदवी 317
जगन्माता, परमेश्वराचे स्वरूप 16, 112, 117, 278-1, 584
जतींदा (ज्योतींद्र घोष), हिमालयाकडे पलायन 40, 41, 42, 51
जदुनाथ पाल, लाहिरी महाशयांचे तैलचित्र करणारे शिल्पकार 484-2
जनक राजा 313-1
जपान, कडील माझा प्रवास 326; लाहिरी महाशयांना झालेला दृष्टांत 461
जयेंद्र पुरी, हिंदुस्थानातील साधुपंथाचे प्रमुख 561-1
जर्नल, इमर्सन यांचे 54-1
जहांगीर, बादशहा, काश्मीरमधील बागा 284

जातिसंस्था, हिंदुस्थानातील 5, 459, 548, 549
जॉन दि बॅप्टिस्ट, येशू ख्रिस्ताशी संबंध 454
जितेंद्र मुजुमदार, वाराणशीच्या आश्रमातील माझा सोबती 122-125, 134; आग्र्यामध्ये 135-139, 145, 565; वृंदावनामध्ये 139-147
जीन्स, सर जेम्स, विश्व ही एक विचार शलाका आहे यावरील उतारा 382
ज्यूल्स-बोईस, एम. सॉरबोनचा, अतींद्रिय मनावरील त्याचा उतारा 88-1
जेनेसिस्, त्याजवरील भाष्य 243, 245
जेरोम सेंट, पुनर्जन्म या विषयावरील त्याची शिकवण 247-1
जैनधर्म, हिंदूधर्मांतर्गत एक पंथ 611-2, 620
जोन्स सर विलियम, यांनी केलेला संस्कृत भाषेचा गौरव 27-1
जोसेफ सेंट, कुपर्टिनोचा, अधांत्री राहत असे 94-1

## झ

झेंद-अवेस्ता 620; उतारा 664

## ट

टागोर (रवींद्रनाथ यावरील सूची पाहावी)
टॉलस्टॉय 375, 620
टीका, धर्मशास्त्रविषयक, प्रणवानंदांची 37-2; शंकराचार्यांचे शिष्य सानंदन यांची 133-1; शंकराचार्यांच्या 132-1, 186; श्रीयुक्तेश्वरांच्या 241-246; सदाशिवेंद्रांच्या 324-1, 550-1; लाहिरी महाशयांच्या 55, 466; माझी, नवीन करारावरीलची 678; भगवद्गीतेवरची 679
टॉयन्बी, अर्नोल्ड जे. 317-2
ट्रॅहर्न, थॉमस, उतारा 684-1
ट्रेनिंग ऑफ दि ह्यूमन प्लँट (मानवी रोपट्याची मशागत) 501, 502
ट्रोलँड, डॉ. एल. टी., 'प्रकाश'-वरील उतारा 385

## ड

डबरू बल्लव, गीतेवरील शिक्षक 187
डांटे, कविता उद्धृत केलेली 686-1
डास, उपद्रव, सेरामपूर आश्रमातील प्रसंग 156
डिकिन्सन्, ई. ई. लॉस एंजेलिसचे, "चांदीचा पेला" प्रसंगाच्या निमित्ताने 659
डिव्हाईन कॉमेडी, दी, उतारा 686-1
डेस्कार्टिस, उतारा 520-1

## त

'तंदुरुस्तीनी चावी' 619-1
तय्युमनावर, मनास ताब्यात ठेवण्यावरीलची कविता 547
तक्षशिला, येथील प्राचीन विश्व-विद्यालय 101; थोर शिकंदर भेट देतो 541, 545

ताईत 39, 131; हातात येतो 26; नाहीसा होतो 127, 263-1
ताजमहाल, सुप्रसिद्ध कबरस्थान 136, 139, 146, 565
तानसेन, याची गायनकला 226, 226-1
तारकेश्वर मंदिर 197; तेथे जाण्याची माझी पहिली वेळ 194; दुसरी वेळ 203; तेथे घडलेला चमत्कार; औषधी उत्पन्न होऊन शरदकाकांस बरे करते 194
तिबेट 66, 198
तीन शरीरे, माणसाची 578, 588, 599
तीन साधू 375
तृतीय नेत्र (एकमेव नेत्रावरील सूची पाहावी)
त्रैलंगस्वामी, यांचे चमत्कार 403-408; माझ्या मामास बरे करतात 407; लाहिरी महाशयांचा गौरव करतात 408

## थ

थामू, माझी धाकटी बहीण 122
थॉमस, एफ. डब्ल्यू. उतारा 279-1
थॉम्पसन, फ्रान्सिस, उतारा 674-1
थेरेसा सेंट, ऑव्हिल येथील 313-1, 680-1; अधांत्री राहत असे त्याबद्दल 94-1
थेरेसा सेंट, 'दि लिटल फ्लॉवर' 510; थेल्स, उतारा 'जन्ममरणा'-वरचा 431-1

## द

दंडा, बांबूची जाड काठी 400-1, 426
दंडामीस, हिंदू साधू, थोर शिकंदराची निर्भर्त्सना करतो 542-544
दयानंद, स्वामी, वाराणशीच्या आश्रमातील महंत 123, 124, 125, 127, 134
दयामाता श्री, एस. आर. एफ. व यो. स. सो. च्या अध्यक्ष 533-1
दर्शन (गुरुचे) 464
दर्शन, दृष्टांताचे, दृश्य, मला माझ्या एका पूर्वजन्माचे झाले ते 3; लाहिरी महाशयांच्या प्रत्यक्ष स्वरूपाचे त्यांच्या तसबिरीत झाले ते 11; हिमालयांतील योग्यांची आणि प्रचंड प्रकाशझोताचे 14; बरेलीला झालेले, माझ्या आईचे 20; माझ्या गुरुच्या मुद्रेचे 39; जगन्मातेचे 109; जगाचे, एका निःस्वन चलच्चित्रासारखे झाले ते 116; विजेचे 202; परमात्म-स्वरूपाच्या भावनेचे घडून आले ते 206; काश्मीरमध्ये कॅलिफोर्निआमधील इमारतींचे झाले ते 284; दक्षिणेश्वरला कालीमातेचे पाषाणमूर्तीत 297; स्वप्नातले एका पाळीव हरणांचे 354; युद्धनौकेवरील एका कप्तानाचे 386; युरोपियन रणभूमीवरचे 390; शरीर हे प्रकाशमय आहे याचे 390; अमेरिकन चेहऱ्यांचे 487; माझ्या गुरुजींच्या निर्याणसमयीचे 571;

भगवान श्रीकृष्णाचे 575; मुंबईमध्ये झालेले एका अपरिचित विश्वाचे 575; माझ्या पूर्वजन्मांचे 604; येशू ख्रिस्ताचे आणि पवित्र पेल्याचे झालेले एन्सिनिटासमधील 679

दिवा, पुरीच्या आश्रमात नाहीसा झाला तो प्रसंग 221

दीक्षा 146, 462-464

दुःखांचा हेतू 62, 389, 654

दुखणे 162; आध्यात्मिकदृष्ट्या एकाचे दुसऱ्याकडे नेणे 289, 481, 516, 596-1

दुर्गा, जगन्मातेचे परमात्मस्वरूप 278-1

दूरसंदेशवहन, (परचित्तज्ञान व समभावना यावरीलही सूची पाहाव्यात.) 218-1, 268, 327, 364-1, 586

दृश्य (दर्शन वरील विस्तृत सूची, पाहणे.) दृष्टांत (दर्शनवरील विस्तृत सूची पाहणे.)

दृष्टी (दर्शनवरील विस्तृत सूची पाहणे)

देवेंद्रनाथ टागोर, रवींद्रनाथांचे वडील 372

देव्यपराधक्षमापनस्तोत्र 132-1

देसाई, श्री. महादेव, गांधींचे खाजगी चिटणीस 606, 607, 611, 619, 621

डोस्टोयेस्की, उतारा 197-1

द्वापर युग; जगाचे सांप्रतचे समवृत्त युग 240, 336-4

द्वारकानाथ टागोर, रवींद्रनाथांचे पितामह 372

द्वारकाप्रसाद, बरेलीमधील माझा बालपणीचा दोस्त 22, 44, 51

दिजेन, कॉलेजमधील वसतिगृहातील माझा सहवासी 267-271

द्विजेंद्र टागोर, रवींद्रनाथांचे बंधू 373

ध

धर्म, सदाचार, कर्तव्य 548-1, 621

न

नन्टू, मॅट्रिकची परीक्षा पास होण्याच्या वेळी झालेली याची मदत 120, 121

नम्रता 61, 111, 118, 197-1, 453

नरेन, श्रीयुक्तेश्वरांचा शिष्य 252

नलिनी, माझी धाकटी बहीण, लहानपणचे अनुभव 328; हिचे लग्न 328; तिची कृशता नाहीशी होते 331; मुदतीच्या तापातून बरी होते 331; पायाच्या अर्धांगवायूच्या व्याधीतून मुक्त होते 332; तिच्या मुली 333

नाईट, गुडविन जे. कॅलिफोर्निआचे ले. गव्हर्नर 671

नाईट थॉटस 441-1

नानक, गुरु, जपभजन, कार्नेगी हॉलमध्ये गायिले जाते ते 666-2

नालंदा विश्वविद्यालय, प्राचीन काळातले 101

नॉर्थरॉप, डॉ. जॉन हॉवर्ड, गंगेच्या पाण्याच्या शुद्धत्वावरचा उतारा 420-1

नॉयमन थेरेसा, कॉनर्सरॉयथची 639, 647, 654-1; त्यांना भेटावयास मी जातो 508-521

निकोलस, सेंट, फ्लूचा, अन्नग्रहण न करणारा 654-1

नियम, विश्वाचे कार्य ज्यामुळे चालते तो 232, 234, 392-1, 405, 416, 621-2, 686

नियम, धार्मिक आचार 321

निर्विकल्प समाधी, परब्रह्मस्वरूपी तल्लीन होण्याची निरंतर अवस्था. (समाधीवरीलही सूची पाहावी) 37-1, 338, 378, 445, 578-1, 603, 681

"निष्कांचन स्थिती" कसोटी, अनंताने सुचविलेली 137; वृंदावनमध्ये घेतली गेलेली 137-146

निसर्ग, सापेक्षतेचे विश्व. (दुर्गा, काली आणि माया यांवरील सूची पाहावी.)

नीतिनियम 675; योगसाधनेस त्याचे पालन आवश्यक 321

नीम, लिंबाचे झाड 465, 608

न्यूटन, गतिविषयक नियम 376

न्यूयॉर्क टाइम्स, उतारे 105, 381, 651-1

प

पतंग, उडविण्याचा प्रसंग, माझी बहीण उमा हिच्या संबंधाने 17, 18

पातंजली, योगशास्त्रावरील प्राचीन-कालचा प्रणेता 87, 159, 320, 324-1, 335, 337, 423, 558, 686; "अष्टांग योग" विशद करून दिलेला 321

पद्म (पद्मे), लाक्षणिक अर्थ 97-1; आपल्या शिष्यास नदीवरून तरून जाण्यास शंकराचार्यांनी स्थूल स्वरूपात निर्माण केली 132-1; मेरुदंडामधील केंद्रस्थाने 228-1

पद्मासन 228-1

परचित्तज्ञान (दूरसंदेशवहन, समभावना यावरीलही सूची पहाव्यात) 218-1, 268, 327, 364-1, 586

परमगुरु 479-2, 673

परमहंस (जी) 4-1, 113, 469-2, 557

परमात्मस्वरूपाची भावना 10-1, 41, 337, 342; चा लहान वयात अनुभव 116, 204-214, 297; यावरील कविता 210; (विश्वरूप संवेदना व समाधी यांवरीलही सूची पाहावी.)

पवित्र आत्मा 208-1, 513-2, 690; (ॐ वरीलही सूची पाहावी)

पवित्र पेला किंवा थाळी, मला दर्शन झाले ते 679

पवित्र भूमी (पॅलेस्टाइन), माझे जाणे 520

पवित्र शास्त्र 479

पॅराडाइझ लॉस्ट (स्वर्ग हरपला) उतारा 677-1

पाकिस्तान 677-1

पाठ, एस. आर. एफ. सभासदां-करिता 672
पाणिनी, प्राचीन काळातील भारतीय वैयाकरणी, संस्कृत भाषेचा गौरव 121-1
पाणी, त्याच्यावर ध्यान लावणे 114; गंगेच्या पाण्याबद्दल आख्यायिका 420-1; सेंट फ्रान्सिसने काढलेले गौरवाचे उद्‌गार 420-1
पायलेट पाँटीअस, उतारा 688
पार्थिव शरीर 159, 170, 201, 245, 333-1, 339, 345, 351, 513-2, 591, 683
पॉझिटिव्ह सायन्सेस, ऑफ दि एन्शंटहिंदूझ पुस्तक 232-1
पॉल सेंट, उतारा 335, 337
पिंगळे डॉ, गांधींचे शिष्य 606, 619
पुतळा स्वतंत्रतेचा 657
पुनरुत्थान, मरणोत्तर 433-1; रामचे 413; हिमालयातील कड्यावरून उडी मारणाऱ्या मनुष्याचे 427; लाहिरी महाशयांचे 483; कबीराचे 483-1; श्रीयुक्तेश्वरांचे 575-605; ख्रिस्ताचे 596
पुनर्जन्म 247-1, 365-1, 439-1, 454-2, 595-1, 587-599, 625-1, 685
पेन, विलियम, अहिंसेबरोल याचा प्रयोग 629
पोलो मार्को, उतारा 330-1
पंचानन भट्टाचार्य 465, 566; यांना लाहिरी महाशयांच्या पुनरुत्थित शरीराचे दर्शन होते 485
पंडित, वाराणशीचे 48, 49, 136; सेरामपूर आश्रमातील 186
पंथी, सेरामपूरमधील 258, 260, 267, 305, 307, 310; अफझलखानाने जेथे आपले चार चमत्कार करून दाखविले 258; जेथे श्रीयुक्तेश्वरांचे चमत्कारपूर्ण पुनर्दर्शन झाले 269
प्रकाश, याचे स्वरूप 379-393
प्रणवानन्द स्वामी, 'दोन देह धारण करणारे' 29-38, 119, 433-1; यांनी लिहिलेली प्रणवगीता 37-2; यांनी रांची विद्यालयास दिलेली भेट 356; यांना मी व माझे वडील भेटलो ते 356; यांना झालेला लाहिरी महाशयांच्या पुनरुत्थित शरीराच्या दर्शनाचा अनुभव 485; नाट्यपूर्ण पद्धतीने सदेह स्वर्गास गेले तो प्रसंग 360
प्रणाम 524, 527, 622, 631, 648
प्रताप चतर्जी, यांनी वृंदावनामध्ये निष्कांचन स्थितीतील दोन मुलांना मदत केली ती हकीकत 143
प्रफुल्ल, श्रीयुक्तेश्वरांचे शिष्य 527; यांची नागाशी पडलेली गाठ 160
प्रभासचंद्र घोष, यो. स. सो.चे उपाध्यक्ष 238-1, 305
प्रवास रोजनिशी, सी. रिचर्ड राईट यांनी ठेवलेली, त्यातील उतारे, श्रीयुक्तेश्वरांची सेरामपूरमध्ये प्रथम भेट झाली त्यावेळचे 524-528; म्हैसूरमधील प्रवासाच्या वेळचे

536; कुंभमेळ्यात करपात्रींची भेट झाली त्यावेळचे 562; गिरिबाला यांची भेट झाली त्यावेळचे 644
प्रज्ञा-चक्षु, कुंभमेळ्यातील अंधसाधू 562
प्राचीन हिंदुस्थान 541
प्राण, जीवशक्ती 68, 88-1, 228-1, 321, 323, 335, 579-1, 683
प्राणकण, "लाइफट्रॉन्स", अणु-परमाणूंहून सुक्ष्मतर कण 68, 392, 579-1, 589, 590, 594
प्राणशक्ती 68, 88-1, 161, 334, 335, 337, 341, 342, 351, 513-2, 590, 683
प्राणायाम, प्राणशक्तीचे नियमन करण्याचे तंत्र 87, 321, 323, 335
प्रार्थना ऐकिली 48, 142, 223, 297, 298, 387
प्रार्थना, निवासस्थान मिळावे म्हणून केलेली 664
प्रेम 204, 315, 347, 587, 625, 626, 637, 677-2, 678-1, 690; श्रीयुक्तेश्वर माझ्याबद्दलचे शब्दात व्यक्त करतात ते 129, 554; त्याचा वनस्पतींवर होणारा परिणाम 499
प्लिनी, प्राचीन भारतामध्ये जी सुसंपन्नता होती त्यावरील उतारा 675-1
प्लूटार्क 541, 544
प्लेटो 271-1

फ

फकीर 70, 258, 561
फारसी म्हणी 460-2, 625-2
फाह्यान, पाचव्या शतकात भारतात आलेला चिनी साधू-प्रवासी 675-1
फेद्रूस, उतारा 271-1
फ्राईड 88-1
फ्रान्सिस दि सेल्स, सेंट, उतारा 293
फ्रान्सिस सेंट, असिसीचा 291, 420-1; ह्यांच्या छत्रीस, स्मारक-मंदिरास मी भेट दिली तो 520

ब

बरे करणे, आध्यात्मिक सामर्थ्याने, यासंबंधीचे श्रीयुक्तेश्वरांचे विचार 162, 170, 277; दुसऱ्याची कर्मे आपणावर ओढून घेऊन त्यास बरे करणाऱ्या सिद्धांविषयी 289; बांगडी किंवा कंकण किंवा रत्ने वापरून 236, 333-1; ह्या विषयावरती लाहिरी महाशयांचे मत 414, 465; प्राचीन हिंदुस्थानातील प्रघात 546
बरबँक ल्यूथर 499-507
बॅरॅक, डॉ. आलवन एल. यांचे, श्वासोच्छ्वासरहित अवस्था साध्य केल्याने रोगनिवारण करता येते यावरील प्रयोग 347-1
बाबर, बादशहा 676-1; याने मुलाचे दुखणे आपल्यावर ओढवून त्यास बरे केले याविषयीचा ऐतिहासिक प्रसंग 291

बाबाजी, लाहिरी महाशयांचे गुरु 201, 335, 337-1, 359, 408, 420, 421-453, 469, 472-483, 508, 559, 576; अवतारी पुरुष 421; शतकानुशतके जगावर पडत असणारा त्यांचा प्रभाव 424; यांचे नाव 425; प्रकट होणे 426; आगीपासून मरण पावत असलेल्या शिष्यास वाचवितात 426; एका मृत शिष्यास जिवंत करतात 427; आपले पार्थिव शरीर कायमचे टिकून राहील असे अभिवचन देतात 431; लाहिरी महाशयांची बदली राणीखेतला व्हावी अशी व्यवस्था करतात 436; हिमालयामध्ये एक प्रासाद जड स्वरूपात उभा करतात 439-443; लाहिरी महाशयांना क्रियायोगाची दीक्षा देतात 443; क्रियेविषयीचे सनातन नियम-निर्बंध सैल करतात 447; मुरादाबादमध्ये एका मेळाव्यापुढे प्रगट होतात 449; कुंभमेळ्या-मध्ये एका साधूचे पाय धुतात 452; अलाहाबादमध्ये श्रीयुक्तेश्वरांना भेटतात 472-477; सेरामपूरमध्ये भेटतात 479; वाराणशीत भेटतात 480; पाश्चिमात्य जगाविषयी औत्सुक्य दर्शवितात 475; एक शिष्य तयार करण्यासाठी पाठवून देतो असे श्रीयुक्तेश्वरांना वचन देतात 475, 491; लाहिरी महाशयांचे आयुष्य आता संपत आले आहे असे भविष्य वर्तवितात 477; अमेरिकेस जाण्यास मी निघालो असताना माझ्यापुढे प्रकट होतात 491; केशवानंदांबरोबर माझ्यासाठी निरोप देतात 569; क्रियायोगाच्या सर्व निष्ठावंत साधकांना मार्गदर्शन करतात 672

बाबू 261-1

बायबल उतारे 27-1, 122-3, 164-1, 167-1, 185, 192, 207-2, 208-1, 222-1, 223-1, 228-1, 243, 243-3, 244-1,2,3; 245-1,2; 257-1, 290-1, 307, 314, 337, 352, 375-1, 378-1, 383-1, 384-1,2; 385-1, 386-1, 392-1, 406-1, 407-1, 409, 416, 423, 429, 433-1, 453-1, 454, 486-1, 513, 513-2, 592-2, 619, 621, 625, 628-1, 630, 637, 668, 675-1, 678-1, 682, 683, 685, 686-1, 687, 688, 689, 690, 691

"बायोस्कोप", परमात्मस्वरूपाच्या अनुभूतीवरील प्रयोग 116-1

बालानंद ब्रह्मचारी, लाहिरी महाशयांकडून क्रियायोगाची दीक्षा घेतात 463

बिमल, रांचीमध्ये घडून आलेला प्रसंग 487

विष्णुचरण घोष, माझा धाकटा भाऊ 8, 122, 301, 302, 327, 352, 522, 640

बिहारी, सेरामपूरमधील गडी 273, 277

बिहारी पंडित, स्कॉटिश चर्च कॉलेजमधील माझे प्रोफेसर 194, 197, 201

बुद्ध 132, 423, 540-1, 587-1, 611-2, 671, 681, 689

बुलेटीन, अमेरिकन काउन्सिल ऑफ लर्नेड सोसायटीज यांचे 467-1
बोस (पाहा जगदीशचंद्र)
बोस डॉ. पी. माझी बहीण नलिनी हिचे पती 328, 329
बंगाल-नागपूर रेल्वे कंपनी 7, 260-1, 314, 353; त्यामधील माझ्या वडिलांचे स्थान 5
बंगाली 169, 310, 311, 466, 489; बंधुत्वाची भावना 414, 624, 668
बर्टल्स, फ्रान्सिस, याचे वाघासंबंधीचे अनुभव 567-1
ब्रह्मचर्य 314, 318, 618
ब्रह्मचर्य विद्यालय, रांची (विद्यालयावरील सूची पाहावी.)
ब्रह्मचारिणी, स्त्री-ब्रह्मचारी साधू 407; ब्रह्मचारी 351-1, 561
ब्रह्मा 36, 106-1, 209-1, 224, 228-1, 241-1, 316, 688
ब्राऊनिंग, रॉबर्ट, उतारे 192
ब्राऊन, प्रो. डब्ल्यू. नॉर्मन, हिंदुस्थानावरील उतारा 467-1
ब्राह्मण, "ब्रह्मविद", चातुर्वर्ण्यापैकी एक वर्ण 54-2, 106-1, 459, 544, 548, 560, 634
वृंदा भगत, वाराणशीमधील पोस्टमन 463
ब्लेच, एटी 509, 535-1, 606

भ

भक्ती 117, 178, 178-1, 210, 460
भगवतीचरण घोष, माझे वडील 4-11, 19, 21, 29, 30, 31, 38, 52, 119, 121, 123, 134, 135, 136, 152, 172, 175, 260-1, 272, 306, 312, 314, 356, 357, 489; त्यांची कडक शिस्त 6-7; खेड्यांतील शेतात त्यांना लाहिरी महाशयांचे दर्शन होते 9; ते क्रियायोगाची दीक्षा घेतात 10; माझ्या आईबद्दल त्यांना जन्मभर वाटणारी निष्ठा 23; माझ्या रांची विद्यालयाला त्यांनी दिलेली भेट 353; माझ्या अमेरिकेच्या प्रवासाला त्यांनी केलेली आर्थिक मदत 489, 496; मी हिंदुस्थानात परत आल्यावर त्यांनी केलेले माझे स्वागत 523; त्यांचा मृत्यू 560-1
भगवद्गीता 37-1, 39, 49, 57-1, 70-1, 117, 187, 242, 322, 335, 347, 448, 461, 467, 476, 492, 572, 573, 588-1, 620, 679, 682-2; बाबाजी उद्धृत करतात 448; मी केलेला अनुवाद 679
भरत, हिंदू संगीताचा प्रस्थापक 227
भादुरी महाशय, अधांत्री राहणारा संत 87-94
भारत केंद्र, एस. आर. एफ. हॉलीवूडमधील 671
भारत, जागतिक संस्कृतीला लावलेला हातभार 95, 99, 101, 231-1, 416; प्राचीन आणि अर्वाचीन संस्कृती 27-1, 416, 539, 541, 546, 559-1, 675, 675-1, 690
भारत, स्वातंत्र्य मिळाले ते 676-1; भाष्ये, शंकराचार्यांची 132-1, 186; श्रीयुक्तेश्वरांची 239-246; सदाशिवेंद्रांची 324-1, 550-1;

लाहिरी महाशयांची 55, 466; नवीन करारावरील माझे 678
भास्करानंद सरस्वती, स्वामी 463
भूतपिशाच 393-1 (मायेवरीलही सूची पहावी.)
भूपेंद्रनाथ संन्याल, लाहिरी महाशयांचे शिष्य 461
भोलानाथ, रांचीमधील गायक विद्यार्थी 368, 369

म

मठ 94, 317-2, 532
मधुमेह 250; ह्या रोगाच्या दुखण्यापासून परमेश्वराने बरा केलेला संत 291
मन 69-1, 75, 163, 170, 178-1, 181, 210, 290, 291, 324, 342, 343, 352, 364-1, 590; मनावर ताबा ठेवण्याबद्दलची कविता 547, 682-2
मनुष्य, त्याची उत्पत्ती (जेनेसिस-मधील कल्पना) 243-245, 682; (हिंदू धर्मातील कल्पना) 246-1; स्वरूप 257-1; परमेश्वराचे प्रतिबिंब आहे 244-3, 313-1, 317, 672; त्याची उत्क्रांती 144, 338, 343, 344
मनोविश्लेषणपद्धती 69-1
मरणोत्तर स्थिती 363, 366-1, 586, 596, 684
महात्मा (गांधी,यावरील सूची पाहावी.)
महाभारत, प्राचीन महाकाव्य 5, 70-1, 467, 624
महामंडल, वाराणशीमधील आश्रम 122, 451-1
महाराज, 'मोठा राजा'; मानाची एक पदवी 476
महाराज, कासिमबझारचे, सर मणींद्रचंद्र नंदी, रांची विद्यालयाचे पहिले आश्रयदाते 350, 529; त्यांचे पुत्र, सर श्रीशचंद्र नंदी 522, 529; बनारसचे 464; त्यांचे पुत्र 464; जोतिंद्र मोहन ठाकूर 464; म्हैसूरचे 535; त्रावणकोरचे 547; बरद्वानचे ज्यांनी गिरिबालांच्या निराहारी स्थितीचे कसून टिपण करून ठेवले होते 640
महावतार, बाबाजींची पदवी 423, 473
महावीर, जैन धर्माचे संस्थापक 611-2
महाशय, धार्मिक पदवी 110, 484-2
महासमाधी, महान योग्याचे भूलोकावरून निर्याण 483, 555-1, 571-1, 672-2
महेंद्रनाथ गुप्त (मास्टर महाशया-वरील सूची पाहावी.)
मॅकक्रिंडल, डॉ. जे. डब्ल्यू., हिंदुस्थानवरील ग्रीक लिखाणांचे भाषांतरकार 541
मा, पुरीची शिष्या, जिला श्रीयुक्तेश्वरांच्या पुनरुत्थित शरीराचे दर्शन होते 604
माझे सत्याचे प्रयोग 614-1
माताजी, बाबाजींची बहीण 430

मायर्स, एफ. डब्ल्यू. एच. उतारे 178-1

माया 57-2, 60, 92, 134, 145, 154, 168, 182, 225, 246, 292, 338, 376, 378, 382, 386, 390, 393-1, 433-1, 594, 601-1, 687; ईमर्सन, यांची कविता 60-2

मार्कोनी, उतारे 377-1

मार्शल, सर जॉन, उतारे 27-1

मास्टर महाशय, (महेंद्रनाथ गुप्त), विनयशील संत 108-118; यांनी 'बायोस्कोप'चा अनुभव मला करून दिला तो 114

मिल्टन, उतारे 395-1, 677-1, 688-5

मिश्र, डॉ., बोटीवरील डॉक्टर 326; शांघाय येथे त्यांनी दर्शविलेली अश्रद्धा 327

मिस्टिरीअस युनिव्हर्स, दि, चमत्कृतीपर विश्व, उतारे 382

मीराबाई, मध्ययुगकालीन गूढवादी संतमहिला 92; तिच्या कविता 92

मीराबेन, गांधींची शिष्या 608

मुकुंदलाल घोष, माझे नाव, जन्माच्या वेळचे 4; संन्यास घेतल्यावर योगानंद हे नवीन नाव घेतले 316

मुद्रा, एक यौगिक क्रिया 466-1

मुस्लिम 258, 337-3, 626, 677-1; नमाज 460; हैदराबादमधील मक्का मसजिद 539

मृत्यू, मरण 4, 354, 366-1, 387, 390, 433-1, 461-1, 486, 558, 588-591, 595, 596, 601-1, 683, 684, 685

मेगॅस्थेनीस, प्राचीन भारतातील समृद्धीवरील त्याचा उतारा 675-1

मैत्रमहाशय, यांना मुरादाबादमध्ये बाबाजींच्या देहाचे स्थूल स्वरूप दिसते 451

मोहेंजोदारो व सिंधु संस्कृती 27-1

मौंट वॉशिंग्टन इस्टेट 284, 496, 659; (सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपवरीलही सूची पाहावी)

मंत्र 27-1, 226, 581-1, 653-1

म्यूझियम, यो. स. सो. 532

म्हैसूरला भेट देण्याचे आमंत्रण 535; तेथील माझा प्रवास 536-540


## य


यम, नैतिक आचरण 321

यम, मृत्यूची देवता 413

यात्रा, बव्हेरियामध्ये थेरेसा नॉयमन यांना भेटावयास गेलो तो 510-521; असिसीच्या सेंट फ्रान्सिसचे निर्याणस्थान पाहावयास गेलो तो 520; पॅलेस्टाईनची 520; बंगालमध्ये गिरिबाला यांना भेटावयास गेलो त्यावेळची 639-655

यूआन च्वांग (ह्यूएन सांग) 559-1, 676-1

युग-गे 240, 241-1, 336-4

युरोप, मधील माझा प्रवास, इंग्लंड, जर्मनी, हॉलंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, इटली व ग्रीस या देशांमधून 519

योग, युती, जीवात्मा व परमात्मा यांचे एकत्व साधण्याचे शास्त्र 3-2, 70-1, 90, 198, 316, 319-321, 334-348, 357, 417, 466-1, 469, 470, 680, 681; त्याचे विश्वव्यापी स्वरूप 319, 320, 672, 679; अज्ञानामुळे त्यावरील होणारी टीका 320, 324-1; पातंजलीची व्याख्या 320; युंग याने केलेला शास्त्राचा गौरव 323; चार अवस्था 324-1

योगदा सत्संग सोसाइटी (यो. स. सो.) संस्थेची भारतामधील विद्यालये व कार्यक्षेत्रे 318-1, 532, 572

योगदा आश्रम, दक्षिणेश्वर येथील 532

योगमाता, भगिनी, स्ट्रॉबेरीबद्दलचे भविष्य वर्तवितात 280

योगसूत्रे, पातंजलीची 37-1, 159-1, 185-2, 312-1, 320-1, 321, 324-1, 330-1, 337-1, 550-1, 654-1, 686

योगावतार, "योगाचा अवतार" लाहिरी महाशयांची पदवी 464-1, 469, 471

योगिनी, स्त्रीयोगी 640

योगी, योगाचा अभ्यासी 3-1, 159, 346, 357, 383, 680, 682-2, 685; योगी आणि स्वामी यांमधील फरक 318-323; ('योग' यावरीलही सूची पाहावी.)

"योगदा", शास्त्रबद्ध, शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक विकास 351, 371, 506, 530, 532-2, 619

यंग, एडवर्ड, उतारा, चमत्कार या विषयावरील 441-1

यंगहसबंड, सर फ्रान्सिस 509; दिव्यानंदावरील उतारा 118-1

युंग, डॉ. सी. जी. यांनी योगविद्येची केलेली प्रशंसा 323

र

रझाक, प्राचीन भारतातील संपत्ती यावरचा उतारा 676-1

रत्ने, रोगनिवारणासाठी, उपयोग 235, 237-1, 332, 333; करून दाखविणे 439, 441

रमण, सर चं. व्यं. 550

रमा, माझी थोरली बहीण 8, 19, 25, 294, 560-1; मृत्यू 302

रमेशचंद्र दत्त, बी. ए. परीक्षा पास होण्यात त्यांची झालेली मदत 307, 308, 310, 311

रविदास, मध्ययुगकालीन संत, चितोड येथे केलेला चमत्कार 570; याची कविता 570

रवींद्रनाथ टागोर 368-374; यांची ज. चं. बोस यांजवरील कविता 106; गीतांजलीमधील कविता 374; त्यांची माझी पहिली भेट 370; त्यांनी आपल्या शांतिनिकेतन विद्यालयाला भेट देण्याबद्दल मला दिलेले निमंत्रण 370; यांचे घराणे 372

रस्किन, उतारे 315-1

राईट, सी. रिचर्ड, माझे चिटणीस 509, 516, 519, 523-528, 534, 535, 536, 562, 574, 606, 613, 632, 633, 637, 639, 644, 653, 656;

(प्रवास रोजनिशीवरीलही सूची पाहावी)
राग, सुस्वराची पट्टी 225
राजयोग, संपूर्ण योगशास्त्र 460
राजर्षी जनकानंद (लिन जे. जे. यावरील सूची पाहावी.)
"राजा बेगम," कुचबिहारच्या जंगलातील वाघ 80-85
राजेंद्रनाथ मित्र, काश्मीरसहलीच्या वेळचा माझा मित्र 273, 275, 277, 284
राम, अवतारी पुरुष 57, 423
राम, गोपाळ मुझुमदार, "कधीही झोप न घेणारा संतयोगी" 194-202; मी तारकेश्वर-मूर्तीपुढे दंडवत घातले नाही म्हणून त्यांनी केलेली माझी निर्भर्त्सना 197; माझ्या पाठीवर त्यांनी केलेला उपचार 202; यांची बाबाजी व माताजी यांच्याशी झालेली पहिली भेट 429-431
रामकृष्ण परमहंस 112, 113, 296, 661-1
राम, लाहिरी महाशयांचा शिष्य, मेलेला जिवंत केला 409-413
रामायण, प्राचीन महाकाव्य 5, 620
रामू, लाहिरी महाशयांचा शिष्य, त्याचे अंधत्व दूर केले 57
रांची विद्यालय (योगदा सत्संग विद्यालय), स्थापना 351; त्याच्या शाखा 355, 532; त्याबद्दल रवींद्रनाथ टागोरांशी केलेली चर्चा 371; यामधील कोठीमध्ये मला झालेले अमेरिकेचे दर्शन 487; ल्यूथर बरबँक यांनी दाखविलेली आस्था 506; शाळेसंबंधीच्या आर्थिक अडचणी 529; कायमची व्यवस्था 529; मधील मुलांना क्रियायोगाची दीक्षा दिली 531; शाळेच्या शैक्षणिक, वैद्यकीय, परोपकारी चळवळी 355, 530; प्रणवानंदांनी दिलेली भेट 356, 357; महात्मा गांधींनी दिलेली भेट 606, 627; आनंदमयी माँनी दिलेली भेट 635
राणी, चितोडची 570
रॉबिन्सन, डॉ. फ्रेडरिक बी. 496
रॉय, डॉ. एन. सी. पशुवैद्य 248, 249; यांचा श्रीयुक्तेश्वरांनी मधुमेह बरा केला 250
रिचेट, चार्ल्स रॉबर्ट, प्रख्यात शरीरविज्ञानशास्त्रज्ञ 171-1; अध्यात्मावरील त्यांचे विचार, तारा 171-1; आगामी शोधांबद्दल 220
रुबायत, मधील कविता, त्याचे विवेचन 422
रूझवेल्ट, फ्रांकलीन डी., उतारा 629
रेडिओ, 'फुलकोबीचा विनोद-प्रसंग' समजावून घेण्याकरिता वापरलेली उपमा 218
मन 219, 364-1; सूक्ष्मदर्शक यंत्र 218-1
रेव्हेलेशन, उतारे 228-1, 257-1, 337-3, 688-2

रोग 161; आध्यात्मिक पद्धतीने एकाचा दुसऱ्यावर नेणे 288-290; 481, 516, 596-1
रोरीच, प्रोफे., निकोलस 375

## ल

लझारी, डॉमिनिका, अन्नग्रहण न करणारी 655-1
लल्ला योगीश्वरी, "दिगंबर" शिवभक्त 279
लाओत्सू, उतारा 630, 681-1, 689
''लाईफट्रॉन्स'' (प्राणकण), अणु–परमाणूंहून सूक्ष्मतर कण 68, 392, 579-1, 583, 590, 594
लामा, एफ. आर. फॉ. 510-1
लालधारी, शरदकाकोंचा नोकर 274, 275
लाहिरी महाशय, बाबाजींचे शिष्य व श्रीयुक्तेश्वरांचे गुरु 8, 11, 36, 37, 53-58, 132, 152, 168, 172, 190, 194, 198, 202, 314, 334-335, 356, 357-1, 376, 392, 402, 417, 421, 425, 426, 429-431, 450-1, 455-471, 472, 474, 477, 478, 481, 485, 526, 531, 565, 567, 569, 572, 592-1, 663; हे एका खेडेगावातील शेतात स्थूल देह धारण करतात 9; माझ्या मातापितरांना क्रियायोगाची दीक्षा देतात 10; मला कॉलऱ्याच्या दुखण्यातून बरे करतात 12; त्यांच्या फोटोग्राफची चमत्कारपूर्ण हकीकत 12; मला आशीर्वाद देतात 24; प्रणवानंदांकरिता ब्रह्मदेवाशी मध्यस्थी करतात 36; केवलानंदांचे गुरु 52; रामूचे अंधत्व नाहीसे करतात 57; श्रीयुक्तेश्वरांचे गुरु 150, 151; श्रीयुक्तेश्वरांचे कुशलत्व घालवितात 162; यांच्या भोवती देवदूत वावरत असतात 395; स्वत:च्या स्त्रीस क्रियायोगाची दीक्षा देतात 396; तिच्या समोरून नाहीसे होतात 397; शिष्यांचे अशनिपातापासून संरक्षण करतात 398; शिष्याच्या विनंतीवरून गाडी (रेलगाडी) सुटण्यास विलंब लावतात 399; अभयाच्या मुलीचे प्राण वाचवितात 400; कालीकुमार रॉय यांच्या धन्याच्या जीवनक्रमातला एक 'चित्रपट' दाखवितात 401; त्रैलंगस्वामी यांचीप्रशंसा करतात 408; मेलेल्या रामला जिवंत करतात 409-413; आपले आत्मचरित्र पाश्चिमात्यांकरिता लिहिले जाईल असे भविष्य वर्तवितात 414; यांचे पूर्वचरित्र 418; यांची सरकारी नोकरी 419, 434, 464-2; वाराणशीमधील घरात व दशाश्वमेध घाटावर त्यांचे एकाच वेळी झालेले दर्शन 429-431; त्यांची राणीखेतला बदली झाली 434; त्यांची बाबाजींशी भेट होते 435; हिमालयातील एका प्रासादात त्यांना क्रियायोगाची दीक्षा मिळते 439-443; संसारात राहून गृहस्थधर्म पाळून

योग्यासारखे कसे राहावे हे जगास दाखविण्याचे त्यांचे जीवितकार्य 445; क्रियायोगाची दीक्षा देण्याबाबतची बंधने थोडी शिथिल करावी म्हणून ते बाबाजींस विनंती करतात 446; मुरादाबादच्या आपल्या मित्रांसमोर उपस्थित होण्याकरिता ते बाबाजींस पाचारण करतात 449; ते बाबाजींस साधूचे पादप्रक्षालन करीत असताना पाहतात 452; आपल्या वरिष्ठाच्या लंडनमध्ये राहत असणाऱ्या बायकोचे दुखणे बरे करतात 457; सर्व धर्मांतील लोकांना क्रियायोगाची दीक्षा देतात 459; जपानच्या किनाऱ्याजवळ एक मोठे जहाज बुडत आहे याचे त्यांना झालेले दिव्य दर्शन 461; प्रसिद्धीबद्दल नावड दर्शवितात 414, 464; धार्मिक ग्रंथांवर त्यांनी लिहिलेली टीकात्मक पुस्तके 54, 467; त्यांचे महानिर्याण 483; तीन शिष्यांपुढे ते पुनरुत्थान पावून प्रकट होतात 483-485; त्यांची 'योगावतार' ही पदवी 464-1, 469

लॉडर, सर, हॅरी 509

लॉरेन्स, ब्रदर, ख्रिस्ती गूढवादी 681

लॉरेन्स, विल्यम एल. सूर्याच्या शक्तीवरील त्यांच्या लेखातील उतारा 651-1

लिंकन, आब्राहम, कलकत्त्यामधील त्यांचे भव्य तैलचित्र 501-1

लिडविना, शीडॅमची संतमहिला, निराहारी 655-1

लिथुआनियन भाषा 675-1

लिन जेम्स जे. (राजर्षी जनकानंद) 508, 664; उतारा 664-1

लुईस, डॉ. एम. डब्ल्यू. 667

लेक श्राईन, एस. आर. एफ., लॉस एंजेलिस 670, 671

लेतॉ लुई, अन्नग्रहण न करणारा 655-1

लेविथॉल, रब्बी आय. एच. अतींद्रिय मन या विषयावरील त्यांचा उतारा 178-1

लैंगिक भावना 182, 244, 245; आहार आणि यांवरील गांधींचे विचार 618

लोअर्डस्, येथील चर्च 194

लंडन, तेथील व्याख्याने 509, 656; तेथील योगावरील वर्ग 656; तेथील एस. आर. एफ. केंद्र 657; तेथून आलेले पत्र 669

लंबोदर दे, गिरिबालांचा भाऊ 641, 644

ल्यूथर, मार्टिन, उतारा 459-1

व

वुझ्च् प्रोफे. फ्रँझ्, आइकस्टाट-मधील 512, 515; (डॉ. वुझ्च्)

वडील, माझे (भगवतीवरील सूची पाहावी); श्रीयुक्तेश्वरांचे 151; श्री लाहिरी महाशयांचे 418, 419

वसाहती, एस. आर. एफ. 667

व्हॅटिकन, मधील गांधींच्या मृत्यवरील संदेश 631

वाघ, हिमालयातील 41, 47, 51, 72-78, 567; कुचबिहारमधील "राजा बेगम" 80-85

यो. स. सो. (योगदा सत्संग सोसायटीवरील सूची पाहावी.)

वारसा, भारताचा, उतारा 278-1; वाराणशी, मधील आश्रम 122, 123, 134, 451-1; तेथील माझे सुरुवातीचे अध्ययन 123-128

वासना, माणसाच्या मार्गातील शृंखला 183, 214, 346, 439-1, 591, 595, 597

वॉशिंग्टन, जॉर्ज, उतारा 497

विद्यालय (रांची विद्यालयावरील सूची पाहावी.)

विद्यासागर, दानशूर 311

विराट स्वरूपाचे चलच्चित्र 388-393

विल्सन, मार्गारेट वूड्रो, हिंदुस्थान-मधील शिष्यसंप्रदाय 609-2

विल्सन, वूड्रो, उतारा 626

विवस्वत, प्राचीन काळातील प्रबुद्ध योगी 336

विवेकानंद, स्वामी 661

विशुद्धानंद, स्वामी, 'गंधबाबा', 66

विश्वभारती, टागोरांनी स्थापन केलेले विश्वविद्यालय 106-1, 373

विश्वरूपसंवेदना 10-1, 41, 338, 342; चा लहान वयात अनुभव 116, 204-209, 297; यावरील कविता 210; (परमात्मस्वरूपाची भावना व समाधी यांवरीलही सूची पाहावी)

विष्णू, परमेश्वराचे स्वरूप 224, 688-1

वेद, भारतीय धर्मग्रंथ 54-1, 63-1, 117, 132-1, 191, 325-1, 382, 420-1, 479, 514-1, 675-1, 690; इमर्सन याने केलेला गौरव 54-1; मनुष्याच्या जीवनक्रमासाठी चार आश्रमांची व्यवस्था 70-2; चार 106-1

वेदान्त, 'वेदांचा सारांश' 107-1, 132-1, 316-1, 562, 601-1

व्हिटमन् वॉल्ट, यांची कविता, उतारा 498

व्हिस्पर्स फ्रॉम इटर्निटी 497

## श

शक्ती, 'सहचरी' किंवा परमात्म-स्वरूपाचे क्रियाशील रूप 213, 688-1

शतश्लोकी, मधील उतारे 133-1, 346

शब्द, त्यांचे सामर्थ्य 16, 27-1, 330-1

शरीराचे अबाधितत्व 343-1; अॅव्हिलाच्या सेंट थेरेसाच्या बाबतीतील 94-1; क्रॉसच्या सेंट जॉनच्या बाबतीतील 118-1

शशी, ह्याची क्षयरोगाची व्यथा श्रीयुक्तेश्वरांनी बरी केली 253; शारदा घोष, माझे चुलते 275, 305, 308; तारकेश्वरच्या मंदिरात एका चमत्काराने निर्माण केलेल्या वनस्पतीच्या उपयोगाने ह्यांस रोगमुक्त केले 194

शास्त्रे 53, 125, 159, 184
शॉ, जॉर्ज बर्नार्ड, उतारा 27-1; शिकंदर, मोठा (दि ग्रेट) 175, 540; दंडामीसने केलेली त्याची निर्भर्त्सना 542; ब्राह्मणांना त्याने विचारलेले प्रश्न 544; त्याच्या मृत्यूबद्दल वर्तविलेले भविष्य 546
शिव, परमात्म्याचे रूप 59-3, 112, 222-2, 224, 278-1, 418, 425, 688; 'दिगंबर' पंथ 279-1
शिस्त, माझ्या वडिलांची 7; दयानंदांची 124; श्रीयुक्तेश्वरांची 133, 168-181; मोठमोठ्या सिद्धयोग्यांनाही पाळावी लागते 450-1
शिक्षण, योग्य प्रकारच्या शिक्षणाची जरुरी 257-1, 350; त्यावरील टागोरांचे विचार 371; त्यावरील ल्यूथर बरबँक यांचे विचार 501, 506
शेक्सपीअर, याची कविता, मृत्यूवर जय मिळविण्याबाबतची 343
'व्याघ्रस्वामी' (स्वामी सोहंग) 72-86
शैलेश मजुमदार, गिरिबालांना भेटावयास गेलो त्यावेळचे सहप्रवासी 644
शंकराचार्य (शंकर), आद्य, संन्यासधर्माची स्थापना करणारे 132-1, 181-1, 184, 283, 317, 346, 423, 601-1; श्रीनगरच्या मंदिरामध्ये मला दिसलेले दृश्य 283; त्यांची कविता 317
शंकराचार्य, म्हैसूरचे 550-1
शंकराचार्य, पुरीचे, अमेरिकेस जातात 317-2
शंकरी माईजी, त्रैलंग स्वामींची शिष्या; बाबाजींबरोबर झालेले त्यांचे संभाषण 408
श्री, 'पवित्र', मानाची पदवी 151-2
श्रीयुक्तेश्वर माझे, गुरु, लाहिरी महाशयांचे एक शिष्य 34, 59, 111, 127, 132, 136, 138, 147, 148-192, 193, 198, 204-257, 236, 264, 267, 293, 305-312, 313-1, 319, 338, 350, 353, 376, 394, 417, 421, 434, 452, 462, 469, 491, 496, 554-556, 559, 562, 570-573, 614, 642-1, 647-1, 668, 673, 686; माझी त्यांच्याशी झालेली पहिली भेट 129; त्यांचे अवतीर्ण होणे 129, 130, 524; निरपेक्ष प्रेम असल्याचे त्यांनी दिलेले वचन 130, 555; मी कॉलेजमध्ये जावे म्हणून त्यांनी केलेली विनंती 148; त्यांचा जन्म आणि त्यांचे पूर्वायुष्य 151; त्यांचे नाव 151-2; त्यांचा शाकाहार 154; त्यांनी मला दिलेली क्रियायोगाची दीक्षा 152; माझे कृशत्व त्यांनी काढून टाकले 161; त्यांचे कृशत्व लाहिरी महाशयांनी काढून टाकले ते 162; त्यांची कडक शिस्त 168-181; कुमार-बरोबरचा त्यांच्या आश्रमातील अनुभव 179; त्यांची मालमत्ता 190, 558; साक्षात्काराचा अनुभव दुसऱ्यांस देतात 205; फुलकोबी घेऊन जाण्याकरिता ते

शेतकऱ्याला सुचवितात 216; हरवलेला दिवा शोधून काढावयास तयार होत नाहीत 221; ढगांची 'छत्री' उभारतात 222; ज्योतिषाच्या खऱ्या अर्थाचे विवेचन करतात 232-241; धर्मग्रंथांतील श्लोकांचे 242-246; माझे लिव्हरचे दुखणे बरे करतात 237; डॉ. रॉय यांचा मधुमेह बरा करतात 250; शशीचा क्षयरोग बरा करतात 254; सेरामपूरला मी माझा बी. ए.चा अभ्यासक्रम पुरा करावा अशी व्यवस्था करतात 256; अफझलखानाच्या चमत्कारांची हकीकत सांगतात 258-266; कलकत्त्यात असूनही सेरामपूर-मध्ये दर्शन देतात 269; माझा कॉलरा बरा करतात 277; स्ट्रॉबेरीबद्दलचे भविष्य वर्तवितात 280; काश्मीरमध्ये आध्यात्मिक स्वरूपाचे दुखणे सहन करतात 288-293; बी. ए.ची परीक्षा पास होण्याकरिता मदतीकरिता रमेशकडे मला पाठवितात 307; मला संन्यासधर्माची दीक्षा देऊन माझे योगानंद असे नाव ठेवतात 316; नलिनीचे अर्धांगाने कुचकामाचे झालेले पाय बरे करतात 332; आपला गुरुबंधू जो राम त्याचे पुनरुत्थान झालेले पाहतात 410-413; लाहिरी महाशयांचे चरित्र लिहिण्याविषयी मला सांगतात 415, 565; त्यांना बाबाजींचे तीन वेळा दर्शन होते 472-481; बाबाजींच्या विनंतीवरून पुस्तक लिहितात 476-479; मी अमेरिकेस जावयास निघालो त्या वेळी मला आशीर्वाद देतात 489, 493; बोटीवर माझी प्रार्थना ऐकतात 494; मला हिंदुस्थानात परत बोलावतात 508; सेरामपूरला माझे व श्री राईट यांचे स्वागत करतात 524-528; मला 'परमहंस' ही पदवी देतात 557; आपल्या अंतकालाबद्दल अगोदर सांगतात 508, 557; त्यांचे या भूलोका-वरून महानिर्वाण 571; त्यांचा अंत्यविधी 572; त्यांचे पुनरुत्थान 576-605; पारलौकिक विश्वाचे त्यांनी केलेले वर्णन 576-603; त्यांची 'ज्ञानावतार' ही पदवी 469, 574

श्रीमद्भागवत 246-2

श्लेगेल, उतारा 107-1

श्वसनक्रिया थांबविणे 683; शारीरिक व मानसिक दृष्ट्या बरे करण्याने होणारे परिणाम 347-1

श्वसनक्रियेचे मान-प्रमाण, त्याचा दीर्घायुष्याशी संबंध 341

श्वास 557-1; त्याचे निरोधन, त्यावर ताबा मिळविणे 87-2, 157, 172, 209, 290, 335-343, 680, 683, 684

## स

सतीशचंद्र बोस, माझी बहीण रमा हिचे यजमान 294-302; मृत्यू 302
सत् तत् ओम् (पिता, पुत्र, पवित्र आत्मा) 209-1, 688-1
सत्य 27-1, 220, 221, 330-1, 449, 688
सत्याग्रह, अहिंसेवर आधारलेली गांधींची चळवळ 607-1, 630; पाळावयाची अकरा व्रते 608
सत्याग्रही, सत्याचे व्रत पालन करणारा 607, 618, 625, 626, 628
सत्संग, 'सत्याशी संग' 222-1, 532-3; (योगदा सत्संगवरील सूची पाहावी.)
'सदाचरणाचे आठ मार्ग' बुद्धधर्मातील 321-1
सदाशिव ब्रह्मन 324-1; त्यांचे चमत्कार 551
सनंदन, प्रणवानंदांचा शिष्य 358-360
सनातन धर्म (हिंदुधर्म) 479-1
संन्यासी 49, 259, 351-1
समभावना 218-1, 269, 327, 364-1, 586; (परचित्तज्ञान व दूरसंदेश-वहन यांवरीलही सूची पाहावी.)
समाधी, ईश्वराशी तादात्म्य झाल्याची अवस्था 37-1, 153-1, 172-2, 200, 204, 283, 321, 338-2, 378, 445, 483-1, 577-1, 603, 633, 664, 681; त्यावरील कविता 210
'सहस्र-दल-कमल' 228-1, 582
साडी, हिंदी स्त्रियांचे वस्त्र 328, 655
साधना आध्यात्मिक यमनियमाचा मार्ग 25-1, 122, 153, 573
साधू, वैरागी 25, 561-1; लाहोर-मधील, जो माझ्या आईला कंकण देतो 25, 26; हरद्वार-मधील जो पोलिसशिपायाने तोडलेला आपला हात पुनः जोडतो 45; वाराणशीमधील, जो पंडितांचा मुलगा व मी यांच्यामधील संभाषण चोरून ऐकतो 49; कलकत्यामधील कालीघाटावरील देवळातला, जो मला उपदेश करतो 60, 71
सानंदन, शंकराचार्यांचा शिष्य 132-1
सानंदलाल घोष, माझा धाकटा भाऊ 122
साप 567, 617; पुरी मठाजवळचा प्रसंग 160
सार्टोर रेझार्टस, उतारे 469-1
सॉक्रेटीस 520; उतारा 271-1; याची हिंदू साधूशी पडलेली गाठ 520-1
सॉलोमन 59, 675-1
सिद्धी 37-1, 213, 324-1, 392-1, 441-1; त्यांचा दुरुपयोग 69, 166, 263-265
सौल, डॉ. बी. एन. 232-1
सुप्त मन 69-1, 178-1, 201, 684; (अर्धचैतन्य शक्ती, अर्धजागृता-वस्था यांवरीलही सूची पाहावी.)
सूर्याची शक्ती 650-1
सृष्टी, विश्व, ब्रह्मदेवापासून निर्माण झाली 106-1; ॐकारापासून

निर्माण झाली 208-1, 337-3; युगचक्रे 241-1; शिवशक्तीकडे सोपविलेले कार्य 278-1; तिचे ध्रुवत्व 377, 378; तिचे खरे स्वरूप 379, 390, 403, 440, 594, 601, 602

सेंचरीज ऑफ मेडिटेशन्स, उतारा 684-1

सेरामपूर कॉलेज 256, 258, 271; मधील माझी शेवटची परीक्षा 303-312; च्या माजी विद्यार्थ्यांच्या संमेलनाच्या वेळी झालेले माझे भाषण 555

सेल्फ-रिअलायझेशन चर्च ऑफ ऑल रेलिजन्स, हॉलीवूडमधील 670; सान् डीयेगोमधील 670; लाँग बीचमधील 670; पॅसिफिक पॅलिसेडसमधील 670

सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिप (एस. आर. एफ.) ची आंतरराष्ट्रीय मुख्य कचेरी, लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निआ 283, 572; संस्थेचे भारतामधील नाव, योगदा सत्संग सोसायटी (यो. स. सो.) 532, 572; ची स्थापना 508; लंडनमधील केंद्र 657, 669; मधील वार्षिक नाताळचा उत्सव 658; च्या वसाहती 667; सदस्यांकरिता केलेले अभ्यासाचे पाठ 672

सेल्फ-रिअलायझेशन मासिक (पूर्वीचे 'ईस्ट-वेस्ट' मासिक) 632, 669, 678, 679-1; ची सुरुवात केली 1925 मध्ये 504; उतारे 101-1, 231-1

सेवानंद स्वामी 557, 604

सैतान ('ईश्वराचा प्रतिस्पर्धी') 393-1; (मायेवरीलही सूची पाहा)

संकीर्तन 223, 228

संगीत 224, 667

संतोष रॉय 248-250

संन्यास 48, 350, 353, 614

संमोहनावस्था 451; अनिष्ट परिणाम 69

संवत्सरचक्र 240, 241-1, 336-4

संस्कृत 27-1, 675-1; सर विल्यम जोन्स यांनी केलेला गौरव 28-1; पाणिनीने केलेला गौरव 121-1

सांख्यसूत्रे 69-1, 242-4

स्कॉटिश चर्च कॉलेज, कलकत्त्या-मधील 153, 194, 254; त्या कॉलेजमधून मला इंटरमीजिएट आर्टस्‌चा डिप्लोमा मिळतो 256

स्टीनमेट्झ चार्ल्स पी. यांचा आध्यात्मिक संशोधनाच्या आवश्यकतेवरील उतारा 629-1

स्ट्रॉबेरी, काश्मीरमध्ये घडलेली हकीकत 280

स्थितिलाल नंदी, गिरिबालांचा शेजारी 640, 648

स्वदेशी 608, 647

स्वप्ने, त्यांची मीमांसा 600, 601

स्वरूप, भौतिक जगाचे 380

स्वामी, प्राचीन संन्यासधर्माचा सदस्य 22-1, 184, 190, 386; शंकराचार्यांनी केलेली पुनर्संघटना 132-1; मला दीक्षा दिली गेली 316; योगी आणि संन्यासी यांमधील फरक 318-324; श्रीयुक्तेश्वरांनी दीक्षा घेतली ती हकीकत 474, 474-1

## ह

हकीकत, थेरेसा नॉयमनची 510-1

हक्सले, डॉ. जूलिअन, पौर्वात्य तंत्र या विषयीचा उतारा 503-1

हझरत, अफझलखानच्या अंकित असलेली परलोकातील देवता 258-266

हठयोग, शरीर-नियमनाचे शास्त्र 323-2

हब्बू, वाराणशीच्या आश्रमातील पुरोहित 128

हरीण, रांचीमधील, ते मरते त्याची हकीकत 354

हर्ष, सम्राट 559-1

हाउंड ऑफ हेवन् दि, मधील उतारा 674-1

हिंदी 465, 613, 622

हिंदू धर्म 479-1, 621, 621-1; दैनिक कर्मकांड 612

हिंदू धर्मशास्त्रे 122-3, 330-1, 343-1, 433-1, 676, 679

हिंदू हायस्कूल, कलकत्त्यामधील 119; मी जिथून मॅट्रिक झालो ते 121

हिमालय पर्वत 198, 281, 284, 285, 420-1; जवळील माझे जन्मस्थान 4; कडे झालेले माझे पलायन — पहिले 22, 59; दुसरे 39-47; तिसरे 193, 203

'हिम् टू अमेरिका' 498

हिरण्यलोक, वरच्या स्तरातील एक लोक 577, 578, 580, 584, 585, 587, 596-1, 598, 603

हुमायून, शहाजादा, त्यास आध्यात्मिक उपचारांनी दुखण्यातून बरे केले तो प्रसंग 291

हॉवेल्स, प्रोफे. जॉर्ज, सेरामपूर कॉलेजचे प्रेसिडेंट 256

## क्ष

क्षमा 624, 628-1

## ज्ञ


ज्ञान, साक्षात्काराने होणाऱ्या व्यतिरिक्त बुद्धीने होणारे 54, 186-190, 271-1, 345, 346, 460, 520-1

ज्ञानावतार, श्रीयुक्तेश्वरांची पदवी 147, 469, 574

ज्ञानेंद्रिये, मनुष्याची, पाच 68, 158-1, 181, 182, 242, 244, 342, 343, 582, 586, 590, 592, 593, 600

# परमहंस योगानंद यांचे संपूर्ण कार्य

योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया
परमहंस योगानंदद्वारा सन 1917 मध्ये संस्थापित



20 व्या शतकातील 100 उत्कृष्ट आध्यात्मिक पुस्तकांपैकी एक असे गौरविले गेलेली परमहंस योगानंदांची ही विलक्षण जीवन कहाणी तुम्हाला संत अणि योगी पुरुष, विज्ञान आणि चमत्कार, मृत्यु आणि पुनरुत्थान यांच्या विश्वाच्या अविस्मरणिय शोधांमधून घेऊन चलते. प्रत्येक माणसाच्या जीवनात अस्तित्वात असलेल्या आनंद, सौंदर्य आणि अमर्याद आध्यात्मिक क्षमता यांसाठी आमच्या हृदयांची आणि मनांची द्वारे उघडत, आत्माला तृप्त करणारे ज्ञान, मनमोहक चातुर्य आणि विनोदाद्वारे लेखक जीवनाच्या आणि विश्वाच्या गहन रहस्यांवर प्रकाश टाकतात.

लेखकाने संस्थापित केलेल्या योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया कडूनच केवळ उपलब्ध केल्या गेलेल्या ह्या संपूर्ण आवृत्तीत अंतिम प्रबंधरचनेसंबंधीच्या त्यांच्या सर्व इच्छा समाविष्ट आहेत–1946 च्या आवृत्तीनंतर त्यांनी जोडलेल्या विस्तृत साहित्यासमवेत.

*''जीवन परिवर्तन घडवून आणणारे पुस्तक.... आजच वाचायला (वा पुन्हा वाचायला) सुरुवात करा!''*

—*योग + जॉयफुल लिविंग*

''ह्या ऋषिचे आत्मचरित्र मंत्रमुग्ध करणारे आहे.''

—*द टाइम्स ऑफ इंडिया*

''पुस्तक जे मन आणि आत्मा यांचे झरोके खोलते.''

—*इंडिया जर्नल*

yssofindia.org
ISBN 81-902562-5-4
9788190256254
₹ 175

परमहंस योगानंदांचा आध्यात्मिक वारसा

AUTOBIOGRAPHY/SPIRITUALITY

*Autobiography of a Yogi (Marathi)*